महाराष्ट्रकविवर्यमुक्तेश्वरकृत

रामायण.

हें

जनार्दन बाळाजी मोडक, बी. ए.

व

वामन दाजी ओक

नीं अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन ...

[redacted] आणि

मुंबईत निर्णयसागर छापखान्याचे मालक यांनीं आपल्या
छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

१८९१

किंमत १२ आणे.

मुक्तेश्वरकृत रामायणाची अनुक्रमणिका.

एकंदर ग्रंथसंख्या १७२५

२

मुक्तेश्वरकृत रामायण.

बालकांड.

(श्लोक.)

श्रीमद्रामपदाम्बुजे हृदि सदा ध्यातुर्भयाम्भोनिधि
मुक्तेशस्य विराजते सुरुचिरा वाणी सुधास्राविणी ।
नानानाटक[illegible]
शुश्राव्या सुजनैर्मनोहरतरा संसारदुःखापहा ॥
अयत्न [illegible] जानकीप्राणमित्रं
विबुधविततिपात्रं विश्वविख्यातमन्त्रम् ।
दशरथनृपपुत्रं दैत्यसंहारमात्रं
[illegible] रामरामेति मन्त्रम् ॥
संसारसागर[illegible]मन्त्रं ब्रह्मादिसर्वसुरपूजितसिद्धमन्त्रम् ।
दारिद्र्यदुःख[illegible] वन्दे [illegible] रघुराजमन्त्रम् ॥
संसारार्णवि दुस्तरीं बहु बहु कष्टांसि की भोगिलें;
[illegible] दाराकडे [illegible] ।
विद्यावाद[illegible] सर्वांसि [illegible];
[illegible] दुर्लभ जरी निश्चितीं मानिलें. ॥
र[illegible]लतिलकाचें नाम वाचे असों दे;
[illegible]विषयरतिसुखाच्या काम चित्तीं नसों दे; ।
[illegible] नलगे ती मुक्तिचिंता करावी;
परमगति विमुक्ती आपु लागे घरावी. ॥
सुजनजनविहारी [illegible]
नवरस[illegible]धारी तापसंतापहारी ।
[illegible] दीन दासा दयाळू
[illegible] मोहजंजाळ जाळू. ॥
चिंतामणी [illegible]कामदायी, दुःखाद्रिदाहक तेज पायीं. ।
तो [illegible] शमिला [illegible] धातुमातू [illegible] ॥

[illegible]

मदायोग हा [illegible] शुंडी, करीं सिद्धि[illegible] [illegible] संगे; ।
[illegible] मनोभाव मोडी, [illegible] तोडी. ॥ ८
[illegible] हें चित्त [illegible] देतो विवेकांकुशीं [illegible] भावपर्थी; ।
[illegible] दिठीं देखतां [illegible]. ॥ ९
विधाता हरी [illegible] गाती [illegible], गणाधीश हें नाम साजे तयातें; ।
मुखीं दंत [illegible] लोपी, तया पावली [illegible] ॥ १०
[illegible] राजहंसासमी रूप साजे; ।
[illegible] तें चीर [illegible], नये ज्ञान[illegible]! ॥ ११
मुनी[illegible] वेगळी, दयाचिह्न[illegible] निराळी; ।
[illegible], [illegible] शारदे ! [illegible] देह वस्तीं ॥ १२

[illegible] नियम ज्याचे [illegible],
[illegible]ची [illegible]; ।
[illegible] रत्नें [illegible] पंक्तीस पाहें,
[illegible] चांद [illegible]. ॥ १३

[illegible]राजहंसा, [illegible]शब्दा[illegible] [illegible]
[illegible] सादर [illegible], शोकापहारी [illegible] ॥ १४
[illegible], [illegible] [illegible]
नाहीं तें तें [illegible] संती विनोदें, [illegible] ॥ १५

[illegible],
[illegible] हे [illegible];
[illegible],
[illegible] साम्य होय [illegible]. ॥ १६
[illegible] पीयूष भावें,
[illegible] सादरेंशीं भरावें; ।
[illegible] गुण [illegible] नित्य रामीं रमावें,
[illegible] रामकर्णीं [illegible]. ॥ १७

---

१. [illegible]. २. [illegible]. ३. [illegible] कमल. ४. [illegible]. ५. [illegible] सुंदरपणा. ६. [illegible]. ७. [illegible]. ८. [illegible] नये [illegible]. १०. [illegible] स्थावरजं-[illegible].

दशरथनृपवंशा थोर चिंता सुताची,
विरत विषयभोगीं, चाड नाही सुखाची ।
त्यजुनि नगर, सर्वावास, कांतारचारी;
निरखित मृगयेतें; वृद्धि काळानुसारी. ॥ १८

अंधभूत मातापिता कावडीनें सुतें श्रावणें काशियेलागीं नेतां ।
दिसा उष्ण बाधेल या अक्षमांतें, तया भावनें मार्ग चा [illegible]
तृषापीडितें ठेविलीं वृक्षसाळे, जळा शोधितां दूरी कोस [illegible]
भरी पात्र, तेणें जळीं शब्द झाला, मृगाभासदोषें नृपें [illegible]
शरें भेदितां तो म्हणे 'राम.' साथा नये कंप सुटे मुनी [illegible]
दशस्यंदनातें म्हणे प्राण जातां, 'निगों पैल ते कावडी [illegible]
पिपासार्दितां तोय पाजूनि वेगें, विनीतोत्तरीं वर्तलें वृत्त [illegible]
निरोपें तयां काढिला शल्य हातें, त्वरें पावला विप्रबाळा [illegible]
नृपें शोधितो मान्यतें तातपात्रा म्हणे माय, 'का लावि [illegible]
वदे राव, 'तो पावला मृत्यु बाणें.' तया वाक्यशूळें [illegible]
तदा सत्वरा शापले [illegible], 'पडो पुत्रशोकानळीं श [illegible]
म्हणे, 'अस्तु, ही स्वस्ति, कल्याण मातें.' चिते अर्पिलीं तीं [illegible]
अयोध्यापुरा पातला भूप वेगें, जना जाचणी दोषदुष्ट [illegible]
धना आणिले देवशत्रें, तयाशीं विरोधा मिषें, भानटी [illegible]
दिवीं पातला, थोर संग्राम झाला, कैंपी साह्य, सेने व [illegible]
तया नंतरें मोंझणा कोप झाला, नृपाशीं झुजे, वांसवो [illegible]
शरें अक्ष एकाक्ष छेदी रथाचा, त्वरें कैकयीनें दिला [illegible]
जयो पावला, तोषला राव देवा, वधूलागिं ओपी वरा [illegible]
नृपें कैकयें लालितां कैकयीतें, कुठें तापसी पातला पैं [illegible]
[illegible] पूजितां राजया तोष भारी, सुखें राहतां कैकयी शे [illegible]
[illegible] बहू जाचिला बाळभावें; वदे शाप तो, 'तूं जग [illegible]
[illegible] ओपिले सांडिले देव हातें, यदा बोलिला या करें [illegible]

१. मोठी. २. विरमी. ३. वृद्ध. ४. सर्व अरण्यास अगा [illegible]
७. वृक्षाचे ठायीं. ८. तृषेनें पीडिलीं. ९. तव हकारणें. [illegible]
[illegible] अर्पित, १२. सत्वरी. १३. माया (कैकेयी) १४. शुक. [illegible]

तयीं कैकयीनें [illegible] बोले, 'कसा औपितां संदर्भी [illegible] आले;' ।
[illegible] कोडितां तोपजाला, अयोध्यापुरीं वर्षतो मेघमाळा ॥ १०

बहुत [illegible] सुरेंद्रा [illegible] तो [illegible],
[illegible] राजचंद्रा ॥ ।
[illegible] नरेंद्रा,
त्रिभुवन[illegible] देवचंद्रा ! ॥ ११

[illegible] करी [illegible] महाराम राया ! ।
[illegible] सर्वे [illegible], [illegible] ॥ १२
[illegible] सर्वेशानंदमान; ।
[illegible] ॥ १३
[illegible] नगरा [illegible]. ।
[illegible] शृंगारिला तो बहुधा सुवर्णी. ॥ १४
[illegible], संतोषला तो, न [illegible] शापा; ।
[illegible] तपोबलें [illegible] आला. ॥ १५

[illegible] हवनकर्ता तथ [illegible],
[illegible], विष्णुपुत्रार्थ [illegible]; ।
[illegible] झाला [illegible] हो !
[illegible] हवनकुंडीं, [illegible] हो, ॥ १६
[illegible];
[illegible]; ।
[illegible],
[illegible] आणवी [illegible]. ॥ १७
[illegible] प्रसादें,
[illegible] ।
[illegible] अंगनांतें,
[illegible] देवदत्तें.' ॥

[illegible] ज्येष्ठ निशिष्टा
[illegible] कनिष्ठा, [illegible], तेंचि पावे [illegible]. ॥

१. [illegible] २. [illegible] (पुत्र [illegible] यज्ञ [illegible]) ३. [illegible] ४. [illegible]
[illegible] ५. [illegible] ६. [illegible] ८. राजास. ([illegible]) ९. [illegible]

[illegible] सुशीळा [illegible]
[illegible] र सुमित्रा [illegible] ।
[illegible] तेजस्वी [illegible]
[illegible] तेव [illegible] ॥

[illegible] नारी, तेव्हा [illegible]
[illegible], असे मृत्यु [illegible]
[illegible] पुढे, वदे [illegible]
[illegible] पाहू, [illegible]
[illegible] राहो, [illegible]
[illegible] वैकुंठधामी, [illegible]
[illegible] ज्यापुढे [illegible]
[illegible], [illegible] मानसी [illegible]
[illegible] यांनी [illegible].

[illegible] वनवासी [illegible]; ।
[illegible] खंडो तयांचे,
[illegible] सोनियाचे. ।
[illegible] विश्वाचे [illegible],
[illegible] मनुजाची [illegible]. ' ।
[illegible] चाड [illegible],
[illegible] डोहळा हा सोहळा सर्वतुष्टी. ॥

[illegible] आल्हाद सर्वां, मुनी मागती, 'धन्य [illegible]
[illegible] प्रसूतीसि काळ, [illegible]
[illegible] जननीच्या [illegible] जें कां.
[illegible] परवस्तु [illegible]; ।
सुजन[illegible] देवेश [illegible],
त्रिभुवन[illegible]. ॥

माय ते [illegible]रायणातें, 'मद्‌[illegible] हें [illegible]
[illegible] वाळ होई.' म्हणे देव तो, ' हो तसें [illegible]

[illegible]. २. [illegible]. ३. आनंद. ४. ध्यान [illegible].

[illegible] बाळ [illegible] दिवलां [illegible]पान्हाव [illegible]
[illegible] मालो [illegible] झुडे [illegible] सोंगें. ॥
[illegible] जिडिले [illegible], ।
[illegible] वृथ कोजे [illegible].
[illegible] तनु [illegible] ।
[illegible] कोटिच्याकोटि [illegible]

[illegible] गोळी
[illegible] कल्याणकाळों. ।
[illegible] वन्ही
[illegible] विभावी. ॥

[illegible] शिवल्या, [illegible] कैव [illegible] कल्या; ।
[illegible] पीयूषकुल्या, [illegible] पादपवी [illegible]. ॥

विसरुनाति [illegible] स्वत, बाळ
निरखि [illegible], [illegible] सुढाळा. ।
[illegible] बैकया मोहखाणी
उकलुनि परस्तारी [illegible] पुत्र दोनी. ॥

[illegible] राम कैवल्यदानी; सौमित्रिला शेष कोदंडपाणी; ।
[illegible] लोकव्यावतारी; रूपें चारी एकला कैटभारी. ॥
[illegible] जन्मला राम जेव्हां, [illegible] सर्वही शत्रु तेव्हां. ।
[illegible] म्हणे रावणातें, 'तुझें मृत्यु, कीं नाश सर्वे कुळातें.
[illegible] सुपाचीशवैरी. [illegible] कुंभश्रोत्री. ।
[illegible] मंकळे कर्ण दोनी, कळाहीन मंदोदरी राजपत्नी. ॥
[illegible] दिसील हे आस शेषा. म्हणे, 'मित्र हा जन्मला मित्रवंशा.
[illegible] हा मनोल्हास इंद्रा. तिघां ते दिनीं पातली तोषनिद्रा.
[illegible] खेळणें, त्यां. [illegible], रांगणें, चालणें, बोलणें,
[illegible] माजिरे, [illegible] झाले. जनीं लक्षिजे, [illegible] दिठीं दैव आलें

---

१. [illegible] २. [illegible] ३. [illegible] ४. सफल. ५. [illegible]
[illegible] ६. [illegible] ७. [illegible] ८. [illegible]. (अनुमयुक्त झाले, अस[illegible]
[illegible] १०. [illegible]. ११. [illegible].

तयानंतरें आलिया सुर्विबंधु, तुर्या आनंदें चारिही बंधु. ।
चतुर्गांठि मंगल कर्म केलें मंगी, यजुर्वेद आणि पुरे सुदामारी. ॥ ६१
चौदा विद्या वंदिती वेदवंशा, साही शास्त्रें सांगिती ज्या गुणांशा. ।
नानाभाषीं ब्रह्मविद्याविलासी तोही कौशल्या• साधी सुकेशी. ॥ ६२
असो कौशिक पातल्या, वसिष्ठांतें नृपें वंदिलें; मागपद्या भाग्य केलें. ।
मिळां भरिलें मधुसी सुखरानें; तथा रूपा रामसौमित्र याचें. ॥ ६३
राजा बोलें बोधिला श्रीवसिष्ठें. 'विश्वामित्रा पुत्र अर्पी सुनिष्ठें; ।
येणें श्रेष्ठें भाजनी जी प्रतिष्ठे, दुष्टांचिं अंत जाती विनष्टें.' ॥ ६४

ध्वज विजयपताका रुपिल्या कामधामीं;
हरिणमदसुगंधें शिंपिली पंथभूमी; ।
क्षिति क्षपणिक मुंडी वारिले; दूरदेशा
रघुपति मुनिसंगें चालले शत्रुनाशा. ॥ ६५
दशरथनरनाथें राम सौमित्र हातीं
नमुनि मुनिवरिष्ठा ओपिले प्रेमभक्ती; ।
'रघुपतिविण माझा देह निर्जीव जाणा,
पुनरपि जरि देखें तेंचि आयुष्य प्राणा.' ॥ ६६

येऊनि तीथें शरयू पवित्रें; सारूनि संध्यादिविधानतंत्रें. ।
तोषोनि दे कौशिक मंत्रबीजा अशाल्पीं राक्षसनाशकाजा. ॥ ६७
रथा प्रेरिता त्वरा पंथ सोडे; हरीचिन्हीं ज्यापरी दोष खांडे. ।
पुढां देखिलें घोर कांतार दृष्टीं. मुनी बोलिला ताटकारण्यगोष्टी. ॥ ६८

सबळ दशसहस्त्रा कुंजरांचेनि पाडें;
शत शत द्विजधेनू नित्य दाढेंत दाटे; ।
गिरिसम जड काया; प्रेतवस्त्रांग वेढी;
नरशिरकृत कानीं कुंडलाकार जोडी. ॥ ६९

भरें देखतां भीमें आवेश धीरा; करें कुंचिल्या बाणनिर्वाणधारा; ।
धनें सजिलें चंड कोदंड मुष्टी; चळे कोटिघंटारवें ब्रह्मसृष्टी. ॥ ७०
शरें फोडिली वक्षकासारपाळी; नदी वाहली शोणिताचे भकाळीं; ।
जयो राघवा; पीटती देव टाळी; नभीं गर्जती दुंदुभींच्या निराळी. ॥ ७१

---

१. स्नान. २. यतिभेदविशेष. ३. अरण्य. ४. प्रचंड. (भयंकर.) ५. वक्षस्थलरूप सरोवराचा तट. ६. आकाशांत.

अहो शेषनगराहकूर्मादिकांतें धरे कंप दाटे महापर्वतांतें; ।
शिळा चूर्ण झाल्या तळीं दंतपाळें भये अंत आला गमे राक्षसांतें. ॥ ७२
धरावेल्हाळी ताटका शीर काढ हटे सूपटें आटिली शीटनेटें; ।
मुनीमानसीं साचिलें काय भीतें; मखीं मांडिले याग वेदांगपाठें. ॥ ७३
मखा रक्षणीं राम आजानुबाहू; पुढें भक्त मारीच धांवे सुबाहू; ।
विसा कोटि शीर्षी मारिलें वीर हाका, विशा वीरकाळीं ढिलों देत धाका. ७४
रघुश्रेष्ठ तो वीर राजेंद्र भारा; करें जोडिला चापदंडीं कुन्हाडा; ।
अशोकक्षखंडासि तोडी तडाडां, शरिं रक्तशोणितें पूर जाती भडाडां. ॥ ७५
खडा राक्षसां घाल सौमित्रिमंत्रें विजे, ज्यापरी संहरी मित्रपुत्रें; ।
शिरें कुंडलें लोळलीं भूमिगोळ्या; पळे पावली भूतप्रेतें सुकाळा. ॥ ७६
कोपे चापासि जोडी शरवर, खचरां दोन निर्वाणकारी;
एकें घातें मारीचा उडवुनि गगनीं, टाकिला सिंधुपारीं; ।
एकें मारी सुबाहु; कोमळकमलिनीच्या कौशिकातें
झाला आनंद, देवे सुमन वरि बहु वर्षती हर्षचित्तें. ॥ ७७
सुबाहूसि निर्वाण साधूनि रामें मखीं याग संपोनि संतुष्टकामें. ।
मुनी बोलिला, तो म्हणे, 'वीरबाहो! चला जानकीस्वयंवरालागिं पाहों.' ॥ ७८
धनापाळवाळा मुनीराजमेळा पुढें चालतां तेथवें शून्य काळा. ।
पुढें देखिली जड पाषाणशीळा, मुनी सांगती रामचंद्रा दयाळा. ॥ ७९
'स्थळीं कल्पाश्रम राघवेंद्रा! तो हा नरेंद्रा ऋजिला वनींद्रा. ।
कामव्यकामें तनु हे नभाची ते गौतमाची वनिता वराची. ॥ ८०
वैकुंठ! काळीं तव पादधूळीं निर्मुक्त हे पातकदेहभंगें.' ।
देखोनि तो लोकहितावतारी तारी शिळा पावनदेहधारी. ॥ ८१
ऋषिवचनविनोदें ज्ञानविद्याविनोदी
पदकिलिखितावज्रें शापशैलांगभेदी; ।
दुरितपरिसातें लोहकालिम्य काळी
जगदत कनकाची भूत वेल्हाळबाळी. ॥ ८२

---

१. गांभीर्याचा ज्याचे देह भरि मोठा. अता. २. भया. ३. सूर्यपुत्र यम. ४. त्रिककमलांनी. ५. तेराव्या महिन्याचा अंत जे सीतु ज्यांनी कम गुरु. ६. निष्कलंकस्वरूप परिसातें. (परीस लागल्याने लोखंडाचे तावरे अथवा लोखंडाचे सोने होतें, असा समज आहे.)

थर थर थर कांपे चंड पाषाणशीळा;
धगधगि रवितेजातुल्य तेजाळ बाला; ।
नवल प्रगट झाली नीळधम्मिल्ल रामा
रघुपतिपदपद्मीं वीतसे शीर्षपद्मा. ॥ ८३
सुरपतिरतिरंगें भोगितां काम देहीं;
म्हणउनि पतिरायें ताडिली शापवायीं; ।
विधिजनित अहल्या गौतमाची प्रिया हो,
रघुपतिपदपद्में पावली पुण्यदेहो. ॥ ८४
नैयायिकी गौतम न्यायकारी; जारी वधू न्यायजनेमहारी; ।
ते पूतपादांबुजवात येतां भक्तिश्रुतीभूषणकेतुमाथा. ॥ ८५
निगमशिवगिरीच्या मस्तकीं भक्तिगंगा
सकळ मळ मनाचे क्षाळनी तापभंगा; ।
निकट तटनिवासी योगिये हंस जैसे;
कविशुकहनुमंतापुंडरीकादि ऐसे. ॥ ८६
ऋषी पातला तेथ. संतोषकाळा सुखें शांतवी सत्यलोकेशबाळा. ।
शतानंदही, प्रेमसंतुष्टचित्तें, सवें, चालिला कौतुकें सैंवरातें. ॥ ८७
विदेहाचिया पट्टणा शीघ्र आले. पणा दारुणा ते खुणा ज्ञात केलें. ।
'बळें ईशचापासि जो सीतें वाहे; तयासीच हे जानकी भाज लाहे.' ॥ ८८
जया चापदंडासि तो मेरु मेढीं; गुणीं ओविलें शेषब्रह्मांड चूडा; ।
दिठी देखतां सांडिती वीर होडी; धनुर्बाततेयें चढे सीत भेंडा. ॥ ८९
मिरवत गजयानी जानकी राजबाळा
निरखि महिपरळें हस्तमंडीतमाळा; ।
रघुकुळवरनीळा पारखी पद्मनेत्री;
हृदयपदकमाळेमाजि गुंफी पवित्री. ॥ ९०
'शिवधनु जड जैसें कूर्म काठिण्य पृष्ठीं;
मदनजनक हा हो! लोक लावण्य दृष्टीं; ।

---

१. केश. २. स्त्री. ३. अर्पीतसे. ४. शिरकमळास. ५. इंद्र. ६. जारिणी. ७. पवित्रचरणकमळसंबंधी वायु. ८. ब्रह्मकुमरी. (अहल्या) ९. जनकपुरोहित व अहल्येचा पुत्र. १०. पुरास. ११. शिवधनुष्यास. १२. दोरी. १३. भार्या. १४. आधार. १५. पैज, प्रतिज्ञा.

तव कुल पण ताता! सिंधु कैसेंनि लंघी
रघुवर विजयी हो चंड कोदंड भंगी[1].' ॥ ९१
भवें पातला तेंथ लंकेश[2]. रागें करें तोलितां चाप तें मान भंगे. ।
उरीं लोटतां वाटलें त्यास पीडा. उठे. संकटीं आठवी नीलकंठा. ॥ ९२
विदेही[3] म्हणे, 'सृष्टि निर्वीर झाली.' मुनीमानसीं खोंचली हीन बोली. ।
रघुणा बोलिली राम संकेतचक्षीं. उठे; पीठिली भूज; कोदंड लक्षी. ॥ ९३
पदःस्पर्श केला सैंपत्नीं कुमारीं. तया शुद्ध तो वाम अंगुष्ठ लावी. ।
ठकारूनियां लुदला हस्त चापा. भयें सांडिली शेष वाराह धापा. ॥ ९४
उभित सह मुनीची रोमराजी विनोदें.
नमित सह नृपांचीं शीसरंभारविंदें. ।
सह जनकविकल्पा स्फोटिलें चाप नेटें,
सहित मन सितेचें चाप ओढीत बोटें. ॥ ९५
सहित भृगुपतीच्या गर्व लोकीं न जोडा,
त्रुटित विकट ओढी. भंगला वज्रमेढा. ।
चलित महि. कडाडे मेरु. मंदार फुटे,
सकळ उडुगणांची मोकळी माळ तुटे. ॥ ९६
सकाळ हि जळसिंधू मीनले एकपात्रीं.
थरकत वरि नौका भंगली तेवि धात्री. ।
रविरथलग वारू मोकळे अंतराळीं.
न धरत दशदिग्भागीं पळे उष्णमाळी. ॥ ९७
भरा सूकरें नीकुरें वक्रदाढे झडें झाडितां, लोटले शैल गाढें. ।
शिरःपंकजें डोलतां चंद्रचूडें शिवा नीलकंठा धरी बाहुदंडें. ॥ ९८
नसी कुंजरीं कुंजरीं घेत थाटी. मुखें वासुकीच्या निघे ज्वाळ सोठी. ।
शिवी विस्मयें ब्रह्मकल्पांत भावी. भयें काळही कींवरा नेत्र लावी. ॥ ९९
सुरां खेचरां सर्वसंहार भाजे. भवे चक्र तैसा दिशागोळ, गाजे. ।
भयें चापचालनाचेनि नादें रसाकामदंती मदातीत मोदें. ॥ १००
तरीं जानकी घालितां माळ कंठीं, पडे लागली अंबरीं पुष्पवृष्टी. ।
जयो राघवा राजया आज सीता. नृपां लाज. त्यां वैरियां गाढ चिंता. ॥ १०१

---

१. हें सीतेचें मनोगत भाषण आहे. २. शिळा. ३. जनक राजा. ४. शत्रूंनी. ५. मोडिलें. ६. नक्षत्रांची. ७. पृथ्वी. ८. सूर्य. ९. पार्वती. १०. बुडणें. ११. भ्यालेला.

सहित विजयलक्ष्मी जानकी भाज रामा
　　वरुनि प्रगट लज्जा लंधिती भूमिसीमा. ।
तरुण प्रबळ चिंता रावणा माळ घाली.
　　उचित सम समस्तां भूतळीं कीर्ति झाली. ॥ १०२
पुरहरधनु[1] रामें भंगिलें. त्या निनादें
　　चळित रथ[2] रथाचा नाथ[3] संतुष्ट मोदें. ।
गुण[4] करि स्तवनातें. सारथी[5] कीर्ति वानी.
　　लिखित मुनिवरें हो! धाडिलें गूढवाणी. ॥ १०३
'रथागर्भिंचें[6] जोडलें रत्न[7] बाणा[8]. तया निर्मिता धन्य तूं भूपराणा.' ।
म्हणे, 'नेणवे एथिंचा अर्थ काय.' वसिष्ठाकरीं ओपि तो पत्र राय.॥ १०४
'शर तंव हरि विष्णू. तोचि हा राम जाणा.
　　धरणि रथ. रथी हो ईश की देवराणा. ।
गुण फणिवर. ब्रह्मा सारथी. साच मानीं.
　　प्रगट गुरु वसिष्ठें दाविलें हें महिम्नीं[9]. ॥ १०५
महीनंदिनी मीथिलापालपुत्री, गुणी, इंदिरा, सुंदरा, चारुनेत्री, ।
तुम्हा सून झाली रमा रामभाजा' सुखानंदबोधें करी नृत्य राजा. ॥ १०६
विदेहापुरा आणिला राव मानें. करी चौघही नोवरे एक लग्नें. ।
सिता, ऊर्मिला, मांडवी, श्रूतकीर्ति विधी ओपिल्या. जोडिली पुण्य कीर्ति. ॥
वसु, श्वेत वाजी, करी, धेनुपंक्ती गमे आंदणा ओपिल्या रत्नजाती. ।
स्त्रिया पूजिल्या. राम कोदंडधारी. अयोध्यापुरा चालती रांजभारीं[10]. ॥ १०८
भृगुपति, नृपनागासिंह, आजानुबाहो,
　　प्रगट प्रळयरुद्रातुल्य ज्याची तनू हो. ।
विकट परशु पाणीं चाप, नाराच, शोभे,
　　त्रिभुवनबळयोद्धा पातला काळक्षोभें. ॥ १०९
टणत्कारितां चाप गाजे. प्रचंड ध्वनी तो करी ब्रह्मखंडा दुखंड. ।
करें निष्ठुरें मेघ पाडी शरांचा. रथीं रामराजा विराजे विरांचा. ॥ ११०
कल्याणाचे बाण निर्वाण मारा रुद्राक्षींच्या[11] पावकातुल्य धारा; ।
गर्जे जैशा मेघमाळा गडाडी, विद्युत्पातें खड्गवल्ली तडाडी. ॥ १११

१. शिवधनु. २. पृथ्वी. ३. महादेव. ४. वासुकी. ५. ब्रह्मदेव. ६ पृथ्वींतील. ७. जानकी. ८. रामास. ९. पुष्पदंतविरचित महिम्नस्तोत्रामध्यें. १०. राजसमुदायासह. ११. शिवनेत्रांच्या.

शरीं धांविजे, वंदिजे रामपायां. गमे भार्गवा चोज हे विष्णुमाया. ।
म्हणे, 'होय हा शेषशायी निवाडें', वदे कौतुकें विधितांही अपाडें. ॥११२
म्हणे राम तो, 'ब्राह्मणा ! ब्रह्मयाती नव्हें. वीर मी विप्रधेनूनिघाती. ।
करीं शस्त्र तूझे. धरीं कंठ माझा. करीं आवडे तें महावीरराजा. ॥ ११३

अतुळबळ बळिष्ठांमाजि तूं श्रेष्ठ रामा.
बळ हत जनमेळीं हीन मी दीननामा. ।
नवगुण[1] तव कंठीं ब्रह्मसूत्रप्रभा जे,
मम धनुगुणिं एके तूलना केविं साजे? ॥ ११४

मुखीं साजिरे शोभती वेद चारी. सदां पाठिशीं बाणकोदंडधारी; ।
जगीं ब्राह्मणा ! वाड मी वीर क्षेत्री; खळां दंडणीं दक्ष तूं शापशस्त्रीं.' ॥११५

'परम अधम तूं रे ! क्षत्रियांमाजि रामा !'
'भृगुपति ! तव शस्त्रें सांगती ब्रह्मकर्मा.' ।
'अनुचित कृत नष्टा मारिली नार झुंजीं.'
'शिव ! शिव ! परि नोहे ताटिका माय माझी.' ॥११[illegible]

'निःक्षत्री म्यां सप्तकें तीन भूमी केली. साचें सांग पां कोण आम्ही ?' ।
बोलीं भारी भार्गवा तोष वाटे. कोपे मिथ्या. मानसीं प्रेम दाटे. ॥ ११[illegible]
गती जाणिजे एक ते रामरामें. जनीं मावतो वाव संग्रामकामें. ।
मही ओपिली भार्गवें भर्गमित्रा[2]. विनाशी दुजा मार्ग स्वर्गादि सूत्रा. ॥ ११[illegible]
सुखें चालिला. जाळिलें मानदर्पा. अहंभर्जनें[3] तर्जिलें कोपसर्पा. ।
जराजर्जरा निर्जरा तोष. नामें मुखें गर्जती. वर्जती शत्रुधामें. ॥ ११९
जयें भार्गवाच्या नृपा तोष भारी. गुरूशीं पुरीं पातले पुत्र चारी. ।
अयोध्यापुरीं लोक संतोषकारी गुढ्या ऊभिती, तोरणें रत्नहारीं. ॥ १२०
सुखीं राम त्या धाम कैवल्य लाभे. घरीं नृत्य तो भृत्य[4] होऊनि राबे. ।
महासिंधु तो बिंदु संसार भासे. तया विघ्न तें भग्न भेदादि नासे. ॥ १२१
हें बालकांडीं कथिलें विचारा. तो श्रोतयांचे श्रवणीं सुचारा. ।
आचार तो सादर भाव रामीं नाचार तो कामितकामकामी. ॥ १२२

---

१. नऊ दोऱ्यांचें. २. शिवमित्रास. (रामाला.) ३. अहंकाराच्या नाशानें. ४. सेवक.

अयोध्याकांड.

दशरथनरनाथें नेमिलें राज्य रामीं.
सकळजनमनाची कामना येचि कामीं. ।
अनुज[1] कयकयीचा वीर युध्याजितें[2] हो !
भगिनितनुज[3] नेले मातुळालागिं पाहों. ॥ १
रायें रामा नेमिलें राज्य देणें. सर्वां लोकां सर्व संतोष तेणें. ।
कैकेयीचीं गर्भमंजूषरत्नें[4] संग्रामातें[5] जिंकिता नेत यत्नें. ॥ २
भरत भुवनपाळा, वाड बुद्धी विशाळा,
दशरथप्रियबाळा रामभक्ती भुपाळा, ।
जननिजनकधामा[6] धाडिलें स्नेहकामा,
सहज अनुज संगीं वीर शत्रुघ्ननामा. ॥ ३
महिपति[7] महिपाळां मूळ धाडी विनोदें.
रथ, नर, करि[8], वाजी पातलें सैन्य मोदें. ।
वसनजनधनेशीं मेदिनीधेनुगौळी[9]
सकळहि करभारें ठाकती राजमौळी. ॥ ४
निखिलनिगमखाणी सारसिद्धांतदानी
वर कवि नितिमानी जाण विद्याविधानीं; ।
दशरथपथगामी भाष्यवेदांतज्ञानी
पुरुषप्रकृतिधर्मी न्यायनिर्धूतकर्मी. ॥ ५
यमनियमसमाधी ध्येयतत्त्वावबोधी[10],
अनुभवसुख ज्यांतें, योगनिद्रासमाधी; ।
परम ऋषिकुळांचा मेळ आला, पवित्रें
रघुपतिअभिषेका पातले प्रेममित्रें. ॥ ६
अयोध्यापुरीं वाजती शंख भेरी. नभीं देव ते मग्न[11] चिंतासमुद्रीं. ।
'धरानायकें ओपिल्या राज्य रामा. करी मोक्ष बंधा पुढें कोण आम्हां ?'॥७

---

१. कनिष्ठ बंधु. २. युधाजित् हें कैकेयीच्या बंधूचें नांव. ३. वहिणीचे पुत्र. (भरतशत्रुघ्न.) ४. गर्भरूप पेटींतील रत्नें. ५. संग्रामातें जिंकिता म्ह० युधाजित्. ६. पितृगृहास. ७. राजा दशरथ. ८. हत्ती. ९. पृथ्वीरूपी गाईचे गौळी असे राजमौळी म्ह० श्रेष्ठ राजे. १०. ध्यान करण्यास योग्य जें ब्रह्म त्यातें जाणते. ११. बुडाले.

बुध विबुध विधीतें बोल्ती, 'बुद्धि कल्पा.'
भजनवनविनाशीं बोधिलें त्या विकल्पा. ।
'कुटिल, कुमति, कुब्जा मंथरा राजदासी;
वसवुनि मन तीचें कैकयीभाव नासीं.' ॥ ८
'जगा डोहळा सोहळा रामराज्यें. तया विघ्न मी कोण हें भाग्य माझें. ।
वळें जोडिली वाड हे विश्वहत्या. नको पाठवूं पुण्य घेंई विधात्या.' ॥ ९
'सुधापानियां पावत्रीं स्वर्गधामा. नव्हे काज तैं लाज हे थोर आम्हां.' ।
भिडे ब्रह्मयाचे निघे देवकामा. जळे शोकसंतप्त वैकल्पनामा. ॥ १०
लपत लपत वेगें हीवेंरीं गुप्त राहे.
निकट पुरपतीची वाटिका रम्य पाहे. ।
दिनकरअवसानीं पातल्या राजदासी
कुसुमवनफळांसी न्यावया राणिवासी. ॥ ११
निघे पक्कालिंगकोशीं कुभावी. मुखें मंथरा सत्वरा तेंचि सेवी. ।
मनःसागरीं वाडवी कल्पकोटी धडाडी. म्हणे 'कैकया मूर्ख मोठी' ॥ १२
'तुझे पुत्र धाडोनि मातूळग्रामा मिसें, देतसे राव रीणीव रामा. ।
दिसे खंडलें भाग्य सौभाग्य बाळे! कळा ग्रासिली आजिपासोनि काळें. ॥ १३
तुझें दुःख देखोनि संताप जाळी. शरीरीं वळें झोंबली कृष्णव्याळी. ।
जिये नाम उद्वेग चिंता कराळी विषें झांकिली, कोण काढी निराळी?' ॥ १४
म्हणे कैकया, 'राम तो बाळ माझा. झणी मंथरे बोलसी भाव दूजा. ।
दिसे वोखटा चोखंटामाजि नाशू. पतिप्राण हा कवतीं केविं त्रासूं? ॥ १५
दिसे कष्ट पावेल तें वत्स माझें. अनिच्छा तया मत्सराचार लाजे. ।
जळो तुच्छ हे कामना कुत्सिताची. नको वांच्छना ही श्रिया लांछनाची.' ॥ १६
अघा सौंदणी आंदणी दासि कुब्जा पडे, अंगणीं लोळणी घेत गाजा. ।
पिटी हस्तकें मस्तकालागिं रागें. धरी कैकयी तीसि धांवोनि वेगें. ॥ १७
त्वरें ओपिलें मंथरे रत्नहारा. करें आंवरी अंतरें राजदारा. ।
हिये मेळतां दोहिंचे एक वाटे, विवेकारि तो संचरे तीसि नेटें. ॥ १८

१. ज्ञाते. २. योजा. ३. अमृत प्राशन करणाऱ्या देवांस. ४. वृक्षावर. ५. जवळ. ६. बाग. ७. सायंकाळीं. ८ राज्य. ९. विक्राळ. १०. चांगल्यांत. ११. भांडें. १२. विचारशत्रु. (क्रोध.)

म्हणे, 'धन्य तूं मंथरे! बुद्धिमंते! करूं काय मी?' 'माग दोहीं वरांतें.।
धरापाट घे आपल्या आत्मजातें. वरें दूसऱ्या राम धाडीं वनातें.॥ १९
मैनूवत्सरांचाचि वाचा सुनेम वदें. कानना जाति सौमित्र राम.।
वनीं राक्षसीं ग्रासिल्या राघवातें, सुखें अक्षयी राज्य तूझ्या सुतातें.॥ २०
उँर्वीभुजातें वर माग पूर्वीं. सौंपत्नदर्वीकर हे सगर्वी.।
हे एक गुर्वी मज बुद्धि माये! तें पुण्य पूर्वीं भज साधतीये.'॥ २१
सले कैकयी सर्व सांडोन लेणें. वळें आघवें रूप वैधव्यवाणें.।
निशीं पातला राव संभोगकाळीं. तया क्षोभली काळरूपा कराळी.॥ २२
क्षमालिंगनीं शांतवी राव हातें. तया झाडिलें, लोटिलें हो निघातें.।
भयें घाबरा लागला भूप पायीं. म्हणे संभ्रमें, 'नाचरें विघ्न कांहीं.॥ २३
वसे मानसीं कायसा खेद सांगें. चिरें भूषणें हेमरत्नादि मागें.'।
म्हणे, 'राज्य दे माझिया पुत्रकातें. दुजी भाष ते राम धाडीं वनातें.'॥२४
'नव्हे मीत हे. घात हा काळिजातें.' पडे. मूर्छना नावरे राजयातें.।
'जिवा जीवना नंदना दूरि जातां, नुरे प्राण हा. पातला मृत्यु आतां.'॥२५
ऐशा शोकें क्षेपेतें नृपवर क्रमितां, प्रात पूर्वे तॅमारी.
शंके देखोनि मंत्री नमनपर पुसे, कैकयीवृत्त भारी.।
'सांगें तूं रामराया सुरस निशि सरे वत्सराचेनि पाडें.
वेगें जाऊन आणीं सँरसिजनयना, पूरवीं सर्व कोडें.'॥ २६
नृपवरवचनें तो रामधामासि गेला.
नमुनि जनकवाचे सांगतां, शीघ्र आला.।
परमगुरुवसिष्ठें सर्वही सिद्ध केलें.
रघुपतिअभिषेका योग्य तें सांग झालें.॥ २७
मुहूर्तें पित्या वंदना राम आला. त्वरें कैकयीतें नमस्कार केला.।
पुसे, 'राजया मानसीं कोण वेथा?' म्हणे कैकयी, 'एक रे! बुद्धिमंता!॥२८
तुतें सांगणें एक साचार शब्दू, झणी मानिसी मानसामाजि खेदू.।
करें भूवरें ओपिली भाष मातें, पडे मागतां भूतळीं शोकचित्तें.॥ २९
अगा! वत्सरें सप्तकें दोनि येथें असो राज्य हें माझिया आत्मजातें;।
तया नंतरें अक्षयी तूंचि राजा, वसे मानसीं हा मनोभाव माझा.॥ ३०

---

१. चवदा वर्षांचाच. २. पृथ्वीपति दशरथाप्रत. ३. सवतीचे पुत्ररूप सर्प. ४. बोलणें. ५. रात्रीतें. ६. सूर्य. ७. कमलनयना. (रामास.)

सुपुत्रें तुवां दंडकारण्यपंथें लिळाकौतुकें खेळणें पारधीतें; ।
जगीं कीर्ति निर्दोष लाधेल तूतें.' म्हणे राम तो, 'आवडे हेंचि मातें. ॥ ३१
नव्हे राजयाची, खरी भाष माझी; जगीं धन्य तो वेंचला पितृकाजीं; ।
सुखें राज्य दे आपुल्या [१]आत्मजातें; वना जातसें निश्चयें जाण माते! ॥ ३२
सुवचन वडिलांचें पाळणें म्यां सुपुत्रें
सुगुण भरत बंधू प्राण माझा पवित्रें; ।
बहु सुख मज त्यातें ओपितां राज्यभारा;'
लगबग वनवासा जावया थोर वीरा. ॥ ३३
निघे, [२]श्राविताम् कैकयीमात कानीं, त्वरें कानना रामकोदंडपाणी. ।
कृपासागरा [३]नागराज्यानिवासा नसे काम तो; राम पोशी सुराशा. ॥ ३४
त्वरें पातला मंदिरीं तैं स्वमातें; नमस्कारिलें; बोधिला अर्थ तीतें; ।
सुमित्रेसही वंदिलें; जानकीतें सुखें शांतवी जावया काननातें. ॥ ३५
'नसे सासु रानीं; नसे तात गेहीं; तुम्हावेगळी आन विश्रांति नाहीं; ।
वना नेइजे स्वामिया! दासिकामा.' प्रिया बोलतां अंतरीं [४]तोषें रामा. ॥ ३६
'हठें आग्रहें ठेविसी येथ रागें, तनू मंदिरीं, प्राण धाडीन संगें.' ।
वसिष्ठें पुढें काज जाणोनि चित्तें, म्हणे, 'राघवा! नेइजे जानकीतें.' ॥ ३७
'रघुपति! तव संगें काननीं तोष मोठा;
तुजविण सुख मानी, मूर्ख तो नष्ट खोटा; ।
म्हणउनि मज नेई आपुले सर्वसेवे.'
विनवित रघुराया वीर सौमित्रि भावें. ॥ ३८
ऐसें त्याचें धैर्य जाणोनि रामें नेमें दोघां नेमिलीं संगकामें; ।
सौमित्राशीं [५]सांगकंदर्पधामें प्रेमें माता वंदिजे तात पद्में. ॥ ३९
चिरें भूषणें त्यागिलीं; वल्कलातें धरी जानकी राघवाचेनि हातें; ।
मही त्यागिलीं [६]वास घे दासि कुब्जा; करें आंवरी कैकयी भूपभाजा. ॥ ४०
वना चालिले राम सौमित्र बंधू; जनांचे मनीं माजला शोकसिंधू; ।
नदी पौरजां लोचनांचेनि वाटे; गमे चालली राम सौमित्र भेटे. ॥ ४१
हहाकार तो नावरे पौरजांचा; घरीं शंख होती तदीं राजयाच्या; ।
सिता सुंदरी चालतां पादचाली, तया दुःखभारें धरा खंड झाली. ॥ ४२

---

१. पुत्रातें. २. ऐकवितां. ३. हत्तीवर व राज्यावर बसण्याचा. ४. संतोष. ५. शरीरयुक्त जो काम त्याचें तेज ज्याचे ठायीं असा जो राम त्यानें. ६. वस्त्रें.

धरुनि कर पतीचा पूर्वद्वारप्रदेशीं,
पुसत जनकबाळा 'देवरा[1]! गूणराशी! ।
निकट पुढिल पेणें मागिल्याहूनि सांगा.'
रघुविरनयनीं ते लोटली अश्रुगंगा. ॥ ४३

मतीनिर्मळा भावशीला सुमंता[2]! रथीं बैसवी राम सौमित्र सीता; ।
त्वरें चालती, धांवती लोकमांधा[3]; पुरी ओस ते, राम जेथें अयोध्या. ॥ ४४
वना राम गेला, जनीं हाक वाजे; पडे शोकजाळीं, रडे, राव लाजे. ।
चढे गोपुरीं, चांचरे, गात्रभंगी, म्हणे, 'कीडता नीळराजीवरंगी[4]?' ॥ ४५
प्रभा बाणली चिद्घनानंदरंगें; जगन्नाथ, विद्युल्लता भाज[5], संगें. ।
गुणी गौरचांफेकळी शेष बंधू म्हणे, 'पैल जातो धराजीवकंदू.' ॥ ४६
दिठी देखतां अंतरें रूप गेलें; रथीं डोलले भावना भृंग झाले; ।
रथू लोपतां लागली दृष्टि[6] केतीं; बुडे केतु, पाहे पुढां धूळि, पंथीं. ॥ ४७
रथू लोपतां, मूर्छनापात तो हो; पुरीं ओळला शोक संताप मोहो. ।
महागर्जना माजली शंखनादीं, रथू धांवतां नावरे लोकमादी. ॥ ४८
'दयासागरा! नागरा! दीनबंधू! कृपा सांडिली; आम्हुतें अंत साधू; ।
दिठी दाखवीं आपुलें रूप रामा! नको कानना जाउं सांडोनि आम्हा.' ४९

आकांतला भाविकलोक पाहे; 'राहें सुमंता तमसातटीं[7] हे.' ।
संकेत रामें करितांच भासे, तेणें जनाशा तनुताप नासे. ॥ ५०
निद्रार्णवीं पौरज मग्न मुद्रा त्या लोकचंद्राननचारुचंद्रा ।
संकोचली पंकजप्राय दृष्टी, विश्रामली मानसभावसृष्टी. ॥ ५१
देखोनि ऐसें सकळां जनासी सौमित्रबंधूसह जानकीशीं. ।
येरीकडे दावुनि मार्ग रातीं[8] श्रीशृंगवेराप्रति शीघ्र जाती. ॥ ५२

हरिचरणसरोजीं रातले दास भावें;
मुकुटमणि तयांचा गूहकू प्रेमजीवें, ।
रघुपतिप्रियसंगें जीव आत्माची जैसा,
समरस सुखगोष्टी लोटली कष्ट नीशा. ॥ ५३

---

१. हे दिरा. (लक्ष्मणा.) २. प्रधानाचें नांव. ३. लोकांचा समूह. ४. नीलकमलासारिखा रंग ज्याचा असा राम. ५. भार्या. ६. ध्वजीं. ७. तमसा नामक नदीच्या तीरीं. ८. रात्र.

[1]हरकिरिटविषाणीं वेष्टली पुष्पमाळा;
गमत मज प्रसादा धाडिली स्नेह काळा; ।
निधि परमसुखाचा देखिली देवगंगा;
नमुनि रघुवरिष्ठें वंदिली [2]उत्तमांगा. ॥ ५४
'मंत्रीमित्रा! जाइं येथोनि मागें; झाली वार्ता सर्व रायासि सांगें, ।
चौदा वर्षीं शीघ्र येईन भेटी; लोकां बाळां शांतवीं स्नेहगोष्टी.' ॥ ५५
गहिंवरभर दाटे; सात्विकें पुष्ट काया;
नयनसलिलधारा क्षाळिलें रामपाया; ।
[3]वचनसुमन माथां वंदिलें भावनिष्ठें;
दशरथपुरपंथें चालतां खंति वाटे. ॥ ५६
भवजलधि तराया नामनौका जयाची,
रघुविर करि भावें प्रार्थना गूहकाची; ।
'विमलहृदय तूझें, पोर्ते गंभीर[5]वारा
करिं झडकरि पैठा[6] जान्हवीपैलपारा.' ॥ ५७
'[7]पदसरसिजपंकें मुक्त पाषाणदेहो,
तरुवरतनुनौकाउद्धरीं चोज कीं हो; ।
अवचट अबळा हे झालिया देवराया!
त्वरित कवण पोशी कर्कशा दोन जाया? ॥ ५८
धनें हीन मी दीन तूझें दयाळा! भरीं पोट तें. कष्टतेशीं निराळा.' ।
पदें क्षाळिलीं सात्विकें तोयधारीं; करी सांडणें देह त्या स्नेहभारीं. ॥ ५९
असो. जान्हवीपैलतीरासि गेले; भरद्वाजगेहप्रयागासि आले; ।
समाधान झालें द्विजां रामभेटी; मुनीसंमतें वास त्या चित्रकूटीं. ॥ ६०
अयोध्यापुरा पातला दूत कष्टें; जना देखतां लोचनीं नीर लोटे; ।
नमस्कारितां राजया लाज वाटे; पुसे भूप, 'सूदीप तो राम कोठें?' ॥ ६१
'हरहृदयसरोजीं ठेवणें गुप्त माझें
प्रगट तवं कराग्रीं ओपिलें यत्नकाजें; ।
त्यजुनि कवण रानीं? आणिली हाणि थोर;
जिवनधन जगाचा चोरिता कोण चोर?' ॥ ६२

---

१. महादेवाच्या मुकुटरूप शिंगाचे ठायीं. २. मस्तकीं. ३. भाषणरूप पुष्प. ४. नौका. ५. खोल उदकास. ६. आगमन. (प्रवेश). ७. चरणकमलसंबंधी धूळीनें.

'महावीर तूं धीर गा! वज्र आंगें, निजात्मा वनीं सांडिला; देह वागे; ।
गमे धाडिलें राघवें मूळ प्राणा; समाचार त्या अमृतें सिंच काना. ॥ ६३
तयां भोजनें केधवां? कोण ठायीं? तिथां वस्ति निद्रा निशी कोण भूई? ।
सिते सुंदरे राजसे माऊलीतें पदें चालवे दंडकारण्यपंथें?' ॥ ६४
तया दुःखिता मात सांगे सुमंत्री, जळाहार केले; तिथीं तीन रात्री; ।
तृणीं शेज त्यां; नेसणें वल्कलांचें; नभोवस्त्र वारी महाशीत त्यांचें. ॥ ६५
वटाचेनि दुग्धें जटाभार पृष्ठीं; तटाकें मही मंचका; वातधृष्टी; ।
उसां ग्रावशीळा; सखे वृक्ष संगीं; दिपाकार इंदू तमाकार भंगी. ॥ ६६
सिता संकटीं पावली शृंगवेळा; जगन्नायका गूहका योग झाला; ।
त्रिवेणीतटीं वंदिला तीर्थरावो; उलंघूनि गेला वना देवरावो. ॥ ६७
मुखें देवगंगातटाहूनि मातें पुरा जाइं आज्ञापिलें लोकनाथें;' ।
तयें सांगतां राव शोकें धडाडी; महामूर्च्छने जीव ज्याचे कडाडी; ॥ ६८
धरा सांडिल्या राघवें शैर्मे कोठें? श्रमें जिंकिला; तैंतला घर्म लोटे. ।
'वधू मर्म भेदे; फुटे चर्मदेहो; दया धर्म मी चूकलों; कर्म पा हो.' ॥ ६९
गळीं गुंतला मीन, जिव्हार खोंचे, तयाहोनि तो जाचणीं राव जाचे; ।
म्हणे, 'पाव गा राघवा! धांव घेईं; त्वरें जीव जातो तया भेट देईं. ॥ ७०
रघूराजया! माझिया प्राणलिंगा! मनोपद्मिनी कोमला नीळभृंगा! ।
तुवां सांडिल्यानंतरें राजहंसें दिसे ओस कांतार हें देह तैसें. ॥ ७१
पिता मी तुझा बोलतां शब्द लाजें; दयासागरा! तूंचि माहेर माझें; ।
घरीं वत्स मी धेनुकें दूरि राना वसों जातिये सोडिलें स्नेहपान्हा. ॥ ७२
बरें राघवे राजसे माउलीये; भवें तापलीया जिवा साउलीये; ।
न येसीच भेटी; करूं सांग काये?' तया चिंतनें सांडिला प्राण रायें. ॥ ७३
घनश्याम तो राम डोळां न्यहाळी; मुखीं राम, त्या मानसीं रामकेली. ।
जगाभास हा भावना राम केला; तनू त्यागितां राव तो राम झाला. ॥ ७४
जगज्जीवनानंद जातांचि पाहो, जिवें धांवला भूप सांडोनि देहो; ।
गतप्राण राजा पडे काष्ठ जैसा; उठे हाक शंखारवें राणिवासा. ॥ ७५
जिवाहोनि जो आगळा पुत्र लोकीं, गमे कानना धाडितां पुत्र तो कीं ।
दयाहीन या नेर्देखों स्नेह देहा, भयें चालिले प्राण सांडोनि गेहा. ॥ ७६

१. पाषाण. २. सुख. ३. ताताला. (दशरथास.) ४. न देखों.

'अहो पुत्र ते दूरि ठेले निदानीं; शवा सांडिल्या कोण देईल वन्ही ?' ।
वसिष्ठें वरिष्ठें विचारोनि, ज्ञानी महाराज तो पाचिला तैलद्रोणी. ॥ ७७
सुमंतासि बोले ऋषी राजवाणी, 'निघें मातुळा; कैकयीपुत्र आणीं; ।
झणी लाविसी ओखटी मात काना, गुणी राघवानूज त्यागील प्राणा.' ॥७८
त्वरें चालिला कैकटा राजमंत्री; पुढें कैकयीनंदनें तेच रात्री ।
दिठी देखिला सीवैणा सांगवेना; सुतैलें तया माखिती शीर्सहीना. ॥ ७९
उठे, ओथरें दाटला रामबंधू; म्हणे, 'चौघ आम्ही; पिता दैवसिंधू; ।
दिसे पंचकामाजि एकासि हानी;' धडाडी मनीं पेटला शोकवन्ही. ॥ ८०
पुढां तेचि काळीं सुमंतासि देखे; मुखें म्लान तो लोपला शोकपंकें; ।
पुसे तत्वतां मात् कांहीं न सांगे; निघे कैकया; पावला पूर वेगें. ॥ ८१
विना राघवें शून्य ते राजधान्नी; पडे रोदिताचा महाशब्द कानीं; ।
पुढां छत्र भंगे; पिता तैलद्रोणी दिठी देखतां मांडली प्राणहाणी. ॥ ८२

'सुजन जनक माते! नेदखें, काय केला ?'
'विकळ तनुजशोकें विष्णुलोकास गेला;' ।
'कवण कुमर?' 'सर्वां श्रेष्ठ जो कां तुम्हांसी'
'कवण विगति झाली सांग पां राघवासी.' ॥ ८३
'दशरथ पति माझे गुंतले भाषपाशीं;
दुरित ऋण हराया राम गेला वनासी.' ।
'मर, मर, मर मूढे! घात केला जगाचा,
भरतभजनचंद्रा डाग झाला अघाचा.' ॥ ८४

'आहा पापे! पापरूपे! भुजंगी! राजा प्राणें ग्रासिला प्राणसंगीं; ।
रामात्मा तो धाडिला दूरिदेशा; गेली माझी त्यासवें जीविताशा.' ॥ ८५
वदे कैकया एकटी आत्मजातें, 'तुतें साधिलें राज्य हें एकचित्तें. ।
वृथा शीणसी पामरा शोकसंगीं, पदीं आरुढें इच्छिले भोग भोगीं. ॥ ८६
'दया धर्म सत्कीर्ति लोटूनि पायें, सखी जोडिली म्यां अपख्यात माये! ।
पतिप्राणसौभाग्य ज्यालागिं गेलें; तया सर्व कष्टा तुवां व्यर्थ केलें.' ॥ ८७
'आयुष्याची लोटली सत्य सीमा; राजा काळें पावला कोळधर्मा; ।
गेल्या रामें हेंचि कल्याण मानीं, भोगीं आतां अक्षयी राजधानी.' ॥ ८८

१. अंतकाळीं. २. देशविशेष. ३. स्वप्न. ४. मस्तकहीनास. ५. अपकीर्ति. ६. मरणा.

म्हणे कैकयी, 'प्राण सांडीन आतां; कदा नेथेवे घोर हें पाप माथां; ।
पिता बंधु गेले जिये जाण पंथीं, तयालागिं मी एक सेवीन भक्तीं. ॥ ८९
पिता मायही राम माझा निजाचा; गुरु गोत्र बंधू सखा राम साचा; ।
श्रिया संपदा राम सर्वस्व पाहीं; उरे प्राण हा राघवावीण देहीं. ॥ ९०

कनकमणि सुरत्ना मस्तकीं काच शोभे;
मृगपतिदळमेळीं जंबुका पट्ट लाभे; ।
रघुपतिविण मातें राजभोगानुसंगीं
यमनिलय पुरी हे रौरवातुल्य भोगीं. ॥ ९१
रघुविरनरराया भाज हे राजधानी,
सहज मज अपत्या माय! हें साच मानीं; ।
अवचट मनमोहें आतळें राजभोगा,
परम अधम देही पात्र हो मातृसंगा.' ॥ ९२

ऋषीआननें श्रावितां सर्व मात, करूं धांवला मंथराजीवघात; ।
नको पाप हें स्त्रीवधें श्रीवसिष्ठे विचारें करें काढिला एकनिष्ठे. ॥ ९३
गुरुवाक्य हें सार सिद्धांतपात्रीं हुताशीं दही राजया वेदमंत्रीं; ।
क्रियाकर्म तें सारिलें सर्व आंगें; निघे कानना राघवाचेनि मार्गें. ॥ ९४
जटा वल्कलें वेढिलीं; भस्मधारी, निराहार, तो निर्जळी, दीन चारी; ।
त्वरें पंथ तो लोटतां शृंगवेरीं दिठी देखतां गूहका कोप भारी. ॥ ९५
वधूं चालिला भाविलें राघवातें. म्हणे, 'दुष्ट हे सर्व मारीन येथें.' ।
बळें कोपला नैषदाधीश दंदीं; तया देखतां कैकयी पाय वंदी. ॥ ९६
म्हणे, 'हस्तकीं छेदिं या मस्तकातें; तरी दुःख हें नोसंडी वाड मातें;' ।
मनीं शंकला देखतां भाव शुद्ध. म्हणे, 'नेणतां द्रोहिला संत साधू.' ॥ ९७
गुहें पूजीला, वंदिला, रामबंधू. त्वरें कैकयी क्षेम दे सत्वसिंधू. ।
म्हणे, 'मित्र तूं, राम सौमित्र सीता सुखें राहिलीं, त्या स्थळा दाविं आतां.'॥
येरें ठावो दावितां भक्तराया, दुःखें बोले 'खेदैली सर्व काया; ।
पापें माझ्या राम दुःखें अघोरी, तारी घोरी ते सखी खेदकारी. ॥ ९९
जो पाळी सृष्टि, काळीरमण धरवळी ज्या जपे सर्वकाळीं;
जो टाळी मोहजाळी, सुहृदयकमळीं वास केली सुकाळीं; ।

१. थेववत नाहीं. २. सिंहाच्या कळपांत. ३. कोल्हास. ४. यमाचें गृह. ५. ऐकतां. ६. कोळ्यांचा स्वामी. ७. दुष्ट आहे भाव ज्याचा. ८. न सोडी. ९. खेदयुक्त झाली.

जो माळी सिंधुबाळीसह शयनजळीं शेषतूळीं मवाळीं;
हा! हा! तो वृक्षमूळीं शयित कुशदळीं, भूतळीं, पांसुमेळीं.॥ १००
जे तुर्या[1], वैर्यवर्या[2], सगुणगुणमया, आत्मसाधुर्य धुर्या;
जे चर्या कार्यकार्या रचि, भरि, हरि, या विश्वआर्या, कुमार्या[3]; ।
जे स्थैर्या धैर्यधैर्या, हृदयिं बसविती चक्र[4] षड्वर्य पुर्या[5];
हा! हा! ते विश्वकार्या क्षुधित, रुदित, हो! कष्टली रामभार्या.' १०१
'वधूबंधुशीं राम कोठें सुभेटी?' 'मुनीवाल्मिकीसंनिधीं चित्रकूटीं.' ।
'त्वरें पाववीं जान्हवीपैलपारा.' 'मिही येतसें रामभेटी उदारा!' ॥ १०२
आणूनि नौका शतशा सुतारी, गेले नदीतें उतरोनि भारी. ।
मार्गीं सखे बोलति रामगोष्टी, आले प्रयागा ऋषिराजभेटी. ॥ १०३
मुनीराज देखोनि लोटांगणेशीं शिरीं वंदिले; राहिले दूरिपाशीं; ।
भरद्वाज पूसे, 'जटावल्कलांतें नृपें वाहिजे? आणिजे कां चमूतें?' ॥ १०४
वदे कैकयो, 'जाणसी सर्वभावा; जनीं राम दुष्टा करीं भस्म देवा!' ।
मनीं शुद्ध जाणोनियां रामभक्ती, म्हणे 'साधु' आलिंगिला सौख्यचित्तीं. ॥
मनीं भावितां, कामगो[6] इच्छितातें दुभे, ज्या मनीं जें रुचे तेंचि त्यातें. ।
वसिष्ठासि पूजोनि रामानुजातें स्वसैन्यें महातिथ्य केलें तयातें. ॥ १०६
मुनी वंदिले चालिले रामठाया; पुढां देखिलीं काननें शैलराया; ।
मनीं हर्षला भेटती आजि बंधू; निशाणें घनें गर्जला सैन्यसिंधू. ॥ १०७
सुमित्रे मनीं भाविता वैरभावो; तया शांतवी हस्तकें रामरावो; ।
म्हणे, 'कैकयीनंदन प्राण माझा; वनीं पातला आवडी स्नेहकाजा.' ॥१०८

ध्वजविलिखितवज्रें, पादपद्में, सुनेत्रीं
निरखित महिपृष्ठीं; पाँसु[7] मार्जि स्वगात्रीं; ।
नमन करुनि, बोले, 'दाविजे राम पायां.'
चकित तंवचि दूरें देखिलें रामराया. ॥ १०९

उत्कंठे प्राण आटे; मनमय प्रगटे; हृत्पुटीं रूप मोठें;
नेटें बोटें कपाटें न लगत नयनीं; तेज दाटे; न घोटे; ।
लोटे प्रेमें सपाटें; पुलकित उसटें; भूतटीं काष्ठनेटें;
श्रेष्ठें धांवोनि कष्टें, उठवुनि निकटें, आंवळी कंठ कंठें. ॥ ११०

---

१. चवथी स्थिति. (जागृति, स्वप्न, सुषुप्ति यांच्याहून निराळी.) २. स्वयें वरणारी. ३. कुमारी. ४, सदा रागांत श्रेष्ठ. ५. रागिणी. ६. कामधेनू. ७. धूळ.

ऐसें दोघां प्रेम आलिंगनाचें; रूपीं रूपा मीळणी एक सांचे; ।
आणी द्वैता भक्तिभावार्थ कामा; भारी रामा तोष कैवल्यधामा. ॥ १११
तैसेंच रामें अरिमर्दनातें[1] स्पर्शोनि मौळी, गुरुदंडपातें ।
वंदूनि माता, नमनें सुखावे, बोले 'सुखी कीं मम तात जीवें?' ॥ ११२
'वियोगें पिता विष्णुलोकास गेला.' जगन्नायका सात्विकें लोट आला. ।
अहो पितृनेत्रोदकें तृप्त झाला, मनें मुक्त सायुज्यब्रह्मीं मिळाला. ॥ ११३
गुरुवाक्यआज्ञे निघे जान्हवीतें; क्रिया लौकिकी सांग सारूनि तेथें, ।
त्वरें पातले, बैसले पर्णशाळे; सभा दाटली ते ऋषीवृंद मेळे. ॥ ११४
वदे कैकयी अग्रजा, 'रामराया! मनोमस्तकें नित्य झाडीन पायां; ।
पुरा चाल गा! आपुल्या शीघ्रकाळें; प्रजा पाळिं, सांभाळिं, हीं बंधुबाळें.'॥
'मुखीं शब्द एकू; करीं बाण एकू; जगीं पत्नि एकू; व्रतें काम एकू; ।
प्रतापी महीमंडळीं राम एकू.' म्हणे, 'सोडिजेना कधीं नेम एकू.' ॥११६
प्रतिज्ञापणा नोसडी सत्यवादी; नये सांगतां, बोधितां, कोटि बुद्धी; ।
उदासीन तो शीणला रामबंधू, तनू जाळण्या पेटवी जातवेदू.[2] ॥ ११७
उडी घालितां सत्वरा वन्हिकुंडीं, मुनीवाल्मिकें ओढिला बाहुदंडीं; ।
सुखें बोधिला मूळकाव्यार्थ कानीं; सुखा पावला भक्त भावार्थखाणी. ॥११८

भरतभजनकंदा शांतवी राम बंधू;
पुसुनि नयनबिंदू, पादुका दे प्रसिद्धू; ।
हृदय विनट रामीं; रंगलें प्रेम नामीं;
विगतविषयकामी त्यास नेमी सुनेमीं. ॥ ११९

'परस्त्री, परद्रव्य, सांडूनि देखा; नुलंघीं कदां वेदमर्यादरेखा; ।
धरीं सर्वदा संग हा सज्जनाचा; नको आयकों शब्दही दुर्जनाचा. ॥ १२०
अरी दुष्ट दंडोनियां, दीन पाळीं; धरीं धीर तूं आगळा कष्टकाळीं; ।
कथाकीर्तनीं वेळ फेडीं पवित्रा! सुखा पावसी कैकयीच्या सुपुत्रा!' ॥१२१

बचन सुरस कानीं स्पर्शतां, तोष मानी;
त्वरित नगर पावे, नेमिली राजधानी; ।
मन दृढतर रामीं, राहिला नंदिग्रामीं;
तपत, जपत वाचा राम संपूर्णकामी. ॥ १२२

---

१. शत्रुघ्नातें. २. अग्नि.

हें कांड दूजें रचिलें, समाप्ती ते संतश्रोतीं विमळा विभक्ती ।
आकर्णिती त्यां हरि चक्रवर्ती काढी विवर्तींहुनियां भवार्ती. ॥ १२३

अरण्यकांड.

त्या चित्रकूटाचळबांधवातें सांडोनि, संगीं सहबांधवातें ।
साध्वीवधूशीं मुनिबांधवासीं अध्वान शोधी अरिअध्वरासी. ॥ १
पुढें पुढें राघव चक्रवर्ती; संगें प्रिया मानसतापहर्ती; ।
पाठीं धैरावाहक वीरराणा चाले, करें ओढुनि चापबाणा. ॥ २
पदोपदीं पादपनीळछाया देखोनि बैसे रघुराजजाया; ।
भारावली, टाकुनि श्वास राहे; 'किती' पुसे, 'मेदिनिवाट आहे?' ॥३
हळू हळू कोमळ पाद ठेवी; तृषानळें निर्झरनीर सेवी; ।
दुरावतां राघव राजसी हे धांवा करी, दावुनि दीर्घ बाहे. ॥ ४
वृक्षातळीं वल्लभराजलोभें श्रांतोदकें आननचंद्र शोभे; ।
सुपल्लवें मारुत मंद वारी चुरी पदें शीतळतोयधारी. ॥ ५

पथि पथिकवधू त्या पूसती रामजाये,
'कुवलयदळनीळा कोण हा सांग माये!' ।
हसितमन मिनाक्षी रामचंद्राननातें
निरखित, पतिराजा जाणवे जाणत्यांतें. ॥ ६

कांतासंगें वीर कांतार पायें जातां, मैंता मंगळाची सुखावे; ।
लाता मोडी वृक्ष जातां विनोदें, कुक्षीं लक्षी पावकाक्षी विरोधें. ॥ ७
अंगारनेत्री प्रळयाग्निवक्त्री, कपाळमाळाधर लंबश्रोत्री, ।
विशाळधूम्रांकितवर्ण गात्री, कुरूपतें कंपित भूतधात्री. ॥ ८

तरस तरळ, म्हैसे, सिंहशार्दूळपाळे,
निवटुनि कर शूळें ओंविले एकमाळे; ।
नरमृगपशुरक्तें तुंबले गाढ सिंधू;
लवथव करि जिव्हा सेवना विश्वकंदू. ॥ ९

धरुनि कर कराग्रें, मैथिली मुक्तकेशी
उचलुनि, लवलाहीं वाहिली स्कंधदेशीं; ।

---

१. चित्रकूटपर्वतरूप बंधूतें. २. मार्ग. ३. सार्वभौम. ४. पृथ्वी वहाणारा शेषावतार. (लक्ष्मण). ५. वीरश्रेष्ठ. ६. झऱ्याचें पाणी. ७. आई. (पृथ्वी.) ८. मंगळसंज्ञक महाची.

रुदित जनकबाळा घोर कारुण्यशब्दें
दशरथकुळमित्रा कोप तो काळ क्षोभे. ॥ १०
भुजविटप विखंडी खड्गतेजाळधारें;
गिरिवरसम ग्रीवा पीळिली अंगभारें; ।
सुरपतिकरवज्रें चंडशैलांग भंगे;
मृत महिवरि तैसा त्यागिला प्राण वेगें. ॥ ११
जगा कंटका दंडकारण्यवासा विभांडोनि केले ऋषी पात्र तोषा; ।
मुनीअत्रिचा वास अंबीरदेशीं उलंघोनियां भेटि त्या कुंभजासी. ॥ १२
सुतीक्ष्णः शरभंगश्च मंदकर्णी महामुनी ।
दर्शनें देति संकेता लंकानाथवधेच्छया. ॥ १३
अगस्त्यासि आल्हाद देखोनि रामा करीं शस्त्र कोदंड दे देवकामा; ।
दिसे कीर्तिचा लाभ त्याचेनि बोलें त्वरें पंच न्यग्रोध टाकूनि आले. ॥ १४
गोदावरीपुण्यतटीं पवित्रा शाळा सुरम्या रचिली विचित्रा; ।
सीतामनोपंकजभृंगवासी सेवे सुखें सादर बंधुपाशीं. ॥ १५
सुरसफळजळातें नित्य आणूनि देतां,
तिळभरि तरि नेघे नेदितां रामसीता. ।
प्रथमचि फळ भक्षी भावना जानकीतें
प्रतिदिन उपवासी राघवानूज तेथें. ॥ १६
वनीं शाबरी काळखड्गार्थकामी तपा आचरे तामसी वृक्षगुल्मीं; ।
महाखर्ग स्वर्गूनि येतां सुमित्रें करें झेलिलें श्रीपर श्रीपवित्रें. ॥ १७
वाहों पाहों भावितां वीरबाहो देतां घावो खंडला शांबदेहो ।
वार्तारंगें राम संतुष्ट झाला वैरा हेतू मृत्यु तो वैरियांला. ॥ १८
खचर सबळ साचा शांबनामा निघातें
नकळत मृत झाला, लक्ष्मणाचेनि हातें; ।
अटत वनफळांतें देखिला तेचि रानीं
सबळ तनुजहंता राक्षसी तर्क मानीं. ॥ १९
शूर्पनखी कुनखी निजनंदना उपरती परती गत जी वना ।
जिवननाश वनीं शर पारधी वधिन मी सुगमी वनिताविधी. ॥ २०

---

१. बाहुरूप खांद्या. २. मान, कंठ. ३. अगस्त्यमुनीशीं. ४. वड. ५. वृक्षाच्या जाळींत. ६. शूर्पनखा.

कपटनागर सुंदर बाळिका; करयुगीं [1]नवपंकजमाळिका; ।
[2]फणिवरा सुवराप्रति वादिनी नवरितां वरितां तव [3]कामिनी. ॥ २१
'विजनिं म्यां जन सांडुनि आदरें मनयमें नियमें तप आचरें; ।
[4]उडुप शंकर तो जळसंगमीं तुज पती जपती बहुकाळ मी.' ॥ २२
'जननि जनकपुत्री, तात सीताविलासी;
[5]वचननिगम त्याचा आडवा [6]तोयराशी; ।
प्रिय वद वडिलांतें; भाव पावेल सिद्धी.'
विनवित रघुराया पापकापट्यबुद्धी. ॥ २३
म्हणे राम, 'तो कोण पाहेन दृष्टी; असे मारिला पुत्र तें वैर पोटीं;' ।
म्हणे दुष्ट, 'हे दोघ भक्षूनि, पाठीं वधू सुंदरा रावणा नेउं भेटी'. ॥ २४
गजगती [7]जगतीवरि चामके; मलमती लपती [8]पतिसामुखें; ।
कपटणी नटणी वधु पातकी; रघुपती कुमती मन पारखी. ॥ २५
त्वरें आश्रमीं पातलीं राम सीता; नमस्कारिलीं पाय वंदूनि माथां; ।
म्हणे, 'पाळिजे स्वामि! या बंधुभाजे;' मुखें बोलतां बोल ते मंद लाजे. ॥ २६
म्हणे जानकी, 'राम! चातुर्यखाणी सुमित्रासि हो! लाधली दिव्य राणी;'।
रघुश्रेष्ठ तो लक्षितां लोचनातें क्षणें जाणिजे राक्षसीलक्ष्मणातें. ॥ २७
निजखुण गुणसिंधू पत्र लेहूनि पाठीं
निरखित [9]फणिराजें सूदला हस्त कंठीं; ।
'नववधु अबळा मी भीतसें.' योगभारें
पसरत महिपृष्ठीं कामभोगानुकारें. ॥ २८
वृक्षोदरीं दाटुनि पादभारें असीलता काढुनि, खड्गधारे ।
भाळातळीं नासिकनाळ छेदी; दंतावळी आननमूळ भेदी. ॥ २९
अहो निश्चयो ज्येष्ठआज्ञेन केला विवाहार्थ नासापुटीं सिद्ध झाला; ।
सवें बोलती ते तया कर्ण दोनी वऱ्हाडी पुजा राक्षसी रामबाणीं. ॥ ३०
बहूशोणितें देह भासे विकारी; खरादीक बंधू [10]जनस्थानचारी ।
दिठीं देखतां कोपले मद्यपानी; बळें सिद्ध झाले सळें शूळपाणी. ॥ ३१
महाभीम सेना सहस्रैक चौदा कळी माजले; पेटले [11]घोर द्वंद्वा; ।
वटी वाटिका वेढिली धोरनेटें; पुढें हाकिले वीर सौमित्र धीटें. ॥ ३२

१. नूतनकमलांची माळा. २. लक्ष्मणा. ३. स्त्री. ४. नौका. ५. भाषणरूप वेद. ६. समुद्र. ७. पृथ्वीवर. ८. पतीच्या सन्मुख. ९. लक्ष्मणानें. १०. जनस्थानसंज्ञक स्थळीं राहणारा. ११. भयंकरयुद्धा.

रणीं भैरवाकार झुंजार राणा गुणीं जोडिलें काळचक्राख्य बाणा. ।
शिरें भंगितां लंघिती खंडखंडें; कळी मातली, नाचती रुंडमुंडें. ॥ ३३
शरीं सूटतां रामहस्तीं झडाडें, नदी लोटल्या शोणिताच्या गडाडें; ।
हिये फूटतां पर्वताचीं तडाडें, पुरें मोडिती वृक्ष जाती तडाडें. ॥ ३४
दिसे सिंदुरें रंगिलें गौतमीतें; भूतें साधिती पर्वकाळासि तेथें; ।
तटीं डाकिणी, शाकिणी, रुद्रचंडें, शिरें बोपिती बायनें सोळवंडें. ॥ ३५
शिरें गर्जती अंबरीं रामनामें; धडें नाचती कामनाशून्यकामें; ।
पदें पीटिती स्वर्गसायुज्यधामें; परानंदही नावडे त्या विरामें. ॥ ३६
बळी सिंह तो बाणकोदंडधारी महाराक्षसां काळ कल्पांतकारी ।
शरें मारितां थोर दैत्यांसि धाका पळाले भयें सांडिलें सप्त लोकां. ॥ ३७
खरा दे वरा बाण निर्वाणघातें; धरी दूषणाच्या वरें भूषणातें; ।
महीं मस्तकें पाडिलीं दूषणाचीं दशा आगळी त्रीजगत्रीदशांची. ॥ ३८
खरा त्रीशिरा दूषणा घात प्राणें नव्हे मृत्यु तो तृप्त स्वानंदपानें; ।
फुलें इंद्र वर्षे जगीं जैत्ररामा जनस्थान वोपी द्विजां भोगकामा. ॥ ३९
पतीहीन झाल्या वधू राक्षसांच्या; वदे शूर्पनाखी तयां भीत वाचा; ।
'पळा, पातली काळसौमित्रधाडी; कळा वांचवा कर्णनासीकजोडी.' ॥ ४०

सकळअरिवधूंतें एक वैधव्य आलें;
विलपत खचरी त्या दैव निर्जीव झालें ।
म्हणत मग, 'पळा हो! पातली रामधाडी;
त्वरित श्रवण नासा वांचवा हेचि जोडी.' ॥ ४१

मुखें पीटिती, पातल्या सर्व लंके; रुपा नाश झाला दिसे शूर्पनाखे; ।
भयें देखतां कंप सर्वांसि दाटे; दिसे बोखटें मृत्यु रायासि वाटे. ॥ ४२
'बळी राम सौमित्र भूपाळवंशी; सवें जानकी भाज लावण्यराशी; ।
सुखा आणितां रावणालागिं जाणा, तया वेसनें मूकलें नाककाना. ॥ ४३
खरा त्रीशिरा दूषणा सर्वसेना सुद्धा मागतां, वेचिलें प्राणदाना; ।
प्रतापें धुरा धाडिल्या यमलोका; मुखें सांगतां पावसी चंडशोका. ॥ ४४

स्नपन करुनि रक्तें, भूमिलिंगासि बोजा
कुसुमअरिविरांची वाहिली लक्षपूजा; ।

---

१. रक्ताच्या. २. जयशाली रामावर. ३. स्त्रिया. ४. कान. ५. भार्या. ६. वैर उगविणें. ७. स्नान.

त्रिभुवनतमहारी लाविलें कीर्तिदीपा.'
  [1]दशवदनपतंगा देखतां कोप झेंपा. ॥ ४५
प्रळयनयनकुंडीं क्रोधज्वाळा धडाडी;
  चुरुनि कर कराग्रें श्मश्रुवाळाग्र तोडी; ।
धरुनि [2]अधर दांतें, मर्गजीखर्ग हाले;
  'धिग धिग मम प्राणां; मानवीं यश नेलें.' ॥ ४६
'कुशळमति मरीची मातु आइक मामा!
  दशरथसुत [3]धाती थोर तो रामनामा; ।
सगुण वधु तयाची चारुनेत्री, विशाळा;
  करिन हरण तीचें चाल संगें दयाळा!' ॥ ४७
वारी मरीची, परि मूढ कांहीं नेघे मनीं; ताडित खड्गघायीं; ।
धाकें उठे मातुळ पंथ चाले; दोघे रथारूढ वनासि आले. ॥ ४८
भयें थोकला अंतरें लंकनाथू; मरीचीन जाणीतला काळमृत्यू; ।
स्मरे दानवी मोहनी मंत्रमाया; कुरंगाकृती आवगे हेमकाया. ॥ ४९
मायामृगीं वाउगि स्वर्णकांती; नारीस तेथें अतिमोह भ्रांती; ।
त्याचेनि संगें नरवीर ज्ञानी मायामृगीं धांवत कष्ट रानीं. ॥ ५०
सरक चवक दावी, थोर्केला, पाठि चाटी;
  पळत पळत पाहे मागुता दूरि दृष्टी; ।
[5]श्रवण नयन पायें खाजवी; भूमि हुंगे;
  [6]विचरत मृगचेष्टा पर्णशाळेसि नीघे. ॥ ५१
रघुपति नरसिंहा काळशार्दूळ दृष्टी
  कनकहरिण पाहे चामके भूतसृष्टी; ।
निरखित जनकाची [7]नंदिनी राघवातें
  नमुनि, म्हणत, 'याचा कंचुकीकाम मातें. ॥ ५२
मायामृगालागिं वधूनि बाणीं चैतन्यचर्माबर शीघ्र आणीं; ।
तें दे दयाळा! मज कंचुकीतें.' 'निकें' म्हणे राघव जानकीतें. ॥५३
'सौमित्रा! तूं राख हे पंचवाटी पाठीं भाता [8]सज्यकोदंडकोटी. ।
सातै सिंधू सूदले काळ वाटे थांबे बोले, 'बाण सोशील कोठें?' ॥५४

---

१. रावणरूप टोळास. २. ओष्ठ. ३. घात करणारा. ४. उभा राहिला. ५. कान. ६. आचरीत. ७. कन्या. ८. सज्य धनुष्याचीं अग्रें.

मृगें जाणिलें लागला मृत्यु पाठीं; पळे सत्वरा मेदिनीचक्र लोटी; ।
भयें मागुता दृष्टि लावूनि पाहे; दिसे ठाकता पारधी वीर लाहे. ॥ ५५
मृगें काढिला अंतरें रामराजा नदी संगमा वोत लंघीत पैजा; ।
महीमाळ ते जात फोडी ठिकाणें बळी पाठिसी वीरबाहो स्फुराणें. ॥ ५६
नभीं संचरे हेमसारंग[1] पाहे; त्वरें ताडिला काळनिर्वाणघायें; ।
पडे, प्राण त्यागी, करी थोर शब्दू; म्हणे, 'धांवण्या धांव सौमित्रबंधू!' ॥ ५७
वदे जानकी, 'देवेरा[2]! धांव वेगीं; वनीं हंस तो वेढिला शत्रुकागीं;' ।
'नव्हे जाण हो! माव हे राक्षसाची;' रमा क्षोभली वर्म जिव्हार खोंची.॥५८
'माझा मनीं वाहसि कामभावो रक्षीत राहें तरि येथ ठावो;' ।
भावीक तो जाउनि बंधु पाहे दुःखाटवीभंजक नाम लाहे. ॥ ५९
'हृदय[3] विमळ माझें भाव चोखाळ रामा!
तरि मज मुख तूझें दाखवीं रंगधामा! ।
कुचिळवचन दोषें भेटि षण्मास राहो.'
वदत धनुषरेखा काढिली चंड पाहो. ॥ ६०
उल्लंघितां हे मम चापरेखा घोरांटवीसागर[4] गाढ देखा; ।
शोधोनियां राक्षसमीन नेती बोधोनि गेला रघुराजपंथीं. ॥ ६१
रचित परशुमुद्रा काय तो वेणुदंडी;
जिवन तरुजपात्रीं, तुंड मुंडाग्र मुंडी; ।
प्रणव जपत ध्यानीं, वृद्ध निस्तेज डोळे;
कपटतनु यती[5] तो पातला पर्णशाळे. ॥ ६२
निष्केशानुज[6] मैस्करीवर[7] नटे, जे तस्करी भावना;
लक्षी भास्करवंशपुष्करमणीजाया जगत्पावना; ।
शुष्का कामिकवासना मनिं धरी, ज्या मृत्युदा दुस्तरी;
दुष्काळीं अशना[8] सदन्न भरणा दे पुष्कळी ज्यापरी. ॥ ६३
गर्जोनि नारायणनाम तोंडें, भिक्षासनी दावित हस्तभांडें; ।
लंघूनि रेखा फळ देत येरी; तो हस्तकातें धरि कामचारी. ॥ ६४
वटी वाटिका रम्य कासारडोहीं वसे लोचना मीनचांचल्य पाहीं; ।
बकाच्या परी पाणि चंचूनि रागें, बळें वोढिली पद्मिणी[9] जेंवि नांगें[10]. ॥ ६५

---

१. सुवर्णमृग. २. दिरा. (लक्ष्मणा.) ३. अंतःकरण. ४. भयंकर अरण्यरूप समुद्र. ५. संन्यासी. ६. कुबेराचा कनिष्ठ बंधु. (रावण.) ७. संन्यासिश्रेष्ठ. ८. भक्षणा. ९. कमळीण. १०. गजें.

तिरस्कारसंस्कार लावोनि रामीं निघे पुष्करीं[1] दुष्कराचार कामीं; ।
दयाशुष्क तो रामधानुष्कधाकें[2] पळे पुष्कराक्षी[3] बळें सूनि[4] काखे. ॥ ६६
वाहूनि खांदीं गगनीं उडाला; शोकें अहाकार जनासि झाला; ।
चाले रथारूढ निराळमार्गें, सीतारवें ब्रह्मकटाह जागे. ॥ ६७
'त्वरें धांव, धांवें पती लावलाहें; महासंकटीं वाट तूझीच पाहें; ।
उपेक्षूनि मी दीन गेलासि कोठें? दशाशीर नेतो बळें काळ वाटे. ॥ ६८
त्वरें धांव रामा! सुखानंदधामा! क्षणी गुंतसी आनभावीककामा; ।
महातक्षकें भक्षिलें राक्षसें या सुपर्णापरी[5] धांव धन्वंतरीया. ॥ ६९
रुपें कोटिकामा, श्रुतीसारनामा[6], सदाचारसीमा रमारंगधामा; ।
मुनीमानसींध्येयरूपें ललामा[7], हरी दुर्गमा धांव वैरीविरामा! ॥ ७०
उपेक्षूनि मी दीन, गेलासि रागें, वनीं राक्षसें नेलि हें कोण सांगे. ।
धरे हार, मुक्ताफळें, मुद्रिकेतें निवेदूनि पूजा, म्हणे, 'सांग मातें.' ॥ ७१
बहु त्यागिले भोग संसारगेहीं, मुनीनिर्जरां वास वैराग्यदेहीं, ।
त्वचा कांचनी[8] याचितां मायरूपा[9], पतीआत्मजा चूकलें ज्ञानदीपा. ॥ ७२
सखा सत्य निष्पाप सौमित्र पाठीं, तयालागिं ते सद्य श्रीरामभेटी, ।
मनीं दुष्ट मी द्रोहिला साधु चित्तें, तयालागिं हा पापिया नेत मातें. ॥ ७३
　　रघुपति! तुज प्रेमें क्षेम देतां विनोदें
　　　　जवकि निकरिं वैरी हार फेडी विषादें; ।
　　गिरि, सरि, तरु, आतां मंडलें आड ठेलीं;'
　　　　म्हणउनि बहु शोकें जानकी साद घाली. ॥ ७४
मुखें गाजतां जानकीशोकशब्दू, वनीं स्थावरां जंगमां होत खेदू. ।
खगाधीश[10] तो दंडकारण्यवासी त्वरें धांवला, क्षोभला कोपराशी. ॥ ७५
　　गिरिवरसमकाया, वज्रचंचू विशाळा,
　　　　त्रिकट तिखट नाखें, तेज लोपी प्रवाळा; ।
　　खगगनगतीतें कुंठवी[11] पक्षवायो,
　　　　रघुपतिप्रिय प्रौढी आड ठाके जटायो. ॥ ७६

---

१. आकाशीं. २. रामरूप धनुर्धराच्या भयानें. ३. कमलपत्राक्षी. ४. असून. ५. गरुडापरी. ६. वेदतत्त्वरूप नाम ज्यांचें. ७. भूषणा. ८. सुवर्णमय. ९. कपटरूपा. १०. जटायु. ११. कुंठित करी.

रथीं सारथी मारिलें अश्व घायीं, बळें भंगिलें चंड कोदंड बाहीं. ।
झडें हाणतां रत्नकोटीर[1] नेले, नखें लुंचितां[2], केश निःशेष गेले. ॥ ७७
नव्हे चंचु हे, कौळदंभोलिधारा[3], सुटे रावणा प्राणधाकें दरारा. ।
सिता संकटीं सांडिली प्राणवेथें, पळे नागिवा भूतवेताळपंथें. ॥ ७८
फिरे, लाजला दुष्ट कापट्यकर्मी, म्हणे, 'मागुता झूज निर्वाण वर्मी.' ।
तनू त्यागिती, बोलती वर्म दोघे, खगें खंडिला नष्ट अंगुष्ठ रागें. ॥ ७९
तळीं पावतां पादअंगुष्ठहानी, त्वरें राक्षसें छेदिले पक्ष दोनी. ।
महीमंडळीं शोणितें[4] पूर जाती, पडे पर्वतातुल्य तो, राम चिंती. ॥ ८०
दशस्यंदनाची[5] स्नुषा[6] स्कंधभागीं, मन स्कंदतां ती जनस्थान[7] त्यागी; ।
पळे खस्तआवस्त आकाशपंथें, महास्फुंदनें स्फुंद तो जानकीतें. ॥ ८१
मातंगाद्रीमस्तकीं[8] जानकी ते टाकी खूणे भूषणा मारुतीतें; ।
भावी, 'रामा जाणवू वृत्त माझें, नेलें मातें राक्षसें लंकराजें.' ॥ ८२
नभीं ठाकितें कोण पाहे प्रतापी, दिठीं देखिला तापसी काळरूपी; ।
बळें हांव ते नावरे रुद्रराया; म्हणे, 'पातलों थांब निर्वाणघाया.' ॥ ८३
उडाणीं दणाणी मही मेरु डोले, महागर्जनें जीव निर्जीव झाले; ।
पिटी वज्रबाहू, गमे काळ राहू, अरी प्राणचंद्रा कुंहू[9] होत हा हू. ॥ ८४
उडाणें ध्रुवाच्या पदा वीर गेला, तळीं भाविलें रावणें अंत आला; ।
म्हणे, 'विघ्न हें दूसरा कोण आला ?' पळे संकटीं शीघ्र लंकेसि गेला. ॥ ८५
कपीहस्तिचें थोर आमीष गेलें; म्हणे, 'पापिया ! पुण्य तूझें उदेलें; ।
पुढां लौकरी येतसें याचि काजा; बळें दोषसंचार झाडीन तूझा.' ॥ ८६
लंकेश लंकेप्रति पावतां हो, शंके मनीं जाळिल रामरावो; ।
विभीषणाचें मन शुद्ध जाणे; झाला कुळाचा बहु नाश येणें. ॥ ८७
मानूनि एकांत, अशोकवाटीं रक्षोगणीं रक्षित पांचकोटी, ।
भूगर्भिचें माणिक जीव रत्नें ठेवूनि, मोही बहुतां प्रयत्नें. ॥ ८८
स्मराचेनि मारें अंपस्मार[10] वाढे चढे चारसंचार वीचारवाढे; ।
जगन्माउलीलागिं संभोग याची; गमे वेंचिली जीविताशा तयाची. ॥ ८९
'उगा ब्रह्मया ! नोवें[11]लें, वेदमौनी; गिरानायका ! अल्प हे जल्पवाणी; ।
विणा सांवरीं नारदा ! रागमाळा; नको तुंबरा चेतऊं कामजाळा. ॥ ९०

---

१. रत्नजडित मुगुट. २. तोडितां. ३. काळरूप वज्रधारा. ४. रक्तानें. ५. दशरथाची. ६. सून. (सीता.) ७. नासिकक्षेत्राच्या आसपासचा प्रदेश. ८. मातंगसंज्ञक पर्वताच्या मस्तकीं. ९. अमावास्या. १०. रोगविशेष. (फेंपरें.) ११. न बोलें.

करीं ताम्रपर्णं चुरीं पादपद्में, उरीं हात ठेवीं मुळें भोगकामें; ।
मृणालीं[1] करीं सेज कावेरि! गंगे! बहू वाढला काम कैसेनि भंगे. ॥९१
तापें निवारी तनुताप आपें; दे गौतमीचंदनगंधलेपें; ।
ये नर्मदे! कां न घलीसि वारा? मारानळा[2] या सकळा निवारा.'॥९२
येरीकडे राम सुमित्र दोनी मायामृगालागिं वधूनि बाणीं, ।
जाणोनि रामें घडल्या वृतांता, दावी त्वरा पंचवटीस येतां. ॥ ९३
लवे नेत्र तो वाम, तो वाम बाहे स्फुरे, सीवणा वोखटा चाष जाये; ।
म्हणे, 'मंद कां गंध या पंकजाचा?' वियोगाब्धि हा जाणवे जानकीचा.॥९४
वटी वाटिका टाकिली थोर कष्टीं; नसे गोरटी शून्य सौभाग्यसृष्टी; ।
सुमित्राचिया मानसा शोक दाटी, पडे राम तो मेदिनी शून्यपाटीं. ॥९५
गिरीगोळपीठें, महीमाळमाथें; तटें गौतमीच्या नदीनीरपंथें, ।
रमानाथ तो धांवतां साद घाली; मुखें 'जानकी! जानकी!' हेच बोली.॥९६
'ये पर्णशालांगणिचे मराळी! कांतालतामंडित हेमवल्ली! ।
मूगर्भिचे भूतलचंद्ररेखे! हे जानकी! आनन केंवि देखें? ॥ ९७
रे रे वृक्षा! गिरींद्रा! कुरग! मृगपते! चारुचंद्रा! सती ते
बिंबोष्ठी, पद्मनेत्री, जघन घन, कटीं मेखलाबंध[3] जीतें, ।
ते माझी प्राणप्रीया, सकळगुणनिधी, चोरुनीयां अरण्यीं,
नेता तो कोण सांगा? सकळ मज तुम्ही शांतवा प्राणदानीं.'॥ ९८
तरुवल्लरीपर्वता[4] गौतमीतें गजां शार्दुळां सिंहव्याघ्रां मृगांतें ।
पुसे राम तो वल्लभे जानकीतें; भुलीं भूलला गात नाचे सितेतें. ॥ ९९
'तुम्ही कोण हो?' 'दास तूझा सुमित्रू.' वदे राम, 'मी कोण?' 'त्रैलोक्यपित्रू.'।
'नसे काज त्या काननीं.' 'देवि पाहो.' म्हणे, 'कोण ते?' 'भूसुता हो!' 'सिते हो!'
'खडतर मज मित्रा मित्रें[5] पोळीत गात्रा[6];'
'तरुवरतळसंगीं तापभंगी पवित्रा!' ।
दिनमणि तव नोहे, चंद्रसा रंग चक्री[7];
निरखित हरिणाक्षी हा सिते! चंद्रचक्री! ॥ १०१
नमन करुनि गंगे गौतमीलागिं बोले
'सुपुलिनजळमेळीं मावळे, ताप पोळे, ।

१. बिसांनीं. २. कामाग्नीला. ३. स्त्रीभूषण. (कमरपट्टा.) ४. वेली. ५. सूर्य. ६. शरीरा. ७. चक्र धरणारा.

विकसितकमलाक्षी[1] पातली सांग सीता;
प्रतिपद[2] मृगबर्हा[3] चोजवी जातजातां; ॥ १०२
मदन कुसुमबाणा सज्ज कोदंड सोडी,
मजवरि धरिसी कां मार! नाराच[4] ओढी? ।
सगुणवधुवियोगें देह दावानळीं रे!
रणवरमृतमारें कीर्ति नेघे वळी रे!' ॥ १०३
'कवण कवण तूं रे!' 'बंधु रामानुसंगी.'
'पुसत कवण? तो?' 'जो ईश कोदंडभंगी.' ।
'धनुषदळण कोठें?' 'मैथिलाराजगेहीं.'
'कवण जनक सीते?' 'हा प्रिये! खेव देईं.' ॥ १०४
'येईं गेहा.' 'केउतें गेह रानीं?' 'रानीं वासें कासया?' 'तातवाणी.' ।
'आलों आम्ही कोण?' 'तीघें जणें गा! मी तूं सीता.' 'भूसुता केउती गा?' १०५
'हस्ताग्रीं पांच मुद्रा, हरिणकिरण[5] ज्या, हाव दूर्वादळांची;
शोभे चंद्राननेशीं, कुरळ कच निळे, ठेव जंबूफळांची; ।
कंठीं ते रत्नमाळा झळकत, हृदयीं दीप्ति[6] विद्युल्लतेची;
ते माझी चारु[7] सीता, नयनसुखकरी, दावि शोभा गुणाची. ॥ १०६
म्हणे पार्वती, 'श्रीहरा देव मूर्ती! जयाचें करा सर्वदा ध्यान चित्तीं, ।
करी शोक तो वल्लभेलागिं रानीं;' 'पिनाकी म्हणे, 'नो वदें पापवाणी.'॥ १०७
वदे शैलजा[8], 'मूलि पाडीन त्यातें.' शिवें वारितां, ते निघे गर्वचित्तें. ।
वना पातली जानकीचेनि वेशें; म्हणे, 'राघवा! लागलें कामपीसें. ॥ १०८
विनोदार्थ म्यां पाहिलें चित्त देवा! तुवां सांडिलें देखिलें देहभावा; ।
त्वरें पातलें; स्वस्थ कीजे मनातें; नव्हे योग्य हें निंद्य वाटे जगातें.' ॥ १०९
पुढां देखतां सन्मुखी एकवीरा; फिरे राम तो सत्वरा पाठिमोरा; ।
न पाहे मुखा, नोबले[9] अंबिकेतें; दिसे आणिके; आळवी जानकीतें. ॥ ११०
म्हणे भूधरू[10], 'भ्रांत कां तूं? भुपाळा! पुढां जानकी देख साचार डोळां;' ।
तया ताडिलें शब्दनिष्ठूरघायीं; नमी, 'स्वस्थळा जाइजे शीघ्र माई! ॥ १११
तुकाई जगन्माउली' राम बोले; वरा बोलतां येजगीं नाम झालें; ।
भवानी मुखें रामचारित्र वानी; म्हणे, 'ब्रम्ह तूं सत्य, साचार वाणी.'॥ ११२

---

१. प्रफुल्लित कमलासारिखे नेत्र जीचे अशी. २. पदोपदीं. ३. हरिणसमूहा. ४. बाण. ५. पांढऱ्या किरणांनीं युक्त अशा. ६. तेज. ७. सुंदर. ८. पार्वती. ९. न बोले. १०. लक्ष्मण.

असो. सत्वरा चालतां वीरबाहू, पुढां देखिला भग्नपक्षी जटायू; ।
प्रभू देखतां लोटलें नीर नेत्रा; म्हणे, 'चिंतिलें, पावलों प्राणमित्रा.॥ ११३
सिता निश्चयें रावणें जाण नेली; बळें अंगिच्या एकदां सोडवीली; ।
पुढें मागुतें पापकापक्ष्यवंतें गिराबंधनें घात केला असत्यें.' ॥ ११४
दिठीं देखतां राघवा कष्ट भारी; जगा तारिता तो बुडे शोकपूरीं. ।
मना जानकीदुःख तें अल्प मोठें, जटायुप्रिया कारणें कंठ दाटे. ॥ ११५
विमानीं हरीकिंकरीं त्याचवेळा जटायूस त्या विष्णुलोकासि नेला. ।
पुढां राम सौमित्र शोधीत सीते; वनीं लागले त्या कबंधासि हातें.॥ ११६
म्हणे राम, 'हें थोर आश्चर्य वाटे; उरीं तोंड, हातें भरी विश्व थोटें;' ।
शरें घातितां राघवीं देह त्याचा, पुढां दिव्य गंधर्व बोले सुवाचा. ॥ ११७

'जय जय रघुराया! आत्मया ब्रह्मरूपा!
तवहननसुखें मी पावलों स्वस्वरूपा; ।
दृढतर तव नामीं शाबरी पैल दीसे;
सुखउनि मन तीचें, कामिनीवृत्त पूसें.' ॥ ११८
नमन करुनि रामा, तो निघे स्वर्गलोकीं,
रमण जनकजेचा शाबरीस्थान ठोकीं; ।
नयन भरुनि पाहे राम हृत्पद्मवासी;[1]
पदसरसिज वंदी वृत्त सांगे तयासी. ॥ ११९

म्हणे, 'राघवा! रावणें लंकनाथें जगन्मातु नेली, तया घातनाथें. ।
विचारीं बळें सख्य सुग्रीवमेळे, करीं कीर्ति भार्या सुखें शीघ्रकाळें. ॥१२०
अनंता! नमो! कोटिब्रह्मांडभूपा! दहीं देह हा पावकीं आत्मरूपा! ।
स्वयें तोषला, धाडिलें विष्णुलोका; त्वरें पातले वीर पंपातटाका. ॥ १२१
वसे तुंगभद्रातटीं देव नामें नमो! त्या विरूपाक्षलिंगासि भावें. ।
तिजें कांड[3] येथूनि संपूर्ण झालें; कथास्वादनें संतसंदोह[2] धाले. ॥ १२२
कैंतारकांडीं कथिलें विनोदा, जो कर्णकोशीं कवळी सुमेधा; ।
त्या मृत्युकाळीं शरचापधारी पावे कृपे, संकट दूरि वारी. ॥ १२३

किष्किंधाकांड.

वनचरवर[4] माथा ऋष्यमूकानगाचा
निरखित, तंव पंपे पातले वीर साचा; ।

---

१. हृदयकमळीं राहणारा. २. साधूंचे समूह. ३. अरण्यकांडीं. ४. सुग्रीव.

भयचकित विचारें त्यागिला देह धीरें;
'गमत मजचिलागीं प्रेरिले वाळिवीरें.' ॥ १
नळअनळसुताशीं जांबुवंत प्रतापी;
[1]अरिकुळवनदाही मारुती काळकोपी; ।
सबळमतिविचारें चौघही प्राणसंगी
न पुसत परि त्यांतें, लंघिलें रान वेगीं. ॥ २
[2]हरिपति हनुमंतें पीठिला जातजातां;
धरुनि वर विचारें देतसे धीर चित्ता; ।
'अनुचर तुज आम्हीं कायशी शत्रुचिंता?
न पुसत पळसी हें [3]श्लाघ्य नोहे समर्था. ॥ ३
देखोनि ज्यांतें बहु भीति देहीं, ते कोण ऐसें? परिसोनि पाहीं. ।
आतांचि येईन, कथूनि बोला;' पंपेसि झेंपें बहु शीघ्र आला. ॥ ४
[4]नगतळवटशय्ये [5]लोकधाता उताणा,
[6]हरि विरवरशाखे मारुती वीरराणा; ।
जितमदन कपी हा, हेमकौपीनपोटीं,
रघुपति अनुजातें दाखवी हस्तबोटीं. ॥ ५
कौपीन लक्षी, तंव स्वामि कोडें मातें न पूर्वी कथिलें निवाडें; ।
तैसाच तैं या प्रतितीस काय; पाडीत शाखेवरि चंड पाय. ॥ ६
पुनरपि कपिराजें वृक्ष भंगूनि हांवा,
भंवडुनि वरि हाणें रामभूपाळदेवा; ।
[7]फणिवर विर कोपें चंड कोदंड वाहे,
रघुवर म्हणताहे, 'बाळकौतूक पाहें.' ॥ ७
पाषाणवृक्षीं कपि [8]वर्षे जाणा; निद्रासनीं सावध वीरराणा; ।
[9]कोदंडकोटीवरि वारिताहे; तोषावला हांसत वीरलाहे. ॥ ८
गर्जोनि थोरें, गिरि पांच आले; रामें शराग्रें यवखंड केले; ।
पिसारयाच्या पवनें उडाला; मोहार्णवीं तापजळीं बुडाला. ॥ ९
[10]जनक [11]पवन सांगे, 'राम वैकुंठराणा;
त्वरित शरण जाई; सेविं सौभाग्यपूर्णा;' ।

---

१. शत्रुकुलरूप अरण्य जाळणारा. २. वानरांचा स्वामी. (सुग्रीव.) ३. स्तुत्य. ४. शैल. ५. राम. ६. वानर. ७. लक्ष्मण. ८. वर्षाव करी. ९. धनुष्याग्रावर. १०. बाप. ११. वायु.

स्तवन करुनि वाचे, अंजनीबाळ भावें;
रघुपतिपदपीठीं भाळ ठेवीत भावें. ॥ १०
उठवुनि, हृदयासी आकळी रामराजा;
'जिवलग मज तूं गा ! निश्चयें प्राण माझा;' ।
झडकरि अनुजातें भेटवी एकपिंडी;
कपिवरनरराया मित्रता भेद खंडी. ॥ ११
विनवुनि गुज बोले मारुतीराज रामा
'[1]रवितनय कपींचा नाथ सुग्रीवनामा; ।
अभय वरद ओपीं प्रेमकारुण्य हातें;
न लगत पळ भेटीलागिं आणीन येथें. ॥ १२
[2]जनन [3]नयनशुक्तीं, [4]कंज ज्याचें सुपाणी,
प्रगट कपि सुतेजा, ऋक्षराजाभिधानी, ।
विचरत शिवलोकीं रम्य [5]कासार पाहो;
निरखित प्रतिबिंबामाजि टाकी स्वदेहो. ॥ १३
'स्पर्शेल जो [6]वारि सरोवराचें तो होय नारी' गिरिकन्यकेचे ।
शापाथिलें दारुणवाक्यपाशीं, [7]आलान झालें हरिपुंगवासी. ॥ १४
म्हणउनि कपि झाला [8]रम्यराजीवरामा;
निरखित रवि इंद्र पातले भोगकामा; ।
सुरत न करितांही त्यागिलें रेत दोघीं;
[9]शशिरविसम झाले [10]आंवळे बाळ वेगीं. ॥ १५
[11]सुरेंद्रशुक्रें [12]अलिनीळ बाळी निर्वाळिला वानरवीरजाळी; ।
[13]भीवांतटीं भास्करबीजधारी, शोभाथिला सुग्रिवनामधारी. ॥ १६
प्रार्थूनियां [14]शंकरराजरामा, उश्शाप याची जनतातनामा; ।
सांडोनियां [15]भामिनिभावना हे, तो ऋक्ष तें वानरदेह [16]लाहे. ॥ १७
किष्किंधा हे राजधानी पवित्रा ओपी श्रेष्ठा, आवडी पुत्रपौत्रा; ।
वाळिज्येष्ठा, सुग्रिवा धाकुट्यातें, माता [17]धाता ऋक्षराजाचि त्यातें. ॥ १८

---

१. सूर्यपुत्र. २. उत्पत्ति. ३. नेत्ररूप शिंपीतिं. ४. कमल. ५. सरोवर. ६. उदक. ७. बंधनरज्जु. ८. कमळासारखी सुंदर स्त्री. ९. चंद्रसूर्यासारखें. १०. जुळे. ११. इंद्रवीर्यानें. १२. भ्रमरासारखा नीलवर्ण. १३. भानेवर. १४. पार्वती. १५. स्त्रीपणा. १६. पावे. १७. पिता.

काळें धर्में मृत्यु त्या ऋक्षराजा; झाला **वाळी** राजधानीसि राजा. ।
येरा आला यौवराज्यार्थ भागा, अर्थाअर्थीं वाढलें वैर दोघां. ॥ १९
[1]सुग्रीवरामा ! सुभगा [2]रुमा जे **वाळी** बळें भोगित **काम**भाजे; ।
दारिद्र्यदानें भंवडे दिगंतीं षण्मासमासा खवळे निघातीं.' ॥ २०

निजजनकरुणेचा सिंधु सर्वार्थदानी
अभयवचन बोले, 'मित्र भेटीस आणीं; ।
वधुनि अरि, तयाचा भाव नेईन सिद्धी;
करुं मग चिरकाळें **जान**कीरत्नशुद्धी.' ॥ २१

[3]**वा**तात्मजें जाउनि वातसंगें, वार्ता वदे वानरनाथ वेगें; ।
धांवोनि वंदी **ह**रिपादपद्में यो[4]गीमुनीमानसभृंगसद्में ? ॥ २२
जीवात्मयांची अनुपम्य मैत्री, स्नेहें गमे सर्वसुखैकधात्री; ।
सुग्रीवरामांकित दोनि काया, चित्तीं विराली गुणभेदमाया. ॥ २३
'**सी**ता नेतां देखिली **राव**णें म्यां' सांगे वार्ता वानराधीश **रा**मा. ।
धांवे तीतें सोडवूं **वा**तपुत्र; गेला धाकें सिंधु लंघोनि शत्रू.' ॥ २४
चिरें[5] भूषणें दावितां **जान**कीचीं, **ज**गन्नायका शोक संताप जाची; ।
कपी शांतवी हस्त ठेवोनि पायीं; म्हणे, 'आणिली म्यां वधू; भाष घेई.'॥२५
[6]**रु**मानायकातें रमाप्राणनाथें वरें बोलिजे, '**वा**ळि धांतीन हातें. ।
तुतें नेदितां निश्चयें राज्य दारा, वधू पातल्या नातळें तीसि वीरा!' ॥ २६
पुसे **राम** वृत्तांत **वा**ळीकळीचा; कपी हेतु वैरासि सांगे सुवाचा. ।
'बळी[8]दुंदुभीदुष्ट**मा**हीषपुत्रें मही शोधिजे वीर झुंजारशस्त्रें. ॥ २७
तया सत्वरां धाडिलें **प्रे**तनाथें; करें [9]**श**क्रजें मारिला एकघातें. ।
शतायोजनें देह त्याचा धरित्री, जया देखतां धाकती वीर क्षेत्री. ॥ २८
सुडालागि हो! पातला पुत्र त्याचा; बळें ताडिला मोडिला देह साचा; ।
पळे दैत्य तो चोर कापट्यमार्गें; [10]हरी क्षोभला, लागला पाठिमागें. ॥ २९
भयें संचरे दैत्य पाताळबीळीं; रिघे पाठिसी नो[11]संडी वीर **वा**ळी; ।
सवें साह्य मी सांगतां द्वार राखें; बहू लागले मास येतां न देखें. ॥ ३०

---

१. सुग्रीवाची स्त्री. २. सुग्रीवाच्या स्त्रीचें नांव. ३. मारुतीनें. ४. ऋषियोगी यांच्या मनोरूप भ्रमरांचीं स्थानें. ५. वस्त्रें. ६. सुग्रीवातें. ७. मारीन. ८. दैत्यविशेष. ९. इंद्रपुत्रानें. (वाळीनें.) १०. वानर. ११. न सोडी.

रूपें राजधानीस लावण्यवाळा, बळी यक्षगंधर्वकार्मुकपाळा; ।
त्वरें धांवलों राज्यभोगार्थ कामीं, हहाःकार झाला जनीं धामधामीं. ॥ ३१
पुरी राजयावीण ते कोण राखे? कपीसेवकीं सांडिले धीर धाकें. ।
प्रधान त्वरें, जेथ मी, तेथ आले; अकीर्ती न ते पाप रायास आलें. ॥ ३२
गुहाआननीं दाटिला शैळ लाहीं; पुरा पातलों, आटिले शत्रु घायीं; ।
प्रजा रक्षिल्या बोलती शिष्ट योजा; 'नि[1]माला वनीं वाळि, तूं होइं राजा.'॥ ३३
सखे राज्य देती सर्वे चौघ मंत्री; बिळा पातला वाळि झुंजार क्षत्री; ।
गुहा लक्षितां, ने[2]देखे द्वार डोळां; भयें वर्तली प्राणनिर्वाणवेळा. ॥ ३४
ऋ[3]षीत्रीगुणें मास माझारि गेले; निराहार त्यां निर्जळी युद्ध झालें; ।
अमित्रास मारूनियां, शीस हातीं, बहू बाबिरा चोजवी मार्गपंथीं. ॥ ३५
जडे शोकराहो मनोरूपचंद्रीं; पुढां शोधितां भासला भानु रंध्रीं; ।
लतें मोडिला पर्वताआड जो कां, महागर्जनें जागवी जीवलोका. ॥ ३६
म्हणे, 'दानवीं मारिला बंधु माझा' करी शोक तो मानसीं शक्रराजा. ।
पुरा पातला, देखिलें राज्य मातें; मनीं पेटला क्रोध संतापवातें. ॥ ३७
'बिळीं सूदलों, तेथ वैरी वधावें; गुहा कोंडिली घातकें नष्टभावें; ।
मही भोगिसी, सेविसी बंधुभाजे, जळो तें जिणें प्राण दे लोकलाजे.' ॥ ३८
महाकोपिया पेटला तो निघाता; करूं धांवला खड्ग काढूनि घाता; ।
नळादीक ते पाठिशीं प्राणदाते पळाले सखे मित्र, घेवोनि मातें. ॥ ३९
पळों तेथ घाला, करी नित्य मारा; बळें घेतलें राज्य मंदीर दारा; ।
इथें पर्वतीं शाप वाळीसि पाहो; असो यापरी येथ रक्षोनि देहो. ॥ ४०
तो सामासां झुंज झुंजे निघातें; घातें माझें छिन्न सर्वांग होतें; ।
त्याची वेथा पां नये साचि मासां; कंठीं ऐसा प्राण मी राघवेशा ! ॥ ४१
बरें काश्यपी रत्नमाळा पवित्रा! त्वरें ओपिली देवराजें सुपुत्रा; ।
बळें आगळा वाळियालागिं भारी पळे सन्मुखें शत्रु वेवोनि हारी. ॥ ४२
चिकटविषमताळा एकबाणें विखंडी
त्रिभुवनबळिया तो एक वाळीस दंडी; ।
वचन वरसुनीचें कोण साचार भंगी?
परिसत भुज पाहे भूमिजामात वेगीं. ॥ ४३

---

१. मरण पावला. २. न देखे. (न पाहे.) ३. ऋषि म्ह० सप्त ऋषि. ७×३=एकवीस. ४. शोकरूप राहू. ५. वाली. ६. बंधूच्या स्त्रियेला. ७. भार्या. ८. कश्यपानें दिलेली. ९. पृथ्वीचा जांवई. (राम.)

अनुजचरणपायीं पीडितां पाठि चोरीं
कुटिल विटप आले सातही एकहारीं. ।
तिखर शरदुधारें छेदिलें एक घायें,
उडवुनि मग टाकी दुंदुभीशीरपायें. ॥ ४४

धनुर्बाण तो जानकीप्राणनाहो करी सज्ज, झुंजावयालागिं पाहो. ।
शरें आजि मौळी धडाडोनि फाळी; रणीं बोळ चाळीतसे पैल वाळी.॥ ४५
म्हणे सुग्रिवा, 'शत्रु झुंजार काढी भुजावल्लरी जात आवेशवाढी.' ।
फळें पातलीं ब्रह्मसायुज्यघोषें अरीपक्षियां प्रेम संग्राम सोसें. ॥ ४६
म्हणे मारुती, 'रामभूपाळपाळा ! कपी दोवही एकरूपी दयाळा !' ।
खुणें ओपिली पद्मपालाशमाळा; त्वरें टाकिला ग्राम संग्रामकाळा. ॥ ४७

'वरदवचनमानें पाळणें कश्यपाचें,
निवटिन खळ वाळी सेवकांलागिं साचें;' ।
म्हणवुनि गिरि वेगीं आपणा आड केला;
कवळुनि धनुमुष्टी दीन रक्षीत ठेला. ॥ ४८

नभा गाजवी वीर संग्रामघोषें; बळें क्षोभला वाळिवेताळ रोषें; ।
करीं वेतले ताळ हिंताळ दोघीं; मही डोलवी शेष पाताळ भोगी. ॥ ४९
त्वरें ताडिती मातले एकमेकां; तरु भंगले धांवती देवलोकां; ।
उडाणीं नभोमंडपा झोंक मारी; गिरीं झेलिले रश्मि तेजाळ धारी. ॥ ५०
गिरागर्जनें झेलिती शैल भारें करें, दाविती भोंवणें चक्रमारें. ।
दिठीं लक्षिती, भेदिती वर्मठावो; धरा तिंबली, लागलें रक्त वाहों. ॥ ५१
उरीं मस्तकीं मारिती वज्रमुष्टी; नभा गाजतां होत नक्षत्रवृष्टी; ।
थरारे मही, मेरु कैलास गाढा; तळीं सांवरी यज्ञवाराह दाढा. ॥ ५२
लुमें पीटिती मेदिनी थोर हांवें; उठी दाटली अंबरा धूळि धांवे; ।
शिळा लागतां भंगलीं देवयानें; जगीं तोचि हा तारकापात मानें. ॥ ५३
नभीं देखतां तांत स्नेहाळ दोघीं तया ताडितां भावसापत्नसंगीं, ।
त्वरें पातला शक्र तेथूनि जाणा, रवी आतला रक्तलोहीतबाणा. ॥ ५४
सुरेशाचिया नंदनें चंडवाहीं रवीनंदना ताडिलें घोरघायीं; ।

---

१. पुच्छ. २. किरण. ३. वर्मस्थान. ४. विजली. ५. पुच्छें. ६. नक्षत्रांचें पतन. ७. बाप. ८. सुग्रीवाला.

महामूर्च्छनें आठवी रामपाया; उठी मागुता सन्मुखीं होत घाया. ॥　५५
रमानाथ तो ईश देवेश राजा म्हणे, 'दांडगा वीर संग्रामकाजा; ।
करूं खंड तों आजिपासूनि याचें; वदे सायका मारणीं मंत्र वाचे.' ॥ ५६
न साहेचि त्या वाळिदर्दूरदर्पा[1]; त्वरें धांवणें बाणनिर्वाण सर्पा; ।
उरीं लागतां, भेदलें वज्र जैसें पडे पर्वतीं, वानरीं देह तैसें. ॥　५७
शरें मारितां, मांडला मृत्यु प्राणा; धरामंडळीं धूळिपंकीं उताणा; ।
दिठीं लक्षिला राम तो काळ कोपी; म्हणे वीर रे! धन्य चंडप्रतापी.॥५८
गुणीं साजिरी पुण्यसत्कीर्तिभाजा[2] वरी एकपत्नीव्रती रामराजा; ।
तये हाणि केली, अकीर्तिन माळा गळां घातली.' लाविलें बोट भाळा[3].॥५९

'अविकळ परवृत्तीं नाशिलें पाप घातें;
त्रिभुवनगुरुदेवा लागला हेतु कातें; ।
गुणपर निजवस्तू भंग त्या भेदबुद्धी;
अविहितकृतकर्मे भोगिसी भोगसिद्धी. ॥　६०
करिण हरिण लोकीं, मुक्तकस्तूरिकाजा,
निवटित मृगराजा वीर वांटीव व्याजा. ।
जरठ[4] कपि वधाया, वेचिलें दिव्यबाणा;
गुणि तरि मज सांगें साधिला अर्थ कोणा?' ॥　६१

असो. राघवें सर्व घेऊनि माथां, तया पाठवी विष्णु सायुज्यपंथा. ।
नतग्रीव[5] सुग्रीव साम्राज्यकामी तया गौरवें राज्य किष्किंधधामीं[6]. ॥　६२
तारा रुमा ओपुनि भोगकाजा, युवापदीं अंगदवीरराजा, ।
साधूनियां सुग्रिवमित्रभावा, संतोष झाला नरदेवदेवा. ॥　६३
सवें मारुती वीर सौमित्र बंधू, गुहा काननीं लोककारुण्यसिंधू, ।
परिस्रोतपुण्याचळीं मेघमाला लिळें कंठितां, पातले पुण्यकाळा. ॥　६४
श्रियावैभवें मातलां वानरेंद्रा, मनीं आठवी केउता राघवेंद्रा? ।
स्त्रिया भोगितां भूलला पद्मपाणी; सिताशुद्धिची नायके मातु कानीं. ॥६५
जगन्मित्र[7] बोले सुमित्रासि वाणी, 'शठा! मर्कटा! रानटालागिं वाणीं. ।

१. वाळिरूप बेडकाच्या गर्वा. २. पुण्यकारक उत्तम कीर्तिरूप श्री. ३. कपाळा. ४. वृद्ध. ५. नम्र आहे मान ज्याची असा. ६. किष्किंधारूप गृहीं. ७. राम.

त्वरें ताडिजे, निष्ठुरें दंड कीजे, पुढां कार्य साधीन वो! मीचि माझें.'॥६६
धनुर्बाण सज्जूनि शेषावतारी[1] निघे, क्षोभला ज्यापरी दंडधारी[2]. ।
दिशा लंघिती वानरें, देति हाके; निघे बाहिरी वीर सुग्रीव धाकें. ॥ ६७
सहित उभयदारां[3] पातला सौरि[4] जाणा;
नमुनि विनयभावें, पूजिला शेषराणा; ।
शरणमरण वारी, त्यासि येऊनि वंदी;
रमण जनकजेचा[5] तोषला सत्यवादी. ॥ ६८
'कपीनायकें देखतां शारदीतें[6], सतीशोधना[7] प्रेरणें पारधीतें; ।
त्वरें धांवडीं दूत हो! मित्रकाजीं, कपी आणवा आण देवोनि माझी.॥६९
गिरीपाळ जे काननाधीश[8] राणे, महीमंडळीं भक्षिती देश मानें; ।
तयां जाणवा वानरां आणि ऋक्षां; नये त्यासि हो राजदंडासि शिक्षा.'॥७०
अरिद्वीप[9] द्वीपांतरीं देशदेशीं गिरीकंदरें मेरु पाठारवासी, ।
नगा[10] झेलिती वृक्ष संग्रामसारें[11], त्वरें पातले आपुलालेनि भारें. ॥ ७१
दणाणी मही पावतां मुंडमुंडा[12], कडा फोडि, काडी तडातोडि सांडीं[13]; ।
उडें पाडिती, फाडिती अंबरातें; जळें नाशिती, त्रासिती भूतजातें. ॥ ७२
धरा दाटली मर्कटांचेनि थाटें; नभीं कोंडला नेदखों[14] वात[15] वाटे; ।
उडाणें महागर्जनें मेघ आटे; भयें जाहले सिंधुचे सात फांटे. ॥ ७३
किरणीं[16] दिशा भेदिती वीर हांवे; त्वरें पश्चिमे पद्मिणीमित्र[17] धांवे; ।
तया पाठिसी घोंटिती सिंधु पुच्छें; उसाळी नभीं टाकिती कच्छ[18] मच्छें[19].॥७४
बहू रंग अंगीं मुखें चारु चेष्टा; विनोदें उठे रावधा स्नेह मोठा. ।
गिरी झेलिती, नाचती, वृक्ष हातीं, फळें तोडिती, वेंचिती पक्षिजाती.॥७५
दिशेदक्षिणे वेगळ्या, सर्व सोसें कपीं शोधिल्या, पातले मासि रासें; ।
'धरामंडळीं, नागपाताळकोशीं नसे जानकी,' सांगती सुग्रिवासी. ॥ ७६
पुढां दक्षिणे प्रेरिला वीर जेठी, जया आवडे स्वामिचें काज पोटीं; ।
नळा जांबुवंता निळा वातपुत्राकरीं[20] ओपिलें अंगदा प्राणमित्रा. ॥ ७७

---

१. लक्ष्मण. २. यम. ३. दोनस्त्रियांसह. ४. सूर्यपुत्र. (सुग्रीव.) ५. सीतेचा. ६. शरदृतूतें. ७. सीतेच्या शोधार्थ. ८. अरण्याचे स्वामी. (रानांत राहणारे.) ९. शत्रूंला हत्तीसारखे. १०. पर्वता. ११. युद्धामध्यें श्रेष्ठ अशा. १२. देशोदेशा. १३. टाका. १४. न देखों. १५. वायु. १६. किरणांनीं. १७. कमळिणीचा मित्र. (सूर्य.) १८. कांसव. १९. मासे. २०. मारुतीचा.

रघुवर निजनामें मुद्रिका मारुतीतें,
नृपमुनि मुखसरोजीं, पूजिला मौळि हातें; ।
'त्रिभुवनविजयी तूं होइं, मारूनि शत्रू;
वर सुखतर चाले लोकप्राणेशपुत्र. ॥ ७८
त्वरें द्राविडादीक मल्याळवासीं, जळीं शृंगळीं जांगलादीकदेशीं, ।
वधूमंडळीं चार पांचाळ मानी, नसे नाढळे कोटिकंदर्पखाणी. ॥ ७९
नदी काननीं, शैलकक्षीं, कपाटीं तरू लागले, नेणवे सूर्य दाटीं; ।
कैरी केसरी भूतवेताळम्हैसे वुझाले, कडां घालिती देह रोषें. ॥ ८०
तपें तापसी बीळ तेजाळ पाही, जया नेणती देव गंधर्व तेही; ।
बहूयोजनें पंथ ज्या अंधकारीं, तया शोधिले, पावले सिंधुपारीं. ॥ ८१
अगणित जलराशी शक्ति नाहीं तराया,
दिवस बहुत गेले, लाज मार्गें फिराया; ।
म्हणउनि मरणाचा लाभ कामूनि देहीं,
पसरुनि तृणशय्या, त्यागिलें तोय त्यांहीं. ॥ ८२
फळाभक्षकां लोळतां शैलकुक्षी, तया भक्षणालागिं संपाति पक्षी, ।
हरिप्रीय जाणोनि साचार शंके, म्हणे, 'पैल हो! जानकी हेमलंके. ॥ ८३
शतायोजनें पंचवीसांसि दूरी असे त्रीकुटाहोनि कन्याकुमारी; ।
नभाचेनि पंथें निरालंबमार्गा नव्हे शुद्धि हे कायसी? प्राणत्यागा? ॥ ८४
अगणित भवसिंधू पापियें नाममात्रें,
तरति, वसति निर्त्यें विष्णुधामीं पवित्रें; ।
त्रिभुवनपतिकाजा दास तुम्ही कपी हो!
बळहि न जळसिंधूलंघनीं चोज पाहो.' ॥ ८५
अरुणिवचनबाणें चंड आवेश रुद्रा,
करुनि नमन येरां, मानसीं राममुद्रा; ।
धरुनि, उदित झाला लंघना क्षारसिंधू,
कपिजयजयकारीं कोंदला एक नादू. ॥ ८६
प्रवळजळसमुद्रालंघनालागिं पाहो,
पवनसुत वेलाब्धी हर्षला वीरवाहो; ।

---

१. देऊन, २. मुगुट, ३. सकळ लोकांचा प्राण जो वायु त्याचा पुत्र. (मारुति.) ४. हत्ती. ५. सिंह. ६. उदक. ७. क्षेत्रविशेष. ८. संपातीच्या वचनरूप बाणानें. ९. उद्युक्त. १०. बळाचा समुद्र.

त्वरितगिरिमहींद्रामस्तकीं सेतुसीमा
निरखि नयनसूत्रें बंधनीं विश्वकर्मा. ॥ ८७
ध्वजविजय उभारी अंबरीं केतु जैसे,
पदयुग नगमाथां रोवितां कूर्म त्रासे; ।
'जयति रघुवरिष्ठो रामचंद्र प्रतापी,'
स्मरत गगनगर्भीं संचरे काळकोपी. ॥ ८८

कडाडी दिशामंडळीं चक्र जैसें, फिरे मेदिनी पर्वता वासपीसें; ।
तृणासारिखे भोंवती ते निराळीं, रथीं दांसळे, कोसळे उष्णमाळी. ॥ ८९
झडाडी महा वात ज्या अंगझोटीं, भयें तापला वाढवू सिंधु पोटीं; ।
उसाळें नभीं नक्र मत्स्यादिजातें, उडें ग्रासिती पीडिती पुष्पकांतें. ॥ ९०
मनोवेग ज्या धांवतां पंगु मागें; नभोमंडळीं भेदितां तात भंगे. ।
महा गर्जनें मांडिला मृत्युमेघीं विधाता म्हणे, 'सांवरा सृष्टि वेगीं.' ॥ ९१

हिंमगिरिवरबीजें पुत्र जो मेनिकेचा,
म्हणउनि मयनाद्री नामसंकेत साचा; ।
नदिपतिमुखमंत्रें आड धांवे निराळीं;
उठति पवनपंथें व्योमगंगाखळाळीं. ॥ ९२

नभावेगळे आगळे एकमेकां, महर्लोक सांडोनियां, देति हाका; ।
कपी पीटितां पैज जिंकोनि गेला;' तळा पादनांखें पडे शैल हाला. ॥ ९३
'भला रे! भला मारुती वीरपाळा; नभीं निर्जरीं सांडिल्या पुष्पमाळा; ।
दैनू धाडिली दानवीं वाट बांधो; म्हणे, 'वानरा विघ्न माझेनि लाधो.' ॥९४
मुखें मेदिनी, मध्य आकाश, वाढी भुजादंड विस्तारले देत आढी; ।
कपी निष्ठला, सांन होवोनि, कानीं; गिरीगर्जना दानवी चोज मानी.॥९५
पुढां सिंहिका घोर दारूण काळीं जळीं ग्रासितां अंगछाया निराळीं, ।
कपीसिंह तो भोंवणीमाजि लाहो उडे, गुंफला मागुती तेथ राहो. ॥ ९६
मुखानीळ वेटाळला पायगुंडी; वळें कोसळे काळविक्राळतोंडीं; ।
रिघे अंतरीं, वावरे वज्रधारा; भरे काळजी प्राणसंहारमारा. ॥ ९७
खुडी अंत्रमाळा, नखें पोट फाडी; निघे अंबरीं, घोरघोषें गडाडी; ।

---

१. ध्वज. २. पृथ्वी. ३. सूर्य. ४. सुसरा. ५. विमानांतें. ६. ब्रह्मा. ७. पर्वतश्रेष्ठ जो हिमाचल त्याच्या वीर्यानें. ८. मैनाकनामकपर्वत. ९. देवांनीं. १०. राक्षसीविशेष. ११. लहान.

करें सांडिली सागरीं [1]केतुमाता; दिसे शोणितें भानुतेजाळ जातां. ॥ ९८
त्रिभुवनबळिया तो, विघ्न भंगोनि, वेगें
त्रिकुटपुरतल्हारीं सांडिले जात मागें. ।
अवघड पडलंकापार पावे मुसांडी;
उपटत महिभारें दुर्ग भंगे तडाडी. ॥ ९९
दणाणीत हातीं सणाणीत शस्त्रें, विदारीत दांतीं असंभाव्यवक्त्रें; ।
[2]तमिस्राचरी पातल्या भक्षकाजे, कपी वेष्टिला ओपिती राजभाजे. ॥ १००
क्रौंचेन तेथें ग्रसितां कपींद्रा, त्रासूनि तीतें, पुजिलें [3]नदींद्रा; ।
रात्रिचरींच्या कवळी दळातें, बांधोनि होमी वडवानळातें. ॥ १०१
ऐशा सर्वा मारिल्या राक्षसी हो! दीना वृद्धा रक्षिल्या वीरबाहो; ।
बोले त्यांसी राक्षसाधीश '[4]दंदी कोठें? दावा, घालितों देव बंदी.' ॥ १०२
परम सुख तयांतें, सांगती मारुतीतें
सुखतर पडलंकावास हा राक्षसीतें; ।
रघुवरवधुहर्ता अंकतों जाण लंके!
गमनपरकपीतें दावितां नाश शंके. ॥ १०३
असो वीर तो शीघ्र लंकेसि आला, चढे गोपुरामस्तकीं, गुप्त ठेला; ।
सिताशुद्धिचा मेघ[5]पीयूष काळा करी चातका कोशकर्णा सुकाळा. ॥ १०४
किष्किंधा हें कांड रामायणीं हो! श्रद्धाभक्ती सेविती जे गुणी हो! ।
त्यांतें नाहीं मागुती [6]देहयात्रा, रामें कामा भंगिलें कर्मसूत्रा. ॥ १०५

सुंदरकांड.

[7]वसुमतिपतिजाया जानकी [8]क्षोणिपुत्री,
रजनिचरपुरेंद्रामंदिरीं [9]कर्मसूत्रीं; ।
हृदयकमल्दाही वल्लभाचा वियोग,
तमनशमनकारी मारुती दिव्यमेघ. ॥ १
[10]हरिपति हरिणाक्षीशोधनालागिं पाहो,
त्रिकुटशिखरपारीं सादरें वीरबाहो; ।

---

१. सिंहिका राक्षसी. २. रात्रिंचरी, राक्षसी. ३. समुद्रा. ४. दुष्टभावी. ५. अमृत. ६. जन्ममरणरूप यात्रा. ७. पृथ्वीपति जो राम त्याची स्त्री. ८. पृथ्वीची कन्या. ९. दैवभोगानें. १०. वानरश्रेष्ठ.

कनकमणिनिबंधें दिव्यशोधें निहाळी,
हरिखभरित लावी अक्षता अग्नि भाळीं. ॥ २
वनचर मृग काया पालटी गुप्तवेशें,
मशकस्वरुपधारी ग्रामगर्भी प्रवेशे; ।
निखिलकनकलंकाशोधनीं चोज भारी,
सकल खल दुरात्मे नांदती पापचारी. ॥ ३
वरीं अग्निहोत्रें मुखीं वेद चारी, दिठीं देखतां धेनुविप्रांसि मारी; ।
फळें भक्षिती, प्राशिती रक्तमद्यें, मुखीं शास्त्रचर्चा श्रुती गद्यपद्यें. ॥ ४
स्त्रिया जारिणी जारचर्चा नरांतें, करीं अक्षमाळा स्मरे शंकरातें; ।
सदा सर्वदा डुल्लती मद्यपानी, मुखीं 'सोऽहमस्मि'[1] वदे ब्रह्मज्ञानी. ॥ ५
गुणातीत हो! चिद्घनानंद आत्मा, कदां नातळे इंद्रियां देहधर्मा; ।
मना आवडे तें सुखें भोग भोगी, म्हणे मुक्त मी ज्ञानियां राजयोगी. ॥ ६
सुरा[2] प्राशिजे, भक्षिजे आवडे तें, परस्त्री बळें भोगिजे सांपडे ते; ।
विधीवाद तो सर्वमायीक मानी, जिवन्मुक्त तो बोलती ब्रह्मज्ञानी. ॥ ७
जनीं दूषिती भक्तिवैराग्यमार्गा, मनीं वाहती द्वेषमोहादिवर्गा; ।
असो. नष्ट ते भ्रष्ट पापिष्ठ मंत्री, सुखें नांदती धामधामीं विचित्रीं. ॥ ८
कनककळससंबें[3], नीळपत्रें पताका,
परिवरचित भासे रम्यकासार[4] लंका; ।
करिवर कपिराणा वीळतेजाळशुंडें[5],
विदळित पुरधामीं दिव्य शोभा विखंडे. ॥ ९
प्रकटितभय रातीं, घोर गाजे किंकाटें,
नगरतळ दणाणी, 'कोण भंगी कपाटें?' ।
उमळिततरुखंडें, नेणवे झंजवाता,
म्हणति जन, 'पळा रे! पातला काळ घाता.' ॥ १०
गणाधीश, मार्तंड भैराळ, शक्ती, तिंथें देखिलीं हिंडतां एकपंक्ती; ।
बहू खेद भूतें तनू जेंवि प्रेतें, जोहारूनियां बोलिजे रामदूतें. ॥ ११
'जया रासभें रक्षणें राक्षसाची, निकी वृत्ति हे साधिली नापिकाची; ।
तराळी तनू चंडिके! दासिधर्मी, भलें गोविलें रावणें पापकर्मी. ॥ १२

१. तो मी आहें. २. मद्य. ३. वरें. ४. रम्य सरोवर. ५. देदीप्यमान पुच्छरूप शुंडेनें.

शेवया, शर्करा, लाडू, चतुर्थीमाजि भक्षिलें; ।
भरितें, रोटिया, कांदे, खादले पायलीभरी. ॥ १३
मेंढरें नवसा घेसी, रेणुके! चंडिके! शिवे! ।
तयाचें उसणें जाणा, बोल कोणा न लावणें. ॥ १४
मणीमल्ल नीसूदनी घोष गाढा, करीं सूर पंचांगिचे रोम काढा; ।
पुरीं आरसा दावणें राक्षसातें, तनूमर्दनें तोषवा रावणातें. ॥ १५
नराचेनि देहें जना श्वान केलें, भलें थोर लंकापुरीं नांव झालें.' ।
म्हणे, 'कां हरी! मारिसी मेलियातें? करीं साह्य आतां हरीं बंधनातें.'॥१६
हांसोनि बोले रघुराजकर्ता, संसारबंदी तनुतापहर्ता, ।
'कपींद्र लंकेहुनि व्यर्थ जाय, तैं अंजनि वीउनि वांझ होय. ॥ १७
असो. जानकी देखिल्या चित्त माझें, समाधान पावेल स्वानंदभोजें; ।
तयानंतरें चोज वर्तेल कांहीं, दिठीं देखिजे, बोलणें व्यर्थ पाहीं. ॥ १८
होईल तें हो! नयनीं विलोका, सुचित्तचित्तें दवडूनि शोका; ।
दुःखात्मतें दुर्घट काळ गेला, स्वानंदपूर्णोदय भानु आला.' ॥ १९
ऐसें त्यातें स्वस्थ केलें सुजाणें, सीतामाताशोधनालागि जाणें, ।
युक्ती जैसा योगिया चक्र भेदी, तैशी नाशी दुर्घटें वाडबुद्धी. ॥ २०

सजळ कलश माथां चालती लोकबाळी,
उपटत महिपृष्ठीं, गुंतल्या वाळजाळीं; ।
धरुनि वटुक, बाळें, व्योमवाटा झुगारी;
पिटिति वदनपोटें, मांडिली गुप्त मारी. ॥ २१

गजरथखरवाजीदिव्यमानुष्ययानीं
सघनसुखविलासी बैसले राजमार्नीं; ।
न कळत कपि पुच्छें पाय गोवूनि ओढी,
उलथुनि वरि लातें कर्दमामाजि पाडी. ॥ २२

पुरुषवधु निगूढीं नग्न निद्रिस्थ भावी,
न करित परि जागीं, चोहटा शेज ठेवी; ।
गजरथवरि लोटी एकमेकांवरौते,
परम सुखचि मानी मांडल्या झूज त्यातें. ॥ २३

धनें, मंदुसा, राजभांडारवस्तू, भिदी पातल्या, भंगल्या; कोण हेतू? ।

१. नवल. २. चिखलामध्यें. ३. पेव्या.

त्वरें पुशिलें रक्षकां लंकनाथें. तयां नेणवे जें किजे रामदूतें. ॥ २४
गळा गोंवितां, चांचरे छत्रधारी; पडे पाठिसी, नावरे झोंक भारी; ।
करें मेदिजे राजगुह्यांग दंडें; फिरे क्षोभला दंड माझारि खंडे. ॥ २५
सुखें सारितां श्मश्रुकर्मांग चाडें, वळें चाचरी भाद्री अर्धखाडें; ।
त्वरें ताडितां नापिका लंकनाथें, फुटे शीर तें निष्ठुरा वज्रघातें. ॥ २६
पिटी पुच्छ, गर्जे, भरे मध्यराती; पुरीवासिया आदकें प्राण जाती; ।
सिताशुद्धि साधावया रामभृत्यू असे पातला रावणा काळ मृत्यू. ॥ २७
रवीअस्तमानीं सभे लंकनाथ निवेदीतसे दूत अद्भुत मात; ।
परी होतसे थोर आकांत लोकां; पिडाकारकू नेणवे कोण तो कां? ॥ २८
प्रभू क्षोभला, मारवी सांगल्यातें; कपी पाठीसी धूमसी मारि त्यातें; ।
पिटी, दीप्तवाळानिळें तेजधाडी; भरी अंधकारीं, करी वीरझोडी. ॥ २९
वळें ताडितां, आदटें आड मोडी; हहाकार मारें करी शंख तोंडीं; ।
करी शब्द, त्याचें करीं वैक्र फोडी; मळें घोळिले दीन तत्काळ सोडी. ॥ ३०
लतामुष्टिघातें पती राक्षसांचा वळें खेस्त केला, मुखीं अस्तु वाचा; ।
हरी हस्तकें मान त्या मस्तकांचा; गमे वैस्त संत्रस्त त्या सोमपाचा. ॥ ३१
चिरें फाडिलीं, तोडिल्या कंठमाळा; शिरोभूषणें भंगिलीं एककाळा; ।
बळा दाविजे, वारिजे वीर वांटे; दिवा दावितां, राजया लाज वाटे. ॥ ३२
त्वरें चालिला मंदिरामाजि रावो, निघे पाठिशीं वीर झुंजारबाहो; ।
वदे वर्तली मात मंदोदरीतें; वधू जाणवी सीवँणा रावणातें. ॥ ३३
'बळीमर्कटें एकसंग्रामधीटें दुपाटें उडे सिंधुजातोय वाटे; ।
अशोकावटी आटिला शोक लंका सुता अक्षयातें क्षयालागीं देखा;' ॥ ३४
अमित्रेश तो रावणाधीश कोपें; तमिस्राचरी प्रेरिल्या जानकीपें; ।
'करा वश्य ते धाक दावूनि पोटीं;' कपी चालिला लागला मृत्यु पाठीं. ॥ ३५
दिठीं देखिली रामलोकेशजाया, महानंदसिंधूदकीं प्लुतकाया; ।
म्हणे, 'साधलें सर्वही काज माझें,' पडे दंड तैसा, नमी नाथभाजे. ॥ ३६
विशाळा निशाचारिणी जानकीतें बळें गांजितां झोडिल्या वृक्षघातें; ।
निमाल्या बहू, वांचल्या एकिदोघी; पळाल्या त्वरें जाणवूं मात वेगीं. ॥ ३७

शिशुपविटपमाथां मारुती वाडबुद्धी
रघुवरकरमुद्रा मौन्य मुद्रा निवेदी, ।

---

१. मुख. २. चूर. ३. वकरा. ४. सोमसंज्ञक वल्लीचें प्राशन करणाऱ्याचा. ५. वळें. ६. मार्गी. ७. स्वप्न. ८. रात्रीच्या ठायीं संचार करणाऱ्या. (राक्षसी.) ९. सीतेप्रत.

धरुनि जनककन्या लोकधन्या सुचारी
हृदयजलधिचंद्रे रामसुद्रे विचारी. ॥ ३८

कल्याणाचा गर्व कल्याणहारी, लोकां सर्वां इष्टकल्याणकारी; ।
त्यातें सांगें, 'क्षेम कल्याण मातें! कल्याणाचा धाम जो राम त्यातें. ॥ ३९

रघुपतिपदपद्मीं भृंग सौमित्रबंधू;
परम कुशळ दोघां सांडि संतापखेदू; ।
ग्रसित स्मरणराहो जानकीभावचंद्रा;
[1]कृशितउभयबाहीं कंकणाकार मुद्रा.' ॥ ४०

विकळवचनवातें मूर्छना ज्ञानदीपें
[2]हरिवर मुखतैलें जागवी सत्यरूपें;।
'दशवदनवधार्थी येतसे [3]लोकधाता,
सकळ सफळ आतां पावसी प्राणकांता.' ॥ ४१

ते राजकन्यासहदेवधन्या, जे कामशून्यासुरवर्यमान्या; ।
पुण्याधिला वानरनाथ वंदी, निर्मुक्तकायाकृत काळवंदी. ॥ ४२

[4]चुडारत्न ओपी खुणा मारुतीतें; म्हणे, '[5]शुद्धिनें शांतवीं राघवातें;' ।
'क्षुधें पीडिलों' सांगतां, येरि त्यातें वदे, 'भूतळीं सांडल्या वे फळातें.'॥ ४३

[6]कृपिवळ कपिराणा, जानकी [7]बागवापे,
अरिवनमन पेरी, शोकसंतापवापे; ।
उचलुनि [8]हल तैसें [9]वाळ लोंबाळ ओढी,
उपटुनि [10]तरुखंडें, शेवटीं शेज काढी. ॥ ४४

फळति सकळ काळीं आम्र, [11]नीचूंळ, जंबू,
कवठ, मधुर बोरी, दाडिंबी, सार अंबू; ।
लवत सफळभारें, डोलती [12]रायरंभा;
[13]सुरतरुवरदाटी, देत [14]जंबीरें शोभा. ॥ ४५

द्राक्षीफळांचे घड वातडोलें सारोदकें साखर ज्यांत बोले, ।
खर्जूरिका, राजस माहुळंगी, नारिंगिणी मागर नीजरंगी. ॥ ४६

अंजीर, चारी, सुर नारिकेळी, [15]पूगीफळी, [16]आमलकी विशाळी; ।

---

१. कृश असा दों बाहूंच्या ठायीं. २ वानरश्रेष्ठ. (मारुति.) ३. जगत्कर्ता राम. ४. शिरोरत्न. ५. पत्ता, तपास. ६. शेत करणारा. ७. बागरूप वाफा त्यांत. ८. नागर. ९. पुच्छ. १०. वृक्षसमूह. ११. फणस. १२. केळी. १३. देवदार. १४. लिंबूं. १५. सुपारी. १६. आंवळी.

क्षीरी[1]भिधानी, गुड[2]तिंतिडीका, गंगाफळीं गुंफित वल्लरीका. ॥ ४७
मधू इक्षुसारें सरीं गाढतोंडें सुखें प्राशिलीं, फोडिलीं, जात लोंढे; ।
पदें फापरें शर्करा, शैल, हाला पडे, क्षारसिंधूजळें क्षार झाला. ॥ ४८
उपटुनि तरु पुच्छें एकदां लक्षकोडी,
पिळुनि महित टाकी, निर्फळी दारु[3] सांडी; ।
हवित वदनकुंडीं आहुती रामनामीं;
वचन जनकजेचें पाळिजे वाड नेमीं. ॥ ४९
तरू भंगितां, वाजती ते कडाडें; फळें झाडितां, सांडती त्या झडाडें; ।
वना रक्षित्यां राक्षसां चेव आला; त्वरें धांवले, भीमें[4] कोल्हाळ झाला. ॥५०
करीं कोयते, कौंतिया[5], भिंडिपाळा[6]; बळें वेढिला मारुती एक काळा. ।
कपीनायकें वाहिला वृक्ष हातीं; बळें झोडितां, आदके प्राण जाती. ॥५१
चौदासहस्त्रां वनरक्षपाळां बांधोनि पुच्छीं, भंवडी निराळा[7]. ।
ताडूनि भूमी, गतजीव केले; झुगारितां सिंधुजळीं बुडाले. ॥ ५२
लंकापतीनें परिसोनि वार्ता, शोकें विषादें पडिला विवर्ता[8]. ।
प्रेरी विरांतें निवडूनि वेगा; 'नाणा कपीतें तरि प्राण त्यागा.' ॥ ५३
ऐंशी सहस्त्रां वनकिंकरांतें देखोनि, वाढे बळ मारुतीतें; ।
लांगूल[9] शेषाकृति काळसूत्रीं गोवूनि, धांवे कपि पिंगनेत्री. ॥ ५४
महाद्वारिंची अर्गळा[10] लोहबंदी बळें ओढिली, वाहिली सव्य खांदीं; ।
करें कांडितां, मस्तकें जाति भंगा; उडे शोणितू, येत आकाश रंगा.॥५५
बांधोनि वैरीतरुभार पुच्छें, पीटूनि पृथ्वीवरि वातवत्सें, ।
टाकी समुद्रीं; बहु कच्छ[11] मच्छें सौख्यावळीं, क्रीडति सर्व इच्छे. ॥ ५६
जंबूमाळी हाक मारी निराळीं[12]; 'राहें, साहें वानरा ! घाय भाळीं.' ।
टाळी मारी सावकां भिंडिपाळीं; गोंवी ग्रीवे[13] दांडगा, काळ जाळी.॥५७
बळें ताडितां सन्मुखीं वज्रलातें, फुटे कोथळा, भंगलीं माजि आंतें[14]; ।
पदें चीरितां, आंत लोटोनि फाळी; म्हणे, 'रावणा भेट जंबूक माळी!'५८
तया पाठिशीं पंचसेनाधिपांतें त्वरें ओपिलें विष्णुसायुज्य हातें; ।
बळें मारिले पुत्र मंत्री जनाचे; 'कुळी आटली' बोलती लोक वाचे. ॥ ५९

---

१. खिरणीचें झाड. २. चिंचेचें झाड. ३. काष्ट. ४. भयंकर. ५. शस्त्रविशेष. ६. गोफणीनें मारावयाचे दगड. ७. आकाशांत. ८. भोंवऱ्यांत, संकटांत. ९. पुच्छ. १०. लोहस्तंभ. (ज्याला आडाणा असें म्हणतात तो.) ११. कांसव. १२. आकाशांत. १३. कंठ, मान. १४. आंतडीं.

लंकाधिराजें बळदर्पमाजें प्रेताग्नितेजें मनिं कोप कीजे; ।
पुत्रांत ज्याचें बहु प्रेम साचें त्या अक्षयाचे निजबाण टांचे. ॥ ६०
तूंणीर पृष्ठीवरि, चाप मुष्टी, शरांबुवृष्टी करितूचि धांवे; ।
शैलेंद्रधारी नगचंड मारी, ते लोहधारीं करि खंड जैसे. ॥ ६१
प्राणांतकर्मी झगटे सुवर्मी, निर्वाण ऊर्मी न पवे कपींद्रा. ।
संहारकाळीं खवळे कराळी, तैसा निराळीं अरिसिंह पावे. ॥ ६२
थोरें गडाडी नभघोरघोषें; आंसूडिले पामरपाद रोषें; ।
त्रैाटीत भेरी, धरणी तडाडी; गाजे, गडाडी घन घर्घराटें. ॥ ६३
पडे पुच्छपाशीं, खुडे सीस पाहीं; झुगारी नभीं, तें पडे तातगेहीं; ।
पिटी राव तो आननें वीसबाहीं; बुडे माय मंदोदरी दुःखडोहीं. ॥ ६४
ऑंसाळी घोर, काळी, सुरदळ विदळी कृष्ण व्याळी, विशाळी;
औवाळी चंडकाळी अधरपुटदळीं दंत दाढा कराळी; ।
शिंदूराकार भाळीं मळवट, उमळी कंठ माळा सिसाळी;
जिव्हा शोणीत लाळीं कपि अतुळबळी आकळी हस्तजाळीं. ॥६५
वक्षीं ओपूनि मुष्टी, रणवट सुघटीं ताडितां देहघृष्टीं,
संत्राणें चूर्ण पृष्टीं प्रबळगिरि करी, दाटला कंप सृष्टी; ।
वाहे शोणीत पाठी, करतळ तगटीं भूतळीं देत घृष्टी;
घायें घेवोनि प्राणें, असुरसुरगणा दाविजे चोज दृष्टी. ॥ ६६
वहू चक्षुचें वक्ष जो कुक्षकारी तया अक्षयाच्या क्षया क्षोभ भारी; ।
उठी मुख्य तो राक्षसां पक्षपाती, कपीभाळचक्षूपुढां दक्षवाती. ॥ ६७
असंख्यात वाजी, रथी, वीर गाढे करी कोटिच्या कोटि संग्राम चाडे; ।
दळापायिच्या पाइकां कोण लेखी ? नभीं दाटला रेणु, तो मेघ शंकी. ॥६८
घनें घातली बांकुडी तेंवि बाणीं, कपीशैल तो झांकिला थोर आणी; ।
महाघोष तो गर्जना एककाळें विजूच्या परी नागवीं शस्त्रजाळें. ॥ ६९
करुनि उखळ पुच्छें मंडळाकार बुद्धी,
मुसळ सरळ हातीं अर्गळा लोहबंदी,
दशमुखदलशालीकंडणीं गीत गाय;
'सकळजनकरामा, जानकी विश्वमाय. ॥ ७०

१. अपुतें. २. भाता. ३. वाजवी. ४. भूत. ५. राक्षसी. ६. डोक्यांचा समुदाय. ७. शरीरघर्षणीं. ८. पद्दवात. ९. प्यानांस.

मदाचे सदा चावरे तूष[1] गेले; नदी शोणितें क्षालितां शुद्ध केले; ।
करें आधणीं सूदले सिंधुडोहीं, जळे रावणी[2], वाहिलें चाप बाहीं. ॥ ७१
कपी विंधिला कोटिच्या कोटि बाणीं; गिरी खंडले, कोण संख्येसि आणी ?
हरि[3] क्षोभला, ताडिलें वक्ष घायें; पडे, नासिकीं बाळशोणीत वाहे. ॥ ७२
सुरेशारिनिर्जीत निर्वाण युद्धीं बहू ताडिला, मोडिला संधसंधीं; ।
पळे नागवा देहलोभें कपाटीं; कपी आननीं पाठिशीं ग्रीव दाटी. ॥ ७३
मुखें सत्यलोकेश्वरालागिं[5] आंगें नमी राव तो, पुत्रदानासि मागे; ।
वना पातला तो, म्हणे, 'रामदासा ! घडी याम[6] तूं सांपडें शत्रुफांसा.' ॥७४
बहू रक्षिलें आदरें प्रेम त्याचें; बळें वागुरे[7] गुंतला वैरियांचे; ।
गिरा गर्जनें धांवला वीरभारीं; कपी साधला; वाइल्या शंख, भेरी. ॥ ७५
भला घेतला सूड या शक्रजीतें; गुढ्या गोपुरीं; गाइजे कीर्ति गीतें; ।
पुरीं वांटिती शर्करा एकमेकीं; कपी नेणती निश्चयें काळ तो कीं. ॥ ७६
कपी बांधला, ओढिती लक्षकोटी; धरा रुंधली, दाटले लोक दाटीं; ।
करीं यष्टिका, मुष्टिका, लात, डांगा बळें ताडितां, मोडिती वज्र आंगा. ॥ ७७
सभे आणिलें वानरा शक्रजीता दिवें मंगळीं दंगळी रामदूता; ।
वधू ओपिती, शापिती हेमलंका; 'घडो या जडो काननीं शापशंका.' ॥७८
सभे रत्नसिंहासनीं लंकराणा म्हणे, 'बांधला शत्रु सन्मूख आणा.' ।
करीं भर्ग[8]शूळासरी खर्ग[9] झेली; बळें नावरे जात संतापवल्ली. ॥ ७९

वदत, 'कवण तूं रे ! मर्कटा ! मृत्युकामी ?'
'युंकवत[10] तव पुत्रा मारिलें, जाण तो मी; ।
खर[11]जिवहरणाचा दास; दोर्दंड घायीं
दलिन त्रिकुट, मेरू, कीटकातुल्य तूं ही. ॥ ८०
म्हणसि कवण राम ? ध्यात कैलासदेवा;
उभयश्रवणनाकीं शूर्पनाखेसि ठावा. ।
कनकहरिणहंता काळनाराच[12]घायीं;
तवकुळवननाशा तोचि दावाग्नि पाहीं. ॥ ८१

---

१. कोंडे. २. रावणाचा पुत्र इंद्रजित. ३. मारुति. ४. पाषाण. ५. ब्रह्मदेवाला. ६. प्रहर. ७. जाळ्यांत. ८. महादेवाच्या त्रिशूळासारखा. ९. तरवार. १०. उवेसारिखा. ११. खरनामक राक्षसास मारणाऱ्या रामाचा. १२. बाण.

उठी; नावरे कोप; निर्वाण मारें कपी ताडिला खर्गतेजाळ धारें. ।
नव्हे वांकुडा रोम; तो वज्रदेही; मनीं लाजला, मंदला मान ठायीं. ॥ ८२
म्हणे 'धन्य रे! वीर तूं' वीसबाहो 'गमे अर्कतूळापरी[1] शस्त्रघावो.' ।
कपी हांसतां, त्रासतो येर भारी. म्हणे, 'काळिजा जाळि हा काळवैरी.'॥ ८३
वदे कौटेळी[2], 'घात कैसेंन तूंतें?' म्हणे मारुती, 'मृत्यु नाहींच मातें. ।
सकाळें विधीगोळ[3] हा नाश पावे.' 'मृषा[4] बोलसी मर्कटा! सर्व मावे.'॥ ८४
वदे मारुती सत्य साधूजनासी वदावें मुखें; तें तुम्हां राक्षसांसी ।
नये बोलतां; तेंचि आईक आतां, असे वर्म हें आमुच्या जीवघाता. ॥ ८५
सतैलें बहू वास[5] गुंडोनि वाळीं[6], बळें पेटवा हस्तकें वन्हि जाळी. ।
क्षणामाजि हो येथ होईल अंतू.' म्हणे राव तो, 'सत्य साचार मातू. ॥ ८६
चिरें मागवा, नागवा लोकजाती; त्वरें भीजवा तैलपुच्छाग्रवाती; ।
त्वरें पाजळा, ऊजळा कीर्तिदीपा; करा कांकडा, माकडा भस्म तापा.'॥ ८७
बहूवर्णजाती बहूसाल वस्त्रें त्वरें नेदितां, ताडिती दूत शस्त्रें; ।
बहूरंग पोटीं कपी वाडबुद्धी; बहू मूढ तो नोळखे कर्मशुद्धी. ॥ ८८
करीं ओढितां, आगळें वाळ वाढें; बळी भागले गुंडितां मल्ल गाढे; ।
गिरी आटला अंबरीं अंबरांचा[7]. म्हणे रावणू शेवटीं काय वाचा. ॥ ८९
'पुरी नग्न; सेखीं दिसे पुच्छ रीतें;' भयें वेढिती एक यज्ञोपवीतें. ।
'करा नागवी' बोलती 'रामजाया.' त्वरें आंखुडी मारुती पुच्छ लाह्या.॥ ९०
सिता जाणतां मात ही मारुतीची, करी प्रार्थना मानसें पावकाची; ।
'सतीधर्म माझा, पती राम विष्णू, जगीं साच तैं होय तूं पां अतुष्णू[8].'॥ ९१
बळें पेटवूं लागले लक्ष कोटी; मुखें फुंकितां पातले प्राण कंठीं. ॥
धुमें कोंडला वात ब्रह्मांडगेहीं; जना जाचणी, मांडणी मृत्यु देहीं. ॥ ९२

दशमुख मुखवातें गौरवी पावकातें;
झडकरि वरि ज्वाळा झोंवल्या आननातें. ।
प्रबळ निविंडश्मश्रूकाननीं[9] हैव्यवाट[10]
धडकत लवलाहें, झाडितां होत आट. ॥ ९३

अरी त्रासला; जेउतें नेत वक्रें, हरी तेउतें खेळवी वाळ सूत्रें. ।
मुखें लासिलीं; निंदिती राघवातें; पुरीं संचरे, क्षोभला वन्हि वातें. ॥ ९४

---

१. कापसासारखा. २. कपटी. ३. ब्रह्मांड. ४. कपट. ५. वस्त्रें. ६. पुच्छीं. ७. वस्त्रांचा. ८. उष्ण नव्हे. (थंड हो, असा भाव.) ९. दाढी केसांच्या अरण्यामध्यें. १०. विस्तव.

दिसे कोपला रावणा रुद्रदेवो; पुरीभक्षणीं पावका होत लाहो. ।
उभे देखती; चोहटां लोक दाटी; पडे पुच्छ माथां, घडे शोकआटी.॥ ९५
'लपा, द्वार लावा, रिघा गेहकुक्षीं; कपी जाळितो, वाळ ओंवी गवाक्षीं.' ।
तया घाटितां आटणी होत सर्वां; दही त्यासवें रावणाधीशगर्वा. ॥ ९६
बळी धांवती, हस्तकीं तीर, डांगा; त्वरें शांतवा, पेटलें पुच्छ मागां. ।
तया लेववी मेखळा, कंठमाळा; पतंगापरी ओपिती देह जाळा. ॥ ९७
खणी, दूखणी, तीखणी, सातपांचें खचों लागलीं; त्या तळीं कोण वांचे? ।
मणीरत्नमाणिक्यवैडूर्यकोटी तडाडें नभीं सांडिती सिंधुपोटीं. ॥ ९८
तया पावकें व्योम[1] कर्पूर काळें; रवी तापला, रंग लोहीत झालें; ।
शशी पोळला, अंतरीं श्यामकाया; उडे धांवती, सांडती जेंवि लाह्या. ॥९९

धरुनि सकळ लिंगें, पोळितां राक्षसांतें,
त्यजुनि वसन, वेथे दाविती रावणातें. ।
परमकरपवित्रा स्पर्शतां एक वेळां,
बहुत विकळ वर्मीं शांत होईल ज्वाळा. ॥ १००
नगर तृतियभागें ओपिलें हूत आगीं,
सहित सुरपतीशीं तोषले यज्ञभागी. ।
प्रथम गरुड ठेवी हेमजंबू सुटंका;
प्रगट दहनसंगें आटली हेमलंका. ॥ १०१

पुरी जाळिली, तोचि तो धूप साचा; तया पाठिशीं दीप पुच्छानळाचा; ।
सितावंदनें हर्ष त्या वातबाळा; निघे सागरीं, शांतवी पुच्छलोळा.॥ १०२
प्रिया कांचनी प्रेम जाळूनि लंके तरे मोह, तो राम साचार देखे; ।
भयें मागुती पाहतां कामकोडें, जडे काळिमा आननीं काळ तोंडें. ॥१०३
नदीनायका लंघितां, घोष दाटे; सखे जाणती बैसले मित्र वाटे; ।
तया गर्जतां, गर्जना एक झाली. म्हणे जै तरे, 'वाजवा एक टाळी.' १०४
यशें मूख प्राणेश्वराचेनि तोषें, कपी नाचती मातले नामघोषें; ।
सुखारण्य विध्वंसिलें सुग्रिवाचें; पुढां सांगती, 'पातले दक्षिणेचे.' ॥ १०५

मधुवनमधुपानें मातले, गीत गाती;
कवळिति तरुशाखा, आवडी झोंक देती. ।

---

१. आकाश. २. नक्षत्रें.

विजयपरम घोषें गर्जती गाढ शब्दीं;
परिसत रघुराजें जाणिजे कार्यसिद्धी. ॥ १०६
दिठीं देखतां राघवाराजयातें, कपी गर्जती वाइल्या वीरहातें; ।
'सिता देखिली, देखिली, देखिली हो!' तनू नावरे श्रीवरा आपुली हो.॥
उठे आदरें आवडी राम खेंवा, करी मारुती मानसामाजि ठेवा; ।
तया भेटिचें बोलतां प्रेम वाचे, निघे, लाजिला शेष पाताळ खांचे. ॥१०८
क्षीरोदधीराघवरामचंद्रें, रत्नाकरीं वानरराजरुद्रें, ।
झाला गमे संगम जीवईशां; ते पर्वणी संभ्रम देवधीशा. ॥ १०९
चुडारत्न ठेवी पुढां प्रत्ययातें; मनें भेटली जानकी वल्लभातें. ।
मुखें वाचिली पत्रिका पद्मजाची; सुखें वागवल्ली फुले मारुतीची. ॥ ११०
'सुगम तव प्रसादें जानकीरत्नसृष्टी
जलधिजठरलंके देखिली दैव दृष्टी;
ग्रसितवदनचंद्रा क्लेश राहू कळेतें,
जिवनहृदयहेतू रामपीयूष तीतें. ॥ १११
करकमळ कपोलीं, लोचनीं नीरें वाहे;
कृशित परम देहीं, कुंतळीं धूळि राहे; ।
तव पद हृदयाळी, आननीं मौनमुद्रा;
सुविकळ वडवाग्नीमाजि ते रामचंद्रा ! ॥ ११२
शृंगारकौतूहलगीतविद्या वाजी, करी कार्मुकराज वंद्या; ।
अष्टौ कथा सांडुनि, कामचारी पलायनाचे पडिले विचारीं.' ॥ ११३
श्रवण करुनि रामें जाणवी सुग्रिवातें;
'कपिकुळदळ लावीं दक्षिणेचेनि पंथें.' ।
दळपतिनळनीळें ठोकिल्या राजभेरी;
न धरत भुभुकारीं माजले शैल पारी. ॥ ११४
कुंचावितां वानरभारमेळा; झांकोळती अंबर मेघमाळा; ।
त्या सारिखे पिंगट थाट चाले; भारावली मेदिनि, मेरु डोले.॥ ११५
परमसुंदर सुंदरकांड हें भवघटीं विघटी रसभांड हें. ।
परगुणी सगुणी परमादरें विररसा परिसा मन सादरें. ॥ ११६

१. आलिंगन. २. ब्रह्मदेव. ३. अमृत. ४. गालावर. ५. पाणी, अश्रु. ६. केशांमध्यें. ७. भ्रमर. ८. नगारे. ९. आकाश. १०. पृथ्वी.

युद्धकांड.

अभिजितशुभलग्नीं,[1] मित्र[2] पावोनि हस्तीं,[3]
प्रगट अमृत वेळा देत कल्याण स्वस्ती; ।
भगणकरणवारें[4] योग सर्वार्थिदायी;
जयतिथि, जयमाळा, वातसे रामपायीं. १
धडकत गज भेरी. घाव गाजे निशाणा;
उठत भुवनपाळू, माजली वीरसेना; ।
पवनतनुजपृष्ठीं राम राजाधिराजा;
लवणजलधिपारा पातला सैन्यमाजा. ॥ २
वैरकनकपुरेशें[5] प्रेरितां विश्वकर्म्या,
पुनरपि नगरेंशीं निर्मिलें रम्यहर्म्या;[6] ।
कुमर, अनुज, मंत्री, राजभद्रीं[7] नृपाळें
विकळ हृदयचित्तें, लागल्या रामव्याळें.[8] ॥ ३
'उलंघुनि सिंधू, जेयें[9] शुद्धि नेली; जगीं वानरें ख्याति विख्यात[10] केली; ।
दळेंशीं बळें शत्रु पावेल लागा; तया आकळी कोण तो मंत्र सांगा?' ॥ ४
सकळ कुमर, मंत्री, क्षोभले शत्रुमारा;
धरुनि प्रबळकोपा, झाडिती खड्गधारा; ।
'वधुनि अरिकुळांतें, पार बांधूं शिरांचे;
लिखित पुसुनि सांडूं वानरांचें नरांचें.' ॥ ५
बिभीषणें राक्षसराजमित्रें केलें तयां खंडन न्यायसूत्रें; ।
निंदूनि बोले सकळां खळांतें, 'वाचाळ वायां वदती बळातें. ॥ ६
पराचेनि पाळें यशें नित्य पोटीं, बळें हीन त्या चावटीं वाड गांठी; ।
वदे न्यून मागां पळे शस्त्रमारीं, गमे ग्रामसिंहासरी[11] देहधारी. ॥ ७
जयाचे दिठी वत्सगोपाद सिंधू, पुरी आटिली, शोधिला मूळकंदू; ।
तयापाठिशीं राम धांवेल शुद्धी; गमे सर्वही मोक्ष पावाल युद्धीं. ॥ ८
न मनि लघु नरातें, आठवीं हैहयातें;[12]
जिवनहर तयाचा, राम जिंके तयातें;[13] ।

---

१. दोन प्रहरीं उत्तम योगीं. २. सूर्य. ३ हस्तनक्षत्रीं. ४. नक्षत्रगण. ५. रावणें. ६. रम्यगृहा. ७. राजसिंहासनावर. ८. सर्प. ९. ज्याणें. १०. प्रसिद्ध. ११. कुत्रे. १२. सहस्रार्जुनातें. १३. परशुरामातें.

वनचर कपि ऐशी भ्रांति सांडीं भुपाळा !
स्मर बळ लवलाहें वाळिदोर्दंडजाळा. ॥ ९
रघुवरशर जैसे सूर्य कल्पांतकाळीं,
न मिळत जंव खेवा रावणा कंठनाळीं, ।
जंववरि कपि सिंधूपैलपारांग सूत्री[1],
तंववरि रघुराया ओपिं राजेंद्रपुत्री. ॥ १०
सौमित्राची हस्तचापाग्ररेखा नुल्लंघीं त्या रावणालागिं देखा; ।
त्या रामाचा दूत ऐकूचि[2] आला, कीर्तीनें तो सिंधु लंघोनि गेला. ॥ ११
तया राघवाशीं घडे युद्धवार्ता, मृषाभाषणें रंजवा लंकनाथा. ।
त्वरें जानकी भेटवा राघवातें; वृथा प्राण वेंचाल निर्वाणघातें. ॥ १२
नव्हे मानवी, काळ तो दंडधारी; बळें क्षोभला राक्षसां अंतकारी; ।
बळें बंधनीं रक्षिले देव सोडा; कपी पातले घेत संग्रामहोडा[3].' ॥ १३
अनुजवचन जैसें सार पीयूषधारी[4],
सुखहित सकळांतें जीवना हेतुकारी; ।
वडिल कुमर बोले, 'राजया ! वन्हि गेहीं,
विष तुज निजबंधू शत्रुचा पक्ष पाहीं.' ॥ १४
दशमुखपरितोषा भंग तो शब्दघायें;
त्वरित अनुज कोपें ताडिला वामपायें; ।
अनुचितअवमानें पोळला येरु पोटीं;
त्यजुनि सुहृद माया, चालिला रामभेटी. ॥ १५
'शरण' म्हण 'तयातें, जो करी हस्तछाया;
निवटुनि कळिकाळा निर्दळी मोह माया. ।
धरुनि चरण त्याचे, दास होईन भावें;
उतरिन भवसिंधू बैसतां नामनावें.' ॥ १६
गदापाणि[5] तो मंत्रियांचेनि मेळें, मनें सागरा लंघिलें शीघ्रकाळें; ।
कपीनायकें देखतां शुद्धभावा, त्वरें भेटवी राघवा देवदेवा. ॥ १७
रघुपतिपदपद्मीं सीसें[6] तो शत्रुभ्राता
न्यसि[7], तंव जगदीशें ठेविला हस्त माथां. ।

---

१. चपल. २. एकच. ३. युद्धाविषयीं पैजा. ४. अमृत. ५. गदा आहे हातीं ज्याच्या. ६. मस्तक. ७. ठेवी.

'जंववरि शशि, सूर्यो, जान्हवी भू, कथा हे,
तंववरि तुज लंका अक्षयी राज्य लाहें.' ॥ १८
रघुपति सहबंधू देखतां वीरश्रेणी,
त्यजुनि फळजळातें सूदला दर्भ पाणीं. ।
सकळ दळ तराया पंथ याची सुलीनें;
[1]अविनित परसिंधू मानसीं त्या न मानें. ॥ १९
नव दिवस समुद्रा पाहिलें त्या उदासा;
रघुवर नरराजा कोपला काळ जैसा; ।
लवणजलधिशाचा दर्पहा सर्प, यातें
गिळिल गरुड माझा बाण चंचूनिघातें. ॥ २०
[2]दंभोलिधारा बडवाग्निबाणा ओपीन सिंधूमुखतोयपाना; ।
सारीन सर्वै जळलेशबिंदू, जैसा [3]कुहूचे रजनींत इंदू. ॥ २१
मंदाकिनीमंगळसूत्रभंगा आवेश धांवे नळिनाक्ष रंगा; ।
[4]नाराच [5]कुंभोद्भव सागरातें भासे; भयें कंपित जीव ज्यातें. ॥ २२
कल्पांतरुद्रासम काळदृष्टी लक्षूनि पाहे, तंव तोय सृष्टी; ।
[6]कल्लोळमाळी [7]डहुळे खळाळें; [8]वीचीविवर्ता भंवडी [9]ईसाळें. ॥ २३
सुखें होमकुंडीं शिखी तेजरूपी, निशा संपतां, मंडळीं लोकतापी ।
निघे, त्यापरी सागरांतूनि सिंधू; कपीलोचना पातले [10]चोजबिंदू. ॥ २४
प्रगट नदनदीशीं पातला सिंधु तेथें;
नमन करुनि पूजी [11]आत्मजेच्या वरातें; ।
'[12]कपिवरनळहस्तें बांधवीं सेतु शैलें;
तरति [13]हरि जळातें बाविला मंत्र वेळें.' ॥ २५
ऋषी देव पूजी शिळे गंडकीतें, जळीं टाकितां शाप झाला तयातें; ।
'तरी जीवनीं ग्रांव याचेनि हातें' तयालागिं हें काज सांगें तयातें. ॥ २६
म्हणे राम तो, 'लाविला बाण चापीं नये मागुता काढितां' काळकोपी; ।
'तया काज सांगें' वदे सिंधु तापीं, 'मुरु दैत्य हा पश्चिमेमाजि पापी. ॥ २७

---

१. दांडगा, नम्र नव्हे असा. २. वज्रधारा. ३. अमावास्येचे. ४. बाण. ५. अगस्त्य. ६. समुद्र. ७. ढवळे. ८. लहरी व भोंवरे यांला. ९. ईर्ष्येनें. १०. चमत्कार, आश्चर्य. ११. लक्ष्मीच्या. १२. वानर. १३. पाषाण.

जळीं नांदती, त्यां जिवां नित्य मारी; ऋषीनिर्जरां मानवां क्लेशकारी; ।
अहोरात्र मातें पिडी दुष्ट रामा !; तया पाठवीं सत्वरा काळधामा.' ॥ २८
रमानाथ तो सोडितां बाण मुष्टी, मुरू मारितां पोळली भूतसृष्टी; ।
जळा आटितां मत्स्यकूर्मादिकोटी लयो पावल्या; तोषला सिंधु पोटीं. ॥ २९
दैत्येंद्रातें मारितां रामनाथें, मूरू ऐसें नाम त्या मंडळातें. ।
धेनूविप्रां देशआल्हादकारी; रामें केले लोक धर्माधिकारी. ॥ ३०
असो. सागरें आणिलीं रत्नजातें; तिहीं भूषणीं भूषिलें राघवातें. ।
म्हणे, 'राजया ! सांडि या वल्कलांतें; अरी सन्मुखें योग्य नोहे नृपातें.'॥ ३१
सांगोनि सिंधू रिघतां समुद्रीं, गर्जोनि पैजा उठिजे कपींद्रीं. ।
अद्रीनगांच्या उचलोनि पेंढी, महोदकीं टाकित कोडेंकोडी. ॥ ३२
सहितशिखरशृंगे, ग्रामगंगातडागें,
वनधर गिरि जैसे वाडविद्याद्रि आंगें; ।
उतरडि घट तैसे, मस्तकीं एकिकाळें
धरुनि सबळ येती एकएकां विशाळें. ॥ ३३
नळाच्या करीं जो शिळाग्राव लागे, जळीं तुंबिकी दारु तैसा तरंगे; ।
नभीं चोज हो पद्मजापार्वतीशा; दिसे दक्षिणे सेतु नागेंद्र जैसा. ॥ ३४
तिमिंगिळांतें गिळिजे विशाळीं, ते मत्स्य घेती उदकीं उसाळी; ।
लोटे गिरी तो गिळिती सवेगें; क्षारोदधीबंधनपंथभंगे. ॥ ३५
मारूनि शंखासुर, वेद चारी जो उद्धरी केशव चक्रधारी, ।
तो मत्स्यरूपी जळवासि यांतें सांगे, बळें वारुनि दूरि हातें. ॥ ३६
म्हणे, 'मूढ हो ! मीचि तो रामराजा; शिळीं सेतु बांधी जळीं देवकाजा; ।
तया विघ्न कोणी कदां नाचरावें; तळीं पुष्टि देऊनियां साह्य व्हावें.' ॥ ३७
न जडति जड शीळा सागरीं एकमेकां;
तरति; परि उसाळें धांवती दूरि देखा; ।
विकळ मति नळाची; हस्तकीं काज ठेवी;
रघुपति सुखतोषें वर्म संकेत दावी. ॥ ३८

---

१. सर्व प्रकारचीं रत्नें. 'जात' म्ह० समुदाय. जसें; वस्त्रजात, धातुजात. २. शृंगारिलें. ३. विसविस. कोडी=खंडी. ४. भोंपळी. ५. काष्ठ. ६. लक्ष्मी व पार्वती यांचे पती विष्णु आणि शिव यांस. ७. मत्स्यविशेषातें.

'राकारा एक रेखीं धरुनि, मग दुजेमस्तकीं मा सुरेखीं;
कल्पांतीं भिन्न भेदा पुनरपि न घडे, वर्म जाणें विवेकी'. ।
संतोषें सेतु बांधी रघुवरवचनें, ज्यापरी विश्वकर्मा;
हें जाणा जाणतेनों भवजळतरणीं रक्षिजे या सुवर्मा. ॥ ३९

शिळा मेळवी, रेखितां राम हस्तीं; शिरे एक देतां जळे एक होती; ।
नळें बांधिजे यापरी सेतुबांधा; जडा जीवनीं[1] जोडिला एक सांधा. ॥ ४०

बुडति भवजळाब्धीमाजि घेऊनि आना[2],
तरति दगड ते हो! तारिते रामसेना; ।
जलधिकपिगिरीचा गूण नोहे निवाडें;
रघुपतिमहिमेचा घोष गाजे गडाडें. ॥ ४१

दहायोजनें रुंद तो, लांब देखा शतां योजना लागली हेमलंका. ।
अहो! संपलें काज तें पंचरात्रीं; कपी नाचती गर्जती नाममंत्रीं. ॥ ४२

मुहूर्तें उठे राम सौमित्रबंधू; दिठीं[3] देखतां चालती सेतुबंधू; ।
चमू दाटतां, लोटती सेतुसीमा; कडेचा पडे, तो उडे वीर व्योमा[4]. ॥ ४३

कपी संगतीं सेतु लंघोनि रामें, सुवेळाचळा पातले अर्धयामें[5]; ।
दळें दाटलीं, दुर्ग वेढीत झूजा; वदे मात शार्दूळ लंकाधिराजा. ॥ ४४

कपीनामसंख्याबळाचा वृत्तांत शुकें सारणें सांगतां, लंकनाथ ।
चढे गोपुरीं[6] सत्वरा, सैन्य पाहे; करें चार[7] तो राघवा दाविताहे. ॥ ४५

'धृतशिर शुभअंकीं नाथ तो वानरांचा;
चुरित चरणपद्में काळ[8] तो अक्षयाचा[9]; ।
कनकहरिणचर्मी पौडला चापपाणी[10];
निकट अनुज तूझा बोलतो मात कानीं.' ॥ ४६

सहस्रावधी मस्तकीं आतपत्रें[11], शिरोभूषणें, कंकणें, हेमसूत्रें; ।
श्रिया दावितां वैरिया राक्षसेंद्रा, तळीं छत्रछाया पडे राघवेंद्रा. ॥ ४७

ऐरीबांधवें[12] राघवप्राणमित्रें करें दाविजे गोपुरीं शत्रुछत्रें; ।
कपी देखतां क्षोभले काळरूपी; धरानायकें लाविला बाण चापीं. ॥ ४८

---

१. उदकीं. २. दुसऱ्यास. ३. दृष्टीनें. ४. आकाशीं. ५. अर्धरात्रीं. ६. शहराचा दरवाजा. ७. दूत. ८ मारुती. ९. रावणाच्या एका पुत्राचें नांव. १०. धनुष्य आहे हातीं ज्याच्या. ११. छत्रें. १२. शत्रु रावण त्याचा बंधू जो बिभीषण त्यानें.

वहू आतपत्रें शरें हेमपुंखें[1] क्षणें छेदिलीं, अंबुजें जेंवि नोखें[2]; ।
जळीं नाळ तैसे रिते दंड देखे; पळे रावणू खालता प्राणधाकें. ॥ ४९
छळें राघवाच्या खळें लंकनाथें वळें राक्षसी माव केली सितेतें; ।
मृषा[3] शीर निर्मूनियां राघवाचें सिते दावितां, हारपे रूप त्याचें. ॥ ५०
विरीं वानरीं वेढिजे दुर्गपौळी; तळीं पाडिती अग्नियंत्रें खळाळी; ।
दळें सिद्ध झालीं, वळें राक्षसांचीं; मदा सांडवी गर्जना वानरांची. ॥ ५१
बिभीषणाच्या परिसोनि मत्ता, शिष्टासि धाडी सकळां विधाता. ।
वाळी वळीनंदन अंगदातें बोधूनि, बोले हितसाधकातें. ॥ ५२
　　'नकळत मज मागां जानकीलागिं नेलें;
　　　　शरण म्हण; असो तें, मोकळें सर्व केलें; ।
　　अचळ पद सितेतें ओपितां लाभ तो कीं;
　　　　न मनित, कुमरेशीं नांदसी यमलोकीं.' ॥ ५३
'वदें यापरी अंगदा ! रावणातें.' शिरीं वंदिलें राघवा तोषचित्तें; ।
उडाणीं दणाणी मही अंगवातें; सभे पावला आसनीं शत्रु जेथें. ॥ ५४
नगाशत्रुपुत्रात्मजा[6] राजभद्रीं पुढां देखतां, वोथरे रावणाद्री; ।
करें हांकिती अंतरें दंडधारी; दिठीं देखतां अंगदा घेत शौरी. ॥ ५५
पुढां रत्नसिंहासनीं लंकरावो तुळे उंचपुच्छासनीं वीर बाहो; ।
म्हणे, 'बोल कीं राजया ! आलियातें; करीं क्षाळणा मागिल्या झालियातें. ५६
　　दोषांतें विसरे, गुणा न विसरे, निर्दोष नेमागळा,
　　　　त्याचें सख्य करीं विदेहकुमरी देवूनि रक्षीं कुळा; ।
　　लंका राज्य अलोट रामवरदें औत्तानपादीपरी[8];
　　　　हें चित्तीं जरि नाणिसी, तरि क्षया जाशील सर्वोपरी. ॥ ५७
　　शत्रूचे अपराध कोटि न गणी, मी भृत्य हें भावितां;
　　　　देतां सान समर्थ भेद न म्हणे, दे आपणा तत्वतां; ।
　　वैकुंठादि महापदें पदजळें अव्हेरितां लोळती;
　　　　ब्रह्मेंद्रादि महेंद्र किंकर पुढां बद्धांजळी तिष्ठती. ॥ ५८

---

१. सोन्याचा आहे पिसारा ज्याला अशा बाणानें. २. नखानें. ३. खोटें. ४. तटाची उतरती भिंत. ५. सर्व जगताची उत्पत्तिकर्ता राम. ६. पर्वतशत्रु जो इंद्र त्याच्या पुत्राचा (वाळीचा) पुत्र जो अंगद त्याला. ७. भीति. ८. उत्तानपादराजाचा पुत्र (ध्रुव) त्यासारिखें.

त्रैलोक्य देवोनि दिलेंचि नाहीं भावी मनें राम उदार पाहीं; ।
खल्पेंचि पैं हो मग त्या दयाळा द्वारीं वसे होउनि द्वारपाळा. ॥ ५९
त्या रामपायीं दशमस्तकांतें ठेवोनि, मागें वरहस्तकातें; ।
कल्याण तेणें तुज कल्पकोटी; हे सत्य जाणा रघुराजगोठी. ॥ ६०
विदेहकन्या मम कन्यका हे मानूनि, ओपीं रघुनायका हे. ।
सौमित्रमित्रीं करिं कां सुमैत्री; सौभाग्यता दे सकळां[1] कलत्रीं. ॥ ६१
पुजे वाहिलीं मस्तकें जीं शिवाचे, शिरें साजिरीं, ज्या मुखीं वेद वाचे; ।
नका लोळवूं काकजंबूकपायीं; बहूजाणल्या सांगणें फार काई ?' ॥ ६२
पुसे राव, 'तूं कोण ?' 'मी रामभृत्यू.'[2] म्हणे, 'कोण तो राम ?' 'शत्रूंसि मृत्यू.'।
'तुझा तात तो कोण ? रे पर्णभक्षा[3] ! 'अरे ! नेणसी ? पाळिलें वाळिकक्षा.॥६३
तुझे शूर्पनाखेचिया नाकपंकें मळें घोळिलें खड्ग तेजाळ तीखें; ।
खरा खंडिल्या रक्तगंगाखळाळीं, यशा क्षाळिलें तोचि लंकेसि जाळी.॥६४
तया राघवा नेणसी ? चोज मोठें; भुकेला करीं बाण निर्वाण नेटें; ।
खरा त्रीशिरा पिंड ग्रासूनि, पाठी तुझे कंठिचें रक्तपानीयघोंटी. ॥ ६५
बळें पातला कीर्तिग्राहीक जोडीं; खरें बाणनाणें शरें प्राण मोडी; ।
तुळीं शीर सीतातुळाधार खंडी; रुचे तें तया सत्वरा एक सांडी.' ॥ ६६
'मागां मर्कट एक उर्मट कुडें, ज्या काळिमा आननीं;
केलें तें फळ पावला, दवडिलें दंडूनि लंकाजनीं.' ।
बोले अंगद, 'नेणवे कपिदळीं पैं कोण तो ? केउता
भाग्याचा जरि नाशकाळ जवळां, तैं देखसी मागुता.' ॥ ६७
'अरे ! मर्कटा ! देख हा इंद्र माळी; शशी छत्रधारी, रवी दीप जाळी; ।
घरीं नीर वाहे पती पश्चिमेचा[4]; मळ क्षाळितां वन्हि तेजाळ कैंचा ? ॥ ६८
गणाधीश घेवोनियां दंडकाठी, पशू रक्षितां नावरे श्वास पोटीं; ।
जगत्प्राण तो वायु हा केर लोटी; सटी शांतवी बाळ स्नेहाळ मोठी. ॥६९
कराळी तराळीण हे भद्रकाळी; निशी जागणें सर्वदां क्षेत्रपाळीं; ।
उभा नीच नापीक मल्हारि पाहें; वदें मोकळा कोण तो देव आहे ?॥७०
जया भक्षितां वेळ रक्षोगणातें नसे, प्राशितां जेंवि अंबूकणातें; ।
तया राघवा मानवालागिं साचें नये वर्णितां, वानरा ! लाज वाचे.' ॥७१

---

1. सकलस्त्रियांच्या ठायीं. 2. रामसेवक. 3. पानें खाणाऱ्या वानरा. 4. वरुण.

'सुरसरि सरिता ते, नाग तो देवदंती;
हय दिनकरवाजी, सिंधुजा[1] नारिपंक्ती; ।
कृतयुग युग, धेन्वा[2] पुष्पधन्वा[3], खगेंद्रा
खग, बरळसि कैसा मानवी रामचंद्रा? ॥ ७२
कपिसम हनुमंत, ग्रांव[4] चिंतामणी[5] रे!
धवळवृषभ नंदी, सोम तारागणीं रे! ।
गिरिसम कनकाद्री, शेषसाम्या भुजंगा,
न म्हण मनुज तैसा मैथिलीप्राणरंगा.' ॥ ७३
'रे रे! अंगद! सांप्रतें तव पिता रामें हता वांटिवा[6]!
तें सत्यें मज नारदें कथियलें तारापिली सुग्रिवा, ।
दूतत्वें तुज लाज कां न मनवे? रामानुसेवीसमा!
भूभारें तव जीवनें कपिकुळीं धिग् मान नष्टाधमा!' ॥ ७४
'रे रे! रावण! रावणा बहुतरां आकर्णिलें ज्यापरी,
पूर्वी एक धरूनि बंधन करी जो कार्तवीर्याघरीं, ।
एकें नर्तनदापितान्नकवळीं[7] दैत्येंद्रदासीजनीं[8],
रे! त्यांमाजिल तूं विहीनें[9] म्हण कां लज्जा न घेतां मनीं.' ॥ ७५
'रिघ हरि[10]! मजपाठीं दास होवूनि माझा;
वधुनि अरिकुळातें सूड साधीन तूझा; ।
मनुजरघुवराचें शीर छेदूनि हातें,
न लगत पळ आतां राज्य ओपीन तूतें.' ॥ ७६
वदे वीर तो, 'राज्य तें रामसेवा; तुतें पातलासे पुढां मृत्युखेवीं[11]. ।
शरें वाळि तो विष्णुसायुज्य भोगी; कुळेशीं तुंही चालकां तेचि मार्गी.' ७७
'धरीं रे! धरीं वानरा! ताडतोडी.' दशाशीर क्रोधावला, खड्ग काढी; ।
त्वरें मल्ल चत्वारि धांवोनि प्रौढी, भुजीं भीडले घातल्या नक्रआढी. ॥ ७८
उडे वीर, गर्जे, पिटी पुच्छ घायीं; शिरीं मंडपू, राजकोटीर[12] पायीं; ।
भुजीं मल्ल ते लोंबती चारि प्रेतें; दिसे पातला वीर तो राम जेथें. ॥ ७९

---

१. लक्ष्मी. २. धनुर्धर. ३. मदन. ४. पाषाण. ५. चिंतिलेली वस्तु देणारा मणि. ६. बोलक्या. ७. नृत्यकरून दिला आहे अन्नग्रास ज्याणें अशा. ८. बळीराजाच्या दासींनीं. ९. रहित. १०. वानरा. ११. आलिंगन. १२. राजाचा मुगुट.

त्रिभुवनपतिपायीं ठेविलें भाळ भावें;
सकळकपिकपींद्रा वंदिलें एकजीवें; ।
अरिमुकुट पदाग्रीं आणिला दिव्यरत्नीं;
दशमुखअनुजाचा पूजिला दिव्यमूर्ध्नी. ॥ ८०

लंका समर्थें शरणागतातें देवोनि, कैसें विपरीत होतें? ।
आकर्णितां ते निजभृत्यवाणी, बाहू पिटी राघव चापपाणी. ॥ ८१
घनाचेपरी गर्जतां सुग्रिवातें, त्वरें भोंवडी नीळ कूच्या दळातें; ।
कपी चालिले मांडला आट सृष्टी; भयें कांसवें घातले पाय पोटीं, ॥ ८२
दिशा दाटल्या, धूसरें भानु लोपे; थरारे मही, मेरु मंदार कांपे; ।
पळों भावितो वेळ सांडूनि सिंधू; हहाकार लंकापुरीं एक नादू. ॥ ८३
हुडा वेंघले, झाडिती नग्न शस्त्रें; उल्हाटादिकें, भीडका, अग्नियंत्रें; ।
दिसे वर्षणें मांडिलें काळमेघीं; कपी क्षोभले लागले दुर्गलागीं. ॥ ८४
गिरी टाकिती अंबरीं एकिकाळें; तळीं चूर्ण होती महायंत्रजाळें; ।
पुरीरक्षकां झोडिती यंत्रघायीं; बळी झूजती, सांडिती प्राण ठायीं. ॥ ८५
ग्रिवा गोंविती सत्वरा पुच्छदोरें; नभा वेंघती भोंवणी प्राणघोरें; ।
तयां पाउलीं खेळती वोळकंबे; जिंऊ गेलिया सांडिती प्रेम क्षोभें. ॥ ८६
बळी दुर्गिचे खोंचिती शूळ हातें; कपी खालतें ओढिती पाउलातें; ।
तळीं पाडिती ठेविती चंडशीळा वरी, नाचतां आटणी अस्थिजाळा. ॥ ८७
मुखें, नासिकें, तोडिती, नेत्र वाटे नखें फोडिती, फाडिती थोर पोटें; ।
बहू आटितां वानरीं राक्षसांतें, दिठीं देखिलें गोपुरीं लंकनाथें. ॥ ८८
म्हणे सैन्यकां, 'देखतां काय वेगीं? कपीं मांडिली थोर लंकेसि लागी; ।
गडाभोंवता बूजिला ओघ प्रेतीं; करा धांवणें माजवा युद्धख्याती.' ॥ ८९
दळें चालिलीं, त्यां करी कोण लेखा? बळी उंचिवा जिंकिती ताळरुखा; ।
जटा लंबकर्णीं, नखें, दंत, दाढा; रुपें काळ विक्राळ तेजाळ तोंडा. ॥ ९०
धडाडीत नेत्रीं तया वन्हिकुंडें; सुरा प्राशिली, मातले हस्तदंडें; ।
गदासाधना दाविती घोरघोषें; कुटी भ्रूकुटी ताविता काळ त्रासे. ॥ ९१
उडाणीं दणाणीं सैराईत राणे; पुढां झाडिती पट्टिका लोह बाणें; ।
लघू लाघवी वेग दंडाइतांचे; समोरें करी मार खंडाइतांचे. ॥ ९२

---

१. धुराळ्यानें. २. मर्यादा. ३. बुरुजाला. ४. तोफा. ५. आकाशांत. ६. प्राण गेल्या. ७. पटाईत. ८. मूर्खांचे.

करीं ओढणें, माजलीं मेघचक्रें; अतीधार विद्युल्लतातुल्य वक्त्रें. ।
अरी संघटीं झोंबती जेंवि नक्रें; मिठी घालितां कांपिजे देवशक्रें. ॥ ९३
नखें, तोमरें, कांतिया, शूळ, चक्रें; गदा, मुद्गरें, गुप्तिया, पाश, वज्रें; ।
कैतारें, दुधारें, तिधारें, शतघ्ना, दशघ्ना, करीती खटा त्या कृतघ्ना. ॥ ९४
सिसें[२] मोकळीं, सिंधुरें भाळवक्त्रा; पटीं व्याघ्रचर्मैं; कटीं यमदंष्ट्रा; ।
सुरांचीं शिरें रेखिलीं नेपुरांतें; भरी भीम कोल्हाळ तो गोळकातें. ॥ ९५
बहू चामरें, श्वेत अंकूश गाढीं; त्रिदें ओपिलीं मस्तकीं बाहुदंडीं; ।
निळा मारुती अंगदा सुग्रीवांचे पदीं तोडरा पूतळे वानरांचे. ॥ ९६
विरश्रीमदें माजले, देति हाका; रणीं ग्रासिला देव हो ! राम राखा; ।
उफाळें नभा धांवती सूर्य ग्रासूं; मही ताडितां पन्नगां होत त्रासू. ॥ ९७
तयांपाठिशीं थाट साह्यायनाचे; नैभोकुंजरातुल्य चापल्य त्यांचें; ।
करीं शूळ ते बैसले पांच एका; गिरीशीखरीं वृक्ष तैशा पताका. ॥ ९८
तयां लागला, चालिला अश्वभारू; जयातें भिये अंबरीं सूर्यवारू; ।
अैसीपंजरीं गुंढिले शत्रुमारा; बळी बैसले खड्ग तेजाळ धारा. ॥ ९९
तळीं वज्र चाकें, ध्वजा भिन्नरूपी; पुढां दिव्य वाजी धुरे काळकोपी; ।
खणीं शस्त्र अस्त्रें धनुर्बाण तूंणी; रथा धांवतां मेदिनी ते दणाणी. ॥ १००
तुरें, दुंदुभी त्राटिल्या राजभेरी; तडाका ध्वनी, खेचरां येत शीरी; ।
कपाटें चहूं द्वारिचीं मुक्त केलीं; छळें लोटलीं, द्वीदळें एक झालीं. ॥ १०१
'यशस्वी सदां जानकीप्राणनाहो;' कपी गर्जती, धांवती ऊर्ध्वबाहो; ।
'जयो रावणा राजया सार्वभौमा' अरी गर्जती, पावले युद्धकामा. ॥ १०२
असंख्यात कोटी कपी वीर जेठी गिरीमंदरातुल्य ते धीर नेटी; ।
मुखें रागिटें भैरवाकार दृष्टी, बळें लोटतां काळ कल्पांतसृष्टी. ॥ १०३
दळें मीनलीं सन्मुखें येरयेरां; निघातें भयें खोंकरे भूतडेरा; ।
निघे, गाजती त्या ध्वनी मेघसानें; दिशा कुंजरे घाबिरे घेति रानें. ॥ १०४
भला मारि घे, पाठि दे धीर धीरा ! छळें हाकितां माजले वीर सैरा; ।
तडाडें धडाडें सुडें घाय गाढें धडा ताडितां, मोडिती हाडमोडें. ॥ १०५
गिरीशैलशृंगीं शिळावृक्षमारें, अरी वल्लरी बाणधारी सुभारें; ।
शिसें[१२] तूटती, फूटती नारिकेळें; सरी इक्षुदंडा पदें पाणिनाळें. ॥ १०६

१. शस्त्रविशेष. २. मस्तकें. ३. ऐरावतासारिखें. ४. सूर्याचा घोडा. ५. खड्गरूप पिंजऱ्यांत. ६. माता. ७. पृथ्वी. ८. शहारे. ९. दोन सैन्यें. १०. नाथ. ११. जर्जर झाला. १२. मस्तकें.

हुली घालिती, टाकिती शस्त्र ओढा; सरी एकटी सौंदणी[1] घेत होडां[2]; ।
विरांचीं शिरें चेंडुवातुल्य पायीं कपी ताडिती, फोडिती लातघायीं. ॥ १०७
बळें मातले, हाणिती वक्षपृष्ठीं; कपीमस्तकीं ओपिती वज्रमुष्टी; ।
फळें पीकलीं ज्यापरी होत चेंदा, सडे सांडणी मांडणी रक्तमेंदा. ॥ १०८
करीं शोभती खेटकें[3], आणि भाले, पुंढां[4] सांडिती मेट पायीं निढाळें; ।
कपी काळिजें खोंचितां, येर कोपे; फळी मोडिती, पाडिती, दंत थापे. १०९
बळी ओढणें चंड वाहूनि माथां, हरी[5] पादपां झोडिती शस्त्रघाता; ।
उडाणें कपी पाठिशीं हेतै[6] लहे; पुढां पाडिती सत्वरा लातघायें. ॥ ११०
कतारे करीं, सूरिया एकरंगी; उरीं मारितां वानरा वेग अंगीं; ।
शिळा ताडिती सन्मुखीं येतयेतां; उताणा पडे, सांडणी होय दांतां. ॥ १११
करें मारितां, मस्तकें जाति व्योमा[7] रवीचंद्रइंद्रादि लंघूनि सीमा; ।
क्षयातें पदीं मारुती येति मूमी, रमानाथपादांबुजीं मोक्षकामी. ॥ ११२
धडें नाचती, टाळिया वात हातें; शिरें गायनें हांसती जीं तयांतें; ।
'रणीं मोक्ष आम्हां, भवीं[8] वास तुम्हां, सुखानंद हा नेणती इंद्रब्रह्मा. ॥ ११३
असो. देव ते वानरीं देहधारी; हरी[9] माजले कुंजरां[10]राजभारीं; ।
शिरें फोडिती, मोडिती मान शुंडा; मुखें फाडिती, तोंडिती[11] ग्रीव[12] तोंडा. ॥
उडी घालिती, फोडिती कुंभ[13] रागें; पदें लोटिती, दाटिती दंत मागें; ।
महावंत[14] मारूनियां चंडमारें, शिरें पांचही भंगिती एकधारें. ॥ ११५
पुढें ओढिती, टाकिती ऊर्ध्वपंथें; पडे त्या उजू हाणिती आणिकातें; ।
पताका नभीं वाजती त्या फडाडें; तळीं लोटती पाठिचे प्रेत पाडें. ॥ ११६
पुसीं[15] आंखुडी दावणी कुंजरांच्या; नभीं भोंवणी दाविती मोवणीच्या; ।
फळीं लागल्या वल्लिका तुंबिनीच्या[16]; परी मारणी कोटि त्या कुंजरांच्या; ११७
गती चौपटा धांवती राजघोडे; कपी ओढिती हस्तकीं पादजोडे; ।
मही त्राटिती बैसले स्वार[17] त्यांसी; ख्वरें[18] पीटिती ताडिती वृक्ष सीसीं[19]. ११८
गिरी टाकिती चंड मंडीतवृक्षा, रथांचीं शतें त्यातळीं होत रक्षा[20]; ।
रणा आणितां वानरां कोटिलक्षां, पुढां माजलें झूज तें मुक्षमुक्षां[21]. ॥ ११९

१. संवगडी, सखी. २. पैज. ३. ढाला. ४. 'पुढं सांडिती मेट पाडूनि डाळें' असाही पाठ आहे. ५. वानर. ६. 'होत लाहें' असाही पाठ आढळतो. ७. आकाश. ८. संसारीं. ९. सिंह. १०. उत्तम गजसमूहांत. ११. 'दाटिती' असाही पाठ आहे. १२. पाषाण. १३. गंडस्थळें. १४. महात. १५. पुच्छीं. १६. भोंपळीच्या. १७. 'वीर' असाही पाठ आढळतो. १८. 'खरें टीपिती' असाही पाठ आहे. १९. मस्तकीं. २०. राख. २१. मुख्यमुख्यांत.

पुरें मातता शोणितें शोणभद्रा; दिसे कुंकुमें रंगिलें हो! समुद्रा; ।
काळीसंभ्रमें वाढ त्या युद्धचंद्रा, चकोरांसरी तुष्ट दृष्टी सुरेंद्रा. ॥ १२०
बहू माजलें झूज तें तीनराती; धरासागरामाजि प्रेतें न माती; ।
पुढां वानरीं लोटिलें शत्रुभारा; बळें घातले मागुतें दुर्गद्वारा. ॥ १२१
उणें देखतां, वीर धूम्राक्षराणा पुढां धांवला, वर्षतां वज्रबाणा; ।
विरां एकलक्षांसि घायाळ केलें; बळीपाद[1] लक्षावधी प्रेत झाले. ॥ १२२
कपी पोळले, सारिले भार मागें; दिठी देखतां, मारुती रुद्र रागें ।
गिरागर्जनें धांवला वातवेगें, रथां सारथ्यां भंगिलें शैलभागें. ॥ १२३
लता ताडितां राक्षसू पाद वेष्टी, बळें थापटी बैसली मौळिपृष्ठीं; ।
उडालें पडे नेणवे सीस कोठें, दळें भंगिलीं वैरियांचीं सुनेटें[2]. ॥ १२४
तयानंतरें वज्रदंष्ट्राभिधानी निघातें कपीचक्र मारीत बाणीं; ।
रणा आणिले आगळे लक्ष दोनी, भयें नाक माघारलें वृक्षपाणी. ॥ १२५
दिठी देखतां अंगदा काळकोप, महागर्जनें माजवी भूमिकंप; ।
गिरीमस्तकीं संघटे शत्रु भारी, क्षणा एक अक्षौहिणी[3] वीर मारी. ॥ १२६
त्वरें राक्षसें पातल्या वन्हियंत्रें, गिरी फोडिजे मागुता वाळिपुत्रें[4]; ।
तरू ताडितां तोडिला खर्गधारा, बळें वाळिजें पेटिजे घोरमारा. ॥ १२७
त्वरें झेलिले संघटे मल्लयुद्धीं, कळा लावितां साधिला वर्मसंधीं; ।
बळें झोंबला, हातिचें शस्त्र ओढी, त्वरें छेदिलें, पाडिलें शीसें[5] प्रौढी. १२८
रणीं सूड मागों अकंपन्न धांवे, पुढां सन्मुखें ताडिला रुद्रदेवें[6]; ।
तनू[7] त्यागितां क्षोभला तो प्रहस्तू, दळेंशीं उठी लाविला बाणसेतू.॥१२९
हरी[8] मारिले पांच लक्षें निदानीं, असंख्यात घायाळ त्यां कोण मानी ? ।
कपींचीं दळें सारिलीं पूर्ण ठायां, हहाकार झाला दिसे वीरराया. ॥ १३०
दिठी देखतां जानकीप्राणनाथें, त्वरें स्पर्शतां चापदंडासि हातें, ।
पुढें वारिलें प्रार्थनें नीळराजें, अरीमर्दनें चालिला देवकाजें. ॥ १३१
शतांपर्वतीं मारिलें वैरियांतें, तया त्रीगुणीं ताडिलें पादपांतें[9], ।
अरी तोडितो बाणधारीं तडाडें, निळा भेदिलें रोमसंख्या[10] कुन्हाडें. ॥१३२

---

१. वानर. २. 'सुवाटें' असाही पाठ आढळतो. ३. एका अक्षौहिणींत २१८७० रथ, इतकेच हत्ती, ६५६१० घोडे आणि १०९३५० पदाति असतात. ४. अंगदें. ५. मस्तक. ६. मारुतीनें. ७. शरीर. ८. वानर. ९. वृक्षांतें. १०. साडेतीन कोटी. (मनुष्यांचे शरीरावर साडेतीन कोटी लोम म्ह० केश आहेत असा समज आहे. 'तिस्रः कोट्योऽर्धकोटिश्च यानि लोमानि मानवे.')

तयानंतरें क्षोभ त्या नीळदक्षा, गिरीकुक्षिच्या मोडिलें चंडवृक्षा, ।
शतें योजनें वाढतें झाड देखा, अरीमस्तकीं ताडिले देत हाका. ॥ १३३
गिरी कोसळे लागतां वज्रघाता, प्रस्हतासि तैसें घडे देहपाता, ।
हहाकार झाला, पळे शत्रुसेना, म्हणे राव तो, 'जागवा कुंभकर्णा.'॥१३४
रणपतन प्रहस्ता, रावणा क्रोध भारी,
सबळ खळदळाशीं सिद्धला शत्रु मारीं, ।
तंव नृपवनितेचे दूत धांवोनि तेथें,
विकळ सकळ झाले सांगती स्वामिणीतें. ॥ १३५
ऐशीसहस्रांवर श्रेष्ठ राणी, मंदोदरी ज्ञानविचारखाणी, ।
सौख्यासनारूढ सभेसि आली, बोधी पती प्रार्थुनि सारबोली. ॥ १३६
बोले लंकेशदारा, 'रजनिचरवरा! कर्णि[1] साचें विचारा,
नेदीं क्रोधासि थारा हरिभजनपरा मार[2] मारी विषारा; ।
स्वामींचा शत्रु त्यासी चतुरनरवरें सौख्य कैसें करावें ?
हे संज्ञा जाण सुज्ञा परवरवनिते जानकीतें त्यजावें. ॥ १३७
हे सीता पापभीता, मुर[3]हरवनिता, जाण माता जगाची,
मान्या क्षीराब्धिकन्या, भयकर भगिनी काळकूटाविषाची, ।
ज्वाळा काळानळाची कवळित बरळे जेंवि जीवें पतंगें[4],
तैसा तूं संगदोषें सकळकुळगणीं भस्म होसी निजांगें. ॥ १३८
शौर्यें श्रीकार्तवीर्यें[5] धरुनि तुज बळें रक्षिलें बंदिशाळे,
त्यातें संहारकारी भृगुपति समरीं जिंकिला ज्या नृपाळें, ।
वाळी ब्रह्मांड चाळी बळनिधि निधडा ताडिला एक बाणें,
त्याशीं तूं झूजगोष्टी बळहिन कुमती वेचसी व्यर्थ प्राणें. ॥ १३९
तारी पाषाण पाहें जळनिधिजिवनीं, काय हें चोजें[6] सानें[7] ?
लक्षांचे लक्ष वैरी निवटित समरीं सत्वरा एक बाणें; ।
भृत्याचें[9] कृत्य हेळां[10] उगवत कवळी भक्ष भावोनि[11] सूर्या,
त्याशीं झुंजोनि वांचे असुरसुरगणीं सत्वरा सांग वर्या. ॥ १४०
ज्यातें पीयूष[12]पानीं वरगति, गगनीं बैसका ज्या विमानीं,

---

१. कानीं. २. मदन. ३. मुरसंज्ञक दैत्याचा नाश करणाऱ्या रामाची स्त्री. ४. शलभें, टोळानें. ५. सहस्रार्जुनानें. ६. आश्चर्य. ७. लहान. ८. 'निधडा चवरीं' असाही पाठ आहे. ९. सेवकाचें (मारुतीचें.) १०. सहज. ११. मानून. १२. अमृत.

त्यातें हो यातुधानीं[1] हतबळकदनीं सोडिजे प्राणदानीं, ।
ऐशा त्यां पर्णभक्षी निवटिति समरीं काळ कैसा विलोकीं,
त्यागीं श्रीरा[2]मरामा, तरि तुज सुगमा क्षेम कल्याण लोकीं. ॥ १४१
लक्षीं साचार चक्षीं, निजहित सहसा साधिजे जें सुदक्षीं,
रक्षीं निष्कामधर्मा, अविहित विसरें वर्तणें वेदसाक्षीं, ।
भाळाक्षीं[3] भक्षिला जो मदन, मन हरी, मानिजे मृत्यु मुक्षीं[4];
नापेक्षीं[5] वारिजाक्षी[6] रघुवरवनिता सर्वभावें उपेक्षीं. ॥ १४२
खंडी चंडीशचापा, महितळ भंवडी, सिंधु पायीं उलंडी,
दंडी दोर्दंडखंडीं[7] अरिगण करिंचे गंड भेरुंड प्रौढी, ।
शत्रूंच्या रुंडमुंडी[8] रणवटसुघडी डाकिणी रुद्रचंडी
ब्रह्मांडीं देति हाका पिशित[9]मदभरें ख्याति गाती उदंडी[10].' ॥ १४३
'सुज्ञे! सारंगनेत्री! सुखजळभरिते! चारुगात्री! पवित्री
नेदीं भूपाळपुत्री, पळभरि न करीं राघवाशीं सुमैत्री, ।
निक्षत्री सर्व धात्री करिन निजशरीं, शत्रु मारीन शस्त्रीं,
तेव्हां तूं कर्णपात्रीं परिससि चतुरे! कीर्ति माझी चरित्रीं. ॥ १४४
रौप्याद्री[11] तुळिला पदें प्रचळिला वित्तेशी[12] विध्वंसिला,
हस्तें मस्तककोटि खंडुनि फुलीं श्रीकंठ[13] संतोषिला; ।
शक्रा वक्र करूनि, चक्र फिरवी देवां समस्तांसि जो
तो मी रावण वीर, विक्रमगुणी, चूडामणी, जाणिं जो. ॥ १४५
ज्याची पादाब्जधूळी सुरगणिं सकळीं चर्चिजे भस्म भाळीं,
आज्ञेचा दंड पाळी शशि, वरुण, बळी काळ खोळे त्रिकाळीं, ।
इच्छी तें तेच काळीं धरुनि करतळीं वोळगे चंद्रमौळी,
त्यांचें संधान टाळीं विर परम बळी दौंविजे[14] ब्रह्मगोळीं. ॥ १४६
सानें[15] मानव राम दानवकुळीं भासे तृणाचे परी,
त्याशीं सख्यविचार मुख्य म्हणतां, जीताचि प्रेतासरी; ।

---

१. राक्षसांनीं. २. श्री. ३. ललाटीं नेत्र ज्याला त्या शिवानें. ४. मुख्यांनीं. ५. न इच्छीं. ६. कमलासारिखे नेत्र जीचे ती. (सीता.) ७. बाहुदंडसमूहानें. ८. मस्तक. ९. मांसगर्वाच्या भरानें. १०. पुष्कळ. (उद्दंड म्ह० उच्च आहे दंड (काठी) ज्याचा तो; छत्र इत्यादि. यावरून उद्दंड म्ह० पुष्कळ असा अर्थ उत्पन्न झाला.) ११. कैलासपर्वत. १२ कुबेर. १३. महादेव. १४. 'दाखवीं' असाही पाठ आहे. १५. लहान.

रामाचें शिर मेरु तो हरगळां योजीन माळे जपा,
त्यापाठीं धरणीसुते वर पती मी निश्चयें जाण पां. ॥ १४७
नारीचें नाम रामा, नरतनु महिमा कैंवि पावे विराची ?
कामें मोहोनि विश्वा कपटपर सरी सांग पावे हराची ? ।
सिंधूचा घोष गाजे तंवत्ररि, न दिसे जोंवरी कुंभजाचा[1]
तैसा हा राम साचा, मखपशुहवनीं जाण नातू अजाचा[2].'॥ १४८
'त्यजूनि चिंतामणि[3]रत्नसारा, कां वेंचिसी व्यर्थ अरण्यगारा ? ।
भोगीं गुणाळंकृत धर्मदारा, ये जारकर्मीं न घलीं विचारा. ॥ १४९
धामांगणीं[4] कल्पलता[5] फळेंशीं सांडूनि तीतें, गुणरत्नराशी ! ।
कां कंटकीची धरितोसि माया ? नाहींच जेथें फळभोगछाया. ॥ १५०
पीयूष[6]गंगे न शिवोनि वेगें, क्ष्वेडोदकीं[7] कां बुडतोसि आंगें ? ।
आली घरा लोटुनि कामधेनू, पाळी अजा तो वद काय जाणूं ? १५१
इंद्रावणी[8] रावणराजपत्नी, कां रक्षिसी ते बहुसाल यत्नीं ? ।
कटु[9] रसा दे शिवतांचि हातीं, सुस्वाद कैंचा फळभक्षणांतीं ? ॥ १५२
हृदयनिबिडवृक्षीं काम हा काकपक्षी,
परलघुजनसंगा कीं[10] मळालागिं भक्षी ? ।
भगव्रणखत चक्षीं[11] रक्तखांडूक लक्षीं,
म्हणवुनि गुणदक्षी साधु यातें उपेक्षी. ॥ १५३
फणसतरुफळाचें रूपसादृश्य शोभे,
कनक[12]तरुफळांतें भक्षितां काय लाभे, ।
अशुभकर सितेचा वेधु तैसा विलोकीं[13],
सुभग निजहिताचें द्वार दृष्टीं विलोकीं[14]. ॥ १५४
गुणी निर्विकारा त्यजीं कामचारा; भजें सत्वसारा, मिळें या विचारा; ।
नको आंतळों[15] आग्रहाच्या विकारा; न मानीं मनीं राम हा शत्रु थोरा[16].॥ १५५
उदारा कुदारा त्यजीं रामदारा, झणी मानिसी हे सुधेची सुधारा; ।
भरे काळिजीं कल्पितां काळधारा, मणीभूषणीं सर्पिणीचा उबारा.'॥ १५६

१. अगस्त्य. २. अजराजा दशरथाचा बाप. ३. इष्ट वस्तु देणारा मणि. ४. गृहसंबंधी आंगण्यांत. ५. कल्पित फळ देणारी लता. ६. अमृत. ७. विषाच्या उदकीं. ८. शेळी. ९. फलविशेष. १०. 'कश्मलालागिं भक्षी' असाही पाठ आढळतो. ११. नेत्रांनीं. १२. धोतऱ्याच्या फळातें. १३. 'विचारीं' असाही पाठ आहे. १४. 'न्यहारीं' 'असाही पाठ आहे. १५. स्पर्शों. १६. लहान.

बुंडे[1] सागरीं सांग कैसा अगस्ती? तमें ग्रासिला साच मानी गभस्ती[2]; ।
युधीं मारिजे केशरीलागिं[3] बस्तीं[4], गमे रावणा भंग तैं रामहस्तीं. ॥ १५७
बहू नोबेलें[5] वल्लभे! वाढ वाणी; किती वानिसी वैरियातें? सुजाणी! ।
घरा जाइजे, राहिजे स्वस्थभावें; नको बोथरों[6] या भयाचेनि नांवें.' ॥१५८
वदे सार मंदोदरी वेळवेळां; उपेक्षी दशाशीर तो एकिहेळा; ।
जळीं दर्दुरा[7] नावडे पद्मगंध; मुखीं मद्यपा काय नेमील वेद. ॥ १५९
मनीं भाविलें[8] आजि वैधव्य आलें; रणीं मंत्रिये, पुत्र, बंधू निमाले[9]; ।
गृहा पातली, लागली थोर चिंता; असो रावणू जागवी कुंभश्राता.॥१६०
महाचंड मेरूसरी देह ज्याचें, भुजादंडवेष्टीत ब्रह्मांड [10]टांचें; ।
गिरी चंड ते आटती तोंडखांचे, रुपें भंड तो बोलतां दंड वाचे. ॥ १६१
गजीं चेपितां हांकितां भेरि नादें, कळा खोंचितां, लावितां घ्राणरोधें, ।
नव्हे सावधू, तो पुढां तानमानें स्मृती पावला किंनरांचेनि गानें. ॥ १६२
सरी मेरुच्या भक्षिलें अन्नमांसा; सुरामद्यपाना गमे सिंधु जैसा; ।
करीं झांकिलीं मोकळीं नेत्रपातीं; पुसे रावणातें तदीं[11] काज हातीं. ॥१६३

'कां केलें सांग जागें, विषम वद गिरा! आणिली रामकांता,
कामाचें कोड झालें विफळ, नवरि ते राघवावीण सीता; ।
रामाचें रूप होई, गगनघनतनू राम निष्काम जाणें,
त्यासंगें भेद भंगे, सकळजनमनीं एक तो याचिखूणे. ॥ १६४

वधुनि अरिकुळातें, सोडवी कां जयातें,
विफळ वचन सोडी, प्राण ओपीन त्यातें; ।
कथुनि सकळ गेला नारद ब्रह्मवाणी,
सुरवर कपि हे गा! राम तो चक्रपाणी.' ॥ १६५
त्वरित रणतटाका पातला वीर गाढा;
गगनमहितळातें भेदिला एकिं मेढा; ।
तुळित महि पदाग्रें, शूळ तेजाळ झाडी,
छळित कपिविरांतें अट्टहास्यें[12] गडाडी. ॥ १६६

---

१. हें रावणाचें प्रत्युत्तर आहे. २. सूर्य. ३. सिंहाला. ४. बोकडें. ५. बोलूं नको. ६. निद्रेंत बोलूं. ७. बेडकाला. ८. मानिलें. ९. मेले. १०. अपुरतें. ११. 'खुणें' असाही पाठ आहे. १२. नेटानें, जोरानें, आग्रहानें.

कपी सांडिती युद्ध संग्रामभूमी, रिघाले गिरीकंदरीं[1] वृक्षगुल्मीं[2]; ।
घिरांचे हरी[3] अंतरें शैल[4] हातीं, उभे त्या उजू लोटले भद्रजाती[5]. ॥ १६७

'बहुत कटक माझें गौतमीच्या[6] तटाकीं
वधुनि, मनुजपुत्रा ! घेतली कीर्ति लोकीं; ।
गिळुनि कपिकुळातें, सूड घेईन त्याचा;'
पसरुनि मुख धांवे भक्षणा वानरांच्या. ॥ १६८

दाटी वनौकें[7] वदनीं अपाडें, ते कर्णरंध्रीं पळती झडाडें; ।
सहस्र चौदा गिळिले कपी ते, धांवे धराया मग यूथपतीतें[8]. ॥ १६९
पांचे कपींद्री गिरि पांच हाले, येरें शुळाग्रें यवचूर्ण केले; ।
सांडूनि चौथे निवडी निराळे सुग्रीव पायीं धरिला ईसाळें[9]. ॥ १७०

पिळुनि कर उडाला वीर सुग्रीव व्योमीं[10],
चढत ग्रहगणाचीं मंडलें पैलसीमा; ।
दशमुखअनुजाचा ऊर्ध्व त्याहूनि हस्तू,
पिळुनि शिर कराग्रें पाडिला खस्तवस्तू. ॥ १७१

'तुझ्या अग्रजें[11] माझिया अग्रजातें[12] बळें पाडिलें कक्षगर्तेंत ज्यातें, ।
तयाचाचि हा फेड घे आजि नेटें,' फिरे घातला वीर [13]कक्षेकपाटे. ॥ १७२
कपींचा पती साधला जैतत्राणी[14]; पुरीं वांटिती शर्करा अक्षवाणी; ।
द्विजीं अक्षता ओपितां कक्षसंधी[15], कपी योढवी मस्तका येशसिद्धी. ॥ १७३
तया कांक्षिचा चालिला घर्मलोंढा, सुरा प्राशिली, झांपडी नेत्रतोंडा; ।
कपी निष्टला सत्वरां, चोज झालें; करें कर्ण दोनीं मुखीं घ्राण नेलें, ॥ १७४
हहाकार तो राक्षसां वानरांतें, जयो गर्जती टाळिया ऊर्ध्वहस्तें; ।
गता[16] नाककानीं तया शुद्धि नाहीं, बुडे अग्रजाकर्णितां दुःखडोहीं. ॥ १७५
त्वरें धाडिलें रावणें नापिकांतें; चढे गोपुरीं[17] तो धरी वंशीं[18] हातें; ।
महादर्पणा बांधलें अग्रभागीं, पुढां दावितां थोकला येत मार्गी. ॥ १७६
तया मानसीं लाज कोपाग्नि लागे; मुखें हाक मारी, फिरे वातवेगें; ।
बळें संघडे राघवा शूळशस्त्रें; करें खोंचितां भंगिजे वातपुत्रें. ॥ १७७

---

१. पर्वतगुहेंत. २. झाडींत. ३. वानर. ४. पर्वत. ५. हत्ती. ६. गोदावरीच्या. ७. अरण्य आहे स्थान ज्यांचें असे वानर. ८. सेनापति जो सुग्रीव त्यातें. ९. ईर्षेनें. १०. आकाशांत. ११. वालीनें. १२. रावणातें. १३. खांक. १४. जिंकल्यासारिखा. १५. काखेच्या संधीस. १६. गेलेल्या. १७. राजवाड्याच्या दरवाज्यावर बांधलेली उंच इमारत. १८ वेळु.

वरी दंड त्या ताडिले चंडरोषें; गदा भोंवडी, सोडिलें वज्र जैसें; ।
गदेनें गदा धाकुट्या लंकनाथें त्वरें टाकितां, क्षोभला त्या निघातें.॥ १७८
सखा आपुला सूदला पुष्ट मानीं, पुढां ठाकला राम कोदंडपाणी; ।
रवीपावकातुल्य तेजाळ रागीं, गुणीं जोडिले, सोडिले शत्रुलागीं. ॥ १७९
मॆहाकर्कचाकार नाराच देखा, क्षणें लागतां खंडल्या हस्तशाखा; ।
सुपर्णापरी धांवती व्योमवाटे, मुखीं सर्प ते चंडदोर्दंड लोटे. ॥ १८०
भुजा तोडिल्या, ताडिती वानरांतें, अही मारिजे त्यापरी वृक्षघातें; ।
कपी ताडिती, तोडिती खंडखंडें, अरी क्षोभला सांडितो ज्वाळ तोंडें.॥ १८१
पदीं मांडिली आटणी वानरांतें; लता ताडितो, फोडितो पर्वतांतें; ।
शशांकार्ध ते बाण कोदंडखंडीं विरें सोडिले, तोडिले जानुदंडीं. ॥ १८२
अहो धांवती पाय ते चंड लाटा; उरीं मस्तकीं लागतां आट मोठा; ।
कपी मोडिती पर्वतें घाय घाली; पुढां राक्षसें धांविजे पोटचाली. ॥ १८३
मुखीं, नासिकीं, लोचनीं वन्हि सांडी; असंख्यात पैं ग्रासिले बाण तोंडीं; ।
बहू मानिती देव तेत्तीस कोडी; पुढां राम तो भीम काळास्त्रसोडी.॥ १८४
शरीं जोडिलें, ताडिलें वज्र गाढें; उडे शीर धारागिरी शैलंपाडें; ।
रिघे अंबरीं[11] घोर विख्यात कोंदें; विमानीं दिशा लंघिती देववृंदें[12]. ॥ १८५
गिळूं आसुतें पातला काळराहो; क्षयें व्यापला त्याभयें चंद्रदेहो; ।
पळाला रवी, पश्चिमे आड गेला; पडे शीर, लंकापुरीं कंप झाला.॥ १८६
नृपा दुःखडोहीं उडी घालिल्यातें विचारें कडे काढिलें शक्रजीतें; ।
रडें संपल्यानंतरें क्रोध भारी; महावीर आवेशले शस्त्रमारीं. ॥ १८७
बळी कुंभ नीकुंभ घेऊनि सेना, सुडा धांवणें, ओपणें देहदाना; ।
विरूपाक्ष माहोदरू मत्त पानी महाकुंजरीं घोष गाजे निशाणीं. ॥ १८८
अश्वासनीं देवनरांतकू हो, मीनाक्षनामासुर ताल्वाहो, ।
सर्वै रथारूढ रणासि आले; पाठी कुवासा अतिकाय चाले. ॥ १८९
वैरा मनीं भावुनि घोरघोषें, युद्धा मिळाले अविचाररोषें; ।
विद्युल्लतेच्यापरि ते अपाडें आकाशभेदा भरले कुन्हाडें. ॥ १९०

१. धनुष्य आहे हातीं ज्याच्या. २. धनुष्याची दोरी. ३. मोठ्या कर्वतीच्या आकारासारखे. ४. बाण. ५. हातांचीं बोटें. ६. गरुडापरि. ७. आकाश. ८. अर्धचंद्रासारिखे. ९. भयंकर. १०. पर्वतासारखे. ११. आकाशांत. १२. समूह.

हरी आठलक्षावधी चूर्ण बाणीं, मदें मेदिनी शोणितें सिंधु खाणी; ।
बहू मारिले देखतां पिंगचक्षू; बळी क्षोभला काळ संग्रामदक्षू. ॥ १९१
गिरी हस्तकीं, मस्तकीं, पुच्छपायीं; बहू ताडितां भंगले शत्रु वायीं; ।
कपी मारिले त्यासरी दुष्टसेना रणीं गीळिली सर्षपातुल्य घाणा. ॥ १९२
सक्रोध लंकेशवनारि जेठी, शैलेंशें तैसा नग चंड वेठी ।
पांचै विरांचा करितां निपातू, आतूर धांवे अतिकायकेतू. ॥ १९३
दिनकरकरसंख्या जुंपिले श्वेतवारू,
शतखण शतचक्रीं उंच जैसा सुमेरू; ।
तळपत रथरायामाजि लंकेशपुत्रें,
धरुनि धनुषदंडीं जोडिलें काळशस्त्रें. ॥ १९४
दशरथकुळदीपें चोज देखोनि दृष्टी,
शैलभदहनकाजा सज्जिलें चाप मुष्टी; ।
तंव दशमुखबंधू मात बोधी सुमित्रा,
'अरिशिरसम मोलें मुक्ति ओपी अमित्रा.' ॥ १९५
निघत वचनवेगें सिद्ध तो रामबंधू,
निरखित अतिकाया मोकली बाणसिंधू ।
धरणिधरअगस्ती ओढवी एक बाणा,
निवटित शरजाळें शत्रु संकोचबाणा. ॥ १९६
अरी मागुती मोकली, बाण सोडी; तया लक्षबाणीं नराधीश तोडी; ।
सहस्रां शरीं भंगिलें त्यासि येरें, नरें छेदिलें त्या शताचेनि मारें. ॥ १९७
खळें त्या उजू घातलें बाण दाहीं, विरें छेदिलें पंचनाराच घायीं; ।
तया एकबाणें करी खंड शत्रू; उरीं पोळला मेदिनीपाळपुत्र. ॥ १९८
देखोनि संकर्षणवीरराणा, लक्षूनि मारी अरि चक्रबाणा; ।

---

१. पृथ्वी. २. रक्तानें. ३. समुद्र. ४. मोहोरीप्रमाणें. ५. लंकेचा स्वामी जो रावण त्याच्या वागेचा शत्रु. (मारुती.) ६. 'शैलें शतें सानुग चंड वेठी' असाही पाठ आहे. ७. पर्वत. ८. सहस्रसंख्या. (सूर्याचे कर एक हजार आहेत. याच कारणास्तव त्याला 'सहस्रांशु,' 'सहस्रकर' अशींही नांवें आहेत.) ९. पांढरे घोडे. १०. ढोल जाळण्यासाठीं. ११. बिभीषण. १२. लक्ष्मणा. १३. शत्रूला. १४. शेषावतार जो लक्ष्मणरूपी अगस्त्यमुनि. १५. बाण. १६. भूपतीचा पुत्र अतिकाय. १७. बलरामास 'संकर्षण' असें नांव आहे. हा शेषाचा अंशावतार होय. येथें 'लक्ष्मण' असा अर्थ घेणें अवश्य आहे, कारण लक्ष्मणही शेषांशच होय.

काळालयीं[1] प्रेषित शीर शेषें[2] गर्जोनि बाहू पिटिले नरेशें[3]. ॥ १९९

सुरवरकुळकाळें श्रेष्ठलंकेशबाळें,
अरिगजवनपाळें पापकापथ्यशीळें, ।
कुटिलखळभुपाळें काळरूपीविशाळें
असुरजनकृपाळें खेळिजे युद्धखेळें. ॥ २००

घनानाद रागी निघे झूजलागीं, सवें कीर्ति मागीं पुढां मृत्यु मागीं; ।
पडे बाण अंगीं, सरे वातवेगीं; कपीहंस संतापले शत्रुकागीं. ॥ २०१
दळा हांव लोटे, बळा धांव फूटे; चढे वैर गाढें, सुडें खैर लोटे; ।
करी युद्ध खोटें, शरीं मार मोठें; हरी नेणती मारितो कोण कोठें. ॥ २०२
भुजंगास्त्र वाणीं जपे मंत्रवाणी, फणी माजले भूमिआकाशखाणी; ।
सुलंबाळ ते योजनें एक दोनी, भयें शक्रही घोर निर्वाणें[11] मौनी[12]. ॥ २०३

सकळगुणनिधानें बांधिलीं नागपाशीं[13],
सदयहृदय आला नारदू पुण्यराशी; ।
सबिज गरुडमंत्रीं बोधिला मंत्र कानीं,
जपत गरुड पावे; त्रासिल्या सर्पश्रेणी[14]. ॥ २०४

करी मारुती रावणी बाणवृष्टी; कपी मारिले श्रेष्ठ चौसष्ट कोटी; ।
तयांलागिं द्रोणाचळा वायुपुत्रें त्वरें आणिलें, सांधिलीं प्राणसूत्रें. ॥ २०५
सिता मारिली, माव मायीक कोपें, अहाकार केला कपीं राघवापें; ।
'नव्हे साच हें' रावणानूज सांगे, 'अशोकागरीं जानकीरूप जागे. ॥ २०६
सुरेशारि नीकुंबळेमाजि रामा! करी होम तो, दाटला धूम्र व्योमा; ।
मखा संपल्या, कोण जिंकील, त्यातें ? त्वरें मारवा आणवा शीर घातें.॥ २०७
बारा वर्षें नित्य नेमी, निर्‍हारी; प्रत्याहारीशीळ तो ब्रह्मचारी; ।

---

१. काळाच्या घरीं. २. लक्ष्मणें. अतिकायाला लक्ष्मणानें मारिलें. (युद्धकांड. स० ७१.) ३. रामानें. ४. इंद्रजितानें. ५. इंद्रजित्. ६. उत्कट इच्छा. ७. वानर. ८. सर्पास्त्र. ९. साप. १०. अत्यंत लांब. ११. संकट, अंत. १२. गणी. १३. सर्पबंधनांनीं. १४. पंक्ति, समूह. १५. इं-द्रजित्. १६. संधानी नामक संधान करणारी (त्रुटित भागांस जोडणारी) औषधी आणून, तिच्यायोगें प्राणसूत्रें पुनः जोडिलीं. संजीवनी, विशल्या आणि सुवर्णकरणी ह्या आणखी तीन औषधी मारुतीनें आणलेल्या पर्वतावर होत्या, त्या रामसैन्यास पुष्कळ उपयोगी पडल्या. १७. मायामय सीता. (सीतेची प्रतिमा वानरांस दाखवून तिचा वध इंद्रजितानें केला.) १८. बिभीषण. १९. रावणानें सीतेला ठेविलें होतें तें स्थळ, अशोकवनिकेंत. २०. उदक प्राशन करणारा. २१. तपोबलानें सर्व इंद्रियें विषयांपासून माघारीं फिरविणारा.

ऐसा जो तो शक्रजीतासि मारी, भारी तो हा शेषं संग्रामकारी.॥२०८
त्यजुनि वधु विनोदें पातलासे वनातें,
म्हणउनि बहुभावें नित्य सेवा तयातें; ।
फळ मुळ जळ आणी शेष नेवेचि कांहीं;
सहजचि उपवासें सर्वदा तृप्त देहीं.' ॥ २०९
परिसत रघुराजा आवडी, प्रेम दाटे;
कवळुनि हृदयासी लोचना नीर लोटे; ।
कथुनि सकळ मंत्रा, ओपिलीं अस्त्रजाळें;
वधुनि अरि, जयाचा लाभ घे शीघ्रकाळें. ॥ २१०
पवाडे जगीं वाड ह्या धाकट्याचे, सुडा साधिते संगिये सांकड्याचे; ।
छळें त्रासिती राक्षसां क्रूरनेत्रें; त्रिदें मस्तकीं, हस्तकीं शूळ शस्त्रें. ॥ २११
सवें जुत्पती मारुती वीरनाथ, खगेंद्रापरी लंघिती व्योमपंथ; ।
भुतें झोडिलीं तेधवां वृक्षघायीं; गुहा शोधिली, भेदिले मत्त गेहीं. ॥ २१२
शिरें साजिरीं साजुकें ब्राह्मणाचीं, त्वचा वेढिली पांझरे आश्वलांची; ।
तळीं सूदलीं आसना सात प्रेतें, शिरीं बांधिले व्याळ पैंजाळ जेथें. ॥२१३
द्विजा मारिलें, भाजिल्या दंतलाजा; पळें साजुकें शोणितें होमकाजा; ।
जटा पिंगटा ओलट्या रक्तस्नानीं; धरी अस्थिमाळा गळां मद्यपानी. ॥२१४
कळे हारवी पद्मिणीवल्लभाचे; रथाची कथा सांगतां मौन वाचे; ।
मुखींहूनि तो काढितां देववक्रें, गिरी सत्वरां ताडिला वातपुत्रें. ॥ २१५
विखुरित महिपृष्ठीं वन्हि तो चंडघातें;
निघत रथ सकोपें ग्रासिला हैव्यनाथें; ।
गजर पडत कानीं, चेईला शक्रवैरी;
सुखरहित निघातें कोपला शत्रु मारीं. ॥ २१६
रिघे मेघपृष्ठीं धनुर्वेग मुष्टी; पडे बाणवृष्टी, झडे प्राण सृष्टी; ।
युगाशेवटीं द्वादशादित्यदृष्टी, महातेज वृष्टीं, विरां धीर भ्रष्टी. ॥ २१७
प्रळयअनळ बाणीं स्थापिला मेघनादें;
सुटत शर धडाडी, पेटिजे जीतवेदें; ।

---

१. लक्ष्मण. २. धाकट्या लक्ष्मणाचे. ३. सेनापति, युद्धपति. ४. गरुड. ५. 'शिरें साजुकें स्वासिनी' असाही पाठ आहे. ६. स्रवे. ७. उग्र. ८. रक्तानें. ९. कमळिणीचा वल्लभ जो सूर्य त्याचा. १०. पसरीत. ११. अग्नीनें. १२. चेवला. १३. घर्षणानें. १४. अग्नीनें.

त्रिभुवनवरदाना ओपिलें काळमित्रें
  नरवरपतिबंधू बाण लावी घनास्त्रें. ॥ २१८
सबळ मुसळधारा ओळला मेघ व्योमीं,
  गिळित गिरिकुळातें, वाढलें तोय भूमीं; ।
सकळहि विधि गोळा होत होतां निमग्ना,
  शचिवरजित कोपें बाण लावी जळघ्नां. ॥ २१९
प्रळयपवन लाहें देत सोडोनि बाणीं;
  गगन महितळाचें आंग केलें निपाणी; ।
उचटित अवनी त्या झुंजवातें महींद्रें
  निरखुनि गिरि अस्त्रा सोडिजे त्या अहींद्रें. ॥ २२०
नमीं दाटले भार त्या पर्वतांचे, महावायु तो लोपला व्योमखांचे; ।
तैमित्राचरें सत्वरा वज्रमुष्टी बहू सोडिल्या, तोडिल्या शैल पृष्टी. ॥ २२१
जपे रावणी वीर प्रेतास्त्र ओठीं; भुतें चालिलीं भ्यासुरें लक्षकोटी; ।
महाकाळ वेताळ खंकाळ म्हैसे घसे घोरसे घर्घरें मेघ त्रासे. ॥ २२२
त्वरें धांवती यैक्षिणी मुक्तकेशा; सँळें डाकिनी शाकिनी मृत्युवेशा; ।
महापिंग सैराळ, झोटिंग, पीसे भिसे मोकळे, भासती जेंवि रीसें. ॥ २२३
रैंमावल्लभानूज निर्वाणबाणीं जपे मानसीं मारुती मंत्रवाणी; ।
क्षणें चालिले सन्मुखीं रुद्रकोटि, भुतीं देखतां सोडिले प्राण पोटीं. ॥ २२४
जपे मारुती रावणी क्रूरदृष्टी, महाभैरवी अस्त्रनिर्वाणसृष्टी; ।
करीं शूळ ते नागवे देति हाका, रणीं धांवती, पावती देव धाका. ॥ २२५
ज्वाळा नृसिंहशरदारुण काळकोपी, मंत्रूनि सोडित शरें रवि चंद्र लोपी; ।
ते क्षेत्रपाळ पळतां महिचक्र थोडें, गर्जोनि देव करिती गुणवाद तोंडें. ॥ २२६
दोषास्त्रातें ओडितां चंडचापीं, सर्वै तेव्हां त्रासिले घोर पापी; ।
ज्यातें व्याली साधुनिंदा करोळी जिव्हा काळी ब्रह्महत्या विशाळी. ॥ २२७
परस्त्री गुरुस्त्री तथा मातृसंगी, धनी मद्यपानी सदाचारभंगी, ।
असत्यें कृतघ्नें परस्वापहारें, अघें धांवती, दाटली क्षोणि भारें. ॥ २२८

१. लक्ष्मण. २. इंद्रजित. (शचीच्या म्ह० इंद्राणीच्या वराला म्ह० पतीला जिंकिलें ज्यानें तो.) ३. शुष्क. ४. राक्षसानें. ५. पिशाची. ६. सुटलेले केंस जिचे. ७. छळें, वैरें. ८. पिशाचीविशेष, ९. केंस. १०. लक्ष्मण. ११. भयंकर. १२. भयंकर. १३. संग करणारे. (येथें गुरुस्त्री आणि मातृसंगी यांचा समास इष्ट असून या दोन पदांमध्यें 'तथा' हा शब्द घुसडून दिल्यामुळें संस्कारहीनत्वाचा दोष येतो.) १४. दुसऱ्याचें धन चोरणें. १५. पापें. १६. पृथ्वी.

सहस्र नामें हरिशंकरांचीं मंत्रूनि अस्त्रें सुटतां शरांचीं, ।
त्यामाजि नारायण नामएकें संहारिलीं अंधक जेंवि अर्कें[1]. ॥ २२९
मायास्त्रातें सोडितां मेघनादें झालीं अंधें मानसें या जनाचीं; ।
त्यातें ग्रासूं प्रेरिली ब्रह्मविद्या, योगीवंद्या जानकीनाथमित्रें. ॥ २३०
बारा[2] सूर्यों मीनले[3] एक ठायीं, ज्याच्या वायीं वज्रधारा दुखंडे; ।
तेणें बाणें ताडिलें मेघनादा, केलें छेदा सर्व गात्रांसि तेणें[4], ॥ २३१
खंडें खंडें खंडितां वीर क्रोधें, पाहे तैसे मागुती देह सांधें; ।
खेदें झाला क्षीण तो रामबंधू, बोधी तेव्हां रावणानूज भेदू. ॥ २३२
'शिरा छेदिजे, लाविजे बाण पाठीं, नभीं भोंवणीं घालिजे चक्रवाटीं; ।
पडों नेदिजे मेदिनीचेनि[5] मार्गें, धडा लागतां मागुती देह जागे.' ॥ २३३
तुणीरांतुनी[6] काढिला बाण जैसा, पुरारातिचे[7] हातिंचा शूळ तैसा; ।
गुणीं जोडिला, सोडिला हो करारें[8], तडाडे धरा[9] शैलभारें[10] थरारे. ॥ २३४
वदे तत्वता सोडितां नेम बाणा, 'रमा जानकी, राम वैकुंठराणा, ।
निराहार मी निश्चयें ब्रह्मचारी, पडो शत्रुचें शीर नाराचधारीं[11].' ॥ २३५
तडाडे फुटे वीज कल्पांतकाळीं[12], तयातुल्य तो बाण धांवे निराळीं[13]; ।
ग्रिवे[14] लागली काळधारा करांळी[15], मुखीं शीर धांवे, भ्रमे अंतराळीं.॥ २३६
सुसाटें भरे अंबरीं सीसें[16] लाहे, स्रवे मेदिनी [17]शोणितें पाट वाहे; ।
वमी बाण तो वन्हिकल्लोळ[18]धारा, महामेघ माझारि त्या रक्तगारा. ॥ २३७
किकाटें करी गर्जना मोक्षकामी[19], तया अट्टहास्यें[20] फुटे हाक व्योमीं[21]; ।
पळालीं विमानें सुरांचीं झडाडें, पडे तो विरू तारकांच्या तडाडें. ॥ २३८
रणीं माजले रुंडें[22], त्यां कोण वारी ? धरी चाप नाराच[23] विंधे समोरी; ।
शरीं कर्दळीपत्रधारावितंडें[24] विरें भूधरें[25] पाडिलीं खंडखंडें. ॥ २३९

---

१. सूर्ये. २. सूर्य प्रतिमासास एक असे बारा आहेत. याच कारणास्तव त्याला 'द्वादशात्मा' असें नांव आहे. विवस्वान्, अर्यमा, पूषा, त्वष्टा, सविता, भग, धाता, विधाता, वरुण, मित्र, शक्र, आणि उरुक्रम असे हे द्वादश आदित्य कश्यप ऋषीपासून अदितीचे ठायीं उत्पन्न झाले. ३. एकत्र झाले. ४. श्लोक २३०-२३१ यांत शेवटीं वर्णावृत्ति साधण्याकडे लक्ष्य दिलें नाहीं. ५. पृथ्वी. ६. भात्यांतून. ७. महादेवाच्या. (पुराचा, त्रिपुराचा वैरी त्याच्या). ८. कडाडें. ९. पृथ्वी. १०. पर्वतांच्या ओझ्यानें. ११. बाणधारेनें. १२. प्रळयसमयीं. १३. आकाशांत. १४. मानेला. १५. भयंकर. १६. शीर्षें, डोकें. १७. रक्त. १८. लाटा. १९. मोक्षेच्छु. २०. मोठ्यानें हंसणें, मोठी विकाळ आरोळी. २१. आकाशांत. २२. मस्तकें. २३. बाण. २४. छेदें. २५. शेषावतार जो लक्ष्मण त्यानें.

विजयवधु विनोदें माळ घाली सुमित्रा,
[1]सुमनघन सुरांचा तापकारी अमित्रा; ।
त्वरित विर सुवेळे पातले सिंधुपाळीं,
अरिशिर नभपंथें सैन्य पाहे निरा[2]ळीं. ॥ २४०

सुखें भेटले आवडी रामबंधू; [3]जयानंदचंद्रें महानंदसिंधू; ।
भरें माजला हस्तकें मित्रकाया, कृपासिंचनें [4]पौरुषें क्लेश माया. ॥ २४१
[5]सौमित्रबाणीं शतखंड देहो, त्यांतूनि [6]बाहो निवडे निराळीं; ।
[7]सुलोचनेचे निजगेहिं टांकीं; लीहूनि भाकी [8]वर्तिल्या वृतांता. ॥ २४२
'संग्रामग्रामीं मज [9]कल्पवृक्षा [10]यांची अरी जीवनदानभिक्षा; ।
देऊनि त्याच्या हरिलें दरिद्रा; [11]सायुज्यतेची चढिली [12]हरिद्रा. ॥ २४३
मिसें शीर्सें[13] गेलें त्वरें रामभेटी; असें मी उभा विष्णुसायुज्यवांटीं; ।
भवाच्या [14]कूपीं तूजलागोनि बाहो दिला साजणी ! सत्वरा धांव लाहो !' ॥
[15]मंदीरबंदीहुनि सुंदरी ते [16]सुपर्णदंदीकुळनंदिनी ते, ।
[17]संदोहबंदीजन सिंधुवेळा टाकोनि आली सुपदीं [18]सुवेळा. ॥ २४५
नंदी [19]पतीमानसमंदिरींचा तो दीप वंदी वर इंदिरे[20]चा; ।
[21]छंदीं [22]पदीं वंदित [23]प्रासबंदीं, विश्रामला [24]मानसभावसंदीं. ॥ २४६
'सुरवरसुखहारी काळना[25]राचधारी
निवटुनि शिर गेलें, अंबरीं जेंवि वारी; ।
[26]कपिसरसिजसूर्या रावणे! मान माझा;
सहज गुण विराजे, पावसी दीन[27]काजा. ॥ २४७

---

१. पुष्पमेघ. २. आकाशीं. ३. इंद्रजिताच्या वधानें झालेला जयानंद. ४. पारोसा. ५. या श्लोकांतही चरमवर्णावृत्तीकडे लक्ष्य ठेविलें नाहीं, म्हणून हा मुक्तप्रास (नियमक) आहे. ६. बाहु. ७. इंद्रजिताची स्त्री. ८. घडल्या. ९. कल्पवृक्षाचा धर्म असा कीं, त्याजखालीं बसून तें जें कल्पावें (मनांत इच्छावें) तें तें तत्काल मिळतें, येथें इंद्रजित् हाच कल्पवृक्ष. १०. मागे. ११. चार मुक्तींपैकीं शेवटची मुक्ति. हींत ईश्वराशीं आणि जीवाशीं अभेद होतो. (समीपता, सलोकता आणि सरूपता या अन्य तीन मुक्ति). १२. हळद. १३. शीर्ष. १४. विहिरींत. १५. मंदिररूप कारागृहांतून. १६. गरुडाशीं स्पर्धा करणाऱ्या सर्पाच्या वंशामध्यें झालेली. १७. भाटांचा जमाव. १८. लंकेंतील एक पर्वत. १९. महादेवाच्या अंतःकरणरूप गृहींचा. २०. लक्ष्मीचा. २१. वृत्तांनीं. २२. शब्दसमुदायांनीं. २३. प्रासबद्ध. २४. अंतःकरणसंबंधीं वासनारूप संदेहीं. २५. बाण. २६. वानररूप कमलाचा सूर्य. २७. दीनाच्या कामाला.

विहित भज हितासी देहजाळीं हुताशीं[1];
भुवनपतिसुतासी तूज वैरीजितासी; ।
पद परमगतीचें[2] शीर मागे पतीचें;'
वचनधन सतीचें ध्येय[3] मोही यतीचें[4]. ॥ २४८

दशवदनविरामा[5] देवकामीं सकामा
विमळचरितनामा सद्य शक्रारिरामा[6] ।
नमित चरणपद्मा[7], रतली[8] जेथ पद्मा[9];
सकळकुशलपद्मा[10] वारिदुर्नामसद्मा[11]. ॥ २४९

'निधनें[12] तनुविधानी, सारसौभाग्यदानी,
अनुचरअरिवर्गा मोक्ष देसी निदानीं; ।
त्रिभुवनतमदीपा, दीनदासानुकंपा[13],
तवपदनखनीरें[14] नाश संसारतापा. ॥ २५०

भुवनजनकदंबीं ख्यातिवल्ली[15] नितंबीं,
विमळगुणतुरंबीं[16] पुण्यपत्रें सलंबीं, ।
मधुकर[17] श्रुतिवाचा[18] वेधल्या ओळकंबीं,
तव पद अविलंबीं, खेद होतो विलंबीं.' ॥ २५१

रघुवरसुरवृक्षा[19] याचितां एक मानें,
करसरसिजपात्रीं[20] टाकिलें शीर बाणें; ।
दशरथकुलभानू[21]दास जो कां सुषेणू
सुरवरजितजाया[22] पेटवी चित्रभानू[23]. ॥ २५२

असे अंबकीं[24] जो सदा त्र्यंबकाच्या[25], तया आननीं कामिनीदेह[26] साचा; ।
पडे ज्यापरी अंबिका तातगेहीं, गमे तुंबिकीं[27] मृत्युसंसारडोहीं. ॥ २५३
नव्हे जाळिलें देहसंदेहधूपा, जगीं पाजळी कीर्तिसौभाग्यदीपा; ।
जगाधीश हा राम दीनानुकंपी[28] लिळे मेळवी ब्रह्मसायुज्यरूपीं. ॥ २५४

---

१. अग्नींत. २. मोक्षाचें. ३. ध्यान करण्यास योग्य जें ब्रह्म तें. (राम.) ४. संन्याशयांचें. ५. रावणांतका. ६. इंद्रजिताची स्त्री. (सुलोचना.) ७. पादकमळा. ८. रत झाली. ९. लक्ष्मी. १०. हे रामा. ११. घर. १२. मरण. १३. दया. १४. पाण्यानें. १५. प्रसिद्धिरूप वेल. १६. स्वच्छगुणरूप केसर. १७. भ्रमर. १८. वेदवाचा. १९. रामरूप कल्पवृक्षा. २०. हस्तरूप कमलपात्रीं. २१. दशरथकुलसंबंधी सूर्य. २२. इंद्रजिताची स्त्री. (सुलोचना.) २३. अग्नि. २४. तृतीय नेत्रीं. २५. शिवाच्या. (तीन आहेत अंबक म्ह० नेत्र ज्याला तो.) २६. स्त्रिचा देह. २७. भोंपळा. २८. दीन जनांवर दया करणारा.

दशमुखमुखपंक्ती [1]आतल्या कृष्णवर्णा,
विकळ हृदयजाळीं आकळी शोकतृष्णा; ।
तळमळि [2]तनु ज्याची, मोह जाची [3]अपाडें,
न धरत वरि कोपें ज्वाळ टाकी धडाडें. ॥ २९५

कनकरथ पताकीं सिद्ध केला त्वरेशीं,
निकट [4]तमचरांशीं युद्ध सीतावराशी, ।
धरुनि कपटभावो, टाकिला मृत्युठावो,
उदित रणतटाकीं राम [5]झुंजार रावो. ॥ २९६

रघुपति अनुजातें देखतां आत्मबंधू,
कुटिलमनविषादें माजला क्रोधसिंधू, ।
करकर करि [6]कोटी सज्जिलीं चंडचापें,
खळ[7]बळदळभारीं [8]नागपाताळ कांपें. ॥ २९७

सौमित्राचा मुख्य जो कां [9]अमित्रू, त्याचा [10]पित्रूं रावणा प्राणशत्रू, ।
तेणें मंत्रू [11]पुत्रशत्रूविनाशी, योजी जैसा सज्जना पापराशी. ॥ २९८

असुरमयवरिष्ठें ओपिली काळशक्ती,
निवडुनि अरिनाथें योजिली सव्यहस्तीं; ।
रहित कवचधारा फांकलें तेज सृष्टी,
असुरसुरकपींच्या झांकिल्या दिव्यदृष्टी. ॥ २९९

कडकडित कडाडे, हाक गाजे गडाडें;
कडत जळ कडाडे, [12]वन्हि धांवे भडाडें; ।
सबळ असुरशक्ती तेज फांके [13]अपाडें,
पळत गगनगर्भीं पक्षि जाती झडाडें. ॥ २६०

सबळ कपि दडाले शैल[14]कुक्षीं कपाटीं,
प्रिय [15]दशमुखबंधू होत सौमित्र पाठीं; ।

---

१. जाहल्या. २. शरीर. ३. विलक्षण, असाधारण. ४. राक्षसांशीं. ५. योद्धा. ६. मनुष्याचें अम्र. ७. सैन्यसमूहें. ८. नागांचा पाताळ लोक. ९. शत्रु. (इंद्रजित.) १०. बाप. (रावण.) ११. मुलाच्या शत्रूचा (लक्ष्मणाचा) नाश करणारा. १२. 'भूमि भंगे तडाडे' असाही पाठ आढळतो. १३. असामान्य. १४. 'कक्षाकपाटीं' असाही पाठ आहे. १५. रावणाचा बंधु. (बिभीषण.)

[1]वसुमतिधर धैर्यें वीर[2]शार्दूळ सृष्टी,
  विजयधनुष मुष्टी दाखवी बाणवृष्टी. ॥ २६१
बहुत शरकुऱ्हाडें वीर विंधी [3]अपाडें;
  जळत पडत झाले कोळसे वन्हि तोंडें; ।
[4]नधरत वरि आली मूर्छना द्वीदळांतें,
  तडक त्रिजे[5] [6]विभांडी बाळघायाळ त्यांतें. ॥ २६२
हृदयकमळकोशीं भेदला रामबंधू,
  मथुनि जिवनकंदा, मेदिनी[7]पृष्ठीभेदू ।
करुनि शर निवाला मूळपाताळतोयें,
  [8]विकळ विर धरित्री पाडिला मृत्युघायें. ॥ २६३
[9]विकट अरिकुऱ्हाडा चूर्ण घायीं [10]उरांडा,
  स्रवति महि [11]अशुद्धें, पूर जाती भडाडां, ।
पडत रणतटाकीं, कंप झाला विराडा,
  म्हणति असुर [12]होडी [13]वाडे केला पवाडा. ॥ २६४
गजबज दळभारीं वानरां [14]निर्जरांतें,
  [15]दशमुखमुख तेव्हां भेदले [16]अंबरातें; ।
रघुवरनरराया कोप काळाग्नि जैसा,
  [17]करिवरशिरभंगा लोटला सिंह तैसा. ॥ २६५
करकर कर दाढा खादल्या वीरपाळें,
  स्खलित प्रळयमेघातुल्य गाजे [18]ईसाळें; ।
अवनितळ थरारें [19]तोडरांचेनिपायें,
  दशमुख[20]दळ जीवा मोकळी वीण घायें. ॥ २६६
रचित विरुदमाळी सूजदंडावळी त्या,
  गमत [21]गगनदंतीराजशुंडावळी त्या; ।
सुजड धनुष दंडीं चंड घंटावळी त्या,
  सुटत शर विखंडी काळकंठावळी त्या. ॥ २६७

---

१. शेष. (लक्ष्मण.) २. श्रेष्ठ. ३. असाधारण, थोर. ४. न सांवरतां. ५. वीज. ६. मारी, पराभव करी. ७. पृथ्वीच्या पृष्ठभागाचा भेद. ८. व्याकुळ. ९. भयंकर. १०. उंच छाती. ११. रक्तें. १२. पैज. १३. थोर. १४. देवांतें. (अमरत्वामुळें ज्यांस जरा नाहीं असे.) १५. रावणप्रमुख राक्षसास. १६. आकाशास. १७. हस्तिश्रेष्ठाच्या मस्तकाचा भेद करण्याला. १८. ईर्षेनें. १९. पादभूषण. २०. सैन्य. २१. ऐरावत.

असुरकदनकामीं वीर विद्याविनोदें
अरिगजमद[1] भंगे चापघंटानिनादें[2]; ।
नैधरत[3] बळसिंधू पेटला वीर मारा
भरित गगन बाणीं लागल्या मेघधारा. ॥ २६८

उभयविरबळांचें झूज कोलाहळांचें,
दशमुख प्रतियोद्धा वैर साधी छळांचें; ।
दशक धनुषमुष्टी बाण काळानळाचे[4],
सुटत पडत घाई मेळ गोळांगुळांचें[5] ॥ २६९

रघुवरशरवृष्टी तोडिली एक बाणीं,
निवडुनि दशकोटी मारिले शैलपाणी[6], ।
असुरकुळकुठारें[7] देखतां वीरमारा,
भरित गगन बाणीं तोयदें[8] जेंवि धारा. ॥ २७०

करिण[9] दशसहस्रें, लक्ष ते अश्व जाती,
रथवर शतसाधें[10], अर्बुदार्धें पदाती[11]; ।
पडत रणकबंधें[12] नृत्य कीजे विनोदें,
जवत्र[13] शतकोटी नाचती मुंड नादें. ॥ २७१

उठत कुणपकोटी[14], नाचतां चापडोले,
सुजड धनुप्रदंडीं घंटिका एक बोले, ।
सकळहि मनुसंख्या[15] वाजतां एक नादू,
प्रहरभरि नरेंद्रें आटिला सैन्यसिंधू. ॥ २७२

तुरग रथ बुडाले शोणिताचे[16] समुद्रीं,
गिरिवर करि[17] तैसे लोटले लोटधारीं; ।
असुरकुळ निमालें, हाक लंकेसि गाजे,
रुदत वधु समस्ता शोकवैधव्यलाजे, ॥ २७३

---

१. शत्रूच्या हत्तींची मस्ती. २. धनुष्यांच्या समुदायाच्या टणत्कारानें. ३. न सांवरत, धरतां न येत. ४. काळाग्नीचे. ५. वानरांचें. ६. डोंगर आहेत हातीं ज्याच्या असे वानर. ७. राक्षसकुळाचा संहारकर्ता (कुठार=कुऱ्हाड) राम त्यानें. ८. उदक देणाऱ्या मेघानें. ९ हत्ती. १०. दीडशें. ११. पायदळ. १२ शिररहित धडें. १३. मोठे वेगवान्. १४. प्रेतकोटि. १५. चवदावेळ. १६. रक्ताचें. १७. गज.

रघुविरधनु वाजे ब्रह्मवेदांतवादीं,
दशमुखधनु गाजे तर्कपाखंडवादीं, ।
रघुविरशर जैसे संत सन्मार्गवर्ती,
दशमुखशर जैसे वाम[1] कौळीक[2]पंथी. ॥ २७४

रघुवरशरदर्पें चोजवी तेज गाढें,
दशमुख सभवंते राम देखे निवाडें; ।
पुसुनि नयन पाहे राम कोट्यानुकोटी,
धनुषधर समोरें घालिती बाणवृष्टी. ॥ २७५

मागां रामें, सन्मुखीं सिद्ध रामें, वामें रामें, दक्षिणें वीर रामें, ।
ऊर्ध्वी रामें, मेदिनीमध्य रामें, सर्वं रामें व्यापिजे पूर्णकामें. ॥ २७६

योगीं रामा, सर्वभोगीं श्रिरामा, त्यागीं रामा, सर्वसंगीं श्रिरामा, ।
रूपीं रामा, सर्वभूतीं श्रिरामा, देखे रामा सर्वसंपूर्ण रामा. ॥ २७७

गगनभुवनआपीं राम चैतन्यरूपी,
दहनपवनतापीं वीर राम प्रतापी, ।
गिरिवरतरुवल्ली रामजाळ्या छळाया,
दशमुख बळहीना ठाव नाहीं पळाया. ॥ २७८

प्रगटगजतुरंगीं राम चिन्मेघरंगीं
उँरग[4]खग[5]कुँरंगीं[6] कीटभृगीं पतंगीं, ।
सकळजिवतरंगीं जानकीप्राणसंगीं
दशमुख समरंगीं युद्धसीमा उलंघी. ॥ २७९

उभय दळ निवाडें राम देखोनि दृष्टी,
झडकरि धनु पाहे राम कोदंडमुष्टी; ।
त्वरित कवचकोशीं खड्ग काढी स्वहस्तें,
रघुवरतनु झाली शस्त्रजाळें समस्तें. ॥ २८०

करचरण अँवेवीं[7] राम देखोनि धाके,
विसही नयन झांकी, मानसीं राम देखे; ।
पळत पळत लंकादुर्गभिंती हुँड्याची[8]
सकळ निखिळ[9] तेही राम देखे पुढांची. ॥ २८१

---

१. वाममार्गी. २. शाक्त. ३. उदकांत. ४. सर्प. ५. पक्षी. ६. हरिण. ७. अवयवीं. ८. बुरूज. ९. अखेरीस, शेवटीं.

द्रुपें भावें प्राणघाकें जिवेंशीं, बोधें रामा शेवटीं राम त्यासी; ।
भेटे जैसा रावणा भूतभानी, झाली निष्ठा रामरूपीं निदानीं. ॥ २८२

त्यजुनि रण पळाला मंदिरामाजि, हातें
धरुनि सकळ सांगे मात मंदोदरीतें; ।
'असुरगुरुवरिष्टें [3]ओपिले मंत्र मातें,
करुनि जप [4]उपासीं काळमृत्युंजयातें.' ॥ २८३

वदे [5]वल्लभा, 'दुर्लभाचेनि कामें वृथा शीणसी, झूज कां वीरधर्मे; ।
म्हणे, 'नाइकें, होम साधीन हातें, [6]अरामी करूं मेदिनी शस्त्रघातें.'॥ २८४
गुहागर्भगेहीं रिघे घोरकामी, मुखें प्रार्थिला राक्षसें [7]काळनेमी, ।
'सिताशोकहारी [8]अशोकारिकाजा गिरिद्रोण आणील रात्रींत पैजा. ॥ २८५
तया पाठिलागा करा शस्त्रजोडी.' सवें प्रेरिले वीर [9]झुंजार [10]कोडी. ।
निघे काळनेमी त्वरा वाट बावों; म्हणे, 'मारुती मारिल्या कीर्तिलाभो.'॥ २८६
असें प्रार्थुनी, जाउनी शीघ्रकाळें, गिरी कंदरीं अग्निकुंडासि केलें; ।
[11]शिखी स्थापिला, दाटला धूम्र व्योमीं; जपे रावणू मंत्र व्हाया [12]अरामी. ॥ २८७
करूनि सिद्धी दशकंधरानें, येवूनि युद्धांगणिं क्रोधमानें, ।
प्रेरी मयास्त्रा शर शक्ति शूळा, भासे जशा त्या प्रलयाग्निज्वाळा. ॥ २८८
तेव्हां गंधर्वअस्त्रें नलगत पळही वारुनी जेंवि इंद्रें,
ताडीलें पर्वतातें धरुनि [13]पवि करी, तेंवि [14]त्यां रामचंद्रें; ।
क्रोधें तो शस्त्र अस्त्रें अगणित निकरें प्रेरुनी जैं प्रभूतें
आच्छादी सर्वसेनासह मग प्रलयो जाहला वानरांतें. ॥ २८९
सौमित्रें तैं प्रयत्नें प्रखर[15]अशनिनें शत्रुच्या [16]कार्मुकातें
तोडोनी सारथीचें शिरहि उडविलें तीक्षणाबाणघातें; ।

---

१. अखेरीस, शेवटीं. २. राक्षसांच्या गुरुवर्यांनें (शुक्राचार्यांनें.) ३. दिले. ४. उपासना करतों, आराधना करतों. ५. प्रिय पतिला. ६. रामरहित. ७. ही कथा अध्यात्मरामायणांतील युद्धकांडाच्या सप्तम सर्गांत आहे. कालनेमि हा रावणाचा चुलता. मारुति लक्ष्मणासाठीं द्रोणाचल आणण्यास गेला तेव्हां त्याला वाटेंत निरोध करण्यास्तव रावणानें याला पाठविलें होतें. यानें मुनिवेष धरुन मारुतीला अडविण्यासाठीं मार्गांत एक आश्रम केला व तो त्यांत जाऊन राहिला. हें सर्व कपट मारुतीच्या लक्षांत आल्यावर त्याचा त्यानें वध करून पुढें मार्गक्रमण केलें. ८. अशोकवनाचा शत्रु. (मारुति.) ९. योद्धे. १०. वीस. ११. अग्नि. १२. रामचंद्ररहित. १३. वज्र. १४. मयासुरानें दिलेल्या अस्त्रादिकांस. १५. वज्रानें. १६. धनुष्याला.

छेदोनी स्यंदनातें, पळहि नलगतां बंधुनें[1] अश्व चारी
मारीले, तैं सक्रोधें दशशिर चपलाप्रायशक्तीस[2] प्रेरी. ॥ २९०
त्या शक्तिनें भस्म बिभीषणानें व्हावेंचि, पैं सत्वर लक्ष्मणानें।
मोडून बाणें समरीं स्वशत्रू, वारूनि शक्ती जिववी सुमित्रू. ॥ २९१
त्या शक्तिनें रावण पापराशी ताडी रणीं सत्वर भूधरासी; ।
ती रामबंधू शिखराग्रि जैसा पाडी क्षितीतें पवनें तरूसा. ॥ २९२
कपिविरदळभारीं थोर आकांत माजे,
त्यजुनि धनुतनूतें त्यागिलें रामराजें; ।
सकळहरिकुळासी[4] दैंतनैर्ऋत्यनाथें[5]
त्रिभुवनगुरुराया बोलिजे शोकशांतें. ॥ . २९३
सुषेणाभिधानी महावैद्यराणा म्हणे, 'याम[6] चत्वार आयुष्य जाणा; ।
रवी देखतां प्राण सांडिल काया; करा यत्न जो मी वदें रामराया!॥ २९४
द्रोणाचळीं पीयुँषहेमवल्ली[7] रत्नाकृतीराजित पुष्पझल्ली; ।
भूदेवता राखिति राजभिल्ली, जिंती[8] रसें खेचँरलोकवल्ली[9]. ॥ २९५
गमन करुनि येतां योजनें आठकोटी,
पयनिधिपरपारीं हेम तेजाळ कोटीं;' ।
वचन पडत कानीं वानरां धाक पोटीं
उदित शपथ बोले मारुती वीर जेठी[10]; ॥ २९६
'मासें, पक्षें, सप्तदीनावकाशें आणूं आम्हीं' बोलती एक[11] ऐसें. ।
बोलीं बोधी रावणानूज[12] त्यांतें, 'प्रीयाभावी काय कीजे वधूतें? ॥ २९७
'तृतियप्रहरभागीं सत्य आणीन शैला'
करुनि पण उडाला मुख्यप्राणेश लीला; ।
सुमैनमन[13] विनोदें ठेविलें रामपायीं,
स्मरणकुँलिशवाचे[14] विघ्न भंगीत जाई. ॥ २९८
करुनि जनक[15] भागां, धांवतां वेग गाढा;
उधळत गिरि व्योमीं अंगवातें झडाडां; ।

---

१ बिभीषणानें. २. वीजेसारख्या. ३. एका पोथींत २८९ ह्यापासून तों २९२ ह्यापर्यंत म्हणजे चार श्लोक नाहींत. ४. वानरसमूहाशीं. ५. जितेंद्रिय राक्षसश्रेष्ठानें. ६. प्रहर. ७. अमृत. ८. जिंकी. ९. स्वर्गलता. १०. ज्येष्ठ. ('वयानें मोठा' असा शब्दार्थ असून 'बळानें मोठा' असा अर्थ झाला.) ११. कित्येक. १२. बिभीषण. १३. पुष्परूप मन. १४. वज्र. १५. बाप. (वायु.)

फिरत धरणि जैसें चक्र [1]कुलालशाळे,
डहुळत जळसिंधू, भंग नक्षत्रमाळे. ॥ २९९
मकर गगनडोहीं सारिले शून्यबाही,
सहित अवनि मेरु लंघिले सिंधु साही; ।
पयरसनिधिपारीं शैल तो चंद्रनामा
तदुपरि मुनिवेषें देखिलें काळनेमा. ॥ ३००
[2]सुतृषितहनुमंतें मागतां तोय, [3]दूतें
वसत [4]ग्रह तडागीं, दाविलें तेंचि त्यातें; ।
कपिविरजळपानीं झोंबली [5]नेक्रि पांया,
पडत मकरआटी [6]आसुडी हस्तघाया. ॥ ३०१
न सुटत, मग कंठीं [7]सूदलें पुच्छदोरा;
धरुनि वदन हस्तें ओढिलें पाणि जोरा; ।
शतपरिमितसंख्यायोजनें देह भासे,
निरखुनि वरि कुक्षी ताडिली लात रोषें. ॥ ३०२
खडतरकपिघायीं आतलें देह चेंदा,
विगळित फळ तैसें सांडणी रक्तमेदा, ।
त्यजुनि दुरितशापा मुक्त [10]गंधर्वरामा.
नमुनि कपिवरातें मारवी काळनेमा. ॥ ३०३
हरिविर जंव पाहे वाढला काळनेमी,
चरण धरुनि पृष्ठीं भेदलें [11]शीसें [12]व्योमीं; ।
पसरुनि मुख धांवे पातकाचा समूहो,
प्रकट प्रळयरुद्रातुल्य वाटे कपी हो. ॥ ३०४
विकट हृदय मर्मी ओपिली वज्रमुष्टी,
धरुनि उभयपायीं ताडिला शैलपृष्ठीं ।
फुटत महि तडाडे, शेष देहीं विरांचे
दशशतमुखसंख्या भाग झाले शिरांचे. ॥ ३०५

---

१. कुंभार. २. तृषापीडित. ३. मायानिर्मित बटूनें जलाशय मारुतीला दाखविला असें अध्यात्मरामायणांत आहे. (अध्यात्मरामायण, युद्धकांड, स० ७ श्लो० २१) ४. मगर, सुसर. ५. मकरी. ६. ओढी. ७. घातलें. ८. झालें. ९. चरबी. १०. गंधर्वस्त्री. ह्या अप्सरेचें नांव धान्यमाली. हिनें वेषधारी मुनीची खरी हकीकत मारुतीला कळवून 'त्याचा शिरच्छेद कर' असें सांगितलें. (अध्यात्मरामायण, युद्धकांड, स० ७ श्लो० २४–२७) ११. मस्तक. १२. आकाशीं.

रघुकुळदिपकाचा दूत राजा प्रतापें;
न भरत पळ आला काळ द्रोणागिरीपें[1]; ।
प्रगट दहनदीप्तिज्वाळकल्लोळमाळा
भरित अचळ तैसा औषधीचा उमाळा[2]. ॥ ३०६
नमुनि वचन बोले, 'शैलराजा! पवित्रा!
दशमुखकरशक्तीं भेद झाला सुमित्रा[3]; ।
म्हणवुनि तुज याची औषधी दीनवाचा,
हरुनि दुरित राखीं मान त्या राघवाचा. ॥ ३०७
महादातया! याचका पाहिं मातें; रमानायकें प्रार्थिलें थोर तूतें; ।
स्वयें चाल, कां औषधीलागिं देईं; जगीं येश निर्दोष हें तूंचि घेईं.'॥३०८
वदे शैल तो, 'मर्कटा! मंदबुद्धी! असो कोण तो रावणा राम दंदी[4]? ।
नयें, नेदवे अल्पही औषधीतें, असें आश्रयें वानरा! तूंचि येथें.' ॥ ३०९
म्हणे मारुती, 'पाथरा द्रोणशैला! जडा! निष्ठुरा! नेणसी कष्टवेला; ।
लवामाजि लंकेसि नेईन तूतें; जगीं कोपल्या कोण वारील मातें?'॥ ३१०
बळें पर्वता घातले तीन वेढे, करें कांपिलें, आंवळी पुच्छ गाढें; ।
कडाडें कडे काढितां शैलवेगा, जडे मेदिनी पिंडिका जेंवि लिंगा.॥ ३११
लांगूल[5] गोळांगुलराज[6] प्रौढी वेष्टूनि पृथ्वीधरमूळ सोडी; ।
आर्डेत म्हैसासुर[7] शक्तिमारें, तैसा पडे पर्वत अंगभारें. ॥ ३१२
भयें भेदला शैल तो मेदिनीतें; कपी वोढितां आसुडे भूमि हातें; ।
मही रोविले पादअंगुष्ठ पाहीं, बळें काढिला ज्यापरी स्तंभ बाहीं. ॥ ३१३
गिरी काढितां छिद्र झालें धरेतें, ईसाळे[8] धुळी धांवती व्योमपंथें[9]; ।
पडे मागुती मेघ होऊनि मागां, थरारे मही मेरु, संहार नागां. ॥ ३१४
उचलुनि गिरि पृष्ठीं वाहिला वीरराजें,
उसळत नभपंथीं गर्जतां मेघ लाजे; ।

१. द्रोणागिरीपाशीं. २. उद्भव. ३. सुमित्रेचा पुत्र लक्ष्मण. ४. हट्टी. ५. पुच्छ, ६. वानरश्रेष्ठ. ७. महिषासुर. हा रंभ नामक दानवाचा महिषीपासून झालेला पुत्र. यानें वायुभक्षण करून घोर तप केलें. तेव्हां पितामहानें प्रसन्न होऊन याला वर दिला. त्या योगानें याला पुरुषापासून भय नाहीं असें झालें; याला स्त्रियांपासून भय नव्हतेंच. याप्रमाणें अजय्य आणि अधृष्य झाल्यावर हा प्राणिमात्रांस पीडा देऊं लागला. तेव्हां यास मारण्याकरितां अष्टादश भुजान्वित आदिशक्ति साकाररूप धरून प्रकट झाली आणि ह्याचा वध केला. ८. ईर्षेनें. ९. 'उसाळी बळें धांवली व्योमपंथें' असाही पाठ आहे.

गजर पडत कानीं चेव विद्याधरांतें,
म्हणति, 'कवण नेतो चोर द्रोणागिरीतें?' ॥ ३१५
गंधर्व गर्वारुढ सर्व माजें दिव्यौषधी राखत देवकाजें; ।
रात्रीं भरी वानर घोरकर्मा, नेतो गिरी मारुनि काळनेमा. ॥ ३१६
सकळ गगनचारी मारिती शस्त्रजाळें,
प्रबळ कपि वधाया धांवती एककाळें; ।
करुनि परिघ वेगीं वेढिला वीरराणा,
म्हणति, '[2]अचळ नेतां मूकसी व्यर्थ प्राणा.' ॥ ३१७
[3]अरिकमळकरींद्रा क्षोभ त्या हीनबोलें,
गिरि[4]कुसुम कराग्रीं मोकळें [5]वाळ केलें; ।
कवळुनि शत शांतें द्वंद्वपादाग्रसंधी,
रगडित रणयोद्धा सत्वरा पंथ भेदी. ॥ ३१८
चौदासहस्रांसि करोनि मारा, चाले, नि[6]राळीं सह शैलभारा; ।
मार्गीं अयोध्येवरि येत लाहें, तों [7]रामबंधू गिरितेज पाहे. ॥ ३१९
भरत विरवरिष्ठें विघ्न मानूनि मोटें,
धरुनि धनुष दंडीं सोडिला बाण नेटें; ।
रघुविरनिजनामें बाण [8]अंकीत लागे,
सहितअचळपृथ्वी कोसळे वीर आंगें. ॥ ३२०
पडत महि दणाणी, देखिला शैलपाणी;
पुसत नर कपींद्रें सांगिजे वृत्त वाणी; ।
स्तवुनि भरत बोले, 'बैस माझे शराग्रीं
न भरत पळ रुद्रा ! पावसी [9]राघवांघ्रीं.' ॥ ३२१
परमसुखसमुद्रा देखतां पूर्णचंद्रा,
भरतवचन मानें त्यापरी वानरेंद्रा ।
हरुनि हृदयचिंता शांतवी त्या नरेंद्रा;
नमुनि चरण माथां चिंतिलें राघवेंद्रा ॥ ३२२
सहितअचळ पृथ्वी पाडिला एकबाणें,
'शरगति मज लंके धाडिसी सत्य जाणें; ।

---

१. देवव्रत नाहीं. २. पर्वत. ३., शक्ररूप कमळाला जो श्रेष्ठ गजाप्रमाणें त्याला. ४. पुष्पवत् पर्वत. ५. पुच्छ. ६. आकाशांत. ७. भरत. ८. चिन्हित. ९. रामाच्या पायीं.

परि मज हनुमंता निंद्य कैसेनि साजे ?
अभिनव बळ माझें जाणिजे रामराजें.' ॥ ३२३
अमृतधरखगेंद्रा वेग तैसा कपींद्रा,
गमन सहनगेंद्रा मानवीइंद्रियेंद्रा ।
परम सुख महींद्रा चोज वाटे सुरेंद्रा
अतुळबळसमुद्रा सत्य काळाग्निरुद्रा. ॥ ३२४
उशिर बहुत झाला मारुतीलागिं पाहो,
म्हणवुनि करि चिंता जानकीप्राणनाहो. ।
तंव झळकत व्योमीं तेज फांके झळाळें.
वदति कपि उदेला मित्र, झालें उजाळें. ॥ ३२५
कपी बोलतां, राघवा रोष भारी; म्हणे, 'केउता लोकआयुष्यहारी ?' ।
नभीं लक्ष लावी, म्हणे, 'बाण साहें.' करी सिद्ध नाराच कार्मूक पाहें.॥ ३२६
'जगा मित्र तो आजि आम्हां अमित्रू, कुळा घातकी पातकी काळशत्रू.' ।
म्हणे राजधन्वंतरी, 'देवपाळा! नव्हे भानु हा, मारुतीराज आला.' ॥ ३२७
उदित गगनरंगीं दीपिका कोटितेजें
करि लखलख तैसा औषधींचेनि पुंजें ।
कनकअचळताटीं लाविल्या लक्षवाती
रघुपति उजळाया मारुती येत भक्ती. ॥ ३२८
कनकपुरविहारी देखती दुर्गपारीं
विषधर नग तैसा भाविती प्राणहारी, ।
विजय हरिख त्यांचा शोक दाहीं जळाला.
रघुपतिहृदयींचा रोष तोषें पळाला. ॥ ३२९
कपि जयजयकारीं सन्मुखीं वेति धांवे
उतरुनि गिरि लाहे पातला स्वामिखेंवे. ।
धरुनि हृदयभावें वंदिलें रामचंद्रा
हरिहरसुख वाचे बोलतां मौनमुद्रा. ॥ ३३०
नमुनि गिरि सुषेणें हस्तकें वैद्यराणा
निवडुनि रसवल्ली काढिलें सार, जाणा; ।

---

१. सीतेचा प्राणनाथ. २. सूर्य. ३. बाण. ४. शत्रु. ५. सुषेण. ६. आकाशांगणीं. ७. सर्प. ८. पर्वत. ९. मानिती. १०. हर्ष. ११. आलिंगनास्तव.

लपवुनि जनदृष्टी सूदलें भिन्नपात्रीं
सुखमय घन आला जेथ घायाळ क्षेत्रीं. ॥ ३३१

मुखीं सूदलें तोय संजीवनीचें, व्रणीं ओतलें सार हो! संधिनीचें, ।
विशल्येन न्हेलें महादुःख भंगा, उरीं लेपिली हेमवल्ली सुरंगा. ॥ ३३२
संजीवनीजीवन धातु ओपी, सौसंधिनी सांधित घाय लोपी, ।
विशल्य शल्या निरसूनि संगें स्वर्णा करी कांचनदेह रंगें ॥ ३३३
निजेला उठे तेंवि धांवे सुमित्रू; म्हणे, 'कडता पापरूपी अमित्रू?' ।
करें ओढिला राघवें प्राणमित्रू क्षमालिंगनें हर्ष दोघां विचित्रू. ॥ ३३४

कपि मृत रणमारें आणि घायाळ अंगें,
सकळहि उठिले ते लक्ष्मणाचेनि संगें. ।
सुख वधुवरलक्ष्मीं भोगिती येर जे कां,
सगरदुरितभंगें ज्यापरी मोक्ष लोकां. ॥ ३३५
सहितगिरि कपींद्रा नीघतां वातवेगें,
खचर अतिबळाचे धांवले पाठिलागें, ।
म्हणति, 'परत, हीना वानरा! सांडि शैला,'
सहज गिरि कराग्रीं ताडिला शत्रुमेळा. ॥ ३३६

पळाले किती पाडिले शैलघायीं अयूतानुयूतें विभांडूनि पायीं. ।
गिरी ठेविला सत्वरा जेथ होता, सुवेळेसि ये वानराधीश येतां. ॥ ३३७
कपींच्या दळीं घोष गाजे विरांचा, बळी रावणें होम कीजे शिरांचा; ।
जया याचिजे काळमृत्युंजयातें, हरी सिद्ध झाले तया नाशनातें. ॥ ३३८

नळनिळयुवराजें मारुती जांबुवंतें
अरिवरनृपगेहा भंगिलें गूढपंथें. ।
क्रतु पर नर हस्तें चालितां तो न भंगे,
मग वधुवर तेथें आणिली लागवेगें. ॥ ३३९
करित हवन सोसें रावणाचेनि रोषें,

१. घातलें. २. संजीवनी औषधीचें पाणी. ३. हिचें नांव 'संधानी.' हिच्या योगें छिन्न मस्तक आणि धड यांच्या नाडीचें पूर्ववत् संधान होतें. ४. विशल्यकरणी. ही शल्यांची पीडा दूर करते. ५. मूळांत 'सुवर्णकरणी' असें नांव आहे. सोन्याप्रमाणें देहाचा वर्ण करणारी असा अर्थ. (युद्धकांड, सर्ग १०१.) ६. सगरराजानें स्वकीय पापनाशास्तव भागीरथी मृत्युलोकांत आणिली, तेणेंकरून सर्व लोकांस मोक्ष प्राप्त झाला, असा भाव. ७. वानर. ८. गुप्तमार्गानें. ९. यज्ञ. १०. श्रेष्ठ स्त्री. (पट्टराणी.)

विजयहरिखतोषें रे[2]तला हा[3]वयोषें ।
अमित शिर असोसें खंडुनी खड्गतोषें,
स्रवित जळ, हुताशें प्राशितां ज्वाळपोषें. ॥ ३४०

असे अंतरीं कूपिका पीयू[4]षाची, तया कारणें वेल वाढे शिरांची ।
कपी गुंतले विस्मयाचेनि पाशें नसे खेद या, वेधलासे जयाशें. ॥ ३४१ ॥

उतरुनि शिरपंक्ती ओपितां हे[5]व्यवाटीं,
फुटत दहनसंगीं पातलीं एक कोटी ।
जळत पळ कपोळीं पट्टिका ब्रह्मरेखा
विलिखित शतकोटी रामचारित्रलेखा. ॥ ३४२

करित क[6]मळजाचें वाव निर्मीत सृष्टी,
अरिकुळमुळनाशा वाढली हांव मोटी. ।
तव कपिवर वेगें गांजिती वल्लभेतें
गृहित कुरळकेशीं खेद मंदोदरीतें. ॥ ३४३

विटंबिली राक्षसराजपत्नी, हारावळी त्रोटित हेमरत्नी, ।
झुगारिलें अँबर अंबरातें, [9]विसंचिलें कंचुकिकुंडलांतें. ॥ ३४४

'घे जानकीचें उसणें खळा ! रे ! झुंजारणें दाखविसी बळा रे ! ।
रें[10]मानळीं निर्दळिलें कुळा रे ! सांडीं खळा ! मानसिच्या मळा रे !' ॥ ३४५

उठुनि प्रबळकोपें घेतली धांव वेगें
कुटित कपि कराग्रें कुंथती गात्रभंगें, ।
पळत विर सुवेळे पातले रामराया,
म्हणति, 'अरिवरिष्ठें येइजे युद्धठाया.' ॥ ३४६

सभा मोडली, हस्तकें चाप वेंटी, उभा राहिला राम झुंजा[11]र जेठी[12]. ।
वरी आजि वैधव्य मंदोदरी तें, स्त्रिया जाणवीती सितेसुंदरीतें. ॥ ३४७
वधू धाडिली पैं गृहा लंकनाथें, धरी अंगत्राणें, धनुर्बाण हातें, ।
सवें शे[13]षसेना निघे युद्धकामा, पुढां देखिलें राम कै[14]वल्यधामा. ॥ ३४८

---

१. हा समास लक्ष्यांत ठेविण्यासारखा आहे. २. रत झाला. ३. हांवरूप स्त्रीशीं. ४ अमृताची. रावणाच्या नाभिप्रदेशीं कुंडलाकार खळग्यांत अमृत होतें असें वर्णन अध्यात्मरामायणांत (युद्धकांड, स० १ श्लो० ५३) आहे. ५. अग्नींत. ६. ब्रह्मदेवाचें. ७. वस्त्र. ८. आकाशातें. ९. विसर्जिलें. १०. स्त्रीरूप अग्नींत. ११. योद्धा. १२. बलिष्ट. १३. अवशिष्ट राहिलेली. १४. मोक्षाचें स्थान.

विजयरथपताकामाजि **लंकेश** राणा
क्षितिवरि **रघुराजें** मांडिलें वज्रठाणा, ।
गिरिवर [1]करि तैसा मत्त **लंकेश** वीरू
महिवर [2]मृगराजा **राम** संग्रामधीरू. ॥ ३४९

रथीं **रावणू**, भूतळीं **रामराजा**, दिठीं देखतां व्यापिला **शक्र** [3]लाजा. ।
म्हणे ,'स्वामि हा आमुचा [4]शत्रुसंधीं पदीं [5]चामके, पाठवूं [6]यान युद्धीं.'॥ ३५०

त्वरें प्रेरिला [7]मातली सारथी तों, रथेसीं निघे पातला भूतळीं तो. ।
दळें देखती निश्चयें चोज सर्वा, सळें भंगिजे **रावणें** मानगर्वा. ॥ ३५१

रविशशिसम चक्रें [8]शक्रनीलांगवर्णी
उतरुनि रथ भावें **मातली** कीर्ति वर्णी. ।
सुनिळ ध्वजपताका झुंपिल्या शामवर्णी
जडित गरुडपाचूवृंद [9]मुक्तें सुवर्णी. ॥ ३५२

विनवुनि रथयानीं नाथ आरूढ केला.
[10]सुरवरकपिभारीं जयजयाकार झाला. ।
दशमुखहृदयींचा कोप धांवे धडाडां,
रगडुनि कर दोनी चाविल्या दंत दाढा. ॥ ३५३

उचलुनि धनु मुष्टीं **राम** गर्जे प्रतापें,
'**द**शमुख [11]दहिला हो! आजि माझेनि कोपें. ।
क्षितिवर दश [12]मुंडें लोळती बाणधारा
वधु सकळ विलापें मुंडिती केशभारा. ॥ ३५४

माझा उर्मट बाण कर्मट जगीं सुस्नात रक्तोदकीं
जे पापात्मक**ता**टिकाहृदायिंची [13]पाटीक्रिया आणखी ।
[14]प्राणायामविधी न घ्राण नळका निर्मूळ कानी सखी,
ते भावी भगिनी तुझी **शु**पनखा निर्दाळिली नासिकीं. ॥ ३५५

होमार्थी **खरदू**षणादिकविरां शीर्षाहुती होमिल्या,
पाठी कांचनदेह **मा**रिच बळी **गं**गातटीं टाकिला. ।

---

१. हत्ती. २. सिंह. ३. लज्जेनें. ४. अरिजनामध्यें. ५. चालें. ६. रथ. ७. इंद्राचा सारथी. (युद्धकांड. सर्ग १०२ पहा.) ८. इंद्रनीलमण्यासारखा नीलवर्ण. ९. मोत्यें. १०. समुदायांत. ११. जाळिला. १२. मुखें. १३. कर्तनक्रिया. १४. श्वास आणि प्रश्वास या वायूंचा गतिविच्छेद करणें यास प्राणायाम म्हणतात.

केलें आचमन सेतुसागरजळीं, कंठावळी भोजना,
आला रावणप्राणभक्षक बळी दे मैथिली दुर्जना!' ॥ ३९६
'रे रे राघव! शब्दलाघवधरास्त्रीरूपिणी ताटिका,
विद्यार्थी भृगुनंदना[1] मृगतनू मारीच त्या बाळका।
वाळी वानर हीन पामर शरा रे! घातलें नेणतां,
तें सांडीं, मज रावणाप्रति रणीं आक्रंदसी झूजतां. ॥ ३९७
प्रळयअनळ[2] माझा क्रोध ब्रह्मांडदाही,
नवनितकण[3] तैसा भस्म होसील पाहीं।
सुरवर तुज मेषा[4] होमिते जीत आगीं,
धरिं धृति समरंगीं, पातले बाण लागीं.' ॥ ३९८
उभय विर विषादें क्षोभले येरयेरां[5];
रगडित रथ लोटें सन्मुखें होत मारा.।
ध्वजगजविरघंटानादघोषें थरारां
थरकत महिपृष्ठीं, देवदैत्यां दरारा. ॥ ३९९
दशक धनुषकुक्षीं जोडिले कंकपक्षी[6]
हृदय विमळ चक्षीं[7] श्रीपदांकीत लक्षी।
कुचयुगल सितेचें जेथ काठिण्यसाक्षी
रघुवर दशबाणीं भेदिला वज्रवक्षीं. ॥ ३६०
पुनरपि दशमुंडें बाणधारा दुखंडी
करुनि रथनिकेता पोळिले[8] अश्व तुंडीं.।
अकळ[9] विकळ[10] केला मातली बाणजाळीं,
गजबज तिंहिलोकीं हाक वाजे निराळीं. ॥ ३६१
बहुत कठिण वेळा वर्तली निर्जरांतें[11];
हडबड ऋषिरायां बोलती कश्यपातें.।
त्वरित मुनि अगस्ती[12] धांवला गुप्त तेथें.
'त्रिभुवनविजयी तूं' थापटी पाठि हातें. ॥ ३६२
'पुरुषपरगुणाद्या! देवदेवैकवंद्या!
झडकरि जप कानीं बोधिली भानुविद्या[13].।

१. परशुराम. २. प्रलयाग्नि. ३. लोण्याच्या कणासारखा. ४. मेंढ्या. ५. परस्पर. ६. पक्षिविशेष. (यांच्या पंखांचा बाणास पिसारा करतात.) ७. नेत्रांनीं. ८. जाळिले. ९. निस्तेज. १०. व्याकुळ. ११. देवांतें. १२. युद्धकांड, सर्ग १०५ पहा. १३. आदित्यहृदय, आदित्योपासनारूप गुह्य.

वरदनिधिकराग्रीं ओपिलें दिव्यबाणा,
निकट विजयलक्ष्मी, शत्रु सांडील प्राणा.' ॥ ३६३

कथुनि [1]कलशजन्मा जातठेला निराळीं
रघुवरकरदंडीं चापघंटा [2]कैराळी ।
घणघणघण घोषें गर्जती एककाळें,
दशमुखतनु वर्मे वीर[3]वाढीव झाले. ॥ ३६४

कवळुनि दृढ मेढा ओढितां सी[4]तें बोटें,
नमित उभय कोटी वाजती कर्कराटें ।
सरळ अनळ जिव्हा काळना[5]राच रागीं,
सुटत सुखसुसाटें मेघ आकाश लंघी. ॥ ३६५

सीतापयोधरस[6]रोरुहरंगओपें सां[7]गाथिलें हृदय [8]पातकपंकलेपें, ।
ऐरावतादशन चौक जगांत वर्णी माझारि बाण झगटे सुखधारपर्णी. ॥ ३६६

पुनरपि रणपंथीं सारथी रावणाचा
कुशळ परम वैरी जो सदां मातलीचा. ।
रघुवर शर धारा छेदिलें शीर घायीं,
रविहयतुळणेचे मारिले अश्व ठायीं. ॥ ३६७

नभरत लव पाठी तोडिला अंख रोखें
विकळ विरथ घायीं भंगिलीं वज्रचाकें. ।
दशमुख रणरंगीं कोसळे प्रेतखांचे
म्हणति कपि, 'जटायू मारिला पाप त्याचें.' ॥ ३६८

रथीं आणिका बैसतां लंकनाथें त्वरें लाविले बाण तेजाळ पंथें ।
म्हणे, 'घेतली मानवा ! सेल राहें, धरीं धीर, आतां रणीं चोज पाहें. ॥
[9]वेधूनाम तूझें जगीं रूढ रामा ! नको वाढवूं वीर वाढीव कामा ।
रणीं धीर ना वीर तूं हीन जाती, कपी झाडिंचे धाडि रे ! पक्षपाती.॥ ३७०

'[10]अंपक्षेचिया पल्लवा रावणा ! रे ! तुवां लागतां, दैन्य आलें जना, रे ! ।
श्रियावंत ते देव निर्दैव केले तया वन्हि मी जानकीनाथ बोलें.' ॥ ३७१

---

१. कलशापासून झालेला. (अगस्त्यमुनि.) २. भयंकर. ३. वीरांचा थोरपणा. ४. धनुष्याची दोरी. ५. बाण. ६. कमळ. ७. भरून गेलें. ८. पापरूप चिखलाच्या लेपानें. ९. हे रामा ! स्त्रियांचें जें नांव तेंच तुझें आहे. 'रामा' हा संस्कृत शब्द स्त्रीवाचक आहे, या गोष्टीकडे येथें लक्ष्य आहे. १०. अवदशेच्या.

उभय विर सरोषें लागला बाणमेहो[1],
 धरणि गगन सिंधू खुंटला वात वाहो. ।
शशि दिनकर लोपे, माजली काळरात्री[2].
 लकलति विजु भारी, दीपल्या पक्षिजाती. ॥ ३७२
शरनिबिडतमिस्त्रें[3] लोपलीं वीरवक्त्रें,
 झळकति करमुद्रा जेंवि आलातचक्रें[4]. ।
उभयविरवरांचीं भासती त्याचिलक्षें
 पसरति शरजाळा दाविती चापदीक्षे. ॥ ३७३
दशमुखशरवृष्टीं दाटलीं अभ्रजाळें[5],
 रघुवरशरसंगीं वात कल्पांत काळें. ।
भ्रमत प्रबळ पुच्छीं घोष गाजे गडाडां
 परशरमुखधाराभंग केला तडाडां. ॥ ३७४
तदुपरि बहु थोरें कोप त्या राक्षसेंद्रा,
 स्थिर करुनि मनातें देखतो राघवेंद्रा. ।
सुटत कडकडाटें शूळशक्ती विशाळा
 वमति वदन कुंडीं ज्वाळकल्लोळमाळा[6]. ॥ ३७५
हरहृदयमराळें[7] बाणजाळें निराळीं
 निरखुनि वरि विंधे शक्ति संहारकाळीं ।
झडपति शरपक्षी वन्हि तेजाळ व्याळीं
 सुरमुनिकपिराणे धांवती अंतराळीं. ॥ ३७६
अगणितमुखचंचू चुंबितां बाणदृष्टी
 उठित खणखणाटें मांडली वन्हिवृष्टी. ।
तरुवरगिरिगुल्मां कानना होत दाहो
 कनकरचित लंका लागलें नीरें[8] वाहों. ॥ ३७७
बहुदळ कपि ऋक्षें[9] जांबुवंतादि पाळें
 भरिति सबळ रामा पेटती वन्हिजाळें. ।
विजवित करयुग्मीं घालिती सिंधुडोहीं
 बुडविति मुख मुंडें काढितां अग्निदाहीं. ॥ ३७८

---

१. बाणरूप मेघ. २. कल्पाची शेवटची रात्र. ३. बाणरूप दाट अंधकारानें. ४. कोलित. ५. मेघजाल. ६. तरंग. ७. महादेवाच्या मनोरूप भ्रमरें. (रामानें.) ८. उदक. ९. आस्वल.

अरिवर नरशक्ती कोटिखंडें विखंडी,
महितळ नेवखंडावेगळें चूर्ण सांडी. ।
नधरत मुखभागा राम सैन्यांत आला,
गिरिधरशतकोटीं वानरा घात केला. ॥ ३७९
नरविरपति रंभापत्रबाणें वितंडें,
मृत विर शतसंख्या छेदिलीं शत्रुमुंडें. ।
दशमुख शतबाणीं खोंचला संधिसंधीं
विकळ विरस मूर्छा दाटली गाढ युद्धीं. ॥ ३८०
पडतपडत लंकाधीश लाहे रथांगीं,
निजवुनि पुरपंथें सारथी जात वेगीं. ।
तव दशमुख देहीं पातला चेतनेतें
पुनरपि रथ लोटी शत्रुसन्मूख जेथें. ॥ ३८१
पुसुनि नयन तोयें साठ ओपी तुरंगा
गिळित नभ उफाळें आणिती मेघभंगा. ।
झगटत रथ जैसे वैाड विंध्याद्रिमेरू
तडकत महिपृष्ठीं मान झाडी विखारू. ॥ ३८२
थडक रथ रथाचे क्षोभले अश्व मारा
उभित पुढिलपायीं झोंबती येरयेरां ।
तळवटिं रथचक्रें भोंवती माजि दोन्ही
धनुषधर विरांचे हांकिती घोरवाणी. ॥ ३८३
न सुटत गळग्रंथी सारथी शस्त्रवोढें,
झगटित मुळवैरें तोडिती अश्व तोंडें. ।
स्थळ विपरित रामा दक्षणें क्षोणिपारीं
दशमुखमुख लंकेसन्मुखें बाण मारी. ॥ ३८४
धनुषगुण समेळीं बाणधारा झळाळीं
रघुकुळमणिमाळामेरुलक्षीं कपाळीं ।
मृगमदतिलकीं तो अक्षताकार लागे
पुनरपि पदपद्में वंदिलीं मोक्ष मागे. ॥ ३८५

---

१. भरत, किंनर, हरि, कुरु, हिरण्मय, रम्यक, भद्राश्व, केतुमाल, इलावृत, हीं पृथ्वीचीं नऊ खंडें २. उडतां. ३. थोर, मोठे. ४. शेष. ५. लंकेच्या समोर. ६. कस्तूरीच्या तिलकांत.

निवटुनि रघुराजें काढिला बाण भाता
  दिनकरमुखचक्रीं दिव्य ब्रह्मास्त्र माथां. ।
सुटत महि तडाडी व्योमीं गर्जे गडाडां
  पडत गिरि समुद्रीं प्राणधाकें दडाडां. ॥ ३८६

न भरत लव आला, लागला काळ कंठीं
  अरिवरगिरिशृंगीं वज्रधारासपाटीं, ।
उडत शिरसरोजें जात कैलासपंथें
  रघुविरवरकीर्ती सांगती शंकरातें. ॥ ३८७

अमरगण विमानीं पीटिती हस्तटाळी,
  कपि जयजयकारीं एक घेती धुमाळी. ।
तंव दशमुखदेहीं चोज झालें अपाडें,
  शिरदशक निघालीं मागिल्याचेनि पाडें. ॥ ३८८

बुडत बुडत डोहीं व्याध पावे तटाका
  सुखभरित मृगें तीं मागुती येति शोका, ।
सुरमुनिगण तैसे देखतां रामराणा
  पिटुनि पद पुढारें वोढिती चंद्रबाणा. ॥ ३८९

हरकिरिटनिवासी चक्रधारीं विराजे,
  उसळत वडवाग्नी सागरीं मग्नला जे. ।
सुटत शर झडाडें संघटे शत्रुझाडा
  पळ दशक शिरांचा छेद केला तडाडां. ॥ ३९०

स्रवतरुधिर मुंडें धांवती सत्यलोका,
  त्रिभुवनजनकातें सांगती, 'मातु देखा.' ।
पुनरपि महिपृष्ठीं पातलीं रामपाया
  उजळुनि कुरवंडी सांडिती शेष काया. ॥ ३९१

निवटुनि जंव पाहे मागुती सद्यकाळें
  न भरत पळ आलीं मागुती पैं शिसाळें. ।
रघुवर लवलाहीं चंडचापें निघातें
  सुजडितगुण वोढी वीर पाशूपतातें. ॥ ३९२

---

१. निवडून, शोधून. २. आकाश. ३. मस्तकरूप कमळें. ४. विलक्षण, असाधारण. ५. शिवाचे मुकुटांत (जटेंत) राहणारा जो अग्नि. ६. समुद्रांतील अग्नि. ७. रक्त. ८. राहिलेली. ९. पशुपतीचें (शिवाचें) अस्त्र.

प्रबळतिखटधारें कोटिवेळां तडाडां,
    अरिदशकशिरांतें छेदितांही दडाडां, ।
पुनरपि शिरबिंबें जन्मती शीरखांचे
    अगणित महिलिंगा लक्ष झाले पुजांचे. ॥ ३९३
सुरवर कपिराणे बाढ उद्विग्न पोटीं,
    म्हणति, 'अमर हा हो रावणाधीश सृष्टीं, ।
[1]रघुपतिविण आतां कोण यातें विनाशी?
    सकळहि मृग आम्हीं गुंतलों बंदिपाशीं. ॥ ३९४
अमृतभरित [1]याचे अंतरीं कुंभ जागे.
    सुभग [2]शचिपतीचा [3]सारथी वर्म सांगे. ।
उपजत शिरवल्लीमूळ छेदीं निघातें
    न भरत पळ देवा! नाश होईल यातें.' ॥ ३९५
हरिखत [4]हरिखाब्धी [5]मातली वाग्मृगांकें,
    [6]अमरकपिचकोरें सांडिती शोकशंके. ।
वचनअमृतगंगे गौरवानंदडोहीं
    विचरत सुखसंगें सूत संतुष्ट देहीं. ॥ ३९६
[7]तुणिरपयरसाब्धी मंदराकार पाणी
    निवडित शररत्ना रावणा मोक्षदानीं, ।
जळधिजठरशूळारोगधन्वंतरी तो
    हरिविधुभगिनीतें मूळ जाता शरीं तो. ॥ ३९७
घटजमुनिमुनींद्रें दत्त ज्या सायकेंद्रा
    विजयधनुष[8]लग्नीं तोष त्या राघवेंद्रा, ।
प्रगट स्वरुप दावी आदिनारायणाचें
    धडकत निजतेजें [8]चीर [9]तारायणाचें. ॥ ३९८
[10]प्रळयअनळसंगीं [11]द्वादशादित्यमेळा
    धरुनि वरदचक्रीं बैसले एकवेळां. ।

---

१. या रावणाचे. २. इंद्राचा. ३. मातली. ४. हर्षसमुद्र. ५. मातलीच्या वाणीरुप चंद्रानें. ६. देव आणि वानर हेच चकोर पक्षी. ७. भाता. ८. वस्त्र. ९. नक्षत्रमंडळाचें. १०. हा समासघटित शब्द असून पदें जोडलीं नाहींत. अशीं उदाहरणें मुक्तेश्वराच्या कवितेंत पुष्कळ आढळतात. ११. बारा सूर्यांचा समूह.

प्रळयपवनपुच्छीं भोंवडी त्यास कैसा ?
दशशतमुख सांडी श्वास फुत्कार जैसा. ॥ ३९९
वरुणयमइशानें इंद्र नैऋत्य रागीं
सुरपति सकळांसीं बैसला कांडभागीं. ।
हिमगिरिवर मेरु गाढ तैसा गुरुत्वें
गगनमयशरीरीं सागरातुल्य सत्वें. ॥ ४००
महीमंडळीं नारसिंहावतारें तयाच्या परी घोष गाजे अपारें. ।
तडाडी विजेमंडळीं मेघ भंगें भयें खेचरां आट अर्भाटसंगें. ॥ ४०१
अरीवक्ष लक्षीत जों मीनदृष्टी सरीं आवगे कूर्मकाठिण्य पृष्टीं. ।
मुसांडी न तो यज्ञवाराह माजे महावीरसिंहासरी हाक गाजे. ॥ ४०२
उपेंद्रापरी दीर्घतेजाळरूपी ऋषीभार्गवातुल्य काळाग्निकोपी, ।
प्रतापूच तो राघवाचा जयार्थीं प्रकाशे जगीं, ज्यापरी कृष्णकीर्ती. ॥४०३
मितीचा नसे वास दिग्वासधारी हराच्या वरा खंडपाखंडकारी, ।
कळीशेवटीं माजला कल्किराणा भयें मूर्च्छनें व्यापिलें विश्व जाणा.॥४०४
महासिंधुचें वोहटे तोय साचें, गळे लोचनीं क्षार मंदोदरीचे. ।
मनीं वाढला कोप तो वाडवाग्नी गृहें झोंबती सत्वरा कंठलग्नी. ॥ ४०५
भयें घाबरे अभ्र जातां निराळी, त्वरें पूसिलें शत्रुभाजाकपाळीं, ।
नभीं लागले डाग जे कुंकुमाचे तया नाम हें साच संध्यारुणाचें. ॥४०६
विजू मीनल्या कोटि कल्पांतकाळीं, सवें लागले सूर्य लक्षांतमेळीं, ।
तयासारिखें देखतां तेज फांके, पडे झांपडी रावणा प्राणधाकें. ॥ ४०७
तडाडें पडे काळरूपी कुऱ्हाडा निघातें बळें चूर्ण केला उराडा, ।
पुढें पाठिसीं ज्वाळ जाती भडाडां, नदी लोटल्या शोणिताच्या धडाडां.॥४०८
घुसळित हृदयातें बाण निष्ठूर रागी,
उघडुनि तनुपृष्टीं ज्वाळकल्लोळआगी, ।
हृदयदहनकुंडीं दीप्तिका बाणरासी
धडकति दशमौळें केशजाळें पळेंसी. ॥ ४०९

१. बाणाग्नीं. २. हरकत. ३. वामनापरी. ४. परशुरामातुल्य. ५. दिशारूप वस्त्र धारण करणारा. ६. मिळाल्या. ७. उर. ८. रक्ताच्या. ९. 'कढत खळखळाटें मेदशोणीत राशी' असाही पाठ आढळतो.

प्रवळ धुम सुसाटें माजला शुभ्रवर्णी,
सुरमुनिकपिघ्राणीं[1] दाटली कर्पटाणी. ।
हृदयकमळ शोधी बाण निर्वाणभावें
त्यजुनि तनुत्रयातें[2] येर वैकुंठ पावे. ॥ ४१०

पुनरपि रघुराजें वोढिला बाण लाहें,
दशमुखदशमुंडछेदनालागिं पाहें. ।
तंव ऋषिकपिदेवीं प्रार्थिला वीरबाहो,
'करशिरसैं[3]अवेवीं शत्रुचें प्रेत पाहों. ॥ ४११

उरीं भेदला जेधवां बाण रामा ! त्वरें पावला जीव सायुज्यधामा;[4] ।
शुचिष्मंत[5] हे बाण तुझे दयाळा ! शिवों शंकती प्रेतसंगीं विटाळा.' ॥४१२

'सर्वै माझें कृत्य संपूर्ण आतां.' ऐसें बोले राक्षसाधीशहंता.[6] ।
सोडी भाता वीर कोदंड ठेवी, तुष्टे उर्वी,[7] दुष्टसंहार भावी. ॥ ४१३

दशमुख रणरंगीं वृक्ष तैसा उलंडे,
पसरत शिर अंघ्री हस्तशाखीं उदंडे. ।
शिरकमळफळातें छिन्न झाल्या पतत्री,[8]
झडपिति मुखचंचू, लोळती जीं धरत्री. ॥ ४१४

रणतळवटमाथां पुष्पनाराचशेजे[9]
दशमुख सुखसंगें रतला[10] मुक्तिभाजे.[11] ।
नखव्रणशरघाईं रक्तकुंकूमलेपें
निरखित अनुजातें झांकळीजे प्रलापें. ॥ ४१५

'त्रिभुवनगुरु देवा ! शिष्य बोधी विचारें.'
तंव दशमुखजाया धांवती दुःखभारें. ।
विकळ रणतटाकीं प्रेत वेष्टूनि कोडें,[12]
रडत पडत पृथ्वीं, पीटिती भाळ तोंडें. ॥ ४१६

---

१. नाकांत. २. स्थूळ, सूक्ष्म, कारण, या तीन देहांतें. ३. अवयवांसह. ४. चार मुक्तींतील एक. (सायुज्यमुक्तींत ईश्वराशीं आणि जीवाशीं अभेद होतो, दोन्हीं एकरूप होतात.) या मुक्तीचें धाम म्ह० स्थान. ५. तेजोयुक्त. ६. राम. ७. पृथ्वी. ८. पक्षी. ९. पुष्परूप बाणांच्या पलंगीं. १०. रत झाला. ११. मुक्तिरूप भाजेशीं (भार्येशीं). 'य'च्या स्थानीं वारंवार 'ज' होतो:— कार्य=काज, शय्या=शेज. १२. उत्सुकतेनें.

सकळवधुविलापें मंद मंदोदरीतें
प्रगटित करुणेचा भेद [1]खेदोदरीतें. ।
'तुजविण पतिनाथा ! सर्व झालों अनाथा,
त्यजुनि भवसमुद्रीं सेविलें दूरपंथा. ॥ ४१७
त्रिकुटखर कपाळें मुक्तकेशें गळालें,
सकळगुणधनाचें दिव्य तारूं बुडालें. ।
नि[2]गम सुगम [3]कर्ता स्वस्थ अस्तासि गेला,
निरखुनि जयलक्ष्मी राम जामात केला.' ॥ ४१८
नविन [4]पुरपती तो शांतवी [5]बंधुरामा,
जननिसम समस्तां पाठवी [6]धामधामा. ।
करुनि प्रबळ वन्ही ओपिला राजदेहो,
विधिवत [7]परकर्मा सारिलें सांग पाहो. ॥ ४१९
[8]धनपतिअनुजातें बांधलें राज्यपाटा,
[9]सुमनघन सुरांचा वोळला एकदाटा. ।
हरिहरपदपंक्ती भूप हा एकच्छत्री
करुनि अचळ ओपी वाक्यसा सानपात्रीं. ॥ ४२०
महाबंधनच्छेदनीं देवराणे सुखें नाचती गौरवानंदमानें. ।
पदें ओपिलीं सर्वही जीं जयाचीं, नव्हे राम तो [10]कामगौ या जगाची.॥४२१
दशमुखदळभारीं प्रेत होतांचि पाहीं
न दिसत कपि देवा सांडवी सिंधुडोहीं; ।
मृत कपि रणरंगें शक्रपीयूषमेघें
सकळहि जिवधारी [11]चेइले सर्व अंगें. ॥ ४२२
करी मार्जनें देवकन्याकदंबीं धरी देवदेवांगवस्त्रें नितंबीं. ।
कटीमेखळारत्नमाणिक्यमाळा कळाशीबिके शोभली भूमिबाळा. ॥ ४२३
तईं दुंदुभी वाजतां घोष गाजे, सवें मारुतीराज लंकाधिराजें ।
करें दंड ते खंडिती लोक दाटी, पुढां पातले, [12]वीतलें चोज पाठीं.॥४२४

१. दुःखयुक्त उदर जीचें अशी. (मंदोदरीचें विशेषण.) २. वेद. ३. रावणानें वेदांचीं खंडें केलीं या गोष्टीकडे येथें लक्ष्य आहे. ४. बिभीषण. ५. बंधु जो रावण त्याच्या स्त्रिया. ६. स्वगृहांस. ७. उत्तरक्रिया. ८. कुबेरबंधु बिभीषणातें. ९. पुष्पमेघ. १०. कामधेनु. ११. सचेतन झाले. १२. घडलें.

[1]मुनिहृदयमराळालागिं सीता[2]मराळी
निरखित तंव राजा दृष्टि घाली निराळीं. ।
मुरडुनि मुखचंद्रा पाठि देवोनि ठाके,
सुरवर कपि सर्वां नेणवे कोण शंके. ॥ ४२५

जनीं रावणें चोरिलें कीर्तिजाया, तये सोडवीलें सिते आनराया. ।
'वरीं जाय तूं देहनिर्वाहकाजा नको आतळूं काम निष्काम माझा. ॥४२६

अदोषा [3]सुयोषा मनें मीच्चि जाणे असे साच तें केंवि लोकांसि मानें. ।
रिघें पावकीं दाखवीं शुद्धसत्वा.' मुनी शंकले सर्व निर्वाणतत्वा. ॥ ४२७

[4]हरिपतिहनुमंतें सागराकारकुंडीं,
कृतमुख वडवाग्नी मोकळी ज्वाळ तुंडीं, ।
सुरवरकनकांगी वन्हि स्नानार्थ लाहे,
[5]हरनयनविलासी रामरूपीच पाहे. ॥ ४२८

मनवचनशरीरें स्वप्नजागर्तिकाळीं,
रघुपतिविण दूजा अन्य संकल्प जाळीं. ।
विपरित तरि, देहो [6]भिक्षु तैं नैक धामा
सकळजठरकुक्षीसाक्ष तूं मोक्षधामा !' ॥ ४२९

हरप्राणलिंगाचिया पादलिंगा नमी सागरा सत्वरा जेंवि गंगा, ।
रिघे त्यापरी पावकीं पद्मकोशी रमा शोभली कौतुकें विश्व पोसीं. ॥ ४३०

सुवर्णाचिया देउळामाजि अंबा दिसे साजिरी, त्यापरी दिव्य रंभा, ।
महाजाळ तेजाळ लंबाळ पत्रें सुरंगापरी पादपद्में पवित्रें. ॥ ४३१

निजरूप [7]महिजेचें गुप्त होतें [8]हुताशीं
दशमुखदृढ छाया सूदली दिव्यदोषीं. ।
प्रगट रुप निवाडें काढिलें स्वप्रकाशें,
अनळ पुनित झाला [9]मातसीतांगस्पर्शें. ॥ ४३२

शुभ वसन नितंबीं, कृष्णकस्तूरि भाळा,
मिरवत [10]वसुरत्नीं साजुका पुष्पमाळा. ।

---

१. रामालागिं. २. हंसी. ३. चांगली स्त्री. ४. वानरपति सुग्रीव आणि मारुती याणें. ५. 'हरनयन निवासी' असाही पाठ आहे. ६. 'भक्षिं तेजैकधामा' असाही पाठ आढळतो. ७. सीतेचें. ८. अग्नींत. ९. माता. १०. माणिकांनीं अथवा आठ रत्नांनीं.

निरखित [1]वेंधुखेवा आवडे [2]रामसोमा
जयजयजयकारीं कोंदला नाद व्योमा[3]. ॥ ४३३
मिळे चिद्रुपीं एकली वृत्ति संगें निषिद्धी परा पूरुषें प्रेमरंगें. ।
जिवीं जानकी राघवीं लीन होतां अशोकादिशोकादि निर्धूत वेथा.॥ ४३४
[4]सतीनायकासंगसंयोगवातें वियोगाभ्र[5] भंगे दिशांचेनि पंथें. ।
करीं देति रत्नांजुळी देवकन्या, स्तवी ईश ब्रह्मा ऋषी लोक धन्या.॥ ४३५
सुग्रीवलंकाधिपलोकपाळीं मेळीं हरी शंकर भूमिबाळी ।
यानीं विमानीं सकळै विनोदें जाती अयोध्ये ध्वनि दुं[6]दुभीचा. ॥ ४३६
'सेतूसुवेळातट दर्भशैनी किष्किंधशैलाश्रितराजधानी, ।
पं[7]पातटीं शंकरभाळनेत्रा पाहीं प्रिये! दाखवि लोकधात्रा. ॥ ४३७
हा शं[8]बरीआश्रम राजपुत्री! काळा कदंबायनपंथसूत्रीं, ।
येथें जटायू हत मित्र पाठीं, पाहे पुढां शोभित पं[9]चवाटी. ॥ ४३८
कुंभोद्भ[10]वाचा वसता गिरी हा, अ[11]त्र्याश्रमा राजित पुण्य पाहा. ।
त्या चि[12]त्रकूटापरती पवित्रा भासे नदी ते यमुना विचित्रा. ॥ ४३९
प्रकट उभयभागीं जा[13]न्हवी मित्र[14]कन्या
धवळ सुनिळ चित्रा चामरें विश्वमान्या, ।
सहज वट विराजे छत्र तैसा तटस्थू
जयति जय प्रयागा! तीर्थराजा! नमोऽस्तु.' ॥ ४४०
[15]भरद्वाजभेटीं न संतोष रामा, पुढां सत्वरां धाडिला रु[16]द्रनामा. ।
म्हणे, 'कै[17]कयीनंदना! सांग वेगीं, सुखी जानकीबंधुसौमित्रसंगीं.'॥ ४४१
निरोपें हनूमंत झेपीत व्योमा, पुढां पातले सर्व कै[18]वर्त सीमा. ।
गुहामानसीं गुह्य जो रामराणा तया भेटिचें नेणवे प्रेम कोणा. ॥ ४४२
नंदि[19]ग्रामीं राघवानूज राहे, चौदावर्षा आगळा दीन पाहे. ।
खेदें वाढे वाढ उद्विग्न पोटीं लोटी जैसा यां[20]म तो कल्पकोटी. ॥ ४४३

---

१. सीतेच्या आलिंगना. २. रामचंद्रा. ३. आकाशा. ४. सती (सीता) आणि नायक (राम) यांचा संग संयोग हाच वात (वायु) त्यानें. ५. विरहरूप मेघ. ६. हा चवथा चरण दुसऱ्या एकाद्या पद्याचा असावा अथवा यांत अखेरचा शब्द भिन्न असावा. ७. ऋष्यमूक पर्वताजवळचें एक प्रसिद्ध सरोवर. ८. शबरी. ९. पंचवटी. हें स्थल नाशिकाजवळ गोदावरीच्या उत्तरतीरावर आहे. १०. अगस्तिमुनीचा. ११. अत्रिमुनीचा आश्रम. १२. चित्रकूट हा पर्वत प्रयागाजवळ आहे. १३. जन्हुराजानें आणिलेली गंगा. १४. सूर्यकन्या. (यमुना.) १५. वाल्मीकिमुनिशिष्य. १६. मारुति. १७. भरत. १८. ढीवर. १९. अयोध्येजवळचा गांव. राम अरण्यांत गेला होता तेव्हां येथें भरत चौदा वर्षें राहिला होता. २०. प्रहर.

रघुटिळकवियोगें आग्रहें ह[1]व्यवाटीं
हवि तंव कपि घोषें गर्जला व्योमवाटीं. ।
'वरुनि विजयलक्ष्मी **राम** राज्यासि आला'
वचन पडत कानीं जैजयाकार झाला. ॥ ४४४

न धरत **भरतें** त्या सन्मुखें घेत धांवे,
न थरत पद पंथीं प्रेमसात्वीकभावें. ।
महिपति म[2]हिजेसीं देवयानीं विमानीं,
निरखित मर्हि मुक्ते नेत्रसिंपी सुपाणी. ॥ ४४५

तनू मेदिनी ज्यापरी हेमदंडें पडे संभ्रमा, पातला क्लेश खंडें. ।
म्हणे, 'धन्य हो ! धन्य मी आजि लोकीं, परानंद हा भेटला **राम** तो कीं.' ४४६

त्यजुनि सुरविमानें सत्वरा स्नेहभावें,
सदय **भरत**वत्सा सत्वरा धेनु धांवे. ।
उचलुनि हृदयेसीं क्षे[3]में देतां जिवेसीं,
परम शिव शिवेसीं लीन त्या **राघवेसीं**. ॥ ४४७

हरिहर सुखसंगीं आवडी येत बोधा
भरतरघुपतीचें प्रेम दुर्बोध वेदा. ।
विफळवचनजाळीं वर्णिजे तेंचि थोडें.
अनुभवसुख ज्याचें तोचि जाणे निर्वा[4]डें. ॥ ४४८

रघुपति**भरता**चें स्नेह देखोनि दृष्टी,
दशमुखअनुजासी **सुग्रिवा** लाज सृष्टी. ।
म्हणति नवल कैसें चौघ बंधू जिवाचे ?
स[5]दयपण जयांचें वर्णितां, मौन वाचे. ॥ ४४९

वसिष्ठासि वंदूनि **शत्रुघ्न**बंधू सुखें भेटला, मातला जेंवि सिंधू. ।
न[6]मीं मस्तकें पूजिल्या सर्व माता, तया वर्णनीं घेत ने[7]णीव **धा**[8]ता. ॥ ४५०

मनकमळनिवासी लोचना गोड झाला.
कवळित हृदयाचा ताप संताप गेला. ।

---

१. अर्पीत. २. पृथ्वीची कन्या जी सीता तिजसीं. ३. आलिंगन. ४. निश्चयें. ५. 'सुहृद वधुनि लागी भाग्य भोगी शवाचें' असाही पाठ आहे. ६. 'मनो मस्तकीं' असाही पाठ आहे. ७. अज्ञान. ८. ब्रह्मदेव.

अभिनव सुरधेनू[1] राम तो वत्स तान्हा,
झगटत जननीतें लोटला प्रेमपान्हा. ॥ ४९१
नमस्कारिला रामराजा सुमंतें[3] जना सज्जना लोचनाचेनि पंथें. ।
मैंनीं[4] थांवला[5] राम विश्रामकारी सुखानंद संदेहसंतापहारी. ॥ ४९२
सुरमुनिगण राजे सर्वगंधर्वमेळे,
हर विधि रवि शक्रः शौनकादीक आले. ।
निगमविधिं वसिष्ठें ओपिलें राज्य रामा.
विनित सकळ सिद्धी पातल्या देवधामा. ॥ ४९३
स्वयें चालवी नीतितें राज्यभारा, जयो आणवी भूधरां हस्तभारा. ।
स्त्रिया लोटिती शिंपिती आंगणातें, महाद्वार तें राखणें पंङ्गुणातें. ॥ ४९४
महाराज सिंहासनीं मेघनीळा कटीं मेखळा कुंडलीं रत्नकीळा, ।
रवीकोटि कोटीर[10] लोपीत लाहे म्हणे, साजिरें छत्र चंद्रासि राहे. ॥ ४९५
वसे दंड छत्रीं[11], दिसे छेद पत्रीं, फुलीबंध हो मारणे सौरियंत्रीं[12], ।
वधू सूरतीं येति संग्रामकाजीं, पिडा एकि ते कामिनीचे[13] कुचाब्जीं[14]. ॥ ४९६
असे वत्सरीं दुर्मुखी[15] क्रोधि जाणा, वसे एक वृश्चीक[16] राशींत सांना[17] ।
नवावें चि नक्षत्र[18] तो सर्प भोगी[19] नसे घात ना पात तो एक योगी. ॥ ४९७
विचारीं वसे सारनिःसारभेदू, वदे तर्क तो एकशास्त्रीं विवादू, ।
ग्रहामाजि नासाथिला एकमंदू, निशे लागला एक दोषानुवादू. ॥ ४९८
अहो नाश तो एक पापासि येथें, महात्रास ते पावलीं यामदूतें, ।
अधःपातवृक्षू निपक्वाफळातें मनीं ताप तो एक दुष्टा खळातें. ॥ ४९९

---

१. कामधेनु. २. तान्हा. ३. दशरथाचा प्रधान मंत्री. ४. 'सुमंतें मही धांवला' असाही पाठ आहे. ५. स्थिरावला. ६. वेदोक्त विधिप्रमाणें. ७. राजाचे सहा गुणः—संधि, विग्रह, यान, आसन द्वैध आणि आश्रय. ८. रत्नजडित सिंहाकृति आसन. ९. रत्नाचा खिळा. १०. मुगुट. ११. 'दंड' (काठी) छत्रांत असावयाचा, अन्यत्र दंड (राजदंड) कोठेंही नाहीं. १२. सोंकऱ्यांच्या पटांत मात्र फुलीबंध (फुल्यांची शिवण) असावयाचा, अन्यत्र बंध (कैद) नाहीं. १३. स्त्री. १४. स्तनकमळीं. स्त्रियांच्या स्तनकमळीं पीडा, अन्यत्र पीडा म्हणून नाहीं. १५. हीं संवत्सरांचीं नांवें. दुर्मुखी आणि क्रोधी संवत्सरांत मात्र आढळावयाचे, अन्यत्र रामाच्या राज्यांत नाहींत. १६. विंचू. वृश्चिक राशिगणांत मात्र दिसावयाचा, अन्यत्र रामराज्यांत नाहीं. १७. लहान. १८. नववें नक्षत्र=आश्लेषा=आलिंगन. 'माना' असाही पाठ आहे. १९. नवरा—भोगणारा; ज्याला भोग म्हणजे फणा आहे तो.

असे एक नेणीव अज्ञान दृष्टी दिसे नेदेंणें[1] शत्रु दीनासि पृष्टीं, ।
जनीं हाणि ते एक दारिद्र्यसंगा अनाचार तो पावला एक भंगा. ॥ ४६०
तरू सर्वही देवँ[2]मंदार झाले, नदीवाटिकीं पूर्ण पीयूष[3] आलें, ।
दिसे रंगली पद्मरागीं[4] धरित्री, जगीं निंद्य न्या, वंद्य वंद्या सुपुत्रीं. ॥ ४६१
पयें वोळल्या[5] कामधेनू जनातें, हरीचिंतनें एकनिष्ठा मनातें, ।
धराधीश होतां परानंदसिंधू जगीं जीव झाले गुणीं संत साधू. ॥ ४६२

कनकरस पियूषें मेघधारा न खंडी,
सुमन[6]घनसुगंधीं विश्व झालें करंडी. ।
अगणित गुण ज्याचे अक्षयी रामराजा
उभित गुढि सुखाची शक्र संतुष्टकाजा. ॥ ४६३
कपिपति कपि लंकाधीश सांक्षेप[7] यत्नीं
असनवसनगंधें पूजिले दिव्यरत्नीं, ।
हयरथनरयानीं कुंजरारूढ[8] केले,
मिरवत पुरवासी झाडिती पुष्पझेले. ॥ ४६४
सकळ सुख सुखाचें राम हें नाम ऐसें,
सुख भरथवसिष्ठा पौरजांलागिं जैसें, ।
अगणित सुख तैसें नित्य हो श्रोतयांतें
विनउनि कवि मागे दान त्या सावचित्तें[9] ॥ ४६५

'संक्षेपरामायण'[10] नाम यातें, संक्षेपता[11] ये श्रवणीं भवातें[12]. ।
काशी निवासीजनताप हारी, तारी जगा केवळ नामधारी. ॥ ४६६
कल्पतरू राघवराज दीना सीतालतालिंगित भावलीना, ।
घोंसाळली निर्भय बाहुटाळें सौख्यावलीं प्रेमळ हंसपाळें. ॥ ४६७
जिहीं सादरें शेवटा ग्रंथ नेला, मतीहीन तो आदरें थोर केला. ।
गुणीं तोषले सारपीयूष पानीं तिहीं गाळिलें दोष निःसार पाणी. ॥ ४६८
महाराष्ट्र जे सर्वराष्ट्रासि राजे, जयाच्या भयें व्यापिले देव लाजे, ।
सदाचारभंगें पळाली प्रतिष्ठा, प्रतिष्ठान त्या ना भिकारींत निष्ठा. ॥ ४६९

---

१. न देणें. २. कल्पतरु. ३. अमृत. ४. रत्नविशेष. ५. वळल्या. ६. पुष्प. ७. अगत्यपूर्वक ८. गजारूढ. ९. सावधान मनानें. १०. या काव्यास कवीनें 'संक्षेपरामायण' असें नांव दिलें असावें असें दिसतें. ११. अल्पता. १२. संसारातें.

सुचिरसहजवासें गौतमी[1]च्या तटाकीं,
    अतुट[2] भजनपंथें पंथ टाकीत टांकी ।
द्विजवर कविनामा मुद्गल अत्रि[3]गोत्रीं,
    विमळ वचनमुक्तें लेववी संतश्रोत्रीं. ॥ ४७०
हरिहरपदपद्मीं भृंगभृंगी विनोदें
    प्रगटित सुखवाणीं जागवी जीव बोधें. ।
भवनिधिजळपारा पाविजे एकनामें
    नकळत बहु पंथें श्रांतले भ्रांत कामें. ॥ ४७१
विरस विषय पाहें रोहिणीतोय जैसें,
    निरस धन दुराशा दर्पणीं बिंब जैसें, ।
सुरस रघुपतीचें नामपीयूष वाचे
    परिसपदसरोजें लोह लागे मनाचे. ॥ ४७२
धनुष पुरहरा[4]चें भंगिलें विश्वमान्या
    अवनिभुज[5]सिंहाची लाधली दिव्य कन्या ।
मिथुन[6] वधुवरांचें शोभलें हेमधामी[7]
    हवनपुजनतोषें तोषला मेषगामी[8]. ॥ ४७३
प्रबळमकरमीनीं माजले कर्क[9] मोटे,
    भरुनि दगड सिंधू लंघिला पायवाटे ।
निवटुनि दश मुंडें कुंभकर्णादि संगीं
    अतुळ बळ तुळाव्या नाठवे अन[10] वेगीं. ॥ ४७४
तनू चिंतितां त्या रघूराजयाची हरे वेधना[11] या भवावृश्चिका[12]ची. ।
स्मरा सादरें सर्वदा राम वाचे, रुळे[13] अंकणा क्रूर तो काळ साचें. ॥ ४७५

उत्तरकांड.

करुनि अरिकुळाचा नाश निःशेष रामें,
    त्रिभुवनविजयाच्या तोषला घोषकामें ।

---

१. गोदावरीच्या. २. सतत. ३. मुक्तेश्वराचें जन्म अत्रिगोत्रांत झालें असून त्याचेंच नांव कदाचित मुद्गल असावें. ४. महादेवाचें. ५. पृथ्वी भोगणारे जे राजे त्यांमध्यें श्रेष्ठ जो जनक त्याची कन्या. ६. जोडपें. ७. सुवर्णकांति. ८. मेंढ्यावर बसून जाणारा, (अग्नि). ९. शेंकडा. १०. अन्य. ११. व्यथा. १२. संसाररूप विंचवाची. १३. लोंबे.

धरणिरमण राजा राम झाला प्रतापी,
म्हणउनि मुनिराणे[1] पातले तेजरूपी. ॥ १
उदीची[2] प्रतीची[3] तथा मुख्य प्राची[4] दिशे दक्षिणेमाजि विश्रांति ज्यांची, ।
बहूस्यानिंचे पातले सिद्ध[5] योगी[6] तपी संयमी[7] चित्सुखानंदभोगी ॥ २
नमस्कारिले निर्मळाचार शिष्टें, सभे पूजिले, ओपिलीं रत्नपीठें[8], ।
ऋषी बोलती, 'जोडली कीर्ति रामा ! तुवां काढिलें संकटातूनि आम्हां. ॥ ३
वरें ब्रह्मयाच्या जगीं प्रौढि गाढी नसे मृत्यु, ज्या काळही हात जोडी, ।
तया शत्रुव्याघ्रासि दंडोनि कोपें धराधेनुतें सोडवीलें प्रतापें.' ॥ ४
सकळहि मुनि ऐसें बोलतां राघवेशें
करपुटविनयेसीं बोलिजे वाक्य तोषें. ।
'अरिअमरवरातें प्राप्तजन्मांतरातें,
सकळ कथन त्याचें सांगिजे, वांछि, तातें'. ॥ ५
मुनीमंडळीमाजि सांगे अगस्ती, 'जगीं जाणता ब्रह्मयाचा पुलस्ती[9] ।
महामेरुमाथां निरालंबकामें तपा आचरे घोरनिर्वाणनेमें ॥ ६
ऋषीबाळका देवकन्या कुमारी पुढां क्रीडती सर्वदा विघ्नकारी[10] ।
मुनी क्षोभला बोलिला शापगोष्टी, 'पडे जे दिठी[11] ते धरी गर्भ पोटीं.' ॥ ७
पळाल्या त्वरें निर्जरी[12] नागकन्या ऋषी निर्जनीं कामनाकामशून्या, ।
तपोतेज विस्तारलें स्वप्रकाशें, दिसे व्योम नादावलें वेदघोषें. ॥ ८
मुनिवर तृणबिंदू काननीं तेचि राहे,
सगुण कुमरि[13] त्याची नेणतां तेथ पाहे. ।
श्रवण करित घोषा बाणली गर्भपुष्टी
प्रगट जनक जाणे चोजवी ज्ञानदृष्टीं ॥ ९
वना पातला वंदिलें ब्रह्मपुत्रा, 'सुता सुंदरा आमुची हे पवित्रा, ।
तुतें ओपिली, अंगना हे करावी, गुणाची बहू, भोगकामें वरावी.' ॥ १०
तयानंतरें ते सती अंगसेवा वरा तोषवी, पावली पुत्रठेवा. ।

---

१. मुनिराज. २. उत्तरदिशा. ३. पश्चिमदिशा. ४. पूर्वदिशा. ५. अणिमादि सिद्धि ज्यांस प्राप्त झाल्या ते. ६. योगसाधन करणारे. ७. इंद्रियजय करणारे. ८. आसनें. ९. ब्रह्मदेवाचा पुत्र. १०. गायनादिक्रीडांनीं विघ्न करणाऱ्या. ११. दृष्टीस. १२. देवकन्या. १३. हिचें नांव गौ.

शुभें थांबला[1] अंतरीं वेदघोषें तयालागिं हो विश्रवा नाम ऐसें. ॥ ११
विश्रव्यालागिं पैं भाज[2] भारद्वाजसुता गुणी, ।
देववर्णिनी[3] हें नाम सर्वकामफलप्रदा. ॥ १२
कुबेर[4] पुत्र पैं तीचा दिक्पतींचा[5] शिरोमणी ।
सहा संवत्सरें वर्या तपश्चर्या चरे वनीं ॥ १३
विरंचि[6]विष्णुशक्रेसीं[7] व्योमकेशी[8]गुणान्वितू ।
पातले वरदानार्थी बोधनार्थी द्विजात्मजा. ॥ १४
चतुर्थलोकपाळी हा नाथ रक्षोगणागुणी, ।
घेई धनाढ्याख्यतेतें पुंष्पकातें[9] निवेदिलें[10]. ॥ १५
हेमरत्नमयी लंका शत्रुशंकाविनाशनीं, ।
वस्तीस ओपिला गांवो रम्य ठावो जगत्रयीं. ॥ १६
सर्वराक्षससेनेसीं सिंधुवासी यथासुखें ।
तो वैश्रवण वित्तेश व्योमकेश[11]महत्सखा. ॥ १७
कुबेर जन्मला ऐसा राघवेशा! निरोपिलें. ।
रावणादिमहोत्पत्ती तव प्रीती निवेदणें. ॥ १८
ब्रह्मयानें निर्मिले जीव दुःख सर्व निवेदिती, ।
'क्षुधेपासाव रक्षावें, भक्ष द्यावें जगत्पती! ॥ १९
रक्ष रक्ष' इया वाणी पद्मयोनीमनेच्छया, ।
यक्ष राक्षस ते झाले वाक्य बोले तयांप्रती. ॥ २०
'यत्नें संरक्षिजे सर्व जळें जीवविती जिवां, ।
लोक संरक्षिते झाले जळें सर्वफळप्रदें. ॥ २१
[12]हेती प्रहेति हे मुख्य आदिराक्षस जन्मले. ।
[13]प्रहेति त्यांत निःसंगें, दारसंगें द्वितीयेंका. ॥ २२

१. स्थिरावला. २. भार्या. ३. ही विश्रव्याची प्रथम स्त्री. ४. यास बापावरुन वैश्रवण असेंही नांव आहे. हा संपूर्ण यक्षांचा अधिपति आणि देवांचा धनाध्यक्ष होय. याला तीन पाय आणि आठ दांत होते असें वर्णन आहे. कुबेर म्हणजे कुत्सित आहे बेर (शरीर) ज्याचें तो. ५. आठ दिक्पालांत श्रेष्ठ. कुबेर हा उत्तरदिक्पाल होय. ६. ब्रह्मदेव ७. इंद्र. ८. महादेव. ९. इष्ट प्रदेशीं जाणारें विमान. १०. दिलें. ११. महादेवाचा मोठा मित्र. १२. हा राक्षसांचा मूळपुरुष. याचा कनिष्ठ भ्राता प्रहेति. १३. हा धार्मिक असून तपश्चर्या करी. १४. हेति यानें काल-भगिनी भया हिच्याशीं लग्न लावलें.

विद्युत्केशि तया पुत्र देवशत्रू महाबळी, ।
सुकेत जन्मला त्यातें जो सुरांतें कुळांतक. ॥ २३
माल्यवंत सुमाळी हो अतिमाळी बळाधिला. ।
सुकेशपुत्र हे जाणा बळें आना न लेखिती. ॥ २४
तपें तोषविला शंभू देत क्षोभू जगत्रया. ।
देखोनि लोकआकांता रमाकांता न साहवे, ॥ २५
गरुडारूढ तो विष्णु लोकजिष्णू जगत्पती, ।
धांवला त्रिश्वकैवारा दुष्टभारा निवर्तक. ॥ २६
सुदर्शनमहाचक्रें दैत्यवक्रें द्विधा करी, ।
शत्रू पावविले भंगा रक्तगंगा प्रवाहती. ॥ २७
झूजा प्रवर्तला माळी कंठनाळीं सुलक्षिला. ।
शिर च्छेदियलें चक्रें जेवि शक्रें महागिरी. ॥ २८
पाठी देवोनियां सर्वी जात उर्वी त्यजोनियां ।
पाताळभुवना गेले गुप्त ठेले रसातळा. ॥ २९
लंका लोकविना झाली माळ घाली धनाधिपा. ।
भोगितां भाग्यभोगातें काळ त्यातें अतिक्रमे. ॥ ३०
पुढां सुमाळिची पुत्री पद्मनेत्री सुमध्यमा ।
पवित्रा कैकसीनाम्नी रूपधाम्नी वरेच्छया. ॥ ३१
पिता घेऊनियां खांदीं कांत शोधी निजात्मजे. ।
तदर्थ भूतळा आला दृश्य झाला धनाधिपा. ॥ ३२
विश्रव्यालागिं हे देईं शीघ्र न्हेईं द्विजाश्रमा, ।
कुबेरवचनें कन्या लोकधन्या समर्पिली. ॥ ३३
अग्निहोत्राचिये काळीं शाम्रबाळीविलोकनें, ।
म्हणे, 'प्राणप्रिये! कांते! भविष्यार्थें विलोकितां. ॥ ३४
पुत्र होती दुराचारी क्लेशकारी जगत्रया ।
शिक्षा पावति त्या कर्में सत्यधर्में दुरावल्या.' ॥ ३५

---

१. त्याचा (हेतीचा) पुत्र. २. विद्युत्केशातें. याचा विवाह सालकटकंटा नामक संध्यातनयेशीं झाला. हिचा पुत्र सुकेश. ३. सुकेशाचा विवाह ग्रामणी नामक गंधर्वाच्या देववती नामक कन्येशीं झाला. हिचे पुत्र माल्यवान्, सुमालि आणि मालि. ४. इतरांला. ५. मोजिती. ६. नद्या. ७. कुबेरा. ८. कमलनयना. ९. वर मिळविण्याच्या इच्छेनें. १०. दूर झाल्यास.

[1]येरी बोले, 'तपोरासी! कैंवी ऐसी तव प्रजा? ।
महालांछन हें वंशा.' विप्र हर्षावला वदे. ॥ ३६
'[2]तीजा होइल धर्मात्मा पुण्यकर्मा प्रवर्तिता ।
सर्ल्यें तुष्टेल श्रीविष्णू काळजिष्णू चिरंजिवी.' ॥ ३७
असो गर्भिणि तेकाळीं कांतमेळीं निजाश्रमीं ।
प्रसूती पावतेकाळीं जन्ममूळीं कुळाच्चिये. ॥ ३८
काळदंष्ट्रा घोरवक्त्री [3]अंजनाद्रिनिभा [4]तनू ।
आरक्तनेत्रभ्रूकुटी लंबवोष्ठी भयानकू. ॥ ३९
वीस हस्त दहा शीर्षें नखें घर्षे [5]नगोदरा ।
[6]अट्टहास्यें करी टाहो चळों पाहे महीतळीं. ॥ ४०
कुंभकर्ण दुजा झाला, पदें हाले महागिरी. ।
[7]धरा [8]खालावली वेगीं स्थूळलिंगी कुलक्षणू. ॥ ४१
रोदनाचे महाहाके कंप धाके सुरासुरां. ।
पुढें शूर्पनखा गाढी काळधाडी जगत्रया. ॥ ४२
[9]विद्युज्जिव्हासती जाया मूतराया रघूद्वहा ।
[10]तुर्यभावा[11]थिलों जाण बिभीषण [12]गुणाथिला. ॥ ४३
होतां आनंदली सृष्टी पुष्पवृष्टी महीतळीं. ।
वयें संपन्न ते झाले, माता बोले सुतत्रया. ॥ ४४
'दारिद्य तुमचा वांटा, दैव ज्येष्ठा धनाधिपा.' ।
बोला आइकतां द्वेषें जातरोषें महातपा. ॥ ४५
[13]गोकर्णतीर्थ [14]निर्धारीं सिंधुपारीं [15]शिवालयीं. ।
तपा आचरते झाले, भयें भ्याले सुरालयीं. ॥ ४६
संख्या दशसहस्त्रांची निर्जरांची रघूद्वहा! ।
रावणाची तपश्चर्या तीव्रसूर्या न लक्षवे. ॥ ४७

---

१. कैकसी. २. तिसरा पुत्र (बिभीषण). ३. काजळाच्या पर्वतासारखी. ४. शरीर. ५. पर्वताच्या मध्यभागाला. ६. मोठ्यानें. (क्रोधादिक वृत्तींच्या अंमलांत मोठ्यानें हंसणें—हा शब्दार्थ). ७. पृथ्वी. ८. नम्र झाली, खालीं गेली. ९. शूर्पनखा ही विद्युज्जिव्हाची स्त्री. १०. जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या अवस्थात्रयाव्यतिरिक्त जी चवथी अवस्था ती. ११. संपन्न, युक्त. १२. गुणान्वित. १३. हें तीर्थ दक्षिण हिंदुस्थानांत महाप्रसिद्ध शिवस्थान आहे. येथें माघमासीं महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरते. १४. निश्चयें. १५. येथें शिवाचें आत्मलिंगमंदिर आहे.

सहस्रवत्सरा कोपी शिरें ओपी हुताशना[1] ।
दहा दहा सहस्रांत शिरें देत महातपी. ॥ ४८
वर्षा दशसहस्रांतें कुंभकर्णें महातपा, ।
ग्रीष्मीं सेवीत पंचाग्नी[2] मोघ[3] मानी घनोदका. ॥ ४९
सीतकाळीं[4] जळीं राहे सर्व साहे समाधिला, ।
विभीषणू सत्यासधू एकपादूतळीं उभा. ॥ ५०
पंचसहस्रवर्षें हो करी पाही महातपा ।
तितुकींच भूपशाका ! भानुचक्रा विलोकितां. ॥ ५१
ब्रह्मा संतोषला तेणें, सौख्य मानें पुढां उभा. ।
म्हणे, 'वांच्छित तें याचा[5] गाढवाचा[6]' प्रजापती[7]. ॥ ५२
'अमृतत्वा निर्भयत्वा आधिपत्वा जगत्रयीं ।
सर्वत्र विजयो दे' कां म्हणे 'घे कां दशग्रिवा ! ॥ ५३
तपा आचरला चीर्णा कुंभकर्णाननीं त्वरें ।
उभी सरस्वती[8] माता, म्हणे दाता दयाळुवा. ॥ ५४
'संख्या वर्षें सहस्रैक निद्रासूख निरूपमा, ।
भक्षा यथेष्ट गा ! देईं' म्हणे 'घेईं' जगत्पती. ॥ ५५
बिभीषण म्हणे,' 'देवा ! विष्णुसेवा निरंतरा ।
धर्मीं सदा वसो बुद्धी' तोषें विधि म्हणे 'दिलें.' ॥ ५६
श्लेष्मातक[9]महारण्य रम्य स्थान निवेदिलें[10] ।
पावले वरदानातें ऐश्वर्यातें महाबळी. ॥ ५७
त्रैलोक्य मानिती कीट नीळकंठ[11]कृपाबळें ।
कुंभकर्ण दशग्रीवी कोणासहिं न लेखिती[12]. ॥ ५८
विश्व पीडियलें पापें भेकें[13] सर्पें जयापरी. ।
नाहीं संरक्षिता त्राता विश्वघाता प्रवर्तले. ॥ ५९

१.अग्नीला. २. चार दिशांस चार अग्नि व एक मस्तकावर सूर्य असे पांच अग्नि. ३. व्यर्थ. ४. थंडीच्या दिवसीं. ५. मागा. ६. दृढवाचेनें. ७. ब्रह्मदेव. ८. कुंभकर्णानें देवांस फार त्रास दिला म्हणून ब्रह्मदेवानें याच्या जिव्हाग्रीं सरस्वतीस अधिष्ठित करून यास वर मागण्याची आज्ञा केली. ९. बदरीवन. १०. समर्पिलें. ११. महादेव. क्षीरसमुद्रमंथनकाळीं हालाहल विष निघालें, तें जगास जाळूं लागलें. तेव्हां देवांच्या प्रार्थनेवरून शंकरानें त्याचा स्वीकार केला, म्हणून त्याचा कंठ नीलवर्ण झाला। त्यायोगें त्यास 'नीलकंठ' असें नांव पडलें. १२. मानिती. १३. बेडुक.

कोणा देतील गाराणें[1] देव दीनें प्रलापती[2]. ।
देव गंधर्व पश्वादी मनुष्यादि ऋषेश्वरां, ॥ ६०
मारुनी भक्षिते झाले, भयें म्यालें जगत्रय. ।
रावणादि दशे आले, वैर झालें जगत्पती. ॥ ६१
आयकोनि सुसौख्यासी येती पाशीं निशाचर. ।
पाताळवासिये क्रोधी प्रहस्तादि[3] पलाशिये[4]. ॥ ६२
सुमाळी पातला वेगीं साह्यालागीं दशानना. ।
मयें[5] मंदोदरी बाळी भाज केली दशानना. ॥ ६३
सौमित्रघातिनी शक्ती आंदणार्थी निरूपिली. ।
मेघनाद तिये झाला, आट आला जगत्रया. ॥ ६४
पुढें शक्राजीतनामा कीर्तिसीमा निरूपमा, ।
दैत्यवैरोचनीबाळा[6] केली ज्वाळा[7] स्थुळोदरा. ॥ ६५
कुंभकर्णांगना झाली, पुत्र व्याली बळेश्वरा[8]. ।
गंधर्वराजकन्येतें[9] सिळीशेतें बिभीषणें ॥ ६६
पाणिग्रहण विध्युक्त सुप्रजार्थ कुलांगना. ।
शयनार्थ कुंभकर्णा सुविस्तीर्णा महालया[10] ॥ ६७
रावणें निर्मिलें यत्नीं हेमरत्नीं सुशोभितें. ।
षट्शतें दंड ते हेमी रुद्रभूमीगृहोदरीं ॥ ६८
तया षड्गुणितें लांब रत्नखांब सुशोभितें. ।
मातले मत्त मातंग[11] तेंवि दोघ दुराग्रही. ॥ ६९
भंगिती वन उद्यानें देवस्थानें सहस्रधा. ।
अपूर्व तितुकें न्हेती, बळें घेती हिरोनियां. ॥ ७०
कुबेर दंडिला क्रोधी प्रतिस्पर्धी विभागिया ।
लंका हिरतलें स्थान देवयान[12] सुपुष्पका[13]. ॥ ७१

---

१. फिर्याद. २. बडबड करूं लागले. ३. सुमालीचा ज्येष्ठ पुत्र आणि रावणाचा मामा. ४. मांसभक्षक. ५. मय हा असुरांचा शिल्पी. यानें हेमा नामक अप्सरेपासून झालेली आपली कन्या मंदोदरी रावणाला दिली व एक अमोघ शक्तिही दिली. (उत्तरकांड, सर्ग १२.) ६. विरोचनपुत्र वैरोचनी (बलि) याच्या कन्येची कन्या (दौहित्री). ७. 'वज्रज्वाला' असें हिचें नांव होतें. ८. बलवान्. कुंभ आणि निकुंभ हीं त्यांचीं नांवें. ९. शैलूष नामक गंधर्वराजाची कन्या सरमा हिचें पाणिग्रहण बिभीषणानें केलें. १०. मोठें गृह. ११. गज. १२. विमान. १३. पुष्पक नामक कुबेराचें विमान.

कैलासकाननीं नंदी[1] हीनशब्दीं निखुंदला[2], ।
कोपोनि शापिला तेणें, 'मर्दे येणें विनाशसी.' ॥ ७२
मर्कटांचेनि निर्वाणीं घडो हाणी कुळक्षया !' ।
वीसहस्तीं महादंत विश्वनाथगणान्विता ॥ ७३
रजताचळ[3] आंदोळी रुंडमाळी[4] पदांबुजें ।
गिरी आवरिला नेटें बळा तुष्टे त्रिलोचन. ॥ ७४

पापभक्षेश्वरें तेणें वरा[5] देणें सदोषिया. ।
कुशध्वजसुता[6] पंथीं वेदवंती तपस्विनी ॥ ७५
देखतां काननीं तेणें पंचबाणें[7] विमोहितु. ।
कुशध्वजनृपा प्रेमा विष्णु जामात मानसीं ॥ ७६

करूं भावी[8], तया दैत्यीं[9] शस्त्रघातीं निपातिलें. ।
तातसंकल्पसिद्ध्यर्थी सत्यवंती निरंजनी ॥ ७७
तपा आचरतां भावें दशग्रीवें निरीक्षिली. ।
धरी कामाथिला[10] वेगीं देह त्यागी हुताशनीं[11]. ॥ ७८
तेंचि हे जनका झाली सीता बाळी रघूद्वहा ! ।
निमित्तालागिं ते जाण रक्षोगणविपातिनी. ॥ ७९

पुढां रावण राजेंद्र दिग्नृपेंद्रजया निघे. ।
मारुती[12] जिंकिला यत्नीं सप्रधानीं सुविक्रमें. ॥ ८०
दुष्कंत जिंकिला युद्धीं पुरु गाधी पुरूरवा ।
शंतनूही[13] भग्न युद्धीं अयोध्याधिपती, नृपा ! ॥ ८१

---

१. नंदी हा शिवाचा द्वारपाळ. हा शिवांश असून शालंकायन मुनीचा पुत्र. याचें वानरासारखें मुख पाहून रावण हंसला तेव्हां 'वानरच तुझा नाश करतील' असा त्याला नंदीनें शाप दिला. (उत्तरकांड, सर्ग १६, श्लो० १७–१९.) २. दमविला. ३. कैलासपर्वत. ४. महादेव. ५. महादेवानें संतुष्ट होऊन 'रावण' असें नांव दशाननास ठेवून चंद्रहासनामक खड्ग दिला. ६. कुशध्वज हा रथध्वजनामक राजाचा पुत्र. याची मुलगी वेदवती. हिनें जन्मतांच वेदध्वनि केला म्हणून तिला हें नांव पडलें. हिनें पिता आणि माता मरण पावल्यावर पुष्करतीर्थीं तप करण्यास आरंभ केला. तेथें रावणाची भेट झाली. ७. कामानें. ८. इच्छी. ९. शंभुनामक दैत्यानें वेदवतीला मागितलें, पण बापानें दिलें नाहीं म्हणून त्याचा घात करून शंभु पळाला. १०. कामपीडित. ११. वेदवतीनें 'माझ्याच योगें तुझा नाश होईल' असा शाप देऊन आपला देह योगाग्नीनें दग्ध केला. १२. मरुत्तराजा. १३. 'अनरण्य' असें पाहिजे.

तो म्हणे, 'माझिये वंशीं कीर्तिराशी रघूत्तम ।
जन्मला राक्षसां अंतु काळ मृत्यू दशानना !' ॥ ८२
पुरी माहिष्मती[1] रम्या सुरागम्या धरातळीं ।
प्रवाहें नर्मदा गंगा बाणलिंगांकिता जळीं ॥ ८३
रावणें सारिलें[2] नेमा जपहोमादिकीं विधी ।
निर्कूरणा[3] शुद्धि बोजा लिंगपूजा निजासनीं ॥ ८४
जांबूनदमया[4] लिंगा उमासंगा[5] सुपूजिते ।
रत्नपीठतळीं शोभा दिव्य आभा सुमंडपीं. ॥ ८५
नाना पुष्पीं फळीं पत्रीं वाद्यस्तोत्रीं सुमंत्रकीं, ।
कुंकुमागरु कस्तूरी सुकर्पूरीं सुचंदनें ॥ ८६
त्रिपुरांतकरा[6] लेपी रत्नदीपीं सुशोभितें ।
वीसहस्तांजुळीं मापीं हेमपुष्पीं निवेदितु. ॥ ८७
साष्टांगनमनें काया देवराया प्रणामकें ।
सहस्रार्जुन[7] भूसूर्य कार्तवीर्य[8] पराक्रमी ॥ ८८
सहिता कामिनी कोडें जळक्रीडे मनेच्छया ।
सहस्रहस्तकीं बुद्धी[9] जळ रोधी[10] प्रवाहतां ॥ ८९
तुंबळे तोय संत्राणें लिंगें[11] तेणें निमज्जतां ।
पुढतीं सोडितां हात तोय जात सवेगता ॥ ९०
पूजा वाहोनियां जातां लंकानाथा न साहवे. ।
प्रधाना जाणवी बोटें 'चढे लोटें सरिद्वरा ॥ ९१
चेष्टा कोण करी येथें शीघ्र त्यातें विलोकणें.' ।
धांवतांचि असंख्यातीं राजदूतीं निषेधितां, ॥ ९२
प्रवर्तले महामारीं शस्त्रधारीं परस्परें, ।
तें देखोनि दशग्रीवें त्वरें धांवे निघातिया, ॥ ९३

---

१. माहिष्मती नगरी हें माळव्यांतील विद्यमान महेश्वर नगर होय, हें नर्मदेच्या तीरीं आहे. हिचा राजा कार्तवीर्य नामक श्रीदत्तात्रेयोपासक शूर होता. २. केलें, आटपलें, उरकलें. ३. मल जाण्याकरितां. ४. सुवर्णमय. (जंबूनदींत उत्पन्न झालेलें=सुवर्ण. जंबूनदी ही मेरुपर्वतापासून निघते आणि उत्तरकुरु देशाकडे वाहत जाते व तींत सोनें होतें असें वर्णन पुराणांत आहे.) ५. भवानी. ६. त्रिपुरासुराचा अंत करणारा शिव. ७. याला सहस्र भुज होते म्हणून 'सहस्रार्जुन' म्हणत. ८. कृतवीर्यराजाचा पुत्र. ९. जाणून बुजून. १०. अडवी. ११. बाणलिंग.

दूतास त्रासितां कोपें नराधीपें विलोकिलें, ।
धांवला सत्वरा रागें हस्तखड्गें सुमंडितें. ॥ ९४
सहस्रसूर्यतेजाळा रत्नमाळाविभूषितु. ।
शस्त्रें पांचशतें हस्तीं जेथें वस्ती [1]हुताशना. ॥ ९५
रावणा ताडितांमात्या जाती मृत्याविलोकना. ।
वांचले पळती [2]लाहीं दिशा दाही [3]भयाथिले. ॥ ९६
रावणा हृदयीं लात देतां येत विमूर्छना. ।
[4]शोणितें नासिकीं तोंडीं जात [5]लोंडीं धरातळीं. ॥ ९७
[6]बळीबंधन गोविंदें सिंह व्याधें जयापरी, ।
तेंवि बांधोनि तो मत्तु पूरा नेतु नराग्रणी ॥ ९८
घालूनि शृंखळामाळे अश्वशाळे सुरक्षिला. ।
विनोद वाटला देवां हर्ष सर्वां ऋषेश्वरां ॥ ९९
[7]नारदें सांगतां मातु सभेआंतु सुरांचिये. ।
पौलस्ती श्रवणें मोहें येत [8]लाहें महीतला. ॥ १००
माहिष्मतीपती शब्दें आशीर्वादें प्रतोषिला. ।
मागोनि घेतला नातू लंकानाथू इयापरी. ॥ १०१
ऐसे एकाहुनी एक वीर देख धरातळीं. ।
विस्मयासि नसे स्थाना, बहुरत्ना वसुंधरा. ॥ १०२
ब्रह्मांडभांडमध्यस्ता नाना वस्ता अमोलिका, ।
निधानें जोडती कैसीं तुम्हां ऐसीं रघूत्तमा ! ॥ १०३
पुढती जिंकितां राजे युद्धकाजें निशाचरें. ।
[9]किष्किंधानगरा पाळीं येत वाळी[10]प्रधर्षणा. ॥ १०४
[11]तार वानर वाळीचा [12]मंत्री साचा विवेकिया ।
म्हणे, 'वाळी बळी गाढा व्यर्थ भेडा निवर्तसी. ॥ १०५

---

१. अग्नि. २. लवलाहीं, सत्वर. ३. भयव्याप्त. ४. रक्त. ५. पूर. ६. बलि नामक एक मोठा बलाढ्य दैत्य होता, त्यानें नर्मदातीरीं इंद्रपदप्राप्त्यर्थ नव्याण्णव यज्ञ करून शंभरावा यज्ञ आरंभिला. तेव्हां विष्णूनें (गोविंदानें) वामनरूप धारण करून बलीजवळ त्रिपाद भूमि मागून, त्यास पाताळीं नेऊन वसविलें अशी कथा आहे, तिला अनुलक्षून हें वर्णन आहे. ७. एक प्रख्यात महर्षि. हा ब्रह्मदेवाच्या उत्संगापासून (मांडीपासून) झालेला दहावा पुत्र. ८. सत्वर. ९. यासच हाल्लीं 'अनागोंदी' म्हणतात. १०. पराभव. ११. एक वानरसैन्याधिपति. १२. अमात्य.

नमूनियां तया मातु विमानांतु सहानुगी.' ।
दक्षिणे सागरापारीं वाळी दूरीं विलोकिला. ॥ १०६
स्नान सारूनियां मौनी जपस्थानीं सुनेमिया ।
ध्यान सांडूनियां व्योमीं येत भूमी धरावया. ॥ १०७
[1]येरें पसरोनियां हस्त लंकानाथ करांबुजीं ।
धरूनी घातला काखे, देत हाके निशाचरू. ॥ १०८
सप्तसागरिंचीं स्नानें केलीं त्याणें हैरीश्वरें. ।
सोडूनि ध्यावया शक्ती आन युक्ती न चोजवे. ॥ १०९
वाळी पातलिया धामा पुत्रक्षेमार्थ संभ्रमें, ।
धरितांचि तळीं पाहे पडे लाहें धरातळीं. ॥ ११०
पडतांचि दशग्रीवा चोज सर्वां वैनौकसां. ।
बांधोनि हस्तपादांतें अंगदातें सुकौतुकें ॥ १११
खेळणें पालखीं बांधे, पिता बोधे सुराल्यीं. ।
पुढती भिक्षुकावेशीं कपीपासीं प्रयत्नता ॥ ११२
सख्यत्व मागुती केलें तयेवेळें रघूद्वहा ! ।
पुढती रावणू रामा ! जयकामा चरे मही. ॥ ११३
पुढें देखत मूनेशा नारदेशा निरंजनी ।
तो म्हणे, 'तूं दशग्रीवा ! व्यर्थ जीवा न पीडणें; ॥ ११४
यम जिंकिलिया एक सर्वलोकशैवाकृती.' ।
सर्वेंचि नारदा वेगें मात सांगे जगांतका. ॥ ११५
'मारावया प्रेतपुरीं दुराचारी दशग्रिव ।
येतसे हो ! कार्यसिद्धी करीं युद्धीं सुरक्षणीं.' ॥ ११६
दशग्रीवें सप्रधानीं प्रेतंधानीं प्रवेशतां ।
देखिली यातना भोगीं जेंवि रोगी प्रलापती. ॥ ११७
रौरवादि घटीपाक थोर दुःखप्रदायकें ।
देखिलीं नरकस्थानें मूत्रपानें मळोदकें. ॥ ११८

---

१. वाळीनें. २. वानरेश्वरानें. ३. वनवासी जनांला. ४. वालीचा पुत्र. ५. रावणाचें आणि वालीचें अग्निसाक्षिक सख्य झालें असें वर्णन रामायणांत आहे. (उत्तरकांड, सर्ग १४.) ६. निष्कलंक. ७. प्रेतरूप. ८. यम. (उत्तरकांड, सर्ग २१.) ९. प्रेतपुरी. १०. रौरवादि अनेक घोर नरक.

तप्ततैलीं तप्त वाळू तप्त गोळूमयी धरा, ।
लोहस्तंभ महातापी वृद्ध पापी अनेकधा. ॥ ११९
वैतरण्या नदी वाहे घोर पाहे असीवना. ।
वेगीं टाकूनि तो ठावो यमरावो विलोकिला. ॥ १२०
दूतदूतां महायुद्ध घोर द्वंद्व प्रवर्तलें. ।
यमदूतांचिया कोटी देती पाठी पलायनीं. ॥ १२१
सप्तरात्र तयां द्वंद्व काळयुद्ध परस्परें ।
यमें प्रेरियलें मृत्या काळमृत्या विनाशना. ॥ १२२
पाश मुद्गर त्या हस्तीं मुखीं वस्ती हुताशना ।
पाय भेदित पाताळीं अंतराळीं शिराचळें. ॥ १२३
अत्यद्भुत महाघोर भयासुर विलोकितां, ।
राक्षसांची पळे थाटी प्राण कंठीं धरोनियां. ॥ १२४
दशग्रीवू खड्गधारी पादचारी प्रतापिया, ।
लोटला देखतां चंड काळदंड जगांतकें. ॥ १२५
प्रेरितां निष्कृपाभावें मित्रें पावे निवारणा, ।
स्वपुत्रातें दिवानाथु निवारीतु स्वहस्तकें ॥ १२६
'वरें अजय हा मत्त दंड व्यर्थ न वेंचणें,' ।
यमें सांडूनियां युद्ध जयानंद दशानना. ॥ १२७
यापरी जिंकिलें यमा; ऐक रामा! सुकौतुकें. ।
पाताळतळ शोधीत लंकनाथजयेच्छया ॥ १२८
पुरी भोगावती रम्या रत्नहर्म्यांकिता भुवी, ।
वासुकी तेथ सर्पेंद्र जेंवि इंद्र नभस्थळीं. ॥ १२९
तया देऊनियां क्षोभ रत्नलाभ अनेकधा, ।
पुरी मणिमयी पाहे जेथ वाहे सरिद्वरा. ॥ १३०
निवांतकवचा वस्ती दिव्य हस्ती तुरंगमा, ।
घेत रत्नाचिया कोटी हांव पोटीं न साहवे. ॥ १३१

१. यमलोकीं जातांना वाटेंत लागणारी नदी. २. एक नरक आहे. यांतील वृक्षांच्या पानांला तरवारीसारखी तीक्ष्ण धार असते, असें वर्णन आहे. ३. समुदाय. ४. सूर्य. ५. यमातें. यम हा सूर्याचा (विवस्वाताचा) पुत्र म्हणून त्यास 'वैवस्वत' असें ही नांव आहे. ६. प्रजापतीच्या आज्ञेवरून यम युद्ध सोडून तेथेंच अंतर्धान पावला असें रामायणांत आहे. (उत्तरकांड, सर्ग २२, श्लोक ३७–४०.) ७. पाताळलोकवर्ती नागांची नगरी. ८. रत्नखचित राजवाड्यांनीं संपन्न. ९. मणिपुर नामक नगरी. १०. प्रह्लादभ्राता संह्लाद याचे हे पुत्र.

पाताळनगरीं दैत्य असंख्यात विभांडिले, ।
पुढें रसातळा आला दृष्ट झाला पयोंबुधी. ॥ १३२
पांडूरवर्ण पैं शुभ्र जैंवि अभ्र घनागमीं ।
कैलास उपमे साम्य दिव्यधामजळेश्वरा[1]. ॥ १३३
यादसां[2] वरुण स्वामी जाण पश्चिमदिक्पति[3] ।
गिरी विशाळ चौफेरीं, क्षीरधारी[4] निरंतरा. ॥ १३४
स्रवती, तोचि हा सिंधू क्षीरसिंधू[5] जगत्रयीं. ।
सीतरश्मी जयापाठीं[6] चंद्ररश्मी प्रकाशकू. ॥ १३५
रमा रंभा पारिजात चतुर्दंत गजाग्रणी[7], ।
धन्वंतरी सुधा शंख काळें[8] वीख सुरासव[9]. ॥ १३६
उच्चैःश्रवा[10] कामधेनू विश्वक्सेनूकरांबुजीं[11] ।
चाप दानवसंत्रासी कौस्तुभेंसी चतुर्दश. ॥ १३७
ऐसीं चौदा[12] तिं जीं रत्नें महारत्नें सुरासुरीं ।
मथितां हा नदीनाथू प्राप्तवस्तू अमोलिका. ॥ १३८
ज्याच्यापासोनियां फेणा ऋषी प्राणा सुरक्षिती, ।
सलिलेंद्रगृहीं रामा! जयकामा दशग्रिवा. ॥ १३९
निघतां त्रासिला शस्त्रीं पुत्रपौत्रीं तयाचिये ।
जळचारीं असंख्यातीं शस्त्रघातीं अनेकधा. ॥ १४०
घेऊनि पेटिले झूजा तोयराजाचिये बळें ।
गौर[13] पुष्कर हे मुख्य वीर देख पराक्रमी. ॥ १४१
रावणे पावितां भंगा, पाठिलागा न सोडिती. ।
महोदर[14] प्रहस्तादी काळक्रोधी निघातिये, ॥ १४२

---

१. वरुणा. २. जलचरांचा. 'यादसां' हें संस्कृताप्रमाणें षष्ठीचें अनेकवचन आहे. ३. दिक्पाल. ४. निरंतर दुधातें स्रवणारी धेनु. ५. क्षीरोद नामक सागर. ६. ज्या क्षीरसागरापासून उत्पन्न झालेला शीतरश्मि (चंद्र.) ७. ऐरावत. ८. हालाहल. ९. सुरा मद्य. १०. हयरत्न. ११. विष्णूच्या करकमळीं धनुष्य. १२. देव व दैत्य यांनीं मिळून क्षीरसमुद्रमंथन केलें तेव्हां त्यांतून निघालेलीं चौदा रत्नें. या चौदा रत्नांचीं नांवें:–'लक्ष्मीः कौस्तुभपारिजातकसुरा धन्वंतरिश्चंद्रमा गावः कामदुघा सुरेश्वरगजो रंभादिदेवांगनाः । अश्वः सप्तमुखो विषं हरिधनुः शंखोऽमृतं चांबुधे रत्नानीह चतुर्दश प्रतिदिनं कुर्युः सदा मंगलम् ॥.' १३. गौर आणि पुष्कर हे वरुणाच्या पुत्रांचे आणि पौत्रांचे बलाध्यक्ष. १४. रावणाचे अमात्य.

करूनियां दशाशांती जयो देती दशग्रिवा. ।
जळेश जिंकिला ऐसा राघवेशा! जगत्पती. ॥ १४३
पुढती दुष्ट पाताळीं जात मेळीं खळांचिये ।
पाताळनगरीं [1]रामा दि[2]व्यधामा विलोकिल्या. ॥ १४४
वै[3]डूर्यतोरणाकीर्णा सुविस्तीर्णा सुवेदिका, ।
सुवर्णस्तंभ पोटाळीं मुक्तजाळीं [4]सुकिंकिणी. ॥ १४५
वज्रस्फटिकसोपानें दीप्तिमानें मनोरमें, ।
पाचुबंध मही शोभे [5]शातकुंभें सुचित्रिता. ॥ १४६
[6]कपाटें पद्मरागाचीं रत्नें शृंगें सुशोभितें ।
अद्भुतज्वाळकल्लोळीं हे[7]ममाळीं नरोत्तम ॥ १४७
[8]उपविष्ट महाद्वारीं लक्षनेत्रीं न लक्षवे; ।
किरीट कुंडलें [9]कांची कौस्तुभाची जगत्प्रभा. ॥ १४८
सौ[10]दामिनीचिया ऐसें [11]चीर कांसे विराजित. ।
लोहमूसळ त्या हस्तीं, दं[12]तज्योती [13]सुवासिता. ॥ १४९
पुरुषेश्वर द्वारस्थचि[14]द्रादित्यसुखोदयें ।
देखतांचि तया श्रेष्टा बुद्धिभ्रष्टा [15]नेचोजवे. ॥ १५०
[16]आंगीं उठावले रोमतापघर्मप्रकंपता, ।
बोले भीतभिता वाणी येर मौनीं विलोकितु. ॥ १५१
म्हणे, 'कोणाचें हें [17]धाम ? काय नाम [18]स्थळेश्वरा ?' ।
ये[19]रू म्हणे, 'गर्वमूर्ती [20]चक्रवर्ती नरेश्वर ॥ १५२
बळी वैरो[21]चनीनामा [22]पद्माप्राणेश्वरप्रियो, ।
इच्छीत असती [23]गोंदा जाई मूढा! ममाज्ञया.' ॥ १५३
गेहीं प्रवेशतां पाहें दैत्यरायें करद्वयें ।
ली[24]लें अंकासनीं वातू पुसे कौतुकसंभ्रमें. ॥ १५४

---

१. स्त्रिया. २. दिव्यकांति. ३. रत्न. ४. लघुघंटा. ५. सुवर्ण. ६. द्वारें. ७. सुवर्णमालांनीं युक्त. ८. बसलेला. ९. कमरपट्टा. १०. विजेसारिखें. ११. वस्त्र. १२. चारु दशन. १३. चांगलें वस्त्र नेसलेला. १४. सूर्य. १५. कौतुक वाटलें नाहीं, पण भय वाटलें. १६. अंगावर रोमांच उभे राहिले, शरीराचा दाह झाला, घाम सुटला आणि हृदय कंपित झालें (रावणाचें.) १७. गृह. १८. श्रेष्ठ स्थळाला. १९. द्वारस्थ पुरुष. (विष्णु.) २०. सार्वभौम राजा. २१. विरोचनाचा पुत्र. २२. पद्मेच (लक्ष्मीचा) प्राणेश्वर (विष्णु) त्याचा प्रिय (आवडता.) २३. प्रवेश. २४. सहज हातीं धरून मांडीवर बसविलें.

वार्ता निवेदितां शंके, वदे लंकेश सादरें, ।
'[1]माधवें बांधलें तूतें सोडवावें स्वशक्तिनें, ॥ १५५
यालागीं पातलों येथें' हास्य येतें [2]हरिप्रिया. ।
'गुणवंत गुणातीत जगन्नाथ जगद्रुपी, ॥ १५६
दुष्टदंडक सुष्टात्मा कर्मधर्मा प्रवर्तकु, ।
विश्व चाळित एकासी करी नाशी मनेच्छया. ॥ १५७
भूभारहरणालागीं लेत आंगीं गुणात्मता. ।
वेदवाद नये बोधा सच्चिदानंद [3]विग्रही. ॥ १५८
तो त्वां विलोकिला द्वारीं चक्रधारी जनार्दनू, ।
क्षीराब्धिशाई शेषाचा आगमाचा रमाधव. ॥ १५९
दैत्याराति सुरश्रेष्ठ श्रीवैकुंठनिवासिया ।
त्यासीं कोण करि [4]द्वंद्व बुद्धिमंद नराधम ॥ १६०
तुजऐसा मूर्खराशी तोचि द्वेषी [5]मधुद्विषा.' ।
ऐसी सांगोनियां [6]संज्ञा देत आज्ञा दशग्रिवा. ॥ १६१
द्वारस्थातें न पाहात पळे भीत महद्भयें, ।
[7]गेला प्रधानसंमेळीं अंतराळीं नभाचिये. ॥ १६२
चरणीं आक्रमी [8]व्योमा देवधामा विनाशकू, ।
दाहा दाहा सहस्रांच्या योजनाच्या नभस्थळीं, ॥ १६३
अंतरीं [9]वसतिस्थानें [10]श्राविकानें मनाचिया, ।
पृथ्वीपासूनि पहिलें स्थान बोले मनोहर, ॥ १६४
विश्रांमले अत्यपूर्व हंस [11]सर्वगुणाथिले. ।
द्वितीय स्थानकीं मेघ जें अमोघ जळप्रदें. ॥ १६५
[12]आग्नेया [12]पक्षिणा [12]ब्रह्मा यया नामाचिया जगीं, ।
सिद्धचारणसंवादी सुखानंदी मनेच्छया. ॥ १६६
तृतीय स्थानकीं वस्ती मरुत्पंथीं [13]दिवोदरीं, ।
चतुर्थ स्थानकीं देख [14]विनायक महाद्भुतें. ॥ १६७

---

१. विष्णूनें. २. बळीला. रावणाचें भाषण ऐकून बळी हसला. ३. मूर्तिमान्. ४. युद्ध. ५. मधुसूदनाला. (विष्णूला.) ६. खूण. ७. रावण गेला. ८. आकाश. ९. मरुपथ. १०. विश्रांति घेत असत. ११. सकळगुणसंपन्न १२. हीं तीन जातीच्या मेघांचीं नांवें आहेत. १३. आकाशांत. १४. चवथ्या वायु मार्गांत विनायकासह भूतें वास करतात.

पंचम स्थानकीं गंगा पापभंगा जगत्रयीं, ।
क्रीडिजे जेथ आनंदीं कुमुदादी गजेश्वरीं. ॥ १६८
शुंडेनें सांडिती गंगा तेचि मेघा महीतळीं, ।
षष्ठम स्थानकीं वस्ती पक्षिजाती सहस्रधा. ॥ १६९
गरुडें वसिजे जेथ प्रियापुत्रसहानुगीं, ।
सातवें मंडळीं रामा! उर्ध्वव्योमा सुखासरी. ॥ १७०
सर्वां ऋषेश्वरां वासू महोल्हासू मनस्वियां, ।
अष्टम स्थानकीं नित्य आदित्यपथसंस्थिता. ॥ १७१
गंगा मूर्तिमती भूषा घोषरूपा सुरेश्वरी, ।
मग सहस्रवर्षेंसी पैंअठ्यासीं सविस्तर. ॥ १७२
विशाळमंडळीं चंद्र रोहिणींद्र सुतारक, ।
जात विध्वंसित स्थान दशानन महानुगी. ॥ १७३
पंथीं त्रासुनि मांधाता निशानाथा विलोकिलें, ।
गर्वें धरावया गेले हिमें केले शवाकृती. ॥ १७४
लक्षुनी सत्वरा क्रोधें बाण विंधे वधावया, ।
धांवोनि पातला धात्रा पुत्रपौत्रा निर्वारणा. ॥ १७५
'वधूं नये अत्रिपुत्रा शिवस्तोत्रास बीजकें,' ।
उपदेशी तया हातें यशदातें जगत्रयीं. ॥ १७६
यापरी जिंकिलें देखा सर्वलोकां निशाचरीं, ।
देवकन्या ऋषीकन्या नागकन्या सुपद्मिणी. ॥ १७७
गंधर्वअप्सरा नारी व्योमचारी कळान्विता, ।
बळें शोधूनियां सृष्टी लक्षकोटी सुमध्यमा. ॥ १७८

---

१. कुमुद ही हत्तीची जात आहे. २. गंगेचें जळ. ३. हेंच जळ मेघ होत. ४. सूर्याच्या मार्गांत असणारें. ५. आकाशगंगा. ६. इक्ष्वाकुकुलोत्पन्न युवनाश्वराजाचा पुत्र. हा पित्याच्या कुक्षींतून बाहेर आला, आणि दुग्धपानार्थ रडूं लागला. तेव्हां इंद्र म्हणाला-हा पुत्र मला पिईल (मां धास्यति) यामुळें यास मांधाता असें नांव पडलें. (द्रोणपर्व-अध्याय ६२). या राजाला रावणानें त्रास देऊन चंद्राला पाहिलें. ७. चंद्र. ८. प्रेतासारखे. ९. ब्रह्मदेव. १०. रावणा. (पुलस्त्याचा पुत्राचा म्ह० विश्रवसाचा पुत्र.) ११. चंद्राला मारूं नको असें ब्रह्मदेवानें रावणास सांगितलें. १२. चंद्रा. १३. श्लोक १६२-१७६ यांतील वर्णन उत्तरकांडांतील २३ व्या सर्गापुढें जे पांच प्रक्षिप्त सर्ग आहेत त्यांच्या आधारें केलें आहे. १४. सर्ग २४ पद्य.

धरूनि आणितां बंदी शोकशब्दीं प्रलापती[1], ।
'परस्त्रीव्यसनें पाहो नाश पावो कुळ क्षया.' ॥ १७९
निकुंभिळावनीं[2] रामा ! जयकामा[3] महीपती ।
करी शक्रजिता[4] होमा[5] सप्त[6] नामाचिका विधीं. ॥ १८०
अग्निष्टोमा अश्वमेधा जो प्रसिद्धा जगत्रयीं, ।
बहुसुवर्णका श्रेया राजसूया महामखा. ॥ १८१
वासवा[7] वैष्णवा थोरा माहेश्वरा यथाविधी; ।
मागां आचरला कोणी ऐसी वाणी न बोलवे. ॥ १८२
ऐसिया सप्तयज्ञातें सांगवीते यथाविधी, ।
संपादितां महेशानू[8] तुष्टमानू जगत्पती. ॥ १८३
कृपेनें पातला तेथ वरा देत पयोंबुधी, ।
विमाना कामगा[9] भव्या देत दिव्या महारथा. ॥ १८४
कोदंड[10] अक्षयी भाते देत हातें महाजया, ।
नभीं धावडिजे वेगा सिंधुमेघाचियापरी. ॥ १८५
अस्त्रशस्त्रमयी विद्या मंत्रसिद्धा फलान्विता ।
कल्पितांचि मखीं देख तात्काळिक रहंवरू[11]. ॥ १८६
निघे उच्चारितां मंत्र भाळनेत्रकृपावरें[12] ।
जो जो सन्मुख ये हावें हानी पावे पराभवें. ॥ १८७
अंधकार करी युद्धीं शत्रुमांदीपराजया ।
राक्षसी तामसी[13] माया वश्य राया तपोबळें. ॥ १८८
बारा वर्षें नित्यनेमें सत्यधर्में नरेश्वरू, ।
निराहारी ब्रह्मचारी तोचि मारील सत्वरीं. ॥ १८९
हो कां एक धराधारी मारी कामारि कीं हरी, ।
येरां नागविजे मत्तें शक्रजीतें रणांगणीं. ॥ १९०
वरातें ओपिलें ऐसें व्योमकेशें[14] कृपार्णवें[15]. ।
कैलासभुवनीं गेला, घोष केला निशाचरीं. ॥ १९१

---

१. ओरडती, विलाप करतात २. लंकेच्या पश्चिमद्वारदेशवर्ति अरण्य. ३. जयेच्छु. ४. इंद्रजित. ५. यज्ञां. ६. यासात यज्ञांची नांवें:—अग्निष्टोम, अश्वमेध, बहुसुवर्ण, राजसूय, गोमेध, वैष्णव आणि माहेश्वर. (सर्ग २५, श्लोक ८-९.) ७. या स्थलीं 'गोमेधा' असें असावें असें वाटतें. ८. पशुपति. ९. इच्छानुरूप गमन करणारा. १०. धनुष्य. ११ रथ. १२. त्रिलोचनाच्या कृपाप्रसादानें. १३. ज्या मायेनें तम (अंधकार) उत्पन्न होतें अशी. १४. शंकरानें. १५. दयासागरें.

[१]मातृभगिनीजा सत्या [२]मधुदैत्यें [३]स्वसा गुणी, ।
धरूनि आणिली, मत्तें [४]शक्रजीतें, निजालया. ॥ १९२
तदर्थ क्षोभला; मंत्रें तातमित्रें बिभीषणें, ।
बोधितां नायके बोला म्हणे 'घाला सुरांवरी.' ॥ १९३
कोपोनि चालिला युद्धा घोरद्वंद्वा निघातिया, ।
अक्षौहिणी सहस्रैक चमू देख भयंकरी. ॥ १९४
मधू जिंकावया जाती, निशा पंथीं प्रवर्तली. ।
कैलासकाननीं वस्ती मत्त हस्ती जयापरी. ॥ १९५
क्रीडती मातले सर्व दशग्रीव सहानुगीं. ।
पूर्णचंद्राचिये राती पुष्पजाती सुपुष्पिता, ॥ १९६
वसंत वल्लभालोभें येत शोभे वनश्रिया, ।
[५]द्विरेफें देति झंकारा हंस मोरा सुनर्तनें. ॥ १९७
चकोरचातकें पुष्टें खंजरीटें कपोतकें, ।
कोकिळा पंचमालाप करी ताप [६]वियोगियां. ॥ १९८
लावण्यलतिका रंभा दिव्यशोभा सुपुष्पकीं ।
[७]कुबेरपुत्रधामातें जात पंथें नभाचिया. ॥ १९९
रावणें देखतां दृष्टी धैर्य मुष्टी न थारवे. ।
मन्मथें ताडिला वर्मी, काळऊर्मी न साहवे. ॥ २००
रावणा करिण क्षोभा [८]रमा [९]रंभातरूपमा ।
संघटे मैथुना अंकीं, येरी दुःखीं प्रळापिती ॥ २०१
भोगूनि सोडिली तोषें, जाती रोषें [१०]प्रियांप्रती. ।
सांगतां येर संक्रोधें शाप शब्दें प्रभावितु ॥ २०२
'[११]परनारी बलात्कारीं पापचारीं निषेवितां, ।
जीवनाश घडो मंदा ! पडो मूर्धा महीतळीं.' ॥ २०३
बंध शापाचिये पाशीं जानकीसीं दुराग्रही, ।
अमर्यादा करूं भ्याला याचि बोला प्रशंकितु. ॥ २०४

---

१. आईची बहीण (अनला) तिची मुलगी–कुंभीनसी. रावणाची माता कैकसी आणि अनला ह्या अनुक्रमें सुमाली आणि माल्यवान् ह्या भावांच्या कन्या होत. २. मधु नामक असुरानें. ३. बहीण. ४. यज्ञांत शक्रजित् मत्त (आसक्त) झाला असतां; इंद्रजिताला यज्ञामुळें स्वगृहकृत्याचें विस्मरण झालें असतां. ५. भ्रमर. ६. विरहिजनांला. ७. नलकूबराच्या गृहाला. ८. लक्ष्मी. ९. कदली-वृक्षासारखी. १०. नलकूबराकडे. ११. सर्ग २६ श्लोक ५४-५५.

असो मधुचिया स्थाना गेली सेना निशाचरी, ।
विभांडुनि तया देखा [1]शक्रलोका [2]निरोधिलें. ॥ २०५
आसनीं चळला इंद्र सूर्य चंद्र सतारक, ।
गुरु बुधकवी पाहो शनी राहो [3]कुंजादिक. ॥ २०६
[4]आदित्य [5]रुद्र [6]वसव [7]साध्यदेव मरुद्गण, ।
सिद्ध ते सर्वही झूजा देवराजाचिया बळें. ॥ २०७
आरूढला [8]चतुर्दंतीं वज्र हातीं सुरेश्वरा. ।
जयंत इंद्रतनयो काळसूर्यो प्रतापिया. ॥ २०८
सुरां निशाचरां घोर युद्ध थोर प्रवर्तलें. ।
जयंत गोविला मंदें मेघनादें महाबळें. ॥ २०९
वसूमाजी मित्र[9]नामा जयकामा बळान्वितु, ।
सुमाळी मारिला ठायीं वज्रघायीं रणांगणीं. ॥ २१०
ऐरावताचिये दंतीं भग्नशक्ती दशग्रिव, ।
निशाचरांचिया कोटी देत पाठी पलायनीं. ॥ २११
राक्षसीं पावतां खेदू, मेघनादू सकोपिया, ।
मौनास्त्रदेवतांमंत्री काळरात्री जपान्वयें, ॥ २१२
निशा प्रवर्तली घोर, येरां येर न देखती. ।
कंठीं घालोनियां पाश निर्जरेशें[10] धरातळीं, ॥ २१३
[11]पाडिला स्वस्थ संत्राणें जीत प्राणें प्रकर्षितु, ।
देव इंद्रादिकें रंकें न्हेत लंके धरूनियां. ॥ २१४
ब्रह्मा येवोनियां तेथ करी मुक्त सुरेश्वरा. ।
'[12]अहल्या छळिली कामें पापकर्में तयागुणीं, ॥ २१५
पावलासि जयोहानी वज्रपाणी! सुनिश्चितें, ।
सुकाळें खंडिती क्लेश इंदिरेशें[13]दयाबळें.' ॥ २१६
यापरी जिंकिलें इंद्रा, रामचंद्रा! धराधिपा! ।
पुढां आइक पां एक सकौतुक रघूद्वहा! ॥ २१७

---

१. सर्ग २७. २. कोंडून टाकिलें. ३. मंगळादिक. ४. बारा आदित्य. ५. एकादश रुद्र. ६. अष्ट वसु. ७. साध्य नामक देव. ८. ऐरावत नामक गजावर. ९. मूळांत 'सावित्र' असें नांव आहे. यानें सुमाळी राक्षसास मारिलें. (सर्ग २७ श्लोक ३४-५१). १० देवांचा स्वामी. (इंद्र) ११. सर्ग २९. १२. सर्ग ३०. १३. विष्णु.

प्रधानेसीं लंकनाथ असे जात धरातळीं, ।
पश्चिमादिशिचे पंथीं सिंधुप्रांतीं सकौतुकें. ॥ २१८
विलोकित महाद्वीपीं दिव्यरूपी नरोत्तमु, ।
कोटिचंद्र कोटिभानू हुताशनु सहस्रधा. ॥ २१९
सांडणें त्याचिये दीप्ती आंगज्योती निरूपमा, ।
चामरें किंकिणीमाळा पद्ममाळा विलंबिनी. ॥ २२०
घंटा तूणीर त्या पृष्ठीं दिव्यदृष्टीं न लक्षवे, ।
लंबकेश कंबुग्रीवा सांवयेवा सुरालयो, ॥ २२१
तेजें आकारला सिंधू कीं ऋग्वेदू गुणाथिला, ।
ब्रह्मांडें दिसती पोटीं जीवसृष्टी अनेकधा. ॥ २२२
महेशमहिमे रामा ! दिसे सीमा गुणागळी. ।
तया स्पर्शोनियां आंगें युद्ध मागे निशाचरू. ॥ २२३
तेणें विलोकितां दृष्टी पडे सृष्टी विमूर्च्छित. ।
धरा भेदूनियां गेला चेवो आला दशग्रिवा. ॥ २२४
निवे तयाचिये पाठी चोज दृष्टी विलोकित, ।
पाताळभुवनीं रामा हैमधामांगणीं बहु, ॥ २२५
सुधासिंधूचिये कांठीं तीनिकोटी नरेश्वरा !।
नृत्य कीजे महातोषें वाद्यघोषें निरंतर. ॥ २२६
नीळवर्ण चतुर्बाहो तेज पाहो विभूषणीं, ।
किरीट कुंडलें माळा रत्नकीळा सुमेखळे, ॥ २२७
दिव्य चीरें दिव्य गंधें महानंदें सुनर्तनें, ।
मार्तंडउदयो कोटी तेंवि दृष्टी विलोकितां. ॥ २२८
कंप संचरला आंगा, निघे मागां सशंकितु. ।
पुढें येतोंचि पैं राया ! शुभ्रशय्या सुशोभित. ॥ २२९
द्विपीं निद्रिस्थ भूपाळा ! वन्हिज्वाळीं वेगुंठितु. ।
पादसेवा करी पद्मा येरु छद्मा विलोकितु. ॥ २३०
कामें आकळितां पाशीं धांवे तीसीं धरावया, ।
निद्रिस्थ उठिला देख हास्यमूख म्हणे 'भला ॥ २३१

१. अग्नि. २. घुंगुरांच्या माळा. ३. भाता. ४. अंगासहित. ५. गुणसंपन्न. ६. स्त्रिया. ७. सुवर्णरचित घरांच्या आंगण्यांत. ८. कमरपट्यास रत्नांचे खिळे होते. ९. वस्त्रें. १०. सूर्य. ११. आच्छादित. १२. लक्ष्मी. १३. मदनानें धरितां, बांधतां.

आजि मृत्यु नसे तूतें, जाईं येथें न राहतां, ।
येणेंचि व्यसनें मूढा! हानी पूढां विलोकिसी.' ॥ २३२
रावणें पाहतां देख चौदा लोक तदूदरीं, ।
पळे झांकोळला नेत्रीं सर्वमंत्रीसमागमें. ॥ २३३
पुसे राम 'महाभागा! नामें सांगा तयाचिया. ।
नृत्यें विलासले पोटीं तिनीकोटी निवेदणें'. ॥ २३४
म्हणे अगस्ति, 'हे रामा! पूर्णब्रह्मस्वरूपिया, ।
देवदेव गुणातीत नित्यानित्य सनातन. ॥ २३५
भगवान् कपिलाचार्या ब्रह्मसूर्या जगत्पती, ।
तिनीकोटी पुत्र त्याचे जाण साचे नरोत्तमा! ॥ २३६
कपिलाख्यान हें पाहीं दोषदाही जगत्रयीं, ।
ऐसा तो राक्षसू जाणा जिंकवेना सुरासुरां. ॥ २३७
तो त्वां विभांडिला बाणीं कीर्ति वाणी न वर्णवे. ।
तेरावेळ युगें चारी राजधारी दशाननु, ॥ २३८
संख्या परियसें त्याची मनुष्यांची नरेश्वरा! ।
संवत्सरें पांचकोटी एकषष्टी नियूतकें, ॥ २३९
सहस्र आगळे साठी भूप सृष्टी दशाननू, ।
उतरूनि धराभारा दशाशीरा निपातिलें. ॥ २४०
इतुका काळपर्यंत पीडा भूतदिवौकसां, ।
रावणाचे महामारीं कारागारीं मृतोपम. ॥ २४१
ऋक्ष वानर हे देव साह्य सर्व समागमीं, ।
गौरी भस्मासुरें न्हेतां सोडवीतां रमापती. ॥ २४२
तेचि उत्तीर्णते कामा साह्य रामा! उमापती, ।
झाला तोचि हनूमंतू काळमृत्यु निशाचरां. ॥ २४३
ज्याची बाळपणीं बाड ख्याति रूढ जगत्रयीं; ।
पक्काफळाचिया भावें गिळूं धावे दिवाकरा. ॥ २४४

---

१. मांदिला. २. मारिलें. ३. प्राणी आणि स्वर्गी रहाणारे देव त्यांला. ४. बंदिशाळेंत. ५. पार्वती. ६. शिवाच्या भस्मापासून उत्पन्न झालेला असुर. हा ज्याच्या मस्तकीं हात ठेवील तो दग्ध होऊन मरण पावेल असा यास वर होता. हा प्राणिमात्रास पीडा देऊं लागला, तेव्हां विष्णूनें याचा हात याच्याकडून याच्याच मस्तकीं ठेवून यास दग्ध केलें. ७. ज्या हनूमंताची. ८. मोठी. ९. सूर्या (सर्ग ३५ श्लोकें २३.)

पळे मार्तंड[1] संकष्टीं, रिघे पाठीं सुरेश्वरा, ।
[2]तेणें ताडियला वज्रें, पडे[3] मारें विमूर्च्छित. ॥ २४५
मोहें धांविन्नला वातू [4]खेंव देतू निजात्मजा. ।
वायू संतापला पोटीं देवकोटीविनाशना; ॥ २४६
आकार्षिलें जगत्प्राणा समाधाना जगत्पती, ।
म्हणे, 'चिरंजिवी पुत्रू दैत्यशत्रू प्रतापिया. ॥ २४७
प्राण हा मित्र **वि**ष्णूचा बळिष्ठांचा शिरोमणी, ।
लोळती सिद्धि ज्यापायीं वज्रदेही गुणाथिला.' ॥ २४८
वात संतोषला वाणी जीवदानीं जगत्रया, ।
'धराभारा विनाशील निर्दळील सुरद्विषां. ॥ २४९
विष्णुकृत्य महामोल संपादील स्वेवाढिवा,' ।
ऐसें जाणोनि निष्टंकें[6] चतुर्मुख[7] निरोपित, ॥ २५०
'शक्ति गुप्त[8] असो यातें **रा**ववातें न देखतां, ।
वाळीउत्कर्षबाधेते **सु**ग्रीवातें विटंबिता, ॥ २५१
सोडिलें ऐसिया हेतूं जाण तें तूं **म**हेश्वरा ! ।
ऐसें आकर्णितां पाहो **रा**मरावो गुणाग्रणी, ॥ २५२
नमस्कारी समस्तांसीं अगस्त्यादि ऋषेश्वरां. ।
आल्हादकारिणी मातू **रा**मनाथू महामती, ॥ २५३
आकर्णूनि सुखें थोर पूंजाभार[10] समर्पिला. ।
आज्ञा मागोनियां बोलें ऋषी गेले निजाश्रमा. ॥ २५४
सभा विसार्जिली **रा**में दिव्य धामें विलोकित, ।
प्रवेशला गृहाद्वारीं सुखाचारी नरोत्तमु. ॥ २५५
कर्पूरदीपिका हस्तीं चंद्रज्योती सहस्त्रधा, ।
हेमठाण[11]वयापंक्ती रत्नदीप्ती निरूपमा. ॥ २५६
वल्लभेचा[12] धरी हातू निशी पंथू सकौतुकें, ।
ऋमितां ठाकला तेथ सुप्रभात सुमंगळ, ॥ २५७

---

१. सूर्य. २. इंद्रानें. ३. मारुति पडे (इंद्रानें सोडलेल्या वज्रानें मारुतीची हनुवटी भग्न झाली म्हणून त्याला हनूमान् असें नांव पडलें सर्ग ३७ श्लोक ११.) ४. आलिंगन. ५. आपल्या बोलीला. ६. अव्याहत सिद्धांत. ७. ब्रह्मदेव. ८. मारुतीला स्वसामर्थ्याचें ज्ञान असणार नाहीं, परंतु जेव्हां कोणी त्याचें स्मरण करील, तेव्हां तें ज्ञान उदित होऊन, बल वृद्धिंगत होईल असा त्याला शाप होतो. (सर्ग ३६) ९. कथा. १०. ऋषींची पूजा केली. ११. समई. १२. प्रिय दयितेचा (सीतेचा.)

बंदी वैतालिकीं[1] शब्दीं स्तोत्रवादीं प्रबोधितां, ।
'महेशप्रतिमा[2]! सृष्टी पुण्यदृष्टीं विलोकितु. ॥ २५८
माता गुरू धेनु वन्ही अनुष्ठानी द्विजोत्तम, ।
नमस्कारूनि सद्भावें देत हांवे सुखोचित, ॥ २५९
अष्टकद्वयदानातें ब्राह्मणातें निवेदितु.' ।
स्नानसंध्याजपा होमा नित्यनेमा यथाविधी, ॥ २६०
सारोनि[3] भोजनें प्रीती मित्रपंक्ती रसोत्तमें, ।
सभे विराजला **राम** जेंवि सोमें[4] नभःस्थळीं[5]. ॥ २६१
गीतनृत्यमहानादें ब्रह्मवृंदें अनेकधा, ।
सादरें बोधिती मंत्रा कथा चित्रा सकौतुकें. ॥ २६२
रत्नें उपायनें[6] वास[7] **मैथुळेस** विदेहिया, ।
देऊनि धाडिला मानी[8] गजयानीं सेहानुगीं[9]. ॥ २६३
सौमित्रीं[10]चेनि सांगातें युधाजीतें[11] धनप्रदें, ।
आज्ञा मागे सवीनीतू बोळवीत सुखोचितें. ॥ २६४
सौमित्रसंगतीं आप्त **युधाजीतू** सुहृत सखा, ।
निघे परिव्राजग्रामा नित्यनेमा रघूत्तमा. ॥ २६५
प्रतर्दन[12] महातेजु **का**शिराज प्रतापिया, ।
तेणें देवोनियां रत्नें दिव्य यानें अनेकधा, ॥ २६६
स्वदेशा[13]प्रति तो गेला. घोष केला नरेश्वरीं, ।
'रावणें हरिली **सीता**, दुष्ट वार्ता नरोत्तमें, ॥ २६७
भरतें श्रवितां[14] ग्रामीं क्रोधऊर्मीं[15] न साहवे. ।
तीस अक्षौहिणी मत्तलंकानाथवधेच्छया, ॥ २६८
मेळवीलें महीपाळां शत्रुजाळा[16] निपातना[17], ।
कार्य साधोनियां **राम** आत्मधाम[18] प्रवेशला.' ॥ २६९

---

१. राजाचा स्तुतिपाठक, अरुणोदयकाळीं गायनानें आणि वाद्यानें राजास जो जागृत करतो तो. २. विष्णूसारखा. ३. उरकून. ४. चंद्र. ५. आकाशांत. ६. नजराणे. ७. वस्त्र. ८. अभिमानी. ९. सेवकांसह भरताला सत्कारार्थ बरोबर देऊन जनकाला रामानें परत मिथिलेस पाठविलें. १०. लक्ष्मण. ११. केकय, मातुल. १२. हा काशीपुरीचा राजा. १३. वाराणसी नगरीस. १४. ऐकतां. १५. रागाची लहरी. (हीं समासघटित पदें असून संधि केला नाहीं.) १६. समुदाय. १७. नाश, विध्वंस. १८. स्वकीय गृह.

स्वदेशा धाडिले राजे महाभोजें सुपूजित, ।
चरित्र रघुरायाचें श्रावित्याचें[1] अंबांतकु[2]. ॥ २७०
सभा विसर्जूनी पाहो रामरावो सुकौतुकें, ।
अशोकवन[3] आलोकी कल्पिजे कीं सुमंडित. ॥ २७१
संपला ग्रंथपूर्वार्धा ज्ञानवृद्धा विवेकिया, ।
आईकतां सुखी होत रमाकांत सुरक्षिता. ॥ २७२
दिशा जिंकिल्या आक्रमी बंधुवर्गी पुरा आणिल्या संपदा हो अनेगी[4], ।
तिहीं पूजिलें सुग्रिवा लंकनाथा[5] सुखें बोळवी स्वस्थळा त्या समस्तां.॥२७३
धनाधीश्वरें[6] धाडिलें हो! विमाना[7], म्हणे राम तो, 'बोल आईक यांना[8]!' ।
मनें चिंतितां येइजे काजकाळीं वसें पूर्वदीशे वनीं अंतराळीं[9].' ॥ २७४
अलौकीक कर्में विलोकीत चित्रें गुणा वानिजे कैकयीचेनि पुत्रें, ।
विसर्जूनियां ते सभा, जानकीसीं प्रवेशे क्रिडारण्य[10] लावण्यराशी. ॥ २७५
धरुनि कर कराग्रें वल्लभें[11] वल्लभेचा[12],
उपवनिं रघुराजें रंजिजे भाज[13] वाचा; ।
म्हणत, 'कमळगर्भे!' ज्ञानपोता[14] 'सुरंभे!'
तरुवर अवलोकीं, देत शृंगारशोभे.' ॥ २७६
दाडिंबीं उलली खंती दंतपंक्तीविलोकनें, ।
देखतां मृगशावाक्षी[15] जाती कुक्षी कुरंगमे[16]. ॥ २७७
'विलोकीं' म्हणे 'वल्लभे! गौरवर्णे! बहू लाजती केतकीची सुपर्णें, ।
गमे धूसरें[17] घोळिलीं याचि हेतू, प्रिये! गौरवीं आदरें प्राणनाथू.' ॥२७८
मैरेयकें[18] आणि विचित्र मासें दे वल्लभेलागुनि राम तोषें; ।
बोले, 'सगर्भे! तुजलागिं पोटीं जे आवडे ते मज सांग गोष्टी. ॥२७९
असे डोहळा काय! सौचार[19] सांगें, मना प्रीयें[20] तें आग्रुतें सद्य मागें.' ।
म्हणे, 'आवडे सर्वदा एक राम, नसे नाठवे आन भोगार्थ काम.' ॥२८०

---

१. ऐकणाराचें. २. पातकाचा नाश करणारें. ३. अशोकवनिका; मोठ्या राजाचें स्त्रियांसह क्रीडा करण्यास योग्य असें उपवन. ४. अनेकी. (पुष्कळा.) ५. बिभीषण. ६. कुबेरानें. ७. पुष्पक. ८. हे विमाना. ९. आकाशीं. १०. अशोकवन. ११. प्रियानें. (रामानें). १२. प्रियेचा. (सीतेचा.) १३. भार्या. ('य'च्या ठिकाणीं प्राकृतांत 'ज' होतो या नियमाचें हें उदाहरण आहे.) १४. ज्ञानाची नौका. (राम). १५ हरिणाच्या छाव्यासारिखे नेत्र जीचे असी. १६. हरिण. १७. परागयुक्त असीं. १८. मद्यविशेष. (विशेषतः ऊंसाच्या रसापासून झालेलें मद्य.) १९. सत्य. २०. वृत्तसुखार्थ येथें 'प्रिय'शब्द दीर्घ केला आहे.

'सुलोचने! कामविमोचने! तूं [1]एणीदृशे! [2]भूजगवेणिकेतू,' ।
निःशंक [3]लंकेशअमित्र [4]भाजे सांगें म्हणे 'सांडुनि सर्व लाजे.' ॥ २८१
'भागीरथीतीर [5]सुनीर जेथें, साधूजनाचा रहिवास जेथें, ।
तेथें वसावें दिन पंच रात्री [6]वन्याशनीं भूशयनीं पवित्रीं.' ॥ २८२
शोकीं अशोकीं बहुकाळ [7]वासा केलें, तरी कीं नपुरेचि [8]सोसा. ।
होणार तें हो! नटळे त्रिवाचा, शीघ्रेंचि भोगीं फळभोग याचा.॥२८३
असो. अस्तमाना [9]दिवानाथ गेला, [10]जगाधीश तो [11]भद्रपीठासि आला. ।
बहू लागल्या दीपिका चंद्रज्योती जनीं वंदिला राम देवेश भक्तीं. ॥२८४
तयानंतरें एकटा देवदेवो [12]पुरीरक्षकातें पुसे गूढ भावो, ।
'जनीं बोलिजे आमुतें काय कैसें? गुणीं येश, कीं दोष वैगुण्य ऐसें,॥२८५
उणें आमुचें कीं [13]गुणीबंधुवाचें, तथा जानकीचे गुणागूण साचे, ।
वदा [14]चार हो! सत्य साचार मातें, नका चावळों या भयाचेनि वातें.'॥२८६
अभयवचन मागे, दूत साचार सांगे,
'वदत पुरनिवासी न्यून पैशून्य मागें; ।
अटक असुरदेवां ख्याति केली निजांगें
सकळ शरकुठारें ताडिलीं [15]शत्रुटांगें. ॥ २८७
दशवदन कळंकी मत्त थाहूनि [16]अंकीं,
समळ मदनपंकीं लेपिली जे [17]अशोकीं, ।
चतुरपर विवेकी राम नोहेचि [18]शंकी,
[19]परनरगत नारी नांव हें नष्ट लोकीं. ॥ २८८
[20]समळ जनकबाळी स्पर्शली जे विटाळीं,
पुनरपि निजगेहा आणिली हें त्रिकाळीं, ।

---

१. हरिणासारखे नेत्र जीचे असे. (एणी=हरिणस्त्री, दृश्=दृष्टि, डोळे.) २. येथें वृत्तसुखार्थ 'भुजग'शब्द दीर्घ केला आहे. ३. रावणाचा शत्रु. (येथें समासघटित पदें असून संधि केला नाहीं.) ४. स्त्रीला. ५. उत्तम उदक. ६. वन्यफळें (कंदमूलादि फळें) यांच्या अशनानें (भक्षणानें). ७. वस्तीला. ८. अतितृष्णा. ९. सूर्य. १०. राम. (जगत्+अधीश=जगदधीश, असा शब्द पाहिजे होता.) ११. भद्रासनास. (सिंहासनास.) १२. सर्ग ४३ पहा. १३. गुणी जो बंधु लक्ष्मण त्याचें. १४. दूत हो. १५. शत्रूचीं डोचकीं. १६. मांडीवर. १७. अशोकवनिकेंत. १८. शंकायुक्त. १९. परकीय पुरुषाप्रत गेलेली. २०. दोषी.

अनुचित बहु केलें, येश निःशेष[1] गेलें,
कुजन कुटिल बोलें जोडिती पाप मोलें'. ॥ २८९
आकर्णितां ते अपवाद[2]गोष्टी संतापला राघवराज पोटीं, ।
पाचारिला सत्वर बंधु पाशीं[3] बोले विषादें वितळे तयासी. ॥ २९०
'सहितकुमरबंधूसंगिये सप्रधानीं
दशमुख दळिला म्यां काळनिर्वाणबाणीं, ।
मुनिवरहरब्रह्मावन्हिदेवेंद्रसाक्षी
प्रगट मज पवित्रा ओपिती पंकजाक्षी[4]. ॥ २९१
पुनरपि जन तोंडें लांछना[5]तेंचि बोले
श्रवण करित माझें दग्ध सर्वांग झालें. ।
हरि[6]हर[7]विधि[8] आतां बोधितांही पवित्रा
त्यजिन अवनिजा[9] हे सत्य जाणें सुमित्रा[10]! ॥ २९२
न साहवे हा अपवाद मातें, त्यजीन जीवा अथवा सिते[11]तें, ।
विशेष कांहीं न वदें उदारा! सांडूनि येईं विजनीं[12] कुदारा.' ॥ २९३
'श्रुती[13] निंदिजे सर्वदा शून्यवादीं[14], अनाचारिया कैं सदाचारबुद्धी? ।
विरक्तें मनीं वाळिले कामचारी, तया मानिजे काय सांगे विचारी?॥ २९४
तयासारिखें बोलणें लौकिकाचें मनें मानिजे साजणे! भाडयाचें.' ।
वदे राम ते गोष्टि आकर्णितां हो! 'निघे बाहिरी सत्वरां वीरबाहो.' ॥ २९५
महेंद्रालया पातला रामबंधू धरानंदिनी[15]वंदनीं होत खेदू, ।
म्हणे, 'चालिजे तापसारण्य पाहो, मनोआवडी पाठवी प्राणनाहो[16].' ॥ २९६
बहू तोषली देवरा[17]चेनि बोलें, सवें घेतलीं रत्नवस्त्रें अमोलें, ।
ऋषीअंगना[18]पूजनालागिं पाहो रथीं आरुढे सारथी वीरबाहो. ॥ २९७
अशुभ शकुन होती आडवे सर्प जाती,
वदत पतिवियोगा पिंगळे[19] कर्करा[20]ती, ।

---

१. सर्व, निखालस. २. दूषण, निंदा. ३. जवळ. ४. कमलनेत्रा. (पंकज–पंकांत म्ह० चिखलांत उत्पन्न झालेलें कमल, अक्षि=डोळा.) ५. दोष. ६. विष्णु. ७. शंकर. ८. ब्रह्मदेव. ९. अवनि-(पृथ्वी)पासून झालेली सीता. १०. हे लक्ष्मणा. ११. हा शब्द दीर्घ असून वृत्तसुखार्थ न्हस्व केला आहे. १२. अरण्यांत. १३. वेद. १४. नास्तिक. १५. सीता. १६. प्राणनाथ. १७. दिराच्या. (लक्ष्मणाच्या.) १८. स्त्रिया. १९. पक्षिविशेष. २०. करकर शब्द करिती.

प्रकटित बहुकष्टां धांवती काक वामें,
निरखित भयशंके रामरामा[1] विरामें. ॥ २९८

धराधीशपत्नी धरानंदिनी हो! पुसे देवरा भूधरातें गुणी हो, ।
म्हणे, 'वोखटें चिन्ह हें काय सांगे,' न बोले, मनीं मीनला शोकगंगे.॥२९९

'सकळ सहित बंधु क्षेम रामा रमेशा,
अचळ सुख असो कां हेंचि मागें महेशा! ।
अकुशळ मज लागो सर्व त्याचें सुमित्रा!'
सकरुण अनुवादे सारसारंगनेत्रा[2]. ॥ ३००

रुदन करित पाहे नोबले[3] मातु[4] कांहीं,
चकित जनकबाळा नेणवे हेतु कांहीं. ।
निरखुनि वन गंगा चालकां रामभेटी,
वचन पडत कानीं आगळा शोक दाटी. ॥ ३०१

रचित कनकनौका नाविकें सिद्ध केली,
उतरुनि सुरगंगा पैलपारासि न्हेली. ।
गहन वन विलोकी लागल्या रूख[5] जाळी,
विरहित जनपक्षीं व्यापिलें सिंहव्याळीं. ॥ ३०२

तरुतळिं तृणशय्ये बैसली लोकमाता,
सकरुण फणिराजें वंदिले पाय माथां ।
वदनविधु विलोकी सद्गदें कंठ दाटे,
उभयनयनपंथीं सांचलें नीर[6] लोटे. ॥ ३०३

प्रदक्षिणा पंकजईक्षणीतें[7] सारुनि पायांवरि मस्तकातें, ।
ठेवोनि बोले अळुमाळ[8] संज्ञा 'अलोट[9] माते! रघुराजआज्ञा[10]. ॥ ३०४

रघुपतिचरणांतें मानसामाजि ठेवीं,
अनुदिनिं रसनेतें[11] रामरंगेंचि लावीं, ।
रघुपतिकरुणेचा मेघ बोळेल[12] जेव्हां,
नयनवदनमेळें पावसी सौख्य तेव्हां. ॥ ३०५

---

१. रामाची स्त्री. (सीता.) २. श्रेष्ठ हरिणाच्या नेत्रासारिखे नेत्र जीचे असी. (सार–श्रेष्ठ, सारंग–हरिण.) ३. न बोले. ४. कथा, गोष्ट. ५. वृक्ष. ६. उदक. ७. कमलनयनेतें. (येथें पदें समासघटित असून संधि केला नाहीं.) ८. किंचित्. ९. अलंघनीय. १०. रघुराजाची आज्ञा. (सामासिक पदें असून संधि केला नाहीं.) ११. जिव्हेतें. १२. वळेल.

यशातें महालोकांनिंदे न हालें, रमानायकें ये वनीं सांडवीलें, ।
असो, एथही रक्षिता राम एकू, पतीचिंतनीं जानकी ! सांडि शोकू.'॥ ३०६

विनवित [1]वनसत्वां [2]पंचभूतां समस्तां,
'सकळि तुम्हि कृपेनें रक्षिजे रामकांता.' ।
धरुनि हृदयधीरें पातले नी[3]जेपंथें,
रुदन करित गेला, त्यागिलें जानकीतें. ॥ ३०७

[4]अहोअंतरें [5]राघवानूज गेला, म्हणे, 'जानकीदेहिंचा प्राण न्हेला.' ।
करी शोक ते चंड मारूनि हाके, म्हणे, 'राघवा ! रक्षिलें लोकशंके. ॥ ३०८

परत परत वेगीं राममित्रा सुमित्रा !
त्यजुनि मज विदेशीं केंवि जासी पवित्रा, ।
तुजविण पळ मातें कोटि कल्पांत वाटे,
रघुपतिविण देहीं प्राण निःशेष आटे.' ॥ ३०९

अहो ! [6]सैंवराहूनि हा काळपावें गुणा आठवी जानकी प्रेमभावें, ।
सुखें भोगिलीं संगतीं वल्लभाचे मनीं आठवी, जाचणीं जीव जाचे. ॥ ३१०
करी शोक सीता, सुखें हाक मारी वनीं [7]खेचरां भूचरां खेदकारी, ।
गिरी कांपती, डोलती वृक्षजाती, मही भीजली त्याचियें अश्रुपातीं. ॥ ३११

कुशसमिधसुपुष्पां न्यावयालागिं तेथें,
कुमर ऋषिगणाचे शोधिती काननातें. ।
रुदन पडत कानीं सांगती वाल्मिकातें,
परिसत कविराजें जाणिजे जानकीतें. ॥ ३१२

त्वरें पातला तेथ वाल्मीक ताता, सुखें शांतवी हस्त ठेऊनि माथां. ।
'जगत्प्राणप्राणेश्वरी ! आदिमाते ! उठें, आश्रमीं वि[8]श्रमें, सांडि चिंते.॥ ३१३
रवी चंद्र तैसे गुणी पुत्र दोनी फळें पात्रसी, जाण लावण्यखाणी ! ।
अयोध्यापदीं राज्य त्यांचेच्चि माथां, नको वाढऊं [9]वेंड उद्वेगचिंता.' ॥ ३१४

जननिजनक दोघे भेटलीं त्यांचिऐसीं,
परम सुख [10]सितेसीं लाधलें हो विशेषीं. ।

---

१. अरण्यांतील प्राण्याला. २. पृथ्वी उदक तेज वायु आणि आकाश. ३. येथें वृत्तसुखार्थ 'निज'-शब्द दीर्घ केला आहे. ४. दिवसाच्या अंतरानें. (अहन्=दिवस.) ५. येथें वृत्तसुखार्थ 'नु' दीर्घ केला आहे. ६. स्वयंवर. ७. आकाशगामी. ८. विश्रांति घे. ९. थोर. १०. सीतेसीं.

धरुनि कर गुरूनें दाविलें नीजपंथा[1],
सुखसदन प्रवेशे, दूरि त्यागूनि चिंता. ॥ ३१५

ऋषीअंगना[2] साजणी सर्व स्नेहें, सदां रक्षिती पाळिती प्राणमोहें, ।
महा तोषली, मानिली हाणि शोका, सुमित्राकडे आइका वृत्त जें कां. ३१६

अहो! राजबंधू[3] अयोध्येसि जातां, करी शोक संताप अद्भूत वेथा, ।
मुखें सारथी शांतवी स्नेहवंतु म्हणे, 'आइकें भूप! मागील मातु. ॥ ३१७

महेंद्रामुखें देवेंदुर्वासयातें बहु प्रार्थिलें कैकयीप्राणनाथें[5], ।
भविष्यें वदें माझिया आत्मजांचीं, ऋषी[6] मात बोले भविष्योत्तरांची. ॥ ३१८

बळी पुत्र होतील ते जानकीतें, यशस्वी जगीं वाटिवे ख्यातिवंते, ।
अयोध्यापुरीं राज्य त्यांचेचि माथां असे, हेंचि जाणोनि तूं सांडिं चिंता.'॥

अयोध्यापुरा पातला रामबंधु, महेंद्रासनीं लोकलावण्यसिंधु, ।
मुखीं मौनमुद्रा, मनीं हर्ष मंदु, दिसे म्लान तो, लोचनीं अश्रुबिंदु. ॥ ३२०

फणीनायकें[7] वंदिलें मौळि[8] पायां, म्हणे[9], 'ज्ञानरूपा! त्यजीं मोहमाया, ।
विशेषज्ञ तूं, जाणता सर्व ताता! न लोटे कदां दांडगी काळसत्ता. ॥ ३२१

घडे योग तो एक भोगाचिलागीं, भंवीं[10] जन्मला, लागला मृत्युमार्गीं, ।
दिसे मोद[11] तो हेतु[12] खेदासि होय, चढे तें पडे येथ आश्चर्य काय? ॥ ३२२

नको जौंकळों[13] लोकनिंदा[14]विवर्ती, जगीं सत्य[15] नाचेल निर्दोषकीर्ती, ।
अपापापवित्राचिया चक्रवर्ती जगत्पावना! राघवा! पुण्यमूर्ती.' ॥ ३२३

हृदय रघुवराचें सुहृदा[16]चेनि बोलें
अमृतभरित झालें, चित्सुखाचेनि डोलें, ।
म्हणत फणिवरातें 'लोकवार्ते विचारीं,
सविकळ निजकृत्या त्यागिलें दीन चारी. ॥ ३२४

परामर्श राजा प्रजेचा करीना, विचारूनियां दुःख त्याचें हरीना, ।
अधःपात हो वेद त्यालागिं बोले, तयालागिं त्वां पाहिजे शोध केले. ॥ ३२५

---

१. निजपंथा. २. या सामासिक पदांचा संधि कर्तव्य असून केला नाहीं. ३. लक्ष्मण. ४. सर्ग ५१ श्लोक ७–२७ पहा. ५. दशरथानें. ६. दुर्वासऋषि. ७. लक्ष्मणें (सर्ग ५२). लक्ष्मण हा शेषाचा अवतार म्हणून त्याला फणिनायक (फणींचा-सर्पांचा स्वामी) असें म्हटलें आहे. ८. मस्तक. ९. खिन्न झालेल्या रामाचें लक्ष्मण सांत्वन करतो. १०. संसारीं. ११. आनंद. १२. कारण. १३. पोळों. १४. लोकांनीं केलेल्या निंदारूप भोंवऱ्यांत. १५. जय पावेल, उत्कर्षानें असेल. १६. येथें 'सु' वृत्तसुखार्थ दीर्घ केला आहे.

सरळ सरडदेहो [1]ब्रह्मशापें नृगाचा;
मिथिळ [2]निमि विदेही पावला मृत्यु साचा; ।
असुरगुरुअवज्ञें वृद्ध झाला [3]ययाती,
म्हणउनि निर्जनेमा [4]रक्षिजे बुद्धिवंतीं.' ॥ २२६

१. सूर्यवंशोत्पन्न नृग नांवाचा ब्राह्मणभक्त राजा होता. यानें पुष्करतीर्थीं अनेक कोटी सवत्स गाई ब्राह्मणास दिल्या. त्यांत असें झालें कीं जी एक गाय पूर्वी एका अग्निहोत्री ब्राह्मणास दिली होती ती चुकून राजाच्या कळपांत परत आली. राजानें न जाणतां तिचें पुनर्दान केलें, तेव्हां ती दुसऱ्या विप्राच्या वांट्यास आली. पहिल्या विप्रानें आपल्या गाईचा पुष्कळ शोध केला पण ती त्यास दिसली नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं ती गाय त्या दुसऱ्या ब्राह्मणाच्या घरांत आढळली. तेव्हां अग्निहोत्री यानें 'हे शबले, इकडे ये' असें म्हणून त्या धेनूला बोलाविलें. त्याप्रमाणें ती त्याजपाशीं आली. यावरून ती त्याची असें ठरलें. तेव्हां त्या उभय ब्राह्मणांत कलह माजला. परमसंतप्त होऊन ते दोघे नृगराजाकडे आले. पण त्यानें निर्णय अनेक दिवस सांगितला नाहीं. तेव्हां प्रथम प्रतिग्रहीत्या (दान घेणाऱ्या) ब्राह्मणानें राजास शाप दिलाः—'हे राजा! अर्थिजनाच्या कार्यसिद्ध्यर्थ ज्यापेक्षां तूं दर्शन देत नाहींस, त्यापेक्षां सर्व प्राण्यांस अदृश्य असा तूं कृकलास (सरडा) होशील आणि या रूपानें हजारों वर्षें गर्तेमध्यें पडून राहशील.' या शापाप्रमाणें नृगराजा सरडा झाला. पुढें कृष्णानें हस्तस्पर्श करुन याचा उद्धार केला. (उत्तरकांड—सर्ग ५३-५४. महाभारत—अनुशासनपर्व, अध्याय ७०). २. निमि हा सूर्यवंशीय इक्ष्वाकुराजाच्या शंभर पुत्रांतील दुसरा पुत्र. यानें बहुत यज्ञ केले. पंचसहस्रात्मक यज्ञाच्या समयीं त्याचा कुलगुरु वसिष्ठ यास इंद्राकडे जावयाचें होतें, तेव्हां 'मी आल्यावर यज्ञ कर' असें त्यानें राजास सांगितलें. तें न मानतां निमीनें गौतमऋषीस उपाध्याय करुन यज्ञास आरंभ केला. इतक्यांत वसिष्ठ परत इंद्राकडून आला. तेव्हां त्याला राग आला व त्यानें 'तुझें देहपतन होईल' असा शाप राजाला दिला. त्यानेंही तोच शाप वसिष्ठास दिला. याप्रमाणें निमिराजा मृत्यु पावला. पुढें उभयतांचे देह पतन पावले. ब्रह्मदेवानें त्यांस पुनः देहधारण करण्याची आज्ञा केली. ती मान्य करुन वसिष्ठानें मित्रावरुणापासून पुनः देहधारण केलें. पण निमीनें तसें केलें नाहीं. देही होऊन सुखदु:खें भोगावीं त्यापेक्षां विदेहस्थिति बरी असें समजून तो विदेहच राहिला. निमि विदेह झाल्यामुळें त्याच्या वंशजास 'वैदेह' 'विदेही' असें नांव पडलें. निमीचा देह मंथन करुन जो पुत्र निर्माण झाला, त्याचें नांव मिथि, म्हणून मिथिराजाच्या वैजयंत नामक नगरास मिथिला असें नांव पडलें. (उत्तरकांड—सर्ग ५५—५७). ३. ययाति हा नहुषराजाचा दुसरा पुत्र. याचें लग्न असुरगुरु शुक्राचार्य याची कन्या देवयानी हिच्याशीं झालें. असुरांचा अधिपति वृषपर्वा याची कन्या शर्मिष्ठा ही देवयानीसमागमें दासी म्हणून ययातिराजाकडे आली होती. तिचें अवलोकन सुद्धां करूं नये अशी शुक्राची राजास आज्ञा होती. पण पुढें शर्मिष्ठेला त्यापासून अनु, द्रुह्यु आणि पुरु असे तीन पुत्र झाले. ही गोष्ट देवयानीनें स्वपित्याला निवेदन केली. तेव्हा शुक्राचार्यांस अनिवार राग आला आणि त्यानें 'हे राजा, ज्याअर्थी शर्मिष्ठेशीं संग करुन माझा अपमान केलास, त्याअर्थी जरा तुला ग्रस्त करो' असा ययातीला शाप दिला. (आदिपर्व—अध्याय ८४-९३; उत्तरकांड—सर्ग ५८ श्लोक ७—२४). ४. आपले नियम, राजधर्म.

महाद्वार शोधीत ये वीरें[1] [2]जेठी, उभा सन्मुखी देखिला श्वान[3] दृष्टी, ।
म्हणे, 'राजया जाणवीं शीघ्र मातू, असें पीडिलों सांगणें त्या वृतांतू.॥ ३२७
अहो ! देवगेहीं, नराधीशगेहीं, तथा विप्रगेहीं, महायागगेहीं, ।
नव्हे योग्य मी यावया हीनयोनी[4], तयालागिं तूं राजया येथ आणीं'.॥ ३२८
सुमित्रासुतें सांगतां चोज मातू, उठे आदरें पातला तेथ नाथू, ।
नमस्कार केला, वदे श्वान तोंडें, 'असें नापराधी[5], तया वेणुदंडें[6] ॥ ३२९
यतीनें[7] पथीं ताडिलें कोणकाजा ? तया नायकू तूं महाराज ! राजा'. ।
तयानंतरें आणवी भिक्षुकातें, नमस्कारिला मस्करी[8] न्यायवंतें. ॥ ३३०
दिसे न्याय तो दोष संन्यासियाचा, उगा राम तो स्वीकरी मौनवाचा. ।
मनें जाणतां श्वान बोले प्रकोपी म्हणे, 'यासि तूं कौळपत्यासि ओपी.'॥ ३३१
[9]परिव्राजकातें बहू गौरवीलें, शिवा[10]गारिंचें[11] कृत्य स्वाधीन केलें. ।
शिवस्वापहारें[12] यती श्वान झाला, शुना[13] सूकृती सद्य स्वर्गासि गेला.॥ ३३२
ज्यां मित्रजेचा[14] तटवास नेमें ते पातले तापस, देवरामें ।
सन्मानिले भोजनदानपानीं, संतोषले ते वदती सुवाणी. ॥ ३३३
'लवण[15] असुरनामा क्रूरकर्मा त्रिलोकीं,
कुमर खर मधूचा भानुजेच्या[16] तटाकीं, ।
द्विजऋषिगणधेनू[17]कोटि मारूनि भक्षी,
करुनि वध तयाचा दीनलोकांसि रक्षीं.' ॥ ३३४
परिसत रघुराया नावरे क्रोध चित्तें,
भरतअनुज[18] धाडी दुष्ट दंडावयातें, ।
सबळदळबळेसीं वीर शत्रुघ्ननामा,
सहज [19]तृतियवस्ती[20] येत वाल्मीकिधामा. ॥ ३३५

---

१. लक्ष्मण. २. बळिष्ठ. ३. उत्तरकांडाच्या ५९ व्या सर्गांपुढील प्रक्षिप्त सर्ग १-२ पहा. ४. नीचकुलोत्पन्न. (कुतरा.) ५. मी अपराधी न असें. ६. वांशाच्या काठीनें. ७. संन्यासी विप्रानें. ८. संन्यासी. ९. दानाध्यक्षतेस, धर्मद्रव्यदानाधिकार. १०. यतीला. ११. देवसदनींचें. १२. धर्मधन हरण केल्यामुळें. १३. कुत्रा. १४. सूर्यकन्या जी यमुना तिचा. (मित्र=सूर्य.) १५. हा मधुदैत्यापासून कुंभीनसी राक्षसीस झालेला पुत्र. (सर्ग ६०-६३.) १६. यमुनेच्या. १७. येथें वृत्तसुखार्थ 'धेनु'शब्द दीर्घ केला आहे. १८. भरताचा अनुज (धाकटा भाऊ) शत्रुघ्न. भरतअनुज हा सामासिक शब्द असून संधि केला नाहीं. अशीं उदाहरणें पुष्कळ या काव्यांत सांपडतात. १९. 'तृतीय' हा शब्द वृत्तसुखार्थ ऱ्हस्व केला आहे. २०. वसति=रात्रि, प्रवासांत विश्रांति घेण्याचा समय.

उलंघूनि **गंगा** महातोय जेथें ऋषीमंडळीमाजि **वाल्मीकि** तेथें. ।
सुखें पातला तेथ वस्तीसि रावो, ऋषीं ओपिला **पर्णशाळेसि** ठावो.॥ ३३६
ऋषी आश्रमामाजि हो तेचि राती धरानंदिनी[1]लागीं झाली प्रसूती; ।
ऋषीबाळकें बोलती **वाल्मिकी**तें, 'गुणी जांवळे[2] बाळ झाले **सितेतें**'. ३३७

कुशलवकरमुष्टी[3] पातला वृद्ध तेथें,
द्वय कुमर सुचिन्हीं लक्षिले स्नेहवंतें. ।
कुशलवकरतोयें सिंचिले सिद्धमंत्रें,
रघुकुळमणिमाळे ओविले नामगोत्रें. ॥ ३३८

कुशें[4] स्पर्श केला करें अग्रजातें[5], लवें[6] सिंचिलें तोय पैं मागिल्यातें; ।
तयांलागिं तीं ठेविलीं साच नामें, महामंगळीं जागती पुण्यधामें[7]. ॥ ३३९
निद्रास्थळीं तो वर्तला[8] सुशब्दू, आकर्णनीं तोषत **रामबंधू**[9], ।
जीवंत येथें जननी जगाची, जाणोनि प्राशी सरिता[10] सुखाची. ॥ ३४०
असो. लोटली यामिनी[11], सुप्रभातें ऋषी राजआज्ञेन पश्चीमपंथें, ।
निघे सत्वरा **राघवानूज** राजा सवें **भार्गवादीक** देवेशकाजा. ॥ ३४१
ऋषी सांगती, 'दैत्य[12] प्रख्यातवंतू महाराजमांधा[13]तयालागिं मृत्यू, ।
असे जाण आला तयाचेनि हातें, वळेना बळें सांग कैसेनि पातें. ॥३४२
हराहस्तिचा शूळ वर्ते तयापें, तयालागिं तो संहरी विश्व कोपें, ।
सदा मंदिरीं शूळ ठेवोनि जाय, वनीं श्वापदें नित्य मारूनि खाय. ॥३४३
तये काळ संधीसि टाकूनि जाई, त्वरें हस्तकीं शूळ साधूनि घेई, ।
तयानंतरें मारितां क्लेश नाहीं'. वदे **भार्गवा** वीर, 'कौतूक पाहीं.' ॥ ३४४
पुरी मधूची रमणीक ठावो, **मित्रात्मजानीर**[14] तरोनि रावो, ।
येऊनि पाहे तंव जीवघाती भक्षार्थ गेला, विचरे वनांतीं. ॥ ३४५

असुर सदनपृष्ठींहूनि ठाके पुढारां,
तव अरिवर आला मस्तकीं प्रेतभारा; ।

---

१. सीता. २. जुळे. ३. दर्भ व दर्भाचीं मूळें. ४. दर्भानें. ५. वडिलातें. ६. दर्भाच्या मूळानें. ७. पुण्यगृहें. ८. झाला. ९. शत्रुघ्न. १०. नदी. ११. रात्र. १२. लवणासुर. १३. हा मांधाता राजा सुरलोकविजयार्थ इंद्रलोकास गेला असतां, 'तूं लवणासुरास जिंकून मग मजकडे ये' असें इंद्रानें त्यास सांगितलें. त्यावरून तो परत आला आणि लवणासुरावर ससैन्य चालून गेला. त्यानें रुद्रदत्त शूळ टाकतांच राजाचें सैन्य दग्ध झालें व तोही तत्काळ मरण पावला. १४. मित्राची (सूर्याची) आत्मजा (कन्या) यमुनानदी तिचें नीर (पाणी).

निरखित नरराया क्षोभला जेंवि काळू
प्रकट विकट हाके गाजवी ब्रह्मगोळू. ॥ ३४६
म्हणे, 'जाण, लंकेश मातूळ माझा, तया राघवें मारिलें दारकाजा, ।
असे शल्य तें मानसीं थोर मातें तयाचाहि हा फेड घेईन घातें.' ॥ ३४७
नरें ताडितां कोटिच्या कोटि बाणीं, तृणातुल्य तो एक लक्षासि नाणी; ।
घनाचेपरी वृक्ष पाषाण ताडी, नराधीश तो बाणधारीं विखंडी. ॥ ३४८
असुरकरनिघातें मूर्छना थोर आली,
सुरवरऋषिराया वेधना वाड धाली. ।
पुनरपि रघुराणा सत्वरा सावधानें,
असुरनिधन योजी, सत्वरा घात जेणें. ॥ ३४९
स्वहस्तें मधूकैटभालागिं पूर्वी वरें निर्मिला बाण जो ब्रह्मदेवीं, ।
पुढां कारणा ओपिला राघवातें, रमानायकें दीधला बांधवातें. ॥ ३५०
गुणीं योजिला सज्जिला तोचि बाणू, थरारी मही मेरु कैलास स्थाणू. ।
उरीं भेदला ज्यापरी वज्रकोटी धरावाहकें सूदले पाय पोटीं. ॥ ३५१
निघातें महावृक्ष रक्तांग झाले, नदी ओघ ते शोणिताचे निघाले ।
नभीं निर्जरीं जैजयाकार केला, बहू पुष्पकीं सांडिती पुष्पझेला. ॥ ३५२
लवण वधुनि झाला रामबंधू यशस्वी,
सुरवरऋषिराणे सिद्ध झाले तपस्वी; ।
म्हणति, 'सहित सिद्धी वस्ति संतोषकाजा,
करुनि सकळ राहें, होइं तूं येथ राजा.' ॥ ३५३
वर्षै बारा लोटल्यानंतरें हो! रामाभेटी चालिला आदरें हो, ।
वस्ती तेथें मागुती वाल्मिकीचे ग्रामीं राहे आवडी प्रेम त्याचें. ॥ ३५४
तयास्थानकीं लोटल्या मध्यराती लवांकुश ते रामचारित्र गाती, ।
विणा ताळ तंत्रीश्रुतीतानमानें, मनें श्रावितां अमृतीं स्वाद सानें. ॥ ३५५
उंपनयन तयांचें वाल्मिकें सांग केलें,
सकळनिगमशास्त्रीं ज्ञानसंपन्न झाले. ।

१. शत्रुघ्नाला. २. मामा. ३. कायकोसाठीं. ४. तो लवणासुर. ५. थोर. ६. मरण. ७. रक्ताचे. ८. देवीं. ९. लहान. १०. मुंजीबंधन. ११. वेद.

मुनिकृत शतकोटी रामचारित्रपाठें,
करिति मधुर गानें किंनरांचेनि कंठें. ॥ ३५६
पुसति सकळ संगी कैकयीनंदनातें,
'करिति कवण येथें सुस्वरीं गायनातें?' ।
म्हणति ऋषि, 'गुरूचा पार कोणा कळेना,
त्यजुनि वचन मौन्यें यान कांहो कराना?' ॥ ३५७
उठुनि मग प्रभातें पातले रामभेटी,
लवणवधबळाच्या जाणवी सर्व गोठी. ।
दिवस दश अयोध्ये सेविले रामसंगा,
पुढति मधुपुरीतें पाठवी राजभोगा. ॥ ३५८
ऋषिकुमर अयोध्ये ब्रह्मचारी निमाला,
उचलुनि जनकें तो राजद्वारासि नेला. ।
म्हणति, 'मरण ऐसें राजयाचेनि दोषें,
झडकरि करिं यत्ना, लिप्त होसी अपेशें.' ॥ ३५९
मुनीनारदें बोलिजे धर्ममूर्ती, 'तपा आचरे जेथ कां हीनयाती, ।
अकाळीं जनीं पाविजे नाश तेथें, तयालागिं त्वां शोध कीजे तयातें.' ॥३६०
अवनिपति विमानीं मेदिनीचक्र शोधी,
भ्रमत जंव दिशांतें दक्षणे पंथ भेदी, ।
तंव गिरि तरु दाटी रम्य कासार जाणा,
निकटतट किरातें मांडिलें धूम्रपाना. ॥ ३६१
पुसे राम त्या, शूद्र बोलेंचि सांगे म्हणे, 'पावणें देवतादेह आंगें, ।
तयालागिं मी आचरें या तपातें रमानाथ तो क्षोभला त्या निघातें.'॥ ३६२
गुणीं जोडिला छेदिला कंठ बाणें, महीं पातलीं निर्जरांची विमानें, ।
वरा ओपितां आदरें राम बोले, 'ऋषीनंदना पाहिजे वांचवीलें.' ॥ ३६३
तया उत्तरें तोषला देवराणा, ऋषीबाळका ओपिलें जीवदाना, ।
तया वेगळे आन होते निमाले रमानाथवाक्यें द्विजा प्राप्त झाले. ॥ ३६४
अगस्त्याचिया कानना राम आला, वनश्री विलोकें महानंद झाला. ।

---

१. गंधर्वांसारख्या. २. गमन. ३. गोष्टी. ४. मरण पावला. ५. बापानें, द्विजानें. ६. सरोवर. ७. शूद्रानें. ८. देवांचीं. ९. अन्य.

पुढां वांदिये पातले दोनि पेंक्षी मुखें बोलती, 'राजया! न्याय रक्षीं.' ॥ ३६५

घुबड वचन बोले, 'गेह माझें, श्रिरामा!
दवडुनि मज, नांदे, गृध्र तेथें दुरात्मा.।
वदत विण समंधें गृध्र बोले वितंडू,
म्हणत मग प्रधाना, 'कैंवि याचा निवाडू?' ॥ ३६६

'नसे मेदिनी गेह त्याहूनि आधीं असे निर्मिलें' गृध्र बोले विनोदीं.।
'तरू निर्मिल्यानंतरें धाम केलें' रमानायकातें दिवांभीत बोले. ॥ ३६७

म्हणति सकल मंत्री, 'गृध्र साचार वाचे
दवडुनि घुबडातें, ओपिजे गेह याचें.'।
चतुरनरवरिष्ठें सत्य जाणोनि पोटीं
निवडुनि घुबडातें ओपिली पर्णकूटी. ॥ ३६८

तरू निर्मिल्यानंतरें पक्षिजाती, तरू आश्रयें पक्षियांलागिं वस्ती.।
अहो! दुष्ट हा गृध्र झोंबे सकामें वधालागिं त्या काढिला बाण रामें.॥ ३६९
महा गाजली तेथ आकाशवाणी म्हणे, 'राजया! वीरकोदंडपाणी!।
क्षणी मारिसी हा नव्हे योग्य मारा समाचार आईक रामा! उदारा!॥३७०
नव्हे गृध्र हा, भूपती ब्रह्मदत्तू, ऋषीगौतमें शापिला याचि हेतू,।
तया वाढिलें भोजना मांसपेया तया पातकें पावला गृध्रकाया. ॥ ३७१
मुखें बोलतां तत्वतां तेचिकाळीं नभोयान त्या पातलें हेममाळी.।
नमी राघवा कीर्ति निर्दोष वानी, पडे सूक्ती दिव्यदेही विमानीं. ॥३७२
अगस्त्याचिया आश्रमा सर्व आले, महीं दंड तैसे नमस्कार केले.।
ऋषीकुंभजें ओपिलें भूषणातें महीमोल जें माणिकें दीप्तिमंतें. ॥ ३७३
पुसे राम तो आदरें कुंभजातें, 'अहो! स्वर्गिंची वस्तु हे कैंवि येथें?।
कळा मानवी येथ पावे विरामा, गमे निर्मिता यासि हो विश्वकर्मा.' ॥ ३७४
मुनी सांगतो, 'येथ कौतूक आहे, तडागीं दिसे पैल तें प्रेत पाहें,।

---

१. वाद करणारे. २. हें गृध्रोलूकाख्यान उत्तरकांडांतील ५९ व्या सर्गापुढच्या तीन प्रक्षिप्त सर्गांत आहे. ३. घुबड. दिवांध असेंही घुबडाला म्हणतात. ४. सत्य. ५. कालगौतम मुनीच्या शापानें गृध्रयोनि पावलेला एक प्राचीन राजा. (प्रक्षिप्त सर्ग ३, श्लोक ५६.) ६. देह. ७. विमान. ८. सर्ग ७६. ९. सर्ग ७६ श्लोक ३०–३२ यांत या भूषणाचें वर्णन आहे. १०. अगस्त्यमुनीतें. ११. सर्ग ७७–७८.

महीपाळ तो श्वेत वैदर्भदेशीं, तपें जोडिलीं त्याबळें स्वर्गवासी. ॥ ३७५
वसतचि परि स्वर्गीं जाकळे तो क्षुधेनें,
तळमळ करि, त्यातें बोधिलें ब्रह्मयानें. ।
'खडतरतपयोगें बैसका स्वर्गपाटीं,
अतिथिपुजन नाहीं अन्नदानादि गांठी. ॥ ३७६
तयालागिं तूं भूतळा नित्य जाई असे आपुलें प्रेत जें तेंचि खाई, ।
सदां भक्षितां मांस पावेल वृद्धी ययावेगळी नेदेखों आन बुद्धी. ॥ ३७७
अगस्त्याचिया दर्शनाचेनि काजें महानिंद्य हें कर्म खंडेल तूझें, ।
सवीमान तो नित्य येवोनि लाहें मुखें आपुलें मांस खाऊनि जाये.' ॥ ३७८
'दिठी देखतां मी तया राघवेंद्रा ! सुखें तुष्टलों कुश्चिता त्या दरिद्रा, ।
कृपीं खंडिलें पुण्य देवोनि दानां पुजेलागिं हो ओपिली वस्तु जाणा. ॥ ३७९
अमोलीक हे राजया ! योग्य भासे, असे राव तो देवतांचेनि अंशें ।
तयालागिं हे द्यावया दोष नाहीं रमावल्लभा ओपिलें क्षेम बाहीं.' ॥ ३८०
जडी तेंचि रत्नाचिया कंकणातें करीं सूदलें आदरें रामनाथें, ।
फळें भक्षिलीं दिव्यशाखाविशेषीं, निशा कंठली संगती सावकाशीं. ॥ ३८१
पुसे राम त्या, 'दंडकारण्य यातें जनें बोलिजे, काय तो हेतु येथें?' ।
म्हणे, 'तेंचि आकर्णि, तूं सावकाशीं, मनूपुत्र इक्ष्वाकु ये सूर्यवंशीं. ॥ ३८२
तया नंदनें दंडकें वीर्यतेजें, वना येइजे पारधीचेनि काजें, ।
तया काननीं आश्रमीं भार्गवाचे वसे बाळिका आरजा नाम तीचें. ॥ ३८३
तपोनेम सारावया तात गेला, ऋषीमंदिरीं दंडभूपाळ आला; ।
दिठीं देखतां रूपलावण्यधारी बळें मीनला संगमा कामचारी. ॥ ३८४
रजोदर्शनें शोणितें लिप्त आंगीं नृपा गेलिया, पातला शुक्र रागीं, ।
दिठीं देखिलें आत्मजेच्या वृतांता, बळें क्षोभला कोप जैसा कृतांता. ॥ ३८५

---

१. श्वेत–हा विदर्भदेशाचा राजा सुदेव याचा पुत्र. यानें उत्तम तप केलें म्हणून यास ब्रह्मलोकप्राप्ति झाली. परंतु याचे हातून अन्नदान घडलें नव्हतें म्हणून तेथें क्षुधा बाधूं लागली. तेव्हां ब्रह्मदेवाच्या आज्ञेनें तो भूलोकास आला आणि आपलें पुष्ट प्रेत भक्षण करूं लागला. या दुःखापासून त्याला अगस्त्यमुनीनें मुक्त केलें. तेव्हां त्यानें मुनीला पूजासमयीं दिव्य भूषण (कंकण) दिलें. (सर्ग ७८.) २. व्याकुळ होय. ३. न देखो. ४. घातलें. ५. सर्ग ८०–८१. ६. भृगुवंशज भार्गवकन्या–अरजा. हिचें कौमार्य इक्ष्वाकुपुत्र दंडक यानें भ्रष्ट केलें. ७. दृष्टीनें. ८. मिळाला, लागला. ९. कामासक्त, कामातुर. १०. यमाला.

म्हणे, 'राव तो सर्वसेनाप्रजेसी पुरें पाटणें पुत्रदाराधनेसीं, ।
जळो, भस्म हो, सत्वरा सप्तरात्रीं' तया बोलतां भस्मली भूतधात्री. ॥ ३८६
बहूकाळ तो आतला शून्य देशू, नसे वृक्ष ना पक्षियां तोयलेशू, ।
तयानंतरें नारदें पर्वतातें कळी लाविली वर्णनाचेनि पंथें. ॥ ३८७
मही पीडिली भांडतां विंध्य मेरू रवीरोधनें माजला अंधकारू, ।
ऋषीनिर्जरीं संकटीं थोर मातें बहु प्रार्थिलें शांतवीं पर्वतातें. ॥ ३८८
दिशे दक्षिणे पातलों देवकाजें, दिठीं देखतां विंध्यशैलाद्रिराजें, ।
त्वरें धांवला ठेविलें मौळिपायीं पडे आडवा भावनानम्र देहीं. ॥ ३८९
तया नेमिलें तत्वता वाक्यनेमीं नुठावें तुवां मागुती जैं फिरें मी, ।
बहुआदरें मानिला बोल माझा प्रकाशे रवी भूतळीं उष्णतेजा ॥ ३९०
ऋषीसंगतीं येथ मी वस्ति केली बहू तापसी पातले सिद्धमेळीं, ।
तयानंतरें लोकसंचार झाला दशा पातली दोष दुष्काळ गेला. ॥ ३९१
घनें देवराजें चमत्कार केला घनीं अंबरीं धान्यवर्षाव झाला ।
तयालागिं हो ! दंडकारण्य यातें जनीं बोलिजे बोधिलें राघवातें. ॥ ३९२
चारित्र तूझें सुपवित्र रामा ! चारी युगें पावनकीर्तिधामा' ।
ऐशा रितीं गौरविलें नरेंद्रा, तोषें मनें पाठवि राजभद्रा. ॥ ३९३
अयोध्यापुरा पातला, बंधुवर्गीं नमस्कारिला आदरें अंतरंगीं. ।
निमाला द्विजा आणिला पुत्र भेटी, म्हणे, 'धन्य तूं राजया एक सृष्टी.'॥ ३९४
पुरीं पुष्करीं जैजयाकार झाला. जनीं सज्जनीं होम उत्साह केला. ।
वसिष्ठादिकां सूहृदां बांधवांतें वदे मानसीं, 'वासना एक वर्ते. ॥ ३९५
मखा राजसूयासि वाटे करावा धराधारकें, बोलिजे देवदेवा!' ।
'बहू पीडिती मेदिनीपाळ याणें, करीं अश्वमेधासि निर्दोषवाणें. ॥ ३९६
वृत्रासुराच्या हननें सदोषी तो वाजियज्ञें मघवा अदोषी. ।

१. शाप देई. २. भार्गवानें शाप दिला कीं—हा राजा आपला पुत्र बलवाहन यांसह सात रात्रींत वध पावेल आणि शतयोजनपर्यंत याचा देश इंद्र पांशुवर्षणानें भस्म करून टाकील. (सर्ग ८१ श्लोक ७–१०.) ३. जाहला. ४. सर्ग ८२ पहा. ५. येथें 'सुहृद'शब्दांतील 'उ' वृत्तसुखार्थ दीर्घ केला आहे. ६. राजानें. (सर्ग ८३ पहा.) ७. राजे. ८. या राजसूय यज्ञानें. ९. दधीच ऋषीच्या अस्थींचें वज्र इंद्रासाठीं विश्वकर्म्यानें सिद्ध केल्यावर इंद्रानें तें वृत्रासुरावर फेंकलें, तेव्हां तो मरण पावला. वृत्रहननानें प्राप्त झालेल्या ब्रह्महत्यादोषाच्या निरसनार्थ इंद्रानें अश्वमेध केला. (सर्ग ८६.) १०. इंद्र.

स्त्रीदेह भावें पिडितां ईडानें झाला नरत्वें हय मेधपुण्यें. ॥ ३९७
महीमंडळीं सोडिजे वारुवातें, बळी जो धरी मागिजे युद्ध त्यातें, ।
धनालागिं ना पीडिजे राजयातें असे संपदा जे तुळे सागरातें.' ॥ ३९८
मना आणिलें सोडिलें शामकर्णा, तयापाठिसीं चालिली वीरसेना, ।
असंख्यात वाजी करी कोटि गाढे मैंदा गाळिती, गर्जती जे गडाडें. ॥ ३९९
रथाचीं शतें लेखितां कोटि खर्वी, दिसे भूमि भारावली वाढ उर्वी, ।
अनेकाकृती केतु ते हेमदंडी, पताकीं महावात वाजे झडाडीं. ॥ ४००
पुढां लोटले पायिचे वीर देखा महाशंखपद्मार्बुदीं होत लेखा, ।
तिखा शस्त्रजाती कळा चंड फांके, तया तीव्रतेजें रवीबिंब झांके. ॥ ४०१
शतें एक अक्षौहिणी रामसेना तयामाजि नामाथिले वीर नाना, ।
बळी तीस अक्षौहिणी वीर संगें तया श्रेष्ठ तो कैकयो वीर आंगें. ॥ ४०२
पुढां तीस अक्षौहिणी वीरसेना तयामाजि तो नाथ शत्रुघ्न जाणा, ।
बळें लागलीं पंचधा वीरवाद्यें महाव्योम नादावलें त्या निनादें. ॥ ४०३
करीं पत्र तें बांधिलें अश्वभाळीं, 'बळी वीर जो आगळा भूमिपाळीं, ।
बळें वारुवा वाढिवातें धरावें अनेका गतीं झूज त्याणें करावें.' ॥ ४०४
हेमपत्र सुरत्नेसीं अर्थतेसी सुमंडित, ।
आदरें बाधिलें वोजा अश्वराजासुमस्तकीं. ॥ ४०५
'महावीर जो आननीं स्मश्रु वाहे, धरावें बळें शामकर्णासि लाहें, ।
असे अश्व हा राघवा राजयाचा सवें मेळ चाले बळें रक्षकांचा. ॥ ४०६
अहो कैकये कारुषा वाटधाना विराटा सुरासेवना सेतु हूणा ।
किराता कुरूकोशळा कुंतळातें विदर्भा क्रथा जिंकिलें चाष्कणातें, ॥ ४०७
कऱ्हाडादि कर्नाटका घर्मघोटा पुलिंदा बहू बर्बरा नाटपाटा, ।
महाराष्ट्रसौराष्ट्रसौवीरदेशा बळें जिंकिलें जोडिलें कीर्तिघोषा. ॥ ४०८

१. राजविशेष, त्यातें. प्रासाकरितां त्यानें. इल (इड) हा वाल्हीक देशाचा राजा, हा मृगया करीत करीत जेथें कार्तिकस्वामीचें जन्म झालें त्या शरवण नामक वनांत आला. येथें जो पुरुष येईल तो स्त्रीत्व पावेल असा शाप या स्थळास असल्यामुळें हा इल राजा स्त्रीत्व पावला. पुढें उमा प्रसन्न झाली. तिच्या वरानें एक मास स्त्री व एक मास पुरुष अशी अवस्था राजास प्राप्त झाली. नंतर यानें अश्वमेधद्वारा हरसंतोष करुन पुरुषत्व मिळविलें. (सर्ग ८७-९०.) २. अश्वाला. ३. गज. ४. मदोदका. ५. तिखट ६. मिशा.

पुढां अंगवंगादि कालिंग वाटा महाभोज कांबोज काश्मीर घाटा ।
उलंघोनियां गौडबंगालपंथी भयें भूपती साउमे दोन होती. ॥ ४०९
अहो ! मागधा माळवा केरळातें, पुढां चोळ पांचाळ माल्याळ पंथें, ।
बळें द्राविडा सिंहळा सिंधुभागीं वधूमंडळा जिंकिलें येत मार्गी. ॥ ४१०
बळें मद्रका सैंधवा मत्स्यकंका मरू पाप्रपारी शवा पारसीका, ।
त्रिगर्ता सुन्हा शाल्वजालंधरातें महीपाळ नेपाळजा कौशिकातें. ॥ ४११
बहू देश लंघूनियां पुण्यपंथीं ऋषीवाल्मिकीआश्रमा अश्व जाती, ।
लिळे पातले, देखिले राजपुत्रें, लवें लक्षिला पारधी पद्मनेत्रें. ॥ ४१२

मुनिकुमरसुसंगीं [2]राघवी श्रेष्ठ जाणे,
[3]समिधफळदळार्थीं प्रेरिलासे ऋषीनें. ।
सहज अनुज गेहीं [4]एकटा चोज झालें,
धरुनि धवळ वाजी, पर्वणें थोर केलें. ॥ ४१३

तयाभाळिचें तोडिलें पत्र हातें, मुखें वाचिलें ओपिलें बाळकांतें. ।
करें कंठिची शृंखळा सौरें बोढी, महा अश्व तो बांधिला वृक्षपेडी. ॥ ४१४
मुखें वारितां, नायके, मात बोले, ऋषी अंगना मानिती विघ्न आलें. ।
ग्रिवे थापटी हस्तकें [6]वारुवाचे, म्हणे, 'देखणे लक्षणें कोण नाचे ? ॥ ४१५
असे निश्चयें आपुली वस्तु देखा, तयालागिं घेतां मना कोण शंका ? ।
कृतांतासही येथ लावीन शिक्षा, रणीं क्षत्रियांलागिं दावीन दीक्षा.' ॥ ४१६
दिठीं देखतां धांवले शस्त्रधारी, मुखें गर्जती, 'कोण रे ! मूढचारी ? ।
मतीमंद हा बाळ रे ! ब्राह्मणाचा, धरी वागदोरा करीं वारुवाचा.' ॥ ४१७
म्हणे [7]राघवी, 'अंतरें मात बोला, नये अश्व कां प्राण वेचाल मोला. ।
पुढां पातल्या वाढ पावाल वेथा, फिरा मागुतां जाणवा रामनाथा.' ॥ ४१८
तिहीं सत्वरा ओढिले हातयेरें, बळें लोटले पैं सहस्रैकभारें, ।
[8]धरानंदिनीनंदनू चाप ओढी, असंख्यात जोडूनियां बाण सोडी. ॥ ४१९
मुठी कर्षिलीं हातयेरें तयासी, मुळींहूनि तो बाहु शस्त्रें विनाशी, ।
महीं सांडिल्या ज्यापरी वृक्षशाखा बळें देखतां पावले प्राणशंका. ॥ ४२०
अहो ! [9]भार्गवें घेतला बाळवेषु सहस्राननें मोकळी ज्वाळ शेषु, ।

१. सामोरें. २. राघवपुत्र. (कुश.) ३. समिधा, फळें आणि पानें आणण्यासाठीं. ४. धाकटा भाऊ. (लव.) ५. सूर्यवंशोत्पन्न (लव.) ६. मानेला. ७. राघवपुत्र. (लव.) ८. सीतेचा पुत्र. ९. परशुरामानें.

तयासारख्या सूटती बाणमुष्टी, 'धरा हो! धरा,' लोटले वीर कोटी. ॥ ४२१
करीं अंकुशा ओपिती मत्तनागा, रथी सारथी सोट देती तुरंगा, ।
मुखीं हाकिती वीर राऊत राणे, पुढां सोडिती लोहपट्टीशबाणें. ॥ ४२२
दिसे वन्हि गुंडाळला वन्हिज्वाळीं सहस्रांकरीं अंबरीं उष्णमाळी, ।
तयासारिखा लोचनीं लक्षवेना, सुटे बाणकल्लोळ तो साहवेना. ॥ ४२३
उरीं मस्तकीं आननीं हातपायीं, बहु भेदले बाण त्या वर्मठायीं, ।
नव्हे धीर वीरां भयें होति मागां, मुखें बोलती, 'राजयालागिं सांगा.' ॥ ४२४
पुढां पातला वीर शत्रुघ्न राणा, करीं विंधिलें सत्वरा अष्टबाणा, ।
तया सन्मुखीं द्वादशाचेनि मारें रथीं अश्वही छेदिले तीव्रधारें. ॥ ४२५
रथीं आणिके आरुढे वीरराणा, म्हणे, 'बाळ कीं काळ हें चोजवेना. ।
रणीं झूजतां नागवे हा निघातें बळें नागपाशीं धरूं जीत यातें.' ॥ ४२६
अभीमंत्रिलें हस्तकीं नागबाणा, त्वरें मोकळी ज्यापरी जाळ मीनां, ।
तयामाजि तो गुंतला हस्तपायीं तनू लोटली वीरसंग्रामभोयीं. ॥ ४२७
रथीं वाहिला, सोड दे वारुवातें फिरे राघवी जैत जिंकोनि हातें, ।
तुरें लागलीं फोडिती वीर हाका ऋषीमंडळीं थोर आकांत लोका. ॥ ४२८

हृदयहनन हातें जानकी आंग घाली,
'मर मर बळिकर्मा केउती धाडि आली? ।
कठिण कवळ काळें केउतें बाळ न्हेलें
सघन जिवन माझें आजि सर्वस्व गेलें.' ॥ ४२९

बरें त्याजिलें ते मनीं क्लेश कोटी, जया देखतां सांडिलें सर्व पोटीं. ।
ऋषीसंगतीं काळ कंठीत माये तयां विघ्न आलें करूं येथ काये? ॥ ४३०
वनाहूनियां पातला ज्येष्ठ लाहें दिसे माय ते शोकसंतप्त पाहे, ।
अयोध्यावरें धाकुटा बंधु न्हेला, जनीं बोलतां पावकातुल्य झाला. ॥ ४३१
त्वरें बांधिला पाठिसीं बाणभाता करें मूवरें सज्जिलें चाप सीतां, ।
पुढां नाग तो गंड भैरुंड मागें निघे त्यापरी सत्वरा पाठिलागें. ॥ ४३२
गुरुवंदनें वंदिली लोकमाता, ऋषीराजयें ठेविला हस्त माथां, ।
म्हणे, 'आवडी या करा निंबलोणें, रणी जैत जिंकोनियां शीघ्र येणें.' ॥ ४३३

---

१. सूर्य. २. लाट, समूह. ३. जाणवेना. ४. माशांना. ५. वीरांच्या युद्धभूमीच्या ठायीं. ६. अग्नीसारखा लाल. ७. दोरी. ८. जानकी. ९. दृष्टीचा अथवा पिशाचबाधेचा विकार न व्हावा म्हणून मीठ, मोहऱ्या, निंबाचीं पानें इत्यादि अंगावरून ओंवाळून टाकणें.

क्षणें पीटिला राघवानूज पंथीं, करें सोडिले पंच नाराच हातीं, ।
ध्वजू तोडिला खंडिला अंख रागें, रथा कुंठिलें थोकले वीर आंगें. ॥ ४३४
तयापाठिसी मागुती बाणधारीं बळें सारथी मारिले अश्व चारी, ।
वदे कैकयो, 'नेणसी रामभृत्या बळें बाळका पाडिली ब्रह्महत्या.' ॥ ४३५
धनुर्बाण घेऊनियां शत्रुघातीं कुशें छेदिलें सत्वरा चाप हातीं, ।
'भला रे! भला' घेतलें आन तेणें, बळी बाळ तो विंधिला वीसबाणें. ॥ ४३६
तयासन्मुखीं मोकळी तीसबाणा करी गर्जना रामि तो वीरराणा, ।
सुपर्णाननीं[2] खंडिलीं सर्पखंडें तयासारिखें भग्न झालें कुन्हाडें. ॥ ४३७
ऋषीराजयें सिद्ध मंत्रूनि हातीं कपाळीं तया चर्चिलीसे विभूती, ।
तयालागिं त्या अस्त्र कोणी न लागे, म्हणे कैकयो, 'वीर कैसेनि भंगे?'॥४३८
शतें विंधिला रामि तो राघवानें तया च्छेदिलें हो! सहस्त्रैकबाणें, ।
बळें सोडितां लक्ष शत्रुघ्ननामीं करें मोकळी कोटि नाराच रामी, ॥ ४३९
शरें भेदिला वीर तो संधसंधी, भरे मूर्छना पातली घोर युद्धीं, ।
धरामंडळीं लोटला तो उताणा, अहाकार झाला पळे भीम सेना, ॥ ४४०
रणीं कुंजरीं[3] भीडिजे कुंजरेंसी, जनीं देखिजे दूरि टाकोनि त्यासी, ।
तयासारिखें अंतरें सैन्य पाहे, पुढां यावया धीर कोणा नव्हाहे. ॥ ४४१
त्वरें धांवला तोडिला नागबंधू, सुखें सोडवी आवडी प्राणबंधू, ।
धरी मागुती जिंकिलें श्यामकर्णा, म्हणे, 'वीरहो! राम युद्धासि आणा.'॥४४२
अहो! अंतरें योजनाचेनि मागें तया कैकयीनंदनाचार सांगे, ।
दिशा लंघिती सत्वरा एकभेंडें अयोध्यापुरीं पातली हांक तोंडें, ॥ ४४३
त्वरें राजया सांगती दूत वार्ता, 'मही जिंकिली स्वामिसेवेसि येतां, ।
मुनी वाल्मिकीचे मठीं चोज झालें, ऋषीनंदनें सर्वही सैन्य न्हेलें. ॥ ४४४
दैंळा[4] भंगिलें, पाडिला शत्रुघातीं, बळें जिंकिला स्वाश्रमा वारु न्हेती.' ।
मुखें सांगतां राघवा हास्य आलें, उठे कोप कांहीं मना गूढ ठेलें. ॥ ४४५
त्वरें ठोकिल्या राजप्रस्थानभेरी[5] 'दळा सज्जवा' सांगिजें चारहेरीं. ।
'कपीनायका मारुतीसुग्रिवातें,' म्हणे, 'आणवा केसरीअंगदातें. ॥ ४४६
नळानीळऋक्षाधिपा जांबुवंता सुषेणा द्विदा आणि कांहीं समस्तां.' ।
मनीं कल्पितां पावले स्वामिकाजें मनीं मानिलें रावणाख्या न दूजें. ॥ ४४७

---

१. बाण. २. गरुडाच्या मुखीं. ३. गजानें. ४. सैन्या. ५. नगारे.

भरतविरविषादें लोटले वीर भारीं,
निरखित तव बंधू सूदलासे[1] समोरीं, ।
प्रबळ रणतटाकीं शोणितें[2] पूर जाती
रघुविरमखवाजी[3] तापसांचे सुहस्तीं. ॥ ४४८
गडाडें पुढें लोटिलें स्यंदनातें, धरी अंगत्राणें धनुर्बाण हातें, ।
शता सायकीं एकएकासि विंधी, सितानंदनें हास्य कीजे विनोदीं. ॥ ४४९
शतें तीनशें सोडितां बाण पंथा, शरीं त्या शरा तोडिलें येतयेतां, ।
पुढां ठोकितां गाजिली हाक व्योमीं रथा सारिलें मागुती कोशभूमी. ॥ ४५०
त्वरें धांवला मागुतां रामबंधू म्हणे, 'बाळकालागिं कैसेनि साधूं? ।
जपें मंत्र तैं अस्त्र कोणी उठेना, धरी हांव तैं शक्ति देहीं भरेना. ॥ ४५१
जपे कैकयो कार्तवीर्यास्त्र वोठीं, सहस्रांकरांचे बहू वीर कोटी, ।
दिठी देखतां रामि तो राजवाणी स्मरे भार्गवी अस्त्र निर्वाणवाणीं. ॥ ४५२
दिठी देखतां कार्तवीर्यास्त्र आटू म्हणे कैकयो, 'दांडगा वीर बैटू.' ।
जपे मागुतीं देखतां काळरात्री, तमें दाटली अंबरीं भीम रात्री. ॥ ४५३
शरीं सोडिला द्वादशादित्यमेळा प्रकाशानळें तांविलें ब्रह्मगोळा, ।
जपे कैकयो मागुती माहिषातें तया सन्मुखीं योजिलें चंडकीतें. ॥ ४५४
गुरूवाक्य तें मूळमंत्रासि हेतू जपीं योजिला हो! शरीं शक्तिपातू; ।
रणीं कैकयो नाठवी देहभावा गळालें करीं चाप नाराच तेव्हां. ॥ ४५५
धरामंडळीं पातली योगनिद्रा, नसे चेतना आननीं मौनमुद्रा. ।
पडे मेदिनी, त्या धरी येर हातीं शरीं सूतवी जेथ कां शत्रुघातीं. ॥ ४५६
दळें देखतां मागुती मोड झाला, त्वरेसीं बळें पाठिसी लाग आला; ।
पुढां शेष तो अंतरें रामराणा, दळा देखिलें आटलें जेंवि घाणा. ॥ ४५७
रणीं पाडिले देखिले बंधु दोघे बळी, क्षोभला वीर सौमित्र रागें; ।
वनाचेपरी मोकळी बाणकोडी तया त्रीगुणी जानकीबाळ सोडी. ॥ ४५८
तडाडां शरीं तोडिलें बाणजाळा, जपे शेष तो मानसीं मंत्रमाळा; ।
गदा मुद्गलें चालिलीं कोटि चक्रें नगालागिं[12] वज्रावळी जेंवि शक्रें. ॥ ४५९
दिठी देखतां क्षोणिजेच्या[13] सुपुत्रें गुणीं[14] सज्जिलें अस्त्र जें भानुमंत्रें, ।

---

१. पडलासे. २. रक्तानें. ३. यज्ञांतील अश्व. ४. आकाशीं. ५. बटु, बाल. ६. अग्नीनें. ७. तप्त केलें. ८. बाण. ९. वेष्टी (भरून टाकी). १०. लक्ष्मण. ११. शरसमूहा. १२. पर्वतासाठीं. १३. सीतेच्या. १४. धनुष्याच्या दोरीवर.

सहस्राग्रुणी मोकळी लोहभाली, नभीं धांवती पारखीं चूर्ण झालीं. ॥ ४६०
तयापाठिसीं शेष कामास्त्र सोडी, तया त्र्यंबकास्त्रें बळें बाळ तोडी; ।
त्वरें सोडितां सायका तारकास्त्रें महीआत्मजें खंडिलें षण्मुखास्त्रें. ॥ ४६१
भुजंगेश तो सोडितां विघ्न कोटी जपे त्या उजू येर हेरंब लोटी, ।
जळा मोकळी शेष तो सागरास्त्रें तया आटिलें बाळकें कुंभजास्त्रें. ॥ ४६२
तयानंतरें ऊर्मिलाप्राणनाथें करें सज्जिलें सायकें पावकातें, ।
बळें ओढिला वीर तो ज्वाळमाळी सितानंदनें सत्वरा तेचिकाळीं. ॥ ४६३
तयासन्मुखीं सोडिलें मेघबाणा म्हणे शेष तो, 'काय हें राम साना ?' ।
शरीं राघवानूज तो वात योजी, तया पर्वतास्त्रें सिताबाळ भंजी. ॥ ४६४
तया तोडितां भूधरें वज्रधारा रणीं रामि तो पेटला घोरमारा, ।
लयीं मेघमाळातरूतुल्यबाणीं बहू मारिलें सैन्य संखेसि नाणी. ॥ ४६५
गजा खंडिलें सायकीं शैलपाडे तरू भूतळीं ज्यापरी वीर घोडे, ।
रथांचीं शतें भासती गुल्मजाळी नरें पायिचीं निर्जिवें यावनाळी. ॥ ४६६
सहस्राननीं सागरीं तोय गंगा तयातुल्य हें शोणितें सैन्यसंगा, ।
महीमंडळीं माजले पूर पाहीं, रिघे लक्षओघीं महासिंधुडोहीं. ॥ ४६७
असो साठ अक्षौहिणी रामसेना रणीं गीळिली साधका साधवेना; ।
'कदां वारु हा वाटिवां न्हेववेना म्हणे शेष तो कोण हा चोजवेना. ॥ ४६८
गमे शंकरें कीं लिळा श्रीमुकुंदें वपू घेतली बाळकाची विनोदें, ।
नव्हे शक्ति हे सर्वथा आणिकाची दिसे धाकुटी श्रीतनू राघवाची.'॥४६९
तयानंतरें भीमनादास्त्र बाळू जपे तेथ नादावला ब्रह्मगोळू, ।
महाघोष तो कोंदला भूनिराळीं तनू कांपती वेद सर्वां कपोळीं. ॥ ४७०
घंटा तंत्री ताळ लेणू मृदंगें भेरी शंखीं वाजतां घोषमेघें, ।
नादानंदें वेधल्या जीवजाती शस्त्रें अस्त्रें सांडिलीं सर्व हातीं. ॥ ४७१
घनीं माजतां हो! महा नादभेदें नरा कुंजरां भूलि आली निनादें. ।
फणीपाळ तो वेधला नादजाळीं, रथा थोकला वीरवांटीव गेली. ॥ ४७२
करींहूनि हो! टाकिलें चापबाणा, नसे आठऊ नोळखे भूतभाना, ।
दिठी झांकिली नेदखे युद्धठाया करी भूतळीं कुंडलाकार कांया. ॥ ४७३

१. कार्तिकेयास्त्रानें. २. अगस्त्यास्त्रें. ३. लक्ष्मणानें. ४. सतार, वीणा इत्यादि. ५. बोलणें. ६. शरीर.

नागस्वरें व्याळ विशाळ मूले, त्यासारिखा तो फणिपाळ डोले, ।
पृथ्वीतळीं तो पहुडे निवांतु देखोनि झाला सकळासि अंतु. ॥ ४७४

सहज कनकबीजा भक्षणें जेंवि पाहो,
विकळ सकळ देहो पावती प्राणमोहो. ।
नवल फणिवराची ते दशा तेथ झाली;
प्रगट अनुजसंगीं भूतटीं शेज केली. ॥ ४७५

विरां रामभारीं अहाकार झाला, रथेसीं पुढां सत्वरां राम आला. ।
कपी ऋक्ष ते लोटले कोटिभारें, घना पाडिती वृक्षपाषाण मारें. ॥ ४७६
तया ताडितां कोटिच्याकोटिबाणीं, शिळा पादपीं खंडिले वीरपाणीं. ।
बुजालीं बहू वानरें देति पाठी, भयें बोलती पावले प्राण कंठीं. ॥ ४७७
गिरी भोंवडी चक्र जैसें निराळीं तळीं टांकिती रामि तो बाणजाळीं, ।
करी कौतुकें पिष्ट जैसें यँवांचें, म्हणे मारुती बोलतां मौन वाचे. ॥ ४७८
'कटीं पुच्छ घालूनियां विप्रबाळा करूं वेग झेलूनि न्यावा निराळा, ।
रघूनायका भेटऊं, चोजवाणें.' पुढां लोळतां ठाकिला दूरि बाणें. ॥ ४७९
करी गर्जना रामि तो चंडवाचे, 'नव्हे झूज हें वानराराक्षसाचें, ।
अशोकाटवी हे नव्हे वातपुत्रा! नव्हे अक्षया मी कपी, राममित्रा! ॥ ४८०
नव्हे द्रोण मी, ना नव्हे काळनेमी, लघू पाट तैसा उडालासि व्योमीं, ।
बहू गाढ हा वांड संग्रामसिंधू उलंघोनि घेई जगीं जैतवादू. ॥ ४८१
असे मानसीं एक तो हेतु कांहीं, नहाणे तुतें वर्मनिर्वाणघायीं, ।
अवर्मीं तनू भेदिली बाणमुष्टी पडे भूतळीं हांव सोडोनि पोटीं. ॥ ४८२
बहु स्नेह तूझा वसे जानकीतें, तयाकारणें रक्षिलें आजि येथें, ।
उगा भूतळीं स्वस्थ नैवेक राहीं, पुढां काय वर्तेल तें चोज पाहीं.' ॥ ४८३
पुढां सुग्रिवें ताडितां शैलवृक्षें, बळें सत्वरा छेदिलें बाणलक्षें. ।
म्हणे, 'भानुजा! काळ मागील गेला, महादोषिया पाहिजे दंड केला. ॥ ४८४
सखा बंधु त्वां मारिला रे! प्रयत्नीं, घरीं घातली पापिया भ्रातृपत्नी, ।
जयाचेनि बोलें कुडें कर्म केलें, जगीं ज्ञान त्याचें बहू रूढ झालें. ॥ ४८५

---

१ धुतऱ्याच्या बियाला. २. रीस. ३. वृक्षांनीं. ४. तांदुळाचें. ५. भयंकर. ६. रावणानें सीतेस जेथें ठेविलें होतें तें स्थळ. ७. द्रोणाचळ. ८. मोठा. ९. असळ, क्षणभर. १०. सुग्रीवा. ११. वाळी. १२. तारा.

रणीं आजि प्रायश्चितालागिं घेईं, बहू बाणधारानिरें[१] शुद्ध होईं, ।
करीं सत्वरा सोडिलें लक्षबाणा पडे सौउमा भूतळीं तो उताणा. ॥ ४८६
असो सोडिला स्वामि तूझा विचारीं नव्हे मा तुम्हा ज्ञान कैसेनि भारी? ।
गुरू आपणें जेथ वर्ते कुनीती वदें शिष्य तो कोण लावील पंथीं? ॥ ४८७
अरे अस्वला! निर्बळा! पादहीना! नको सन्मुखीं, पावसी दुःख दीना. ।
नळा रे! शिळांचा नव्हे सेतुबंधू, सरें मागुतां पावसी प्राणखेदू.' ॥ ४८८
वदे अंगदासी बळें स्नेहवाचा, रिवें पाठिसी सूड घेईन याचा, ।
अधर्में असे मारिला बाळि साचा सभामंडपू हा नव्हे रावणाचा. ॥ ४८९
शतांसायकीं विंधिलें एकएका, रणीं पाडिल्या ज्यापरी चंड शाखा, ।
दशाआगळे मोहितां आठपद्मा, सुरीं भाविलें पावले[३] काळसद्मा. ॥ ४९०
सुमंतादिकां आठही मंत्रियांतें रणीं पाडिलें अष्टनाराचघातें. ।
उरे राम तो एकला चाप ओढी, तुटे झूजतां वीर आवेश पोटीं. ॥ ४९१
म्हणे, 'नेणवे मांडलें काय येथें? रणीं सूदले सर्वही बाणघातें, ।
असे बाळ कीं मत्कुळा काळ मृत्यु, जयो पारखा आमुतें यासि भृत्यु.' ॥ ४९२
करी सत्वरा बाणसंधान हातें दशा पाठिसी मोकळी हो! शतातें, ।
सहस्रां शरीं ताडिलें त्याचिपाठीं तयानंतरें टाकिले लक्ष मुष्टी. ॥ ४९३
बळें सत्वरें लक्षबाणाचि पाठीं, शरा सोडिलें पंचकें कोटि कोटी, ।
तयानंतरें अर्बुदा निर्बुदातें, बळें मोकळी खर्वसंख्यानिघातें. ॥ ४९४
बहू खर्व नीखर्व टाकूनि क्रोधें, तयापाठिसीं पद्मसंख्येसि विंधे, ।
तयानंतरें पाडिली गांठि शंखा, भयें पावती अंबरीं देव शंका. ॥ ४९५
रघूराजयाचे बहूबाण कोटी, मही सांडिती मौळि[६] लंघूनि पाठीं, ।
लँघूपिच्छ[७] ते स्पर्शती मस्तकांतें, दिठी देखतां चोज वाटे सुरांतें. ॥ ४९६
लघू लाघवें सोडिजे रामराजें तयाहूनि रामात्मजें वीरराजें, ।
सहस्रागुणी सोडिजे बाणहारी जनीं नेणिजे जैत कोणासि हारी. ॥ ४९७
बळें राघवासन्मुखीं रामवत्सें शरा सांडितां स्पर्शिजे पाय पित्सें[८], ।
पुढां सांडिती भूतळीं पाठिमोरें बहू दाटली मेदिनी बाणभारें. ॥ ४९८
रमानायकें टेंकिलें चाप बाहीं, म्हणे, 'झूजण्या नेदखों अंत कांहीं, ।
जयोहानिचा लाभ एका दिसेना, उठे कैंवि हे मागुतीं वीरसेना.' ॥ ४९९

---

१. उदकें. २. सामोरा, प्रत्यक्ष. ३. यमगृहा. ४. बाण. ५. पडले. ६. मस्तक. ७. ज्यांस लहान पिसें लाविलेलीं आहेत असे. ८. पिसानें.

रघूराज बोले, 'ऋषीबाळकें हो! करें स्वीकरा संपती भातुकें हो, ।
वनीं शीणतां वेइजे, धेनुदाना क्षुधेतें हराया करा क्षीरपाना. ॥ ९००
असों सुप्रसन्ना, वदा आवडे तें सुखें इच्छिलें दैव देईन येथें, ।
जगीं दुःख दारिद्र्य म्यां शून्य केलें, वदा कासया येथ हें युद्ध बोलें?' ॥ ९०१
म्हणे, 'बाळकें इच्छिलें काय देसी? नसे वासना मागतां हे विशेषी, ।
असे संपदा हे तुझी तूंचि सेवीं, असे कीर्ति ते आसुतें सर्व ठावी. ॥ ९०२
जगीं निर्दया साधु हें कोण मानी? छळें मारिला वाळि विंधोनि बाणीं, ।
अपापा वधू सांडिली घोररानीं मुखीं ख्याति हे आपुली तूंचि वानी.' ॥ ९०३
विरश्री रणी नावरे राघवातें, दिठी देखतां जाकळे मोहचित्तें, ।
मना आवडे आदरें क्षेमें द्यावें, मुखें बोलतां चुंबनातें करावें. ॥ ९०४
विरामें गुणग्रामसंग्रामकाजें, विलोकी रणीं सूदले वीर लाजें, ।
नव्हे संगिया नेदखों आन कोणी, उभा निश्चळें ज्यापरी मेरु मौनी. ॥ ९०५
कुश लव नरपाळीं जैत जिंकोनि तेथें,
सहित सबळ वारू चालिले स्वाश्रमातें. ।
उचलुनि वरि खांदीं वाहिलें मारुतीतें,
म्हणति, 'नवल दाऊं कौतुकें जानकीतें.' ॥ ९०६
गळाबंधनीं आणिला जांबुवंत, ऋषीमंडळीमाजि आनंद होत, ।
सुखें अंगना आणिती अक्षवाणी, मुनी गर्जती जैजयाकार वाणी. ॥ ९०७
कवीनायकें आदरें क्षेम केलें, सुखें जानकीलोचनीं अश्रु आले, ।
धरी आवडी आत्मजालागिं पोटीं, जगीं सांठवेना सुखानंदकोटी. ॥ ९०८
ऋषी बोलती सर्व स्नेहाळभावें, 'नरें यापरी वाटिवां जाणवावें, ।
जगीं धन्य हो! धन्य हे वीर दोनी जयांतुल्य नाहीं दुजा आन कोणी.' ॥ ९०९
लवें दाविजे कौतुकें जानकीतें, म्हणे, 'माय! तूं देख या वानरांतें, ।
असे आणिले तूज दावावया ते.' दिठी देखतां थोर आश्चर्य सीते. ॥ ९१०
कडे घेतलें जानक्या वातपुत्रा, सुखें चुंबिलें शांतवी पद्मनेत्रा, ।
म्हणे, 'बाळका! चोज अद्भूत झालें, भलें धाकट्या अग्रजें गौरवीलें. ॥ ९११
सम तुज विधिगोळीं वीर नाहीं निवाडें,
कठिणकरकुठारें छेदिलीं शत्रुझाडें, ।

१. सीता. २. वर्णी. ३. व्याकुळ होई. ४. आलिंगन. ५. आरत्या. ६. वाल्मीकीनें. ७. ब्रह्मांडांत.

अतिगति गिरिद्रोणा ठेविलें सिंधुपाळीं,
धरुनि प्रबळरुद्रा आणिलें केंवि बाळीं ?' ॥ ११२
सुमित्रेचिया नंदना प्राणदाता, बळी काळ तूं मुख्य लंकाधिनाथा, ।
जगीं गाइजे रामचारित्रगाथा तया मूळ तूं, सत्य बोले विधाता, ॥ ११३
कपितनु कुरवाळी, सत्य स्नेहाळ माय,
सहित सकळभावें येर वंदीत पाय; ।
पुनरपि वर ओपी अक्षयो कोटिकल्पें,
सुखतरु बहु नाचे जानकीवागजल्पें. ॥ ११४
म्हणे, 'तूज देखावयालागिं माते! मिसें पातलों, बांधल्या पुत्रहातें, ।
दिठी देखिसी वीर वाटीव याची धैंणी नूपुरें सांगतां शारदेची. ॥ ११५
मनें सांडिली आस निःशेष चिंता, सदा सर्वदा मानसी मात सीता; ।
नसे भिन्नता तूज वो! राघवेसीं मृषा माव माईक दावी जनासी. ॥११६
सहज विजयलक्ष्मी पातली तूजसंगें,
सहित अनुजसेना पावली त्रास भंगें. ।
उभयकुमरदेहीं विष्णुशक्तीसि ठावो,
करुनि प्रकट केला निश्चयें जाण भावो.' ॥ ११७
म्हणे जानकी, 'गूज कोणा न बोलें; वसें येथ मी, पुत्र हीं रामबाळें.' ।
वदे रुंद्र, तो 'ठाउकें सर्व मातें.' मुखें गौरवी बोळवी मारुतीतें. ॥ ११८
ऋषीवाल्मिकें घेतलें वारुवातें, त्वरें धांवला, पातला राम जेथें. ।
म्हणे, 'घेइजे आपुली वस्तु देवा! क्षमालिंगनीं वाढवीं स्नेहभावा. ॥ ११९
दिठी देखिलें, वर्तलें येथ कांहीं, तया बोलतां मानवी यत्न नाहीं. ।
लिळा ईश्वराची तया काय कीजे? मना नाणिजे स्वामियां! आन दूजें. १२०
जगीं अर्थ हा वेचितां हो! सुदानीं बहू लाभ तो मानिजे केंवि हानी, ।
जिहीं जिंकिल्या त्रीजगीं कीर्ति जोडे तये हानितें मानिजे केंवि तोंडें. १२१
जगीं आगळें तेज तें रूप तूझें, असे कीर्ति हे चौगुणी साच बूझें, ।
नको मानसामाजि तूं खेद आणूं, नये बोलतां साच तूं सर्वजाणू. ॥ १२२
पुरा जाइजे, नेइजे यागसिद्धी, जयश्रीवरा हानि कैसेनि बाधी? ।
यशें आससी नित्य निर्दोष रामा!' ऋषी बोलतां तोषला अंतरात्मा. ॥१२३

१. मारुतीला. २. ब्रह्मदेव. ३. तृप्ति. ४. सरस्वतीची. ५. मारुति. हा रुद्राचा अवतार होय.
६. अश्वातें. ७. वृत्तसुखार्थ हा शब्द ऱ्हस्व केला आहे. ८. चौपट. ९. जाणे.

पुसे राम तो, 'झूजले कोण गाढें?' म्हणे वाल्मिकी, 'ज्ञान होईल पूढें, ।
बहू नोवेलें स्वीकरीं मौन वाचे, मखा येतसे हाचि संकेत साचें. ।। १२४
मुखें शक्र आव्हानिला तेचिकाळीं, त्वरें पातला आदरें हेममाळी. ।
म्हणे पीयुंषें मेघ पाडूनि येथें दैंळा जीववीं जागवीं या विरांतें.' ।। १२५
क्षणें देवराजें घनें वृष्टि केली, सुखें सर्वसेनाहि संजीव झाली. ।
सुमित्रादिकां बंधुवर्गासि पाहीं रमाराजया ओपिलें, क्षेम वाहीं. ।। १२६
मुखें मारुती आणि हो! जांबुवंतें नृपा सांगिजे चोज त्या अद्भुतातें. ।
'जिवें वांचलों, सोडिलें बाळकें हो!' करी हास्य तो राघवू कौतुकें हो!१२७
अयोध्यापुरा पातले सर्व तोषें, पुढां वर्तलें आइका सावकाशें. ।
वसों बोधिलें मानसीं सज्जनांच्या असे हे कथा भारतीं जैमिनीच्या.।।१२८
महामंडपीं मीनले संत साधू गुणा वानिती बोलती मित्र बंधू. ।
'अहो! याग हा सांग संपूर्ण कीजे, जगा दक्षिणेलागिं संतोष दीजे.'।।१२९
तया बोलतां मानिलें लोकनाथें, म्हणे, 'पाठवा मूळ मित्राजनातें, ।
ऋषी राजयां सुग्रिवा राक्षसेंद्रा गुहा कौशला कैकया मैथुलेंद्रा, ।। १३०
कपी आणिकां जांबुवंतादिऋक्षां जपीतापसां साधकां मंत्रदक्षां, ।
मुनी आणवा, मान देवोनि थोरें उभा मंदिरें ये नदीचेनि तीरें. ।। १३१
येतां जातां योजनें तीस, पंथीं नाना वस्तू सांठवा राजवीथीं, ।
निर्मा आणा जाणत्या शिल्पिकारां रिद्धी सिद्धी सर्वसमृद्धिभारा.।।१३२
ऋषीराजयांमाजि वस्तीसि मोठें बहू यज्ञशाळा बहू यज्ञवाटें, ।
बहू आलयें हेमरत्नीं करावीं, बहू संपदा सर्वसौख्यें भरावीं. ।। १३३
श्रीराममुद्रांकित निष्कराशी ठेवा तळीं ज्या तुळिती गिरीसी, ।
रत्नाकरीं डोंगर हो! करावे, दिव्यांबरीं अंबरें हो भरावें. ।। १३४
खर्वें निखर्वें सुरधेनुवांचीं, यूतें प्रयूतें हयवारणांचीं, ।
या याचकांलागुनि सर्व आणा, आज्ञा करी सत्वर रामराणा. ।। १३५
'सुवर्णदानें निवटा दरिद्रें, निर्वास तेतें बुडवा सुवस्त्रें, ।
अन्नोदकें तृप्त करा भुकेले, जों वासना हे म्हणतील धाले. ।। १३६
यंत्रें विनोदें बहुसाल आणा, कौतूहळें नर्तन गीत गाणा, ।

---

१. न बोलें. २. बोलाविला. ३. अमृतानें. ४. सैन्यास. ५. इंद्रानें. ६. मिळाले. ७. बिभीषणा. ८. उभवा, करा. ९. मार्गीं. १०. मार्ग. ११. मोहरांचा ढीग. १२. रत्नांच्या खाणीनें. १३. उत्तम वस्त्रांनीं. १४. आकाश. १५. अश्व आणि गज यांचीं. १६. वस्त्राच्या अभावातें.

जें जेथ नाहीं परिपूर्ण कीजे, 'मिळे नैसे' हें दवडूनि दीजे.' ॥ ५३७
आज्ञापितां हें सकळां नरेशें बंधूप्रधानीं रचनाविशेषें, ।
केली त्रिलोकीं न मिळे सुरांतें जें देखतां चोज महेश्वरातें. ॥ ५३८
मुनिवरमहिपाळां वानरां राक्षसांसी,
सकळसहित सेना पातले जे जयासी. ।
नमुनि भरत ओपी हेमधामें सुवासा,
भरित सकळ सिद्धी भोग सौख्यें विलासा. ॥ ५३९
विचरति कनकाची जानकी रत्नबंधा,
गुरु करि नव दीक्षा बाणली सर्व सिद्धां. ।
प्रगट निगम आंगें साधकांहूनि राबे.
निकट शिव विधाता घेत सादृश्यशोभे. ॥ ५४०
ऋत्वीज तेथें ऋषिराज मोठे, ज्यांचे दिठी व्यंग तुरेचि कोठें, ।
पूर्णें विसर्जी हय शामकर्णा दे दक्षिणार्थी रजता सुवर्णा. ॥ ५४१
दधिमधुघृतधाराओघ जाती प्रवाहें,
मिसळत पय गंगा क्षीरसिंधूसि लाहें. ।
कवण करित आतां जीर्ण झालाचि नाहीं,
सकळ भुवनचारी गर्जती हेंचि पाहीं. ॥ ५४२
धनें भोजनें याचकां वर्ष एकीं रमानायकें तृप्त केलें त्रिलोकीं, ।
कुबेरापरी भासती मागणारे सुरीं बोलिजे, 'बाप तूं राघवा रे!' ॥ ५४३
'पुरे हो! पुरे' हेंचि सर्वत्र बोलीं, धनें सांडिती, ज्यां बहू भारि झालीं. ।
पुरे रत्नवस्त्रें पुरे कामधेनू गमे याचकां इंद्रही रंक दीनू. ॥ ५४४
सवें गुप्त सीता बहू शिष्यमेळा, लवांकूश दोघे तपीवृंदमेळा, ।
मुनी वाल्मिकी पातला यज्ञवाटा, बहू पूजिला, पावला तोष मोठा. ॥५४५
स्थळें ओपिलीं कोटि रत्नां धनांच्या, बहूलक्ष पंक्ती मेहाधेनुवांच्या, ।
सुधाभोजनीं तृप्त केलें विनोदें अळंकारिलें हेमरत्नीं सुगंधें. ॥ ५४६
सवें बाळकें रम्यरामायणातें अहोरात्र गाती, मिळे लोक तेथें, ।
जनीं बोलिजे, 'स्वाद कैंचा सुवेसी? कथा गोड ते वाल्मिकीचे निवासी.'॥
लिळा राउळीं देउळीं गीत गाती, तया गायना वेधल्या जीवजाती. ।
पुसे कोण त्यां सांगती, 'वाल्मिकाचे असों तापसी, काज नाहीं धनाचें.५४८

१. 'अमुक वस्तु मिळत नाहीं' असें याचकवचन. २. चांगल्या वस्त्रास. ३. कामधेनूंच्या.

रघूराजया सांगती श्रेष्ठ बोलें, 'मुनीवाल्मिकें जें [1]महाकाव्य केलें, ।
मुखें पाठ तें बाळकें दोनि गाती, तया सुस्वरें [2]किन्नरें लीन जाती.' ॥ १४९
तया यज्ञिचें काज [3]सारूनि रामें तयां आणवी सन्मुखीं गीतप्रेमें, ।
सभा माजली, गोडपी[4]यूषपाना कथा [5]श्राविता वेधला रामराणा. ॥ १५०
मुळींहोनि ते लोटली जेंवि गंगा, कथा श्रावितां पातलीया प्रसंगा, ।
जनीं तर्किजे बाळ हे जानकीचे, मुखें वर्णिती तातचारित्र वाचे. ॥ १५१
तया गायनीं अंतरीं राघवातें, ऋषीराजयांतें कपीराक्षसांतें, ।
कळों पातलें वाजली एकटाळी, जगीं बोलिजे लक्षणें [6]ऐकताळीं. ॥ १५२

सकरुण रघुराजा कोंदला [7]अष्टभावीं,
[8]कनकपुरपती तैं मारुतीतें खुणावी. ।
सहित भरत जाणें बोलणें वाल्मिकीतें,
प्रगट जनकबाळा आणिजे शीघ्र येथें. ॥ १५३

त्वरें रामआज्ञेन ते सर्व गेले, [9]ऋषीराजयें पाहतां हास्य केलें. ।
सवें राजबाळा बहू शिष्यमेळा सभे पातला, वाल्मिकी त्याचकाळा. ॥ १५४
दिठीं देखतां जैजयाकारवाणी ऋषी बोलती, 'धन्य हे सत्वखाणी, ।
जगीं धन्य हा राम एकूचि मानें.' नभीं गर्जती [10]निर्जरांचीं विमानें. ॥ १५५
पुढां वाल्मिकी, पाठिसीं रामजाया, ढळे तोय नेत्रीं सकंपीत [11]काया, ।
गमे सद्गदें दाटली कंठभागीं, मनोभाव तो वल्लभाप्रेमरंगीं. ॥ १५६

[12]सारंगनयना [13]बाळी जेंवि काळी हरिप्रिया, ।
कृष्णकस्तूरिका भाळीं मुक्तजाळी सुशोभना. ॥ १५७
[14]कौषायवासिनी सीता बद्धहस्ता शुभानना, ।
दर्शनानंदसंतुष्टी अधोदृष्टी विलोकना. ॥ १५८

म्हणे वाल्मिकी, 'राम! भूपाळमौळी! तुझे बाळ, हे वल्लभा [15]भूमिबाळी,।
बहूकाळ म्यां रक्षिली धर्मकन्या, [16]निवेदीतसें, पाळि विश्वैकधन्या!॥१५९

---

१. रामायण. २. गंधर्व नम्र होती. ३. आटोपून. ४. अमृत. ५. ऐकतां. ६. तालांतील एक भेद आहे. ७. आठ सात्विक भावांनीं. सात्विक अष्टभावांचीं नांवें:-स्तंभ (स्तब्धता), प्रलय (बेशुद्धि), रोमांच (आंगावर कांटा येणें), स्वेद (आंगाला घाम सुटणें), वैवर्ण्य (तोंडाचा वर्ण फिरणें), वेपथु (कंप सुटणें), अश्रु (डोळ्यांतून पाणी येणें), आणि वैस्वर्य (स्वर पालटणें). ८. बिभीषण. ९. येथें वृत्तसुखार्थ 'ऋषि'शब्द दीर्घ केला आहे. असा प्रयोग पूर्वींही अनेक स्थलीं आला आहे. १०. देवांचीं. ११. देह. १२. मृगनयना. १३. कन्यका. १४. मळकट वस्त्र परिधान करणारी. १५. भूमीची कन्या. १६. देत असें.

धरा[1] आप तेजादिकें पंचभूतें[2] असे साक्ष, मी आणि चैतन्यनाथें, ।
अपापा मनोवासना जानकी हे चमत्कार दावील अद्भूत पाहें.' ॥ १६०
म्हणे राम तो, 'ठाउकें सर्व मातें, करूं काय मी? सांग या लौकिकातें, ।
असो एथ आतां इणें एक कीजे, पुन्हा मागुती एकदां दिव्य[3] दीजे. ॥१६१
लंकापारीं दिव्य झालें सुविद्ये, नाहीं लोकां दृश्य झालें अयोध्ये, ।
आतां दावीं मागुती शुद्ध भावो, जेणें माने पापशब्दार्थ जावो.'॥१६२
धरा[4] लक्षिली बोलतां आदिशक्ती, विमानीं बहू दाटल्या देवपंक्ती. ।
करी गर्जना तातडी रामरामा जगीं श्राविता पाप पात्रे विरामा. ॥ १६३
'मनोवासनेमाजि रामूचि नांदे, उठे शब्द त्यामाजि रामूचि बोधें, ।
असे हेचि जैं सत्य साचार माये! त्वरें वाट दे वीवरीं, माधवीये!॥१६४
तनू आचरे तेथही चित्त रामीं, नसे राघवावीण आणीक कामी, ।
असे सत्य हें वर्तलें साधनीयें, धरे! वीवरीं मार्ग दे, माधवीये! ॥ १६५
दिसे जागृतीं राम स्वप्नीं सुषुप्तीं, परा उन्मनीं भाव तो राम व्यक्तीं, ।
असे साच तें सौंदरी नादवीये, त्वरें वीवरीं वाट दे, माधवीये!' ॥ १६६
तयेसन्मुखीं सत्वरा तेचिकाळीं धरे छिद्र झालें, गुहा घोर काळीं. ।
शिरीं रत्नसिंहासनीं सर्प आला, फणी श्वेतवर्णी धरी रत्नमाळा. ॥ १६७
तया हेमसिंहासनारूढ नारी तनू श्यामला दिव्यदेवांगधारी, ।
करी जानकी ते धरी अंकभागीं, रिघे सत्वरा वीवरीं नेत्र नागी. ॥ १६८
हहाकार झाला सुरांभूचरांतें, रघूनायकें पीटिलें वक्ष[9] हातें. ।
पतंगापरी धांवला मुक्तकेशी म्हणे, 'प्राण माझा प्रिये! चारुहासी[10]!'॥१६९
करें कंपितां सत्वरां चोज झालें, स्वीमंडळाचेपरी बिंब गेलें ।
बुझालें तळीं छिद्र कोठें दिसेना, म्हणे राम तो, 'भूतळीं मी वसेना.'१७०
तनू नावरे, भूतळीं राम लोळे, जळें शिंपिती वक्ष राजीवडोळे[11]. ।
वपू घोळिलें धूसरें[12] सर्व पाहें, गमे लोपलें ज्यापरी ज्ञान [13]मोहें. ॥ १७१
विनवित अवनीतें, 'शीघ्र देयीं सितेतें,
करुनि विवर नेयीं जानकी तेथ मातें, ।

१. उदक. २. पृथ्वी, आप्, तेज, वायु आणि आकाश हीं पांच महाभूतें. ३. शपथ. ४. पृथ्वी. ५. स्त्री. ६. शांति. ७. मनाचा लय होतो अशी पांचवी अवस्था या अवस्थांचीं नांवें:—जागृति, स्वप्न, सुषुप्ति, तुर्या आणि उन्मनी. ८. ताप. ९. वक्षःस्थळ. १०. शुचिस्मिते. ११. कमलनेत्र. १२. मळकट. १३. मूर्च्छायोगें.

हेळमुखमहिभेदें ओपिली त्वांच पूर्वी,
न करि कठिण आतां स्नेह संपूर्ण उर्वी. ॥ ९७२
रसातळीं स्वर्गसुरेंद्रगेहीं, असेल तेथें सुभगा विदेही, ।
असेन तेथें, कवळीन बाहीं; येणें कुराज्यें मज चाड नाहीं.' ॥ ९७३
अहो! क्षोभला घे धनुर्बाण हातें, म्हणे, 'सद्य भेदीन ये मेदिनीतें[3], ।
बळें आणिली सेतु बांधोनि जैसी, मही भेदुनी येथ आणीन तैसी. ॥९७४
माझी मातें सत्वरा दे दयाळे!' वंदी राजा मेदिनीतें कपाळें. ।
बोले पृथ्वी शब्द आश्वासनाचा, 'रामा! राहें देव तूं या जगाचा. ॥९७५
गेली आतां नेभटे मैथुळीतें, लक्ष्मीरूपें विष्णुवक्षस्थळीं ते, ।
आत्मारामीं चित्कळा लीन झाली, येणें जन्मीं भेटिची गोठि ठेली.' ॥९७६
विमानीं वदे सन्मुखी ब्रह्मदेवो, 'गुणी निर्गुणा! आठवी तत्वभावो, ।
पुढां कांहिं तें सर्वही त्वांचि केलें, तुझे कल्पनेमाजि ब्रह्मांड झालें. ॥९७७
दिसे विश्व हें तूंचि कर्ता अशेषी, जना वाउगें गोविसी भ्रांतिपाशीं, ।
असे जानकी ते तुझी तूजपाशीं, नको मोह तूं वाढवूं मानसासी. ॥ ९७८
धैरानंदिनी देखणें मानसातें उठे वासना तेधवां बाळकांतें, ।
विलोकीं, मना धीर देऊनि राहीं, नसे यत्न तो काळसत्तेसि कांहीं.' ९७९
परिसत विधिवाक्या स्तब्ध मौनें उगासे,
धरुनि कुमर हातें राजधानी प्रवेशे. ।
सकळ विरस वाटे, चित्त कोठें रमेना.
सगुणजनकबाळेवीण वेळा गमेना. ॥ ९८०
काळीं काळीं जानकी हेमरूपा, निर्मी तेणें नातळे देहलोपा. ।
वाजीमेधा वाजपेया असंख्या केल्या नोहे दानपुण्यासि लेखा. ॥ ९८१
सुमित्रा तथा कैकयी राममाता सुकाळें तिघी लागल्या मृत्युपंथा. ।
हरीचिंतनीं पावल्या काळधर्मा, रमाराजयें सारिलें सांगकर्मा. ॥ ९८२
युद्धाजीतें मातुळें स्नेहवंतें हस्ती वाजी रत्नवस्त्रें अनंतें, ।
धाडी प्रीती आदरें राघवातें, प्रेरी पत्रें सौक्षपें[12] कारणातें. ॥ ९८३

---

१. नांगराच्या फाळानें जमीन फोडून. २. भुजांनीं. ३. पृथ्वीतें. ४. सीता. ५. ब्रह्मदेवाचें वचन. ६. यज्ञविशेष. ७. गणना. ८. कौसल्या. (सर्ग ९९ श्लोक १४–१५पहा) ९. यमधर्मा. १०. परिपूर्ण. ११. उत्तरक्रिया. १२. अगत्यानें.

'मदोन्मत्त [1]गंधर्व हे तीनकोटी महाद्वीप ते भक्षिती सिंधु पोटीं. ।
तयां दंडिजे देश स्वाधीन कीजे बहू रम्य तें संपतीचेनि माजें, ॥ ९८४
बळी[2]कैकईनंदन वीरदक्षा सवें पाठवीं [3]पुष्करा आणि [3]तक्षा ।
म्हणे, 'दुष्ट दंडोनियां राज्य घेईं गुणीआत्मजालागिं वांटूनि देईं.' ॥ ९८५
युद्धाजीता राघवानूजभूपा जाणें झालें शीघ्र गंधर्वद्वीपा ।
काळास्त्राच्या बाणधारीं दुखंडें गंधर्वांचीं पाडिलीं [4]रुंडें मुंडें. ॥ ९८६
[5]तक्षसीळेसि तक्षातें लोकनाथें नियोजिलें. ।
[6]पुष्करावतितें दक्षा पुष्कराक्षा सुरक्षिलें. ॥ ९८७
पांचांवर्षांनंतरें रामभेटी आला भावें [7]कैकयो [8]वीर जेठी. ।
हस्ती वाजी धेनु कोटी अपारा [9]लेखा नाहीं हेममाणिक्यभारा. ॥ ९८८
पुरी अंगदी पश्चिमेमाजि तेथें सुमित्रात्मजानंदना अंगदातें, ।
दुजा [10]चंद्रवक्रापुरीं चंद्रकेतू करी भूपती आवडी रामनाथू. ॥ ९८९
वर्षें सहस्रें दश या नरांचीं ये मृत्युलोकीं क्रमिलीं सुखाचीं, ।
त्यानंतरें काय विचार झाला, पैं [11]तापसी होउनि [12]काळ आला. ॥९९०
महाकाळ तो तापसाचे सुवेषीं सुमित्रें तया देखिलें द्वारदेशीं, ।
म्हणे, 'राजया जाणवीं [13]मातु एकी, असे कारणा धाडिलें श्रेष्ठलोकीं.'॥९९१
[14]महींद्रें [15]अहींद्राचिया सिद्धबोलें तया आदरें सन्मुखीं आणवीलें. ।
बहू पूजिला तो म्हणे, 'गुह्य भावो असे बोलणें, पाहिजे गूढ ठावो.॥९९२
गुजा बोलतां पातल्या आन तेथें, तया दंडिलें पाहिजे घोरघातें.' ।
रघूराजयें नेम नेमस्त केला. [16]फणीपाळ तो द्वार रक्षीत ठेला. ॥ ९९३
'सुमित्रेच्चिया नंदना प्राणमित्रा ! धरी मानसीं बोधिल्या गुह्यमंत्रा, ।
[17]चतुर्मूखही पातल्या इंद्रईशू तया सोडितां पावसी प्राणनाशू.' ॥ ९९४

---

१. शैलूष गंधर्वाचे पुत्र. २. भरता. ३. भरताचा पुत्र. ४. तोडलेलें शरीर. ५. गांधारदेशाची राजधानी. ६. 'पुष्कळावती' असेंही नांव आढळतें. ७. भरत. ८. बलवान्. ('ज्येष्ठ'शब्दाचा अपभ्रंश 'जेठी'. ज्येष्ठ म्हणजे वयानें मोठा, पण जेठी म्हणजे बळानें मोठा.) ९. गणना. १०. अंगदाची राजधानी अंगदी आणि चंद्रकेतूची चंद्रकांता असें वर्णन रामायणांत आहे. (उत्तरकांड—सर्ग १०२ श्लोक ८९). येथील वर्णनांत नांवाचा भेद आहे. ११. विप्रवेषधर. १२. यम, मृत्यु. १३. मात, गोष्ट. १४. रामानें. १५. लक्ष्मणाच्या. (शेषाच्या.) १६. लक्ष्मण. १७. वृत्तसुखार्थ शब्दांची ओढाताण केल्याचीं अशा प्रकारचीं उदाहरणें या काव्यांत अनेक सांपडतात.

महाराजआज्ञेन तो सावधानें मनें मानिलें मांडिला घात याणें. ।
सुरक्षीत ठेला महाद्वारठावो, गुजा बैसले तापसी आणि रावो. ॥ ५९५
म्हणे तापसी, 'जाण मी काळ, रामा! निरोपी सुखें पाय वंदूनि ब्रह्मा, ।
असे लोटली काळमर्याद देखा, सुरां पाळिजे, येइजे विष्णुलोका. ॥ ५९६
धराभार फेडूनियां रावणातें तुवां ओपिलें विष्णुसायुज्य हातें. ।
खळां दंडिलें, पाळिले सत्य साधू, जगीं कोंदला येश निर्दोष नादू. ५९७

सकळसुरनराचें काज संपूर्ण झालें.
परमसुखसुखाचें भाग्य भोगासि आलें. ।
अखिलभुवनपाळा! चाल वैकुंठपीठा,
तव रुपअवलोका आवडी नीलकंठा. ॥ ५९८

वारीजकोशीं नव भृंग जैसा संशोधितां नाळविशाळकोशा, ।
अंता न पावे मग मी तपातें पाळूनि आज्ञा सृजिलें जगातें. ॥ ५९९
माझेनि बोलें बहुतावतारीं दंडूनि दुष्टां वरिली धरत्री, ।
भो! शेषशायी! मधुकैठभारे! पद्मापते! पावनकल्मषा रे! ॥ ६००
तुझी अंगना आदि जे मूळमाया, जियेचेनि हे भासली विश्वछाया, ।
तियेचे कुसीं जन्मलों याचिलागीं तुझा पुत्र मी जाण पां सिद्धयोगी.॥६०१

एकादशसहस्रांची संख्या वाची सुवत्सरें, ।
त्यागूनि धारणा एका देवलोका विलोकणें.' ॥ ६०२
येरीकडे सुमित्रातें वर्तलें तें सुकौतुकें, ।
आदरें श्राविजे संतीं रामकीर्ति सुमंगळा. ॥ ६०३

विरामें समाधीचिया तो पवित्रू तपी देव दुर्वास तो अत्रिपुत्रू, ।
सभे पातला देत संकेत हातें, म्हणे, 'कउता राम तो आणि येथें.'॥६०४
वदे राघवानूज वंदूनि पायीं, 'असे दास मी, सांगणें काज कायी ?' ।
म्हणे, 'बोलणें एक तें भूपतीसीं, न येतां, पुरी राजयासीं प्रजांसीं,॥ ६०५
क्षणामाजि हें सर्व जाळीन कोपें' तया देखतां वीर नागेश कांपे. ।
म्हणे, 'जाउ कीं एकला प्राण माझा, जनेसी असो क्षेम कल्याण राजा.' ॥
उलंघोनि आज्ञा रिघे गुह्यकक्षीं दिठी लक्षिला राघवें क्रोधचक्षीं, ।
वदे तापसी, 'भंगला नेम रामा! असें जात मी, सांवरीं सत्यधर्मा.' ॥ ६०७

---

१. कमल. २. पापनाशका. ३. लक्ष्मण. ४. अंतर्गृहीं. ५. क्रोधयुक्त नेत्रांनीं.

दिठी देखतां **काळ** अदृश्य झाला. सभामंडपा **राम** भूपाळ आला. ।
नमस्कारिलें देव**दु**र्वासयातें, म्हणे, 'राजया! शीघ्र दे भोजनातें. ॥ ६०८
सहस्रवर्षांवरि[1] हे समाधी विसर्जिली, ते बहुसाल बाधी; ।
क्षुधानळें[2] अंतर सर्व जाळी, दे भक्षभोज्यें सुरसें रसाळीं.' ॥ ६०९
लेह्यें[3] पेयें[4] चोष्य[5] खाद्यें अपारें दुग्धें आज्यें शर्करा पाक सारें, ।
अत्रीपुत्रा[6] भोजनीं तृप्त केला, आज्ञातोषें स्वाश्रमा शीघ्र गेला. ॥ ६१०
सुमित्रा उजू देखतां, नेत्र झांकी, सखा **राम** तो लेपला शोकपंकीं, ।
मुखें नोबले, लोचनीं नीरँ[7] ढाळी, फणीनायकें[8] वंदिले पाय भाळीं. ॥ ६११
'न संडी कदा आपुला नेम राजा! विचारूं नको, तूं वधीं देह माझा. ।
भविष्यार्थ जाणोनि आचार्य[9] बोले, 'अहो! सत्य संरक्षिजे प्राणमोलें. ॥ ६१२
त्यागें वधें खेद समान श्रेष्ठा, यालागिं यातें त्यजिजे वरिष्ठा! ।
सांडूं नको निर्मळ नेम निष्ठा, नासत्यदोषें विघडे प्रतिष्ठा.'[10] ॥ ६१३
सखेदें वदे **राम** तो बांधवातें, 'नको सन्मुखीं दाखऊं आननातें. ।
त्वरें जाई रे! सत्व माझें न खंडीं, मनें मानसीं मोहपाशा विखंडी.' ॥ ६१४
नमस्कारिलें **जा**नकीप्राणरंगा महादुःखशोकें सुटे अश्रुगंगा[11]. ।
करीं सांवरी स्वीकरी मौनवाचा, नदी टाकिली **मा**नसीं जन्म जीचा. ६१५

शुभकर **शरयू**चें स्पर्शिलें नीर नेत्रा,
विमळपुलिनभागीं[12] आसनीं योगतंत्रा. ।
रचुनि मन निरोधी ज्ञानकर्मेंद्रियांतें,
गुण परतर चित्तीं **वा**सुदेवाक्षरातें. ॥ ६१६
सुमनस[13] सुमनांची[14] वर्षती दिव्य वृष्टी,
भरित गगन नादीं कोंदली सर्व सृष्टी. ।
प्रगट सहशरीरें आरुढे[15] नाकपृष्ठीं,
मिसळत हरिरूपीं होत आनंददृष्टी. ॥ ६१७

---

१. बहुत. २. क्षुधारूप अग्नीनें. ३. चाटण्यास योग्य अशीं. ४. पिण्यास योग्य अशीं. ५. चाखण्यास योग्य अशीं. ६. दुर्वासाला. ७. उदक. ८. लक्ष्मणानें. ९. वसिष्ठादिक. १०. रामायण–उत्तरकांड–सर्ग १०६ पहा. ११. बाष्पनदी. १२. स्वच्छवाळवंटीं. १३. देव. १४. पुष्पांची. १५. लक्ष्मण आरोहण करी.

मुळीं आदिनारायणा चारिभागीं तया मीसळे **शेष** **सौ**मित्र आंगीं, ।
ऋषी देव सन्मूख **ब्र**ह्मादि आले, नभोमंडळीं जैजयाकार झाले. ॥ ६१८
अहो! यापरी वीर **सौ**मित्र देखा, महोल्हास लीळा त्यजी मृत्युलोका, ।
रघूराजया बंधुनिर्याणमातु, जनीं सांगतां शोकसंतापभूतु. ॥ ६१९
वियोगें बहू झांकळे[1] **राम** चित्तें, म्हणे, 'राज्य घे **कै**कयीनंदनातें[2], ।
प्रवेशेन मी काननीं आजि आतां, न साहे मना वाड[3] उद्वेग वेथा. ॥ ६२०
सुमित्राविणें मी नसें मृत्युलोकीं, दिशा सर्वही शून्य तैशा विलोकीं, ।
गुणी बंधु माझा वसे नित्य जेथें त्वरें आजि जाईन राहेन तेथें.' ॥ ६२१

सुगुण **भ**रत बोले, 'राज्य तें **राम**पायीं;
तुजविण सुख इच्छी, तोचि पापिष्ठ पाहीं.' ।
रुदत पुरनिवासी जावया **राम**संगें,
कुमति कवण राहे **रा**घवावीण मागें? ॥ ६२२
सुगुणलव**कु**शातें राज्य वांटूनि ओपी,
रथवर करि वाजी यान उष्ट्रें निरोपी. ।
महिषि वृषभ धेनू आणिका मेषभारा,
खग मृग नकुळादी[4] दास दासी अपारा. ॥ ६२३
गड गिरि महि दुर्गें पट्टणें पूर धामें[5],
कनकरजतधातू[6] वस्त्रशस्त्रें ललामें[7]. ।
धरुनि कुमर ओपी मंत्रियांचे सुहस्तीं,
त्यजुनि नगर, केली काननामाजि[8] वस्ती. ॥ ६२४

किष्किंधेचें राज्य **ता**रासुतातें ऐश्वर्येंसी ओपिलें **अं**गदातें. ।
रामासंगें जावया शीघ्र येतू नैर्ऋत्येसी पातला **लं**कनाथू. ॥ ६२५
शत्रुघ्नातें दूत जावोनि सांगे, 'दुःखी राजा बांधवाचेनि त्यागें, ।
स्वर्गा जातो, सर्वमित्राजनासी ऐश्वर्यातें वांटिलें आत्मजांसीं.' ॥ ६२६
वार्ताखेदें **कै**कयो[9] घेत लाहो राज्यीं स्थापी **शं**त्रुघाती **सुं**बाहो[10]. ।
रामासंगीं जावयालागिं आला, **रा**मापोटीं थोर संतोष झाला. ॥ ६२७

---

१. व्याकुळ होय. २. भरतातें. (सर्ग १०७.) ३. मोठा. ४. मुंगसादि. ५. गृहें. ६. सोनें रुपें. ७. भूषणें. ८. अरण्यांत. ९. शत्रुघ्न. १०. सुबाहु हा शत्रुघ्नाचा ज्येष्ठ पुत्र. याला मथुरेच्या राज्यावर स्थापित केलें. शत्रुघाती हा कनिष्ठ पुत्र. याला वैदिशनगरीं स्थापिलें. (सर्ग १०८ श्लोक १०.)

बिभीषणातें रघुराज बोले, आकर्णितां प्रेमळ चित्त डोले, ।
'माझी प्रतिज्ञा न करीं वृथा तूं, **लंकेसि** राहें, मजलागिं ध्यातू. ॥ ६२८
जंववरि नवखंडीं पुण्य चारित्र माझें,
जंववरि सुरगंगा देवलोकीं विराजे, ।
तंववरि जिवखाणी वर्तती भूतधात्रीं
तंववरि तुज **लंके** नांदणें पुत्रपौत्रीं.' ॥ ६२९
वदे **राम,** 'वातात्मजा[1]! ऐक मात झणी धाडिसी आमुचा बोल व्यर्थ, ।
असें काळमृत्यूसि बांधोनि पायीं चिरंजीवया अक्षयी साच राहीं. ॥ ६३०
नको आग्रहो संगतीं यावयाचा, असें जाण मी एक सर्वत्र साचा. ।
कदां भेद नाहीं कपी तूज मातें.' हरी[2] बोधिला तत्वसंकेतवंतें. ॥ ६३१
जन पशु मृग पक्षी कीट भृंगादि कोटी,
सकळ पुरनिवासी चालिले **रामभेटी.** ।
सैरि[3] **शरयु** पवित्रा पश्चिमे वक्र वाहे,
रघुपति सकळांसीं पातला तेथ लाहें. ॥ ६३२
वाजपेय[4] आतपत्रें[5] अग्निहोत्रें सपात्रकें, ।
पुढें चालविलीं देखा देवलोका विलोकना. ॥ ६३३
महाप्रस्थानिकीं[6] धर्मीं सांग कर्मीं सुशोभितु, ।
दिव्य क्षौमांबरें[7] 'वेढी[8] दर्भमुष्टी सुमंडित. ॥ ६३४
श्रिया सिद्धि रिद्धी रमा मूर्ति अंगें सवें चालती **राघवा** वामभागें, ।
विशाळाक्षि **देवेंद्रि** या दक्षिणांगीं पुढां चालिल्या न्याय शोधीत मार्गीं. ६३५
वषट्कार ओंकारहीं दक्षिणांगीं **रती शक्ति सावित्रि** या वामभागीं, ।
धृती कीर्तिधर्मादिकीं सत्य चाले, असो सर्वही स्वर्गद्वारासि आले. ॥ ६३६
धनुष शर सहस्रें अस्त्र तूणीर मूर्ती,
सहित निगम[10] चारी विप्रवेषें प्रवर्ती. ।
रघुपति सकळांसी स्वर्गद्वाराख्यघाटीं,
निरखि, वरि विमानीं देव कोट्यानकोटी. ॥ ६३७

---

१. सर्ग १०८ श्लोक २९-३०. २. वानर. ३. नदी. ४. यज्ञविशेष. ५. छत्रें. ६. परलोकीं जाण्यासाठीं प्रस्थान करण्यास योग्य असा धर्मविधि. ७. रेशमी वस्त्रें, सूक्ष्मांबरें. ८. आच्छादी. ९. माते. १०. वेद.

नभोमंडळीं दिव्यतेजें विराजे, पडे पुष्पमोहो सुवासीत माजे. ।
बहू नर्तनीं गीत गंधर्व गाती, दिवीं दुंदुभी लोपल्या मेघजाती. ॥ ६३८
पुढां सन्मुखीं देखिला देव ब्रह्मा करी दंड तैसा नमस्कार रामा, ।
म्हणे, 'घेइजे भद्र कल्याण विष्णो! जगत्पावना देवदेवैकजिष्णो! ॥ ६३९

सहित सकळबंधू सच्चिदानंदरूपी,
सहजगति प्रवेशें विष्णु कैवल्यदीप्ती. ।
परमपुरुष देवा! आवडे आन कांहीं,
अभिनव निजशक्ती पावसी पूर्ण तेही'. ॥ ६४०

महादीपिकामाजि माणीकवाती करें मेळवीतां गमे एक ज्योती, ।
क्षमालिंगनीं अच्युतीं भेद गेला, हरांदीक[1]देवां चमत्कार झाला. ॥ ६४१
नदीओघसंघाटणीं तोय संगा, जया नामरूपें गमे एक गंगा, ।
सहानूज[2] तो[3] आपुले आदिरूपीं[4] लिलें मीनला[5] चिद्घनानंदरूपी. ॥ ६४२
अहो! काज संपादल्या जेंवि अर्थू गुणी ठेविती जेथिंची तेथ वस्तू, ।
तयासारिखा मीनला राम रामीं, सुखानंद कोंदाटला देवधामीं[6]. ॥ ६४३

[7]तो हरिचंदन वंदन विबुधा अमृतकर[8] जो सज्जनकुमुदां[9], ।
पीतवसन वनमाळ विराजे, कुंडलयुग मकराकृति साजे. ॥ ६४४
मणिगणमुगुटीं दिनकरमेळा उशना[10]सुरगुरुसुघटित वेळा, ।
कौस्तुभपदकीं तेज विराजे, मंडित भाळीं मृगमद[11] साजे. ॥ ६४५
पयनिधिजा बंधु[12] विलसत अंकीं सनक सनंदन पदजळपंकीं, ।
गुंजत[13] तोषत गर्जत बोधें वेद विधी हर शेष विनोदें. ॥ ६४६
नारद नाचत वाजत वीणा, तुंबुरु जाणवि ताळ सुगूणा, ।
गणपति रंगीं ब्रह्मकुमारी तांडव नाचत मोदें[14] पुरारी[15]. ॥ ६४७

---

१. शंकरादिक. २. वृत्तसुखार्थ 'नु' दीर्घ केला आहे. (सह+अनुज=धाकट्या भावांसह.) ३. राम. ४. विष्णुरूपीं. ५. मिळाला. ६. देवांच्या गृहांत. ७. श्लोक ६४४ पासून ६५१ पर्यंत यांचें वृत्त 'पादाकुलक' होय. याचें लक्षण:—चार चरण असतात आणि प्रत्येक चरणांत सोळा मात्रा असतात. प्रख्यात 'मोहमुद्गर' स्तोत्र याच वृत्तांत आहे. 'पादाकुलक' हें वानवासिका, चित्रा, उपचित्रा व विश्लोक या वृत्तांच्या संयोगानें होतें. ८. चंद्र. ९. कमळां. १०. शुक्र आणि बृहस्पति यांहीं चांगली घडलेली. ११. कस्तूरी. १२. स्त्री, लक्ष्मी. १३. लोळत, गुडत. १४. आनंद. १५. महादेव.

पादकमळ मुनिमधुकररागीं गुणमतिवेधक जन वितरागी, ।
वीरत विषया वाळित रोषें ब्रह्मसुधारसपानविशेषें. ॥ ६४८
नाभिसरोरुह राजित कैसें बाळनखीं नव मंडळ जैसें, ।
विखनस तो कळिके मकरंदु प्रकटित मोदित वेदसुगंधु. ॥ ६४९
धवळ सुवासित शंख विराजे, अरिकुळचक्रविभंजनकाजें, ।
रघुपति सहजें माधव झाला, सुखमय सुघने त्रिजग ध्याला. ॥ ६५०
सुरवर किन्नरचारणसिद्धें नाम मरुद्गण मुनिजन बोधें, ।
वरुण कुबेर पुरंदर भारें मिळुनी गर्जति जयजयकारें. ॥ ६५१
कपी ऋक्ष ते अंश जे कां जयांचे तयांच्या रुपीं मीनले सर्व साचे, ।
रवीमाजि सुग्रीव पैं नीळनामा मिळे पावकीं आपुल्या तेजधामा. ॥ ६५२
बळी जांबुवंतू मिळे ब्रह्मदेवीं, नळू त्वष्टयामाजि प्राणांश ठेवी. ।
असो. सर्वही मीनले आत्मरूपीं, मुळीं सत्य तें संचलें द्वैत लोपी. ॥ ६५३
सुस्नात झाले शरयूजळीं जे ते दिव्यदेही सनकादि जे जे, ।
सन्मूख देखोनि विमानपंक्ती संतुष्ट तो भोजनभावभक्ती. ॥ ६५४
म्हणति विधिवरातें विष्णु विश्वेश वाणी,
सकळपुरनिवासी पातले सत्यखाणी, ।
अचळ पद तयांतें नित्य वस्तीसि दे कां,
वरुनि वचन ओपी दिव्य संतोष लोकां. ॥ ६५५
नारीनरेशा श्रवणें जयांचा संतानवंता सुगुणा सुताचा, ।
यालागिं भावें वदनीं पडावें सर्वार्थिदातें श्रवणीं भरावें. ॥ ६५६
ते गोप्रतारीं सुपवित्रतीर्थीं स्नानेंच होती सुरचक्रवर्ती, ।
मोक्षा सुखातें शरयू प्रवाती झाली निशाणी परलोकपंथीं. ॥ ६५७
प्रथम पुरि अयोध्या सर्वक्षेत्रांसि मान्या,
शतपरमित वर्षें निर्धना लोकशून्या, ।
सुमति ऋषभनामा जन्मला भूप, तेणें
पुनरपि जनवस्ती ठाव केला सुजाणें. ॥ ६५८

---

१. कमल. २. सर्ग ११० श्लोक २१. ३. अग्नींत. ४. विश्वकर्मा. ५. मुक्ति देणारा संतान नामक लोक ज्यांस मिळाला ते. ६. देवांमध्यें सार्वभौम. ७. या राजानें अयोध्यानगरींत पुनः वसति केली.

उपसंहार.

(श्लोक.)

सकरुणगुरुदृष्टीं ग्रंथ संपूर्ण झाला,
अगुणसहित संतीं पाहिजे गोड केला. ।
सुजनसमुह शंभू कोटि लिंगें न मौला,
परमभणगदीनें वाहिला बेलपाला. ॥ १
परिकर शतकोटी विष्णुचारित्र साचें,
अनुदिनिं पढतां हो! श्लोक श्लोकार्ध वाचे, ।
हरुनि सकलदोषा विष्णुसायुज्य पावे,
जननमरण खंडे राघवाचेनि नांवें. ॥ २
विश्वंभरश्रीगुरुच्या प्रसादें आनंदवाचा वदलों विनोदें, ।
भक्तीन मुक्तेश्वर सार बोले, आकर्णितां सज्जनचित्त डोले. ॥ ३

---

१. चिंतामणि उर्फ विश्वंभर हें मुक्तेश्वराच्या बापाचें नांव. मुक्तेश्वरानें आपल्या मातापितरांच्या नांवांचा उल्लेख 'लीलाविश्वंभर' या पदानें आपल्या ग्रंथांत अनेक ठिकाणीं केला आहे.

THE MAHÂBHÂRATA

OF

MUKTES'VARA.

(THE GREAT MARÂTHÎ POET OF THE MAHÂRÂSHTRA.)

"It should be the earnest endeavour of every educated person to maintain inviolate the purity of his native language—to be familiar with the history of its rise and progress."—Frederick Schlegel.

1. ÂDIPARVA.

EDITED WITH

CRITICAL AND EXPLANATORY NOTES

BY

VÂMAN DÂJÎ OKA.

PRINTED AND PUBLISHED

BY

TUKÂRÂMA JÂVAJÎ

PROPRIETOR OF JÂVAJÎ DÂDÂJÎ'S "NIRṆAYA-SÂGARA" PRESS.

BOMBAY.

1893.

Price 2½ Rupees.

महाराष्ट्रकविवर्यमुक्तेश्वरकृत

महाभारत.

१. आदिपर्व.

मुक्तेश्वरकृत भारत आवडतें विठ्ठलासि, कीं पर्व ।
सर्व श्रवणें हरितें आशा कविच्या, अशेषही गर्व. ॥

मोरोपंत–पांडुरंगदंडक.

हें

वामन दाजी ओक,

यांनीं अनेक हस्तलिखित प्रतींवरून शुद्ध करून, अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन तयार केलें.

आणि

मुंबईंत जावजी दादाजी यांच्या "निर्णयसागर" छापखान्याचे मालक तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

१८९३.

किंमत २॥ रुपये.

महाराष्ट्र भाषेचें व कवितेचें

आस्थापूर्वक अध्ययन

करूं पाहणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

सप्रेम अर्पण करतों.

'काव्यसंग्रह'कार.

अनुक्रमणिका.

परिशिष्टें.

सूचना—या पर्वांतील पहिल्या ४८ पृष्ठांतील टीपा **कै० ज० बा० मोडक** यांच्या हातच्या आहेत.

मुक्तेश्वरकृत महाभारत.

आदिपर्व.

(ओव्या.)

अध्याय पहिला.

ॐ नमो जी विश्वंभरा स्वामी ! । तुझिये स्वरूपपरब्रह्मीं । पंचायतन पंचनामीं । कल्पिजेती अवयव. ॥ १ ॥ तेथें शिव तो निजमस्तक; । विष्णुसूर्य द्वयहस्तक; । [1]सव्यचरण विनायक; । वाम तो शक्ति साजरा. ॥ २ ॥ याचा हाचि अभिप्रावो, । वस्तुवीण दुसरें [2]वावो. । जेथें नमन एका [3]सैभावो । जाणिजे तें निजबीज. ॥ ३ ॥ ऐशिया भांडवलाची गांठी, । गुरुसंकेतें, मनसंपुटीं । बांधोनि, मग हे विचित्र सृष्टी । लाभावरी घेतसे. ॥ ४ ॥ कां नाभिपद्मांत [4]कमळासन; । मध्यकंठांत रमारमण; । स्कंधावरता त्रिनयन; । अंगत्रयीं जो एक. ॥ ५ ॥ तया परमपुरुषालागीं, । [5]अष्टौ भावांच्या अष्टांगीं । नमस्कारोनि, मग प्रत्यंगीं । सेवा संतोषें निवेदीं. ॥ ६ ॥ माथां स्पर्शोनि स्नेहामृत, । अंग प्रत्यंगीं मर्दना करीत, । त्या त्याद्वारा सुख भोगित । आत्माराम हृदयस्थ. ॥७॥ अक्षय इक्षुरसाचें [6]बांधे । [7]आळिले हरिहरनामभेदें, । हें जाणे त्या अभेदबोधें । आवडी उपजे वदावया. ॥ ८ ॥ आतां [8]कैलासकंठीरव, । [9]काळकुंजरभंजन देव, । ब्रह्मेंद्रादि [10]त्रिबुंध सर्व । पादपद्मीं, पुजा रे. ॥ ९ ॥ कैवल्यकनकसभापती, । तांडव शंकर उदारकीर्ती, । चिदंबर स्वामी, चिन्मयमूर्ती, । [11]कामाटवीदाहक. ॥ १० ॥ की दशभुज पंचानन, । व्याघ्रचर्मांबरपरिधान, । कर्पूरगौर [12]गजाजिन । शोभे घन चांदणें, ॥ ११ ॥ प्रभा [13]शरच्चंद्रकोटी, । [14]हालाहलनीलता कंठीं, । कुरंग मिरवे करसंपुटीं, । विशाळभाळीं [15]कुटिलेंदु. ॥ १२ ॥ तया [16]हंसरूपी विरूपाक्षा, । गौरी[17]वल्लरीकल्पवृक्षा, । ज्ञानदीक्षागुरु, जो [18]दक्षा । शिक्षा करी, त्या

---

१. जनरूढींत 'सव्य' ह्या शब्दाचा अर्थ 'उजवा' असा घेतात, आणि एथेंही तसाच घेतला आहेसें दिसतें; परंतु को[illegible] शब्दाचा अर्थ 'डावा' असा घेतला आहे. २. व्यर्थ. ३. मावासहित. ४. ब्रह्मा. ५. 'स्तम्भः स्वे[illegible]ञ्चः स्वरभङ्गोऽथ वेपथुः । वैवर्ण्यमश्रुप्रलयौ अष्टौ भावाश्च सात्त्विकाः ॥' ६. गुळाचे खडे. [illegible] केले. ८. सिंह. ९. काळरूप हत्तीचा नाशक. १०. देव. ११. कामवनाचा दहनकर्ता. १२. [illegible] चर्म. १३. शरदृतूंतील कोटिचंद्रांसारिखा. १४. विषाची काळिमा. १५. चंद्रकोर. १६. [illegible]पी. १७ पार्वतीरूप वेल. १८. दक्षप्रजापतीला.

दंडवत. ॥ १३ ॥ जयाच्या ज्ञानोदकाचा वारा । झगटे मनोरूप तरुवरा, । अविद्याकुसुमीं जीवभ्रमरा । नित्य मुक्तता स्वभावें. ॥ १४ ॥ जयाच्या नामाचा दिव्य रस । जिव्हेसि लागे निमिष लेश, । तैं संसाररोगाचा नाश । अनायासें भाविकां. ॥ १५ ॥ ऐशिया सायुज्यसुखवर्धना । प्रणाम श्रीशैलमल्लिकार्जुना; । अशेषकर्मबीजभंजना-[1] । लागीं शरण निघालों. ॥ १६ ॥ आतां अंतरद्वारकाधामीं । जो अवाप्त[2]सकळकामी । विमळ[3]वैराग्यबदरिकाश्रमीं । नारायण नररूपें. ॥ १७ ॥ तोचि कांचीवरदराज, । श्यामसुंदर, चतुर्भुज, । शंखचक्रगदांबुज, । अभयपाणी नेटका. ॥ १८ ॥ इंदिरा[4]हृदयमंदिरनिवासी, । स्वानंदवृंदावनविलासी, । कोटिकंदर्प[5]लावण्यराशी, । विरक्ति[6]वेधें वेधलों. ॥ १९ ॥ मार्तंड[7]कोटि कोटिकिरणीं, । तैशीं मकराकृती कुंडलें श्रवणीं, । मुक्तमाळा तारका, वर्णीं । चंद्र तैसा कौस्तुभ. ॥ २० ॥ सौदामिनी[8]पट्टकूलवेशें । लागली चिद्धनाचिये कासे, । बिंबाधरा[10]माजी सुवासें । दंतरत्नें झळकती. ॥ २१ ॥ आकर्णनयन, नासीक कीर, । भाळीं तिलक रेखिला सुंदर । मृगनाभीचा[11] मनोहर; । तनू चंदनें चर्चिली. ॥ २२ ॥ अवलोकितां चरणप्रयाग । होय सकळ दुरित[12]भंग, । अवलोकितां मानसभृंग । पतंग होय दीपला. ॥ २३ ॥ ऐशिया स्वामी श्रीरंगधामा ! । कावेरीतटविहंगमा[13] ! । चढोचढी तुझा प्रेमा । हृदयीं वसो आदिया. ॥ २४ ॥ आतां बालार्क[14] बीजकंदीं । स्कंधीं विरूढला हस्तपादीं, । सगुण सुरंगाचा उदधी,[15] । गजानन नमियेला. ॥ २५ ॥ दिसे सजीव कनककमळें । स्वरूप धरिलें सहज लीळें, । ऋद्धिसिद्धीचीं स्वर्गफळें । भोगभरितें जयापाशीं. ॥ २६ ॥ देवऋषिगणांचे पौळे[16] । भोगिती स्वर्गापवर्गफळें,[17] । प्रसाद ओपिलिया वेगळे । चिदानंद मोदक[18]. ॥ २७ ॥ कृपामंदाकिनीच्या[19] जीवनें, । चतुर्दशविद्यानंदनवनें, । पल्हेजती[20] तेथें सुमनें, । साधक[21] झाले षट्पद[22]. ॥ २८ ॥ दंतदिनकराची दीप्ती, । पळे विघ्नांधकार राती, । नानादर्शनें[23] दीपावती, । जो मध्यस्थ गुरुत्वें. ॥ २९ ॥ निर्जर[24] भयें जर्जर होती, । ते ज्याचेनि आश्रयें जिती, । तो साह्य माझिये दुर्बळ मती । होऊ उन्मेषधनदाता[25]. ॥ ३० ॥ आतां सरस्वती कल-

---

१. सकळकर्मबीजाचा नाशक. २. प्राप्त. ३. निर्मळ. ४. लक्ष्मी[illegible]हृदयरूप मंदिरीं वास करणारा. ५. कोटी मदनांसारिखा. ६. वैराग्यवेधें. ७. सूर्य. ८. विद्युल्लता[illegible]वेषानें. ९. चैतन्यस्वरूपी. १०. तोंडल्याप्रमाणें ओठ. ११. कस्तूरीचा. १२. पातकनाश[illegible]पक्ष्या. १४. नुतन उदित सूर्य. १५. सागर. १६. मेळे. १७. स्वर्गमोक्षफळें. १८. हर्ष[illegible]१९. कृपारूपी भागीरथीच्या. २०. प्रफुल्लित होती. २१. साधु. २२. भ्रमर. २३. नाना[illegible]हा दर्शनें. २४. देव. २५. ज्ञानरूपी धन देणारा.

संसारीं [illegible] कैवल्यनिधा [illegible] । वेद कैवल्य-रीचा. ॥ ३१ ॥ त्रैलोक्यरूपी [illegible] गाहिलावाण-लिंगाचे शिखरीं । विद्याटनदी [illegible] रंभा । विद्यामूलपीठ, जगदंबा, । चातुर्यसौभाग्य [illegible] ॥ ३३ ॥ नवरसांची मंदाकिनी, [illegible] वाहे [illegible] देवत्रया पैढियंती ॥ ३४ ॥ तिये भक्तकामधेनूच्या [illegible] दुरी । दोहनसंभ्रमावांचूनि सत्वरीं । दे अज्ञान [illegible] सुवासिनी निर्वाणी, । सौभाग्यदायिनी, शुभकल्याणी, [illegible] सुजाणी, । वर सुवाणीयाची जे. ॥ ३६ ॥ वीणापुस्तकधारिणी [illegible] विहारिणी, । जे पांडित्यदानें सुखकारिणी, । ते वंदिली शा[illegible] तिनें अनुग्रहाचा त्वरित । शिरीं ठेविला वरदहस्त, । म्हणे, 'तुझी [illegible] सर्वदा सुफळ माझेनी.' ॥ ३८ ॥ आतां कथेचें अन्नसत्र । घालीं [illegible] पवित्र, । तेथें स्वामिनी, श्री स्वतंत्र, । पैढकी आत्र त्यां कीजे. ॥ ३९ ॥ [illegible] कां डोळस पायाळ निकें, । परी गुरुआज्ञेचें अंजन देखा, । प्रज्ञते ची भाग्यरेखा । नसतां निधान कैं जोडे ? ॥ ४० ॥ म्हणोनि देवताकृपें लाहिला । एक गुरुनि म्यां स्तविला, । अभेदभक्तीचिची सुलला, । आज्ञापीत निजसुखें. ॥ ४१ ॥ त्या कारुण्यवसंतवातें । शुद्धमानसशाखालतें । स्फूर्तीचे पल्लव फुटले, तेथें । कवित्व फळे फळभारें. ॥ ४२ ॥ म्हणे, 'बाळक पेतला थैया । नी भक्त करूनि दाखवी माया, । तेवीं त्यां आदरिलें, बाया । केवीं आम्हां उपेक्षणें. ॥ ४३ ॥ मुक्तेश्वर जो अवधूत, । माझेनी नामें मुद्रांकित, । कथा विस्तारी भारत । महाराष्ट्रपदबंधीं. ॥ ४४ ॥ मूळ भारत व्यास सांगे, । गणेश आपण लिही वेगें, । येथें मी कर्ता नव्हे अंगें । म्हणोनी, संतप्रार्थना त्यां कीजे. ॥ ४५ ॥ जी मी परब्रह्म नीतळें व्यक्तीं, । तें संत माझिया उत्साहमूर्ती, । त्यांसी जे अनन्य शरण होती, । त्यांसी कैवल्य खेळणें. ॥ ४६ ॥ जो ऐश्वर्यें न चढे मदा, । दारिद्रें दीनत्व न शिवे कदा, । निंदी त्याची न करी निंदा, । तो नारायण नररूपें. ॥ ४७ ॥ कामक्रोधाच्या भूतसंचारीं । न चळे सुविचारपंचाक्षरी, ।

---

१. कल्पवल्ली. २. सरस्वती. ३. गाठोडे. ४. विद्येचें आदिस्थान. ५. आवडती ६. [illegible] कामधेनूच्या. ७. सेवा, चाकरी. ८. चांगला. ९. लागलाच. १०. कारुण्यरूप वसंतऋतूंतील वायूनें. ११. मूर्तीनें अंतःकरण हीच शुष्क वल्ली. १२. हट्ट. १३. नामरूपी मोहरानें चिन्हित. १४. नमाथें. १५. मूर्ती. १६. गर्भेला.

[illegible]भाव दीपासूनि दुरी, । तो [illegible] [illegible] मनीं, । [illegible] [illegible] [illegible] [illegible]रूप. ॥ ४९ ॥ [illegible] [illegible] [illegible]मनाली, । [illegible] [illegible] [illegible], । तो नारायण नररूपें. [illegible] ॥ सज्जनश्रोत्रियीं [illegible] [illegible] जो [illegible] [illegible] दुरी, । शीर्षे वाट [illegible] पुढारी, । तो नारायण नररूपें. ॥ ५१ ॥ हरिहरनामाचे जीवर्सी, । जिव्हा तळंप होवोनि [illegible], । [illegible] [illegible] भाली, । तो नारायण नररूपें. ॥ ५२ ॥ [illegible] [illegible]कांची [illegible], । श्वानमांस वरिलें करीं, । देखोनि ब्राह्मण सदा[illegible] । [illegible] न [illegible] दोहींची. ॥ ५३ ॥ तैसे देहद्रोहाचे हातीं । असंगळ [illegible] । मनें चित्तें साधुसंगतीं । कदा कल्पांतीं [illegible]. ॥ ५४ ॥ [illegible] [illegible] हीन, । हा देहीं दृढ देहाभिमान, । तो गेलिया मग सूकरश्वान । [illegible] [illegible] गुरु[illegible]. ॥ ५५ ॥ ऐशिया सिद्धाचे पायवणी । जव न घेई माथां [illegible], । तंववरी ब्रह्मसुखाची कहाणी । कैंची लाभे तयातें? ॥ ५६ ॥ ऐशिया [illegible] जे दास, । ते इंद्रचंद्रांचे ईश, । त्यांच्या प्रसादें मावकाश । ऋद्धिसिद्धी [illegible]. ॥ ५७ ॥ ऐसें गुरुवाक्य होतां क्षणीं, । जे जे संत इंहीं लक्षणीं । [illegible], त्यांतें [illegible] । दंडवत माझें पावो. ॥ ५८ ॥ आतां प्रसंगासारिखें [illegible] । [illegible]संताचीं लक्षणें कांहीं, । अवगुण [illegible] देहीं, । साधकजनीं जाणावी. ॥ ५९ ॥ [illegible] [illegible] क्रोध काम । ज्या भूतद्रोहीं नित्य नेम, । स्वार्थालागीं हिंसाकर्मे, । सदाचार जयाचा. ॥ ६० ॥ [illegible]चें मदिरापान । [illegible] [illegible] [illegible] । हेळणछळणाचे पाषाण । साधूकडे [illegible]. ॥ ६१ ॥ तपोव्रताचिया [illegible] । [illegible] देहनाम [illegible], । वाचेच्या [illegible] । [illegible] देती पोसणें. ॥ ६२ ॥ वेदशास्त्राचें सदन, । सफळतेचें [illegible] [illegible], । पीपांडाचें [illegible] रान । अनीश्वरवादें [illegible] ॥ ६३ ॥ [illegible]चारिकपंथीं । दिवामीत झाले राती, । राहटों नये तें ते रीती । [illegible] जयाचा. ॥ ६४ ॥ लोभमळाचा चोहोडें । दांभिकता ही

१. [illegible] [illegible]. २. दांभिक [illegible]. ३. [illegible]. ४. [illegible] मांस. ५. [illegible]. ६. [illegible]. ७. [illegible] न करावें. ८. [illegible]. ९. गोड. १०. [illegible] होतो. ११. [illegible] [illegible]. १२. दुष्ट. १३. लोकांच्या [illegible]. १४. [illegible]. १५. [illegible]. १६. [illegible]. १७. [illegible]. १८. [illegible] वन. १९. [illegible]. २०. मरड, ओसाड जमीन. २१. [illegible]. २२. [illegible] लोकांचें [illegible]; अभिचारिक=[illegible] किंवा [illegible] ठायीं. २३. [illegible]. २४. [illegible].

ा । मिथ्याचारें लावोनि पोटा- । साठी श्वान जे झाले. ॥ ६५ ॥
निंदेची विष्टा, । पापदेह पोशिती मोठा, । सूकरकुकर्माचा वांटा ।
ालिती. ॥ ६६ ॥ वाचे सत्याचा विटाळ, । इंद्रियनियमाचा ईसाळ, ।
माशीं गोंधळ । अखंड वाली मानसीं. ॥ ६७ ॥ एका अवगुणाची
ुनि, सत्कवीकथारसीं । आनंदगुळाच्या गोडग्रासीं । अरुची
ा. ॥ ६८ ॥ आपल्या कवित्वाचा कुँवाडा । मिरवी सधन सभे-
करी म्हणे होडा । महान् कविरत्नाशीं. ॥ ६९ ॥ ऐसे असंत
ं, । त्यांसही प्रार्थी आदरें बहुतें, । आमंत्रणें येइजे येथें । कथा-
. ॥ ७० ॥ श्रीगुरूच्या आज्ञे आदरें, । पवित्रकथेच्या बँडिवारें, ।
ारें । दुःखदारिद्र्य हरेल. ॥ ७१ ॥ ऐसें आज्ञापितांचि, रहिला ।
विटाळ फिटला, । म्हणोनि आचार्यपादुका झाला । स्पर्शावया
७२ ॥ आतां **व्यास** वेदांती नेटका, । जैमिनीवसिष्ठमीमां-
ा **गौ**तमनैयायिका । दंडप्रणाम सद्भावें. ॥ ७३ ॥ सांख्याचार्य
भाष्याचार्य परमज्ञानी । पतंजली सहस्रफणी । शेषं विशेषें
४ ॥ **गौ**डपाद, श्रीशंकर, । विवरणाचार्य **श्री**धर, । टीकाकार-
। नमस्कारिले गुरुरूपें. ॥ ७५ ॥ प्राकृतकवीश्वराचार्य ।
कवर्य, । जयाचे बुद्धीचें गांभीर्य । अगाधसिंधूसारिखें. ॥ ७६ ॥
चिंतिले मनीं, । तेणें पावन झालों जनीं, । मातृजनक जनार्दनी ।
नयेला. ॥ ७७ ॥ आतां वंदूं सभासमुद्र, । जेथें जन्मला चातुर्य-
ुधेचा सुचंद्र, । जिववी जिज्ञासूचकोरा. ॥ ७८ ॥ अखिलनिगमा-
, । शास्त्रकल्लोळाचिये त्रिवेणीं, । पुराणगाथेची तरंगिणी । उक्ति-
. ॥ ७९ ॥ विद्वज्जन रत्नाचे पुंज, । ज्ञानविज्ञानें अतिसुतेज, ।
र्थराज । भागीरथी अगाध ते. ॥ ८० ॥ न्यायगुरुमर्यादावेळा ।
कदा काळा, । तया परमपुरुषांचा मेळा । सिंधुरूपें नमियेला.
थील श्रोते हो! परिसपणें । तुमचें अवधानस्पर्शें तेणें । माझें
हगुणें । अमोल्य होईल कांचन. ॥ ८२ ॥ मग जयाच्यां कर्णे-
य होईल, निश्चय जाणा. । यालागीं तुम्हांतें पुन्हा पुन्हा । प्रणिपात

. किळस. ३. खीळपटपणा. ४ गोष्टी. ५. यथाप्रमाणें. ६. अमृत. ७. मीठेपणानें.
शेषाचा अवतार मानिला आहे. ९. भागवतटीकाकार. १०. ज्ञानानें सर्वांत एक
र हा एकनाथाच्या मुलीचा मुलगा. १२. जनार्दनपंत हा मुक्तेश्वराच्या आजाचा ...
१३. बोधामृताचा. १४. जाणण्याविषयीं इच्छिणारा चकोरनामक पक्षी. १५. मर्यादा.

साष्टांगी. ॥ ८३ ॥ भरवेना तें धरिलें मनीं, । तें सिद्धी पाववा कृप
कीं वानरां सेतुबंधनीं । सामर्थ्यदेता रघुनाथ. ॥ ८४ ॥ अंजळ
सिंधूदका, । ब्रह्मांड उचलूं म्हणे अळिका, । तुम्ही कराल,
निका । तोचि अगस्ति, कीं शेष. ॥ ८५ ॥ वेदशास्त्र स्मृतिपुराणें
इतिहास व्याकरणें । गाळूनि विचाररसायणें । द्वैपायनें कुशलत्वें
सुरस सुंदरी पवित्र सृष्टी । पक्वान्नें निपजवूनि पाठीं । संस्कृतशब्द
श्रेष्ठश्रेष्ठां ओगरिलीं. ॥ ८७ ॥ तेंचि रसायण दुर्बळपणीं । महार
पणीं । वाढिलें, तरी मुकाळूजनीं । न सेविजे किमर्थ ? ॥ ८८
कविपंडितीं, । सर्वज्ञतेच्या रत्नदीप्तीं, । निर्गुण, निर्विकार, पशु
ककमळीं अर्चिजे. ॥ ८९ ॥ तेथें भावार्थी मी दुर्बळ, । धत्तूरपुष्प
अल्पमतीचेनि मोल । काढविती ते केवीं ? ॥ ९० ॥ तथापि दे
रिसा । मोह कराल, हा भरंवसा. । कां सोन थोर महेशा ।
कींडसणी. ॥ ९१ ॥ आणि ईश्वरस्वरूपीं डोळस, । त्यांसी वप
नुपजे, जैसा सूर्यप्रकाश । नेणे कदा तमातें. ॥ ९२ ॥ तेवीं
दृष्टीं, । न म्हणे संस्कृत मऱ्हाटी, । रत्नकुंभीं कीं मृत्तिकाघटीं
रिखें. ॥ ९३ ॥ श्रोते म्हणती, 'नवल प्रीती, । आमंत्रणींच
पुढील भोजनाची गती । अनिर्वाच्य सर्वथा. ॥ ९४ ॥ आतां व
सर्व; । कथा आरंभीं अति अपूर्व, । संबंध लावीं पर्वीं पर्व, । अनुस
॥ ९५ ॥ 'जी जी प्रसाद' म्हणोनि वक्ता । नमस्कारूनि होय बो
सादर परिसा आतां । कथा [11]कलिमलनाशनी. ॥ ९६ ॥ आधींच
समुद्र, । वरी विस्तारी कवीश्वर, । तरि श्रोतियां भासेल भयंकर
पडिल्यासारिखें. ॥ ९७ ॥ सिंहावलोकनें पडताळितां ग्रंथ, । अ
वेढाळूं लागत; । चतुर श्रवणें चातकां गमत । अमृताची वा कुपी
म्हणोनि कथा नये गाळितां, । सुविस्तारें नये पाल्हाळितां, । जैसें
कर्ता । [14]थोडेनीं [15]सांग संपादी. ॥ ९९ ॥ उग्रश्रवा लोमहर्षण
पुराणीक सुज्ञानी, । अर्थवंत ऋषीदर्शनीं । नैमिषारण्यीं पातला.
तेथें [16]द्वादशवार्षिक सत्र । शौनकें आरंभिलें विचित्र; । मिनें[17]

१. समुद्राच्या उदकाला. २. भ्रमरी. ३. ड्सम. ४. व्यासानें. ५. मागून, नंतर.
केळीच्या पानीं. ८. गारिखा. ९. लहान. १०. दृष्टासनीं. ११. कलिपातक नाशन करणार
१३. सौम्य कर्म. १४. थोडक्यांत. १५. यथाशास्त्र. १६. बारा वर्षेपर्यंत चालणारा यज्ञ.

पवित्र । संशितव्रती अपार. ॥ १०१ ॥ ते मुनिवर्यें देखोनि दृष्टीं, । भावें
जोडिली करसंपुटीं, । नमस्कार धरणीतटीं । सकळिकांतें घातला. ॥ १०२ ॥
म्हणाती परम ऋषी । आदरें आसन दिधलें त्यासी, । गौरवूनी म्हणती,
कैशी । लाभवेळा आजची ! ॥ १०३ ॥ सत्कथेच्या अवर्षणीं । भरूनि अ-
मृतसिंधूचें पाणी । मेघ धाडिले कृपेकरुनी । जगदीश्वरें या ठायां. ॥ १०४ ॥
तुझिया वक्तृत्वलक्षणपीयूखा । सकळीं सादरतेनें देखा; । ओढविल्या कर्णकु-
पिका । परमरस म्हणउनी.' ॥ १०५ ॥ सौती म्हणे, 'स्वामी ! वहिला ।
जन्मसंग्रह सार्थक झाला. । दरिद्रियाचे कन्येनें वरिला । सभाग्यश्रेष्ठ भूपती.
॥ १०६ ॥ जनमेजयाचे सर्पसत्रीं । वैशंपायन पवित्रवक्त्रीं । वदला, तिया श्र-
वित्या श्रोत्रीं । विचित्र कथा कौतुकें. ॥ १०७ ॥ व्यासशंकरापाशील गंगा ।
भारतकथालक्षण सुभगा; । तीस भगीरथ झाला जगा । वैशंपायन विवेकी.
॥ १०८ ॥ ते कर्णद्वारां हृदयकलशीं । धरिली स्मरणाचे अवकाशीं; । तो
स्वामींसी । तीर्थप्रसादबिंदु हा.' ॥ १०९ ॥ क्षीराब्धिशायी
भारतमिसें जाण । पंचम वेद
ही. । तें ब्रह्मसृष्टींत जन्मलें
॥ १११ ॥ ते साठि
स्थापिलें देखा ।
विता झाला
॥ बृह-
गधरां ।
वेज्ञ

पाती अर्थ; । जाणे नेणे संजय. ॥ १२० ॥ मातृनियोगें द्वैपायन । विचित्रवीर्यें
क्षेत्रीं आण । वाढवी करी कुळसंतान । रेतोदकें आपल्या. ॥ १२१ ॥ धृत
राष्ट्र, दुजा पांडु नृपती, । तिसरा मांडव्यशापें प्रेतपती, । विदुर क्षत्ता, पक्ष
पाती । सर्वकाळ धर्माचा. ॥ १२२ ॥ धृतराष्ट्राचे शत गांधार, । पांच प
डव पांडूचे कुमर; । त्यांचे राहाटीचा प्रकार । वृक्षदृष्टांतें परिसिजे. ॥ १२३
अहंकारद्रुम दुर्योधन; । शकुनी शाखा; खांदी कर्ण; । पुष्पफळें दुःशासन;
मूळ राजा धृतराष्ट्र. ॥ १२४ ॥ धर्म तो धर्मस्वरूपी द्रुम; । खांदिया शाख
अर्जुनभीम; । पुष्पें फळें अतिउत्तम । माद्रीपुत्र मिरवले. ॥ १२५ ॥ मूळ
तो जगदात्मा श्रीकृष्ण, । जो परमात्मा जगद्वंद्य विष्णु; । म्हणोनि छळित
सहिष्णु । धर्मराज धर्मात्मा. ॥ १२६ ॥ पहिलें कौरवपांडवजनन. । त्याव
लाक्षागृहीं दहन. । द्यूतीं द्रौपदीवस्त्रहरण, । वनाभिगमन तद्योगें. ॥ १२७
मत्स्यालयीं अज्ञातवास. । गोग्रहणीं कौरवत्रास. । युद्धें नेमी द्वा
मग संग्राम मांडला. ॥ १२८ ॥ अकरा [illegible]
दोघांजणां. । सहाय झाले [illegible]
अक्षौहिणी अंत । निः[illegible]
पांडवांपाठीं राहि[illegible]
भारद्वाज; । द्रो[illegible]
शल्य; अर्ध[illegible]
द्रोणपुत्रें[illegible]
आदि[illegible]

पृथ्वी पावले. ॥ १३६ ॥ हेची अनुक्रमाची युक्ती; । पश्चात्ताप मानूनि चित्तीं; । धृतराष्ट्र संजयाप्रती । सतरा श्लोकीं बोलिला.॥ १३७॥ म्हणे 'लक्ष भेदोनि साक्षेपें, । द्रौपदी जिंतिली प्रतापें, । तेथवांची जयाशा संकल्पें । म्यां सांडिली रे संजया! ॥ १३८ ॥ सुभद्रा प्राप्त झालि या पार्था, । यादव पातले इंद्रप्रस्था. । हें ऐकतां जयाची आस्था । म्यां सांडिली रे संजया! ॥ १३९॥ लाखाजोहरीं वांचले. । पांचाळाचे जामात झाले. । ऐकतांक्षणीं जयाशा बोलें । म्यां सांडिली रे संजया! ॥ १४० ॥ जरासंध वीर विक्रमें । शस्त्रेंवीण मारिला भीमें. । तधींच जयाशा कामें । म्यां सांडिली रे संजया! ॥ १४१ ॥ रजस्वला, अनाथा ऐशी । सभेसी आणिली मुक्तकेशी, । कृष्णा गांजितां, जयाशा मानसीं । म्यां सांडिली रे संजया! ॥ १४२ ॥ श्रमले दुःशासनाचे हात, । ऐसे वस्त्रांचे पडले पर्वत. । कृष्ण पुरवितां, विजयीं स्वार्थ । म्यां सांडिला रे संजया! ॥ १४३ ॥ वना जातां संतप्त पोटीं, । संकेत दाविले जनांचे दृष्टीं, । विदुर सांगतां जयाची गोष्टी । म्यां सांडिली रे संजया ॥ १४४ ॥ इच्छाभोजन अद्वैतवनीं. । युद्धीं जिंकिला पिनाकपाणी. । हें ऐकतां विजय अंतःकरणीं । म्यां सांडिला रे संजया! ॥ १४५ ॥ कर्णबुद्धीनें सदा वर्तीतां, । दुर्योधन गंधर्वी बांधोनि नेतां; । पार्थें तो सोडवितां; जयाची क[illegible] सांडिली रे सं-जया! ॥ १४६ ॥ विराटयुद्धीं एकेचि र[illegible]
तेव्हांचि जयाची वासना [illegible]
स्वराज्य सन्मान [illegible]
तरीं [illegible]

तापें विद्ध भेदूनी गेला. । तेधवांच जयाशेच्या बोला । म्यां सांडिलें रे संजया ! ॥१५४॥ कर्ण, द्रोण, शल्य, गुरुसुत । देखतां मारिला जयद्रथ, । तेधवांची जयाची मात । म्यां सांडिली रे संजया ! ॥ १५५ ॥ गुरुमर्यादा सांडुनी बाणें । द्रोण वधिला धृष्टद्युम्नें, । तेव्हांची जयाची कामना मनें । म्यां सांडिली रे संजया ! ॥१५६॥ दुःशासन माझी धेनु धाकुटी, । भीम व्याघ्र झोंबोनि कंठीं, । अशुद्ध प्राशितां जयाशा पोटीं । म्यां सांडिली रे संजया ! ॥ १५७ ॥ जो धनुर्धरशिरोमणी । कर्ण पार्थें विंधिला रणीं; । तेव्हांचि जयाशा मनीं । म्यां सांडिली रे संजया ! ॥ १५८ ॥ जो कृष्ण तो न मनी माझें; । शल्य वधिला धर्मराजें; । तेव्हांची जयाशेचें ओझें । म्यां सांडिलें रे संजया ! ॥ १५९ ॥ कलहद्यूतीं मूळ शकुनी, । त्यासी सहदेवें मारिलें रणीं; । तेव्हांची जयाशेची दुराशा मनीं । म्यां सांडिली रे संजया ! ॥ १६० ॥ अकरा अक्षौहिणींचा पती । दुर्योधन विरथ, भग्नशक्ती, । जळीं लपतां, जयाची संपत्ती । म्यां सांडिली रे संजया ! ॥ १६१ ॥ पांडव वेढनियां गोपाळ । जाउनी छळिला माझा बाळ; । तेव्हांची अपजयाचा अनळ । मज लागला रे संजया ! ॥ १६२ ॥ चित्रमार्गें विविध गती । गदायुद्धीं ऐंद्रजाती. । भीमें पाडितां जयसंपत्ती । ... माझी ... १६३ ॥ मिथ्या वासुदेवाची बुद्धी, । पांडव राहा- ... ाब्धी । कपटें कोंडोनी मारिला. ॥१६४॥ ... असपत्न राज्य ऐशियापरी । ... रहा ठरले जीवें ... वो

चित्रगुप्ताचे हात । तेही लिहितां भागले. ॥१७२॥ अंबरीष, मरुत्त, इक्ष्वाकु क्षिती । मनु, गयराजा, भरत, ययाति, । शशबिंदु, भगीरथ, राम दाशरथी । लोकत्रयीं प्रसिद्ध. ॥१७३॥ सैन्याश्रुत, जय, कक्षीवंत, । सुहोत्र, रंतिदेव, शर्याती अजित, । बाल्हीक, चैद्य, मगधनरनाथ, । विश्वामित्र, नळनामा.॥१७४॥ कृतवीर्य आणि जनमेजयो, । तव नामाचा प्रतापसूर्यो । ज्यांची कीर्ति स्वमुखें तनयो । सत्यवतीचा अनुवादे. ॥ १७५ ॥ पुत्रशोकपरिहारार्थी । पूर्वी नारद शौनकाप्रती । चतुर्विंशती राजे नृपती । पुण्यश्लोक सांगीतले. ॥ १७६ ॥ पुरुप्रवीरकुरुइत्यादिका । शतसहस्रीं नव्हे लेखा, । त्यांचीं दिव्यकर्में देखा । त्यागें विक्रमें गर्जती. ॥ १७७ ॥ ज्यांच्या चरित्रांचीं लेणीं । भूषणें झालीं जगाचे श्रवणीं, । स्वर्गीं स्तुतीच्या तांबूलेंकरुनी । मुखें रंगलीं देवांचीं. ॥१७८॥ ज्यांचिया सुकृतराशी उमापा । पूर्ण भरितां ब्रह्मांडाचिया मापा, । प्रळयीं उरवितां साटोपा, । गणना नव्हे कल्पांतीं. ॥१७९॥ बहुयज्ञ, बहुदक्षणा, । देतां बहुसाल ऋषिब्राह्मणां, । नेतां उबगोनी सांडिलें धना, । नाम झालें कनकाद्री. ॥१८०॥ सत्य, शौच, दया, आर्जव, । स्वधर्मकर्मीं ईश्वरभाव, । न्यायनीतीचें गौरव, । जीहीं बहुसाल वाढविलें. ॥ १८१ ॥ जींहीं दानोदकें प्रबळ । जळमय केला ब्रह्मगोळ, । तेही पातला असतां काळ, । वश झाले मृत्यूतें. ॥ १८२ ॥ अभ्रें वितुळलीं निराळीं; । नाना बुंद्बुद विराले जळीं; । तैसे अचुक काळानळीं । भस्म झाले असंख्य. ॥ १८३ ॥ तुझे पुत्र तंव दुरात्मे । नाश पावले केलेनि कर्में; । त्यांचा शोक मनोधर्में । करणें हाचि अविवेक. ॥ १८४ ॥ वेदशास्त्रींच्या अर्थविचारें, । आचार्याचेनि वाक्यनिर्धारें, । प्रपंचापासूनि बुद्धी चतुरें । स्वरूपनिष्ठा करावी. ॥ १८५ ॥ देहेंशीं विश्व मिथ्या सकळ । जाणोनि, ब्रह्म चिंतीं निर्मळ; । तेणें शमेल शोकजाळ; । स्वानंदसुख पावसी. ॥ १८६ ॥ नानादेहांतरांत ऊर्मी । उठती चैतन्याचिये व्योमीं; । तें जाणत्या मोहाची गुर्मी । कल्पांतींही बाधेना.' ॥ १८७ ॥ ऐसें बोलोनि मुनी संजयो । स्वस्थ केला अंबिकातनयो; । इतुकेनी कथेचा अन्वयो । एथें संक्षेपें सांगीतला. ॥ १८८ ॥ हेंचि विस्तारें परिसा पुढें; । उघडोनि श्रवणातींचीं कवाडें; । वचनें सेवा सुपक्वफळें गोडें । भारतकथामृतवल्लीचीं.' ॥ १८९ ॥ ऐशी सविस्तर कथा । संजयें सांगीतली गांधारीकांता; । श्रद्धेनें ऐकती जे तत्वतां, । मोक्षसुख त्यां लाभे.

१. पराक्रमें. २. अलंकार. ३. विझ्यानें. ४. आकाशांत. ५. बुडबुडे. ६. लाटा. ७. आकाशीं. ८. विश्वासानें, आस्तिक्यबुद्धीनें.

॥ १९० ॥ आदिपर्वकथामृत । मन करूनियां साव चित्त, । जैसें चातक मेघातें[1] आर्तभूत, । तैसें श्रवण करावें. ॥ १९१ ॥ भारत पाहतां पांचवा वेद । श्रीव्यासें कथिला विशद; । निर्धारेशीं पदबद्ध । श्रवण करा श्रोते हो ! ॥१९२॥ कथामृत परम सुस्वाद । ऐकतां आनंद उद्बोध; । पावती सज्जन स्वानंद । निजांगीं अतिवेगें. ॥ १९३ ॥ इतर आदरें ऐकतां । सकळ दोष जाती तत्वतां; । तया सायुज्यपद ये हाता, । श्रवण करितां भावार्थें. ॥ १९४ ॥ आदरें वाचिती प्रीती, । जे श्रवण करिती सुचित्तीं, । त्यां निजपद सांपडे हातीं, । पातकें जाती निःशेष. ॥ १९५ ॥ कुरुक्षेत्रीं आणि प्रयागीं । सहस्त्र कपिला सुवर्ण शृंगी । गाई विप्रा वेदविदुषालागीं । देतां सुकृत जें जोडे; ॥ १९६ ॥ तें भारतींचें पर्व एक । श्रवण करितां पावती लोक; । पापसिंधु प्राशिती देख । इतिहासरूपें अगस्ती. ॥ १९७ ॥ श्राद्धीं ब्रह्मविद ब्राह्मण । आमंत्रितां तृप्ति पितरां संपूर्ण; । तैसें एक पर्व करितां श्रवण । सर्वशास्त्रांचें फळ लाभे. ॥ १९८ ॥ इति श्रीभारत आदिपर्वणि । पुढें परिसावें विचक्षणीं; । वदेल मुक्तेश्वराची वाणी । लीलाविश्वंभरप्रसादें. ॥ १९९ ॥

अध्याय दुसरा.

ऐश्वर्याचेनि मदें समर्थें । हेळणा करूनि दीनें अनाथें, । गांजितां विघ्न पावोनि त्यातें । हानी करी, तें ऐका. ॥ १ ॥ जनमेजयराजा कुरुक्षेत्रीं । परम धार्मिक दीर्घसत्रीं । सहवर्तमान ब्रह्मक्षेत्रीं । बंधुत्रय नेटकें. ॥ २ ॥ श्रुतसेन, उग्रसेन, । तिसरा अनुज भीमसेन, । पौरपत्य[2] तया अधीन । रायें केलें यज्ञाचें. ॥ ३ ॥ तेहीं देवशुनीचा तनय । दुरी देखोनी सारमेय,[3] । न विचारितां न्याय, अन्याय, । दंडप्रहारीं ताडिला. ॥ ४ ॥ तो रुदन करीतचि वेगें । जाऊनि वृत्तांत मातेसि सांगे; । येरी म्हणे, 'त्वां अन्याय आंगें । केला असेल तयाचा.' ॥ ५ ॥ पुत्र म्हणे जननीप्रति, । 'अन्याय असतां कायसी खंती ?' । ऐकोनि कुमरा धरोनि हातीं, । शुनी सभेप्रति पातली. ॥ ६ ॥ लक्षूनि राजचूडामणी । म्हणे, 'गा ! अनीतिवेश्याव्यसनी । झालासी, म्हणोनि स्वधर्मपत्नी । कीर्ति रुसोनि जातसे.' ॥ ७ ॥ राजा विचारी बंधुवर्गा; । तंव अन्याय शिवला दिसे अंगा; । हें जाणोनि व्यापार उगा । वाग्देवीनें पैं केला. ॥ ८ ॥ शुनी म्हणे, 'अधर्में येणें । शाप घेई माझेनि वचनें; । अकस्मात विघ्न येईल तेणें । याग न पावे सिद्धी

---

१. दुःखित. २. साहिल, व्यवस्थेचें काम. ३. कुत्रा.

हा.' ॥९॥ राजा उद्विग्न निज मानसीं। मृगयाव्याजें निघे वनासी; । त्या वनीं देखियला ब्रह्मऋषी । श्रुतश्रवा महातपी. ॥ १० ॥ नमस्कारूनि ऋषिसत्तमा, । म्हणे, 'जी ! पुरोहित मेळवा आम्हां; । जो कां सिद्धी पाववी होमा, । अडसोडोनि अरिष्टें.' ॥ ११ ॥ ऋषी म्हणे, 'माझा कुमरु । सोमश्रवा तपस्वी थोरु; । याचेनि हातें हा अध्वरु । समाप्तीतें पावेल. ॥ १२ ॥ माझेनि वीर्यें वीर्यज पुष्टी; । परी जन्मला सर्पिणीच्या पोटीं; । विघ्नें पळती याचिया दृष्टि, । जेवीं पातकें हरिनामें. ॥ १३ ॥ हा सांगेल तें त्वां करणें.' । राजा गोंवोनियां नियमवचनें, । पुरोहित करोनियां मानें, । ब्रह्मसत्रीं स्थापिला. ॥ १४ ॥ यावरी धौम्यनामा ऋषी । तपोवनीं स्वाश्रमवासी; । तिघे शिष्य पैं तयासी । आरुणि, उपमन्यु, आणि वेद. ॥ १५ ॥ त्यांतें धौम्य आज्ञापी वचनीं, । 'पांचाळासि जाऊनि आरुणि ! । केदारखंड बांधोनि, पाणी । शीघ्र आणीं त्या ठायां.' ॥ १६ ॥ आज्ञा होतांचि निघे त्वरित; । पाणी पाटें वाफया नेत; । फुटलें तेथें निरोधार्थ । शरीर आड सूदलें. ॥ १७ ॥ उदक गेलिया कोपेल गुरु, । म्हणोनि सांडिला देहव्यापारु, । धैर्य करूनि पिंडपाथरु, । जळीं जैंळसेन तो झाला. ॥ १८ ॥ ऐसे लोटले दिवस कांहीं; । सद्गुरु म्हणे, 'आरुणि कां नाहीं ?' । पाहों आला, तंव प्रवाहीं । जळचरप्राय पडिलासे. ॥१९॥ श्रीगुरु म्हणे, 'ये गा आरुणि !' । येरु म्हणे, 'येतां सुटेल पाणी.' । उपाध्यायें कृपा करुनी, । करीं धरूनी काढिला. ॥ २० ॥ उदक रोधिलें गुरूच्या कामा, । म्हणोनि उद्दालक या नामा । ठेवोनि म्हणे, 'गा शिष्योत्तमा ! । वरप्रदान घे माझें. ॥ २१ ॥ ज्ञान, प्रज्ञा, कुळ, शीळ, । तप, लावण्य, संपत्ति, बळ, । अष्टैश्वर्य सर्वकाळ । तुझ्या ठायीं वसोत.' ॥ २२ ॥ बहुतकाळ भोगिलें श्रमा । म्हणोनि पाठविला स्वाश्रमा. । यावरी जो कां उपमन्युनामा । दुसरा शिष्य, आज्ञापी. ॥ २३ ॥ 'तुवां सवत्स धेनु रक्षावी, । धर्मारण्यामाजी चारावी, । कंडूयनें तोषवावी.' । 'अवश्य' म्हणे उपमन्यु. ॥ २४ ॥ आज्ञेनें रक्षित असतां धेनु, । शिष्य देखे प्रसन्नवदनु; । श्रीगुरु म्हणे, 'बाळका ! प्राणु । किमुपायें जीवविसी ?' ॥ २५ ॥ म्हणे, 'जी ! भिक्षान्नें पाळिलें.' । आचार्य म्हणे, 'अविहित केलें; । गुरूस नेदितां, तें झालें । निषिद्धान्न सर्वथा. ॥ २६ ॥ अर्धभिक्षा गुरूस द्यावी; । शेष श्रेयस्कर ते भक्षावी. ।' शिष्य म्हणे, 'बहुत बरवी । आज्ञा समर्थ स्वामींची.' ॥ २७ ॥ त्याचि सां-

१. यज्ञ. २. क्षेत्र, शेत. ३. बांधण्यासाठीं. ४. ठेविलें. ५. जलचर. ६. खाजविण्यानें. ७. कल्याणकारक.

गीतल्या रीती । पक्ष मास क्रमितां, पुढती । अवलोकन करितां अंगकांति, । दिसे दोंदिल साजिरा. ॥ २८ ॥ जाणोनि म्हणे, 'गा ! शिष्य सुमती ! । अर्ध देणें अनुचित विहितीं; । संपूर्णभिक्षा अवंचक भक्ती । आजपासोनि दे आम्हां.' ॥२९॥आज्ञेसारिखा वर्ते येरु; । सर्वभिक्षेनें तोषवी गुरू; । दुसरेनि मधुकरें जठरु । तृप्त करी आपुला. ॥ ३० ॥ धष्ट पुष्ट मांसागळा । देखोनि मागुती म्हणे, 'रे बाळा ! । कवणेपरी क्षुधानळा । शांतविशी तें सांग.' ॥ ३१ ॥ येरु म्हणे, 'दुसरेनि भिक्षा करीं.' । श्रीगुरु म्हणे, 'ही साचारी । द्विवारभिक्षा क्लेशकारी । गृहस्थातें सर्वदा. ॥ ३२ ॥ आजिपासोनि ऐसें न करीं प्राज्ञा ! । जाणत जावी श्रीगुरुसंज्ञा.' । महाप्रसाद म्हणोनि आज्ञा । शिष्यें माथां वंदिली. ॥ ३३ ॥ धेनु चारित असतां वनीं, । क्षुधाभुजंग लागला, तत्क्षणीं । द्रोणमात्रदुग्धपानीं । शांत करी तयातें. ॥ ३४ ॥ मागुती मांसागळा देखोनि पुशिलें; । येरें यथार्थचि हो ! कथिलें. । श्रीगुरु म्हणे, 'गा ! उच्छिष्टिलें । होमद्रव्य नेणतां. ॥३५॥ करूं नये तें न कीजे पुढती; । वारंवार सांगणें किती?' । क्लेश न मानूनियां चित्तीं, । 'क्षमा करा' म्हणे उपमन्यू. ॥ ३६ ॥ पयपानही वर्जिल्यावरी, । धेनू पाजूनि वत्सा वारी; । दुग्धफेणें तुष्टि करी । अधरसंधीं जो निघे. ॥ ३७ ॥ सेवोनियां काढी वेळ, । आनंदभरित सर्वकाळ. । सद्गुरु म्हणे, 'हे बाळ ! । वृत्ती काशानें कंठिसी ?' ॥ ३८ ॥ शिष्यें साचचि सांगतां देख । आचार्य म्हणे, 'अतिपातक । वत्साहाराचा अपहारक, । त्यातें धेनू शापिती. ॥ ३९ ॥ तूतें आम्हीं हेंचि सांगणें । जे जीवमात्रा न पीडणें.' । 'त्राहे त्राहे' म्हणोनी वचनें । शिष्य निघे निजकार्या. ॥४०॥ वनीं करितां गोशुश्रूषे, । पीडिला क्षुधेचेनि हुताशें[३]; । दुग्धभरित भावूनि ढेसें[४][५], । अर्ककुसुमें[६] भक्षिलीं. ॥ ४१ ॥ तें अतिक्षार, उष्ण, कटुक । अंगीं व्यापिलें दाहक विख; । तेणें दृष्टी जाऊनि निःशेख । अंध झाला ते क्षणीं. ॥ ४२ ॥ सांजे गृहा आणितां गोधन, । कूपीं पडला न देखोन, । धौम्य म्हणे, 'अतिसहिष्ण । आजि उपमन्यू न येची.' ॥ ४३ ॥ उबग मानूनि तो वना जाये; । मार्गीं येऊनि त्या बोभाये[७]; । 'उपमन्या ! तूं शीघ्र ये ये; । केउता[८] असशी अपत्या ?' ॥ ४४ ॥ येरु म्हणे, 'स्वामी ! न ये येतां; । दृष्टी जाऊनि कूपा आंतौता[९] । पडिलों आहें.' हें ऐकतां । 'नाभीं' म्हणोनि कळवळला. ॥ ४५ ॥ 'मी सांगेन तयाचे परी । अश्विनौदेवस्तवन करीं; ।

१. सिद्धान्नभिक्षेनें. २. सेवा. ३. अग्नीनें. ४. मानून. ५. वृक्षाचा कोम. ६. रुईचीं फुलें. ७. बोलावी, हांक मारी. ८. कोठें. ९. आंत.

ते दृष्टी देऊनि बाहेरी । काढतील तुजलागीं.' ॥ ४६ ॥ तेणें उपदेशिलिया वचनीं । अश्विनौदेव स्तवितां क्षणीं, । देव धन्वंतरी ते दोन्ही । कृपेनें आले त्या ठायां. ॥ ४७ ॥ तिहीं मस्तकीं ठेवुनि हात, । अपूप[1] दिधला घृतपाचित; । म्हणती 'बाळका ! क्षुधापीडित । भक्षण करीं तूं याचें.' ॥ ४८ ॥ येरू म्हणे, 'गुरूसी नेदितां सहसा । भक्षण न करीं हा भरंवसा.' । अनन्य[2] विश्वास देखोनि, हर्षा । अश्विनौदेव पावले. ॥ ४९ ॥ कृपेनें स्पर्शितां करतटीं, । प्रकट झाली दिव्य दृष्टी; । धरोनि स्नेहाच्या बाहुवटीं । अंध कूपांतूनि काढिला. ॥५०॥ गुरुदास्याविषयीं निर्धारू । देखोनि, देते झाले वरू; । म्हणती, 'धन्य धन्य ईश्वरू । तुवां गुरुरूपें सेविला. ॥ ५१ ॥ वेद, शास्त्र, अनुभव, ज्ञान, । ऋद्धिसिद्धी, स्वच्छंदमरण,[3] । शेखीं[4] पावसी पदनिर्वाण । आशीर्वादें आमुच्या.' ॥ ५२ ॥ वर वदोनि गेले दोन्ही; । येऊनि लागला श्रीगुरुचरणीं; । तेणेंही तोचि वर देउनी, । गृहाश्रमा पाठविला. ॥ ५३ ॥ यावरी तृतीय शिष्य वेदू । बुद्धिनिपुण चातुर्यसिंधु । गुरुशुश्रूषा करितां वेधू । गुरुसि तेणें लाविला. ॥ ५४ ॥ न सांगतां जाणे मनोगत; । न मागतां पुरवी समयोचित; । अप्रिय ते रांहटीआंत[5] । कदा आचरोनी दावीना. ॥ ५५ ॥ क्लेशीं शरीर अन्वोरणें । केलें लोकीं प्रगटों नेणे; । मरण मांडल्याही मनें । मर्यादेतें नुलंघी. ॥ ५६ ॥ अग्राकडूनि इक्षुरस । मुळा येतां आगळा सुरस; । तैसा वाढता मनोल्हास[6] । दिवसें दिवस भजनाचा. ॥ ५७ ॥ गुरूहूनि ईश्वर आन । ऐसें कल्पूंचि नेणे मन; । सेवा सकळ अनुष्ठान; । वेदप्रमाण गुरुवाक्य. ॥ ५८ ॥ देखोनि तोषला श्रीगुरुनाथ; । माथां ठेविला वरदहस्त; । आलिंगोनि म्हणे, 'बहुत । सुखी झालों तुझेनी. ॥ ५९ ॥ विवेकासारिखा जोडणें गुरू; । जीवासारिखा मित्र उदारू; । चित्तासारिखा शिष्य चतुरु; । हें दुर्लभ तिहीं लोकीं. ॥ ६० ॥ कुलीन, सुरूप, पतिव्रता; । धनिक, उदार, प्रिय बोलता; । सर्वज्ञतेवरी अगर्वता;[7] । हें दुर्लभ तिहीं लोकीं. ॥६१॥ पुत्र गुणाढ्य, पितृभक्त, । शास्त्रवेत्ता, वैराग्यभरित, । ब्रह्मज्ञानी, शुचिष्मंत,[8] । हें दुर्लभ तिहीं लोकीं. ॥६२॥ अगा परिसाची ईश्वरप्रतिमा । दैवें जोडे द्विजसत्तमा! । भरतें आणी गुरूच्या प्रेमा, । ऐसा शिष्य तूं एक. ॥ ६३ ॥ न सांगतां जाणे तो ईश्वर; । न मागतां दे तो नरेश्वर;[9] । सांगितल्यावर करणीचा विसर । तो जाल्या द्विपाद पशू. ॥ ६४ ॥ सांगीत-

१. तुपानें तळलेला घारगा. २. आपुल्यावांचून इतरांवर नाहीं विश्वास ज्याचा. ३. आपुल्या इच्छेनें मृत्यु. ४. शेवटीं. ५. वर्तणुकेंत. ६. मनाचा उल्हास. ७. निरहंकारता. ८. शुद्ध. ९. राजा.

त्यावरी जीवीं न धरी, । तो पाषाण नरशरीरी; । म्हणउनी सकळांसी खरी । चातुर्यकळा पाहिजे. ॥ ६५ ॥ न लागती कौटाळिका मौनें; । मनासारिखें राहाटणें जाणे; । सकळ विश्व जिंकिलें तेणें । वशीकरण न करितां. ॥ ६६ ॥ असो. ऐशिया चातुर्यमूर्ती । आतां घेउनी वरद उचिती, । आश्रमा जाऊनि सहज स्थिती, । विहित पालन करावें. ॥ ६७ ॥ संतती, संपत्ती, आणि ज्ञान, । पावोनि होसी सुखसंपन्न.' । यापरी वेद गौरवून । स्वाश्रमासी बोळैविला. ॥ ६८ ॥ तेणें स्वस्थळासि जाऊनि जाण । तिथें शिष्य केले आपण; । त्यांचेनि संगें स्वधर्माचरण । गुरुचिंतनीं वर्तत. ॥ ६९ ॥ गुरुगृहीं भोगिलें क्लेशा; । म्हणोनि काज ना सांगे शिष्यां; । पिंजरियामाजी पक्षी जैसा, । तैसा पाळी शिष्यांतें. ॥ ७० ॥ तेणें उत्तम शिष्य सुमती । गृहीं ठेवूनि रक्षणार्थी, । जनमेजयाच्या सत्राप्रती । यांचे लागीं स्वयें गेला. ॥ ७१ ॥ मागें भार्या केवळ तरुणी । ऋतुस्नात झाले दिनीं । कामानळें पीडितां मनीं । पुरुषसंगा अपेक्षी. ॥ ७२ ॥ उत्तंकातें पाचारुनी । म्हणे, 'गुरुतुल्य गुरुपत्नी. । माझी आज्ञा तुज लागुनी । अलोट जाण सर्वथा. ॥ ७३ ॥ यालागीं माझा मनोरथ । पूर्ण करावा न विचारीत.' । ऐकोनि येरू आच्छादित । कर्णद्वारें हस्तकीं. ॥ ७४ ॥ म्हणे, 'मात्रागमन दोषाब्धी, । ऐसें प्रगट बोलिजे वेदीं; । असो निषेध भेटवी विधी, । ते गुरुआज्ञा ही असेना.' ॥ ७५ ॥ म्हणोनि भुजंगा न घालीं हात; । ठेवूनि अंतरें गेला त्वरित. । यावरी स्वल्पकाळेंचि तेथ । वेद गृहा पातला. ॥ ७६ ॥ तो सर्वज्ञ जाणोनि सकळ । म्हणे, 'हा ईश्वरांश केवळ; । ऐसा निर्विकार निर्मळ । विरळा असे एखादा. ॥ ७७ ॥ वनिता मनोरम एकांतीं । आपण होऊनि पुरुषा प्रार्थी; । तेथें जो निर्विकल्प चित्तीं । तोचि शंकर म्हणों ये. ॥ ७८ ॥ विजनीं भरलीं कनकें पाहे; । देखिल्यावरी लोटी पायें; । ऐशी निर्लोभता लाहे, । तोचि शंकर म्हणों ये. ॥ ७९ ॥ जया आधीन मन इंद्रियें, । न मनीं सुखदुःखाचे घाये, । छळितांही परक्रोधा न ये, । तोचि शंकर म्हणों ये. ॥ ८० ॥ सकळज्ञानियांचा रावो, । जितेंद्रिय देवाधिदेवो, । ऐसा माझा निश्चय भावो, । सत्य सत्य त्रिवाचा. ॥ ८१ ॥ जया इंद्रियनेम नाहीं; । तो श्वानसूकरसमान पाहीं; । आप परावे हें कांहीं । न विचारितां स्वीकारी.' ॥ ८२ ॥ ऐसा मानवोनी मनीं, । शिष्य बोळविला आज्ञापुनी; । येरू म्हणे, 'कांहीं वचनीं । गुरुदक्षिणा म्यां देणें.' ॥ ८३ ॥ गुरु म्हणे, 'गा ! सर्व पावलें.' । शिष्य म्हणे,

१. पाठविला. २. जनरहितस्थानीं.

'मज न वाटे भलें.' । यावरी स्त्रियेतें विचारिलें, । 'इच्छित कांहीं या सांगें.' ॥ ८४ ॥ तें म्हणे, 'पौष्यभूपाळपत्नी । दिव्य कुंडलें लेइली कर्णी; । तीं मज दिधलिया आणोनी । गुरुदक्षिणा पावली. ॥ ८५ ॥ आजपासूनि चवथे दिनीं । मांगल्यकृत्य मंडपस्थानीं । लेवूनि बैसेन पुण्याहवाचनीं । ऐसें केलें पाहिजे. ॥ ८६ ॥ अमृतस्त्रावी महामौल्यें । पद्मरागमणिकुंडलें । मज देशी तरी पावलें । दक्षिणाऋण गुरूचें.' ॥ ८७ ॥ आज्ञा घेऊनि चालिला येरू, । मार्गी देखिला वृषभ थोरू, । त्यावरि आरूढला नरू, । तेणें गोमय ओपिलें. ॥ ८८ ॥ म्हणे, 'हें भक्षीं रे बाळका !' । येरें आज्ञेनें सेविलें देखा. । हस्त पुसोनियां मुखा, । त्वरे पुढें चामके. ॥ ८९ ॥ वनें अटव्यें उल्लंघून, । पावला पौष्यराजाचें भुवन; । गृहा जाउनी आशीर्वचन । प्रभुलागीं दीधलें. ॥ ९० ॥ पौष्य म्हणे, 'चोजें अद्भुत । मनुष्य पातलें कैसेनि येथ?' । वृत्तांत पुसतां यथार्थ । आगमनहेतू सांगीतला. ॥ ९१ ॥ 'गुरूच्या कार्यालागीं थोरू । दुरी पातलों धरूनि धीरू.' । गृहस्थ म्हणे, 'याचें करूं । आलें काज सर्वथा. ॥९२॥ सांगे जाय गृहा आतौता, । पत्नी माझी पतिव्रता, । तिजप्रती सांगोन वृत्तांता, । मागोनि घेईं कुंडलें.' ॥ ९३ ॥ उत्तंक प्रवेशे निकेतनीं, । तंव गृहामाजी न दिसे कोणी, । बाहेर पातला परतोनी, । म्हणे, 'केउते तें नव्हे.' ॥ ९४ ॥ येरू म्हणे, 'उच्छिष्ट असेल मुख; । क्षालीं चरणद्वय हस्तक; । आचमन करूनि सम्यक, । जाईं' म्हणे 'मागुता.' ॥ ९५ ॥ जाऊनि पाहे ब्रह्मचारी, । तंव देखिली जैशी गौरी, । नमस्कारूनि जोडिल्या करीं, । समाचार निवेदी. ॥ ९६ ॥ 'तुझिया कुंडलांचा काम । माझिये गुरुपत्नीसी परम; । यालागीं पातलों दुर्गम । महापंथ क्रमूनियां.' ॥ ९७ ॥ तिणें पतीचे आज्ञेवरून । ब्राह्मणा कुंडलें दिधलीं दान.। पौष्य म्हणे, 'गुह्य सांगेन । तें तूं ऐकें ब्राह्मणा ! ॥९८॥ हीं कुंडलें अमोल्य तेजें; । बहुवेळा तक्षकनागराजें । मागीतलीं, परी मन माझें । नेदीच मोह सोडूनी. ॥ ९९ ॥ तो तुजशीं हरील दुर्मती, । सांभाळूनि जाइजे पंथीं.' । मागुती म्हणे, 'आजिचे तिथी । श्राद्ध असे, संपादीं.' ॥ १०० ॥ संकल्प सोडोनि कल्पोक्त मंत्रीं, । अन्न वाढिता झाला पात्रीं, । निवालें देखोनि परम श्रोत्री । उत्तंक कोपें कोपला. ॥ १०१ ॥ म्हणे 'रे ! पर्युषित अन्न । श्राद्धीं देसी मज हेळून, । तात्काळ जाऊनियां नयन, । अंध होसी मदांधा !' ॥ १०२ ॥ गृहस्थ म्हणे, 'मी भोळेपणें । सहसा कापथ्य कांहीं नेणें, । न विचारितां त्वां कृतघ्नें । अनर्थ

१. चाले. २. घोर. ३. कौतुक. ४. गृहांत. ५. शिळें, पूर्वदिवशींचें.

केला मजवरी. ॥ १०३ ॥ निरपराधें शापिलें पाहीं, । तरी अपत्यहीन होशील तूं ही.' । ब्राह्मण म्हणे, 'लटकें नाहीं; । पात्र दृष्टी विलोकीं.' ॥१०४॥ गृहस्थ शोधूनियां पाहत, । तंव अनुष्ण आणि केशयुक्त,। हें देखोनि सांशंकित। शब्द कांहीं न बोले. ॥ १०५ ॥ उत्तंक म्हणे गृहस्थातें, । 'अन्न सकेश, शीत मातें । देऊनि, तूंचि शापोक्तीतें । बोलसी हा अधर्म.' ॥ १०६ ॥ पौष्य म्हणे, 'मुक्तकेशी । भार्येनें निवेदिलें अन्नासी, । तें मी नेणें कृपारासी ! । क्षमा कीजे सर्वथा.' ॥ १०७ ॥ ब्राह्मण बोले उःशापशब्द, । 'क्षण एक होऊनियां अंध, । मागुती चाक्षुषांत शुद्ध । होशील सर्व देखणा. ॥ १०८ ॥ मातें शाप दिधला रोषें, । तो परिहारीं प्रसन्न तोषें.' । येरू म्हणे, 'नवनीत ऐसें । ब्राह्मणहृदय बोलिजे. ॥ १०९ ॥ क्षत्रियाचें हृदय जाण । अतिकठोर करुणाहीन. । यालागीं उःशापाचें वचन । मजपासूनि न पावसी.' ॥ ११० ॥ उत्तंक म्हणे, 'अशुद्ध अन्न । असतां, मातें शापवचन । बाधेना; हें सत्य जाण । कृपाबळें गुरूच्या.' ॥ १११ ॥ ऐसें परस्परें पाहीं, । समाधान कल्पून तेहीं, । कुंडलें घेऊनि लवलाहीं । उत्तंक तेथूनि निघाला. ॥ ११२ ॥ त्वरें जातसे वातवेगें, । क्षणक्षणां पाहे मागें, । तंव अंतरें पाठीलागें । क्षपणिक एक येतसे. ॥ ११३ ॥ कांहीं दृष्टी पडे न पडे, । उत्तंकें धांव घेतली पुढें, । कंठ शोषला उदकचाडें, । तृषानळें पीडिला. ॥ ११४ ॥ तंव वापिका देखिली दृष्टी, । कुंडलें ठेवी तिच्या कांठीं, । तीमाजी उतरोनि अंजळिपुटीं । तोय प्राशन जंव करी, ॥ ११५ ॥ तंव तक्षकें वेग केला, । कुंडलें घेऊनि सत्वर गेला; । देखोनि उत्तंक धांविन्नला, । पाठी लागे लवलाहीं. ॥ ११६ ॥ ब्राह्मण लागला देखोनि पाठी, । तक्षक निघे महीच्या पोटीं; । पाताळ भेदूनि, शेवटीं । नागभुवनीं प्रवेशे. ॥ ११७ ॥ उत्तंक हींवे भरला पोटीं; । दंडकाष्ठ धरूनि मुष्टी, । खाणों आदरिलें पृथ्वी । धरित्रीच्या आवेशें. ॥ ११८ ॥ स्वर्गींहूनि अमरनाथें । दृष्टी देखिलें कृपाभरितें; । प्रेरिता झाला पैं वज्रातें, । छिद्र धरित्रीतें पाडावया. ॥ ११९ ॥ आज्ञा होतां, वज्र दंभोळी । धरा भेदिली जगतीतळीं; । उत्तंक प्रवेशे तये विळीं, । तंव पाताळा पावला. ॥ १२० ॥ देखोनि सर्पांचीं दिव्य भुवनें, । पद्मिनींचीं क्रीडतीं स्थानें, । ब्राह्मण निर्भय अंतःकरणें । नागवर्णन करीतसे. ॥ १२१ ॥ तंव आश्चर्य देखोनि नयनीं, । तंतुकारस्त्रिया दोन्ही । श्वेतकृष्णतंतू धरूनी, । उकलि-

१. थंड. २. शंका पावलेला. ३. नेत्रयुक्त. ४. पाहणारा. ५. यती. ६. ईर्षेनें. ७. वज्र.

ताती निजकरें. ॥ १२२ ॥ चक्र एक द्वादशधार, । तयाजवळ षट्कुमार, । पुरुष एक बैसला थोर, । प्रतिष्ठित आसनीं. ॥१२३॥ तेणें संकेत दावूनि करीं, । म्हणे, 'इंद्राचें स्तवन करीं; । तो कृपाळू ये अवसरीं । इच्छा तुझी पुरवील.' ॥ १२४ ॥ आज्ञा वंदूनि ब्राह्मणकुमरू । जोडल्या करीं सुख निर्भरू, । पुजूनि आदरिला सुरेश्वरू । शब्दसुमनीं आपुल्या. ॥ १२५ ॥ म्हणे, 'जय जय सहस्रनयना ! । शैलदमना! शचीरमणा ! । त्रैलोक्यांत तुझी आज्ञा । ध्वजप्राय मिरवतसे. ॥१२६॥ भूगोलकुंभ धरूनि शिरीं, । शेष तिष्ठे कल्पांतवरी; । मध्यें उतरावया तिळभरी । धैर्य पोटीं त्या नव्हे. ॥१२७॥ ग्रीष्मकाळ सरतांक्षणीं, । भरूनि लैंवणाब्धीचें पाणी, । मेघीं शिंपोनियां धरणी । धान्यमंडित करावी. ॥१२८॥ मृत्युकाळ मारक परम, । आयुष्य असतां, वांकडें रोम । करूं न शके, येथें नियम । तुझे आज्ञेचा अलोट. ॥१२९॥ वज्रधर्ता, भुवनगोप्ता, । वृत्रशत्रु, नमुचिहंता, । गौरवर्ण, वरी वेढिता । कृष्णांबरें साजिरीं. ॥१३०॥ तिहीं लोकीं सत्यासत्य । प्राणी राहटे प्रगट, गुप्त. । तें तूं जाणसी यथार्थ, । सर्वज्ञ नाथ ह्मणउनी, ॥१३१॥ ऐशिया स्वामी सर्वज्ञ समर्था ! । कृपा करीजे मज अनाथा; । सद्गुरुवर कुसुमीं माथा । भरे माझा, तें करीं.' ॥१३२॥ ऐसें करितां स्तवन गाढें, । श्वेत अश्व देखिला पुढें; । पुरुष म्हणे, 'रे ! बाळका ! तोंडें । अपान याचें फुंकीं कां.' ॥१३३॥ वदनानळें अपान फुंकी, । तंव कर्णनयनमुखीं, नासिकीं, । ज्वाळा धडकल्या देखी, । धूमें पाताळ कोंदलें. ॥ १३४ ॥ सर्प म्हणती, 'मांडला प्रळयो; । मस्तकांत कोंडला वायो;' । ते वेळे धाकें कंद्रूतनयो । कुंडलें आणून देतसे. ॥ १३५ ॥ म्हणे, 'मज सांपडलीं काननीं; । तुझीं ऐशीं न सांगे कोणी; । आतां क्रोधक्षमा करूनी, । कुंडलें घेऊनि जाइंजे.' ॥ १३६ ॥ तक्षक सांगोनि गेलियावरी, । पुरुष म्हणे, 'वारूवरी । आरूढोनि, निर्विघ्न करीं । गमन पंथीं बाळका !' ॥ १३७ ॥ येरू तंव वारुवीं वळंघे; । कौतुकें पातया पातें न लागे; । वेदाश्रमा पावला वेगें, । चतुर्थदिनीं सोहळिया. ॥ १३८ ॥ नमस्कारूनी मंडपस्थानीं, । कुंडलीं पूजिली आचार्यपत्नी; । श्रीगुरु पुसे, 'बाळका ! नयनीं । आश्चर्य कांहीं देखिलें ?' ॥ १३९ ॥ शिष्यें समूळ कथिली कथा; । 'न कळे तें मज सांगिजे ताता !' । श्रीगुरु म्हणे, 'मार्गीं जातां, । पहिलेनि भेटी वृत्रभासी.

---

१. सहा बाळक. २. इंद्र. ३. वाक्पुष्पांनीं. ४. पर्वतरिपो. ५. क्षारसमुद्र. ६. धान्यानें सुशोभित. ७. इंद्र. ८. त्रैलोक्यरक्षिता. ९. वृत्रासुराचा रिपु. (इंद्र.) १०. तक्षक सर्प. ११. वरचढे.

॥ १४० ॥ तो जाण ईंद्र अमरपती, । तो जाण वृषभ ऐरावती; । मूत्र पूरीष ओपिलें हातीं । तें पीयूष प्राशविलें. ॥ १४१ ॥ तेणें विषोल्बणांच्या भुवनीं । कल्याण झालें तुजलागुनी; । माझा परम मित्र म्हणोनी, । तुज निर्वाणीं रक्षिलें. ॥ १४२ ॥ तंतुकारिणी दोघी वनिता, । ते जाण धाता आणि विधाता; । दिवसरात्रि गा! तत्वता । श्वेतकृष्ण तंतू ते. ॥ १४३ ॥ चक्र जें द्वादशधार, । ते द्वादश मासेंसि संवत्सर; । साही ऋतू, ते षट्कुमार; । प्रत्यक्ष दृष्टी दाविले. ॥ १४४ ॥ पुरुष जाण गा! पर्जन्य; । अश्व ओळखें हुताशन;' । ऐसें सांगोनि, आलिंगन । स्नेहें शिष्यास दीधलें. ॥ १४५ ॥ माथां ठेवूनि उदार कर, । वर वदे श्रेयस्कर; । यापरि बोळविला कुमर । उत्तंक तेणें स्वाश्रमा. ॥ १४६ ॥ तो स्वाश्रमीं विश्रामोन, । तक्षक क्लेश स्मरोनि जाण, । कुरुक्षेत्रासि जाउन, । जनमेजयातें भेटला. ॥ १४७ ॥ म्हणे, 'राया! विचारचतुरा! । सैंकार अर्थ सोडून, पैरा । निःकारण कर्माचारा । करितां कोण पुरुषार्थ? ॥ १४८ ॥ तुझिया पित्याचा घेतला प्राण, । त्या सर्पाचें करावें दहन, । हें तुज नेदितीच स्मरण, । ऋषीश्वर कोणीही.' ॥ १४९ ॥ ऐसा पितृसुडाचा लाभ, । राजहृदयीं आणूनि क्षोभ, । सर्पसत्राचा आरंभ । करविता झाला, तें ऐका. ॥१५०॥ कथिलें पवित्र पौष्याख्यान; । सच्छिष्याचें निजलक्षण; । श्रीगुरुपदीं पाविजे जाण । धर्मार्थकाममोक्षादि. ॥ १५१ ॥ इति श्रीभारत आदिपर्वणि, । पुढां पौलोमास्तिकाख्यानीं, । वदेल मुक्तेश्वराची वाणी, । तें पंडितें परिसिजे. ॥१५२

अध्याय तिसरा.

सौंती म्हणे, 'सावधान । शौनका! तुझे पूर्वजांचें कथन, । भृगुवंशाचें महदाख्यान, । परमप्रीती परिस तूं. ॥ १ ॥ ब्रह्याचे दहा कुमर, । मरीचि, अत्रि, अंगिरा चतुर, । पुलस्ति, पुलह, ऋतु, हे थोर, । आणि भृगु महामुनी. ॥ २ ॥ वसिष्ठ आठवा, दक्ष प्रसिद्ध, । दहावा देवऋषी नारद, । ब्रह्मनिष्ठ परम वंद्य, । जो कां अंश विष्णूचा. ॥ ३ ॥ यांत सातवा भृगु आपण, । त्याचिया पुत्रा नाव च्यवन; । तयाचा प्रमति नंदन; । रुरू जाण तयाचा. ॥ ४ ॥ त्या रुरूचा शुनक सुमती; । त्याचा शौनक तूं ये क्षिती, । परमधार्मिक, विवेकमूर्ती, । काळ सार्थक पैं तुझा. ॥ ५ ॥ तया भृगूची पवित्र

---

१. प्रखरसर्पांच्या. २. हात. ३. कल्याणकारक. ४. आपला. ५. परक्याचा. ६. सूतपुत्र.

वनिता । पुलोमा लावण्यगुणैकसरिता, । आश्रमीं ठेवूनि, नित्य विहिता । अनुष्ठाना ऋषी गेला. ॥ ६ ॥ मागां राक्षस महाक्रूर । आश्रमा पातला कामातुर; । कुंडीं देखोनि वैश्वानर, । बोलता झाला तयासी.' ॥ ७ ॥ म्हणे, 'गा ! ईचेनि जनकें बोली । पहिली मजलागिं देऊं केली; । त्यावरी भृगूतें ओपिली । असत्यधर्में सर्वथा. ॥ ८ ॥ तरि तूं बोलें यथार्थ शब्दू, । होय कीं नव्हे माझी वधू?' । संकटीं पडिला जातवेदु । उत्तर कांहीं स्मरेना. ॥ ९ ॥ 'होय' म्हणतां, दुराचारी । ईतें नेईल बळात्कारीं; । 'नोहे' म्हणतां माझिये शिरीं । असत्य कांहीं स्पर्शेल.' ॥ १० ॥ पावक म्हणे, 'पुलोमा ऋषी । पहिली मात बदला ऐसी, । घडे तरी विचारीं मानसीं । ब्रह्मसूत्र प्रमाण. ॥ ११ ॥ त्यावरी पाणिग्रहणविधी । भृगूतें ओपी लावण्यनिधी; । इतुकें जाणें मी त्रिशुद्धी, । आणीक कांहीं नाठवे ! ॥ १२ ॥ साक्षीचा आश्रय होतां कांहीं, । राक्षस धाविन्नला लवलाहीं; । पुलोमा ओढोनियां बाहीं, । बळें घेवोनि चालिला. ॥ १३ ॥ आच्छादुनी राक्षसवेश, । वराहरूपें अतिकर्कश । वाहुनी नेतां, त्रास । पावोनि, येरी आक्रंदे. ॥ १४ ॥ धाकें गर्भ गळाला पोटीं, । तो सांडिला पृथ्वीतटीं; । तेजें जैसा सूर्यकोटी, । किंवा अग्नि प्रळयींचा. ॥ १५ ॥ ते गर्भप्रभा देखतां नयनीं, । राक्षस भस्म झाला तत्क्षणीं; । जैसा रुद्रचक्षूचा वन्ही । स्पर्शतां काम दग्धला. ॥ १६ ॥ मोहें कवळोनि गर्भातें, । पुलोमा करी दीर्घरुदनातें; । गगनीं देखोनि ब्रह्मयातें, । दुःखवार्ता निवेदी. ॥ १७ ॥ तिचिया नयनोदकें विमळ, । गर्भपरिधी पवित्र प्रबळ, । नदी लोटली अतिविशाळ, । बिंदुसरा या नांवें. ॥ १८ ॥ भृगु पातला आश्रमातें, । तंव दोघें देखिलीं अनर्थभूतें; । हृदय पिटूनियां हातें, । पृथ्वीवरी पडियेला. ॥ १९ ॥ धांवोनि वन्हिलागीं पुसत, । 'कोणें केला हा अनर्थ?' । येरें सांगितला 'हा वृत्तांत । राक्षसाचा वर्तला. ॥ २० ॥ साक्षी पुसली मजलागुन, । असत्य चुकवुनी बोलतां वचन, । त्यावरी दुराचारी जाण, । घात करुनी पळाला.' ॥ २१ ॥ ऋषी बोले क्रोधायमानें, । 'या सत्याचें काय घेणें ? । मौन्य धरूनि घेनु दावणें । हातें जैशी खाटिका. ॥ २२ ॥ असत्य वदोन, पुढिलाचें हित । करितां, जोडे सर्व सुकृत; । सत्यें घडे पराचा घात, । त्याहूनि पाप असेना. ॥ २३ ॥ जेणें प्रकारें परोपकार, । घडे, तोचि गा ! पवित्राचार; । परातें पीडाकारक थोर । तोचि अधर्म जाणिजे.

१. अग्नि. २. ओरडे. ३. वळाला.

॥ २४ ॥ असत्यें चुकविजे मरणा; । असत्यें घडविजे अनाथलग्ना; । असत्यें संकटीं आत्मरक्षणा । कीजे, हा तंव महाधर्म. ॥ २५ ॥ म्हणोनि कृतघ्न, कुनामा, । तूंचि राक्षस, पापकर्मा; । अन्यायें शाप घे अधमा ! । होईं सर्वभक्षक.' ॥ २६ ॥ मग प्रोक्षोनि मंत्रोदक, । उठविता झाला स्त्री, बाळक. । च्यवला, म्हणउनि कौतुकें देख, । च्यवन नाम ठेविलें. ॥ २७ ॥ शापापमानें रुसला वन्ही; । लपाला, न दिसे त्रिभुवनीं; । जठरीं मंदला जठराग्नी; । तेणें तळमळ समस्तां. ॥ २८ ॥ व्यापार आकर्षुनी अनळ, । दोन्ही मुखें झांकितां प्रबळ, । इंद्रादिक अमर सकळ । पीडों लागले उपवासें. ॥ २९ ॥ ते वेळीं हरिहरब्रह्मादिदेव । भृगूसि प्रार्थिते झाले सर्व; । ओपोनि उःशापगौरव । वैश्वानर बुझविला. ॥ ३० ॥ भृगु म्हणे, 'हा देववक्त्र । सर्वभक्षक, परमपवित्र, । हर्षें स्वाहास्वधेचा मित्र । स्वव्यापार अनुष्ठी.' ॥ ३१ ॥ असो. त्या च्यवनभार्गवा पाहीं, । पुढां सुकन्येच्या ठायीं, । पुत्र जन्मला पवित्रदेहीं । प्रमती नाम तयाचें. ॥ ३२ ॥ त्या प्रमतीच्या वीर्योदकें । घृताचीच्या उदरीं देखें, । पुत्रांकुर विरूढला चोखें । रुरु नाम तयाचें. ॥ ३३ ॥ रुरुसि प्रमद्वरेच्या ठायीं । शुनक पुत्र जन्मला पाहीं. । तिये प्रमद्वरेचें कांहीं । चरित्र ऐका ऋषी हो ! ॥ ३४ ॥ गंधर्वराज आणि मेनका । क्रीडार्थ दोघें निघालीं देखा; । एकांता पातलीं भूलोका । स्थूळकेशऋषीवना. ॥ ३५ ॥ तेथें पानभोगरतिक्रमें, । क्रीडा करितां सुखसंभ्रमें, । गंधर्वरेतें कन्या जन्मे, । जाति पद्मिनी, दिव्यस्त्री. ॥ ३६ ॥ क्रीडा संपूर्ण झालिया, दोन्ही । बैसोनि चालिलीं विमानीं; । कन्या सांडिली तये वनीं, । ते ऋषीनें देखिली. ॥ ३७ ॥ नेऊनि स्नेहें पालन करितां, । रुरु पातला तेथे अवचिता; । देखतांक्षणीं तो मन्मथा । वश झाला तत्काळ. ॥ ३८ ॥ कामानळें संतप्त देखा, । गृहा येऊनि सांगे जनका; । 'स्थूळकेशाची कुमारिका । परम सुंदरी, नेटकी. ॥ ३९ ॥ ते मज करिसी जरी अंगना, । तरीच रक्षीन या प्राणा; । न घडे, तरी हा देह जाणा । शीघ्रकाळें सांडीन.' ॥ ४० ॥ प्रमति पातला त्या वनासी, । प्रार्थिला स्थूळकेशऋषी; । कन्या मागोनि कुमारासी । वाङ्निश्चय नेमिला. ॥ ४१ ॥ भगदैवतनक्षत्र पाहीं, । लग्न धरिलें विलंबें कांहीं; । सुखसंभ्रमें आपुल्या गेहीं । सामुग्रीतें मांडिलें. ॥ ४२ ॥ कन्या असतां पित्यापाशीं, अकस्मात एके दिवसीं, । काज करितां आश्रमासी, । सर्पदंशित ते झाली.

१. अग्नि. २. समजाविला. ३. उगवला. ४. पूर्व फल्गुनी नक्षत्र. ५. घरीं.

॥ ४३ ॥ तें रुरूसि कळतां, ये धांवुन; । प्रेत आलिंगुन करी रुदन; । गुण लावण्य आठवून, । पिटी वदन हस्तकें. ॥ ४४ ॥ म्हणे 'कृतांता ! रैविनंदना !। कृपेनें जीववीं मैमांगना; । म्यां जोडिल्या सुकृतधना । पालटां इच्छा देतसें. ॥ ४५ ॥ संत, महंत, साधुजन । देखोनी, आदरें प्रैत्युत्थान । केलें असेल, तरी हा प्राण । रिघो परतोन शरीरीं. ॥ ४६ ॥ अयाचित गांजला रिणें, । तो निर्मुक्त गुप्तदानें । केला असेल, तया पुण्यें । प्राण परतो प्रियेचा. ॥४७॥ मिथ्या अभिशापाची गोष्टी । लावूनि, दुर्जन करितां कुंठी, । तेथें पवित्र सुदलें पाठीं । असती, तरी वांचो कां. ॥ ४८ ॥ दीन परदेशीं पीडतां रोगें, । त्याचा सांभाळ आपुल्या आंगें । केला असेल, तरी हा वेगें । प्राण परतो शरीरीं. ॥ ४९ ॥ अनाथप्रेताचिया दहना, । यौवनदरिद्रियाचिया लग्ना, । साह्य केलें असेल, करुणा ! । तरी हा प्राण येऊ परतोन. ॥ ५० ॥ इये सुकृतें श्रेष्ठसुखें । ऐकिलिया आयुष्यसंवर्धकें, । जैसा गेला प्राण पीयूषें, । रिघो परतोन शरीरीं. ॥ ५१ ॥ ऐशिया पुण्याचा पैरिमळ । लागला असेल मज अळुमाळ, । तरी हे भार्या सगुण वेल्हाळ । वांचो' म्हणोनी विलपत. ॥ ५२ ॥ शोक करितां निर्जनीं, । दुजें वारितें नाहीं कोणी, । अंतरिक्षें विमानयानीं । देवदूत जात होते. ॥ ५३ ॥ तिहीं खुंटविली विमानगती; । पाहों ठेले तयाची स्थिती; । करुणाशब्द ऐकोनि चित्तीं । कळवळिले कृपाळू. ॥ ५४ ॥ अंतरें येऊनि बोलते झाले, । 'अर्ध आयुष्य दे आपुलें; । इचें देह होय भलें, । ऐसा यत्न विचारूं. ॥ ५५ ॥ यम आमचा मित्र जाण; । सहसा न सांडी आमुचें वचन; । त्यासि प्रार्थूनि, इचा प्राण । मागुती देहीं परतवूं.' ॥ ५६ ॥ रुरू लोटांगण घाली क्षिती, । चरणांगुष्ठ धरूनि दांतीं; । अर्धआयुष्यदान हातीं । उदक त्याचें घातलें. ॥ ५७ ॥ तिहीं जाऊनि शीघ्रगती, । धर्मराज दक्षिणपती । प्रार्थूनियां परमभक्ती, । समाचारु सांगितला. ॥ ५८ ॥ ऐकोनि आदित्याचा बाळ, दुष्टदंडक, दीनदयाळ, । म्हणे, 'तुमचा शब्द सुफळ । केला आह्मी सर्वथा. ॥५९॥ तुमच्या वचनाकारण, । त्याचें आयुष्य त्यासि संपूर्ण । भार्या तेही त्यासमान । आंयुष्मती हो सुखें.' ॥ ६० ॥ सावध झाली प्रमद्वरा; । रुरूचिया सुखसागरा । पार नाहीं; त्या अवसरा । स्तवन करी दूतांचें. ॥ ६१ ॥ म्हणे, 'पवित्र ये संसारीं, । धन्य धन्य परोपकारी, । सकळ कीर्तिवंत शरीरीं । शिरोमणी तो

१. सूर्यपुत्र यम. २. माझी स्त्री. ३. मोबदला, बदल. ४. आदरसत्कार. ५. अमृतानें. ६. सुवास. ७. थोडा. ८. शोक करी. ९. दक्षिण दिशेचा स्वामी यम. १०. चिरायु, बहुत वर्षें जगणारी.

एक. ॥ ६२ ॥ जिहीं आपल्या सर्वयत्नें । पराचे क्लेश परिहरणें, । श्रमोनि पुढिल्या सुख दावणें, । तो एक धन्य संसारीं. ॥ ६३ ॥ प्रेरणा न करितां, संकटीं । कृपेनें अनाथ घाली पोटीं, । केला उपकार न बोले ओठीं । तो एक धन्य पुरुष. ॥ ६४ ॥ आपल्यासमान पुढिल्या पाहे, । पराच्या संतोषें संतोष लाहे; । अन्य क्लेशें क्लेशत जाये, । तो एक धन्य संसारीं. ॥ ६५ ॥ परोपकारा वरिलें नसतां, । विधवासंतती नाशवंता, । जैशी नाकावीण वनिता । श्लाघ्यता मानी सौंदर्यें. ॥६६॥ परोपकाराविण जे जन, । ते जाण हीन पाषाण; । तनु धन लोभाविष्टविण । असे माखुन सांडिला. ॥ ६७ ॥ परोपकाराविण समर्थ नर, । तो प्रेताचा देहशृंगार, । मांडवावांचोनि वाद्यगजर, । नेतां सत्वर दहनार्थ. ॥ ६८ ॥ असो. पवित्र परोपकारी, । देवदूत निजनिर्धारी, । त्यांचिया चरणरेणूंवरी, । हो सांडणें देह माझा.' ॥ ६९ ॥ ऐशी करोनि परमस्तुती, । प्रिया घेऊनि, आश्रमाप्रती । आला, पर तो न विसरे चित्तीं, । केला अपकार सर्पें जो. ॥ ७० ॥ पित्यानें पाहूनियां शुभ लग्न, । रुरूसी ओपिलें कन्यारत्न; । कृपेनें सैबर्ह दिधलें दान, । यथाशक्ति आवडी. ॥ ७१ ॥ लाहोनि इच्छेसारिखें फळ, । रुरू पातला सुखकल्लोळ; । सर्पापराधा सार्वकाळ । आठवूनि संतापे. ॥ ७२ ॥ तो द्वेष धरोनि अंतरीं, । लोहदंड धरोनि करीं, । दृष्टी पडिला सर्प मारी, । बिळें वारुळें शोधोनी. ॥ ७३ ॥ कोणे एके दिवशीं कोडें । वनें उपवनें खलीला हिंडे; । तंव डुंडुभनामक अजगर पुढें । महाविशाळ देखिला. ॥ ७४ ॥ दंड पडताळोनि करीं, । घाव घाल्रं धांवला शिरीं, । भुजंग म्हणे करुणोत्तरीं । 'सावध होईं ब्राह्मणा ! ॥ ७५ ॥ निरपराधियातें पुण्य पुरुष, । प्राण गेलिया, न देती त्रास. । निरपराधें माझा नाश । तूं कां करूं पहातोसी? ॥ ७६ ॥ कर्में सुखदुःख भोगिती प्राणी; । तो द्वेष धरोनि अंतःकरणीं, । जीवमात्राचिये हननीं । हिंसाकर्मीं उद्यत. ॥ ७७ ॥ ऐसें न करावें द्विजवर्या ! । जीवमात्रीं धरितां दया, । परमकल्याण होय तया । सर्व काळ वाढतें. ॥ ७८ ॥ सर्वभूतीं परमदया, । भूतापासूनि अरिष्टें तया । कल्पांतींहीं नाही, यया । वचन मानीं यथार्थ.' ॥ ७९ ॥ देखूनि अजगराची मात, । चमत्कारिला प्रमतिसुत; । उगारिला होता हात, । तो आंवरिला माघारा. ॥ ८० ॥ म्हणे, 'तूं कवण? कवणिये विधी, । यया तामस देहाचे बंदीं । पडला अससी? मज तें आधीं । सांगीतलें पाहिजे.'

१. कण. २. आंदणासह. ३. कौतुकानें. ४. दुतोंडें. 'अलगर्दो जलव्यालः समौ राजिलडुंडुभौ' इत्यमरः ५. मारण्यानें.

॥ ८१ ॥ उरग म्हणे, 'खगनामा । अग्निहोत्री ब्राह्मणोत्तमा! । भेडसावितां ऐशिया कर्मा । भोगवी ताप तें ऐका. ॥ ८२ ॥ ऋषी करीत असतां जप, । करूनि वस्त्राचा विशाळ सर्प, । समीप ठेवितां महाकंप । पावता झाला तपस्वी. ॥ ८३ ॥ सर्प सर्प म्हणोनि हाक । देतां, धाविन्नले विषयीं लोक; । कृत्रिम जाणतां, सकळिक । हास्य करूं लागले. ॥ ८४ ॥ विषादें मुनी चढला क्रोधा; । म्हणे, 'दुर्जना! अमर्यादा! । योग्यायोग्य नेणोनि मंदा ! । चेष्टा करिसी श्रेष्ठाची ? ॥ ८५ ॥ राजा कोपी, तपस्वी साधु, । बळी, प्रतिष्ठित प्रसिद्ध, । इहीं करितां विनोदु, । परतोन शहाणे न करिती. ॥ ८६ ॥ म्हणोनि आम्हासीं विनोद करणें, । हा अर्थ घेतला मोलें येणें; । अजगरशरीर धरोनि प्राणें । दुःख भोगीं चिरकाळ.' ॥ ८७ ॥ तेणें शापें भोगीं क्लेशा. । असो. हे तुवां सोडोनि हिंसा, । सकळभूतीं स्नेह सॅरिसा । करितां संतोष पावसी. ॥ ८८ ॥ जनमेजयाचे महासत्रीं । सर्प जळतां पावकचक्रीं, । तेथें आस्तीक महामंत्री । रक्षिता झाला कृपाळू. ॥ ८९ ॥ तैशी दया करूनि, तुवां । विश्वरूपें वासुदेवा । भजावें, हें जाण सर्वा । साधनाचेनी निजबळें. ॥ ९० ॥ तया आस्तिकाचें चरित्र । ऋषिमुखीं अतिपवित्र । ऐकसी, तेव्हां तुझें श्रोत्र । हर्षामृतें निवेल.' ॥ ९१ ॥ प्रार्थून मागतां उच्छापवचन, । तो म्हणे, 'रूरूचें दर्शन । होतां क्षणीं, तात्काळ जाण । मनुष्यता तूं पावशी.' ॥ ९२ ॥ ऐसें बोलत असतां, पहा हो! । भुजंग पावला दिव्य देहो; । परस्परें भावोनि स्नेहो, । जाते झाले स्वाश्रमा. ॥ ९३ ॥ इति श्रीभारते आदिपर्वणि, । नवरसरंगी वरदायिनी, । मुक्तेश्वराची वाग्वाणी । खेळे स्वानंदें गोंधळ. ॥ ९४ ॥

अध्याय चवथा.

शौनकादि महाऋषी । पवित्र नैमिषारण्यवासी । म्हणती, 'पौराणिका! कैशी । आस्तिकाची मूळकथा ?' ॥ १ ॥ सौती म्हणे, 'प्रसंगें आलें, । सांगण्याआधीं स्वामींनीं पुशिलें, । आवडीचें अवधान केलें, । सर्वज्ञ तुम्ही सर्वथा. ॥ २ ॥ जरत्कारूनामा ब्राह्मण । करीत असतां पृथ्वीअटन, । गर्तेमाजी अधोवदन । पितृगण सर्व देखिले. ॥ ३ ॥ दूर्वावल्लीं ऊर्ध्वचरण । गोंवोनि, तळीं अधो-

१. सर्प. २. भिववणें. ३. आसपासच्या प्रदेशांतील. ४. सारिखा. ५. सूतपुत्र. ६. पृथ्वीपर्यटन. ७. खळग्यामध्यें. ८. दूर्वेच्या वेलीमध्यें.

वदन । लोंबतां, देखोनि आपण । पुसता झाला साक्षेपें. ॥ ४ ॥ 'तुम्ही कवण? कवणा अर्था । भोगितां हे क्लेशावस्था?' । येरू म्हणे, 'ती व्यर्थ सांगतां, । श्रम होईल आगळा. ॥ ५ ॥ वंश झालिया संततीहीन, । पितरां अधोमुख पतन, । तें आम्हांसि प्राप्त व्यसन । येणें काळें झालेंसे. ॥ ६ ॥ तृणरज्जूचा स्वल्पाधार । चरणीं दिसे क्षणभंगुर; । तो संततीमाजी एक नर । मृतप्राय उरलासे. ॥ ७ ॥ तोही गृहस्थाश्रमाविरहित, । नाहीं स्त्री ना पुत्रापत्य; । तापसी होवोनि, तीर्थोतीर्थ । अटन करी वैराग्यें. ॥ ८ ॥ गृहीं असोनि स्त्रियेसंगीं, । संतती वाढविता जगीं, । तरी आमचें वास्तव्य स्वर्गीं । अक्षय होतें त्याचेनी. ॥ ९ ॥ तृणतंतूसि अहोराती, । मूषक खंडितां दिसे दांतीं, । तो पैं काळ सत्वरगती । आयुष्य हरी तयांचें. ॥ १० ॥ पुससी तयाचें अभिधान, । तरी जरत्कारु ऐसें जाण.' । परिसोनि पूर्वजांचें वचन । स्तब्ध झाला तपस्वी. ॥ ११ ॥ म्हणे, 'बळात्कार कर्माचा, । मजचि संबंध लागला यांचा; । परम क्लेश मानुनि, वाचा । वदता झाला तयांसीं.' ॥१२॥ म्हणे, 'ऐका वडील हो! तुम्ही । जरत्कारुनामा जाणा तो मी, । विगतवासन सर्वकामीं । वरी हें संकट सांगतां. ॥ १३ ॥ तरी मजसारिखी नामें गुणीं । भिक्षेसाठीं पवित्र कोणी । कन्या ओपितील, तरी ते गृहिणी । करूनि गृहस्थ म्यां होणें. ॥ १४ ॥ जरेनें झाला देह जर्जर, । यालागीं नामें जरत्कार, । ऐशियातें कन्या स्वयंवर । करील कोण तें कळेना. ॥ १५ ॥ ते ही नामाशीं नामसरी, । म्हणत असतील जरत्कारी, । ऐसा योग घडेल, तरी । तुमचें वचन होवो सुखें.' ॥ १६ ॥ ऐसें बोलोनि, जाता झाला. । सकळ पृथ्वी शोधूनि, वहिला । नागलोकाप्रती पातला; । रूढ केला मुखशब्द. ॥ १७ ॥ 'जरत्कारी या नामाचें । कन्यारत्न असेल ज्याचें, । तें मज भिक्षेसि घालितां साचें, । इच्छिलें फल तो पावो.' ॥ १८ ॥ ऐसें वचन ऐकतां क्षणीं, । वासुकीनें आपुली भगिनी । जरत्कारी करीं धरूनी । जरत्कारूसि दीधली. ॥ १९ ॥ म्हणे, 'तुजलागीं बहुतकाळ । रक्षिली होती हे वेल्हाळ; । ईतें अंगीकारूनि, विमळ । गृहस्थाश्रम संपादीं. ॥ २० ॥ मातृशापपरिहारार्थी । उपाय वदला प्रजापती, । तयालागीं दिधली हातीं । आज माझी अनुजा हे.' ॥ २१ ॥ ऐसें सांगूनि, आदरें करीं । विधिनें ओपिली जरत्कारी; । पुढें जन्मला तिच्या उदरीं । आ-

१. क्लेशांची स्थिति. २. पर्यटन. ३. निरिच्छ. ४. स्वच्छ. ५. ब्रह्मा. ६. कनिष्ठभगिनी.

स्तिकनामा तपस्वी. ॥ २२ ॥ जनमेजयें सर्प जाळितां, । कृपेनें झाला तो रक्षिता; । आणि पितृगणांही समस्तां । तपोबळें उद्धरिलें. ॥ २३ ॥ मातेनें सर्प शापावया, । जनमेजयें सर्प जाळावया, । तेथें आस्तिकें रक्षावया, । काय कारण निर्धारें? ॥ २४ ॥ ऐसें कल्पोनि अंतर्यामीं, । प्रश्न करूं पहातसां तुम्ही; । तरी ऋषी हो! ऐका. तें मी । सकळीक सांगेन. ॥ २५ ॥ दक्षप्रजापतीच्या दुहिता, । कश्यपस्त्रिया कद्रू विनता, । सगुण सुंदर पतिव्रता, । तरी मत्सर दोहींतें. ॥ २६ ॥ सेवेनें संतोषवितां, ऋषी । वर ओपिता झाला तयांसी; । 'सहस्र कुमार जन्मतील कुशी,' । ऐसें कद्रूसी बोलिला. ॥ २७ ॥ 'बळिष्ठ[2], पवित्र, परोपकारी, । दोघे पुत्र जन्मती उदरीं,' । ऐसें सांगोनि विनता कुसरी[1] । कुरवाळिली प्रीतीनें. ॥ २८ ॥ दोघींस ओपूनि रेतदाना, । कश्यप गेला अनुष्ठाना; । यथाकाळें कद्रू जाणा । सहस्र अंडें प्रसवली. ॥ २९ ॥ तेजोमय दोनी अंडें । विनता प्रसवली प्रचंडें[3]. । त्यांमाजि अरुणें आणि गरुडें । देह धरिले प्रसिद्ध. ॥ ३० ॥ वर्षें क्रमिल्या पांचशतें, । सहस्र अंडीं उलोनि तेथें, । सहस्रसंख्या धुंधुवातें । महासर्प निपजले. ॥ ३१ ॥ शेष, वासुकी, अहि तक्षक, । ऐरावत, धनंजय, कर्कोटक, । काळिया, मणिनाग, पंजरक, । एळापत्र, इत्यादि. ॥ ३२ ॥ जरी नामें सांगावीं निवाडें, । तरी प्रसंगीं ग्रंथीं येती पुढें. । असो. सर्पांचीं जुंबाडें[4] । कद्रु व्याली विशाळ. ॥ ३३ ॥ सवती देखोनि पुत्रवती, । विनता उतावळी पुत्रार्थी, । संपूर्ण दिवस नव्हतां[5], हातीं । अंड एक फोडिलें. ॥ ३४ ॥ पुत्र पहावयाचे चाडें[6] । अंडें भेदूनि पाहतां कौडें[7], । अर्ध शरीर, चरणाकडे । नाहीं कांहीं निपजलें. ॥ ३५ ॥ कटीपासूनि वरील आंग । अवयव आकारले सांग[8], । मांसोदकें तळील भाग । लवथवित राहिला. ॥ ३६ ॥ तेणें कोपें पुत्र अरुण । मातेसि वदे शापवचन, । 'अर्ध दिवस न होतां पूर्ण । अंड भेदिलें पापिष्टे! ॥ ३७ ॥ जीचेनि[9] द्वेषें अर्ध दिवसीं । अंड खंडिलें निर्दयरासी! । तीच्याच गृहीं होशील दासी । सहस्र अंयनें[10] परियंत. ॥ ३८ ॥ आतां ऐकें एक वचन, । दुसरें अंड करीं जतन, । सहस्र वर्षें होतां पूर्ण । अपेंपचि उलेल[11] हें. ॥ ३९ ॥ त्यामाजि जन्मेल खगेंद्र[12], । तो त्रैलोक्यास करील उपकार, । शाप दासित्वें दुःखभार । तो फेडील प्रतापें.' ॥ ४० ॥ यापरी अरुणाची उत्पत्ती, । तो पुढें सूर्याचा

१. चतुर स्त्री. २. बलवत्तर. ३. वायूनें. ४. थवे. ५. न होतां. ६. इच्छेनें. ७. उत्सुकतेनें. ८. संपूर्ण. ९. ज्या सवतीचें. १०. वर्षांचीं अयनें. ११. फुटेल. १२. पक्ष्यांमध्यें श्रेष्ठ.

सारथी । झाला, जयाची अंगदीप्ती । सुरंग दिसे प्रभातें. ॥ ४१ ॥ दुसरें अंड निगूढस्थानीं[1] । ठेवूनि, कद्रु विनता दोनी । उच्चैःश्रवा[2] पहावया नयनीं । सूर्यलोका पातल्या. ॥ ४२ ॥ ज्याची सौंदर्याची कळा । धवलता[3] लोपे रजताचळा,[4] । कीर्तिकमळिणीच्या कळा । इंद्राचिये निर्धारें. ॥ ४३ ॥ कां समुद्रमथनींचा नवनीतगोळ, । शशांक[5]सहोदर तेजाळ, । देवीं पूजूनि, सुपरिमळ । पुष्पमाळा लेवविल्या. ॥ ४४ ॥ नीटनेटकें ठाणमाण, । सर्वलक्षणीं अतिसंपूर्ण, । ज्याचे चरणीं मनपवन । अभ्यासिती चपलता. ॥ ४५ ॥ अवलोकोनी विश्वकर्मा । हृदयभूमिके अश्वोत्तमा[6] । रेखूं न सके, तया उपमा । कासयाची योजावी ? ॥ ४६ ॥ चारी सहस्र चारी शतें । चारी योजनें अधिक तेथें । निमिषामाजि दिनमणीतें । जो नेतसे निराळंबीं.[7] ॥ ४७ ॥ शौनक म्हणे, 'सूतनंदन ! । उच्चैःश्रवा अनर्घ्यरत्न[8] । त्याचें समुद्रमथनीं जनन । झालें कैसें ? सांगिजे.' ॥ ४८ ॥ सौती म्हणे, 'महामुनी ! । त्याचा उद्भव समुद्रमथनीं; । तेंही प्रज्ञेसारिखें[9] चरणीं । निवेदीन परिसिजे. ॥ ४९ ॥ श्रीगुरु अवज्ञेचा दोष, । त्यावरी दुर्वासऋषीचा रोषें,[10] । म्हणोनि इंद्राची अशेष[11] । संपत्ती पडली सागरीं. ॥ ५० ॥ ऐसे त्रिदश[12] दशाहीन झाले, । ते वेळीं ब्रह्मया शरण गेले, । त्यांतें घेऊनि पातले । मेरुशृंगा समस्त. ॥ ५१ ॥ तेथें असंख्य सुवर्णशिखरें, । रत्नमणिबद्ध सरोवरें, । नाना गुहाविवरें । सिद्धसाधकीं वसविलीं. ॥ ५२ ॥ नानावल्ली, नानाद्रुम, । श्वापद जळचर विहंगम,[13] । विद्याधरांचे विश्राम । देती आराम पाहतिया. ॥ ५३ ॥ नानासरिता[14] शोभती जीवनीं, । अमोल्य लीलामाचिया[15] खाणी, । ऐसा कनकाचळ देखोनी, । स्थिरावले सुरवर. ॥ ५४ ॥ जी पृथ्वीलिंगाची पिंडिका, । लक्षयोजनें उंच देखा, । रुंद आणि गिळिली भूमिका । बत्तीस सहस्र योजनें. ॥ ५५ ॥ तेथें वैकुंठींचा रावो । देखता झाला समुदावो, । जैसा व्यंकटाचळीं नांवो[16] । लक्ष्मीचा प्रत्यक्ष. ॥ ५६ ॥ शुद्ध सुवर्ण मंडपगहन, । मणिमाणिक्यसिंहासन, । त्यावरी मूर्ती विराजमान । इंद्रनील कीळवर्णी.[17] ॥ ५७ ॥ सहस्रफणींचें श्वेत छत्र । देखतां, दिपला सहस्रनेत्र;[18] । सहस्रकरेंसि कमलमित्र[19] । प्रभा मागों पातला. ॥ ५८ ॥ कनकचंपकगौरीवर्णिमा । धरणी दूर्वादलश्यामा । उभयभागीं उभयरामा[20] । क-

१. गुप्तस्थानीं. २. इंद्राचा अश्व. ३. शुभ्रपणा. ४. रौप्यपर्वताची. ५. चंद्र. ६. उत्तम अश्व. ७. आकाशीं. ८. अमूल्य रत्न. ९. बुद्धिप्रमाणें. १०. राग. ११. सर्व. १२. देव. १३. पक्षी. १४. नद्या. १५. शोभेच्या. १६. नवरा. १७. तेज. १८. इंद्र. १९. सूर्य. २०. स्त्रिया.

नकदंडें ढाळिती. ॥ ५९ ॥ ऐसा त्रैलोक्यीं गृहस्थ । कलत्रयद्वीपीं अतिशोभत; । मदनजनक जगन्नाथ । नमस्कारिला समस्तीं. ॥ ६० ॥ 'समुद्र मथावा प्रयत्नें, । अमृत जोडेल परमयत्नें, । प्राप्त झालिया चौदा रत्नें । क्लेश तुमचे हरतील. ॥ ६१ ॥ दैत्य सबळ काळें येणें, । त्यांशीं कार्यार्थ साम करणें, । अभिमान सांडूनियां मनें । तयांप्रती जाइजे. ॥ ६२ ॥ कार्य साधावयाचे अर्थी । लीन होणें खलाचे भक्ती; । मी थोर शहाणा हें चित्तीं । तये काळीं न धरावें. ॥ ६३ ॥ हित स्वार्थाचिये सिद्धी । अधम स्तवावे उत्तम शब्दीं; । लाज त्यागून परगृहा आधीं । श्रेष्ठें हीनाप्रती जाइजे. ॥ ६४ ॥ [1]अन्योक्तीनें प्रसंगीं चतुरा । धाकुटें काज सांगे असुरा । त्यावरी अभिमान ये थोरा, । कार्य [2]अनुष्ठितील ते. ॥ ६५ ॥ तेथें तुमची पाठ रक्षिता । साह्य असें मी कार्यार्थी;' । ऐसें शिकवुनी अमरनाथा । सिंधुमथनीं [3]प्रेरिले. ॥ ६६ ॥ बलिप्रती आला सहस्रनेत्रु; । दैत्य म्हणती पुरातन शत्रु; । [4]वैरोचनी म्हणे, 'मित्रु । म्हणोनि शरण आला असे.' ॥ ६७ ॥ गौरवूनि असुरराणा, । म्हणे, 'ज्यालागीं [5]शचीरमणा ! । आला अससी, त्या कारणा । साह्य आम्ही सर्वस्वें.' ॥ ६८ ॥ 'मथुनी सिंधुचिया पोटा, । अमृताचा करूनि समान वांटा, । नेमिला नेम न कीजे खोटा, । हेंच प्रमाण उभयतां.' ॥ ६९ ॥ '[6]निकें, म्हणोनि देव दानव । एकत्र मिळोनि पातले सर्व; । पात्र केला [7]लवणार्णव । घुसळावया साक्षेपें. ॥ ७० ॥ रवीये सुंदर मंदराचळ । विधीनें योजिला अवक्र सरळ; । परि उपडूनि आणावया बळ । नचले देवांदैत्यांचें. ॥ ७१ ॥ अकरासहस्रयोजनें वरी । उंच वाढला गगनोदरीं; । सहस्रसंख्या महीमाझारीं । तितकाच रुंद विशाळ. ॥ ७२ ॥ सुरांसुरांतें मंदरगिरी । नुचले देखोनि, [8]चक्रधारी । [9]सहस्रशीर्षा आज्ञा करी । [10]अनंतातें [11]अनंत. ॥ ७३ ॥ [12]धरणीधरासि [13]धरणीधरें । वेष्टुनी आपुल्या शरीरें । उन्मूळितां प्रतापें थोरें । थरारली पृथ्वी पृष्ठीं. ॥ ७४ ॥ सहितवनें शिखरें [13]सरिता, । संख्या कैंची श्वापद[14]जाता ? । असो. यावरी पर्वत माथां । वाहुनी आला [15]भुजगेंद्र. ॥ ७५ ॥ ठेविला नी[16]रधीच्या तीरीं; । गुंडिला वासुकीच्या दोरीं; । देवादानवांच्या हारी । धरिल्या झाल्या दों भागीं. ॥७६॥ विष्णुसंकेतें सुरेश्वर म्हणे, । 'दैत्य हो ! तुम्हीं पुच्छ धरणें.' । येरू म्हणती,

---

१. एकाला बोलून अन्याला जाणिवणें. २. करतील. ३. पाठविले. ४. विरोचनाचा पुत्र बली. ५. इंद्र. ६. बरें. ७. सागर. ८. आंत. ९. विष्णु. १०. शेष. ११. विष्णु. १२. पर्वत. १३. नद्या. १४. समुदाय. १५. शेष. १६. समुद्र.

'हीनांगें[1] हीनें[2] । धरणें; आम्हां अयोग्य. ॥ ७७ ॥ उत्तमें धरिजे उत्तमांग[3]; । आम्ही शक्ति सामर्थ्यें चांग[4]; । मुखाकडील आमुचा भाग.' । 'अवश्य' म्हणे देवेंद्र. ॥ ७८ ॥ दैत्य कोटीच्या कोटी गाढे । झोंबिन्नले मुखाकडे; । देव म्हणती, 'विषानळ[5]पीडे । वेगळें केलें ईश्वरें.' ॥ ७९ ॥ यावरी अमरांचिया थाटी । संख्या त्रिंशत्तीन[6] कोटी । पुच्छ दोर तो करतटीं । कवळिते झाले सत्वर. ॥ ८० ॥ सागरीं निक्षेपितां[7] अचळ[8], । भेदूनि चालला पाताळ, । ते वेळे धांवोनि लक्ष्मीलोळ[9] । कमठ[10] झाला तळवटीं. ॥ ८१ ॥ आदिकूर्में केशवें तेणें । वज्रपृष्ठी करोनि निर्वेणें[11], । गिरी झेलिला, संकर्षणें । वसुधा[12] जैशी फणाग्रीं. ॥ ८२ ॥ उदधी[13] डोलतां मंदरगिरी, । पुढती कंबु[14]चक्रधारी । हस्त ठेवूनी पर्वतशिखरीं । लोट आंगें सांवरिला. ॥ ८३ ॥ वेष्टिला असतां विषयव्याळें । विवर्ती भोंवतां जडजीव अचळें । त्यातें कृपेनें वैकुंठपाळें । हस्त माथां ठेविजे. ॥ ८४ ॥ तयापरी तो जगदीश्वर । डोलतां कवळी गिरिवर; । हें देखोनि दैत्य निर्जर[15] । घुसळिते झाले आवेशें. ॥ ८५ ॥ सबळ दैत्यांचिये वोढी । पडती देवांचिया मुरकुंडी; । सुरां न ढळती असुरपेढी । मध्यें तडाडी भुजंग. ॥ ८६ ॥ विक्राळ हाक फोडितां मुखें, । पैजा घालूनि मारिती झोंके; । उभय पुरुषार्थाचीं तुकें[16] । जेविता जीवा सूंदली[17]. ॥ ८७ ॥ कांचनवर्णी गिरी मंदर, । कटीं मेखळे धवळ विखार[18]; । घुसळितां गमे नरकुंजर । तांडव करी सुरवरद. ॥ ८८ ॥ चतुर्दशविद्या रत्नदानीं । जाणूनि देवदैत्यश्रेणी[19] । कटिबंध तो पल्लवस्थानीं । धरूनि सेवा जाणविती. ॥ ८९ ॥ नाना भवार्णव तारक । गिरी तो गिरिजानायक । भावूनि सुरासुर सकळिक । कासे जैसे लागले. ॥ ९० ॥ भोंवरी देतां मंदराचळ । भोवों लागला विरंचीगोळ[20]; । सप्तलोक सप्तपाताळ । ताळ तोडिती भूकंपें. ॥ ९१ ॥ पोट रगडतां, व्यालवदनीं । अग्निज्वाळा लागली गगनीं; । गरळ वमितां, सिंधूचें पाणी । कढों लागलें खळखळां. ॥ ९२ ॥ स्फुलिंग[21] लागतां अळुमाळ[22], । यंत्र[23]मुखीं उठती ज्वाळ, । तेंवि ओढितां सांडी व्याळ । विषानळ भडभडां. ॥ ९३ ॥ तप्तकांचनरसाचा लोट । तेंवि फूत्कारी काळकूट[24]; । वर्षतां दैत्यांचे संघाट[25] । जळों

---

१. तुच्छ अंगें. २. हलक्यानें. ३. उत्तम अंग म्ह० मस्तक. ४. उत्तम. ५. अग्नि. ६. तेहतीस कोटी. ७. टाकितां. ८. पर्वत. ९. श्रीकृष्ण. १०. कूर्म. ११. वेंटाळें. १२. पृथ्वी. १३. समुद्र. १४. शंख. १५. देव. १६. सामर्थ्यें. १७. ओंविली, घातली. १८. साप. १९. पंक्ती. २०. ब्रह्मांडगोळ. २१. अग्नीच्या ठिणग्या. २२. थोडें. २३. बंदूक, तोफ. २४. विष. २५. समुदाय.

लागले त्या वेळीं. ॥ ९४ ॥ विषमिश्रितसिंधूदकीं । जळचर जाती हो! अनेकी। संहारल्या; तया लेखी । महाप्रळया कोण पां? ॥ ९५ ॥ न सांठत सागरजी-वनीं; । काळकूट उसळे गगनीं; । तेथें अहिच्या आहाळणीं[1] । विश्व सकळ पोळों लागलें. ॥ ९६ ॥ अमृताची धरितां आस, । प्राप्त झालें पहिलें विष; । देवीं ऋषीं मानूनि त्रास, । महादेव स्तवियेला. ॥ ९७ ॥ क्षोभलें दिसे हा-लाहल, । क्षणें लोक जाळील सकळ, । ऐसें जाणोनि जाश्वनीळ[2] । कैलासा-हून धांविन्नला. ॥ ९८ ॥ कृपार्णव तो जगरक्षक । विरूपाक्ष झाला विषभ-क्षक; । जैसा शांतीनें सात्विक । प्रबळ क्रोधा आकळी. ॥ ९९ ॥ निरुपमम-हिमा हर विश्वात्मा । ग्रीवे[3] सांठवी गरळाची गरिमा; । तेणें ग्रीवे पातली नीलिमा । नीलकंठ या हेतु. ॥ १०० ॥ विषबाधा शमलियावरी, । अवघे गर्जोनि जयजयकारीं, । ओढिते झाले मंदरगिरी । पुनरपि देवदानव. ॥१०१॥ वासुकीच्या नासिकीं नयनीं । सुसाटें धूम भरला गगनीं; । तों महा-मेघ होवोनि धरणी । वर्षों लागला अपार. ॥१०२॥ धूमांबरामाजी[4] सुखाग्नी । मेघीं ज्वाळा सौदामिनी[5]; । तयीं कडकडाटे ध्वनी; । दिशाकुंजर[6] बुझाले. ॥१०३॥ गिरी ओढितां दाटलें धापें, । घर्म सांडिती श्रमाचिया तापें; । त्यातें मेघवृष्टीच्या आपें[7] । शिंपोनि केलें साउपें. ॥१०४॥ त्यांची पर्जन्यधारीं देखा । पुष्पें ओझडी झाली रुखा; । सुरासुरांच्या मस्तका । पुष्पांजळी ओपिजेती. ॥१०५॥ अठरा भार वनस्पती तरु । पर्वत डोले फळसंभारु; । सागरीं सांडिती कमलावरु । क्षीराब्धिशायी पूजा-वया. ॥१०६॥ श्वापदपक्षियांचे पोळे । पळती, लंघिती अंतराळें; । गृहस्थ गोंविल्या त्रिषमकाळें[10], । आश्रित पळती ज्यापरी. ॥१०७॥ मंदरभ्रमणीं तरुसंघट्टें[11] । वन्ही[12] पेटला धडधडाटें; । दिव्यद्रुमांचीं[13] डांगें[14] दाटें । जळों लागलीं चौफेरी. ॥ १०८ ॥ त्यावरी महामेघ वर्षतां, । औषधीरसाच्या विशाळ सरिता । सागरोदरीं संगम होतां, । कौतुक कैसें वर्तलें? ॥१०९॥ अगाध महोदधीचें[15] जीवन । आतळे[16] धवळ दुग्धवर्ण; । पुढतीं पेटला हुताशन, । ज्वाळा धांवती चौफेरीं. ॥ ११० ॥ सुवर्णवल्लीचें सारामृत । तांतडें येवोनि मिळतां तेथ, । पय लोपोनि अवघें घृत । होतें झालें ते काळीं. ॥ १११ ॥ मथितां मंदले देव दैत्य; । सुधा प्राप्त नव्हे तेथ; । हें जाणोनि कमलाकांत । देता झाला बळ शक्ती. ॥ ११२ ॥ तेणें हाव चढिली

---

१. अग्नीनें. २. श्रीसांब. ३. कंठीं. ४. आकाश. ५. वीज. ६. दिग्गज. ७. उदकें. ८. शांत. ९. समुदाय. १०. पडत्या काळें. ११. संगम. १२. अग्नि. १३. वृक्ष. १४. दाट रानें. १५. सागर. १६. पावे.

दुणी,[1] । पुढती खवळले सिंधुमथनीं, । 'बाप बाप' ऐशिया वचनीं । 'घे घे' झालें म्हणताति. ॥११३॥ तें घृत मथितां खळखळाटी, । त्रयोदशरत्नें अनर्घ्य-[2] सृष्टी । कौतुकें एकएकापाठीं । निघतीं झालीं तें ऐका. ॥ ११४ ॥ श्री, सोम, कौस्तुभ, शार्ङ्ग,[3] शंख, । अश्व, गज, रंभा, पारिजातक, । सुरा, सुरभी,[4] वैद्य,[5] पीयूख;[6] । विष मागील चौदावें. ॥११५॥ कंबु,[7] कमला,[8] कौस्तुभ, धनु । देऊनि देवीं पूजिला विष्णु; । वसिष्ठा ओपिली कामधेनु; । उच्चैःश्रवा सूर्यातें. ॥ ११६ ॥ 'सिंधुमथनापूर्वीलकाळीं । लक्ष्मी काय नव्हती विष्णुजवळी ?' । ऐसा विकल्प विवेककुशळीं । कल्पिजेना सर्वथा. ॥११७॥ अर्थीं वाचा, वाचेंत अर्थ, । ऐसा शिवशक्ति सांगात, । कौतुकार्थ बोले ग्रंथ, । तो भावार्थ परिसिजे. ॥ ११८ ॥ असो. चंद्र ठेविला गगनोदरीं; । ओषधीपासोनि ताप निवारी; । सुरा भ्रमें संभ्रम करी । म्हणोनि असुरां नेमिली. ॥११९॥ रंभा आणि पारिजात, । ऐरावत श्वेत चौदंत, । माझे म्हणोनि अमरनाथ । अक्षता हातें लावित. ॥ १२० ॥ तंव मागोनि देदीप्यमान । श्वेत कमंडलु करीं धरून, । परमामृतें भरूनि पूर्ण, । धन्वंतरी निघाला. ॥ १२१॥ तो सुधारस देखतां दृष्टी, । सकळां स्वार्थ सारिखा पोटीं, । सुरासुरांचिया थाटी । उतावीळ धाविन्नल्या. ॥ १२२ ॥ 'माझें माझें' म्हणत वरी । उड्या पडल्या एकसरी, । तेथें अंगबळें असुरीं । अमृतकुंभ हिरतला. ॥ १२३ ॥ म्हणती, 'वर्म न कळेचि पहिलें; । देवीं यथार्थचि ठकिलें; । आतां राहों नये उंगलें;'[9] । बळें हारिलें अमृत. ॥ १२४ ॥ देव उठावले झुंजारी; । परि अमृत शिरकलें असुरकरीं[10] । इंद्र हृदय पिटी करीं, । काज नासलें म्हणोनि. ॥१२५॥ ज्यालागीं केले क्लेश बहुत, । तें वैरींनीं हरिलें अमृत, । परमखेद मानूनि तेथ, । धांवा करी विष्णूचा. ॥ १२६ ॥ ऐसें विषम देखोनि तेथ, । विबुधवरद[11] वैकुंठनाथ । मोहनी अवतार धरूनि, त्वरित । प्रगट झाला ते काळीं. ॥१२७॥ मायामूळपीठनिवासिनी, । अनंतशक्तीची निजस्वामिनी, । वेदवाचा वरदायिनी । गोंधळ गाती इयेचा. ॥ १२८ ॥ ब्रह्मादिकें अजातबाळें[12] । गर्भीं पाळी मोहें समेळें; । परि नुघडी एकाचेही डोळे । आपणातें देखावया. ॥१२९॥ जो ब्रह्मसुखाचा अमृतोदधी[13] । माजी वसवोनि चाखों नेदी, । मृगज-

---

१. द्विगुण. २. अमूल्य. ३. धनुष्य. ४. कामधेनु. ५. धन्वंतरी. ६. अमृत. ७. शंख. ८. लक्ष्मी. ९. मद्य ९. उगें. १०. दैत्याचे हातीं. ११. देवाला वर देणारा. १२. अजात म्ह० विष्णु त्याचा बाळ. १३. अमृताचा सागर.

लप्राय विषयनदी । भ्रमें रमवी जगातें. ॥ १३० ॥ असो. ऐसी विश्वमोहिनी । मूळमायेची कुळस्वामिनी । सुरासुर देखतां नयनीं । पतंगप्राय दीपले.॥१३१॥ अवलोकितां कंदर्पकोटी । सांडणें होतसे चरणांगुष्ठीं; । त्रैलोक्यलावण्याची पेटी । देवां दैवें उघडिली. ॥ १३२॥ झळकतां दंतपंक्तींचा रंग, । पाषाण होती पै-[1]द्मराग; । स्मित[2] होतां भूतळीं चांग, । रत्नराशी विखुरती. ॥ १३३ ॥ पाय ठेवितां महीमंडळीं, । सुवर्णकमळें सहस्रदळी । उगवती, तेथें परागधूळी- । माजी लोळे वसंत. ॥१३४॥ ते चातुर्यचंपककळिका, । शृंगारकासारमराळिका,[3] । नानाकैवल्यकनकलतिका, । वैकुंठींहूनि उतरली. ॥ १३५ ॥ ब्रह्मांडकरंडाबाहेरी । अंगींचा परिमळ धांवणें करी; । वेधकाचिया चित्तभ्रमरी[4] । यात्रे आणी त्या ठायीं. ॥ १३६ ॥ भ्रूचाप[5] सज्जूनि आकर्ण, । सोडितां कटाक्षांचे बाण, । असुरमृगीं[6] सोडितां प्राण, । धैर्य आणि स्मरणाचें. ॥१३७॥ नाना कटाक्षांचे जाळीं । असुरसमुदावो सागरजळीं । मनोमत्स्य[7] एककाळीं । वेधोनि पाशीं गोंविले. ॥ १३८ ॥ बळी म्हणे, 'इचा मुखशशांक[8] । वर्षे दर्शनें आनंदपीयूख,[9] । तेथें माझे उभय अंबक[10] । चकोर दोंदील झाले हे. ॥ १३९ ॥ इची लावण्यरासी उमापें । शेषशक्रांचीं नयनें मापें । शिगेशीं भरितां हे साक्षेपें । सरले नव्हे सर्वथा. ॥ १४० ॥ रूपऐश्वर्य पाहतां डोळां, । दासीसमान भासे कमळा; । आमुतें अंगीकारील तरी सकळां । वस्तुलाभ पावलों. ॥ १४१ ॥ रमा रंभा डोळसा दोघी । देवीं नेल्या आपुल्या भागीं, । म्हणोनि ईश्वरें आम्हांलागीं । हे धाडिली वाटतें.' ॥ १४२ ॥ म्हणोनि उठले अत्यादरें;[11] । अवघे आले तिज सामोरें; । वेष्टीत उभे देखोनि करें । येरी वृत्तांत विचारी. ॥ १४३ ॥ 'कवण अर्थाचेनि स्वार्थें । कलहो करीतसां निघातें ?' । दैत्य सांगती कृतघ्नतेतें । देवांचिया तिजप्रती. ॥ १४४ ॥ 'ठकूनि नेल्या सकळ वस्तु, । संपूर्ण पोशिला आपला स्वार्थु, । पुढती अमृताचिये हेतु । युद्ध करिती आम्हांशीं.' ॥ १४५ ॥ मोहिनी म्हणे, 'अकर्मी, दुष्ट, । मित्रद्रोही, कामलोभिष्ट; । तुम्हांसि पाववोनि कष्ट । काज केलें आपुलें. ॥ १४६ ॥ यत्न करवूनि दारुण, । शेखीं[12] न करितां समाधान, । आपस्वार्थी ठेवूनि मन, । स्वेच्छा[13] वस्तु हिरतल्या.

---

१. माणिक्य, पंचरत्नांतील एक रत्न. २. हास्यप्रफुल्लता. ३. शृंगाररूप तडागाच्या ठायीं राहणारी हंसस्त्रीच काय. ४. चित्तरूप भ्रमरी. ५. भ्रूकुटीरूप धनुष्य. ६. दैत्यरूप मृगी. ७. मनोरूप मत्स्य. ८. मुखचंद्र. ९. अमृत. १०. नेत्र. ११. अतिआदरें. १२. शेवटीं. १३. आपलें इच्छित.

॥ १४७ ॥ अनुचित राहाटोनि मंद । शेखीं पुढिल्या ठेविती शब्द; । ते अविवेकी हें प्रसिद्ध । काय लागे सांगणें ? ॥ १४८ ॥ आतां दैत्य हो ! एक ऐका, । अमृत दुर्लभ तिहींलोकां, । बहुत भाग्यें जोडलें देखा । सिंधुमथनीं प्रयासें. ॥ १४९ ॥ श्रेष्ठ, दुर्लभ, जो पदार्थ । त्यावरी सकळांची ही आर्त; । तेथें एकेंचि केलिया स्वार्थ, । विरोध उपजे सहजची. ॥ १५० ॥ विश्वास धरील तुमचें चित्त, । तरी मी न्याय करीन यथार्थ; । ज्यासि योग्य जो पदार्थ । तोचि ओपीन तयातें. ॥ १५१ ॥ स्त्रियेचें वचन अनर्थकारी । ऐसें भावेल जरी अंतरीं, । तरी जें दिसेल स्वहिताचारी । तेंचि कीजे सर्वथा. ॥ १५२ ॥ उद्योग, साहस, मौर्ख्य, लुब्धता, । माया, अशौच, निर्दयता; । ऐशिया दोषीं व्याप्त वनिता, । म्हणोनि उपेक्षा न करावी.' ॥ १५३ ॥ अंगीकारील हे आपणा । ऐशी बळीची मनकामना, । म्हणोनि म्हणे, 'तुझिया वचना- । आधीन आम्हीं सर्वथा. ॥ १५४ ॥ विवेकें न्याय कीजे चतुरीं, । आमच्या पक्षीं अभिमान धरीं.' । विश्वासोनि शक्तीच्या करीं । अमृतकुंभ ओपिला. ॥ १५५ ॥ 'योग्यायोग्य पाहोनि जाण । करवीन अमृतरसभोजन,' । ऐसें बोलोनि सुरासुरगण । पाचारिले जवळिकें. ॥ १५६ ॥ शाळा निर्मिल्या चित्रमंडिती, । स्नानें करविलीं सकळां हातीं, । उच्चीं बैसविल्या पंक्ती । दैत्यांचिया आदरें. ॥ १५७ ॥ अमृतकलश घेऊनियां हातीं, । आज्ञा पुसे असुरांप्रती, । 'प्रथम वाढूं कवण्या पंक्ती ? । एथें निरोप पाहिजे.' ॥ १५८ ॥ दैत्य बोलती विहितोत्तरा, । 'आधीं अमृत धावें अमरां, । सुरांपाठी ओपिजे असुरां.' । 'निकें[५]' म्हणे महाशक्ती. ॥ १५९ ॥ ते अवसरीं सिंहिकासुत । राहु कुटिळ परमधूर्त । मनीं अनुमानी, 'पैं येथ । कपटाचार दिसतसे. ॥ १६० ॥ भ्रमें भुलला असुरजनु; । मोहिनी नव्हे, हा महाविष्णु; । निश्चयें दैत्यांतें ठकवणू । अमृत ओपील देवांतें.' ॥ १६१ ॥ असो. पोटींचे पोटीं मात; । विबुधवेष धरोनि त्वरित, । पातला अमरपंक्तीआंत । दांभिक देवां नेणवे. ॥ १६२ ॥ चंद्रसूर्यां हो ! माझारी । बैसला कपटवेषधारी, । न विचारितां अमृतकरीं । वाढितां सूदलें मोहिनिया. ॥ १६३ ॥ पाहिलें नसतां घेतलें कोणी, । आज्ञा नेदितां श्रेष्ठजनीं, । राहु मुखीं घालितां तरणी । आणि चंद्रेंही लक्षिलें. ॥ १६४ ॥ दैत्यलक्षण जाणोनि

---

१. अयोग्य. २. यत्नें. ३. इच्छा. ४. योग्य उत्तर. ५. योग्य. ६. देवाचें रूप. ७. घातलें. ८. सूर्य.

नि[1]गुती, । भ्रू[2]संकेत दाविला शक्ती, । वाँ[3]म ताटंक वाम हस्तीं । महामाये मोकलिलें. ॥ १६५ ॥ देखतां कर्णताटंक आलें, । परी तें सुदर्शन प्रेरिलें, । तेणें राहूचें छेदिलें । शिर जैसें अ[4]रविंद. ॥ १६६ ॥ मस्तक उसळतां गगनाआंत । निवालें मुखें गर्जना करित, । 'दैत्य हो ! ठकलेती समस्त । मोहिनीरूपें विष्णु हा. ॥ १६७ ॥ सहसा अमृत नेदी असुरां.' । ऐसें ऐकतां हाहा:कारा, । प्रवर्तले हो होतियेरा । हात वसविती समस्त. ॥ १६८ ॥ अमृतकलश घेऊनि तेथ । इंद्रें पळविला हातोहात; । संग्राम माजला अद्भुत । देवां दैत्यां ते काळीं. ॥ १६९ ॥ आरूढले नाना वहनीं, । शस्त्रास्त्रीं केश धरुनी । युद्ध होतां अपार, [6]अवनी । सुरंग झाली [7]शोणितें. ॥ १७० ॥ जयसिद्धि ज्यापें [8]कमळा । तो विष्णु साह्य अमरपाळा, । म्हणोनि असुर तये वेळां । नाश पावले अपार. ॥१७१ ॥ विशेष लाधलें अमृत । म्हणोनि म्हणती 'जैत्य जैत्य' । दैत्यभागा गेलें मृत्य । परी संग्राम खंडेना. ॥१७२ ॥ ते वेळीं नर नारायण । प्रगट झाले दोघेजण; । नराहस्तीं धनुष्यबाण । चक्रधारी श्रीकृष्ण. ॥१७३॥ दैत्यदानवांचिया थाटी । संहारिल्या कोट्यानकोटी, । तरी युद्धाची हांव पोटीं । प्राणत्यागें खंडेना. ॥ १७४॥ अमृतरसाचिये आशे । मृत्यु पावले ते न मनुनि सोसें, । उरले झुंजति आवेशें । अमृतपान करावया. ॥ १७५ ॥ दृष्टी देखोनि अकाळप्रळयो, । चतुराननें आपुला तनयो । नारद पाठविला पहा हो ! । विरोधशांतीकारणें. ॥ १७६ ॥ सुरां असुरां समान मान्य, । न्यायनिष्ठुर, सत्यसर्वज्ञ, । देवां म्हणे, 'सांडा मान । संग्रामाचा विचारें. ॥ १७७ ॥ लेंकुराकरीं देवोनि फळ, । चोर चोरी भूषणें सकळ, । तैसें काज सारूनि केवळ, । दैत्य ठकविले [10]कुटिलत्वें. ॥ १७८ ॥ अजुनी न पावा [11]उपरमातें, । हा कैंचि विवेक वाटे तुम्हांतें ?' । शंकोनि देवऋषीवचनातें, । माघारले सुर सकळ. ॥ १७९ ॥ सर्वेचि दैत्यांप्रती येउन, । बोधिला [12]प्रल्हादसुतनंदन; । म्हणे, 'काळ सहाय नसतां कोण । इच्छिलें फळ पावला ?' ॥१८०॥ काळ सहाय झालेअर्थी, । वस्तु चढल्या सुरांच्या हातीं, । तुम्हीं वि[13]षाद धरूनि चित्तीं, । खेद कांहीं न करणें. ॥ १८१ ॥ साह्य करोनि शुक्राचार्या । विश्वजित याग करीं राया ! । तेणें जितोनि देवराया, । स्वर्गसंपत्ती लाधेल.' ॥ १८२ ॥ हें यथार्थ म्हणोनि

---

१. खातरीनें, खचीत. २. भिवयांची खूण. ३. कानींचे तानवड. ४. कमळ. ५. शलास. ६. पृथ्वी. ७. रक्तानें. ८. लक्ष्मी. ९. जिंकिलें. १०. वांकडे बुद्धीनें. ११. शांतीतें. १२. प्रल्हादाचा पुत्र विरोचन याचा मुलगा बलि. १३. खेद.

दैत्यीं । जाते झाले स्वस्थळाप्रती, । हें उच्चैःश्रव्याच्या उत्पत्ती- । लागीं पडलें सांगणें. ॥ १८३ ॥ रुंडा[1] मुंडा[2] दोन्हीतेंही । अमृत लागलें अळुमाळ कांहीं, । म्हणोनि दोन्ही अमर पाहीं । गगनोदरीं भ्रमताती. ॥ १८४ ॥ तो द्वेष धरोनि अंतःकरणीं । चंद्रसूर्यांतें लागती ग्रहणीं, । अद्यापि लोक देखती नयनीं । राहु केतु प्रत्यक्ष. ॥ १८५ ॥ संपलें अगाध सिंधुमथन, । सुरां श्रोतयां अमृतपान । समान झालें; विचक्षण ! । पुढें कौतुक परिसें तूं. ॥ १८६ ॥ इति श्रीभारत आदिपर्वणि । कवि मुक्तेश्वरशूळपाणी । त्याचेनि प्रसादें हे वाणी । सुखी करो श्रोतयां. ॥ १८७ ॥

अध्याय पांचवा.

यापरी जन्मला समुद्रमथनीं । उच्चैःश्रवा हयराज गुणी; । दृष्टी देखोनि दोघीजणी । दक्षदुहिता बोलती. ॥ १ ॥ कद्रू म्हणे, 'विनते ! साजणी ! । उच्चैःश्रवा कवण वर्णीं?' । येरी म्हणे, 'चंद्रकिरणीं । डवरिला[3] असे सुतेजें.' ॥ २ ॥ कद्रू म्हणे, 'यथार्थवचन । परी पुच्छचि एक श्यामवर्ण.[4]' । विनता म्हणे, 'तुझे नयन । अवलोकितां तेरळले.[5]' ॥ ३ ॥ पुढती कद्रू बोले वचन, । 'सपुच्छ वारु श्वेतवर्ण, । तैं म्यां सहस्त्रवर्षें जाण । दासी होणें तुझ्या घरीं.' ॥ ४ ॥ विनता म्हणे, 'जरी श्यामता । तैं नेमिला नेम माझे माथां'; । दोघीजणी गोवोनि शपथा, । गृहा पातल्या दिवसांतीं.[6] ॥ ५ ॥ रात्री पाचारूनि सर्प, । कद्रू करी सखेद जल्प; । 'दासीकर्दमाचा[7] लेप । मज विनतेनें लाविला. ॥ ६ ॥ मनींच्या कापट्यकाजळें । अश्ववाळ[8] न करितां काळें, । दासीत्वगोमयाच्या मळें । मी माखल्यें चिरकाळ.[9] ॥ ७ ॥ म्हणउनी तुम्ही सकळ व्यांळ[10] । [11]दंशोनि पुच्छ करावें सुनीळ;[12]' । सर्प म्हणती, 'रवी तात्काळ । शापोनि भस्म करील. ॥ ८ ॥ आम्हां न करवे अविचार कृत्य.' । कद्रु क्षोभली त्यां अद्भुत. । म्हणे, 'दुष्ट हो! तुम्ही समस्त । भस्म व्हा रे! मच्छापें.[13] ॥ ९ ॥ वृथा पुष्ट, परमारक, । मातृआज्ञा अपाळक, । तुम्हां सापत्न[14] आणि पावक[15] । नाश करो अविलंबें. ॥ १० ॥ जनमेजयाचे सर्पसत्रीं[16] । प्रवेश कराल पावकवक्त्रीं';[17] । ऐसा शाप सुरांच्या चक्रीं[18] ।

---

१. धड. २. शीर. ३. व्याप्त. ४. काळसर. ५. चंचल झाले. ६. सायंकाळीं. ७. चिखल. ८. पुच्छ. ९. बहु काळ. १०. सर्प. ११. चावोनि. १२. काळें. १३. माझा शाप. १४. सावत्र बंधु. (गरुड.) १५. अग्नि. १६. सर्पांच्या होमांत. १७. अग्नीचे मुखीं. १८. समुदायीं.

चतुराननें ऐकिला. ॥११॥ 'तथेति तथेति' ऐसें वचन। त्रिवार वदला कमळासन.। आल्हादलें अंतःकरण। बरवें झालें म्हणोनियां. ॥ १२॥ 'हिंसक, पीडक, यांची चिंता। बहुसाल वर्ते माझिया चित्ता;। ईश्वरें तयांचिये घाता। मातृशाप निर्मिला.' ॥ १३ ॥ ऐसें वदोनि, जगज्जनकें। कश्यप बोलाविला जवळिकें। विचार सांगे त्या विवेकें,। 'साह्य न कीजे दुष्टांचें. ॥ १४ ॥ तुझे वीर्यज हे सर्प। दुष्ट, दुर्जन, पापरूप;। त्यांतें मातेनें दीधला शाप। कल्याणकारी जगातें. ॥ १५ ॥ त्याच्या परिहारा उपाया। अभिमान न धरीं पवित्र राया!। असें सांगोन दीधली तया। विषहरणविद्या हो! ॥ १६ ॥ असो. मातेनें शापितां कुमरां। अवघे करिती हाहाःकारा;। धाकें धाविन्नले सत्वरा। वाळ सुनीळ करावया. ॥ १७ ॥ कृष्णकेश होवोनि सकळ। पुच्छीं जडले सलंब व्याळ.। प्रभात होतां उतावेळ। कद्रु बोले विनतेसी. ॥ १८ ॥ 'वाजीवाळ धवळ कैसें?। तें मज दाखवीं डोळसे!'। हातीं धरूनि अतिआवेशें। बलात्कारें ओढिली. ॥ १९ ॥ समुद्र लंघूनियां वेगीं। अश्वासमीप पातल्या दोघी.। विनता पाहे तंव पुच्छांगीं। दिसे कृत्रिम श्यामता. ॥ २० ॥ शब्द कुंठित झाला मुखीं,। चित्त चिंतेनें केलें दुःखी.। हारी पातली मस्तकीं,। असत्य सत्यत्वें स्थापितां. ॥ २१ ॥ कपटें जिंतोनि विनता सती,। नेवोनि सर्प सदनाप्रती,। दासी केली जेंवि विरक्तीं। वश्य कीजे विषयाशा. ॥ २२ ॥ दाक्षायणी दास्यधर्मीं। गुंतली जैसी धेनु कर्दमीं.। यावरी वृत्तांत विनताश्रमीं वर्तला। तो परियेसा. ॥ २३ ॥ उरलीं वर्षें पांचशत। क्रमिल्या, अंडें भेदोनि त्वरित,। गरुड उदेला ब्रह्मांडभरित। देदीप्यमान तेजस्वी. ॥ २४ ॥ प्रळयवन्हितुल्य तेजाळ,। कीं द्वादशादित्य एकमेळ,। तैसा देखोनि प्रजां सकळ। भयें सुटला चळकंप. ॥ २५ ॥ दंडवतें घालोनि धरणीं। प्रवर्तले पावकस्तवनीं.। म्हणती, 'स्वामी! खडतर किरणीं। विश्व भस्मेल क्षणार्धें. ॥ २६ ॥ चत्वारिशृंगा! हे त्रिचरणा!। सप्तहस्ता! उभयवदना!। स्वाहास्वधेचिया रमणा!। तेज आपुलें आच्छादीं.' ॥ २७ ॥ ऐकोनि प्रजांचा करुण जल्प,। प्रत्यक्ष झाला वन्हि सकृप;। म्हणे, 'हें भावूनि माझें स्वरूप,। क्षणीं पावलां भयातें. ॥ २८ ॥ कश्यपवीर्यें विनतातनयो। गरुड पक्षींद्र प्रतापसूर्यो। जन्मला असे, त्याचा उदयो। दिसे अद्भुत प्रकाश. ॥ २९ ॥

१. तथास्तु तथास्तु. २. ब्रह्मदेव. ३. जगाच्या बापें. ४. काळे केश. ५. पुच्छअंगीं. ६. विषयांची वासना. ७. प्रलयकालींच्या अग्नीसारिखा. ८. द्विमुखा. ९. वर्णून.

हा जगातें हितकारक। अवतरला असे [1]नागांतक; । यातें प्रार्थिल्या प्रकाशक। दाहकला लोपेल.' ॥ ३० ॥ ऐसें परिसोनि पावकवचन, । प्रजांहीं मांडिलें गरुडस्तवन; । म्हणती, 'विष्णुवल्लभा! नमन। समस्तांचें तुज पावो. ॥ ३१ ॥ तुझें स्मरण केलिया निखळ, । उतरे संसारसर्पगरळ, । इतर व्याळविष विकळ। करूं न शके तव दासा. ॥ ३२ ॥ पक्ष स्पर्शतां मेदिनी । होती गरुडपाचूच्या खाणी, । चतुर्विंशति योजनें दोन्ही । विद्युत्प्राय फडकती. ॥ ३३ ॥ आरक्त चंचू चरण नयन । किरीट कुंडलें विराजमान, । स्वामी! तुझें पवित्र ध्यान । हृदयीं वसो आमुचे. ॥ ३४ ॥ जो ओळखे गुरूची खूण । तो शिष्य गुरूसारखा जाण, । विष्णुभक्त तो आपण । विष्णुसमान मानावा. ॥ ३५ ॥ म्हणोनि देवा! दीनदयाळा! । आंवरीं आपुली प्रकाशकळा.' । ऐसें स्तवितां, जना सकळा । कृपे बोले [6]पतगेंद्र. ॥ ३६ ॥ 'नाभी नाभी' म्हणे प्रजांतें, । 'क्षणी शंकाल मद्रूपातें । माझें अभय सदा तुम्हांतें, । मी दीनातें रक्षिता. ॥ ३७ ॥ मातृद्रोही, पितृद्रोही, । मित्रद्रोही, साधुद्रोही, । विष्णुद्रोही, यांतें पाहीं । मजपासाव भय असे. ॥ ३८ ॥ दुष्ट, दुर्जन, क्षुद्र, अशांत, । गुरुतल्पग, सत्यरहित, । दुराचारी ते अनर्थ । मजपासाव पावती. ॥ ३९ ॥ कीर्तनद्वेषी, परपीडक, । वदनीं कठोरतेचें विख, । ते मज सर्पासारिखे देख, । भक्षण करीन तयांचें. ॥ ४० ॥ वैष्णव आणि शंकरद्वेषी, । शैव विष्णूतें उपहासी, । ते ते शत्रु मानूनि मी त्रासीं, । सर्पातुल्य निर्धारें. ॥ ४१ ॥ शास्त्राभिमानें माजली बुद्धी, । नाम लाविती अर्थवादीं, । ते ते जाण माझे द्वंदी, । सर्पऐसें [10]विखंडीन. ॥४२॥ काशीस्मरणें विष्णुस्मरणें । मोक्ष, ऐशीं वेदवचनें; । तीं जो असत्य मानी मनें, । तो मज वैरी निर्धारें. ॥ ४३ ॥ म्हणोनि प्रजा हो! तुम्हीं सकळ । हरिहरभजनीं सार्वकाळ । निरंतर झालिया केवळ, । घैरटीकार मी तुमचा.' ॥ ४४ ॥ यापरी आश्वासूनि प्रजांतें, । आच्छादिलें निजतेजातें; । मग खांदीं वाहूनि अरुणातें । मातेजवळी पातला. ॥ ४५ ॥ तंव पूर्वदिशे अंशुमाळी । तपों लागला द्वादश कळीं; । क्षोभें चौदालोकहोळी । करावया [13]उदित. ॥ ४६ ॥ हें देखुनि, [14]देवसमूहो । प्रार्थिता झाला पितामहो; । ब्रह्मा म्हणे, 'ग्रहणीं [15]राहो ।

१. सर्पनाशक. २. सर्व. ३. संसाररूपी विष. ४. विजेसारखी. ५. पक्षिश्रेष्ठ. ६. माझ्या रूपातें. ७. गुरुपत्नीशीं रत. ८. निंदिती. ९. स्पर्धी. १०. नाश करीन. ११. दास. १२. सूर्य. १३. सिद्ध. १४. देवांचा समुदाय. १५. राहू.

येरें ग्रासी सूर्यातें. ॥ ४७ ॥ अमृतमथनीं सुधा प्राशितां, । सूर्यें राहु प्रगट करितां, । तेणें सांडूनि समस्तां, । सूर्यातेंच लागला. ॥ ४८ ॥ तेणें क्षोभे सहस्रकिरण, । जाळूं पाहे त्रिभुवन, । म्हणोनि तया आडवा अरुण । सारथी करून स्थापावा. ॥ ४९ ॥ हें म्यां पहिलेंच सुचोन गोष्टी, । अरुण निर्मिला विनतापोटीं.' । ऐकोन सुरांचिया कोटी । अरुणासमीप पातल्या. ॥ ५० ॥ गौरवें नेऊनि समस्तीं । सारथी केला दिनकररथीं, । यावरी तोषला गभस्ती । आच्छादिलें उष्णातें. ॥ ५१ ॥ असो. सागर पैलपारीं । विनता दासी कद्रूच्या घरीं, । गरुडपुत्र स्नेहकरी । तया स्थाना पातला. ॥ ५२ ॥ तोही मातेचिया क्लेशा । विभागी झाला सैरिसा, । भृत्यत्व करितां बहुत दिवसा, । कद्रु । म्हणे विनतेतें. ॥ ५३ ॥ 'समुद्रकुक्षीं रमणीकवस्ती । नागालय अतिएकांती; । स्कंधीं वाहूनि तयाप्रती । शीघ्र नेईं मजलागीं.' ॥ ५४ ॥ मातृवचनें पृष्ठावरतें । गरुडें बैसविलें सर्पांतें, । मार्ग क्रमितां दिवसनाथें । तीव्र उष्णें तापविलें. ॥ ५५ ॥ तया ग्रीष्मींचें खडतर उष्ण । लागतां, सर्प मूर्छापन्न, । देखोनि कद्रु करी स्तवन । देवेंद्राचें ते काळीं. ॥ ५६ ॥ म्हणे, 'शक्रा ! करुणाकरा ! । विश्वपाळका ! अतिउदारा ! । मेघोदकें शिंपोनि दातारा ! । कुमर ये काळीं रक्षावे.' ॥ ५७ ॥ स्तवनें इंद्र कळवळला, । सोडिता झाला मेघमाळा, । तेणें विश्रांती झाली त्यांला, । प्राण देहीं परतले. ॥ ५८ ॥ हरुषें पावले रमणीकद्वीप, । स्वैच्छोदकें[9] बहु पादप[10], । खेचरभूचरांचे[11] काळप । सुखवाढोनि राहिले. ॥ ५९ ॥ तें द्वीप पाहोनि निवाडें, । सहित कद्रु विनता गरुडें; । सर्प म्हणती, 'याहूनी पुढें । सुंदर द्वीप पैं असे. ॥ ६० ॥ तेथें आम्हुतें वाहूनि पृष्ठीं । गरुडा ! नेईं न लागतां त्रुटी, । नाना द्वीपें तुझिये दृष्टी । पडती प्रसादें आम्हुच्या.' ॥ ६१ ॥ परिसोनि सर्पांचें सत्तावचन, । गरुड मानसीं कोपायमान, । मातेसी पुसे हें कारण, । काय तें सांगें मजप्रती. ॥ ६२ ॥ 'हीन[12]वीर्य, दुरात्म[13], खळ । क्लेशविती सदाकाळ, । विक्रीत दास भृत्यातुल्य[14] । सत्ता करिती आम्हांवरी. ॥ ६३ ॥ इहीं सांगीतलें काज । कां करणें ? सांडूनि लाज.' । विनता म्हणे, 'कपटें पैज । घालोनि मातें जिंकिलें. ॥ ६४ ॥ तेणें गुणें परम क्लेशी, । सहस्र अयनें[15] झालें मीं दासी.' । ऐकोन पुत्राच्या मानसीं ।

---

१. 'सुरांच्या हिता' असाही पाठ आहे. २. सत्कारानें. ३. सारिखा. ४. दास्यत्व. ५. समुद्राचे मध्यभागीं. ६. सूर्यानें. ७. तापविलें. ८. मूर्छेनें व्याप्त. ९. स्वच्छ उदकें. १०. वृक्ष. ११. आकाशीं व भूमीवर चालणारे जीव. १२. निर्मळ. १३. दुष्टबुद्धि. १४. चाकरासारिखे. १५. वर्षें.

खेद अद्भुत वाढिन्नला. ॥ ६५ ॥ म्हणे, 'माते! परिस हे मातु, । तुझेनी [1]पां-
लटें जे जे वस्तु । मागती, ते मी समर्थु । देऊन तूतें सोडवीन.' ॥ ६६ ॥
विनता विचारी कद्रूतें, । कवण वस्तु ओपिल्या तूतें, । दासीकर्मापासूनि
मातें । मुक्त करिसी तें सांग.' ॥ ६७ ॥ कद्रू म्हणे, 'ऐक वचना, । मज
आणि माझ्या नंदनां, । अमृत आणोनि दिधल्या [2]पौना, । मुक्त करीन तुज-
लागीं.' ॥ ६८ ॥ मातेनें सांगतां गरुडाप्रती, । बाहु पिटी [3]भीमपुरुषार्थी, ।
'जिंकोनि देवांचिया पंक्ती, । अमृत आणीन निर्धारें. ॥ ६९ ॥ परी [4]क्षुधा-
नळें पीडिलों जठरीं, । भक्ष ओपी हो! झडकरी.' । माता म्हणे, '[5]सागरोदरीं ।
[6]निषादालय विस्तीर्ण. ॥ ७० ॥ समुद्रकुक्षीं अतिएकांत । निषादालयीं असं-
ख्यात । निषाद भक्षूनि, अमृत । शीघ्र आणीं सुपुत्रा! ॥ ७१ ॥ परंतु गेलि-
याही प्राण, । न करीं ब्राह्मणभक्षण; । ब्राह्मण अग्नीसमान जाण । सर्वभूतीं
मानिजे. ॥ ७२ ॥ सूर्यअग्नीपरीस शीघ्र । शापें कोपें जाळिती विप्र; । [7]कल्प-
द्रुमाहूनि उदार । फळ ओपिती प्रसादें. ॥ ७३ ॥ विषापरीस मारक [8]रोषें; ।
अमृताहूनि तारक तोषें; । पादरेणूंचेनि [9]कुलिशें । पापपर्वत विभांडिती. ॥७४॥
ब्राह्मण तोचि महाविष्णु; । त्याचे पूजनें संतुष्ट भगवानु; । ब्राह्मणद्वेषिया नारा-
यणु । वैरी मानी आपुला. ॥ ७५ ॥ म्हणसी, ब्राह्मण जाणूं कैसा; । ग्रासितां
[10]खदिरांगार तैसा । कंठीं लागेल तो, [11]खगेशा! । वीर्य जाण ब्राह्मणाचें. ॥७६॥
[12]बडिश मीनाचिये कंठीं । लागतां करी प्राणसाठीं, । तैसा ब्राह्मण ग्रासितां कष्टी ।
तूं होशील खगेंद्रा!' ॥७७॥ मातृआज्ञा वंदोनि परम । निघता झाला खगोत्तम ।
[13]निषादद्वीप अतिउत्तम । मनोवेगें पातला. ॥ ७८ ॥ तया द्वीपाचे चौफेरीं ।
विशाळ पर्वताची भोंवरी । सकळा [14]निर्गमें एकद्वारीं । [15]दुर्गद्वारासारिखे. ॥७९॥
तेथें गरुडें लाविलें वदन, । पक्ष झडाडे सोडिला पवन, । तेणें धुरोळा दाटला
[16]सघन, । माजी दिनमणी लोपला. ॥ ८० ॥ स्थानें सोडिलीं पर्वतीं, । घुसळों
लागला [17]अंपांपती । धाकें निषादांचिया पंक्ती । गिरिद्वारें निघाल्या. ॥ ८१ ॥
पळतां निषादांचे पाळें । गरुडमुखीं जाती सगळे; । कोटीकोटी वरी आगळे, ।
लक्ष किती नेणवती. ॥ ८२ ॥ त्यांमाजी होता एक ब्राह्मण पतित । [18]निषादी-

१. बदल. २. प्राशना. ३. भयंकर पुरुषार्थ ज्याचा. ४. क्षुधारूप अग्नीनें. ५. सागराचे उदरीं. ६. कोळ्याचें घर. ७. कल्पवृक्षाहून. ८. रागें. ९. वज्रें. १०. खैराच्या लांकडाचा निखारा. ११. पक्ष्यांचा राजा. १२. गळ. १३. आकाश. १४. मार्गी. १५. किल्ला. १६. अतिजाड. १७. समुद्र. १८. धीवराची बायको.

स्त्रियेसमवेत, । कंठीं लागला अकस्मात, । तप्तलोहासारिखा. ॥ ८३ ॥ गरुडें देखोनि ओकारी । म्हणे, 'ब्राह्मणा! निघें बाहेरी.' । येरु म्हणे, 'गा! प्राणेश्वरी । निषादी माझी मज संगें ॥ ८४ ॥ उंगळिशील अरुणानुजा! । तरीच देह परतेल माझा.' । गरुडें ब्राह्मणसहित भाजा । मुखींहुनी सोडली. ॥ ८५ ॥ आज्ञा देऊनि धाडिलें त्यातें, । ग्रासूनि सर्व निषादांतें, । गगन वळघला, तंव अवचितें । कश्यपातें देखिलें. ॥ ८६ ॥ नमस्कारितां तातचरण, । पित्यानें दिधलें आलिंगन; । म्हणे, 'कुमरा! कुशळ संपूर्ण । सांग तूतें असे कीं?' ॥८७॥ गरुड म्हणे, 'स्वामी ताता! । सर्पी जितिली विनता माता, । तिच्या दासित्व-परिहारार्थी, । अमृत आणूं जातसें. ॥ ८८ ॥ क्षुधा माझी अत्यद्भुत, । निषादभक्षणें नव्हे शांत.' । पिता मोहें स्नेहभरित । म्हणे, 'परिसें बाळका! ॥८९॥ देवलोकीं सरोवर । विशाळ, जैसा सागर, । त्यामाजी कूर्मकुंजर । मूळवैरें झुंजती. ॥ ९० ॥ कथा सांगेन ते ऐक; । विभावसु आणि सुप्रतीक । दोघे ब्राह्मण सहोदर देख, । अर्थस्वार्थी विरोधी. ॥ ९१ ॥ कनिष्ठ म्हणे, 'द्रव्यवि-भाग । माझा मजलागीं ओपीं चांग;' । ज्येष्ठ म्हणे, 'एकत्र योग । असतां लोकीं प्रतिष्ठा. ॥ ९२ ॥ तुंबा तंति वेणुदंड । तिघां मेळीं वीणा सुघड । मधुरस्वरीं श्रवणीं गोड । नाना लोकां रंजवी. ॥ ९३ ॥ तिन्हीं सांडितां तीं ठायीं, । कोणी हातीं न शिवे पाहीं; । तैसा वेगळाचार कांहीं । श्लाघ्य नव्हे श्रेष्ठातें.' ॥९४॥ ऐसा वडील विचारें बोधी, । परी कनिष्ठ नायके आग्रहवादी; । नित्य कलहो झालिया क्रोधी । शाप ओपी अनुजातें. ॥ ९५ ॥ 'अखंड मातें पीडिसी प-हा हो! । दुष्टा! पावसी कुंजरदेहो;' । येरु म्हणे, 'तूं जळग्रहो । कमठ होसी क-पटिया!' ॥ ९६ ॥ परस्परें वदतां शापु, । कुंजरकांसवाचिया वपु । धरूनि, पूर्वील संकल्पु । झुंज करिती अद्यापि. ॥ ९७ ॥ त्या गजाचें शरीर जाण, । उंच विशाळ साहा योजन, । लंबायमान त्या द्विगुण । बारा गांवें प्रचंड. ॥ ९८ ॥ दुसरें कच्छपकलेवर । तीन योजनें भयंकर, । दाहा योजनें रुंदवि-स्तार, । पर्वतपृष्ठासारिखें. ॥ ९९ ॥ त्यांचे देह भक्षूनि वेगीं, । सुधामातृमो-चनालागीं । आणितां, देव जिंकोनी स्वर्गीं । जया पावसी निर्धारें. ॥ १०० ॥ वेदमंत्रबीजरहस्यें । तंत्र मंत्र देवता सावकाशें, । प्रसन्नचित्तें महाहर्षें ।

---

१. ओकशील. २. अतिआश्चर्यकारक. ३. द्रव्यासाठीं. ४. ओपला. ५. तारा. ६. वेळूचा दांडा विण्याला लावण्याचा. ७. कनिष्ठबंधूतें. ८. जलचर. ९. कूर्म. १०. शरीर. ११. कांसवाचें शरीर. १२. हर्षानें.

विजयप्रद[1] तुज होवो. ॥ १०१ ॥ आणि विष्णूचें ध्यानस्मरण । करी ज्याचें हृदयवदन, । त्यातें ऋद्धि सिद्धि जाण । कर जोडुनी ओळंगती. ॥ १०२ ॥ अच्युत, केशव, नारायण, । कृष्ण, दामोदर, संकर्षण, । श्रीधर, माधव, गोपीरमण, । रघुनंदन दाशरथी. ॥ १०३ ॥ ऐशिया नामांची जपमाळ । पुत्रा! जपतां सर्वकाळ, । पायें लोटोनि कळिकाळ, । जय पावसी तिहीं लोकीं.' ॥ १०४ ॥ ऐसा बोळविला[2] आज्ञापुनी, । मग लाभ सुचविला शकुनीं, । शक्ति वाढली सहस्रगुणीं, । बाहु स्फुरती युद्धार्थी. ॥ १०५ ॥ सरोवरा पातला लवलाहें, । गगनीं राहोनि कौतुक पाहे, । सुप्रतीक[3] कुंजरदेहें । तडागोदरीं[4] पातला. ॥ १०६ ॥ त्याच्या गर्जनेचा घोष । ऐकोनि, कूर्मा चढला रोष, । बाहेर धाविन्नला द्वेष । जन्मांतरीचा[5] स्मरोनी. ॥ १०७ ॥ चरणीं घालोनियां अढी[6] । कांसव गजातें पैं ओढी, । कुंजरदातांचिये जोडी । कूर्मग्रीवें गोंवित. ॥ १०८ ॥ खळवळी कांसारिंचें[7] जळ, । मत्स्यमगरां प्रळयकाळ, । हें देखोनि विहंगमपाळ[8] । झेंपावला सैत्राणें[9]. ॥ १०९ ॥ वामचरण चवंडीयांत[10] । दोन्ही कवळिले झोंबियेसहित, । गगनोदरीं फेरे देत, । ठाव पाहे बैसावया. ॥ ११० ॥ तंव महापर्वतीं विशाळरूप । रौहिणेयवट पादप[11], । खग, पक्षिणी, श्वापद कळप । असंख्यात वसिन्नले. ॥ १११ ॥ मस्तकींहुनि पारंबिया[12] । पाताळपर्यंत भेदलिया, । कनकशाखीं[13] पाळलिया । रत्नकळिका सुरंग. ॥ ११२ ॥ वृक्ष म्हणे, 'हे देवपक्षी! । शतयोजनें शाखा लक्षीं, । तिजवरी बैसोनियां भक्षीं । कूर्म आणि कुंजर.' ॥ ११३ ॥ ऐसें ऐकोनि गृध्ररावो । अळुमाळ[14] ठेवी सव्यपावो, । तंव शाखा कडाडिली भेवो[15] । नाना खेचर[16] पळाले. ॥ ११४ ॥ गरुड शाखा[17] पाहे दृष्टी, । तंव पानोंपानीं, देंठोंदेंठीं, । वालखिल्य[18] सहस्र साठी । अधोवदन लोंबती. ॥ ११५ ॥ तिहीं देखोनि पुरुषार्थ भीम[19], । गरुड ऐसें ठेविलें नाम; । असो. भयें विहंगोत्तम[20] । शाखा घेवोनि उडाला. ॥ ११६ ॥ करीं कच्छप, आणि शाखा । उभय चरणीं कवळुनी देखा, । फेरे घाली भूगोलका, । परमधाकें ऋषींच्या. ॥ ११७ ॥

---

१. विजय देणारे. २. पाठविला. ३. ब्राह्मणनामविशेष. (मागें ९१ ओंवी पहा.) ४. तळ्याच्या मध्यभागांत. ५. अन्यजन्मींचा. ६. मिठी. ७. तलावाचे. ८. पक्ष्यांचा पाळक. (गरुड.) ९. जोरानें. १०. तळपायांच्या बोटांजवळच्या भागांत. ११. वृक्ष. १२. पारंब्या. १३. सुवर्णशाखा. १४. हळु, किंचित. १५. भय. १६. पक्षी. १७. वृक्षाची खांदी. १८. अतिसूक्ष्म देहाचे ऋषी. १९. भयंकर. २०. पक्ष्यांत उत्तम. (गरुड.)

शाखा सांडितांचि धरणी, । शाप देतील महामुनि, । तेणें भयें उद्विग्न[2] मनीं । अंतरिक्षीं[1] तळपत. ॥ ११८ ॥ ऐसा फिरतां गगनपंथीं, । गंधमादन महापर्वतीं । कश्यपऋषि देखिला पुढतीं, । तयाप्रती पातला. ॥ ११९ ॥ सचिंत देखोनि कुमारातें, । पिता 'नो[3] भी' करी हातें, । 'वालखिल्यांपासूनि तूतें । शापभय असेना.' ॥ १२० ॥ मग जोडोनि दोन्ही कर, । प्रार्थिले ते ब्रह्मकुमर, । 'स्वामी! तुह्मी दयाकर । क्षमाशील सर्वथा. ॥ १२१ ॥ अमृतान[4]यनालागीं जाणा, । गरुड जातसे स्वर्गभुवना; । तुम्हीं जावें आणिका स्थाना, । भग्नशाखा सांडोनी.' ॥ १२२ ॥ ऐकोनि कश्यपाची विनंती, । हिमालयपर्वताप्रती । वालखिल्य मानसगती । जाते झाले तात्काळ. ॥ १२३ ॥ कश्यप कुमरातें आज्ञा करी, । 'हिमाचळाच्या वरिल्या शिखरीं । शाखा ठेवूनि भक्षण करीं । कुंजर आणि कमठांचें.' ॥ १२४ ॥ गरुड गेला गिरिमस्तका, । तेथें ठेवोनि पादपशाखा, । करी कच्छप दोवे देखा । सावकाश भक्षिले. ॥ १२५ ॥ झाला उत्पतना[6] उद्यत[5] । तंव स्वर्गीं उठला महोत्पात[7], । इंद्रवज्रापासूनि उठत । वन्हिज्वाळा भडभडां. ॥ १२६ ॥ भिन्न भिन्न सुरांचीं शस्त्रें । झुंज करितीं परस्परें, । रक्तोदकाचेनि तुषारें[8] । मेघ वर्षों लागले. ॥ १२७ ॥ किरीट देवांचिया मौळी । तेथें बैसली दिसे धुळी; । दिवाभीतांच्या[9] कल्लोळीं । शीतज्वर प्रगटले. ॥ १२८ ॥ देखोनि अरिष्टांचा[10] मेळा, । शक्रा[11]आंगीं भयकांटाळा[12], । ते वेळीं पाचारिलें जवळां । देवगुरु[13]तें साक्षपें. ॥ १२९ ॥ त्याप्रती निवेदिली मात; । ऐकोनि अंगिराचा सुत । बृहस्पती सांगे ते परिसोत । श्रोते कथा पुढारीं. ॥ १३० ॥ इति श्रीकद्रुविनतासौपर्णे । भारत आदरें ऐकतां शाहाणे, । विश्वंभरप्रसादें म्हणे । मुक्तेश्वर आवडी. ॥ १३१ ॥

अध्याय सहावा.

सद्गुरु[14] म्हणे, 'गा वज्रपाणी[15]! । तुझेनि अपराधें विषाद मनीं । मानिला साठसहस्रजनीं । वालखिल्लीं साक्षपें. ॥ १ ॥ तपें तोषवूनि रुद्र, । करीत असतां दुसरा इंद्र, । कश्यपें प्रार्थूनि पक्षींद्र । जो करविला बळी विष्णु. ॥ २ ॥

---

१. अंतराळीं. २. चिंतायुक्त. ३. भिऊं नको. ४. अमृत आणायासाठीं. ५. सज. ६. उडण्यास. ७. मोठा उत्पात. ८. बारीक उदकाचे कण. ९. घुबडाच्या. १०. दुश्चिन्हांचा. ११. इंद्र. १२. त्रास. १३. बृहस्पति. १४. बृहस्पति. १५. हे इंद्रा.

तो गरुड हो! स्वर्गभुवना । बळें येतसे अमृतहरणा, । मातृशापविमोचना. । लागूनियां प्रतापें. ॥ ३ ॥ त्याशीं तुळे हो! संग्रामीं, । ऐसा नाहीं ब्रह्मांडधामीं; । तरी आतां समस्त तुम्हीं । अमृत यत्नें रक्षावें. ॥ ४ ॥ परी तो अजिंक समस्तांसी, । अमृत हरील निर्धारेंशीं, । यालागीं अशुभ चिन्हें ऐशीं । उदेलीं हें जाणिजे.' ॥ ५ ॥ ऐकोनि बृहस्पतिचिया वचना, । इंद्र हाकारी अमरगणा; । 'युद्धसामग्रीशीं जाणा । सुधासरोवर[1] रक्षावें.' ॥ ६ ॥ आज्ञा होतांक्षणीं त्वरित, । वसु, रुद्र, साध्यादित्य, । मरुद्गण ही समस्त । सिद्ध झाले संग्रामा. ॥ ७ ॥ कवचें बाणलीं[2] रत्नखचित, । टोपें[3] सूदले वज्रमंडित,[4] । करीं करवाळें[5] झळकत, । विद्युत्प्रभेसारिखीं.[6] ॥ ८ ॥ चक्रें, परिघ, शूळ, शक्ती, । परशु, पट्टीश, मुद्गलजाती, । गदा पडताळिली हातीं; । धाकें कांपती गिरिमौळी.[7] ॥ ९ ॥ यमदंष्ट्रा खोंविल्या कंठीं, । तूणीर[8] आंवळिले पृष्ठीं, । धनुष्य सज्जूनियां[9] मुष्टीं, । समुदायेशीं निघाले. ॥ १० ॥ अमृतकुंड वेष्टिती बळें; । पडले अमरगणांचे पाळे; । जेथें संचारावया अंनिळें[10] । रीघ नोहे सर्वथा. ॥ ११ ॥ दाही दिशा लावूनि नयना, । पाहत ठेले गरुडागमना; । सूर्य, चंद्र, यम, वरुण, । वन्ही, वायु, इत्यादि. ॥ १२ ॥ शौनक म्हणे, 'अगा सुमती! । पौराणिकचक्रवर्ती! । कवण अपराध सुरपती । आचरला ऋषींचा? ॥ १३ ॥ जेणें वालखिल्य कोपें । दुसरा इंद्र पैं साक्षेपें । करीत होते, तें त्वां कृपें । निरोपिलें पाहिजे.' ॥ १४ ॥ सौती म्हणे, 'हो! जी! ऐका; । कश्यप सृष्टीचिया जनका । संततीकामनेस्तव देखा । याग करितां पुत्रेष्टी,[11] ॥ १५ ॥ शक्त्यनुसार सामुग्रीसी । साह्य झाले देवऋषी; । शक्रें पर्वततुल्य राशी । समिधांचिया[13] आणिल्या. ॥ १६ ॥ देखोनि अंगुष्ठप्राय ऋषी । साठी सहस्र वैखानसी,[12] । वितस्तिमात्र[14] एकी सायासीं । पालाशसमिधा तोडिली. ॥ १७ ॥ खांदी वाहूनि समस्तीं । शनैःशनैः[15] आणितां पंथीं, । गोष्पदप्राय[16] अपांपती[17] । तैसा पुढें भासला. ॥ १८ ॥ पाय निसरोनि अवचितें । अवघे पडिले त्या आंतौतें; । कुचकळ्या खात एकमेकांतें । कवळूनियां झोंबती. ॥ १९ ॥ हें देखोनि तये काळीं । इंद्र हांसे पिटोनि टाळी; । 'पहा चोज, गोष्पदजळीं ।

१. अमृताचा तलाव. २. घातलीं. ३. किरीट. ४. हिरेजडित. ५. तरवारी. ६. विजेचे कांतीसारिखी कांती ज्यांची. ७. पर्वतांचीं शिखरें. ८. भाते. ९. गुण चढवून. १०. वायूनें. ११. पुत्राकरितां इष्ट. १२. यज्ञकाष्ठें. १३. ब्रह्मचारी. १४. वीतभर. १५. हळू हळू. १६. गाईचे पाऊल. १७. समुद्र.

ब्राह्मण कैसे बुडाले ? ॥ २० ॥ ऐसे जीव जे देखती । तयांसि हांसावयाचे अर्थीं । ब्रह्यानें निर्मिलें निश्चिती । विनोदार्थ जगातें.' ॥ २१ ॥ परी धांवोनि आपुल्या हातें । कोणी न काढीच तयांतें, । ते वेळीं महाविष्णूतें । बोभाविलें आकांतीं. ॥ २२ ॥ तये संकटीं जगदीश्वरु । जो [1]संसारक्लेशाब्धिचें तारू, । त्वरें पावूनि कमळावरु । तारक झाला तयांतें. ॥ २३ ॥ इंद्रें हांसोनि उपहासिलें, । तेणें मानसीं संतापले, । मग तेथेंचि करिते झाले । तपश्चर्या अत्युग्र. ॥ २४ ॥ इंद्रासि हारी आणी युद्धीं, । बळें आगळा ऐश्वर्यनिधी, । ऐसा निर्मूं इंद्रपदीं । दुसरा इंद्र [4]अविलंबें. ॥ २५ ॥ देखोनि ऋषींचें निर्वाण, । इंद्र धाकें कंपायमान, । कश्यपासी जाऊनि शरण, । 'रक्षीं रक्षीं' ह्मणतसे. ॥ २६ ॥ कुमार घालुनियां पाठीं, । कश्यप आला तयां निकटीं; । म्हणे, 'मजवर ठेवूनि दृष्टी, । कोप सांडा सात्विक हो ! ॥ २७ ॥ योग्य जाणोनि, इंद्रपदीं । त्यांतें स्थापूनि गेला विधी, । तुम्ही धरोनि विषाद बुद्धी । विपरीत करूं पाहतसां. ॥ २८ ॥ तरी तुमचा काम पावे सिद्धी, । इंद्र न चळे इंद्र-पदीं, । ऐशी मी एक सांगेन बुद्धी, । ते कृपेनें [5]अनुष्ठा. ॥ २९ ॥ न करूनि त्याग [6]त्रिदशांचा इंद्र, । निर्मावा तपें [7]पतगेंद्र, । वीर्यशौर्यबळसमुद्र, । इंद्राहूनि [8]आगळा.' ॥ ३० ॥ ऐसें कश्यप भगवान् ऋषी । प्रार्थोनि मागोनि घेतां त्यांसी, । [9]वालखिल्य सुखसंतोषीं । वर ओपिते जाहले. ॥ ३१ ॥ म्हणती, 'सहज तूं पुत्रकामार्थी । आमुच्या तपाचें फळ घे हस्तीं, । जो मनोरथ तुझ्या चित्तीं । तोचि पावो सिद्धीतें.' ॥ ३२ ॥ तेणें वरें गरुडनिधान, । [10]विनता-गर्भशुक्तिकारत्न, । निपजलें पुढां झालें कथन । मागां तुम्हीं तें परिशिलें. ॥ ३३ ॥ असो. तो गरुड महाबळी । स्वर्गीं प्रवेशे तये काळीं; । पक्षवाताचिये धूळीं । मंदाकिनी डहुळीत. ॥ ३४ ॥ तें समस्त जाणवलें सुरां, । आला म्हणोनि [11]हेतियेरा । हातीं वसवोनि येरयेरां । धीरशब्दें ओपिती. ॥ ३५ ॥ तंव सहस्र दिनकरांचा मेळ, । कीं उदेला प्रळयानळ, । पक्ष भवंडितां भू-गोळ, । चक्रीं पडे गरगरा. ॥ ३६ ॥ नखें देखोनि सणाणी, । सुरांचे शस्त्रीं पाझरे पाणी, । एका वज्रा अणिया दोन्ही । तैसे चंचू समसमीत. ॥ ३७ ॥ देखोनि सुरांचिया थाटी, । करिते झाले शस्त्रवृष्टी, । गर्जनेच्या अतिबोभाटीं ।

---

१. दुःखरूपी संसारसागर तरून जाण्याविषयींची नौका. २. अपयश. ३. खरेंसें. ४. तत्काळ. ५. स्वीकारा. ६. देवांचा. ७. पक्ष्यांचा स्वामी. (गरुड.) ८. अधिक. ९. वालखिल्यऋषि. १०. विनतेच्या गर्भाशयरूपशिंपींतील रत्न. (मोती.) ११. शस्त्रें.

गगन घुमों लागलें. ॥ ३८ ॥ तडक भिंडिमाळा[1]गुंडे, । चक्रें, नाराच, लोह-खंडें, । भाले, त्रिशूळ, इंडेंपाडें । घेघे म्हणोनि टाकिती. ॥ ३९ ॥ हें देखोनि प्रळयरुद्र । कोपें खवळला विहंगेंद्र[3] । म्हणे, 'देव हो! तुमचा इंद्र । जरी पातला विबुधांशीं,[4] ॥४०॥ अथवा साठसहस्रगणीं । युद्धा आला पिनाकपाणी,[5] । नातरी वैकुंठ सांडोनि, । मधुसूदन पातला, ॥ ४१ ॥ तरी कश्यपाचा कुमर । मागां न सरे खगेश्वर; । ऐसा जाणोनि निर्धार । हांव सांडा युद्धाची. ॥ ४२ ॥ हरि हर तोषवोनि युद्धीं, । आपुलें काज नेईन सिद्धीं; । गर्वा चढला जो दुर्बुद्धी, । तो पावेल क्लेशातें.' ॥ ४३ ॥ ऐसें गर्जोनि एकसरीं । झेंप घातली निर्जरभारीं;[6] । जैसा युगांतीं त्रिपुरारी । क्षोभे विश्व नाशावया. ॥ ४४ ॥ पक्ष पिटोनियां धरणी, । मृत्तिका भरली सुरलोचनीं; । रजें आच्छादिला तरणी,[7] । कोणा कोणी न देखे. ॥ ४५ ॥ पक्ष निबिडाचिया रातीं, । येरयेरांवरी आदळती; । शस्त्रें सांडूनियां हातीं, । अनिमिष[8] नेत्र झांकिती. ॥ ४६ ॥ ते अवसरीं सहस्रनयन[9] । आज्ञापूनि पाठवी पवन, । मेघ पाडूनि रजःकण । शांत शीघ्र करावया. ॥ ४७ ॥ आज्ञेनें मुसळप्राय[10] सैरा । मेघीं मोकलिल्या जळधारा; । विद्युत्पातें अतिभेदरा[11] । पक्षींद्रातें दाविती. ॥ ४८ ॥ मेघीं भंगिला धुरोळा; । देखते झाले येरयेरां, । परतोनियां हातियेरां । पुढती मारूं लागले. ॥ ४९ ॥ दशघ्नी,[12] शतघ्नी,[12] सहस्रघ्नी;[12] । शस्त्रअस्त्रांच्या प्रहरणीं, । तीक्ष्णतीक्ष्ण धारांचा खणाणी, । वन्ही[13] वर्षों लागला. ॥ ५० ॥ एक म्हणती, 'जितचि धरा;' । एक म्हणती, 'शतखंड[14] करा;' । एक म्हणती, 'झाला पुरा, । वज्रघातें गिरी जैसा.' ॥ ५१ ॥ एक म्हणती, 'लघुलाघवें । वरुणपाशीं[15] चरण-ग्रीवे[16] । गोंवोनि पिंजरीं रक्षावें । कौतुकार्थ पाखरूं.' ॥ ५२ ॥ परिसोनि देवांची वल्गना, । गरुड मिसळला रणकंदना; । पक्षवातावर्तीं जाणा । असंख्यात गोंविले. ॥ ५३ ॥ एक ऊर्ध्व उडविले गगनीं; । एक टाकिले समुद्रजीवनीं;[17] । एक व्योमींहुनी[18] धरणी । पडती, उठती पुनःपुनः. ॥ ५४ ॥ लागतां नखांचा चपेट, । शस्त्रें अस्त्रें होती पीठ; । चंचु हाणितां रागीट, । चूर्ण होती मस्तकें. ॥ ५५ ॥ निर्जरांचीं[19] दिव्य शरीरें, । चंडघायें शतजर्जरें; । प्रबळ

१. गोफण. 'भिंडिपाल गुंडे' असाही पाठ आहे. २. हटातटानें. ३. पक्षिश्रेष्ठ गरुड. ४. देव. ५. रुद्र. ६ देवसमुदायांत. ७. सूर्य. ८. डोळे न झांकणारे देव (ते डोळे झांकीत नाहींत तरी या प्रसंगीं तसें करतात असा भावार्थ.) ९. इंद्र. १०. मुसळाप्रमाणें. ११. भय. १२. शस्त्रविशेष. १३. अग्नि १४. शंभर तुकडे. १५. वरुणाच्या पाशांत. १६. मान. १७. उदकीं. १८. आकाशांतून १९. जरारहित जे देव त्यांचीं.

रुधिराचेनि[1] पूरें । देवगंगा माजली. ॥ ५६ ॥ हस्त, पाद, अंगोळिका । खंडित जैशा पादपशाखा[2]; । केश, श्मश्रु लुंचतां[3] देखा, । क्षपणिक[4] तैसे भासती.॥५७॥ गरुड माराचिये नेटीं । कोणा धैर्य न धरवे पोटीं; । अमरगणीं देखोनि पाठीं । पळते झाले सत्वरा. ॥ ५८ ॥ सिद्ध साध्यादिक गंधर्व । पूर्वे उजु[5] पळाले सर्व; । धाकें रुद्र आणि वसव[6] । दक्षणदिशा लंघिती. ॥ ५९ ॥ आदित्य पळाले पश्चिमे. । अश्विनीदेव धांवती सौम्ये[7]. । म्हणती, 'प्रळय विहंगमें । देवसृष्टी आटिली.' ॥ ६० ॥ अश्वक्रथन, नरक्रथन; । तपन, उलुप, निमीषण; । पुरुजयादि देवगण । एकें एक पळाले. ॥ ६१ ॥ ऐसें देखोनि अद्भुत, । कोपें खवळला कृतांत[8]; । दंड पडताळूनि त्वरित, । गरुडाउजू धांविन्नला. ॥ ६२ ॥ जेणें काळदंडें भीम । जगाचे प्राण दंडी यम, । तेणें ताडितां विहंगम, । चोज कैसें वर्तलें? ॥ ६३ ॥ दंड झेलूनि विजयपाणी, । नवनीतप्राय गिळिला वदनीं; । म्हणे, 'रे! विष्णुकिंकरां स्वप्नीं । यमबाधा असेना. ॥ ६४ ॥ आतां पाहें जगहिंसका! । निर्दयनिष्ठुरजीवकंटका! । तुझ्या छेदूनि मस्तका, । अमर करीन विश्वातें.' ॥ ६५ ॥ म्हणऊनि धांविन्नला रागें, । यम संविल्याआड[9] निघे; । सूर्यसारथियातें[11] सांगे, । 'निर्वाणवेळा सांभाळीं.' ॥ ६६ ॥ अरुण म्हणे, 'अगा अनुजा[12]! । माझिया स्वामीच्या आत्मजा[13] । कृपेनें रक्षीं पवित्रद्विजा!' । ऐकतां गरुडें सोडिला. ॥ ६७ ॥ पुढें त्रिगुणत्रिशूळधारी । हरें ताडिला लक्षूनि दुरी; । विवेक साधकें सुविचारीं । सावधानें चुकविला. ॥ ६८ ॥ तो कौतुकें झेलूनि, धैर्यगती । निस्तेज करूनि ओपितां हातीं, । आश्चर्य मानुनी, गिरिजापती, । बळ अद्भुत देखोनि. ॥ ६९ ॥ हांसोनि बोले, 'खगनायका! । तुझेनि पावलों परमसुखा; । वर वदोनि, मग कौतुका । पाहों ठेला निराळा[14]. ॥ ७० ॥ ऐसा वरुणपाशीं वरुण । दंभाचारें गोवितां चरण, । निर्लोभतेचे नखीं जाण । शतखंड केले साधकें. ॥ ७१ ॥ 'विष्णुस्मरण जयाचे वदनीं, । तयातें बांधूं न शके कोणी;' । ऐसा निश्चय करूनि गगनीं । निवांत ठेले समस्त. ॥ ७२ ॥ वीज चमके जेणें पाडें, । तैसा गरुड झेंपावे पुढें; । अमृत लक्षी, तंव धडाडे । वन्ही धडके सभोंवता. ॥ ७३ ॥ प्रळयीं पसरे कृतांतवक्त्र[15] । तैसें परिधिज्वालाचक्र, । गगन चुंबित अवक्र[16], ।

---

१. रक्त. २. वृक्षाच्या खांद्या. ३. उपटतां. ४. बौद्धजोगी. ५. सरळ. ६. अष्टौ वसव. ७. सोमाची दिशा उत्तर तिजकडे. ८. यम. ९. यमा. १०. पित्याच्या म्ह० सूर्याच्या. ११. अरुणातें. १२. कनिष्ठबंधो गरुडा. १३. पुत्राला. १४. आकाशांत. १५. कालमुख. १६. सरळ.

मनासि मार्ग असेना. ॥ ७४ ॥ हें देखोनि, गरुडोत्तमें । बुद्धि योजिली मनोधर्में; । सुधावरोधी पावक शमे । ऐसा करूं उपाव. ॥ ७५ ॥ शरीरीं करूनि अनंत वदनें, । भरिलीं अनंतनद्यांचीं जीवनें, । तेणें शिंपितां प्रळयघनें । शांत झाला प्रळयाग्नी. ॥ ७६ ॥ यापरी करोनि अनळ शांत, । पुढां संचरे भेदीत पंथ; । तंव देखिलें अत्यद्भुत, । जें कां असाध्य प्रयत्नीं. ॥ ७७ ॥ सुधावापिकेचें वक्त्र, । त्यावरी भोंवे कर्तरीयंत्र; । जैसें कुंभकाराचें चक्र । सहस्रधारा झगझगी. ॥ ७८ ॥ ज्याचें होतां संघट्टण, । सहस्रखंड होतो पवन, । तीक्ष्णतेच्या भयें करून, । वन्ही काष्टीं लपाला. ॥ ७९ ॥ त्याची चुकवूनियां भवंडी, । चक्रधारेचिया सवडी, । माजी संचरला तांतडी । सूक्ष्म देह धरूनियां. ॥ ८० ॥ चक्र भ्रमत असतां वेगीं, । यंत्रमुखें पैलभागीं । निघता झाला, जैसा योगी । ब्रह्मरंध्रप्रवेशें. ॥ ८१ ॥ पुढें पाहे अमृत निकटीं । वेढे घातले महाकर्कोटीं; । जो जीवपणे त्याचिये दृष्टी, । तो भस्म होय क्षणार्धें. ॥ ८२ ॥ तेथें अदृश्य होवोनि आपण, । पंखीं भरले मृत्तिकाकण, । उधळोनि सर्पांचे लोचन । अंध केले निःशेष. ॥ ८३ ॥ मुखीं, आणि नाकीं, नयनीं । व्याळ निर्बुजले रजःकणीं; । कुंडाआंतौति उतरोनी, । अमृत माथां वंदिलें. ॥ ८४ ॥ रौप्यकलशीं पवित्र सुधा । संपूर्ण भरली मुखमर्यादा; । वदनीं झांकिलें अरविंदा । कनकाचिया हस्तकें. ॥ ८५ ॥ यंत्रमूळीं नख सूदलें, । चक्र उपटोनि सांडिलें, । मनोवेगाहूनी वहिलें । अमृत घेऊनि उडाला. ॥ ८६ ॥ गर्जना करीत जयजयकारें, गगनमंडळीं घालीत फेर; । म्हणे, 'देव हो ! बळिष्ठ वीरें । शीघ्र यावें संग्रामा.' ॥ ८७ ॥ अद्भुत कर्म देखोनि नयनीं, । सन्मुख पातला शार्ङ्गपाणी; । मायिक क्रोध अवलंबोनी, । चक्र वेगीं मोकलिलें. ॥ ८८ ॥ येतयेतां सुदर्शन । गरुडें गिळिलें पसरोनि वदन; । हृदयस्थाच्या हातीं जाण । भूषणार्थ ओपिलें. ॥ ८९ ॥ विष्णु म्हणे, 'भलारे ! भला; । प्रसन्न झालों माग वहिला; । अमृतप्राशनावीण केला । देह तुझा अक्षयी.' ॥ ९० ॥ गरुड म्हणे, 'कमळापती ! । तूंचि वर मागें मजप्रती.' । देव म्हणे, 'अवश्य, हातीं । भाक ओपीं उदारा !' ॥ ९१ ॥ गरुड देतां भाकप्रमाण, । हरी म्हणे, 'हो माझें वाहन; । दास्यधर्मे पाळोनि वचन, ।

१. अग्नि. २. कातर. ३. कुंभार. ४. सर्पविशेष. ५. कमळाला. ६. विष्णु. ७. धरूनि. ८. हृदयीं राहणारा आपला स्वामी देव. ९. लक्ष्मी.

ध्वजस्तंभीं राहावें.' ॥ ९२ ॥ गरुड म्हणे, '[1]समर्थबोलें । हो तैसेंचि.' अंगिकारिलें. । भावें येवोनि वंदिलें । पादांबुज विष्णूचें. ॥ ९३ ॥ तंव इंद्रातें पावली हाक, । गरुड घेऊनि गेला [2]पीयूख; । आडवा धाविन्नला सरोख । [3]नागारूढ [4]नगवैरी. ॥ ९४ ॥ वज्र सोडिलें सव्य हस्तीं, । तेजें जैसा तीव्र [5]गभस्ती; । गरुड झेलोनि म्हणे, 'अस्थि । भंगूं नये ऋषीची.' ॥ ९५ ॥ मग शक्रातें म्हणे वचनीं; । 'माझें कौतुक पाहें नयनीं.' । म्हणोनि पक्षापासोनि धरणी । [6]पर्ण एक सोडिलें. ॥ ९६ ॥ तें कनकपाचूंनिं बंधपत्र, । ठसे उमटले चित्रविचित्र; । तेजें [7]सहस्रचक्षूचे नेत्र । झांकुळले सौंदर्यें. ॥ ९७ ॥ देखोनि हरि हर कमळासन । म्हणती, 'याचें नाम सुपर्ण; । हें पर्णधारतळीं चूर्ण । शतें होती वज्राचीं. ॥ ९८ ॥ पृथ्वी, सागर, सहस्रगिरी, । एक पक्षपर्णाच्या अग्रीं, । [8]ब्रह्मायुष्यवर्षेंवरी । वाहों शके विस्मरणें. ॥ ९९ ॥ येवढी जयाची आंगवण, । तयासी झुंजोनि वांचे कवण ? । यालागीं सख्य करूनि जाण, । कार्य साधीं सुरेशा !' ॥१००॥ ना गवे देखोनि [9]गृध्रराव, । इंद्र इच्छी मित्रभाव; । म्हणे, 'गरुडा ! मजशीं स्नेह, । वाढता करीं बंधुत्वें. ॥ १०१ ॥ आणि जे इच्छा असेल मनीं, । तो वर मागें मजलागुनी; । माझे शत्रु मित्र मानीं । शत्रु मित्र आपुले.' ॥ १०२ ॥ गरुड म्हणे, 'हे सहस्राक्ष ! । सर्प होत कां माझे भक्ष; । हा एक वर ओपिल्या मुख्य, । मित्र माझा तूं एक. ॥ १०३ ॥ विशेष कश्यपाचा कुमर । होशील वडील सहोदर । दोघे [10]खेचरांचे इंद्र. । नाम ही एक दोघांचें. ॥ १०४ ॥ म्हणोनि तुम्हां आम्हां सहजें । मैत्री योग्यता समान साजे; । आतां काज माझिये काजें । आपुलेंसें मानीं तूं.' ॥ १०५ ॥ शक्र म्हणे, 'अगा सखया ! । छत्तीस कुळें सर्पांस या; । त्यामाजि तूतें भक्षावया । [11]सप्तविंशति ओपिलीं. ॥ १०६ ॥ उरले जनमेजयाचे यज्ञीं । भस्म होतील [12]हुताशनीं; । त्यांतून कांहीं आस्तिक मुनी । श्रेष्ठ ते ते रक्षील.' ॥१०७॥ [13]एवं बोलोनि दोघे जणीं, । स्नेहें [14]मीनले आलिंगनीं; । इंद्र म्हणे मग प्रार्थोनी, । 'वाक्य माझें अवधारीं. ॥ १०८ ॥ तुज काज नाहीं अमृतें, । कृपेनें उचित ओपीं मातें.' । गरुड म्हणे, 'तदर्थ चित्तें । चिंता कांहीं न करीं तूं. ॥ १०९ ॥ किंचित्कार्याच्या उद्देशें । अनुच्छिष्ट सुधा मी नेतसें; । वेंचों

१. समर्थाच्या वाणीनें. २. अमृत. ३. गजारूढ. ४. पर्वतशत्रु. (इंद्र.) ५. प्रखर ज्याचे किरण असा सूर्य. ६. पीस. ७. इंद्र. ८. ब्रह्मदेवाचीं शंभर वर्षें. ९. पक्ष्यांचा राजा. १०. देव आणि पक्षी ह्यांचे. ११. सत्तावीस. १२. अग्नींत. १३. असें. १४. मिळाले.

नेदीं हें विश्वासें । वचन माझें मानीं तूं. ॥ ११० ॥ हें सर्पातें दावूनि नयनीं, । ठेवीन पवित्र कुशस्थानीं; । तुवां हरावें तेथुनि । अदृश्यगती सत्वर.' ॥ १११ ॥ ऐसा संकेत सांगूनि वहिला, । सर्पसदनाप्रती पातला; । अमृतकुंभ दाविता झाला । परम आल्हाद सकळांतें. ॥११२॥ गरुड म्हणे, 'अशुचिपण । असतां, दुर्लभ अमृतपान; । स्पर्श करील त्यापासून । अदृश्य होईल तात्काळ. ॥ ११३ ॥ म्हणोनि पवित्र गंगाजळीं । मंगळस्नानें सारूनि सकळीं, । मग बैसोनि सुहृदमेळीं, । पीयूषपान करावें. ॥ ११४ ॥ गंगातीरीं स्थळ निर्दोष । कुशमंडळीं अमृतकलश, । ठेविता झाला पतंगाधीश । दावोनियां सर्पातें. ॥ ११५ ॥ आजपासूनि माझी जननी । मुक्त दास्यत्वदोषापासुनि; । साक्षी यथार्थ सूर्य धरणी.' । गर्जोनि ऐसें जाणवी. ॥ ११६ ॥ सर्प मानूनियां वचन, । त्वरें सारूनि संध्या स्नान, । लावोनियां उभयनयन, । मंत्र जपती मानसीं. ॥ ११७ ॥ ते संधी लक्षूनियां निरुती, । इंद्र येऊनि अदृश्यगती, । अमृत हरिलें कत्रणेरीती, । प्राण जैसा कृतांतें. ॥ ११८ ॥ नियम सारूनियां व्याळीं, । येऊनि पाहती कुशस्थळीं, । अमृत न देखोनि, सकळीं । हाहाःकार माजविला. ॥ ११९ ॥ 'गरुडें आम्हां ठकविलें पाहीं; । आतां उपाय न चले कांहीं; । अमृत ठेविलें ते ठायीं । दर्भ जिव्हाग्रीं चाटिती. ॥ १२० ॥ तिये दर्भधारेकरुनी । चिरोनि जिव्हा झाल्या दोन्ही; । ते साक्ष अद्यापि लोचनीं । लोक देखती प्रत्यक्ष. ॥ १२१ ॥ अमृतहराचेनि दुःखें । दाहिलें चिंतेच्या पावकें; । विनतापृष्ठीं वाहोनि सुखें । गरुड गेला स्वाश्रमा. ॥ १२२ ॥ सत्तावीस कुळें व्याळ । क्रोधें ग्रासिले महाविशाळ; । उरले भयें पाताळबिळ । भेदोनियां पळाले. ॥ १२३ ॥ एकत्र करोनि जनकजननी । इतुकी कथा नैमिषारण्यीं । वर्तली ते यथार्थवचनीं । सौती सांगे शौनका. ॥ १२४ ॥ आख्यान हें श्रद्धाभक्ती । पढोनि, पुढल्या परिसविती, । त्यांतें पृष्ठीं वाहोनि अंतीं । वैकुंठासी नेई गरुड. ॥ १२५ ॥ आणि सर्पापासूनि कदा । नाहीं विषदंशाची बाधा; । ऐसें व्यासाचिया शब्दा । विश्वासें मानिजे. ॥ १२६ ॥ एथून संपलें सौपर्ण; । पुढें मांडिलें आस्तिकाख्यान; । ते कथेसि निजावधान । सज्जनीं दिधलें पाहिजे. ॥ १२७ ॥ इति श्रीभारते आदिपर्वणि । मुक्तेश्वरगिरा ताम्रपर्णी । साहित्यमोतियांची भरणी । जोडे ग्राहीक श्रोतियां. ॥ १२८ ॥

---

१. लव्हाळ्याच्या बेटावर. २. कोणी न पाहतां. ३. अमृत. ४. पक्ष्यांचा राजा. ५. यमानें. ६. सर्पांनीं. ७. गरुडाचें आख्यान. ८. लक्ष, चित्त. ९. मुक्तेश्वराची वाणी. १०. एक नदी आहे.

अध्याय सातवा.

शौनक म्हणे, 'लोमहर्षणी! । मागील कथा परिसिली श्रवणीं; । सर्पाभिधानें तुझी वाणी । वदली नाहीं विस्तारें. ॥ १ ॥ तें सांगोन पन्नगसत्र । जें कां अद्भुतरसाचें पात्र, । तेणें आमुचे क्षुधित श्रोत्र । संतृप्त करीं उदारा!' ॥ २ ॥ सौती म्हणे, 'जी स्वामी! । संख्या न सरे सर्पनामीं; । तथापि श्रेष्ठ श्रेष्ठ ते मी । अनुवादेन अवधारीं. ॥ ३ ॥ शेष, वासुकी, ऐरावत; । तक्षक, कर्कोटक, धनंजय, कुशीत; । काळिय, मणिनाग, कंबल श्वेत; । आपूरण आणि पिंजरक. ॥ ४ ॥ एळापत्र, वामन व्याळ; । नीळानीळ, कल्माष, शबळ; । आर्यक, उग्रक, नहुष, पिंगळ; । पोतक आणि सुनामुख. ॥ ५ ॥ दधिमुख, क्षत्ता, विमळ, पिंडक; । आप्तशंख, करोटक; । वालिशिख, निष्ठानक; । हेमगुह महानाग. ॥ ६ ॥ बाह्यकर्ण, हस्तिपद, मुद्गर; । पिंडक, काळीक, एकवीर; । पुण्यदंष्ट्रात्रत, बिल्व, पांडुर; । संवर्तक, पौत, पद्मा. ॥ ७ ॥ शंखमुख, वज्रकोपन, क्षेमक; । पिंडारक, अतिभद्र, मूषक; । शंखशिरा, जोतिरक; । अपराजित, पूर्णभद्र. ॥ ८ ॥ श्रीवह, कौरव्य, धृतराष्ट्र; । कुमुदाक्ष, कुञ्जन, कुठर; । कुंडोदर, कर्कर महोदर, । सत्य, विराज, सुबाहु. ॥ ९ ॥ पुष्कर, शालि, पिंड, वीर्यवान, । पीवरक, मुखर, कोणपायन; । कुष्मांडक, तित्तिरी, कर्दमान, । बहुमुख, कलशरस. ॥ १० ॥ असो. हे किती नामसंख्या; । प्रगट केलें मुख्यमुख्यां; । अप्रसिद्ध तयांची लेखा, । विश्वकर्ता स्वयें जाणे. ॥ ११ ॥ पुत्र, पौत्र, बहु संपत्ती, । नागकन्या पद्मिनीजाती; । देवांगनातुल्य सुकृती, । भोग पावती तयांचे. ॥ १२ ॥ सकळसर्पश्रेष्ठ, सुमती, । शेष फणींद्र धर्ममूर्ती; । धरूनि वीतराग विरक्ती । निवता झाला तपातें. ॥ १३ ॥ वल्कलवसनें, जटाधारी; । जितेंद्रिय, निराहारी; । पुण्यारण्य पुण्यगिरी; । पुण्यकुहरें वसवित. ॥ १४ ॥ हिमालयीं, गंधमादनीं; । दशारण्यीं, पुष्करारण्यीं; । निर्मळ तपें निर्मळ स्थानीं, । निर्मळ मनें आचरत.

---

१. लोमहर्षण ऊर्फ सूत याचा पुत्र. (सौती.) २. सर्पांचीं नांवें. ३. सांगेन. ४. उत्तम जातीची स्त्री. इचें लक्षण:—'प्रांतारक्तकुरंगशावनयना पूर्णेंदुतुल्यानना पीनोत्तुंगकुचा शिरीषमृदुला स्वल्पाशना दक्षिणा । फुल्लांभोजसुगंधिकामसलिला लज्जावती मानिनी श्यामा कापि सुवर्णपंकजनिभा देवादिपूजारता ॥ उन्निद्रांबुजकोशतुल्यमदनछत्रा मरालस्वना तन्वी हंसवधूगतिः सुललितं वेषं सदा बिभ्रती । मध्यं चापि वलित्रयांकितमसौ शुक्लांबराकांक्षिणी सुग्रीवा शुभनासिकेति गदिता नार्युत्तमा पद्मिनी ॥' (अनंगरंग. अ० १ श्लो० ८–९.) ५. निर्लोभी. ६. वीळ.

॥ १५ ॥ तपश्चर्या तीव्र दारुण । देखोनि पातला चतुरानन; । म्हणे, 'कवण कामना मन । वांछी? तें सांग अनंता!' ॥ १६ ॥ नागेंद्र म्हणे, 'देवदेवा! । श्रीरंगनाभिकमलोद्भवा!। सुहृदसंग माझिया जीवा । वांती तैसा नावडे. ॥१७॥ हे दुराचारी, जगहिंसक, । अधर्मशील, परनिंदक, । नित्य कलहाचें कौतुक । परस्परें बाढविती. ॥ १८॥ त्यावरी बलिष्ठ सापत्नबंधु । गरुड देवांचा सेवक, साधु; । त्याशीं चालविती वैरसंबंधु, । हीनशक्ती पामर. ॥ १९ ॥ विशेष मातेनें शापिलें, । पावकीं भस्म होतील वहिलें, । तयां जोहरांतूनि केलें । देह माझें भिन्न म्यां. ॥ २० ॥ तीव्र तपाच्या वैश्वानरीं । शरीर जाळीन निज निर्धारीं.' । ऐकोनि हात ठेविला शिरीं; । 'मैंभी' म्हणे विधाता. ॥ २१ ॥ 'मातृशापाचा अनळ । लागों नेदीं तुज अळुमाळ; । निर्भय होवोनि राहें अचळ, । मी सांगेन त्या रीती. ॥ २२ ॥ माथां घेवोनियां धरणी । अक्षयी राहें पाताळभुवनीं; । सर्व सौख्य तुजलागोनी । पाठवीन त्या ठायां. ॥ २३ ॥ तुझेनि तपें झालों तुष्ट, । शक्ती देईन अति अचाट, । पद्मपत्राहून हळुवट । धरणी राहेल तुझ्या माथां.' ॥ २४ ॥ अहिनाथ म्हणे, 'त्रैलोक्यनाथा! । भुगोळ बैसवीं माझिये माथां.' । ब्रह्मा म्हणे, 'मही डोलतां । आंदोळती गिरिकूटें. ॥ २५ ॥ तेणें प्रळयो होईल भूतां, । खचतील स्वर्गींचिया चळथा, । म्हणोनि तृणाग्र न हालतां । सुखोपाय सांगतसें. ॥ २६ ॥ माझे आज्ञेनें धरा एथ । विवर पाडोनि देईल पंथ; । तुवां प्रवेशोनि त्वरित, । स्तंभ होणें तळवटीं.' ॥ २७ ॥ करोनि प्रदक्षिणा, नमन; । शेष आज्ञेनें करी गमन; । विवर पाताळतळ भेदून । पृथ्वी माथां वाहिली. ॥ २८ ॥ सहस्रफणींचा एकमणी, । तया रत्नाग्रावरी धरणी, । धरिली, जैशी मृत्तिकाकणी । न दिसे शृंगीं मेरूच्या. ॥२९॥ हरिहर सिद्धाचे सकळ भोग, । ऋद्धिसिद्धीसहित सांग, । निकट येऊनि उभे मार्ग, । पाहती शेषआज्ञेचा. ॥ ३० ॥ पुढें, परम भक्त म्हणोन, । त्यावरी पहुडला नारायण; । यापरी शेषें हो आपण । आत्महितार्थ साधिला. ॥३१॥ शेष त्यागूनि गेलियावरी, । सर्प मिळोनि थोरथोरी, । वासुकी केला राज्याधिकारी, । इंद्र जैसा सुरगणीं. ॥ ३२ ॥ सभा करोनि मग समस्तीं । चित्तें भ्रमती चिंतावर्तीं; । शापारिष्टपरिहारार्थीं । म्हणती, 'यत्न विचारा.' ॥ ३३ ॥ एक म्हणती, 'ऋषींची काया । धरोनि भेटों जनमेजया; । सर्पसत्र न करावया ।

---

१. शेषा. २. अग्नि. ३. भिऊं नको. ४. अग्नि. ५. अणुमात्र, किंचित. ६. स्थिर. ७. कमलपत्रापेक्षां. ८. हलकी. ९. पर्वतशिखरें. १०. निजला.

उपदेश करूं विवेकें.' ॥ ३४ ॥ एक म्हणती, 'होऊनि प्रधान, । सेवेनें मोहूं नृपाचें मन;' । एक म्हणती, 'ॠत्विजगण । रात्रीं निद्रिस्त डंखावे.' ॥ ३५ ॥ एक म्हणती, 'द्रव्य सकळ । नाश करूं घालोनि गरळ;' । एक म्हणती, 'तो भूपाळ । ग्रासूं पितियासारिखा.' ॥ ३६ ॥ एक म्हणती, 'विषोदकधारी । मेघा पाडूं यज्ञावरी.' । एक म्हणती, 'हस्तनापुरी । सर्पमयचि करावी.' ॥३७॥ ऐशीं सर्पमुखींचीं वचनें । राजा एकही न मानी मनें; । म्हणे, 'हे ब्रह्महत्या रे! जाणें, । मरण पावतील हुताशीं.' ॥ ३८ ॥ अधोवदनें वारिलें मौळ, । श्वास सोडी वेळोवेळ ; । हें देखोनि धर्मशील । एळापत्र बोलत. ॥ ३९ ॥ म्हणे, 'भुजंगेशा ! अवधारीं; । शाप झाला, ते अवसरीं । मातेचिया मांडीवरी । भयें उपविष्ट मी होतों. ॥ ४० ॥ ते वेळीं कानीं पडिलीं वचनें, । तीं तुम्ही ऐका एकाग्रमनें; । शाप परिसोनि चतुराननें । 'तथास्तु' म्हणितलें चहूं मुखीं.॥४१॥ तेथें अमरेंद्रसहित निकट । भावें जोडोनि करसंपुट, । स्तवनें प्रार्थिला देव-श्रेष्ठ । पितामह परमेष्ठी. ॥ ४२ ॥ पुत्र शापूनि करी दहन । ते लाव राक्षसी-समान, । तिच्या वचना अनुमोदन । किमर्थ दिधलें? स्वामिया!' ॥४३॥ ब्रह्मा म्हणे, 'परपीडक । त्यांचे हृदयीं अत्यंत दुःख, । यालागीं वदलें माझें मुख । 'हो तैसेंचि' म्हणोनी. ॥ ४४ ॥ दुष्टसंहाराकारणें । अपाय रचावा प्रयत्नें; । सहज मांडल्या देखोनि, मनें । म्यां संतोष मानिला.' ॥ ४५ ॥ शक्र म्हणे, 'तूं दीनदयाळ, । सात्विक, तामस प्राणी सकळ; । सुष्ट दुष्ट तुझेचि बाळ । कृपेनें देवें रक्षावे.' ॥ ४६ ॥ हांसोनि बोले सर्वेश्वर, । 'सांगणें नलगे हा विचार. । पवित्र रक्षावयाचा प्रकार । म्यां पूर्वींच रचिलासे. ॥ ४७ ॥ दुष्ट पडतील हुताशनीं, । सुष्ट रक्षील आस्तीकमुनी;' । ऐसें देखोनि पद्मयोनी । पुढती बोले प्रगटार्थ. ॥ ४८ ॥ 'स्वसा शेषाची धाकुटी, । जरत्कारी सुगुणसृष्टी, । जरत्कारु भिक्षेसाठीं । अंगीकारील निजवधू. ॥ ४९ ॥ तिच्या पोटीं जन्मेल कुमर, । आस्तीकनामा ऋषीश्वर; । तपोतेजें वैश्वानर । धडाडीत वैराग्यें. ॥ ५० ॥ तो रक्षील मातुळकुळ जळतां.' । ऐसें वदला वेदवक्ता. । तोचि यत्न तुम्ही आतां । विचारावा मुख्यत्वें. ॥ ५१ ॥ ऐकोनि एळापत्रवचन, । तोषलें वासुकीचें मन; । अवघे म्हणती, 'धन्य धन्य । श्रेष्ठ विचार हा एक.'॥५२॥ त्यावरी स्वल्प काळेंकरून, । सुरासुरीं समुद्रमंथन। मांडिलें, तेसमयीं

१. यज्ञक्रिया चालविणारे. २. सर्पनामविशेष. ३. बसलेला. ४. ब्रह्मदेव. ५. ब्रह्मदेव. ६. बहिण. ७. ब्रह्मा.

प्रार्थून । [1]रंज्जू केला वासुकी. ॥ ९३ ॥ कार्य संपादल्या सर्व । वस्तुलाभें तोषला देव; । ते वेळीं स्मरोनि देहभाव, । पुढती ब्रह्मा प्रार्थिला. ॥ ९४ ॥ 'स्वामी ! फणींद्र वासुकी नामा । एथें बहुसाल पातला कामा, । याचे हृदयींचें शल्य तुम्हां । वांचोनि कवणें फेडावें ? ॥ ९५ ॥ याचा [2]हृत्ताप केलिया शांत, । आम्हां पावलें कोटी उचित.' । ऐकोनि बोले त्रैलोक्यतात, । 'हें म्यां पूर्वींच कथिलेंसे. ॥ ९६ ॥ एळापत्र आपुल्या युक्ती । ज्या कां वदला सर्पांप्रती, । तोचि आठव धरोनि चित्तीं, । उपाय यांहीं साधावा. ॥ ९७ ॥ जरत्कारी रक्षूनि यत्नें, । जरत्कारूस भिक्षा देणें, । तो आपल्या रेतदानें । आस्तीकातें जन्मवील. ॥ ९८ ॥ तपोतेजें वैश्वानर । मनें सृष्टी मनें संहार, । ऐसा आस्तीक ऋषीश्वर । जळतां रक्षील सर्पांतें. ॥ ९९ ॥ त्या ऋषीचा आगमनकाळ । येथून समीप जाणा सकळ; । ऐसें अभय देखूनि, व्याळ । लोटांगणें घालिती. ॥ ६० ॥ वासुकी बोले आज्ञावचन, । 'सर्प हो ! लक्षा [3]द्विजागमन । जरत्कारू हें [4]अभिधान । आठवण मनीं असों द्या.' ॥६१॥ यावरी कौरववंशज नृपती, । पवित्र राजा परीक्षिती, । मृगयाव्याजें वनाप्रती । निघता झाला कौतुकें. ॥ ६२ ॥ जैसा प्रपितामह पांडु । धनुर्धरांमाजी प्रचंडु, । तैसा यशकीर्तिनें रूढु । मृगयाशीळ स्वधर्मी. ॥ ६३ ॥ कबरीं [5]सायक [6]शरासन, । श्वापदें लक्षीत हिंडे वन, । तरस, तरळ, वराह, श्वान । बाणधारीं [7]निर्वंटित. ॥ ६४ ॥ [8]पुढां [9]कुरंग एक नयनीं । दूर देखोनि, विंधिला बाणीं; । घायाळ मृग पळतां वनीं । पाठीं धांवे नृपाळ. ॥ ६५ ॥ जैसा शंकर पिनाकपाणी । यज्ञमृगातें विंधोनि बाणीं, । पाठी लागे, धांवे चरणीं । [10]स्वर्गारण्य शोधित. ॥ ६६ ॥ तैसा लागला असतां बाण, । [11]वनोपवनें लंघी हरिण, । राजा पाठीसि धांवतां शीण । पावता झाला अपार. ॥ ६७ ॥ पुढें [12]गोरक्षकांचें वृंद । देखिलें, करिती विनोद, । वत्समुखींचे स्रवतां बिंद, । तो पयफेण प्राशिती. ॥ ६८ ॥ त्यांसी [13]तृषार्त पुसे [14]जीवनें; । ते म्हणती, 'जी ! पयप्राशन । कीजे' म्हणोनि क्षीरद्रोण । पुढां करिती हस्तकें. ॥ ६९ ॥ तें घेऊनि भोंवतें पाहे दृष्टी, । तंव अंतरें देखे पर्णकुटी. । पाहोनि आला [15]तयानिकटी, । देखे [16]मांझारी तपस्वी. ॥ ७० ॥ बैसोनियां [17]पद्मासनीं, । मनें

१. दोरी. २. हृदयदुःख. ३. ब्राह्मण जरत्कारू यांचें येणें. ४. नांव. ५. बाण. ६. धनुष्य. ७. मारतो. ८. पुढें. ९. हरिण. १०. स्वर्ग व अरण्य. ११. वन व उपवन. १२. गुराख्यांचें. १३. तृषेनें व्याकुळ. १४. जल. १५. पर्णशाळेजवळ. १६. आंत. १७. एक प्रकारचें योगशास्त्रप्रसिद्ध आसन.

पहुडला समाधिशयनीं, । म्हणोनि कपाटमुद्रा[1] नयनीं, । आणि मुखीं महामौन्य. ॥७१॥ फेण प्राशोनि करी तप, । यालागिं शमीक[2] तो फेणप[3]; । राजा आला त्यासमीप, । तापघर्मे[4] श्रांतला. ॥ ७२ ॥ हस्तें पिटोनियां टाळी, । म्हणे, 'ब्राह्मणा ! मज न्याहाळीं; । अभिमन्युपुत्र ये काळीं । परीक्षिती मी आलोंसें. ॥ ७३ ॥ कृष्णकुरंग[5] विंधिला बाणीं, । पळतां देखिला असेल नयनीं, । तो सांगिजे' म्हणतां वचनीं, । ऋषी मौनस्थ न बोले. ॥ ७४ ॥ जैशी दारुप्रतिमा[6] स्तब्ध, । आळवितां नेदी प्रतिशब्द, । तैसा न बोलतां, विषाद । राजा पावे मानसीं. ॥ ७५ ॥ विनाशकाळीं भ्रष्ट बुद्धी, । ऐशी श्रेष्ठमर्यादा अवधी, । म्हणोनि अविद्या[7] तये संधी । उदित झाली रायातें. ॥ ७६ ॥ मृतसर्पाचें कलेवर पडिलें, । तें धनुष्यकोटीनें उचलिलें, । कंठीं ऋषीचे सूदलें, । तो ध्यानस्थ तें नेणे. ॥ ७७ ॥ ईश्वरमायेचा बडिवार, । कीं पूर्वकर्माचा बळात्कार, । विवेकवंतही अविचार । राहटे विचार असतां कीं. ॥७८॥ मोहिनीनें छळिला गिरिजावर, । मायामृगें श्रीरामचंद्र, । कीं कपटपाश युधिष्ठिर । ढाळिता झाला आदरें. ॥ ७९ ॥ विरक्त संचरे व्यभिचारा, । सात्विक क्षोभे परमारा, । निरपेक्ष प्रवर्ते आचारा । आपुलियाचि प्रारब्धें. ॥ ८० ॥ पडिला शाहणीया सींतर, । नांड पावला पारखी थोर, । विवेकसिंधूचा पोंहणार । कुबुद्धिकूपीं बुडाला. ॥ ८१ ॥ तैसा परीक्षिती सुविदेही परम, । त्यासही प्राप्त झाला भ्रम, । म्हणोनियां अयोग्य कर्म । करिता झाला ते काळीं. ॥ ८२ ॥ अनुचित राहाटोनियां थोर, । राजा पावे हस्तनापुर, । ते वेळीं त्या ऋषीचा कुमर । शृंगी नव्हता आश्रमीं. ॥ ८३ ॥ तो जमदग्नीसमान कोपी, । दुर्वासाहूनि शीघ्रशापी[10], । विश्वामित्राहूनि तपी, । तेजें जैसा हुताश[11]. ॥ ८४ ॥ त्या ब्रह्मदर्शनाचा नियम, । तो सारूनि द्विजसत्तम, । टाकोनि येतां निजाश्रम, । वाटे सहाध्यायी[12] भेटला. ॥ ८५ ॥ त्यासि विनोदें उपहासितां । तो म्हणे, 'गर्व न धरीं चित्ता; । शृंगी तुझा पवित्र पिता । कंठीं वाहे शवातें.' ॥ ८६ ॥ ऐकोनि क्षोभला अद्भुत, । परी सांवरोनि पुसे वृत्तांत; । कृश म्हणे, 'गा! नृपनाथ! । परीक्षिती आला आश्रमा. ॥८७॥ तेणें बोलवितां वचनीं, । तपस्वी न बोलेचि मौनी, । यावरी गेला कंठीं सूदूनी । मृतसर्पाचें कलेवर[13].' ॥ ८८ ॥ शृंगी

१. नेत्र लाविला असा अर्थ. २. ऋषीचें नांव. ३. फेस पिणारा. ४. सूर्यतापानें घामावूम झालेला. ५. काळवीट. ६. लांकडाची बाहुली. ७. अज्ञानमोह. ८. शंकर. ९. ठकबाजी. १०. शीघ्र शाप देणारा. ११. अग्नि. १२. पढण्याचा सोबती. १३. शरीर.

म्हणे, 'पावेल केलें; । आवडी मरण घेतलें मोलें[1]; । दाटूनि हेळाहळ प्राशिलें; । प्रचीती तेथें रोकडी. ॥ ८९ ॥ ऐश्वर्यमदें चढला भ्रमा; । नेणे सत्पुरुषाचा महिमा; । आतां धर्माचिया धामा । वोळवीन अविलंबें.' ॥ ९० ॥ ऐसें बोलोनि क्रोधितवकें; । उदक घेतलें निज हस्तकें; । शाप वदता झाला मुखें । अतिदारुण तो ऐका. ॥ ९१ ॥ 'आजीपासोनी सातवे दिवशीं । तक्षकदंशें मरण त्यासी; । अन्यथा माझिया वचनासी । करूं न शके हर ब्रह्मा.'॥ ९२॥ यापरी शाप वदोनि रागें, । आश्रमा आला विहंगमवेगें; । सर्प काढोनि सर्वांगें । उदक हस्तें सिंचिलें. ॥ ९३ ॥ त्यावरी ध्यान विसर्जुनी, । स्मृति पावला शमीक मुनी; । वृत्तांत जाणितला मनीं, । न सांगतां, सर्वज्ञें. ॥ ९४ ॥ म्हणे, 'अनुचित केलें कोपें, । राजहत्या जोडिली शापें; । राहटीपासोनि मनसंकल्पें । काय न करी प्राणियां? ॥ ९५ ॥ निंद्यानिंद्य कर्म जितुकें, । मनुष्यापासूनि घडे तितुकें; । यालागीं विचारी नरें सात्विकें । भूतद्रोह न करावा. ॥ ९६ ॥ विश्व हे अवयव आपुले; । यांहीं केल्या, आपण केलें; । ऐसें साचार जया कळलें, । तोचि निश्चयें जगदात्मा. ॥ ९७ ॥ पराचे अपराध करणें क्षमा, । हेंचि भांडवल तपियां आम्हां; । क्रोधें धरिल्या अक्षमा, । अक्षम होती साधनें. ॥ ९८ ॥ प्रजापाळक, स्वधर्ममूर्ती; । ऐसा राजा विवेककीर्ती, । शापिला हा पुढत पुढती । खेद वाटे मज पुत्रा! ॥ ९९ ॥ 'दशश्रोत्रियांसमान नृपती'। ऐसें बोलती मन्वादि स्मृती; । विशेष हा परीक्षिती । पुण्यश्लोक, धर्मात्मा. ॥ १०० ॥ राजे करिती द्विजपालन, । यास्तव निपजती महायज्ञ, । यज्ञीं देव संतोषोन, । पर्जन्यातें वर्षती. ॥ १०१ ॥ तेथूनि ओषधी, वनस्पती, । बहुधा अन्नातें प्रसवती; । यास्तव सकळ भूतें जीती । हा पैं धर्म रायाचा. ॥ १०२ ॥ आम्ही जोडल्या सुकृतधना । राजा स्वतंत्र विभागी जाणा; । यालागीं शाप देणें प्रौज्ञा । परम अश्लाघ्य आमुतें.' ॥ १०३ ॥ शृंगी म्हणे, 'तात स्वामी! । होणार बळिवंत जाणा तुम्ही; । अशांत क्रोधीया दुर्नामीं । शब्द ठेवावा कवणातें?' ॥ १०४ ॥ शमीक विचारी आपण, । 'अन्यथा नव्हे शृंगीचें वचन; । आतां सांगोनि, सावधान । राजा केला पाहिजे.' ॥ १०५ ॥ ऐसें विचारोनि चित्तीं, । गौरमुख नामा शिष्य सुमती, । वृत्तांत सांगोनि तयाप्रति, ।

---

१. विकत. २. विषविशेष. ३. यमाच्या. ४. सदनास. ५. तांतडीनें. ६. क्रोधावेशानें. ७. गरुडासारखा त्वरित. ८. असमर्थ. ९. ब्राह्मण. १०. पवित्र आहे श्लोक म्ह० कीर्ति ज्याची असा. ११. श्रेष्ठा. १२. अयोग्य.

भूपभवना पाठविला. ॥ १०६ ॥ तेणें जाऊनि गजसाव्हया, । प्रवेशोनि महेंद्रालया, । अवलोकूनि राजवैडूर्या, । आशीर्वाद न म्हणेची. ॥ १०७ ॥ जनेश्वरें जोडल्या हस्तीं । भूसुर नमिला विनयभक्ती; । रत्नपीठासनीं उचितीं । अत्यादरें गौरविला. ॥ १०८ ॥ अंगीकारूनि त्या बहुमाना, । म्हणे 'चक्रवर्तीचूडारत्ना! । शमीकऋषींनीं बोलल्या वचना । सांगों तूतें पातलों. ॥ १०९ ॥ प्रेरिलें असतां दुष्टप्रारब्धें, । आश्रमा आलासी मृगयानादें, । तेथें अनुचित प्रमादें । आचरलेंसी जें कांहीं, ॥ ११० ॥ तें म्यां सर्वही केलें क्षमा; । परी पुत्र माझा शृंगी नामा । तपोतेजें क्रोधप्रतिमा । न साहेची तयातें. ॥ १११ ॥ शापकर्वतें तेजाळें । छेदिलीं आयुष्यवल्लीचीं मुळें; । ऐकतां सर्व सुखाचीं फळें । रक्षा होती एकदां. ॥ ११२ ॥ सप्तम दिवसाचे अंतीं, । तक्षकदंशनाचे निघातीं, । मृत्यु पावोनि सदनाप्रती । वैवस्वताचे जाशील. ॥ ११३ ॥ अन्यथा करावया ये अर्थी, । हरि हर ब्रह्मा यांची शक्ती । नव्हे, ऐसें माझिये मतीं । आणी श्रेष्ठांचे गमताहे. ॥ ११४ ॥ तथापी सावध होई त्वरें, । तक्षकविषबाधा परिहरे, । तोची यत्न बहुप्रकारें । साधीं, येर सांडीं कां.' ॥ ११५ ॥ ऐसें सांगोनि जाता झाला, । राजा चिंतार्णवीं पडला; । तरी धैर्यें गौरविला । गौरमुख मृदुवचनीं. ॥ ११६ ॥ 'शमीकचरणीं माझें मौळ । टेविलें सांगा सहस्रवेळ; । माझिया अपराधाचें फळ । याहून विशेष पाहिजे. ॥ ११७ ॥ स्वकृत दोषें पावलों व्यसना, । तथापी दीनावरी करावी करुणा; । तेणें परलोकीं तरी गहना । कल्याणातें पावेन.' ॥ ११८ ॥ असो. बोलवोनि द्विजा, । पाचारिल्या प्रधानप्रजा; । पश्चात्तापामुळें राजा । संतापला बहुसाल. ॥ ११९ ॥ म्हणे, 'होणार दुष्टकर्मा; । अवमानिलें ब्राह्मणोत्तमा; । आतुडलों मरणधर्मा । अकस्मात ये काळीं. ॥ १२० ॥ केल्या कर्माचा प्रस्तावो । ज्याच्या हृदयीं नुपजे पहा हो! । तोचि चांडाळवीर्य देहो । जन्मला ऐसें जाणिजे. ॥ १२१ ॥ श्वास टाकावयापुरता । नाहीं अवकाश तत्वतां, । कवण साधन साधूं आतां? । मोक्षपंथा जें दावी. ॥ १२२ ॥ कवण भेटेल महानुभावो? । कवण प्रगट होईल देवो? । कवण तीर्थ? कवण ठावो । ठाकिल्या? अनर्थ नीतळे.॥१२३॥ नाहीं ऐसा जोडिला गुरु, । जो मस्तकीं ठेवी तत्क्षणीं करु, । करी विश्वासरूपसाक्षात्कारु । देहाभिमाना निरसोनि. ॥ १२४ ॥ अर्चिली नाहीं ऐशी दे-

१ हस्तनापुरास. २. राजरत्ना. ३. गर्वानें. ४. क्रोधमूर्ति. ५. यमाच्या. ६. शिर. ७. संकट. ८. मोठें. ९. पावलों. १०. पश्चात्ताप. ११. न शिवे. १२. नाहींसा करून.

वता, । जे ओ देत पावे धांवा करितां; । सर्वस्व ओढवी आकांता, । ऐसा मित्रही असेना. ॥ १२५ ॥ स्नानें नासे मनोमळ, । ऐसें तीर्थ कोण निर्मळ ?। आतळों नेदी मृत्युकाळ,। ऐसा सोयरा दुर्लभ. ॥ १२६ ॥ आतां धैर्यचि एक सोयरें, । प्रारब्ध न चुके निजनिर्धारें; । आपुलेनि विचारें चतुरें । चित्त राखणें स्वस्थानीं. ॥ १२७ ॥ पाठिमोरें मन विचारा, । तरी काय उपदेशील दुसरा ? । गुरु केलियाही हरि शंकरा । बहिर्मुख[1] बोधेना. ॥ १२८ ॥ मी आत्मा अज अविनाशी, । देह तरी नैश्वर[2] निश्चयेंशीं; । आतांचि मृत्यु ग्रासो तयासी; । कां वांचला प्रारब्धें? ॥ १२९ ॥ माझिया अनुभव निजनिधाना । सांडणें शरीर सांडिलें जाणा; । तें वर पडूनि मृत्युश्वाना । कां संचलें असो हें? ॥ १३० ॥ परी या उभय संबंधाकडे । पाहतां, वर पीडा होई, न पीडे; । जन्ममृत्यूचें सांकडें[3] । जीवीं जड नसतेंची. ॥ १३१ ॥ म्हणोनि शरीरसंबंध कांहीं । मज सर्वथा नाहीं नाहीं; । मी अनादी मुक्त पाहीं, । सर्वसाक्षी जगदात्मा. ॥ १३२ ॥ ऐसें आपुलिया मना । विवेकें आणिजे समाधाना; । हेचि ज्ञानियाची संज्ञा । वेदांतवेत्ते बोलती.' ॥ १३३ ॥ तंव अकस्मात तो ज्ञानार्क । प्रगट झाला हो श्रीशुक । काखेसि श्रीभागवत पुस्तक, । 'आईक' म्हणे 'नृपवर्या!' ॥ १३४ ॥ रायें साष्टांग अभिवंदन । करोनि षोडशोपचारीं[4] पूजन । एकाग्र करोनियां मन, । श्रवण करिता पैं झाला. ॥ १३५ ॥ श्रीशुकमुखें श्रवण केलें. । तें तया मननें उपेगा[5] आलें । निर्जध्यासें[6] पावतें केलें । साक्षात्कारपर्यंत. ॥ १३६ ॥ श्रीभागवत झालें इयेसंधी, । ज्ञानदानें करुणैकनिधी, । शुक योगींद्र द्वादशस्कंधीं । अनुवादला[7] परमार्थ. ॥ १३७ ॥ अठरा सहस्र विष्णुचरित्र, । परमार्थरसाचें पीयूषपात्र,[8] । श्रवणें शुकाचें पवित्र वैक्र,[9] । विश्वश्रोत्र[10] निववाया. ॥ १३८ ॥ असो. तें भारतचि ऐका, । प्रजा प्रधान नरनायका । रक्षिते झाले, त्या कौतुका । अतिं[11] सज्जनीं परिसावें. ॥ १३९ ॥ इति श्रीभारत आदिपर्वणि, । कथा स्वर्लोककल्लोलिणी[12] । श्रवणाचमनें[13] मुक्तेशवाणी । मुक्तिफळ दे श्रोतियां. ॥ १४० ॥

---

१. केवळ बाह्य गोष्टींकडे लक्ष देणारा. २. नष्ट होणारा. ३. संकट. ४. पूजा करण्याचे सोळा प्रकार:—आसन, स्वागत, पाद्य, अर्घ्य, आचमनीयक, मधुपर्क, आचमन, स्नान, वसन, आभरण, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, आणि वंदन. ५. उपयोगीं. ६. निदिध्यासानें, अखंडध्यानानें. ७ प्रतिपादन केला. ८. अमृतपात्र. ९. मुख. १०. जगाचे कान. ११. लक्षपूर्वक. १२. स्वर्गनदी. १३ श्रवणरूप पानानें.

अध्याय आठवा.

आप्तविषयी प्रजा प्रधान । ऋषि ब्राह्मण तपोधन । राजासि रक्षिती, करोनि यत्न, । कवणे रीती तें ऐका. ॥ १ ॥ गगनचुंबितस्तंभावरुतें । उपरिका गृह निर्मिलें निरुतें । राजा संरक्षिला तेथें, । प्राण जैसा ब्रह्मांडीं. ॥ २ ॥ कृपणीं आवडी निजअर्थातें, । विरक्तीं सदा मनेंद्रियातें, । सत्यशीळ दृढनियमातें,। रक्षी, तैसा रक्षिला. ॥ ३ ॥ औषधमूळिका मंत्रयंत्रें । भूर्ज सुवर्ण तोळपत्रें । सूत्ररक्षा गरुडस्तोत्रें । स्तंभावरूनि बांधिलीं. ॥ ४ ॥ जपा बैसविले जपी, । तपश्चर्या मांडिली तपीं, । व्रतारंभीं मनसंकल्पीं । नवस बहुतीं नवसिले. ॥ ५ ॥ अश्वत्थसेवे लिंगार्चना । ब्राह्मण घातले अनुष्ठाना, । राजा रक्षावया नाना । यत्न केले समस्तीं. ॥ ६ ॥ स्तंभवेष्टित असंख्यात । प्रधान जन सेना समस्त, । वेष्टित ठेले, जेथें पंथ । पिपीलिकेचा सरेना. ॥ ७ ॥ सप्तम दिवस होतां प्राप्त,। मात फांकली पृथ्वीआंत, । देशवासी जन समस्त । येते झाले बहु पंथीं. ॥८॥ कश्यप नामा धन्वंतरी, । औषध मंत्रीसिद्ध सामग्री, । घेऊनि चालिला, त्वरा करी, । राजा प्रतापें जिववावया. ॥ ९ ॥ म्हणे, 'जो जगाचा प्रतिपाळिता । त्याचा होईन प्राणदाता; । कीर्ति, धर्म, आणि अर्था, । श्रेय, मोक्षही पावेन.' ॥ १० ॥ पाय लागे न लागे क्षिती, । पंथ क्रमी, ऐसिया गती. । पुढें देखिला कपटमूर्ती, । ब्राह्मणवेषें तक्षक. ॥ ११ ॥ सर्प विद्यार्थी घनदाट । माजी आचार्यत्वें श्रेष्ठ, । वेषधारी महापापिष्ठ । राजहिंसना चालिला. ॥ १२ ॥ सत्वर गमन कश्यपाचें । देखोनि, उरगें तर्किलें साचें. । म्हणे, 'श्रेष्ठ हो! घ्या आमुचें । आशीर्वचन आदरें.' ॥ १३ ॥ फणींद्र पुसे, 'ब्राह्मण स्वामी! । अति लगबगां जातसां तुम्ही । कवण कार्या? कवण ग्रामीं? । स्वार्थ किंवा परमार्थ? ॥ १४ ॥ बोलाविलें किं पाठविलें? । किंवा गमन सहजाथिलें? । सांगोये तरी सांगीतलें । पाहिजे आम्हां यथार्थ.' ॥ १५ ॥ वैद्य धन्वंतरी, 'गुणिया!' । म्हणे, 'जाणें गजसाव्हया; । महद्व्यसन संप्राप्त राया, । त्या परिहाराकारणें. ॥ १६ ॥ तक्षकभयाचा काळज्वर । स्पर्शलासे राजशरीर. । तें मी करावया विज्वर । मंत्रौषधी नेतसें. ॥ १७ ॥ तक्षक म्हणे, 'तक्षकविष । उतरणें, असाध्य म्हणती लोक. । हें हरिसी हें कौतुक, । केंवि साचार मानावें?' ॥ १८ ॥ तो

---

१. स्पष्ट. २. ताडाचीं पानें. ३. मुंगीचा. ४. वैद्य. ५. परीक्षितीच्या वधार्थ. ६. सहजीं अवलंबिलें. ७. हस्तनापुरास. ८. तक्षकाचा भयरूप जो काळज्वर त्यापासून मुक्त करण्यास. ९. सत्य.

म्हणे, 'प्रतीती[1] दावीन विश्वा । तक्षकविषाचा केतुला[2] केवा[3]? । मृडें[4] क्ष्वेडें[5] प्राशिलें हांवा[6] । तेंवि ग्रासीन विषबाधा. ॥ १९ ॥ पर्वताचें गुरुत्व गहन । दंभोळिधर[7] पाकशासन, । भेदी जैसे, विष छेदून, । वांचवीन नृपातें. ॥ २० ॥ संकटें कार्तवीर्यस्मरणें[8], । दरिद्र पार्थिवलिंगार्चनें, । दोष नाशती हरिकीर्तनें । तेंवि नाशीन विषबाधा. ॥ २१ ॥ पडिला नाहीं माझिये दृष्टी, । तंवचि तक्षकविषाची गोष्टी, । चमत्कार दाखवीन सृष्टीं । अमोघ[9] मंत्रविद्येचा. ॥ २२ ॥ रोगदुःखें संकट पडिलें । तें कृपेनें पाहिजे सांभाळिलें. । हेंचि विद्येचें फळ बोलिलें । पुण्यपुरुषीं शास्त्रज्ञीं.' ॥ २३ ॥ देखोनि बोलाचा पुरुषार्थ । भोगीशं[10] चरणा लावी हात, । 'तक्षक तो मी मूर्तिमंत[11] । काळमृत्यु रायातें. ॥ २४ ॥ जीवविशील नरेश्वरातें, । हे प्रतीती दाखवीं मातें, । रहस्य सांगणें, असे तुतें । तें मग पुढा अनुवादुं[12].' ॥ २५ ॥ म्हणोनि, न्यग्रोध[13] वनस्पती । तक्षकें मूळीं स्पर्शितां दांतीं । प्रळयज्वाळा धडकोनि क्षिती । भस्म झाला क्षणार्धें. ॥२६॥ उष्णता सरलियावरी, देख, । वैद्यें एकवटिलि राख. । अभिमंत्रीं तात्काळिक। वट दुपानीं निघाला. ॥ २७ ॥ तंव पाहतां तेचिक्षणीं । शाखोपशाखीं फळीं पानीं । वृक्ष विस्तारिला गगनीं । शकुंत[14]नीडें[15]समवेत. ॥ २८ ॥ चमत्कारोनि महाव्याळ । वारंवार डोलवी मौळ[16], । म्हणे, 'गुरू तो प्रबळ, । जेणें ऐसी विद्या दिधली. ॥ २९ ॥ आतां, गुणियां शिरोमणी ! । यथार्थ सांगें मजलागोनी, । सकाम किंवा निष्काम मनीं । जीवऊं जासी नृपातें ? ॥ ३० ॥ राजा ब्रह्मशापाभिभूत[17], । क्षीणायुषी, जांण, निश्चित. । विद्यावीर्य न करीं व्यर्थ, । जोडलें यश न दवडीं. ॥ ३१ ॥ रायापासूनि फळाशा मनीं । ते मी पुरवीन, अनंत गुणीं. । दुराग्रहातें[18] सांडोनी । परत[19] वेगीं सुजाणा !' ॥ ३२ ॥ ऐकोनि सर्पमुखींच्या गोष्टी, । ब्राह्मण दिव्यज्ञानदृष्टी । पाहे, तंव यथार्थ पोटीं । जाणवला भविष्यार्थ. ॥ ३३ ॥ 'गतायुषी राव निश्चित, । मी कां विद्या करूं व्यर्थ ? । काद्रव[20] पुरवोनि स्वार्थ, । अवश्य जावें स्वस्थाना.' ॥ ३४ ॥ मग म्हणे, 'ऐक, नागनाथा ! । गृहस्थां आम्हां कुटुंबवंतां, । दरिद्रातुल्य दुसरी

---

१. प्रलय. २ केवढा. ३. ठेवा. ४. शंकरानें. हालाहल नामक विष यानें प्राशन केल्यामुळें कंठ काळा झाला म्हणून यास 'नीलकंठ' हें नांव पडलें. ५. विष. ६. उत्साहानें. ७. वज्रधर इंद्र. ८. सहस्रार्जुन. ९. फलदायक, सफल. १०. भोगींद्र. (तक्षक.) ११. प्रत्यक्ष. १२. सांगूं. १३. वटवृक्ष. १४. पक्षी. १५. घरट्यासहित. १६. शिर. १७. ब्रह्मशापदग्ध. १८. हट्टातें. १९ परत जा. २०. कद्रूतनय. (तक्षक.)

व्यथा। ये संसारीं असेना. ॥ ३५ ॥ दरिद्रें जीतचि प्रेत जाण, । दरिद्रें योग्यता तृणसमान, । दरिद्रें विद्यासमुद्र द्रोण। द्रुपदें छळूनि दवडिला. ॥३६॥ दरिद्रें उदास पुत्र दारा, । दरिद्रें सुहृद पाठिमोरा, । दरिद्रें नैषध युधिष्ठिरा। रानोरान भवंडिलें. ॥ ३७ ॥ दरिद्रें श्रेष्ठ कर्मठ वेषी, । दरिद्रें परमार्थ जनाची दासी, । दरिद्रें गांजिले वनतापसी, । धनिकांद्वारां धावती. ॥ ३८ ॥ उपकार लावूनि नृपाचे माथां। दरिद्रशत्रूच्या करणें घाता। किंबहुना, अर्थस्वार्था-। लागीं जातों यथार्थ.' ॥ ३९ ॥ तक्षक म्हणे, 'माझिया धना। मर्यादा नाहीं, रे ब्राह्मणा! । नेईं शरीर आंगवणा। घेईं इच्छें आपुलिया.' ॥ ४० ॥ म्हणोनि, पृथ्वीगर्भीचें बीळ, । उघडोनि दाविलें सागरातुल्य, । कनक आणि महामौल्य। रत्नें भरिलीं अपार. ॥ ४१ ॥ पन्नग सेवकांचे शिरीं, । मांदुसा देऊनि सहस्रवरी, । 'ब्राह्मण पावऊनि घरीं। यावें.' ऐसें आज्ञापी. ॥ ४२ ॥ देवोनि कनकरत्नांचे गिरी, । स्वदेशा धाडिला धन्वंतरी; । पुढें तक्षक सहविखारीं। हस्तनापुरा पातला. ॥ ४३ ॥ सूर्य पावतां अस्ताचळा, । साधूनि ऐसिया सायंकाळा, । सर्पांसि म्हणे, 'अत्यंत जवळा। मृत्युसमय रायातें. ॥ ४४ ॥ ब्राह्मणवेषें तुम्हीं सकळीं। शीघ्र जावें रायाजवळीं, । पत्रीं पुष्पीं दिव्यफळीं। महाप्रसाद भेटवा. ॥ ४५ ॥ आज्ञा मागोनि नरेंद्रातें, । सत्वर जावें स्वस्थानातें, । पुढां वर्तेल तें निरुतें, । जाणवेल सहजची.' ॥ ४६ ॥ आच्छादूनि विशाळ तनू, । आपण झाला कीटक अणु। फळगर्भीं रिघाला, प्राणू। ग्रासावया नृपाचा. ॥ ४७ ॥ कृत्रिम ब्राह्मणाचा वेष। धरोनि, करिती वेदघोष, । तपोवनीचे महातापस। रक्षा करूं पातले. ॥ ४८ ॥ पातले स्तंभालयानिकटीं। देखती मंत्रविद्येच्या थाटी. । गारुडी विद्या जाणते द्विष्ठी। पंचाक्षरी सभोंवते. ॥ ४९ ॥ गणक, भिषक आणि तपी। प्रतिज्ञा करोनि बैसले जपीं, । त्यांतें देखूनि छद्मरूपी। हास्य करिती परस्परें. ॥ ५० ॥ नृपा जाणविती सेवक प्रधान, । 'दुरी तीर्थांचे तपोधन। पातले असती, जी! दर्शन। इच्छिताती स्वामीचें.' ॥ ५१ ॥ रायें पाचारिले जवळिकें, । फळें दर्भी तीर्थोदकें, । प्रसाद देतां पैं हस्तकें, । मस्तकावरी वंदिला. ॥ ५२ ॥ प्रत्युत्थानीं अभिवंदनीं, । गंधपुष्पदक्षिणादानीं, । ब्राह्मण गौरऊनि वचनीं, ।

---

१. मित्र. २. नळराजा. ३. शक्ति. ४. मोठ्या पेट्या. (हडपे.) ५. सर्पांसह. ६. कृमी. ७. लहान. ८. खांबाचें गृह. ९. ज्योतिषी. १०. वैद्य. ११. कपटवेषी सर्पसमूह. १२. सत्कारास्तव उठून उभें राहणें.

बोळविले[1] स्वस्थळा. ॥ ५३ ॥ मग अमात्य मंत्रियांचेनि मेळें । मित्रांसि बोले गदारोळें,[2] । 'तापसीयें आणिलीं फळें, । तीं समस्तीं स्वीकारावीं. ॥ ५४ ॥ पवित्र पक्वें आणि सुवासें । भरलीं, पीयूषाचेनि[3] रसें, । सिद्धप्रसाद[4] सेवितां निरसे[5] । दोष त्वरित आमुचा.' ॥ ५५ ॥ सकळां विभाग वोपिला पंक्ती, । स्वकीय भाग घेतला हातीं, । ज्यामाजी तक्षकाची वस्ती । तेंच फळ हातां पातलें. ॥ ५६ ॥ फोडोनि अंतर जंव न्याहाळीं, । माझारीं देखे कीटक अळी, । घेऊनि साक्षेपें करतळीं । दाखवीत सर्वांतें. ॥ ५७ ॥ अंग तयाचें ताम्रवर्ण, । काजळा ऐसे काळे नयन, । पाहोनि म्हणे, 'ऐका वचन, । जों वाग्देवी[6] अनुवादे.[7] ॥ ५८ ॥ सप्तम दिवस तंव लोटला. । तक्षकभयाचा विटाळ फिटला. । ऋषीनें शापिलें त्याही बोला । करूं साचार[8] थोडेनीं. ॥५९॥ कीटक भाऊनि तक्षक, । ग्रीवास्थानीं[9] स्पर्शऊं मुख, । इतुकेनि शृंगीचेंही वाक्य, । जाणूं यथार्थ फळलें हें.' ॥ ६० ॥ जाणोनि कीटक लावितां कंठीं, । धुधुःकारिला तो फुंफाटी. । काळसर्पें घातली मिठी, । मृत्युपाशासारिखी. ॥ ६१ ॥ नासिकीं धूम्राचे कल्लोळ,[10] । मुखीं धांवती महाज्वाळ, । निमिषामाजि प्रचंड व्याळ[11] । होऊनि ग्रीवा फोडिली. ॥ ६२ ॥ उडिया टाकोनि पळाले आप्त. । एक पाहतांची झाले प्रेतें.[12] । एक पळत पळत मूर्छित, । ठायीं ठायीं उलथले. ॥ ६३ ॥ कंठीं झोंबतां कडकडाटी, । ज्वाळा निघती धडधडाटी, । नगरवासी कोट्यानकोटी, । भयें लंघिती दशदिशा. ॥ ६४ ॥ भयें परतोनि पाहतां दुरी । तंव अर्ध शरीर गगनोदरीं[13] । अर्ध पसरलें पृथ्वीवरी । विशाळ काळसर्पाचें. ॥ ६५ ॥ इंद्रधनुष्यासारखा गगनीं, । जातां लोक देखती नयनीं, । हाहाकार सकळां वदनीं, । हृदय पिटिती हस्तकें. ॥ ६६ ॥ वीज पडोनि भंगला तरू, । तैसा निमाला[14] राजेश्वरू. । ऋषी म्हणती, 'अनर्थ थोरू । नाहीं ऐसा वर्तला.' ॥ ६७ ॥ राजदेहोपरिकाधाम,[15] । विषानळें[16] झालें भस्म. । कल्पांतसमयासारिखें विषम । प्रजांतें गमलें ते काळीं. ॥ ६८ ॥ बाँप![17] ब्रह्मशापाची थोरी, । राजा भस्मला सहशरीरी, । जाणते पुरुष हो! संसारीं । ब्राह्मणक्षोभ न द्यावा. ॥ ६९ ॥ ब्रह्मशापें श्रीकृष्णासहित, । यादवकुळासि झाला अंत; । ब्रह्मशापें भस्मभूत, । कार्तवीर्यवंशासी. ॥ ७० ॥

---

१. घालविले. २. मोठ्या शब्दानें. ३. अमृत. ४. साधूचा प्रसाद. ५. नष्ट होतो. ६. वाणीरूप देवी. ७. बोले. ८. खरोखर. ९. कंठदेशीं. १०. तरंग, लाट. ११. सर्प. १२. मृत. १३. आकाशांत. १४. संपला. १५. राजाचें शरीर हेंच उच्च गृह. १६. विषाग्नीनें. १७. अहो.

ब्रह्मशापें शक्रसंपत्ती । पडिली समुद्रा [1]आंतौतीं; । ब्रह्मशापें [2]दंडक नृपती । परिवारेसीं भस्मला. ॥ ७१ ॥ भगांकित [3]सहस्रनेत्र, । सलांछन [4]रोहिणी-मित्र, । ब्रह्मशापें [5]दासीपुत्र, । [6]यम झाला भूलोकीं. ॥ ७२ ॥ [7]ब्रह्मशापें सर्पत्व नहुषा, । [8]सरटदेहो [9]नृगनरेशा, । ब्रह्मशापें मुख्य महेशा, । लिंगपतन नि-र्धारें.' ॥ ७३ ॥ श्रोतयांतें नमस्कार, । वक्ता करी वारंवार, । ब्राह्मण क्षोभे तो प्रकार, । नाचरावा कोणींही. ॥ ७४ ॥ कपिलशापवै[10]श्वांनरें । सगर ज-ळतां वर्ष सहस्रें । भगीरथ भक्तीं तुष्टोनि हरें । गंगादानें उद्धरिले. ॥ ७५ ॥ योग्यायोग्य ब्राह्मणजाती । घडे, तरी पूजणें यथाशक्ती. । नाहीं तरी निंदापंथीं, । जिव्हा वर्तों नेदावी. ॥ ७६ ॥ असो. ब्राह्मणशापें देखा, । परीक्षिती गेला विष्णुलोका. । पात्र झाले शोकदुःखा । प्रजा प्रधान संबंधी. ॥ ७७ ॥ मि-ळोनि ऋषी थोरथोर, । अमात्य मंत्री विवेकचतुर । राजपदीं राजकुमर । अभि-षेकिला ते काळीं. ॥ ७८ ॥ जनमेजयो राज्यासनीं । संस्थापिला बाळपणीं. । प्रबुद्ध झाला दिनींदिनीं, । चंद्रवृद्धीसारिखा. ॥ ७९ ॥ पूर्वजपुण्य पूर्व-पुण्य, । सत्संगति सद्भावनें मन । स्वधर्मपंथीं वर्ततां जाण, । सिद्धी होती [11]बोळं-गण्या. ॥ ८० ॥ सकळ विद्या सकळासहित, । बत्तीस लक्षणें अळंकृत । वि-वेक न्याय यश पुरुषार्थ । वसतीं झालीं त्यापासीं. ॥ ८१ ॥ व्रतबंध झालि-यावरी । विवाहविचारपरीक्षाचतुरीं । सुवर्णवर्म नृपाची कुमरी । वपुष्टमा या नामें. ॥ ८२ ॥ [12]आर्तें पाणीग्रहणविधी, । वरिता झाला लावण्यनिधी. । आं-दणा वोपिल्या समृद्धी, । पैं मर्यादे वेगळ्या. ॥ ८३ ॥ दास दासी [13]वारण रथ, । असंख्यात [14]वाजी साळंकृत, । शकट [15]खरोष्ट्र बळवंत । शतप्रयुतें वृष-भांचीं. ॥ ८४ ॥ सवत्स सुदोहा धेनु महिषी, । सुवर्णरत्नाचिया रासी, । [16]निवेदिल्या कुरुरायासी । काशीश्वरें उदारें. ॥ ८५ ॥ वपुष्टमेची पुरवी [17]आर्ति, । [18]सरीं प्रफुल्लीं क्रीडा करित, । पुरूरवा उर्वशीयुक्त, । तैसीयां शोभा

---

१. आंत. २. इक्ष्वाकूचा तृतीयपुत्र. यानें आपल्या गुरुच्या कन्येवर बलात्कार केला म्हणून त्यानें यास शाप दिला. ३. इंद्र. यानें गौतममुनीची भार्या अहल्या हिच्याशीं व्यभिचार केला म्हणून 'तुझ्या अंगावर हजार (सहस्र) भगें पडतील' असा शाप त्या मुनीनें यास दिला. नंतर इंद्रानें त्याची आराधना केली, तेव्हां 'तीं भगें सहस्रनेत्रें होतील' असा उच्छाप दिला. याच कारणास्तव इंद्राला 'सहस्रनेत्र' म्हणतात. ४. चंद्र. ५. विदुर. ६. मांडव्य मुनीच्या शापानें यम शूद्रयोनींत जन्मास आला. ७. अगस्तीच्या शापानें. ८. सरडा. ९. 'तूं सरडा होशील' असा एका ब्राह्मणानें याला शाप दिला. १०. अग्नीनें. ११. आश्रय करण्या. १२. आवडीनें. १३. हस्ती. १४. घोडे. १५. गाढव आणि उंट. १६. दिल्या. १७. आवड, हौस. १८. सरोवरीं.

शोभती. ॥ ८६ ॥ प्रदीप्तरूपें कंदर्पमूर्ती, । कुरुप्रवीर लाहोनि पती, । वपुष्टमा अक्षयप्रीती, । वल्लभासीं रममाण. ॥ ८७ ॥ पांडुनृपातुल्य पुरुषार्थी, । विश्वीं विस्तारली कीर्ती; । जनमेजय पवित्र नृपती । राज्य चालवी स्वधर्में. ॥ ८८ ॥ पुढें कैसी वर्तली कथा । ते आणावी श्रवणपथा; । शौनकादि ऋषी समस्तां । सौती बोले आदरें. ॥ ८९ ॥ इति श्रीभारत आदिपर्व । तें हें अपूर्वांही अपूर्व, । झाडित ग्रंथ कथेचे गर्व, । दोषदाहक अवधारा. ॥ ९० ॥ श्रीदत्तांघ्रियुगीं भ्रमर, । मुक्तेश्वर कवी किंकर, । सज्जनाचा अभयकर । कथाकौतुक वदावया. ॥ ९१ ॥

अध्याय नववा.

श्रीशौनकादि ऋषेश्वर । नैमिषारण्यवासी थोर । तपी संयमी योगेश्वर । प्रश्न करिती आदरें. ॥ १ ॥ म्हणती, 'लोमहर्षणी कुमर, । वक्त्यांमाजी चतुरेश्वर, । कथा, आणून विस्तार, । विशद सांगें आम्हुतें. ॥ २ ॥ कैसें आस्तीकाचें जनन? । सत्रीं सर्पकुळाचें दहन? । केवढे समर्थ ब्राह्मण? । जे ऋत्विज त्या यागीं. ॥ ३ ॥ कैसीं मंत्रबीजें तेजाळीं? । पाताळ पेटाराचीं सगळीं, । उसळोनि सर्पांचीं वेटाळीं । कुंडीं पडलीं, आपसया. ॥ ४ ॥ हेंचि सांगें सविस्तर, । अवधान मुकेलेंसें थोर.' । सौती करूनि नमस्कार । सांगता होय तयांतें. ॥ ५ ॥ जरत्कारु तपस्वी थोर, । भ्रमत असतां देशांतर । गर्तेमाजि आपुले पितर । अधोवदन देखिले. ॥ ६ ॥ त्यांहीं आज्ञा नेमिली, देखा, । 'वंश वाढवीं आवश्यका, । तेणें अक्षयी ब्रह्मलोका । प्राप्त होईल आम्हुतें.' ॥ ७ ॥ यालागीं दारार्थी आपण । करिता झाला पृथ्वीअटन, । गर्जोनि ऐसें यथार्थ वचन, । जाणवी तूं जगांतें. ॥ ८ ॥ 'जरत्कारी नाम परिपाटी । कन्या असेल, जयाच्या पोटीं, । ते मज द्यावी भिक्षेसाठीं, । वचन कानीं ऐकतां. ॥ ९ ॥ मी वृद्ध आणि द्रव्यहीन, । देवों न सकें अशन वसन, । आज्ञा भंगितां जाईन, । त्यागोनियां तत्काळीं.' ॥ १० ॥ ऐसें वचन ऐकोनि कानीं, । अविचार ऐसें मानोनि मनीं, । उदासीन करोनि कोणी । प्रत्युत्तरही न देती. ॥ ११ ॥ देवलोक आणि भूतळा । शोधोनि, शोधिलें पाताळा. । परी तेथेंही, संकल्प फळा । येतां मार्ग दिसेना. ॥ १२ ॥ मग उभा ठाकोनि काननीं । म्हणे,

---

१. मदनमूर्ति. २ पुराणवक्ता, सूत (लोमहर्षण) याचा पुत्र सौति. ३. स्पष्ट, फोड करून. ४. यज्ञांत. ५. आपोआप. ६. वळयांत. ७. पृथ्वीपर्यटन. ८. अन्नवस्त्र.

'पितृ हो! ऐका श्रवणीं, । उत्तीर्ण होतों तुमच्या ऋणीं, । एक वाक्यें करूनियां. ॥ १३ ॥ तुमचे गांठीं असेल पुण्य, । तरी शेवटील माझें वचन । सुफळ होऊनि, कन्यादान । करूत कोणी मजलागीं. ॥ १४ ॥ पाहिजे तितुका यत्न केला. । आतां उत्तीर्ण तुमच्या बोला.' । म्हणोनि एकदां गर्जिन्नला, । हाक मारोनि आक्रोशें. ॥ १५ ॥ 'जरत्कारी नाम जीतें । कन्या भगिनी असेल ज्यातें, । ते मज भिक्षेलागीं एथें । आणूनि देणें, ये काळीं.' ॥ १६ ॥ ऐसी ब्राह्मणमुखींची हांक । ऐकते झाले दंदशूक. । वासुकीतें तात्काळीक । जाणविलें ते काळीं. ॥ १७ ॥ श्रवण होतांचि पन्नगराजा । शृंगारूनि पवित्र अनुजा । जरत्कारी अर्पूनि द्विजा, । निजहस्तकीं बोपिली. ॥ १८ ॥ म्हणे, 'हे माझी कनिष्ठ भगिनी, । लक्ष्मीसमान लावण्यगुणी, । स्वामिणी करूनी स्वधर्मपत्नी । गृहस्थधर्मे वर्तावें.' ॥ १९ ॥ ऋषी म्हणे, 'हे समर्थदुहिता । रूपतारुण्यभूषणयुक्ता । अंगीकारूनि वनिता, । नम्र वर्तलें पाहिजे.' ॥ २० ॥ म्हणे, 'हे जातीची पद्मिणी, । परी गुणसंस्कारें सर्पिणी, । वाढली सदन्नभोजनपानीं । वस्त्राभरणीं सुखाडें.॥२१॥समर्थ माहेरीचें बळ, । तेणें स्त्रिया उत्सृंखळ, । भ्रतार मानूनि गोळांगुळ, । अव्हेरिती सर्वस्वें. ॥ २२ ॥ बंधुभाग्यें सगर्व मनीं, । अमर्यादेनें उद्धत गुणीं । वर्ततां, शापोनि तत्क्षणीं । भस्म करीन यथार्थ.॥२३॥ भरणपोषण उद्योग । स्पर्शों नेदी आपुलें अंग, । अवज्ञा करितां, करीन त्याग । हा निर्धार सर्पेशा!' ॥ २४ ॥ वासुकी विनवी ब्रह्मविदा, । 'मीचि पुरवीन सर्व संपदा, । सनाथ करावें भाग्यमंदां । सर्पां आम्हां निजसंगें. ॥ २५ ॥ आमुची भगिनी ऐश्वर्यरासी, । परी विक्रीत तुमची दासी, । अणुमात्र चुकल्या, पाहिजे तैसी । शिक्षा करणें स्वामिया!' ॥ २६ ॥ स्वीकारोनि प्रमाण नेमा । नमस्कारोनि ब्राह्मणोत्तमा, । [11]संभ्रमें आणितां स्वाश्रमा । नागलोकीं आल्हाद.॥२७॥ बांधोनि दिधलें सुवर्णसदन. । सर्व संपत्ती भरली पूर्ण. । जो जो पदार्थ इच्छी मन, । तो तो सन्मुख सर्वदा. ॥ २८ ॥ रमा रमेश मानूनि दोघें, । सेवा करिते झाले अवघे. । जरत्कारु स्वस्त्रीसंगें । गृहस्थधर्म संपादी. ॥ २९ ॥

---

१. मुक्त. २. 'देवोनि' असाही पाठ आहे. ३. सर्प. ४. सर्पाधिप. ५. धाकटी बहीण. ६. स्त्रियांच्या चार प्रकारांपैकीं एक. पद्मिनी, चित्रिणी, शंखिनी आणि हस्तिनी हे चार प्रकार. पद्मिनीचें लक्षण:—'भवति कमलनेत्रा नासिकाक्षुद्ररंध्रा अविरलकुचयुग्मा दीर्घकेशी कृशांगी । मृदुचरणसुशीला गीतनृत्यानुरक्ता सकलतनुसुवेशा पद्मिनी पद्मगन्धा ॥' (रतिरहस्य). ७. उद्दाम, अमर्याद. ८. शिळपट. ९. हेळसांड करतात. १०. ब्रह्मवेत्त्या. ११. आदरानें.

स्नान, संध्या, जप, हवन, । स्वाध्याय[1], हरिहरदेवार्चन, । वैश्वदेव, अतिथिपूजन, । पितृतर्पण पैं नववें. ॥ ३० ॥ हीं नवही कर्में आवश्यक, । चालवी नित्यनैमित्तिक[2], । काम्यनिषिद्धें[3] दोषात्मक, । मनें शरीरें नातळे[4]. ॥ ३१ ॥ कुंडत्रय वेदिकायुक्त[5], । अष्टाविंशति पात्रांसहित, । अग्निहोत्रादि ईष्टापूर्त[6], । पैं विधियुक्त संपादी. ॥ ३२ ॥ स्वीकारूनि न्यायार्जित धनी । निष्ठा संपूर्ण तत्त्वज्ञानीं, । श्रद्धा अतिथीच्या पूजनीं, । भगवद्भावें सर्वदा. ॥ ३३ ॥ व्यय शोभे षण्णवतिश्राद्धीं[7], । वाचा शोभे यथार्थवादीं, । ऐसा गृहस्थ मोक्षपदीं, । संन्यासाचें फळ लाभे. ॥ ३४ ॥ ऐसिया परी सार्थक काळ । करीत, गृहस्थ ऋषी निर्मळ, । पतिसेवे भाव अचळ । स्वदारेचा सर्वदा. ॥ ३५ ॥ ऋतुस्नाता[8] झालिये दिनीं, । पुत्रफळार्थ याचकिनी[9], । भविष्य जाणोनि, रेतदानीं । तोषविली स्वधर्में. ॥ ३६ ॥ शुक्रभिक्षा[10] गर्भपात्रीं । पडतां संतुष्ट पद्मनेत्री; । भानुतेज लपवी गात्रीं, । तपोबीजविस्तारें. ॥ ३७ ॥ परि, ते नेणेचि, तये काळीं, । बाळबुद्धीनें सलज्ज बाळी. । ऋषीनें जाणोनि हृदयकमळीं । ऋतु कार्यार्थि मानिला. ॥ ३८ ॥ यावरी कोणे एके दिवसीं, । भोजन करोनि सावकासीं, । दारांक[11] करोनि उसी, । निद्रासुखें पहुडला[12]. ॥ ३९ ॥ झोंपेनें झांकळिला[13] प्रियो. । तंव अस्तमाना गेला सूर्यो. । रंभोरुतें[14] डोलवी, वायो । संशयाचा, हृत्पद्मीं[15]. ॥ ४० ॥ जागृत केलिया चढेल कोप, । न करितां, मानेल स्वधर्मलोप, । अधैर्य दोंमार्गीं संकल्प, । भयें न सरे चांचरे[16]. ॥ ४१ ॥ विचार करितां, सामान्य विशेष । सत्कर्मलोपें स्पर्शेल दोष, । निद्रेसी आहे अवकाश । रात्री सगळी पुढारें. ॥ ४२ ॥ मग चुरोनि चरणतळा । म्हणे, 'साधिजे संध्याकाळा, । होम देवोनि, स्वधर्मशीळा! । मग संतोषें पहुडणें[17]. ॥ ४३ ॥ पश्चिमसमुद्रीं बुडतां तरणी, । विहितभंगें सुकृतहाणी, । व्यंगतेचा विटाळ झणीं । तुमच्या पायां नातळो[18].' ॥ ४४ ॥ ऐसें ऐकतां उत्तर, । कोपें

---

१. वेदाध्ययन. २. अमुक तिथीस करावयाचें जें श्राद्धादि कर्म तें. ३. नित्यकर्माव्यतिरिक्त इष्टफलप्राप्तीसाठीं व्रतादि जें कर्म करतात तें काम्यकर्म. ४. न शिवे. ५. यज्ञ इत्यादिकांत डमरूच्या आकाराप्रमाणें केलेली भूमि. ६. यज्ञयागादि धार्मिक कर्म. ७. शाण्णव. ८. ऋतु प्राप्त झाल्यावर चवथे दिवशीं स्नान करून शुद्ध झालेली स्त्री. ९. याचना करणारी. १०. रेत, वीर्य. ११. स्त्रीची मांडी. (संस्कृत भाषेच्या नियमाप्रमाणें सामासिक शब्दांचे संधि करणें अवश्य आहे, परंतु तसें न केल्याचीं उदाहरणें मुक्तेश्वराच्या कवितेंत पुष्कळ आढळतात). १२. निजला. १३. व्यापला. १४. कर्दलीसारख्या मांड्या जीच्या अशीतें. १५. हृदयकमलीं. १६. अडखळे. १७. निजणें. १८. न स्पर्शो.

खवळला वैश्वानर[1]. । म्हणे, 'मांडिये पडला भार, । म्हणोनि निद्रा मोडिली. ॥ ४५ ॥ वृद्ध मी, नावडें तुझिया मना, । म्हणूनि करिसी हेलना. । आतां, जा तूं, स्वबंधुसदना । सेवूनि, राहे भुजंगीं. ॥ ४६ ॥ आज्ञा न घेतां मज ऋषीची । खंडना करूनि मत्कर्माची । प्रौढी[2] नाहीं सैविल्याची[3] । अस्तमाना जावया. ॥ ४७ ॥ नावेक[4] धरूनियां धीरू, । पहावा होता चमत्कारू; । असो. हा अवघा उद्धताचारु । तुझिये दुष्ट बुद्धीचा. ॥ ४८ ॥ वृद्ध दरिद्री रोगी भर्ता[5] । विशेष श्वशुरगृहीं वसता, । सुरूप तरुणी समर्थाची दुहिता । कांतारूपें हृद्रोग[6]. ॥ ४९ ॥ श्वानासारिखें हेलसाविती[7], । मर्कटातुल्य उपहासिती, । तरी, निर्लज्ज कामासक्ती, । त्रास न घेती स्त्रियेचा. ॥ ५० ॥ कुच पय:पात्र[8] देखोनि नयनें, । पुरुषमार्जार मींयो[9] म्हणे; । हृदयीं हाणीतल्या चरणें, । बळें संघटे पादसंधीं. ॥ ५१ ॥ वर्मीं ताडितां कठिणवचनीं, । लिंगमुख दाटलें भगभाजनीं; । ओंठ चावित रोमस्थानीं । पुच्छ उभारित पुढारें. ॥ ५२ ॥ कीं विषयविष्टे लागीं टोंकती, । मूत्रमोरिये नित्य मरती, । नग्नस्त्रियेभोंवते भोंवती, । ते शूकरव्यक्ति नरदेह. ॥ ५३ ॥ कीं रेतपानार्थ मंजुरिया । उभयस्कंधीं द्वयदांडिया । वाहक होवूनि नरकालया । जीव नेती सकामें. ॥ ५४ ॥ हस्त दंड टेंकोनि शुनी । श्रमल्या, विसावा मानिती मनीं. । तृषानिवृत्ती मृगजळपानीं, । तेंवि चुंबनीं परितोष. ॥ ५५ ॥ यापरी आयुष्यें वेचूनि व्यर्थ । नरकयात्रे चालिले बहुत. । वैराग्यावीण मोक्षपंथ । वोस पडले प्राणिया. ॥ ५६ ॥ असो; हे संसार कुंश्चित[10] राहटी[11], । मी तंव तपियांमाजि धूर्जटी[12], । त्यागोनि जातों सुखसंतुष्टी । राहें इच्छा आपुलिया.' ॥ ५७ ॥ पाय धरूं धांवे कांता; । ऋषी चरणें लोटी माथा; । म्हणे, 'यावरी सन्मुख येतां, । भस्म करीन क्षणार्धें.' ॥ ५८ ॥ भयें कंप सुटला गात्रीं, । अश्रुधारा लोटल्या नेत्रीं, । धाकें शब्द न फुटे वक्त्रीं, । मुख आच्छादी पल्लवें[13]. ॥ ५९ ॥ भयें सर्प दडाले सदनीं. । धाकें समोर न येती कोणी. । म्हणती, 'कोपिष्ठ तपस्वी मुनी । क्षणी शापील आम्हुतें. ॥ ६० ॥ मातृशापें[14] पावलों व्यसन; । दुसरा प्रळयो हा

---

१. जरत्कारुरूप अग्नि. २. शक्ति, हिमत. ३. सूर्याची. ४. क्षणभर. ५. पति. ६. हृदयस्थ रोगासारखी बाधक. ७. तुच्छ मानिती. ८. दुग्धपात्र. ९. मार्जारशब्द. १०. कुत्सित. ११. वागणूक. १२. महादेव. १३. पदरानें. १४. कद्रुमातेचा शाप 'जनमेजय सर्पसत्र करील, त्यांत तुमचें भस्म होईल' असा होता. एकदा विनतेचा आणि कद्रूचा उच्चै:श्रवा अश्वाच्या पुच्छाचा रंग पांढरा आहे कीं काळा आहे असा वाद उत्पन्न झाला. तेव्हां विनतेचें म्हणणें तें श्वेतवर्ण आहे आणि कद्रूचें म्हणणें तें कृष्णवर्ण आहे, असें पडलें. खरोखर रंग तर काळा नव्हता. परंतु आपल्या विषानें काळा रंग करून टाका अशी कद्रून आपल्या पुत्रांस (सर्पांस) आज्ञा केली. ती त्यांनीं पाळिली नाहीं, म्हणून तिनें त्यांस शाप दिला. (मागें अध्याय पांचवा पहा.)

साहील कोण ? । भगिनीचे धरिती चरण, । 'पती शांतवीं आपुला.' ॥ ६१ ॥ देव धोत्रें घेवोनि हातीं, । ऋषी चालिला वैराग्यपंथी. । येरी[1] मागें मागें येती । शोक करीत आक्रोशें. ॥ ६२ ॥ अंतरें जाऊनि, मागें पाहे । तंव प्रिया पाठीसीं येत आहे । मग उभा ठाकूनि म्हणे, 'राहें, । गृहा जायें परतोनी.' ॥ ६३ ॥ भार्या विनवी, सर्वज्ञ देवा ! । विचारमूर्ती करुणार्णवा[2] ! । जन्मोनि नेणें दुष्ट भावा । भोळेपणें आजवरी. ॥ ६४ ॥ स्वामींनीं शब्द ठेविला क्षोभें, । हें दुष्ट प्रारब्ध राहिलें उभें. । आतां क्रोध सांडूनि, लोभें । कृपानुग्रह[3] करावा ॥ ६५ ॥ थोर दुराशा[4] धरूनि चित्तीं, । वडिलीं वोपिलें तुमच्या हातीं. । स्वामी ! त्यांचिये मनोरथीं । शून्याकार[5] दिसताहे. ॥ ६६ ॥ तुम्हांपासोन लाधेल फळ, । तेणें अक्षयी माझें कुळ, । तयांचा संकल्प नव्हे विफळ, । ऐसें केलें पाहिजे.' ॥ ६७ ॥ ऐसें प्रियेनें प्रार्थितां तेथें, । कृपेनें आश्वासी अभयहस्तें. । म्हणे, 'गर्भशुक्तिके[6] आंतौतें[7] । रत्न वाढे अनर्घ्य[8]. ॥ ६८ ॥ नाहीं फळाची नास्तिक, । पोटीं आहे **आस्तिक**. । रजनीजठरींहूनि तीव्रार्क[9] । प्रगटे जैसा प्रभातें. ॥ ६९ ॥ कपिल, अथवा स्वामिकार्तिक, । याज्ञवल्की, योगींद्र शुक, । यांचे पंक्तीस हा **आस्तिक** । तुळिजेल महिम्यानें. ॥ ७० ॥ [1]जोहरीं रक्षील सर्पांतें, । पितर पावतील ब्रह्मलोकातें, । तुझी कीर्ति त्रैलोक्यातें । पावन करील, पवित्रे !' ॥ ७१ ॥ ऐसें बोलोनि स्वदारेसी, । अदृश्य झाला ब्रह्मऋषी. । वियोगदुःखें कासाविसी । पडे मूर्छित धरणीं ये. ॥ ७२ ॥ सावध होवोनि, बौढवेळा[11] । जल स्पर्शिलें नेत्रकमळा, । गृहा पातली, तव व्याळा । विवर्ण देखे सचिंत. ॥ ७३ ॥ **वासुकी** विनवी, 'विशालनयने ! । सर्व जाणसी विचार पूर्णें । तुज वोपिलें कारणें जेणें । ते साध्य कीं असाध्य ? ॥७४॥ प्रार्थिलें असतां आमुच्या काजें, । काय बोलिजेलें तपस्वि राजें ?' । येरी म्हणे, '[12]उद्वेगीजे । आश्रयो कांहीं दिसताहे. ॥ ७५ ॥ वैश्वानरातुल्य तेजाळा, । तपोधन देवागळा, । **आस्तिक** जन्मोनि तुमच्या कुळा । कवच होईल निर्वाणीं[13].' ॥ ७६ ॥ ऐसें परिसतां उत्तर, । हर्षें नाचे दर्वीकर[14], । अवघे करिती जयजयकार, । सुखें साखरा वांटिती. ॥७७॥ मीनाक्षी[15] [16]गौरीचिये सेवे । तिष्ठती

१. दुसरी. (जरत्कारू.) २. दयासागरा. ३. कृपारूप प्रसाद. ४. दुःसाध्य आशा. ५. अभाव, निष्फलता. ६. गर्भरूप शिंपी. ७. आंतील, आंतलें. ८. अमूल्य. ९. सूर्य. १०. ज्योतिर्धर अग्नि. ११. पुष्कळवेळा. १२. उद्विग्न होऊं नका. १३. संकटसमयीं. १४. सर्प. १५. मत्स्यासारखे नेत्र जिचे अशी. १६. भवानी.

यक्षणीचे थवे; । कीं, स्त्रिया सिद्धीचे मेळावे[1], । इंदिरेतें[2] वोळंगती[3]. ॥ ७८ ॥ तैशा पद्मिनी नागकन्या । सर्वोपचारें गुणैकधन्या, । जरत्कारीतें पूजिती मान्या, । कुळदेवतेसारिखी. ॥ ७९ ॥ शुक्लीं दिवस गगना चढे, । तंव तंव मृगांकीं[4] कळा वाढे, । तैसा पवित्रोदरीं विरूढे । गर्भांकुर आगळा. ॥ ८० ॥ अभ्रें[5] आच्छादिलें आदित्यबिंबा[6], । परी विश्वीं प्रगटे शोभा, । तैसी जठरांतून प्रभा । बाहेर फांके तयाची. ॥ ८१ ॥ स्फटिकनिकेतनींचा[7] दीपु, । कीं पंपेआंतील अंगनावपु, । कीं ब्रह्मक्रिया प्रगटी रूपु, । आत्मनिष्ठाचे लक्षणें. ॥ ८२ ॥ नवमास लोटल्या अंतीं । पावती झाली सुखप्रसूती. । विधूम[8] पावकाचेनि[9] दीप्ती । जन्म पावे सुतेज. ॥ ८३ ॥ कृत्तिकांचे प्रथमचरणीं, । जन्म पावला आस्तिकमुनी. । ते वेळीं वासुकीच्या सदनीं । मंगळोत्साह मांडिला. ॥ ८४ ॥ गुढिया तोरणें घरोघरीं, । मंगळवाद्यें गर्जती[10] गजरीं; । उचित दक्षिणेच्या संभारीं[11], । वोझीं केलीं याचकां. ॥ ८५ ॥ अति आल्हाद दंदशूकां[12] । परम निधान[13] मानुनि, देखा, । रक्षिते झाले त्या बालका । प्राणातुल्य सौक्षेपें[14]. ॥ ८६ ॥ चंदन कर्पूर दवणा जैसा । वाढता होय परिमळसरिसा । बुद्धी विवेकें संस्कार तैसा । योगभ्रष्ट स्वयें वाढे. ॥ ८७ ॥ जातकर्म[15], नामकरण[16], । निष्क्रमण[17], अन्नप्राशन[18], । चौलानंतरें[19] उपनयन[20], । वासुकी सांग संपादी. ॥ ८८ ॥ व्रतबंध झालिया मग, । च्यवन भार्गवापासूनि[21] सांग[22] । वेद पढविला निर्व्यंग । ज्योतिषादि शिक्षाही. ॥ ८९ ॥ विवेकबुद्धी सत्वशीळ । तपश्चर्येनें क्रमीत काळ, । प्रभाकरातुल्य[23] तेजाळ, । शीतळ चंद्रासारिखा. ॥ ९० ॥ गांभीर्यें जैसा रत्नाकरु[24], । औदार्यें मेघ किंवा कल्पतरु, । सामर्थ्यें जैसा सर्वेश्वरु, ।

---

१. समुदाय. २. लक्ष्मी. ३. सेविती, आश्रय करिती. ४. चंद्राचे ठायीं. ५. मेघानें. ६. सूर्य. ७. स्फटिकाच्या गृहांतील. ८. धूराव्यतिरिक्त. ९. अग्नि. १०. 'वाजती घन गजरीं' असाही पाठ आहे. ११. सामग्रीनें. १२. सर्पांस. १३. ठेवा, धनराशि. १४. अगत्यानें. १५. 'नालछेदनापूर्वीचा संस्कार. या समयीं मुलाला सुवर्ण, घृत आणि मध हीं मिश्र करून प्राशन करावयास देतात. १६. उत्पन्न झालेल्या मुलाचें नांव ठेवणें, हा सोळा संस्कारांपैकीं एक. १७. सूर्यदर्शनासाठीं मुलास चवथ्या महिन्यांत बाहेर काढणें. १८. हा संस्कार मुलास साहव्या अथवा आठव्या महिन्यांत आणि मुलीस पांचव्या अथवा सातव्या महिन्यांत करतात. १९. यास 'चूडाकरण' म्हणतात. मुलास प्रथमतः शेंडी राखण्याचा संस्कार. २०. आठव्या वर्षी ब्राह्मणाचें उपनयन (मौंजीबंधन) करावें अशी मन्वाज्ञा आहे. २१. भृगूच्या सात पुत्रांतील ज्येष्ठ. २२. वेदांच्या अंगासहित. ('शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छन्दसां चितिः । ज्योतिषामयनं चैव षडङ्गो वेद उच्यते ॥' हीं वेदाचीं सहा अंगें आहेत.) २३. सूर्य. २४. समुद्र.

घडी मोडी संकल्पें. ॥ ९१ ॥ इंदिरेश बळाची आश । धरूनि, इंद्राणीचा ईश । अमरगणासी सावकाश । सेवेनें रक्षी सर्वदां. ॥ ९२ ॥ तैसेपरी, पन्नग सकळ, । वासुकीसहित सर्वकाळ, । सेवाभक्तीनें ऋषीचा बाळ । संरक्षिती सर्वदा. ॥ ९३ ॥ नाना यक्षगणाचे लक्ष । घेऊनि, मुख्य धनाध्यक्ष[1] । रक्षिता, म्हणोनि विरूपाक्ष[2] । सेवेनें रक्षी सर्वदा. ॥ ९४ ॥ सूचना कथेची पुढारीं, । येरीकडे हस्तनापुरीं, । जनमेजयें क्षोभोनि जिव्हारीं[3], । पन्नगसत्र[4] आरंभिलें. ॥ ९५ ॥ इति श्रीभारत समुद्ररूपी । मंद्वाणीकुररीचंचूमापीं[5], । उमाणी[6] हें मनसंकल्पीं । अघटित मान चतुराचें. ॥ ९६ ॥ परी विश्वंभरगुरुप्रसादें । मुक्तेश्वर वदे आरुषशब्दें[7]; । तें परिसोनि, सज्जनवृंदें । संतोषती यथार्थ. ॥९७॥

अध्याय दहावा.

श्रोते म्हणती वक्तया, । ‘उत्तंकऋषी[8] जनमेजया । तिरस्कारी, मग मंत्रिया । काय बोले, तें सांगा?’ ॥ १ ॥ सौती म्हणे, ‘सावधान, । ब्राह्मणें कथिलें पितृमरण । संतोषनौका भंगोनि, मन । शोकार्णवीं नरनाथ. ॥ २ ॥ अमात्य मंत्री वडील वृद्ध । पाचारोनि सोयरे सुहृद । तयांप्रती सखेद शब्द । ऐसा बोले नरेंद्र. ॥ ३ ॥ ‘माझा पिता परीक्षिती । मरण पावला कवणे रीती? । तक्षकविषाग्नीच्या दीप्तीं । दाहिला, ऐसें ऐकिलें. ॥ ४ ॥ परी हे वार्ता तुम्हीं कोणीं । लाविली नाहीं माझ्या श्रवणीं. । बाळबुद्धी किंवा अगुणी । मानूनि केली उपेक्षा?’ ॥ ५ ॥ पुरोहित म्हणती, ‘नृपनाथा! । कवण ते संतोषाची वार्ता? । ते सांगोनि, तुझिया चित्ता । बळें शोकाग्नी लावणें. ॥ ६ ॥ विष वाटितां, वंचिलें[9] पंक्ती, । म्हणोनि रुसावें अमृतभोक्तीं; । श्रवणीं पडल्या, खेद चित्तीं । तें काय गोष्टी सांगणें? ॥ ७ ॥ आतां सहज प्रसंगें आलें, । साक्षेपें करूनि स्वामीनीं पुसिलें, । तरी सांगिजेल, श्रवण केलें । पाहिजे प्रतापरुद्रा! ॥ ८ ॥ कौरवपांडवविरोधवातु[10] । माजला असतां अत्यद्भुत, । पांडवसंततीचे तंतु । सातही तुटले एकदां. ॥ ९ ॥ द्रौपदीचे पांचही[11] कुमर, । घटोत्कच[12]

---

१. कुबेर. २. शंकर. ३. मर्मस्थानीं. ४. यज्ञ. ५. माझ्या वाणीरूप टिटवीची चोंच या मापानें. ६. मापून पाही. ७. आर्ष, अडाणी. ८. यानें जन्मेजयास उत्तेजन देऊन त्याकडून सर्पसत्र करविलें. ९. फसविलें. १०. विरोधरूप वायु. ११. प्रतिविंध्य, श्रुतसेन, श्रुतकीर्ति, शतानीक आणि श्रुतकर्मा हे पांच पुत्र. हे अनुक्रमें पांच पांडवापासून झाले. १२. भीमापासून हिडिंबा राक्षसीच्या ठायीं झालेला पुत्र.

भैमसेनी राक्षस क्रूर, । कर्णद्रौणीचेनि संहार । झाला साही जणाचा. ॥१०॥ सप्तम तोही पावला क्षयो, । कृष्णभगिनीसुभद्रातनयो । अभिमन्यू अपर धनंजयो । व्यूहभेदनीं निमाला. ॥ ११ ॥ कृष्णावतार संपल्या अंतीं, । पांडव निघतां महापंथीं । राज्यीं स्थापिला परीक्षिती । अभिमन्युपुत्र, तव पिता. ॥ १२ ॥ तेणें साठी वरुषेंवरी । गुणी पूर्वजां आणूनि हारी, । स्वधर्में पाळिली धरत्री । श्रीरामचंद्रासारिखी. ॥ १३ ॥ राक्षस त्रासवूनि जगतीतळीं । रक्षी, जैसा श्रीकांत बळी; । अरिष्टापासूनि प्रजा सकळी । संरक्षिल्या प्रतापें.॥ १४॥ साधुसंग्रह, दुष्टनिग्रह, । शरण आलिया अनुग्रह, । धर्मविग्रहाचा संग्रह । केला नाहीं सर्वथा. ॥ १५ ॥ दान दंडाचेनि घातें । जगाचीं दुःखें दोष दुरितें. । दरिद्र दवडिलें देशापरतें. । स्पर्शो नेदी कलिधर्मा. ॥ १६ ॥ जितेंद्रिय सत्यशील, । प्रजापाळक भूतदयाळ, । विष्णुभजनीं अतिप्रेमळ, । साधु मित्र सद्भावें. ॥ १७ ॥ शारद्वत गौतम कुमरु । कृपाचार्यापासूनि चतुरु । धनुर्विद्या पावोनि, गुरू । झाला शस्त्रास्त्रधरांचा. ॥ १८ ॥ ऐसा पवित्र नरेंद्रोत्तम । पावता झाला निधनधर्म. । तो सांगतां, वाटेल श्रम, । तथापि धैर्यें आकर्णी. ॥ १९ ॥ मृगयाव्याजें वनासि गेला, । शमीकऋषीच्या आश्रमा आला. । ध्यानस्थ देखोनि, कंठीं सुंदला । मृत पन्नग तयाचे. ॥ २० ॥ ऋषीच्या पुंत्रें, तेणें रोषें । शाप दिधला अति आवेशें. । 'सप्तमदिवसांतीं तक्षकदंशें । मृत्यु पावसी निश्चित.' ॥ २१ ॥ ऋषीनें सांगून धाडितां नृपा, । तात्काळ पावला पश्चात्तापा. । प्रजा प्रधान उदेला कंपा, । विश्वप्रळयासारिखा. ॥ २२ ॥ सुहृद प्रधानीं, ते समयीं, । राजा रक्षिला स्तंभाच्या ठायीं. । सप्तम दिवसाच्या अंतीं, पाहीं । मार्गी येतां तक्षका. ॥ २३ ॥ कश्यप धन्वंतरी सुजाण । सर्पविखारी विद्यानिपुण । सत्वर येतां देखिला, प्राण । वांचवावया नृपाचा. ॥ २४ ॥ तक्षकें कारण विचारिलें? । ऋषीनें यथार्थचि कथिलें. । प्रतीत दावी म्हणतां बोलें, । 'अवश्य' म्हणे कश्यप. ॥ २५ ॥ तेणें वृक्षदाहपरीक्षा । दावोनि, पुरविली समक्षा. । म्हणे, 'मंत्रज्ञामाजिदक्षा ! । इच्छा ते सांग मजपासीं. ॥ २६ ॥ हस्त धरोनि कश्यपाचा, । म्हणे, 'मागसी

१. अश्वत्थामा. २. शत्रूचा आंत प्रवेश न होतां आपला मार शत्रूवर चालावा म्हणून त्याच्या रचनेचे शकटव्यूह, चक्रव्यूह, दंडव्यूह इत्यादि जे अनेक प्रकार करतात त्यांचा भेद करतांना. ३. संपला, मरण पावला. ४. पुण्यविरोधाचा संचय. ५. पापें. ६. काळयमा. ७. शरद्वत्पुत्र कृपाचार्य. ८. मरण. ९. घातला. १०. शृंगीनें. ११. प्रलय, दाखला.

तें देईन वाचा.' । ब्राह्मण म्हणे, 'बहु धनाचा । लाभ झाल्या परतेन.'
॥ २७ ॥ संख्येवेगळें[1] देऊनि वित्त, । वैद्य फिरविला येत येत. । पुढें तक्षक
नगराआंत । कपटवेशें पातला. ॥ २८ ॥ मोहोनि सकळांचीं ज्ञानें, । राजा
तक्षकें घेतला प्राणें. । आम्हीं सकळही झालों दीनें, । स्वामीविणें ते काळीं.
॥ २९ ॥ विषानळें अतिसकुमार । राजा भस्मला सहशरीर. । नगरीं राष्ट्रीं
हाहाकार । थोर माजला प्रजांतें. ॥ ३० ॥ 'आम्हुतें अनाथ केलें रायें, । मग
आश्रयले तुझे पायें; । तुज देवेंतरुचे[2] शीतळ छाये । हा काळवरी निवालों.'॥३१॥
पुढें अनंत संवत्सर[3], । होईं विजयलक्ष्मीचा वर[4].' । वार्ता ऐकोनि, राजेश्वर ।
शोक करी आक्रोशें. ॥ ३२ ॥ त्यावरी विचारी, विशेष मात । 'वैद्य फिर-
विला देऊनि वित्त. । हे नगरीं कांतारींची[5] मात । तुम्हा कैसी जाणविली ?
॥ ३३ ॥ 'राया ! न्यग्रोधवृक्षावरुता[6] । ब्राह्मणकुमार वेंळंघला[7] होता. । तेणें
गुप्त राहोन, वृत्तांता । दोहींचाही ऐकिला. ॥ ३४ ॥ समिधाकुशकाष्टभारा ।
मस्तकीं होता ब्राह्मणकुमरा, । तो जळोनि पावला आकारा । पहिल्या ऐसा
प्रत्यक्ष. ॥ ३५ ॥ ऐशिया विखें जाळिलें जनकातें, । तें स्मरोनि हृदय पिटीत
हातें. । म्हणे, 'प्राण त्यजीन येथें, । कां वधीं न तो सर्प ? ॥ ३६ ॥ वैद्य
पावता हस्तनापुरा । तरी, वांचविता राजेश्वरा; । तक्षकाची वैरीकारा[8] । मज
मर्यादा दिसेना. ॥ ३७ ॥ आतां प्रतीकार[9] करीन याचा, । सूड घेईन पित-
याचा, । संततीसहित तक्षकाचा । देह जाळीन हुताशीं[10]. ॥ ३८ ॥
उत्तंकऋषीचें[11] मनोगत, । तेंचि माझें हृदयींचें आर्त, । तक्षकदहनें म्यां पुरुषार्थ[12] ।
सर्व जोडले संसारीं.' ॥ ३९ ॥ उश्वास टाकीतसे वदनीं । रागें अधर चावी
दशनीं[13], । हस्तें चुरीत तळवा, मूर्ध्नीं । आरक्त, नयन संतप्त. ॥ ४० ॥ ब्राह्मण
पाचारोनि सकळ । त्यांप्रती बोले उतावीळ. । 'सर्पयज्ञक्रियाकुशळ । कोण ते
निवडा निराळे. ॥ ४१ ॥ विषें दाहिला जनकोत्तम, । मीही करीन तक्षक
होम, । सत्य होवोनि अभिमान नेम । सिद्धी न्यावा समस्तीं. ॥ ४२ ॥ अभि-

१. असंख्य. २. कल्पतरु. ३. वर्षे. ४. भर्ता. ५. अरण्यांतली. ६. वडाचे झाडावर. ७. मिठी मारून. ८. दुस्मनगिरी. ९. प्रतिक्रिया, उसनें फेडणें. १०. अग्नीत. ११. उत्तंकानें गुरुपत्नीस देण्यासाठीं सूर्यवंशीय पौष्य राजाच्या स्त्रीचीं कुंडलें आणिलीं होतीं, तीं मार्गांत तक्षकानें हरण करून नेलीं. इंद्रादिकांच्या साहाय्यानें उत्तंकानें तीं परत आणून गुरुपत्नीस दिलीं. पण या कामीं त्याला फार त्रास झाला, म्हणून तक्षकाचा द्वेष धरून त्यानें जनमेजयाकडून सर्पसत्र करविलें. १२. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ. १३. दांतांनीं.

नव पन्नगास्त्रविधी । कुशळजाणते मंत्रवादी, । तिहीं विलंब न करितां, आधीं । सत्रारंभ करावा. ॥ ४३ ॥ जो मंत्र उच्चारितां वोठीं, । आणि निमंत्रितां हस्तबोटीं, । तंव उसळोनि सर्पांच्या कोटी । कुंडीं पडाव्या आपैसा.[1]' ॥ ४४ ॥ ऋषी बोलती, 'परमपवित्र ! । विध्युक्त आहे पन्नगसत्र । विधीनें निर्मिलें स्वतंत्र, । तुजचिलागीं भूलोकीं. ॥ ४५ ॥ पाषाण तारूनि सागरांतु । एकें श्रीरामें बांधिला सेतु. । गॆरळप्राशनीं[2] समर्थु । शंकर स्वामी तो एक. ॥ ४६ ॥ रात्रीं शतयोजनें चारी कोटी । द्रोणाचळ[3] वाहोनि पाठीं । आणोनि जावया जगजेठी[4] । हनुमंत एक जन्मला. ॥ ४७ ॥ व्यूह भेदोनि जयद्रथ । वधावयाचा प्रमाणशपथ[5]. । सिद्धी नेला, तो एकचि पार्थ. । वडील तुझा निवडला. ॥ ४८ ॥ सिंधुप्राशनीं अगस्ती, । तमोहरणीं एक गभस्ती[6], । धराधर्ता[7] धैर्यप्राप्ती । आदिकूर्म[8] एकची. ॥ ४९ ॥ तैसा मार्गे आचरला कोणी । ऐसें बोलों न शके कोणाची वाणी । पुढें आचरेल कोणी । भुवनत्रयीं असेना. ॥ ५० ॥ पितृवैरें पन्नगहोम । कर्ता तूंचि प्रतापी परम, । उपमे कृष्ण कीं परशुराम, । तिसरा कोणी दिसेना. ॥ ५१ ॥ एकें वधिलें कंसादिका, । एकें सहस्रार्जुना[9] वधिलें देखा, । पितृमारक परमारका । दहनकर्ता तूं एक. ॥ ५२ ॥ वंशीं एक, देशीं एक, । जगीं एक, युगीं एक, । ब्रह्मकल्पीं उपजे एक, । कीर्तिघोष तुज ऐसा. ॥ ५३ ॥ आज्ञा देईं नरनायका ! । कौतुक दावूं ब्रह्मादिकां, । तव कीर्तिभेरी[10] तिहीं[11] लोकां, । श्रवण करवूं चहूं युगीं.[12]' ॥ ५४ ॥ राजा म्हणे, 'भूसुरस्वामी![13] । चित्त व्याकुळ संतापऊर्मीं[14], । स्तुतिवादें गौरवा तुम्ही, । परी तें गोड वाटेना. ॥ ५५ ॥ शब्द उसनें फेडितां बहुत । विलंबें काळ जातसे व्यर्थ, । आतांचि बदले, तितें येथ । यथार्थ करूनि, दाखवा.' ॥ ५६ ॥ 'अवश्य' म्ह-

१. आपोआप. २. विषपानीं. ३. द्रोणाचळावर नानाविध औषधी असत, त्यांत मृतसंजीवनी क मेलेल्या प्राण्यास जीवंत करणारी औषधी होती, यास्तव तो पर्वत मारुतीनें उचलून लंकेंत रांगणीं निश्चेष्ट पडलेल्या लक्ष्मणास पुनरुज्जीवन करण्यासाठीं आणिला. ४. जगद्वंद्य; गांत ज्येष्ठ. ५. 'शपथ' शब्द संस्कृतांत पुल्लिंगी आहे. ६. सूर्य. ७. पृथ्वीला तारणारा. ८. वि च्या दहा अवतारांपैकीं 'आदिकूर्म' म्ह० वराहावतार हा तिसरा होय. हा अवतार घेऊन णूनें हिरण्याक्ष दैत्यास मारून सागरांत बुडणाऱ्या पृथ्वीला आपल्या दंतायानें उचलून धरिलें, ी पौराणिक कथा आहे. ९. कार्तवीर्य. यानें जमदग्नीची कामधेनु बळानें नेली म्हणून आणि परशुरामाचें युद्ध झालें, त्यांत याचे सहस्र हात तुटून हा मरण पावला. १०. नौबद. . स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ. १२. कृत, त्रेता, द्वापर आणि कलि. १३. द्विजवरा. ४. संतापरूप लहरींत. (येथें संधि करणें अवश्य असून तो केला नाहीं.)

णोनि, द्विजवरीं । करविते झाले सिद्ध सामुग्री, । पुढती बोलती, 'अवधारीं । राजेश्वरा! चतुरेशा! ॥ ५७ ॥ आम्ही वित्पन्न ग्रंथज्ञानी, । परि, क्रियाविचार अनुष्ठानीं । करूनि निवडिले ज्ञानी, । ते सिद्ध समीप असावे. ॥ ५८ ॥ आ[1]-गमीं नि[2]गमीं अ[3]थर्वणीं । मंत्रावतार त्रिकाळ ज्ञानी । तीर्थीं गिरीगुहारण्यीं । वसते, येथें आणावें. ॥ ५९ ॥ कृपा आज्ञा अनुग्रहप्रभे । कर्मसिद्धीसी ठाकले उभे, । त्यांचिया संनिध सुकृत, सभे । येईल, उद्योगें आमुच्या. ॥ ६० ॥ गौड मलयाळ अर्धदेशस्था । कर्दळी श्रीशैल्य बदरीवनस्था । त्यांचिये मंत्रीं मंत्र-देवता, । उभ्या जागती फळेसीं. ॥ ६१ ॥ गंगागौतमीनर्मदातीरीं, । छाया भगवती गोकर्णेश्वरीं, । ताम्रपर्णी पुण्यकावेरी । मा[4]नससरोवरीं जे वसती.॥६२॥ मांत्रिकवृक्ष त्याचेनी जळें, । वाढती तेथें सिद्धीचीं फळें, । प्रत्यक्ष म्हणऊनि ते जवळें, । यज्ञकाळीं असावे.' ॥ ६३ ॥ ऐसें विनवितां पुरोहितीं, । द्विज धाडूनि मानसगती, । अनुष्ठानातें मंत्रमूर्ती । शिष्यसमुदायेसीं आणविले.॥६४॥ कृष्णवस्त्राचें परिधान, । कृष्णांबराचें प्रावर्ण, । धूम्रआरक्तनयन, । दैदीप्यमान तेजस्वी, ॥ ६५ ॥ जयांचा क्रोधहुताशन, । ब्रह्मांड जाळील, नलगतां क्षण; । प्रसाद देती इंद्रभुवन । तुलसीपत्रासारखें. ॥ ६६ ॥ ऋग्यजुःसाम अथर्वण, । ष[5]डंगयुक्त दशलक्षण, । तर्कवेदांतसांख्यज्ञान । योगशास्त्रीं अतियोग्य, ॥ ६७ ॥ व्याकरणकार, स्मृतिकार, । साहित्यसंगीतकाव्यकार, । पौ[6]राणिक, ऋषीश्वर, । जितेंद्रिय पातले. ॥६८॥ रायें धनधान्यरत्नवसनीं, । पूजूनि स्वस्थ अंतःकरणीं, । करूनि प्रवर्तविले यज्ञीं, । सर्पसत्रीं याजक. ॥ ६९ ॥ वा[7]स्तुविद्याविशारद बहुत । मंडप चै[8]त्य यू[9]पांकित, । शिल्पकारीं निर्मिले तेथ । वि[10]बुधसदनासारिखे. ॥ ७० ॥ पताका तोरणें क[11]नकध्वज । शोभे, स्वर्गातुल्य सुतेज. । स्वस्थानीं स्थापिले ऋत्विज, । कर्मकुशळ विवेकी. ॥ ७१ ॥ होता मैत्रावरु[ण] पो[12]तीं, । अच्छवाग् कुग्राव स्तौता, । अ[13]ध्वर्यु आणी प्रतिप्रस्थाता । नेष्टीं ने[ष्टा] ब्रह्मा पैं. ॥ ७२ ॥ ब्राम्हणाच्छंसी उ[15]द्गाता, । आ[16]ग्नीध्र प्रस्तोता प्रतिहोता,

---

१. शास्त्र. २. वेद. ३. अथर्वण वेदांत इष्टकार्यसाधनाचे मंत्र सांगितले आहेत. ४. हें सरो[वर] हिमालयाच्या गंधमादन नामक शिखराच्या उत्तरेस आहे. ५. शिक्षा, कल्प, छंद, व्याकर[ण,] निरुक्त आणि ज्योतिष या सहा अंगांनीं संपन्न. ६. धर्मशास्त्र इतिहासादि जुने (पुराण) ग्रंथ व[ाचून] उपजीविका करणारे. ७. गृह बांधण्याच्या विद्येंत कुशल, शिल्पागमवेत्ते. ८. यज्ञस्थान. ९. यज्ञ[स्तंभ.] १०. देवालयासारखें. ११. सुवर्ण. १२. ऋत्विज्. १३. यजुर्वेदी ऋत्विज्. १४. यज्ञांतील ऋत्विज्. १५. सामवेदज्ञ ऋत्विज्. १६. यज्ञांत अग्नि सिद्ध करणारा ऋत्विज्.

स्रुव शेषी जाणिजे श्रोता, । षोडश ऋत्विज महायागी. ॥ ७३ ॥ कपिलकाश्यपातुल्य ऋषिवर्य । तपोतेजें जैसे सूर्य, । असो. हे आमंत्रिले आचार्य, । अवतार अग्नीपुरुषाचे. ॥ ७४ ॥ खाणोनि गर्ता अवघी । निर्मिली, ग्रंथोक्त प्रमाण विधी, । हवनद्रव्याच्या समृद्धी । पर्वतप्राय लोटिल्या. ॥ ७५ ॥ लोहिताक्ष सूत्रधार, । पौराणिक अत्यंत चतुर, । त्रिकाळज्ञानी महाथोर, । भविष्यज्ञाते, ते ठायीं. ॥ ७६ ॥ अवलोकोनियां यज्ञायतन । म्हणती, 'कर्मी उदित विघ्न, । सिद्धी न पावे हा यज्ञ, । ऐसें चिन्ह दिसताहे. ॥ ७७ ॥ निमित्त होईल ब्राह्मण एक, । तेणें मध्येंच खंडेल मख. । हैंवें भरला नरनायक, । आग्रह कांहीं लक्षी ना.' ॥ ७८ ॥ दीक्षाग्रहण भार्येसहित । यजमान राजा महाव्रतस्थ, । सदस्य मिनले द्वादशादित्य । एका सैवीं पैं जैसे. ॥ ७९ ॥ कुंडीं प्रतिष्ठिला वन्ही, । पर्युक्षणीं परिसंमोहनीं, । कुशबर्हिपरिस्तरणीं, । पात्रसाधनीं विधिमंत्रें. ॥ ८० ॥ ईध्मा समंत्रें विसर्जिली, । संस्थापूनि आज्यीं स्थापिली, । प्रणीतापात्रीं संमार्जिली । स्रुचि स्रुवा इत्यादी. ॥ ८१ ॥ आव्हानितां प्रळयानळ । जागृत होतांचि सरळ । सप्तजिव्ह सप्तज्वाळ । सप्तहस्तीं मंडित. ॥ ८२ ॥ महानदीचे जळसंघाट, । तैसे वसुधारांचें लोट, । ते भेटतां, हव्यवाट । होय कनकस्तंभ गगनातें. ॥ ८३ ॥ प्रळयीं कृतांतवक्र प्रचंड, । तैसें विशाळ प्रदीप्त कुंड, । कीं, पन्नग भक्षावया तुंड । धरादेवीनें पसरिलें. ॥ ८४ ॥ याजक द्रष्टे ...तिसावध । अनावर देखोनि जातवेद । पृषदाज्य केलें सिद्ध, । क्षीरसिंधूसारिखें. ॥ ८५ ॥ समिधा वोपितां पावकमुखीं, । उत्पात उठले नागलोकीं. । ...वंडी दाटल्या मस्तकीं । नश्वर मानिती संपत्ती. ॥ ८६ ॥ केवळ कश्मल...या भारें, । सकंप थरकती शरीरें. । आसनें सोडूनि एकसरें, । गगनमार्गें

. होता, उद्गाता, अध्वर्यु आणि ब्रह्मन् हे चार ऋत्विज् मुख्य होत. पण मोठ्या यज्ञांत हे ... असतात. २. यज्ञगृह. ३. मिळाले. ४. उत्कट इच्छा. ५. बारा सूर्य. प्रत्येक मासास एक ...हे बारा आदित्य आहेत. यांचीं मासानुगत नांवें:—माघांत अरुण, फाल्गुनांत सूर्य, चैत्रांत ... वैशाखांत तपन, ज्येष्ठांत इंद्र, आषाढांत रवि, श्रावणांत गभस्ति, भाद्रपदांत यम, ...नांत हिरण्यरेत, कार्तिकांत दिवाकर, मार्गशीर्षांत चित्र आणि पौषांत विष्णु. हे बारा सूर्य ...मुनीपासून अदितीच्या ठायीं उत्पन्न झाले. (आदित्यहृदय.) ६. यज्ञ. ७. मंत्रोच्चरणा... प्रोक्षण करणें. ८. दर्भ. ९. यज्ञाचें जळण, सर्पण. १०. अविच्छिन्न घनधारांचे. ११. अग्नि. ...समाचें तोंड. १३. तोंड. १४. यज्ञ करणारा ऋत्विज्. १५. अग्नि. १६. हवन करण्याचें ...श्रित तूप. १७. अशाश्वत. १८. मूर्छनेच्या. १९. एकदम.

उसळती. ॥ ८७ ॥ एक वृक्षासी घालिती वेढे, । एक वेष्टिती शिळा धोंडे, । तेणेंसीं उसळोनि झुंबाडें । व्योमपंथीं धांवती. ॥ ८८ ॥ एकमेकातें बोभात, । एकमेकां परिवेष्टित, । देहरज्जु शतानुशत । एकग्रंथीं गोंविती. ॥८९॥ ऐशिया सर्पसांखळिया । नभीं धांवती गुंफिलिया, । मेघमाळा चाललिया, । तैसे निबिड आकाशीं. ॥ ९० ॥ तेथूनि धूम्राचेनि पंथें । हवनीं पडती शतानुशतें, । विविध नाद उठले तेथें, । हाहाकार सर्पांचा. ॥ ९१ ॥ शृंखळाकारें कंकणाकारें । शरीरें गोंविती परस्परें, । तेणेंसीं उसळोनि एकसरें । काळानळीं रिघवती. ॥ ९२ ॥ एक व्याकुळ निश्चेष्टित, । एक ते प्राणांतें सांडित, । एक चपळते चळबळीत, । पुच्छें तोडिती निजदांतीं. ॥ ९३ ॥ एकें भयें पसरिलीं मुखें, । एकें जिव्हा लळलळ विखें, । एक मुइनळ्यासारिखे । वन्हिस्फुलिंग सांडिती. ॥ ९४ ॥ मातृवाग्वज्रें पीडिले, । ब्राह्मणीं क्षोमें उच्चारिले, । काळाग्निकुंजरें दाटिले, । ईक्षुदंड आननीं. ॥ ९५ ॥ एक काजळाऐसे काळे, । खैदिरांगाराऐसे डोळे, । एक हींटकवर्णी पिवळे, । एक निळे शुकरंगी. ॥ ९६ ॥ एक ते तप्त लोहार्गळा, । स्थूल दीर्घ अतिविशाळा, । मुखीं नाकीं महाज्वाळा, । विषाग्नीच्या धडकती. ॥ ९७॥ एक शंखवर्णी धवळ, । एक माणीकरंगी निखळ, । एक चित्रांग विशाळ, । एक विक्राळ विकटदंती. ॥ ९८ ॥ एक अस्वलाकार रोमाळ, । एक श्मश्रुखांड सरळ, । एक वृद्ध बहुत काळ, । सुपरिमळें मघमघिती. ॥ ९९ ॥ मुखीं मस्तकीं धरिले मणी । वृद्ध बाळ तरुणे फणी, । प्रवेशती पावकाननीं । कोटिच्या कोटी एकदां. ॥ १०० ॥ ब्राह्मणमंत्राचा आंकडा । वोढिले मारोनि आँसडा, । अग्नींत पडोनि तडतडां, । भस्म होती असंख्य. ॥१०१॥ डोंबें गव्हाळे शंखपाळ, । सरड धामन करडियाळ, । फरड फोंडसे महास्थूल, । अजगर आणि दुतोंडे. ॥ १०२ ॥ एक पंचमुख दशमुख, । एक शतमुख द्विशतमुख, । मुगुटमंडितमस्तक । ऐसे विशाळ क[...] सर्प. ॥ १०३ ॥ गोकर्णप्रमाण, गोप्रमाण । अश्वगजगिरिप्रमाण, । भयें [...]मिती विषोल्बण, । दर्शन देती मृत्यूतें. ॥ १०४ ॥ क्रोश द्विक्रोश क्रोशत्र[...]

१. सुन्यांचा समुदाय. २. हाका मारित. ३. मेघांचीं मंडळें. ४. शेंकडों. ५. सांख[...] सारखीं. ६. थोतिती. ७. 'एक ते फडांतें झाडीत' असाही पाठ आहे. ८. 'चाविती' अ[...] पाठ आहे. ९. अग्निकण. १०. ऊंस. ११. खैराचा निखारा. १२. सुवर्ण. १३. पोपटाच्या सारखे. १४. शुद्ध. १५. भयंकर. १६. ज्यांच्या तोंडावर केशसमूह पुष्कळ असे. १७. ओढ, हि[...] १८. गाईंच्या कानासारखे. १९. दारुण विष. २०. 'दर्शन देतती मृत्यूचें' असाही पाठ

योजनायत महाकाय । ऐसे असंख्य कौद्रवेय । भस्म झाले हुताशीं. ॥ १०५ ॥ वृकमुख जंबुकमुख । व्याघ्रमुख सिंहमुख । नक्रमुख महिषमुख । श्वापदमुख अनेकें. ॥ १०६ ॥ ऐसिया सर्पांच्या कोटी । पावकीं विचरती पाठोपाठीं, । नाद उठती कडकडाटी, । पृथ्वी ज्वाळें पळिपतु. ॥ १०७ ॥ मांसमेदाचे संघाट । कढतां, वाहों लागला पाट. । ज्वाळाजिव्हेनें हव्यवाट । चाटोनि नेत क्षणार्धे. ॥ १०८ ॥ जळतां मांसाचिया घाणी । कुवास भरलासे मेघघ्राणीं. । चिळसीनें तोंडीं सुटलें पाणी । तें[10] अद्यापि न जाय. ॥१०९॥ प्रयुत अर्बुद निर्बुदांत । खर्वीं निखर्वीं नव्हे गणित, । चित्रभानूचे लिहितां हात । तेकाळीं पैं राहिले. ॥११०॥ पद्माचे पद्म, शंखाचे शंख, । निधीचे निधी, नव्हे लेख, । सहस्रमुखाचेंही मुख । संख्या करितां ढासळे. ॥ १११ ॥ न कळे मातृशापाचा गैरिमा, । किंवा ऋत्विजऋषींचा महिमा, । कीं जनमेजयाची प्रतापसीमा । एकें वाचें न वदवे. ॥ ११२ ॥ इतुकें भक्षोनि पावकें । पुढती पसरिलीं दोन्ही मुखें. । राजा ऋत्विजां म्हणे तंवकें, । 'तक्षक न पडे अझुनि कां?' ॥ ११३ ॥ ऐकोनि जनमेजयाचें वचन, । तक्षकनामें अभिमंत्रोन । ब्राह्मणीं उचलिलें अंवदान । 'हरहर' शब्दें गर्जोनियां. ॥ ११४ ॥ पुढें वर्तलें काय चरित्र । तें परिसोत सभाग्यश्रोत्र; । सज्जनाचें कृपापात्र । मुक्तेश्वर कवि वदे. ॥ ११५ ॥ इति श्रीआदिपर्व भारत । सकळ ग्रंथांचें कुळदैवत, । ऐकतां पुरवी आर्त । श्र-[...]ण सुखाचें श्रोतया. ॥ ११६ ॥ आणिक, एक ऐका विधी । हें वासनालेश [...] नेदी; । शब्दब्रह्माची सकळ सिद्धी । येणें एकें आवडे. ॥ ११७ ॥[16]

अध्याय अकरावा.

शौनक पुसे आर्त करून, । 'सर्पसत्रीं ऋत्विज कवण ? । तें आपल्या मुखें [...] । करीं आमुतें, सर्वज्ञा! ॥ १ ॥ देवऋषी ब्रम्हऋषी । सदस्य कोण [...]ी ? । तें वाक्यदीपें प्रकाशीं । श्रवणनेत्रीं आमुचे.' ॥ २ ॥ 'जी जी' [...]नि वक्ता वचनीं । म्हणे, 'मुख्य तें कावूं श्रवणीं । इतर सांगतां विस्ता-

---

[...]. लांब. २. शरीर. ३. सर्प. ४. अग्नीत. ५. लांडगा. ६. कोल्हा. ७. पाठोपाठ, लागोपाठ. [...]ीप्त होवो. ९. संघात, समुदाय. १०. 'तें अद्यापि स्त्रवताहे' असाही पाठ आहे. ११. थो- [...]१२. थोरपणा. १३. अवेशें. १४. एके आहुतीस पुरावाजोगें होमद्रव्य. १५. 'देवब्राह्मणाची [...]सिद्धि । येणें एकें क्षातुडे' असाही पाठ आहे. १६. या अध्यायास 'सर्पदहन' असें नांव [...] १७. यज्ञांत कांहीं चूक होईल ती पाहून सुधारणा करणारा ऋत्विज, उपद्रष्टा.

रुनी । अतिप्रसंग होतसे. ॥ ३ ॥ च्यवनऋषीचा कुळसंभव । होता[1] प्रचंड भार्गव, । वेदवेद्यांवरिष्ठ देव, । चतुरानन[2] पैं जैसा. ॥ ४ ॥ धर्माधर्मविचारतरणी । मीमांसाकार परमज्ञानी । तो उद्गाता[3] तेथें जैमिनी, । कुत्सऋषी त्या जवळी. ॥ ५ ॥ भव्य ते ऋग्वेद सावेव, । तो ब्रह्मा[4] शांडिल्य[5] रव, । अध्वर्यू ते यागीं स्वयमेव, । हेमपिंगळ ब्रह्मऋषी. ॥ ६ ॥ कुंडली[8] द्वेष धरोनी मनीं, । तेथें येतां उत्तंक मुनी, । सर्प जाळिले हुताशनीं । कोट्यानुकोटी त्यारागें. ॥ ७ ॥ व्यासपुत्र जीवन्मुक्त । शुकयोगींद्र शिष्यांसहित, । सर्वां श्रेष्ठ सभेआंत । व्यंग[9] तें सांग[10] त्याचेनीं. ॥ ८ ॥ उद्दालक, मौठरक,[11] । श्वेतकेतु, शांडिल्य देख, । असित, देवल तपस्तेजोर्क,[12] । नारद पर्वत पैं दोघे. ॥ ९ ॥ आत्रेय, दुर्वासऋषी श्रेष्ठ, । कुंडजठर, कालघट, । वात्स्य, श्रुतश्रवा वरिष्ठ, । कोहळ आणि देवशर्मा, ॥ १० ॥ मौद्गल्य, सौरभ मुख्य-करूनी । समर्थ सदस्य सभास्थानीं, । पन्नगसत्रीं[13] महायज्ञीं । पारीक्षिति रायाचे. ॥ ११ ॥ याहीवेगळे असंख्यात, । संशितव्रती[14] ब्राह्मण बहुत । मूर्तिमंत वन्ही कीं आदित्य । किंवा प्रतिमा रुद्राच्या. ॥ १२ ॥ विष्णुप्रतिबिंब दर्पण, । कीं नाय अवगला चतुरानन, । ज्यांचें सहजचि दर्शन । काम पुरवी इच्छिलें. ॥ १३ ॥ महासाक्षेपें आरंभिलें देख । फळा नये तें काय एक । म्हणोनि भस्मले दंदशूक[15] । परहिंसक पातकी. ॥ १४ ॥ असंख्य पडिले काळानळीं,[16] । पुढती सर्पांचीं वेंटाळीं । पडतां देखोनि बद्धांजळी । यजमा[17]... स्तवी याजका.[18] ॥ १५ ॥ राजा म्हणे, 'ब्राह्मणोत्तमा । मुख्य शत्रु तक्षकनामा... तो पाडोनि संतोष आम्हां । दिधला आतां पाहिजे.' ॥ १६ ॥ 'अवश्य' म... णून ऋत्विजवरीं । तक्षक आकर्षणार्थ मंत्रीं । अभिमंत्रोनि स्रुवापात्रीं[19] । मह... अवदाना[20] उचलिलें. ॥ १७ ॥ तंव मरणाचें त्रिदोषविकारें[21] । तक्षका... भरलें शरीरें.[22] । कार्मुकापासोनि सुटिजे शरें । तैसा सत्वर पळाला. ॥ ...

१. हवनकर्ता ऋत्विज्. २. ब्रह्मदेव. ३. सूर्य. ४. सामवेद पढलेला ऋत्विज्. ५. स... सांग. ६. ऋत्विज्. ७. मूळभारतांत 'शार्ङ्गरव' असें नांव आहे. (महाभारत, आदिपर्व, अ... श्लो० ६ पहा.) ८. सर्प. ९. अपूर्ण. १०. पूर्ण. ११. मूळांत 'प्रमतक' असें नांव आहे. (अ०... श्लो० ७.) १२. तपोरूपकांतीचे सूर्य. १३. सर्पसत्रीं. १४. तीव्रव्रती, कडक व्रत क... १५. सर्प. १६. कालाग्नि, ब्रह्मांड जाळणारा अग्नि. १७. यज्ञ करण्याविषयीं ऋत्विजांस आज्ञा... १८. यजमानाचें यज्ञादि कर्म करणारा उपाध्याय, ऋत्विज्. १९. हवनपात्रीं. २०. एके... पुरायाजोगें होमद्रव्य. २१. कफ, पित्त आणि वात यांचा एकाच समयीं झालेला क्षोभ.

सांडोनियां पाताळभुवन । शक्रलोका जाऊनि जाण । [1]देवेंद्रातें रिघाला शरण । प्राणधाकें ते काळीं. ॥ १९ ॥ दीर्घस्वरें रुदना करित, । भयें थरथरां कांपत, । म्हणे, 'स्वामी ! चुकवीं घात, । प्राणदाता मज होईं. ॥ २० ॥ निःसर्पी झाली सर्व सृष्टी । मी शरण रिघालों तुझ्या पाठीं । मज वांचवुनी ये संकटीं । श्रेय घेईं देवेंद्रा !' ॥ २१ ॥ इंद्र म्हणे, 'दुष्ट प्राणी । निःशंक निर्भय पापाचरणी । अनर्थ पातलिया निदानीं । मग दीनता [2]अवगती. ॥ २२ ॥ वंशीं अनृतवादी एक । त्याचेनि पूर्वजा होय नरक; । तेवी तव दोषें पावक । पन्नगारण्या लागला. ॥ २३ ॥ शरीरबळें कां समर्थाश्रयें, । ऐश्वर्यबळें महाअन्यायें, । रहटतां, तया अपायें, । महद्व्यसनीं पाडीजे. ॥२४॥ जाणतां जोडोनि पापठेवा, । मग म्हणे 'धांव, सोडवीं देवा !' । मग तो देवाच्याही देवा । रक्षिला नेवचे संकटीं. ॥ २५ ॥ म्हणोनि पहिलेंचि संभाळावें, । अन्याया आंतळों नेदावें, । दोषातीत या स्वभावें, । दुःखभोग असेना. ॥ २६ ॥ असो; ये समयीं न बोलों बोला । सदोषी म्हणोनि शरण आला. । तोही नेवचे, त्याग केला, । उत्तमपुरुषें सर्वथा. ॥ २७ ॥ आतां मरणभयाची व्यथा । सोडोनि, स्वस्थ करीं चित्ता. । पितामह ब्रह्मा, याची अर्था । असे म्यां पूर्वी प्राथिला. ॥ २८ ॥ सर्पसत्रापासूनि तूतें । भय नाहीं गा ! निश्चितें.' । तक्षक म्हणे, 'माझेनि चित्तें । धैर्य सर्वथा न धरवे ? ॥ २९ ॥ [10]उत्तरीय करोनि आपुल्या अंगीं । मज वांचवीं ये प्रसंगीं.' । इंद्रें बंधुत्व स्मरोनि जगीं । [11]भोगी केला स्वकंठीं. ॥ ३० ॥ [12]येरीकडे पाताळभुवनीं । वासुकी संतप्त अंतःकरणीं. । [13]भगिनी समीप पाचारूनी, । तिये जवळी विलपत. ॥ ३१ ॥ 'भ्रम लागला माझिये शरीरीं, । दृष्टी येतसे अंधारी, । बोलतां चालतां [14]चांचरी । वाचा, शरीर जातसे. ॥ ३२ ॥ विस्मृति उपजे क्षणक्षणां । [15]पतंगाऐसी मनवासना । धांवोनि प्रदीप्त[16]हुताशना । आलिंगावें वाटतसे. ॥ ३३ ॥ इष्ट मित्र बंधु कुमर । झाला सकळांचा संहार. । उरले तीहींसीं[17] मच्छरीर । पडेल आतां [18]हुताशीं. ॥ ३४ ॥ ग्रीष्मीं आटे [19]तडागजीवन । तैसा [20]परिवार झाला क्षीण, । शेष[21] सर्पासहित जाण, । पूर्णा-

१. इंद्रातें. २. शेवटीं. ३. अंगीकारिती. ४. सर्परूप बनाला. ५. 'प्रसादबळें' असाही पाठ आहे. ६. वर्ततां. ७. न जाई. ८. स्पर्शो. ९. दोषरहिताला. १०. अंगवस्त्र. ११. सर्प. १२. दुसरीकडे. १३. जरत्कारू. १४. अडखळे. १५. दिव्यावर झडप घालणारा पक्षी. (टोळ.) १६. अग्नीस. १७. त्यांसुद्धां. १८. अग्नींत. १९. तळ्याचें पाणी. २०. परिजन, आश्रितमंडळ. २१. अवशिष्ट, बाकी राहिलेले.

हुती म्यां होणें. ॥ ३५ ॥ ज्या अरिष्टपरिहारार्थीं, । तुज वोपिलें ऋषीचे[1] हातीं. । त्या व्यसनदुस्तरगर्तीं । आजि आम्हीं बुडालों. ॥ ३६ ॥ प्रार्थोनियां आपुल्या पुत्रा[2] । शीघ्र पाठवीं नरेंद्रसत्रा. । बोधोनि पार्थिवा[3] सुपवित्रा । यज्ञसमाप्ती करवणें. ॥ ३७ ॥ राजहृदयींचा कोपाग्नी । शांत होय जिहीं वचनीं; । ऐसें शीतळ अनुवादोनी[4] । समाधान करावें. ॥ ३८ ॥ मंत्रें अथवा तपोबळें । वांचवावीं मातृकुळें । याहूनि यश आगळें[5] । भुवनत्रयीं असेना.' ॥ ३९ ॥ ऐकोनि अग्रजमुखींची[6] मात[7], । जरत्कारीनें आस्तिक सुत, । ध्यान[8] भंगूनि त्वरित । सावध केला ते काळीं. ॥ ४० ॥ पुत्रा बोधी[9] रुदितवक्त्रीं,[10] । 'जनमेजयाचे महासत्रीं, । तुझे मातुळपुत्रपौत्रीं । भस्म झाले असंख्य. ॥ ४१ ॥ उरले तेही पडती कुंडीं,[11] । यालागीं जाईं तूं तांतडीं.[12] । मखसमाप्ति करूनि, खंडीं । मृत्युपाश सुहृदांचे.' ॥ ४२ ॥ पुत्र विचारी अति सौक्षेपें,[13] । 'सर्प किमर्थ जाळिले नृपें.' । येरू म्हणे, 'मातृशापें[14] । बांधोनि बळें होमिले. ॥ ४३ ॥ त्या शापास मूळकारण, । उच्चैःश्रवा[15] श्वेत[16] कीं कृष्ण[17] । यदर्थी शपथांचें प्रमाण । कद्रुविनतेसीं[18] मांडिलें. ॥ ४४ ॥ 'साच न कराल माझें वाक्य, । मातृद्रोही परभक्षक. । तुम्हां भक्षू सापत्न पावक । सत्रीं पारिक्षिताच्या.' ॥ ४५ ॥ निष्ठुर शाप ऐकोनि तेथ । शेष वासुकी भयकंपित । यत्न करिता झाला, घात । चुकवावया कुळाचा. ॥ ४६ ॥ आंथरुणा वोपिला देहो । माथां मेदिनी धरिली पहा हो. । कंठभूषणीं[19] गिरिजानाहो । तोषविलें[20] चिरकाळ. ॥ ४७ ॥ रज्जु होवोनि सिंधुमथनीं । सुरांसहित वज्रपाणी[21] । आराधिला कुलरक्षणीं, । याचीलागीं सुपुत्रा! ॥ ४८ ॥ तपें आर्जवें अंगसेवा । संतोषविलें ब्रह्मदेवा. । तेणें उपाय कथिला बरवा. । कृपें करूनि तो ऐकें. ॥ ४९ ॥ जरत्कारूसी जरत्कारी । दिधल्या, जन्मेल तिच्या उदरीं । तो आस्तिक पावकजोहरीं[22] । संरक्षील सर्वांतें. ॥ ५० ॥ तो आजि प्राप्त झाला काळ । सत्वर उठीं न लावीं वेळ. । वचनीं गोंवोनि[23] भूपाळ, ।

---

१. जरत्कारुमुनि. २. आस्तिक. ३. जन्मेजया. ४. बोलोनि. ५. अधिक. ६. वासुकि. ७. गोष्ट. ८. 'अनुष्ठानाहुनि' असाही पाठ आहे. ९. उपदेशी. १०. रडव्या तोंडानें. ११. अग्निकुंडीं. १२. त्वरेनें. १३. अगत्यानें. १४. कद्रू ही संपूर्ण सर्पांची माता. १५. इंद्राचा घोडा. १६. गौर. १७. काळा. १८. कद्रू आणि विनता ह्या कश्यपऋषीच्या तेरा स्त्रियांतील दोन. १९. पार्वतीपति शंकर. २०. शेषावर शंकर(?)शयन करतो, त्याच्या मस्तकावर पृथ्वी आहे, वासुकि शंकराच्या गळ्यांत भूषणरूप आहे, या गोष्टींकडे येथें लक्ष्य आहे. २१. इंद्र. २२. अग्निकुंडीं. २३. गुंतवूनि.

यज्ञसमाप्ति करविणें. ॥ ९१ ॥ उरलीं वांचवीं सर्पवृंदें, । भूगोळ चर्ची कीर्तिसुगंधें.' । मातृमुखींच्या सखेदशब्दें । आवेशला आस्तिक. ॥ ९२ ॥ उठता झाला अतिलगवेगें, । गमन इच्छी मनोवेगें, । मातेसि म्हणे, 'मातुळा सांगें । चिंता कांहीं न करावी. ॥ ९३ ॥ वार्ता न पडतां माझे श्रवणीं, । तव प्रारब्धें आटले फणी[1]. । आतां स्पर्शों न शके वन्ही. । हें साचार[2] जाणिजे. ॥ ९४ ॥ मातृमुखींचा अलोट शाप, । जनमेजयाचा असाध्य कोप, । ऋत्विजांचा सिद्धिसंकल्प, । तीन्ही करीन निस्तेज[3]. ॥ ९५ ॥ स्तवनीं तोषवोनि नृपती । प्रसन्न करीन हव्यमूर्ती[4]; । संभावना[5] यज्ञसमाप्ती । हेचि दक्षणा मागेन.' ॥ ९६ ॥ ऐसें मातेच्या वचनामृतें । अमरत्व देवूनि वासुकीतें, । मांघारोनी[6] मनपवनातें, । सत्रसदना पातला. ॥ ९७ ॥ द्वारस्थें आड करितां दंड, । देखोनि प्रदीप्त दिव्य मार्तंड[7]. । मांघारुनि[8] म्हणे, 'हा प्रचंड, । ईश्वरी पुरुष दिसताहे.' ॥ ९८ ॥ नमस्कारोनि शिरसा दंडें । म्हणे, 'स्वामी! जावें पुढें.' । मुनी प्रवेश करोनि कोडें[9] । यज्ञमंडपीं पातला. ॥ ९९ ॥ कुंडीं प्रत्यक्ष हुताशन । राजा सदस्य[10] ऋत्विजगण, । वाटे एकचि मेषवाहन[11] । अवघीं रूपें अवगला[12]. ॥ ६० ॥ कीं त्या चंद्रसूर्यप्रतिमा । तैसें देखिलें ब्राह्मणोत्तमा. । ह्त्वनीं ब्राह्मणींही ऐसी उपमा । त्या वरिष्ठा देखिली. ॥ ६१ ॥ जेंवी बळी[13]चिया यज्ञमंडपीं । कीं उपेंद्र[14] उभा ब्रह्मरूपी, । तैसा आस्तिक परमतपी । ऋत्विजगणीं देखिला. ॥ ६२ ॥ पसरोनि पवित्र पद्महस्त, । लक्षोनि समुदाय समस्त, । स्तवनीं नमनीं विनयवंत । आशीर्वचनीं अनुवादे[15]. ॥ ६३ ॥ कीं वाक्यपुष्पीं पुष्पवसंत[16] । बुद्धिसुगंधें घमघमित । प्रसन्नतेचा पारिजात । वृष्टी करी तयातें. ॥ ६४ ॥ 'प्रणम्य यज्ञनारायणा, । नमो सदस्यऋत्विजगणा, । स्वस्ति पांडवकुलभूषणा! । जय कल्याण तुज असो. ॥ ६५ ॥ [17]तुष्टिरस्तु, पुष्टिरस्तु, । धर्मैश्वर्यवृद्धिरस्तु, । सार्थकायुःसिद्धिरस्तु, । शांतिरस्तु तव प्रभो! ॥ ६६ ॥ विवेकज्ञानसमृद्धिरस्तु, । संतत हरिहरभक्तिरस्तु, । प्रतापप्राज्ञाविजयोऽस्तु, ।

१. सर्प. २. सत्य. ३. हतवीर्य, निष्फळ. ४. अग्नि. ५. प्रतिष्ठित भिक्षुकास दक्षिणादि देऊन केलेला सत्कार, गौरव. ६. मागें टाकून. ७. सूर्य. ८. मागें वळून. ९. कौतुकानें. १०. यज्ञांत कांहीं चूक होईल ती सुधारण्याविषयीं नेमलेला ऋत्विज्. ११. अग्नि. १२. आचरला. १३. बलि नामक एक बलवान् दैत्य झाला इंद्रपदप्राप्त्यर्थ यानें शंभरावा यज्ञ आरंभिला तेव्हां इंद्राचे कल्याणार्थ विष्णूनें वामनरूप घेऊन बलीपाशीं त्रिपाद भूमी मागून, त्रिविक्रमरूप घेऊन त्याला पाताळीं लोटलें. १४. विष्णु. १५. बोले. १६. वसंतऋतु. १७. तुष्टि असो, पुष्टि असो, धर्म आणि ऐश्वर्य यांची वृद्धि असो, इत्यादि आशीर्वचनें.

[1]सर्वभद्रमस्तु तव प्रभो! ॥६७॥ भवद्दुर्जयशत्रुक्षयोऽस्तु, । [2]अक्षयपदप्राप्तिरस्तु, । भूतदयाविशेषोऽस्तु, । कुशलमस्तु तव प्रभो! ॥ ६८ ॥ सर्वाभीष्टप्राप्तिरस्तु, । सर्वारिष्टशांतिरस्तु, । सततनित्यानंदभोगोऽस्तु, । शिवमस्तु तव प्रभो! ॥ ६९ ॥ निर्दोष कीर्ति अक्षय असो, । लोकापवादीं सभयता वसो, । याचकार्तीशमनीं असो, । [3]प्रशस्त बुद्धि सर्वदा. ॥ ७० ॥ निर्दयाचारीं आवडी नसो, । दुराग्रहीं दृढता नसो, । पूर्णापूर्णकर्मी नसो । असंतोष आणि [4]विकळता. ॥ ७१ ॥ [5]अहंममतेची भावना नसो, । दुष्टापराध स्मरणीं नसो, । संत महंतवचनीं नसो । अनादर आणी उपेक्षा. ॥ ७२ ॥ श्रद्धा [6]मेधा प्रज्ञा यश । विद्या बुद्धी बळ विशेष । तेज आरोग्य श्री आयुष । होवो वाढतें तुज राया! ॥ ७३ ॥ माझे [7]आशिष अनेक । फळप्रद हो तात्काळिक. । माझेंही वांच्छित एक । हो संपूर्ण तुझेनीं.' ॥ ७४ ॥ '[8]तथास्तु' ऐसें त्रिवारवचनीं । उत्तरें दिधलीं ऋषिब्राह्मणीं. । पुढती ऐकों [9]ठेले श्रवणीं । [10]वाग्विलास ऋषीचा. ॥ ७५ ॥ 'सोमयज्ञ, वरुणयज्ञ, । ब्रह्मयज्ञ, यमधर्मयज्ञ, । हरिमेध, [11]रंतिदेवाचा यज्ञ, । तत्समान तव [12]क्रतु. ॥ ७६ ॥ रामदाशरथीचा यज्ञ, । युधिष्ठिराचा महायज्ञ, । कृष्णजगदीश्वराचा यज्ञ, । तत्समान तव क्रतु. ॥ ७७ ॥ पृथुयज्ञ, पुरूरवायज्ञ, । धुंधुमारी [13]श्वेतकीयज्ञ, । हरिश्चंद्रनृपाचा यज्ञ, । तत्समान तव क्रतु. ॥ ७८ ॥ गययज्ञ, शशबिंदुयज्ञ, । वैश्रवणाचा सुमेधयज्ञ, । नृगयज्ञ, अजमीढयज्ञ, । तत्समान तव क्रतु. ॥ ७९ ॥ व्यास श्रीकृष्ण आपुल्या अंगीं, । उत्तर साधक पांडवयागीं, । त्याहून विशेष तुझा जगीं । सर्पयज्ञ वाखाणे. ॥ ८० ॥ [14]शक्ती भक्षिला निशाचरें. । राक्षस दाहिले [15]पराशरें. । तोही दृष्टांत येथें न [16]सरे । तुळावया तव यज्ञा. ॥ ८१ ॥ अग्निसूर्याहूनि सुतेज । यज्ञपरिचर्या करिते द्विज । [17]वृत्रसूदनासारिखा मज । तुझा याग दिसताहे. ॥ ८२ ॥ ऐसे ऋत्विज [18]आणीके मखीं । नाहीं ऐकिले तिहीं लोकीं । त्याचे शिष्य आपुल्या मुखीं । वेद नूतन

---

१. कल्याण असो. २. स्वर्गपद. ३. 'प्रस्तुत सिद्धि सर्वदा' असाही पाठ आहे. ४. व्याकुलता. ५. हें माझें तें माझें, ही वृत्ति. ५. वचनप्रबंध. ६. धारणाविशिष्ट बुद्धि. ७. आशीर्वाद. ८. तसें असो. ९. राहिले. १०. वचनप्रबंध. ११. पुरुकुलोत्पन्न संकृति राजाचा धाकटा मुलगा. १२. यज्ञ. १३. या राजानें अनेक यज्ञ करून शतसंवत्सरात्मक सत्र केलें. १४. शक्ति ऋषि हा वसिष्ठाचा ज्येष्ठ पुत्र. यासह वसिष्ठाच्या शतपुत्रांस कल्माषपाद नांवाच्या राक्षसानें भक्षिलें. १५. पराशर हा शक्ति ऋषीचा पुत्र. याच्या बापाला राक्षसानें भक्षिलें, म्हणून यानें राक्षससत्रास आरंभ केला आणि सांत सहस्रावधि राक्षस जाळून मारिले. १६. लागे. १७. इंद्रासारिखा. १८. दुसऱ्या.

निर्मिती. ॥ ८३ ॥ वंशानुवंशीं हस्तक माथें । न खोलविती आणिकांतें । ऐसें करोनि सांडिले मागते । न मागे ते करोनिया. ॥ ८४ ॥ दानघनाची प्रबळवृष्टी । याचकरेणु लोपली सृष्टी । पूर्णपृथ्वीचिया पृष्ठीं । हर्षांकुर माजले. ॥ ८५ ॥ तुझियाऐसा आणिके यागीं । तृप्ती नव्हे चत्वारशृंगी[1] । अनेक पुरुषीं अनेक युगीं । अपार हविर्भाग[2] होमितां. ॥ ८६ ॥ विभावसु[1], चित्रभानु[1] महात्मा । हिरण्यरेता[1] कृष्णवर्त्मा[1] । विश्वभुक् हुतभुक् वन्हि नामा । जगदांतर निवासी. ॥ ८७ ॥ शिखा प्रदक्षिणावर्त । हवि भक्षुनि परम तृप्त । जैं झाला दिसे प्रसन्नवंत । दैदीप्यमान तेजस्वी. ॥ ८८ ॥ अनंतयुगीं अनंतपुरुषीं । यागीं होमिले विशेषी । यथेष्ट तृप्ती तुझिया ऐसी । नाहीं हुताश पावला. ॥ ८९ ॥ सोम[4] ज्योतिष्टोम[5] चयन[3] । महाव्रतादि स्वर्गारोहण । शैववैष्णवमाहेश्वरयज्ञ । बहु सुवर्ण शतक्रतु[6]. ॥ ९० ॥ पौंडरीक[7] वाजपेय[3] । अश्वमेध[3] राजसूय[3] । विश्वजितादि[8] अप्रमेय । असंख्य यजिले याजकीं. ॥ ९१ ॥ त्या यज्ञकर्त्यांमाजी सहसा । गृहपती[9] नाहीं तुझ्या ऐसा । वृत्त शीळ देखोनि हर्षा । पात्र झालों बहुसाळ. ॥ ९२ ॥ खट्वांग[10], नाभाग[10], दिलीप[10] नृपती, । ययाती[10], मांधाता[10] चक्रवर्ती, । तयांची उमाणितां[11] कीर्ती । उणीव दिसे ओपाडे[12]. ॥ ९३ ॥ प्रजापाळक जीवलोकीं । दुजा तुळावया तुकीं[13] । 'नाहीं' म्हणतां कवीचे मुखीं । शंका दूषण असेना. ॥ ९४ ॥ दंडनीतीं दुसरा यम, । सत्य सदय दुसरा धर्म, । शास्त्रविद्याविखीं[14] राम, । परशुराम प्रतिज्ञे. ॥ ९५ ॥ सुवृत्तीं जैसा गंगातनय । प्रतापतेजें भूलोकसूर्य । निर्मळकीर्ती रोहिणीप्रिय[15] । प्रजारक्षणीं श्रीविष्णु. ॥ ९६ ॥ वाल्मीकितुल्य धैर्यश्रेष्ठ, । तपें जैसा श्रीवसिष्ठ । अगस्तीसारिखा बळिष्ठ, । औदार्यें दधीचीसारिखा. ॥ ९७ ॥ कृष्णातुल्य गुणसंपन्न, । प्रभुत्वें जैसा सहस्रनयन, । प्रयत्नाविषयीं उपमन्यु, । परंतु होसी भगीरथ. ॥ ९८ ॥ भारतश्रेष्ठा! परीक्षितिपुत्रा! । प्रिय हो तुज आणि तुझिया मित्रा । तुमचे स्नेहें प्रियपात्रा । प्रेम करूं आमुतें.' ॥ ९९ ॥ घनगंभीरगिरा-

---

१. अग्नि. २. यज्ञभाग. ३. यज्ञविशेष. ४. या यज्ञांत सोमलतेच्या रसाचें हवन व प्राशन करतात. ५. या यज्ञांत सोळा ऋत्विज असतात आणि सोमरसाचें हवन करतात. ६. इंद्र. ७. हा यज्ञ अकरा दिवसपर्यंत चालतो. ८. यांत यजमानानें सर्वस्वाचें दान करावें असें आहे. ९. अभ्यागताचें आतिथ्य, याग, दान, धर्म, व्रतें, इत्यादि शास्त्रोक्त कर्म करणारा गृहस्थाश्रमी पुरुष. १०. राजविशेष. ११. ताडून पाहतां. १२. अपार. १३. बरोबरीविषयीं, वजनाविषयीं. १४. विशीं. १५. चंद्र.

गजरें । सकळिकांचीं मनमयूरें । हर्षें नाचतां राजेश्वरें । अत्यादरें बोलिजेलें. ॥ १०० ॥ 'वयें बाळक दिसे नयनीं, । ज्ञानें वडील सकळांहुनी, । हा श्रेष्ठ पूज्य मजलागुनी । यज्ञमंडपीं दिसताहे. ॥ १०१ ॥ इच्छा करूनि अंतर्यामीं । आला असेल जिये[1] कामीं । तें अवश्य दिधलें पाहिजे आम्हीं । कर्मसिद्ध्यर्थ ये काळीं.' ॥ १०२ ॥ म्हणोनि कनक[2]पीठ हस्तें । देवूनि म्हणे, 'बैसिजे येथें. । पूजा अंगीकारूनि सुचित्तें । मग इच्छेतें निरोपीं. ॥ १०३ ॥ आज्ञा देसी भगवंता! । ते मी आदरें वंदीन माथां. । तुझिया सामर्थ्यें सत्रा । संकल्प पावेल सिद्धीतें. ॥ १०४ ॥ आस्तीक म्हणे, 'जया काजा । मी आलों असें, महाराजा ! । तें देईन ऐसा शब्द तुझा । नेमस्त कानीं ऐकणें. ॥ १०५ ॥ तरीच स्पर्शेन आसन, । आदरें करीन पूजाग्रहण, । नेदितां जाईन परतोन, । उभ्याउभ्यां ये काळीं.' ॥ १०६ ॥ सदस्य म्हणती, 'राजा ! परमेशा ! । ज्ञानिया प्रमाण नव्हे वयसा. । द्वितीयेचा शशांक[3] जैसा । वंद्य होय सकळांतें. ॥ १०७ ॥ प्रत्यक्ष काशीविश्वेश्वर । स्वल्पाकृती मान्य थोर, । विशाळ तिळभांडेश्वर । कोण प्रथम वंदिजे ? ॥ १०८ ॥ वडिल धोंरा नव्हे दीप । धाकुटें[4] पूज्य तुळसीरोप, । तैसें श्रेष्ठत्वाचें रूप । ज्ञान विशेष ते ठायीं. ॥ १०९ ॥ यालागीं उभा तिष्ठे मुनी । तो बैसवावा[5] स्वस्थानीं, । हा तुष्टल्या तत्क्षणीं । तक्षक पडे हुताशीं.' ॥ ११० ॥ ऐकोनि राजा बोले वचनीं, । 'तक्षक पडे हुताशनीं, । तंववरी माझे अंतःकरणीं । हर्षोत्साह असेना. ॥ १११ ॥ वैरी पडतांचि होमानळीं । सहस्रभुजा करोनि सरळी । आस्तीकमाथा पुष्पांजळी । कनकरत्नीं वोपीन. ॥ ११२ ॥ याही वेगळी जे आज्ञा । तुम्ही कराल ऋषिसर्वज्ञा ! । तेही विहित मानी, ऐशी संज्ञा । अवश्य करणें म्यां येथें.' ॥ ११३ ॥ ऋत्विज म्हणती, 'नरोत्तमा ! । तुझें वाक्य अनुल्लंघ्य[6] आम्हा. । सांडोनिया स्वकीय धामा । पलायमान तव शत्रु. ॥ ११४ ॥ प्रगट[7] सांगिजे पावकें । आणि सर्वज्ञ पौराणिकें । त्रिकाळज्ञ आपुल्या मुखें । दूरदृष्टें बोलती.' ॥ ११५ ॥ 'सर्पसत्रापासून मृत्यु । तक्षक भयें भयपीडितु । इंद्रलोका जावूनि त्वरितु । शरण गेला शक्रातें. ॥ ११६ ॥ प्रार्थोनियां सहस्रनेत्र,[8] । कंठीं झाला उत्तरीयवस्त्र.' । ऐसें सिद्धपुरुषांचें वक्त्र[9] । वृत्तांत वदे ये काळीं. ॥ ११७ ॥ 'इंद्रें अभय दिधलें होतें । पावक स्पर्शों नेदी त्यातें.' । ऐकोन राजा क्षोभला चित्तें । निग्रहेंकरोनि बो-

१. ज्या. २. सुवर्णाचा पाट. ३. चंद्र. ४. लहान. ५. 'तो बैसवावा सुखासनीं' असाही पाठ आहे. ६. न उल्लंघन करावयाजोगें. ७. स्पष्ट. ८. इंद्र. ९. मुख.

[1]लेत. ॥ ११८ ॥ 'माझा परम [2]द्वंदी सृष्टी । शक्रें दुष्टें घातला पाठीं. । तरी
इंद्रासहित [3]हव्यवाटीं । तक्षक शीघ्र पाडावा.' ॥ ११९ ॥ 'निकें' म्हणोनि
ऋत्विजगणीं । मंत्रप्रयोग केला वचनीं. । तंव इंद्रासन डळमळोनी । अधोपंथें
उतरिलें. ॥ १२० ॥ गजरेशीं [4]निर्जरनाथ । अप्सरागणीं परिवारित । विमा-
नयानीं सुशोभित । दैदीप्यमान तेजस्वी. ॥ १२१ ॥ गंधर्व गायनीं रंजवीत, ।
[5]जीमूति जवळी मूर्तिमंत, । गगनभेरी घंटासहित । नाद कानीं परिसिला.
॥ १२२ ॥ दीक्षित सदस्य याजकजनीं । अवलोकितां ऊर्ध्व वदनीं । तक्षक-
माळी [6]वज्रपाणी । अंतरिक्षीं लक्षिला. ॥ १२३ ॥ 'सहइंद्राय तक्षका' इति ।
स्वाहाशब्देंशीं गर्जती । दोघे होमा पूर्णाहुतीं । राजा प्रेरी याजका. ॥ १२४ ॥
ऋत्विज म्हणती, 'गुणैकनिधी! । हें कर्म सांग पावलें सिद्धी । आस्तिक [7]गौ-
रवुनी आधीं । [8]पूर्णकाम करावा.' ॥ १२५ ॥ हरुषें बोले राजेश्वर, । 'ब्राम्हण-
श्रेष्ठा! मागें वर.' । याचक म्हणती, 'राजया! थोर । कौतुक पुढती वर्तलें. ॥
१२६ ॥ कुंडाग्नीजवळ देखोनि दृष्टीं । इंद्रें धाक घेतला पोटीं. । तक्षक सां-
डोनि उठाउठीं, । धाकें ऊर्ध्व पळाला. ॥ १२७ ॥ गगनचुंबित जिव्हाज्वाळा ।
पासरूं धांवतां होमानळा । [9]नागोत्तरीयाचा गुंडाळा । दुरी केला देवेंद्रें. ॥
१२८ ॥ वेढा उकलोनियां हातें । तक्षक झुगारिला [10]परौतें. । [11]सुंसाट करीत
शून्यपंथें । नक्षत्रप्राय खचताहे. ॥ १२९ ॥ दक्षिणोत्तर व्यापूनि दोन्ही ।
विशाळ पसरलासे गगनीं. । [12]घर्घराटें गर्जे ध्वनी । अधोपंथें येतसे. ॥ १३० ॥
[13]विषोदकांच्या मेघधारा । पडती [14]वन्हिस्फुलिंगीं गारा. । ऊर्ध्वपुच्छ अधःशिरा ।
करोनि आला पतनार्थ.' ॥ १३१ ॥ ऐकोनि अवघीं पिटीली टाळी, । रावो
[15]घोसंडे स्वानंदजळीं. । सौती म्हणे, 'तेचि काळीं । आणीक एक वर्तलें.
॥ १३२ ॥ न देखतां सकळिकांतें । आस्तिकें पाहोनियां वरतें । तपोबळें
स्वसामर्थ्यें । अर्धपंथीं [16]रोधिलें. ॥ १३३ ॥ ऊर्ध्व उचलोनियां पाणी । तिष्ठ
[17]तिष्ठ इहीं वचनीं, । अढळ करोनि खिळिला गगनीं । [18]औत्तानपादासारिखा.'
॥ १३४ ॥ [19]येरीकडे याजकमेळीं । जयजयकार केला सकळीं. । 'तक्षक पा-
तला हो जवळी' । म्हणोनि हर्षें गर्जती. ॥ १३५ ॥ ते वेळीं म्हणती, 'भू-

---

१. बोले. २. शत्रु ३. अग्नींत. ४. इंद्र, देवांचा स्वामी. ५. मेघ. ६. इंद्र. ७. सत्कारून. ८. सफळेच्छ. ९. नागरूप अंगवस्त्राचा. १०. पलीकडे. ११. सुंसुंशब्द, निश्वास. १२. घर्घरशब्दें. १३. विषारी पाण्याचा. १४. अग्निकणीं. १५. भरून जाई. घोसंडणें म्ह० भरून खालीं सांडणें. १६. प्रतिबंध केला. १७. रहा रहा. १८. ध्रुवासारखा. १९. दुसरीकडे.

वल्लभा ! । तपस्वी तिष्टतसे उभा, । तो बैसवूनि, इच्छित लाभा । लाभे ऐसें करावें. ॥ १३६ ॥ तक्षक आकर्षूनि आम्ही । पाडीत असों इये होमीं, । आस्तिकशांतवनाचें तुम्ही । दुसरें कार्य संपादा.' ॥ १३७ ॥ संतोषोनि धरा[1]-रमण । म्हणे, 'ब्रह्मरूपा ! बोलें वचन, । मागसी तें देईन दान, । सत्य जाण त्रिवाचा.' ॥ १३८ ॥ ऐकोनि बोले भुजंगीसुत, । 'देईन म्हणसी संकल्पिला[2] अर्थु, । तरी हा समाप्त करीं क्रतु । उरग[3] आतां न पाडावे. ॥ १३९ ॥ तक्षक अथवा हो आणिक, । होमीं न जाळीं दंदशूक. । माझें मागणें हेंचि एक, । कर जोडोनि समस्तां.' ॥ १४० ॥ वचन नव्हे, शस्त्रधार । श्रवणें खोंचला[4] राजेश्वर. । म्हणे, 'ब्राह्मणा ! नमस्कार । सहस्रवार तव पायां. ॥ १४१ ॥ सुवर्ण, पृथ्वी, धेनु, रत्नें, । अपार यांचीं मोकळ्या मनें, । माझा अध्वर खंडे जेणें । ऐसिया भिडे न कोंडीं. ॥ १४२ ॥ यज्ञस्वरूपा मच्छरीरा[6] । मध्यें न सोडीं करुणाकरा[7] ! । आणीक कांहीं मागें वरा, । असाध्य तो मी देईन.' ॥ १४३ ॥ आस्तिक म्हणे, 'गा सत्यशीळा ! । दोन जिव्हा एक व्याळा[8], । पवित्र रसना[9] हे विटाळा । असत्याचिया नातळे. ॥ १४४ ॥ मागणें हें एकचि साचें, । आणि मागतां व्यभिचार[10] वाचे, । पूर्वजां पतन कुंडीं रौरवांचें[11] । विफळ होतां वाङ्नियम. ॥ १४५ ॥ कुंजरदशन[12] वाढतां पुढें । ते लोटतां, नव्हती मागिले कडे. । सज्जनवचन तेणें पाडें[13] । पालटों नेणें कल्पांतीं. ॥ १४६ ॥ सत्य रक्षावया पवित्रनरीं[14] । शरीरें विकिलीं डोंबाघरीं, । याचिलागीं अरण्यचारी[15] । पांडव आणि रघुनाथ. ॥ १४७ ॥ ऐकीं[16] भोजना दिधला बाळ, । ऐकीं[17] मांसें तुकविली तुळ, । ऐकीं[18] त्वचेची[19] खोळ । काढोनि दिधली स्वहस्तकीं. ॥ १४८ ॥ ऐकीं[20] आपणा द्विभागिलें करवतीं, । ऐकीं[21] जितचि दिधल्या अस्ती. । तूंही तयांचिये पंक्तीं । सत्वशीळ[22] धर्मात्मा ! ॥ १४९ ॥ त्याहुन कठीण हें मागणें । ऐसें कल्पिलें तुझे मनें, । तरी प्रशस्त अंतःकरणें । सार्थक करीं मम यात्रा[23]. ॥ १५० ॥ पन्नग माझें मातुळकुळ । त्यांलागीं होई अतिदयाळ । तिळतुल्य

---

१. भूप. २. मनांत धरलेला. ३. सर्प. ४. विद्ध झाला. ५. मागून घे. ६. माझें शरीर. ७. दयासागरा. ८. सर्पा. सापाला 'द्विजिव्ह' असा पर्यायशब्द आहे. ९. वाणी. १०. ठरविलेल्या विधीचें अथवा नियमाचें उल्लंघन. ११. नरकाचे. १२. हत्तीचे दांत. १३. त्याचप्रमाणें. १४. हरिश्चंद्रादिकें. १५. वनांत फिरणारे. १६. श्रियाळानें. १७. शिबीराजानें. १८. कर्णें. १९. कातडीची. २०. मयूरध्वजानें. २१. दधीचीनें. २२. समचित्त, ज्यास आपत्काळीं दुःख आणि संपत्काळीं सुख नाहीं तो. २३. आगमन.

दोषासाठीं शैल । प्रायश्चित्ताचा भोगिला. ॥ १९१ ॥ माझें आशीर्वचन घेई, । आपुला आशीर्वाद तयां देईं, । 'शेषकुळांसी अक्षय होईं' । वासुकीतें वद ऐसें. ॥ १९२ ॥ बोलिला बोल यथार्थ करी, । त्याचें द्वार राखे हरी. । क्लीबपुरुष वंध्यानारी । तैसीं इतर साधनें.' ॥ १९३ ॥ ऐकोनि आस्तिकाचीं वचनें । राजा असंतुष्ट मनें, । वारंवार तेंचि म्हणे, । 'आणीक मागें मज कांहीं. ॥ १९४ ॥ पूर्ण करीं माझा मख' । म्हणोनि प्रार्थी नरनायक. । आग्रहें वारिला ऋषि आस्तिक । बद्धांजळी तिष्ठतसे. ॥ १९५ ॥ 'मागणें हें एकचि जाण, । वि[1]राम पावो मत्प्रीत्यर्थ यज्ञ. । यावेगळी इच्छा [2]आन । तुजपासोनि असेना.' ॥ १९६ ॥ [3]भूभुज [4]भ्रूलतासंकेतें । प्रेरणा करी [5]मांत्रिकांतें, । 'तक्षक भक्ष पावकातें । होय तें करा अतिशीघ्र.' ॥ १९७ ॥ तिहीं बोढितां मंत्रशक्ती । लो[6]हकंटक गगनभित्तीं । रोंविलासे सामर्थ्य हस्तीं । कोणातेंही उपडेना. ॥ १९८ ॥ कीं विराटतरूची प्रचंड शाखा । फणींद्र केला ऋषीनें देखा, । झोंबोनि मोडितां याज्ञिकां । सढील झाली मंत्रशक्ती. ॥ १९९ ॥ ताजवा तुकितां दोन्ही बळें । आस्तिकतेज दिसे [7]आगळें. । ब्राह्मणीं जाणोनि वर्मकळे । मग नृपातें बोधिती. ॥ १६० ॥ म्हणती, 'राया ! आग्रह न कीजे,। आस्तिकवचना मान दीजे, । आमुचेही प्रार्थने भजे, । कुळदेवता मानूनि. ॥ १६१ ॥ काय यशाच्या बांधणें मोटा ? । विश्वीं झाली ख्यातप्रतिष्ठा. । शिक्षा केली परम दुष्टां । असंख्यात सर्पांतें. ॥ १६२ ॥ मूर्ख पाखांडी विवादी । अहंकारी अविचारी क्रोधी । अत्यंत आग्रही मोक्षपदीं । [8]अर्ह नव्हेत, शास्त्रार्थ. ॥ १६३ ॥ प्रतापें जाळिले अपार फणी, । मान दिधला आस्तिकवचनीं, । दोन्ही कीर्ती उभयकर्णीं । कुंडलें होतील जगाचे. ॥ १६४ ॥ प्रसन्न करोनि [9]हृदयारविंद । त्यजूनि अपूर्णतेचा खेद । आस्तिकातें देईं शब्द । वरप्रदान ये काळीं.' ॥ १६५ ॥ ऐसें बोलतां तपोधनी, । गुरूपदेश मानूनि मनीं, । राजा बोलिला [10]भद्रवचनीं, । 'हो[11] तथैव भवदाज्ञा.' ॥ १६६ ॥ 'घेईं ब्राह्मणा ! दिधला वरू' । ऐसें बोलतां राजेश्वरू, । आस्तिकें केला जयजयकारू । आणी सदस्य याजकीं. ॥ १६७ ॥ वर [12]वोपितां राजोत्तम । ब्राह्मण झाला [13]पूर्णकाम. । ऋत्विजीं मानोनि [14]यज्ञोपरम । [15]स्रुवापात्रें ठेविलीं. ॥ १६८ ॥

---

१. अंत, शेवट. २. दुसरी. ३. राजा. ४. भिंवयारूप वल्लीच्या खुणेनें. ५. मंत्रज्ञ, आचार्य. ६. लोखंडाचा कांटा. ७. अधिक, श्रेष्ठ. ८. योग्य. ९. हृदयकमल. १०. कल्याणवचनानें. ११. तुमच्या आज्ञेप्रमाणें होवो. १२. देतां. १३. सफलमनोरथ. १४. यज्ञाचा शेवट. १५. होमपात्रें.

इति श्रीआदिपर्व भारते । पुढें मोलें ध्यावया कथे । विश्वासें चित्त ठेविजे येथें । आर्तवंतीं निजलाभा. ॥ १६९ ॥ श्रीदत्तांघ्रिपद्मभ्रमर । विनवी कवी मुक्तेश्वर । ग्रंथ चाले तो बैंडिवार । संतमहंतकृपेचा. ॥ १७० ॥

अध्याय बारावा.

शौनकादि ऋषीश्वरश्रोतीं, । प्रश्न करितां पवित्रवक्त्रीं, । 'पन्नग भस्मले सर्पसत्रीं । कोण? किती? तें सांगपां.' ॥ १ ॥ सौती म्हणे, 'ऐक बोले, । वक्तृत्व जरी बैंाढ केलें, । दग्धसर्प सांगीतले । माझेनिंही न वचती. ॥ २ ॥ तथापि कांहीं एक हो! जी! । सांगेन ते ऐका सहजी, । वासुकीच्या कुळामाजी । इतुके अही भस्मले. ॥ ३ ॥ श्वेत, पीत रक्त, कृष्ण, । महाकाय, विषोल्बैण, । पंच सप्त शतानन । शैलतुल्य शरीरी. ॥ ४ ॥ कोटिशः मानस पूर्ण देख । शल, पाल, हळीमक, । कालवेग, पिच्छलक, । कौणप सकळविषधर ॥ ५ ॥ काळविष, हिरण्यबाहुक, । कक्षक, फणी, काळदंतक, । वासुकिवीर्यज मुख्य मुख्य । प्रविष्ट झाले हुताशीं. ॥ ६ ॥ त्यांचे पुत्रपौत्रसंख्या । पैद्म अैर्बुद नव्हे लेखा । जे कां पावकाचेनीं मुखा । ग्रास झाले ते सत्रीं. ॥ ७ ॥ पुच्छांडक, मंडळक, । पिंडसेक्ता, रभेणक, । उरुप, भंग, व्यगांगक, । स्वर्णवर्ण महासर्प. ॥ ८ ॥ विरोहण, शिली, शलकर, मूक, । सुकुमार, प्रवेपन, मुद्गरक, । शिशुरोमा, पावकमुख, । सुमनवेग, महाहनू. ॥ ९ ॥ इतके तक्षकाचे कुमर । प्रगट केले थोर थोर । संततीसीं काळनामा विखार । भस्म झाला हुताशीं. ॥१०॥ एरक, कुंडळ, कुमारक, । वेणी, वेणीस्कंद, बाहुक, । शृंगवेर; अणी धूर्तक, । शंखचूड, फणीराज. ॥ ११ ॥ हे कौरववीर्यज फणी । प्रविष्ट झाले हव्यवाहनीं । धृतराष्ट्राचे कुमार श्रवणीं । सांगेन तेही ऐकिजे. ॥ १२॥ वातवेग, शंकुकर्ण, । पिंगळक, सेचक, कुठारवदन, । पूर्णांगद, पूर्णमुख जाण, । प्रहास, शकुनी, दरीनामा. ॥ १३॥ अंगावह, शरण, कुमुद, । बळ, भैरव, मंड, मानद, । वेदांग, पिशक, मणिस्कंद, । श्वेतपारग, ऋषभादी. ॥१४॥ वेगवान, पिंडारक, महाहनु, । पद, राक्षस, वराक, वरुणु, । पराशर, तरुणक,

---

१. थोरपणा, मोठपणा. २. या अध्यायास 'सर्पसत्रसमाप्ति' असें नांव एका पोथींत आहे. ३. या अध्यायास आधारभूत महाभारतांतील आदिपर्वांतर्गत ५७ वा अध्याय आहे. ४. पुष्कळ. ५. उल्बण नामक विषभरित. ६. तेरावी संख्या. ७. दशकोटी. ८. गणना. ९. घास, भक्ष्य.

अरुणु, । सर्वसारंग रक्तांग. ॥ १५ ॥ आणीक नामाथिले बहुत । पुत्रपौत्रीं नामांकित । विस्तारूनि बोलतां येथ । अतिप्रसंग होतसे. ॥ १६ ॥ श्रवणीं मातुनीं विकृती । ह्मणी [1]उबग घेइजे संतीं । असो. हे दग्ध झाले किती ? । [2]काद्रवसंख्या नेणवे. ॥ १७ ॥ स्थूळपणें पर्वतप्राय । विस्तीर्ण योजनद्वय । महावीर्य [3]महाकाय । [4]हाळाहळविषतुंड. ॥ १८ ॥ [5]कामरूपी [6]कामागम । असें बळें शक्रासम । ऐसे असंख्यात झाले भस्म । सत्रीं पारीक्षिताचे. ॥ १९ ॥ [7]आस्तिकातें वोपितां वर । हर्षनिर्भर भुजंगीकुमर, । [8]न्यूनतेचा राजेश्वर । खेद सर्व विसरला. ॥ २० ॥ 'गोविंद'शब्दें गर्जोनि सकळीं । हर्षें पिटिली एकचि टाळी. । [9]प्रणीतापात्रें भूमंडळीं । [10]न्यसूनि, उठले याजक. ॥ २१ ॥ सदस्य ऋत्विज आणी मागते । वेदज्ञ जे जे आले तेथें, । अपार दक्षिणा त्यांतें । याचक इच्छेनें वांटिली. ॥ २२ ॥ [11]लोहिताक्ष [12]स्थपती जाण । जीहीं यज्ञास कथिलें कारण । त्यासि दिधलें बहुत सुवर्ण, । संतोषोनि नरेंद्रें. ॥ २३ ॥ विधिमंत्रें यथोचित । [13]अवभृथस्नान भार्येसहित । करूनि [14]क्षेत्रपाळप्रीत्यर्थ । बळिदानें वोपिलीं. ॥ २४ ॥ आसनीं बैसवूनि आस्तिक । आदरें केला कनकाभिषेक । येरू निरपेक्ष निष्कलंक । अर्थस्वार्थ असेना. ॥ २५ ॥ 'पवित्रें दर्शन द्यावें पुढती.' । येरू म्हणे, 'तथैव भविष्यति.' । पुढती प्रार्थीत नृपती, । 'विनंती ऐकें [15]द्विजवर्या ! ॥ २६ ॥ [16]वाजिमेध असे करणें, । तेवेळीं स्वामीनीं कृपा करणें.' । 'अवश्य' म्हणे संतुष्टमनें । आज्ञा घेवोनि निघाला. ॥ २७ ॥ मुक्त करूनि तक्षकनामा । सहित पावले वासुकीधामा. । ते वेळीं नागानंद व्योमा । सांठवितां अपार. ॥ २८ ॥ बैसवोनि सिंहासनीं । नागराज सह [17]कामिनी । [18]नीराजनें करूनि मूर्घ्नीं । रत्नांजुळी वोपिल्या. ॥ २९ ॥ अमरीं पूजिजे [19]इंदिरां-

---

१. कंटाळा. २. सर्प. (कद्रूत्पन्न.) ३. स्थूलदेह. ४. हलाहल हें विष आहे तोंडीं ज्यांच्या असे. ५. इष्टरूप धारण करणारे. ६. इच्छेस येईल तेथें आणि तेव्हां येणारे. ७. येथपासून अध्यायसमाप्तिपर्यंत जो कथाभाग आला आहे त्यास आधार मूळांतील ५८ व्या अध्यायाचा आहे. ८. सत्र अपूर्ण राहिल्याचा. ९. यज्ञपात्रें. १०. ठेवूनि. ११. लोहिताक्ष हा (सूत) शिल्पी होता. यानें 'तुझ्या सर्पसत्रनिवृत्तीस ब्राह्मण कारण होईल' असें राजास सांगितलें. १२. शिल्पशास्त्रवेत्ता. १३. यज्ञसमाप्तीनंतर स्त्रियेसह दीक्षासमाप्तीसाठीं जें स्नान करतात तें. १४. ग्रामदेवता. १५. ब्राह्मणश्रेष्ठ. १६. अश्वमेध. १७. स्त्री. १८. नीराजनाविधि म्हणून एक मंगलकारक कर्म आहे. ताटांत दूर्वा, पुष्पें, कमळें, अक्षता इत्यादि शुभद्रव्यें ठेवून दीप पाजळून देवाला अथवा नवऱ्याला आरतीसारखें ओंवाळतात. याचे योगें अरिष्टनिरसन होऊन उन्नति होते अशी समजूत आहे. १९. लक्ष्मीपती. (विष्णु.)

रमण । ऋषीं पूजिजे [1]चतुरानन । सिद्धगंधर्वीं पूजिजे [2]प्राण । पार्वतीचा पैं जैसा. ॥ ३० ॥ तैसे पूजोनि आस्तिकातें । वासुकी विनवी जोडिल्या हस्तें, । 'उपकारार्थ फेडावया येथें । पदार्थ कांहीं दिसेना. ॥ ३१ ॥ तुझिया ऐसा [3]पक्षपाती । आतां [4]न भूतो न भविष्यति, । पुराणसुखें राहेल कीर्ती । ऐसें कांहीं मज सांगें.' ॥ ३२ ॥ आस्तिक म्हणे, 'अवश्यक । मागणें आहे कांहीं एक.' । 'देईन' म्हणे तात्काळिक । भाक दीधली फणींद्रें. ॥ ३३ ॥ 'हें माझें आस्तिकचरित्र । पढेल पढवील ज्याचें [5]वक्त्र । श्रवण करितां ज्याचें श्रोत्र । अथवा ग्रंथसंग्रहीं. ॥ ३४ ॥ आपदीं संपदीं सहजदिनीं । सायं प्रातरहो माध्यान्हीं । आस्तिकनाम स्मरेल वाणी । [6]सकृत् अथवा असकृत ॥ ३५ ॥ तुम्हां सर्पापासोनि जगतीं । विषभय नव्हे त्यां कल्पांतीं; । दंश झालिया प्रारब्धगती । तेही आज्ञा पाळणें. ॥ ३६ ॥ विष उतरितां माझे नामीं । तात्काळ निर्विष करावें तुम्हीं, । आस्तिक स्मरती जिये [7]धामीं । तें स्थळ तुम्हीं त्यजावें. ॥ ३७ ॥ एकटा मनुष्य वनांतरीं । देखतां, माझें जो स्मरण करी, । त्यातें सांडोनियां दूरी, । शीघ्र सर्पीं पळावें. ॥ ३८ ॥ मैथुन करितां पाहेल दृष्टी । सर्पीं न लागावें तया पाठीं, । [8]आरें गिळितांही संकटीं । ते स्मरण करितां सोडणें.' ॥ ३९ ॥ ऐसें आस्तिकें मागीतलें, । सर्पीं 'अवश्य' म्हणोनि दिधलें. । वासुकीनें प्रमाण केलें । सर्व पन्नग गोंविले. ॥ ४० ॥ '[9]सर्पापसर्प, भद्रं ते. । [10]जन्मेजयस्य यज्ञांते, । आस्तिका स्मरोनि चित्तें । दूरी जावें महायशा ! ॥ ४१ ॥ आस्तिकवचनें[11]श्रवण कानीं । निवर्तेना सर्प कोणी । शतधा भग्न हो [12]मूर्ध्नी । [13]शिरीषफळासारिखें.' ॥ ४२ ॥ ते मर्यादा अद्यापि पाहीं । सर्पीं पाळिजे लोकीं तिहीं; । इयेविषयीं संशय नाहीं. । व्यासवाक्य प्रमाण. ॥ ४३ ॥ तेणें आस्तिकें तपोबळें । उद्धरोनि पूर्वज कुळें । अक्षय मोक्षपदीं सोहळे । भोगविले समस्तां. ॥ ४४ ॥ 'हें [14]आस्तिकधर्माख्यान । श्रवण करील पुण्यवर्धन । सर्व पातका करील क्षीण, । चंद्र जैसा तमातें. ॥ ४५ ॥ संस्कृत अथवा प्राकृत गिरी । कथा प्रवेशे श्रवणद्वारीं । ते हरोनि [15]दोषागारी । धर्मैश्वर्य पावती.' ॥ ४६ ॥ संपलें अद्भुत आस्तिकाख्यान । पन्नगसत्र झालें पूर्ण. । पुढा उपरिचराख्यान । व्यासोत्पत्ती [16]अवधारा. ॥ ४७ ॥

---

१. ब्रह्मा. २. शिव. ३. कैवारी. ४. झाला नाहीं व होणार नाहीं. ५. मुख. ६. एकवार. ७. गृहीं. ८. अजगरें. ९. 'सर्प हो ! तुम्हीं येथून जावें. तुमचें कल्याण असो !' १०. जन्मेजयाच्या सत्रामध्यें. ११. श्रवण (करोनि). १२. मस्तकीं. १३. सिताफळ (शिशवृक्षफल). १४. ही फलश्रुति आहे. १५. दोषांचें घर. १६. ऐका.

इति श्रीभारतकथागर । आदिपर्व रससागर । सेवा म्हणे कविकिंकर । मुक्तेश्वर श्रोतयां. ॥ ४८ ॥

अध्याय तेरावा.

सौती सांगे नैमिषारण्यीं[1] । सर्पसत्र संपतां क्षणीं । शिष्यांसहित **व्यास**मुनी । कृपेनें आले त्या ठायां. ॥ १ ॥ देखोनि साष्टांगनमस्कार[2] । करिता झाला राजेश्वर, । कनकासनीं पूजोपचार । निवेदिले[3] सद्भावें. ॥ २ ॥ चरणांबुजीं न्यसोनि[4] माथा । म्हणे, 'पूर्वजा श्रीगुरुनाथा ! । माझिया पूर्वजांची कथा । अद्यापि नाहीं परिसिली. ॥ ३ ॥ त्यांचें चरित्र गुणार्णवा । साठि लक्ष प्रबंध तुवां, । रचिला, त्यामाजि मानवां । लक्ष एक दीधलें. ॥ ४ ॥ तें मी ऐकावया श्रवणीं । बहुकाळ आर्तीच्या अनुष्ठानीं, । फळ द्यावया कृपेंकरुनी । आजि आलासि तूं येथें. ॥ ५ ॥ तरी तें आपुलेनि मुखें, । देईं आवडीचें भातुकें.[5]' । ऐसें ऐकोनि कवतुकें । वेदव्यास[6] कृपाळु ॥ ६ ॥ संतोषोनि, परम सुखें । म्हणे, 'वैशंपायना ! ऐकें । जैसें तुवां माझेनि मुखें । श्रवण केलें **भारत**. ॥ ७ ॥ तैसें साद्यंत विस्तारी । जन्मेजयाचे[7] श्रवणीं करीं.' । महाप्रसाद म्हणोनि शिरीं । 'आज्ञा'[8] येरें वंदिली. ॥ ८ ॥ पावोनि पूजेचा संतोष । आश्रमा गेला वेदव्यास. । वैशंपायन धुराधीश । श्रोते वक्ते बैसले. ॥ ९ ॥ सदस्य समर्थ ऋषीश्वर । ब्रह्मक्षेत्री राजकुमर । ऐकों ठेले अतिसादर । सभास्थानीं नृपाचे. ॥ १० ॥ स्थिरासनीं चितारहित । सात्विक अर्थज्ञ प्रेमभरित । कथाश्रवणीं नित्यव्रतस्थ । वरी उदार सर्वस्वें, ॥ ११ ॥ जितेंद्रिय सदाचारी । क्षमाशील परोपकारी । परगुण परीक्षा सुविचारी । दयावंत सर्वदा, ॥ १२ ॥ इहीं लक्षणीं जे पुरते । श्रोते ऐसें बोलती त्यांतें, । ग्रंथींचा अर्थ काढूनि हातें । हृदयीं लेऊं जाणती. ॥ १३ ॥ त्यांहीं लिहिलें शासनपत्र । जेंवि पाषाणीं कोरिलें चित्र, । कीं विंधिलें घटिकायंत्र । मिळो नेणे कल्पांतीं ॥ १४ ॥ वाचोनि अभिषेकपात्रा पाडें । ग-

---

१. हें कुरुदेशाजवळ एक मोठें पवित्र अरण्य आहे. येथें सूतानें शौनकादिक मुनिजनांस पुराणकथन केलें. 'एका निमिषांत या अरण्यामध्यें विष्णूनें दानवबलाचा नाश केला म्हणून यास नैमिषारण्य म्हणतात' असें वाराहपुराणांत वर्णन आहे. २. दोन हात, दोन पाय, दोन गुडघे, उर व भाळ हीं अष्टांगें भूमीस लावून केलेला नमस्कार. ३. अर्पण केले. ४. ठेवोनि. ५. मुलांनीं भक्षण करण्यास योग्य (लाडु, मेवा इत्यादिक) ६. यानें वेदांचे विभाग केले म्हणून यास 'वेदव्यास' म्हणतात. ७. राजा जनमेजय. ८. आज्ञापत्र.

ळोनि होय कोरडें । पद्मपत्रीं पडे न पडे । तैसा ढळे घनबिंदु. ॥ १५ ॥ रोंत्रोनि उपडितां दाभणा । छिद्र शोधितां न दिसे कोणा । हृदयशून्य तैसें जाणा । अनधिकारी अश्रोते. ॥ १६ ॥ तुंबीफळ बुडविलें जळीं, । राहे जंव धरिलें करतळीं, । रोधिलें चित्त घे उसाळी । कथा संपतां अवलोकीं. ॥१७॥ स्वातीतोयबिंदुकणिके । शुक्तीं मुक्ताफळचि पिके, । कीं उदकीं सिंतोडा न देखे, । तैल जैसें विस्तारे. ॥ १८ ॥ तैसा श्रवणीं पडतां शब्द, । अर्थगर्भ वाढे विशद. । प्रतिफळीं प्रसवे बोध, । सिंधु जैसा लक्ष्मीतें. ॥ १९ ॥ ऐसिया समर्थ श्रोतियां । मान केला बैसावया, । अश्रोते अनधिकारियां । ठाव तेथें न मिळेची ॥ २० ॥ गंधपुष्पादिक पूजा । आदरें करूनि समस्तां द्विजां, । प्रीतीनें प्रसन्न करितां राजा । वैशंपायन अनुवादे. ॥ २१ ॥ गुरुविप्रांसि करूनि नमन, । स्मरोनियां श्रीकृष्णचरण, । म्हणे, 'राजया ! सावधान । परीस कथा वडिलांची. ॥ २२ ॥ शापें पांडूनें सेविलें वन, । तेथें जन्मले पांचही जण. । पिता निर्मालिया दीन । होवूनि नगरा पातले. ॥ २३ ॥ रूप विद्या पराक्रम गुणीं । विशेष म्हणोनि वर्णितां जनीं, । मत्सर वाढविता झाला मनीं । दुर्योधन दुरात्मा. ॥ २४ ॥ विष अनळ अरण्यवस्ती । भोगोनि वांचले, दैवगती. । सैंवरीं जिंतिली महासती । याज्ञसेनी प्रतापें. ॥ २५ ॥ हें ऐकोनि कौरवराजें । हृदयीं मानूनि लोकलाजे, । शांतवूनि अर्धराज्यें । इंद्रप्रस्थीं ठेविलें. ॥ २६ ॥ राजसूयज्ञ संपदा, । मयसभेच्या अपमानखेदा, । देखोनि दुर्योधन विषादा, । पुढतीं चढला बहुसाल ॥ २७ ॥ कर्ण बंधु शकुनी सहीत । आरंभूनि कपटद्यूत, । ऐश्वर्य हिरोनि समस्त, । पांडव वना दवडिले. ॥ २८ ॥ अज्ञातवास सहित तेरा । वर्षें क्रमूनियां, चतुरा ! । राज्यभाग मागतां, निंकुरा । कौरव आले तेकाळीं. ॥ २९ ॥ भीष्म द्रोण विकर्ण विदुर । संजय आणि यादवेश्वर । यांचे हृदयीं तुटोनि वैर, । बंधुभावें वर्तावें. ॥ ३० ॥ कर्ण शकुनी दुःशासन । [11]द्रौणी राजा सुयोधन । यांचे पोटीं वैर दारुण । कुळक्षयातें वाढविणें'. ॥ ३१ ॥ म्हणोनि [12]सर्वभूतांतकर । युद्ध मांडिलें [13]घोरंदर, । अठरा अक्षौहिणी वीर । संहारिले दोंभागीं ॥ ३२ ॥ बंधूंसहीत दुर्योधन । गदायुद्धीं पावला [14]निर्धन. । [15]सार्वभौम ऐश्वर्यसदन । पां-

---

१. भोंपळा. २. उडी. (बंधमुक्त होण्यासाठीं). ३. स्पष्ट. ४. आदिपर्व अध्याय ६१ पहा. ५. दमसुनीच्या शापानें. ६. मरण पावल्यावर. ७. द्रौपदी. ८. दुःशासन. ९. निकरास, हटातटास. १०. कृष्ण. ११. द्रोणपुत्र अश्वत्थामा. १२. सर्व प्राण्यांचा संहार करणारें. १३. अतिघोर. १४. मरण. १५. सर्व पृथ्वीचे राजे.

डव झाले तेकाळीं. ॥ ३३ ॥ तें हें भारत[1] महदाख्यान । स्वमुखें कृष्णद्वैपायन । वदला, याचेनि श्रवणें जाण, । कलिकल्मषें[2] नाशती. ॥ ३४ ॥ ब्रह्महत्यादि पापरासी । श्रवणें जळती क्षणार्धेंसी; । अश्वमेधादि सुकृतें यासी । फळ घेवूनि तिष्ठती. ॥ ३५ ॥ जपतप योग याग दान । वेद शास्त्र तीर्थाटन । व्रतादिक बहु साधनीं शीणें[3] । नलगे करणें साधकीं[4]. ॥ ३६ ॥ दर्शन जनन मरण स्मरण । मोक्ष देती चत्वारी स्थान, । तेही ऐकें कोण कोण । जे पुराणीं बोलिले. ॥ ३७ ॥ चिदंबर कमळालय काशी । त्रिनामल्ल दक्षिणदेशीं । बोलिलीं, जरी, घडती सायासीं । तरीच फळ पाविजे. ॥ ३८ ॥ इयें भारत नगरहाटीं[5] । मुक्ती विकती श्रवणासाठीं । ऐसी व्यासमुनीची गोष्टी । नये म्हणतां महादोष. ॥ ३९ ॥ जय[6] काम इतिहासातें । ऐकतां जी जी कामना ज्यातें । तें पूर्ण होय येथें, । असंदेह त्रिवाचा. ॥ ४० ॥ ऐसा भारतश्रवणमहिमा । परिसतां आल्हाद राजोत्तमा! । नमस्कारोनि चरणपद्मा । वैशंपायन विनवीत. ॥ ४१ ॥ 'संक्षेपें भारतवस्त्राची घडी । दावोनि ग्राहिकां[7] लावोनि गोडी, । ते उकलोनि विस्तार वाढी । हात घालीं पर्वाचे. ॥ ४२ ॥ पाटी समसुती साजरिया । नानाख्यानें चौकडिया । नवरस[8] रंगीं सावलिया । उघड दृष्टी दाखवी. ॥ ४३ ॥ आदिपासूनि[9] स्वर्गारोहण । अठरा हातांचें[10] प्रमाण, । मोजून देई धडुतेपण[11] । भणगां[12] आम्हां, दातया!' ॥ ४४ ॥ ऐकोनि नरेंद्राचें वचन, । वैशंपायन हास्यवदन. । म्हणे, 'श्रोता विचक्षण[13] । नाहीं ऐसा देखिला. ॥ ४५ ॥ [14]पैरिसें आतां सुनिश्चळ । राजा उपरिचर धर्मशीळ । चैद्यदेशींचा वसुनृपाळ । परम मित्र इंद्राचा. ॥ ४६ ॥ तेणें येवोनि तपोवना, । त्यागोनियां धनुष्यबाणा, । वेढोनि चीरवल्कवसना, । तपश्चर्ये बैसला. ॥ ४७ ॥ फल मूळ तोयें[15] वर्जित, । जितेंद्रियें[16] नित्य नेमस्त, । उभयत्यागें सुशोभित । विरक्तीरंगें विराजे. ॥ ४८ ॥ खंडतर[17] देखोनियां तप । अत्यादरें अमराधिप । आंगें येवूनि त्या समीप । शांतवीतसे वसूतें. ॥ ४९ ॥ 'दंडूं नको स्वदेहातें, । पाहिजे तें, सांग मातें । धराइंद्रत्व दिधलें तूतें । मजसमान सुख भोगीं. ॥ ५० ॥ वेढून रविरश्मि पटोळा[18] । समुद्रावरण [19]कटिमेखळा । चंद्रमंडळ भांग टिळा ।

१. आदिपर्व अध्याय ६२ पहा. २. कलियुगांतील पापें. ३. श्रम. ४. कार्यसिद्धीविषयीं उत्सुक पुरुषानें. ५. बाजारांत. ६. भारत. ७. घेणारांस. ८. शृंगार, वीर, करुण, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र आणि शांत हे नऊ मनोभाव. ९. आदिपर्वापासून. १०. हस्तरूप पर्वें. ११. लुगडीं. १२. भिकारी. १३. पंडित. १४. आदिपर्व, अध्याय ६३ पहा. १५. उदक. १६. इंद्रियें जिंकिलीं आहेत असा. १७. अतितीव्र. १८. पाटांव. १९. कमरपट्टा.

शेष वासुकी नेपुरें. ॥ ९१ ॥ ऐसी शृंगारूनि धरणी । तुज म्यां वोपिली भोगेंपत्नी । पतिव्रता तुझ्या सदनीं । भोग प्रसवो बहुकाळ. ॥ ९२ ॥. ईये स्फटिकमय विमानीं । आरूढोनि सहकामिनी । क्रीडा विहार करी गगनीं, । नानालोकीं मनेच्छा. ॥ ९३ ॥ वैजयंती पंद्ममाळा । सदा अम्लान लेईं गळां,। ईतें अवलोकितां डोळां । पराभवती अरिकुळें. ॥ ९४ ॥ घेईं वैणवीयष्टिकादंड । इंद्रकेतु नाम दृढ । याचेनि दर्शनें पूजनें वाढ। ऐश्वर्याचा नित्य नवा. ॥ ९५ ॥ हा संवत्सराचे आदि । इंद्रध्वज पुष्प गंधी । इंद्रप्रीत्यर्थ पूजितां सिद्धी । राज्यलाभ क्षत्रियां. ॥ ९६ ॥ चैद्यदेश पवित्र भूमी । प्रजा निरत सदा धर्मी. । तेथिंचे राजधानीच्या धामीं । वास्तव्य तुवां करावें. ॥ ९७ ॥ हें दुःखदोषातीत भुवन, । सदा स्वकाळीं वर्षे घन, । फळें धान्यें रत्न सुवर्ण । समान पिके धरित्री. ॥ ९८ ॥ धेनु आणि सरिता सकळी । सारख्या स्रवती क्षीरजळीं, । रोग दरिद्रचि मुळीं । वार्ता येथें नेणिजे. ॥ ९९ ॥ वृक्ष आणी गृहस्थ दाते । कल्पद्रुमासारिखे येथें । इच्छिती तयाचेनि आर्ते । फळादानीं वदान्य. ॥ ६० ॥ येथें करूनियां सुखवस्ती । पाळोनियां सर्व जगती, । याही वेगळी इच्छा चित्तीं । ते मी सर्व पुरवीन.' ॥ ६१ ॥ ऐसा देवूनि उचित वर । अमरभुवना गेला इंद्र. । चैद्यदेशी राजेश्वर । सुंरंवाडला संतोषें. ॥ ६२ ॥ प्रजा पाळी पवित्र धर्मे, । क्षमा पावे क्षमागरिमें, । कीर्ती सुकृतीं भरलीं धामें । मानवांचीं देवांचीं. ॥ ६३ ॥ तयासी झाले पांच कुमर । पितयातुल्य गुणसागर । त्यांचीं नामें कर्णगोचर । करूं तूतें गुणवर्या ! ॥ ६४ ॥ बृहद्रथ पहिला जाण, । प्रत्यग्रह, कुशांब सगुण, । चवथिया नाम मणिवाहन, । विमळ तो पांचवा. ॥ ६५ ॥ पांचही इंद्रातुल्य नृपती । वीर्य शौर्य बळ संपत्ती, । वसुपुत्र वसुमती । भोगिते झाले प्रतापें. ॥ ६६ ॥ कुमरीं आपुलेनि अभिधानें । नगरें पुरें बहु पाटनें, । आणीका देशीं राज्यस्थानें । रचिलीं असती अद्यापि. ॥ ६७ ॥

---

१. पैंजण. २. पट्टाभिषिक्त स्त्रीशिवाय जी अन्य भोग्य स्त्री ती. ३. हा. ४. विजयहेतु, रणांत जय देण्यास कारणीभूत अशी. ५. पंकजमाला. ६. वेळवाची, वेणूची काठी. ७. इंद्राचें निशाण. या संबंधानें आदिपर्व, अध्याय ६३ श्लो० १७-२४ व त्यांवरील टीका पाहण्यासारखी आहे. वर्षप्रतिपदेस दारापुढें गुढी उभारण्याचा जो महाराष्ट्रांत प्रचार आहे तोच इंद्रध्वजोत्सव असावा असें दिसतें. ८. उदार. ९. पृथ्वी. १०. राहिला. ११. मोठेपणा. १२. 'विमल' असें मूळग्रंथांत नांव आढळत नाहीं. तसेंच कुशांब आणि मणिवाहन हे एकच. भारतांत बृहद्रथ, प्रत्यग्रह, कुशांब (मणिवाहन), मावेल्ल आणि यदु अशीं पांच नांवें दिलीं आहेत. (अध्याय ६३, श्लो० ३०-३१पहा.) १३. पृथ्वी.

पुष्पकीं बैसोनि सपरिचर[1] । पाहती लोक लोकांतर. । नामें ठेविलीं 'उपरिचर' । लोकपाळीं तयांचीं. ॥ ६८ ॥ आदरें प्रतिसंवत्सरीं । इंद्रध्वजाचें पूजन करी. । तोचि दंडक आझूनि वरी । गुढिया चैत्रीं पाडवा. ॥ ६९ ॥ वसुनगरापुढें पाहे । शुक्तिमती नदी वाहे. । तिसी कोंडोनि दुराग्रहें । कामाचारीं प्रवर्तत ॥ ७० ॥ कोळाहळनाम गिरी । सरिता भोगी बळात्कारी; । रायें जाणोनि पादप्रहरीं । पर्वत कडे टाकिला. ॥ ७१ ॥ मुक्त झाला जळप्रवाहो । नदी संतुष्टमानसा हो, । प्रगट करूनि प्रमदादेहो[2] । रायासमीप पातली. ॥ ७२ ॥ स्तवनीं पुजोनि राजेश्वर । पर्वतवीर्यें अतिसुंदर । एक कन्या एक कुमर । दोन्हीं दिधलीं रायातें. ॥ ७३ ॥ लक्षण परीक्षूनि सुमती । पुत्र केला 'सेनापती' । पत्नी करूनि ठेविली यौवती[3] । गिरिका नाम्नी गिरिकन्या ॥ ७४ ॥ तिसीं वर्ततां यथासुखें । नाना उपभोग कौतुकें । शृंगारवनीं सदनीं देखें । सुरतानंदें क्रीडत. ॥ ७५ ॥ ऋतुस्नात झालिया युवती । प्राप्त झाली पितृतिथी । पूर्वजीं अंतरिक्षगती । मांसभोजन इच्छिलें. ॥ ७६ ॥ त्यालागीं घेवूनि धनुष्यबाण । वनोपवनीं करूनि अटन[4] । वृक्षच्छायेसि बैसतां, मदन । जाणीतला मानसीं. ॥ ७७ ॥ गृहीं ऋतुस्नात रामा । लावण्यगुणी स्त्रियेची प्रतिमा । तिच्या स्मरोनि सुखसंभ्रमा[5] । परमविव्हळ काननीं. ॥ ७८ ॥ आठवितां संयोगदुःख, । वीर्य सुटलें अधोमुख. । पडों नेदी तात्कालिक । वृक्षपर्णीं[6] धरियेलें ॥ ७९ ॥ म्हणे, 'हें माझें अमोघ[7] रेत । सहसा करूं नयें व्यर्थ; । गृहीं भार्या आर्तभूत । तिसीं दिधलें पाहिजे.' ॥ ८० ॥ भोंवतें अवलोकुनि कक्षीं । पाचारिला श्येनपक्षी । त्यासि म्हणे, 'मृगशावाक्षी[8] । गृहीं माझी प्रियकांता. ॥ ८१ ॥ चंचुनें धरोनि रेतद्रोण, । प्रवेशोनि राजभुवन, । तिच्या हस्तकीं निवेदून[9] । शीघ्र येईं मागुता.' ॥ ८२ ॥ गृध्र वंदुनि राजवचना । चंचुसांडसीं[10] वीर्यद्रोणा । धरूनि आक्रमितां गगना, । इतरपक्षीं लक्षिलें. ॥ ८३ ॥ म्हणती, 'आमिष[11] नेतां बरवें, । बहुतीं बळें हिरोनि घ्यावें, । म्हणोनि धाविन्नले अघवे[12]. । तुंडयुद्ध मांडिलें. ॥ ८४ ॥ परस्परें अंगकवळी । होतां रेत सांडलें तळीं. । पडतां यमुनामध्यजळीं । तें मच्छीनें ग्रासिलें.॥८५॥ अद्रिकानामें अप्सरा थोरी । ब्रह्मशापें यमुनाचरी[13] । मच्छरूपें बहुकाळवरी । नद्योदकीं तळपत[14]. ॥ ८६ ॥ तिच्या उदरीं पडोनि रेत । वाढों लागलें उदरा-

१. सेवकांसहवर्तमान. २. स्त्रीरूप. ३. स्त्री. ४. भ्रमण. ५. सुखविलासां. ६. वृक्षाचे पानावर. ७. फलदायक. ८. मृगबाललोचना. ९. देऊन. १०. चिमट्यानें. ११. मांस. १२. सर्व. १३. मत्स्यी. १४. चमकत.

आंत. । दशमास लोटल्या तेथ । अद्भुत वर्तलें. ॥ ८७ ॥ मेच्छजीवीं पसरोनि जाळें । तीच मच्छी गाळिली बळें. । थडिये सांडोनि मासागळे । देह देखोनी तोषती. ॥ ८८ ॥ विदारितां शस्त्रधारीं । जावळीं बाळें मच्छोदरीं, । एक कुमर एक कुमरी । देखोनि, करिती आश्चर्य. ॥ ८९ ॥ तीं बाळकें घेवोनि हातीं । दाश पातला महेंद्राप्रती, । जोहारूनि म्हणे, 'नृपती ! । मच्छजात अवलोकीं.' ॥ ९० ॥ उपरिचर वसुधापाळें । अवलोकूनि दोन्हीं बाळें, । संतोषोनि अतिस्नेहाळें । बाळ भूषणें लेवविलीं. ॥ ९१ ॥ पुढती मोहलिया चित्तें । घेता झाला पैं पुत्रातें. । कन्या परतोनि दिधली त्यातें । म्हणे, 'हे पाळीं कैवर्ता!' ॥ ९२ ॥ मच्छनाम त्या पुत्रासी । ठेवूनि राजा मत्सदेशीं । केला, पुढें त्याचिया वंशीं । मत्स राजे जन्मले. ॥ ९३ ॥ अद्रिका शापमुक्त झाली । दिव्य देह पावोनि वहिली । सिद्धचारणपंथीं गेली, । अप्सरा लोकीं ठाकुनी. ॥ ९४ ॥ मच्छगंधीनें द्रवली वपु, । म्हणोनि ने घे उपरिचरनृपु. । दाशराजा अतिसंतृप्तु । तेणें कन्या पाळिली. ॥ ९५ ॥ 'सत्यवती' पावोनि नाम, । सुखें वसवी पितृधाम, । रूपें सत्त्वगुणें परम । शुभलक्षणें साजिरीं. ॥ ९६ ॥ पितृआज्ञा वंदोनि कुमरी । नौका रक्षी यमुनातीरीं; । अकस्मात एके अवसरीं । तीर्थयात्राउद्देशें, ॥ ९७ ॥ ऋषी पराशर पातला तेथें, । नेयीं म्हणतां परपारातें, । नौकारूढ करूनि त्यातें । मध्यभागा जंव आणी, ॥ ९८ ॥ लाधला असतां अतिएकांत । हृदयीं अवतरला काम मन्मथ. । होवूनियां संगासक्त । केशपादांत विलोकी. ॥ ९९ ॥ इंदिरावरश्यामांगना, । आकर्णांत विशालनयना । बिंबाधरा चंद्रवदना । कोमलांगी रंभोरु. ॥ १०० ॥ जाणीतली, 'वासुकीकन्या । होईल सर्व लोकांत मान्या । माझिया पवित्ररेतधान्या । होय सुभूमी निर्धारें.' ॥ १०१ ॥ तीतें अवलोकितां नयनें । हृदय भेदिलें पंचबाणें । म्हणे, 'अभुक्त अबले ! देणें । भोगभिक्षा येकाळीं. ॥ १०२ ॥ आजिचा पुण्यकाळ उदित, । याचक महापात्र मी येथ, । यमुनाद्वीप सुक्षेत्र, । देहदान त्वां कीजे. ॥ १०३ ॥ वन्हीनें दग्धिलें निववावें, । सर्पें दंशिलें जीववावें, । क्षुधेनें पीडिलें तोषवावें, । इच्छापानें भोजनीं. ॥ १०४ ॥ तयाचें ऐसें हेंही जाण, । आर्तीं द्यावें अवश्य दान, । तेणें कोटी महायज्ञ । केले

१. धीवरानें, कोळ्यानें. २. कोळी. ३. वंदन करून. ४. कोळ्या. ५. तात्कालिक. ६. कैवर्तांचा (कोळ्यांचा) राजा. ७. मानुनि. ८. उत्पन्न झाला. ९. निळ्या कमळाप्रमाणें श्यामवर्ण. १०. तोंडल्यासारखे अधर. ११. केळीसारख्या मांड्या जिच्या ती. १२. मदनानें. १३. हे स्त्रिये !

होती निश्चयें. ॥ १०५ ॥ स्मरें[1] विस्मरणाच्या डोहीं । मातें बुडविलें ये समयीं, । अंकारूढ करोनि नेईं । रेतपाता परपारा.' ॥१०६॥ येरी विनवी, 'ऋषिवर्या ! । केंवी आचरावी अविहितचर्या[2]? । पुढें दूषण विवाहकार्या । लागे तें तंव न करावें. ॥ १०७ ॥ अंगना देहाचि विक्रेयवस्तु । हा श्रेष्ठाचार अनादि पंथु; । पुढें ग्राहीक न लावी हातु । कुमारीत्व भंगतां. ॥१०८॥ वरी दिवसाचा प्रथमप्रहर, । उभयतटाकीं[3] नारीनर; । रहस्य[4] होतां दृष्टिगोचर । महा अनर्थ आदळे. ॥१०९॥ मागोनियां दाशराजासी । मातें करणें स्वकीय दासी.' । येरु म्हणे, 'या विलंबासी । काज नाहीं आम्हुतें. ॥ ११० ॥ म्हणसी पाहती नारी नर । तरी हा देखें चमत्कार,' । म्हणोनि पाडिलें अतिनीहार[5] । धूमाकार तिमोंघ[6]. ॥ १११ ॥ 'लोकीं बोलिजे 'मत्स्यगंधा,' । माझेनि वरें 'योजनगंधा'[7] । होय, तुझिया देहसुगंधा । आसक्त होती षट्पद[8]. ॥११२॥ अंगसंग झालिया माझा । कुमारीभाव न भंगे तुझा, । तूतें वरील महाराजा । चक्रवर्ती[9] निर्धारें[10].' ॥११३॥ निबिडनीहारें[11] लोपला दिवस, । अंगीं उदेला दिव्य सुवास, । म्हणे, 'हा परम पुरुष । ईश्वरची दुसरा.' ॥११४॥ मौन्य अवलंबोनि वदना । त्यागूनि आशंकेच्या वसना । अनुसरली ऋषीचे वचना, । मनोभावें तेकाळीं. ॥ ११५ ॥ पूर्ण करोनि मनोरथ । निघता झाला शक्तिसुत[12] । अमोघवीर्य बाळादित्य[13] । प्रगटे तैसा तेकाळीं. ॥ ११६ ॥ षड्गुणैश्वर्यसंपूर्ण[14] । जन्म पावला **व्यास** भगवान, । जो द्विभुज **नारायण** । एकानन[15] विरिंची[16]. ॥ ११७ ॥ आभाळलोचन महेशान[17], । पुराणसरिता[18] रत्नासन, । उपजत युवा हुताशन[19] । दाहकत्व पैं जैसा. ॥ ११८ ॥ तैसा उपजत प्रौढज्ञानी, । नमस्कारोनि आदरें जननी, । आज्ञा मागे कर जोडोनी, । तपश्चर्ये जावया. ॥ ११९ ॥ माता बोले स्नेहभरित, । 'पुरलें नाहीं दर्शन आर्त.' । पुत्र म्हणे, 'स्मरतां त्वरित । भेटी तात्काळीं म्यां देणें'. ॥ १२० ॥ ऐसा संकेत सांगोनि वेगें । **व्यास** गेला योगमार्गें. । कुमारीत्व पावोनि अंगें । येरी ठेली स्वस्थानीं. ॥ १२१ ॥ यमुनाद्वीपीं[20] झालें ज-

---

१. मदनानें. २. अयोग्य आचरण. ३. तीरीं. ४. सुरत, मैथुन. ५. पुष्कळ दंव. ६. दाट काळोख. ७. एक योजनपर्यंत हिच्या शरीराचा सुगंध जात असे, म्हणून 'योजनगंधा' हें नांव पडलें. (अध्याय ६३ श्लोक ८३.) ८. भ्रमर. ९. सार्वभौम. १०. निश्चयें. ११. दाट धुक्यामुळें. १२. पराशर, शक्तिमुनीचा पुत्र. १३. बालसूर्य. १४. समग्र ऐश्वर्य, समग्र धर्म, समग्र यश, समग्र श्री, समग्र ज्ञान, आणि समग्र वैराग्य या सहा गुणांनीं परिपूर्ण. १५. एकमुख. १६. ब्रह्मदेव. १७. महादेव. १८. विष्णु. १९. अग्नि. २०. यमुनेच्या बेटांत. (अध्याय ६३ श्लोक ८६.)

नन । यालागीं नाम द्वैपायन. । वेदार्थ प्रकाशी म्हणोन । वेदव्यास बोलिजे. ॥ १२२ ॥ भारतलक्षण पंचम वेद । सर्वार्थींसीं करूनि विशद, । शिष्यपुत्रासीं केला बोध । द्वैपायनें सर्वज्ञें. ॥ १२३ ॥ सुमंतु जैमिनी पै तिसरा । गालव आणि संजयो चतुरा । पांच विजया आत्मकुमरा । ज्ञान केलें शुकातें. ॥ १२४ ॥ कौरवान्वय विशाळनदी । खंडिली विचित्रवीर्यसंधी, । तेणें सामर्थ्यें जलसमृद्धी । वाहती केली प्रतापें. ॥ १२५ ॥ विष्णुपर्वतापासोनि उदित । गुणसमुद्रा ! तुजपर्यंत, । प्रवाह पावे तो निश्चित । धर्मव्यासचरणाचा. ॥ १२६ ॥ ऐसिया-परी व्यासोत्पत्ती । तुज म्यां परिसविली नृपती ! । अंशावतार जन्मले क्षिती । तेही आतां अवधारीं.' ॥ १२७ ॥ इति आदिपर्वकथा भारती, । मुक्तेश्वर अव-धूतमूर्ती, । तत्प्रसादें श्रोतयांप्रती । कविकिंकर अनुवादे. ॥ १२८ ॥

अध्याय चौदावा.

'परीक्षितीकुरुनंदना ! । जनमेजया ! गुणनिधाना ! । अंशावतारा निरोपणा । ऐक सांगेन संक्षेपें. ॥ १ ॥ तीनसप्तक वेळा धरणी । निक्षेत्री करूनि आपुल्या बाणीं । भार्गवराम अनुष्ठानीं । महेंद्रपर्वतीं बैसला. ॥ २ ॥ सोमसूर्यादि राजवंश । संततीविणें पडिला वोसे, । तेवेळीं ब्राह्मण ऋषी तापस । रांजांगनीं प्रार्थिले. ॥ ३ ॥ सांडूनि उभयतां कामबुद्धी । केवळ संतानहेतुसिद्धी । वीर्य-दान मागोनि वृद्धी । राजवंश वाढविले. ॥ ४ ॥ ब्रह्मबीजें ब्रह्मक्षेत्रीं । जन्मले तेही सर्वधात्रीं, । आक्रमूनि अतिपवित्रीं । वसती केली विवेकें. ॥ ५ ॥ पृथु-प्रियव्रताचे धर्म । जगीं वाढविले निःसीम. । इच्छिलें फळ यज्ञधूम । स्वर्ग भेदूनि आणिती. ॥ ६ ॥ गाई ब्राह्मण आणि साधु । आदरें पावले परमानंदु. । न्यायें पाळणें प्रजातें खेदु । जगाबाहेर दवडिला. ॥ ७ ॥ यावरी राक्षस दानव दैत्य । प्रबळ झाले अत्यद्भुत. । तिहीं सत्य पाताळ मृत्य । आटोपिले निजबळें. ॥ ८ ॥ परस्त्री परद्रव्य परहिंसन, । ब्राह्मणछळणा हेळना अवमान, । अभक्ष्य-भक्ष अपेयपान । अधर्माचार वाढला. ॥ ९ ॥ स्वयें स्वस्थळें सांडिलीं विबुधीं ।

---

१. वेदांचा शाखाभेदेंकरून विस्तार केला, म्हणून 'व्यास' असें नांव पडलें. (अध्याय ६३ श्लोक ८८.) २. सुमंत जैमिनी गालव इत्यादि व शुक हा पुत्र. ३. मूळ ग्रंथांत 'पैल' असें नांव आहे. ४. कौरववंश. ५. व्यासाची उत्पत्ति. ६. देवांचे अंशांनीं झालेले अवतार. ७. एकवीस. (अध्याय ६४ श्लोक ४-५.) ८. निःक्षत्रिय. ९. ओस, ओसाड. १०. राजस्त्रियांनीं. ११. देवांनीं.

सांपडले ते सूदले[1] बंदी. । मानव लोक लक्षावधी । निर्मूळ केले भक्षणें.॥१०॥ रूप धरूनियां कर्कशा । नानापरी बहु तापसां । छळितां, पावोनि परम त्रासा, । प्राण बहुतीं त्यागिले. ॥ ११ ॥ दया धर्म न्याय नीती । विवेक नाहीं झाला क्षिती. । पापभारें सर्व जगती । आक्रांतली बहुसाल. ॥ १२ ॥ तेवेळीं धरा देव ब्राह्मण। ब्रह्मदेवासी गेले शरण. । पीडा परिसोनि चतुरानन । चित्तें द्रवला दयाळु. ॥ १३ ॥ हरिहर मेळवूनि संवादा। आज्ञा करी समस्त विबुधां, । 'दुष्ट दैत्यांचिया वधा । अंशअवतार धरावे.' ॥ १४ ॥ कृतीं[2] त्रेतीं[3] दैत्य राक्षस। तेचि द्वापारीं नृप कर्कश[4]। पृथ्वी पीडिली बहुवस[5]। धेनु जैसी बहुव्याघ्रें. ॥१५॥ नानायोनींत जन्मले,। नानारूपें धरूनि वहिले[6] । नानापरी लोक पीडिले, । ते नानायत्नीं वधावे.' ॥ १६ ॥ ऐसें बोलतां चतुरानन, । 'अवश्य' म्हणे सहस्रनयन[7]. । आपुलाले अंशीं जाण । अवतार धरिले ते ऐका. ॥ १७ ॥ राजा म्हणे, 'चतुरेश्वरा ! । व्यासशिष्या ! गुणसागरा ! । सृष्ट्यादि सुर असुरा । उद्भव सारा कौतुकें, ॥ १८ ॥ जें आधीं करूनि कथन । मग पुढां कथीं निरोपण, । देव दैत्या अंशावतरण । विस्तारेसीं वदावें.' ॥ १९ ॥ प्रश्नें संतोषोनि वक्ता । म्हणे, 'परियेसीं धरित्रीनाथा ! । जें ऐकतां, सर्वज्ञता । श्रोतयां आंगीं अवतरे. ॥ २०॥ आदिपुरुषाचे नाभिकमळीं । ब्रह्मा जन्मला सृष्टीच्या मुळीं. । तयाचीये संकल्पजाळीं । मानस पुत्र दशसंख्या. ॥ २१ ॥ तेचि जगाच्या उद्भवा । कारण झाले माधवीधवा[10] ! । तोही श्रवणीं बोध बरवा । होय तैसा तुज सांगों. ॥ २२ ॥ पुलस्ती पुलह क्रतु वरिष्ठ । भृगु[11] सातवा आणि वसिष्ठ । मरीची अत्री अंगिरा श्रेष्ठ । दक्ष नारद पैं दाहावा. ॥ २३ ॥ मरीचीचा कश्यपमुनी । तयासी स्त्रिया तेराजणी, । दक्षकन्या कवण कवणी । नांवें ऐका नृपवर्या ! ॥ २४ ॥ अदिती दिती दनु काळा । दनायु सिंहिका मुनी नृपाळा ! । क्रोधा वरिष्ठा[12] विमळा[12] । विनता कपिला आणि कद्रू. ॥ २५ ॥ अदितीचे द्वादशादित्य[13] । धाता मित्र अर्यमा सत्य । शक्र वरुण भग आदित्य[14] । विवस्वत आठवा. ॥ २६ ॥ पूषा सविता त्वष्टा विष्णु । जो परमात्मा जग-

---

१. घातले. २. कृतयुगीं. ३. त्रेतायुगीं. ४. निर्दय, कठोर. ५. पुष्कळ. ६. तत्काळ. ७. इंद्र. ८. ईश्वर, परमात्मा. ९. त्रेंबी. १०. माधवी ही जनमेजय राजाची स्त्री. ११. 'मरीचिरत्र्यंगिरसौ पुलस्त्यः पुलहः क्रतुः । भृगुर्वशिष्ठो दक्षश्च दशमस्तत्र नारदः ॥' या श्लोकाप्रमाणें भृगु सातवा येतो. १२. प्राधा आणि विश्वा अशीं नांवें मूळांत आढळतात. (अध्याय ६५ श्लोक १२.) १३. बारा अदितीचे पुत्र. १४. विधाता अथवा अंश हें एकाचें नांव.

जिष्णु । हे मुख्य करूनि अमरगणु । आदितेय जाणावे. ॥ २७ ॥ दि[1]ती-पासून दैत्य दारुण । हिरण्यकशिपु, प्रऱ्हाद सुगुण । विरोचन बळीचा बाण । [2]शंकरगणीं अग्रणी. ॥ २८ ॥ दनूचे पुत्र [3]पंचशत । दानव राजे महासमर्थ, । अमरांसहित अमरनाथ । तृणप्राय ज्यां दृष्टी. ॥ २९ ॥ प्रथम [4]प्रचीत नामा । शंबर नमुची मय पुलोमा । वातापी वृषपर्वा असिलोमा । केशी दुर्जय विरूपाक्ष. ॥ ३० ॥ हे मुख्य करोनि असंख्यात । नामें सांगतां वाढेल ग्रंथ; । असो. हे दानव बलोन्मत्त । दनूचे पुत्र जाणावे. ॥ ३१ ॥ काळकेचे काळकेय क्रूर, । दैत्य दानवांपरीस उग्र, । विनाशन क्रोध क्रोधी शक्र । हे मुख्य करोनि असंख्य. ॥ ३२ ॥ विक्षर बळ वीर वृत्रनामा । महासुर नृपसत्तमा ! । दैत्यविषयीं काळप्रतिमा । दनायुष्या प्रसवली. ॥ ३३ ॥ सिंहिकेचे चौघे कुमर । राहु सुचंद्र चंद्रहर्तार । चंद्रप्रमर्दन महाक्रूर । वैरी चंद्रसूर्यांचे. ॥ ३४ ॥ मुनीचे मौनेय सोळाजण । श्रेष्ठ गंधर्व, त्यांचें अभिधान । त्यांचीं नामें कोण कोण । तेंही ऐकें [5]ऐकतया ॥ ३५ ॥ भीमसेन उग्रसेन सुपर्ण । वरुण गोपती धृतराष्ट्र जाण, । सूर्यवर्चा [6]सुपुत्रवान । अर्कपर्ण प्रयुत हा. ॥ ३६ ॥ भीम चैत्ररथ [7]शाळीशिळा । [8]प्रद्युम्न नारद कलीजवळा. । ऐसे गंधर्वराज सोळा । मुनीचे मौनेय जाणावे. ॥ ३७ ॥ 'गण [9]क्रोधेवश' रौद्रकर्मा । अरिमर्दन कुरुसत्तमा ! । क्रूररूप क्रूरप्रतिमा । क्रोधा देवी प्रसवली. ॥ ३८ ॥ अनवद्या मनु वंशा या । असुरा आणी मार्गणप्रिया । अनूपा सुभागा ऐसिया । प्राधा देवी प्रसवली. ॥ ३९ ॥ [10]वरिष्ठेचे देवगंधर्व । विद्यावरिष्ठ महा अपूर्व । ज्यांचें संगीत ऐकतां सर्व । [11]तांडवनृत्य अवतरे. ॥ ४० ॥ सिद्ध पूर्ण बर्ही तिसरा । पूर्णायु महायश चतुरा । ब्रह्मचारी [12]रतीवरा । सुपर्णनामा सातवा. ॥ ४१ ॥ विश्वावसु भानु सुचंद्र । दहाही विद्येचे समुद्र । वरिष्ठेचे नृपनरेंद्र ! । देवगंधर्व मुख्य हे. ॥ ४२ ॥ विनतेचे अरुण गरुड । हे तव प्रसिद्ध जगीं रूढ, ।

---

१. दितीचा हिरण्यकशिपु, त्याचा प्रऱ्हाद, त्याचा विरोचन, त्याचा बलि, आणि त्याचा बाण म्हणजे (बाण हा दितीच्या नातवाचा प्रऱ्हादाचा) पणतू. २. रुद्राच्या सेवकांत श्रेष्ठ. ३. मूळांत (अध्याय ६५ श्लोक २१) दनूचे चाळीस पुत्र असें वर्णन आहे. ४. 'विप्रचित्ति' असें नांव मूळांत आहे. (हिचे चार पुत्र. विक्षर, बळ, वीर आणि वृत्र.) ५. एकाग्रचित्तें. ६. 'सत्यवाक्' असें मूळांत नांव आहे. ७. मूळांत 'शालिशिरा' असें नांव आहे. ८. 'पर्जन्य' असें मूळांत आहे. ९. क्रोधेचे पुत्र क्रूरस्वभाव होते, म्हणून त्यांस 'क्रोधवशगण' असें नांव होतें. १०. प्राधेचे. ११. शिवाचें आणि शिवगणांचें नृत्य. १२. मूळांत 'रतिगण' असें नांव आहे. (अध्याय ६५ श्लोक ४७.)

एक सारथी सूर्या आड । एक तो वाहन विष्णूचें. ॥ ४३ ॥ अलंबुषा मिश्रकेशी । विद्युत्पर्णा लावण्यराशी । तिलोत्तमा अरुणाऐसी । केशिन्यादि निजनामें. ॥ ४४ ॥ रंभा मनोरमा रक्षिता । सुबाहु सुरजा आणी सुरता । सुप्रिया, अतिबाहु नृपनाथा ! । हाहा[1] हुहू[1] तुंबर हे. ॥ ४५ ॥ पवित्र अप्सरागणांचें वृंद । रूपविद्येनें अतिप्रसिद्ध, । स्वर्गसौख्य पैं सुस्वाद । यांचेनि योगें बोलिजेती. ॥ ४६ ॥ अमृत गाई आणि ब्राह्मण । पुण्यगंधर्व अप्सरागण । हा कपिलेचा विस्तार जाण । स्वर्गभूषण स्वर्गस्थां. ॥ ४७ ॥ शेष वासुकी अनंत कुलिक । तक्षक काळिया कर्कोटक । हे मुख्य करूनि सहस्त्र येक । काद्रवेय कद्रूचे. ॥ ४८ ॥ दैत्य दानव काळिकेय । क्रोधेय आणि दनायुषेय । त्यांचा कुळगुरु शुक्राचार्य[2] । भृगुनंदन प्रतापी. ॥ ४९ ॥ त्वष्टा[3] चरित्र षंढामर्क । शुक्रपुत्र चौथे देख । विद्याविशारद[4] जैसे अर्क । तपातेजें तपस्वी. ॥ ५० ॥ त्रैयोदश[5]स्त्रियांची संतती । सांगीतली ऐसिया रीती. । काश्यपी सृष्टी याचिये अर्थी । ग्रंथकर्ते बोलती. ॥ ५१ ॥ आणीक ऐकें निरोपण । देव ईशापासोनि गहन । जन्मले एकादश नंदन । एकादशरुद्र बोलती ॥ ५२ ॥ मृगव्याध सर्प निर्ऋती जाण, । अजैकपाद अहिर्बुध्न । पिनाकी ईश्वरु कपाळी दहन । भग स्थाणु अकरा[6] हे. ॥५३॥ ब्रह्मयाचे दशनंदन । त्यांत मरीची श्रेष्ठ जाण, । कश्यप तैयाचा[7] आपण । विश्वविस्तार काश्यपी.॥ ५४ ॥ आणी उरले नव कुमर । तयांपासोनि जो विस्तार । तोहि सांगेन अतिसादर । श्रवण केला पाहिजे. ॥ ५५ ॥ अत्रिऋषीचे असंख्यात । वेदविद् शांत दांत । योगसिद्ध झाले बहुत । मुख्य तिघे त्यांमाजी. ॥ ५६ ॥ मूर्तिमंत देवत्रय । अनुसूयाजन्म श्रेष्ठ त्रय । चंद्र दुर्वास दत्तात्रेय । विधि श्रीकंठ श्रीपती.॥५७॥ अंगिराची वीर्यसंतती । बृहस्पती उतथ्य संवर्त सुमती । त्यामाजी श्रेष्ठ वाचस्पती[8] । उपाध्याय[9] अमरांचा. ॥५८॥ पुलस्ती ब्रह्मयाचा नंदन । विश्वश्रवा सुतपोधन । वेद[10]घोषवीर्यें जाण । तृण[11]बिंदुकन्या प्रसवली. ॥ ५९ ॥ विश्वश्रव्या ते महा-

---

१. गंधर्वविशेष. २. असुरांचा उपाध्याय. ३. त्वष्टाधर, अत्रि, रौद्र आणि कर्मी अशीं नांवें आढळतात. ४. कुशल, चतुर. ५. कश्यपमुनीच्या तेरा नायकांची. ६. हेच अकरा रुद्र. ७. मरीचीचा. ८. बृहस्पति. ९. विद्यार्थी ज्याच्याजवळ जाऊन यथाविधि अध्ययन करतो तो उपाध्याय. १०. वेदघोषाच्या सामर्थ्यानें. ११. तृणबिंदु नामक राजर्षीनें आपली गौ नामक कन्या पुलस्त्य ऋषीस दिली. तिनें मनापासून वेदाध्ययन श्रवण केलें म्हणून तिच्या मुलाचें नांव विश्रवा असें ठेविलें. ग्रन्थांत विश्वश्रवा असें आहे तें ठीक नाहीं.

राजा! । वरिल्या झाल्या दोन्ही भाजा,[1] । ब्राह्मणी भारद्वाजात्मजा । दुजी राक्षसी कैकसी. ॥ ६० ॥ देववर्णिनीचा[2] निर्दोष । कुबेर जन्मला देवपुरुष; । जो यक्षराज[3] गुह्यकेश[4] । परममित्र शिवाचा. ॥ ६१ ॥ सुमाळी राक्षसाची कुमरी । कैकसी यातीनीं[5] निशाचरी; । राक्षस जन्मले तिच्या उदरीं । तिघे पुत्र एक कन्या. ॥ ६२ ॥ रावण आणि कुंभकर्ण । तिसरा पवित्र बिभीषण । जिचेनि कलहें रामायण । रचिलें, ते जाण शूर्पनखा. ॥ ६३ ॥ एवं राक्षस यक्ष किंनर । उग्र तापस हरकिंकर । हा पुलस्तीचा विस्तार । [6]संकळित सांगीतला. ॥ ६४ ॥ शलभ[7] सिंह व्याघ्र किंपुरुष । ईहामृगादि[8] ऋक्ष[9] कर्कश[10] । पुलहापासोनि हे अशेष । जन्म पावले जाणिजे. ॥ ६५ ॥ क्रतूचे क्रतुसमान जाणा । पतंगसहचारी[11] दैदीप्यमान[12] । जे कां व्रतपरायण[13] । असंख्य[14] पुत्र निपजले. ॥ ६६ ॥ अग्निष्टोमादि[15] अश्वमेधांत । सत्यलोकस्थ मूर्तिमंत । ते क्रतुनामें क्रतूचे सुत । संकेतें जाणें कुरुवर्या ! ॥ ६७ ॥ भृगुविस्तारान्वय[16] बोधें । च्यवन[17] और्व रुचिक[18] अंगें । त्यांचा[19] जमदग्नी, रेणुका[20] संगें । पुत्र चवघे[21] प्रसवले. ॥ ६८ ॥ त्यांत प्रसिद्ध भार्गवराम । जो क्षत्रियांतक महाभीम । ज्याचें संकटीं स्मरतां नाम । भ्रष्ट होती अरिष्टें.[22] ॥ ६९ ॥ आणीक भृगूची संतती । कवि शुक्र धर्ममूर्ती । और्वाचाही नेणों किती । शतसहस्री विस्तारु. ॥ ७० ॥ वसिष्ठ[23] शक्ती पराशर । व्यासदेव शुक योगींद्र । वसिष्ठ सृष्ट्यन्वय सुचंद्र । निष्कलंक तिहीं लोकीं. ॥ ७१ ॥ शास्त्रसिद्धांत श्रुति स्मृती । इतिहास संहिता पुराणपंक्ती ।

---

१. भार्या. ('य'च्या स्थानीं 'ज' प्राकृतांत वारंवार होतो. जसें, कार्य—काज.) २. भरद्वाजमुनिकन्या ३. यक्षांचा राजा. ४. गुह्यकांचा (गंधर्वांचा) स्वामी. ५. जातीनें, वर्णानें. ६. संक्षिप्त. ७. टोळ. ८. वृक, लांडगा. ९. आस्वल. १०. क्रूर. ११. सूर्याबरोबर गमन करणारे. यांचें नांव वालखिल्य. हे सूर्याच्या रथाबरोबर राहून त्याची स्तुति करितात असें पुराणांत प्रसिद्ध आहे. १२. तेजस्वी. १३. सत्यव्रत पाळणारे. १४. साठसहस्र हे पुत्र होते म्हणून 'असंख्य' असें म्हटलें. १५. यज्ञविशेष. १६. वंशसंबंध. १७. हा भृगुऋषीस पुलोमा नामक भार्येपासून झालेला पुत्र. १८. ऋचीक हा च्यवनाचा प्रपौत्र, उर्वाचा पौत्र, आणि और्वमुनीचा पुत्र. १९. ऋचीकाचा. २०. जमदग्नीच्या पत्नीचें नांव रेणुका. ही प्रसेनजित् राजर्षि (रेणु) याची कन्या. २१. पांच असें पाहिजे. पांच पुत्रांचीं नांवें—रुमण्वान्, सुषेण, वसुमान्, विश्वावसु आणि परशुराम. आदिपर्व-अध्याय ६६ श्लोक ४८ यांत जमदग्नीचे चार पुत्र होते असेंच वर्णन आहे. २२. विघ्नें, संकटें. २३. वसिष्ठाचा ज्येष्ठपुत्र शक्ति, शक्तीचा पराशर, पराशराचा व्यास आणि त्याचा शुक.

व्यासप्रश्नेपासाव जगती । विस्तारली महिम्यानें. ॥ ७२ ॥ परमेष्ठीच्या[1] दक्षिणां-गुष्ठीं । दक्ष जन्मला वरिष्ठ श्रेष्ठी, । भार्या त्याची[2] सौंदर्यपुष्टी[3] । वामांगुष्ठीं निपजली. ॥ ७३ ॥ अर्धशतक[4] तिच्या[5] कुशीं । कन्या जन्मल्या लावण्यराशी । शशधरासी[6] आदरेंसी । सप्तविंशती[7] वोपिल्या. ॥ ७४ ॥ अश्विनीपासून रेवतीवरी[8] । नक्षत्रयोगिनी[9] अतिसुंदरी । प्रकाशमाना गगनोदरीं[10] । रूपें नामें प्रसिद्ध. ॥७५॥ त्रयोदश[11] दिधल्या कश्यपातें । ज्यां कां मागें कथिल्या तूतें; । दहा निवेदिल्या[12] धर्मातें । धर्मवृद्धी[13] ज्या द्वारा. ॥ ७६ ॥ कीर्ति लक्ष्मी धृति मेधा । पुष्टी[14] क्रिया तथा श्रद्धा । बुद्धि लज्जा मती, हे द्विरदा![15] । कथा पद्मिनीच्या अवधारीं. ॥ ७७ ॥ धर्मापासोनि जे जे गुण । विस्तारिती ते तयांपासून । ऐसे जाणती विचक्षण । तुजसारिखे नरवर्या! ॥ ७८ ॥ देवऋषींत शिरोमणी । नारद ब्रह्मज्ञ दशमस्थानीं[16] । विवेक वैराग्याची खाणी । ब्रह्मनिष्ठ कुळगुरु. ॥ ७९ ॥ संन्यासमार्गप्रवर्तक । जितेंद्रिय मदनांतक । ज्याचा लाहोनि वरहस्तक । व्यास[17] झाला बोलका. ॥ ८० ॥ आणीक ऐकें राजनृपती! । पितामहतनयो[18] प्रजापती । त्याचे पुत्र अष्टमूर्ती । अष्ट वसु जाणावे. ॥ ८१ ॥ अह धर ध्रुव सोम । अनळ अनिळ प्रत्यूष परम । प्रभास आठवा अतिउत्तम । अष्टौनामें आठांचीं. ॥ ८२ ॥ धराचा ज्येष्ठ[19] पुत्र द्रविण, । ध्रुवाचा काळ महादारुण,[20] । सोमाचा तो वर्चा जाण । पितयातुल्य तेजस्वी. ॥ ८३ ॥ अग्नीचा कुमार षडानन[21] । कार्तिकेय सुब्राह्मण, । अनिळाचा महाजवमन[22] । जो कां जिंके चपळत्वें. ॥ ८४ ॥ प्रत्यूषाचा देवल ऋषी; । प्रभासभार्या गुणैकराशी । बृहस्पतीभगिनीचिये कुसी । विश्वकर्मा जन्मला. ॥ ८५ ॥ यंत्रें शस्त्रें गृहभूषणें । देवलोकीं दैदीप्यमानें[23] । मनेच्छा विचरती विमानें । हे हस्तकळा तयाची. ॥ ८६ ॥ पुरें दुर्गें[24] गडें[25] पर्वत । समुद्रयानीं नौकापोत[26] । शिल्पविद्येनें

---

१. ब्रह्मदेवाच्या. २. दक्षाची. ३. लावण्यखाणी. ४. पन्नास. ५. दक्षभार्येच्या. ६. चंद्राला. ७. सत्तावीस. ८. अश्विनीनक्षत्रापासून तों रेवतीनक्षत्रापर्यंत सत्तावीस. ९. नक्षत्रनाम युक्त अशा. १०. आकाशांत. ११. तेरा. १२. दिल्या. १३. ज्यांच्या द्वारें धर्मवृद्धि व्हावी अशा. १४. 'क्रिया समुद्रा पुष्टि सुधा' असाही पाठ आहे. १५. हे गजा. (हे श्रेष्ठा.) १६. ब्रह्मदेवाचा हा दहावा मानस पुत्र, म्हणून याचें दशमस्थान. १७. नारदानें व्यासास उपदेश केला या गोष्टीस अनुलक्षून हें वर्णन आहे. १८. धर्म. याला वसु नामक दक्षकन्येच्या ठायीं आठ वसु झाले. १९. वडील पुत्राचें नांव द्रविण व धाकट्याचें हुतहव्यवह. २०. मोठा भयंकर. २१. कार्तिकस्वामी. २२. 'मनोजव' असें याचें नांव. २३. 'दिव्य विमानें' असाही पाठ आहे, व पुढें तृतीयचरणांत 'विमानें'च्या स्थानीं 'गगनें' असा पाठ आहे. २४. तट. २५. किल्ला. २६. नाव व होडी.

असंख्यात । मानव जीववी भूलोकीं. ॥ ८७ ॥ पुढती ब्रह्मयाच्या देहीं । दक्षिण हस्त[1] भेदूनि पाहीं । धर्म जन्मला नरविग्रही[2] । आल्हादकारी[3] भूतांतें. ॥ ८८ ॥ धर्माचे तिघे वर कुमर । जे सर्वभूतमनोहर । शम काम हर्ष चतुर । शक्ती त्रयेंसी अवधारीं. ॥ ८९ ॥ रती कामदेवाची भार्या, । प्राप्ती शमाची निज जाया । नंदी[4] हर्षांगना[5] राया ! । सुजाणाच्या जाणिजे. ॥ ९० ॥ त्वष्टी[6] सविताची भार्या । वडवारूपिणी[7] काया । सूर्यवीर्यकुमरद्वया । अश्विनी[8] देवी प्रसवली. ॥ ९१ ॥ आणि ब्रह्मयाचे नंदन । धाता विधाता दोघेजण । त्यांची स्वसा[9] गुणनिधान । लक्ष्मीनामें सुपवित्र. ॥ ९२ ॥ तिचा मानस पुत्र परम । व्योमचारी[10] तुरंगोत्तम[11] । उच्चैःश्रवा ऐसें नाम । तयालागीं बोलिजे. ॥ ९३ ॥ शुक्रा देवी वरुणपत्नी । तिचीये पवित्रगर्भस्थानीं । बळ पुत्र, आणि सुनंदिनी । कन्या[12] एक जन्मली. ॥ ९४ ॥ प्रजा अन्नकामनें करून । परस्परें परिभक्षण । करितां, भूतविनाशन[13] । अधर्म तेस्थळीं जन्मला. ॥ ९५ ॥ तया अधर्माची भार्या । नैर्ऋतीनाम्नी[14] महाराया ! । नैर्ऋत्य राक्षस जन्मावया । जन्मभूमी ते जाणा. ॥ ९६ ॥ घोर[15] पापकर्मी निरत । भय महाभय आणि मृत्यु । तिघे अधर्माचे सुत । भूतांतक दुरात्मे. ॥ ९७ ॥ तयांसी नाहीं पुत्र भार्या । भूतसृष्टी न्यावी क्षया[16] । याचिया वांचूनि तयां । व्यापार कांहीं असेना ॥ ९८ ॥ श्येनी भेकी[17] आणि काकी । धृतराष्ट्री[18] पांचवी शुकी । ताम्रा[19] देवीपासोनि लोकीं । पंच कन्या प्रसवली. ॥ ९९ ॥ काकीपासुनी काकजनन[20] । श्येनीपासुनि जन्मले श्येनें[21] । भेकीपासूनि[22] नानावर्ण । गृध्र अनेक जन्मले. ॥ १०० ॥ धृतराष्ट्रीपासोनि देख । हंस सकळ चक्रवाक; । शुकीपासोनि झाले शुक । नीळ श्वेत बहुरंगी. ॥ १०१ ॥ आणीक ऐकें कुरु-

---

१. 'स्तन' असें मूळ भारतांत आहे. (आदिपर्व, अध्याय ६६ श्लो० ३१.) २. मनुष्यदेहधारी. ३. सर्वलोकसुखावह. ४. 'नंदा' असें मूळ भारतांत आहे. ५. हर्षाची पत्नी. ६. 'त्वाष्ट्री' असें महाभारतांत आहे. ७. अश्विनीचें रूप धारण केलेली जीची काया (शरीर) अशी ८. अश्विनीकुमारीं. ९. बहीण. (धाता विधाता यांची.) १०. आकाशगामी. ११. अश्ववर. १२. हिचें नांव सुरा. १३. भूतविनाशक. १४. नैर्ऋतेय नामक राक्षसांची ही माता. १५. भयंकर. १६. अंता. १७. 'भासी' असें महाभारतांत आहे. (आदिपर्व, अ० ६६ श्लो० ५६) १८. नामविशेष. (पक्षिणी.) १९. कश्यपभार्या. २०. कावळा. २१. ससाणा. २२. बेडकी. याठिकाणीं 'भासी' असेंच पाहिजे, कारण भेकीपासून गृध्र होणें असंभाव्य आणि भासी म्ह० गृध्रपक्षीण, तेव्हां 'भासी' हाच पाठ मुक्तेश्वराचा असला पाहिजे. (अध्याय ६६ श्लोक ५७.)

मूषणा[1] । मृगी मृगमंदा हरी सगुणा । सुरभी श्वेता भद्रमना । आणि मातंगी शार्दूली. ॥१०२॥ मृगीपासोनि मृग अपार, । मृगमंदेचे रुक्ष[2] सूकर[3], । अश्वरत्नें अतिसुंदर । आणि वानर हरीचे. ॥ १०३ ॥ भद्रमनेपासोनि जाण । ऐरावत[4] ऐरावण[5] । जो कां देवेंद्राचें वाहन । स्वर्गभूषण स्वर्गस्थां. ॥१०४॥ मातंगीचे मातंग[6] बहुत । अष्ट[7] दिग्गज मुख्य समर्थ । जीहीं टेकोनियां दांत । बळें भूगोल धरिलासे. ॥ १०५ ॥ तोची ऐरावत पुंडरीक । वामन मुकुंद अंजन देख । सार्वभौम सुप्रतीक । पुष्पदंत आठवा. ॥ १०६ ॥ शार्दूळीपासोनि प्रबळ । व्याघ्र सिंह आणि शार्दूळ, । शरभपक्षी महाविशाळ । गंड[9] भैरव[10] प्रसवली. ॥१०७॥ शेळी मेढी म्हैसी खरें[11] । श्वान मार्जार कुक्कुट[12] सूकर । ग्रामसंबंधी पशु अपार । श्वेता जाण प्रसवली. ॥१०८॥ सुरभी प्रसवली धेनु-खिल्लार[13] । बहुवर्ण वृषभ[14] लांगूलेधर[15]; । अठरा[16]धान्यांचे संभार । पृथ्वीपासोनि जन्मविले. ॥ १०९ ॥ सप्तस्वयंभु दश[17]द्विदळ । तैलगर्भ मुख्य तिळ । ऐसिया धान्यांचा सुकाळ । वृषभ करिती भूलोकीं. ॥ ११० ॥ यव[18], गोधूम[19] आणि तंदुळ । राळे सजगुरे यावनाळ[20] । तुषधान्यें[21] सहित प्रबळ । सप्तधान्यें अखंडें. ॥ १११ ॥ चणक मसुर मूग उडीद । लांक वाटाणे तुरी प्रसिद्ध । वाल चवळे कुलित्थ विशद । दशद्विदळ जाणावे. ॥ ११२ ॥ कुसुंभ अतसी[22] सर्षप[23] शिरस । नारळ करंज[24] मधु खसखस । या अष्टतैलाहून निर्दोष । तिळ ऐसें

---

१. ह्या आठ क्रोधवशानामक पत्नीच्या कन्या; नववी कन्या सुरसा–हिचें नांव येथें दिलें नाहीं. २. आस्वल, रीस. ३. डुकर. ४. गज. ५. इंद्राचा गज, देवनाग. ६. गज. ७. भूगोल संभाळण्यासाठीं प्रत्येक दिशेस एक एक मोठा गज ठेविला आहे, त्यास 'दिग्गज' असें म्हणतात. दिशांच्या ठायीं ठेविलेले जे गज ते दिग्गज. ८. पशुविशेष. ९. गेंडा. १०. भयंकर. ११. गाढव. १२. कोंबडा. १३. कळप. १४. बैल. १५. शेंपटी. १६. ह्यांचीं नांवें:–गहूं, साळ, तूर, जव, जोंधळा, वाटाणा, लांक, चणा, जवस, मसूर, मूग, राळा, तीळ, हरीक, कुळीथ, सावा, उडीद आणि चवळी. याविषयीं श्लोक आहेत ते:–'यवगोधूमधान्यानि तिलाः कंगुकुलत्थकाः । माषा मुद्गा मसूराश्च निष्पावाः श्यामसर्षपाः ॥ गवेधुकाश्च नीवारा आढक्योऽथ सतीनकाः । चणकाश्चीनकाश्चैव धान्यान्यष्टादशैव तु ॥.' १७. ज्यामध्यें दोन डाळी असतात असें, हरभरा वाटाणा इत्यादि धान्य. १८. जव, सातू. १९. गहूं. २०. जोंधळा. २१. ज्या धान्यांस तूस (त्वचा) आहे अशीं. २२. जवस. २३. मोहरी. २४. करंजाचें झाड. याचें तेल काढतात.

जाणावें. ॥११३॥ आणी अनेकदेशीं अनेक वर्णें । अनेक नामांचीं उपधान्यें। अप्रसिद्ध बोलतां मनें । उबग वाटे श्रोतयां. ॥११४॥ असो. हें धर्मरूपें वृषभें। शरीर कष्टूनि निर्लोभें । धान्यें जगासी केलीं सुलभें । हा प्रसाद सुरभीचा. ॥११५॥ अनळा नामें शुकी पुत्री । तिजपासाव धराक्षेत्रीं । अठराभार फळीं पत्रीं । वनस्पती निपजल्या. ॥ ११६ ॥ मंदार पारिजात संतान । कल्पवृक्ष हरिचंदन । आम्र निचोल कपित्थ गहन । वटाश्वत्थ बिल्वादी. ॥ ११७ ॥ अरुणभार्या जाण श्येनी । तिचे पवित्रगर्भस्थानीं । बळिष्ठ पुत्र जन्मले दोन्ही । संपाती आणी जटायु. ॥ ११८ ॥ आदिंकरूनि ऋषी देव । सर्वभूतांचा पवित्र प्रसव । तुजप्रति निवेदिला सर्व । व्यास वदला त्यारीती. ॥ ११९ ॥ आतां दैत्य घेऊनि अंशा । येऊनि अवतरले नरेशा! । तो अंशावतार प्रकार कैसा । श्रवण केलें पाहिजे. ॥ १२० ॥ पूर्वी विप्रचित्ती नामा । दानवराज नृपसत्तमा! । तो नरलोकीं पावला जन्मा । जरासंध या नामें. ॥ १२१ ॥ हिरण्यकश्यपु असुरेश्वर । जो दितीचा वडील कुमर । तो द्वापारीं धरणीश्वर । शिशुपाळ नामें बोळखें. ॥ १२२ ॥ हिरंण्याक्ष तयाचा बंधु । यज्ञ वराहें जयाचा वधु । केला, तो द्वापारीं प्रसिद्धु । दंतवक्र जाण पां. ॥ १२३ ॥ प्रऱ्हादबंधु चौघे सबळ । संऱ्हाद अनुऱ्हाद शिबी बाष्कळ । ते भूलोकीं नरनृपाळ । अनुक्रमेंचि बोळखें. ॥ १२४ ॥ शैल्य दुसरा धृष्टकेतु । द्रुपद आणि चौथा भगदत्तु । जो जगत्पती आणि महासमर्थु । रणकैवारी कौरवां! ॥१२५॥ प्रऱ्हादशिष्य नग्नजितु । विष्णुद्रोही अधर्मनिरतु । तो सुबळनामा मेदिनीनाथु।

---

१. अठरा उपधान्यांचीं नांवें:—सजगुरा, भादली, वरी, नाचणी, बरग, कांग, खपले, गहूं, नका, करडई, राजगिरा, मटकी, पावटा, मूग, वाल, कारवा, देहभात, सातू, आणि अंबाडी. अथवा हीं नांवें अन्यप्रकारचीं आढळतात:—सजगुरा, नाचणी, वरी, मका, मटकी, राजगिरा, शिरस, पांढरफळी, जिरा, मेथी, वेणुबीज, देवभात, कमलबीज, पाकड, अंबाडी, भेंडीबीज, गोंवारी, आणि कुड्याचें बीज. कोणी खसखस आणि पांढरा मका यांस धरून हीं उपधान्यें वीस मानतात. २. कंटाळा. 'विस्तार' असाही पाठ आहे. ३. अनलेची पुत्री शुकी असें महाभारतांत आहे. (अध्याय ६६ श्लोक ६९) ४. 'मंदार पारिजातक कंचन' असाही पाठ आहे. ५. संभव. ६. हा असुर पृथ्वीला पाताळांत घेऊन जात होता, तेव्हां वराहानें यास मारून तिचा उद्धार केला, या कथेचा उल्लेख येथें आहे. ७. हा संऱ्हाद. ८. हा अनुऱ्हाद. ९. महाभारतांत 'द्रुम' असें आहे. (आदिपर्व अ० ६७. श्लो० ८). शिवाय द्रुपदराजा मरुद्गणांतर्गत होय असें १५३ व्या ओंवींत वर्णन असून महाभारतांत ही (आदिपर्व, अ० ६७ श्लो० ८०) तसेंच सांगितलें आहे, तेव्हां येथें 'द्रुम' असेंच पाहिजे. द्रुम हा शिबि होय.

गांधारराजा जन्मला. ॥ १२६ ॥ देवशापें धर्महननीं । प्रजा होती ऐसिया गुणी । पुत्र दुरात्मा जन्मला [1]शकुनी । आणी [2]गांधारी नृपवर्या ! ॥ १२७ ॥ अयःशिरा अश्वशिरा अयःशंकु । गगनमूर्धा वेगवान एकु । हे पंचदानव नृपपंचकु । कैकेयराज जन्मले. ॥१२८ ॥ केतुमान दानव बळी । तो [3]अमितौजा पृथ्वीतळीं. । वृषपर्वा परिसिला मुळीं । तो दीर्घप्रज्ञ नरेंद्र. ॥ १२९ ॥ [4]कालनेमी प्रलंबन । कंस चाणूर दोघेजण । वीरदैत्य अतिदारुण । पौंड्रमात्स्यक जाणावे. ॥ १३० ॥ [5]रुक्मी एकलव्य हिरण्यधन्वा । काशीश्वर जयद्रथ भूरिश्रवा । [6]क्रूरराक्षस नरपार्थिवा ! । राजे झाले येलोकीं. ॥ १३१ ॥ वरिष्ठेय गंधर्वे[7] ज्येष्ठ । तो धृतराष्ट्र नरवरिष्ठ । नागायुतबळबळिष्ठ । कुरुश्रेष्ठ कुरुकुळीं. ॥ १३२ ॥ कळिपुरुषाचा पूर्ण अवतारु । तो दुर्योधन कौरवेश्वरु । त्रैलोक्यींचा मदमत्सरु । एकत्र करूनि जो घडियेला. ॥ १३३ ॥ धर्मद्रोही विष्णुद्रोही । मानी कोपी दुराग्रही । ज्याचे कलहें हे सर्व मही । भारातीत पैं झाली. ॥ १३४ ॥ दुःशासनादी कर्कश । शतभरी संख्या बंधु विशेष । ते पौलस्त्य ब्रह्मराक्षस । मनुष्यदेहीं अवतरले. ॥ १३५ ॥ [8]वसुवीर्य क्षेत्रे[9]वीर्य । गंगातनयो जो भीष्माचार्य । प्रतापतेजें बारा सूर्य । एकत्र मीनले ज्यापरी. ॥ १३६ ॥ द्रोणाचार्य बृहस्पती । राजगुरु जन्मला क्षिती । भूभार उतरावयाचे अर्थी । सहाय झाला कौरवां. ॥ १३७ ॥ [10]रुद्रगण रुद्रांश देहधारी । कृपाचार्य अमरशरीरी; । गौतमवीर्यें कुमर कुमरी । कृप कृपी द्रोणभार्या. ॥ १३८ ॥ शिवहृदयींची क्रोधप्रतिमा । व्यक्तीसी आली नरेंद्रोत्तमा ! । तो नरलोकीं अश्वत्थामा । शूराग्रणी शूरत्वें. ॥ १३९ ॥ सूर्यवीर्य सूर्यांश कर्ण । कुंतीजठरीं पावला जनन । कुमारीदशेनें जन्मला म्हणोन । कर्ण [11]कौंतीन बोलिजे. ॥१४०॥ [12]रणीचत्वरीं [13]पदाब्जधूळी । विभूती चर्ची शत्रुच्या भाळीं । ज्याचेनि बळें पांडव बळी । अलक्ष केले कौरवीं. ॥१४१॥ एवं मागध चैद्य कौरव । आणि पृथ्वीचे बहु [14]पार्थिव । यक्ष राक्षस दैत्य दानव । अवतरले हे जाणिजे. ॥१४२॥ आतां पांडवपक्षीं जाण । देवची अवतरले आपण । तेही अवतरले कोण

---

१. हा द्वापराचा अंश. २. ही मतीचा अंश. ३. अतिबलाढ्य. ४. हा कंस झाला. ५. हा जनमेजय झाला. ६. 'अकरा' असाही पाठ आहे. ७. हंस नामक गंधर्वपतीचा धृतराष्ट्र. (अध्याय ६७ श्लो० ८३–८४.) ८. अष्टवसुवीर्यांश. ९. शांतनुवीर्येन. १०. शिवगण. ११. अविवाहित कन्यापुत्र. १२. रणांगणीं. १३. चरणरूप कमळाची माती. १४. राजे.

कोण । अंश कवणं कवणाचे. ॥ १४३ ॥ यम[1] वायु पाक[2]शासन । अश्विनौ[3] देवौ दोघेजण । यांचे धर्म भीम अर्जुन । नकुळ सहदेव पांचही. ॥ १४४ ॥ स्वकीयांश स्वकीय रेत । देऊनि स्वयेंचि जन्मले तेथ । धराकाशीं[4] पंचादित्य[5] । प्रतापतेजें तेजस्वी. ॥ १४५ ॥ दुर्वासमंत्रमुखानिळें[6] । फुंकोनि पाजळिले[7] तेजाळें[8] । पंचवीर्य स्नेहसुढाळें । कुरुदीपक कुरुकुळीं. ॥ १४६ ॥ कुंतीमाद्री-जठरपात्रीं । उजळितां तेजें भरली धात्री । पतंगप्राय[9] कौरव क्षेत्रीं । भस्म झाले सपक्ष. ॥ १४७ ॥ शची पार्वती उभय मिळूनी । जन्मली द्रौपदी याज्ञसेनी । धृष्टद्युम्न प्रतापतरणी[10] । अग्नीचा अंश जाणावा. ॥ १४८ ॥ पांचही दिवटीया बंबाळ । हातीं धरूनि वैकुंठपाळ । ब्रह्मांडमंडपीं गोंधळ । खेळिन्नला संतोषें. ॥१४९॥ प्रतिविंध्यादी[11] पांचही जण । पांचाळीचे पंच नंदन[12] । ते हो वैश्वदेव-गण । निर्धारेसीं जाण पां. ॥ १५० ॥ सुवर्चा[13] नामें चंद्रकुमर । तो अभिमन्यु महावीर । सुभद्रातनयो वंशधर । पिता परिक्षितीचा. ॥ १५१ ॥ सिद्धी[14] धृति मूर्तिमंता । कुंती माद्री जाण तत्वतां । धर्ममूर्ती विदुर क्षत्ता[15] । धर्मावतार[16] वोळखें. ॥ १५२ ॥ सात्यकि आणि सत्यसंध । कृतवर्मा विराट द्रुपद । पांचही मरुद्गण[17] प्रसिद्ध । मनुष्यलोकीं अवतरले. ॥ १५३ ॥ धरूनि भीष्मवधाचा द्वेष । स्त्री पावली पुरुषवेश । तो जाण जातीचा राक्षस । द्रुपदपुत्र शिखंडी[18]. ॥ १५४ ॥ देवादिदेव सनातन । मायातीत शुद्ध चैतन्य । आदी परमात्मा नारायण । श्रीकृष्णरूपें अवतरला. ॥१५५॥ कर्ता हर्ता भर्ता भोक्ता । सर्वीं सर्वत्र जयाची सत्ता । साकारला[19] देवकार्यार्था । यादवकुळीं कुळमणी. ॥ १५६ ॥ पांडव यादव लोहकुऱ्हाडी । धरुनी स्वशक्तिसत्ता प्रौढी । कौरव असुरतरुच्या पेंढी[20] । निर्मूळ केल्या भूतळीं. ॥१५७॥ रमा भग-

---

१. यमधर्म. २. इंद्र. ३. अश्विनीकुमारांचे अंश नकुळ सहदेव. ४. पृथ्वीरूप आकाशांत. ५. पांच सूर्य. ६. मुखवायूनें. ७. प्रदीप्त केले. ८. तेजस्वी, स्वच्छ. ९. शलभाप्रमाणें. १०. सूर्य. ११. प्रतिविंध्य, सुतसोम, स्तुतकीर्ति, शतानीक आणि स्तुतसेन हे विश्वदेव गणांश होत. १२. पुत्र. १३. महाभारतांत 'वर्चा' असेंच नांव आहे. १४. याचे अंश कुंती आणि माद्री. (अध्याय ६७, श्लो० १६०.) १५. दासीपुत्र. १६. सूर्याचा पुत्रांश जो धर्म त्याचा अवतार विदुर. १७. हे मरुद्गणांचे अंश. १८. शिखंडी स्त्री असून स्थूणाकर्ण नामक यक्षाच्या प्रसादानें पुरुषत्व पावला. भारतीयुद्धांत यानें भीष्मास मारिलें. १९. आकार धारण केला. २०. भारी, मोळी.

वती रुक्मिणी । सत्यभामा देवी धरणी । अष्ट महासिद्धी ऐश्वर्यखाणी । अष्ट नायिका सगुणत्वें. ॥ १९८ ॥ अनंतशेष संकर्षण । तो बळराम रेवतीरमण । हलायुध प्रलंबघ्न । अच्युताग्रज प्रतापी. ॥ १९९ ॥ बहुकाळ तपश्चर्या परम। करोनि अप्सरा इच्छिती काम । विष्णुसंगें सुरताराम । स्वेच्छाचार भोगणें. ॥ १६० ॥ त्या गोपिका वेल्हाळी । लावण्यलतिका कुचकुड्मळी । तमाळनीळतरुवनमाळी । षोडशसहस्रीं वेष्टिला. ॥ १६१ ॥ सनत्कुमार तो प्रद्युम्न । गद सांब, सनक सनंदन । एकें वचनें अवघे जाण । देव तितुके यादव. ॥ १६२ ॥ ऋषी देव दैत्य दानव । यक्ष चारणगण गंधर्व, । नाग पक्षी पशुप्रसव । निवेदिला तुजप्रति. ॥ १६३ ॥ थोडें बहुतें निववविलें मना, । असें कथिलें कुरुनंदना! । त्याचेनि स्मरणें कलिमलवना । दहन होय क्षणमात्रें. ॥ १६४ ॥ जे जे कामना जया मुख्य । धर्म अर्थ काम अथवा मोक्ष । श्रवणें प्रेतीति होय प्रत्यक्ष । अमरत्व जैसें अमृतें. ॥ १६५ ॥ आदिकवीचा आदिगुरु । विश्वेशलीला विश्वंभरु । भक्तिशक्तीनें मुक्तेश्वरु । वाक्यपुष्पीं अर्चिजे. ॥ १६६ ॥ तोचि कविंकिंकर श्रोतयां । विनवी हस्त जोडोनिया । 'कथासुपथीं चालवावया । सांगाती या मज' म्हणे. ॥ १६७ ॥ इति श्रीभारत आदिपर्वणि । अंशावतार निरोपणीं । राजा संतोषोनि श्रवणीं । पुढा प्रश्नीं उद्यत. ॥ १६८ ॥

अध्याय पंधरावा.

'व्यासदेव अनुग्रहीता । वैशंपायना! चातुर्यभरिता । आमुच्या पूर्वजां समस्तां । भारत म्हणती किमर्थ? ॥ १ ॥ हे सांगोनि सविस्तर । पौरववंशीं वंशधर । यशकीर्तिगुणसागर । कोणते मातें परिसवीं.' ॥ २ ॥ कुरुकुळामाळिका मेरु । प्रश्न करितां राजेश्वरु । वक्ता म्हणे, 'ऐक सादरु । मद्वाक्यसुगंधषट्पद! ॥ ३ ॥ कौरववंशीं विख्यातकीर्ती । दुष्यंतनामा गुणैकमूर्ती । श्रेष्ठ

---

१. 'अणिमा लघिमा प्राप्तिः प्राकाम्यं महिमा तथा । ईशित्वं च वशित्वं च तथा कामावसायिता ॥' ह्या आठ सिद्धि होत. २. रुक्मिणी, जांबवती, भामा, सत्या, भद्रा, लक्ष्मणा, कालिंदी, मित्रविंदा, या कृष्णाच्या आठ नायिका. ३. बलराम. ४. रेवतीपति. ५. नागरायुध. ६. प्रलंबनामक दैत्यास मारणारा. ७. पूर्वजन्मींच्या अप्सरा होत. ८. सोळा हजार स्त्रियांनीं. ९. प्रचीति, प्रत्यय. १०. कौरवांची वंशावळी हाच मेरु. ११. भ्रमर. (याला सहा पाय असतात).

भूपाळ चक्रवर्ती[1] । वीर्यें शौर्यें आगळा[2]. ॥ ४ ॥ प्राची[3] प्रतीची[4] दक्षिणोत्तर[5] ।
चारी दिशा चतुःसमुद्र । आक्रमूनि मही हे महेंद्र[6] । सुरेंद्र तैसा भूलोकीं. ॥५॥
वर्णव्यवस्था[7] जया देशीं । 'कुमारीखंड' म्हणिजे त्यासी । म्लेंछ[8]मंडळ सिंधुप्र-
देशीं । एकवर्ण नर तेथें. ॥ ६ ॥ अष्टादश आणि बावन्न । उत्तम मध्यम
कनिष्ट वर्ण, । यांहीं वसविले देश संपूर्ण । भोगिता तो एक नरनाथ. ॥ ७ ॥
यावेगळें एकवर्णी । सिंधूपरिसरिं सिंधुस्थानीं । मंडळें भरिलीं बहुत यवनीं ।
तेथेंही स्वामित्व तयाचें. ॥ ८ ॥ जावी जंगी फिरंगी क्रूर । नायी इंग्रेज
मल्लोबार । काबे कावटे कंकमखर । जळतस्कर मांसाशी. ॥ ९ ॥ रूमशाम
खोरासान । मुलतान हबशान अर्बस्थान । उजवेखपटाण तुर्कमान । बदक-
शान मेवात ॥ १० ॥ घोडेमुख धेनुमुख । सूकरमुख रासभमुख । बानरमु-
ख ऋक्षमुख । मानव आहार जयाचा. ॥ ११ ॥ केशवसन रोमवसन । कर्ण-
धारी कर्णप्रावर्ण । पादहीन हस्तहीन । एकचरण भाळाक्ष. ॥ १२ ॥ जळ-
माणसें वनमाणसें । सिंदूरवर्ण विक्राळवेशें । अन्नाविरहित मद्दे मांसें । अति-
कर्कश वाढिन्नलीं. ॥ १३ ॥ त्याही देशा आपुली आज्ञा । सत्ता नेमिली पर-
मप्राज्ञा! । गोवध देवब्राह्मणअवज्ञा । करिती त्यातें करी शूळदंड[9]. ॥ १४ ॥
सवेद अवेद देश मंडळें । द्वीपें उपद्वीपें जा वेगळें । वनें पर्वतें नानास्थळें ।
ऐकी आज्ञा चालती. ॥ १५ ॥ नवखंड[10] सप्तद्वीपवती[11] । सप्तार्णवी[12] सप्तपर्वती[13] ।
आज्ञा यश व्यापिलें जगती । जेंवि चैतन्य सर्वत्र. ॥ १६ ॥ देश विदेश वदावे
एथ । ते सहज सभापर्वा[14] आंत । बोलणें असे समयोचित । राजसूय[15] प्रसंगीं.
॥ १७ ॥ याचिलागीं या अवसरा । विशाळ वक्तृत्वाचा वाग्दोरा । सांवरोनि
जव माघारा । उन्मेष[16] केला तुरंग. ॥ १८ ॥ असो. दुष्यंतराज नृपती । उ-
भऊनि[17] कीर्ती जगती । भोगितां ब्रह्मांड एकांतीं; । उपमा लाजोनि माघारे.

---

१. सार्वभौम. २. श्रेष्ठ. ३. पूर्वदिशा. ४. पश्चिमदिशा. ५. दक्षिण, उत्तर. ६. पर्वत (कुलपर्वतांपैकीं). ७. भिन्नजातीय जनांची व्यवस्था. ८. मांसभक्षक. ९. देहांत शासन. १०. नवखंडें:– इलावर्त, ब्रह्मावर्त, मलय, केतु, भद्रसेन, इंद्रस्पृक्, विदर्भ आणि कीकट. ११. सप्तद्वीपें:– 'जंबुप्लक्षाह्वयौ द्वीपौ शाल्मलिश्चापरो द्विज । कुशः क्रौंचस्तथा शाकः पुष्करश्चैव सप्तमः ॥' (विष्णुपुराण). १२. सप्तसागरः–क्षारसमुद्र, इक्षुरसोद, सुरासमुद्र, घृतोद, क्षीरोद, दधिसमुद्र आणि शुद्धोद. १३. सप्तपर्वतः–'महेंद्रो मलयः सह्यः शुक्तिमान् गंधमादनः । विंध्यश्च पारियात्रश्च सप्तैते कुलपर्वताः॥' १४. मुक्तेश्वरकृत सभापर्व अध्याय ८ यांत हें वर्णन आहे. १५. सार्वभौम राजानें जो यज्ञ करावयाचा तो=राजसूय यज्ञ. १६. अल्पकाल. १७. उभारून.

॥ १९ ॥ रत्नभरित जडित रत्नीं । रत्नमांदुसा[1] रत्नखाणीं । रत्नाकरातें हे मेदिनी । गुणरत्नें पाळिती प्रतापें. ॥ २० ॥ हिंसाकारी अधर्मकारी । अथवा वर्णसंकर-[2]कारी । दुष्यंतराज्यीं अनाचारी । स्वप्नीं ही परि असेना. ॥ २१ ॥ धर्मरीति धर्मधन । सेवूनि संतुष्ट सर्व जन, । स्वस्वकर्मीं सकळ वर्ण । विहिताचारी वर्तती. ॥ २२ ॥ रोग दारिद्र कीं बंधन । दुःख दुर्भिक्ष[3] अकाळमरण । सर्प वृश्चिक[4] तस्कर जाण । दुष्यंतराज्यीं असेना. ॥ २३ ॥ दर्शनें गृहस्था भयकारी । नाहींच झाले भिकारी. । ब्राह्मण निरंतर सदाचारी । अत्यंत दंभें सांडिलें. ॥ २४ ॥ विषयविष्ठेंत बुडालीं मनें । शरीरें वैराग्यसुचंदनें । चर्चूनि मिरवती शब्दज्ञानें । ते गोंसावी तैं नव्हते. ॥ २५ ॥ स्वकाळीं पर्जन्य वोपी[5] उदका । रत्नधान्यें समृद्धीपिका । पृथ्वी पिके हो! मांत्रिका । फळे जैसी श्रीविद्या. ॥ २६ ॥ विष्णुसमान सत्ताबळ । प्रतापें जैसा सूर्य तेजाळ । धरातुल्य[6] सहनशीळ । अक्षोभ[7] जैसा सागरु. ॥ २७ ॥ पृथ्वीपासोनि मंदराचळ । उपडुं शके ऐसा सबळ । दुष्ट दंडनीं जैसा काळ । चंद्रातुल्य उपकारी. ॥ २८ ॥ निपुण शास्त्रास्त्रप्रहरणीं । आरूढों जाणे सर्व वहनीं । ऐसा भूपाळ-चूडामणी[8] । दुष्यंतराजा मूलोकीं. ॥ २९ ॥ सप्तसमुद्रींचे लोट । धरामंडळीं एकवट । तैसे सेनेचे संघाट[9] । घेवुनि वना चालिला. ॥ ३० ॥ वाजी वारण रथ पदाती । संख्या करितां न धरवे गणती. । सेनावसनें सर्व जगती । पांघुरविलीं समर्थें. ॥ ३१ ॥ अनेक शस्त्रधरांचीं वृंदें । अनेकवाद्यें अनेकशब्दें । गर्जती तेणें विचित्रनादें । नादावलें अंबरं[10]. ॥ ३२ ॥ कनकरत्नीं निरवाळलीं[11] । गोपुरें[12] गगन भेदीत गेलीं, । तेथें वळघोनि[13] पाहों ठेलीं । कामिनीवृंदें[14] आवडी. ॥ ३३ ॥ चंद्रमंडळीं पिकली धरणी । तैशा श्वेतछत्राच्या उभारणी । रत्नकळसाचिया किरणीं । कवि[15] गुरु[16] दोन्ही लोपले. ॥ ३४ ॥ क्षीरसमुद्रीं तरंग[17] उठती । तैसीं दिव्यचामरें झळकती । वीरश्रीसीं राजनृपती । नक्षत्रीं चंद्र अवगमे. ॥ ३५ ॥ सेनेसहित सेनानाथ । नगरगर्भीं जात मिरवत । हें देखोनि नारी शतानुशत[18] । मांडिया गोपुरीं वळघल्या[19]. ॥ ३६ ॥ कनककुसुमें कनकताटीं । आवडी धरूनि करसंपुटीं, । अवलोकूनि राजमुगुटीं । पुष्पांजुळी सां-

---

१. रत्नांची पेटी. २. भिन्नवर्णांचा संबंध जोडणारा, जातिभेद मोडणारा. ३. दुष्काळ. ४. विंचू. ५. देई. ६. पृथ्वीसमान. ७. गंभीर (खोल). ८. राजांचें शिरोभूषण. ९. समूह. १०. आकाश. ११. निर्मळ केलेलीं. १२. शहराच्या अथवा राजवाड्याच्या दरवाज्यावर बांधलेली उंच इमारत. १३. चढोनि. १४. प्रमदासमूह. १५. शुक्राचार्य. १६. बृहस्पति. १७. लाटा. १८. शेंकडों. १९. चढल्या.

डिती. ॥ ३७ ॥ एकीं अवलोकितां नयनें । म्हणती, ‘निवालीं अंतःकरणें.’ । एक म्हणती, ‘पंचबाणें । चित्तकुरंग वेधिला.’ ॥३८॥ तारुण्यलावण्यऐश्वर्यवंत । गुणौदार्य नरसमर्थ । देखोनि स्त्रियांचा मनोरथ । पतंग होय भोगावया. ॥३९॥ एकीं भाविती निजमानसीं । ‘समर्थाघरीं होइजे दासी, । गृहिणी होवोनि दरिद्रयासी । रौहटी करणें जळो तें.’ ॥ ४० ॥ एकी घरचारमाझारी । म्हणती, ‘पुजोनि शंकरगौरी । ऐसा भ्रतार स्वकीय जन्मांतरीं । पावोनि स्वेच्छा भोगावा.’ ॥ ४१ ॥ ऐक पवित्र पतिव्रता । ईश्वर मानूनि स्वकीय भर्ता । ऐश्वर्येसीं अमरनाथा । भणंगप्राय अवगणिती. ॥४२॥ असो. हे संसारीक जना । सुप्रिय विषयाची वासना । निःशेष देखता अंतःकरणा । अभिलाष उपजे सर्वांतें. ॥ ४३ ॥ तैसींच पुरुषांचीं हीं मनें । सुंदर परस्त्रीअवलोकनें । देखतांक्षणीं तत्क्षणें । मनें भोगोनि जाइजे. ॥ ४४ ॥ माता कन्या अथवा भगिनी । त्यांचे मैथुनिं अंतःकरणीं । न स्मरे ऐसा न दिसे कोणीं । तो अव्यभिचारी मनाचा. ॥ ४५ ॥ मनें न उपजे ज्या अभिलाष । तोचि जाणावा ईश्वरी पुरुष । पुरुषाहूनि आगळा ईश । नमिती एक पतिव्रता. ॥ ४६ ॥ यापरी अवलोकितां रावो । नारीसी गमला ऐसा भावो, । नारीदर्शनीं पुरुषसमूहो । विकार अविचारी पावले. ॥ ४७ ॥ शोभा संपत्ति समुद्र । वाद्यगजरीं नृपनरेंद्र । नगर टाकोनि चालिला इंद्र । नंदनवना पैं जैसा. ॥ ४८ ॥ आशीर्वाद घेऊनि द्विजा । मागा परतवी सहित प्रजा, । जनप्रदेश लंघोनी पैजा । महावनीं प्रवेशे. ॥ ४९ ॥ देखे महाप्रचंड गिरी । विशाळ पर्वताचिया दरी । जळें तुंबिलीं सरितांसरीं । समुद्रतुल्य अगाध. ॥ ५० ॥ तेथें आम्र निंबोल बेल । कवंट कदंब मधु पिंपळ । सिरस पलाश बिशाळ । न्यग्रोधवृक्ष वाढिन्नले. ॥ ५१ ॥ ताळ हिंताळ शाळ सरस । मंदार कांचन तमाळ निर्मळ । पिचुंमंद देवदार धवळ । अर्जुनवृक्ष अपार. ॥ ५२ ॥ खैदिर कंटकी हिवरसादोडे । हिरवे हिंगण ब्याहाडे कुडे । आंवळे पाचुडे कंकाकडे । करंज पांगरे चौफेरी. ॥५३॥ वेणू कळंक चिविया जाळी । औदुंबर फळले सुगंधफळीं, । तोरणी लागली घोंसाळीं । खिरणीया टेंबुरणी पिंपरी. ॥ ५४ ॥ अर्क निवडंग सदामस्त । मोडितां दिसे दुग्ध स्रवत । जैसे प्रपंची विवेकरहित । सुख बोलती विषयातें.

१. मदनानें. (याचे पांच फुलांचे पांच बाण असतात.) २. अंतःकरणरूप हरिण. ३. कल्पना करतात. ४. बर्तणूक. ५. भिकारी. ६. मोठा भयंकर. ७. सरोवरें. ८. जलवेतस. ९. मोहाचें झाड. १०. वडाचीं झाडें. ११. कांटेताड. १२. सायल्याचें झाड. १३. कडूनिंबाचें झाड. १४. पांढरा. १५. खैराचें झाड. १६. संसारीजन.

॥ ९५ ॥ बदरी श्लेष्मातकी[1] आंवळी । शाल्मली करवंदी जांबुळी । चारी भेल्लातकी[2] गुग्गुळी । शमी वेरुकळी चिंचणिका. ॥ ९६ ॥ ऐसिया वृक्षांचीं अचाट । डोंगें[3] लागलीं घनदाट[4]; । माजी निर्झरोदकाचे[5] पाट । स्वैरावैरा[6] धांवती. ॥ ९७ ॥ मस्तकें उचलोनि दिनकर[7] । छाये रक्षिला अंधकार; । माजी श्वापदगणांचे भार । सुखाडले सुखवस्ती. ॥ ९८ ॥ हरिण करी सिंह शार्दूळ । चित्ते चितळे तरस तरळ । रिक्ष रोही गवे मासाळ । अरण्य सारे माजले. ॥ ९९ ॥ खड्गमृग कस्तुरमृग । गोळांगुळ[8] अनेक रंग । अप्रसिद्ध कोण सांग । वृक दंबूक शशादी. ॥ ६० ॥ नूतन भाग्य पातलिया नष्टा, । श्रीमदें[9] वांकुल्या दाविती श्रेष्ठा; । [10]तैसें दांत विचकून श्रेष्ठा । मर्कट करिती बहुवृक्षीं. ॥ ६१ ॥ प्रस्थानभेरीच्या गर्जनें । वीरमुखींचीं आस्फोटणें[11] । तडक यंत्रें फुटती, तेणें । महावनचर बुझाले. ॥ ६२ ॥ कोंडले देखोनि चौफेरी । झुसांडी मारिती राजभारीं[12], । ते वधिजेती शस्त्रशरीं । महावीरीं असंख्य. ॥ ६३ ॥ मृग मारोनि असंख्यात । भक्षूनि अभर्जित भर्जित, । पारध खेळतां झाले श्रांत । ते विश्रांती पावले. ॥ ६४ ॥ पारधी खेळावयाची हांव । श्वापदें साधावयाचे भाव । सरक चौकाचें लाघव । लपणी छपणीं धांवती. ॥ ६५ ॥ उडती बुडती आणि लपती । गौरीगायक दीपका दीप्ती । घंटा पारधी खेळणें राती । कोपों नेदी रक्षणें. ॥ ६६ ॥ ऐसा करीत विद्याकुशळ । रायें खेळोनि मृगयाखेळ । फळें आणोनि महासुकाळ । सकळदळ तोषविलें. ॥ ६७ ॥ अवलोकोनियां तें वन । तंव देखिलें कश्यपारण्य; । राजा करी पुढारे गमन । सिद्धीं[13] साधकीं[14] बसविलें. ॥ ६८ ॥ तेथें चंदन पारिजात । देवदार केतकी सुपुष्पित । तुळसीवनें सुशोभित । दवनेवनें घमघमिती. ॥ ६९ ॥ सरितासरोवरींचीं पैं जळें । पद्मगंधें[15] सुशीतळें । रातोत्पळें नीळोत्पळें । सितोत्पळें कनकाचीं. ॥ ७० ॥ तेथें राजहंस कारंडक । चकोर सारस चक्रवाक । करींद्र करिणी करिशावक । स्वेच्छा करिती जळक्रीडा. ॥ ७१ ॥ मयूर गर्जती किंकारें, । कोकिळा गर्जती पंचमस्वरें, । षट्पद[16] बोलती झंकारें, । आणी कपोतें[17] कूजती. ॥ ७२ ॥ सदा सर्वदा पुष्पीं फळीं ।

---

१. भोंकरी. २. भिलावा, बिब्बा. ३. झाडी, झुडपें. ४. गच्च भरलेलीं. ५. झऱ्याच्या पाण्याचे. ६. स्वच्छंदानें. ७. सूर्य. ८. वानर. ९. लक्ष्मीच्या मदानें. १०. 'तैसे रंग तरंग चेष्टा' असाही पाठ आहे. ११. मोठा आवाज, शस्त्रास शस्त्र लागून झालेला खणखणाट. १२. राजसैन्यीं. १३. ज्यास सिद्धि प्राप्त झाली तो. १४. जो कार्यसिद्धीसाठीं उद्योग करतो तो. १५. कमलाच्या वासानें. १६. भ्रमर. १७. पारवे.

वृक्ष लवती भूमंडळीं; । जैसा कुळीन ऐश्वर्यकाळीं । विनयें भजे सर्वांतें. ॥७३॥ [1]चहूं वेदांचीं पारायणें, । [2]अनेकशाखांचीं अध्ययनें, । रायें परिसोनि अंतःकरणें । पापक्षयो [3]भाविला. ॥ ७४ ॥ नदी मालिनी [4]पवित्रजीवनी । वाहे जैसी [5]दैवत-टिनी । [6]तरंगलिंगें [7]सुफेनसुमनीं । सुपूजित शोभती. ॥ ७५ ॥ तिच्या तटाकीं असंख्यात । [8]संशितव्रती वानप्रस्थ । श्रौतस्मार्तविधिनिरत । अनुष्ठानी तपस्वी. ॥ ७६ ॥ याजकीं रचोनि होमशाळा । होमकुंडीं प्रदीप्त अनळा । हवी होमितां रविमंडळा । धूम भेदिती हविर्गंधें. ॥ ७७ ॥ द्वादशपंचाग्नि-धूम्रपानें । ग्रीष्मीं रविचक्रावलोकनें । वर्षाकाळीं वृष्टी साहणें । सीतकाळीं जलशय्या. ॥ ७८ ॥ एक उभे एकचरणी, । एक [9]वातांबुपर्णाशनी; । ऐशा तपोधनाच्या श्रेणी । असंख्यात देखिल्या. ॥ ७९ ॥ सप्तकोटि महामंत्रें । अनेक पात्रीं अनेक यंत्रें । सांग मंत्रें चतुःषष्टि तंत्रें । मंत्रोपासक पूजिती. ॥ ८० ॥ एक मौनी, एक स्मरणी, । एक साकारमूर्तिध्यानी, । एक आत्मानुसंधानी । '[10]सोऽहंमस्मि' या बोधें. ॥ ८१ ॥ [11]साही अंगें [12]दशे लक्षणें । पाठक करिती वेद पठणें । साम करिती सामगायनें । अतिसुस्वरें ते ठायीं. ॥ ८२ ॥ तें परिसोनि [13]भाष्यकार । म्हणती, 'अर्थानुष्ठान थोर । वृथा पठनाची करकर । कंठ शोषणा वाउगी.' ॥ ८३ ॥ [14]चार्वाक म्हणती, '[15]शरीरात्मा, । एक प्रत्यक्ष प्रमाण प्रतिमा, । [16]स्वर्ग नरक उभय भ्रमा- । भ्रमें नरक भोगवी'. ॥ ८४ ॥ हें ऐकोनि [17]नरेश्वर । [18]मुरारी भट्ट प्रभाकर । [19]मीमांसक म्हणती, 'पामर ! । क-

---

१. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, आणि अथर्ववेद. २. वेदाच्या अनेक शाखा (पोटभाग) आहेत. जसें:—शाकलशाखा, बाष्कलशाखा, हिरण्यकेशीशाखा, आपस्तंबशाखा, इ०. ३. पापाचा क्षय झाला असें मानिलें. ४. निर्मलजला, पुण्यतोया. ५. गंगा. ६. तरंग(लाटा)रूप लिंगांनीं. ७. पुष्पांनीं. ८. ज्यांनीं व्रताची पूर्णता केली असे. ९. वारा, पाणी आणि पानें खाणारा. १०. तो मी आहें. ११. शिक्षा, छंदस्, व्याकरण, निरुक्त, ज्योतिष आणि कल्प हीं सहा अंगें. १२. पद क्रम घन जटा इत्यादि लक्षणें. १३. टीकाकार. भाष्यकार ही संज्ञा मुख्यत्वेंकरून शंकराचार्यास लावतात. येथें आचार्यांचा कोणी अनुयायी शिष्य असें समजावयाचें. १४. चार्वाकमतानुयायी. या दर्शनांतील मुख्य मत असें कीं, स्वर्ग नाहीं, मोक्ष नाहीं, देह हाच आत्मा तो विनाशी आहे. यांस प्रमाणचतुष्टयापैकीं प्रत्यक्ष प्रमाण मात्र मान्य आहे. चार्वाकमतानुयायी नास्तिक आहेत. मरेपर्यंत मनुष्यानें खुशाल बसून कर्ज काढून यथेच्छ गोड गोड खावें, कारण स्मशानांत देहाचें एकदा भस्म झालें म्हणजे हा पुनः कोठून मिळणार ? यांस 'लोकायतिक' असें दुसरें नांव आहे. १५. शरीर हाच आत्मा, तो शरीराहून भिन्न नाहीं. १६. स्वर्ग नरक हे भ्रमजन्य आहेत. १७. नरश्रेष्ठ. १८. नामविशेष. १९. मीमांसाशास्त्रानुसारी. या शास्त्राचे उत्तर आणि पूर्व असे दोन भेद आहेत, पूर्वमीमांसाशास्त्रांत कर्ममार्गाचें प्रतिपादन आहे. याचा कर्ता जैमिनिमुनि. येथें मीमांसक म्हणजे कर्ममार्गवादीजन असें समजावयाचें. उत्तरमीमांसा वेदांतपर आहे.

र्मचि मुख्य आचरिजे.' ॥ ८५ ॥ तव आवेशें नैयायिक[1] । साहित्य उपासक वैशेषिकें[2] । म्हणती, 'कर्ता ईश्वर एक । कारणभूत[3] जगातें.' ॥ ८६ ॥ सांख्य[4] म्हणती, 'सांगा युक्ती । आदिकारण पुरुषप्रकृती । त्यापासोन जगदुत्पत्ती । शैवागमसंमतें.' ॥ ८७ ॥ हांसोनि बोलिले वेदांती[5], । 'अवघे आंधळे सिद्धांतीं; । सर्व[6] ब्रह्म ऐसी स्मृती । उपनिषदार्थ[7] अनुवादे. ॥ ८८ ॥ परिणामवाद[8] विवर्तवाद[9] । बिंबप्रतिबिंब[10]जीवेश्वरवाद[11] । अन्वय[12]व्यतिरेकाचे[13] शब्द । अनुगत[14] व्यावृत्त[15] संकेतें. ॥ ८९ ॥ मूळज्ञान तुळाज्ञानें । एकीं अनेक जीवलक्षणें ।

---

१. न्यायशास्त्रानुसारी. या शास्त्राचा कर्ता गौतममुनि होय. २. कणादमतानुसारी. वैशेषिक पंडित असें मानतात कीं, आत्मा नित्य व विभु आहे आणि त्याच्या अंगीं बुद्धि, सुख, दुःख, इच्छा, द्वेष, प्रयत्न, धर्म, अधर्म, आणि भावना असे नऊ विशेष गुण आहेत. ३. 'रज्जु कारण भुजंगातें' असाही पाठ आहे. ४. सांख्यदर्शनाप्रमाणें जगताचें आदिकारण पुरुष+प्रकृति होय. यांच्या संयोगापासून महत्, महतापासून अहंकार, त्यापासून तन्मात्रा आणि एकादशेंद्रियें आणि तन्मात्रापासून स्थूल भूतें म्हणजे जगत्सृष्टि. या सांख्यदर्शनाचा प्रवर्तक कपिलमुनि होय. हें निरीश्वरवादी आहे. ५. सकल प्रपंच मिथ्या असून सर्व कांहीं चैतन्यरूपी ब्रह्म आहे असें मानणारे. उत्तरमीमांसाशास्त्र हें ज्ञानमार्गप्रतिपादक आहे. याचा कर्ता व्यास होय. यानें कर्ममार्गाचें खंडन केलें आहे. व्यासांनीं लिहिलेल्या ब्रह्मसूत्रांवर शंकराचार्यादिकांनीं भाष्य व्याख्यानें लिहिलीं आहेत. या शास्त्रांत मुख्यत्वेंकरून उपनिषदांतील मताचा समावेश केला आहे. ६. 'सर्व ब्रह्मेति ऐशी श्रुति' असाही पाठ आहे. ७. उपनिषदांत मुख्य विषय ब्रह्मविचार आहे. यांत आत्मिक आणि भौतिक तत्त्वांचें विवेचन केलें आहे. चैतन्य म्हणजे काय? आत्मा म्हणजे काय? जन्मांतर कां होतें? जगताची उत्पत्ति कशी झाली? मी कोण? आलों कोठून? इत्यादि तत्त्वविचारांचीं उपनिषदें भांडारगृहें आहेत. उपनिषदांची संख्या मोठी आहे, तथापि त्यांत दहा प्रमुख आहेत:—'ईशकेनकठप्रश्नमुंडमांडूक्यतित्तिरिः । ऐतरेयं च छांदोग्यं बृहदारण्यकं तथा ॥'. या दहांवर शंकराचार्यांचें भाष्य आहे. ८. पदार्थमात्राच्या स्थितींत अथवा आकारांत विकार अथवा फेरफार होतो किंवा नाहीं याविषयीं वाद. ९. खोट्या वस्तूंच्या ठायीं खऱ्या वस्तूंचा भास होतो, याविषयीं विवेचन. जसें:—दोरीच्या ठायीं सर्पाचा भास, अथवा सूर्यकिरणांच्या ठायीं जलाचा भास. १०. बिंबापासून प्रतिबिंब म्हणजे प्रतिछाया उत्पन्न होणें. प्रतिबिंब हें बिंबानुरूप असतें किंवा कसें इत्यादि विवेचन. आरशांत मुखाचें प्रतिबिंब दिसतें अथवा उदकांत चंद्राचें प्रतिबिंब दिसतें तें सत्यरूप अथवा मिथ्या इत्यादि विषय प्रतिपादन. ११. जीवाचें आणि ईश्वराचें ऐक्य होतें अथवा नाहीं, जीवात्मा अखेरीस परमात्म्याशीं सरूपता पावतो अथवा नाहीं, या प्रमेयाचें पूर्वपक्ष उत्तरपक्ष करून खंडन मंडन करणें. १२. अन्वय म्हणजे संबंध. स्वरूपतः अथवा स्वशक्तियोगें कोणत्या एकाद्या अधिकरणास (स्थानास) व्यापून पदार्थाचें जें अस्तित्व तो अन्वय होय. कार्यकारणसंबंध. जसें सुवर्णाच्या दागिन्यांत अन्वय आहे, म्हणजे दागिन्याला (अधिकरणाला) व्यापून सुवर्णाचें अस्तित्व आहे, तेव्हां हा अन्वय झाला. सोनें हें कारण आणि दागिना हें कार्य. जितक्या चंद्रकलांवर सूर्यकिरणांचा अन्वय होतो तितक्या मात्र प्रकाशित होतात. १३. व्यतिरेक म्हणजे (अन्वयाचा) अभाव. ईश्वरी ज्ञानाचा व्यतिरेक (अभाव) आहे. जगांत परमेश्वराचा व्यतिरेक (अभाव) आहे. १४. अन्वित, अनुलक्षून असणारा. १५. विधिसंकोचित, व्यवच्छिन्नवर्जित.

अनेक विद्या पक्षापक्ष हरणें । ब्राह्मणांसह मुच्यते. ॥ ९० ॥ सर्व सहित सर्व रहित । व्यापक चाळक साक्षिभूत । व्याप्य[1] व्यापक सदोदित । ब्रह्मवेत्ते[2] जाणती. ॥ ९१ ॥ मनोजय[3] मोक्ष केवळ । निश्चयें मानूनि पातांजळ[4] । अष्टांग[5] योगाभ्यास[6] प्रबळ । म्हणती समाधि[7]साधनें. ॥ ९२ ॥ ऐसे नानामतांचें वाद । रायें परिसोनि महाविनोद । सांडोनियां भेदाभेद । एकभावें समस्तां. ॥ ९३ ॥ साष्टांग करूनि नमन । राहवुनि सेना प्रधान । निःसंग एकाकी आपण । कं[8]-श्यपाश्रमीं प्रवेशे. ॥ ९४ ॥ अवलोकोनि कश्यपाश्रम । अंतरीं पाहे नृपसत्तम । तंव कण्वऋषीचा आश्रम । अतिरमणीय देखिला. ॥ ९५ ॥ आदरें येऊ-नियां निकटीं । अंतरीं पाहे पर्णकुटीं[9], । मनुष्यावीण सर्वसृष्टी । गृहसामुग्री दिसताहे. ॥९६॥ मग गर्जोनि नराधीशें । म्हणे, 'या आश्रमीं कोण असे, ? । हें परिसोनि इंदिरा[10]वेशें । लावण्यकलिका[11] साजिरी. ॥ ९७ ॥ कनकलतिका[12] सौदामिनी[13], । कीं चंद्रकळा तनुधारिणी, । सुवर्णकेतकीपत्रवर्णी । सुगंधखाणी, हरिणाक्षी. ॥ ९८ ॥ रूपयौवनचातुर्यभरिता । बाहेर पातली मुनीश्वरदुहिता । अत्यादरें धरित्रीकांता[14] । पवित्रासन वोपिलें. ॥ ९९ ॥ 'स्वागत' पुसोनियां व-चनीं । अर्घ्यपाद्यादि पूजनीं । राजा तोषवोनि बहुमानी । कुशळ[15]विचार कु-शळत्वें. ॥ १०० ॥ 'दर्शनें स्वानंद झाला नयना, । नाम अभिधान करावें श्रवणा, । परिचयज्ञानें अंतःकरणा । अष्टभावें[16] भेटवणें.' ॥ १०१ ॥ ऐकोनि चातुर्याच्या गोष्टी । राजा चमत्कारिला पोटीं । म्हणे, 'हे वयें धाकुटी । विचार-

---

१. 'व्याप्याव्याप्य उपाय तींत' असाही पाठ आहे. २. 'ब्राह्मणसह मुच्यते' असाही पाठ आहे. ३. मन स्वाधीन करून ठेवणें हाच मोक्ष होय. ४. पतंजलिकृत योगशास्त्रानुयायी, पातंजलदर्शनानुग. ५. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि हीं आठ अंगें. ६. योग म्हणजे चित्ताच्या वृत्तींचा निरोध. चित्ताच्या वृत्ति बाह्यपदार्थांवरून काढून त्यांचा रोंख आत्म्याकडे लावणें याचें नांव योग. चित्तवृत्तींचा निरोध अभ्यासानें आणि वैराग्यानें करितां येतो. चित्त अंतर्मुख व्हावें, त्याचा रोंख बाह्यसृष्टीकडे लागूं नये आणि आत्म्याच्या ठिकाणीं लय लागावा म्हणून जो वृत्तिशून्य चित्ताचा प्रयत्न त्याचें नांव अभ्यास होय. ७. प्राणायामादिसाधनांनीं सर्व विषयांपासून चित्त निवृत्त करून ईश्वराच्या ठिकाणीं एकाग्रतेनें लावणें यास 'समाधि' म्हणतात. ८. कश्यपगोत्रोत्पन्न कण्वाच्या आश्रमीं. ९. झोंपडी. १०. लक्ष्मी. ११. लावण्याची कळी. १२. सुवर्णाची वेल. १३. वीज. १४. राजाला. १५. राष्ट्रादि क्षेम. १६. स्तंभ, स्वेद, रोमांच, स्वरभंग (वैस्वर्य), वेपथु (कंप), वैवर्ण्य, अश्रुपात आणि प्रलय असे आठ प्रकारचे भाव मनुष्याचे शरीरीं होतात. 'आप्तभावें' असाही पाठ आहे.

वृद्ध दिसताहे.' ॥१०२॥ मग म्हणे, 'वो सुलक्षणे! । गुणालय कमलेक्षणे ! । तुझेनि वचनमात्रें क्षणें । श्रम सर्वही हरपला. ॥ १०३ ॥ मैथुलीनरेंद्रपुत्र जगती । दुष्यंतराजा चक्रवर्ती । ऐकिला असेल, तरि हे मूर्ती । बोळखें दृष्टीं सुजाणे ! ॥ १०४ ॥ कण्वऋषीचें दर्शन । इच्छून येथें ममागमन । केव्हां होईल ? बोल वचन, । विलंबें कीं अविलंबें ?' ॥ १०५ ॥ शकुंतला म्हणे, 'नृपती ! । मम पिता विवेकमूर्ती । वनफळें घेऊनि शीघ्रगती । आतांचि येईल आश्रमा. ॥ १०६ ॥ यालागीं नरेंद्रचूडामणी ! । क्षणेक बैसावें स्वस्थ होउनि, । इच्छित कामना ऋषिदर्शनीं । पूर्ण होईल निर्धारें.' ॥ १०७ ॥ एकांत देखोनि निर्मळ । राजहृदयीं महाप्रबळ । कामार्णवाचे कल्लोळ । हेलावती अतिमानें. ॥ १०८ ॥ राजा पुसे, 'लावण्यराशी ! । ऊर्ध्वरेता कण्वऋषी, । त्यासी तूं कन्या झालीस कैसी ? । हें मज कळलें पाहिजे.' ॥ १०९ ॥ 'भुजंगवेणीधरा ! चतुरा !' । म्हणे 'राजया ! जनेश्वरा ! । पूर्वीं एक तपस्वी धरा । ऋषिदर्शना पातला. ॥ ११० ॥ तेणें पुसिलें तुझिया ऐसें, । त्याप्रति कण्वें कथिलें जैसें । तें मी सांगेन सावकाशें; । श्रवण केलें पाहिजे. ॥ १११ ॥ पूर्वीं गाधिज मुनींद्रवर्य । खडतर करितां तपश्चर्य । देखोनि सांडिलें धैर्य । देवेंद्रें कांपे चळचळा. ॥ ११२ ॥ म्हणे, 'इंद्रपदाचिये चाडे । धरूनि विश्वामित्र वाडे । तपश्चर्या अति अवघड । मांडिलीसे निर्धारें. ॥ ११३ ॥ यासि उपाव करावा कवण । जेणें तयाचें सुकृतधन । हारवोनि हा ब्राह्मण । दीन होय सर्वस्वें.' ॥ ११४ ॥ तेवेळीं अप्सरांमाजी श्रेष्ठ । मेनिके[11] पाचारिली निकट, । म्हणे, 'हें माझें संकट । वारे ऐसें करावें. ॥ ११५ ॥ तुवां जावोनि तपोवना । कौशिकऋषीच्या दर्शना । विघ्न करावें, जेंवि का दाना । दुरुक्ती[12] नाशी क्षणार्धें. ॥ ११६ ॥ कां ज्ञानियाची ज्ञानकळा । आशेनें कीजेति सर्वविकळा[13], । तेंवी ऋषीच्या तपोबळा । निर्फळ करीं सकामें. ॥११७॥

---

१. तरंग २. उठती, उचंबळती. ३. ब्रह्मचारी. ४. पृथ्वीधरा. (पृथ्वीपते.) ५. विश्वामित्र. ६. इंद्र. (कोणी मोठें तप केलें म्हणजे तो आपलें इंद्रपद हरील असें भय इंद्रास असतें, म्हणून तपोभंग करावा ही गोष्ट इंद्राला आवश्यक असते.) ७. आवड. ८. थोर. ९. पुण्यरूप धन. १०. सुरवेश्यांमध्यें. या देवांगना इंद्राचें एक कोमल शस्त्र असून त्यांच्या करवीं तो आपली नाजुक कामगिरी सदा करवितो असें वर्णन आहे. ११. मेनका. १२. अपशब्द बोलून दिलेलें दान पुण्यावह होत नाहीं अशी समजूत येथें व्यक्त केली आहे. १३. विफळा. ज्ञानी पुरुषांची विद्या आशालुब्ध झाल्यानें विफळ होते त्याप्रमाणें.

अधरपान आंबवणें । गाढालिंगनीं मेळवणें, । विषयभाला गोऊनि मनें । वश्य कीजे द्विजधेनु[2]. ॥ ११८ ॥ तळीं भगपात्र वोढवून । नेमें त्राहाटी लिंगस्थान, । वीर्यदोहनें करोनि क्षीण । तपश्चर्ये नागवीं. ॥ ११९ ॥ पैयोधर मेंडिचिया आशा । विश्वामित्र करोनि म्हैसा । पाठीं धावे रेकत ऐसा । विनोद दावीं आमुतें.' ॥ १२० ॥ मेनिका म्हणे, 'अमरोत्तमा! । प्रतिसृष्टीचा अपरब्रह्मा । ज्याचिया तपश्चर्येचें तुम्हां । भय सर्वदा अपार. ॥ १२१ ॥ वसिष्ठपुत्र एकशत गुणी । जेणें वसविले कृतांतभुवनीं, । क्षत्रियवीर्यज ब्राह्मणपणीं । तपोबळें मिरवत. ॥ १२२ ॥ जेणें शौचार्थ भरिली उदकीं । नदी कौशिकी निर्मिली लोकीं, । श्रवणापासूनि सुकौतुकीं । नक्षत्रमाळा जयाची. ॥ १२३ ॥ दुर्भिक्षकाळीं मातंगयाग । जेणें संपादितां सांग । तुवांचि धांवोनि सवेग । अमृतपान[11] वोपिलें. ॥ १२४ ॥ कोपें प्रळयपंचानन[12], । वदनीं प्रत्यक्ष हुताशन[13], ।

---

१. आंबोण. २. ब्राह्मणरूपी धेनु. ३. स्तन. ४. हा तपोबळानें प्रतिसृष्टि निर्माण करी. यानें त्रिशंकुराजासाठीं प्रतिस्वर्ग निर्माण करण्याची प्रतिज्ञा करून कांहीं भाग उत्पन्नही केला. ५. वसिष्ठाशीं याचें वैर होतें. याचें कारण वसिष्ठानें आपल्यास 'राजर्षि' असें न म्हणतां 'ब्रह्मर्षि' म्हणावें अशी विश्वामित्राची इच्छा होती, पण वसिष्ठ तसें म्हणेना. तेव्हां वसिष्ठाचे शक्ति आदि शंभर पुत्र राक्षसांकरवीं (कल्माषपाद राजाकरवीं) विश्वामित्रानें भक्षविले. ६. यमसदनीं. ७. विश्वामित्र क्षत्रिय असून तपःप्रभावानें ब्राह्मणत्व पावला हें प्रसिद्ध आहे. ८. यानें स्नानार्थ कौशिकी नदी उत्पन्न केली, व पुढें हिला 'पारा' असें नांव ठेविलें. (आदिपर्व–अ० ७० श्लो० ३०–३२). ९. त्रिशंकुराजाला राहण्यासाठीं या विश्वामित्रानें नक्षत्रयुक्त असा एक दुसराच लोक उत्पन्न केला. त्यांत श्रवणादिक सकल नक्षत्रमाला यानें कौतुकानें नवीन उत्पन्न केली. (आदिपर्व–अ० ७० श्लो० ३४.) १०. मातंगाकरवीं (वसिष्ठशापपीडित त्रिशंकुराजाकरवीं) विश्वामित्रानें करविलेला यज्ञ. अयोध्येचा राजा निबंधन हा तप करण्यासाठीं निघून गेला. नंतर त्याचा पुत्र सत्यव्रत हाही अरण्यांत राहूं लागला. तेव्हां अयोध्येंत नऊ वर्षें अवर्षण पडलें. लोकांस अन्न मिळेनासें झालें. या अवर्षणांत विश्वामित्राची स्त्री व तीन पुत्र सांपडले. त्यांचें पोषण सत्यव्रतानें केलें. नंतर सत्यव्रत राज्य करूं लागला. तेव्हां मर्त्यदेहानें स्वर्गास जाऊन स्वर्गसुख भोगावें असा यज्ञ करण्याचा विचार केला. तो बेत कुलगुरु वसिष्ठास रुचला नाहीं. तेव्हां सत्यव्रतानें (त्रिशंकुराजानें) दुसरा उपाध्याय आणून यज्ञ करण्याचा घाट घातला. त्यावरून वसिष्ठानें 'तूं चांडाल हो' असा त्यास शाप दिला. इकडे अवर्षणांतील हकीकत स्त्रीपुत्रांपासून विश्वामित्रास कळली व वसिष्ठशापानें त्रिशंकु चांडालदशापन्न झाल्याचें ही त्यास कळलें; तेव्हां त्यानें ब्राह्मण बोलावून यज्ञ केला. ११. 'अमृतपान वोपिलें' या स्थलीं 'सोमपान सेविलें' असें पाहिजे होतें. महाभारतांत 'त्वं च सोमं भयादस्य गतः पातुं सुरेश्वर' असें वर्णन आहे. यावरून इंद्र मातंगाकडे (त्रिशंकुराजाकडे). सोमपान करण्यास्तव विश्वामित्राच्या भयानें आला होता असें होतें. यास्तव वर निर्दिष्ट केलेल्या अर्थाचा चतुर्थ चरण पाहिजे होता. १२. सिंह. १३ अग्नि.

चंद्र सूर्य तैसे नयन । काळजिव्हा[1] तपस्वी. ॥ १२५ ॥ ज्याच्या क्रोधाची दीप्ती । पाताळ भेदुनि जाय क्षिती, । मेरु उन्मळे, अपांपती[2] । कलशकुक्षीं ज्या भेणें. ॥ १२६ ॥ यम सोम महर्षि साध्य । वालखिल्यादि[3] अनंत सिद्ध । जयासन्मुख शब्द[4] प्रतिशब्द । भयें कोणा न वदवे. ॥ १२७ ॥ क्षोभवितां तयाची प्रतिमा । स्वर्गासहित आम्हा तुम्हा । भस्म करील, एथें भ्रमा । संशयाचा न धरणें.' ॥ १२८ ॥ सुरेंद्र म्हणे, 'मृगडोळसे ! । बोलसी तितुकें ठाउकें असे, । तथापि आमुच्या कार्योद्देशें । अवश्य गेलें पाहिजे. ॥ १२९ ॥ मळयानिळ तुझिया संगीं । साह्य देतसें कोमळांगी ! । तूतें[5] अवलोकोनि भोगीं । नेम जाईल ऋषीचा. ॥ १३० ॥ कांहीं विषाद[6] न मानी चित्तीं । आपण होऊनी तूतें प्रार्थी । ऐसी सोधूनि देईल युक्ती । पवन संगीं सुजाणे ! ॥ १३१ ॥ आतां शंका सांडोनि मना । गंतव्य करावें ममाज्ञा.' । मेनिका आली कौशिकवना । साळंकार सुवस्त्रीं. ॥ १३२ ॥ विश्वामित्रासी करूनि नमन । त्याचेच दृष्टीपुढें जाण । क्रीडाकौतुकें सुनर्तन । दाविती झाली विनोदें. ॥ १३३ ॥ वस्त्र ठेवोनि सरोवरपाळीं[7] । स्नान सारोनि कासारजळीं[8] । नग्न[9] असोनि वस्त्राजवळीं । येतां साशंक विलोकी. ॥ १३४ ॥ गंधवायुनें विनोदें जेथें । वस्त्र उडवोनि नेलें परौतें[10], । येरी धांवोनि धरी हातें, । तंव ते वेगीं नाटोपे. ॥ १३५ ॥ रातोत्पळदळ[11] इंदीवरें[12] । आच्छादिजे तेंवि सकुमार । वामकरें कामागार[13] । कवळोनि धांवे नग्नांगी. ॥ १३६ ॥ यागतपाच्या पुण्यकोटी । मोलें घ्यावया लागे पाठीं । अमोल्य नेदी स्वल्पासाठीं । म्हणोनि मुष्टीं धरी वस्तु. ॥ १३७ ॥ धरोनि धांवे चंपळापांगी[14] । सलज्जा आंग झांकी वेगीं; । मुखें निंदित म्हणे, 'आगीं । पडें रे ! पवना ! पापिष्ठा !' ॥ १३८ ॥ नाभीतळींची रोमरेखा[15] । सिंह मध्यें अतिनेटका । देखतां ऋषीच्या विवेका । भ्रष्ट केलें मन्मथें[16]. ॥ १३९ ॥ सुवर्ण गोकर्ण शुभ सुतेज । वरी सांडिलें शाकिनीबीज । तैसें रोमांकुरांत सहज । दाऊनि लोपी लगबगा. ॥ १४० ॥ देखतां क्षणीं वज्रघात । मन्मथें ताडिताचि तेथ । तपोधैर्याचा पर्वत । चूर्ण झाला क्षणार्धे.

---

१. काळ हाच जिव्हा ज्याची असा (तपस्वी). २. समुद्र. ३. अंगुष्ठमात्रप्रमाण साठहजार मुनींचा समुदाय. ४. उत्तर प्रत्युत्तर. ५. 'तुझ्या अवलोकनें भंगीं' असाही पाठ आहे. ६. खेद. ७. तीरीं. ८. तळें, सरोवर. ९. 'निर्वस्त्रा वस्त्राजवळी' असाही पाठ आहे. १०. दूर, पलिकडे. ११. तांबड्या कमळाचे पानानें. १२. नीलकमळ. १३. स्मरगृह. १४. चंचलनेत्रप्रांतयुक्त अशी. १५. केशपंक्ति. १६. मदनानें.

॥ १४१ ॥ भंगला नेमाचा तडाग । न कळत उडाला कौपीनकाग । मेनिकाचंदनतरूचें आंग । भुजाभुजंगीं वेष्टिलें. ॥ १४२ ॥ गौरजानु पयोधर कटीं । अवलोकितां उटाउटी । धैर्य पळालें बाराबाटीं । नाहींच झाला विचारु. ॥ १४३ ॥ धांवोनि प्रमदेचे कंठीं । बाहुपंजरें घातली मिठी, । सुरतसंगीं पडली गांठीं । जी वैराग्यें सुटेना. ॥ १४४ ॥ चुंबन आलिंगन मैथुन । ग्रंथित्रयीं गुंतलें मन; । 'करितों काय ? मी कवण ?' । हे आठवण असेना.॥१४५॥ भोग भोगितां उतावेळ । नेणें क्रमिला बहुत काळ । कामनदीचे कल्लोळ- । पूर नौवेक लोटला. ॥ १४६ ॥ चिरकाळभोगें पावला स्मृती । तपश्चर्ये निघाला पुढती । सुरकार्य साधूनि सुरयुवती । जाती झाली सुरसदना. ॥ १४७ ॥ ऋषीच्या अमोघवीर्य करीं । दिव्यगर्भ कन्याकारी । हिमवंतगिरीच्या पौठारीं । सांडोन गेली अप्सरा. ॥ १४८ ॥ वनीं येकलें सुंदर बाळ । पडिलें देखोनि पक्षी सकळ । पक्षमंडपातळीं स्नेहाळ । रक्षिते झाले साक्षेपें. ॥ १४९ ॥ चंचुपात्रें मधु सुढाळी । मुखीं वोपिती क्षुधाकाळीं । श्वापदें येऊं न देती जवळी । झडपोनि नेती परौतें. ॥ १५० ॥ अकस्मात तेणें पंथें । कण्वऋषी पातला तेथें । बाळक रक्षिती शकुंतें । देखोनि करी आश्चर्य. ॥ १५१ ॥ उचलोनि वोसंगीं घेतलें । गृहा आणोनि प्रतिपाळिलें । यालागिं पिता ऐसें बोलें । कथिलें तें म्यां यथार्थ. ॥ १५२ ॥ शकुंतीं रक्षिली वेल्हाळा । यालागीं नाम शकुंतला. । हा काळपर्यंत भूपाळा ! । पाळण केलें स्नेहाळें. ॥ १५३ ॥ वीर्यदानें उपजविता, । अन्नदानें प्रतिपाळिता, । संकटीं प्राणरक्षिता, । तिघे पिते बोलिजेती. ॥ १५४ ॥ पुसिल्या प्रश्नाचें उत्तर । तुजप्रती सांगीतलें साचार.' । कथा ऐकोनि राजेश्वर । अति संतुष्ट मानसीं. ॥ १५५ ॥ म्हणे, 'हे मेनिकेच्या उदरीं । जन्मली ऋषीश्वरवीर्यकरीं, । अनर्घ्य दिव्यस्त्री निर्धारीं । मनुष्यलोकीं दुर्लभ. ॥ १५६ ॥ आम्हुच्या ठायीं ठेवोनि भावो । भार्या होय तो उपावो । केला पाहिजे' म्हणोनि रावो । बोलता झाला साक्षेपें. ॥ १५७ ॥ ग्रंथग्रहणी रससागर । भारत साहित्यरत्नाकर । गुणग्राही श्रोते चतुर । अत्यादरें परिसतु. ॥ १५८ ॥ आदिपर्वामाजी गहन । शकुंतलेचें विमलाख्यान । भक्तिनें मुक्तेश्वराचें वदन । वदे तें पुढारी परिसावें. ॥ १५९ ॥

---

१. उपस्थ, गुह्यांग. २. 'मेनिकातरूचें चंदनांग' असाही पाठ आहे. ३. अनेक वाटांनीं. ४. क्षणभर. ५. पृष्ठभागीं. ६. मेनका. ७. अगत्यानें. ८. स्वच्छ, सुंदर. ९. पक्षी. १०. 'कडिये' असाही पाठ आहे. ११. शरीरकृत् अन्नदाता आणि प्राणदाता हे तीन पितें धर्मशास्त्रांत सांगितले आहेत. (आदिपर्व–अ० ७२ श्लो० १५). १२. अमोलिक. १३. स्वर्गांगना.

अध्याय सोळावा.

देखूनि शकुंतला लावण्यदीप । शृंगाररमणीय दिव्यरूप । भोगाभिलाषी भूप साक्षेप । करिता झाला अतियुक्ती. ॥ १ ॥ साधावया गुप्त धन । अंजनसाधनीं करिती यत्न, । कीं सिद्धिसाधनीं साधक जन । प्रवर्तती साक्षेपें. ॥२॥ तैसा राजा अत्यादरें । म्हणे, 'ऐकें मद्वाक्य चतुरे! । तुझ्या दर्शनें पंचशरें । हृदय वर्मी भेदिलें. ॥ ३ ॥ तेणें विकळ झाली शक्ती, । गात्रें चळचळां कांपती, । मूर्च्छित होवोनि पडितां क्षिती । धैर्यें तनु सांवरिली. ॥ ४ ॥ मनोवैद्यें पाहोनि हात । औषध कथिलें समीप येथ, । तुवां होऊनि कृपावंत । उतार केला पाहिजे. ॥ ५ ॥ देऊनियां अधरपान । उपडीं हृदयींचा मदनबाण, । देवोनि दृढ आलिंगन । संतप्त वपू हे निववावी.' ॥ ६ ॥ ऐकोनि राजमुखींची गोष्टी । सरसाक्षी चांपेगोरटी । वचनसुमनें श्रवणपुटीं । पूजिती झाली नृपातें. ॥ ७ ॥ 'धराधीशा ! स्वधर्मपाळा ! । तुझिया शुद्ध यशाचळा । कीर्तिशृंगें रविमंडळा । भेदूनि गेलीं सुतेजें. ॥ ८ ॥ कुकर्मकुलिश घेऊनि हातीं । अमर त्यातें छेदूं इच्छिती । होऊं पाहसी, माझिये मती । अयुक्त ऐसें दिसताहे. ॥ ९ ॥ अमृत म्हणोनि हाळाहळ । प्राशिल्याचें कवण फळ? । बाळ म्हणोनि धरितां व्याळ । अनर्थ वाजे रोकडा. ॥१०॥ आम्हां स्त्रियांची संगती । भली नोव्हे गा ! मेदिनीपती! । मातल्या काम भद्रजाती । विवेकांकुशें वळावा.' ॥ ११ ॥ राजा म्हणे, 'कनकलतिके ! । बोलसी तितुकें परम निकें. । परस्त्री अभिलाषितां दुःखें । भोगिती हे मानव. ॥ १२ ॥ परस्त्री आणि परधन । अखंड वांछी ज्याचें मन । तो जितचि प्रेतासमान, । त्यासी सज्जन नातळती. ॥ १३ ॥ दासीसंग करितां दरिद्री, । यश धन तें वेश्या हरी, । आयुष्य हरी विधवा नारी, । सर्व हरी कुलांगना. ॥ १४ ॥ तूं तंव कुमारी ऋषिबाळा । हातीं घेऊनि सुमनमाळा । घालीं मज नृपाचिया गळां । होईं अंतुरी सुजाणे!' ॥ १५ ॥ दुष्यंत म्हणे, 'स्त्री

---

१. 'शृंगारराग रमणीय रूप' असाही पाठ आहे. २. एक प्रकारचें अंजन आहे, तें नेत्रांस लाविलें असतां गुप्त धन दिसतें ह्या समजुतीस अनुलक्षून हें वर्णन आहे. ३. कामानें. (याचे फुलांचे शर पांच असतात). ४. 'हृदयवर्म' असाही पाठ आहे. ५. कार्दी. ६. देह. ७. कमलाक्षी. ८. चांफेकळीसारखी गौरवर्ण. ९. यशोगिरि. १०. वज्र. ११. 'त्यातें छेदूनि अमरपति' असाही पाठ आहे. १२. विष. १३. सर्प. १४. धराधिपति. १५. सुवर्णाच्या लतेसारखी (शरीरयष्टि) जिची ती. (शरीराला लतासादृश्य कल्पिण्याचा कविसंप्रदाय आहे.) १६. मृततुल्य. १७. न स्पर्शती. १८. पुष्पांची माळा. १९. स्त्री.

सुंदरी! । लज्जा शंका सांडूनि दुरी । होईं माझी प्राणेश्वरी । भोग भोगीं शचीचे. ॥१६॥ अयोग्य वास तुज काननीं; । राजमंदिरीं गृहस्वामिणी । होवोनि, नानावस्त्राभरणीं । देह शृंगारीं मत्संगें. ॥ १७ ॥ अमोल्यरत्न सुवर्णपदकीं । जोडल्या शोभा दावी निकी, । तेंवि बैसोनियां मैमांकीं । भूषण वैभव भोगावें. ॥ १८ ॥ नाना पैट्टणें भूमंडळीं । तेथील वस्त्रें मोलेंगळीं । स्व इच्छा भोगीं सार्वकाळीं । सौख्य देवां दुर्लभ. ॥ १९ ॥ सैमुद्रकंकणांकित धैरित्री । स्वामित्वही अत्यंत प्रीती, । सत्ताकंकण तुझिया हातीं । आजिपासूनि बांधिलें.'॥२०॥ शकुंतला बोले वचन, । 'विधियुक्त न होतां पाणिग्रहण । अविचारें घडतां मैथुन । अंधःपतन दोघांसी.' ॥ २१ ॥ नृप म्हणे, 'चातुर्यभरिते! । विशालाक्षी! लावण्यसरिते! । विधी अंष्ट विवाहातें । वर्तताती शास्त्रार्थी. ॥ २२ ॥ अष्ट विवाहांमाजी येथ । गंधर्व बोलती श्रेष्ठ ग्रंथ, । तेणें गंधर्वलग्नें त्वरित । अंकासनीं आरुढे कां.'॥२३॥ चारुहासी पंकजानना । वदे वैखरी मृगलोचना, । म्हणे, 'राजया! विचक्षणा । विहित धर्में बोलसी. ॥२४॥ कन्यादेह तव निश्चितीं । दिधला पाहिजे पुरुषाहातीं, । विशेषें, तुज ऐसा भूपती । परमदैवें पाविजे. ॥ २५ ॥ तुझिया ऐसी माझ्या चित्तीं । वर्तताहे अत्यंत प्रीती, । परी वडिलां नेणतां हे रीती । व्यभिचारधर्मीं लागतसे. ॥ २६ ॥ यालागिं नोवेक धरीं धीर, । आश्रमा येईल ऋषीश्वर, । वचन मान्य करूनि अत्यादर । मज वोपील तुज हातीं.' ॥ २७ ॥ नरेंद्र बोले, 'वो सुजाणी! । विचारें आपेंआप धनी, । आदिमध्यअंवसानीं । संगीं आपआपणिया. ॥ २८ ॥ विवेकें आपआपणा मित्र, । कुबुद्धी आपआपणा शत्रु, । आपणा आपण गुरु स्वतंत्रु, । शिष्यही आपणा आपण. ॥ २९ ॥ यालागिं आपुल्या देहदाना । समर्थ करीं आपुल्या मना, । माझेनि संगीं अर्थ नाना । वोळंगणें तुज होती. ॥ ३० ॥ अंष्ट भोग मूर्तिमंत । सांडणें करीन तुजवरून नित्य, । हेममाणिकामंदिरांत । रत्नमंचकीं सुखशय्या. ॥ ३१ ॥ मंदहासिनी! कुंदंदशने! । कैर्पूरगर्भरंभांजघने! । फळाहारवल्कलवसनें । तुज अयोग्य

१. इंद्राणीचे. २. माझ्या मांडीवर. ३. शहरें. ४. किंमतीनें श्रेष्ठ. ५. समुद्रवलयांकित. ६. पृथ्वी. ७. यथाशास्त्र. ८. विवाह. ९. अधोगति. १०. ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस आणि पैशाच्च असे विवाहाचे आठ प्रकार धर्मशास्त्रग्रंथांत सांगितले आहेत. ११. वाणी. १२. अमळ, क्षणैक. १३. आपले आपण, आपोआप. १४. अंतीं, अखेरीस. १५. ओढून घेणें. १६. देणें, लेणें, नेसणें, पांघरणें, खाणें, पिणें, इत्यादि आठ भोग. १७. कुंदपुष्पासारिखे दांत जिचे ती. १८. 'कर्पूररंभागर्भजघने' असाही पाठ आहे. १९. केळीसारखा आहे कटिप्रदेश जिचा ती.

काननीं. ॥ ३२ ॥ शिरीषपुष्पसकुमारे ! । कनकचंपकदामगौरे ! । तिळतरुकुसुमनासाकारे ! । धरीं सुपाणी निजकरें. ॥ ३३ ॥ गांधर्वी अप्सरा मिश्रकेशी । रंभा तिलोत्तमा उर्वशी । तुज लावण्य माणिक्यराशी । तुळितां गुंजा तैसिया. ॥ ३४ ॥ सुकेशी चार्वंगी सुश्रेणी । कं[1]बुग्रीवा पीनस्तनी । तुझिया ऐसी चौ[2]दाभुवनीं । अंगना आ[3]न असेना. ॥ ३५ ॥ सप्त निर्गू[4]ढ रक्तवर्णें । उन्नत नेटकीं साही स्थानें । लक्षितां तुझीं शुभलक्षणें । मन वेधलें, परते ना. ॥ ३६ ॥ पाणि पादतळ नेत्र । नखें ताळू जिव्हा अधर । आरक्तवर्ण ते साकार । स्त्रीप्रतिमा जाणावी. ॥ ३७ ॥ क[5]क्षा कु[6]क्षी वक्ष घ्रा[7]ण । स्कं[8]ध ललाट साहावें जाण । उ[9]न्नत तें शुभलक्षण । उत्तम स्त्रीस जाणिजे. ॥ ३८ ॥ पंचबा[10]णें हृदयभेद । केला त्यासी हें दिव्य औषध, । बिंबाधरामृत सुस्वाद । कुचालिंगन सर्वथा. ॥ ३९ ॥ हा परम विरहज्वरु । हारोनि करीं सुखोपचारु, । जा[11]नु उल्हासती रंभोरु[12] । स्पर्शाविया आवडी. ॥ ४० ॥ [13]मैद्रेतस्वात्योदकाची वृष्टी । धरीं गु[14]ह्यांगशुक्तिसंपुटीं । रत्न निपजेल जें कां सृष्टी । मोलागळें त्रै[15]लोकीं. ॥ ४१ ॥ अष्ट विवाहांचीं नामें । सांगेन, ऐकें अनुक्रमें, । विधीनें नेमिले शास्त्रनेमें । [16]चहूं वर्णासि विभागें. ॥ ४२ ॥ ब्र[17]ह्मविवाह, देवविवाह, । तिसरा बो-

---

१. शंखासारिखी तीन रेषांनीं चिन्हित आहे ग्रीवा (मान) जिची ती. (अशी स्त्री दैवशालिनी समजतात.) २. सप्तपाताल आणि सप्तलोक मिळून चवदा भुवनें:—अतल, वितल, सुतल, महातल, रसातल, तलातल आणि पाताल अशीं सात पाताळें; भूर्लोक (मृत्युलोक), भुवर्लोक (पृथ्वीपासून सूर्यापर्यंतचा भाग, येथें मुनि सिद्ध इत्यादि राहतात), स्वर्लोक (स्वर्गलोक, सूर्यमंडळापासून ध्रुवापर्यंतचा भाग; येथें देवांसह इंद्र राहतो), महर्लोक (सूर्यगोल व इतर तेजस्वी भाग), जनर्लोक (येथें ब्रह्मदेवाचे पुत्र राहतात), तपर्लोक (येथें तपश्चर्या करणारे राहतात), आणि सत्यलोक (येथें ब्रह्मदेव आणि ऋषिजन राहतात.) ३. दुसरी. ४. गुप्त. ५. बाहूमूल, कांख. ६. पोट, कूस, उदर. ७. नासिक. ८. खांदा. ९. उंच. १०. कामानें. (ह्याचे पांच बाण असतात:–'अरविंदमशोकं च शिरीषं चूतमुत्पलम् । पंचैतानि प्रकीर्त्यन्ते पंचबाणस्य सायकाः ॥'.) ११. गुडगा, ढोंपर. १२. रंभेसारखे (कदलीसारखे) ऊरु (मांड्या). १३. माझें वीर्य. १४. स्मरगृह. १५. स्वर्ग, पाताल आणि मृत्युलोक. १६. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र. १७. विद्या व सदाचार यांनीं युक्त असून, कन्येची याचना न करणारा अशा वराला सत्कारपूर्वक बोलावून आणि वस्त्रालंकारांनीं पूजून कन्यादान करणें हा 'ब्राह्मविवाह.' ज्योतिष्टोमादि यज्ञ होत असतां, यथाविधि कर्म करणाऱ्या ऋत्विजाला अलंकारयुक्त कन्यादान करणें हा 'दैवविवाह.' वरापासून धर्मार्थ म्हणजे यागादिसिद्धीसाठीं किंवा कन्येला देण्यासाठीं एक गोमिथुन (एक गाय व बैल), अथवा दोन गोमिथुनें घेऊन त्याला यथाशास्त्र कन्यादान करणें हा 'आर्षविवाह.' 'तुम्ही उभयतां मिळून धर्माचरण करावें' असा कन्यादानकालीं पूर्वीं नियम करवून पूजा करून कन्यादान करणें हा 'प्राजापत्य विवाह.' कन्येच्या

लिजे ऋषिविवाह, । चौथा प्राजापत्यविवाह, । असुरविवाह पांचवा, ॥ ४३ ॥ गंधर्वविवाह तो षष्टम, । राक्षसविवाह तो सप्तम, । पिशाचविवाह तो अष्टम, । ज्ञान केलें शास्त्रोक्त. ॥४४॥ मनु [1]स्वयंभुवाच्या वचनें । [2]ब्राह्मादि प्राजापत्यगणने । चारी वरावे ब्राह्मणें । [3]अग्रवर्णीं [4]निगमाज्ञा. ॥४५॥ ब्राह्मादि गांधर्वपर्यंत । [5]सौही क्षात्रवर्णीं [6]विहित । हो कां राक्षसही उचित । स्वयंवरहरण या भेदें. ॥ ४६ ॥ वैश्य शूद्र दोघां-जणा । आसुर एक नेमिला जाणा. । पिशाच तो हीनवर्णा । अग्राह्य ऐसें बोलिजे. ॥ ४७ ॥ आतां [7]पंचभूतें हृदयवासी । [8]पंचप्राण इंद्रियेंसी । दोहीं मंडपीं दों प्रदेशीं । आदिदैवत स्थापिलें. ॥ ४८ ॥ सूर्य साक्षी काळ सुकाळे । घटिका प्रतिष्ठिली सुवेळे, । चढों लागली पळोपळें । प्रीतिजीवनें [9]भरिताहें. ॥ ४९ ॥ नेपुरें कंकण झणत्कार । योजिलासे वाद्यगजर, । संवाद तोचि मंगळमंत्र । आरंभिला [10]सौरसें. ॥ ५० ॥ मर्यादा तोचि अंत:पट । वाढवेळ धरिलासे बळकट, । ब्रह्मसूत्र लग्न वरिष्ठ । अतिसमयो वर्तत. ॥ ५१ ॥ तोचि सा-रूनियां धीटपणें । आवडी पुढारां सरकणें । ऐक्यभावें ओपणें । लग्न लावीं सुंदरी ! ॥ ५२ ॥ सोलणें कांडणें पाक करणें । शर्करा भक्षणीं नलगे जाणें, । तैसें सुगम गंधर्वलग्नें । सुख भोगणें तात्काळ. ॥ ५३ ॥ तेणें गंधर्वलग्नें त्वरित । पुरवीं आर्तीचे मनोरथ, । मज समर्थालागीं उचित । देईं [11]अष्टांग आपुलें. ॥५४॥ फेडीं लज्जेची कंचुकी । हृदय वोपीं मम हस्तकीं, । कल्पनावृत्तीच्या अनेकीं । निरिया करीं '[12]परौत्या.' ॥ ५५ ॥ ऐसें बोलतां [13]धरारमण । शकुंतला हास्यवदन ।

पित्रादि ज्ञातींला आणि कन्येला यथाशक्ति स्वेच्छेनें धन देऊन कन्येचा स्वीकार करणें हा 'आसुर विवाह'. कन्या आणि वर यांच्या अन्योन्यानुरागानें आलिंगनादिरूप परस्पर वधुवरांचा संयोग तो 'गांधर्व विवाह' होय. कन्यापक्षीय लोकांचा नाश करून अथवा त्यांचे शरीराला जखमा करून व प्राकारादि फोडून रोदन करणारी आणि पित्याला व भ्रात्यांला आक्रोशपूर्वक हाका मारणारी अशी कन्या गृहांतून बलात्कारानें आणणें हा 'राक्षस विवाह.' निजलेली, मद्यमदविव्हल अथवा शीलसंरक्षणविरहित अशा स्त्रियेशीं एकांतीं मैथुनधर्में प्रवृत्त होणें हा 'पैशाच विवाह.' (मनुस्मृति-अध्याय ३ श्लोक २७–३४).

१. मनुस्मृति–अध्याय ३ श्लोक २०–३४ पहा. २. ब्राह्म, दैव, आर्ष आणि प्राजापत्य असे चार. ३. श्रेष्ठवर्णी. ४. वेदाची आज्ञा. ५. आसुर, गांधर्व आणि पहिले चार मिळून सहा. ६. योग्य. ७. आकाश, वायु, तेज, आप, पृथ्वी, हीं पांच भूतें. ८. व्यान, प्राण, उदान, समान, आणि अपान हे पांच प्राण (वायु). ९. प्रीतिरूप उदकानें. १०. सरसपणें. ११. शरीराचे आठ अवयव. (दोन हात, उर, कपाळ, दोन नेत्र, ग्रीवा आणि कटि; अथवा दोन हस्त, उर, भाळ, दोन पाय व दोन गुडघे). १२. परत्या, पलीकडे. १३. नृपति.

म्हणे, 'आतां ऐकें वचन । नियमाचें अवधारीं. ॥ ५६ ॥ तुझेनि वीर्यें माझे पोटीं । पुत्र जन्मेल तोचि ये सृष्टीं । राज्य धरू; तो तुझिये पाठीं । पदाधिकारी त्वां करणें. ॥ ५७ ॥ ऐसिया नेमा देसील भाके । तरी घडणार घडो सुखें.' ॥ हें ऐकोनि अत्यंत हेरिखें[1] । राजा सरके पुढारां. ॥ ५८ ॥ हस्त धरोनि स्वहस्तकें । देता झाला त्रिवार भाके, । 'तुझा पुत्र निज निष्टंकें[2] । राज्यासनीं युवराजा[3].' ॥ ५९ ॥ हें माझें प्रतिज्ञावचन । भंगूं न शके चतुरानन[4].' । तें परिसोनि आग्रहाचें वसन । त्यागूनि भावें अनुसरली. ॥ ६० ॥ सोडूनियां हृदयग्रंथी । तनु मन दिधलें वल्लभाहातीं; । पुढें वर्तलें तें उक्तीं । बोलतां चतुरीं वारिलें. ॥ ६१ ॥ पुरल्या मनोरथाच्या कोडी । सर्वसौख्या झाली जोडी । आनंद तुळितां पडीपाडीं । स्वर्गही दिसे ठेंगणा. ॥ ६२ ॥ यापरी रायें मानिला लाभ । परी उगवला ऋषिभयाचा कोंभ[5]; । इंद्रापराधें गौतमक्षोभ[6] । तैसेंच घडेल ये ठायीं. ॥ ६३ ॥ भ्रांति पडिली मन्मथें, । प्रमदा प्रतारिली[7] स्वार्थें, । अनुचित जाणवल्या ऋषीतें । महा अनर्थ दिसताहे. ॥ ६४ ॥ आतां येथोनि शीघ्रगती । गमन करावें हेचि युक्ती, । ऐसें विचारूनि नृपती । भार्येप्रती अनुवादे. ॥ ६५ ॥ आवडी देउनी आलिंगन । म्हणे, 'आतांच धाडीन तुजलागुन । छत्र चामर[8] शिबिका[9] यान । दासी दास समवेत. ॥ ६६ ॥ प्रधान चातुरंग[10] सेना । वृद्ध सुहृद विषयी जना । मूळ पाठवितों स्वस्थाना । तुज न्यावया संभ्रमें[11].'॥ ६७॥ ऐसें बोलोनि जाता झाला । दळेसीं[12], नगरा प्रवेशला. । मागा मुहूर्तानंतरें आला । कण्वऋषी आश्रमा. ॥ ६८ ॥ पुरुषसंगें शंकान्वित । बाहेर न ये लज्जाभरित, । हें देखोनि सर्वज्ञनाथ । जाणता झाला मानसीं. ॥ ६९ ॥ जामात कन्या मैथुनरहाटीं[13] । ऋषीनें देखिलें ज्ञानदृष्टीं, । परम संतोष मानूनि सृष्टी । आश्वासीत कुमारीतें. ॥ ७० ॥ म्हणे, 'माझिये निजात्मजे ! । बाहेर येईं सांडूनि लाजे, । कर्तव्य होतें पैं सहजें । सिद्धी नेलें प्रारब्धें. ॥ ७१ ॥

---

१. आनंदानें. २. सर्वस्वीं, पूर्णपणें. ३. राजाच्या पाठीमागें राज्यपदीं बसणारा यथाविधि अधिकारी. ४. ब्रह्मदेव. ५. अंकुर, मोड. ६. गौतमऋषीची स्त्री अहल्या ही होय. तिच्या रूपलावण्यास भुलून इंद्रानें तिच्याशीं गौतमरूपानें जारकर्म केलें. तें गौतमास कळलें. तेव्हां त्यानें 'तुझ्या अंगास सहस्र भगें पडतील' असा इंद्राला शाप दिला, अशी कथा आहे, तिजकडे येथें लक्ष्य आहे. ७. फसविली. ८. चमर नांवाचे मृग असतात, त्यांच्या शेंपटाच्या चंवऱ्या (चामरें) करतात. यांच्या शेपटांस केसांचा झुबका अथवा गोंडा असतो, तो चंवरी करण्यास फार उपयुक्त असतो. ९. पालखी. १०. गज, अश्व, रथ पदाति, हीं चार अंगें. ११. त्वरित अथवा आदरपूर्वक. १२. सैन्यासह. १३. वृत्त.

जें झालें तें बहुत बरवें । मान्य केलें माझिये जिवें, । कष्टीं न मिळे तें स्वभावें । पूर्वदैवें जोडिलें.' ॥ ७२ ॥ ऐकोनि पितयाची अभयवाणी । कन्या येऊनि लागली चरणीं, । म्हणे, 'म्यां वरिला भूपाळ गुणी । तो त्वां मान्य करावा. ॥ ७३ ॥ कृपाअनुग्रह वरप्रसादें । गौरवीं आशीर्वचनशब्दें.' । ऋषी बोले परम आल्हादें, । 'चिरंजीव तव भर्ता. ॥ ७४ ॥ [1]शचीसुरेशासारिखे । दोघें असा अक्षयसुखें; । विष्णुशक्तीसमान [2]तुके । ऐसा पुत्र लाधसी.' ॥ ७५ ॥ असो तोचि धरोनि दिवस । चढतां वाढतां मासोमास । शुक्लपक्षीं [3]तारकाधीश । वृद्धी पावे पैं जैसा. ॥ ७६ ॥ दश मास होतां पूर्ण । पावता झाला पुण्यजनन, । धरामंडळीं दैदीप्यमान । अपर [4]भानु पैं जैसा. ॥ ७७ ॥ कीं प्रत्यक्ष [5]दीप्तानळाची मूर्ती । रूपौदार्य गुण संपत्ती । शकुंतलेपासाव तो दौष्यंती । भरतनाम जन्मला. ॥ ७८ ॥ सुलक्षणिक राजकुमर । देखोनि कण्वऋषीश्वर । [6]जातकर्मादि संस्कार । करिता झाला आदरें. ॥ ७९ ॥ चक्रांकित [7]सुंढाळ हस्त । विशाळ भाळ शुक्ल दंत । [8]आजानुबाहु सुशोभित । [9]वृषभाक्ष नेटका. ॥ ८० ॥ कुमार सकुमार [10]देवगर्भाभ । [11]कीर्तिप्रासाद विजयस्तंभ, । नाना सौंदर्यतरूचा कोंभ । धरामंडळीं उगवला. ॥ ८१ ॥ सिंहाकृति [12]ठाणमाण, । उंच मूर्धा वर्तुळ जघन, । ऊर्ध्वरेखामंडित चरण, । वक्ष विस्तीर्ण साजिरें. ॥ ८२ ॥ सामुद्रिकें लक्षितां दृष्टी । परम आल्हाद ऋषीच्या पोटीं, । आत्मजेतें म्हणे, 'वो ! गोष्टी । भविष्याची ऐक पां. ॥ ८३ ॥ [13]सागरमेखलांकित पृथ्वी । भाग्य भोगील प्रतापरवी, । पौरवराजे याचेनि नांवीं । भारत ऐसें पढविती.' ॥ ८४ ॥ [14]षष्ठम वर्ष भरतां गुणी । क्रीडा कौतुकें विचरत वनीं, । व्याघ्रसिंहवराहश्रेणी । मत्तकुंजर म्हैसादी ॥ ८५ ॥ धरूनि आणी ऋषीच्या आश्रमीं, । बांधोनि घाली एके [15]दामीं, । त्यावरी [16]वळघोनि पराक्रमीं । [17]सैरावैरा धांवडी. ॥ ८६ ॥ क्रूर श्वापदांचे गण । बळें करी त्यांचें दमन, । यालागीं त्याचें ठेविलें अभिधान । 'सर्वदमन' ब्राह्मणीं. ॥ ८७ ॥ धनुष्यकोटीनें [18]आतुर्बळी । गंगा आणिली आश्रमाजवळी, । पर्वत लोटूनि महीतळीं । समान करी [19]हिंडावयां.

---

१. इंद्राणी आणि इंद्र यांसारखे. २. तुलना पावे, साम्य करी. ३. चंद्र. ४. सूर्य. ५. पेटलेल्या अग्नीची. ६. मूल उत्पन्न होतांच नालच्छेदनादि जे संस्कार करतात ते. ७. सुरेख. ८. उभा राहिला असतां सहज गुडघ्यापर्यंत ज्याचे हात पोंचतात तो. (हें शुभ लक्षण मानतात). ९. विष्णु. १०. देवशिशुतुल्य कांति ज्याची असा. ११. कीर्तीचें राजगृह. १२. शरीराचा बांधा. १३. समुद्रवलयांकित. १४. सहावें. १५. दावणी. १६. चढोनि. १७. मनास येईल तसें. १८. बलाढ्य, अतिबळी. १९. महाभारतांत ह्या ओंवीस आधार नाहीं.

॥ ८८ ॥ ऐसीं इंद्रासमान कर्में । अमानुष्य अतिउत्तमें । ऋषीनें जाणोनि मनोधर्में । विचार करी शिष्यांसीं. ॥ ८९ ॥ 'अहो युवराज्य देतां समयो । सर्वांविषयीं योग्य तनयो । पृथ्वी जिंकोनि दिग्विजयो । करी ऐसा प्रतापी. ॥ ९० ॥ पितया भेटवावा कुमर । आत्मजेतें निजभ्रतार, । इतुकेनि कन्येचा ऋणभार । उत्तीर्ण झालों मी येथें. ॥ ९१ ॥ सुंदर प्रौढ समर्थ वनिता । चिरकाळ पितृगृहीं वसतां । लोकनिंदेचा अवचिता । पाषाण पडे मस्तकीं. ॥ ९२ ॥ हो कां उत्तमाची कुमरी, । बहु काळ वर्ततां माहेरीं । उद्धत होय विहिताचारीं, । तोही शब्द वडिलांतें. ॥ ९३ ॥ मातापितरीं स्नेह कळवळा । बहुकाळ समीप ठेवितां बाळा । [1]काजळ लावी पितयाच्या भाळा, । होय अपकीर्ति लौकिकीं. ॥ ९४ ॥ स्वयें नर्तन गायन । गीत नृत्य अवलोकन । शृंगारकामशास्त्रश्रवण । हेंचि दूषण कुळवंते. ॥ ९५ ॥ परघर[3]अटण परघरवस्ती, । जारजारिणीची संगती, । एकटशय्या, एकट पंथी, । हें कुलक्षण कुलवंते. ॥ ९६ ॥ क्षणक्षणा चंचलपणें । चीरें[4]निरिया सरसावणें, । [5]कच्छ फेडणें घालणें, । हें कुलक्षण कुलवंते. ॥ ९७ ॥ हृदय दाऊनि घाली पदर, । पुरुष अवलोकूनि वाढवी [6]हार, । परकीयासीं एकांतविचार, । हें कुलक्षण कुळवंते. ॥ ९८ ॥ बहु हांसणें, बहु बोलणें, । सदां हांसत गोष्टी करणें, । परत परतोनि [7]निरखणें, । हें कुलक्षण कुळवंते. ॥ ९९ ॥ [8]आणिका वर्णी, निंदी भर्ता, । पति त्यागूनि धांवे तीर्था, । पुरुष [9]आव्हेरूनि, देवता । भजतां, दूषण कुळवंते. ॥ १०० ॥ उपेक्षूनि पतीईश्वरु । आणीक [10]महानुभाव करी गुरु, । भजनीं लोकनिंदेचा [11]सोरें । माजे थोर [12]अभिशापें. ॥ १०१ ॥ यत्नें शर्करा ठेविजे जेथें । परी पिपीलिका लागती तेथें, । विश्वासस्थळीं ठेवितां वनिते । तेथेंचि विपरीत उद्भवे. ॥ १०२ ॥ हा शब्द ठेवणें कवणासी? । काय कीजे? वस्तूचि तैसी. । ब्रह्मयानें निर्मिली जगासी । भ्रमावया भ्रमयंत्र. ॥ १०३ ॥ असोत [13]संसारिकांच्या गोष्टी; । उत्तम वर्तिजे उत्तम [14]रहाटी, । माझी कन्या हे गोरटी । सुशील आणि पतिव्रता. ॥ १०४ ॥ शिखा स्वस्थानीं साजिरी, ।

---

१. काळिमा. २. ही समजूत मुक्तेश्वराच्या वेळची दिसते. आतां स्त्रियांस गायन आणि नर्तन आलें पाहिजे आणि तीं शिकविण्यासाठीं शाळाही असल्या पाहिजेत असें प्रतिपादन लोक उघडपणें करतात असें पाहण्यांत येतें. ३. गमन. ४. लुगड्याच्या निऱ्या. ५. कासोटा. ६. गळ्यांतील माळा. ७. पाहणें. ८. पतिव्यतिरिक्त अन्य पुरुषाची स्तुति करिते. ९. सभ्यगृहस्थ, कामक्रोध इत्यादिकांनीं ज्याचे मनास विकार होत नाहीं असा उदारमनस्क पुरुष. १०. आकांत, अनर्थ. ११. मिथ्यापवादें. १२. मुंग्या. १३. प्रापंचिकांच्या. १४. वर्तन, वागणूक.

भ्रतारगृहीं पवित्र नारी, । शोभा श्लाघ्यता मान्यता थोरी । उभयलोकीं ते पावे. ॥ १०५ ॥ यालागीं द्विज हो! समुदायेसीं, । सपुत्र शकुंतला सरसी । नेऊनि [1]निवेदा रायासीं । हस्तिनापुरीं [3]अविलंबें. ॥ १०६ ॥ आतां कन्या ठेवणें येथ । हें नव्हे आमुतें उचित; । तुम्ही जाऊनियां त्वरित । ज्याची त्यातें समर्पा.' ॥ १०७ ॥ ऋषिआज्ञेनें तापसमेळा- । सहित भरत शकुंतला । [2]गजसाह्वया पातले, डोळां । लोक देखती कौतुकें. ॥ १०८ ॥ सभामंडपीं राजनृपती । मुनिवरांसी राजयुवती । राजकुमर धरूनि हातीं । उभे ठेले सन्मुख. ॥ १०९ ॥ आशीर्वचनीं जयजयकार । करूनि, बैसला ऋषींचा भार. । शकुंतला आत्मकुमर । करीं धरूनि सैंक्षेपें ॥ ११० ॥ बलौदार्यलावण्यगुणी । तनुज लाविला जनका चरणीं, । म्हणे, 'राजया! [5]अंकासनीं । ठाव देईं बैसावया. ॥ १११ ॥ बहुत दिवस पाहिली वाट, । निष्ठुर नोव्हेसी कां लोभिष्ट? । आतां गृहस्वामिनी वरिष्ठ । गृहा पातलें आपुलिया. ॥ ११२ ॥ सत्यप्रतिज्ञा नरेंद्रोत्तमा! । आठवोनियां आपुल्या [6]नेमा । यौवराज्यीं भरत नामा । पुत्र आपुला अभिषेकीं. ॥ ११३ ॥ विश्रामोनि कण्वाश्रमीं । जो अर्थ कथिला वाङ्नेमीं । तो येकाळीं [7]क्रियाधर्मीं । करोनि दावीं यथार्थ.' ॥ ११४ ॥ ऐकोनि शकुंतलेचें वचन । केल्या कर्माची आठवण । मनें जाणतांही आपण । झाला नेणता ते काळीं. ॥ ११५ ॥ चोरी जैंरी अनाचार । करूनि, 'नाहीं' म्हणती नर, । तैसा नींवेक राजेश्वर । असत्या आंगीं [9]आवगला. ॥ ११६ ॥ झांकूनि करिती पापाचरण । बाह्य बोलती धर्मवचन । तेंवीं आच्छादूनि गुण । लोकभयें [10]अनुवादे. ॥ ११७ ॥ म्हणे, 'तूं कैंची दुष्ट तापसी? । कोण? कोठील? कोणे देशीं? । कोणे काळीं एकांतवासीं । संग झाला? मी नेणें. ॥ ११८ ॥ नेणतां माझिया [11]सुहृज्जना । कैसी झालीस ममांगना? । ऋषी राजे पातले लग्ना । कोण? ते येथें दाखवीं. ॥ ११९ ॥ देव ब्राह्मण अग्नि वेद । साक्षी न करूनि वडील वृद्ध । [12]धर्मकामार्थसंबंध । झाला

---

१. अर्पण करा. २. हस्तिनापुर. (हस्तिन् नामक भरताच्या प्रपौत्रानें हें शहर वसविलें म्हणून यास हस्तिनापूर असें ह्मणतात. याला गजसाह्वय आणि हास्तिनपुर असेंही नांव आहे.) ३. लौकर. ४. औत्सुक्यानें. ५. मांडीरूप आसनावर. ६. करार, नियम. ७. बारकर्म. ८. क्षणभर. ९. बावचळला, बहकला. १०. बोले. ११. मित्रमंडळाला. १२. विवाहसंबंध. 'धर्मे चार्थे च कामे च नातिचरितव्या त्वयेयम्, नातिचरामीति–अशा विवाहमंत्रानें घडलेला संबंध. लग्नांत. वधूचा पिता वराला म्हणतो, 'धर्म अर्थ आणि काम यांत हिचा (वधूचा) अतिक्रम त्वां करूं नये.' 'मी हिचा अतिक्रम करणार नाहीं' असें वर उत्तर देतो; तेव्हां वैवाहिक संबंध असा अर्थ.

कैसा मी नेणें. ॥ १२० ॥ माझेनि वयें वय सामान, । तालस्कंध, बळसंपन्न, । खल्प काळें हा नंदन । कैं प्रसवलीस मद्रेतें? ॥ १२१ ॥ पाहतां साक्षीस न मिळे कांहीं, । मज तरी अणुमात्र ठाउकें नाहीं; । आतां आलेनि पंथें जाई, । शीघ्र येथूनि निर्लज्जे! ॥ १२२ ॥ हांसावया जनांची [1]मांदी । सोंग आणिलें राया विनोदी, । हेंही तैसें माझिये बुद्धी । कृत्रिमाचार दिसताहे. ॥ १२३ ॥ [2]जघन्यतेच्चिया कर्दमा, । निर्दोष माझिया निजनामा, । मुखें लेपितां पापकर्मा । पात्र होसी पापिष्ठे! ॥ १२४ ॥ जे मज योग्य नोहे मात । ते कैंवी जल्पसी जगांत? । [3]पैण्यांगनेचा आचारपंथ । आश्रयला दिसताहे. ॥ १२५ ॥ आतां सांडोनि माझ्या गोष्टी । संबंधवार्ता न वदें वोटीं; । खाश्रमा जावोनि, राहाटी । आवडे तैसी वर्तें कां'. ॥ १२६ ॥ ऐसें बोलतां मेदिनीपाळा । क्रोधें संतप्त शकुंतळा, । जेंवी प्रळयाग्नीच्या ज्वाळा । स्पर्शों धांवती गगनातें. ॥ १२७ ॥ आरक्तता लेऊनि नयनें । [4]अंजन क्षाळिलें [5]अश्रुजीवनें । अधर स्फुरती, जेंवी पवनें । [6]पद्मपत्रें थरकती. ॥ १२८ ॥ म्हणे, 'धन्य गा! पुरुषोत्तमा! । उत्तम ऐसेचि रक्षिती नेमा, । [7]कर्मसाक्षी [8]अंतरात्मा । तृप्त झाला या वचनीं. ॥ १२९ ॥ [9]मना नेणतां नाहीं पाप । वन्ही नेणतां कैंचा दीप? । जीवनेंवीण वाढलें रोप । पृथ्वीवरी कोठूनी? ॥ १३० ॥ जाणोनियां होय अजाण । परिचय असतां पुसे, 'कोण?' । हें तव अधर्माचें लक्षण, । तुज उत्तमा! अयोग्य. ॥ १३१ ॥ ईश्वर आणी जोडिलें पुण्य । स्मरोनि, बोलें यथार्थ वचन, । माझी साक्षी तुझेंचि मन, । तुझे अंतरीं देताहे. ॥ १३२ ॥ यथार्थ जाणतां अंतःकरणीं । अन्यथा प्रतिपादी जो वचनीं । तेणें कोणती पापकरणी । केली नाहीं [10]सांग पां? ॥ १३३ ॥ 'मी एक जाणता सर्व सृष्टी' । ऐसा अभिमान वाहसी पोटीं, । सकळमूर्खांच्या शेवटीं । कर्म करिसी त्यां तुल्य. ॥ १३४ ॥ पाप एकांतीं करूनि, पाहीं, । म्हणती, 'कोणें देखिलें नाहीं;' । इंद्रियदेवता आणि [11]देही । [12]अंतरपुरुष पहातसे. ॥ १३५ ॥ समर्थी देखतां जें करणें । त्याप्रती पुढतीं 'नाहीं' म्हणणें, । तेणेंचि दंड पाविजे तेणें । हें तंव प्रसिद्ध जाणसी.

---

१. जमाव. २. जारकर्माच्या चिखला. ३. बाजारी वेश्या स्त्रीचा. ४. काजळ. ५. बाष्पांच्य उदकानें. ६. कमलदळें. ७. सर्व कर्म पाहणारा. ८. जीव, क्षेत्रज्ञ. ९. मनाला ठाऊक नाहीं असें पाप नाहीं. १०. महाभारत–आदिपर्व, अध्याय ७४ श्लोक २७ हा या ओंवीशीं समानार्थक आहे. ११. देहधारी, शरीरी. १२. अंतरात्मा, सर्वांच्या हृदयीं असणारा सर्वद्रष्टा परमात्मा, सर्वांतर्यामी पुरुष.

॥ १३६ ॥ आदित्य[1] वन्ही चंद्र पवन । आकाश पृथ्वी आणि जीवन । हृदय यम हे नव जण । वृत्त[2] जाणती नराचें. ॥ १३७ ॥ उभयसंध्या[3] दिवस रजनी । धर्मस्वरूप अंतःकरणीं । शुभाशुभ रोहटे[4] प्राणी । तितुकें दृष्टी देखती. ॥१३८॥ इतुकें जाणें आपुल्या वक्रीं । प्रगट करितां जगाचे श्रोत्रीं, । चित्रगुप्ताचे[5] लेखनपत्रीं । साक्ष देऊनि लिहिती. ॥ १३९ ॥ 'वेव्हार[6] न साधे साक्षीविण' । ऐसें बोलती जन अज्ञान, । साक्षी परमात्मा आपण । सत्याकडे निर्धारें. ॥१४०॥ आणीक पुरुषाची करणी, । अपूर्व ऐकों आपुल्या श्रवणीं, । मुखीं लावूनि शर्करांकणी । शब्दस्वादा लोभवी. ॥ १४१ ॥ मोहोनि जार जारिणी दोघां । एकांतीं जाऊनि न पुरे संगा, । तव गृहमस्तकीं ठाकूनि उभा । ढोल पिटोनि जाणवी. ॥ १४२ ॥ इहीं केली कुकर्मकरणी । ठाउकी असो जगाचे श्रवणीं, । एवं कर्म केलें तें जनीं । आपेआप विस्तारे. ॥ १४३ ॥ कर्मसाक्षी हृदयस्थ । क्षेत्रज्ञ[7] आत्मा चैतन्यनाथ, । ज्याचेनि सत्क्रिये संतोषयुक्त । सत्य शौच्य स्वधर्में. ॥ १४४ ॥ त्यातें दयाळ दंडपाणी । धर्मराज कर जोडोनी । आज्ञा मागे म्हणे, 'प्राणी । उद्धरीन तव आज्ञा.' ॥ १४५ ॥ ज्याच्या असत्याचार कुकर्मा । देखोनि प्रळपे[9] अंतरात्मा । त्यातें चोपोनि यमधर्मा । दंड करवी सुबुद्ध. ॥ १४६ ॥ एवं हृदयस्थ आत्मिया । अधीन सूर्यतनय[8] राया! । त्याचे साक्षीनें प्राणियां । केलीं कर्में भोगवी. ॥ १४७ ॥ म्हणोनि ईश्वर पाप भ्रत्याचें । वेद दवडील लोकनिंदेचे, । भय धरूनि वर्ते साचें । तोचि एक विवेकी. ॥ १४८ ॥ आतां असत्य पर्वततळा । उभा न राहें कुंभिनीपाळा[10]! । वर पडेल वज्रशिळा । परम अकीर्ति दोषाची. ॥ १४९ ॥ मस्तक होईल सहस्रभाग, । यया बोला न म्हणे व्यंग, । न्याय बोलतां उद्वेग । विवेकीये न पावती. ॥ १५० ॥ सकल ऐश्वर्य वेऊनि भेटी । पद्मा[11] पातल्या पायें लोटी । तो सभाग्य कीं अभाग्य सृष्टीं । कांय[12] लागे सांगणें?. ॥ १५१ ॥ अदुष्टा सविनया पतिव्रता । यौवनीं तीतें त्यागी भर्ता, । तैं सप्तजन्म भोगी व्यथा, । बा-

१. 'आदित्यचंद्रावनिलोऽनलश्च' इत्यादि पद्याचें हें भाषांतर आहे. (आदिपर्व—अध्याय ७४ श्लोक ३०.) २. कर्म, आचरण. ३. पूर्व आणि उत्तर संध्यासमय. ४. वर्ते. ५. यम लोकांतील एक पुरुष. हा लोकांचे गुणावगुण आणि पापपुण्यें लिहून ठेवितो. यमासही 'चित्रगुप्त' असें म्हणतात. ६. व्यवहार, न्याय, क्रयविक्रयादि व्यापार. ७. जीव. ८. यमं. ९. भितो. १०. पृथ्वीपालका. ११. लक्ष्मी. १२. 'काय म्हणिजे सांग पां' असाही पाठ आहे.

लवैधव्य स्त्रीदेहीं. ॥ १९२ ॥ अचल श्री, [1]आरोग्य काया, । सुगुण पुत्र, पवित्र जाया, । बहु जन्में हरिहरांच्या पायां । भजतां हें फळ पाविजे. ॥ १९३ ॥ विवेकबुद्धी न सांडीं हृदया, । सर्वां भूतीं अभेद दया, । बहु जन्में हरिहरांच्या पायां । भजतां हें फळ पाविजे. ॥ १९४ ॥ सत्य वसविलें [2]वेदनालया, । परस्त्री-त्याग गुह्येंद्रिया, । बहु जन्में हरिहरांच्या पायां । भजतां हें फळ पाविजे. ॥ १९५ ॥ [3]अपत्याचे आशेनें देखा । [4]अंड न भेदी [5]पिपीलिका, । [6]अमोल्य पुत्र वैडूर्यमाणिका । ग्राहीक कां न होसी ? ॥ १९६ ॥ '[7]आत्मा वै पुत्रनामासि,' । आपण तोचि पुत्रवेषी, । जैसें [8]दर्पण निजमुखासी । आडनांव प्रतिबिंब. ॥ १९७ ॥ आपण जन्मोनि [9]आंतौता, । माता [10]तैसीचें पुत्रमाता, । लौकिक नव्हे, [11]श्रुतिवाक्यार्था । श्रेष्ठश्रेष्ठां विचारीं. ॥ १९८ ॥ आतां शेवटीलिया वचना । एकदां ऐकें नरभूषणा ! । मी जातसें काश्यपारण्या । कण्वाश्रमा सखेद. ॥ १९९ ॥ यया आत्मजा आपुलिया । आदरें अंगीकारावें राया ! । समर्थ नव्हेसी त्यागावया । सत्य सत्य त्रिवाचा. ॥ १६० ॥ याचिया कल्याण जन्मकाळीं । वाचा झालीसे [12]अंतराळीं, । 'सार्वभौम पृथ्वीतळीं । अश्वमेध शतसंख्य ॥ १६१ ॥ करील, अनेक महदाख्यानें । वंशा जयाचेनि [13]अभिधानें । भारत म्हणतील पुराणें । कीर्ति गातील ययाची'. ॥ १६२ ॥ [14]स्वर्गनायिकांमाजी श्रेष्ठ । मेनिका नामें अतिवरिष्ठ, । तिच्या पोटीं तपोनिष्ठ । विश्वामित्रऋषिवीर्यें. ॥ १६३ ॥ ब्रह्मयोनींत माझें [15]जनन, । वंचूनि पिता सुहृज्जन । तुज वोपिलें देहदान, । तें [16]उत्तीर्ण झालासी.' ॥ १६४ ॥ ऐसे शकुंतलेचे बोल । रायें मानिले निरस [17]फोल, । जैसा [18]क्षपणक [19]निरोधी झोल । पिकल्या मधुमोहळाची.

---

१. निरामय, रोगरहित. २. मुखसदनीं. ३. महाभारत–आदिपर्व, अध्याय ७४ श्लोक ५५ याचा आधार या ओंवीस आहे. ४. आंडें. ५. मुंगी. ६. अमोल्य पुत्र हेंच वैडूर्यजातीचें माणिक याला गिऱ्हाईक घेणारा स्वीकारकर्ता. ७. हें श्रुतिवाक्य आहे. ८. आरसा. ९. आंतील. १०. पति पुत्ररूपानें जायेच्या ठिकाणीं उत्पन्न होतो, यास्तव ती जाया म्हणजे पुत्राची माता ही त्याचीच माता होते, पुत्र आणि पिता हे अभेदरूप आहेत–हा भावार्थ. ११. 'अंगादंगात्संभवसि हृदयादधिजायसे । आत्मा वै पुत्रनामासि स जीव शरदां शतम् ॥' हें वेदवचन. हें जातकर्मसंस्कारसमयीं ब्राह्मण म्हणतात. पिता पुत्राला संबोधून म्हणतो:–'हे पुत्रा ! माझ्या प्रत्येक अंगापासून तुझा संभव आहे, तूं हृदयापासून झालास, तूं माझें प्रतिबिंब आहेस, यास्तव शंभर वर्षें वांच' असा या वचनाचा भावार्थ. १२. आकाशीं, आकाशवाणी झाली. १३. नांवें. १४. उर्वशी, पूर्वचित्ति, विश्वाची, घृताची, सहजन्या आणि मेनका या सहा अप्सरांमध्यें. (आदिपर्व–अध्याय ७४ श्लोक ६८.) १५. जन्म. १६. त्या ऋणांतून मुक्त. १७. व्यर्थ. १८. जैन. १९. निषेधी.

॥ १६५ ॥ चंपकपुष्पांचे सुवासशोभें । ग्राहि[1] न होइजे जेंवि रोलंबें,[2] । कोकन[3]-दांचीं चारु[4] कदंबें[5] । कुंजर[6] सारी परौतीं,[7] ॥ १६६ ॥ नानावेदींचे विधिवाद[8] । चार्वाक[9] म्हणती सर्वाबद्ध,[10] । उपनिषदाचा गुह्यार्थभेद । वौंदी[11] जेंवी अव्हेरिती, ॥ १६७ ॥ तैसीं प्रियेचीं पवित्र वचनें । दुष्यंतें दूषिलीं आपुल्या मनें. । म्हणे, 'हे बहुभाष कवणें । जिंकिली न वचे बोलतां. ॥ १६८ ॥ मातला हस्ती, क्षोभला सर्प, । भ्रष्टला ब्राह्मण, पेटला दीप, । अमर्याद स्त्रियांचा जल्प, । आवरूं न शके विधाता.[12] ॥ १६९ ॥ हीनजातीचिया लक्षणा । आतां जाणवलें या मना, । मेनिका ते पण्यांगना,[13] । धर्मनिषिद्ध बंधकी.[14] ॥ १७० ॥ अनेक लिंगोदकाचे लोट । जीमाजी होती एकवट; । कंदर्पचर्म निकृष्ट । चर्मसौंदणी[15] निर्मिली. ॥ १७१ ॥ नगरद्वारींचा दर्पण । अवलोकितां निवारी कोण ? । विद्यामठीं रोंविला साहाण । काष्ठ घांशी भलताचि. ॥ १७२ ॥ भेरी मांडली देउळीं । येतां जातां बडविजे सकळीं, । धर्मशाळेच्चिया उखळीं । आवडे तेणें कांडावें. ॥ १७३ ॥ जीचे उदरीं तव उत्पत्ती । तिची निवडिली ऐशी जाती, । म्हणोनि 'खाण तैसी माती' । आहाणा[16] लोकीं प्रसिद्ध. ॥ १७४ ॥ यालागीं बोलती वडील वृद्ध, । 'उभयकुळें पाहूनि शुद्ध । कन्या परणावी[17] प्रसिद्ध । जेंवी पताका वंशासी.' ॥ १७५ ॥ क्षत्रियें[18] घेतला ब्रह्मवेष, । हा कोण जातीचा विशेष ? । शूद्र होवोनि परमहंस[19] । म्हणे, 'मी श्रेष्ठ संन्यासी'. ॥ १७६ ॥ तो कौशिक कामाचारें । विचरतां उभयतां कामविकारें । गर्भ त्यागोनि अनादरें । दोघें गेलीं दो[20] पंथें. ॥ १७७ ॥ भोगूनि त्यागिती पुष्पमाळा । तेंवि निर्माल्य शकुंतळा । शकुंतीं रक्षितां स्नेहाळा । श्रेय घडलें कण्वातें. ॥ १७८ ॥ असो. ती अप्सरा केउता[21] ? ऋषी । केउता ? पिशाच वनतापसी । कैंचा पुत्र हो मानसी । श्रुत दृष्ट मी नेणें. ॥ १७९ ॥ गळां पडोनि विषयस्वार्था । संबंध लाविसी मज समर्था, । अविचारबुद्धि सांडूनि आतां । जाई स्वस्थळा आपुलि-

---

१. घेणारा. २. भ्रमर. ३. तांबड्या कमळाचीं. ४. सुंदर. ५. समूह. ६. गज. ७. पलीकडे, दूर. ८. अमुक कर्म अमुक रीतीनें करावें असा धर्मशास्त्रांत सांगितलेला जो नियम त्याचा उल्लेख. ९. चार्वाकमतानुसारी, नास्तिक. १०. सर्व असंबद्ध, अयुक्तिक. ११. पाखांडी. १२. ब्रह्मदेव. १३. वेश्या. १४. व्यभिचारिणी. १५. दोण. सौंदणी=पाणी ठेवण्याचें धातुमय अथवा पाषाणमय पात्र. १६. उखाणा, म्हण. १७. परिणावी. परिणय म्हणजे विवाह. १८. विश्वामित्र क्षत्रिय असून तपानें ब्राह्मण झाला, या गोष्टीस उद्देशून हें वर्णन आहे. १९. तपासाठीं ज्यानें इंद्रियनिग्रह केला आहे असा संन्यासी. २०. दोन. २१. कशाची, कोठची.

या.' ॥ १८० ॥ मंत्रबीजाक्षरांच्या ओळी । अबद्ध जपतां [1]भद्रकाळी । क्षोभे, तैसी क्रोधानळीं । अंगार टाकी शब्दाचे. ॥ १८१ ॥ पवित्र विश्वामित्रबाळा । शकुंतला [2]अलिकुंतळा । म्हणे, 'कुंतळमंडळपाळा ! । तूंचि अविचारें जल्पसी. ॥ १८२ ॥ [3]सैर्षपप्राय पराचे दोष । पर्वतप्राय करी अधम पुरुष; । आपुलीं दुष्कर्में अशेष । मेरुतुल्य गणीना. ॥ १८३ ॥ मेनिका [4]त्रिदेशपंक्तिमान्य, । [5]चतुर्दशलोकीं तिचें गमन, । मीही जाण तिजसमान । देवतादेही दिव्य स्त्री. ॥१८४॥ इंद्रचंद्रादित्यभुवन । वैकुंठ कैलास ब्रह्मसदन । येच क्षणीं अवलोकुन । येईन येथें या देहीं. ॥ १८५ ॥ तूं तव भूचर विचरसी [6]क्षिती । पाहें माझी [7]सांध्यां [8]प्रतीती, । श्रेष्ठा सावित्री गौरी पार्वती । साक्षी आणीन या ठायां. ॥१८६॥ अपर सृष्टीचा [9]परमेष्ठी । [10]गाधिज मुनी निंदिसी दोषदृष्टीं, । हें ऐकोनि काय श्रेष्ठीं । श्रेष्ठ तूतें म्हणिजेल ? ॥ १८७ ॥ मागें एकासि बोलिजे न्यून, । त्याहून अपराध तो कवण ? । विशेष समर्थ तपोधन । निंदितां, अनर्थ रोकडा. ॥ १८८ ॥ पराचे दोष न बोलतां मुखीं । तो मान्यता पावे उभय लोकीं, । विष्णुदूत त्या मस्तकीं । वाहूनि नेती वैकुंठा. ॥ १८९ ॥ कुरूप न पाहे आरसीं वदन । तोंवरी वाहे [11]रूपाभिमान, । देखिल्या म्हणे अपार जन । रूपें विशेष मजहुनी. ॥ १९० ॥ रूपें विरूप कोणा न मानी, । पवित्र दोष न देखे नयनीं, । सदोषिया निर्दोष कोणी । भुवनत्रयीं दिसेना. ॥ १९१ ॥ शुभाशुभश्रवणीं सुरस । सज्जना गुण, दुर्जना दोष, । जैसे [12]क्षीरविभागी राजहंस । [13]पुरीषभाग वायसां. ॥ १९२ ॥ दुरुक्ति बोलतां [14]अनआना । प्राणांत देख साधूच्या मना, । साधुनिंदा करितां जाणा । सुख दुर्जना अपार. ॥ १९३ ॥ वृद्धासि करितां अभिवंदन । साधु होती सुखसंपन्न, । करूनि साधूचा अवमान । परम लाभ दुष्टातें. ॥ १९४ ॥ दोष न देखती जे लोकीं । ते सर्वत्र सदा सुखी, । दोषदुःखें स्वयेंच दुःखी । दुःख देती पुढिलातें. ॥ १९५ ॥ मुख्य साधूचें लक्षण । परदोष न वदे गेलिया प्राण, । [15]पैशून्य बोले कारणेंविणें । तोचि दुर्जन [16]दुरात्मा. ॥ १९६ ॥ 'दुर्जन' ऐसें बोलती जनीं । हेंचि लांछन, हीच हानी, ।

---

१. दुर्गादेवी. २. भ्रमरा(अलि)सारिखे आहेत केश(कुंतल)जीचे. ३. मोहरीसमान. (आदिपर्व–अध्याय ७४ श्लोक ८२.) ४. देवसमूहास वंद्य. ५. चवदा भुवनीं. सप्त स्वर्ग आणि सप्त पाताळ मिळून चौदा भुवनें. ६. पृथ्वी. ७. हल्लीं. ८. प्रत्यय, अनुभव, निदर्शन. ९. ब्रह्मदेव. १०. विश्वामित्र गाधिनामक राजाचा पुत्र. ११. सौंदर्याचा गर्व. १२. दूध. १३. विष्ठा. १४. अन्यअन्याला. १५. निंदाशब्द, चहाडखोरपणाचें वचन. १६. दुष्टात्मा.

धन्य तो 'साधु' पवित्र गुणी । परम लाभ या नांवें. ॥ १९७ ॥ जैसा देखतां काळसर्पु । लहानथोरा उपजे कोपु, । तैसी सत्य स्वधर्मे वपु । त्यजिली तया दुष्टाची. ॥ १९८ ॥ त्यासी देखूनि सकळ जन । शंका पावती, नवल कवण ? । मुख्य ईश्वर तो आपण । तोही पावे भयातें. ॥ १९९ ॥ पुत्र उत्पादूनि स्वरेतें । म्हणे, 'मी नेणें, त्यजीन त्यातें,' । देव अपाय चिंती तयातें । ऐश्वर्य घेतो हिरोनी. ॥ २०० ॥ वीर्यें पत्नीपासोनि केला, । लब्ध विक्रीत प्रतिपाळिला, । अन्यक्षेत्रीं संपादिला । पुत्र बोले मनुस्मृती. ॥ २०१ ॥ स्वपत्नीप्रभव लब्ध क्रीत । चौथा जो कां विवर्धित, । धर्म कीर्ति मोक्षपंथ । होय जवळी त्यांचेनी. ॥ २०२ ॥ चौघांमाजी ज्येष्ठ अग्रगणी । स्वरेतें स्वस्त्रीगर्भस्थानीं । जन्मला तो भूषणमणी । विजयकेतु वंशाचा. ॥ २०३ ॥ पितरां नरकाब्धि तारावया । नौका तो एक पुत्र, राया ! । यालागीं तूं त्यागावया । अर्ह नव्हेसी निर्धारें. ॥ २०४ ॥ नरसिंहा ! सोडोनि कपट । मांडिये बैसवीं कुमारश्रेष्ठ, । सत्य स्वधर्म करीं प्रगट । वडीलवृद्धांदेखतां. ॥ २०५ ॥ निर्जळीं शतकूपखनन । तें एका वापिकेसमान, । शतभरी वापिकांचें पुण्य । एका यज्ञीं पाविजे. ॥ २०६ ॥ शतक्रतूंचें सुकृत । एका पुत्रोत्पादनीं प्राप्त, । त्याचें श्रेय शतगुणित । सत्यरक्षणीं लोहिजे. ॥ २०७ ॥ अश्वमेधशतांचें पुण्य, । एकीकडे सत्य वचन, । तुळितां सत्य आगळें जाण । मेरुसर्षप दृष्टांतें. ॥ २०८ ॥ चहूं वेदींचें सांग ज्ञान । सकळ तीर्थांचें अवगाहन, । त्यासी तुळितां यथार्थ वचन । सत्य अगणित आगळें. ॥ २०९ ॥ कोटी पुण्यें जोडिलीं यत्नीं । तीं जळती एके असत्यवचनीं, । जैसी पावकस्फुलिंगकणीं । नाशी कर्पूरगिरीतें. ॥ २१० ॥ सत्यापरता नाहीं धर्म, । सत्य तेंचि परब्रह्म, । सत्यापासीं पुरुषोत्तम । सर्वकाळ तिष्ठत. ॥ २११ ॥ सत्यें नेमिला नचळे नेम, । त्यासीं वोळगे मोक्षधाम, । घोर

---

१. भय. २. स्ववीर्यानें. (आदिपर्व–अध्याय ७४ श्लोक ९७.) ३. आदिपर्व–अध्याय ७४ श्लोक ९९. ४. विक्रीत. ५. पुत्र पांच प्रकारचे आहेत:–एक स्वपत्नीप्रभव (स्वपत्नीपासून झालेला), व दुसरे चार अन्य स्त्रीच्या ठायीं झालेले:–लब्ध (प्राप्त झालेला), क्रीत (विकत घेतलेला), विवर्धित (पाळण केलेला), कृत (उपनयनादि संस्कार ज्याचे केले तो). वास्तव येथें 'पांचांमाजी' असें पाहिजे होतें. ६. योग्य. ७. जेथें उदक नाहीं अशा स्थलीं शंभर आड खणणें. ८. रुंद व खोल अशी मोठी विहीर, गृहदीर्घिका. ९. आदिपर्व–अध्याय ७४ श्लोक १०१-१०६ पहा. १०. यज्ञांचें. ११. पुण्य. १२. पाविजे. १३. श्रेष्ठ, अधिक. १४. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद यांचें. १५. स्नान. १६. विस्तवाची ठिणगी. १७. कापराच्या पर्वताला. १८. ओढवे.

संसारभयाचें नाम । स्पर्शों न शके कल्पांतीं. ॥ २१२ ॥ असत्य तेंची पैं पातक, । असत्य तोची महानरक, । असत्याचेनि संगें दुःख । अनंतजन्मीं भोगिती. ॥ २१३ ॥ सत्यामृताची कनकवाटी । जोडिली न संडे भूतटीं, । [1]असत्यविषाची नरोटी । पवित्र हातें नातळे.' ॥ २१४ ॥ [2]मूलिंगासी अधोवदनें । [3]गळल्या लाविल्या [4]अश्रुजीवनें, । उष्णश्वास धूम्रवर्णे । तीव्र सांडी सकोप. ॥२१५॥ तो अधरसुवासें घोळिला, । परिमळधूप समर्पिला, । खेद संताप उपजला । हृदयटवळा दीपकु. ॥ २१६ ॥ वाक्यपुष्पें पुष्पांजुळी । [5]सत्यसाक्षीनें [6]रांजमौळीं । वोपितां, तंव तेचि काळीं । अति आश्चर्य वर्तलें. ॥ २१७ ॥ सत्य सत्य [7]शूलपाणी । प्रगट झाला तत्क्षणीं; । म्हणोनि [8]अंतरिक्षवाणी । होती झाली, ते ऐका. ॥ २१८ ॥ वाग्वाचा [9]अशरीरिणी । गंभीर मेघाचिये ध्वनी । होतां सकळ सभास्थानीं । ऋत्विज मंत्री आचार्य ॥ २१९ ॥ ऐकों ठेले सावधान, । देखती दिव्यसुमनांचा घन. । ऋषी म्हणती, 'करा श्रवण । वचन देवदूताचें.' ॥ २२० ॥ 'रे! रे! दुष्यंतराज नृपती! । झंणी अवमानिसी हे सती; । हे कोपलिया सर्व जगती । जाळूं शके क्षणार्धें. ॥ २२१ ॥ चर्मभाता फुंकिजे पवन । तेथूनि [11]लोहोपदार्थ [12]सुघन । निपजती, हें सामर्थ्य जाण । [13]हस्तचाळी तयाचें. ॥ २२२ ॥ म्हणती शस्त्र [14]खोंतियें केलें, । न म्हणती भात्याहूनि पडिलें; । जयलाभें [15]झुंजारा पूजिलें । धनुष्य कोणी पुजीना. ॥ २२३ ॥ तयाचिये परी जाणिजे [16]माता । पुत्रस्वरूप उगवे पिता, । [17]रमे तोचि जन्मे हे वार्ता । [18]वेदमुखींची यथार्थ. ॥ २२४ ॥ यालागीं पुत्र आपुला घेणें, । [19]मानिनी मानें सदना नेणें; । आतां [20]प्रतारणेचीं वचनें । न बोलावीं बहुसाल. ॥ २२५ ॥ पाळोनियां आमुचें वचन । अंगीकारीं [21]उभयरत्न, । पुढारां बोलसी तरी [22]आण । हरिहरदेवदूतांची.' ॥ २२६ ॥ ऐसी ऐकतां आकाशवाणी । टाळी पिटिली सभास्थानीं. । जयजयकाराचिये ध्वनी । परमाल्हाद समस्तां. ॥ २२७ ॥ राजा

---

१. 'असत्यबुद्धीची नरोटी । पवित्र हस्तें स्पर्शों नये' असाही पाठ आहे. २. मूरूप महादेवलिंगावर. ३. अभिषेकपात्रें. ४. बाष्परूप उदकें. ५. सत्यास साक्षी कल्पून. ६. रायाच्या मस्तकावर. ७. शूलधारी महादेव. ८. आकाशवाणी. ९. देहरहिता. १०. एकाएकीं. ११. लोखंडाचे पदार्थ. १२. लोखंडी गदा, मुद्गर. १३. हातानें भाता चालविणाराचें, (भात्याचें नव्हे) म्हणजे लोहाराचें. १४. लोहारानें. १५. युद्धकर्त्या वीराला. १६. माता ही चामड्याच्या पिशवीप्रमाणें (भात्याप्रमाणें) आहे, वास्तव तत्प्राप्त जें अपत्य तें बीज निक्षेपकर्त्या पित्याचें आहे, चर्मभात्याचें नव्हे. १७. पत्नीशीं जो रत होई. १८. मागच्या ओंव्या (१५७-१५८) पहा. १९. स्त्री. २०. वंचनेचीं. २१. शकुंतला आणि भरत. २२. शपथ.

म्हणे,‘ वृद्ध हो ! ऐका; । हा सर्व अर्थ मज ठाउका, । परी शंकोनि मी लौकिका । कृत्रिमवाक्यें बोलिलों. ॥ २२८ ॥ पहिलेंचि करितों अंगीकार । तरी लोक [1]भाविते अनाचार, । कामबुद्धि राजेश्वर । निंद्यकर्मी [2]रहाटला. ॥ २२९ ॥ आतां ईश्वरवचन साक्षी । अंगीकारीन [3]मृगशावाक्षी.’ । परिसोनि सुहृज्जन स्वपक्षी । ‘धन्य’ म्हणती ऋषिवर्य. ॥ २३० ॥ मग उठोनि लवलाहें । पुत्र क्रडिये घेतला मोहें । आवडी चुंबोनियां पाहे, । वारंवार वदनातें. ॥ २३१ ॥ जनाची दृष्टी लागेल म्हणें । म्हणोनि अपार धन धान्यें । वोवाळूनि सांडिलीं तेणें, । याचक झाले कुबेर. ॥ २३२ ॥ करूनि [4]मूर्धविघ्राण, । स्नेहें देऊनि आलिंगन, । यौवराज्यीं अभिषेचन । करिता झाला तात्काळीं. ॥ २३३ ॥ ‘[6]भरस्व स्वपुत्रं हे दुष्यंत!’ । ऐसें बोलिले देवदूत । यालागीं नाम ठेविलें भरत । जनकें तनया आवडी. ॥ २३४ ॥ आदरें प्रिया धरोनि हातीं । नेली अंतर्गृहाप्रती; । आलिंगोनि म्हणे, ‘चित्तीं । विषाद कांहीं न मानावा. ॥ २३५ ॥ सत्य प्रकट करावया साचारें । वाक्य बोलिलों लोकाचारें, । तें तूं न मानूनियां चतुरे! । क्षमा करणें मजलागीं.’ ॥ २३६ ॥ म्हणोनि वस्त्रें दिव्याभरणें । वोपिलीं जैसीं [7]शचीही नेणें; । राज्यसंपत्ती निजठेवणें । [8]निवेदिलें तिजहातीं. ॥२३७॥ [9]पट्टमहिषीमाजी मुख्य । पावली अनेकभोगसौख्य; । पूर्वीच्या [10]नेमांहूनि अधिक । ऐसें आलें प्रतीती. ॥ २३८ ॥ दुष्यंतराजानंतरें भरत । वीर प्रतापवंत विख्यात. । दुसऱ्या राजें ब्रह्मांडांत । नाहीं केला पुरुषार्थ. ॥ २३९ ॥ [11]पंचाशत्कोटी विस्तीर्ण । हेमाद्रिशृंगें शोभायमान, । केलें पृथ्वीचें शासन । एकछत्र एकाज्ञा. ॥ २४० ॥ [12]गोजितनामा अश्वमेध । तेणेंचि केला जगप्रसिद्ध । तेवेळीं करूनि ब्रह्मांडभेद । याचकइच्छा पळविली. ॥ २४१ ॥ [13]सहस्रपद्में सुवर्णराशी । देऊनि पूजिला कण्वऋषी, । विश्वामित्र तपोराशी । केला संपत्तिसमुद्र. ॥ २४२ ॥ त्याचेनि नामें भारती कीर्ती । विस्तारिली हे त्रिजगती, । त्याचे वंशान्वयसंतती । भारत तुम्ही समस्त. ॥ २४३ ॥ सरलें रसाळ शाकुंतळ; । पुढें ययाति महाविशाळ । चित्त करूनि सुनिश्चळ । कथा कुशळ

१. मानिते. २. प्रवर्तला. ३. मृगबालकासारखे नेत्र (अक्षि) जिचे अशी. ४. मस्तक. ५. हुंगणें. ६. हे दुष्यंता ! आपल्या पुत्राचें पोषण कर. ७. इंद्राणीही. ८. दिलें. ९. पट्टदेवी, राजाची पट्टाभिषिक्त स्त्री. १०. नियम, करार. ११. पन्नास. १२. पृथ्वीजित्‌नामक. मूळांत ‘गोवितत’ नामक वाजिमेध केला असें वर्णन आहे. (आदिपर्व–अ० ७४ श्लो० १३०) १३. कोटिशतांचें (पद्मांचें) सहस्र.

परिसोत. ॥ २४४ ॥ इति श्रीआदिपर्व भारती । व्यासकविता श्रीभागवतीं । मातृकारूपें माझी प्रीती । पाठी चाले परिचर्यें[1]. ॥ २४५ ॥ भक्तीनें मुक्तेश्वराचीं वचनें । ऐकतां तोषती सज्जनमनें, । जैसें काचमणीचें [2]लेणें । लंकेसी लेती श्रीमंत. ॥ २४६ ॥

अध्याय सत्रावा.

वैशंपायन धरित्रीधवा[3] । म्हणे, 'परिसें नरेंद्र पार्थिवा ! । चतुराननापासूनि[4] दहावा[5] । पूर्वज तुमचा ययाती. ॥ १ ॥ तयासि भार्या पवित्र दोन्ही । शुक्रतनया देवयानी, । शर्मिष्ठा वृषपर्वाणी[6] । दैत्यपतीची आत्मजा[7]. ॥ २ ॥ नेमच्चलनाचे अपराधीं[8] । काव्यें[9] ताडिला शापशब्दीं । तेणें जराजर्जरव्याधी । क्षीण झाला शरीरीं. ॥ ३ ॥ यदु तुर्वसु गुणसागर । दोघे देवयानीचे कुमर, । द्रुह्यु अनु पूरु प्रवीर । शर्मिष्ठेचे त्रयसंख्या. ॥ ४ ॥ विषयभोगाचिये आंतीं[10] । तारुण्य याचितां पुत्रांप्रती । चौघे नेदूं म्हणतां कुमती । शापूनि केले श्रीभ्रष्ट. ॥ ५ ॥ कनिष्ठ पूरुनें आपुलिया वया । भक्तीनें उचित वोपिलें पितया, । यालागीं जनकें तुष्टोनि तया । अभिषेकिलें निजपदीं. ॥ ६ ॥ 'राज्यधर वंशधर । तूंचि होईं' ऐसा वर । देऊनियां पूरु प्रवीर । श्रेष्ठ केला सर्वार्थी. ॥ ७ ॥ अन्वयसंभूत सकळें । संततिपरंपरा सुढाळें[11] । वंशवल्लीचीं सुपक्व फळें । तुम्हाऐसीं कुरुवर्या !' ॥ ८ ॥ राजा म्हणे वक्तया, 'गुणी । ब्राह्मणकन्या देवयानी । क्षत्रियातें पट्टकामिनी । झाली कैसी आदरें ? ॥ ९ ॥ अन्यशरीरींची शरीरांतरा । कैसेनि संचरली ते जरा ? । तारुण्य पातलें हेंही चतुरा ! । अत्यंत आश्चर्य मज वाटे. ॥ १० ॥ तरी मी आंतीनें[12] क्षुधावंत, । वाढितां मागें न काढीं हात, । कथासुधेचा विशदार्थ[13] । रस अद्भुत निरोपीं.' ॥ ११ ॥ वक्ता म्हणे, 'गुणैकराशी ! । सांगेन ऐकें सावकाशीं, । देवेंद्रपदाभिलाषी । वैर दायादसंबंधें.

---

१. सेवे. २. लंकेंत सुवर्ण परिपूर्ण, तेथें काच दुर्लभ, म्हणून काचेचें लेणें (अलंकार) श्रीमंतलोक आवडीनें घालतात. ३. पृथ्वीपाला. ४. ब्रह्मदेवापासून. ५. ब्रह्मदेव, दक्षप्रजापति, अदिति, विवस्वन्, मनु, इला, पुरुरवा, आयु, नहुष आणि ययाति, या अनुक्रमानें ययाति हा दहावा होतो. ६. वृषपर्वकन्या. ७. कन्या. ८. नियमाचें उल्लंघन केलें या अपराधास्तव. ९. शुक्रानें. १०. आवडीनें. ११. सुरेख, तेजस्वी. १२. आवडीनें. १३. स्पष्टार्थ.

॥ १२ ॥ जिंकावया एकमेकांतें, । अर्चिते झाले [1]उपाध्यायांतें; । शक्रादि देव बृहस्पतीतें, । दैत्य दानव शुक्रासी. ॥ १३ ॥ पुढें सुरासुरीं थोर । युद्ध माजलें [2]घोरांदर, । निर्जर[3]घायीं अतिजर्जर । दैत्य मृत्यू पावती[4]. ॥ १४ ॥ ते अमृतसंजीवनीमंत्रें । [5]उशना उठवी निमिष[6]मात्रें, । सुर पडती असुरशस्त्रें । त्यांसीं उपाय असेना. ॥ १५ ॥ [7]अमृतसंजीवनी विद्या । बृहस्पती नेणे असुरविद्या, । हें देखोनि दे[8]ववंद्या । चिंताग्रहें ग्रासिलें. ॥ १६ ॥ [9]म्हणे, 'निर्बळ स्वामी, नपुंसक भर्ता, । अज्ञान गुरु, निर्धन दाता, । ऐसियांच्या मनोरथा । सुफळें होती कैसेनी? ॥ १७ ॥ कृपण मित्राचें साजणें, । अंधासंगें पंथ चालणें, । पोहूं [10]नेणे तयाची धरणें । [11]कांस जैसी समुद्रीं. ॥ १८ ॥ रोगीवैद्याचें औषध, । मोडल्या शस्त्रें करणें युद्ध, । खोटें नाणें बुद्धिमंद । व्यर्थ जैसें संरक्षी. ॥ १९ ॥ वाचस्पतीची गुरुत्वथोरी । फळली आम्हां ऐसियापरी । [5]भार्गवसामर्थ्याची [12]सरी । तुळितां ब्रह्मांड ठेंगणें. ॥ २० ॥ यालागीं पाहिजे ऐसा गुरु, । जो सर्वदाता कल्पतरु, । [13]अनादिसिद्धांमाजी ईश्वरु । दत्तात्रेय पैं जैसा. ॥ २१ ॥ मुळींच गुरुचें नांव [14]जीव । तो केंवि शिष्यातें करील शिव?' । ऐसें बोलतां लोक सर्व । गुरुनिंदार्थ कल्पिती. ॥ २२ ॥ 'शुक्रासीच गुरुत्व देणें । हें तों अत्यंत लाजिरवाणें; । [15]अमित्राप्रती आपुलें उणें । उघडें करितां अश्लाघ्य. ॥ २३ ॥ आपल्या अपकाराच्या घायीं । शल्य वाढलें ज्याचे हृदयीं । अडल्या लोटांगण त्याचे पायीं । [16]ईश्वरक्षोभ या नांव. ॥ २४ ॥ आपुला अर्थ लोकांवरी बुडे, । लोकांचें देणें अचूक घडे, । वैरियाकरीं [17]वर्म सांपडे, । ईश्वरक्षोभ या नांव. ॥ २५ ॥ लाभार्थ कष्टतां होय हानी, । अवमान पाविजे पूजास्थानीं, । सुहृद प्रवर्ते शत्रूच्या गुणीं, । ईश्वरक्षोभ या नांव. ॥ २६ ॥ आपुलें ऐश्वर्य

---

१. उपेत्य यस्मात् अधीते स उपाध्यायः. शिष्य ज्याच्या जवळ जाऊन यथाविधि अध्ययन करतो तो उपाध्याय. दैत्यगुरु. २. भयंकर. ३. निर्जरांच्या (देवांच्या) घायीं (घावांनीं). ४. 'युद्ध जाहलें घोरांदर । निर्जरघायीं शत जर्जर । दैत्य मृत्यु पावती सत्वर । वातवेगें जाणपां ॥' असाही पाठभेद आढळतो. ५. शुक्राचार्य. ६. पळमात्रें. ७. मेलेल्यास अमृत देऊन सजीव करण्याची विद्या. ८. इंद्रास. ९. इंद्र म्हणे. १०. न जाणे. ११. कांसोटा, आश्रय. कांस धरणें=कांहीं संकटांतून पार पडण्याकरितां कोणेक समर्थाचा आश्रय धरणें. १२. बरोबरी, साम्य. १३. कोणी मनुष्यानें केलेले नव्हेत असे जे ईश्वरनिर्मित साधु त्यांत श्रेष्ठ. १४. बृहस्पति. १५. शत्रु. १६. ईश्वरी क्षोभ='कोणेकावर मोठ्या नाशाचा प्रसंग गुदरल्यामुळें तत्कारणत्वेंकरून संभविणारा जो ईश्वराचा कोप तो'. १७. मर्म, उणेपणा.

आपुली [1]वनिता । बळिष्ठ भोगी आपणादेखतां, । वृद्धपणीं दरिद्रता, । ईश्वरक्षोभ या नांव.' ॥ २७ ॥ ऐशिया युक्ती [2]शचीचा वर । हृदयीं करी दीर्घ विचार, । मग बृहस्पतीचा ज्येष्ठ कुमर । पाचारिला जवळिकें. ॥ २८ ॥ तो कचनामा परम गुणी । दक्ष कुशल कार्यसाधनीं, । तयाप्रती [3]कुलिशपाणी । [4]आलोचना करी विश्वासें. ॥ २९ ॥ म्हणे, 'आमुचें [5]पद न हाले, । तुझें [6]पुरोहितत्व चाले, । ऐसें तुवां पाहिजे केलें । जें मी सांगेन त्या रीती. ॥ ३० ॥ यत्न करितां न मिळे सृष्टीं । [7]ते वस्तु असे शत्रूचे गांठी, । नीच सेवक होइजे निकटीं । हितस्वार्थाकारणें. ॥ ३१ ॥ लोकलाज आणि अभिमान । सांडोनि आपुलें थोरपण । कार्य साधिती विचक्षण । गृहा जाऊनि शत्रूच्या. ॥ ३२ ॥ यालागीं तुवां विवेकमूर्ती । जाऊनि शुक्राचार्याप्रती । शिष्य होऊनि विनयभक्ती । पुत्रविश्वास दावणें. ॥ ३३ ॥ [8]अवंचकपणें करूनि सेवा । [9]हृदयमांदुसामाजील ठेवा । संजीवनीमंत्र साधावा । निधी जैसा [10]पायाळें. ॥ ३४ ॥ भक्तीनें तोषे अंतःकरणीं । तैसी करावी महाकरणी, । साधूनि विद्या संजीवनी । वंद्य होईं [11]विबुधांतें. ॥ ३५ ॥ देवयानी शुक्रतनया । प्राणापरीस [12]वेढियंती पितया, । तिचें चित्त [13]उपासलिया । [14]सौध्य होईल निज अर्थ. ॥ ३६ ॥ शील दाक्षिण्य माधुर्य वचनीं । आचारवंतें [15]अवक्रगुणीं । आराधितां देवयानी । संजीवनीफळ लाभे. ॥ ३७ ॥ मी श्रेष्ठ, श्रेष्ठाचा कुमर, । धरीं विद्येविण अहंकार, । सुज्ञ सुविद्या न करी नर, । तो शतमूर्ख जाणावा. ॥ ३८ ॥ सर्वाभिमान लोटोनि चरणें, । धूर्तता लाहोनि अंतःकरणें, । शिष्यत्व न घेतां कां तेणें । अमोघ विद्या कथिजेल? ॥ ३९ ॥ म्हणोनि आतां न लावीं उशीरु, । जाऊनि [16]उपासीं [17]असुरगुरु, । नाना क्लेशें धरूनि धीरु । कार्य साधीं सुजाणा! ॥ ४० ॥ साखरेतें स्वादिष्ट करणें, । कर्पूरातें सुवास देणें, । चतुरपुरुषातें शिकविणें, । हेंचि [18]नेणीव सांगतिया.' ॥ ४१ ॥ यजमानगुरुताताज्ञा ।

---

१. स्त्री. २. इंद्राणीचा पति. (इंद्र.) ३. इंद्र. (कुलिश=वज्र आहे पाणीच्या=हाताच्या ठायीं ज्याच्या तो.) ४. 'आलोचन करी स्वमुखें' असाही पाठ आहे. ५. इंद्रपद. ६. उपाध्यायपणा. ७. 'ते वस्तु असे शुक्राचे गांठी' असाही पाठभेद आहे. ८. निष्कपटपणानें. ९. हृदयरूप पेटींतील. १०. पायांकडून उत्पन्न झालेला. यांच्या अंगीं चोरी शोधून काढणें, गुप्त ठेवा (निधि) कोठें आहे हें सांगणें, इत्यादि अमानुष शक्ति असते असा समज आहे. ११. देवांतें. १२. आवडती. १३. आराधिलें असतां. १४. 'साध्य होईल सर्वस्वें' असाही पाठ आहे. १५. सरळ भावानें. १६. आराधीं. १७. शुक्राचार्य. १८. अज्ञान.

घेऊनि निघाला परमप्राज्ञ; । मार्गीं[1] शकुनीं सुचविलें सर्वज्ञा । कार्यसिद्धी सुचिन्हीं. ॥ ४२ ॥ दैत्यलोकीं दैत्यसदनीं । वृषपर्वा राज्यासनीं । भार्गवाचार्य[2] तये स्थानीं । मान्य सकळां गुरुत्वें. ॥ ४३ ॥ त्याप्रती बृहस्पतीचा कुमर । पातला कार्यसाधनीं चतुर, । दैत्यगुरूतें नमस्कार । करिता झाला साष्टांगीं[3]. ॥ ४४ ॥ मस्तक ठेविला काव्यचरणीं[4], । उभा ठेला कर जोडुनी, । म्हणे, 'स्वामी ! कृपा करुनी । विज्ञापना परिसावी. ॥ ४५ ॥ दासत्व करावयाचे आर्तीं[5] । पातलों व्हावया विद्यार्थी, । नीच सेवा शिष्यपंक्ती । तो विभाग मज द्यावा. ॥ ४६ ॥ सहस्त्रं संवत्सरपर्यंत । ब्रह्मचर्यव्रतसंयुक्त । सेवा करीन प्रेमभरित । अनालस्यें सर्वदा. ॥ ४७ ॥ ऋषी अंगिराचा पौत्रें[6] । कचनामा बृहस्पतीचा पुत्र । अनुग्रहा[7] अयोग्य पात्र । परि कृपेनें योग्य करावा. ॥ ४८ ॥ असेल वडिलांसी विरोध । तो मज नाहीं जी ! संबंध । शरणागत मी शुद्ध । उपेक्षितां अनुचित.' ॥ ४९ ॥ ऐकोनि शुक्र विचारी मनीं, । म्हणे, 'हा निर्मळ अंतःकरणीं । यथार्थ प्रगट बोले वचनीं । पितृनाम स्वनाम. ॥ ५० ॥ हा वर्तल्या सेवकवृत्ती । सेवक झाला वाचस्पती, । याचेनि शिष्यत्वें निश्चिती । शिष्य माझा सुरगुरू.' ॥ ५१ ॥ ऐसी श्लाघ्यता मानूनि जिवें[8] । म्हणे, 'बाळका ! बहुत बरवें । अंगीकारूनी आराध्यसेवे । सुखें राहीं मम गृहीं.' ॥ ५२ ॥ असुरगुरूचे आज्ञावचनें । गुरुपुत्र[9] वंदी मस्तकीं सुमनें. । मग अहोरात्र सावधानें । गुरुशुश्रूषे[10] तिष्ठत. ॥ ५३ ॥ ब्रह्मचर्यव्रताचरणें । अग्रोदक[11] दूर्वा सुमनें[12] । काष्ठ जळ समिधा पर्णें । आणूनि नित्य निवेदी[13]. ॥ ५४ ॥ सडासंमार्जन[14] लेपनें[15] । पादसेवा अंगमर्दन, । तेणें आचार्याचें मन । सुप्रसन्न सर्वदा. ॥ ५५ ॥ नृत्य गायन पवित्र कथा, । आज्ञापालन निर्विकारता[16], । तेणें

---

१. 'मार्गी सुचली शकुनसंज्ञा । कार्यसिद्धीचीं सुचिन्हें ॥' असाही पाठ आहे. २. शुक्राचार्य. ३. आठ अंगांनीं युक्त असा. अष्टांग नमस्काराचें लक्षण दिलें आहे तें असें:–'जानुभ्यां च तथा पद्भ्यां पाणिभ्यामुरसा धिया । शिरसा वचसा दृष्ट्या प्रणामोऽष्टांग ईरितः ॥.' ४. शुक्राचार्याच्या पायांवर. ५. आवडीनें. ६. नातू. ७. प्रसादाला. ८. मनानें, पोटांत. ९. कच. (गुरुचा= बृहस्पतीचा पुत्र.) १०. गुरूच्या सेवेसाठीं. ११. अग्रोदक='हस्तपादवस्त्र इत्यादिकांच्या संमर्दानें कचंबलेलें नव्हे असें नदी इत्यादिकांचें उदक आंत हात न बुडवितां स्वच्छ भांड्यांत भरून आणितात तें.' १२. पुष्पें. १३. देई, अर्पण करी. १४. स्थलशुद्ध्यर्थ झाडून शेणसला चंदनोदक इत्यादिद्वारा सेक करून स्वच्छ करण्याचा संस्कार. १५. भिंत चिखल लावून सारवणें. १६. कामक्रोधादि विकारांचा अभाव.

देवयानीच्या चित्ता । स्नेह वाढला अपार. ॥ ५६ ॥ फळाहार कां भोजन । कचावेगळें उदकपान । देवयानी न करी, क्षण । जाऊं नेदी परौता[1]. ॥५७॥ वर्षें क्रमिलीं पांच शत । आचार्यधेनु वनाआंत । गुरुआज्ञेनें चारितां तेथ । तंव[2] दानवीं लक्षिला. ॥ ५८ ॥ म्हणती, 'शत्रुगुरूचा कुमर । कपटबुद्धी धूर्त किंकर । संजीवनी हरावया चोर । सेवा करी शुक्राची.' ॥ ५९ ॥ म्हणूनि निष्ठुरीं[3] खड्गधारा । तिळतुल्य छेदिलें शरीरा, । सूदला[4] श्वापदगणा चारा । वृक[5]जंबुक[6]व्याघ्रांतें. ॥ ६० ॥ धेनु पातलिया अस्तमानीं । सवें गुरुपुत्र[7] न देखे नयनीं, । अति उद्विग्न देवयानी । सखेद बोले पितयातें. ॥ ६१ ॥ 'कच न-येचि परम साधु, । वाटे असुरीं केला वधु, । तया न देखतां पळपादु[8] । प्राण देहीं न राहे.' ॥ ६२ ॥ शुक्र विचारी जंव ज्ञानीं । तंव शिष्य भक्षिला श्वापदगणीं. । मग[9] स्मरोनि संजीवनी । सजीव केला दयाळें. ॥ ६३ ॥ 'वत्सा! आगच्छ[10],' इहीं वचनीं । हांकारितां[11] तत्क्षणीं । समीप पातला धांवोनी । लोटांगणीं[12] अतिनम्र. ॥ ६४ ॥ मंत्र प्रयोजितां प्रचंड । श्वापदजठरींचीं खंड खंड । एकवटोनि सजीव पुढ । उभा ठेला तत्काळीं. ॥ ६५ ॥ करूनि साष्टांग नमस्कार । विदित केला समाचार; । ऐकोनि म्हणे करुणाकर[13], । 'श्रमलासी मम वत्सा!' ॥ ६६ ॥ पुढती एके दिवशीं जाणा । आनंदें आणावया सुमना[14] । देवयानी पाठवी वना । तंव दानवीं लक्षिला. ॥ ६७ ॥ म्हणती, 'वांचला हा मागुता, । तुटेच ऐसें करूं आतां.' । म्हणोनि प्रवर्तले घाता । द्वेषें देवगुरूच्या. ॥ ६८ ॥ त्याचें करूनियां हनन, । सवेंचि केलें देहदहन, । अस्थि[15]रक्षा करूनि चूर्ण । मद्योदकीं मेळविली. ॥ ६९ ॥ तें अत्यंत मधुर म्हणोन । आचार्यासीं करविलें पान, । म्हणती, 'निःशल्य झालें मन । यत्न खुंटला[16] देवांचा.' ॥ ७० ॥ कच न येतां अस्तमानीं । अति उद्विग्न देवयानी । पुसे पितयातें प्रार्थुनी, । 'शिष्यविचार केउता?' ॥ ७१ ॥ तो म्हणे, 'अंतकसदना[17] गेला, । दानवीं दुसरेनीं वधिला, । आतां नयेचि पाचारिला । खेद सांडीं वेल्हाळे[18]!' ॥७२॥ ऐकोनि तातमुखींचें वचन । देवयानी करी रुदन, । म्हणे, 'तात्काळ

---

१. वेगळा. २. 'असुरगणीं, लक्षिला' असाही पाठ आहे. ३. निर्दय असुरांनीं. ४. घातला. ५. लांडगा. ६. कोल्हा. ७. कच. ८. पळाचा चवथा भाग. ९. 'मग स्मरोनि सुधासंजीवनी । पाचारिलें स्नेहाळें ।।' असाही पाठ आहे. १०. ये. ११. बोलावितां, हांक मारितां. १२. आडवें पडून चक्रासारखें लोटत जाणें. १३. करुणेचा आकर (खाण). १४. पुष्पांतें. (आदिपर्व—अध्याय ७६ श्लोक ४०—४१). १५. हाडांची राख, भस्म. १६. 'खंडला' असाही पाठ आहे. १७. यमगृहाला. १८. प्रिये.

त्यजीन प्राण । जीवतनया[1] न देखतां. ॥ ७३ ॥ जितेंद्रिय परमशांत । श्रेष्ठ पवित्र विनयवंत । यालागीं विचारीं यथार्थ । खेद कैसा न करावा ?' ॥ ७४ ॥ उशना[2] पाहे ज्ञानदृष्टी । तंव जीवात्मज[3] आपले पोटीं. । मग संजीवनी[4] जपोनि वोठीं । सजीव करी उदरस्था[5]. ॥ ७५ ॥ तेथोनि आदरें बोभाय[6], । म्हणे, 'बाळका ! झालें काय ?' । येरू म्हणे, 'शस्त्रघाय । दुष्ट दानवीं वधियेलें. ॥७६॥ देहदहन करूनि रक्षा । सुरामिश्रित[7] परमदक्षा ! । प्राशन करविली अध्यक्षा ! । जगद्गुरु ! तुजलागीं. ॥ ७७ ॥ कृपानुग्रहसामर्थ्यें करीं । सर्वही स्मरे तुझिया उदरीं, । परंतु यावया बाहेरी । मार्ग येथें दिसेना.' ॥ ७८ ॥ पिता कन्येस बोले वचन, । 'कचा उठवितां मातें मरण, । मी अक्षयी तरी जीवन । जीवात्मजा[3] घडेना. ॥ ७९ ॥ दोंमाजी आवडे काय ? । तें मज यथार्थ सांगें माय !.' । येरी म्हणे, 'उभय वर्मीचे घाय । मारणबाधा सारिखी. ॥ ८० ॥ मृगी पळतां पावकीं । उडी घाली कूपोदकीं, । प्राणहानी तंव सारिखी । प्राप्त झाली मज ऐसी. ॥८१॥ तुझेनि मृत्यें मज मृत्यु, । तेथें न कल्पीं दुसरा अर्थु, । जीवीं पावतां जीवघातु । तोही मजची तूं मानी. ॥ ८२ ॥ म्हणोनि सर्वज्ञा ! समर्था ! । परिहारोनि उभयानर्था । दोघे अक्षयी सुखी अवस्था । पावे, ऐसें करावें.' ॥८३॥ शुक्र विचारी अंतःकरणीं, । 'आंन उपाय न दिसे नयनीं, । आतां विद्या संजीवनी । गर्भस्थातें उपदेशूं. ॥ ८४ ॥ हा वसिन्नला माझे उदरीं । पुत्र होय निज निर्धारीं[11], । विद्याधनातें अधिकारी । पितयाचिया आत्मज. ॥ ८५ ॥ विशेष देवयानीचें मन । रक्षावें हें मुख्य कारण, । यालागीं संजीवनीदान । अवश्य केलें पाहिजे. ॥ ८६ ॥ उदर विदारोनि माझें । बाहेर पातलिया सहजें । माझिया उपदेशमंत्रबीजें । जपोनि मातें जीववील.' ॥ ८७ ॥ कन्येचाही मनोभाव । ऐसाचि जाणोनि अभिप्राव । बोलता झाला कवींचा राव । उदरस्थासीं तें ऐका. ॥ ८८ ॥ म्हणे, 'गुरुपुत्रा ! मम पुत्रा ! । वचन ऐकें परमपवित्रा ! । घेयीं संजीवनीमंत्रा । प्रणवबीजादिसहित[12]. ॥ ८९ ॥ माझे सेवेचें हेंचि फळ । सफळ हो कां तुज तात्काळ, । येणें मंत्रें अमर सकळ । मृत्यूपासोन[13] संरक्षीं. ॥ ९० ॥ ब्रह्महत्या रे ! दुर्बुद्धी ! । दैत्य विनाश पावती युद्धीं.' ।

---

१. जीवाचा (बृहस्पतीचा) तनय (कच). २. शुक्राचार्य. ३. कच. ४. संजीवनीमंत्रा. ५. 'गर्भस्था' असाही पाठभेद आहे. ६. हांक मारी, बोलावी. ७. मद्यसंयुक्त. ८. आदिपर्व–अध्याय ७६ श्लोक ५६ पहा. ९. अर्थात. हा मृगीचा दाखला मूळभारतांत नाहीं. १०. दुसरा. ११. निश्चयें. १२. ओंकार मंत्रादिकांचें बीजाक्षर इत्यादिकांसहित. १३. 'मृत्यूपासाव रक्षावें' असाही पाठभेद आहे.

ऐसें बोलोनि महासिद्धी । संजीवनी वोपिली. ॥ ९१ ॥ शुकदेवातें गर्भस्थानीं । उपदेश करी [1]चक्रपाणी, । कीं प्रऱ्हादातें नारदमुनी । देता झाला हरिमंत्र. ॥ ९२ ॥ तैसें संजीवनीविद्यामृता । शुक्र उपदेशी गर्भस्था, । जैसें ठेवणें आपुल्या आप्ता । विश्वासूनि दाविजे. ॥ ९३ ॥ [3]कीं हृदयस्थ शिष्य जवळा । मंत्रोपदेशें [4]वदनानळा । फुंकोनि उजळिला सोज्वळा । सिद्धमंत्रें दीपकु. ॥ ९४ ॥ पुसोनियां आज्ञाशब्दु । करोनि दक्षिणकुक्षीभेदु । बाहेर पातला जैसा इंदु । पूर्णिमेचा पैं जैसा. ॥९५॥ कुक्षीहूनि बाहेर येतां । [6]गुरु पावला निर्जीवावस्था, । शिष्यें स्मरोनि विद्यामृता । वदनवातें स्पर्शिला. ॥ ९६ ॥ उठोनि बैसला तत्काळीं । जैसा थापटिला करतळीं । निद्रात्यागें [8]स्मरणाचळीं । सावधान विराजे. ॥ ९७ ॥ तैसा संतुष्ट स्वस्थानीं । देखोनि गुरुपुत्र लागे चरणीं. । मग जोडोनि उभय [9]पाणी । स्तुतिवादें गर्जतु. ॥ ९८ ॥ 'त्रैलोक्यगुरुसमूहमेळीं । मध्यनायका! विश्वमौळी । गुरुत्व गौरव ब्रह्मांडगोळीं । तुजचि साजे एकातें. ॥९९॥ [10]द्वादशदृष्टांतीं गुरुत्वभेद । सविस्तर बोलती [11]ब्रह्मवृंद, । परि ते तुजसीं तुळितां अंध । जेंवि इंद्रासीं [12]उपमावे. ॥ १०० ॥ [13]अनुग्रहगुरु विचारगुरु, । [14]धातुवादी परीसगुरु । [15]कच्छपचंद्रचंदनगुरु । दर्पणगुरु आठवा. ॥ १०१ ॥ छायानिधी नादनिधी । क्रौंचपक्षिणीचिया बुद्धी । सूर्यकांतकार्पासविधी । द्वादश प्रकार जाणावे. ॥ १०२ ॥ एक अनुग्रहें श्रेष्ठ केला । एक विचारें अनुभवा आला । धातुवादी एक गोंविला । साधनाचे [16]कचाटीं. ॥ १०३ ॥ विळा अथवा राजखड्ग । न म्हणे [17]स्पर्शमणीचें आंग, । न धरी अधिकाराचा [18]पांग । तो परीस गुरु जाणावा. ॥ १०४ ॥ केवळ अवलोकनेसाठीं । कूर्मिच्या पुष्टीं पृष्टीं तुष्टी, । तैसे एक कृपादृष्टी । शिष्या करिती सुखरूप. ॥ १०५ ॥ सन्मुख देखतांचि जाण । चंद्र, चकोरा अमृतपान; । तैसें एकाचें दर्शन । होतां सर्वार्थ साधती. ॥ १०६ ॥ गांठ्याळ वेळू वेळुजाती, । चंदन तितुके वनस्पती, । तैसे कुटिल त्यजूनि संपत्ति । ब्रह्मस्वरूप गुरुसंगें. ॥ १०७ ॥ पाहे तयाचें

---

१. श्रीकृष्ण. २. 'उशना उपदेशी हृदयस्था' असाही पाठभेद आहे. ३. 'कीं गर्भस्थ शिष्य हृदयजवळा' असाही पाठभेद आहे. ४. वदन+अनळ=मुखाग्नि. ५. आदिपर्व–अध्याय ७६ श्लोक ६१ पहा. ६. उपदेष्टा शुक्राचार्य. ७. मरण. ८. स्मरणपर्वतावर. (अचल=पर्वत.) ९. हात. १०. गुरुत्वाचे बारा प्रकार. यांचीं नांवें आणि लक्षणें पुढें दिलीं आहेत. ११. ब्राह्मणांचा समूह. १२. तुळणा पावे. १३. शिष्यांस मंत्रदान करणारा गुरु. १४. धातुपरीक्षक. १५. कांसव. १६. साधण्याच्या चिंतेंत, खटपटींत. १७. परीसाचें. १८. तावा, ओशाळगत.

तया वदन । सन्मुख दावितें दर्पण, । तैसें एकाचें देखणेपण । पहातां वस्तु आं[1]तुडे. ॥ १०८ ॥ छायानिधी पक्षीया गगनीं । छाया स्पर्शे जयाचे मूर्ध्नीं[2] । तो होय भूपाळचूडामणी । ऐसा गुण तयाचा. ॥ १०९ ॥ तैसा एकाचा हस्तक । अवचट स्पर्शे जैं मस्तक । तरी फिटोनि जीवित्वकलंक[3] । शिवरूप[4] तो होय. ॥ ११० ॥ नादनिधी असे जेथें । धातूचा नाद पावे तेथें । अष्टलोह[5] सुवर्ण आंतें । हा चमत्कार तयाचा. ॥ १११ ॥ तैसी वार्ता दीनस्तवन । ऐकोन पुरे गुरूचे कान, । उपदेश न करितां जाण । सर्वार्थ सिद्धी रोकडी. ॥११२॥ करकोंचीपक्षीण[6] दुरी । पिलीं ठेविती गिरिकोठारीं । चारिया जाती द्वीपांतरीं । सहस्र एक योजनें; ॥ ११३ ॥ तेथोनि आठवितां अंतरीं । बाळकें जीवती अंडोदरीं, । तैसे एक दीनोद्धारीं । स्मरोनि देती सर्वार्थ. ॥ ११४ ॥ नाहीं कीरणींहूनि पडिला, । न दिसे सूर्यकांत स्रवला, । कापुसीं वन्ही प्रगटला । प्रत्यक्ष दिसे लोचनीं. ॥ ११५ ॥ तैसी निष्ठा न दिसे डोळां । शब्दज्ञानीं विताळ[7] भोळा । अनुग्रहितांचि तात्काळा । आत्मानुभव शिष्यातें. ॥ ११६॥ ऐसीं गुरूचीं बहु लक्षणें । त्यांत तूं आगळा[8] बहुतां गुणें । अमरांतें अमर करणें । हें सामर्थ्य तुजपासीं. ॥ ११७ ॥ धातुवादिया परिसातें । जितुलें अंतर बोलती ज्ञाते । गुरु म्हणवी तयांमाजी तूतें । तितुला पैंड[9] त्रैलोकीं. ॥ ११८ ॥ वैरागराचा[10] मुख्य मणी । अवचट[11] लगटे जैं पाषाणीं । तो हिरा होऊनि वैरभूषणीं[12] । मुगुटीं मिरवे नृपाचे, ॥ ११९ ॥ तैसें तुवां केलें मातें । आपुलें म्हणोनि सिंचितलें होतें । देवगुरु तृप्त झाले सरतें । हा प्रसाद चरणाचा. ॥ १२० ॥ स्वामी इंद्रादिकांचे मुगुट । माझे पायीं पादुका प्रगट । लेवविल्या त्याहूनि श्रेष्ठ । लाभ कोणता अनुवादों ? ॥ १२१ ॥ म्हणोनि न भजे गुरूच्या पाया । तो टाकून जाई नरकालया, । गुरुभक्त तो वेदत्रया । वंद्य होय निर्धारें.' ॥ १२२ ॥ ऐकोनि शिष्याचें बोलणें । भार्गवाचार्य संतुष्टमनें । आलिंगूनि आदरें म्हणे, । 'स्तुती कांहीं न बोलें. ॥ १२३ ॥ माझी हरिली मूर्छना[13] । ते मज पावली गुरुदक्षिणा[14] । एक भाव

१. मिळे, सांपडे. २. मस्तकीं. ३. जीविताचा डाग, जीवदशेंतून मुक्त होऊन शिवस्वरूप होतो. ४. 'विश्वरूप तो होय' असाही पाठ आहे. ५. अष्टलोहक=अष्टधातु. सुवर्ण, रौप्य, तांबें, वंग (कथील), पितळ, शिसें, लोखंड आणि तिखें या आठ धातूंचा समुदाय. 'सुवर्णं रजतं ताम्रं सीसकं कांतिकं तथा । वंगं लौहं तीक्ष्णलौहं लौहान्यष्टाविमानि तु ॥.' ६. क्रौंचपक्षीण. ७. तालरहित. ८. श्रेष्ठ. ९. निरख. १०. रत्नांची खाण. (वज्राकर.) ११. अकल्पित. १२. श्रेष्ठ अलंकारांत. १३. शुद्धिबुद्धि नाहीं अशी अवस्था. १४. विद्यासंपादन झाल्यावर शिष्य जी गुरुला दक्षिणा देतो ती.

अंतःकरणा । तेथें स्तवन वांउगें. ॥ १२४ ॥ परमदुष्टा दानवजाती । मद्यपानें पाडोनि भ्रांती । ब्रह्महत्या माझे हातीं । बलात्कारें करविली. ॥ १२५ ॥ तेणें रोषें हे दुर्जन । विष्णुहस्तें पावती मरण.' । तैसेच शापूनि मद्यपान । वर्ज केलें ब्राह्मणा. ॥ १२६ ॥ 'आजिपासोनि सुरापान । जो कोणी करील ब्राह्मण, । तो त्रैलोकीं निंद्य जाण । नरकवास परलोकीं. ॥ १२७ ॥ धरूनि आगमाचें बळ, । मानूनि ईश्वरवाक्य प्रबळ, । मद्यपान करितां वैरळ । हानि पावे सर्वस्वें.' ॥ १२८॥ तेचि मर्यादा लोकीं तिहीं[6] । अद्यापि चालतसे पाहीं; । हरिहराची प्राप्ती नाहीं । भंगावया शुक्राज्ञा. ॥ १२९॥ याची प्रतीति रोकडी जाणा । झांकोनि करिती मद्यपाना । ठाउकें होतां सर्वजना । वाळींत पडे सर्वस्वें. ॥ १३० ॥ यावरी संतोषोनि म्हणत, । 'सहस्र वर्षें चालिलें व्रत, । आतां स्वस्थळा जाऊनि त्वरित । श्रम आपुला परिहारीं'. ॥ १३१ ॥ 'महाप्रसाद' म्हणोनि गुणी । मस्तक ठेविला श्रीगुरुचरणीं; । नमस्कारिली आचार्यपत्नी । देवयानीसमवेत. ॥ १३२ ॥ प्रयाण करितिये अवसरीं । देवयानीनें धरिला करीं, । म्हणे, 'द्विवार वधिला निशाचरीं । पुनर्जन्म माझेनी. ॥ १३३ ॥ युक्ती बोधोनि आचार्या । जीवविलासी यया कार्या, । जे त्वां मज करोनि भार्या । प्रिय होवोनि असावें. ॥ १३४ ॥ कुळ रूप विद्या गुणी । तुजसारिखा न दिसे कोणी. । माझेनि पाडें चतुर रमणी । दुसरी कोणी दावीं पां. ॥ १३५ ॥ यालागीं सांडोनि संदेहो । होवोनि माझा प्राणनाहो । साह्य आचार्याचा स्नेहो । विशेष करील वाढता.' ॥ १३६ ॥ कच विनवी देवयानी, । 'बोलसी ते अघटित वाणी; । तुझा माझा एक स्थानीं । वास झाला जाणसी. ॥ १३७ ॥ जिये उदरीं तुझा वास । तेथेंचि माझा रहिवास, । पिता गुरु देव ईश । आम्हां तुम्हां एकची. ॥ १३८ ॥ तुम्हीं आम्हीं एकोदर । बंधुभगिनी सहोदर, । यालागीं बोलसी तें उत्तर । कानीं कैसें ऐकावें? ॥ १३९ ॥ मज बोळवीं[16] कृपाकरूनी, । तुज

१. उगाच, व्यर्थ. २. विप्रघात. ३. शास्त्राचें. ४. मद्यादिकानें बेशुद्ध होऊन अविचारानें मनस्वी बोलणें. ५. 'अधःपतन पावती' असाही पाठ आहे. ६. स्वर्गमृत्युपातालीं. ७. शक्ति. ८. अनुभव. ९. बहिष्कार. १०. हिचें नांव जयंती, ही इंद्राची कन्या. ११. असुरांनीं. १२. पाणिग्रहणरूप कार्या. १३. माझ्या बरोबरीची. १४. पति. १५. आदिपर्व–अध्याय ७७ श्लोक १३ पहा. १६. परत जाण्याला निरोप दे, बिदागी कर.

मी शुक्रासमान मानीं'. । क्षोभोनि बोले देवयानी, । 'शठा! नष्टा ! कृतघ्ना ! ॥ १४० ॥ उपेक्षूनि जासी मातें । तरी संजीवनी नं फळे तूतें, । मंत्रबीजें होती व्यर्थें । हा निश्चय जाण पां'. ॥ १४१ ॥ कच म्हणे, 'वो गुरुनंदिनी ! । न्याय बोलतां तमोगुणी । अविचारें कठीण वाणी । जल्पसी हा अधर्म. ॥१४२॥ जे बोलसी शापवचनें । ते घेई आपले शब्द उसणें, । तुझा देह हा द्वितीयवर्णें[2] । भोगिजेल निर्धारें. ॥ १४३ ॥ तूतें न वरील ब्राह्मण श्रोत्री, । वरील सोमवंशींचा क्षत्री, । विशेष कोपूं तरी गुरुपुत्री । यालागीं कांहीं न बोलें. ॥ १४४ ॥ म्हणसी विद्या न फळे तूतें, । फळेल उपदेशीन त्यातें; । जैसा परीस वेधूनि धातूतें । पालन करी जगाचें.' ॥ १४५ ॥ ऐसें बोलोन शीघ्रगती । पातला देवलोकाप्रती. । नमस्कारिला बृहस्पति । देवगुरु निजपिता. ॥ १४६ ॥ विचार जाणीतला जनकें, । म्हणे, 'न करीं आशंके, । अमरां उपदेशीं सुखें । विद्या फळेल तात्काळीं.' ॥ १४७ ॥ तातआज्ञेनें संजीवनी । विस्तारितां सुमनमनीं[3] । बिंबली जैसी सुदर्पणीं[4] । रूपछाया प्रत्यक्षें. ॥ १४८ ॥ तेवेळीं जयजयकारशब्दीं । देवदुंदुभीच्या नादीं । कच पूजिला विबुधीं[5] । सिद्धी साधली म्हणोनी. ॥ १४९ ॥ दिव्यांबरीं[6] दिव्य सुमनीं[7] । आदरें कनकसिंहासनीं । अभिषेकिला दिव्यरत्नीं । दिव्यगंधें चर्चित. ॥ १५० ॥ प्राप्त झाला विजयकाळ । ऐसें भावोनि अमरपाळ[8] । निघता झाला रणकल्लोळ । करावया दैत्यांचा. ॥ १५१ ॥ इति श्रीआदिपर्व भारत । कचोपाख्यान अपूर्वार्थ । मुक्तेश्वरकविविरचित । देशभाषाप्रबंधें. ॥ १५२ ॥ तें परिसावें कविपंडितीं, । न्यून तें पूर्ण करावें श्रोतीं, । जैसें दुर्बळाचें प्रहस्तीं । समर्थें वेंची हातींचें. ॥ १५३ ॥

अध्याय अठरावा.

साधिल्या संजीवनीसिद्धी । परमआल्हाद मानूनि विबुधीं[9] । निघते झाले महांमांदी[10] । त्रासावया असुरांची. ॥ १ ॥ तये मार्गीं रमणीक वन । चैत्ररथ[11]-

---

१. आदिपर्व—अध्याय ७७ श्लोक १६ पहा. फलद्रूप होणार नाहीं. २. क्षत्रियें. ३. अमरांच्या मनांत. (सुमन=देव.) ४. चांगल्या आरशांत. ५. देवांनीं ६. वस्त्रें. ७. पुष्पें. ८. इंद्र. ९. देवांनीं. १०. मोठी मंडळी, मोठा जमाव. ११. कुबेराच्या बागेशीं समान.

वनातुल्य गहन. । त्यामाजी सरोवर विस्तीर्ण । [१]मानससरोवरासारिखें. ॥ २ ॥ [२]सहस्रदळीं नव [३]फुल्लारें । विकासलीं, तेथें झंकारें । [४]रोलंब गाती आदरें । पिक मराळ परिसती. ॥ ३ ॥ तेथें सहस्र मृगलोचना । चंपकगौरा नवयौवना । [५]तीरीं ठेवोनि वस्त्रभूषणा । जळीं खेळती विवस्त्रा. ॥ ४ ॥ दहा शतें [६]परिचारिका । त्यांमाजी [७]शर्मिष्ठा मुख्य नायिका, । देवयानी लावण्यलतिका । [८]प्रणयेंसीं जवळिके. ॥ ५ ॥ फळीं कमळीं येरायेरीं । जळ शिंपिती परस्परीं, । गाती गर्जती सरोवरीं । दि[९]व्याप्सरा जैसिया. ॥ ६ ॥ हें देखोनि [१०]अमरपाळ । विनोदार्थ पाठवी [११]अनिळ, । तेणें भ्रमोनि वस्त्रमेळ । गुंडाळिला एकत्र. ॥ ७ ॥ दूरी परिसोनि पुरुषवाणी । तटा धाविन्नल्या कामिनी । वस्त्रें वेढितां घाबरेपणीं । फेरावल्या लगबगा. ॥ ८ ॥ शर्मिष्ठेचें दिव्य [१२]अंशुक । [१३]भार्गवीनें वेढिलें देख । देवयानीचा [१४]क्षीरोदक । राजकन्या नेसली. ॥ ९ ॥ दूरी गेलिया अमरगण । पुढती होवोनि सावधान । आपुलालें वोळखून । घेत्या झाल्या समस्तीं. ॥ १० ॥ भार्गवी बोले क्रोधनेत्री, । 'शिष्यपूजकाचिये पुत्री! । पवित्रेचें वस्त्र [१५]अपवित्री! । नेसलीस अविचारें. ॥ ११ ॥ पितृभाग्यें चढलीस मदा, । उल्लंघिली धर्ममर्यादा, । येणें दोषें श्रेष्ठपदा- । पासोनि चळसी उद्धते ! ॥ १२ ॥ माझ्या पित्याचें आज्ञोदक । प्राशूनि [१६]जीतसे तुझा जनक, । राज्यपदाची हे भीक । शुक्रें कृपेनें वोपिली.' ॥ १३ ॥ ऐकोनि कोपली नरेंद्रतनुजा, । म्हणे, 'तूं भिक्षुकाची [१७]आत्मजा; । पोषकातें [१८]हेळसितां लज्जा । पोष्य कैसी पावेना ? ॥१४॥ अयोग्य वित्पन्नासीं तंडे, । निशस्त्री शस्त्रधरासीं भिडे, । दातयासीं मागते तोंडें । थोरींव बोले आपुली. ॥ १५ ॥ अवलोकितां लोकीं तिहीं । मागण्यापरतें हीनत्व नाहीं; । तोचि जीवनोपाव पाहीं । [१९]रौरवातुल्य

---

१. हें सरोवर हिमालय पर्वताच्या गंधमादन नामक शिखराच्या उत्तरेस आहे. २. कमळें. ३. पुष्पें. ४. भ्रमर. ५. 'तीरीं फेडोनि वस्त्राभरणा' असाही पाठ आहे. ६. दासी. ७. ही वृषपर्वा दानवाची कन्या. ही दास्य पत्करुन देवयानीसमागमें ययातिराजाकडे गेली होती. ८. 'प्राणसखी जवळिके' असाही पाठ आहे. ९. गंधर्वांगना. १०. इंद्र. ११. वायु. १२. वस्त्र. १३. गुरुकन्येनें. १४. पांढरें पातळ. १५. आदिपर्व–अध्याय ७८ श्लोक ८ पहा. १६. वांचत आहे. १७. आदिपर्व–अध्याय ७८ श्लोक ११ पहा. १८. तुच्छ मानितां, हेळणा करतां. १९. नरकासमान.

याचका. ॥ १६ ॥ चौदा विद्या, चौसष्ट कळा, । चातुर्य ज्ञानें गुणागळा । मागों जातां गोळांगुळा- । प्राय भासे परगृहीं. ॥ १७ ॥ जैसीं आदित्याचीं झाडें । सन्मुख खोलती सूर्याकडे, । कीं पत्रें पसरलीं येरंडें । आवरूं नेणे सर्वथा. ॥ १८ ॥ तैसा दातयासन्मुख । सदा पसरिला हस्तक, । नाना अवज्ञेचें दुःख । तो विभाग तयाचा. ॥ १९ ॥ निरंतर राहोनियां नगरीं । अहोरात्र वर्णना करी । उभा वोळगे जोडल्या करीं, । शुक्राचार्य आसुतें. ॥२०॥ तया भिक्षुकाची कुमरी । मज श्रेष्ठेसी बोलसी थोरी, । आपुल्या दोषां जीवीं करीं । दंड पावसी कुबुद्धे !' ॥ २१ ॥ म्हणोनि दासीचिया हातीं । पृष्ठीं मर्दिली मुष्टिघातीं, । कूपीं सांडोनि समस्तीं । जाल्या झाल्या स्वस्थाना. ॥ २२ ॥ भार्गवी निमाल्या विशेष । ऐसा मानूनि संतोष । दानवी शांतऊनि रोष । राजगृहीं प्रवेशे. ॥ २३ ॥ तेचि काळीं तेचि क्षणीं । वेधोनि पारधीच्या व्य-

---

१. चौदा विद्या=४ वेद (ऋग्, साम, यजुष् आणि अथर्वन्) + ६ अंगें (छंद, सूत्र, ज्योतिष्, निरुक्त, शिक्षा आणि व्याकरण) + पुराणें (ब्राह्म, पाद्म, वैष्णव, शैव, लैंग, गारुड, नारदीय, भागवत, आग्नेय, स्कांद, भविष्य, ब्रह्मवैवर्त, मार्कंडेय, वामन, वाराह, मात्स्य, कौर्म आणि ब्रह्मांड) + न्यायशास्त्र + पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा + धर्मशास्त्र (गृह्यसूत्रें व मन्वादि स्मृति). चौसष्ट कलांचीं नांवें–१ अभिधानकोश, २ अक्षरमुष्टिकाकथन, ३ आकारज्ञान, ४ आकर्षकक्रीडा, ५ आलेख्य, ६ उत्साहन, ७ उदकघात, ८ उदकवाद्य, ९ ऐंद्रजाल, १० काव्यसमस्यापूरण, ११ कर्णपत्रभंग, १२ केशमार्जनकौशल, १३ क्रियाविकल्प, १४ क्रौंचमारणयोग, १५ गंधयुक्ति, १६ गीत, १७ चित्रयोग, १८ चित्रशाकापूपभक्तविकारक्रिया, १९ छंदोज्ञान, २० छलितयोग, २१ तंदुलकुसुमबलिप्रकार, २२ तर्ककर्म, २३ तक्षण, २४ दशनवसनांगराग, २५ दुर्वचकयोग, २६ देशभाषाज्ञान, २७ द्यूतविशेष, २८ धातुवाद, २९ नाटकाख्यायिकादर्शन, ३० नाट्य, ३१ नृत्य, ३२ नेपथ्ययोग, ३३ पट्टिकावेत्रबाणविकल्प, ३४ पानकरसरागासवयोजना, ३५ पुष्पवाटिकानिमित्तज्ञान, ३६ पुष्पास्तरण, ३७ पुस्तकवाचन, ३८ प्रतिमाला, ३९ प्रहेलिकाकूटवाणी ज्ञान, ४०, बालक्रीडन, ४१, भूषणयोग, ४२ मणिभूमिकाकर्म, ४३ मणिरागज्ञान, ४४ मानसी काव्यक्रिया, ४५ माल्यग्रथनविकल्प, ४६ मेषकुक्कुटलावकयुद्धविधि, ४७ म्लेंच्छितकविकल्प, ४८ यंत्रमातृकाधारणामातृकासंवाय, ४९ रौप्यरत्नपरीक्षा, ५० वस्त्रगोपन, ५१ वाद्य, ५२ वास्तु, ५३ विशेषकच्छेद्य, ५४ वीणाडमरुवाद्य, ५५ वृक्षायुर्वेदयोग, ५६ वैजयिकविद्याज्ञान, ५७ वैतालिकविद्यादान, ५८ वैनायिकविद्यादान, ५९ शयनरचना, ६० शुकसारिकाप्रलापन, ६१ शेखरापीडयोजना, ६२ सूचीवानकर्म, ६३ सूत्रक्रीडा आणि ६४ हस्तलाघव. हीं कलांचीं नांवें श्रीमद्भागवत–दशमस्कंध–अध्याय ४५ श्लोक ३६ याच्या टीकेंत दिलीं आहेत. तसेंच श्रीवात्स्यायनप्रणीत 'कामसूत्र' नामक ग्रंथाच्या प्रथम अधिकरणाच्या 'विद्यासमुद्देश' नामक तृतीय अध्यायांत सविस्तर दिलीं आहेत. २. वानरजातिविशेष.

सनीं । ययाती पातला त्या वनीं । अश्वारूढ एकाकी. ॥ २४ ॥ धांवतां दळभार[1] अंतरला, । क्षुधेतृषेनें अति श्रांतला, । उदक शोधीत पातला । तेचि कूपाजवळिकें. ॥ २५ ॥ तंव त्यामाजी स्वल्पोदकीं । रूपें इंदिरेसारिखी[2] । आर्द्रकेश चीरकंचुकी । म्लानमुखी एकवस्त्रा ॥ २६ ॥ दीर्घस्वरें करी रुदन,। क्रोधें संतप्त उभयनयन; । रायें देऊनि आश्वासन । पुसता झाला सौक्षेपें[3]. ॥ २७ ॥ 'तूं तंव कवणाची कुळनंदिनी ? । कुमारी किंवा सुवासिनी[4] ? । येथें पडलीस कोणे व्यसनीं ? । खेद करिसी किमर्थ?' ॥ २८ ॥ ते म्हणे, 'देवेंद्रवज्रघातें । दैत्य दानव ग्रासितां मृत्यें । त्यांस जो जीववी निजसामर्थ्यें । शुक्राचार्य जाणसी. ॥ २९ ॥ त्याची कन्या मी गोरटी[5], । झणी पहासी सामान्यदृष्टी, । अमित्रीनें[6] ये संकटीं । मारावया लोटिलें. ॥ ३० ॥ आतां कनकाब्जनालाकृती[7] । माझा हस्त धरूनि हातीं । कूपांतूनि कृपामूर्ति ! । मज बाहेर काढावें. ॥ ३१ ॥ कुलीन शांत वीर्यवंत । यशस्वी[8] राजा जगविख्यात । माझा स्पर्शावया हात । योग्य होसी निर्धारें[9]'. ॥ ३२ ॥ राय चोजावला[10] वचनीं, । म्हणे, 'हे जातीची ब्राह्मणी' । मग आपुला सव्यपाणी[11] । देता झाला आदरें. ॥ ३३ ॥ करतळरातोत्पळ[12] सुरंग । नखें पांचही पद्मराग[13] । सुकुमारपणें भूपतिभृंग । धरूनि झेली वरौतें. ॥ ३४ ॥ निक्षेप[14] काढिजे पायाळें, । सिद्धी साधिजे योगकुशळें, । तैसी कूपींहूनि स्नेहाळें । ब्राह्मणकन्या उद्धरिली. ॥ ३५ ॥ मग म्हणे, 'जाय तातसदना, । स्नेह वसों दे अंतःकरणा.' । येरी म्हणे, 'मनवासना । पूर्ण करिता ईश्वरू'. ॥ ३६ ॥ स्वस्थळा गेलिया राजोत्तम । भार्गवी[15] प्रवेशे असुरग्राम[16]; । बाह्यप्रदेशीं अशोकद्रुम- । तळीं बैसे सशोक. ॥ ३७ ॥ तेथोनि घूर्णिका[17] साक्षेपें । समीप पाचारिली निरोपें, । तीप्रती सांगोनि प्रलापें । शर्मिष्ठेचें दुष्कृत. ॥ ३८ ॥ म्हणे, 'घूर्णिके ! त्वरायुक्त । पितया जाणवीं वृत्तांत[18], । सांडोनि असुरांची संगत । आतांचि येथून निघावें. ॥ ३९ ॥ त्यजूनि दुष्टाची संगती । सुखें वसवीं अमरावती[19] । शिष्य करोनि अमरपती । सत्वमूर्ती धर्मात्मा. ॥ ४० ॥ ऐसा निरोप जाणवीं जनका.' । सखेद धांविन्नली

---

१. सैन्यसमूह. २. लक्ष्मीसारखी. ३. अगत्यानें. ४. तरुणदशेस आलेली विवाहित स्त्री. ५. सुंदरांगी. ६. दुष्ट शर्मिष्ठेनें. ७. सुवर्णकमळाच्या नालासारखी सरळ आकृति ज्याची असा (हस्त). ८. आदिपर्व–अध्याय ८७ श्लोक २१–२२ पहा. ९. निश्चयें. १०. कौतुकाकुल झाला. ११. डावा हात. १२. कमळ. १३. रत्नविशेष. १४. ठेव, पुरलेलें द्रव्य. १५. देवयानी. १६. वृषपर्व्याचें नगर. १७. दासीविशेष. १८. आदिपर्व–अध्याय ७८ श्लोक २५ पहा. १९. इंद्राची राजधानी

घूर्णिका; । [१]दुश्चित सांगे कविनायका, । 'कन्या मरोनि वांचली. ॥ ४१ ॥ राजकुमरीनें नेऊनि वना । दुष्टवचनीं करोनि छळणा । [२]सेखीं घ्यावयालागीं प्राणा । अपाय केला निष्ठुरीं. ॥ ४२ ॥ ताडण करूनि परहस्तें । सांडिलें वनकूपा[३]आंतौतें, । दैवयोगें वांचली, तूतें । पाहों इच्छी येकाळीं.' ॥ ४३ ॥ ऐकोनि पिता सद्गदकंठीं । धांवोनि पातला कन्यानिकटीं । झोंबोनि येरयेरा कंठीं । शोक करी आक्रोशें. ॥ ४४ ॥ स्नेहें कवळोनि पोटिसीं । शुक्र शांतवी आत्मजेसीं, । म्हणे, 'वत्से ! बोल मजसीं, । खेद सांडीं सात्विके !' ॥४५॥ वनीं शर्मिष्ठेनें ताडिलें । घोरकूपीं [४]निक्षेपिलें, । [५]नहुषपुत्रें मोचन केलें । जाणवलें तें मजलागीं'. ॥ ४६ ॥ देवयानी म्हणे, 'ताता ! । नाहीं प्राणवधाची व्यथा; । दुरुक्तीचा संताप चित्ता । सहावेना मजलागीं. ॥ ४७ ॥ [६]बहुकाळींचा मित्रसंबंधु । तोडी एक [७]वोखटा शब्दु, । जैसा कांजीचा स्वल्प बिंदु । घटचि नाशी दुग्धाचा. ॥ ४८ ॥ नाना तपाचिया जोडी । स्वल्प कामना नासती [८]कोडी, । परगृहीं [९]षड्रसांची गोडी । दवडी एक [१०]हेळणा. ॥ ४९ ॥ ज्वर वन्ही ग्रीष्मातप । याचा ऊष्मा अत्यंत स्वल्प, । त्याहूनि बोलाचा संताप । [११]आगळा ऐसा मज वाटे. ॥ ५० ॥ हृदयीं तप्त लोहाचें सळ । साहों येईल चिरकाळ, । परी दुष्टशब्दाची जळजळ । मरणांतींही शमेना. ॥ ५१ ॥ सोनें अथवा हस्त चरण । मोडिल्या, सांधिती विचक्षण; । फुटलें मोतीं, तुटलें मन, । सांधूं न शके [१२]विधाता. ॥ ५२ ॥ जो तूं विश्वांत अग्रगण्य । विद्येनें जिंकिसी [१२]चतुरानन । त्या तुज बोलली वचन । असुरघरींचा [१३]मागता. ॥ ५३ ॥ स्तवन करिता आणि याचिता, । नित्य परान्नें तनु पाळिता, । तया भिक्षुकाची दुहिता । परम हीन याचकी. ॥ ५४ ॥ हेंचि असेल जरी यथार्थें । तरी मी प्रसन्न करीन तीतें, । [१४]गृहीं जाऊनि कोपातें । शांतवीन सर्वस्वें. ॥ ५५ ॥ आतां यातें त्यजूनि देवा । शिष्य कीजे श्रेष्ठ [१५]मघवा; । हें तुज न माने तरि या जीवा । घात करीन तात्काळीं.' ॥ ५६ ॥ उशना म्हणे, 'ऐक माते ! । दैत्य दानव स्तविती ज्यातें, । संकटीं मागती जीवदानातें । दीन होऊनि ज्यापाशीं, ॥ ५७ ॥ त्रैलोकींचें वैभव जितुकें । तें जयाचे निज [१६]निष्टंकें, । ज्याच्या सामर्थ्यासीं [१७]तुके ।

---

१. दुश्चरित्र, अयोग्य वर्तन. २. शेवटीं. ३. आंत. ४. लोटिलें. ५. ययातीनें. ६. ओंव्या ४८–५२ ह्या सुभाषितांत गणण्यालायक आहेत. ७. वाईट. ८. कोटी. ९. आम्ल तिक्त मधुर इत्यादि सह रसांची. १०. अवमानना. ११. अधिक. १२. ब्रह्मदेव. १३. याचक. १४. 'शरण जाऊनि कोपातें' असाही पाठ आहे. १५. इंद्र. १६. अव्याहत, निरंतर, सर्वस्वी. १७. तुलना करी.

ऐसा नाहीं ब्रह्मांडीं. ॥ ५८ ॥ ज्याचे जळदानें[1] मेघवृष्टी । जीवनोपाय जीवसृष्टी । स्वाहास्वधाकारें तुष्टी । देव पावती समस्त, ॥ ५९ ॥ तया समर्थाची कुमरी । क्लेश न मनीं हीनोत्तरीं, । सकळ दातयांच्या शिरीं । मिरवे माझी पादुका. ॥ ६० ॥ स्तवनीं मागण्याचा कळंक । तुझे अंगीं नलगे देख, । बोलिली ते केवळ मूर्ख । नेणोनियां गुरुमहिमा. ॥ ६१ ॥ नीच बोले नीचवचनें । तेणेंचि लघुत्व पाविजे गा ! जाणे । हें परिसोनि विचक्षणें । खेद कांहीं न मानावा. ॥ ६२ ॥ माझिया प्रतापाची कळा । प्रचीत[2] दावीन याचि काळा; । परी त्वां क्रोधाग्नीची ज्वाळा । शांत कीजे मानसीं. ॥ ६३ ॥ क्रोधें[3] आधीवीण[4] आधी, । क्रोध तोची महाव्याधी, । क्रोधें सूदले अप्रमादी । सारासार जाणते. ॥ ६४ ॥ क्रोध तोचि अपस्मार, । क्रोध तोचि भूतसंचार, । क्रोधें कीजे पिशाच नर । परमचतुर विवेकी. ॥ ६५ ॥ उणें बोलतां उणिया । तें क्षमेनें साहती शाहणिया, । त्रैलोक्यसंपत्ती राणिया । भोक्ता होय तो एक.' ॥ ६६ ॥ यापरी शांतऊनि दुहिते । क्रोधा घेऊनि सांगाते । शुक्र पावला आस्थानीतें[5] । दानवेंद्र जेठायीं. ॥ ६७ ॥ दृष्टी न घालूनि प्रत्युत्थानीं, । न बैसोनि पूज्यासनीं, । उभाउभीं जोडोनि पाणी । आज्ञा मागे सखेद. ॥६८॥ म्हणे, 'तुम्ही दैत्य दानव । मजविण भोगा सुखें रांणीव[6], । ऋणानुबंध पुरला, दैव । उणें वाटे उभयतां.॥६९॥ प्रारब्ध नेईल तेथें जाणें, । ईश्वर ठेविल तेथें राहणें, । सांडूनि अवमानाची धनें । महत्वलाभें तोषिजे. ॥ ७० ॥ नलगे अवज्ञेचा[7] पावो । तंवचि आसनीं सेविजे रावो, । सोसोनि मानहानीचा घावो । लाभ इच्छी तो मूर्ख.' ॥ ७१ ॥ ऐकोनि आचार्याची गोष्टी । असुरीं कल्पांत भाविला[8] सृष्टीं; । एक मस्तक घालिती पोटीं, । एक झोंबती चरणातें. ॥ ७२ ॥ वृषपर्वा म्हणे, 'देवा ! । अपराध कवण तो सांगावा ? । तुवां त्यागिल्या आम्हां सर्वां । मरण रोकडें येकाळीं. ॥ ७३ ॥ तुझेनि बळें ब्राह्मणोत्तमा! । तोडरीं रेखिली शक्रप्रतिमा, । विष्णुप्रताप अचाट गरिमा । तृणप्राय आमुतें. ॥ ७४ ॥ पाककर्तेनीं सूदलें[9] विश्व, । मातेनें आपटिलें बाळक, । रायें पुरी सांडितां रंक । तेथें प्रयत्न कायसा ? ॥ ७५ ॥ दुकाळीं भंणगा[10] दवडी दाता । श्रीगुरु लावी अधर्मपंथा । रक्षक प्रवर्ते निघाता । तेथें प्रयत्न कायसा ? ॥ ७६ ॥ तेंवि त्वां आम्हां अव्हेरिलें, । याचि नांवें मृत्या निरविलें, । व्याघ्रवनीं जैसें त्यजिलें । गोरक्षकें धेनूतें.

---

१. आदिपर्व–अध्याय ७८ श्लोक ४० पहा. २. प्रत्यय, प्रतीति. ३. ओंव्या ६४–६५ या सुभाषितांत गणण्यालायक आहेत. ४. मनोव्यथा. ५.स्थानातें ६. राज्य.७. अपमान. ८. मानिला. ९. वाढिलें. १०. भिकारी.

॥ ७७ ॥ अथवा अपराध होय विदित । तरीं आचरों देहांत प्रायश्चित्त, । समुद्रमज्जन पर्वतपात । कां पावकीं प्रवेशों ?' ॥ ७८ ॥ शुक्र म्हणे, 'आश्रितजनीं । पुत्र कन्या बंधु पत्नी । यांचें न्यून प्रभूचे कर्णीं । घालणें हें अनुचित. ॥ ७९ ॥ तथापि न सांगतां न कळे । यालागीं बोलिजे येणेकाळें, । शर्मिष्ठेनें माझिये बाळे । घात केला काननीं. ॥ ८० ॥ छळूनि नाना दुष्टवचनीं । ताडोनि सांडिली कूपजीवनीं, । दैवें वांचविली ते सदनीं । न प्रवेशे वनस्था. ॥ ८१ ॥ सांडो सांगे तुझा संग । नातरी करील प्राणत्याग, । या परिहारा उपाय चांग । माझिये दृष्टी दिसेना'. ॥ ८२ ॥ दानव म्हणे, 'आचार्यदेवा ! । शर्मिष्ठेचा कितुला केवा ? । दंड कवण तो नेमावा । मी करीन स्वहस्तें. ॥ ८३ ॥ त्यागीन, वधीन, अथवा आन । देवयानीस देईन दान; । इतुकियासाठीं आपुलें मन । सखेद कांहीं न करावें. ॥ ८४ ॥ कृपापीयूषमहोदधीतें । क्रोधविषोदकाचें भरितें । पातलें हें माझेनि चित्तें । अतिआश्चर्य मानिजे. ॥ ८५ ॥ देवयानी तुझें बाळ, । सांग कवणाचीं आम्हीं सकळ ? । धेनुसरिसे वत्समेळ । तेंवि येऊं तुजसंगें. ॥ ८६ ॥ देवयानीचा अपमान । झालिया संतप्त करिसी मन । देवीं आमुतें केलिया दीन । तोही अवमान तुझाची. ॥ ८७ ॥ शांतिपीयूषरसाचें पात्र । तुझें हृदयीं अतिपवित्र, । तेथें क्रोधश्वान अपवित्र । स्पर्शों नेदी सर्वथा.' ॥ ८८ ॥ म्हणोनि मस्तक ठेविला चरणीं, । 'क्षमा' न म्हणतां तुचली मूर्ध्नी, । शुक्रें स्पर्शोनियां पाणी । म्हणे, 'ऐका विचार. ॥८९॥ तुम्हीं जावोनियां वनीं । प्रसन्न कीजे देवयानी; । ते बोलेल्या माझे मनीं । सहजचि कांहीं असेना.' ॥ ९० ॥ दैत्येंद्र शुक्रासहित । समुदायेंसीं पातला तेथ; । श्रीपर्वता येती भक्त । जेंवि भ्रमरी दर्शना. ॥ ९१ ॥ राजा आणि असुरगण । धरिती देवयानीचे चरण; । म्हणती, 'कृपेनें अवलोकन । करीं आमुतें जननिये! ॥ ९२ ॥ काय आवडे तें सांग, । देवां दुर्लभ तेंही माग, । पुरवूं न शकों, तैं आग । लागों आमुच्या पुरुषार्था. ॥ ९३ ॥ आमुची संपदा असे जितुकी । तितुकी शुक्रातें वोपितों कीं, । अन्यथा असे तरी पादुकीं । दिव्य तुझे त्रिवाचा'. ॥ ९४ ॥ देवयानी म्हणे, 'त्वरित । बोलसी तें जरी यथार्थ । तरी गा ! सहस्रदासींसहित । दासी माझी शर्मिष्ठा ॥ ९५ ॥ क-

१. विहीरींतील उदकांत. २. केवढा. ३. पाड, मोठेपणा, पर्वा. ४. अमृत. ५. प्रसन्न झाल्या, वळली असतां. ६. श्रीशैल. येथें मल्लिकार्जुन नांवाचें ज्योतिर्लिंग आहे. ७. शपथ.

रूनि देईं माझे करीं, । पिता वोपील जयाचे घरीं । तेथें होवोनि किंकरी । सेवार्थ यावें मजसवें. ॥ ९६ ॥ इतुकें करूनि दाविल्या येथ । माझा क्रोध होईल शांत; । तुमचें ऐश्वर्य तें यथार्थ । तैंचि घडो शुक्रालागीं'. ॥ ९७ ॥ ऐकूनि गुरुकन्येचें वचन । राजा झाला सुप्रसन्न, । पाठऊनि शिबिकायान । कन्या तेथें आणविली. ॥ ९८ ॥ धाया म्हणे, 'नृपबाळिके ! । स्वकुळउद्यानवनवापिके ! । तुज देऊनि तुझ्या जनकें । प्रसन्न केली गुरुकन्या.' ॥ ९९ ॥ येरी म्हणे, 'याहीपरता । श्रेष्ठ लाभ तो कोण आतां ? । मज देऊनि माझा पिता । अक्षयी असो स्वजनेंसीं'. ॥ १०० ॥ रायें हातीं धरूनि कुमरी । वोपिली देवयानीचे करीं । म्हणे, 'सहित दासीसहस्त्रीं । दासी तुझी शर्मिष्ठा. ॥ १०१ ॥ पिता लाऊनियां लग्न । तूतें वोपील ज्यालागुन । तेथें ही येईल जाण । सेवेलागीं सांगातें. ॥ १०२ ॥ सहित सहस्त्र परिचारिका । तूतें वोपिली कुळबालिका । अन्यथा वचन माझें देखा । करूं न शके विरिंची.' ॥ १०३ ॥ म्हणोनि चरणीं ठेविला माथा । 'क्रोध सांडीं' म्हणे आतां । हांसोनियां ब्राह्मणदुहिता । संतोषली बहुसाल. ॥ १०४ ॥ शर्मिष्ठेसहित देवयानी । प्रवेशली तातसदनीं । दैत्य आपुले निकेतनीं । वसते झाले संतोषें. ॥ १०५ ॥ यावरी क्रमिला किंचित् काळ । घेऊनि सहस्त्रदासींचा मेळ, । इच्छूनि वनक्रीडेचा खेळ । देवयानी निघाली. ॥ १०६ ॥ पुढती पातली त्याचि वना । तेथें प्रारब्धयोगें जाणा । वेधोनि पारधीच्या व्यसना । ययाती राजा पातला. ॥ १०७ ॥ आम्रवनीं सुशीतळें । बैसका घातली कमळदळें, । भक्ष्य भोज्य नानाफळें । घेती देती भक्षिती. ॥ १०८ ॥ कनकलतिका रत्नसुवर्णीं । माजी क्रीडती दोघी हंसिणी । कीं रिद्धिसिद्धीमाजी स्वामिणी । उमा रमा जैसिया. ॥ १०९ ॥ तैसिया सहस्त्र लावण्यखाणी । त्यामाजी दोघी मुखरणी । शर्मिष्ठा आणी देवयानी । सर्वगुणीं आगळिया. ॥ ११० ॥ सुकुमार देवयानीचे चरण । असुरी हातें करी संवाहन, । नाना उपचार चामरव्यजन । बहुतजणी वारिती. ॥ १११ ॥ मृगापाठीं धांवतां रावो । तृषेनें अंतरीं दाविला भावो । म्हणोनि जळार्थी होऊनि ठावो । शोधीत तेथें पातला.

---

१. आदिपर्व—अध्याय ८० श्लोक १६ पहा. २. धात्री. ३. दासी. ४. ब्रह्मदेव. ५. पुष्कळ. ६. गृहीं. ७. मृगयेच्या नादीं लागून. ८. बैठका. ९. आदिपर्व—अध्याय ८१ श्लोक ३८—८४ पहा. १०. प्रमुख, श्रेष्ठ. ११. शर्मिष्ठा. १२. मर्दन. १३. चंवरी. १४. ययाति.

॥ ११२ ॥ लता अंतरें राहोनि उभा । पाहे कामिनीकदंबशोभा[1] । दृष्टी गुंतली दर्शनलोभा । ते मावारी परतेना. ॥ ११३ ॥ मग म्हणे, 'चतुरेश्वरी! । सांग तूं कवणाची कुमरी? । राजकन्येसमान दुसरी । सेवा करी ते कवण?'[2] ॥ ११४ ॥ येरी म्हणे, 'गा! महाराजा! । मी ब्राह्मणी शुक्रात्मजा, । हे शर्मिष्ठा दैत्यतनुजा । परंतु माझी निजदासी. ॥ ११५ ॥ दासी कैसी झाली म्हणसी? । तरी स्वभावें पुढें जाणसी । आतां पुसणें तें विश्वासेंसी । वचन बोलें नृपवर्या! ॥ ११६ ॥ मीही वोळखें तुजलागुनी । तथापि सांगें आपुले वचनीं । नाम गोत्र सकळ श्रवणीं । प्रगट बोलें आपुलें.' ॥ ११७ ॥ येरु म्हणे, 'मी नहुषकुमर । जाण ययाती राजेश्वर । सोमवंशींचा शृंगार[3] । संतती अत्रिऋषीची. ॥ ११८ ॥ होती उदकाची वासना, । आतां वर्ते आन[4] भावना[5].' । हांसोनि बोले पद्मनयना, । 'इच्छा पुरवील ईश्वरु. ॥ ११९ ॥ चित्तासारिखें मिळे दुसरें । तेथें सौख्याचा सागर भरे । त्यासी तुळावयासि सरे । यत्नही होय माघारां. ॥ १२० ॥ योग्यायोग्य मिळे अवचट[6] । यालागीं बोलिजे भाग्य श्रेष्ठ । अयोग्य संगतीचे कष्ट । खेद देती क्षणक्षणां. ॥ १२१ ॥ भ्रमर शोधितां पुष्पजाती । अकस्मात मिळे मालती । तेथें येरयेरां[7] उपेक्षिती[8] । हें कैसेंनि घडेल? ॥ १२२ ॥ सहित दासी नृपनंदिनी । मी होतसें पट्टराणी । भ्रतार होवोनि पाणिग्रहणीं[9] । इच्छा पुरवीं आपुली.' ॥ १२३ ॥ राजा म्हणे, 'तूं ब्राह्मणदुहिता[10], । विशेषकोपी समर्थ पिता; । त्यासी नेणतां हे वार्ता । कानीं कैसी ऐकावी?' ॥ १२४ ॥ येरी म्हणे, 'माझें वचन । पिता न मोडी अणुप्रमाण; । त्याचे आज्ञेनें पाणिग्रहण । अवश्य केलें पाहिजे.' ॥ १२५ ॥ म्हणोनि पाठविली धाया[11] । वृत्तांत सांगे शुक्राचार्या । भविष्य निश्चय जाणोनियां । आला तेथें भार्गव. ॥ १२६ ॥ आला देखूनि असुरगुरु । नरेंद्रें केला नमस्कारु, । आशीर्वचनीं राजेश्वरु । गौरविला आचार्यें. ॥ १२७ ॥ 'मनोरथावाप्तिरस्तु'[12] । ऐसें बोलतां सर्वज्ञनाथु । महींद्रें[13] बोलोनि 'तथास्तु'[14] । शकुनगांठी[15]

---

१. स्त्रीसमूहाचें लावण्य. २. आदिपर्व—अध्याय ८१ श्लोक ८ पहा. ३. भूषण. ४. अन्य. ५. इच्छा. ६. अकस्मात्. ७. परस्परांस. ८. त्यागिती. ९. विवाहानें. १०. ब्राह्मणकन्या. ११. धात्री. १२. मनोरथाची प्राप्ति असो. १३. राजानें. १४. तसें असो. १५. कालांतरीं अथवा देशांतरीं होणाऱ्या अथवा झालेल्या परोक्ष गोष्टीविषयीं सांगितलेला कांहीं शकुन अथवा तत्सूचक कांहीं लक्षण त्याचें स्मरण, ती गोष्ट प्रत्यक्ष होईपर्यंत रहावें म्हणून जी पदरास गांठ मारतात तिला 'शकुनगांठ' म्हणतात.

बांधिली. ॥ १२८ ॥ कन्या बोले, 'स्नेहाळ जनका ! । [1]तवोदरसागरींच्या मौक्तिका । [2]ग्राहीक पातला परम[3]निका । [4]इंदिरावरासारिखा. ॥ १२९ ॥ तरी तूं आपुले निजहस्तकें । मातें वोपीं या कौतुकें । इतुक्रेनी मनोरथ[5]भातुकें । सर्व पावलें मजलागीं, ॥ १३० ॥ यावेगळा आन विचार । तो म्यां मानिला व्यभिचार.' । जाणोनि कन्येचा [6]निर्धार । 'अवश्य' म्हणे आचार्य. ॥ १३१ ॥ [7]बृहस्पतिसुताचें [8]शापवचन । दुसरें [9]ब्रह्मसूत्र प्रमाण । मनोगत कन्येचा जाणोन । शुक्र बोले आदरें. ॥ १३२ ॥ 'रूपचातुर्यगुण[10]निधान । अमूल्य माझें कन्यारत्न । कृपेनें तुज देतसें दान । अंगिकारीं नरवर्या ! ॥ १३३ ॥ ब्राह्मणकन्या क्षत्रिय भर्ता । हे [11]वर्णसकंरभयाची कथा । लागों नेदी सर्वथा । निजसामर्थ्यें आपुल्या'. ॥ १३४ ॥ म्हणोनि पाणिग्रहणविधी । नृपा वोपिली लावण्यनिधी । आंदण वोपिल्या ऋद्धीसिद्धी । सहस्रदासींसह शर्मिष्ठा. ॥ १३५ ॥ पुढती बोले आचार्य, 'राजा ! । सांगणें असे रहस्यबीजा, । शर्मिष्ठा हे दैत्येंद्रतनुजा । दासी माझिये कन्येची. ॥ १३६ ॥ दासीपणाचें ठेविलें नाम । परी हे नृपकन्या उत्तम, । इच्या ठायीं इंद्रियनेम । चलन तुवां न करावें. ॥ १३७ ॥ देवयानीतें वंचोन । ईतें वोपिल्या रेतदान । माझेनि शापें महाविघ्न । पावसील निर्धारें.' ॥ १३८ ॥ राजा म्हणे, 'न घडे ऐसें;' । द्विज म्हणे, 'माझे पाय स्पर्शें.' । प्रमाण करोनि मग संतोषें । देवयानी वरियेली. ॥ १३९ ॥ शुक्रपर्वतापासोनि [12]सरिता । अनेक संपत्तीतोयभरिता । येतां राय पावला दृष्टांता । [13]अष्टम समुद्र अवगमे. ॥ १४० ॥ देवयानी शर्मिष्ठेसी । सहवर्तमान सहस्र दासी । आज्ञा मागोनियां शुक्रासी । नगरा आपुले प्रवेशे. ॥ १४१ ॥ वंदोनि भार्गवीचें वचन । शृंगारवनीं विश्रामसदन । तेथें ठेविली सुखसंपन्न । दासीसहित शर्मिष्ठा. ॥ १४२ ॥ वस्त्रें शय्या विचित्रासनें । हेमरत्नें वित्त [14]आभरणें । भक्ष्य भोज्य मधुरसपानें । [15]स्रक्चंदन इत्यादी. ॥ १४३ ॥ अंगसंगेंवीण सकळ । सर्वोपचार सुपुष्कळ । राजा पुरवी सर्वकाळ । मेघ जैसा [16]धरणीतें. ॥ १४४ ॥ लाहोनि देवयानीचा संग । इंद्रउर्वशीचे भोग । भोगिता

---

१. तुझ्या उदररूप सागरांतील. २. घेणारा, गिऱ्हाईक. ३. खरा. ४. विष्णुसारिखा. ५. खाऊ. ६. निश्चय. ७. कचाचें. ८. तुला क्षत्रिय वरील इत्यादि शाप. ९. ईश्वरसूत्र. १०. ठेवा. ११. ब्राह्मण क्षत्रियादि वर्णांचा (जातींचा) व्यभिचारादि योगांनीं झालेल्या संकर (मिश्रण) त्याचें भय. १२. नदी. १३. हा आठवा समुद्र झाला असें समजे. सप्तसमुद्र प्रसिद्ध आहेत, तेव्हां हा नूतन आठवा समुद्र होय. १४. अलंकार. १५. पुष्पमाला. १६. पृथ्वीला.

झाला सभाग्य । निरामय[1] शरीरीं. ॥ १४५ ॥ शुक्रकन्या लाधली तेणें । रायासी आल्हाद कोटिगुणें, । ब्रह्मांड तेंही मानिलें उणें । ब्रह्मलोक पदेसीं. ॥ १४६ ॥ वनीं उपवनीं पर्वतमौळीं[2] । गंगाजळीं सरोवरजळीं । उपरिका[3]-गृहीं हेमराउळीं । क्रीडा करी संतोषें. ॥ १४७ ॥ देवयानी संग सुरवाडें[4] । वर्ष निमिषाचेनि पाडें[5]. । क्रमितां कौतुक वर्तलें पुढें । तें सादर परिसिजे. ॥ १४८ ॥ मुक्तेश्वराची वाग्वल्लरी । संत अवधान सुरतरुवरीं । वेष्टिली म्हणोनि फळसंभारीं । लवोनि आली रसरूपें. ॥ १४९ ॥ इति श्रीआदिपर्व भारत । ययातिनृपाख्यान अद्भुत । भूलोकींचें परमामृत । बुधविबुधें सेवावें. ॥ १५० ॥

अध्याय एकोणिसावा.

यानंतरें शृंगारवनीं । शर्मिष्ठा वसे लावण्यखाणी । पतिभोगाविरहित कामिनी । सर्वही सौख्य अनुभवी. ॥ १ ॥ परंतु पुरुषसंगेंविण । उपभोग जे स्रक्चंदन । ते खदिरांगारा[6]समान । शर्मिष्ठेतें वाटती. ॥ २ ॥ म्हणे, 'पूर्वकर्मा ! रे ! बळिवंता ! । तेणें अवमानिली ब्राह्मणदुहिता, । दासीत्वपद आलें माथां । तेथेंही पतिसंग न देखें. ॥ ३ ॥ भोगीतसें भोग सकळ । ते मज लागती जैसें हाळाहाळ[7] । पुरुषसंगेंवीण शरीर विकळ[8] । निद्रा न लागे शेजेसीं[9]. ॥ ४ ॥ श्रेष्ठ-नृपाची नंदिनी[10] । श्रेष्ठ वर असावा मजलागुनि, । अथवा दीन दुर्बळ प्राणी । ऐसाही वर न देखें. ॥ ५ ॥ रमणीय कासार[11] जळेंविण । सुदर मंदिर दीपहीन । राजशरीर प्राणांविण । तेंवि पुरुषावीण मज होय. ॥ ६ ॥ जळेंविण मच्छी तळमळी । दिनपती[12]वीण दीनता[13] कमळीं । तेंवि भ्रतारावीण वेल्हाळी[14] । दिननिशीं दुःखित.' ॥ ७ ॥ तंव येरीकडे राजा ययाती । सकळ सेना सजूनि निगुती[15] । मृगया[16]व्याजें वनाप्रति । अत्यादरें निघाला. ॥ ८ ॥ दिव्यरथीं शुक्रजामात । वरी कनकदंडें चामरें ढळत । छत्रें आतपत्रें[17] विराजत । मस्तकावरी नृपतीच्या. ॥ ९ ॥ पुढें वाजी[18] वारण[19] रथ । आडाऊ[20] पायींचे चालत । कडक-

---

१. रोगरहित. २. पर्वतशिखरीं. ३. उंच हवेलींत, राजवाड्यांत. ४. श्रेष्ठ. ५. प्रमाणें, सारखें. ६. खैराच्या जळत्या निखाऱ्यासमान. ७. तीव्र विष. ८. व्याकुळ. ९. शय्येवर. १०. पुत्री. ११. तलाव. १२. सूर्यावीण. १३. म्लानता. १४. सुंदर स्त्री. १५. निश्चयें. १६. पारधीच्या निमित्तानें. १७. आतपापासून (उन्हापासून) रक्षण करणारीं. १८. घोडे. १९. हत्ती. २०. आडहत्यारी शिपाई.

डाटें वना जात । पारधीलागीं भूपती.[1] ॥ १० ॥ राजा महाअरण्यीं प्रवेशला, । तेथें मृगया खेळों लागला; । अपार श्वापदांचा मेळा । वधिता झाला शरजाळीं. ॥ ११ ॥ नानापरी मृगयाखेळ । खेळतां शिणला ईलापाळ; । नगरा परततां, अस्ताचळ । सूर्य पावता पैं झाला. ॥ १२ ॥ राजा म्हणे प्रधानालागुनी, । 'आजि रहावें शृंगारवनीं.' । [2]निकें म्हणोनि तत्क्षणीं । तेणें सैन्य राहविलें. ॥ १३ ॥ वाजी वारण पदाती रैथ[3] । ठायींठायीं उतरले वनांत । ययाती पातला त्वरित । शर्मिष्ठेच्या मंदिरा. ॥ १४ ॥ तीतें जाहला बहु आनंद । नमिलें नृपतीचें पैदारविंद[4], । सहस्रदासींचें वृंद । नमस्कारी नृपातें. ॥ १५ ॥ उदक ठेविलें दासीजनीं, । शर्मिष्ठेनें स्वहस्तेंकरोनी । नृपतीस अभ्यंग[5] घालोनी । क्षीरोदैक[6] नेसविला. ॥ १६ ॥ षैड्रस[7] अन्नें निपजऊन । दिधलें रायासी भोजन । दिव्यमंचकीं आरक्त सुमन[8] । वरी निजवी नरेंद्रा. ॥ १७ ॥ वेळा[9] कर्पूर सुगंधयुक्ता । तांबूल अर्पी धरित्रीनाथा । मग संतोषोनि अवलोकिता । राजा वदन तियेचें. ॥ १८ ॥ जैसी सुवर्णचपंककळी, । कीं वोतिली मन्मथपुतळी, । अत्यंत तारुण्यभरें लवली । परी विनत सकुमार. ॥ १९ ॥ विराजे राजवदनचंद्रिका, । भाळीं रेखिला कस्तूरीटिका. । आकर्णपर्यंत कैज्जलरेखा[10] । नयन तेणें शोभती. ॥ २० ॥ दृढ विल्व पीनस्तन । वरी मुक्तजाळी विराजमान, । हृदयीं पदक दैदीप्यमान । तेज फांके हृदयाब्जीं[11]. ॥ २१ ॥ करिशावकशुंडादंड[12] । तैसे सरळ भुजदंड । कंकणें रुणझुणती प्रचंड । मदनातें चेतवावया. ॥ २२ ॥ [13]हरिकटीवरी शोभे धैटी[14], । उभी राहे सन्मुख गोरटी, । नृपातें [15]व्यंकट दृष्टीं । लक्षीतसे वेल्हाळी[16]. ॥ २३ ॥ ऐसी देखतां मृगशावनयना[17] । [18]मनोभवें नहुषनंदना । भुलविलें, मग बोले वचना । शर्मिष्ठेसीं आदरें. ॥ २४ ॥ म्हणे, [इ]रिसें नृपनंदिनी ! । तूं लावण्यचिंतामणीची खाणी; । तुझा अंगसंग व्हावा [म]नीं । हें बहुकाळ वसे माझिया. ॥ २५ ॥ परी संधी मातें न पावे । ते आज

---

१. पृथ्वीपति. २. खरें. ३. चतुरंग सैन्य. ४. चरणकमल. (अरविंद=कमल.) ५. तैल, [द्र]व्य इत्यादि आंगास लावून केलेलें स्नान. ६. पीतांबर. ७. मधुर, कटु (तिखट), कषाय आम्लक, क्षीर आणि तिक्त (कडू) हे सहा रस. ८. पुष्प. ९. वेलची. १०. काजळाची ११. हृदयकमळीं. १२. हत्तीच्या छाव्याच्या सोंडेप्रमाणें. १३. सिंहकटीवरी. १४. रेशमी १५. वांकडी. १६. सुंदरी. १७. बालमृगेक्षणा. १८. मदनें.

साविली निज दैवें. । देवोनि अंगसंग विझवावें[1] । कामानळा माझिया[2].॥२६॥ येरी म्हणे, 'जी प्रजापाळा ! । जैं शुक्रकन्या वरिली वेल्हाळा । तैं म्यां मैन-[3] पंकजांची माळा । तुझिया गळां घातली. ॥ २७ ॥ ती वडील, मी धाकुटी, । परि ते कोपिष्ठ आहे मोठी; । करील आपुल्या जिवा साठी । म्हणोनि संग न करवे.' ॥ २८ ॥ ऐसें ऐकतांचि वचन । नृपति व्यापिला मदनेंकरून. । उठोनि दिधलें आलिंगन । सुरतसुखें रमला पैं. ॥ २९ ॥ कामानळ शमलि-यावरी । राजा विचारी अंतरीं, । 'कोपेल शुक्राची कुमरी । तरीं हें गुप्तचि राखावें'. ॥ ३०॥ नृप सैन्येंसीं गेला नगरा । शर्मिष्ठा झाली गरोदरा । बैत्तीस-लक्षणी राजकुमरा । प्रसवती झाली अपत्य. ॥ ३१ ॥ शर्मिष्ठेतें झाला कुमर, । ऐकोनि भार्गवी चिंतातुर । शृंगारवना अतिसत्वर । पाहों आली सौक्षेपें. ॥ ३२ ॥ म्हणे, 'हें कैसे झालें प्राप्त? । पुत्ररत्न लक्षणवंत?' । येरी म्हणे, 'अकस्मात । ऋषेश्वर एक पातला. ॥ ३३ ॥ प्रार्थोनियां तपोधना । मागोनि घेतलें वीर्यदाना । त्याचे प्रसादें हें जाणा । रत्न दृष्टी देखिलें.' ॥ ३४ ॥ देवयानी वदे वाचे । 'नाम गोत्र सांग त्याचें.' । येरी म्हणे, 'ऐश्वर्य त्याचें । देखोनि भुललें पुसावया ! ॥ ३५ ॥ भार्गवी म्हणे, 'निजनिर्धारें । ऐसेंच असेल सौंचोकारें[10] । तरी मी संतुष्ट सौंचारें[11] । खेद कांहीं असेना. ॥ ३६ ॥ ऋषिवीर्य निजतेजाळ । तुझें तें माझें धाकुटें बाळ.' । ऐसें बोलोनि गुणवेल्हाळ । गृहा गेली आपुलिया. ॥ ३७ ॥ यापरी क्रमितां संतुष्ट काळ । देवयानीतें दुसरा बाळ । रूपें गुणें अतिविशाळ । तुर्वसूनामा[12] जन्मला. ॥ ३८ ॥

---

१. 'निवळावें' असाही पाठभेद आहे. २. कामाग्नीला. ३. मनरूप कमळांची. ४. 'संपूर्ण दिवस जालिया सुंदरा । प्रसवली पुत्रातें ॥' असाही पाठभेद आहे. बत्तीस लक्षणें (द्वात्रिंशल्लक्षणें).–५ दीर्घ (म्हणजे बाहु, नेत्र, जानु, नाक, आणि छाती, हे पांच अवयव लांब असावे); ४ आंखूड (म्हणजे गळा, लिंग, हस्त, जंघा हे चार अवयव आंखूड असावे,); ४ सूक्ष्म (म्हणजे बोटाचीं पेरें, दांत, केश, आणि नखें हे चार अवयव बारीक असावे); ६ उन्नत (म्हणजे कांखा, कुशी, छाती, नाक, खांदे आणि कपाळ हे सहा अवयव उंच असावे); ७ रक्तवर्ण (म्हणजे तळहात, पायांचे तळवे, नेत्र, नखें, तालु, जिव्हा, आणि ओठ, हे सात अवयव लाल असावे); ३ खोल (म्हणजे शब्द, अंतःकरण व नाभि हे तीन अवयव गंभीर असावे); ३ विस्तीर्ण (म्हणजे ऊर, मस्तक, व कपाळ [illegible] अवयव रुंद असावे); हीं पुरुषांचीं सामुद्रिकशास्त्रोक्त बत्तीस शुभलक्षणें आहेत. ५. [illegible] ६. अशोकवना. ७. अगत्येंकरुन. ८. अध्याय ८३ श्लोक ३-४ पहा. ९. अध्याय ८[illegible] ६ पहा. १०. खरें, खरेपणानें. ११. खरोखर. १२. पहिला पुत्र यदु आणि दुसरा तुर्वसु.

[1]असुरतनयेसीं नृपसंगमें । गुप्त काननीं [2]पुत्रललामें । [3]द्रुह्यु अनु पुरु या नामें । कुमारत्रया प्रसवली. ॥ ३९ ॥ यानंतर एकेदिवशीं । देवयानी राजयासरिशी । विनोदें आली त्या वनाशीं । तंव कौतुक देखिलें. ॥ ४० ॥ राजलक्षणी सालंकृत । तेजें [4]पावकचंद्रादित्य । पुत्र खेळतां देखिले तेथ । [5]गजशावक त्रिमूर्ती. ॥ ४१ ॥ राजाशी अवलोकितां नयनीं । धांवोनि बसले [6]अंकासनीं । स्नेहें श्मश्रु करीं धरूनी । फळें मागती भक्षावया. ॥ ४२ ॥ देखोनि उचकली वेल्हाळा । धडकली उद्विग्नतेची ज्वाळा । अश्रुबिंदू पातले डोळां । मग राजया विचारी. ॥ ४३ ॥ 'तुझिया रूपाचीं अपार बिंबें । तैशीं आथिलीं परमशोभें । सलगी करिती अत्यंत लोभें । हीं बाळकें कवणाचीं ?' ॥ ४४ ॥ राजा भयाभीत अंतःकरणीं । वचनत्यागें झाला मौनी । तस्कर जैसा राजसदनीं । अधोवदनीं तिष्ठत. ॥ ४५ ॥ मग कुमारांतें करीं धरुनी । म्हणे, 'मी जाणे तुमची जननी । पिता कोण तो दाखवा नयनीं । शर्मिष्ठेचा वल्लभ.' ॥ ४६ ॥ कुमरीं तर्जनिकासंकेतें । प्रकट केलें नरवर्यातें; । हें देखोनि भार्गवी चित्तें । संतापली बहुसाल. ॥ ४७ ॥ [9]रोषें बोले शर्मिष्ठेसी, । 'मज स्वाधीन माझी दासी; । मज नेणतां माझी कैसी । वस्तु चोरिली पापिष्ठे !?॥ ४८ ॥ म्हणसी ऋषेश्वर पातला येथें । तेणें वोपिलें पुत्रफळातें; । असत्यदोषें तुझी येथें । जिव्हा करीन शतखंड. ॥ ४९ ॥ असुरखाणीमाजी जन्म । म्हणोनि असुरी दुष्ट कर्म । आचरलीस शंका धर्म । सांडोनीयां [10]भंय माझें.' ॥ ५० ॥ सक्रोधें बोले देवयानी. । असुरी बोले मधुरवचनीं, । म्हणे, 'मी वदलें सत्यवाणी । नाहीं असत्य शिवितलें. ॥ ५१ ॥ [11]न्यायधर्मता आचरण । करितां पराचें भय दारुण । व्यर्थ मानसीं वाहे कोण ? । हें विवेकें विचारीं. ॥ ५२ ॥ जेव्हां तुवां वरिला रावो । तेव्हांचि म्यां कल्पिला [12]नाहो । सखीभर्ता धर्मता पहा हो ! । भ्रतार माझा निश्चयें. ॥ ५३ ॥ पूज्यमान सकळापरी । श्रेष्ठ तूं मातें ब्रह्मकु[illegible]री । तुझी दुरुक्ती विहिताचारीं । साहणें माझा स्वधर्म. ॥ ५४ ॥ मजही [illegible]ज्य विशेषीं । श्रेष्ठ राजा राजऋषी, । यालागीं वदलें भावार्थेसी । [13]रहाटी केली [illegible]यार्थ.' ॥ ५५ ॥ ऐकोनि शर्मिष्ठेची वाणी । विशेष कोपली देवयानी. ।

[illegible] शर्मिष्ठेला. २. पुत्ररूप भूषणें. ३. 'पूर्व प्रालब्धेंनी नेमें' असाही पाठभेद आहे. ४. अग्नी, [illegible]ाणि सूर्य. ५. हत्तीचे छावे. ६. मांडीवर. ७. युक्त, अन्वित आहेत. ८. हस्ताच्या आंगठ्या[illegible]चें बोट. ९. रागानें. १०. अध्याय ८३ श्लोक १९ पहा. ११. अध्याय ८३ श्लोक २०-२२ [illegible]हा. १२. पति. १३. वर्तणूक, आचरण.

म्हणे, 'राजया! येच क्षणीं। लागूनि तूतें जातसें. ॥ ५६ ॥ सहसा न वसें तुझे सदनीं,। वृत्तांत सांगेन शुक्रश्रवणीं.'। राजा मस्तक ठेवी चरणीं,। 'क्षमा करीं मज' म्हणे. ॥ ५७ ॥ शुक्रभयें अति उद्विग्न। शर्मिष्ठेनें धरिले चरण,। करितां बहुसाल समाधान। परी ते सहसा नायके. ॥ ५८ ॥ पायीं लोटोनियां माथा। शर्मिष्ठेतें हाणोनि लाता। शुक्रसदना शुक्रदुहिता। वातवेगें निघाली. ॥ ५९ ॥ शांत करावया सवेगें। राजा धांवे मागें मागें। परी ते मनातें म्हणे रागें। 'राहें परतें मंदटा.' ॥ ६० ॥ सवेग पातली तातसदना। दीर्घस्वरें करी रुदना। धरूनि आचार्याच्या चरणा। उंकसांबुकसीं स्फुंदत. ॥ ६१ ॥ दुःखित देखोनि कुमरी। जनका जाणवलें अंतरीं,। संगीं होती असुरकुमरी। विपरीत कांहीं वर्तलें. ॥ ६२ ॥ पुढें पातली देवयानी। पाठीसीं राजा गृहांगणीं। गुरुवर्यातें लोटांगणीं। नमस्कारी साष्टांगीं. ॥ ६३ ॥ देवयानी म्हणे, 'ताता!। राय स्वधर्मा हाणोनि लाता। दासी माझी दैत्यदुहिता। विभागीण मज केली. ॥ ६४ ॥ कळों न देतां कवणातें। तिघे पुत्र वोपिले तीतें। दोघे नातू जन्मले तूतें। दैवहीन मजपोटीं. ॥ ६५ ॥ छेदिला कीर्तीचा अश्वत्थू। तव मर्यादा स्वधर्मसेतू। भंगिला, म्हणोनि क्लेशमातू। सांगावया पातलें.' ॥ ६६ ॥ जाणोनि रायाचा अपराध। देवयानीचा देखोनि खेद। आचार्यासी चढला क्रोध। महारुद्रासारिखा. ॥ ६७ ॥ म्हणे, 'धर्मज्ञ आणि छेदी धर्म। तोचि बोलिजे पुरुष अधम। आतां घेई शाप दुर्गम। जो कां अलोट हरिहरां. ॥ ६८ ॥ हो तारुण्यधनाची हाणी। जरा आकळो येच क्षणीं। वार्धक्याच्या महास्मशानीं। पिशाच होईं पापिष्ठा!' ॥ ६९ ॥ राजा विनवी जोडल्या करीं,। 'कामानळें दग्धली नारी। प्रार्थोनियां एकांतअवसरीं। ऋतुप्रसाद याचिलें. ॥ ७० ॥ आर्ती न देतां ऋतुभिक्षेतें। भ्रूणहत्यादि पातकें त्यातें। येणें धर्मे शास्त्रसंमतें। वीर्यदाता मी झालों. ॥ ७१ ॥ देवयानीतें दुराऊनी। नाहीं वर्तलों अधर्माचरणीं.'। गुरु म्हणे, 'कुशल वाणी। मीही जाणें कुटिलाची ॥ ७२ ॥ अंतरीं धरूनि विषयबुद्धी। वर्ते अनाचारें अविधी,। वचन ल[illegible]विती धर्मसंबंधी। तो दांभिक दुरात्मा. ॥ ७३ ॥ आतां अनुवादलों तें राया[illegible]

---

१. 'अति सत्वर चालली' असाही पाठभेद आढळतो. २. ओंकसांबोकशीं, उकसा[illegible] अकूसाबोकशीं=रडण्याचा वेग आटोपेनासा झाल्यामुळें घाबरें होऊन अतोनात रडणें. हें [illegible] विशेषण आहे. ३. 'सत्याचा' असाही पाठ आहे ४. कठिन. ५. अनिवार्य, अपरिहार्य, [illegible] ६. अध्याय ८३ श्लोक ३१ पहा. ७. बाल्हसादि. (अध्याय ८३ श्लोक ३२-३३ पहा.)

माझी शापोक्ति [1]नैवचे वायां.' । ऐसें बोलतां तेच्क्षणीं काया । [2]वलीपलितें व्यापिली. ॥ ७४ ॥ [3]दशनीं वोस पाडिलें वदन, । अंधत्व पावले विशाळ नयन, । बधिरत्वा पातले सुश्रवण, । हस्त चरण न चलती. ॥ ७५ ॥ शरीरीं उठला शीघ्र कंपू, । [4]कमठरूप, अवगली वपू, । चावळतांही वाग्जल्पू । अर्थहीन उमजेना. ॥ ७६ ॥ मस्तक श्मश्रू सुनीळ [5]बोळ, । बकाच्या ऐसे [6]आतले धवळ । घ्राणीं [7]श्लेष्मा, मुखीं लाळ । स्रवों लागली झुळझुळां. ॥ ७७ ॥ चढतां निर्बळतेचा गुण । धनुष्याकृती आतलें [8]ठाण, । नम्र विनीत मरणाभेण । प्राणदान खोकत. ॥ ७८ ॥ विकार रोगाचे दारुण । लागती [9]कुश्चळतेचे बाण । त्रास मानूनि स्वकीय जन । धाकें पळती [10]परौते. ॥ ७९ ॥ असो. ऐसी जरेची मिठी । पापें पडली नृपाचे कंठीं; । [11]दंडप्राय नमन भूपृष्ठीं । करोनि प्रार्थी शुक्रातें. ॥ ८० ॥ 'देवयानीसीं भोगकाम । अद्यापी झाला नाहीं शम; । तूं कृपेचा कल्पद्रुम । कामना पूर्ण करावी. ॥ ८१ ॥ देवयानीची भोगरती । [12]अळुमाळ पुरली नाहीं [13]आर्ती । यालागीं जरा करोनि परौती । तारुण्य देईं मज माझें.' ॥ ८२ ॥ ग्लानी भाकितां नहुषतनय । कृपेनें द्रवलें ब्रह्महृदय; । म्हणे, 'वरदोक्ती अप्रमेय । ऐकें माझी [14]महींद्रा ! ॥ ८३ ॥ तारुण्य याचितां कुमरातें । तुझें वार्धक्य जाईल त्यातें; । यौवन प्राप्त होईल तूतें । जो देईल तयाचें. ॥ ८४ ॥ मद्वाक्यप्रतापाचें बळ । [15]प्रचीती दावील तत्काळ.' । राजा म्हणे, 'दीनदयाळ ! । विनंती एक परिसणें. ॥ ८५ ॥ जो निज वय वोपील मातें, । मी स्वराज्य देईन त्यातें; । येविषयीं प्रसन्नचित्तें । अभय दीधलें पाहिजे.' ॥ ८६ ॥ 'होय' तैसेंच म्हणे गुरु, । 'जो तारुण्य वोपील [16]कुमरु, । तो राज्यधरु वंशधरु । अवश्य तुवां करावा. ॥ ८७ ॥ इयेविषयीं माझ्या चित्तीं । नाहीं स्वार्थ विषाद खंती.' । आज्ञा मागोनि राजनृपती । नगराप्रती पातला. ॥ ८८ ॥ पांचांही पुत्रांतें पाचारी, । म्हणे, 'ममाज्ञा वंदोनि शिरीं । तारुण्य सहस्र वर्षेंवरी । देऊनि जरा स्वीकारा. ॥ ८९ ॥ सहस्रवर्षांनंतरें पुढती । घेईन वार्धक्यतेची [17]बुंथी । तुमचें तारुण्य तुम्हांप्रती । संचरेल निर्धारें. ॥ ९० ॥ [18]षड्रसपात्रावरूनि त्वरित । उठविजे तैसा स्त्रीभोगार्थ । अपूर्ण

---

१. न जाई. २. वृद्धत्वानें. वली=सुरकुत्या, पलित=पांढरे पिकलेले केंस. ३. दांतांनीं. ४. कांसवासारखी. ५. केश. ६. झाले. ७. शेंबूड. ८. शरीर. ९. कुत्सिततेचे. १०. दूर, पलिकडे. ११. दांड्यासारखें जमिनीवर पडून नमस्कार घालणें. १२. अल्प. १३. आवड. १४. हे राजा. १५. प्रत्यय. १६. अध्याय ८३ श्लोक ४१-४२ पहा. १७. बुरखा, आच्छादन. १८. मधुर, कटु (तिखट), कषाय (तुरट), आम्लक, क्षार, आणि तिक्त (कडू) या सहा रसांनीं भरलेलें पात्र.

माझा मनोरथ । पूर्ण करावा वयोदानें.' ॥ ९१ ॥ शर्मिष्ठेचा कनिष्ठ कुमर । वेगळा करूनि पूरु प्रवीर । चौघे म्हणती, 'हा विचार । अटक आम्हां ठेकेना. ॥ ९२ ॥ दुःखदोषांचें आगर । वार्धक्य तेंचि नरक घोर । त्याचा करूनि अंगीकार । तारुण्य आम्हां न देववे. ॥ ९३ ॥ विशेषें मातृभोगकामा । तारुण्य मागसी पुत्रां आम्हां । देतां मात्रागमनकर्मा । पात्र आम्हीं निर्धारें.' ॥ ९४ ॥ ऐकोनि पुत्रांचें उत्तर । पिता कोपला अतिदुर्धर; । म्हणे, 'दुष्ट हो! अतिनिष्ठुर । शाप घ्या रे! चौवेही. ॥ ९५ ॥ यदुयादवकुळसंतती । अराज्यभाक् भ्रष्टराज्यसंपत्ती, । पराचेनि आश्रयें जिती । महींद्रत्व त्यां नसे. ॥ ९६ ॥ तुर्वसो! तुझें वीर्यसंतान । गोहिंसकी मद्यपी जाण । आरक्त श्यामवर्ण नयन । समुद्रवासी जन्मती. ॥ ९७ ॥ प्रतिलोमज अधर्मी रत । गुरुदारासंगासक्त । पशुधर्मी पापनिरत । जन्मतील दरिद्री. ॥ ९८ ॥ द्रुह्यो! तुझें वीर्यसंभवी । नौकाजीवी मत्स्यजीवी । सुत भोज यानांवीं । जन्मतील दुरात्मे. ॥ ९९ ॥ अनो! तुझे अन्वयजात । प्राप्तयौवनीं पावती मृत्य । हीनवर्ण धर्मरहित । जन्मतील दरिद्री. ॥ १०० ॥ यंत्रकार लोहकार । राज्यरहित जन्मती नर । वेदबाह्य अतिपामर । नीचयोनी जन्मती.' ॥ १०१ ॥ चौघे शापूनि केले परते । कनिष्ठा पाचारिलें ओरौतें । आलिंगनीं स्नेहभरितें । परमआदरें बोलत. ॥ १०२ ॥ म्हणे, 'पुत्रा! तूं पुत्रोत्तमा । पुरो! तूं माझा प्रिय आत्मा; । वयोदकदानें मत्कामद्रुमा । सुफळ केलें पाहिजे.' ॥ १०३ ॥ ऐकोनि पितृमुखींची वाणी । पुत्रें मस्तक ठेविला चरणीं. । 'अवश्य' ऐसें त्रिवार वचनीं । बद्धहस्तें अनुवादे. ॥ १०४ ॥ 'शरीर प्राण यौवन धन । सर्वही तुझें वेदप्रमाण; । तुझें तुज द्यावया कवण । संदेह कल्पी दुरात्मा? ॥ १०५ ॥ वेगीं ओपिलें तारुण्य । इच्छा करावी परिपूर्ण; । दिधलें पाहिजे परतोन । ऐसें चित्तीं न धरावें. ॥ १०६ ॥ देखोनि जराजर्जर रूप । मातें उपजे खेद संताप । माझेनि वयें तारुण्यदीप । पुढती उजळीं आपुला.' ॥ १०७ ॥ ऐकोनि सुपुत्रमुखींचे बोल । पितया पातले स्वानंदडोल; । आलिंगूनि म्हणे, 'अमोल । गुण तुझे जगत्रयीं.

---

१. प्रतिबंध. २. राहीना. ३. गृह. ४. मातृ+आगमन+कर्म=आईशीं संग करणें. ५. 'पापाण व्हा रे चौघेही' असेंही पाठांतर आहे. ६. अध्याय ८४ श्लोक ९ पहा. ७. उत्तम वर्णाच्या स्त्रीच्या ठायीं नीच वर्णाच्या पुरुषापासून उत्पन्न झालेला. ८. गुरुपत्नीशीं संग करण्याविषयीं लालस. ९. अध्याय ८४ श्लोक १३-१५ पहा. १०. अध्याय ८४ श्लोक २०-२२ पहा. ११. अध्याय ८४ श्लोक २६ पहा. १२. अलिकडे, जवळ.

॥ १०८ ॥ केलें ममाज्ञापालन, । तुज मी सदा सुप्रसन्न, । जेव्हां जें जें इ-च्छील मन । तें तें संपूर्ण पावसी. ॥ १०९ ॥ आयुष्यवंत आरोग्यवंत । तुझे वंशज भाग्यवंत । बळलावण्यविवेकवंत । पितृभक्त जन्मती. ॥ ११० ॥ माझे राज्यपदीं बोजा । भाग्यें भोगितील तुझिया प्रजा । ऐसा प्रतिज्ञाशब्द माझा । मेरुप्राय न भंगे. ॥ १११ ॥ राज्यधर वंशधर । माझे पदीं तुझे कुमर । ऐसा देई अक्षयी वर । माझा आणि शुक्राचा.' ॥ ११२ ॥ ऐसें बोलतां स्नेहादरें । वय पालटलें परस्परें. । तारुण्य लेइलें नृपवरें, । जरा कुमरें स्वीकारिली. ॥ ११३ ॥ जे कां तीव्र ज्ञानशक्ती । एकेकाचीं रूपें होती । तारुण्य वार्धक्य ऐसिये रीती । पिता पुत्र पावले. ॥ ११४ ॥ लाहोनि तारुण्य अमोलिका । राजा पावला परमहरिखा. । मग पाचारिल्या उभय नायिका । असुरी आणी ब्राह्मणी. ॥ ११५ ॥ सत्य स्वधर्म अविरोधी । काम पुरवी यथाविधी, । उभयवनितांच्या संवादी । सुरतानंदें क्रीडतु. ॥ ११६ ॥ यथाकामोत्सव तोषें । यथाकाम यथासुखें । स्वधर्मशील विवेकें । तुझिया ऐसा वर्ततु. ॥ ११७ ॥ यज्ञें तृप्त केले देव, । श्राद्धीं तोषविले पितर सर्व, । अनुग्रहें दीन मानव । दुःखांतूनि काढिले. ॥ ११८ ॥ पूर्ण केले इच्छिले काम । सुखी केले द्विजसत्तम; । प्रजापालनीं वाङ्मिय । चळों नेदी सर्वथा. ॥ ११९ ॥ ईच्छाभोजनीं रसोदकपानीं । अतिथी पोषिले प्रतिदिनीं । अन्नें वसनें करुणावचनीं । शूद्रजाती पाळिल्या. ॥ १२० ॥ देशमारक ग्राममारक । मार्गमारक गृहभेदक । पाशतस्कर जनमोहक । मनुष्यघाती बहुवेषें. ॥ १२१ ॥ ऐसे तस्कर आततायी । निग्रह शासनें शस्त्रघायीं । महीमंडळीं केंलेंच नाहीं । दोष जैसे कृतायुगीं. ॥ १२२ ॥ शिरच्छेदन शूळभेदन । यंत्रमुखीं निक्षेपण । कुंजरपादघातें चूर्ण । दंडशासन रायाचें. ॥ १२३ ॥ हस्तदंड पाददंड । कर्णघ्राणचक्षुर्दंड । मस्तक जिव्हा खंडविखंड । शरीर करणें दुष्टांचें. ॥ १२४ ॥ यापरी चोरजारहनन । केलिया जोडती महायज्ञ; । प्रजा सुखवोनि जाण । विभाग देती नृपातें. ॥ १२५ ॥ न्यायें पाळोनि सर्व प्रजा । स्वधर्म भोगें भोगिले बोजा । सहस्रवर्षांनंतर लज्जा ।

१. चांगुलपणा. २. संतति. ३. हर्ष. ४. अध्याय ८४ श्लोक २-४ पहा. ५. ब्राह्मणानें इच्छिलेला जो पक्वान्नादिपदार्थ तो सिद्ध करून तद्विशिष्ट इच्छातृप्त जें त्यास भोजन घालितात तें. ६. महाअपराधी (बंदिवान्, बायको फितविणारा, खून करणारा, दरवडेखोर, घर जाळणारा, भूमिहरण करणारा, चहाडी करणारा, विष घालणारा इत्यादि). ७. तोफेच्या तोंडीं देणें. ८. 'प्रजा सुखवोनि पुण्य' असाही पाठ भेद आहे.

वैराग्याची पातली. ॥ १२६ ॥ पश्चात्ताप वैद्य सुमती । विचार[1] उखळ मात्रा निगुती । देतां वांती उपजली चित्तीं । कामपित्त परिहारा. ॥ १२७ ॥ तेवेळीं विवरीं अंतःकरणा । म्हणे, 'हे अतृप्त मनवासना; । भोगितांही आगळी तृष्णा । दिवसेंदिवस होतसे. ॥ १२८ ॥ सरली आयुष्याची जोडी । ठेली इंद्रियबळाची प्रौढी, । तरी विषयतृष्णेची वाढी । आगळी दिसे वाढती. ॥ १२९ ॥ हवी[2] भक्षितां वैश्वानरु[3], । नदीप्राशनीं जळसागरु, । विषय भोगितां पामर नरु । तृप्ती नोहे कल्पांतीं. ॥ १३० ॥ भंगिला कुंभ भरितां हातीं । शेखीं रिचवितां रिता पुढतीं, । तैसें विषयभोग भोगितां अंतीं । न दिसे कांहीं दावावया. ॥ १३१ ॥ धान्य हिरण्य पशु वनिता । स्वइच्छा चिरकाळ भोगितां । 'पुरे पुरे नलगे आतां' । म्हणता कोणी दिसेना. ॥ १३२ ॥ आतां जाणतेनि पुरुषें । त्याग करणें हें विशेषें; । तेणें पैरत्रीं[4] सावकाशें । विश्रांतीतें पाविजे. ॥ १३३ ॥ विषयत्यागाविणें मोक्षु । मानूनि म्हणविती ज्ञानी दक्षु । ते मूर्खसभेचे अध्यक्षु । माझे मतीं मानले. ॥ १३४ ॥ विषय त्यागूनि समस्त । उभयअंगनासमवेत । वनीं होऊनि वानप्रस्थ । आत्महितार्थ साधावया, ॥ १३५ ॥ मृगपक्षीवृक्षसंगीं । लेऊनि वैराग्याची विभूती अंगीं । तपश्चर्या आचरण जगीं । जें न करवे तापसां. ॥ १३६ ॥ पुत्र पाचारूनि सुमती । आलिंगिला परमप्रीती; । म्हणे, 'कनिष्ठा ! श्रेष्ठ आर्ती । पूर्ण केली त्वां एकें. ॥ १३७ ॥ घेई वयसा हे आपुली, । राज्यसंपदा तुज वोपिली; । माझिया आशीर्वचनफुलीं । पुष्पांजुळी तव माथां. ॥ १३८ ॥ सरळ तुझिया वंशध्वजीं । वरद पताका मिरवे माझी; । पृथ्वी पाळोनि बैस राज्यीं । अचळ आज्ञे माझिया. ॥ १३९ ॥ माझी आज्ञा पाळिली थोर । यालागीं तूंचि राज्यधर, । ज्येष्ठांतें अनधिकार । अवज्ञादोषें म्यां केलें. ॥ १४० ॥ करीं प्रजांचें समाधान, । जेणें माझें पाळिलें वचन, । तो म्यां मान्य केला जाण । तुम्हीं[5] विषाद न करावा. ॥ १४१ ॥ कनिष्ठ स्थापिला ज्येष्ठस्थळीं । तुम्हीं वर्तावें तयाचे तळीं.' । 'अवश्य' म्हणोनि जनीं सकळीं । पूरु प्रवीर वंदिला. ॥ १४२ ॥ लेऊनि जराजर्जर कंथा । करीं धरूनि उभयकांता । कांतारीं[6] प्रवेशला ममता । त्यागूनियां ययाती. ॥ १४३ ॥ करूनियां अरण्यवास । तापसमेळीं वर्ते तापस । तीव्रतपाचा हव्यास[7] । धरिता झाला मानसीं. ॥ १४४ ॥ निग्रहूनि इंद्रियग्राम[8] । द-

---

१. विचारानें दूर करणारी. २. हवनीय द्रव्य. ३. अग्नि (अध्याय ८५ श्लोक १२ पहा). ४. परलोकीं. ५. 'तुम्ही ही विशेष करावा' असेंही पाठांतर आढळतें. ६. अरण्यांत. ७. इच्छा. ८. इंद्रियसमूह.

वडोनि सांडिले क्रोध काम; । लोभममतेचा कर्दम । लागों नेदी अंगुष्ठा. ॥ १४५ ॥ घेऊनि वानप्रस्थाश्रम । वन्हीचे ठायीं नित्य होम, । फलोदकें क्षुधाश्रम । अतिथींचा परिहारी. ॥ १४६ ॥ स्नान संध्या जप हवन, । नित्य स्वाध्याय, देवतार्चन । देवऋषिपितृतर्पण, । विधीनें सांग संपादी. ॥ १४७ ॥ शिलोंच्छवृत्ती अवलंबून । तेणें विशेषान्नें करी भोजन; । ऐसीं सहस्र वर्षे जाण । काळ सार्थक लोटिला. ॥ १४८ ॥ त्यावरी तीस वर्षे वरी । शरीर नेमिलें जळआहारीं; । वायुभक्षण निर्धारीं । वर्ष एक तपस्वी. ॥ १४९ ॥ पंचाग्नीमाजी काया । वर्ष एक दंडिली राया ! । दृढासनीं एक पायां । वरता उभा षण्मास. ॥ १५० ॥ यानंतरें पुण्यकीर्ति । लाहोनि दिव्य देहाची प्राप्ती । स्वर्गीं प्रवेशला सुकृती । सर्वांहूनि आगळा. ॥ १५१ ॥ वसु साध्य मरुद्गण । यक्ष गंधर्व सिद्ध चारण । विमानयानीं अवघेजण । वेगीं सन्मुख पातले. ॥ १५२ ॥ सहित देवऋषेश्वरां । देवेंद्र पातला सामोरां, । आसनीं पूजिलें राजेश्वरा । अत्यादरें समस्तीं. ॥ १५३ ॥ तेथोनि वैंळंघोनि विमानीं । स्वेच्छा प्रवेशे ब्रह्मसदनीं । तेथेंही मान पावोनी । नंदनवनीं क्रीडत. ॥ १५४ ॥ सोमसूर्ययमस्थानीं । ययाती पातला अवलोकोनी, । ओपोनि स्वकीय सिंहासनीं । बद्धहस्तीं वोळंगती. ॥ १५५ ॥ कौतुकें एके दिवशीं जाणा । सहज पातला शक्रभुवना । इंद्रें देऊनि मुख्य स्थाना । गौरवूनि अनुवादे. ॥ १५६ ॥ ऐश्वर्य देखूनि अति आगळें । सुरेश तापला ईर्षानिळें । कुटिलभावें मृदुमवाळें । वचनें बोले नृपासी. ॥ १५७ ॥ 'राज्य देऊनि निजनंदना । जरा घेऊनि आलासि वना, । तेवेळीं हितोपदेशवचना । बोलिलासी पुत्रासी. ॥ १५८ ॥ तें आम्हुतें करावें श्रवण । ऐकतां पावे विश्रांती मन । पुण्यश्लोकाचें सहज स्मरण । पावन करी ऐकतियां. ॥ १५९ ॥ दैव नाहीं जरी दुर्बळा । तरी समर्थ ऐकावे पहावे डोळां.' । राजा आर्जवपणें भोळा । पुत्रोपदेशा अनुवादे.

१. चिखल. २. वेदाभ्यास, वेदपठण. ३. तापसानें शेतामध्यें जे धान्यकण पडले असतील ते घेऊन शरीर रक्षण करणें. ४. चार बाजूंस चार अग्नि व मस्तकावर सूर्य अशा नियमानें. (अध्याय ८६ श्लोक १६). पंचाग्नि किंवा पंचाग्निधूम्रपान-हा एक हठयोगांतील तपश्चर्येचा प्रकार आहे. या प्रकारांत साधकानें स्वतःस उलटें टांगून घेऊन जमिनीवर पांच ठिकाणीं अग्नि पेटविलेले असतात त्यांचा धूर सेवन करावयाचा असतो. त्या अग्नींचीं विशेष नांवें असल्यास माहीत नाहींत. ५. पुण्यशाली, दैवशाली. ६. अध्याय ८७ श्लोक १ पहा. ७. चढोनी. ८. प्रवण होती, नम्र होती. ९. मत्सराग्नीनें. १०. कोमळ. ११. अध्याय ८७ श्लोक ४ पहा. १२. ज्यांची कीर्ति पवित्र आहे अशांचें.

॥१६०॥ '[1]गंगायमुनामध्यभूमिके । राज्य भोगावें तुवांच एकें; । इतर पृथ्वीभाग प्रत्येकें । बंधू तुझे भक्षिती. ॥ १६१ ॥ धरेतुल्य करावी क्षमा । सत्य माधुर्य वाङ्नियमा, । आधीं पाळोनि ब्राह्मणोत्तमा । मग प्रजांतें सांभाळीं. ॥ १६२ ॥ क्रोधियाहूनि विशेष अक्रोधी । हें वर्म चतुरीं जाणितलें आधीं; । छलनकर्त्यांहूनि सुबुद्धी । सहनशीळ आगळा[2]. ॥ १६३ ॥ अमानुषाहूनि[3] माणुस । विचारें जाणावे विशेषें[4] । केवळ नेणत्यांमाजी विदुष । श्रेष्ठ पंडित विवेकी. ॥ १६४ ॥ छळितां क्रोध नुपजे ज्यातें । तेणें जोडिलीं सर्व सुकृतें । कोपिष्ठाचीं सुपुण्यें बहुतें । भस्म होती क्षणार्धें. ॥ १६५ ॥ कठोर वाग्बाण वर्माठायीं । मरणांत शल्य पराचे हृदयीं । राहे ऐसे दुरुक्तीघाईं । मरण न कीजे कवणातें. ॥ १६६ ॥ परवर्मभेदनीं दुरुक्ती । ते अवलक्ष्मी अकीर्ति अवगती[5] । ते प्रत्यक्ष राक्षसी व्यक्ती । हिंसा करी अशस्त्रें. ॥ १६७ ॥ म्हणोनि दुर्वाक्य न बोलावें, । पराचें आपण साहीत जावें; । याहूनि श्रेष्ठ साधन बरवें । भुवनत्रयीं असेना. ॥ १६८ ॥ साधु सद्भावें पुजावे, । सज्जन संकटीं रक्षावे, । खळापवाद साहोनि जावे, । तेंचि वर्तन श्रेष्ठांचें. ॥ १६९ ॥ सत्य विनीत मधुरभाषी । सकळ प्राणी वश्य त्यासी । कोणापासून तयासी । अपाय कांहीं असेना. ॥ १७० ॥ मुखें सत्य अंगें विनीत । तेणें जिंकिले जन समस्त । इहीं सद्गुणीं अलंकृत । चतुरें झालें पाहिजें. ॥ १७१ ॥ जया सर्वभूतीं कणव[6] । तया नमस्कारिती सकळ देव, । अक्षयी सुख सर्व वैभव । चढोवढी वोपिती. ॥ १७२ ॥ यालागीं अवाच्य परुषवचन[7] । न बोलावें गेलिया प्राण; । करावें पूज्यांचें पूजन । कोंणा कांहीं न मागावें. ॥ १७३ ॥ ऐसें उपदेशोनि कुमरा । मी पातलों वनगव्हरा[8]'. । 'भला भला' म्हणूनि 'चतुरा' । शक्र बोले मागुती. ॥ १७४ ॥ 'मनुष्यलोकीं यज्ञदानें । पुण्यें जोडिलीं कोणकोणे, । तीं ऐकावीं तुझेनि वचनें । ऐसी आवडी मानसीं. ॥ १७५ ॥ आणी दिव्यलोकनिवासी । त्यांमाजी तुझिया सुकृतासी, । तुळणा पावे तो आम्हांसी । प्रगट केला पाहिजे.' ॥१७६॥ ऐसें बोलतां पाकशासन[9] । राजा झाला हास्यवदन । म्हणे, 'विचारेंवीण वचन । सर्वज्ञ कैंवी अनुवादे? ॥ १७७ ॥ कैंचे सागरातुल्य कांसार[10], । मेरुसमान गिरिवर, । सूर्यासमान तेजोगार[11] । कोणती वस्तु उपमावी. ॥ १७८ ॥ माझिया प्रचंडपुण्याचळा । तुळणे घालिजे कोण कांटाळा; । ब्रह्मादि संत[12] ऋ-

१. अध्याय ८७ श्लोक ५–१३ पहा. २. श्रेष्ठ. ३. मनुष्यव्यतिरिक्तांहून. ४. श्रेष्ठ, प्रधान, थोर. ५. अधोगति. ६. करुणा. ७. कठोर. ८. वनगुहेंत. ९. इंद्र. १०. तळें. ११. तेजाचें गृह. १२. मरीचि, अत्रि, अंगिरस्, पुलस्त्य, पुलह, क्रतु, आणि वसिष्ठ हे सात ऋषि.

षींचा मेळा । पासंगातें न पावती. ॥ १७९ ॥ माझिया पुण्यधनाची कहाणी । ऐकतां संख्या न धरवे मनीं; । माझी करावया करणी । शक्ती कैंची अन्यातें?'. ॥ १८० ॥ ऐसें बोलतां ययाती राजा । शक्र भावी साधिलें काजा, । कोपोनि म्हणे, 'न धरिसी लाजा । आत्मस्तुती मुखें बोलतां. ॥ १८१ ॥ सकळ स्वरूप ईश्वराचें । महिमा न जाणे कवणाचें । श्रेष्ठ अवमानूनि वाचें । गर्वें श्लाघ्यता मानिसी. ॥ १८२ ॥ क्रोधें नाडिले तपोधन । सुविद्या नासती विस्मरण, । स्वकीर्तनें भस्मती महापुण्य । तें तंव घडलें तुज आजी. ॥ १८३ ॥ पुण्यलोकापासूनि पतन । पावसी अंतवंतस्थान, । येचि काळीं न लगतां क्षण । मृत्युलोकीं प्रवेशें.' ॥ १८४ ॥ ऐसें बोलतां सुरेश्वरातें । ययाती विनवी जोडिल्या हातें, । 'केलेनि कर्मे सुखदुःखातें । प्राणी पावे सर्वथा. ॥ १८५ ॥ माझेनि दोषें पावलों खेद । हा तुज कासया ठेवणें शब्द? । नाठवूनि ममापराध । एक देई मज आतां. ॥ १८६ ॥ स्वर्गापासूनि हीनसुकृती । पतन पावेन अधःपंथीं; । पडेन तेथें सत्संगती । जोडे ऐसें करावें. ॥ १८७ ॥ साधुसंगें न्यून तें पूर्ण, । उत्साह तैसें वाटे मरण, । आपदा संपदा समसमान, । सज्जनसंग जोडिल्या. ॥ १८८ ॥ यालागीं संतांचे संगती । मातें टाकणें कृपामूर्ती.' । इंद्र दयाळू द्रवला चित्तीं । शांतवूनि अनुवादे. ॥ १८९ ॥ वरदवचनी सहस्रनेत्र । म्हणे, 'हे नरेंद्र! नहुषपुत्र! । पडसी तेथें अतिपवित्र । महानुभाव भेटती. ॥ १९० ॥ त्याचेनि संगें शीघ्रगती । पुढती स्वर्गपदाची प्राप्ती । पावसी येथें संशय चित्तीं । न धरीं कांहीं पवित्रा! ॥ १९१ ॥ पुढें तरी होईं शहाणा । न करीं कोणाची अवगणना । आत्महितार्थ सुखसाधना । भूतमात्रीं असावें.' ॥ १९२ ॥ ऐसें बोले तंव तात्काळ । आसनीं चळला नृपाळ; । जैसें खचलें रविमंडळ, । कीं नक्षत्र उलंडलें. ॥ १९३ ॥ यापरी लोटिला ययाती । पृथ्वी लक्षीत अधोपंथीं । उतरला, त्याची अंगदीप्ती । दाही दिशा उडजे. ॥ १९४ ॥ अंतरिक्ष मंडलेश्वर । अवघे करिती हाहाकार. । म्हणती, 'स्वर्गभोग नश्वर । मनुष्यमरणासारिखा.' ॥ १९५ ॥ असो. ययाती पडिला ऐसा । पुढां विनोद वर्तला कैसा । तो श्रीव्यास वदला तैसा । मुक्तेश्वर कवि वदे. ॥ १९६ ॥

---

१. नाशवंत स्थान (अध्याय ८८ श्लोक ३). २. अध्याय ८८ श्लोक ४ पहा. ३. इंद्र. ४. प्रशस्तमनस्क सज्जन. ५. अमर्यादा. ६. प्राणिमात्रीं.

अध्याय विसावा.

छलन करून कपटयुक्ती । इंद्रें लोटिला नृप ययाती । वरून पडतपडतां क्षिती[1] । कौतुक कैसें वर्तलें. ॥ १ ॥ अष्टकादि[2] तपस्वी चौघ । गंगातटाकीं करिती याग, । त्यांचिया होमधूम्रें अंग । आकाशाचें भेदिलें. ॥ २ ॥ हविर्गंधें पवित्रधूमा । स्पर्श करितां राजोत्तमा । पडतपडतां माजि व्योमा[3] । अंतरिक्षीं राहिला. ॥ ३ ॥ धूम्र नोहे तो, मुनिसुकृतें[4] । वरिच्यावरी धरिला हातें । अष्टक म्हणे, 'आश्चर्य येथें । काय दृष्टीं देखतसों. ॥ ४ ॥ गगनींहूनि खचलें[5] बिंब । अंतरिक्षीं राहिलें नसतां स्तंभ[6] । अवलोकनें होतसे लाभ । आनंदाचा अंतरीं.' ॥ ५ ॥ दुरोनियां जोडोनि पाणी । विनीत बोले मधुरवाणी, । 'विष्णु-समान रूपगुणीं, । सूर्यवन्हीसम तेजें, ॥ ६ ॥ दिव्यदेही देवांगळा,[7] । दिव्य कुंडलें, दिव्य माळा, । दिव्यगंधीं सुतेजाळा, । दिव्यांबरें शोभित. ॥ ७ ॥ तो तूं कवण परमपुरुषा ! । सकळां हृदयीं हेचि जिज्ञासा;[8] । तुझें संकट पावे नाशा । आमचेनि दर्शनें. ॥ ८ ॥ साधुजनीं सूदल्या[9] पाठी । शक्रही पाहों न शके दृष्टीं, । सुकृतापासूनि चळला सृष्टीं । तया आश्रयो संतांचा. ॥९॥ प्रतिष्ठे-पासोनि जो भ्रष्टला । तो सत्संग योगबळें [10]वहिला, । पुढती [11]महिमेतें पावला । वंद्य झाला विश्वातें. ॥ १० ॥ वंद्यांतही वंद्य बहुत । श्रेष्ठ गुरुत्वें अभ्यागत[12] । म्हणोनि पुसावया हेत । विहितें[13] असे आम्हुतें. ॥ ११ ॥ प्रतापें प्रभुत्व वैश्वानरा[14] । प्रकाशें प्रभुत्व प्रभाकरा[15] । सर्वाधार म्हणोनि धरा[16] । गुणीं प्रभुत्वें आगळी[17]. ॥ १२ ॥ प्रियामाजी श्रेष्ठत्व कुमरा । सुहृदांमाजी आगळी दारा[18] । अतिथिपूजनामाजी चतुरा ! । श्रेष्ठत्व शिष्टा बोलिजे'. ॥ १३॥ अष्टकाचें विशिष्टोत्तर[19] । ऐकोनि बोलिला राजेश्वर । मी ययाती नहुषकुमर । पूरूपिता जाणसी. ॥ १४ ॥ सकळभूतांचा[20] अपमान । कृतपुण्याचें उच्चारण । घडलें, यालागीं महापतन । स्वर्गींहोनी पावलों. ॥ १५ ॥ प्रार्थिलें असतां देवेंद्रातें । संतसंगतीं टाकिलें मातें; । तपोवृद्धहो !

---

१. पृथ्वीवर. २. ययातिराजाची कन्या माधवी म्हणून होती तिला अष्टक, प्रतर्दन, वसुमना आणि शिबि असे चार पुत्र होते. हे अरण्यांत जेथें तप करीत होते तेथेंच ययाति आत्मश्लाघादोषानें स्वर्गांतून पतन पावला. यांनी आपलें पुण्य देऊन मातामह ययातीला परत स्वर्गी पाठविलें. ३. आकाश. ४. पुण्यानें. ५. गळून पडलें. ६. खांब, आधार. ७. देवांहून श्रेष्ठ. ८. जाणावयाची इच्छा. ९. घातल्या, आश्रय दिल्या. १०. सत्वर. ११. हा शब्द पुंलिंगी आहे, पण येथें स्त्रीलिंगी प्रयोग केला आहे. १२. अतिथि. १३. उचित. १४. अग्नि. १५. सूर्य. १६. पृथ्वी. १७. थोर, श्रेष्ठ. १८. स्त्री. १९. चांगलें उत्तर. 'विनीतोत्तर' असाही पाठभेद आहे. २०. प्राण्यांचा.

तुम्हांतें । वयोवृद्धेंहि[1] म्यां वंदिजे. ॥ १६ ॥ उत्तमपुरुष हो! परियेसा । विचारें मान्य नव्हे वयसा । वैराग्यतपें आगळी दशा । तोचि पूज्य द्विजातें. ॥ १७ ॥ वडील वृद्ध मी आपण । हा मज नाहीं मूर्खाभिमान, । वय धाकुटें तपोधन । तरी विशेष आगळा. ॥ १८ ॥ विरुद्धकर्मांचें व्यसन । याचि नांव पापाचरण, । पादीं रमती पापीजन । त्यातें सज्जन न सेविती. ॥ १९ ॥ प्राप्त असतां धन संपदा । स्पर्शलों नाहीं ऐश्वर्यमदा, । भाग्यहानीच्या विषादा[3]। पावलों नाहीं याकाळीं. ॥ २० ॥ जीव कर्माधीन सकळ, । कर्मे पावती सुख-दुःखफळ । सुखापेक्षेची जळजळ[4] । व्यर्थ वाहे अविवेकें. ॥ २१ ॥ सर्व नश्वर[5] जाणती ज्ञानी । तेथें कायसा लाभ ? कायसी हानी ? । स्वप्नीं दारिद्र्य लक्ष्मी दोनी । जागृती येतां केउती ? ॥ २२ ॥ म्हणोनि अष्टका! विवेकमूर्ती! । काय बोलणें बहुसाल युक्ती ? । विशेष लाभ, जे संगती । तुमची घडली सुकृतें.' ॥ २३ ॥ अष्टक म्हणे, 'नरेंद्रोत्तमा! । क्षेत्रज्ञ[6] तैसा बोलसी धर्मा । कवण कवणा लोकीं परमा । दिव्य भोग भोगिले? ॥ २४ ॥ कवण काळ-पर्यंत वास । देवतादेहीं सुखविलास ? । भोगिले ते सावकाश । श्रवण करवीं आम्हांतें ? ॥ २५ ॥ स्वर्ग ऐकिजे पुराणीं । परि तो मानवा अदृश्य नयनीं. । मरोनि काय होतसे प्राणी । तेंही कोण्हा नेणवे. ॥ २६ ॥ प्रत्यक्ष देखिलें भोगिलें । तें तूं बोलसी आपुले बोलें । तुझेनि मुखें जें ऐकिलें । तो निर्धार यथार्थ. ॥ २७ ॥ भोगित असतां देवसदना । कारण कोण झालें पतना ?' । ऐसें पुसतां चौघांजणां । ययाति सांगे निजमुखें. ॥ २८ ॥ 'सार्वभौम[7] मी या क्षिती । येथोनि पातलों स्वर्गाप्रती, । महर्लोकींची[8] वस्ती । सहस्र वर्षें देवांचीं. ॥ २९ ॥ तेथोनियां परमस्थान । प्रवेशलों इंद्रभुवन; । अमरावती[9] आनंदस-दन । शक्रापरी बोलिजे. ॥ ३० ॥ शतयोजनें विस्तारें । रत्नखचित सहस्र द्वारें, । जांबूनदाचीं[10] कनकागारें । भास्करोपम[11] झळकती. ॥ ३१ ॥ दिव्यांबरें[12] दिव्याभरणें । दिव्यगंधें तनुलेपनें । दिव्यस्त्रियांचीं आलिंगनें । भोग चुंबन सुरतादि. ॥ ३२ ॥ कल्पद्रुम पारिजात । कामधेनू असंख्यात, । चैत्यसोपानें[13]

---

१. 'तेजसां हि न वयः समीक्ष्यते' अथवा 'गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः' हाच अर्थ येथें दर्शविला आहे. २. अध्याय ८९ श्लोक २ पहा. ३. दुःखा, खेदा. ४. आग. ५. नाशवंत. ६. अध्याय ८९ श्लोक १४ पहा. क्षेत्रज्ञ म्हणजे महाभूतांतें जाणणारा, ज्ञाता, ज्ञानी. ७. अध्याय ८९ श्लोक १५-२३ पहा. सार्वभौम=चक्रवर्ती राजा. ८. ब्रह्मांडांतील एक लोक. हा ध्रुवनक्षत्रापासून एक कोटि योजनें उंच आहे. पृथ्वीप्रलयांत जे साधु वांचतात, ते येथें राहतात. ९. इंद्राची नगरी. १०. सुवर्णाचीं. ११. सूर्यासारखीं. १२. वसनें. १३. यज्ञमंडपाच्या पायऱ्या.

सुमंडित । चिद्रत्नीं बांधिलें. ॥ ३३ ॥ अमृतफळें फळभक्षण । अमृतरसाचें रसपान । गंधर्व अप्सरा नृत्य गायन । क्रीडा विहार पुष्पकीं. ॥ ३४ ॥ ऐसीं सहस्र वर्षें जाण । इंद्रासमान भोगितां मान । तेथूनियां विशेषस्थान । ब्रह्मलोक पावलों. ॥ ३५ ॥ इंद्रानंदासहस्रगुणी । विशेषानंद ब्रह्मसदनीं, । त्याही सुखाची शिराणी । उरली नाहीं भोगितां. ॥ ३६ ॥ वेद याग मंत्र देवता । जेथें नांदती मूर्तिमंता, । त्यांचे संगीं सुख भोगितां । सहस्र वर्षें लोटलीं. ॥ ३७ ॥ तेथोनि मागुती विशाळें । देवदेवांचीं महास्थळें । पाहोनियां अनंतकाळें । स्वर्गसौख्य भोगिलें. ॥ ३८ ॥ उच्चैःश्रवा[3] ऐरावती । विमानयानीं स्वेच्छागती, । पूजा त्रिदशांचे[5] हातीं । ईश्वरतुल्य पावलों. ॥ ३९ ॥ तेथून नंदनवना[6]आंतौतें । वर्ष अयुताचीं अनेक शतें । क्रमिल्यानंतर देवदूतें । हाक दिधली अवचितीं. ॥ ४० ॥ 'सरली सुकृताची नव्हाळी[7] । घाला सत्वर स्वर्गातळीं,' । ऐसें बोलतां तात्काळीं । पडोनि आलों या ठाया. ॥ ४१ ॥ जैसा मनुष्य लोकांत । द्रव्य गेल्या दरिद्र प्राप्त । तेवेळीं [8]सोइरे समस्त । अव्हेरिती सर्वस्वें. ॥ ४२ ॥ तयाचीपरी स्वर्गलोक । पुण्य सरतां तात्काळिक । लोटोनि सांडिती अधोमुख । तें म्यां आंगें भोगिलें. ॥ ४३ ॥ ऐश्वर्यहानीची विकळता[9] । [10]अकुमाळ नाहीं माझिया चित्ता, । विशेष लाभ जे महंता ! । तुम्हां देखिलें येकाळीं. ॥ ४४ ॥ सात्त्विक पुण्य असतां गांठी । अक्षयीं बैसे तो स्वर्गापाठीं; । रज तम स्पर्शले ते कष्टी । क्षय पावती तात्काळीं. ॥ ४५ ॥ लोलुंप्य[11]मानस विषयासक्त । जे रजतमअहंताभरित, । तप यज्ञ दानें दंभयुक्त । नरदेव करिती भूलोकीं. ॥ ४६ ॥ तें स्वप्नप्राय स्वर्गभुवन । देखोनि पावती तात्काळ पतन । इयें उभयनरकीं जाण । दुःख भोगी बहुकाळ. ॥ ४७ ॥ कंक[12] गोमायु[13] मांसभक्षक । देह धरितां दुःखदायक । म्हणोनि विवेकी सात्त्विक । निंद्यकर्म नाचरती. ॥ ४८ ॥ मौसें[14] नरकामाजी पतितें । गृध्र कंक भक्षिती त्यातें । कैसें म्हणाल तरी यथार्थें । श्रवण करा सज्जन हो ! ॥ ४९ ॥ अवचट[15] लाहोनि नरशरीर । विषय मानूनि आल्हादकर । आयुष्य नासोनि शिश्नोदर । आराधिले अधमें. ॥ ५० ॥ कार्पण्य[16] कार्पण्य अधैर्यता । परहिंसनीं[17] उत्साह चित्ता । वाग्निष्ठुरता[18] अनम्रता । ऐश्वर्य-

१. विमानांत. २. आवड. ३. इंद्राचा घोडा. ४. इंद्राच्या हत्तीची स्त्री. ५. देवांचे. ६. इंद्राचें उद्यान. ७. अपूर्वता, नवलाई. ८. अध्याय ५० श्लोक २ पहा. ९. व्याकुलता. १०. अल्प. ११. लुब्धचित्त. १२. क्रौंच. १३. कोल्हा. १४. अधोलोकसंबंधी. १५. अकस्मात्. १६. लोभीपणा, नीचपणा. १७. दुसऱ्याचा वध करण्यांत. १८. कठोर भाषण.

मर्दें जयासीं. ॥ ५१ ॥ काम क्रोध मद मत्सर । लोभ दंभ निषिद्धाचार । हिंसाकर्म पापसागर । [1]जितां जींहीं जोडिला. ॥ ५२ ॥ मरणानंतरें त्या संकटीं । केल्या पापासीं पडे गांठी । दुःख भोगितां कल्पकोटी । आराणुक असेना. ॥ ५३ ॥ साठी सहस्रवर्षें दुःखीं । यातना भोगिती यमलोकीं । ऐसीं सहस्र वर्षें हो ! कीं । अंतरिक्षीं तिष्ठती. ॥ ५४ ॥ [3]लोहचंचू [4]लोहदशनीं । कंक गोमायु त्रासिती गगनीं, । लपावया त्यालागुनी । आश्रय कोठें असेना. ॥ ५५ ॥ तेथूनि पडतां इये क्षिती । क्रूर राक्षस कवटाळिती, । तीक्ष्णदंष्ट्रा लोहदंतीं । विच्छेदिती देहातें. ॥ ५६ ॥ तेथूनि पापकर्में गर्भस्थानीं । प्रवेशती जीव प्राणी; । तीही कर्मगतीची काहाणी । तपोधन हो ! परियेसा. ॥५७ ॥ पुष्प फळ औषधी जीवन । त्याचेनि संगें गर्भस्थान । पावोनियां हीनाहीन । देह धरिती प्रारब्धें. ॥ ५८ ॥ द्विपदें चतुष्पदें षट्पदें । ऐसीं शरीरें अनेकविधें । धरोनि कर्म भोगिती [6]अब्दें । मनुष्यांचीं असंख्य. ॥ ५९ ॥ दुःखभोगाचे पर्वत । सोसितां जन्म असंख्यात । पुण्ययोगें अकस्मात । मनुष्यदेह पावती. ॥ ६० ॥ वासना लिंगदेहाकार । शुभाशुभकृत संस्कार । अन्नोदकीं [8]षड्रससार । वीर्यरूपें अवगती. ॥ ६१ ॥ ते मन्मथ योनिस्थानीं । रक्तरेताचिया मिळणी । गर्भ आकारे हे करणीं । प्रारब्धाची विचित्र. ॥ ६२ ॥ नारीत्व नरत्व क्लीबत्व[9] जाण । सुरूप कुरूप दुर्गुण सगुण । अवयव [10]सांग छिन्नभिन्न । पापपुण्यें पावती. ॥ ६३ ॥ ऐसा अवतरे शरीराकारें । तंव तो व्यापिजे अहंताभरें । मी मी म्हणतां ब्रह्मांड न पुरे । प्रबळस्वार्थें आपुल्या. ॥ ६४ ॥ मनोगुण इंद्रियां [11]चेवविती, । इंद्रियें विषयांतें शोधिती, । विषय लाभालाभ देती । लोभा आणि शोकातें. ॥ ६५ ॥ तींच जन्मांतराचीं बीजें । हें वर्म कोणा नेणवे सहजें । शरीरसुखाचेनि [12]ओजें । सत्य संसार भाविला. ॥ ६६ ॥ आयुष्यक्षयीं मरणधर्म । पावतां लोपे रूप नाम । तेवेळीं कृमि विष्ठा भस्म । होऊन शरीर हारपे. ॥ ६७ ॥ कर्में करितां देह पडला । वासनारूपें जीव बांधला, । तो स्वप्नप्राय टाकूनि गेला । जन्मालागीं मागुती. ॥ ६८ ॥ पुण्याधिक्यें स्वर्गनमन, । पापाधिक्यें अधःपतन, । पापपुण्य समसमान । तैं नरदेह पाविजे. ॥ ६९ ॥ पापपुण्यें ज्ञानानळीं । ज-

१. जिवंत असतां. २. विश्रांति. ३. लोखंडासारखी चोंच. ४. दांत. ५. अध्याय ९० श्लोक १०-११ पहा. ६. वर्षें. ७. वासनात्मक देह. ८. मधुर आम्ल तिक्त इत्यादि सहा रसांचें सार. ९. नपुंसकत्व. १०. परिपूर्ण. ११. चेतविती. १२. तेजानें, चकाकीनें.

ळोनि जाती जैं समूळीं, । तैं मोक्षश्रियेचे रांउळीं । अच्युतानंद[2] भोगणें. ॥ ७० ॥ एवं संसारीक जीवा । कथिला क्षयजन्मप्रस्तावा । परी आत्मनिष्ठा महानुभावा । संबंध याचा असेना. ॥ ७१ ॥ याहून अष्टका! विवेकमूर्ती! । पुसावयाची आवडी चित्तीं । काय वर्ते तें मजप्रती । बोल वैहिलें[3] गुणज्ञा!' ॥ ७२ ॥ मातामहातें[4] दौहित्रें । प्रश्न करिती अतिपवित्र, । 'सर्वज्ञते एक पात्र । क्षेत्रज्ञ[6] विष्णू विश्वात्मा. ॥ ७३ ॥ तयातुल्य तूं आमुतें । वचन बोलसी स्नेहभरितें, । आतां सांगिजे सर्वांतें । आवडी असे सांगावया. ॥ ७४ ॥ स्वर्गलोकीं अक्षय सुख । कोणते साधनें साधक, । पावती ज्यां पतनदुःख । कल्पांतींही स्पर्शेना. ॥ ७५ ॥ दान तप योग याग । यामाजी साधन कोणतें चांग?' । ययाति म्हणे, 'हो! निर्व्यंग । मार्ग परिसा निश्चय. ॥ ७६ ॥ स्वर्गाचीं सप्त द्वारें । संत बोलती निजनिर्धारें, । जेथें पतनभयाचें वारें । लागों न शके सर्वथा. ॥ ७७ ॥ दंभ फळाशा अहंता मानें । स्पर्शलीं दिसती जीं साधनें । तीं तीं देती अधःपतनें । फळ हातींचें हिरोनियां. ॥ ७८ ॥ पहिलें तप दुसरें दान । शम दम पांचवी लज्जा जाण, । आर्जव सातवें भूषण । सर्वां भूतीं अं[10]नुकंपा. ॥ ७९ ॥ स्तुतिश्वानाचें विटाळीं । न शिवती निष्काम नव्हाळी[11], । म्हणोनि अक्षयी आनंदरांउळीं[12] । अचळ भोग भोगिती. ॥ ८० ॥ इहीं द्वारीं जो साधक । प्रवेशला अक्षयी सुख; । अनंत कल्प गेलिया दुःख । कर्णं न शिवे तयाचा. ॥ ८१ ॥ वेदशास्त्राभिमानमदें । पूजापांडित्यमानोन्मादें[13] । सभेमाजी हेळणाशब्दें । परांचीं यशें नाशिती. ॥ ८२ ॥ तयांतें अंतवंत[14] लोक । जन्मोजन्मीं वाटे दुःख । फळ तात्काळ पावतां अनेक । अंतराय[15] नागविती. ॥ ८३ ॥ ईश्वर वेद विद्या तीन्हीं । फळें न देती बहु साधनीं । ऐसा निश्चय अंतःकरणीं । जाणतेने जाणिजे. ॥ ८४ ॥ अन्न जिववी परिमितआहारीं । अधिक झालिया तेंचि मारी, । तैसीं कर्में द्विप्रकारीं । भयाभयें प्रसवती. ॥ ८५ ॥ एक अग्निहोत्र, दुसरें मौन, । तिसरें [16]सांगवेदाध्ययन, । चौथें कर्म सर्वयज्ञ । संस्था

---

१. देउळ. २. ज्या आनंदास नाश नाहीं असा. ३. सत्वर. ४. आईच्या (माधवीच्या) पित्यातें. (ययातीतें.) ५. कन्यापुत्र. (माधवीपुत्र.) ६. शरीरवासी जीव. ७. अध्याय ९० श्लोक ८ पहा. ८. दोषरहित. ९. तप, दान, शम, दम, ऱ्ही, आर्जव आणि सर्वभूतानुकंपा हीं सात द्वारें. (अध्याय ९० श्लोक २२.) १०. कृपा. ११. अपूर्वता. १२. देवालयीं. १३. मान + उन्मादें. १४. नाशवंत. (अध्याय ९० श्लोक २५ पहा.) १५. विघ्नें. १६. शिक्षा, कल्प, व्याकरण, छंदस्, ज्योतिष्, आणि निरुक्त हीं वेदाचीं सहा अंगें त्यांसह वेदपठण.

एकविंशति. ॥ ८६ ॥ चारी निष्कामविहिताचारें । अभयप्रद निजनिर्धारें । सकामता साहंकारें । हींच देती भयातें. ॥ ८७ ॥ जो[1] सन्मानें न पावे हर्षा, । अवमानें नये संताप रोषा, । तो देवलोकीं पवित्र पुरुषा । पूजा पावे विशेष. ॥ ८८ ॥ परी असाधु[2] वा मंदा । साधुबुद्धि नुपजे कदा, । म्हणोनि उभय-लोकीं आपदा । अनंतकाळ भोगिती. ॥ ८९ ॥ म्हणोनि मद्वाक्यव्रतवैभवें । द्यावें यजावें अभ्यासावें । तरीच श्रेय, येरवीं पावे । भय दारुण साधक'. ॥९०॥ अष्टक म्हणे, 'अगा! वडिला ! । चहूं[3] आश्रमामाजी वहिला । अक्षय लोकातें पावला । सांग कोण तो निवाडें'. ॥ ९१ ॥ ययाति म्हणे, 'आश्रमधर्मीं । कृत्रिमकर्मं सकामकर्मीं । ते अक्षयीं देवधामीं । सुख पावती कैसेनी? ॥ ९२ ॥ साक्षेपें जाऊनि गुरुकुळीं वसे । सुविद्या साधिती अनालस्यें । न सांगतां गुरु-कार्य उल्हासें । एकला अंगीं संपादी. ॥ ९३ ॥ सर्वांपूर्वीं प्रभाते उठी । वेद-विष्णुस्मरणपरिपाटी[6] । निद्रा करि समस्तां पाठीं । गुरुशुश्रूषा संपल्या. ॥ ९४ ॥ मृदु दांत धृतिमंडित । जिव्होपस्थादिजयें शोभित । सावधानें अप्रमत्त । स्वा-ध्यायशील सर्वदा. ॥ ९५ ॥ ऐसा तो ब्रह्मचारी एक । पावे अक्षयी ब्रह्मलोक । येरा क्षयरूप स्वर्ग नरक । कदा न सुटे सर्वदा. ॥ ९६ ॥ धर्मन्यायें धनाची प्राप्ती । तेणें अर्ची देव अतिथी । पराचा अर्थ न शिवे हातीं । न देतां कां दे-तांही. ॥ ९७ ॥ स्वीकारी न्यायार्जित धन, । तत्त्वज्ञानीं निष्ठा पूर्ण, । अतिथीचें प्रेम गहन । प्राणमित्रासारिखें. ॥ ९८ ॥ परोपकारीं कीं श्राद्धोद्देशें । जोडिलें वेंची धन उल्हासें । प्राणसंकटीं सायासें । असत्य तोंडीं न बोले. ॥ ९९ ॥ ऐसा एकची गृहस्थ जाण । पावे अक्षय ब्रह्मसदन । यया वेगळें, तयां पतन । प्राप्त होय जाणावें. ॥ १०० ॥ आतां वानप्रस्थ वनवासी । सांडिला अवगुण दोषी । आपुले शक्ती उदरपोषी[11] । आणि अतिथी आलिया. ॥ १०१ ॥ अर-ण्यद्रव्यें दातृत्वविधी । मागोनि परातें संताप नेदी । तो वानप्रस्थ अक्ष-यपदीं । अधिकारिया जाणावा. ॥ १०२ ॥ जेणें रंजती जयांचीं मनें । पूजा प्रतिष्ठा वाटे जेणें । केलें काया वाचा मनें । प्रगट नेणें लौकिकीं. ॥ १०३ ॥ परगृहीं नसे, [12]न वसे मठीं । सर्वत्र मुक्त स्नेहाच्या गांठीं । ज्याचें जितेंद्रियत्वें

१. अध्याय ९० श्लोक २५ पहा. २. दुर्जन. ३. ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ आणि संन्यास असे चार आश्रम. ४. अध्याय ९१ श्लोक १ पहा. ५. पूर्वोत्थायी. ६. अनुक्रम. ७. जि-तेंद्रिय. ८. अध्याय ९१ श्लोक २ पहा. ९. धन. १०. अध्याय ९१ श्लोक ३ पहा. ११. स्ववीर्यजीवी. १२. रहात नाहीं.

सृष्टीं । निर्लोभ शांती आथिली. ॥ १०४ ॥ वृक्षारण्यीं[1] निद्रास्थळ । असणें वसणें स्वल्पकाळ, । अनेकदेश अटतां[2] मळ । संग न लगे दुजियाचा. ॥ १०५॥ मळमूत्रप्राय प्रमदा[3] धन । त्यागिलें न करी अवलोकन । शिष्योपाधी गुरुत्व मन । श्वान संगीं पाळीना. ॥ १०६ ॥ ऐसियापरी जो संन्यासी । पावे अक्षयब्रह्मपदासीं, । इतर वेषधारी त्यांसीं । अधःपात[4] चुकेना. ॥ १०७ ॥ अविद्यारात्रीनें जिंकिले लोक । भोगिती अविहित[5] कामसुख,[6] । परमार्थक्रिया कौतुक । लोपलें दृष्टीं देखेना. ॥ १०८ ॥ ऐसी प्रपंचलोकरहाटी[7] । रात्री मानूनि विचारदृष्टी । विवेकदिवसें साधु जगजेठी[8] । अरण्यवासी जितात्मा. ॥ १०९ ॥ सर्व भूतांची[9] जे निशा । तेच तयाची जागृति दशा । विश्व जागें तेथें सहसा । जागा नव्हे संकल्पें. ॥ ११० ॥ ऐसियेपरीचा विजनवासी[10] । अभ्यंतरीं[11] सिद्धसंन्यासी, । उभयलोकीं मान्यता त्यासी । विष्णुसमान जाणिजे. ॥ १११ ॥ दहा पूर्वे दहा पर । ज्ञातीसहित एकवीस नर । उद्धरोनी पुण्यद्वार । अक्षयसुखीं नांदवी.' ॥ ११२ ॥ अष्टक म्हणती, 'वक्तया गुणी । ब्रह्मनियम व्रतस्थ मौनी। मननशीळ दुसरा मुनी । कोणता येथें आगळा? ॥ ११३ ॥ एक गृहस्थ एक त्यागी । यांमाजी विशेष कोण तो जगीं? । पूजा पावोनि अक्षय स्वर्गीं । अचळसौख्य भोगितो.' ॥ ११४ ॥ ययाति बोले सिद्धांतवचन, । 'साधु हो! तुम्ही विचक्षण.[12] । जाणतसां, परी पुढें श्रवण । माझेनि मुखें करितसां. ॥ ११५ ॥ विवेककुशळ ज्ञानराशी । तो ग्रामीं असोनि अरण्यवासी । वनीं असोनि ग्रामवासी । मनासंगीं सकाम. ॥ ११६ ॥ लौकिक वार्ता विषय काम । अर्थ स्वार्थ कपटोद्यम[13] । हानिकाळीं संताप श्रम । ऐशियां दोषां वेगळा. ॥ ११७ ॥ ऐसा गृहस्थ गृहनिवासी । तपोवनींचा तो वनवासी, । संन्यासाचें फळ तयासी । ठेविलें असे आइतें. ॥ ११८ ॥ वनीं असोनि वनिताधन[14] । स्मरोनि सर्वदा झुरे मन । ग्रामवार्ता करी श्रवण । ग्रामकर्मीं उद्यत. ॥ ११९ ॥ तो वनीं वसोनि ग्रामवासी । योग ना भोग तयासीं, । फळ नेदिती निश्चयेंसी । जाणतेणें[15] जाणिजे. ॥ १२० ॥ अनग्नी[16] अनिकेतन[17] अगोत्राचरण । कौपीनावीन[18] न

---

१. अनोकशायी. २. फिरतां. ३. स्त्री. ४. पुण्यक्षयामुळें स्वर्गापासून मृत्युलोकीं अथवा नरकांत पडणें. ५. अयोग्य, अनुचित. ६. विषयसुख. ७. रीति. ८. श्रेष्ठ. (जेठी—ज्येष्ठ—म्हणजे 'वयानें मोठा' असा अर्थ, पण कालांतरानें 'बळानें मोठा' असा अर्थ झाला.) ९. भगवद्गीता—अध्याय २ श्लोक ६९. १०. एकांतस्थळीं रहाणारा. ११. आंत, अंतरीं. १२. ज्ञानी, शहाणे. १३. उद्योग. १४. स्त्री. १५. जाणणारानें. १६. अग्नीरहित. १७. गृहरहित. १८. अध्याय ९१ श्लोक ११-१८ पहा. कौपीन=वस्त्रविशेष, लंगोटी.

ठेवी वसन । प्राणधारणमात्रें [1]अशन । स्वादास्वादविरहित. ॥ १२१ ॥ तो वसो ग्रामीं अथवा वनीं । फळ सारिखें दोहीं स्थानीं, । स्वर्गसौख्यें तयाचे चरणीं । [2]बोळंगती सर्वदा. ॥ १२२ ॥ परित्यागूनि सकळ कामा । जितेंद्रिय युक्तकर्मा । मुनी मौनअचळनेमा । अवलंबोनि जो असे. ॥ १२३ ॥ तो परलोकीं अक्षयसिद्धी । निश्चय पहा हो! हे त्रिशुद्धी । सुखें क्षयाची क्षयव्याधी । कल्पांतींही जाणेना. ॥ १२४ ॥ [3]कृंतनख [4]धौतदंत । सदा सुस्नात अलंकृत । निष्काम स्वधर्मकर्मरत । तोचि पूज्य देवांतें. ॥१२५॥ तपें कर्षी बळ समस्त । क्षीणमांस[5]अस्थी[6]शोणित । तेणें इहलोक परलोकार्थ । जिंतिला हें जाणिजे. ॥ १२६ ॥ धनूच्या ऐसें अधोमुख । आहार सेविती करूनि एक । तेणें [7]हेळूंनि सर्वलोक । मोक्ष[8]धाम जिंतिलें. ॥ १२७ ॥ अंतरीं निरभिमान चित्तें, । तरीच फळती बाह्यव्रतें, । बाहेर क्रिया बहिर्मुखांतें । सोंगप्राय जाणावीं. ॥ १२८ ॥ निर्लोभ निर्मान निर्दंभ । तो देवातें भक्त दुर्लभ, । भक्तांसी देव अति सुलभ । काष्टीं तृणीं पाषाणीं. ॥ १२९ ॥ लाहोनि आयुष्याची प्राप्ती । जन्मोनि वेंचले परमार्थीं । ते सभाग्य ऐसें पुढतपुढती । काय लागे सांगणें? ॥ १३० ॥ परि ते भोगूनि विषयसुख । [10]शेखीं विरक्ती पावोनि देख । उरल्या आयुष्यें परलोक । साधिती ते सुधन्य. ॥ १३१ ॥ अनेकसाधनीं अनेकपंथीं । श्रम पावले नेणों किती? । मीही तरलों सत्संगतीं । तुमची घडली येकाळीं.' ॥१३२॥ ऐकोनि ययातीचें वचन । चौघे पावले समाधान । घालोनियां लोटांगण । अत्यादरें बोलती.॥१३३॥ अष्टक प्रतर्दन वसुमना । चौथा [11]उशीनरपुत्र जाणा । शिबीनृपाळ ज्याचिया गुणा । तुळणा आन असेना. ॥१३४॥ चौघे म्हणती मातृजनका । 'आमुचिया तपोबीजास्तव देखा । फळस्वरूपीदिव्यलोका । कोणकोणा देखावें. ॥ १३५ ॥ [12]देवीं अथवा अंतरिक्षीं । जें जें तुवां लक्षिलें [13]चक्षीं । तें निरोपीं वचन साक्षी । तुझी आम्हां प्रमाण. ॥१३६॥ कैसे तेथील भोग विशाळ । कवणकाळपर्यंत [14]अचळ.' । ययाती म्हणे, 'वाचा [15]विकळ । सांगों जातां होतसे. ॥ ३७ ॥ जंवपर्यंत इये क्षिती । नरसंचार गोसंगती । अरण्यपशु वनपर्वतीं । बुद्धिवंत देखिजे. ॥ १३८ ॥ तंवपर्यंत तुमचे

१. आहार. २. आश्रय करिती. ३. नखें काढलेला. ४. दंतधावन केलेला. ५. हाडें. ६. रक्त. ७. निंदून. ८. गृह. ९. पुन: पुन:. १०. अंतीं. ११. उशीनर हा भोजनगरीचा राजा. यास ययातिकन्या माधवी हिजपासून शिबि नामक पुत्र झाला. १२. देवलोकीं. १३. नेत्रांनीं. १४. स्थिर. १५. असमर्थ.

लोक । भोगविती अक्षय सुख । जेथें पतनभयाचें दुःख । कल्पांतींही स्पर्शेना. ॥ १३९ ॥ [1]घृतकुल्या क्षीरसरिता । रत्नवापिका अमृतभरिता । मधुबिंदूंचा अखंडिता । मेघ वर्षे सुधारीं. ॥ १४० ॥ याही वेगळीं अनंत सौख्यें । काय विस्तारूं यामुखें ? । जीं तुमचेनि सुकृतें चोखें । भोगावया [2]वोगेरिलीं. ॥ १४१ ॥ चंद्रसूर्याचेनि प्रकाशें । भूतळीं वर्तती जीव मानुषें । तंववरी तुम्हां सावकाशें । शाश्वतलोकीं सुखवस्ती. ॥ १४२ ॥ ऐसें परिसोनि तयेकाळीं । चौघांजणीं उदकअंजुळी । संकल्प घातला भूतळीं । [3]मातामहा सन्मुख. ॥ १४३ ॥ म्हणे, 'आमचें लोकराया ! । सुकृत वोपिलें तुझ्या पाया, । त्यागोनियां पतनभया । शीघ्र होईं स्वर्गस्थ. ॥ १४४ ॥ पायें स्पर्शो नको ये [4]क्षिती, । त्वरें आरूढें ऊर्ध्वपंथीं; । आम्ही जोडिली स्वर्गसंपत्ती । भोगीं शक्रासारिखा.' ॥ १४५ ॥ राजा बोले स्वधर्म युक्ती, । 'कांहीं क्षत्रीं क्षत्रियांप्रती । [5]प्रतिग्रह घेतला हें ग्रंथीं । नाहीं अद्यापि ऐकिलें. ॥ १४६ ॥ ज्यासी अयोग्य जें का सृष्टीं । तो तें सेवीना संकटीं, । दारिद्र्यें पीडितां स्वधर्मसृष्टी । म्लेच्छवृत्ती निघेना. ॥ १४७ ॥ [6]दौहित्रे म्हणती, 'पूर्वजातें । आम्हीं अपत्यें [7]अन्वयजातें । आमुच्या [8]अर्जिल्या अर्थातें । अधिकार तूतें घ्यावया. ॥ १४८ ॥ म्हणोनि येविषयीं कांहीं । प्रतिग्रहाचा दोष नाहीं, । आम्ही तरणें शक्तिमंत पाहीं । पुढती करूं तपातें.' ॥ १४९ ॥ ययाती बोले, 'सप्रेममेळें । फळ देऊन घेइजे मोलें । पतिता मातें उद्धरिलें । हेंचि फळ हो तात्काळीं.' ॥ १५० ॥ ऐसें उभयतां संवादत । तंव [9]हिरण्यमय पांचहि रथ । गगनींहूनि अकस्मात । येतां दृष्टीं देखिले. ॥ १५१ ॥ दिव्यपताका दिव्य[10]सुमनीं । घंटाघोष दिव्य गाणीं, । दिव्यदुंदुभीच्या ध्वनीं । पांच [11]यानें पातलीं. ॥ १५२ ॥ सन्मानूनि देवदूतीं । ययाती वाहिला एके रथीं । चारी आणिले चौघांप्रती । न बैसती विरक्त. ॥ १५३ ॥ म्हणती, 'मागील अल्प स्वल्प । देवोनि [12]धडौता केला नृप; । आतां मागुती मांडूनि तप । पुण्यजोडी जोडणें. ॥ १५४ ॥ अवचक धनाचा ठेवा । ओपूनि पाठविलें पार्थिवा, । नवें सुकृत जोडूं जेव्हां । येणें घडे ते काळीं. ॥ १५५ ॥ सहज येऊं मागिलेकडे । आतां नेईं ययाती पुढें । याचेनि भाग्यगौरवें [13]कोडें । सर्व पुरलीं आमुचीं.' ॥ १५६ ॥ दूत करिती विज्ञापना । 'तुम्हीं [14]सुकृतें दि-

---

१. तुपाची नदी. २. वाढलीं, ओंगरलीं. ३. आईचा बाप ययाति. ४. पृथ्वी. ५. दानाचा स्वीकार. (अध्याय ९२ श्लोक १२-१३). ६. नातू. (मुलीचे पुत्र.) ७. अन्वयांत (वंशांत) झालेलीं. ८. संपादिलेल्या. ९. सुवर्णमय. १०. पुष्पें. ११. विमानें, रथ. १२. धड, सांग, पूर्ण. १३. हौस. १४. पुण्यें.

धर्ली दाना, । त्याचें फळ सहस्त्रगुणा । ग्रंथीं तुम्हीं बांधिलें. ॥ १५७ ॥ ऐसें जाणोनि जगदीश्वरें । आमुतें पाठविलें आदरें, । पतितउद्धरणीं अपारें । महापुण्यें जोडती. ॥ १५८ ॥ अग्निनें जळतां, जळीं बुडतां, । शिरच्छेदनीं प्राणदाता, । दुर्भिक्षकाळीं प्रतिपाळिता । अन्नदानीं दीनातें. ॥ १५९ ॥ सकळपुण्यफळ सकळ । पुरुषार्थ मुक्ती एक वेळ । देऊनि ईश्वर सर्वकाळ । तयाजवळ तिष्ठत. ॥ १६० ॥ सुकृत स्वयें देऊनि हातीं । पुढिला संरक्षी आकांतीं, । त्याची वेचली पुण्यग्रंथी । म्हणतां मूर्ख निर्धारीं. ॥ १६१ ॥ भूमी पडतां प्रतिष्ठिता तें । जो कां उठवी आपुले हातें, । त्रैलोक्याचीं सर्व सुकृतें । टाकूनि येती यापासीं. ॥ १६२ ॥ म्हणोनि सांडा आग्रहवाणी । बलात्कारें वाहूं यानीं.' । मग हांसोनि पंच विमानीं । पांचही जण बैसले. ॥ १६३ ॥ क्रमित असतां सुरमंडळें । शिबीचें विमान अतिझळाळें । पुढें धांवतां जैवागळें । तिघे पूसती नृपातें. ॥ १६४ ॥ 'एकसारिखें तपआचरण । सत्र आम्हीं इंद्रासी मान्य, । संगियां मागें सांडोनि आपण । शिबी चमके पुढारां. ॥१६५॥ ययाती ! शांत महानुभावा ! । इयेविषयीं कायसा हेवा ? । गुणीं विशेष तो [illegible]वा । विशेषाकारें पावतु. ॥ १६६ ॥ शरीरा व्हावया सुख । जगीं जोडिले मार्ग अनेक, । येणें शरीरें तिहीं देख । परोपकारा वेंचिलें. ॥ १६७ ॥ दान तप सत्य धर्म । ह्री श्री क्षमा सौम्यता नेम । तितिक्षादीगुणलल्लाम । अवयवप्राय या देहीं. ॥ १६८ ॥ धातूमाजी जांबूनद । रत्नीं पद्मराग प्रसिद्ध, । तैसा आम्हांमाजी तपोवृद्ध । पुण्ययोगें आगळा. ॥ १६९ ॥ यालागीं पुढें असे जात । हा आमुतें आल्हाद बहुत.' । असो क्रमोनि ऊर्ध्वपंथ । अक्षय धाम पावले. ॥ १७० ॥ ऐसियापरि पांचही मूर्ति । पावले उत्कर्षें परमगती । जन्मेजया ! विशाळकीर्ती । ययात्यादि वसती सभाग्य. ॥ १७१ ॥ ऐसा दौहित्रीं ययाती । पतित नेला ऊर्ध्वगती, । यालागीं संतांची संगती । साधन करी प्रयत्नें. ॥ १७२ ॥ ऐसे हे ययातीचे दौहित्र । चौघे माधवीचे सुपुत्र । यांचें सविस्तर चरित्र । उद्योगपर्वीं परिसणें. ॥ १७३ ॥ ययातीचें महदाख्यान ।

---

१. दुकाळीं. २. संकटीं. ३. निश्चयें. ४. ययाति, अष्टक, प्रतर्दन, वसुमान् आणि शिबि. ५. मोठ्या वेगानें. ६. लज्जा. ७. सहन करणें इत्यादि गुणास भूषण. ८. सुवर्ण. (जंबूनदींत उत्पन्न झालेलें.) ९. माणिक, रत्नविशेष. १०. उद्योगपर्व—अध्याय १२०-१२३ यांत माधवीपुत्रांचें सविस्तर वर्णन आहे. 'उद्योगपर्वीं परिसणें' ह्या उल्लेखावरून मुक्तेश्वरानें 'उद्योगपर्व'रचना केली असावी अथवा करण्याचा विचार असावा असें वाटतें.

परिसे, पढे ज्याचें वदन, । तो ययातीअष्टकासमान । अक्षयलोक स्वानंदप्रदा । ॥ १७४ ॥ पूर्व उत्तर द्वय [1]यायात । सविस्तरें निरोपिलें येथ । वनितचतुरीं सावचित्त । भीष्मोत्पत्ति परिसणें. ॥ १७५ ॥ व्यास वैशंपायन ॥ ॥ । तिघांमुखींचें उच्छिष्ट क्षिती । सांडलें तें सज्जनमती । स्वीकारलान अनुवाद.॥१७६॥ लीलाविश्वंभरप्रसादें । मुक्तेश्वरअवधूतगुणानुवादें । भारत[2]नलिनीचीं [3]अरविंदें । महदाख्यान सुपंक्ती. ॥ १७७ ॥ चतुर[4]चंचरीकांची [5]मांदी । सेवितां मातली ब्रह्मानंदीं, । साधुसाधु इहीं शब्दीं । गुंजारवें गर्जत. ॥ १७८ ॥

अध्याय एकविसावा.

[6]वसुंधरेचा ईश्वरु । राजयां राज परमेश्वरु । जनमेजय [7]रत्नाकरु । चातुर्याचा [8]अनुवादे. ॥ १ ॥ 'वैशंपायना! विवेककुशळा! । आत्मपूर्वजापासून सकळा । मजपर्यंत नाममाळा । पूर्वजांची परिसवीं. ॥ २ ॥ जे ऐकतां श्रवणसंपुटीं । प्रत्यक्ष देखिलें वाटे दृष्टीं, । तुझिया मुखींच्या सुंदर गोष्टी । [9]पीयूषपानासारिख्या. ॥ ३ ॥ जंव जंव हे कथावल्ली । सुरस जातसे पाल्हाळीं. । तंव तंव हर्षाची आगळी । [10]वाढी मातें होतसे.' ॥ ४ ॥ हांसोनियां वैशंपायन सुमती । म्हणे, 'परियेसीं जगतीपती! । आदिकेशव ब्रह्ममूर्ती । पिता [11]पितामहाचा. ॥ ५ ॥ तयाचे [12]नाभिसरोजीं जाण । जन्म पावला [13]चतुरानन; । त्या चतुराननाचा नंदन । दक्ष ब्रह्मा दूसरा. ॥ ६ ॥ त्या दक्षाचें कन्यारत्न । देवी अदिति गुणसंपन्न; । अदितीचा [14]विवस्वान; । [15]मनू पुत्र तयाचा. ॥ ७ ॥ मनूची कन्या जाण इळा; । इळेचा [16]पुरूरवा नृपाळा!; । पुरूरव्याचा ज्ञानकुशळा! । आयूनामा नरेशु. ॥ ८ ॥ आयूचा नहुष नरेंद्र, । जो [17]इंद्रपदीं दुसरा इंद्र; । नहुषाचा गुणसमुद्र । ययाती मागें कथिला जो. ॥ ९ ॥ ययातीचा पूरु प्रसिद्ध, । [18]कौसल्यात्मजा तयाची [19]वधु; । तीपासाव गुणैकसिंधु । [20]जं-

---

१. ययातिचरित्र. याचे पूर्व यायात आणि उत्तर यायात असे विभाग मूळभारतांत आहेत. २. कमलिनीचीं. ३. कमळ. ४. भ्रमरांची. ५. जमाव. ६. पृथ्वीचा. ७. सागर. (रत्न+आकर= रत्नांची खाण.) ८. बोले. येथून 'संभवपर्वा'स आरंभ होतो. ९. अमृतप्राशनासारख्या. १०. वृद्धि. ११. ब्रह्मदेवाचा. १२. नाभिकमळीं. १३. ब्रह्मदेव. (चार आहेत तोंडें=आननें ज्याला तो.) १४. द्वादश आदित्यांतील एक. १५. वैवस्वत मनु. १६. याच राजाची स्त्री उर्वशी. १७. वृत्रासुराच्या हत्येनें त्रस्त होउन इंद्र जळांत विश्रांति घेत असतां, देवांनीं आणि मुनिजनांनीं मिळून नहुषास इंद्रपदाचा अधिकारी केलें होतें. १८. कौसल्या नामक मुलगी ही पुरूची स्त्री. (आदिपर्व—अध्याय ९५ श्लोक ११.) १९. स्त्री. २०. जनमेजय.

॥ [illegible] ॥ [illegible]रा. ॥ १० ॥ तेणें जन्मेजयें राया ! । [1]माधवी नामें वरिली जाय.[illegible] । [illegible] उदरीं जन्मला तया । [2]प्रचिन्वान हें नाम. ॥ ११ ॥ [3]सूर्य-उदयप[illegible] । [4]प्राची जिंतिली [5]आटोपें, । प्रचिन्वान रूढ प्रतापें । पूर्वज तुमचा तेराव[illegible]. ॥ १२ ॥ प्रचिन्वानें [6]अश्मकीनाम्नी । सैंवरीं वरिली लावण्य-खाणी, । तिच्या उदरीं जन्मला गुणी । संयाति राजा या नामीं. ॥ १३ ॥ संयाति [7]दृषद्वदुहिता । पट्टमहिषी वरिली कांता, । तिचा कुमर वसुधानाथा ! । अहंयाती जाण पां. ॥ १४ ॥ संयातीचा अहंयाती । कृतवीर्यकन्या भानुमती । वरिली, तिचा पुत्र सुमती । सार्वभौम या नांवें. ॥ १५ ॥ पुढती [8]कैकेयराजदुहिता । सुनंदा नामें चातुर्यभरिता । सार्वभौमें वरिली कांता, । जयत्सेन तयाचा. ॥ १६ ॥ [9]सुश्रवा वैदर्भराजतनया । जयत्सेनें [10]पर्णिली भार्या, । तिच्या जठरीं जन्मला राया ! । अवाचीन नृपनाथ. ॥ १७ ॥ अवाचीनाची [11]अंतुरी [12] । मर्यादा, विदर्भी दुसरी, । [13]महाभौम तिच्या उदरीं । प्रतापवंत जन्मला. ॥ १८ ॥ महाभौमें भोगितां उर्वी । [14]प्रासेनजिती सुमाधवी । वरिली, तिच्या उदरीं जन्मवी [15]प्राचीनधन्वा सुचंद्र. ॥ १९ ॥ आब्दकी सुजन्या सुनाम्नी । प्राचीनवंश[illegible]ची सुपत्नी, । तीचा तनय परमगुणी । [16]अयुतनायी बळिष्ठ. ॥ २० ॥ अयुतनायीची अंगना । पृथुश्रवादुहिता कुरुनंदना ! । कामा नाम, [17]तयांचा जाणा । अक्रोधन नृपनाथ. ॥ २१ ॥ अक्रोधनाची [18]शुभमानिनी । [19]रेणुका-लिंगी [20]अभिधानीं, । तीचा तनय [21]प्रतापतरणी । देवातिथी धार्मिक. ॥ २२ ॥

---

१. अनंता माधवी. २. 'प्राचिन्वान्' असें पाहिजे. ३. उदयाचलपर्यंत. जनमेजयपुत्रानें उदयाचलपर्यंत एका दिवसांत प्राची दिशा जिंकिली म्हणून त्यास 'प्राचिन्वान्' असें नांव पडलें. (आदिपर्व—अध्याय ९५ श्लोक १२.) ४. पूर्वदिशा. ५. डौलानें. ६. अश्मकी यादवी. ७. वरांगी दृषद्वती. ८. सुनंदा कैकेयी. ९. नामविशेष. १०. परिणय केला=विवाह केला. ११. स्त्री. १२. ही विदर्भाधिपाकडची दुसरी कन्या, पहिली सुश्रवा वैदर्भी. १३. अवाचीन+मर्यादा यांचा पुत्र अरिह, अरिहाची स्त्री आंगी आणि अरिह+आंगी यांचा पुत्र महाभौम असें वर्णन पाहिजे. (अध्याय ९५ श्लोक १८-१९ पहा.) १४. सुयज्ञा प्रासेनजिती. १५. ओंवी १९-२० यांस महाभारतांत आधार नाहीं. कदाचित् या वर्णनांत जो फरक दिसतो त्यास कारण मुक्तेश्वराची महाभारताची पोथी विद्यमान मुद्रित ग्रंथाहून स्थलविशेषीं भिन्न असावी असें वाटतें. महाभौम+सुयज्ञा यांचा पुत्र अयुतनायी असें महाभारतांत वर्णन आहे. (अध्याय ९५ श्लोक २०.) १६. यानें यज्ञांत अयुत पुरुष आणले म्हणून याला 'अयुतनायी' असें नांव पडलें. १७. 'तियेचा जाण । अक्रोधन नृपनाथ' असाही पाठ आहे. १८. 'शुभ कामिनी,' 'शुभ भामिनी' असे पाठभेद आढळतात. १९. 'करंभा कालिंगी' असें पाहिजे. (अध्याय ९५ श्लोक २२ पहा.) २०. नांव. २१. प्रतापसूर्य.

तीचेन वैदभी मर्यादा । देवातिथीची पुण्यप्रमदा, । तिच्या उदरीं [illegible] अरिहनामा सुपवित्र. ॥ २३ ॥ सुदेवा आंगेयी याचि नामें [illegible] व-रिली राजधर्में, । तिचा पुत्र पराक्रमें । ऋक्षनामा पूरुवंशी. [illegible] २४ ॥ ज्वाळानामें तक्षकदुहिता । ऋक्षें आणून केली कांता, । तिच्या उदरीं धरित्रीनाथा ! । मतिनारनामा जन्मला. ॥ २५ ॥ मतिनारें स्वधर्माचारी । पवित्र सरस्वतीच्या तीरीं । संपूर्ण द्वादशवर्षेंवरी । दीर्घ सत्र आचरला. ॥ २६ ॥ यज्ञसमाप्ती होतां तेथ । नदी अंगें मूर्तिमंत । देवांगनावेषें त्वरित । माळ घाली रायातें. ॥ २७ ॥ सरस्वतीसीं भोगितां भोग । राजवीर्यें अति अमोघ । कुमार जन्मला सभाग्य । तंसुनामा प्रसिद्ध. ॥ २८ ॥ तंशु कालिंदीसंयोगें । ई-लिन जन्मविला संभोगें, । ईलिनसुरतानंदयोगें । दुष्यंतराजा निपजला. ॥२९॥ दुष्यंतभार्या शकुंतला । जे विश्वामित्रऋषीची बाळा, । तिच्या पोटीं भरत भूपाळा ! । भारत नाम त्याचेंनी. ॥ ३० ॥ भरतें काशेयी सार्वसेनी । सुनंदा या अभिधानीं । वरिली, तिचा प्रतापतरणी । सुहोत्रनामें नरेंद्र.॥३१॥ सुहोत्रें इक्ष्वाकुराजकन्या । सुवर्णादेवी वरिली मान्या, । तिच्या उदरीं लेंक धन्या । हस्ती राजा जन्मला. ॥ ३२ ॥ जेणें हस्ती आपण । आपल्या नामें हें पट्टण । वसविलें म्हणोनि सकळ जन । हस्तनापुर बोलती. ॥ ३३ ॥ ह-स्तीनें त्रैगर्ती यशोधरा । सैंवरीं जिंतिली पवित्र दारा, । तिच्या उदरीं राजे-श्वरा ! । विकुंठननामा जन्मला. ॥ ३४ ॥ विकुंठनाची स्वधर्मकांता । यादवकुळींची देवसुता, । तिच्या उदरीं धरित्रीनाथा ! । अजमीढनामा जन्मला. ॥ ३५ ॥ तया अजमीढा महाराया ! । प्राप्त झाल्या पांच भार्या, । त्यांचीं नामें श्रोत्रींळया । पंचदीपिका प्रकाश. ॥३६॥ कैकई, ऋक्षा आणि गांधारी, । विशाला, मृगाक्षका, पंच नारी । चतुर्विंशती शक्रापरी । पुत्ररत्नें प्रसवली.

---

१. 'वैदेही मर्यादा' असें पाहिजे. २. महाभारत–आदिपर्व–अध्याय ९५ श्लोक २६ पहा. ३. फलोत्पादक. ४. 'तंसु' असें पाहिजे. ५. तंसुभार्या. ६. 'ईलिनरथंतरीसंयोगें' असाही पाठ आढळतो. रथंतरी ही ईलिनपत्नी. ७. काशीराजाची कन्या. ८. भरत+सुनंदा यांचा पुत्र भुमन्यु, सुमन्यूची भार्या विजया दाशार्ही, आणि यांचा पुत्र सुहोत्र असें वर्णन पाहिजे. (अध्याय ९५ श्लोक ३२-३४.) ९. शहर. १०. 'हास्तिनपुर' असें पाहिजे. ११. 'सुदेवा नाम दाशार्ही सुता' असें पाहिजे. १२. कर्णरूप स्थानास. १३. महाभारतांत चारच भार्यांचीं नांवें दिलीं आहेत. (अध्याय ९५ श्लोक ३७) व येथें पांच नांवें दिलीं आहेत. यावरून मुक्तेश्वराची महाभारताची प्रत विद्यमान मुद्रांकित प्रतीहून भिन्न असावी, या विधानास बळकटी येऊं पाहते. या अध्यायांत आणि महाभारताच्या छापील प्रतींतील ९५ व्या अध्यायांत पुष्कळ अंतर आहे. १४. चतुर्विंशपुत्रशत म्हणजे चौविसशें पुत्र असें महाभारतांत आहे.

॥ ३७ ॥ चतुर्विंशती राजकुमर । त्यांमाजी श्रेष्ठ [1]राज्यधर । संवरण [2]तपती-प्राणेश्वर । जो कां जामाता सूर्याचा. ॥ ३८ ॥ संवरणभार्या [3]वैवस्वती । स्त्रीच्या रूपें नदी तपती, । तिच्या उदरीं प्रख्यातकीर्ती । कुरु नृपाळ जन्मला. ॥ ३९ ॥ त्या कुरुवीराची संतती, । कौरव तुम्हां यालागीं म्हणती; । कुरुक्षेत्र पवित्र क्षिती । तीर्थ तेणें निर्मिलें. ॥ ४० ॥ [4]कुरूतें अमृता माधवी । भार्या झाली लग्नगौरवीं, । तिचा परीक्षिती या नांवीं । नामाथिला तव पिता. ॥ ४१ ॥ परीक्षितीची अंगना परम । बाहुदा सुयशा स्वरूपधाम, । तिचा [5]भीमें ज्याचें नाम । पंडुपुत्रा ठेविलें. ॥ ४२ ॥ भीमसेनें कैकयकुमरी । रूपें नामें जे सकुमारीं, । प्रतिश्रवा तिच्या उदरीं । तोचि [6]प्रतीप बोलिजे. ॥ ४३ ॥ प्रतीपें शैबी सुनंदा नारी । वरिली स्वरूपें जैसी गौरी; । देवापी, शंतनू तिच्या उदरीं । आणी बाह्लीक तिसरा. ॥ ४४ ॥ त्यामाजी वंशधर नृपती । शंतनू राजा [7]चक्रवर्ती । त्यातें गंगा भागीरथी । वरिती झाली [8]संभ्रमें. ॥ ४५ ॥ [9]जीर्ण करी स्पर्श जितुकें । तें [10]नूतन होय निकें, । यालागीं शंतनू व्यासमुखें । नाम झालें [11]तयासी. ॥ ४६ ॥ शंतनुवीर्यें प्रतिज्ञावंत । जान्हवीउदरीं [12]देवव्रत । [13]अष्टवसूंचा अंशभूत । भीष्माचार्य प्रतापी. ॥ ४७ ॥ जो शस्त्रधरां परमगुरु । अरिकुळा [14]प्रळयवैश्वानरु । ज्याचे तुळणे दुसरा वीरु । बोलतां शंके [15]शारदा. ॥ ४८ ॥ पितयाचिया लग्ननेमा । स्वीकारी ब्रह्मचर्यकर्मा । स्त्री न करीच म्हणोनि, सीमा । संततीची खंडली. ॥ ४९ ॥ शंतनूतें भार्या दुसरी । [16]गंधवती नेमिलीं नारी, । कुमारीदशेंत तिच्या उदरीं । [17]व्यास [18]कानीन जन्म-

---

१. 'वंशधर' असाही पाठ आहे. २. सूर्यकन्या. ३. नामविशेष. ४. कुरुभार्या शुभांगी दाशार्ही, यांचा पुत्र विदूर, विदूराची भार्या संप्रिया माधवी, यांचा पुत्र अनश्वा, याची भार्या अमृता मागधी, यांचा पुत्र परीक्षित्; म्हणजे परीक्षित् हा कुरूचा प्रपौत्र (पणतु) होय. ५. भीमसेन. ६. 'त्याचाचि प्रतीप बोलिजे' असें पाहिजे, कारण प्रतीप हा प्रतिश्रवाचा पुत्र. (अध्याय ९५ श्लोक ४४ पहा). ७. सार्वभौम. ८. आदरानें. ९. जुनें. १०. नवें. ११. ज्याला शांतनूनें स्पर्श करावा तो जीर्ण जरी असला तरी त्याला सुख होऊन तो तरुण व्हावा म्हणून यांचें नांव 'शांतनु' असें प्रख्यात झालें. (अध्याय ९५ श्लोक ४५ पहा). १२. भीष्म. १३. ध्रुव, धर, सोम, अन्ह, अनिल, अनल, प्रत्यूष आणि प्रभास अशीं या वसुसंज्ञक देवांचीं नांवें आहेत. 'तुम्हांस मृत्युलोकीं जन्म घडेल' असा अष्टवसूंस वसिष्ठाचा शाप होता. त्याप्रमाणें ते आठ गंगेच्या पोटीं जन्मास आले. त्यांत पहिल्या सातांस तिनें पाण्यांत बुडविलें. आठवा भीष्म मात्र शंतनूच्या विनंतीवरून तिनें राखिला. १४. प्रलयसमयींचा अग्नि. १५. सरस्वती. १६. सत्यवती गंधकाली असें हिचें नांव आहे. १७. पराशरापासून गंधकालीच्या ठायीं झालेला. १८. कुमारीदशेंत झालेला.

ला. ॥ ९० ॥ प्राप्त झालिया **शंतनू**तें । दोघे पुत्र जन्मले तीतें; । **चित्रांगद** नाम एकातें, । **विचित्रवीर्य** पाठींचा. ॥ ९१ ॥ एकनामाच्या विपाळे । [1]गंधर्वराजें गंधर्वमेळें । **चित्रांगद** वधिला बळें । **कुरुक्षेत्रीं** संग्रामीं. ॥ ९२ ॥ उरला **विचित्रवीर्य** [2]अनुज । त्यातें स्थापून **गंगातनुज** । राज्य चालवी सुतेज । धरासूर्य प्रतापें. ॥ ९३ ॥ **का**शिराजाच्या कुमारी । **भी**ष्में जिंकूनि स्वयंवरीं । **अं**बिका, **अं**बालिका दुसरी, । **विचित्रवीर्या** वोपिल्या. ॥ ९४ ॥ राज्य करितां राजधर्में । उभयस्त्रियांसीं सुखसंभ्रमें । वर्तत असतां पूर्वकर्में । आपुल्या आयुष्यें वेंचिला. ॥ ९५ ॥ [3]राजयक्ष्मारोगव्याळें । ग्रासिलें म्हणोनि स्वल्पकाळें । मरण पावला, तेवेळीं मुळें । वंशद्रुमाचीं खंडलीं. ॥ ९६ ॥ देखोनि सत्यवतीनें **व्यास** । प्रार्थूनि प्रेरिला ईश्वरपुरुष । मातृआज्ञेनें **पौरव**वंश । वीर्यदानें वाढविला. ॥ ९७ ॥ **धृतराष्ट्र, पांडु** आणि **विदुर** । [4]कृष्णद्वैपायनाचे कुमर । **विचित्रवीर्य**[5]क्षेत्रीं चतुर । वंशधर जन्मविले. ॥ ९८ ॥ धर्मचारिणी **गां**धारदुहिता । [6]**गां**धारी परम पतिव्रता । **धृ**तराष्ट्रें वरिली कांता । एकशत पुत्र तियेचे. ॥ ९९ ॥ **दुर्योधन** आणि **दुः**शासन, । **विकर्ण**, चौथा **चित्र**सेन, । शतांमाजी चौघे प्रधान । [7]नागायुतबळियाढे. ॥ ६० ॥ [8]**कुंतिभो**जात्मजा **कुंती**, । **माद्री** मद्रात्मजा गुणवंती, । उभय वनिता **पांडु** नृपती । वरिता झाला स्वधर्में. ॥ ६१ ॥ मृगयाखेळ खेळतां वनीं । ऋषेश्वरयुग्म सुखमैथुनीं । [9]मृग भावोनि विंधितां बाणीं । तीहीं कोपोनि शापिलें. ॥ ६२ ॥ 'स्त्रीसंयोगें पावसी मरण' । मरतां वदला शापवचन. । **पांडु** पावला महा [10]व्यंसन । वंशकार्य स्तब्ध झालें. ॥ ६३ ॥ **दुर्वासऋषीचे** वरदानें । भ्रताराचे आज्ञावचनें । लाहोनि **कुंती** पांच रत्नें । पांचांपासाव प्रसवली. ॥ ६४ ॥ धर्मापासाव **युधिष्ठिर**, । **वायू**पासाव **वृ**कोदर, । **इं**द्रवीर्यें महावीर । **अर्जुन**नामा [11]जन्मला. ॥ ६५ ॥ **पृथेसी** प्रार्थोनि प्राणनाथ । **माद्री** करावी संततीवंत, । अश्विनीकुमारवीर्यें तेथ । **नकुळ सहदेव** जन्मले. ॥ ६६ ॥ **द्रौ**पदी **द्रुप**दराजतनया । पांचाजणा झाली भार्या, । तिच्या उदरीं पंचवीर्या- । पासाव पांच ज-

---

१. चित्रांगद नामक गंधर्वानें यास अरण्यांत मारिलें. २. धाकटा. ३. क्षयरोग. ४. व्यासाचे. ५. शेतांत. (पत्नीच्या ठायीं.) ६. गांधार (कंदहार) देशाच्या राजाची कन्या. ७. दहाहजार हत्तींच्या बलानें युक्त. ८. कुंतिभोजराजाची कन्या. ९. 'मृगभावें विंधितां बाणीं' असाही पाठ आढळतो. किंदम मुनि मृगवेशानें स्वस्त्रीशीं क्रीडा करीत असतां पांडूनें तो मृग असें समजून त्याजवर बाण टाकिला. १०. संकट. ११. आदिपर्व-अध्याय ९५ श्लोक ६१ पहा.

न्मले. ॥ ६७ ॥ प्रतिविंध्य धर्मराजकुमर, । भीमापासाव श्रुतसोम वीर, । श्रुतकीर्ती धनुर्धर । अर्जुनपुत्र जाणावा. ॥ ६८ ॥ नकुळवीर्यें शतानीक, । श्रुतकर्मा पांचवा देख । सहदेवतनय राजतिलक । लावण्यगुणीं आगळा. ॥६९॥ यावेगळिया राजकुमरी । पांचैजणीं पांच नारी । वरिल्या, त्यांचे पवित्रोदरीं । पुत्रपंचक जन्मले. ॥ ७० ॥ गोवासनराजकन्या । देविका नामें परम धन्या । स्वयें वरिली मान्या । धर्मराजें धार्मिकें. ॥ ७१ ॥ तिच्या उदरीं धर्मरेतें । यौधेयनामा पुत्र तीतें । जन्मला, तो सत्यधर्मातें । चालवी पितयासारखा, ॥ ७२ ॥ बळंधरा वीर्यशुल्कानाम्नी । भीमें वाटिवा जिंतिली हरिणी, । तिच्या पवित्रगर्भस्थानीं । सर्वगभैमी जन्मला. ॥ ७३ ॥ बलरामवासुदेवभगिनी । सुभद्रा देवी लावण्यखाणी । अर्जुनें वरिली, तियेचा सुगुणी । अभिमन्यु झाला जाण पां. ॥ ७४ ॥ चैद्यकन्यका करेणुमती । नकुळभार्या परमसती, । तिच्या उदरीं सगुणमूर्ति । निरमित्रनामा जन्मला. ॥ ७५ ॥ विजया मद्रराजकुमरी । युद्धीं सहदेव स्वयें वरी, । पुत्र जन्मला तिच्या उदरीं । सुहोत्रनामा पवित्र, ॥७६॥ हिडिंबाराक्षसीच्या उदरीं । भीमवीर्यें क्रूरशरीरी । घटोत्कच जन्मला रैंणचत्वरीं । जो कां कर्णें मारिला. ॥ ७७ ॥ ऐसे अकरा पांडवेय । त्यांमाजी अर्जुनाचा तनय । अभिमन्युनामा सौभद्रेय । वंशधर कुरुकुळीं. ॥ ७८ ॥ तया अभिमन्यूची कांता । उत्तरा नामें विराटदुहिता, । तिच्या उदरीं तुझा पिता । परीक्षितीराजा जन्मला. ॥ ७९ ॥ पांडवसंततीचीं सूत्रें । छेदितां ब्रह्मास्त्र द्रोणैपुत्रें । सूदलें, तेवेळीं वसुदेवपुत्रें । जो कां गर्भी रक्षिला. ॥ ८० ॥ त्या परीक्षितीनें माद्रवती । पाणिग्रहणीं वरिली सती । तुझी माता तुजप्रती । सहज पडलें सांगणें. ॥ ८१ ॥ परीक्षितीपुत्रा ! जन्मेजया ! । वपुष्टमा जे तुझी भार्या, । तिच्या उदरीं कुमरद्वया । जन्म झाला तव वीर्यें. ॥ ८२ ॥ शतानीक, शंकुकर्ण । तुझे पुत्र परम सगुण । शतानीकाचें अंगनारत्न । विदेहकन्या वैदेही. ॥ ८३ ॥ तुझा नातू त्याचिये कुसी । स्वदत्त जन्मला गुणैकरासी. । तुमची सद्वंशमाळिका ऐसी । निरोपिली विस्तारें. ॥ ८४ ॥ ब्रह्मदेवापासूनि

---

१. आदिपर्व–अध्याय ९५ श्लोक ७५ पहा. २. बल जें तेंच मोल जिचें म्हणजे तेंच तिचें नांव. ३. रणांगणांत. ४. अश्वत्थाम्यानें पांडवांचा समूळ नाश करावा म्हणून ब्रह्मास्त्र सोडिलें, तें उत्तरेच्या गर्भांत प्रवेश करून पीडा देऊं लागलें. हें कृष्णानें जाणून त्या शस्त्राचा पराभव करून गर्भाचें संरक्षण केलें, अशी कथा आहे. ५. घातलें. ६. विवाहीं. ७. अश्वमेधदत्त हें याचें नांव.

वंश । कथित आलों कीर्तिघोष, । अठ्ठेताळीसावा पुरुष । तुझा नातू जाणिजे. ॥ ८५ ॥ बादरायण मूळभारतीं । वदला बहुसाल फैळश्रुती, । याचेनि श्रवणें पठणें प्राप्ती । कैवल्याची कौतुकें. ॥ ८६ ॥ सर्व सुकृतें जोडती करीं, । सर्व पातका होय बोहरी, । सर्ववर्णी पुरुष नारी । सर्वीं श्रवण करावें. ॥ ८७ ॥ परेश लीलाविश्वंभर । मुक्तपाणी मुक्तेश्वर । वदला, तेथें प्रेमादर । सज्जनीं केला पाहिजे. ॥ ८८ ॥ इति श्रीमहाभारते आदिपर्वणी । कथारूपें हे कृष्णावेणी । निवृत्तिसंगम दाखवी नयनीं । प्रवाहपंथें चालतां. ॥ ८९ ॥ श्रीधरश्रीशैल्यपर्वतावरुनी । पूर्वसमुद्रऔघस्थानीं । संस्कृत प्राकृत उभयवदनीं । ब्रह्मानंदें संमरसें. ॥ ९० ॥

अध्याय बेविसावा.

वैशंपायन म्हणे, 'नृपती ! । कथा ऐकें सावधमती. । इक्ष्वाकुवंशीं चक्रवर्ती । महाभिष या नांवें. ॥ १ ॥ तेणें सागरात अवनी । बहुकाळ भोगिली न्यायसद्गुणीं, । पुण्य जोडिलें यज्ञदानीं । पुंण्यश्लोकासारिखें. ॥ २ ॥ अश्वमेध सहस्र एक । शतभरी राजसूययज्ञ देख, । करूनि अमरांचा नायक । प्रसन्न केला सुकृतें. ॥ ३ ॥ संतोषोनि सुरांचा ईश । तया ओपिला स्वर्गवास, । तेथें भोगितां सुखविलास । वर्षें अपार लोटलीं. ॥ ४ ॥ कौतुकें पुण्यदिवशीं जाणा । देवऋषी ब्रह्मभुवना । चतुराननाच्या दर्शना । समारंभें पातले. ॥ ५ ॥ कनकविमानीं आल्हादभरित । महाभिष पातला तेथ, । पवित्रब्रह्मसभेआंत । हो-

---

१. 'बावन्नावा पुरुष' असें पाहिजे, कारण अश्वमेधदत्त हा ब्रह्मदेवापासून बावन्नावा पुरुष होय. मुक्तेश्वरानें ज्या पुरुषांचीं नांवें गाळिलीं आहेत तीं गणनेंत न धरिलीं तर ४८ पुरुष होतात, यावरून मुक्तेश्वराच्या महाभारताच्या प्रतींत पुष्कळ फरक असावा असें दिसतें. २. व्यास. ३. अध्याय ९५ श्लोक ८७-८९ पहा. ४. मोक्षाची. ५. पुण्यें. ६. अग्नि, भस्म. हा शब्द 'ज्ञानेश्वरीं'त आढळतो. तसेंच अनंतकविकृत 'सुलोचनाख्यान' श्लोक १७ यांतही आला आहे. ७. 'मध्यस्थानीं' असाही पाठ आहे. ८. संभवपर्वांतील 'पुरुवंशानुकीर्तन' असें या अध्यायास नांव साजेल. हेंच मूळभारतांतील आदिपर्वाच्या ९५ व्या अध्यायास दिलेलें आहे. ९. सागर हा जिचा अंत (सीमा) अशी (अवनी.) १०. पवित्र आहे श्लोक (कीर्ति) ज्याचा तो. 'पुण्यश्लोक' ही संज्ञा नलराजास लावतात असें 'पुण्यश्लोको नलो राजा' या पद्यावरून सुप्रसिद्ध आहे. ११. या महाभिषानें सहस्र अश्वमेध आणि शत राजसूय यज्ञ केले. (आदिपर्व-अध्याय ९६ श्लोक २.) १२. इंद्र. १३. ब्रह्मदेवाच्या.

णार कांहीं वर्तलें. ॥ ६ ॥ सकळ [1]सरितांची स्वामिणी । गंगा भगवती स्त्रीरूपिणी । [2]अंबर [3]चंद्रबिंबवर्णी । वेढितां हातींचें [4]निष्टलें. ॥ ७ ॥ वातें वसन फिटतां पहा हो! । वस्त्रेंवीण परस्त्रीदेहो । दृष्टी पडेल म्हणूनि समूहो । माघारला [5]विबुधांचा. ॥ ८ ॥ एकीं वदनें पाठिमोरीं । करूनि नयनें झांकिलीं करीं । अधोमुखें निर्मळाचारीं । नेत्रपातीं लाविलीं. ॥ ९ ॥ महाभिषें पसरूनि नयन । केलें नग्नांगअवलोकन । हें देखोनि चतुरानन । [6]कोपिष्ठ होऊनि अनुवादे. ॥ १० ॥ म्हणे, 'हा मानव दुराचारी, । नग्न अवलोकी परनारी; । विशेष [7]श्रेष्ठांमाझारी । शंका कांहीं असेना. ॥ ११ ॥ महाभिषें देखतां नग्न । गंगा [8]अळूमाळ हास्यवदन, । हेंचि लक्षूनि [9]विचक्षण । भाव जाणती हृदयींचा. ॥ १२ ॥ मनुष्यदेह धरूनि दोघें । [10]वांसना पूर्ण करावी भोगें, । दोघें कर्मक्षयें दैवयोगें । पुढती स्वर्ग पावाल'. ॥ १३ ॥ ऐसें [11]बोलोन [12]चतुरानन । उठला सभा विसर्जून, । [13]विबुधीं वंदोनियां चरण । जाते झाले स्वस्थाना. ॥ १४ ॥ गंगा [14]विचरतां गगनपंथीं । आठही [15]वसु दिव्यमूर्ती । खेदभूत [16]चिंतावर्ती । म्लानवदन देखिले. ॥ १५ ॥ त्यांतें [1]सरिता [18]सांक्षेपयुक्त । म्हणे, '[19]दुश्चित्त कायसे येथ? । लोकेश्वरहो! अतिसमर्थ । निस्तेज तुह्मी कायसे?' ॥ १६ ॥ वसु म्हणती, '[17]देवतटिनी! । [20]स्वल्पअपराधें पडिलों व्यसनीं; । वसिष्ठशापें मनुष्ययोनी । प्राप्त झाली आमुतें. ॥ १७ ॥ त्रैलोक्यपवित्रकारिणी गंगे! । उपकार पातला तुझेनी भागें । दुस्तरापासूनि [21]कृपापांगें । दीनां तारीं दयाळे! ॥ १८ ॥ स्नेहभरित सुरजान्हवी! । मनुष्यकाया धरूनि बरवी । पवित्रउदरीं यां जन्मवीं । पुत्रां आम्हां आठांतें. ॥ १९ ॥ मानवीगर्भ अति[22]कुश्चित । रक्तमूत्रविष्ठाभरित । तेथें प्रवेशतां चित्त । मानी अत्यंत कंटाळा. ॥ २० ॥ म्हणोनि तुझिये निर्मळोदरीं । आमुतें धरीं [23]निर्जरशरीरीं.' । 'अवश्य' म्हणोनि [24]तीर्थेश्वरी । [25]मोहाथिली अनुवादे. ॥ २१ ॥ 'मनुष्यलोकीं हो! आतौता । वीर्यदानें तुमचा कर्ता । नामें कोण तो तत्वतां । [26]जाणतेनो! मज सांगा.' ॥ २२ ॥ '[27]भाँ-

१. नद्यांची. २. वस्त्र. ३. शशिप्रभ. ४. पडलें, निसटलें. ५. देवांचा. ६. 'कोपाविष्ठ अनुवादे' असाही पाठ आहे. ७. 'विशिष्टांमाझारी' असाही पाठ आहे. ८. थोडें. ९. पंडित. १०. कामवासना. ११. असा शाप देऊन. १२. 'कमलासन' असाही पाठ आहे. १३. देवांनीं. १४. फिरत असतां. १५. पृष्ठ १८१ टीप १३ पहा. १६. चिंतारूप भोंवऱ्यांत. (आवर्त=भोंवरा.) १७. नदी. १८. आग्रहयुक्त, पक्षपातयुक्त. १९. खिन्नचित्त. २०. आदिपर्व-अध्याय ९६ श्लोक १३ पहा. २१. कृपावलोकनानें. २२. कुत्सित. २३. देवशरीरानें. २४. गंगा, तीर्थांची स्वामिणी. २५. मोह पावून. २६. हे सुज्ञ हो. २७. हें वसूंचें प्रत्युत्तर आहे.

रतवंशीं प्रतीपकुमर। शांतनू नामें राजेश्वर। होवोनि तुझा प्राणेश्वर। जन्मवील आमुतें. ॥ २३ ॥ तुझिया [1]गर्भशुक्तिकें विमळें। शांतनुरेतस्वातीजळें। जन्मतील अष्टही मुक्ताफळें। परी मानवां अयोग्य. ॥ २४ ॥ यालागीं मागणें असे एक। तें त्वां द्यावें आवश्यक. । पुत्र जन्मतां तात्काळिक। गंगाजळीं त्यागावे. ॥ २५ ॥ खंडूनि मनुष्यदेहाची गुंती। स्वर्ग पावों शीघ्रगती। पूर्वींच्या अक्षयपदाची प्राप्ती। [2]हो तुझेनी [3]आमुतें.' ॥ २६ ॥ गंगा म्हणे, 'हें [4]अतिदुर्गम। कैंवि आचरूं [5]हिंसाधर्म?। लोक ठेवितील कुकर्म। राक्षसीचे मजमाथां. ॥ २७ ॥ प्रसवोनि पुत्रांचें अष्टक। [6]शेखीं वंध्या म्हणती लोक;। छळण शब्दाचा कलंक। नलगे ऐसें विचारावें.' ॥ २८ ॥ वसु म्हणती, '[7]मागिलीकडे। [8]अष्टम पुत्र तुझिया [9]चाडे। देवूनि तो त्वां [10]वांडेकोडें। सर्वस्नेहें पाळावा. ॥ २९ ॥ आठांचेनी अंशें एक। कुमार घेई वंशतिलक। प्रतापतेजें जैसा [11]अर्क। जितेंद्रिय [12]वाग्नेमी. ॥ ३० ॥ देवतापिंड म्हणोनि रेत। वृद्धी न पावे भूलोकांत। ब्रह्मचर्यव्रतनेमस्थ। इच्छामरणी धर्मात्मा.' ॥ ३१ ॥ ऐसीं उभयतां निश्चयोत्तरें। नेम नेमिला परस्परें। चरित्र वर्तलें जें पुढारें। तें तूं परिसें नरेशा! ॥ ३२ ॥ [13]प्रतीप राजा हस्तनापुरीं। [14]मृगयाव्यसनें [15]वनगव्हरीं। फिरत फिरत जान्हवीतीरीं। स्वस्थ आसनीं बैसला. ॥ ३३ ॥ [16]विषयेंउष्णें अतितापला,। तृष्णातृषेनें श्रांतला,। गंगा देखोनि [17]विश्रामला,। नाश झाला [18]भवतापा. ॥ ३४ ॥ मृदु [19]मवाळ वाळुका पहा हो!। दुग्धवर्ण जलप्रवाहो। क्रीडासौख्य जलचरसमूहो। उपहासिती स्वर्गस्थां. ॥ ३५ ॥ नाना कमळांचा सुवास अद्भुत। [20]घ्रांणद्वारा प्रवेश करित। तेणें हृदयलिंगा होत। हरिजागर [21]स्वानंदें. ॥ ३६ ॥ सुघोष कर्णीं सांगे वर्म। गंगारूपें [22]रज्जुकादाम। विष्णुचरणीं अतिउत्तम। मूळग्रंथीं गोंविला. ॥ ३७ ॥ गंगासेवनीं चक्रधर। पायीं बांधोनियां दोर। आपणापाशीं अतिसत्वर। वोढून तेणें आणिला. ॥३८॥ असो, माथां वंदूनि उ-

---

१. गर्भस्थानरूप शिंपींत. २. होवो. ३. आदिपर्व–अध्याय ९६ श्लोक १७-१९ पहा. ४. अतिकठिण. ५. पुत्रांस पाण्यांत टाकून मारण्याचें काम. ६. अखेरीस. ७. शेवटला. ८. आठवा. ९. इच्छेनें. १०. कौतुकानें, आवडीनें. ११. सूर्य. १२. वाग्नियमी. १३. हा कथाभाग ९७ व्या अध्यायांत आहे. १४. शिकारीच्या नादानें. १५. वनांतील दाट झाडींत, गुहेंत. १६. कामाग्नीनें. १७. स्थिरावला. १८. संसारदुःखा. १९. मऊ. २०. नासिकाद्वारानें. (हें संस्कृताप्रमाणें तृतीयेचें एकवचन आहे.) २१. ओव्या ३४-३६ यांस मूळांत आधार नाहीं. प्रसंगानुरूप विषयाचें विस्तारानें वर्णन करण्याची हौस मुक्तेश्वरास होती या विधानास अशीं स्थलें आधारभूत होत. २२. रज्जुरूप दावें.

दक। [1]ओल्हाविलें [2]द्वयअंबक; । तृषासार्पिणीचें विख। जळप्राशनीं [3]परिहरिलें. ॥३९॥ तंव गंगेआंतूनि अकस्मात। [4]अपर लक्ष्मी मूर्तिमंत। दिव्याभरणें रत्नखचित। [5]श्वेतवस्त्रा, सुनेत्रा, ॥ ४० ॥ गंगावल्लीची कमळकळिका, । लावण्यवनींची [6]कनकलतिका, । शंकरमस्तकींची माळिका । तुटोनि पडिली [7]नृपांकीं. ॥ ४१ ॥ सौंदर्यगगनींची [8]सौदामिनी । झळके तैसी प्रकाशखाणी, । आनंदवनींची हरिणी । [9]झगटे भूप-[10]सारंगा. ॥ ४२ ॥ यापरी आपुलें स्वरूप प्रगट । करूनि गंगा पातली [11]नि-कट । आश्चर्य करी नरवरिष्ठ । म्हणे, 'रमा कीं उमा हे.' ॥ ४३ ॥ येऊनि दक्षिणजानूवरी । बैसती झाली झडकरी. । म्हणे, 'राजया! मातें वरीं, । [12]वल्लभा मी भोगार्थ.' ॥ ४४ ॥ नातरी ते चपळत्वें [13]कुरंगी । [14]संघटे [15]राजद्रुमाच्या अंगीं; । अंगकंडूशमनालागीं । स्नेहवादें अनुवादे. ॥ ४५ ॥ '[16]दोषकुंजरविदारण । उग्र देखोनि [17]श्रीहरिचरण । त्याचे [18]कवेपासून जाण । प्राणधाकें पळालें. ॥४६॥ शिवगिरिशिखर जटावनीं । लपोनि [19]ठेली ये गुप्तस्थानीं । तेथें तृतीयनेत्रींचा दावाग्नी । तया वणव्या गंवसिलिये. ॥ ४७ ॥ त्यावरी [20]पंचाननाचें नाव । ऐकतां भयें व्यापिले [21]जीव । मग अधोमुख घेऊनि धांव । [22]जन्हुजठरीं थो-[23]कली. ॥ ४८ ॥ मृगधर आणी मृगपाणीतें । संगीं सांडूनि उभयमृगांतें । कीर्तिकस्तूरी मृगा! तूतें । भोगावया पातलें. ॥ ४९ ॥ यालागीं देईं अंगसंग, । मानसतापा पाववीं भंग, । झणी अनमानाचा [24]पांग । पडों देशी येकाळीं.' ॥५०॥ [25]एणीदृशा चातुर्यभरित । [26]साहित्यशब्दीं प्रकटी अर्थ । संकेत जाणूनि विचार-वंत । प्रतीप राजा विवेकी. ॥ ५१ ॥ एकांत [27]विजनीं लावण्यखाणी । स्वयें अनुकूळ शरीरदानीं । तथापि निर्मळअंतःकरणीं । विकारातें [28]नातळे. ॥ ५२ ॥

---

१. आर्द्र केलें. २. नेत्रद्वय. (अंबक=डोळा.) ३. नाहींसें केलें. ४. दुसरी. ५. पांढरें वस्त्र नेसलेली. ६. सुवर्णलता. ७. राजाच्या मांडीवर. ८. वीज. ९. चिकटून असे. १०. हरिण. ११. जवळ. १२. 'वल्लभा भामिनी भोगार्थ' असाही पाठ आढळतो. १३. हरिणी. १४. चिकटे. १५. राजरूप वृक्षाच्या. १६. दोषरूप हत्तीचें विदारण करणारा. १७. 'श्रीधरचरण' असाही पाठ आहे. १८. हस्ताग्राशीं हस्ताग्र मिळवून मध्यें कांहीं वस्तु धरायाकरितां जो पोकळ अवकाश राहतो तो. १९. राहिली. २०. शिवाचें. पंचास्य, पंचानन, पंचमुख हे शब्द शिव आणि सिंह यांचे वाचक आहेत. २१. पंचप्राण. २२. जन्हुराजाच्या उदरांत. २३. विसांवली. २४. चिंता, ओशाळगत. (मागें, पृष्ठ १४३ टीप १८ पहा.) २५. हरिणीनयना. २६. सालंकारशब्दांनीं. २७. मनुष्य नाहीं अशा स्थळीं. २८. न स्पर्शे.

यापरी धैर्यकनकाचळ[1] । नियमासनीं चित्त अढळ[2] । हांसोनि बोले, 'सुंदरी ! विफळ । बोलसी तें दिसताहे. ॥ ९३ ॥ जयासी जो अयोग्य पदार्थ । तो कैंवी स्वीकारावा अर्थ ? । यालागीं कल्पिसी तो व्यर्थ । माझ्याठायीं संकल्प. ॥९४॥ पाळखीं[3] बाळकाचिये शेजे[4] । वृद्ध आदरें कैसेनि निजे ? । कुमारीचें लेणें[5] न साजे । प्रगल्भांतें[6] सर्वथा. ॥ ९५ ॥ परस्त्रीसंगव्यभिचारमळ । स्पर्शला नाहीं मज अळुमाळ[7]; । यालागीं दोषाचा विटाळ । झगटों नेदी मानसा.' ॥ ९६ ॥ सरिता[8] बोले सुरसवचना, । 'मनुष्यलोकामाजी जाणा । नोव्हें मी पराची अंगना[9] । अनुपनीत[10] निर्धारें. ॥ ९७ ॥ यालागीं विधीनें पाणिग्रहणीं[11] । मी होईन पट्टराणी.' । राजा म्हणे, 'वो ! एकपत्नी । अखंडित व्रत माझें. ॥९८॥ आणीक एक परिसें भावो[12] । वामांकीं[13] स्त्रियेचा ठावो । तो त्वां त्यजिला म्हणोनि वावो[14] । संकल्प तुझा त्वां केला. ॥९९॥ स्नुषा[15] भगिनी हो कन्यका, । दक्षिणमांडिये त्यां बैसका; । यालागीं पुत्राची नायिका । होऊनि वर्ते मम गृहीं. ॥६०॥ पुत्रालागीं अंगीकार । म्यां केला हा निर्धार.' । भविष्य जाणोनि साचार[16] । 'अवश्य' म्हणे जान्हवी. ॥६१॥ 'माझिया सुपुत्राची पत्नी । होईं राज्याची स्वामिणी.' । 'निकें' म्हणोनि सत्यवचनीं । राजा भाषें गोंविला. ॥ ६२ ॥ पुढें बोले जन्हुतनुजा, । 'मी होऊनि तव पुत्राची भाजा[17] । तुझिया भारतवंशीं ध्वजा । कीर्तिपताका मिरवीन. ॥ ६३ ॥ पावन करीन सकळकुळा । पुत्र प्रसवेन गुणवेल्हाळा । ज्याचें शौर्य अतिविशाळा । हारी[18] आणील हरीतें.' ॥ ६४ ॥ ऐसें बोलोनि तेचक्षणीं । अदृश्य झाली देवतटिनी[19]; । प्रतीपपुत्राची अह्रदिनीं । करीत ठेली प्रतीक्षा. ॥ ६५ ॥ यावरी, राजा भारतोत्तम । इच्छिता झाला पुत्रफळाचा काम । भार्येसहित पुण्याश्रम । सेविता झाला पुत्रार्थी. ॥ ६६ ॥ जान्हवीतटीं रमणीक वन । सेवूनि कंदमूळजीवेंन[20] । वेढोनियां वल्कलवसन । तपश्चर्या आचरे. ॥ ६७ ॥ प्रसन्न करूनि दुर्गारमणु[21] । पुत्र लाधला राजीवनयनु[22] । महाभिष

---

१. धैर्यरूप मेरुपर्वत. २. स्थिर. ३. पाळण्यांत. ४. बिछान्यावर. ५. अलंकार. ६. प्रौढांतें. ७. किंचित. ८. नदी. (गंगा.) ९. भार्या, स्त्री. १०. अविवाहित. ११. विवाह. १२. विचार, अभिप्राय. १३. 'सव्योऽसः कामिनीभोग्यस्त्वया स च विवर्जितः' असें मूळांत आहे. (आदिपर्व—अध्याय ९७ श्लोक १०.) १४. निष्फळ, व्यर्थ. (मागें, पृष्ठ १ टीप २ पहा.) १५. सून. १६. सत्य. १७. भार्या. संस्कृत शब्दांतील 'य'कारास प्राकृतांत 'ज' आदेश होतो असा नियम आहे; जसें—यार=जार, कार्य=काज. १८. पराजित करील, हरील जिंकील. १९. गंगा. २०. उदक. २१. शंकर. २२. कमलनेत्र.

मानवतनु । **शां**तनू होऊनि जन्मला. ॥ ६८ ॥ महाभिष **शां**तनू झाला, । पुण्यें **प्रतीप** उदया आला; । रायें **हस्तनापुरीं** केला । महोत्साह संतोषें. ॥६९॥ दिवसेंदिवस याची वाढी । चढली लावण्यसरिता[1] गाढी[2] । तारुण्य पावतां, पैंखडी[3] । कन्याजनकें मांडिली. ॥ ७० ॥ राजे आपलालिया दुहिता । द्यावया प्रेरिते झाले दूतां । शब्द कोणा नेदी पिता[4] । तेणें साशंक **शां**तनु. ॥ ७१ ॥ स्मरें[5] संतप्त जाणूनि तनुज । पिता एकांतीं सांगे गुंज[6], । 'पुत्रा! ऐकें रहस्यबीज । तें त्वां अवश्य करावें. ॥ ७२ ॥ मृगया खेळतां **गं**गातटीं । दिव्यांगना प्रगटेल दृष्टीं, । ती न करोनि आग्रहगोष्टी । अत्यादरें पर्णावी[7]. ॥ ७३ ॥ कोण कोणाची तूं येथें । ऐसें न विचारितां तीतें । सांगेल तें आदरें बहुतें । आज्ञापालन करावें. ॥ ७४ ॥ अंतुरीच्या[8] अधिकारें । गृहा आणूनि सोपस्कारें[9] । भोग भोगावे **शं**करें । **पा**र्वतीसीं ज्यापरी.' ॥ ७५ ॥ ऐसा बोधोनि सुपुत्र गुणी । अभिषेकिला राज्यासनीं; । आपण प्रवेशला वनीं । मोक्षकामी वैराग्यें. ॥ ७६ ॥ **शां**तनू राजा प्रतापवंत । वसुंधा[10] सागरवलयांकित[11] । आक्रमूनि स्वधर्मनिरत । न्यायमार्गें वर्तत. ॥ ७७ ॥ पित्याचें वचन स्मरोनि मनीं । मृगयाखेळ खेळतां वनीं । **जा**न्हवीचें तीर नयनीं । अवलोकित सौक्षेपें[12]. ॥७८॥ दिव्यांजन[13] भरोनि नयनीं । पायाळु[14] पाहे निधिस्थानीं[15] । तेंवी शोधीत प्रमदारत्नीं[16] । देवसरितापरिसरीं[17]. ॥ ७९ ॥ तंव **गं**गातटाकीं देवद्रुमा- । दितळीं उपविष्ट[18] दिव्य[19]रामा, । जेंवी रमेची अपर प्रतिमा । दुजी उपमा **उ**मेची. ॥८०॥ राय अवलोकितां नयनीं । मूर्ती बिंबली हृदयभुवनीं, । आसक्तीच्या पाशबंधनीं । मृगप्राय शिरकला. ॥ ८१ ॥ किंवा लावण्यसरिताजळा । भरितां नयन ओलावला, । प्रीतिलतिका अतिवेल्हाळा । पाल्हेजली[20] विस्तारें. ॥ ८२ ॥ ते अंकमंडपा[21] चढों लाहे । कुचफळातें स्पर्शों पाहे, । अधरपानालागीं मोहें । वाढी घेत इच्छेची.

---

१. नदी. २. खोल, मोठी. ३. गडबड, धांदल. ४. प्रतीप. ५. कामें. ६. गुह्य. ७. विवाह करावा. परिणय=विवाह. (अध्याय ९७ श्लोक २१-२३.) ८. स्त्रीच्या. ९. अनेक उपचार करून. १०. पृथ्वी. ११. समुद्रवलयांकित. १२. अगत्यानें. १३. 'दिव्यांजनें भरोनि नयन । पायाळ पाहे निधीचें स्थान । तेंवी शोधीत प्रमदारत्न' असाही पाठ आहे. १४. मागें, पृष्ठ ३ ओंवी ४० पहा. पायाळु मनुष्याला पुरलेलें धन दिसतें ही समजूत या ग्रंथांत अनेक ठिकाणीं व्यक्त केलेली आढळते. १५. ठेव्याचें ठिकाण. १६. तरुण स्त्रीरत्न. १७. जान्हवीतीरीं. १८. बैसलेली. १९. अत्यंत सुंदर स्त्री. २०. प्रफुल्लित झाली. (मागें, पृष्ठ २० टीप ७ पहा.) २१. मांडीरूप मंडपावर.

॥ ८३ ॥ मग आदरें बैसोनि निकटीं । बोले मंजूळवचन गोष्टी. । म्हणे, 'वो! तूं कोण गोरटी[1] । महाअरण्यीं एकटी ? ॥ ८४ ॥ देवी, दानवी कीं गंधर्वी, । अप्सरा, यक्षिणी कीं मानवी, । कीं नागकन्या लावण्यठेवी ? । सुमध्यमे! मज सांगें. ॥ ८५ ॥ जी होसील तया स्वरूपें । मातें वरीं सौभाग्यसरिते! । भार्या होवोनि अमूपें । सर्वसौख्यें [2]अनुभवीं. ॥ ८६ ॥ न पडें अनुमानाचे गुंतीं । लोकलाज दवडूनि पैरौती[3] । दंपत्यपणाची हे ग्रंथी । पाडी आम्हां तुम्हांतें.' ॥ ८७ ॥ दंततेजें उजळोनी दिशा । हांसोनि म्हणे, 'नरवीरेशा! । [4]भार्या होईन परमपुरुषा! । साक्ष करून नेमें[5]तें. ॥ ८८ ॥ शुभ हो कां अशुभ करणी । करितां मज वारावें ना वचनीं । अप्रिय करितां तेचक्षणीं । त्यागून तूतें जाईन. ॥८९॥ ऐसिया नेमें वर्तसी राया! । तरी मी होईन [6]पट्टजाया; । माझेनि संगें [7]सुरालया । मृत्युलोकीं भोगिसी.' ॥ ९० ॥ त्वरें अंगीकारोनि वचन । हस्तकीं वोपिलें भाषदान, । शिबिके वाहून गुणनिधान । राजा नगरा पातला. ॥ ९१ ॥ योगियां साधे योगसिद्धी, । कृपणा सांपडे नि-[8]क्षेपनिधी, । तैसा **शांतनू** [9]ऐश्वर्यउदधी । **गंगा**लाभें संतुष्ट. ॥ ९२ ॥ दिव्य तारुण्य दिव्य संपदा । दैवें लाधली दिव्य प्रमदा । ते वेळीं त्याचिया आनंदा । ब्रह्मांड वाटे ठेंगणें. ॥ ९३ ॥ वनोपवनीं सरितासरीं । मलयहिमालयपरिसरीं । स्फटिकमयगो[10]पुरशिखरीं । सुवर्णसदनीं क्रीडत. ॥ ९४ ॥ जान्हवीसुरतसंगसुखाडे । स्वर्ग निंदूनि सांडिला कडे । वर्षें निमि[11]षांचेनि पाडें । भोगानंदें लोटिलीं. ॥ ९५ ॥ पुण्यवंती काळकाळें । अमोघराजवीर्यमेळें । कुमार जन्मती मुक्ताफळें । शुक्तिगर्भीं ज्यापरी. ॥ ९६ ॥ ऋतुकाळीं गर्भ संभवे । पूर्णदिवशीं पुत्र प्रसवे । उपजतेक्षणीं निर्दयभावें । **गंगा**गर्भीं सांटवी. ॥ ९७ ॥ राजवीर्य अमोघवंत । अष्ट पुत्र जन्मले तेथ । तें राजया दाखवीत । पुत्रसप्तक बुडविलें. ॥ ९८ ॥ अपत्य प्रसवे तेचक्षणीं । बुडवूनि सांडी **गंगा**जीवनीं[12]; । [13]त्यागभय धरूनि मनीं । राजा कांहीं न बोले. ॥ ९९ ॥ सप्तपुत्र सांडिले जळीं ।

---

१. सुंदर, गौरवर्ण. २. या वचनास आधार आदिपर्व—अध्याय ९७ श्लोक ३१-३२ यांत आहे. ३. दूर. ४. आदिपर्व—अध्याय ९८ श्लोक १-४ पहा. ५. नियमातें. ६. महिषी. ७. सुर+आलय=देव+गृह=स्वर्ग. ८. ठेवलेल्या द्रव्याचा संग्रह. ९. 'ऐश्वर्योदधि' असें समासघटित पद पाहिजे. १०. गोपुर=राजवाड्याच्या दरवाज्यावर बांधलेली उंच इमारत. ११. पळांप्रमाणें वर्षें घालविलीं. १२. उदकांत. १३. गंगा आपणास सोडील अशा भयानें.

अष्टमकुमराचिये काळीं । धैर्य न धरवे मोहजाळीं । राजा बोले सकोपें. ॥ १०० ॥ [1]म्हणे, 'तूं कोण दुष्ट राक्षसी ? । परम निर्दय मानववंशीं । आपुलीं बाळें वधितां कैशी । करुणा कांहीं असेना ? ॥ १०१ ॥ नारीवेषें तूं सर्पिणी । बाळकें भक्षिलीं पापिणी ! । वंशवल्लीची खंडणी । केली निष्ठुर [2]कुठारें.' ॥ १०२ ॥ हांसोनि बोले [3]सुकृतनिधी, । 'झाली काळमर्यादा अवधी । मी जातसें, राज्यपदीं । भोग भोगीं मजवीण. ॥ १०३ ॥ नव्हें [4]मी पन्नगी राक्षसिणी । देवगंगा तनुधारिणी । वसुशापविमोचनी । मनुष्यलोका पावलें. ॥ १०४ ॥ [5]कार्याकारण तुझे घरीं । वास्तव्य केलें हा काळवरी । आतां जातसें, हृदयांतरीं । स्नेहें स्मरण असों दे. ॥ १०५ ॥ [6]वसिष्ठकोपाचिया डागें । आठही वसु ताडिले रागें । मनुष्यदेह धरूनि वेगें । स्वर्गा पावतील मागुते. ॥ १०६ ॥ त्यांचें करूनियां जनन । [7]गंगामज्जनें देहमोचन । करूनि मागुती स्वर्गस्थान । पावविले यथार्थ. ॥ १०७ ॥ आणीक एक निजकारण । तुझी [8]कामना करावी पूर्ण । हेंही संपादिलें जाण । जाणें आतां स्वस्थाना.' ॥ १०८ ॥ शांतनू पुसे, 'तीर्थेश्वरी ! । कवण अपराध वसूंच्या शिरीं ? । मानवी देहें तुझ्या उदरीं । अल्पायुषी [9]जन्मले.' ॥ १०९ ॥ गंगा म्हणे, 'ऐक कथा । देवी अरुंधतीचा भर्ता । वसिष्ठ [10]वारुणि नृपनाथा ! । बहुतां मुखें जाणसी. ॥ ११० ॥ दक्षदुहिता सुरभी जाण । कश्यपवीर्यें [11]तीपासोन । [12]कामधेनू जन्मली रत्न । [13]चौदा रत्नीं प्रसिद्ध. ॥ १११ ॥ संतोषोनि चतुरानन । होमार्थ वसिष्ठासी दान । दीधली, तीचें संरक्षण । प्राणातुल्य ऋषी करी. ॥ ११२ ॥ पुष्टीनें [14]ऐरावताऐसी । वर्णसुवास [15]कर्पूरराशी । [16]सुबाळ पुच्छ [17]चामरासरसी । चंद्रकिरणें धवळिली. ॥ ११३ ॥ रत्नखुर शिंगें सरळ । त्वचा [18]सरोम मृदु मवाळ. । सुकर्ण नयन अतिविशाळ । सभाग्य भोगी निश्चयें. ॥ ११४ ॥ जीचें प्राशिलिया [19]क्षीर । दहासहस्रवर्षें नर ।

---

१. आदिपर्व—अध्याय ९८ श्लोक १५-१६ पहा. २. कुऱ्हाडीनें. ३. पुण्यराशि (गंगा). ४. आदिपर्व—अध्याय ९८ श्लोक १७-२४ पहा. ५. देवकार्यार्थाच्या सिद्धीस्तव. ६. वसिष्ठाच्या शापानें हे आठ वसु मानुषत्व पावले. ७. गंगेंत बुडवून. ८. पुत्रकामना. ९. आदिपर्व—अध्याय ९९ श्लोक १-३ पहा. १०. वरुणपुत्र. ११. त्या सुरभीपासून. १२. नंदिनी. १३. या चौदा रत्नांचीं नांवें पुढच्या श्लोकांत दिलीं आहेत:—'लक्ष्मीः कौस्तुभपारिजातकसुरा धन्वंतरिश्चंद्रमा गावः कामदुघाः सुरेश्वरगजो रंभादिदेवांगनाः । अश्वः सप्तमुखो विषं हरिधनुः शंखोऽमृतं चांबुधे रत्नानीह चतुर्दश प्रतिदिनं कुर्युः सदा मंगलम् ॥.' १४. इंद्रगजासारखी. १५. कापराची रास. १६. उत्तम केंसयुक्त शेंपूट. १७. केंशयुक्त. (रोम=केंस.) १८. चंवरीसारखी. (मागें, पृष्ठ १२५ टीप ८ पहा.) १९. दुग्ध.

अमरत्व पावे हा चमत्कार । पयःपानीं तियेच्या. ॥ ११५ ॥ मेरु[1]पार्श्वीं वसिष्ठाश्रम । अतिरमणीक पवित्र परम । दिव्य लतिका दिव्य द्रुम । सदा फळित वसंतें. ॥ ११६ ॥ निर्भय धेनु चरतां तेथ । नानावनीं क्रीडा करित । अष्ट वसू भार्येंसहित । तया ठाया पातले. ॥ ११७ ॥ तींहीं नंदिनी कामधेनू । लक्षितां वेधलें तनुमनू । म्हणती, 'अनर्घ्य[2] रत्न हें क्षणू । त्यागूनि परतें नँ[3] वचवे.' ॥ ११८ ॥ दरिद्री हिंडतां महावनीं । सुवर्णवापिका देखिली नयनीं । तो जेंवि नढळे तियेपासोनी । तेंवी झालें आठांतें. ॥ ११९ ॥ त्यामाजी ऐंकाची अंगना । पतीतें प्रार्थी भाक्रीत करुणा । 'धेनुँ[5]हरणीं मनवासना । बहुत वर्ते मजलागीं. ॥ १२० ॥ सगुण सुंदर मनुष्यलोकीं । जिं[6]तवती नामें माझी सखी । सुँ[7]ढाळ गौतमीसारिखी । कळेनें जैसी शारदा. ॥ १२१ ॥ राया उशीनराची दुहिता । तीतें नेऊनि द्यावी उचिता । ऐसें वर्ते माझिया चित्ता । तें तुम्हीं अवश्य करावें. ॥ १२२ ॥ सेविल्या नंदिनीचें क्षीर । माझी भगिनी अजरामर । होईल ऐसा उपकार । घडे मातें तुमचेनी[8].' ॥ १२३ ॥ ऐसें वल्लभेचें वचन । पुरुषें मानिलें वेदप्रमाण । ऋषि[9]शापाचें महाविघ्न । [10]नँ जाणती स्त्रीलोभें. ॥ १२४ ॥ मग सवत्स धेनु धरूनि हातीं । चोरूनि नेली स्वस्थळाप्रती । गुप्त रक्षूनि आपुले चित्तीं । परम लाभ मानिला. ॥ १२५ ॥ वाँ[11]रुणी घेऊनियां फळा । आश्रमा पातला उताविळा । धेनु न देखोनि डोळां । दाही दिशा विलोकी. ॥ १२६ ॥ शोधितां धेनु न दिसे सृष्टीं । मग विचारी ज्ञानदृष्टीं । वसूंची विद्या जाणूनि पोटीं । क्रोधाँ[12]नळें धडकला. ॥ १२७ ॥ रागें पातला वसुसदना । वदता झाला शापवचना, । म्हणे, 'दुष्टहो ! महाव्यसना । केल्या कर्मं पावाल. ॥ १२८ ॥ स्वर्गसुखापासूनि पतन । मनुष्ययोनीमाजी जँ[13]नन । जन्मतेक्षणीं देहमरण । दुरात्मे ! हो ! पाँ[14]वाल.' ॥ १२९ ॥ ऐसें शापोनि ब्रह्मकुमरा । धेनू घेऊनि पातला घरा । वसू येऊनि वसिष्ठद्वारा । लोटांगणी प्रार्थिती. ॥ १३० ॥ उःशाप मागती होऊनि दीन । येरू म्हणे, 'नोव्हे अन्यथा वचन.' । परंतु मागुतें स्वर्गस्थान । शीघ्रकाळें पावाल. ॥ १३१ ॥ उ-

१. आदिपर्व—अध्याय ९९ श्लोक ६ पहा. २. ज्याची किंमत होत नाहीं असें. ३. न जावें. ४. द्युसंज्ञक वसूची. (आदिपर्व—अध्याय ९९ श्लोक १५-१७ पहा.) ५. धेनू हरण करण्याविषयीं. ६. राजकन्याविशेष. ७. तेजस्वी. ८. आदिपर्व—अध्याय ९९ श्लोक २१-२६ पहा. ९. 'आपवशापाचें महाविघ्न । ते नेणती स्त्रीलोभें' असाही पाठ आहे. आपव=वसिष्ठ. १०. 'नेणेचि कांहीं स्त्रीलोभें' असाही पाठ आहे. ११. वसिष्ठ. १२. कोपाग्नीनें. १३. उत्पत्ति. १४. आदिपर्व—अध्याय ९९ श्लोक ३१-३२ पहा.

म्हामाजी एक पुरुषु[1] । निरपराधें आठवा वसु । पुरुषामाजी उत्तम पुरुषु ।
भीष्माचार्य या नांवें. ॥ १३२ ॥ भारतवंशीं करूनि ख्याती । स्वेच्छामरणें[2]
स्वर्गप्राप्ती । पावेल,' ऐसें वसूंप्रती । वसिष्ठ वदला यथार्थ. ॥ १३३ ॥ 'मनु-
ष्यवेषें देवतटिनी । होईल तुमची पवित्र जननी, । वासनाक्षयें ईश्वरभुवनीं ।
वास्तव्य कराल समस्त. ॥ १३४ ॥ वसिष्ठाचीं भविष्योत्तरें । तैसेंच वर्तलें
पुढारें । ऋणानुबंधास्तव[3] निर्धारें । नेमिला काळ लोटला. ॥ १३५ ॥ तुवां
इच्छिला पुत्र येथ । तो मी देईन गंगादत्त.' । ऐसें बोलोनि कुमरांसहित । अ-
दृश्य झाली जान्हवी[4]. ॥ १३६ ॥ आवडीची हारपे वस्त, । तेवेळीं न धरवे
खेद अद्भुत; । तैसा राजा अतिदुःखित । शोक करी आक्रोशें. ॥ १३७ ॥ रा-
जभोगीं न वाटे सुख, । अमृत चाखतां लागे वीख, । तेंवि गंगावियोगाचें दुःख ।
क्षणक्षणां जाकळे[5]. ॥ १३८ ॥ मग विचार करूनि सांगती । चित्त ठेविलें चि-
त्तवृत्ती । सर्व नश्वर ऐसिया युक्ती । खेद दवडी बाहेरी. ॥ १३९ ॥ इंद्रियनेमें
दमूनी मदन । वाचेसीं सत्येसीं सुलग्न । ईश्वरचिंतनीं लावूनि मन । राजधर्मे व-
र्तत. ॥ १४० ॥ समुद्रवलयांकित पृथिवी । स्वधर्मन्यायें पाळी बरवी, । दुर्जनतस्करांचे
नावीं । वार्ता कोठें असेना. ॥ १४१ ॥ सर्ववर्णीं सदाचार, । शोधितां न दिसे अना-
चार, । आत्मसाधनीं विचार । जीवमात्रीं सर्वदा. ॥ १४२ ॥ सर्व नारी पतिव्रता, ।
गृहस्थां नाहीं कृपणता, । तापसां नाहीं लोलंगता[6], । भूतकृपा[7] सर्वत्र. ॥ १४३ ॥
अकाळमृत्यु दरिद्रसंग । नाहीं दुर्भिक्ष व्याधि रोग. । मत्स्य पक्षी वराह[8] मृग ।
हिंसा यांची असेना. ॥ १४४ ॥ प्रतापप्रभेचा दिनकर[9] । शत्रुतापनीं वैश्वानर[10] ।
दुष्टदंडनीं महाक्रूर । यमधर्मासारिखा. ॥ १४५ ॥ आढ्यतेनें ईशान[11] कुबेर ।
उदार जैसा जलधर[12] । मान्यतेनें जेंवि सुरवर । इंद्र तैसा नृपातें. ॥ १४६ ॥ चं-
द्राऐसा कृपाळु सकळा । पवनातुल्य जवागळा[13] । सर्वसत्तेचिया अर्गळा । धरितां
ईशान अवगमे. ॥ १४७ ॥ अष्टलोकपाळांची मूर्ती । एकिं अवतरली वाटे क्षि-
ती, । विनीत[14] करूनि विरक्ती । स्त्रीकामना दवडिली. ॥ १४८ ॥ गंगावि-
योगें दुःख मनीं । म्हणोनि न वसे राजसदनीं । वस्ती करोनि वनकाननीं ।

---

१. हा द्युसंज्ञक वसु होय. २. स्वच्छंदमरण. ३. इष्ट अथवा अनिष्ट फल प्राप्त होण्यास कारणी-भूत जो पूर्वजन्मींचा परस्पर संबंध तो. ४. अध्याय ९९ श्लोक ४६ पहा. ५. व्यापी, ग्रासी. जा-कळणें=व्यापणें, ग्रासणें. ६. लालसा, इच्छा, लोभ. ७. प्राणिमात्रांवर दया. ८. डुकर. ९. सूर्य. १०. अग्नि. ११. ऐशानी दिशेचा स्वामी. १२. मेघ. १३. अतिवेगवान्. १४. जितेंद्रिय, आत्मवान्.

राज्यनेम चालवी. ॥ १४९ ॥ ऐसियापरी काळ क्रमितां । छेतीस वर्षे लोटलीं गणितां । पुढें मृगयामिसें अटन करितां । गंगातीरा पातला. ॥ १५० ॥ अगाध भागीरथीचें जळ । वरुतें तुंबळे महाप्रबळ । तळीं प्रवाह अतिनिर्मळ । स्वल्प वाहे झुळझुळां. ॥ १५१ ॥ आश्चर्य वाटलें नृपवरा, । म्हणे, 'आटली कां सरिताधारा ? । जळनिरोधा दूसरा । अगस्ती कैंचा याठाया ?' ॥ १५२ ॥ भीष्माचार्यशरसंधानीं । प्रवाह रोधला देवतटिनी, । रायें दुरोनि पाहतां नयनीं । महापुरुष देखिला. ॥ १५३ ॥ स्वपुत्र ऐसें नाहीं ज्ञान । परी स्नेहें द्रवलें अंतःकरण; । म्हणे, 'बळिष्ठ तूं येथें कवण । शुभलक्षण साजिरा.' ॥ १५४ ॥ गौरवर्णी कनकताळ । रत्नभरणें सुतेजाळ । धनुर्विद्ये विरंचीगोळ । तुळितां यासीं ठेंगणा. ॥ १५५ ॥ केवढें अस्त्रविद्येचें बळ । शरें रोधिलें जान्हवीजळ । हस्तलाघवी कळाकुशळ । नाहीं ऐसा देखिला. ॥ १५६ ॥ पुढती आदरें अवलोकित । तंव अदृश्य झाला गंगासुत. । तेवेळीं राजा खेदयुक्त । धांवा करी गंगेचा. ॥ १५७ ॥ म्हणे, 'वल्लभे ! आपुलें वचन । सत्य करीं हो ! कृपेकरून । प्रत्यक्ष देवोनि दर्शन । दुःख माझें परिहरीं. ॥ १५८ ॥ अष्टम पुत्र देईन तूतें । म्हणोनि दिधलें शब्दातें, । विसरलीस सत्यनेमातें । आतां भेटोनि सुख देईं.' ॥ १५९ ॥ ऐसें राजा करुणावचन । बोलोनि आठवी बहुसाल गुण; । चित्तीं नव्हेचि समाधान । वाट पाहे मागुता. ॥ १६० ॥ तंव हातीं धरूनि कुमरातें । गंगा प्रगट पातली तेथें, । लाभकाळीं सभाग्यातें । परीस ओपी देवता. ॥ १६१ ॥ वस्त्राभरणें पदकमाला । दिव्य कुंडलें कटिमेखला । ऐसा पुत्र धरित्रीपाळा । देती झाली हस्तकें. ॥ १६२ ॥ म्हणे, 'हा तुजलागीं वाढविला, । सर्वविद्येनें अलंकारिला, । नेम नेमिला त्या बोला । तुझा ओपिला तुझहस्तीं. ॥ १६३ ॥ वसिष्ठापासूनि वेदाध्ययन । सांग संपादिलें संपूर्ण, । शास्त्रविद्येंत केला निपुण । शुक्राचार्यें समर्थें. ॥ १६४ ॥ बृहस्पतीपासून मंत्रशास्त्र । लाधला हा अतिपवित्र, । गुणसंपन्न तुझा पुत्र । पि-

१. आदिपर्व–अध्याय १०० श्लोक २० यांत 'स समाः षोडशाष्टौ च चतस्रोऽष्टौ तथापराः' असें आहे, त्यावरून छत्तीस वर्षेंच होतात. २. भ्रमण. ३. 'सरिद्वरा' म्हणजे श्रेष्ठनदी असाही पाठ आहे. भीष्मानें शरसंधानानें गंगाप्रवाहाचा निरोध केला म्हणून तिचें पाणी आटलें, अल्पजला झाली. अगस्त्यमुनीनें जलधिशोषण केलें या कथेकडे येथें कटाक्ष आहे. ४. स्वर्णमय तालवृक्ष. ५. आदिपर्व–अध्याय १०० श्लोक २९ पहा. ६. पुष्कळ. ७. शांतनुराजाला. ८. व्याकरण, छंद, निरुक्त, ज्योतिष इत्यादि सहा अंगांसहित.

तृभक्त त्रिलोकीं. ॥ १६५ ॥ [1]भार्गवापासून धनुर्विद्या । संपूर्ण फळली या सुविद्या, । आतां [2]पृथ्वीपाळवंद्या ! । पुत्र नेईं निजगृहा. ॥ १६६ ॥ युवराजाच्या वरासनीं । अभिषेकावा नराग्रणी, । [3]सागरांत हे मेदिनी । संरक्षील तैंव आज्ञा.[4]' ॥ १६७ ॥ ऐसी वदोनियां वाणी । गुप्त झाली [5]देवतटिनी, । राजा ठेला तटस्थ मौनी । मुहूर्तमात्र आश्चर्यें. ॥ १६८ ॥ मग हातीं धरूनि कुमरा । तेव्हां पातला हस्तनापुरा; । प्रजा आल्या नमस्कारा । राजपुत्रा सन्मुख.॥१६९॥ लागल्या भेरी मंगळतुरें । ध्वज पताका सुवर्णचामरें, । शृंगारिलीं गृहें गोपुरें । रत्नमाळा तोरणीं. ॥ १७० ॥ यौवराज्यीं स्थापूनि कुमर । ओपिता झाला राज्यभार, । येरू सर्वविषयीं चतुर । कार्यमात्रीं दक्षता. ॥ १७१ ॥ [6]सुहृदें सुहृदाचें ओझें । हरितल्या संतोष उपजे, । तेंवी राजा सर्व काजें । साधिलीं ऐसें मानीत. ॥ १७२ ॥ देवताप्रतिमेचिया गुणीं । राजा संतुष्ट पूज्यासनीं । इच्छाभोजन मानदानीं । साधुवृंदें स्थापिलीं. ॥ १७३ ॥ दयापालनाचे सुजळीं । प्रजावल्ली गेली पाल्हाळीं । फळल्या नाना वस्तु फळीं । शोभा देती ऐश्वर्यें. ॥ १७४ ॥ अधिकवेतनें अधिकमानें । वेधिलीं सेवकांचीं मनें । मागत्यांचेनि इच्छेनें दानें । देऊनि केलें [7]धनाढ्य. ॥ १७५ ॥ ऐसियापरि सावकाशें । सुखें लोटलीं [8]चत्वारि वर्षें. । चरित्र पुढां वर्तलें कैसें । तें तूं परिसें नरेंद्रा ! ॥ १७६ ॥ इति श्रीमहाभारते आदिपर्वणि । अगाध व्यासमुखींची वाणी । अमृतभरित मंदाकिनी । लोकत्रया तारक. ॥ १७७ ॥ तेथें मुक्तेश्वराची वाणी । क्षुद्रनदी मिळाली मिळणी । पवित्रतासुखादगुणीं । समान संतीं मानिजे[9]. ॥ १७८ ॥

अध्याय तेविसावा.

अवलोकोनि गंगासुता । राजा मानी [10]कृतकृत्यार्था. । म्हणे, 'आयुष्य देऊनि [11]धाता । जीववो यातें बहुकाळ.' ॥ १ ॥ स्वभावें एके दिवसीं देखा । संगियां सांडूनि सकळिका । [12]सूर्यतनयेच्या तटाका । सहजगती पावला. ॥ २ ॥ तंव

---

१. परशुरामापासून. २. राजांनीं वंदन करण्यास योग्य. ३. सागरवलयांकित पृथ्वी. ४. अध्याय १०० श्लोक ३३-४० पहा. ५. देवनदी (गंगा). ६. मित्रानें. ७. धनसंपन्न, श्रीमान्. ८. चार. (अध्याय १०० श्लोक ४५.) ९. या अध्यायास 'भीष्मोत्पत्ति' अशी संज्ञा हस्तलिखित प्रतींत दिलेली आढळते. १०. सफलता. ११. ब्रह्मदेव. १२. यमुनातीराला.

वरिलेकडून [1]मंदानिळ । कोटोनि आणी दिव्य [2]परिमळ, । राजा होवोनि [3]अलिकुळ । [4]गंधोन्मुख चालिला. ॥ ३ ॥ सुवासिक वस्तु कवण । तीचें करावया शोधन । मार्ग कल्पूनि गंधागमन । गंगातीरीं [5]चामके. ॥ ४ ॥ तंव दाशनगरापुढां पाहीं । यमुना वाहे जळप्रवाहीं, । नौकेमाजी दिव्यदेहीं । [6]दाशकन्या देखिली. ॥ ५ ॥ पितृआज्ञेनें ते कुमारी । नौका रक्षी यमुनातीरीं । अंगींचा सुगंध पृथ्वीवरी । योजनमात्र फांकत. ॥ ६ ॥ रूपसुदीपदर्शनें जाण । पतंग झालें नृपाचें मन, । अंगसुवासें उभयनयन । भ्रमरप्राय वेधले. ॥ ७ ॥ मग [7]सांक्षेपें येऊनि जवळा । म्हणे, 'तूं कवणाची [8]वेल्हाळा ? । [9]अहोरात्र यमुनाजळा- । माजी नौका रक्षिसी.' ॥ ८ ॥ येरी म्हणे, 'मी [10]दांशनंदिनी । पितृआज्ञेनें नौकायानीं । पांथिक उतरावया [11]जीवनीं । येथें तिष्ठें सर्वदा.' ॥ ९ ॥ हृदय भेदिलें [12]मन्मथें । राजा भोगार्थ भुलला तीतें, । गृहा जाऊनि [13]दाशातें । अत्यादरें भेटला. ॥ १० ॥ दाशें सन्मानूनि नृपती । म्हणे, 'जी ! कृपा केली केउती ? । आम्हां [14]भणगां दीनांप्रती । येणें तुमचें दुर्लभ.' ॥ ११ ॥ राजा म्हणे, 'सकारण देख । तुजप्रती आलोंसें याचक; । मागणें आहे कांहीं एक, । तें त्वां दीधलें पाहिजे.' ॥ १२ ॥ [15]कैवर्तक विनवी कर जोडोन, । 'ओंवाळूनि सांडीन प्राण । याहून वस्तू आगळी कवण ? । जे न दीजे तुम्हांतें.' ॥ १३ ॥ राजा संतोषोनि पोटीं । आप्तभावें थापटी पाठी; । म्हणे, 'मित्रा ! माझी गोष्टी । न मोडावी सर्वथा. ॥ १४ ॥ तुझी कन्या सुरूप तरुणी । होय मातें पट्टराणी, । तो स्वीकारु अंतःकरणीं । येचि काळीं करावा.' ॥ १५ ॥ दाश म्हणे, 'जी ! [16]सौंचार, । याहूनि लाभ नाहीं थोर; । बोलणें असे एक विचार । तो [17]नांवेक परिसणें. ॥ १६ ॥ माझेनि वचनें नेमिला [18]नेम । अंगीकाराल मानूनि सुगम । तरीच तुमचा हृदयकामु । [19]फळ देईल तात्काळ. ॥ १७ ॥ इच्या पोटीं जन्मेल कुमर । तो राज्यधर वंशधर । करणें ऐसा निजनिर्धार । प्रमाण वाक्यें

१. मंद वारा. २. उत्तम गंध. ३. भ्रमर. ४. सुवासाकडे मुख करून. ५. जाई, फिरे. 'चामके' हा शब्द मुक्तेश्वराच्या ग्रंथांत कोठें कोठें आढळतो. (आदिपर्व—अध्याय २ ओवी ८९ आणि वनपर्व अध्याय ८ ओंवी ११ पहा.) ६. धीवरकन्या. ७. अगत्यानें. ८. प्रिया. ९. अहन्+रात्रि=दिवसरात्र. १०. धीवराची कन्या. (अध्याय १०० श्लोक ४८-४९). ११. उदकीं. १२. कामें. १३. दाश=कोळी, धीवर. १४. भिकारी. १५. धीवर. १६. खरोखर. १७. अंमळ, क्षणभर. १८. नियम, समय, प्रतिज्ञा. १९. 'सफळ होईल महींद्रा' असाही पाठ आहे.

करावा. ॥ १८ ॥ राया! शंतनूच्या पाठीं । तोचि बैसावा [1]राजपटीं, । ऐसी सभास्थानीं गोष्टी । [2]परिसवावी समस्तां. ॥ १९ ॥ ऐसा झालिया भरंवसा । तुटला संशयाचा फांसा. । वस्तु आपुल्या [3]निवासा । येचिकाळीं नेइजे.'॥२०॥ दुस्तर ऐकोनि दाशवचनें । [4]ज्येष्ठपुत्राचे शंके भेणें । रायें न देतां प्रमाणें । मौन्येंचि उठला तेथोनी. ॥ २१ ॥ हृदयीं दाशकन्येच्या [5]कामा । धरूनि, पातला स्वकीय [6]धामा, । पहिला ऐसा आदरप्रेमा । सुहृदांवरील [7]मंदला. ॥ २२ ॥ सत्यवतीनें हरितलें मन, । विरहें लागलें तीव्र ध्यान, । त्यागूनियां अन्नपान । चिंतातुर सर्वदां. ॥ २३ ॥ उश्वास टाकीत वदनीं । अश्रुबिंदु ढळती नयनीं । हें देखोनि [8]चातुर्यतरणी । पुत्र पुसे [9]आदरें. ॥ २४ ॥ म्हणे, 'खेद करावया पुरता । कारण विषय न दिसे, ताता! । तुझ्या हृदयीं कायसी व्यथा? । ते मज सांगें यथार्थ. ॥ २५ ॥ मुखें न बोलसी अणुमात्र । हृदयीं जळसी अहोरात्र । काय तो प्रगटीं गुह्यमंत्र । शंका न धरीं आम्हुची.॥२६॥कारण कळलिया, चिंतेतें । मी परिहरीन, जाण, तीतें, । जें इच्छिजे तुझेनि आतें । तें पुरवीन तात्काळीं.'॥२७॥ जनक म्हणे, 'ऐक वचन, । तुझेनि पुत्रत्वें मी धन्य, । कोणी विषयीं नाहीं न्यून । भाग्य भोगीं सर्वार्थी. ॥ २८ ॥ वंशीं संतती दिसे स्वल्प । हा मज हृदयीं चिंतासर्प । लागला, म्हणोनि संताप । अहोरात्र शमेना. ॥ २९ ॥ तुजसारिखा प्रतापवंत। पुत्र न मिळे त्रैलोक्यांत, । परंतु देह [11]अंतवंत । काय केव्हां कळेना. ॥ ३० ॥ [12]एकदृष्टीचा डोळस, । एकचरण चालता पुरुष, । एकहस्ताचा हव्यास । करितां व्यंग जनदृष्टीं. ॥ ३१ ॥ एकपुत्रें पुत्रवंत । [13]तो नेणतां झाला बहुत, । क्षणक्षणा लागला मृत्य । आयुष्य नासी जगाचें. ॥ ३२ ॥ प्रवासप्रसूतिकलहाचारें । ऋतुस्पर्शरोगसंचारें । एकभार्येच्या भ्रतारें । दुःख जैसें भोगिजे. ॥ ३३ ॥ एक [14]निष्कें असल्या ग्रंथीं । काय तो मिरवें कुबेरपंक्तीं? । म्हणोनि तुजलागीं सांगातीं । बंधुवर्ग असावे. ॥ ३४ ॥ भारतवंश विशाळसदन, । स्तंभ तूं एकला एक पूर्ण । पडतां नलगे एक क्षण । हें दुश्चित मज, पुत्रा! ॥३५॥ जैसा दरिद्री तैलकारू । घाणा जुंफी एक ढोरू, । तो अडलिया सर्व विचारू । [15]व्यवसायाचा खंडला. ॥ ३६ ॥ तोचि [16]प्रस्ताव दिसे मातें, । यालागीं नावरे दुःखभारातें; । सर्व सांडोनि अरण्यातें । सेवावें, हें वाटतें.' ॥ ३७ ॥ ऐसें अ-

---

१. अध्याय १०० श्लोक ५६ पहा. २. ऐकवावी. ३. गृहा. ४. भीष्माचे. ५. इच्छेला. ६. गृहाला. ७. कमी झाला. ८. चतुरपणाची नौका. ९. आवडीनें. १०. अध्याय १०० श्लोक ६०-६२ पहा. ११. नश्वर, विनाशी. १२. हें वर्णन मूळांत नाहीं. १३. 'म्हणे तो नेणता जाण बहुत' असा अन्य पाठ आहे. १४. सोन्याचें नाणें. १५. उद्योगाचा. १६. प्रसंग.

नुवादितां रावो[1] । भीष्माचार्य जन्मतां ठावो । तया सर्व कळला भावो । तात-हृदयीं वर्तता. ॥ ३८ ॥ पाचारूनि मंत्रियांतें । गुज सांगे त्यां भावार्थें; । म्हणे, 'विधुरत्व[2] राजयातें । शोभा नेदी सर्वथा. ॥ ३९ ॥ रायासी नाहीं विषय-स्वार्थ । नाहीं स्त्रीभोगाची आर्त । परी आमुचेंनि मनोगत । गृहिणी[3] गृहीं पाहिजे[4]. ॥ ४० ॥ वय विशेष गुण सुंदरी । ऐसी विचारा राजकुमरी । करू रायातें अंतुरी[5] । इतकेंनि संतोष आमुतें.' ॥ ४१ ॥ 'निकें[6]' म्हणोनि आश्रित-जन । निघते झाले ब्राह्मण । रायालागीं अंगनारत्न । शोधावया तांतडी. ॥ ४२ ॥ जाणोनि पुत्राचा वृत्तांत । पिता प्रगटी मनोगत, । पाचारूनि पुरोहित । तया संकट जाणवी. ॥ ४३ ॥ म्हणे, 'बोधीं देवव्रतातें[7] । गृहस्थ करणें आहे मातें । तरी न पडावें दीर्घयत्नातें, । सांगेन तें अनुष्ठा. ॥ ४४ ॥ जाऊनि दाशराजाप्रती । मागोनि घेणें सत्यवती । जेजे आशंका[8] कल्पील चित्तीं । तेते सर्व परिहारा. ॥ ४५ ॥ यावेगळा भिन्न प्रयत्न । सहसा न करावा आ-पण । तीवेगळी अंगना आन । मी सर्वथा वरीना.' ॥ ४६ ॥ पुरोहितमुखें अभिप्रावो[9] । जाणता झाला भीष्मदेवो, । घेऊनि आप्तांचा समुदावो । निघता झाला तात्काळीं. ॥ ४७ ॥ प्रधान मंत्री पुरोहित । वृद्ध वडील बुद्धिवंत । सेना चातुरंगसहित । वाद्यघोषें निघाले. ॥ ४८ ॥ निकट[10] आले दाशनगरा, । कैवर्तक पातला सामोरा, । सन्मानूनि राजेश्वरा । सभास्थाना आणिलें. ॥४९ ॥ भीष्म विनवी, 'दाशराया ! । आम्ही पातलों कवण कार्या । चित्त देऊनि अभिप्राया । सिद्धी नेलें पाहिजे. ॥ ५९ ॥ योजनगंधा तव नंदिनी । शांतनूलागीं स्वधर्मपत्नी । आमुतें होय सखी जननी । ऐसें अवश्य करावें.' ॥ ५१ ॥ दाश म्हणे, 'मा-नलें मना । नाहीं प्रत्युत्तर या वचना; । परी एक आशंका, विचक्षणा[11] ! । अवाच्य[12] लागे बोलणें. ॥ ५२ ॥ शांतनूऐसा राजेश्वर । तपें करितां न मिळे वैरें[13]; । दोष[14] एकचि असे थोर । तोही प्रगट अनुवादूं. ॥ ५३ ॥ समर्थे नीच धरिलें हातीं । तें थोर करावें सकळार्थीं, । हे आमुची वासना कोणे युक्तीं । सिद्धी पावे सांग पां ? ॥ ५४ ॥ सापत्न[15] पुत्र अतिबळिष्ठ । कोपल्या करील ब्रह्मांड

---

१. शांतनु. २. मेलेली आहे स्त्री ज्याची अशा प्रकारें रहाणें. ३. स्त्री. ४. 'गृहीं गृहिणी अ-सावी' असा अन्य पाठ आहे. ५. स्त्री. ६. खरें. ७. भीष्मातें. ८. संशय. ९. अभिप्राय. १०. [illegible]. ११. चतुरा. १२. बोलण्यास अयोग्य असें. १३. पति. १४. सापत्नभाव हाच एक मोठा दोष होय. तूं ज्याचा सापत्न होशील, तो गंधर्व असो अथवा असुर असो, तो कधींही जीवंत रहावयाचा नाहीं, म्हणून कन्या द्यावी अथवा न द्यावी—इत्यादि वर्णन मूळांत आहे. (श्लोक ८३-८४.) १५. भीष्म हाच सापत्न पुत्र होय.

पिष्ट, । तुज नें मनें तो संतुष्ट । दायाद वांचे कैसेनी? ॥ ५५ ॥ म्हणोनि समर्थासीं झैटे। समर्थें घेतां श्लाध्य वाटे, । दीनें आपुलेंनि वाटे। मर्यादेनें असावें. ॥ ५६ ॥ योग्य ते कुंजरीं कुंजरू, । समान मार्जारी मार्जारू, । आम्हां तुम्हा संबंधाचारू । तैसा दिसे स्वामिया! ॥५७॥ ज्येष्ठ सबळ अव्हेरून । जो इच्छील राज्यासन । तेणें आंवतूनियां मरण । मग हा संकल्प धरावा. ॥ ५८ ॥ असो शब्दाची गरिमा, । संबंध अघटित आम्हां तुम्हां, । येथें आलेती नरेंद्रोत्तमा.' । तें मस्तकीं माझिया.' ॥ ५९ ॥ ऐकोनि दाशमुखींचें वचन । भीष्म बोले गर्जोन, । म्हणे, 'ऐका अवघे जण । उत्तर माझें नेमाचें. ॥ ६० ॥ इच्या पोटीं जन्मेल कुमर । तो शांतनूपाठीं राज्यधर. । स्यां करणें निजनिर्धार । सत्य सत्य त्रिवाचा. ॥ ६१ ॥ राज्यपदाचा अल्प संबंध । मज नाहीं हा प्रमाण शब्द, । अन्यथा होय तरीं हा वेद । म्लेच्छमुखीं प्रवेशो.' ॥ ६२ ॥ हें ऐकोनि निर्वाण सकळीं । 'साधु'शब्दें पिटली टाळी. । दाश म्हणे, 'हृदयकमळीं । एक असे आशंका. ॥ ६३ ॥ तुजपासोनि होतील पुत्र । ते विभागी स्वतंत्र, । आम्ही योजिला मंत्र । तो तींहीं पाळिला पाहिजे. ॥ ६४ ॥ तुजसारिखे तुझे कुमर । होतील बलाढ्य धनुर्धर, । मुख्याधिकारी साचार । ज्येष्ठसंतती या हेतु. ॥ ६५ ॥ तयां वारूं शके कोण? । ते कां त्यजितील उपेक्षून । तुझें ऐकोनि प्रमाण । सर्व सूर्खता स्थापितील.' ॥ ६६ ॥ ऐसें बोलतां दाशोत्तम, । भीष्म स्वीकारी अचाट नेम, । जो ऐकतां अतिदुर्गम । करितां कठीण सर्वांतें. ॥ ६७ ॥ म्हणे, 'संततीपासोनि अपावो । लागेल ऐसा तुमचा भावो, । तरी ये आशंकेचा ठावो । मी निर्मूळ करीतसें. ॥ ६८ ॥ पुरवावया पितृकाम । अंगिकारीतसें दुसरा नेम । तो परिसोत पुरुषोत्तम । पितृभक्त धर्मात्मे. ॥ ६९ ॥ आजिपासोनि निजनेमस्त । अक्षयब्रह्मचर्यव्रत । अंगीकारिलें म्यां नेमस्त । पितयालागीं सद्भावें. ॥ ७० ॥ स्त्रीमात्र इये सृष्टीं । गंगेसमान माझिये दृष्टीं । जितेंद्रियत्वगुणाचे मुगुटीं । वरी अंकुश खोंविला. ॥ ७१ ॥ मस्तक मदनाचा छेदूनी । ब्रीदावळी बांधिली चरणीं, । वाग्नेमाची त्रिभुवनीं । मिरवो माझी पताका. ॥७२॥ संततीवीण मी निर्दोष । पावेन अक्षय स्वर्गवास.' । ऐसें बोलतां कुरुनरेश । जयजयकार प्रवर्तला.

---

१. मानित नाहीं. २. गोत्रज बांधव. ३. झगडा, कलह. ४. हत्ती. हा दाखला मुळांत नाहीं. ५. बोलावून. ६. गुरुत्व. ७. अखेरचें भाषण. ८. अपाय, अनर्थ. अपाव=अपाय. तत्सम संस्कृत शब्दांतील 'य'स कधींकधीं 'व' होतो. जसें; उपाय-उपाव, राय-राव, पाय-पाव. ९. अध्याय १०० श्लोक ९५-९६ पहा. १०. हा दृष्टांत मूळांत नाहीं. मुक्तेश्वरानें आपल्याच कल्पनेनें योजिला आहे.

॥७३॥ 'धन्य रे! धन्य' ऐसिया गोष्टी। समस्तीं चरण वंदिले मुगुटीं.। गगनींहूनि सुमनवृष्टी। भीष्ममाथां वोसरली. ॥ ७४ ॥ दाशें आल्हादूनि चित्तीं। कन्या ओपिली भीष्माहातीं.। येरें वाहूनि कनकरथीं। समारंभें निघाला. ॥ ७५ ॥ हर्षें पातले हस्तनापुरा,। नमस्कारिलें राजेश्वरा,। अंतर्गृहीं गुणसुंदरा। जननी जनका ओपिली. ॥ ७६ ॥ जैसा उदार विवेकमूर्ती। जननी मानूनि धनसंपत्ती। ओपूनि धर्मजनका हातीं। उत्तीर्ण व्हावें पुत्रला. ॥ ७७ ॥ तैसी आणून सत्यवती। पुत्रें ओपिली पित्याहातीं,। तेवेळीं जनकानंद क्षितीं। सांठवितां अपार. ॥ ७८ ॥ आपणालागीं दुस्तर व्रत। भीष्में स्वीकारिलें अद्भुत,। हें जाणोनि प्रसन्न होत। वर ओपीत पुत्रातें. ॥ ७९ ॥ म्हणे, 'सुपुत्रा! कुळटिळका!। उपमे तूंचि तुंजसारिखा.। तुवां जिंतिलें उभयलोका। रामचंद्रासारिखें. ॥ ८० ॥ ब्रह्मचर्यसत्यव्रती। तूंचि आगळा पितृभक्ती। संततीवीण परमा गती। ब्रह्मनिष्ठाची हो तुज. ॥ ८१ ॥ इहलोकीं निर्दोष कीर्ती। परलोकीं सायुज्यमुक्ती। स्वच्छंदमरण तुझ्या हातीं। वरप्रदान ओपिलें.' ॥ ८२ ॥ पुत्र गौरवूनि वचनीं। वेदविधीनें पाणिग्रहणीं। विवाहकृत्य संभ्रमें करूनी। अंगीकारिली सुगंधा. ॥ ८३ ॥ सत्यवतीसंगमलाभें। भूपती भुलला विषयलोभें,। मोक्षश्रियेचेनि शोभे। कुरूप ऐसें मानिती. ॥ ८४ ॥ ब्राह्मणादिका संभ्रमें। वित्त वस्त्रें गोलंलामें। वांटोनि रायें आणी भीष्में। अतिसंतोष मानिला. ॥ ८५ ॥ ऋतुप्राप्तकाळावसरीं। राजवीर्यें पवित्रोदरीं। पुत्र प्रसवली सुंदरी। चित्रांगद या नामें. ॥ ८६ ॥ पुढती एक संवत्सरा। कुमर जन्मला दुसरा,। विचित्रवीर्य, राजेश्वरा!। शुभलक्षणी शोभत. ॥ ८७ ॥ जातकर्मादि संभ्रमें। वित्तें वस्त्रें गोललामें। वांटोनि रायें आणि भीष्में। अति

---

१. पुष्पवृष्टि. २. पडली, झाली. ३. पृथ्वी. ४. हें 'अनन्वय' नामक अर्थालंकाराचें उदाहरण आहे. जेथें ज्याची त्यालाच उपमा दिली असते म्हणजे उपमान आणि उपमेय हीं एकालच उद्देशून असतात, तेथें हा अलंकार होतो. जसें–गगन हें गगनासारखें आहे, सागर हा सागरासारखा आहे, रामरावणयुद्ध हें रामरावणयुद्धासारखें आहे. याचें लक्षण गोविंदप्रणीत 'काव्यप्रदीप'नामक ग्रंथांत दिलें आहे तें असें:—'उपमानोपमेयत्वे एकस्यैवैकवाक्यगे। अनन्वयः' (काव्यप्रदीप–उल्लास १० सूत्र ५ पहा.) ५. सलोकता, समीपता, स्वरूपता, व सायुज्यता अशीं चार मुक्तींचीं नांवें आहेत. उपास्य देवतेच्या लोकीं राहणें ती सलोकता; उपास्य देवतेच्या संनिध राहणें ती समीपता; उपास्य देवतेचें व आपलें स्वरूप व गुण सारखे होणें ती सरूपता, आणि उपास्य देवतेमध्यें (ब्रह्मीं) मिळून लीन होणें ती सायुज्यता. ६. अध्याय १०० श्लोक १०२ पहा. ७. विवाह. ८. आदरानें. ९. 'भरीं भरला विषयलोभें' असा अन्य पाठ आहे. १०. गायींमध्यें भूषणासारिखीं, म्हणजे चांगल्या गायी–असा भाव.

संतोष [1]मानिला. ॥ ८८ ॥ बाळत्व वर्ततां पुत्रातें । तारुण्य प्राप्त न होतां तेथें। शांतनूराजा [2]काळधर्मातें । [3]अदृष्टयोगें पावला. ॥ ८९ ॥ तेवेळीं उत्तरकार्य सकळ । भीष्में संपादिलें कर्मकुशळ । द्रव्य दक्षिणा अतिपुष्कळ । बहु याचकां वांटिली. ॥ ९० ॥ सारूनि पितृकार्याची [4]शुंती । सत्यवतीची [5]मनोवृत्ती । राज्यीं बैसविला नृपती । चित्रांगद अग्रजें. ॥ ९१ ॥ तेणें चित्रांगदें स्वशक्ती । जिंकिली [6]सप्तद्वीपवती । विशेष देखे जे जे संपत्ती । ते ते हरोनि घेतसे. ॥ ९२ ॥ वेढूनियां [7]अमरावती । अवमानूनि [8]अमरपती । तेथील अपूर्व वस्तुजातीं । शृंगारिली स्वसेना. ॥ ९३ ॥ बळ देखोनि सर्वांगळें । एक [9]नामाच्या [10]ईर्षाळें । गंधर्वराजें बुद्धिकुशळें । संग्राम त्यासीं मांडिला. ॥ ९४ ॥ कुरुक्षेत्रीं बहुकाळवरी । [11]शस्त्रांची घोर [12]झुंजारी । कपटविद्येच्या गुप्तमारीं । राजा प्राणें घेतला. ॥ ९५ ॥ चित्रांगदनरनायका । मारूनि [13]गंधर्वराज देखा । प्रवेशला गंधर्वलोका । भीष्मा भेणें तेकाळीं. ॥ ९६ ॥ हस्तनापुरीं सत्यवतीसुत । गंधर्वें न कळतां केला घात । भीष्माचार्य अतिदुःखित । म्हणे, 'हें कर्म आमुचें.' ॥ ९७ ॥ संपादूनि [14]प्रेतकार्यार्था । विवेकें शांतविली माता; । विचित्रवीर्य कनिष्ठ भ्राता । राज्यासनीं [15]स्थापिला. ॥ ९८ ॥ रक्षक होवोनि स्वशक्ती । राज्य चालवी अनुजाहातीं । प्रजापालनीं धर्ममूर्ती । [16]मांधातया सारिखा. ॥ ९९ ॥ वेदशास्त्रधनुर्वेदु । निपुण झालिया कनिष्ठबंधु । [17]उपनयनानंतर शब्दु । विवाहाचा प्रगटला. ॥ १०० ॥ 'बंधुयोग्य राजकुमरी' । म्हणे, 'हे विचारा नोवरी । रूपें रतीचिये सरी । कीं दमयंतीसारिखी.' ॥ १०१ ॥ वार्ता सांगिजे ऋषेश्वरीं । काशीश्वरें आपुल्या नगरीं । राजे मेळविले स्वयंवरीं । कन्यात्रय तयातें. ॥ १०२ ॥ अंबा अंबिका अंबालिका । रूपें चातुर्यें अमोलिका । शक्तिधनाच्या आगळिका । ग्राहीक होय बळिष्ठ. ॥ १०३ ॥ श्र-

---

१. ओंव्या ८५ आणि ८८ सारख्याच असून हस्तलिखित दोन प्रतींत आढळतात. म्हणून येथें दाखल केल्या आहेत. ८८ वी ओवी प्रक्षिप्त असावी असें दिसतें. २. मरणातें. ३. दैवयोगानें. ४. अडचण. ५. मनाप्रमाणें. ६. जंबुद्वीप, कुश, प्लक्ष, शाल्मली, क्रौंच, शाक आणि पुष्कर या सात द्वीपांनीं युक्त अशी (पृथ्वी). ७. इंद्राची राजधानी. ८. इंद्र. ९. तुल्य नामाच्या, चित्रांगद या नांवाचा. १०. ईर्षेनें. ११. 'शस्त्रासीं बहुत झुंजारीं' असा अन्य पाठ आहे. १२. युद्ध. १३. चित्रांगद. १४. उत्तरक्रिया. १५. येथें चित्रांगदोपाख्यान संपून १०१ अध्यायही संपला. १६. हा इक्ष्वाकुकुलोत्पन्न पराक्रमी दानशूर आणि तपोनिष्ठ राजा होता. १७. ब्राह्मणक्षत्रियवैश्यांच्या पुत्रांस वेदाधिकारार्थ आठव्या वर्षी करावयाचा संस्कार, मौंजीबंधन. (पृष्ठ ६९ टीप २० पहा.)

वणें आवेश गंगात्मजा । कन्यात्रय जिणोनि पैजा । अनुजालागीं करणें भाजा । इच्छा झाली मानसीं. ॥ १०४ ॥ विलंब दवडोनि माघारां । आळस न भेटवितां विचारा । सभागमें घेऊनि वरा । निघता झाला तात्काळीं. ॥ १०५ ॥ एकरथेसीं [2]शरासनधारी । पावला वाराणसीपुरीं । [3]रंगभूमिकि माझारीं । [4]हेममंडप उभारिले. ॥ १०६ ॥ शाण्णवकुळींचे राजकुमर । उभे करूनि दिव्य शृंगार । भीष्म देखोनि लहान थोर । विषादवातें झडपिले. ॥ १०७ ॥ [5]कुंजरशावकांचे मेळ । सिंहदर्शनीं होती व्याकुळ, । जेंवी पातल्या आचारशीळ । कर्मभ्रष्ट कांपती. ॥ १०८ ॥ तैसी जाणोनि भीष्मशक्ती । म्हणती, '[6]आमिष गेलें हातीं.' । निर्बळपणें निंदायुक्तीं । चालते झाले समस्त. ॥ १०९ ॥ म्हणती, 'जे जे वयें तरुणें । धरून पातले स्त्रीकामने । येथें यावया वृद्धपणें । कारण कोण विशेष. ॥ ११० ॥ पितयाच्चिया विवाहकार्या । स्वसुखें नेमिलें ब्रह्मचर्या । तें अवघेंचि गेलें वांया । उत्तरवय दिसताहे.' ॥ १११ ॥ हें ऐकूनि गंगानंदन । कोपें कोपला दारुण । म्हणे, 'मूढ हो ! ऐका वचन । प्रतिज्ञेचें अवघेंही. ॥ ११२ ॥ अवमानूनि अयोग्यांतें । जिंकोनियां राजसभेतें । पूजा नेइजे पंडितें । विद्याबळें ज्यापरी. ॥ ११३ ॥ तेंवि तुमचीं [9]आननें काळीं । करूनि नेतसे तिघी बाळी, । सोडवीना तयाचें [10]मौळीं । चरण माझा [11]न्यासिला. ॥११४॥ म्हणोनि उतरोनियां क्षिती । राजकन्या धरिल्या हातीं । रथीं वाहूनि [12]भद्रजाती । नगरपंथें परतला. ॥११५॥ 'पुरुषचिन्हें जो [13]औथिला । खाडमिशांचा दादुला । तेणें आड टाकूनि [14]वहिला । संग्राम मजसीं करावा.' ॥११६॥ ऐकोनि भीष्माचें उत्तर । कोपा चढले राजकुमर । सज्जूनि आपुलाले भार । [15]वरवाळले संग्रामा. ॥ ११७ ॥ 'घ्या घ्या' म्हणती अवघेजण । सकळ बोलती आगळें वचन, । 'कन्या नेतसे हिरोन । अव्हेरून समस्तां.' ॥११८॥संग्रामसंकेतें गर्जे [16]भेरी । [17]त्राहटिल्या [18]भयासुर स्वरीं । शृंगें [19]काहळ्या रणमोहरी । वीरदुंदुभी वाजती. ॥११९॥ चातुरंगसैन्यसंपत्ती । हस्ती वाजी रथ पदाती । [20]वर्मे [21]चर्मे शस्त्रजाती । करमंडित विराजे. ॥१२०॥ [22]राऊत [23]वळंघले अश्वावरी, । [24]हस्तीप बैसले कुंजरीं, । रथी आरू-

---

१. भार्या. २. चापधारी. ३. विवाहभूमिप्रदेशीं. ४. सुवर्णमंडप. ५. हत्तीच्या छाव्यांचे. ६. लोभविणारा पदार्थ. (स्त्री धन इत्यादि.) ७. हें जमलेल्या क्षत्रियांचें भाषण. (अध्याय १०२ श्लोक ७-९.) ८. हा दाखला मूळग्रंथांत नाहीं. ९. मुखें. १०. मस्तकीं. ११. ठेविला. १२. उत्तम जातीच्या. १३. संपन्न. १४. सत्वर. १५. फिरले. १६. दुंदुभी. १७. वाजविल्या. १८. भयंकर. १९. काहळ, काहल. काहला=शिंगासारखें वाद्य. २०. कवचें. २१. ढाला. २२. घोडे राऊत. २३. चढले. २४. महात.

ढले रैहंवरी, । उर्ष्ट्रीं वरीं पैं एक. ॥ १२१ ॥ प्रचंड कैरटी शाळ्यायन । स्रवती मदोदकाचे घैन; । दिव्यास्त्र म्हणती, 'पवन । पैजे सांडों माघारें.' ॥ १२२ ॥ विकैट वीरांचिया हांका । रागें फोडिती तडका; । म्हणती, 'नदीच्या बाळका ! । सेनासमुद्रें गिळिलासी.' ॥ १२३ ॥ चंदन नेतां कुठारधारीं । रागें वेढिजे कांद्रव्यभारीं । निधान साधितां पंचाक्षरीं । भूतावळी वेढिती. ॥ १२४ ॥ तेंवी भीष्मासीं झुंजारी । व्यावया धांविजे महावीरीं, । रथ वेष्टूनि चौफेरी । नानाशस्त्रीं हाणिती. ॥ १२५ ॥ जैसें अवगुणाचें वृंदें । विभांडी एक विचारसिद्ध । तैसा भीष्म संग्रामवृद्ध । त्रासिता झाला परांतें. ॥ १२६ ॥ धनुष्य सज्जोनि घेतलें मुष्टीं । गुणीं सज्जिल्या उभय [10]कोटी । कोदंडघंटांचे बोभाटीं । मद सांडित परांचे. ॥ १२७ ॥ अमरांअसुरांसारिखा थोर । युद्ध मांडिलें घोरांदैर । हें देखोनि मंदाकिनीचा कुंमर । वरिता झाला वीरश्री. ॥ १२८ ॥ त्यागूनि ब्रह्मचर्यनियमा । [12]तियेसीं रतला जारकर्मा । [13]परांगना राजप्रतिमा । [14]वीर्यपंकें लोपल्या. ॥ १२९ ॥ धनुर्विद्या हस्तलाघव । देखोनि आश्चर्य करिती देव, । सोडण्या वोढण्याची ठेव । मनपवना लक्षेना. ॥ १३० ॥ तीन तीन एक एक । पांच पांच हेमपुंखें । सुटतां परसैन्यीं कौतुक । वर्तलें तें ऐक पां. ॥ १३१ ॥ धनुष्यें तोडिलीं हातींचीं हातीं । ध्वजाग्र नाहींच केलें रथीं । वर्म चर्म भेदितां क्षिती । असंख्य प्राणी मूकले. ॥ १३२ ॥ मुकुटकुंडलें साळंकृत । शिरसरोजें शैंतानुशत । पृथ्वीलिंगा सुशोभित । पूजा मिरवे भीष्माची. ॥ १३३ ॥ अँशुक्तनदीचे संघाट । माजले गर्जतां खळखळाट, । धरादेवीचें ललाट । जाणों कुंकुमें चर्चिलें. ॥ १३४ ॥ एक केसरी बहुत [22]वैरण, । हंसाभोंवते [23]वायसगण, । एक साधु बहुत दुर्जन, । तेंवी बहुत एकासीं. ॥ १३५ ॥ कणसें सैंवंगिलीया शेतीं । ताटें निर्फळ दिसती रीती । तैशा शिरांवीण पंक्ती । रुंडाचिया चौफेरी. ॥ १३६ ॥ असाध्य जाणूनि लाभातें । साधक सांडिती यत्नातें । तैसें सेऊनि अपजयातें । पृथ्वीपाळ परतले. ॥ १३७ ॥ परशरसंधानमेघधारीं । [25]झांकोळला गांगेयगिरी । वरी खळांचिया दुरुक्तिमारीं । शांत जैसा चळेना.

१. रथीं. २. गज. ३. मेघ. ४. भयंकर. ५. भीष्मा. ६. सर्पसमुदायीं. ७. ठेवा. ८. पिशाचबाधानिरासक मंत्र ज्यास येतात तो=पंचाक्षरी. ९. समुदाय. १०. अग्रें. ११. भयंकर. १२. वीरश्रीशीं. १३. शत्रुयोषिता. १४. चिखलानें. १५. सोनें आहे ज्यांच्या पंखांस असे बाण. १६. शिरकमळें. १७. शेंकडों. १८. रक्तनदीचे. १९. समूह. २०. पृथ्वी. २१. सिंह. २२. गज. २३. कावळ्यांचे समूह. २४. कापलीं असतां. २५. व्यापलें.

॥ १३८ ॥ असंख्य सोडोनि बाणजाळ । गज खिळोनि केले अचळ । स्थावर वृक्ष निजनिश्चळ । तैसे अश्व स्वारेंसीं. ॥ १३९ ॥ दहासहस्र महारथी । पराभविले संग्रामपंथीं । पाठी देवूनियां पळती । प्राणधाकें दशदिशा.॥१४०॥ संग्राम[1] नोव्हे तो विचित्र । चपळ **भी**ष्माचे सकाम शर । सेनास्त्रियेचें धैर्य वस्त्र । सढील झालें झगडतां. ॥ १४१ ॥ वीरश्रेणी निऱ्याग्रंथीं । सुटली नावरे उभयहस्तीं । प्राणगुह्य झांकोनि परौती । पळे सत्वर लाजली. ॥ १४२ ॥ अवमान पावतां राजपंक्ती । देखोनि **शाल्व**[2] **सौ**[3]भपती । धांविन्नला क्रोधमूर्ती । **भी**ष्मासमोर आवेशें. ॥१४३॥ म्हणे, 'स्वल्प रे **गं**गापुत्रा! । जितेंद्रिया अतिपवित्रा! । स्त्रीलोभें आजि अपवित्रा । दंड पावसी मजहस्तें'. ॥ १४४ ॥ म्हणोनि सोडिली बाणकोटी । जेंवी मूर्खाच्या ज्ञानगोष्टी । **भी**ष्म सर्वज्ञ तृणासाठीं । अवगणूनि सांडिला. ॥ १४५ ॥ **वा**रुणास्त्र लाऊनि **गु**णीं । चारी अश्व एके क्षणीं । मारूनि सारथीयाचा मूर्धी । गगनमार्गें उडविला. ॥ १४६ ॥ धरितां युद्धाचा आवेश । तात्काळ प्राणा होईल नाश । सांडोन संग्रामाचा हव्यास । **शा**ल्व मार्गां माघारे. ॥ १४७ ॥ जीवदान देऊनि त्वरित । **शा**ल्व सोडिला जिवें जीत. । जैसें शिवनिर्माल्य भक्त । त्यागिलें तें न पाहे.॥१४८॥ जिणोति रायांचा समुदावो । विजय पावला **भी**ष्मदेवो । विजयलक्ष्मीसहित ठावो । **ह**स्तनापुरा पातला. ॥ १४९ ॥ भगिनीसवें वडील बंधू । श्वशुरसंगीं पुत्रवधू । नानाजनक कृपासिंधू । कन्या आणी माहेरा. ॥१५०॥ तैसाच विजयलक्ष्मीसहित । कन्या आणूनि तो येथ । मातृहस्तीं ओपी उचित । कनिष्ठबंधूकारणें. ॥ १५१ ॥ पाचारूनि ऋषी ब्राह्मणा । विवाहसुलग्नविचारणा । आरंभितां वडील वचना । **अं**बा[4] बोले **भी**ष्मासी. ॥ १५२ ॥ 'म्यां आपुले मनोभावीं । **शा**ल्व[5] वरिलासे पूर्वीं, । **शा**ल्वरायें आपुले जीवीं । इच्छा माझी धरिलीसे. ॥ १५३ ॥ आर्तवंताचे हृदयीं आर्त । कृपेनें पुरवी कृपावंत । स्नेहें विघडितां अद्भुत । पाप ग्रंथीं बोलिलें. ॥ १५४ ॥ तरी धर्मरक्षका! धर्ममूर्ती!। सदां चालसी धर्मपंथीं । स्वधर्म विचारूनि निश्चितीं । उचित धर्में वर्तावें'. ॥ १५५ ॥ विवेकें विचारूनि सुमती । परवस्तू मानूनि **अं**बासती । धाडिता

---

१. 'संधान नव्हे तो स्वतंत्र' असा दुसरा पाठ आहे. २. एक शाल्वदेशीय राजा. यानें भीष्माशीं घोर युद्ध झालें. याला अंबेनें मनानें वरिलें होतें म्हणून ती भीष्माची आज्ञा घेऊन याजकडे आली पण तिचा स्वीकार यानें केला नाहीं. भारती युद्धांत हा दुर्योधनाकडे होता. सात्यकीनें यास मारिलें. ३. सौभ=शाल्वराजाचें अंतरिक्षांत फिरणारें विमानरूप नगर, पति=त्याचा स्वामी. ४. ही काशिपतीची ज्येष्ठ कन्या. ५. अध्याय१०२ श्लोक ६१-६२ पहा.

झाला शाल्वाप्रती । गौरवूनि सन्मानें. ॥ १५६ ॥ समागमें वृद्ध ब्राह्मण । नपुंसक दास दासीजन । देऊनियां शिबिकायान । अंबा सौभाग्यें पावविली. ॥ १५७ ॥ अंबिका अंबालिका दोन्ही । विधीयुक्त पाणिग्रहणीं । अनुज्ञा ओपूनियां जननी । तोषविली अपार. ॥ १५८ ॥ व्यासादिक ऋषीश्वर । शरीरसंबंधीं नृपवर । गौरविले हो! अपार । द्रव्यदानें याचकां. ॥ १५९ ॥ तृषाकाळीं अमृतपान । तेंवी यौवनीं अंगनारत्न । प्राप्त होतां सुखसंपन्न । विचित्रवीर्य विलासी. ॥ १६० ॥ दुष्काळीं मिष्टान्नभोजनें तृप्ती । तेंवी तारुण्यीं प्रमदाप्राप्ती । विचित्रवीर्य मदनमूर्ती । स्त्रियांसंगें रममाण. ॥ १६१ ॥ दोनी करिणीमाजी गज, । कीं गंगेयमुनेमाजी तीर्थराज, । तेंवी क्रीडत भीष्मानुज । उभयवनितांसमागमें. ॥ १६२ ॥ किंचित् काळ सुखसंभ्रमें । भोगितां, सत्यवतीया भीष्में । अकस्मात अदृष्ट कर्में । विघ्न केलें माझारीं. ॥ १६३ ॥ राजयक्ष्मामहारोगें । व्यापिलीं रायाचीं अष्टांगें । काळसर्प लागला वेगें । असाध्य जैसा उतारा. ॥ १६४ ॥ धन्वंतरी मांत्रिका गुणीं । उपचार करितां अनेकयत्नीं । अस्तमानीं अस्तवे तरणी । तेंवी पावला निधनातें. ॥ १६५ ॥ अमृतापाठीं प्रगटे विख । सुखासरिसें होय दुःख । भाग्यासरिसें दरिद्र देख । साव चोरप्राय वर्तत. ॥ १६६ ॥ ऐसें अरिष्ट वर्तलें तेथ । राजा निमाला अकस्मात । तेवेळीं दुःखाचे पर्वत । भीष्मा आणि मातेतें. ॥ १६७ ॥ विचित्रवीर्यप्राणहानीं । सुहृद बुडाले दुःखजीवनीं । अनुजदेह हुताशनीं । गंगातनुजें ओपिला. ॥ १६८ ॥ उत्तरकार्य सारूनि सकळ । सचिंत चित्त अतिव्याकुळ । पुढां वर्तलें तें कुशळ । कथाकौशल्य परिसवू. ॥ १६९ ॥ इति श्रीआदिपर्वकथा । अवधान दीजे संतश्रोत्यां । मुक्तेश्वराच्या भावार्था । भगवंत तुम्हीं कृपाळू. ॥ १७० ॥

अध्याय चोविसावा.

शोकपूराच्या महालोटीं । सत्यवती भीष्म संकटीं । बुडतां येरयेरा कंठीं । झोंबोनि रडती आक्रोशें. ॥ १ ॥ विवेकें शांत करितां माता । नावरे पुत्रशो-

---

१. हत्तीण. २. प्रयाग. ३. विचित्रवीर्य. ४. या नांवाचा एक क्षयरोग. ५. सूर्य. ६. मरणातें. ७. निवर्तला. ८. अग्नींत. ९. या अध्यायास 'विचित्रवीर्यनिधन' आणि 'विचित्रवीर्योपरम' अशीं नांवें हस्तलिखित प्रतींत आढळतात. १०. येथें मूळांतील १०२ अध्याय संपतो. मुक्तेश्वराच्या या तेविसावे अध्यायांत मूळांतील १००-१०२ या अध्यायांचा समावेश झाला आहे. मोरोपंतांनीं हाच मजकूर १९ पद्यांत आटोपून घेतला आहे. (मोरोपंत–आदिपर्व–अध्याय १४ पहा.) ११. एकमेकांस

कावस्था । मग म्हणे, '**भीष्मा**! ऐक आतां । सांगेन तें त्वां करावें. ॥ २ ॥ संततीहीन झाला वंश । शेष तूं एक पुण्य पुरुष । माझे वचनीं अतिविश्वास । धरूनि एक करावें. ॥ ३ ॥ **विचित्रवीर्याचीं**[1] उभय क्षेत्रें[2] । आपुलीं मानूनि स्वतंत्रें । स्ववीर्यनिक्षेपें[3] पवित्रें । प्रजावंत करावीं. ॥ ४ ॥ येथें करितांचि अनुमान । वंशीं खंडलें संतान.' । **भीष्म** म्हणे, 'ऐक वचन । श्रेयस्कर दोंपक्षीं. ॥ ५ ॥ पूर्वीं तुझिया विवाहकार्या । म्यां स्वीकारिलें ब्रह्मचर्या । हें अन्यथा करावया । सामर्थ्य ईश्वरा असेना. ॥ ६ ॥ उष्णता सांडील वैश्वानर[4], । प्रभा त्यागील पद्मिनीवर[5], । हिमांशु[6] दवडील हिमकर, । परी मी सत्य सांडीना. ॥ ७ ॥ शब्दविषय सांडिल गगन[7], । रूप तेज, स्पर्श पवन, । रसविषय सांडिला जीवन[8], । सत्य माझें चळेना. ॥ ८ ॥ पृथ्वी सोडील अंगींचा गंधू[9], । परी मी नातळें असत्य शब्दू; । अनाचारीं संचरे साधू । हें कैसेंनि घडेल? ॥ ९ ॥ त्रैलोक्य बुडतां येचक्षणीं । परि मी नढळें नियमासनीं । **कुरुराजातें** कवण मानी । ज्यालागीं सांडी सत्यातें. ॥ १० ॥ आतां ऐक उपाय सुगम । आपत्काळीं आपद्धर्म[10] । राहाटोनि[11] तरले दुर्गम । मागां वडील विवेकीं. ॥ ११ ॥ एकवीसवेळां हे मेदिनी । निर्वीर केली **भार्गवें**[12] बाणीं । तेवेळीं समस्तराजांगनीं[13] । ब्राह्मणकुळ प्रार्थिलें. ॥ १२ ॥ त्याचेनि वीर्यें क्षत्रियवंश । वाढता केला निर्दोष । येचविषयीं इतिहास । पुरातन परिसें कीं. ॥ १३ ॥ **बृहस्पतीचा** वडील बंधु । **उतथ्य**नामा ऋषी प्रसिद्धु । **ममता** देवी तयाची वधु । गुणलावण्यनेटकी. ॥ १४ ॥[14] तिसीं **बृहस्पती** कामासक्तीं । संगमा प्रवर्तला एकांतीं । **ममता** देवरातें[15] प्रार्थी, । 'मी गर्भिणी[16], सर्वज्ञा! ॥ १५ ॥ तुझिया अमोघरेतधारीं । तात्काळ जन्मेल देहधारी[17] । दोघांजणां इयेउदरीं । वस्तीस ठाव असेना. ॥ १६ ॥ येरें नायकोनि बोला । मैथुनीं निघे कामाथिला. । हें देखोनि विनविता झाला । गर्भवासी[18] तयातें. ॥ १७ ॥ म्हणे, 'ताता! विवेकमूर्ती! । मजची ठाव संकोचवस्ती । तुझा वीर्यज येतां पुढती । प्राणनाश तिघांतें.' ॥ १८ ॥ **बृहस्पती** नायके ते वाणी । सुखाडला सुखमैथुनीं । रेत पडतां तेणें चरणीं[19] । योनिद्वारें रोधिलें.

---

१. अध्याय १०३ श्लोक ८-११ पहा. २. स्त्रिया. ३. स्वीय रेताचें दान करून. ४. अग्नि. ५. सूर्य. ६. चंद्र. ७. आकाश. ८. उदक. ९. हे सर्व दृष्टांत मूळांत अहेत. (अध्याय १०३ श्लोक १६-१८). १०. आपत्काळींचे धर्म. ११. चालवून, आचरून. १२. जामदग्न्य रामानें. १३. राजस्त्रियांनीं. १४. अध्याय १०४ श्लोक ५-८ पहा. १५. दिरातें. १६. उतथ्यापासून गर्भिणी असा भाव. १७. अन्य प्राणी. १८. औतथ्य. १९. उदरस्थगर्भानें आपल्या पायानें रेताचा प्रतिबंध केला.

॥ १९ ॥ यास्तव वीर्य पडतां तळीं । बृहस्पती कोपला क्रोधानळीं, । म्हणे, 'पापिष्ठें कवणें येकाळीं । संतोष माझा भंगिला? ॥ २० ॥ मैथुनांतीं रेतःपात । जीवमात्रा आल्हाद करीत, । तें त्वां लोटितां घात । केला वाटे मज दुःखें.' ॥ २१ ॥ म्हणोनि शापिलें तैयातें, । 'गर्भी अंधत्व जडो तूतें.' । तो गर्भांध जन्मला त्यातें । दीर्घतमा हें नाम. ॥ २२ ॥ तया दीर्घतम्याचे कुमर । गौतमादि ऋषीश्वर । तपस्तेजें अतिदुर्धर । विश्वामित्रासारिखे. ॥ २३ ॥ तये वर्तमानीं पाहीं । व्यभिचाराचा निषेध नाहीं । म्हणोनि परांगनाच्या ठायीं । प्रजा होती परवीयैं. ॥ २४ ॥ दीर्घतम्याची अंगना द्वैवती । सेजे टाकूनि आंधळा पती । निघती झाली आणिकाप्रती । स्वेच्छाचारें रमाया. ॥ २५ ॥ हें देखोनि दीर्घतमा । विषादें केली क्रोधप्रतिमा । शापोनि, मर्यादेची सीमा । नेमिता झाला लौकिकीं. ॥ २६ ॥ आजिपासोनि जे परवनिता । परपुरुषासीं संग करितां । ते जाईल अधःपाता । असंख्य वर्षें देवांचीं. ॥ २७ ॥ निंद्य शब्द घेऊनि माथां । इहलोकीं वागवी जीविता । मरणांतरें अधःपाता । घोरनरकातें पावती. ॥ २८ ॥ तेचि मर्यादा अद्यापवरी । वर्तत असे लोकाचारीं । पुढें त्याचिया दाराकुमरीं । काय केलें ऐक पां. ॥ २९ ॥ शाप वदला तेणें रागें । काष्ठद्रोणीतें निर्मूनि आंगें । अंधें तो बैसऊनि वेगें । गंगाजीवनीं सोडिला. ॥३०॥ तो प्रवाहाजळाचेनि धारें । लंघूनि देश देशांतरें । बळीनामाराजेश्वरें । आपुलें नेत्रीं लक्षिला. ॥ ३१ ॥ थडिये लागतां काष्ठद्रोणी । अवलोकी तंव ब्राह्मण गुणी । परम तपस्वी विद्याखाणी । जाणोनि पूजिला आदरें. ॥३२॥ तोही राजा संततिहीन । मनीं विचारी उपाय गहन । करूं प्रजांचें उत्पादन । ययापासूनि साक्षेपें. ॥ ३३ ॥ याचेनि वीर्यें स्त्रियेच्या पोटीं । संतती विचारूं गोमटी । हेचि वैधूतें वदूनि गोष्टी । शय्यासनीं पाठविली. ॥ ३४ ॥ अंधत्व वृद्धत्व दोष प्रगट । देखूनि येरीं मानिला वीट, । आपण न वंचोनि त्यानिकट । विपरीत चर्या वर्तली. ॥ ३५ ॥ आपुले वस्त्रालंकार । दासीस करूनि शृंगार । अंगसंगीं निरंतर । ऋषीसंगीं लाविली. ॥ ३६ ॥ काक्षीवदादी जे राजे । अकरा संख्या पै जाणिजे । शुद्रक्षेत्रीं याचेनि बीजें । जन्मले हे जाण पां. ॥३७॥ संतती नोव्हे स्त्रियेतें । राजा विचारी दीर्घतम्यातें । तो म्हणे, 'अंधत्व मानूनि

---

१. त्या गर्भस्थ उतथ्यपुत्रातें. २. दीर्घतम्याची भार्या प्रद्वेषी नामक विप्रकन्या होती. ३. प्रद्वेषी. ४. अध्याय १०४ श्लोक ३४-३५ पहा. ५. स्त्रीपुत्रांनीं. ६. लघुनौका. ७. दीर्घतमा. ८. हिचें नाव सुदेष्णा (श्लोक ४५).

मातें । समीप नये तव भार्या'. ॥ ३८ ॥ रायें कोपोनि सुदेष्णेसी । यत्नें धाडिली ऋषीपासीं. । पुढें मग तियेचे कुसीं । अंगादि राजे जन्मले.॥ ३९॥ यालागीं ब्राह्मणवीर्यें निखिळ । वृद्धि पावलें क्षत्रियकुळ, । म्हणोनि धनदानें पुष्कळ । ब्राह्मणोत्तम प्रार्थावा. ॥ ४० ॥ त्याचेनि वीर्यें पौरववंश । वाढता कीजे हा निर्दोष.' । ऐकोनि मातेतें उल्हास । रहस्य कांहीं बोलावया. ॥४१॥ म्हणे, 'सर्वज्ञा! ऐक निरुतें । सहज प्रसंगा आलें येथें । वदूं नये तेंही तूतें । सांगीतलें पाहिजे. ॥ ४२ ॥ कुमारीदशेंत तातसदनीं । पराशर देव महामुनी। नौका रक्षितां जीवनीं । तेणें पथें पातला. ॥ ४३ ॥ तपनतनयेच्या परपारा । नेतां पातला मध्यनीरा । तेथें तो वश होवोनि स्मरा । संगमातें मागीतलें.॥४४॥ कुमारीत्वभंगाचे भेणें । विचारीं घातलें अनुमानें । हें जाणोनि सर्वज्ञतेनें । त्वरित शंकेतें परिहारिलें. ॥ ४५ ॥ तेणें अवलोकितां नेत्रीं । सुगंध उठिला सर्वगात्रीं, । दिवसाची करूनि रात्री । चमत्कार दाखविला. ॥ ४६ ॥ त्यातें ओपिलें देहदाना । व्यास जन्मला तत्क्षणां । भुवनत्रयीं ज्याची तुलना । पावे महेश कीं विष्णु. ॥ ४७ ॥ तोही गुंतलासे वचनीं, । स्मरतां पावेन तत्क्षणीं, । तो पावेल इये व्यसनीं । सोडवील सामर्थ्यें. ॥ ४८॥ ऋषी ब्राह्मण वडील कुमर । तुमचा अग्रज जो सहोदर । अनुजक्षत्रीं त्या अधिकार । प्रजोत्पत्तीकारणें. ॥ ४९ ॥ जरीं हें मानेल तुझिया मना । तरी मी प्रार्थीन द्वैपायना; । विचित्रवीर्याचिया अंगना । प्रजावंत करवीन.' ॥ ५० ॥ ऐसें अनुवादतां ते काळीं । भीष्में हर्षें पिटिली टाळी; । म्हणे, 'हें कृत्य येचिकाळीं । सिद्धी नेलें पाहिजे. ॥ ५१ ॥ झणी करिसी देवध्यान । शीघ्र करवीं व्यासागमन. । हेंचि श्रेष्ठ वेदविधान । पूज्य आम्हां सर्वस्वें.' ॥ ५२ ॥ मग पुत्रवचनें संतोषोन । येरी करी करपादप्रक्षालन, । आणितां स्मरणीं व्यास भगवान । प्रगट झाला तात्काळीं. ॥ ५३ ॥ चंद्र सूर्य आणि हुताश । एके मुसीं ओतिला रस । ऐसा ज्याचा अंगप्रकाश । सबाह्य निववी पहातयां. ॥ ५४ ॥ अवलोकितां जयाची मूर्ती । दुःखदोषा होय शांती । जीव पावे सुखविश्रांती । स्मरणमात्रें जयाच्या. ॥ ५५ ॥ भीष्में करूनी नमस्कार । भावें अर्पी पूजोपचार, । म्हणे, 'देव गुरु ईश्वरा । तूं सर्वस्वें आमुतें.' ॥ ५६ ॥ मातेसी करूनियां नमन । स्नेहें दिधलें आलिंगन. । पुसे, 'करावया स्मरण । कारण कोण

१. श्लोक ५० पहा. २. अंग, वंग, कलिंग, पुंड्र, सुह्म, हे पांच पुत्र. या पुत्रांच्या नांवानें एक एक देश प्रसिद्ध आहे. ३. स्पष्ट. ४. उदकांत. ५. यमुनेच्या. ६. व्यासाला. ७. अग्नि.

सांग पां ? ॥ ५७ ॥ ज्यालागीं चिंतन केलें माझें । तें कार्य सिद्धी पावेल तुझें.' । परिसूनि प्रेमाचें [1]भोजें । धरी आवडी पोटीसीं. ॥ ५८ ॥ म्हणे, 'पुत्रा ! संकटहरणा ! । शांतनू पावलिया [2]निधना । वैधव्य भोगितां वेधना । पुत्रशोकाची पावलें. ॥ ५९ ॥ तुझेनि अनुजीं दोघांजणीं । प्रवेश केला [3]काळाननीं । वंश खंडला, राज्यासनीं । अधिकारी कोणी असेना. ॥ ६० ॥ तरी या कुळाचा कुळसंबंधू । तुजही असे हा हित शब्दू । आपुल्या वीर्यें बंधुवधू । पुत्रवंती कराव्या. ॥ ६१ ॥ भारतवंशाचें वस्त्र । विणतां खंडलें चित्रविचित्र । व्यासवीर्याचें पटसूत्र । सांधूनि करीं धेंडौतें.' ॥ ६२ ॥ ऐकोनि मातेचा वचनार्थ । 'अवश्य' म्हणे व्यास समर्थ, । 'वर्ष एक नेमस्त । व्रतस्थ नारी असाव्या. ॥ ६३ ॥ तपानंतरें शरीरशुद्धी । झालिया उपजेल धैर्यबुद्धी । अमोघवीर्यधारणासिद्धी । तपें लाधे स्त्रियांतें. ॥ ६४ ॥ हळाहळ कवळिलें शिवें । स्पर्शतां जळतील मानवें; । माझें हिरण्यरेत धरवे । ऐसें धैर्य धरवीं स्त्रियांतें.' ॥ ६५ ॥ माता म्हणे, 'पैं तात्काळ । प्राप्त झालें पाहिजे फळ, । विलंबीं घालितां चिरकाळ । धैर्य मातें पुरेना.' ॥ ६६ ॥ व्यास म्हणे, 'ऐके माता ! । माझिया रूपाची उग्रता । शरीरगंधाची तीव्रता । अतिउष्णता तेजाची. ॥ ६७ ॥ स्वस्थचित्तें हें साहिजे । या नावें महाव्रत बोलिजे । येणें तपें फळ पाविजे । इच्छिलें तें तात्काळीं. ॥ ६८ ॥ मैत्रावरुणी समसमान । पुत्र जन्मती गुणनिधान । ज्यांचें पवित्र महदाख्यान । विस्तारेल त्रिलोकीं.' ॥ ६९ ॥ सत्यवती म्हणे, 'ताता ! । तूंचि कृपेनें फळ अर्पिता । तूंचि त्यांतें धैर्यदाता । अतिसमर्थ श्रीव्यास ॥ ७० ॥ विलंबीं गोष्टी न घालीं अतां । पुरवीं माझिया मनोरथा, । तुझे वीर्यज दाऊनि पंथा । मोक्षाचिया मज लावीं.' ॥ ७१ ॥ 'अवश्य' म्हणोनि व्यासमुनी । आसनारूढ गूढस्थानीं । निशाकाळीं विवेकखाणी । स्नुषा बोधी प्रजार्थ. ॥ ७२ ॥ करूनियां मंगळस्नान । हरिहरप्रतिमागुरुपूजन । देऊनि ब्राह्मणातें भोजन । सदक्षिणा सुवस्त्रें. ॥ ७३ ॥ शुचिर्भूत शृंगारेसीं । अंबिका धाडिली ऋषीपासीं । उग्रता देखूनि सर्वांगासी । कंप सुटला चळचळां. ॥ ७४ ॥ खदिरांगार तैसे नयन । पिंगट श्मश्रू विकट वदन । भ्यासुर रूप देखतां प्राण । निघों पाहे बाहेरी. ॥ ७५ ॥ संगमा

१. खाणेंपिणें. २. मरणा. ३. यमाच्या मुखांत. ४. धड वस्त्र. ५. फलोत्पादक. ६. महाविष ७. भक्षण केलें. ८. शुक्र. ९. ऋषीनामविशेष. (अध्याय १०५ श्लोक ४१.) १०. खैराच्या जळत्या निखाऱ्यासारखे. ११. भयंकर.

मिळतां द्वैपायन । धाकें झांकिले उभय नयन । उदरीं वीर्य निक्षेपून । ऋषी बाहेर पातला. ॥ ७६ ॥ हातीं धरूनि व्यासमुनी । अत्यादरें पुसे जननी, । 'पुत्र जन्मेल सुलक्षणी । कैसा मातें परिसवीं.' ॥ ७७ ॥ हांसोनि बोले कृष्णद्वैपायन । म्हणे, 'ऐकें भविष्यवचन । कुमार जन्मेल सुलक्षण । परी तो उणा नेत्रांनीं.' ॥ ७८ ॥ नागायुतबळें बळिष्ठ । कौरवकुळीं प्रख्यात श्रेष्ठ । संततीसंपतीनें वरिष्ठ । बुद्धिबळें आगळा. ॥ ७९ ॥ तयातेंही एकशत । पुत्र जन्मतील बळसमर्थ । दीर्घायुषी प्रख्यातिवंत । प्रज्ञाचक्षु या नांवें. ॥ ८० ॥ मातृअवगुणविकारीं । गर्भांध होईल स्वशरीरीं । कीं काळी कपाळ पिटी करीं, । 'इच्छे ऐसें नव्हेची. ॥ ८१ ॥ स्वकुळवंसुधासंरक्षणीं । अंध अधिकारी राज्यासनीं । भूषणरूप न दिसे जनीं । चक्षुहीन या हेतू. ॥ ८२ ॥ यालागीं पुढती कृपा करूनी । मान देई माझे वचनीं । आणीक एक सुपुत्र गुणी । द्वितीयक्षेत्रीं निर्मावा. ॥ ८३ ॥ 'निकें' म्हणूनि तेचक्षणीं । अदृश्य झाला व्यासमुनी. । काळें काशीश्वरनंदिनी । पुत्र प्रसवे कौतुकें. ॥ ८४ ॥ तो धृतराष्ट्र प्रज्ञाचक्षू । कौरवकुळीं सर्वाध्यक्षू । कुमरद्वयामाजि मुख्यू । गर्भांध श्रेष्ठ ज्येष्ठत्वें. ॥ ८५ ॥ पुढती सुमुहूर्तशुभयोगीं । आव्हानिला निष्काम योगी । पूजा अर्पूनि साष्टांगीं । भीष्मादिकीं वंदिला. ॥ ८६ ॥ ऋतुस्नान अंबालिका । शृंगारूनि लावण्यलतिका । शय्यासना प्रवेशतां, शंका । अत्यद्भुत पावली. ॥ ८७ ॥ कैंपिलं जटा सलंब वोष्टीं । विरूपता देखूनि दृष्टीं । तीक्ष्ण नखें आरक्त नेत्रीं । धैर्य न धरवे सर्वथा. ॥ ८८ ॥ प्रथमता नरसिंहरूप । देखतां कमळा पावली कंप । तेंवी अंबालिका ताप । विरूपतेचा पावली. ॥ ८९ ॥ पांडुरवर्ण सर्वगात्रीं । अप्रकाश चंद्रवक्त्रीं । ऋषीनें अवलोकूनि नेत्रीं । अंगसंगा प्रवर्ते. ॥ ९० ॥ उदरमांदुसे वीर्यधन । निक्षेपूनि[10] शुद्धाचमन । बाहेर येतां स्वनंदन । माता पुसे सादरें. ॥ ९१ ॥ 'अळंकृत शुभलक्षणीं । राजपुत्र जन्मेल गुणी.' । ऐसी गोड अमृतवाणी । ऐकोनि आल्हाद भीष्मातें. ॥ ९२ ॥ ऋषी म्हणे, 'बहुतेक तैसे । शरीरवर्ण कापुरा ऐसे । ते मातेचेनि दोषें । धैर्य अपुरें म्हणोनी. ॥ ९३ ॥ पांडुरत्व पावली सर्वांगीं । पंडु जन्मेल श्वेतरंगीं । तेंचि नाम तयालागीं । पंडुराजा कुरुकुळीं. ॥ ९४ ॥ देह होईल पांडुरवर्ण । म्हणून पंडु या अभिधान[11] । पाचारील सर्व जन । राजकुळीं कुळदीपू. ॥९५॥ तयासि

१. व्यास. २. अंध. संभोगकाळीं मातेनें डोळे मिटले होते या वैगुण्यामुळें अंध--असा भाव. (अध्याय १०६ श्लोक ८-१०.) ३. सत्यवती. ४. पृथ्वी. ५. बोलाविला. ६. पृष्ठ १४० टीप ३ पहा. ७. पिंगट वर्ण. ८. लक्ष्मी. ९. उदररूप पेटींत. १०. टाकून, ठेवून. ११. नाम.

होतील पंचकुमर । पांडव सुरांचे अवतार । ज्यांचेनि हातें कमळावर । भार फेडील पृथ्वीचा.' ॥९६॥ पंडुत्व मानुनी बाळातें । माता विनवी सुपुत्रातें, । 'याचक होऊनि तूतें । फळ आणीक मज देईं.' ॥९७॥ आवडीं आलिंगूनि हृदयीं । म्हणे, 'माझिया वचना मान देईं । तृतीय पुत्रदान देईं । एवं यश उद्धरणा.' ॥ ९८ ॥ वचनें आश्वासूनि सुभगें । गुप्त झाला योगमार्गें । काळें अंबालिका आंगें । राजपुत्रा प्रसवली. ॥ ९९ ॥ पंडुराजा पांडुरवर्णी । बळसंपन्न प्रतापतरणी । ज्याच्या पुत्रांची करणी । वर्णी भारत इतिहास. ॥ १०० ॥ पुढां मागुती तृतीय खेपे । ऋषी मातेचिया कृपे । येता झाला पैं साक्षेपें । फळ तिसरें द्यावया. ॥ १०१ ॥ पुढती कौशल्या धाडिली । ते रूपाच्या उग्रते भ्याली । दासी शृंगारूनि वहिली । पुत्रकामा पाठविली. ॥ १०२ ॥ तियें भोगोपचारविलासें । ऋषी रंजविला संतोषें । उग्रविरूपतेचें पिसें । स्पर्शों नेदी मानसा. ॥ १०३ ॥ नमनें स्तवनें विनयभजनें । अंगसंगें देहदानें । ईश्वरबुद्धीं भजतां कृष्णें । अति संतोष मानिला. ॥ १०४ ॥ पैरिचारिका हीन जाती । हृदयीं निर्मळ भावभक्ती । दोहींहून उत्तम रीती । श्रेष्ठ वाटे ऋषीतें. ॥ १०५ ॥ देखोनि तिचा अचळ भाव । प्रसन्न झाले व्यासदेव । वीर्यदानें धर्मराव । देहधारी जन्मला. ॥१०६॥ सर्वलक्षणी सुलक्षण । विवेकाचें जन्मस्थान । धर्ममूर्ती गुणनिधान । विदुर क्षत्ता जन्मला. ॥ १०७ ॥ मांडव्यशापें रविनंदन । शूद्रयोनींत पावला जनन । भक्तियोगें अतिसंपन्न । सत्वशीळ धर्मात्मा. ॥ १०८ ॥ सत्यवतीचें वाचाऋण । परिहारूनि द्वैपायन । मातेसी करूनियां नमन । जाता झाला स्वस्थाना. ॥ १०९ ॥ एवं विचित्रवीर्यक्षेत्रें । दासीसहित पुण्यपात्रें । व्याससवीर्य अतिपवित्रें । विस्तारातें पावलें. ॥ ११० ॥ खंडला वंश तो पुढती । वृद्धी पावला ऐशारीती । एवं गंधर्वतुल्य नृपती । कुमरत्रय जन्मलें. ॥ १११ ॥ हें परिसतां महादाख्यान । संतती पावती संततिहीन । वचन व्यासाचें प्रमाण । सत्य सत्य त्रिवाचा. ॥ ११२ ॥ इति श्रीभारत पर्व आदी । श्रवणें हरती महा व्याधी । लीलाविश्वंभरप्रसादीं । मुक्तेश्वर कवि वदे. ॥ ११३ ॥

---

१. अंबिका. २. अध्याय १०६ श्लोक २३-२५ पहा. ३. व्यासानें. ४. दासी. ५. यमधर्म. ६. या अध्यायास 'धृतराष्ट्रपंडुविदुरोत्पत्ति' असें नांव एका प्रतींत आढळतें. या अध्यायांत मूळांतील १०३-१०६ या अध्यायांचा समावेश झाला आहे. पंतांनीं हाच मजकूर सुमारें ६० पद्यांत आटोपून घेतला आहे. (मोरोपंत–आदिपर्व–अध्याय १५ पहा.)

अध्याय पंचविसावा.

राजा म्हणे, 'चातुर्यसिंधु! । कवण हो! ऋषीचा अपराधु? । यम आचरला तो विशदु । अर्थ मातें परिसवीं. ॥ १ ॥ कवणदोषें कवणें बोला । शापून दासीपुत्र केला?' । वैशंपायन म्हणे, 'भला! । ऐक आतां एकाग्र. ॥ २ ॥ मांडव्यनामें ऋषेश्वर । तपोवनीं तपस्वी थोर । अनुष्ठानीं अहोरात्र । काळ सार्थक करीतसे. ॥ ३ ॥ वृक्षमूळीं एकचरणी । उभा तिष्ठे वल्कलवसनी । ऊर्ध्वबाहु दिवसरजनी । तपश्चर्या आचरे, ॥ ४ ॥ नगरामाजि नृपमंदिरीं । भांडार फोडिलें तस्करीं । हेम रत्नें कोटीवरी । अमूल्य वस्तू चोरिल्या. ॥ ५ ॥ घेऊनि पळतां लगबगा । राजदूत पावले लागा. । ठाव न दिसे लपण्याजोगा । मुनिस्थानातें ते आले. ॥ ६ ॥ ऋषी ध्यानस्थ, नेणे कांहीं । तस्करद्रव्यासहित पाहीं । गुप्त ठेले आश्रमगेहीं । स्थळीं स्थळीं भयभीत. ॥ ७ ॥ धांवणें पुसे मुनिशिष्यांतें, । 'चोर पळाले येणे पंथें । शीघ्र सांगिजे तयांतें । जाणें असे त्यांपाठीं.' ॥ ८ ॥ ब्राह्मण म्हणती, 'आपण । नेणों तस्करांची कैसी खुण, । पळाले तें मार्गज्ञान । आम्हां नाहीं सर्वथा.' ॥ ९ ॥ शोधीत पातले राजदूत । तस्कर गवसले वस्तूसहित, । म्हणती, 'तापसी नव्हेत येथ । महामैंद कपटी हे. ॥ १० ॥ पाश तस्कर वाँटपाडा । वेष दाऊनि शिंतिरी मूढा । चोरसंग्रहनिवाडा । नागविती जगातें'. ॥ ११ ॥ म्हणोनि उठऊनि आसनाहुनी । शरीर पीडिलें दंडपाणीं । ताडण करीत करबंधनीं । राजगृहा आणिला. ॥ १२ ॥ तस्करांसहित तस्करनाथ । धरूनि आणिला वस्तूसहित, । राजा निरोपी क्रोधयुक्त । 'शूळदंड त्या कीजे.' ॥ १३ ॥ आज्ञा होतांचि तात्काळीं । मांडव्य नेऊनि घातला सुळीं । तो तपस्वी निश्चयबळीं । धैर्यासनीं चळेना. ॥ १४ ॥ शूळपीठाचें आसन । करोनि मांडिलें अनुष्ठान । योगबळें रक्षूनि प्राण । तपश्चर्या आचरे. ॥ १५ ॥ ऐसे कांहीं लोटिले दिवस । निशींकाळीं मुनि तापस । धरूनि पक्षियाचा वेष । तयापासीं पातले. ॥ १६ ॥ सखेद पुसती मांडव्यातें, । 'कोण अपराध घडला तूतें?' । तो म्हणे, 'कायावाचाचित्तें । पाप कांहीं जाणेना. ॥ १७ ॥

---

१. जनमेजय. २. अध्याय १०७ श्लोक १ पहा. ३. प्रयत्ना. ४. चोर धरण्यासाठीं आलेले राजभृत्य.—जसें चोर पळत आहेत तों सरकाराचें धांवणें आलें. ५. चोरांची. ६. जुवेबाज, फांसेगार. ७. मार्गांत लूट करून रहदारी बंद करणारा. ८. फसविती. ९. शूलावर—सूच्यग्र लोहदंडावर चढविण्याची शिक्षा. १०. रात्रीं. ११. त्या मांडव्यापाशीं इतर मुनि शकुनाचें रूप घेऊन आले. (अध्याय १०७ श्लोक १६.)

निरपराधी आसनाहुनी । उठऊनि तीक्ष्णशूळासनीं । तनू सूदली[1] उताणी । हेंचि एक मी जाणें. ॥१८॥ न विचारितां नरनायकें[2] । पृच्छा[3] न करितां निजमुखें । शरीर दंडिलें महादुःखें । कारंण कांहीं कळेना.' ॥१९॥ ऐसें उभयतां संवादतां[4] । हेरीं[5] ऐकिली ते वार्ता । जाणविलें नरनाथा । 'ऋषी वधिला' म्हणोनी.॥२०॥ राजा प्रधानपरिवारेसीं[6] । धांवोनि पातला शूळापाशीं । तपस्वी देखोनि मानसीं । खेद अद्भुत पावला. ॥ २१ ॥ घालोनियां लोटांगण । अश्रुधारा स्रवती नयन । 'नकळत घडलें, मी अज्ञान । क्षमा समर्थें करावी.' ॥ २२ ॥ आणोनी सूत्रधार[7] कुशळ । क्रकचें[8] खंडण केला शूळ । हृदयीं भेदलें तें प्रबळ । काढूं जातां प्राणांत. ॥ २३ ॥ म्हणोनि उपडूं नेदी हातें । शृंगप्राय[9] हृदया-वरुतें । ठेविलें म्हणोनियां त्यातें । म्हणती नाम अणीमांडव्य[10]. ॥ २४ ॥ कोप न करितां राजयासी । ऋषी पातला यमलोकासी । रागें पुसे धर्म-राजासी, । 'किमर्थ मातें दंडिलें? ॥२५॥ कवणें कर्में? कवणें दोषें? । मज[11] त्वां दुःख दिधलें ऐसें?' । यम म्हणे, 'सावकाशें । क्षमावंता! अवधारीं[12]. ॥ २६ ॥ बिंदु[13]प्राय पुण्य कीजे । समुद्रप्राय भोगिजे, । तैसेंचि दुःख लाहिजे । तिळतुल्य पाप करूनी. ॥ २७ ॥ ऐसे कर्मांचे विचित्र खेळ । स्वल्प, देती अचाट फळ । हें जाणती शास्त्रकुशल[14] । येरां वर्म[15] कळेना. ॥ २८ ॥ सूक्ष्म कीटक सपक्ष देखा । तया नाव पतंगिका[16] । ते त्वां ओपिली कंटका । पूर्वीं[17] जाण ने-णतां. ॥ २९ ॥ तयादोषास्तव तेकाळीं । शरीर पडलें काष्ठशूळीं'. । ऋषी कोपला क्रोधानळीं । म्हणे, 'अविचारें जल्पसी. ॥ ३० ॥ स्वल्प पाप सर्षपा[18]-येवढें । दंड[19] मेरूचेनि पाडें[20] । धन्य रे! न्याय तुझे तोंडें । तुजचि साजे बो-लतां. ॥ ३१ ॥ दुरात्मया! विचारभ्रष्टा!। जगहिंसका! अतिपापिष्ठा! । धर्मा-धिकारीं परमनष्टा! । कोणें तूतें स्थापिलें? ॥ ३२ ॥ परमपदापासूनि पतन । शूद्रयोनींत पावें जनन, । दासीपुत्र हें लांछन । मनुष्यलोकीं तुज लागो.

---

१. घातली. २. राजानें. ३. प्रश्न, चौकशी. ४. बोलतां. ५. दूतीं. ६. सचिव व इतर चाकरांसह. ७. सुतार. ८. करवतानें. ९. शिखरप्राय. १०. अणी=शूलाग्र, त्यानें युक्त जो तो अणीमांडव्य. ११. अध्याय १०८ श्लोक ९-१० पहा. १२. ऐक. १३. अल्प. १४. शास्त्रकुशळां-शिवाय अन्यांला. १५. तत्त्व. १६. भ्रमरी. तिच्या पुच्छास कांटा टोंचला म्हणून मुनीला हें दुःख प्राप्त झालें. १७. लहानपणीं, बालपणीं. १८. मोहरीएवढें. १९. शिक्षा. २०. प्रमाणें.

॥ ३३ ॥ आजिपासूनि चौदावर्षां[1] । जन्म पावसी महापुरुषा; । मनुष्यदेह पावूनि, दोषा । नातळसी[2] मद्वाक्यें.' ॥ ३४ ॥ ऐसा ऐकोनि शाप दारुण । धर्मराज[3] नेदी प्रतिवचन । म्हणे, 'ब्राह्मण दुःखें कोपला, आपण । शाप साहूनि शांतवूं.' ॥ ३५ ॥ स्वयें अंगीकारूनि शाप । शांत केला ऋषीचा कोप, । व्यासवीर्य प्रचंड दीप । हीनपात्रीं उजळिला. ॥ ३६ ॥ प्रत्यक्ष मूर्तिमंत धर्म । पुरुषांमाजी पुरुषोत्तम । गुणीं उपमे निरुपम । पंडिताचार्य विवेकी. ॥ ३७ ॥ काम क्रोध लोभ जाणा । स्पर्शले नाहींत ज्याचे मना । जो आश्रय ज्ञानविज्ञाना[4] । पक्षपाती कुरुकुळीं. ॥ ३८ ॥ तो विदुर, गा! पुरुषेश्वरा! । ज्ञानियांमाजी अनुभवी खरा । सप्रेमभक्ती यादवेश्वरा[5] । प्राणप्रिय पढियंता[6]. ॥ ३९ ॥ एवं कुरुवंशविवर्धन । पुरुष जन्मले तिघेजण[7] । भीष्ममाता सप्रधान । परम आल्हाद पावली. ॥ ४० ॥ उत्साह मांडिला घरोघरीं । रत्नतोरणें मंडपद्वारीं । मखरें शृंगारिलीं कुंसरीं । वरी पताका मिरवती. ॥ ४१ ॥ विस्तारली नगररचना । स्वर्गशोभा बाणली सदना । दैवकळेनें वरिलें जाणा । अष्टैश्वर्यें[9] शोभती. ॥ ४२ ॥ वंध्या विधवा उभय व्यक्ती । दृष्टी न पडे प्रमदापंक्ती[10] । सुपुत्र सौभाग्यसंपत्ती । नांदती सुखसंभ्रमें. ॥ ४३ ॥ रोगी दरिद्री नपुंसकू । पुरुषामांजी न दिसे एकू । दुःखशोकाचा कळंकू । कोणा अंगीं असेना. ॥ ४४ ॥ इच्छिलेकाळीं वर्षे धन[11] । पृथ्वी प्रसवे सकळही धान्य । पुष्पें फळें परिपूर्ण । कंद मूळें इत्यादि. ॥ ४५ ॥ औषधी ओपिती अपार । रसनिर्यास[12] कर्पूरभार । कुंकुम केशर कस्तूरी फार । चंदनागरु ज्यापरी. ॥ ४६ ॥ मत्स्यपित्त[13] गोरोचन । धूप तैल सुगंधचूर्ण । केतकी कल्हार[14] कुसुम सुमन । बहुपरिमळें ओथिली[15]. ॥ ४७ ॥ शालीतंदुळ तांबूलपर्णी[16] । पक्कफळीं दिव्यसुवर्णी । दिव्यपरिमळाची[17] खाणी ।

---

१. आजपासून मी अशी मर्यादा करतों कीं, जन्मदिवसापासून चौदा वर्षेपर्यंत कोणी कांहीं कर्म केलें तरी, पातक व्हावयाचें नाहीं, त्यानंतर केलें असतां तो दोषी होईल. असें मांडव्याचे वचन मूळांत आहे. (अध्याय १०८ श्लोक १७). २. न स्पर्शसी. ३. यम. ४. शास्त्रीयज्ञान आणि अनुभव यांला. ५. श्रीकृष्णा. ६. आवडता. हा शब्द पूर्वीही आला आहे. पृष्ठ ३ व १३९ पहा. ७. धृतराष्ट्र, पांडु आणि विदुर. ८. चातुर्यानें. ९. येथें कदाचित् 'षडैश्वर्यें' असें पद असावें. अष्टैश्वर्यें म्हणजे अष्टसिद्धि असा अर्थ असेल. १०. स्त्रीपंगती. ११. अध्याय १०९ श्लोक २-१२ पहा. १२. डीक. १३. कटुकी. १४. कमळ. १५. संपन्न होती. १६. पानवेल. १७. सुवास.

घ्राणमापीं नेसंटे[1]. ॥ ४८ ॥ अष्टधातू[2] नवहीरत्नीं[3] । पृथ्वी पिके अनंतगुणीं । वस्त्रें विचित्र नानावर्णी । परिचारिलीं बहुसाल. ॥ ४९ ॥ धेनू महिषी सर्पि[4] दुग्धें । वर्षती सोडूनि मर्यादे । अरण्यमक्षिका सुस्वादें । मधु अपार प्रसवती ॥ ५० ॥ हस्ती वाजी खेचर । उष्ट्र वृषभ म्हैसे थोर । अजादिकांचे[5] विस्तार । धरातळीं न धरवे. ॥ ५१ ॥ कृमी[6]कार्पासऊर्णाजनितें । तरुजें[7] अजिनें[8] सुगंधभरितें । सुवर्णरौप्यतंतुमंडितें । अतिसमर्थें अपार. ॥ ५२ ॥ मृगपक्षियां अतिसंतोष । नाहीं पारधीयांचा त्रास । उदीम वाढला चौभास[9] । बावन्नवर्णा[10] सारिखा. ॥ ५३ ॥ ज्या ज्या देशीं ज्या ज्या वस्तु । त्यांचा विस्तार झाला बहुतु; । धर्मन्याय गंगासुत । पृथ्वी पाळी म्हणोनी. ॥ ५४ ॥ कुमर औथिले[11] भाग्यसृष्टी । जन्मले यालागीं पवित्र रहाटी[12] । कृतयुगाची परिपाटी[13] । विस्तारली बहुसाल. ॥ ५५ ॥ नंदादीप[14] देवाप्रती । स्नेहें उजळोनियां वाती । काजळी तोडोनि अहोराती । सावधानें रक्षिजे. ॥ ५६ ॥ तैसे संत महंत साधु । परिहारोनी क्लेशबाधु । अचळ स्वस्थ सुखानंदु । परम हर्ष भोगवी. ॥ ५७ ॥ वर्णपंक्तीचे वर्णाक्षर । शोधोनि काढिती अर्थज्ञ चतुर, । कां[15] तंदुळांत पाकड सत्वर । काढिती निवडूनि जाणते. ॥ ५८ ॥ हंसपद[16] देवोनि ओळीं । उणें[17] अक्षर रेखिजे मौळीं[18] । तैसे गुणवंत उंचस्थळीं । मानें आणोनि स्थापिले. ॥५९॥ मात्रा वेलांटी व्यंजन । मस्तकीं मानूनि गुरु सज्जन । उकार होवोनि अग्रवर्णे । पायीं भजे लीनत्वें. ॥ ६० ॥ यज्ञशाळीं अंत्यज व्यान । दूर घालिती दवडोन । तैसा लोभी निर्दय कृपण । पृथ्वीतळीं वाळिले. ॥ ६१ ॥ कामक्रोधलोभरहित । पूर्णायुषी आनंदभरित । भगवद्भजनीं आर्तभूत । जन समस्त तेकाळीं. ॥ ६२ ॥ वन वाटिका दिव्य आराम[19] । जळें सुस्वाद अमृतोपम । सदा फळीं फळती द्रुमं[20] । सर्वदेशीं सुरवाडे[21]. ॥ ६३ ॥ तटाग[22] सरिता[23] वापी कूप । देवालय मठ मंडप । विश्रांतिशाळा देखतां ताप । मार्गस्थाचा परिहारे. ॥ ६४ ॥

---

१. न मावे. २. सोनें, रुपें, तांबें, कथिल; शिसें, पितळ, लोखंड. तिखें. याविषयीं श्लोक:–'स्वर्ण रूप्यं च ताम्रं च रंगं यशदमेव च । शीसं लौहं रसश्चेति धातवोऽष्टौ प्रकीर्तिताः ॥.' ३. हिरा, माणीक, मोती, गोमेद, इंद्रनील, पाच, प्रवाल (पोंवळीं), पुष्कराज, वैडूर्य, (तोर्मळी). यांविषयीं श्लोक:–'मुक्तामाणिक्यवैदूर्यगोमेदा वज्राविद्रुमौ । पद्मरागो मरकतं नीलश्चेति यथाक्रमम् ॥.' ४. तूप. ५. शेळ्या व मेंढ्यांचे. ६. किडे, कापूस, लोंकर यांपासून झालेलीं. ७. वृक्षापासून झालेलीं. ८. चर्में. ९. नानाप्रकारचा. १०. बावन्न देशांत राहणाऱ्या बावन्न वर्णासारखा. ११. झाले. १२. वर्तणूक. १३. अनुक्रम. १४. देवापुढें अहोरात्र लावून ठेवलेला दीप. १५. 'तेंवी दुर्जन पाप तस्कर । पुसोनि हातें सांडिती' असा अन्य पाठ आढळतो. १६. लिहिण्यांत चुकलेल्या अक्षराच्या स्थानीं केलेली शोधार्थ खूण.–जसें; काकपद. १७. कमी, चुकलेले, १८. अग्रस्थानीं. १९. बाग. २०. वृक्ष. २१. श्रेष्ठ. २२. तळें. २३. नदी.

[1]चैत्यरचना स्थळोस्थळीं । [2]प्रपा सूदल्या सुगंध जळीं । दिव्य मिष्टान्नें रसमेळीं । [3]सत्रागारीं याचका. ॥ ६५ ॥ कामुकांलागीं मनोहरें । मार्गीं निर्मिलीं वेश्यागारें । [4]आसवें मैरेयकें मधुरें । पानकर्त्या ओपिती. ॥ ६६ ॥ जेंवि कां शास्त्रज्ञांच्या वदनीं । संचरों न शके [5]गोवळवाणी । नातरी [6]श्रोतियांचे सदनीं । [7]पलांडुभक्षण असेना. ॥ ६७ ॥ तेंवी दूतिका जार जारी । प्रवृत्ती नाहीं या व्यापारीं, । पूर्ण काम सदाचारी । तेथें निषेध कायसा? ॥ ६८ ॥ जें जो मागेल तें त्या देणें । आवडे तेणें भोजन करणें । 'या या घ्या घ्या' हींच वचनें । कानीं पडती सर्वदा. ॥ ६९ ॥ फिटली जगाची अवदशा । जगीं बाणली ऐश्वर्यदशा । ऐसा योग [8]धराधीशा! । मांडिला असे तेकाळीं. ॥ ७० ॥ [9]श्रीसहित [10]श्री सुंदरी । तांडव नाचे घरोघरीं । गर्जना होत मंगळतुरीं । अहोरात्र ते काळीं. ॥ ७१ ॥ रत्नीं परिपूर्ण [11]रत्नाकर । तेंवी संपत्तियुक्त [12]हस्तिनापुर, । उपमे तुळितां [13]अमरपुर । [14]भरे [15]हळवट आकाशीं. ॥ ७२ ॥ खंडलें कुळ पावलें वृद्धी । देखोन खंडली [16]आधी [17]व्याधी, । राजा सुखी प्रजा आनंदी । क्रीडा करिती [18]संतोषें. ॥ ७३ ॥ पुत्रत्रयाचा [19]संभ्रम । आवडीं करी राजा **भीष्म**, । जे जे इच्छी मनोधर्म । ते ते पुरवी तात्काळीं. ॥ ७४ ॥ [20]गर्भाधान पुंसवन । अनवलोभन सीमंतोन्नयन । जातकर्म नामकरण ।

---

१. यज्ञमंडपादि. २. पाणपोई. ३. यज्ञगृहीं. ४. मद्यें. ५. गवळ्याची बोली. ६. वेदवेत्त्याचे. ७. कांद्याचें भक्षण. ८. जनमेजय राजा! ९. शोभेसहित. १०. लक्ष्मी. ११. समुद्र. १२. पृष्ठ १२८ टीप २ पहा. १३. 'निर्जरनगर' असा अन्य पाठ आहे. १४. शिरे. १५. भिकार, क्षुद्र. १६. मानसिक चिंता. १७. शरीररोग. १८. या सुमारें २९–३० ओव्यांतील वर्णनास मूळांत आधार नाहीं. हें मुक्तेश्वरानें प्रसंगाकडे लक्ष देऊन स्वकल्पनेनें येथें घातलें आहे. १९. आदर. २०. संस्कारविशेष. हे संस्कार सोळा आहेत, त्यांचीं नांवें आणि संक्षिप्त वर्णन:— ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र या चार वर्णांनीं देहशुद्ध्यर्थ करावे ते गर्भाधान (ऋतुशांति), पुंसवन (गर्भधारणापासून दुसरे किंवा तिसरे महिन्यांत करितात विधि तें), अनवलोभन (गर्भाच्या तिसरे महिन्यांत करितात जो विधि तें), विष्णुबलि (गर्भाच्या सातवे महिन्यांत करावयाचा विधि तो), सीमंतोन्नयन (गर्भाच्या चौथे, सहावे किंवा आठवे महिन्यांत जो विधि करितात तो), जातकर्म (बालक उत्पन्न झाल्यावर नालच्छेदनापूर्वी बालकाच्या मुखांत मधु घालण्याचा विधि), नामकरण (बालकास नांव ठेवण्याचा विधि), निष्क्रमण (बालकाला तिसरे पक्षांत चंद्रावलोकन करण्याचा विधि), सूर्यावलोकन (बालकाला तिसरे किंवा चौथे महिन्यांत सूर्य दाखविण्याचा विधि), अन्नप्राशन (बालकाला सहावे किंवा आठवे मासांत अथवा दंतोत्पत्ति झाल्यावर अन्न देण्याचा विधि), चूडाकर्म (दुसरे किंवा तिसरे वर्षी शिखा राखण्याचा विधि), उपनयन (मुंज करण्याचा विधि) महानाम्न्य (गायत्रीचा उपदेश करण्याचा विधि), समावर्तन (सोडमुंज), विवाह (लग्न), आणि स्वर्गारोहण हे प्रत्येक. याशिवाय भूम्युपवेशन, दुग्धपान, कर्णवेध इत्यादि अंतर्गत विधि करितात. या संस्कारांपैकीं उपनयन, महानाम्न्य आणि समावर्तन हे तीन शूद्रास वर्ज्य आहेत.

निष्क्रमण सातवें. ॥ ७५ ॥ अन्नप्राशन चौलोपनयन । महानाम्नीव्रत पैं जाण । महाव्रत आणि गोदान[1] । उपनिषद्व्रत चौदावें. ॥ ७६ ॥ हे संस्कार सकळही चांग[2] । पार्वती विवाहाचें अंग । द्रव्यदानें चतुरें सांग । संपादिलीं कुरुवृद्धें. ॥ ७७ ॥ वेदाध्ययन शास्त्राभ्यास । स्मृतिग्रंथ अर्थप्रकाश[3] । संहिता पुराण इतिहास । वैस्य[4] केले अभ्यासें. ॥ ७८ ॥ सप्तकोटी महामंत्र । चतुःषष्ठीविधानयंत्र । आगमउपासनातंत्र । ज्ञान केलें क्रियांसीं. ॥ ७९ ॥ नीतिशास्त्रन्यायकुशळ । धर्माधर्मीं बुद्धि प्रबळ । चौदा विद्या कळा सकळ । बसल्या झाल्या तयांतें. ॥ ८० ॥ उपनिषदमत सिद्धांत । तत्वनिर्धार उपनिषदर्थ । साहित्य नाटक संगीत गीत । जाणते झाले गुरुमुखें. ॥ ८१ ॥ नेत्रनादकरसंकेत । लिपिभाषा गुह्यभेदार्थ । जाणते केले समर्थ । [6]गंगापुत्रें सुपुत्र. ॥ ८२ ॥ अश्वगजरथारोहणीं । धनुर्विद्याशस्त्रसाधनीं । नानाशस्त्रांच्या प्रहरणीं । प्राप्त झाली निपुणता. ॥ ८३ ॥ पांडु धनुर्विद्याकुशळ । धृतराष्ट्र अंगबळें सबळ । शास्त्रज्ञांमाजि अतिविशाळ । बुद्धि प्रखर विदुराची. ॥ ८४ ॥ भीष्मऋषीप्रधानजनीं । विचार मांडिला सभास्थानीं । म्हणती, 'श्रेष्ठ तो राज्यासनीं । कोण तो येथें स्थापावा.' ॥ ८५ ॥ ज्येष्ठ अंधत्वें उणाविला । विदुर कनिष्ठत्वें अवमानिला । राज्यासनीं अभिषेकिला । पांडुराजा समस्तीं. ॥ ८६ ॥ विदुर जाणोनि परमचतुर । भीष्म पुसे निजविचार । धाकुटा म्हणोनि अनादर । सहसा न करी तयाचा. ॥ ८७ ॥ 'होता [7]अन्वयतंतु तुटला । मजलागीं मातेचिया बोला । सुतीं पुत्र जन्मोनि केला । वेदव्यासें वाढता. ॥ ८८ ॥ कुमारदशा माघारली । तारुण्यदशा उदया आली । विवाहविचारणा उठली । इच्छा मातें अपार. ॥ ८९ ॥ लग्नसमारंभकोडें । पुत्रां मेळऊं अंगना जोडें । जेणें संततीगंगा पुढें । सहस्रमुखें विस्तारे. ॥ ९० ॥ कन्या बहुत म्यां ऐकिल्या । त्यांमाजि तिघी [8]नामाथिल्या । चि[9]त्रकें पटीं गोचर केल्या । वरी [10]वाणिल्या परीक्षकीं. ॥ ९१ ॥ एक गांधारी सुबळसुता, । दुजी [11]यादवी प्रसिद्ध [12]पृथा । [13]तिजी मद्रराजदुहिता । [14]माद्रवती या नांवें ॥ ९२ ॥ जरी मानेल तुझिया मना । तरी आरंभूं [15]विचारणा.' । विदुरें नमस्कारूनि चरणा । म्हणे, 'हें ऐकें यथार्थ. ॥ ९३ ॥ माता पिता

---

१. मुंज झाल्यावर हजामत करणें–केंस काढणें याला गोदन म्हणतात. २. चांगले. ३. भाष्यादि ग्रंथ. ४. स्वाधीन. ५. पृष्ठ १४८ टीप १ पहा. ६. भीष्मानें. ७. वंशतंतु. ८. नामांकित, प्रसिद्ध. ९. चितान्यानें. १०. वर्णिल्या, वाखाणिल्या. ११. यादववंशांतील कुंतिभोजाची कन्या. १२. कुंती. १३. तिसरी. १४. माद्री. १५. वाटाघाट, पूर्वापर विचार.

तूंचि गुरू, । तूंचि आत्मा निज ईश्वरू, । तुज मानला जो विचारू । तोचि मान्य विश्वातें.' ॥ ९४ ॥ कौतुक सांगिजे ऋषिजनीं । 'अतिसुंदर सुबळनंदिनी । तिची वार्ता हे श्रवणीं । स्वल्प कांहीं ऐकिजे. ॥ ९५ ॥ आचरोनि खडतर व्रत । प्रसन्न केला [1]गिरिजाकांत । वर लाधली अतिसमर्थ । शंकरमुखें तो ऐका. ॥ ९६ ॥ 'बलिष्ठरायाची [2]अंतुरी । होवोनि भोगिसी ऐश्वर्यथोरी । [3]अरुंधतीचिये सरी । मान्य होसी पतिधर्में. ॥ ९७ ॥ एकशत राजकुमर । पोटीं जन्मतील महाशूर । एक कन्या अतिसुंदर । पुत्रांपाठीं प्रसवसी.' ॥ ९८ ॥ ऐसें वरदान [4]धूर्जटी । वदोनि गेला कृपादृष्टी । कवण सभाग्य वैसेल पाटीं । हेंही जाणे तो एक.' ॥ ९९ ॥ ऐसी परिसोनियां मात । सादर झाला गंगासुत, । यत्नें गांधारी सुवस्त । इच्छी पुत्राकारणें. ॥ १०० ॥ वंशीं संतती विस्तारावी । ऐसी आवडी भीष्मा जिवीं । म्हणे, 'सुबळआत्मजा करावी । [5]प्रिया [6]प्रज्ञाचक्षूतें.' ॥ १०१ ॥ म्हणोनि पुरोहित सुमती । [7]प्रेरिला [8]सुबळरायाप्रती । भीष्मवाक्य गांधारनृपतीं । वेदप्रमाण मानिलें. ॥ १०२ ॥ कुरुवंशीं [9]चक्रवर्ती । वरी बुद्धि बळ संपत्ती । अंधत्वदोष न धरूनि चित्तीं । [10]शंब्द दीधला संतोषें. ॥ १०३ ॥ कन्या नेमिली धृतराष्ट्रातें । निकें मानलें समस्तांतें । [11]ऐकोनि स्वीकारूनि मातें । राजपुत्री पवित्रा. ॥ १०४ ॥ अंध भ्रतार ऐकतां गोष्टी । [12]पैंटें बांधिला आपले दृष्टी । कोपें कृपे पाहतां सृष्टी । तारी मारी तात्काळ. ॥ १०५ ॥ भगिनी शृंगारूनि रथीं । शकुनी सेनासहसंपत्ती । पातला [13]कुंजरपुराप्रती । लग्नसिद्धीकारणें. ॥ १०६ ॥ [14]संभ्रमें [15]पाणिग्रहणविधीं । अंधा ओपिली लावण्यनिधी । आंदणें ओपिलीं समृद्धीं । कुबेरश्रीसारिखीं. ॥ १०७ ॥ हस्ती वाजी सुवर्णरथ । दास दासी साळंकृत । महिषी धेनु वृषभ [16]श्वेतें । उष्ट्र खर मेषादी. ॥ १०८ ॥ [17]करिणीं आणि [18]शकटीं । रत्नभार सुवर्णकोटी । [19]पारिबर्ह पाहतां दृष्टी । समुद्रप्राय अवगमे. ॥ १०९ ॥ ऋषीराजयां सुहृज्जनां । आदरें आणिलें विवाहलग्ना । उभयमंडपीं दक्षिणा । बहु याचकां वांटिली. ॥ ११० ॥ लाहोनि गांधारीची प्राप्ती । गृहस्थ झाला कौरवपती । पतिव्रता महासती । सदा सेवी

---

१. शंकर. २. स्त्री. ३. वसिष्ठमुनिपत्नीसारखी. ४. शंकर. ५. भार्या. ६. धृतराष्ट्रातें. ७. अध्याय११० श्लोक ११ पहा. ८. सुबळ—हा गांधारदेशाचा राजा आणि गांधारीशकुनिपिता. ९. सार्वभौम. चक्राला (सैन्याला किंवा राजमंडळाला) उत्तमप्रकारें वागविण्याविषयीं ज्याची ख्याति तो.) १०. अनुमति. ११. 'श्रवण' असा अन्य पाठ. १२. वस्त्र. १३. हस्तिनापुराप्रत. १४. विवाहसंस्कारें. १५. आदरानें. १६. पांढरे. १७. हत्तीणीवर. १८. गाड्यांवर. १९. आंदण.

पतीतें. ॥ १११ ॥ अंबिका अंबालिका [1]काळी । भीष्मश्वशुर राजमेळीं । यांच्याठायीं सदाकाळीं । ईश्वरभावें भजतसे. ॥ ११२ ॥ [2]देवेराची अतिमर्यादा । कुटुंबातें विचारी सदा, । दासदासीतें संपदा । पुरवी इच्छे [3]आगळी. ॥ ११३ ॥ [4]पैरुष वाक्य असाध्य करणी । कोणा नलगे श्रवणीं मनीं, । 'धन्य स्नेहाळ विश्वजननी' । हेचि लोकीं बोलिजे. ॥ ११४ ॥ यापरी धृतराष्ट्रगांधारी । ऐक्यें मीनलीं [5]घराचारीं । पांडुलग्नाची पुढारीं । विचारणा भीष्मातें. ॥११५॥ [6]शूरसेननामा वसुदेवपिता । त्याची कुमारी पवित्रा पृथा । स्नेहभावें [7]धर्मदुहिता । कुंतिभोजा दीधली. ॥ ११६ ॥ ते वर्ततां जनकाघरीं । कुमारदशे सहजाचारीं । भाग्योदयाचे [8]अवसरीं । महातपस्वी पातला. ॥ ११७ ॥ तपोतेजें [9]वैश्वानर । मूर्तिमंत पार्वतीप्राणेश्वर । देवीअनुसूयेचा कुमर । प्रसिद्ध नामें दुर्वास. ॥ ११८॥ कुंतिभोजाचिये [10]आंतीं । किंचित्काळ राहिला वस्ती । सर्वभावें त्याचिये भक्ती । कुंती तिष्ठे सादर. ॥११९ ॥ जें जें कांहीं [11]अपेक्षी तेव्हां । तें तें तात्काळ पुरवी तेव्हां । पान भोजन शरीरसेवा । चढतिया प्रेमें समर्पी. ॥ १२० ॥ देवपूजा अतिथिपूजा । करावया पवित्रतनुजा । जनकें योजिली ते [12]वोजां । सर्वयत्नीं तोषवी. ॥ १२१ ॥ अवलोकोनि उत्तमगुणा । अतिसंतोष ऋषीच्या मना । प्रसन्नवदनें वदे वचना । 'घेईं प्रसाद' म्हणोनि. ॥१२२॥ भाव देखोनि पवित्र । वर ओपिले पंच मंत्र । रहस्य बोले [13]श्रवणपात्र । स्पर्शोनियां हस्तकें. ॥१२३॥ 'भविष्य [14]पुढां जाणोनि [15]निरुतें । आपद्धर्मालागीं मी तूतें । पंचमंत्रांत पंच दैवतें । बांधोनि दीधलीं तुजहस्तीं. ॥ १२४ ॥ [16]दिनकर [17]दंडपाणी पवन । चौथा देव तो [18]पाकशासन । पांचवे [19]अश्विनौदेव जाण ।

---

१. सत्यवती. २. दीराची. ३. अधिक. ४. कठोर. ५. गृहस्थाचारीं. ६. अध्याय १११ श्लोक १-५ पहा. ७. धर्मकार्यार्थ दिलेली कन्या. धर्मदत्तया कन्या. पृथा होण्यापूर्वी इच्या पित्यानें (शूरानें) पितृष्वस्त्रीय कुंतिभोजापाशीं अशी प्रतिज्ञा केली होती कीं, 'तूं अनपत्य आहेस, तेव्हां मला जें प्रथम अपत्य होईल तें तुला देईन.' त्याप्रमाणें त्यानें पृथा होतांच तिला कुंतिभोजाच्या स्वाधीन केलें, अशी कथा आहे. ८. समयीं. ९. अग्नि. १०. यत्नानें. ११. इच्छी. १२. वोजा= तेजस्विनी. हा शब्द संस्कृत ओजस् (तेज, कांति) शब्दापासून निघाला आहे. ओज, ओजा हे शब्द मराठींत उपयोगांत आहेत. यांचा अर्थ=कळा, तेज. यानें घराची ओजा (कळा) चांगली राखिली असें म्हणण्याचा परिपाठ आहे. वोजा 'याचा अर्थ 'काळजीनें' असाही दिसतो. (मुक्तेश्वर—वनपर्व, अध्याय १ ओवी ४६ पहा.) १३. कर्णरूप पात्र. १४. पृथेला कांहीं भावी संतानप्रतिबंध आहे असें पूर्वी जाणून आपद्धर्मानुसारें अभिचारयुक्त मंत्राचा उपदेश केला. (अध्याय १११ श्लोक ६.) १५. स्पष्ट, चांगलें. १६. सूर्य. १७. यम. १८. इंद्र. १९. दोन अश्विनीकुमार.

उभयफळें तुज देऊं. ॥ १२५ ॥ येणें मंत्रें गुणैकराशी । जें जें दैवत [1]आंव्हानिसी । त्याचेनि प्रसादें लाधसी । पुत्रप्राप्ती तात्काळीं. ॥ १२६ ॥ [2]अमोघ मंत्र [3]अभिचारिक । फळीं फळती तात्काळिक । ऐसें [4]अत्रीचा [5]कुळदीपक । वदोनि गेला स्वाश्रमा. ॥ १२७ ॥ [6]न्यासबीजप्रणवध्यानें । येरीं हृदयीं धरिलें परमयत्नें । [7]निधिनिक्षेप जैंवि कृपणें । न विसंबिजे मानसीं. ॥ १२८ ॥ अवलोकोनि गंगातट । दुजें कोणी नव्हतें निकट । म्हणे, '[8]प्रतीति करूं प्रकट । सत्य मिथ्या मंत्राची.' ॥ १२९ ॥ म्हणोनि प्रणवबीजाक्षरीं । [9]आदित्य [10]आंव्हानिला मंत्रीं । चमत्कार देखे नेत्रीं । तेचकाळीं ते ऐका. ॥ १३० ॥ सूर्यमंडल खचलें धरणी । तैसा समीप पातला तरणी, । मंत्रसामर्थ्याची करणी । अत्यद्भुत न बोलवे. ॥ १३१ ॥ [11]जांबूनदकनकपुतळा । पाहतां तेज न लक्षवे डोळां । मुगुट कुंडलें [12]कटिमेखळा । [13]हेमांबरें शोभती. ॥ १३२ ॥ भास्कर म्हणे, '[14]नरभामिनी ! । किमर्थ पाचारिलें स्मरणीं । इच्छित सांगें वो ! सुजाणी ! । पूर्ण करीन [15]क्षणार्धें.' ॥ १३३ ॥ [16]उभयपक्षांचें भय नावरे । कुमारित्वभंगें मन घाबरे । भास्करातें नमस्कारोनि शिरें । भीतभीत अनुवादे. ॥ १३४ ॥ आव्हानिलें आर्तभावें । तें मज [17]उपसाहिजे देवें । कोणा न कळतां करावें । शीघ्र [18]गंतव्य येथूनी. ॥ १३५ ॥ तातयाझेनें रक्षिलें सदा । जें बांधलें धर्ममर्यादा । स्वइच्छाचरणें निषेधा । वडील आतळों न देती. ॥ १३६ ॥ तें हें उच्छिष्ट झालिया व्यक्ती । पुढां नातळे वर अतिथी । हेचि चिंता पुढतपुढती । वर्ते मातें स्वामिया! ॥ १३७ ॥ रूप आच्छादूनि [19]वेहिलें । शीघ्र प्रयाण पाहिजे केलें । प्रकट होतां नोहे भलें । अलौकिक लौकिकीं.' ॥ १३८ ॥ हास्यवदन वदे सविता, । 'हें कैसेनि घडे आतां ? । अनंत जन्मींच्या [20]सुकृता । वेंचिल्या भेटी आमुची. ॥ १३९ ॥ भाग्योदयीं आमुचें येणें । फळ न देतां न घडे जाणें । जे कां आशंका वाहसी मनें । ते दवडीन माघारीं. ॥ १४० ॥ भय मानिसी जया अर्थी । [21]आंतळों

---

१. बोलाविसी. २. सफळ. ३. जारणमारणादि द्वारा वशीकरणादि इष्ट फळ देणारे. ४. अत्रिऋषीचा. ५. पुत्र. (दुर्वास.) ६. हे मंत्राचे निरनिराळे भाग होत. मंत्रेंकरून कोणेका देवतेचें कोणत्या एका ठिकाणीं जें यथाविधि स्थापन त्यास 'न्यास' म्हणतात. मंत्राचें जें बीजाक्षर तें 'बीज,' 'प्रणव' म्हणजे ओंकार इत्यादि. ७. ठेवा. ८. प्रत्यय. ९. सूर्य. १०. आमंत्रिला. ११. जंबू नदींत उत्पन्न झालेल्या सुवर्णाचा पुतळा. १२. मुंज. १३. कनकवस्त्रें. १४. मनुष्यपत्नी. १५. अध्याय १११ श्लोक १० पहा. १६. शूर आणि कुंतिभोज या दोन पक्षांकडील लोकांचें. १७. क्षमिजे. १८. जावयाचें, गमन. १९. सत्वर. २०. पुण्या. २१. स्पर्शों.

नेदीं त्या अनर्था । कीर्तिप्रमदेचिया[1] माथां । वंद्य होसी पवित्रे ! ॥ १४१ ॥ माझा झालिया अंगसंग । कुमारीत्व न पावे भंग । पुत्र जन्मेल पद्मरंग[2] । अतिवरिष्ठ नररत्नीं. ॥ १४२ ॥ आणीक ऐकें सुमध्यमे[3]! । तूतें वरिजेल सार्वभौमें[4] । देवतावीर्यें अतिउत्तमें । पंच अपत्यें प्रसवसी.' ॥ १४३ ॥ मग आदरें धरूनि हातीं । सुरतानंदें दिधली तृप्ती । अमोघवीर्य[5] महामूर्ती । अपर सूर्य जन्मला. ॥ १४४ ॥ सूर्यवीर्यें जो जन्मला । सूर्यासमान तेजागळा । किरीट कुंडलें मेखळा । दिव्याभरणें शोभती. ॥ १४५ ॥ सुवर्णकवच स्वयंभू[6] अंगीं । ऐसें देखोनि तन्वंगी[7] । तेज पाहतां न साहे जगीं । भयें कांपे थरथरां. ॥ १४६ ॥ लोकशंके[8] शंकूनि बाळी । बाळक सोडून गंगाजळीं । अतिव्याकुळ हृदयकमळीं । जाती झाली तात्काळ. ॥१४७॥ पुत्र प्रसवोनि अंगना । झाली कुमारी नवयौवना । प्रवेशली तातसदना । त्यागूनियां कुमारातें. ॥ १४८॥ गंगोदकीं सांडिलें बाळ । बुडऊं न शके गंगाजळ, । जननी जान्हवी[9] स्नेहाळ । कृपेनें झाली रक्षिती. ॥ १४९ ॥ लहरिया[10] करीं त्या झेलीत । तरंगपाल-[11] खीं खेळवीत । राधारमणें[12] अकस्मात । दैवें दृष्टीं देखिला. ॥ १५० ॥ राधापती किरातपाळ[13] । तेणें उदकीं देखिलें बाळ, । धांवूनियां उतावेळ । घाली उडी धरावया. ॥ १५१ ॥ करीं धरूनि काढिला थडिये[14] । श्रमें भावें घेतला कडिये । अवलोकितां घडिघडिये । तृप्ती नोहे डोळियां. ॥ १५२॥ पाचारोनि राधासती । पुत्र भावोनि दिधला हस्तीं । तिणें पाळिला म्हणोनि म्हणती । राधेय नाम तयातें. ॥१५३॥ वसुभूषणीं[15] सुभूषण । मातृजठरीं पावला जनन[16] । यालागीं नाम वसुषेण[17] । सूत[18] ठेवी आवडी. ॥ १५४ ॥ संस्कार सांग[19] वेदाध्ययन । ऋषीमुखें झाला निपुण । सर्वविद्येनें संपूर्ण । धनुर्विद्याकुशळगुरु. ॥ १५५ ॥ स्नान करूनि गंगाजळीं । सूर्योपस्थान[20] जपे तेकाळीं । पुत्रासमीप

---

१. कीर्तिरूप स्त्रीच्या. २. पद्मरत्नासारखा अंगवर्ण ज्याचा तो. ३. सुश्रोणि. ४. चक्रवर्ती राजानें. ५. सफळ. ६. स्वयमेव झालेलें. ७. कोमलांगी. (पृथा.) ८. लोकभीति. ९. जन्हुराजामुळें भागीरथी नदीस हें नांव पडलें. १०. लाटा. ११. लहरीरूप पाळण्यांत. १२. राधा नामक स्त्रीच्या नवऱ्यानें. १३. किरातांचा स्वामी. १४. तटाला, तीराला (तट=थडी, गंगातट=गंगथडी, भीमातट=भिमथडी). १५. सुवर्णाच्या अलंकारांनीं. १६. जन्म. १७. 'वसुना कुंडलकवचादिद्रव्येण सह इति वसुषेणः' असा वसुषेण या पदाचा विग्रह नीलकंठानें महाभारतावरील टीकेंत केला आहे. (अध्याय १११ श्लोक २४.) १८. राधाभर्ता; सूत म्हणजे ब्राह्मणीच्या ठायीं क्षत्रियापासून झालेला पुत्र. याचा धंदा सारथ्य करण्याचा. १९. षडंगांसहित. पृष्ठ ६९ टीप २२ पहा. २०. सूर्यस्तुति, सूर्याची उपासना.

[1]अंशुमाळी । स्नेहभरित पातला. ॥ १९६ ॥ अर्जुनापासून [2]अपावो । लागेल ऐसा धरून भावो । या परिहारा भानुदेवो । येता झाला जवळिके. ॥ १९७॥ गुज सांगे कर्णा [3]कर्णीं । म्हणे, 'हा निश्चय धरावा मनीं, । याचक आलिया दानीं । उदार होईं सर्वस्वें. ॥ १९८ ॥ परी अंगींचें कवच जाण । सहसा न द्यावें आपण । येणें [4]आतळों न शके मरण । शस्त्रमारीं शत्रूच्या.' ॥१९९॥ ऐसें सांगून स्वपुत्रातें । भानू गेला स्वस्थळातें. । नेम न चळेची तयातें । परमौदार्य म्हणोनी. ॥ १६० ॥ [5]अर्जुनपुत्राचिया स्वार्था । कर्णबळाची धरोनि व्यथा । अवलंबूनि कपटपंथा । शक्र आला छळणार्थ. ॥ १६१ ॥ [6]कर्ण असतां [7]अद्दष्टानीं । भिक्षुक[8]वेषें [9]वज्रपाणी । दान मागे दीनवचनीं, । 'कवच देईं [10]अंगींचें. ॥१६२॥ [11]शिबीनें मांस च्छेदिलें हस्तीं, । [12]दधीचऋषीनें दीधल्या

१. सूर्य. २. अपाय. ३. कानांत. ४. स्पर्शो. ५. इंद्राचा पुत्र अर्जुन त्याच्या कल्याणासाठीं. ६. ज्यानें सहज कवचाचें कर्तन=कापणें केलें तो. (कर्ण.) (अध्याय १११ श्लोक ३१ टीका पहा.) ७. जप करीत असतां. ८. अध्याय १११ श्लोक २७ पहा. ९. इंद्र. वज्र आहे पाणीच्या (हाताच्या) ठायीं ज्याच्या तो. (इंद्र.) 'वज्रपाणि' हें व्यधिकरणबहुव्रीहिसमासाचें उदाहरण होय. तसेंच हें 'तद्गुणसंज्ञकबहुव्रीहि'समासाचें ही उदाहरण आहे. ज्या वर्णिलेल्या गुणांची संज्ञा (चिन्ह) ज्याच्या विशेष्यांत नित्य आढळते तो तद्गुणसंज्ञकबहुव्रीहिसमास होय. हातांत वज्र असणें हा गुण इंद्रांत नित्य आढळतो हें सांगावयास नको. १०. कर्णाच्या जन्मकाळींच कवचकुंडलें उत्पन्न झालीं होतीं. ११. शिबिराजानें. शिबि–हा सोमवंशीय उशीनरराजाचा ज्येष्ठ पुत्र. या राजाविषयीं दोन कथा महाभारतांत आहेत, त्यांतून पहिलीचा येथें उल्लेख आहे ती अशी:– शिबिराजाची परीक्षा करण्याकरितां इंद्रानें श्येनाचें रूप घेतलें व अग्नीनें कपोताचें रूप घेतलें. नंतर श्येन आपले पाठीस लागला आहे अशा मिषानें कपोत उशीनर राजाजवळ आश्रयार्थ आला. त्यास आश्रय मिळाला हें पाहून 'माझा भक्ष्य मला दे' असें श्येन म्हणूं लागला. तेव्हां कपोताचें भारंभार उशीनर राजानें आपल्या शरीराचें मांस श्येनास देण्याचें कबूल केलें. परंतु शरीराचा बराच भाग तोडून तराजूंत घातला तरी कपोत जडच येऊं लागला, तेव्हां उशीनर स्वतःच पारड्यांत बसला. तें पाहून उभयतां संतुष्ट होऊन आपलीं रूपें प्रगट करून वर देऊन गेले. (महाभारत–वनपर्व–अध्याय १३०-१३१.) याप्रमाणें प्रथम कथा झाली. द्वितीय कथा आहे ती अशी:–या राजाचें सत्त्व पाहण्यासाठीं ब्रह्मदेव विप्ररूपानें आला आणि त्यानें राजाच्या पुत्राचें (बृहद्गर्भाचें) मांस खावयास मागितलें. राजानें मांस शिजवून तयार केलें, पण विप्र कोठें दिसेना, तेव्हां मांसपात्र मस्तकावर घेऊन राजा विप्राचा शोध करीत फिरूं लागला. तों तो विप्र राजमंदिरास आग लावीत आहे असें यानें पाहिलें. पण मनांत विकल्प न धरतां राजानें विप्राची प्रार्थना करून 'सिद्ध केलेलें मांस स्वीकारावें' अशी विनंति केली. 'मी तें खात नाहीं, तूंच तें खा' असें प्रत्युत्तर विप्रानें केलें. त्याप्रमाणें राजा तें मांस खाणार तों ब्रह्मदेव प्रसन्न होऊन, स्वरूप प्रकट करून, राजास आशीर्वाद देऊन, त्याचा पुत्र पूर्ववत् सजीव करून अंतर्धान पावला अशी कथा आहे. (महाभारत–वनपर्व–अध्याय १९४-१९८.) १२. दधीच–हा एक मोठा ऋषि होता. वृत्रासुराशीं इंद्राचें युद्ध चाललें असतां, यानें देवाच्या प्रार्थनेस अनुसरून वज्र करण्यासाठीं आपल्या अस्थि दिल्या. त्या अस्थींचें विश्वकर्म्यानें वज्र केलें, आणि इंद्रानें तें वृत्रासुरावर टाकतांच तो मरण पावला. (महाभारत–वनपर्व–अध्याय १००.)

अस्थी, । जीमूतवाहन[1] पुण्यकीर्ती । जीवदानीं उदार.[2] ॥ १६३ ॥ तयाहूनि तूं विशेषा । अंगीं ऐश्वर्याची दशा । मिरवतां हे परमपुरुषा! । अदेय[3] कांहीं दिसेना.' ॥ १६४ ॥ ऐकोनि ब्राह्मणाचीं वचनें । मधुरवाक्यें प्रशस्तमनें ।

---

१. जीमूतवाहन—याची कथा सोमदेवकृत 'कथासरित्सागर' नामक ग्रंथांत आणि श्रीहर्षकृत 'नागानंद' नामक नाटकांत आहे. तिचा सारांश:—जीमूतवाहन हा जीमूतकेतु नामक विद्याधरांचा राजा होता त्याचा पुत्र. याच्या आईचें नांव वृद्धादेवी, पत्नीचें मलयवती आणि सासऱ्याचें विश्वावसु. जीमूतवाहन हा उदार, धीर, कुलशीलसंपन्न आणि परोपकारी महात्मा होता. दक्षाच्या कन्या विनता आणि कद्रू ह्या दोघी बहिणी असून कश्यप मुनीच्या स्त्रिया होत्या. गरुड हा विनतेचा पुत्र आणि नाग हे कद्रूचे. यांमध्यें सापत्नभाव असल्यामुळें गरुड नागांना मारून खाऊं लागला. तेव्हां स्वजातीचा संहार न व्हावा या हेतूनें वासुकीनें प्रत्यहीं एक नाग गरुडास खाण्यासाठीं देण्याचा करार केला. त्याप्रमाणें दररोज एक नाग गरुडाकडे येत असे. असें होतां होतां गरुडाकडे जाण्याची पाळी शंखचूड नामक नागावर आली. त्याप्रमाणें नेमलेल्या स्थळीं जाण्यासाठीं तो निघाला. त्याच्या बरोबर त्याची वृद्ध माताही होती. आपला पुत्र गरुडाच्या भक्ष्यस्थानीं पडणार हें जाणून ती शोकाकुल झाली आणि धाय मोकलून रडूं लागली. ते तिचे हे विलापरव जीमूतवाहनानें ऐकिले तेव्हां त्याचें हृदय फार कळवळलें. 'मी आपल्या देहाचें अर्पण करून तुझ्या पुत्राचे प्राण वांचविण्यास सिद्ध आहें,' असें सांगून या लोकोत्तर महापुरुषानें त्या नागमातेचें सांत्वन केलें आणि त्या दोघांस न कळवितां तो वध्यशिळेवर जाऊन बसला. नित्याप्रमाणें गरुडाची स्वारी आली. त्यानें हा नागच आहे असें समजून त्याला घेऊन मलयपर्वताच्या शिखरावर उड्डाण केलें. याप्रमाणें जीमूतवाहनानें आपला देह गरुडाला अर्पण करून शंखचूड नागाचे प्राण वांचविले. गरुड जीमूतवाहनाचें उर फोडून रक्तमांस खाऊं लागला, तथापि त्या प्राणहर वेदना, हूं कीं चूं न करतां, प्रसन्नमुद्रेनें सहन करून तो स्वस्थ होता. कांहीं वेळानें हा नाग नसून कोणी तरी उदार महात्मा असावा असा गरुडाला संशय आला. नंतर ह्याची पूसतपास करतां हा सुप्रसिद्ध परोपकाररत जीमूतवाहन होय असें शंखचूडाकडून त्यास कळलें. तेव्हां गरुड फार घाबरला आणि कृतपापकर्माचा त्याला पश्चात्ताप झाला. त्यानें या महापातकाची निष्कृति करण्यासाठीं अग्निप्रवेश करण्याचा निश्चय केला. इतक्यांत जीमूतकेतु, वृद्धादेवी आणि मलयवती हीं तिघेंजणें जीमूतवाहनाचा शोध करीत तेथें आलीं. त्यांना ही स्थिति पाहून मूर्च्छा आली. इकडे जीमूतवाहनाच्या जीविताची आशा उरली नाहीं, त्यानें डोळे मिटले. पुढें जगदंबेनें प्रसन्न होऊन त्याच्यावर उदक शिंपडून त्यास उठविलें. त्याच्या सांगण्यावरून गरुडानें सर्पभक्षण करणें सोडून देऊन इंद्राकडून अमृतवृष्टि करवून जितक्या सर्पांस भक्षण केलें होतें तितक्यांस सजीव केलें. जीमूतवाहनाच्या ह्या अलौकिक औदार्यामुळें हा दिवस नागांना महोत्सवाचा झाला आणि ते त्याचे उपकार आठवीत पाताळीं आपापल्या घरीं सुखानें कालक्रमणा करूं लागले. पंतांची गीति पहा:—'कर्णे त्वचा, शिबि पलल, दे अस्थि दधीचि विप्र अर्थिजना. । जीमूतवाहनाच्या आलें दुष्करहि जीवदान मना. ॥' [सत्संगस्तव—गीति ५५; **काव्यसंग्रह**—मोरोपंतकृत स्फुट काव्यें—पृष्ठ ३६ पहा.] २. हीच ओंवी वनपर्वांत आहे. [मुक्तेश्वर—वनपर्व—अध्याय २२ ओंवी १७ पहा.] ३. देण्यास अशक्य.

नमस्कारोनि 'घेईं' म्हणे । [1]महापत्रिश्वरा हें.' ॥ १६५ ॥ संलग्न अंगींच्या सुवर्णकवचा । शस्त्रें काढोनि दिधली [2]त्वचा । अद्भुत देखोनि देवांचा । नाथ झाला विस्मित. ॥ १६६ ॥ संतोषोनि [3]अमरपती । उचित ओपिली दिव्य शक्ती । म्हणे, 'हे अगाध [4]खेचरी **काळ**व्यक्ती । मृत्यु देती वैरियां. ॥१६७॥ देवराक्षसमनुष्यव्यक्ती । जयावरी प्रेरिशील हे शक्ती । तो प्राणेशीं शरीराकृती । नाहीं होईल [5]क्षणार्धें.' ॥ १६८ ॥ वचनीं गौरऊनि **कर्णा**तें । साधूनि पुत्रकार्यातें । **अ**मरावतीतें अमरनाथें । प्रयाण केलें तात्काळ. ॥ १६९ ॥ ऐसा उदार चक्रवर्ती । ज्याची [6]आतुर्बळी दातृत्वशक्ती । उपमा द्यावया त्रिजगतीं । दुजा दृष्टीं दिसेना. ॥ १७० ॥ तैसाच [7]क्षात्रत्वें [8]झुंजारु । शस्त्रास्त्रीं संग्रामचतुरु । धनुर्धरां दीक्षागुरु । [9]**जा**मदग्न्यासारिख्यां. ॥ १७१ ॥ पाहतां सौंदर्यदीप । लाजोनि माघारे [10]कंदर्प । **चं**द्र उपमे अत्यंत स्वल्प । [11]क्षयरोगी म्हणोनी. ॥ १७२ ॥ ज्याच्या [12]मुखचंद्रअवलोकनें । समुद्रभरती स्त्रियांचीं मनें । **सो**मकांत[13]कामसदनें । [14]स्रवों लागलीं आवडी. ॥ १७३ ॥ ऐसी **कर्णा**ची उत्पत्ती । तुज सांगीतली [15]यथानिगुती । **पांडु**सी प्राप्त झाली **कुं**ती । तेही आतां ऐक पां. ॥१७४॥ इति श्री**भारत आदि**पर्व सागर । अवगमे [16]**मा**नससरोवर । [17]राजहंस श्रोते चतुर । प्रेमानंदें क्रीडती. ॥ १७५ ॥ शब्दार्थमोतीयांचा चारा ।

---

१. महायाचकश्रेष्ठा. २. कातडी. ३. इंद्र. ४. राक्षसी. ५. अध्याय १११ श्लोक ३० पहा. ६. अतिबळी, मोठी. ७. क्षत्रियधर्मानें. ८. योद्धा. ९. जमदग्निपुत्र परशुराम त्याजसारख्यांस. १०. मदन. ११. चंद्राला सोळा कला आहेत, त्या अग्नि सूर्य इत्यादि देव पान करतात म्हणून त्याचा कृष्णपक्षीं क्षय होतो असें पुराणांत वर्णन आहे. १२. चंद्रोदयीं समुद्रास भरती येते ही गोष्ट सुप्रसिद्ध असून पदार्थविज्ञानशास्त्रवेत्त्यांस मान्य आहे. १३. योनि, भग. १४. द्रवों. १५. निश्चयें. १६. पृष्ठ ७४ टीप ४ पहा. १७. राजहंसाचें प्रिय वासस्थान म्हटलें म्हणजे मानससरोवर होय असा कविसंकेत आहे. या कविसंकेतांविषयीं विश्वनाथकविराजकृत 'साहित्यदर्पणां'तील तीन पद्यें (सप्तमपरिच्छेद) उपयुक्त आहेत. म्हणून येथें दिलीं आहेत. यांत पुष्कळच कविसमयांचा समावेश केला आहेः—'मालिन्यं व्योम्नि पापे यशसि धवलता वर्ण्यते हासकीर्त्यो रक्तौ च क्रोधरागौ सरिदुदधिगतं पंकजेंदीवरादि । तोयाधारेऽखिलेऽपि प्रसरति च मरालादिकः पक्षिसंघो ज्योत्स्ना पेया चकोरैर्जलधरसमये मानसं यांति हंसाः ।,' 'पादाघातादशोकं विकसति बकुलं योषितामास्यमद्यैर्यूनामंगेषु हाराः स्फुटति च हृदयं विप्रयोगस्य तापैः । मौर्वी रोलम्बमाला धनुरथ विशिखाः कौसुमाः पुष्पकेतोर्भिन्नं स्याद्स्य बाणैर्युवजनहृदयं स्त्रीकटाक्षेण तद्वत् ॥' 'अह्न्यंभोजं निशायां विकसति कुमुदं चंद्रिका शुक्लपक्षे मेघध्वानेषु नृत्यं भवति च शिखिनां नाप्यशोके फलं स्यात् । न स्याज्जाती वसन्ते न च कुसुमफले गंधसारद्रुमाणामित्याद्युन्नेयमन्यत्कविसमयगतं सत्कवीनां प्रबंधे ॥'.

चरोनि देती सुखढेंकरा। पुढें प्रार्थिती मुक्तेश्वरा। कथा सादर परिसवीं.॥१७६॥

अध्याय सव्विसावा.[1]

वदे व्यासशिष्य मंजुळ वाणी। ऐके कुरुवंशजचूडामणी। ऐसा कर्ण तो काननीं। कुंतीजठरीं जन्मला. ॥ १ ॥ रमारमणपादारविंदीं[2]। त्रितापहंत्री[3] जन्मली नंदी[4]। तिचा नंदन[5] हृदयारविंदी[6]। विचार करी अमोघ. ॥ २ ॥ विदुरोक्ती आठवून। म्हणे, 'पांडूचें करावें लग्न'। पुरोहितातें[7] पत्र देऊन। कुंतिभोजाप्रति[8] पाठविलें. ॥ ३ ॥ कुंतिभोजाप्रति भेटतां ब्राह्मण। मान्य केलें तेणें वचन.। लग्नपत्रिका देऊन। भूसुरांतें[9] [10]बोळविलें. ॥ ४ ॥ आपण घेऊनि सर्व संपत्ती। गेला वसुदेवपित्याप्रती। भीष्म सहपरिवारें त्वरितगती। यादवनगरा प्रवेशला. ॥ ५ ॥ पांडुकुंतीचें लग्न[11]। भीष्म विध्युक्त संपादून। अपार आंदण घेऊन। हस्तिनापुरा पातला.॥६॥ विदुरविचारें गंगानंदन। पुरोहितातें पाचारून। पांडूस दुसरें [12]अंगनारत्न। मेळवावें प्रयत्नें.॥७॥ विप्रा धाडिलें [13]मद्रेशासीं। तेणें जाऊन सांगतां त्यासीं। भीष्माची आज्ञा वंदोनि शिरसीं। माद्री घेऊनि निघाला.॥८॥ सकळसंपत्तीसैन्यसमवेत। हस्तिनापुरा आला नृपनाथ।

---

१. या अध्यायास 'धृतराष्ट्रपाणिग्रहणकर्णोत्पत्ति' असें नांव हस्तलिखित प्रतींत आढळतें. यांत महाभारताच्या आदिपर्वांतील १०७-१११ या अध्यायांचा समावेश झाला आहे. पंतांनीं हेंच प्रकरण सुमारें ६० गीतींत वर्णिलें आहे. (मोरोपंत–आदिपर्व–अध्याय १५ गीति ८०-९३, आणि अध्याय १६ गीति १-१८.) या अध्यायांत मांडव्य ऋषीचा यमाला शाप, शांतनूचा वंशोद्धार, धृतराष्ट्राचा विवाह आणि कर्णसंभव इतकीं प्रकरणें आलीं आहेत. २. लक्ष्मीपतिचरणकमलीं. (अरविंद=कमळ.) ३. कायिक वाचिक आणि मानसिक किंवा आध्यात्मिक आधिदैविक आणि आधिभौतिक या तीन तापांचा नाश करणारी. आधिदैविक (देवतांच्या क्षोभापासून होणारा–जसी वीज पडणें), आध्यात्मिक (मनाच्या क्षोभापासून अथवा शरीराच्या रोगापासून होणारा–जसा खरूज, ताप), आणि आधिभौतिक (पृथ्वी, आप, तेज, वायु, आणि आकाश या पंचमहाभूतांच्या क्षोभानें होणारा–जसा भूकंप, अतिवृष्टि, समुद्रमर्यादोल्लंघन). ४. विष्णुपदी. ५. पुत्र. (भीष्म.) ६. हृदयकमलीं. ७. उपाध्यायातें. ८. याच राजाला शूरानें आपली कन्या पृथा प्रेमानें दत्तक दिली. ९. ब्राह्मणांतें. (भू+सुर=पृथ्वीवरचे+देव.) १०. परत पाठविलें. ११. कुंतिभोजानें सकल राजांस स्वयंवरार्थ बोलाविलें असतां, कुंतीनें त्या प्रसंगीं पांडुराजाला माळ घातली असें वर्णन महाभारतांत आहे. (आदिपर्व–अध्याय ११२ पहा.) १२. स्त्रीरत्न. १३. मद्राधिप शल्य. माद्री ही शल्याची भगिनी. भीष्मानें स्वतः मद्रेशाकडे जाऊन माद्रीला आणिलें असें वर्णन महाभारतांत आहे. (आदिपर्व–अध्याय ११३ पहा.)

पाडूसी लग्न लाऊनि त्वरित । [1]स्वनगरा तो गेला. ॥ ९ ॥ पांडुरायातें द्रय [2]मौक्तिनी । झाल्या अत्यंत विलासिनी । तेणें तो सुखाऊनि मनीं । कामिनीसीं क्रीडत. ॥ १० ॥ मग भीष्म वदे विदुरमतें । 'अश्वमेध करावया येथें.' । आज्ञापितां पांडुरायातें । स्वसैन्येंसीं तो [3]निघाला. ॥ ११ ॥ [4]सेनावसनें सर्व [5]जं-गती । नेसऊनी पांडुनृपती । जिंकावया [6]भूभुजांप्रती । उत्तरदिशे चालिला. ॥ १२ ॥ सर्व सैन्य [7]अतितुंबळ । जैसे [8]वडवाग्नीचे ज्वाळ । कीं प्रतापनिधीचें [9]जळ । उत्साहवातें उसळलें. ॥ १३ ॥ भीष्मआज्ञा होतां त्वरें । [10]व्यासात्मज चालिला उत्तरे । तेणें रायांचा मद उतरे । शरण येती तयासी. ॥ १४ ॥ कोणी करिती युद्ध[11]कंदन । कोणी चरणा येती शरण, । करभार अपार ओपून । समागमें चालती. ॥ १५ ॥ [12]आनर्तदेशींचा नृपनाथ । बळभीम जिंतिला त्वरित, । शाकलद्वीपींचा नृपनाथ । [13]प्रतिविंध्यनामा जिंकिला. ॥ १६ ॥ [14]पुढें देखिला गंधर्वदेश । तोही जिंकिला नराधीश । सवा-लक्ष पर्वत विशेष । जराधीश जिंकिला. ॥ १७ ॥ हिमवंत श्वेतपर्वत । किं-[15]पुरुषदेश समस्त । पद्मरागादि अपरिमित । रत्नें अपार आणिलीं. ॥ १८ ॥ गोरक्षपर्वत प्रसवे सुवर्ण । पुढां मानससरोवर गहन । शरयूपाट तेथींचा जाण । जो कां वाहे अयोध्ये. ॥ १९ ॥ मानससरोवरकमळिणी । भोंवत्या [16]हाटकरत्नखाणी । [17]प्रवाळलतिका [18]जीवनीं । उतरल्या अमोघ. ॥ २० ॥ क-

---

१. असें वर्णन मूळांत नाहीं. शल्य हस्तिनापुरास माद्रीविवाहार्थ आला नव्हता. मुक्तेश्वराच्या आणि व्यासाच्या वर्णनांत हा जो फरक दिसतो तो चिंतनीय आहे. मुक्तेश्वराची महाभारताची पोथी प्रस्तुतच्या मुद्रित ग्रंथाहून भिन्न असावी असें दिसतें. २. स्त्रिया. ३. तीस दिवस सुखो-पभोग घेतल्यावर पांडु दिग्विजयास निघाला. (अध्याय ११३ श्लोक २१.) ४. सेनारूप वस्त्रानें. ५. पृथ्वी. ६. राजांस. (भूमीचा भोग घेणारे.) ७. अतिशयित. ८. वडवाग्नि—समुद्रांत राहून जल शोषण करणारा अग्नि. याची कथा अशी:—और्व नामक एक मोठा भार्गववंशोत्पन्न मुनि होता. त्यास असें कळलें कीं कार्तवीर्यकुलोत्पन्न राजांनीं भार्गवसंततीचा उच्छेद करून आपल्या कुलांतील स्त्रियांस द्रव्यनिमित्त बहुत पीडा दिली. तेव्हां यानें त्यांच्या नाशासाठीं तपःप्रभावानें भयंकर अग्नि उत्पन्न केला. त्यामुळें क्षत्रियांस फार त्रास झाला, तेव्हां ते और्वपितरांस शरण गेले. नंतर पितरांच्या आज्ञेवरुन और्वानें आपला कोपानल समुद्रांत टाकिला. यासच, वडवाग्नि, वडवानल, असें म्हणतात, कारण याचें मुख वडवे(घोडी)सारखें होतें. ९. उदक. १०. पांडु. ११. हनन, रण. १२. हीं देशांचीं आणि राजांचीं नांवें मूळांत आढळत नाहींत. कदाचित् मुक्तेश्वरापाशीं असलेला महाभारतग्रंथ विद्यमान मुद्रणांकित ग्रंथाहून भिन्न असावा आणि त्यांतील श्लोकसंख्याही कदा-चित् जास्त असावी असें वाटतें. १३. 'प्रतिधाननामा' असा अन्य पाठ आहे. १४. 'पुढें गंधर्वी जिंतिला देश । तो ही जिंके नराधीश । सवा लक्ष पर्वत अशेष । नराधिप पैं जिंकी. ॥' असा अन्य पाठ आहे. १५. किंपुरुष=किंनर. हे देवयोनि असून देवापेक्षां कनिष्ठ आणि मनुष्यापेक्षां श्रेष्ठ जातीचे लोक होत असें पुराणांत वर्णन आहे. १६. सुवर्ण. १७. पोंवळ्याच्या वेली. १८. उदकांत.

पूरकर्दळींचीं [1]काननें । कस्तूरीमृग अतिपावने । [2]करिणीशावकांचें खेळणें । भूपाळ नयनें पहातसे. ॥ २१ ॥ मुक्ताफळगुच्छ शोभती जळीं । दिव्य रत्नें सुवर्णीकमळीं । स्वच्छंदें [3]मराळ [4]तामरसदळीं । सुखानंदें क्रीडती. ॥ २२ ॥ कोणी नेदितां सहजें । ज्याला आवडे तेणें घेइजे । सुवर्णरत्नें हेमांबुजें । मुक्ताप्रवाळ इत्यादि. ॥ २३ ॥ उत्तरे [5]हारिवा गंधर्वपुर । जेथें गजप्राय त्रिखार । नागिया भेदिती गिरिवर । ऐसे [6]वृश्चिक तेठायीं. ॥ २४ ॥ उत्तरदिशा जिंकोनि सकळ । [7]वोढियाजगन्नाथादि देश सकळ । पूर्वदिशेचे भूपाळ । वेगीं सर्वही जिंकिले. ॥ २५ ॥ कराड आणी कर्णाटक । [8]चोळमंडळादि अनेक । देश [9]मल्याळ पंचभर्तारिक । पांडुरायें जिंकिले. ॥ २६ ॥ श्रीरंगपट्टण [10]शिवकांची । समुद्रवासी गडवासियांचीं । स्थळें जिंकूनि दुर्जनांचीं । अपार वस्तू आणिल्या. ॥ २७ ॥ चौदाचाळ कोंकण । घेतलें कठीण कोळवण । अपार बंदरें घेऊन । आणिली द्रव्यसमृद्धी. ॥ २८ ॥ कांबे काढे कंकम खर । मानवआहारी अत्यंत क्रूर । सर्व जिंकोनी नृपवर । धनें अपार आणिलीं. ॥२९॥ पूर्व पश्चिम उत्तर दक्षिण । जिंकोनि अष्टदिशा पूर्ण । हस्तिनापुरा आला आपण । अपार करभार घेऊनी. ॥ ३० ॥ [11]रत्नमांदुसा सहस्रश्रेणी । वाजी[12]वारणउष्ट्रयानीं । अपार [13]शकटें भरोनी । द्रव्य आणिलें पांडूनें. ॥ ३१ ॥ नाना दिव्य अळंकार । अपार वस्त्रांचे संभार । नेणों लोटले गिरिवर । हस्तिनापुरप्रदेशीं. ॥ ३२ ॥ [14]कनकनिष्क सहस्रकोटी । [15]जांबूनदाच्या अनेक कोटी । सकळीं होय मेघवृष्टी । तैसी संपदा आणिली. ॥ ३३ ॥ दिग्विजय करूनि जाण । आला पांडू हें ऐकोन । सैन्यासहित [16]गंगानंदन । सामोरां जाय तयातें. ॥३४॥

---

१. वनें. २. हत्तिणीच्या छाव्यांचें. ३. हंस. ४. कमलपत्रीं. ५. हारीला. ६. विंचू. ७. वोढिया जगन्नाथ–ओढिया नामक देश. यांत सुप्रसिद्ध जगन्नाथ नामक देवाचें नगर आहे. हें नगर हिंदुस्थानाच्या पूर्वकिनाऱ्यास ओरिसा प्रांतात आहे. या नगरास जगन्नाथपुरी असेंही म्हणतात. येथें श्रीकृष्णाची मूर्ति आहे. व कृष्णाचा भाऊ बळराम व भगिनी सुभद्रा यांच्याही मूर्ति आहेत. येथील देव कृष्णच आहे, व त्यास पाय नाहीं असें म्हणतात. याच्या आसमंताद्भागींची दहा दहा कोसपर्यंतची जमीन पवित्र मानिली आहे. येथें शंकराचार्यांचा गोवर्धन नामक एक मठ आहे. ८. कारमंडल. ९. मलवार देश. १०. ही अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंती, आणि द्वारवती या सात पुऱ्यांतील एक प्रसिद्ध नगरी. शिवकांची आणि विष्णुकांची अशीं दोन नगरें अर्काटाच्या पूर्वेस आणि व्यंकटेशाच्या आग्नेयीस असून यांच्यामध्यें वेदवती नामक नदी आहे. ११. रत्नांच्या पेट्या. १२. वारण=हत्ती. १३. गाडे. १४. सुवर्णाचीं पदकें. १५. सुवर्णाच्या. १६. अध्याय ११२ श्लोक ४३ पहा.

सन्मुख देखतां जान्हवीसुत । पांडु रथाखालें उतरत । भावें पदांबुजें नमित, । येरु आलिंगी तयातें.॥३५॥करूनि मस्तका अवघ्राण[1]। भीष्में करें कुरवाळून । सकळ कुशळ विचारून । पुढती रथारूढ पैं झाले.॥३६॥मिरवत आले निजनगरीं । भीष्मासहित राजमंदिरीं । पांडु सत्यवतीस नमस्कारी । आणि माता आपुलीया.॥३७॥ त्यांचा आनंद न माय त्रिभुवनीं,। भीष्म तयांप्रती बोले वचनीं । 'पांडूनें दिग्विजय करूनी । अपार वस्तू आणिल्या. ॥ ३८ ॥ छप्पन्नदेशींच्या वस्तुजाता । पूरें माजल्या जेंवी सरिता[3] । एकत्र मिनल्या[4] तत्वता[9] । हस्तिनापुरसागरीं[2]. ॥ ३९ ॥ पूर्वी कुरुरायांचीं धनें । राजे हरिती उद्धतपणें । ते सर्व होवोनि दीनें । वोळंगती करभारें.' ॥ ४० ॥[5] संपत्ती आणिल्या अमोघ । त्यांचे करूनि अष्ट भाग । पूज्य ते पूजिले सांग । पांडुराजें आवडी. ॥ ४१ ॥ एकें भागें[6] भीष्मनृपती । एकें पूजिली सत्यवती । अंबिका अंबालिका सती । भाग्यद्वय त्यां दीधले. ॥ ४२ ॥ एक धाडिला धृतराष्ट्रातें । एक दीधला विदुरातें, । नगरवासियां सुहृदांतें । तोषविलें भागेकें. ॥ ४३ ॥ एक ओपिला ऋषिब्राह्मणा[7] । भणगां[8] वांटिली बहु दक्षिणा । स्तव करितां, लोकवदना । तृप्ती नोहे सर्वथा. ॥ ४४ ॥ अपार ओपोनि संपत्ती । प्रज्ञाचक्षुचिया हस्तीं । शत एक अश्वमेध निगुती । सांगोपांग[10] करविले. ॥ ४५ ॥ जयंत[11] देखोनि पौलोमी[12] । संतोष मानी अंतर्यामीं । पांडु देखोनी सुखाची ऊर्मी[13] । कौशल्येतें[14] नावरे. ॥ ४६ ॥ नगरवास न रुचे मनीं । सवें घेऊनि उभयपत्नी । वसता झाला काननीं । मृगयाशील[15] सर्वदा. ॥ ४७ ॥ हिमवंतगिरीच्या पाठारीं[16] । ताळतमाळवनगव्हरीं[17] । दक्षिणपार्श्वी धनुर्धारी । सिंह तैसा विचरत. ॥४८॥ करिणीमाजी[18] भद्रजाती[19] । तेंवी उभयवनितांचे पंक्ती । पांडुराजा अहोराती । अरण्यक्रीडे रंतला[20]. ॥ ४९ ॥ भक्ष्यभोज्यादि समस्त । धृतराष्ट्र पाठवी वनांत । आज्ञा होतां असंख्य दूत । सामुग्रीसीं तिष्ठती. ॥ ५० ॥ देवकराजकन्या बरवी । जीचें नांव पारसवी[21] । भीष्में मागोनि लग्नगौरवीं । भार्या केली विदुरातें. ॥ ५१ ॥ तिचे पोटीं

---

१. आघ्राण (हुंगणें). २. समुद्रा. ३. नद्या. ४. मिसळल्या. ५. अध्याय ११४ श्लोक १-५ पहा. ६. एका हिश्शानें. ७. यावरून आठही भाग वांटून दिले असें होतें. ८. भिकारी जनांला. ९. निश्चयें. १०. संपूर्ण, परिपूर्ण. ११. इंद्रपुत्र. हाच दाखला मूळांत आहे. (अध्याय ११४ श्लोक ४ पहा.) १२. इंद्राणी. १३. लहरी. १४. अंबालिकेतें. १५. मृगयासक्त. (अध्याय ११८ श्लोक ७). १६. पृष्ठभागीं. १७. गुहेंत. १८. हत्तीणीमध्यें. हाच दृष्टांत मूळांत आहे. (श्लोक ९). १९. गजेंद्र. २०. आसक्त झाला. २१. ब्राह्मणापासून शूद्रयोनीच्या ठायीं झालेली कन्या. (अध्याय ११४ श्लोक १२ टीका पहा.)

जन्मले कुमर । पितयातुल्य विवेकचतुर । विनयवंत धीर गंभीर । महासमुद्र क्षमेचे. ॥ ५२ ॥ यावरी प्रज्ञाचक्षुरायातें । शत पुत्र झाले गांधारीतें । वेश्यागर्भी जन्मला त्यातें । युयुत्सुनाम जाण पां. ॥ ५३ ॥ देवतावीर्यें वनांतरीं, । कुंतीमाद्रीउभयजठरीं । देवचि जन्मले देहधारी । [1]धर्मासहित पांचही. ॥ ५४ ॥ विनवी [2]राजचूडामणी, । वैशंपायना ! चातुर्यखाणी । शतपुत्रांतें एक जननी । कैशापरी प्रसवली ? ॥ ५५ ॥ एकदां किंवा काळांतरीं । जन्मले हें सविस्तरीं । शत पुत्र एके उदरीं । सांग मातें सर्वज्ञा ! ॥ ५६ ॥ वेश्यागर्भी एक नंदन । जन्मावया काय कारण ? । हेंही मातें होय ज्ञान । तैसें [3]प्रांजळ निरोपीं. ॥ ५७ ॥ मनुष्यस्त्रीचे गर्भमुसे । देववीर्यें देवतावेशें । पुत्र जन्मले हेंही कैसें ? । विस्तारूनि मज सांगें. ॥ ५८ ॥ पंडितमंडळीवरमंडणा ! । वैशंपायना ! संशयखंडणा ! । प्रचंडवसंतचंडकिरणा ! । कथापंथा प्रकाशीं.’ ॥ ५९ ॥ वैशंपायन म्हणे, ‘नृपती ! । निकें परिसें सावधमती । गांधारीचे परमभक्ती । व्यास गृहा पातला. ॥ ६० ॥ भोजनादरें तोषला ऋषी । कृपेनें वरदोक्ती वदला ऐसी, । ‘शत पुत्र तुझिये कुसीं । जन्मतील सुदैवें.’ ॥ ६१ ॥ व्यास वदोनि गेलिया, राजा ! । [6]ऋतुस्नात [7]सुबळात्मजा । प्रज्ञाचक्षूवीर्यें [8]वोजा । धरिती झाली गर्भातें. ॥ ६२ ॥ गर्भ स्थिरावला उदरीं । पंचविंशतिमासवरी । प्रसूत नव्हे कवणेपरी । चिंता वर्ते दोहींतें. ॥ ६३ ॥ वार्ता सांगिजे ऋषीं ब्राह्मणीं । ‘कुंती प्रसूत झाली वनीं, । ज्येष्ठ पुत्र जन्मला गुणी । [9]बाळसूर्यासारिखा.’ ॥ ६४ ॥ हें ऐकोनि विषममनें । धृतराष्ट्रातें कळतां मौनें । उदर ताडिलें पाषाणें । निष्ठुरकरें रागिष्टें. ॥ ६५ ॥ उदर ताडितां दक्षिणकुसीं । गर्भ गळाला तात्काळेसीं । रक्तवर्ण [10]मांसपेशी । तळीं पडली [11]लवलवीत. ॥ ६६ ॥ झालें देखोनि गर्भपतन । [12]सौबळी करी रोदन । म्हणे, ‘व्यासाचें वरदान । विपरीत केलें [13]अदृष्टें.’ ॥ ६७ ॥ ऐसें बोलतां खेदभूत । तंव व्यास प्रगटला अकस्मात । [14]‘नों भी’ म्हणोनि आश्वासीत । कृपावचनीं कृपाळु. ॥ ६८ ॥ ‘अन्यथा नोव्हे मद्वचनासी’ । म्हणोनी जळें [15]प्रोक्षिलें तियेसी । हस्त स्पर्शतां [16]आपैसी । भेदावली शतभाग. ॥ ६९ ॥

---

१. अध्याय ११५ श्लोक १-२ पहा. २. जनमेजय. ३. उघड, स्पष्ट. ४. सूर्या. ५. हे जन्मेजया. ६. ऋतु प्राप्त झाल्यावर चवथे दिवशीं स्नान करून शुद्ध झालेली. ७. गांधारी. ८. ओजस्विनी=तेजस्विनी. (मागचा अध्याय ओंवी १२१ टीप पहा.) ९. बालार्कसमतेज असा. (अध्याय ११५ श्लोक १०.) १०. मांसाची पिशवी. ११. कोमल, मऊ, मृदु. १२. गांधारी. १३. दैवें. १४. भिऊं नको. हें ‘मा भीः’ याचें भाषांतर. १५. सिंचिलें. १६. आपोआप.

फंगसामाजील[1] बीजकण । काढितां निघती भिन्नभिन्न । तेंवी अंगुष्ठप्रमाण । मांसगोळे निवडिले. ॥ ७० ॥ शतकुंभीं[2] भरोनि घृत । ऐक[3] एक सूदला[4] करूनि गणित । संख्या होतां एकशत । गांधारीतें प्राथिलें. ॥ ७१ ॥ 'एक कन्येची वासना । ते मज द्यावी, द्वैपायना ! । 'निकें' म्हणोनि विशेषकणा । आगळे[5] कुंभीं घातला. ॥ ७२ ॥ शतपुत्रावरी आगळी । कन्या जन्मली गुणवेल्हाळी । दुःशलानामें राजबाळी । बंधुवर्गा पैंढियंती[6]. ॥ ७३ ॥ गर्भबीजाचे भिन्न भिन्न अंश । घृतीं झालिया समरस । घाटोनियां एकमूस । व्यासें केली स्वहस्तकें. ॥ ७४ ॥ रक्षा करूनि मंत्रमेळीं । कुंभ ठेविले निगूढस्थळीं[7] । दीप लावूनियां जवळीं । रक्षणा नारी ठेविल्या. ॥ ७५ ॥ 'मूषकमार्जारनिवारण । करोनि विलोका सावधान । नवमास होतां संपूर्ण । आकारती अवयव.' ॥ ७६ ॥ ऐसें सांगोनि व्यासमूर्ती । तपश्चर्या मानसगती । गेला हिमालयाप्रती । योगमार्गें योगिया. ॥ ७७ ॥ मासमासाच्या अंतरीं । जन्म पावले कुंभोदरीं । ज्येष्ठ त्यामाजी निर्धारीं । दुर्योधन दुरात्मा. ॥ ७८ ॥ जन्मतांक्षणीं बाळभावें । टाहो फोडिला रासभरवें[9] । अनेक अरिष्टांचे थवे । एकवटले तेकाळीं. ॥ ७९ ॥ होतां रासभरवनाद । रासभीं दीधला प्रतिशब्द । वृकं[10] व्याघ्र गोमायु[11] गीध[12] । शिवा[13] वायस[14] इत्यादी. ॥ ८० ॥ मेघ वर्षे रक्तधारा । झडझडाटें सुटला वारा । उन्मळोनि[15] तरुवरा । गगनमार्गें उडवीतु. ॥ ८१ ॥ क्षणक्षणा भूमिकंपू । जागजागां सीततापू । दिग्दाहधूमें[16] [17]व्योमदीपू । लोपोनि केला [18]दुर्दिनु. ॥ ८२ ॥ करिती भ्यासूरगर्जनें । दीर्घस्वरें रडती श्वानें । ऐसीं देखोनि दुश्चिन्हें । लोक चित्तें सचिंत. ॥ ८३ ॥ कडकडाटें उल्कापात[19] । दिवसा बोभाती दिवाभीत[20] । ऋषी सांगती भविष्यार्थ । भीष्मा आणी धृतराष्ट्रा. ॥ ८४ ॥ 'हा जन्मला जगाचे मुळीं । करील सकळकुळाची होळी । क्षत्रियमात्र पृथ्वीतळीं । संहारेल या योगें. ॥ ८५ ॥ करील महाविष्णूसीं स्पर्धा । बळें बळिष्ठेंसीं द्वंद्वी[21] । पुत्रशोकाच्या महा आपदा । भोगवील वडिलांतें.

---

१. या वर्णनास मूळांत आधार नाहीं, हें मुक्तेश्वराच्या पदरचें आहे. २. शंभर घट तुपानें भरून. ३. मांसाचा गोळा. ४. घातला. ५. अन्य, अधिक. ६. आवडती. ७. सुरक्षित स्थानीं. ८. अध्याय ११५ श्लोक २४ पहा. ९. गाढवासारखा नाद केला. (श्लोक २८.) १०. लांडगा. ११. कोल्हा. १२. गिधाडें. १३. भालू. १४. कावळे. १५. उपटून. १६. दिशांच्या दाहाच्या धुरानें. १७. सूर्य. १८. दुर्दिन=जलदध्वांत, मेघांधकारित दिवस [मेघच्छन्नेऽह्नि दुर्दिनमित्यमरः. १९. आकाशांतून अग्निरूप तेजःपुंज तारकांचें पतन. २०. घुबड. २१. युद्ध.

॥ ८६ ॥ नायिकेल श्रेष्ठांचें उत्तर । दुराग्रही महाक्रूर । कपटविद्येचा सागर । दीर्घद्वेषी निर्दयी'. ॥ ८७ ॥ विदुर म्हणे, 'अगा ज्येष्ठा ! । विचार करीं विवेकनिष्ठा ! । सर्प डसला जया बोटा । तेंचि खंडिती जाणते. ॥ ८८ ॥ वांचवावया सकळकुळा । शीघ्र सांडीं यया बाळा । इतुकेंनि क्षेम कल्याण सकळां । सुहृदांसीं जगातें. ॥ ८९ ॥ एक त्यागितां कुमर । वंश विशेषीं अपार । वांचेल याहूनि लाभ थोर । कोण तो सांगें सर्वज्ञा ?' ॥ ९० ॥ मोह दवडूनियां परौता । अनुमाना हाणोनियां लत्ता । गंगाजळीं बुडवीं सुता । वसु जैसे पूर्वीं जे. ॥ ९१ ॥ उत्पात उठले दिसती क्षिती । यदर्थीं करणें हेचि शांती । एक पुत्र त्यागिल्या त्रिजगती । क्षेम उरती मानव. ॥ ९२ ॥ कुरुकुळेसीं यया विश्वा । जीवदान देईं नरपार्थिवा ! । हे आमुची प्रार्थना देवा ! । नुपेक्षावी समर्थें. ॥ ९३ ॥ एक त्यागूनि कुळ रक्षणें । ग्रामालागीं कुळ सांडणें । देशविरोधें ग्राम त्यागणें । ऐसी नीती व्यासाची. ॥ ९४ ॥ शरीर रक्षावयाकारणें । पृथ्वीचाही त्याग करणें । यालागीं पुत्र त्यजूनि प्राणें । कुळ आपुलें वांचवीं.' ॥ ९५ ॥ हृदयीं आलिंगूनि सुत । धृतराष्ट्र बोले स्नेहभरित । म्हणे, 'तुमचें बोलणें व्यर्थ । मी नायकें सर्वथा. ॥ ९६ ॥ प्राणप्रिय वडील कुमर । त्यागितां मातें न धरवे धीर । सांडणें सांडीन शरीर । ओंवाळूनि याहुनी. ॥ ९७ ॥ अरिष्टें उदेजती काळें । शांत होती स्वभावलीळें । ईश्वरकर्तव्यावांचूनि बोलें । काय कीजे सांग पां ?' ॥ ९८ ॥ असो, दुर्योधन जन्मला ऐसा । यानंतरें मासमासा । जन्म पावले नरवीरेशा ! । एकशत बळगाढे. ॥ ९९ ॥ दिवसें वडील युधिष्ठिर । लोटल्या एक संवत्सर । दुर्योधन वृकोदर । एकें दिवसीं जन्मले. ॥ १०० ॥ सगर्भ असतां गांधारीतें । रायासी पीडिलें मन्मथें । वेश्यागमनीं कामातें । पूर्ण करी स्ववीर्यें. ॥ १०१ ॥ तेथें पुत्र पावला जन्म । तया युयुत्सु ऐसें नाम । शतावेगळा उत्तम । बुद्धी त्याची पवित्र. ॥ १०२ ॥ त्या सुतांचीं नांवें कवण । ऐकों इच्छी तुझें मन । तें पूर्वींच माझें वदन । बोलिजे तें ऐक पां. ॥ १०३ ॥ दुर्योधन युयुत्सु दुःशासन । दुःसह दुःशळ जलसंध जाण । सम सह विंद

१. दुर्योधना. २. दूर, पलीकडे. ३. पूर्वी जसे गंगेनें वसु बुडविले तसे. ४. अनास्था न करावी. ५. अध्याय ११५ श्लोक ३७-३९ पहा. ६. हें धृतराष्ट्राचें उत्तर मूळांतील ४० व्या श्लोकाशीं (अध्याय ११५) ताडून पाहिलें म्हणजे मुक्तेश्वराच्या कल्पनाचातुर्याची महती कळून येण्यासारखी आहे. ७. भीम. ८. कामानें. ९. अध्याय ११५ श्लोक ४२ पहा.

कुलक्षण । अनुविंद दुर्धर्ष दहावा. ॥ १०४ ॥ सुबाहु आणि दुष्प्रधर्षण । दुर्मुख दुर्मर्षण दुष्कर्ण । कर्ण विविंशती विकर्ण । शल सत्व तो त्रिसावा. ॥१०५॥ सुलोचन चित्र उपचित्र । चित्राक्ष शरासन चारुचित्र । दुर्मद दुर्विगाह विकटानन पवित्र । विवित्सु जाण तिसावा. ॥१०६॥ ऊर्णनाभ सुदर्शन । नंद उपनंद चित्रबाण । चित्रवर्मा सुवर्मा सुगुण । दुर्विमोचन सुनाभा. ॥१०७॥ अयोबाहु महाबाहु चित्रांग । चित्रकुंडल भीमवेग । भीमबळ बलाकी सुभग । बळवर्धन निषंगी ॥१०८॥ उग्रायुध सुषेण भीमकर्मा । कुंडधार महोदार दृढवर्मा । दृढपाशी नरेंद्रोत्तमा ! । सोमकीर्ती चित्रायुध अनूदर॥१०९॥ वृंदारक दृढसंध जरासंध । सद:सुवाक् सत्यसंध । उग्रश्रवा महाप्रसिद्ध । उग्रसेन सेनानी ॥ ११० ॥ दुष्पराजय अपराजित । कुंडशायी विशाळाक्ष । दुराधर आणि दृढहस्त । सुहस्त बाहातरी हे ॥१११॥ सुवर्चस वातवेग । बव्हाशी आदित्यकेत । अग्रयायी कवची नागदत्त । क्रथन कुंडी कुंडधर ॥११२॥ उग्र भीमरथ वीरबाहो । अलोलुप अभयनामा पहा हो ! । रौद्रकर्मा प्राणनाहो । वीरश्रियेचा संग्रामीं.॥११३॥दृढरथाश्रय युद्धीं । अनाधृष्य कुंडभेदी । दीर्घलोचन पैं विरावी । प्रमाथ आणी प्रमाथी ॥११४॥दीर्घरोम वीर्यवान । दीर्घबाहु महाबाहु जाण । व्यूढोर कनकध्वज आपण । कुंडाशी आणी विरजा॥११५॥वेश्यापुत्रेंसीं समस्त । एकागळे एकशत । नामें निरोपिलीं समस्त । यथानुक्रमें नरवरा ॥११६॥ सकळां सांग वेदाध्ययन । सर्वशास्त्रीं झाले निपुण । सर्व धनुर्विद्या संपूर्ण । सर्व योद्धे अतिरथी ॥ ११७ ॥ एकशत राजकुमरी । मागोति पुत्रांतें सुंदरी । भार्या केल्या जेंवि सुरवरीं । देवांगना क्रीडिजे. ॥ ११८ ॥ दु:शला कन्या अतिसंभ्रमें । अपार संपदा ओपोनि प्रेमें । जयद्रथातें नरेंद्रोत्तमें । लग्नसिद्धीनें दिधली. ॥ ११९ ॥ रूपविद्याबळसमर्थ । राजसदनीं दक्षधूर्त । पुत्र देखुनी अंबिकासुत । कृतकृत्य स्वयें मानी. ॥ १२० ॥ आतां पांडव जन्मले कैसे । तेंही परिसें सावकाशें । तुझे अवधान वदनें पिसें । वक्तृत्वातें लाविलें.॥१२१॥ विशेष लीलाविश्वंभरु । दत्तात्रेय जगद्गुरु । त्याचेनि प्रसादें मुक्तेश्वरु । निरोपी तें परिसावें. ॥ १२२ ॥

---

१. या अध्यायांत मूळांतील ११२-११७ या अध्यायांचा समावेश होतो. यांत कुंतीविवाह, माद्रीपाणिग्रहण, पांडुदिग्विजय, तद्वनवास, विदुरपरिणय, गांधारीपुत्रोत्पत्ति, धृतराष्ट्रपुत्रनामकथन आणि दु:शलाविवाह यांचें वर्णन आहे. २. या अध्यायाला 'धृतराष्ट्रपुत्रजनन' असें नांव एका पोथींत आहे.

अध्याय सत्ताविसावा.

पांडुराजा राजमौळी । मृगयाशील सदाकाळीं । अटण करितां वनस्थळीं । मृग सुंदर देखिला. ॥ १ ॥ मृग मृगीशीं सुखमैथुनीं । पाठिमोरा देखोनि नयनीं । लक्ष्य लाऊन पंच बाणीं । विंधोनियां पाडिला. ॥ २ ॥ तो तापसी कुरंगरूप । धावोनि समीप आला भूप. । मृग म्हणे, 'महापाप्र । आचरलासी पापिष्ठा ! ॥ ३ ॥ भोजनपानीं स्त्रीमैथुनीं । दुश्चित वधूं नये प्राणी, । तें त्वां करूनि अवमें करणी । क्षात्रधर्म बुडविला.' ॥ ४ ॥ ऐकोनि राजा बोले शब्द, । 'क्षत्रियें करावा मृगाचा वध; । [3]विधी नेमुनी गेला वेद, । तूं कां मातें निंदिसी ? ॥५॥ सुचित्त दुश्चित्त न विचारीत । राजे करिती मृगाचा घात । शिष्टाचार प्रमाण येथ । अगस्त्यादि ऋषींचा.' ॥ ६ ॥ सारंग वदे, 'ऐकें वचन । किंदमनामा मी ब्राह्मण । आपुल्या इच्छें सुखमैथुन । करावयाचे आवडी. ॥ ७ ॥ लोकदृष्टीं करितां प्रगट । आड शंकेचें कपाट । कृत्रिमवेशाचा नट । दारापुरुष अंबगलों. ॥ ८ ॥ पूर्ण न होतां मैथुनसुख । तुवां मध्यें दिधलें दुःख,' । म्हणोनि करिती महाशोक । मृग मृगी आक्रोशें. ॥ ९ ॥ पुढती बोले, करूनि कृपा । 'न कळत मातें वधिलें, नृपा ! । ब्रह्महत्येचिया पापा । स्पर्शों नेदीं तुजलागीं. ॥ १० ॥ आचरलासी ज्या अपराधा । त्यास्तव घेईं शापशब्दा । स्त्रीसंग करितांचि बुद्धिमंदा ! । मृत्यु पावसी तात्काळ. ॥ ११ ॥ मैथुनीं मातें विंधिला बाण । त्यांही करतां स्त्रीमैथुन । वीर्यपातासवें प्राण । देह त्यागील सर्वथा.' ॥ १२ ॥ ऐसें वदोनि शापवचन । कुरंगरूपें सोडिला प्राण । पांडुराजा अति उद्विग्न । [11]आकळलासे अतिदुःखें. ॥ १३ ॥ ब्रह्महत्येचा कळंक । विषयसुखाचें वियोगदुःख । उभयलोकीं न दिसे सुख । विश्रांतीचें मज आतां. ॥१४॥ पाचारूनि उभय [12]वनिता । त्यांप्रती सांगे दुःखवार्ता, । 'मृगयापापें अनर्था । [13]आतुडलों मी येकाळीं.॥१५॥आतां राज्य पाहिजे कवणा ? ।

---

१. हा मृग मुनिपुत्र होता व स्वतः मृगरूप धरून मृगीरूपधारिणी स्वस्त्रियेशीं रत झाला होता. २. खिन्नचित्त. ३. नियम, आचारमार्ग. ४. अगस्त्य मुनीनें सत्र केलें तेव्हां सर्व आरण्यक मृगांची मृगया करून प्रोक्षणविधि केला. यावरून मृगया करण्यास प्रमाणभूत वेदाचा आधार आहे असें म्हणण्याचें तात्पर्य. (अध्याय ११८ श्लोक १४-१५.) ५. मृग. ६. स्त्री. ७. झालों. ८. याप्रमाणें बोलून. ९. अध्याय ११८ श्लोक ३१-३२ पहा. १०. याचा कर्ता 'प्राण' आणि कर्म 'देह'. ११. ग्रस्त झाला; आकळणें=व्यापणें, ग्रासणें. १२. स्त्रिया (कुंती आणि माद्री). १३. प्राप्त झालों.

कवण इच्छी वस्त्राभरणा ? । कासयालागीं अंगना ? । तुम्हांऐशा माझ्यासवें.॥ १६ ॥ हा ! तव व्यर्थ गेला जन्म । कोठें न दिसे सुखविश्राम । ब्रह्मज्ञानी बोलती ब्रह्म । आनंदरूप म्हणोनी. ॥ १७ ॥ परी तें आतुडे कवणे युक्तीं । ज्ञानसाधन कैंचे ग्रंथीं । इंद्रियें घालिती अनर्थीं । मरणभया विसरोनी. ॥ १८ ॥ आतां तुम्हीं नगराप्रती । जावें जेथें सत्यवती । अंबिका अंबालिका सती । तयासंगीं असावें. ॥ १९ ॥ भीष्म विदुर ज्ञानमूर्ती । आयुष्य वेचावें त्यांचिये भक्तीं, । व्यर्थ माझिये संगतीं । काज नाहीं यावया. ॥ २० ॥ मी प्रवेशेन महावनीं । प्राण त्यजीन देहदंडणीं. । परलोकीं सुखाचे सदनीं । बैसेन ऐसें करीन. ॥ २१ ॥ करीन षड्रिपुवर्गांचा त्याग । धरीन वैराग्य, साधूंचा संग, । क्षुधेतृषेच्याही पांगीं । पडों नेदीं सर्वथा. ॥ २२ ॥ पंचरात्रसप्तरात्रें । शरीर रक्षीन जळआहारें । मन आकळूनि योगाधारें । परतत्त्वातें साधीन.' ॥ २३ ॥ विनीत होवोनि विनविती वनिता । म्हणती ऐकें, 'प्राणनाथा ! । पुरुषसंगीं पुरुष असतां । कामविकार कोणातें. ॥ २४ ॥ दारा भ्रतार हे भावना । आठव आठऊं नेदीं मना. । शिष्यत्व अंगीकारूनि चरणा । समीप असूं निष्काम. ॥ २५ ॥ जितेंद्रियत्वनेमें राया ! । सेवेनें सार्थ करूं काया, । तुझियाऐसी तपश्चर्या । तीव्र आम्हीं आचरों. ॥ २६ ॥ तेणें परलोकीं निजांगें । सुख पावूं तुझे संगें, । दूरी दवडितां वियोगें । प्राण त्यागूं तात्काळीं.' ॥ २७ ॥ परिसोनि त्यांचीं निश्चयोत्तरें । निकें मानिलें पुरुषेश्वरें । नटामाजी नारीनरें । त्या भावना स्वीकारी. ॥ २८ ॥ ब्राह्मण होकारले वचनें । निजांगींचीं वस्त्राभरणें । वांटिलीं जैसीं फळें सुमनें । वृक्ष ओपी पांथिकां. ॥ २९ ॥ चूडारत्न मणिकुंडलें । पदकमाळा कटिमेखळें । बाहुअंगदें अमोलें । वीरकंकणें मुद्रिका. ॥ ३० ॥ विप्रां ओपोनि उदारें । अंगीं वेढिलीं वल्कलांबरें. । हें देखोनि परमादरें । कुंती माद्री उभयतां. ॥ ३१ ॥ पाचारूनि ऋषीश्वर । तयां वांटिले अळंकार । भूर्जें वेढोनि समोर । कर जोडोनि राहिल्या. ॥ ३२ ॥ अवलोकोनि राजपरिवार । आज्ञा करी राजेश्वर । 'नगरा जावोनि समाचार । धृतराष्ट्रातें आणवा. ॥ ३३ ॥ त्यागूनियां सर्वस्वातें । पांडु गेला वनवासातें. । तुम्हीं सांभाळावें राज्यातें । मना

१. आभरण=अलंकार. २. सांपडे, मिळे. ३. काम मोह मद लोभ मत्सर क्रोध या षड्रिपूंचा. ४. संकट, अडचण, दाती. ५. परब्रह्मातें. ६. नम्र. ७. ऐक. ८. अध्याय ११९ श्लोक २७-३० पहा. ९. होकारिले. १०. पुष्पें. ११. अध्याय ११९ श्लोक ३८-४१ पहा. १२. वल्कलें. 'भूर्जे त्वम्गुरु स्त्री' इत्यमरः. १३. सेवकगण.

मानेल ते रिती.' ॥ ३४ ॥ रोदन करीत राजेश्वरा । संगिये पातले हस्तिनापुरा । जाणविलें गंगाकुमरा । प्रज्ञाचक्षू[1] नृपातें. ॥ ३५ ॥ 'सांडोनि राज्याची वासना । पांडु प्रवेशला कानना[2]' । ऐकोनि धृतराष्ट्राच्या मना । शोक अद्भुत तावरे. ॥ ३६ ॥ शोकें संतप्त अंबालिका, । भीष्महीं पात्र झाला शोका, । असो. पुढें वर्तलें तें ऐका । पांडुकडे काननीं. ॥ ३७ ॥ राजसंबंधी सुहृद्वर्ग । त्याचा सांडोनियां संग । स्मरणेंसीं विषयभोग । वांतिप्राय मानिला. ॥ ३८ ॥ सेवेसि घेऊनि उभय पत्नी । जटाधारी वल्कलवसनी । कंदमूळफळसेवनी । महारण्यीं प्रवेशला. ॥ ३९ ॥ अवघड क्रमूनियां पंथ । महा विशाळ गिरी शोभत । ओलांडूनि चैत्ररथ । महावन टाकिलें. ॥ ४० ॥ ते भूमी सांडोनि माघारीं । वाट काढिली पुढारीं । काळकूटगिरीशिखरीं । दारांसहित वळंघला[3]. ॥ ४१ ॥ अवलोकोनि पवित्र स्थळ । पुढारां गेला भूपाळ, । तंव देखिला हिमाचळ । रत्नशिखरीं मंडित. ॥ ४२ ॥ हिमालयाचेनि परिसरें[4] । सिद्धाश्रम गुहा गव्हरें । हिमोदकाचीं[5] कासारें[6] । स्फटिक तैसीं भासती. ॥ ४३ ॥ हिरेकनकाचें वाळवंट । स्वच्छ सोमकांती निघोट । माजी जान्हवीजळाचे लोट । दुग्धवर्ण भासती. ॥ ४४ ॥ तेथेंही तापसांचा मेळ । दृष्टीं देखिला निर्मळ । ज्याचेनि दर्शनें तात्काळ । चित्तशुद्धी पापिया. ॥ ४५ ॥ तेथोनि पुढां अतिशोभित । गंधमादन पर्वत । जेथें औषधी अमृतभरित । महाभूतीं रक्षिल्या. ॥ ४६ ॥ परमसिद्ध ऋषी वसती । त्यातें नमस्कारोनि परमभक्ती । पांडु माद्रीसहित कुंती । पुढतीं पुढां चालिले. ॥ ४७ ॥ इंद्रद्युम्न सरोवर । दृष्टीं देखिलें मनोहर । हंसकूट लंघूनि वीर । शतशृंगा पातला. ॥ ४८ ॥ तो शतशृंग पवित्रनामा । मंडित ऋषीसिद्धाश्रमा । लगटला स्वर्गाचिये सीमा । अत्यंत जवळ भासत. ॥ ४९ ॥ जांबूनदाहूनि श्रीरंग । आदळीहूनि मुख्य प्रयाग । तैसा गिरी शतशृंग । समीप देखे स्वर्गातें. ॥ ५० ॥ श्रवणीं पडिलें गंधर्वगाणें । दृष्टीं भासती सुरविमानें । कुबेराचीं क्रीडास्थानें । अतिरमणीक शोभती. ॥ ५१ ॥ ताम्ररजतसुवर्णभूमिका । पद्मराग पाषाण देखा । चिंतारत्नसरोवरवापिका[9] । मठ मंडप उभविले. ॥ ५२ ॥ यक्ष चारणगण गंधर्व[10] । विद्याधर किंनर देव । देवांगनासहित सर्व । स्वेच्छानंदें क्रीडती. ॥ ५३ ॥ शतशृंगगिरिपरिसरीं । काननें लागलीं चौफेरी । वृक्ष

---

१. धृतराष्ट्रातें. २. वना. ३. चढला. ४. आसंमतात्द्वारीं. ५. थंड उदकाचीं. ६. सरोवरें. ७. जाई. ८. अध्याय ११९ श्लोक ४९ पहा. ९. चिंतामणिरत्नखचित सरोवरें व विहिरी (त्याचे ठायीं.) १०. हे देवांशक होत म्हणून यांस 'देवयोनि' असें नांव आहे.

लविन्नले फळसंभारीं । तृप्ती देती परिमळें. ॥ ९४ ॥ पर्वतनितंबाहूनि देखा। सरिता वाहती अधोमुखा, । जैशा मेखळे पल्लव सडका । गजाननातें शोभती. ॥ ९५ ॥ तेथें वसती बहु तापस । योगसिद्ध परमपुरुष । राजा देखोनि संतोष । समस्तांतें सारिखा. ॥ ९६ ॥ एकीं भाविला परम मित्र, । एकीं बंधु सहोदरू, । एक म्हणती जैसा कुमरू । तैसा आम्हां आवडे. ॥ ९७ ॥ तया ऋषींचिया संगतीं । राजा करूनि राहिला वसती. । उभय वनिता अहोराती । सेवासुखें वर्तती. ॥ ९८ ॥ उभयकाळीं देवोनि होम । अरण्यफळीं अतिउत्तम । आधीं पूजनाचा नेम । सारूनियां फळआहारी. ॥ ९९ ॥ ऋषी मानिती चमत्कार । तैसेंच आचरे तप खडतर । तपस्वी म्हणती, 'महाथोर । ब्रह्मऋषीसारिखा.' ॥ ६० ॥ जोडोनि तपाची संपत्ती । सहदेहें जावें स्वर्गाप्रती । ऐसी भावना धरूनि चित्तीं । महातपें तपिन्नला. ॥ ६१ ॥ एके दिवसीं ऋषीश्वर । चढतां पर्वताचें शिखर । ऊर्ध्वशून्याचेनि समोर । अवलोकित चालिले. ॥ ६२ ॥ शतशृंगाचिये शिखरीं । प्रवेश केला स्वर्गद्वारीं । वरील स्वर्गाची पायरी । दिसे स्वर्गा जातिया. ॥ ६३ ॥ तया ऋषींच्यानि सांगातें । पांडु चढला ऊर्ध्वपंथें । तपोधनीं वारिला हातें । म्हणती, 'राहें राजया ! ॥ ६४ ॥ येथोनि पुढां कठीण पंथू । न चले दुजयाचा सांगातू । निर्मळसुकृताचा हेतू । धरूनि येती धर्मात्मे. ॥ ६५ ॥ मनपवनाची कुंठित गती । पक्षी जावों न शके पंथीं । दारांसहित राजनृपती ! । येऊं पाहसी केउता ? ॥ ६६ ॥ येथें पुण्यचि एक एकलें । निर्मळ भावें होय जोडिलें । तरीच होय चालतां भलें । येरा येतां अवघड. ॥ ६७ ॥ ऊर्ध्वरेते महायोगी । अथवा संग्राममहायागीं । शरीर होमिती त्यां या मार्गी । चालावया अधिकार. ॥ ६८ ॥ यावेगळे दारावंत । गृहस्थ जे कां स्वधर्मनिरत । तेही जोडूनि शुद्ध सुकृत । येतां उपाय एकची. ॥ ६९ ॥ तोही

१. पर्वताच्या कड्यापासून. २. एका उदरांत उत्पन्न झालेला. ३. अध्याय १२० श्लोक ३ पहा. ४. वांछा. ५. अमावास्येच्या दिवशीं. (अध्याय १२० श्लोक ५.) ६. अर्धशून्य, मध्यशून्य, ऊर्ध्वशून्य आणि निःशून्य अशीं शून्यें चार प्रकारचीं आहेत. शून्य=आकाश. ७. पुण्याचा. ८. ब्रह्मचारी. [ऊर्ध्वं ऊर्ध्वगं नाधःपतत् रेतो यस्य स ऊर्ध्वरेता=ज्याचें रेत खालीं पतन पावत नाहीं तो, आमरण ब्रह्मचर्यव्रत पाळणारा साधु.] ९. युद्धरूप यज्ञांत.

उपाय म्हणसी कवण । जेथें खंडती चत्वारी ऋण । संतती वर्ते पवित्र जन । सुखें येती या ठाया. ॥ ७० ॥ देवऋणी मनुष्यऋणी । पितृऋणी ऋषींचा ऋणी । जो मुक्त झाला चहूं ऋणीं । तया निर्विघ्न हा पंथ. ॥ ७१ ॥ चहूं ऋणापासूनि मुक्त । प्रवेश स्वर्गीं दारांसहित । येरा लोटिती देवदूत । दंडप्रहारें माघारें. ॥ ७२ ॥ यज्ञीं परिहार देवऋणा । स्वाध्यायतपें ऋषींच्या ऋणा । पितृश्राद्धादि गयावर्जना । पासुनी अनृणी होतसे. ॥ ७३ ॥ अहिंसाभूतदया गुणीं । प्राणी सुटे मनुष्यऋणी । ऐसी हे साधन करणी । जाणती एक जाणते. ॥ ७४ ॥ देवऋण मनुष्यऋण । फेडोनि झालासी उत्तीर्ण । न सरे पितृऋण संततीवीण । यालागीं येथें आशंका. ॥ ७५ ॥ संततिवंत जो सुकृती । तोचि सरता इये पंथीं । येराची येथें नचले गती । कोटीसाधनें कष्टतां. ॥ ७६ ॥ अनेक प्रकारांचिया उपायीं । संतति वाढवी स्त्रियांचे ठायीं । मृगशापाच्या शस्त्रघायीं । शरीर चुकवीं आपुलें. ॥ ७७ ॥ ज्यापरी कृष्णद्वैपायन । तुमच्या जन्मासी कारण । तैसा प्रार्थोनि तपोधन । संतति श्रेष्ठ संपादीं.' ॥ ७८ ॥ ऐसें परिसोनियां तेथ । पांडु दुःखशोकें संतप्त, । नमस्कारूनि ऋषी समस्त । स्त्रियांसहित परतला. ॥ ७९ ॥ बैसोनियां निर्जनस्थानीं । पाचारिली ज्येष्ठ पत्नी । तीप्रति बोले सखेदवचनीं, । 'विचार परिसें पवित्रे ! ॥ ८० ॥ अपवित्र वंध्यात्वदोष देख । साधनें केलीं नपुंसक, । उभयलोकीं न दिसे सुख । आम्हां तुम्हां निर्धारीं. ॥८१॥ सत्यवतीये करूनि यत्न । विचित्रवीर्य क्षेत्रीं जाण । प्रार्थोनि कृष्णद्वैपायन । पुत्रां आम्हां जन्मविलें. ॥ ८२ ॥ वल्लभे ! तुवां तयाचिपरी । ऋषेश्वरवीर्यें आपुले उदरीं । संतती वाढविसी जरी । तरीच सार्थक जन्माचें. ॥ ८३ ॥ न धरूनि आशंका अंतरीं । माझी आज्ञा घेऊनि शिरीं । पुत्र जन्मवीं स्वउदरीं । ब्रह्मवीर्यें सर्वज्ञे ! ॥८४॥ संततीहीनाचीं साधनें । सर्वही व्यर्थ जाणावीं मनें । जैसीं वांजवृक्षाचीं सुमनें । निर्फळ भारें लविन्नलीं. ॥ ८५ ॥ पुत्राचेनि बळें जनक ।

---

१. 'जायमानो वै ब्राह्मणस्त्रिभिर्ऋणवा जायते ब्रह्मचर्येणर्षिभ्यः यज्ञेन देवेभ्यः प्रजया पितृभ्यः', 'एष वानृणः यः पुत्री यज्वा ब्रह्मचारिवासी' इत्यादि वचनांवरून ऋषींचें ऋण, देवांचें ऋण आणि पितरांचें ऋण अशा तीन ऋणांचा बोध होतो व याच तिन्हीं ऋणांचा उल्लेख वारंवार आढळतो. (रघुवंश सर्ग ८ श्लोक ३०.) शास्त्राध्ययनानें ऋषींचें, यज्ञानें देवाचें, पुत्रोत्पादनानें पितरांचें ऋण फिटतें असें वर्णन प्राचीन ग्रंथांत आहे. महाभारतांत (आदिपर्व अध्याय १२०, श्लोक १६-२०.) चार ऋणांचा निर्देश घेतला आहे. चवथें ऋण मनुष्यांचें, ते आनृशंस्यानें (दयालुपणानें) फिटतें. [यज्ञैस्तु देवान् प्रीणाति स्वाध्यायतपसा मुनीन् । पुत्रैः श्राद्धैः पितृंश्चापि आनृशंस्येन मानवान् ॥' अध्याय १२० श्लोक १८ पहा.] २. पुण्यवान्. ३. व्यास. ४. पुष्पें.

स्वइच्छा भोगी स्वर्गलोक । ऐसें बोलती मन्वादिक । स्मृतिकर्ते ग्रंथार्थीं. ॥८६॥ अनेक प्रकारींचे कुमर । ग्रंथीं बोलती ग्रंथकार । उत्तम मध्यम हा विचार । तूं जाणसी सुजाणे ! ॥ ८७ ॥ प्रथम जाण [1]स्वयंजात । दुजा [2]प्रणीत [3]परिक्रीत । [4]पौनर्भव चौथा सुत । [5]कानीन तो पांचवा. ॥ ८८ ॥ [6]स्वैरिणीपासोनि जो जन्मला । तो [7]षष्ठ पुत्र बोलिला । [8]बंधुदायादत्वें वहिला । पितृधना विभागी. ॥ ८९ ॥ प्रथम [9]दत्त [10]क्रीत । कृत्रिम [11]उपागच्छक स्वयेंचि होत । [12]सहोढ आणि [13]शौतिरेत । [14]हीनयोनी संभवीजे. ॥ ९० ॥ ऐसिया नामाचे नंदन । एकाहूनि एक हीन । यांत वडील श्रेष्ठमान । [15]वीर्यजात [16]स्वक्षेत्रीं. ॥ ९१ ॥ स्वकीयवीर्यें अतिपवित्र । जो कां प्रसवे [17]निजकलत्र । तो पुत्रांमाजि श्रेष्ठ पुत्र । मन्वादीक बोलती. ॥ ९२ ॥ [18]देवरापासोनि संतती । [19]आपद्धर्म बोलती ग्रंथीं,। उत्तम पुत्राचे पंक्ती । मान त्यातें निर्धारें. ॥ ९३ ॥ असा स्वक्षेत्रीं जन्मला । [20]अन्यवीर्य जरी झाला, । तरी पुत्रत्वीं बोलिला । [21]गतिप्रद वडिलांतें. ॥ ९४ ॥ याचविषयीं स्वल्प [22]कहाणी । इतिहास ऐकें आपुले श्रवणीं । नाम शारदं[23]डायिनी । वीरपत्नी पवित्रा. ॥ ९५ ॥ तुझिये ऐसी संततिहीन । गुरुभ्रतारआज्ञेवरून । [24]पुंसवनीं मंगळस्नान । होम देऊनि [25]हुताशीं. ॥ ९६ ॥ [26]चतुष्पथीं पवित्र रात्रीं । श्रेष्ठ ब्राह्मण प्रार्थूनि भक्ती । शरीरदानें विवेकमूर्ती । पुत्रत्रय प्रसवली. ॥ ९७ ॥

---

१. स्वस्त्रीच्या ठायीं स्ववीर्यापासून झालेला. (अध्याय १२० श्लोक ३०-३६). २. स्वस्त्रीच्या ठायीं उत्तम पुरुषाच्या अनुग्रहापासून झालेला. ३. परपुरुषास रेतोमूल्य देऊन त्याजपासून स्वस्त्रीच्या ठायीं झालेला. ४. एक कन्या पूर्वी विवाहित असून नंतर तिचा दुसऱ्याशीं विवाह झाला, तिच्या ठायीं दुसऱ्या नवऱ्यापासून झालेला. ५. कन्यापणीं झालेला. ६. जारिणीपासून झालेला. ७. या सहाव्या पुत्रास 'कुंड' असें नांव आहे. विवाहित स्त्री स्वैरिणी झाल्यावर तिच्या ठायीं श्रेष्ठ पुरुषापासून झालेला तो कुंड होय. ८. हे सहा पुत्र बंधुदायाद होत. हे पितृधन घेण्यास योग्य होत. ९. मातापितरांनीं समर्पित. १०. धनादिक देऊन विकत घेतलेला. ११. तिसरा कृत्रिम, आपण स्वतः जवळ येऊन मी तुमचा पुत्र होतो असा झालेला. १२. ज्याची माता गर्भवती असतां तिचा विवाह होऊन जो तिजपासून झाला तो सहोढ. १३. पांच सात बंधु अपुत्रिक असतां कोणे एकास झालेला व ज्याचे योगें सकळ भ्राते पुत्रवंत होतात तो. १४. हीन योनींच्या ठायीं झालेला. १५. स्ववीर्यापासून स्वस्त्रीच्या ठायीं झालेला. १६. स्वस्त्रीच्या ठायीं. १७. स्वकीय स्त्री. १८. दिरापासून. १९. नियोगधर्म. [देवराद्वा सपिंडाद्वा स्त्रिया सम्यङ्नियुक्तया । प्रजेप्सिताधिगंतव्या संतानस्य परिक्षये ।।' मनुस्मृति-अध्याय ६ श्लोक ५९ पहा.] २०. अन्यरेतोज. २१. स्वर्गगति देणारा. २२. गोष्ट. २३. शारदंयाइनीची भार्या. २४. स्त्रीस गर्भ राहिल्यावर दुसऱ्या अथवा तिसऱ्या मासांत गर्भास पुंस्त्वप्राप्ति व्हावी म्हणून जो विधि करतात त्यास 'पुंसवन' 'म्हणतात. २५. अग्नींत. २६. चवाठ्यांत.

ते दुर्जयादिक महारथी । जन्मले जाण पां निश्चिंती[1]. । तैसा तूंही ब्राह्मण प्रार्थी । संतानार्थ ममाज्ञा.' ॥ ९८ ॥ कुंती म्हणे, 'कुरुभूषणा! । हें न रुचे माझिया मना, । तुवां ओपून वीर्यदाना । श्लाघ्य[2] आम्हां करावें. ॥ ९९ ॥ येचविषयीं प्राणनाथा! । पुराणीं ऐकिली जीर्ण[3] कथा । ते मी सांगेन दृष्टांता । यालागीं परिसें भूपती! ॥ १०० ॥ व्युषिताश्व चक्रवर्ती । भद्रा नामें तयाची सती, । पतिव्रता अहोरातीं । स्वामिसेवे सादर. ॥ १०१ ॥ व्युषिताश्व प्रतापरवी । जिंकोनि सागरांत पैंदवी[4] । पुण्य जोडिलें जें देवीं । गाइजेतें स्ववाचा. ॥ १०२ ॥ नागायुतबळसंपत्ती । न्यायें रक्षिली धर्ममूर्ती, । धेनुविप्रपक्षपाती[5] । दुष्टदमनीं कृतांत[6]. ॥ १०३ ॥ अश्वमेध सोमयाग । अपार संपादिले सांग, । दानमेघोदकें मार्ग । याचकांचे मोडिले. ॥ १०४ ॥ भद्रा सुंदर पतिव्रता । तारुण्यकाळ प्राप्त होतां । संततिकामनेची लता । हृदयीं वाढों लागली.॥ १०५॥ तेचिकाळीं अकस्मात । क्षयरोगें[7] झाला अंत । मृत्युव्याघ्रें चपेटहात[8] । मारूनि प्राण घेतला. ॥ १०६ ॥ प्रेत आलिंगूनि देख । भद्रा करी दीर्घ शोक, । म्हणे, 'प्राणेश्वरा! दुःख । वैधव्याचें न सोसवे. ॥ १०७ ॥ पुत्रहीन पुरुषहीन । ते संसारीं नाहींच जाण । अमंगळा समसमान । विघ्न दृष्टीं जगातें. ॥ १०८ ॥ वंध्यात्व आणी विधवात्व । तेंचि नारीतें प्रेतत्व । तींहीं रक्षावया जीवित्व । कारण कांहीं असेना. ॥ १०९॥ कृपा करूनि प्राणनाथें । मजही न्यावें जी सांगातें.'[9] । हें ऐकोनि देहांतीतें[10] । वायुरूपें बोलिला. ॥ ११० ॥ जयापरी आकाशवाणी । नैथझोटिंगमुखींची[11] वाणी । तैसा आश्वासनाचा कानीं । शब्द पडिला प्रत्यक्ष. ॥ १११॥ 'शोक न करीं वो! पवित्रे! । तुज मी फळेन सुपुत्रें । सांगेन तया उपदेशमंत्रें । वर्तणूक करावी. ॥ ११२ ॥ अष्टमीचतुर्दशींत जाण । प्रेतसंगीं करावें शयन । इतुकेनि तुझी कामना पूर्ण[12] । वरें होईल माझिया.' ॥ ११३ ॥ सांगीतलें त्यारिती । शवासहीत पहुडली[13] सती, । प्रेतसंगीं गर्भवती । सप्तवेळां ते झाली. ॥ ११४ ॥ तीन शाल्व, चौवारि[14] मद्रां । पुत्रां प्रसवली ते भद्रा. । कुरुकुळकुमुद्वतीचंद्रा[15] ! । चरित्र ग्रंथीं ऐकिजे.

---

१. अध्याय १२० श्लोक ३८-४१पहा. २. प्रशंसापात्र, धन्य. ३. जुनी, पौराणिकी. ४. 'पृथ्वी' असाही पाठ आहे. ५. गोब्राह्मणप्रतिपालक. ६. काळ. ७. यक्ष्मरोगें. ८. वेगाचा हात. चपेट=अभिघात. ९. अध्याय १२१ श्लोक २०-२३ पहा. १०. देहव्यतिरिक्तें. ११. पिशाचमुखींची. १२. श्लोक ३२-३५ पहा. (अध्याय १२१.) १३. निजली. १४. चार. १५. कौरवकुळरूप कमळिणीच्या चंद्रा (पांडो).

॥ ११५ ॥ संरक्षोनि विहिताचार[1] । राहविजेतो श्रेष्ठ विचार । उपदेशोनि कौलिकाचार[2] । केंवि मातें करविशी ? ॥ ११६ ॥ जितां अथवा मेलिया जाण । करावें तुझेंचि आराधन, । भाळीं असेल तें आपण । फळ देईल स्वभावें'. ॥ ११७ ॥ पांडु म्हणे, 'वो ! प्राणेश्वरी ! । अर्थ बोलसी सत्योत्तरीं । मृगशापाच्या कारागारीं[3] । काम माझा शिरकला. ॥ ११८ ॥ तो सुटावया नाहीं यत्न । यालागीं मानी माझें वचन । ब्रह्मवीर्य सुसंतान । आपद्धर्म बोलिजे. ॥ ११९ ॥ आणीक ऐकें निरूपण । ब्रह्मयानें सृजिले वर्णावर्ण । तैं स्त्रियांतें सुखमैथुन । मुक्त केलें स्ववर्णीं. ॥ १२० ॥ मागील युगाच्या अवसरीं । स्वेच्छाचारें वर्तती नारी । धेनुवृषभाचिये परी । संततिदानीं भलताही. ॥ १२१ ॥ तो आचार अद्यापवरी । उत्तरदक्षिणेमाझारीं । वर्तत असे लोकाचारीं । कुरुपांचाळदेशीं[4] मल्याळीं. ॥ १२२ ॥ पुढें विभांडकाचा पौत्रें[5] । उद्दालकाचा ज्येष्ठ पुत्र । श्वेतकेतु ऋषी पवित्र । तपोतेजें तेजस्वी. ॥ १२३ ॥ तेणें वदोनि शापशब्दा । केली येलोकीं मर्यादा । तैंपासूनि पुरुषप्रमदा[6] । नेमें वर्तों लागलीं. ॥ १२४ ॥ पुत्रभ्रतारादेखतां । उद्दालकाची सुरूप वनिता[7] । ब्राह्मणें बलात्कारें नेतां । मैथुनार्थ कामिका. ॥ १२५ ॥ ते सशोकें क्षुधापीडित । नांगीकारी, झुरडी हात, । येरू ताडण करीत नेत । धेनूसि व्याघ्र ज्यापरी. ॥ १२६ ॥ हें देखोनि ऋषीचा कुमर । कोपें कोपला वैश्वानर[8]. । पिता म्हणे, 'स्थीर स्थीर । शांत होई सात्विका ! ॥ १२७ ॥ संतानधर्माचिया राहाटी[9] । नेमूनि गेला परमेष्ठी[10], । तूं कां हृदय करिसी कष्टी । अवलंबोनि कोपातें ? ॥ १२८ ॥ विधिवेदाचिया वचना । आचार प्रमाण या जना, । तुवां कोप केलिया जाणा । मार्ग मोडे सांग पां ?' ॥ १२९ ॥ आयकोनि उद्दालकाची वाणी । पुत्र कोपला चौगुणी; । म्हणे, 'चळला पद्मयोनी । विवेकशून्य चौतोंड्या. ॥ १३० ॥ वंशज[11] होय कर्दमाचा[12] । पंकावली[13] त्याची वाचा । म्हणोनियां कश्मलाचा[14] । प्रचार केला लौकिकीं. ॥ १३१ ॥ कन्यागमनिया[15] पापिष्ठा । कोणें दिधली प्रतिष्ठा । भ्रष्टाचार प्रमाण भ्रष्टा, । मान्य श्रेष्ठा तो नव्हे. ॥ १३२ ॥ जो अमार्गी लावी लोक । तो तंव मूर्खांचा

---

१. उचित आचरण. २. दुष्कर्माचार, शाक्ताचार. ३. कारा=तुरुंग; अगार=गृह. ४. अध्याय १२२ श्लोक ७-८ पहा. ५. पुत्राचा पुत्र, नातू. ६. पुरुष आणि स्त्रिया. ७. स्त्री. ८. अग्नि. ९. वर्तन, वर्तणूक. १०. ब्रह्मदेव. ११. गोत्रज. १२. कमळ हें चिखलापासून उत्पन्न होतें. ब्रह्मदेव कमलांतून झाला म्हणून चिखलाचा वंशज हें निंदाव्यंजक विशेषण दिलें. १३. चिखलयुक्त झाली. १४. मोहाचा. १५. सरस्वती ही विधात्याची कन्या. तिचें रूप पाहून त्याला मोह पडला व त्यानें तिच्याशीं दुष्कर्म केलें अशी कथा आहे.

नायक, । सृष्टिरचनें अविवेक । अपार दृष्टी देखिजे. ॥ १३३ ॥ राज्यीं स्थापिले वर्णहीन । भिक्षेसि लाविले ब्राह्मण, । ऐसियाचीं वचनें कोण । मान्य करील सांग पां? ॥ १३४ ॥ मिथ्यास्वर्गसुखाची आर्ती । पशु मारवी ब्राह्मणाहातीं. । तया हिंसकाची युक्ती । ठेवी नावेक[1] परौती[2]. ॥ १३५ ॥ अनाचार वदला वेद । तोही जाण विवेक[3]मंद । निषेधपथें लोक अंध । जेणें नरकीं लोटिले. ॥ १३६ ॥ आजिपासूनि परके पुरुषें । परस्त्री लक्षितां अभिलाषें । मैथुन चुंबन अंगस्पर्शें । अनुमोदन भोगइच्छा. ॥ १३७ ॥ सुयोनीं कुयोनीं परक्षेत्रीं । जो बीज टाकी अविचारी । तो म्यां दिधला दोषकरीं । दंडावया सुबद्धा. ॥ १३८ ॥ साठीसहस्रवर्षेंवरी । यातना भोगूनि नरकीं घोरीं । अपकीर्ति घेऊन शिरीं । हाणी पावे सर्वस्वें ॥ १३९ ॥ पतिव्रता वर्ते जी नारी । तिसी मान्यता चराचरीं । उमेरमेच्चिये सैरी[4] । अक्षय लोकीं सुख भोगी. ॥ १४० ॥ जितेंद्रिय सदाचारी । जननीसमान ज्या परनारी । तोही हरिहरांचे सरी । मान्य होय सुरवरां. ॥ १४१ ॥ चहूं[5]वर्णांचिया नारी । एकें पुरुषें न वराव्या घरीं । हेंही नचले लोकाचारीं । लोपतील मद्वाक्यें. ॥ १४२ ॥ ममाज्ञा हेचि अलोट[6] सीमा । भंगूं न शके वेदब्रह्मा । तया श्वेतकेतूचिया नेमा । अद्यापी लोकीं पाळिजे. ॥ १४३ ॥ असो. हे सांप्रत रचिली रहाटी । परंतु आपद्धर्म संकटीं । उपाय बोलिलासे श्रेष्ठीं । तो तुवां प्रस्तुत करावा. ॥ १४४ ॥ सूर्यवंशीं सौदास नृपती । अंगना तयाची मदयंती । उपदेशोनि वसिष्ठाप्रती । पाठविली शयनार्थ. ॥ १४५ ॥ त्याचेनि वीर्यें जन्मला कुमर । अश्मकनामा वंशधर । प्रस्तुत हा श्रेष्ठाचार । प्रमाण तुवां करावा. ॥ १४६ ॥ आतां न बोलावें बहुसाल युक्तीं । संशय दवडूनि चित्तीं । माझें वचन मान प्रीतीं । संतान करीं ऋषिवीर्यें.' ॥ १४७ ॥ कुंती म्हणे, 'ऐक भावार्थ । प्रगटूं नये निज गुह्यार्थ । तथापि संकटहरणार्थ । रहस्य[7] लागे बोलणें. ॥ १४८ ॥ कुमारीदशा नव्हतां लग्न । [8]तातसदनीं सुखसंपन्न । असतां पित्याचें आज्ञावचन । होतें झालें मजप्रती. ॥ १४९ ॥ अतिथींचें आतिथ्य करणें । वसनें धनें भोजनपानें । तोषवूनि प्रसाद घेणें । आशीर्वाद तयांचा. ॥ १५० ॥ तेथें दुर्वासा वेदमूर्ती । वस्तीस पातला सहजगती । तो म्यां तोषविला भक्ती । प्रसन्न झाला कृपाळू.

---

१. क्षणभर. २. दूर. ३. विचारशून्य. ४. बरोबरी. ५. ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्र आणि वैश्य या चार वर्णांच्या. ६. अलंघनीय. ७. गुप्त गोष्ट. ८. अध्याय १२२ श्लोक ३३-३९ पहा.

॥ १५१ ॥ तेणें बीजाक्षरपूर्वक । दिधलें मंत्रांचें पंचक । [1]अभिचारयुक्त तात्काळीक । फळ देतील उच्चारें. ॥ १५२ ॥ येणें मंत्रें गुणैकराशी । जें जें दैवत आव्हानिसी । तें तें येऊनि शीघ्रगतीसी । फळ देईल पुत्राचें. ॥ १५३ ॥ सत्य मिथ्या हे [2]प्रतीती । पहावया स्मरला [3]गभस्ती । तेणें येऊनि शीघ्रगती । वीर्यप्रसाद ओपिला. ॥ १५४ ॥ सूर्यवीर्यें लावण्यमूर्ती । कर्ण जन्मला उदारकीर्ती । लोकशंकाभयें नृपती । गंगाजळीं टाकिला. ॥ १५५ ॥ राधावल्लभ किरातकुळीं । पुत्रस्नेहें त्या प्रतिपाळी । तो राधेय धनुर्धर बळी । तया घरीं वाढत. ॥ १५६ ॥ जाणोनि पुढील भविष्यातें । मंत्रपंचक ओपिलें मातें. । ऐसें आतां जाणावें चित्तें । येणें काळें यथार्थ. ॥ १५७ ॥ अनुष्ठिले मंत्र चारी । ते मी जपेन हृदयांतरीं । अभय देसील आपुले करीं । आणी आज्ञा स्वमुखें. ॥ १५८ ॥ तरी मी जपोनि तात्काळिक । दावीन दिव्य पुत्रांचें मुख । श्रवणें पांडु पावला सुख । तें नाकळे दृष्टांतें. ॥ १५९ ॥ हृदयीं प्रेमें आलिंगूनी । पाठी [4]सुखसंभ्रमें थापटोनी । म्हणे, 'मी आज संसारश्रमापासूनी । सुटलों जाण यथार्थ. ॥ १६० ॥ आजी [5]अदृष्टरेखा नीट । झाली ईश्वरकृपें प्रगट । संत महंत सेविले श्रेष्ठ । तें पुण्य फळे यारूपें. ॥ १६१ ॥ दरिद्री [6]अटतां पृथ्वीआंतु । दृष्टी न पडे लोहधातु । त्यासी कनकाचा पर्वतु । गृहांगणीं सांपडला. ॥ १६२ ॥ मारवाडीं लागूनि उष्ण । प्राण जातां मागे [7]जीवन । त्यावरी तत्काळ अमृतघन । गगनाहूनि वर्षेला. ॥ १६३ ॥ तैसें संतुष्ट माझें मन । न करीं अळुमाळ [8]व्यवधान । मंत्रोच्चारीं रविनंदन । धर्मराजा [9]आव्हानीं.' ॥ १६४ ॥ येरी सारोनि गंगास्नान । वेढोनियां [10]धौतें वसन । करूनियां प्रदक्षिणा नमन । भ्रतारातें आवडी. ॥ १६५ ॥ राहोनियां [11]विजनस्थानीं । आदरें जोडोनि उभय पाणी । मंत्रोच्चारें [12]दंडपाणी । आव्हानिला समर्थ. ॥ १६६ ॥ भास्करातुल्य तो [13]भास्करी । कनकवर्ण कनकांबरी । कनककिरीट शोभे शिरीं । कनकांगदें शोभती. ॥ १६७ ॥ हस्तकीं मिरवे कनकदंड । कनककुंडलांचा जोड । पदकमाळांचा उजेड । दीन करी दिवसातें. ॥ १६८ ॥ स्मरण करितां कुरुभामिनी । पुढें सन्मुख दंडपाणी । देखतां भाळ ठेवी चरणीं । देहदाना [14]उदीत. ॥ १६९ ॥ अंगसंग

---

१. अभिचारसंयुक्त=देवताकर्षणशक्तियुक्त. २. प्रत्यय, अनुभव, खातरी. ३. सूर्य. ४. सुखानें आणि आदरानें. ५. दैवाची रेषा. ६. फिरतां. ७. उदक. ८. अंतर, प्रतिबंध. ९. अध्याय १२२ श्लोक ४०-४३ पहा. १०. धुतलेलें. ११. एकांत स्थळीं, निर्जनप्रदेशीं. १२. यमधर्म. १३. सूर्यपुत्र. (यम.) १४. उद्युक्त.

अमोघ रेत । ओपितां तात्काळ तेथ । सत्यस्वरूप सत्यव्रत । युधिष्ठिर जन्मला. ॥ १७० ॥ गगनीं गर्जे आकाशवाणी । सार्वभौम भूप हा धरणी । दयाशीळ सत्यवाणी । पुण्यश्लोक धर्मात्मा. ॥ १७१ ॥ सगर्भ असतां सुबळकुमरी । वर्ष एक लोटल्यावरी । धर्मराज वनगव्हरीं । कुंतीजठरीं जन्मला. ॥ १७२ ॥ तिथी वार नक्षत्र योग । शुभ करण वेळा सांग । जन्म पावला सभाग्य । सभाग्य कर्ता वंशातें. ॥ १७३ ॥ पांडु म्हणे, 'वल्लभे! इष्ट । पुत्र लाधलों क्षत्रज्येष्ठ, । रणीं श्रेष्ठबळ वरिष्ठ । द्वितीय पुत्र प्रसवें कां.' ॥ १७४ ॥ 'अवश्य' म्हणे ते यादवी । भ्रतारआनंदवनमाधवी । वायुदेवातें सादवी । बीजमंत्रेंकरूनिया. ॥ १७५ ॥ मंत्रोच्चारणें तात्काळ । प्रत्यक्ष झाला देव अनिळ, । म्हणे, 'घेईं इच्छिलें फळ । मजपासाव सभाग्ये!' ॥ १७६ ॥ सुरतानंदें अमोघ रज । कुंती-उदरीं ठेवितां बीज । पडतांक्षणीं विशाळभुज । महापुरुष निपजला. ॥१७७॥ बळत्वें आगळा महामेरू । गौरवर्ण अति सुंदरू । धैर्यबळाचा सागरू । सूर्य तैसा तेजस्वी. ॥ १७८ ॥ मातृहस्तींहूनि निष्टला । उपजत बाळ तळीं पडला । तेणें पाषाणशिळेचा झाला । चूर्णपिष्ट तात्काळीं. ॥ १७९ ॥ टाहो फोडितां बाळक । सिंहगर्जनेसारिखी हांक । ऐकोनि माता अतिसाशंक । भयें कांपे थरथरां. ॥ १८० ॥ तीस शतशृंगनिवासी । अभय देती मुनी तापसी. । म्हणती, 'जन्मला तुझिये कुशी । पुरांराती या नावें. ॥ १८१ ॥ गगनभेरी अति अद्भुत । गर्जत तैसा देवदूत । म्हणे, 'भूचर हो! समस्त । वाक्य परिसा देवांचें. ॥ १८२ ॥ कुंतीजठरीं जन्मला बाळ । दैत्यराक्षसां वै-

---

१. अध्याय १२३ श्लोक ९-६ पहा. "धर्मराजाच्या जन्माचा काल पुढील पद्यांत सांगि-
तला आहे:—ऐंद्रे चंद्रसमायुक्ते मुहूर्तेऽभिजितेऽष्टमे । दिवा मध्यगते सूर्ये तिथौ पूर्णेऽतिपूजिते
॥ ६ ॥ समृद्धयशसं प्रवरं सुतं ॥ ७ ॥ आदिपर्व–अध्याय १२३. या पद्यांचा आशय असा आहे
कीं इंद्रदेवताक नक्षत्र जें ज्येष्ठा त्या नक्षत्रीं चंद्र असतांना, आठवा जो अभिजित् मुहूर्त त्या मु-
हूर्तीं, दिवसास सूर्य मध्यान्हवृत्तावर असतांना, पूर्णा नांवाचे तिथीस कुंती धर्मराजास प्रसवली.
पंचमी, दशमी, व पूर्णिमा या तीनही तिथींस पूर्णा अशी संज्ञा असल्यामुळें वरील वचनांत तिथि
संदिग्ध आहे. तथापि अतिपूजित या विशेषणावरून ती पूर्णिमा असें घेतल्यास ज्येष्ठ महिन्यांतील
पूर्णिमेस चंद्र ज्येष्ठा नक्षत्राचे सुमारास असतो. म्हणून धर्मराजाचें जन्म ज्येष्ठ शु० १५ चे दिवशीं
ज्येष्ठा नक्षत्रावर दोन प्रहरीं झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं." २. विमलयशा. ३. सुबल
राजाची कन्या (गांधारी). ४. पतीच्या आनंदरूप वनांतील मोगरी. ५. बोलावी. ६. वायु.
७. पासून. ८. अधिक; श्रेष्ठ. ९. अध्याय १२३ श्लोक १७-१८ पहा. १०. महादेव. (त्रिपुराचा
अराति=शत्रु.)

रियां काळ, । याच्या बळा ब्रह्मांडगोळ । तुळितां उणा, अपाडे[1]. ॥ १८३ ॥ दशसहस्रकुंजरबळी । सर्प जिंतील पाताळीं । याचेनि हातें वनमाळी[2] । भार फेडील पृथ्वीचा. ॥ १८४ ॥ खणधारा घनामृतीं । वर्षे[3] शतशृंगपर्वतीं । हस्तिनापुरीं उल्कापातीं । पाषाण मेघ पाडीत. ॥ १८५ ॥ असो. वर्षानंतरें जाण । आव्हानितां देव पवन । त्याचेनि वीर्यें भीमसेन[4] । जन्म पावला यारिती. ॥ १८६ ॥ जे दिवसीं भीमसेन । वनामाजी पावला जनन । तेचदिवसीं-दुर्योधन । हस्तिनापुरीं जन्मला[5]. ॥ १८७ ॥ पुत्र अवलोकितां जाण । आवडी न पुरती उभय नयन; । पांडु म्हणे, 'धन्य धन्य । मृत्युलोकीं मी एक.' ॥ १८८ ॥ पुढती म्हणे, 'अंगने! ऐक । समस्त अमरांचा नायक । मघवा[6] भगवान् साम्यक । आराधनीं तोषवीं. ॥ १८९ ॥ वर्षपर्यंत खडतर तप । मीही आचरेन निष्पाप । तूंही नेमाचा नंदादीप[7] । व्रतस्थ होवोनि जागवीं'. ॥ १९० ॥ उभा राहोनि एक चरणीं । ऊर्ध्व जोडोनि उभय पाणी । भार्येसहित अनुष्ठानीं । वर्ष एक वर्तला. ॥ १९१ ॥ देवाधिदेव शचीरमण[8] । कृपेनें पावला सहस्रनयन[9] । म्हणे, 'मानवमानिनी! कवण । इच्छा वर्ते मानसीं?' ॥ १९२ ॥ येरी विनवी, 'त्रैलोक्यदेवा! । दाखवीं पुत्रनिधानठेवा । जो कां देवां आणी मानवां- । हूनि आगळा सर्वथा. ॥ १९३ ॥ देवकीकौसल्येचें उदर । तैसेंच मानीं माझें जठर । ऐसिये कीर्तीचा शृंगार । लेववीं मातें समर्था!' ॥ १९४ ॥ शक्र म्हणे, 'वो! शुभानने! । बोलसी त्याहूनि विशेष गुणें, । पुत्र घेई ज्याचे तुळणें । विष्णु एक उपमावा[10].' ॥ १९५ ॥ ऐसें बोलोनि परमप्रीती । आलिंगनें स्वानंदरती । संपादितां आनंदमूर्ती । नरेश्वर निपजला. ॥ १९६ ॥ द्विधा झाला इंदिरावर । एक नारायण एक नर । तो अर्जुन महावीर । कुंतीजठरीं अवतरला[11]. ॥ १९७ ॥ गंभीरगिरा आकाशवाणी । भविष्य प्रगटी जनाचे कर्णीं ।

---

१. तुलना न पावे. २. श्रीकृष्ण (वनमाला ज्याला आहे तो. 'आपादपद्मं या माला वनमालेति सा मता' इति कलिंगः; अथवा 'आजानुलंबिनी माला सर्वर्तुकुसुमोज्ज्वला । मध्ये स्थूलकदंबाढ्या वनमालेति कीर्तिता ॥'; तात्पर्यार्थ–कंठांत घातली असतां पायांपर्यंत पोंचणाऱ्या मालेला 'वनमाला' असें नांव आहे. ३. पांचही पांडव हे एकेका वर्षाचे अंतरानें जन्मले होते. (आदिपर्व–अध्याय १२४ श्लोक २२.) ४. भीमसेनाच्या जन्मकालाचा उल्लेख महाभारतांत नाहीं. ५. अध्याय १२३ श्लोक १९ पहा. ६. इंद्र. ७. नंदादीप=नंदा (आनंद)+दीप (दिवा)=देवापुढें अहोरात्र तेवत असणारा दिवा. ८. शचीचा पति–इंद्र. ९. इंद्र (पृष्ठ ६३ टीप ३ पहा.) १०. उपमेस लावावा, तोलावा. ११. अर्जुनाचे जन्म उत्तरफाल्गुनी नक्षत्रीं हिमालयाचे पठारावर झालें (विराटपर्व–अध्याय ४४ श्लोक १४.)

म्हणे, 'आश्रमवासीय मुनी । आणी भूतें परिसोत. ॥ १९८ ॥ शक्रवीर्य कुंतीकुमर । पांडवांमाजी तृतीय वीर । याचिये तुळणें झुंजार[1] । भुवनत्रयीं असेना. ॥ १९९ ॥ विशेष कार्तिकवीर्य[2] बळा । शिबीहूनि[3] दानागळा । जमदग्नि[4]तुल्य तेजाळा । प्रतापतेजें तेजस्वी. ॥ २०० ॥ खांडववन देवोनि दाना । तृप्त करील हुताशना[5] । पाळोनि देवेंद्राचीं आज्ञा । निवातकवच[6] वधील. ॥२०१॥ संग्राम करूनि अद्भुत । तोषवील गिरिजाकांत । प्रसाद पावेल पाशुपत[7] । महाअस्त्र तेकाळीं. ॥ २०२ ॥ विष्णुतुल्य विष्णुमित्र । नाहीं[8] करील दुर्जन शत्रु । ध्वजीं बसवील वातपुत्र[9] । महारुद्रप्रतापी. ॥ २०३ ॥ एक आज्ञेचे दांवणीं । भूपाळवृषभांच्या श्रेणी । बांधोनि करभाराची गोणी । वणिकापरी[10] वाहवील.' ॥ २०४ ॥ ऐसें ऐकोनियां वचन । पांडु कुंती तापसजन । सुख पावले तेणें गगन । भरूनि सांडिलें सागरीं. ॥ २०५ ॥ गगनीं दाटलीं विमानें । वर्षाव मांडिला सुमनघनें[11] । दिव्यपरिमळाचेनि पवनें । विश्व केलें करंडी. ॥ २०६ ॥ देवदुंदुभीचा नाद । तेणें व्यापिलें विष्णुपद[12] । गंधर्वगायनीं सुस्वाद । अमृ-

---

१. झुंज करणारा, युद्ध करणारा. २. अध्याय १२३ श्लोक ३८-४६ पहा. (मागें पृष्ठ ७२ टीप ९ पहा.) ३. पृष्ठ २२२ टीप ११ पहा. ४. पृष्ठ १०२ टीप २०-२१ पहा. ५. अग्नीला. खांडववन अग्नि पंधरा दिवस भक्षीत होता. (अध्याय २२८ श्लोक ४६ पहा.) ६. या नांवाचे बलाढ्य असुर. (मुक्तेश्वर–वनपर्व–अध्याय १५ ओंवी ८६-९४ पहा.) ७. पशुपतीचें (शंकराचें) अस्त्र. ८. नाहींसा, नष्ट. ९. मारुति. वातपुत्र अर्जुनाच्या ध्वजावर असल्यामुळें त्याला कपिध्वज अथवा कपिवरध्वज असें नांव आहे. मारुति आणि अर्जुन यांचें एका प्रसंगीं परस्परांच्या सामर्थ्याविषयीं बोलणें चाललें असतां निकरावर गोष्ट येऊन युद्ध झालें; त्यांत अर्जुनास कृष्णाचें साहाय्य असल्यामुळें यश आलें आणि मारुति हरला. तेव्हां युद्धप्रसंगीं अर्जुनाच्या ध्वजावर बसून आपल्या प्रचंड गर्जनेनें शत्रूंस भयाकुळ करण्याचें काम त्यानें पतकरिलें, म्हणून अर्जुनास कपिध्वज अथवा कपिवरध्वज असें नांव पडलें. कपिध्वज वृषध्वज मीनकेतन इत्यादि शब्दांचा बहुव्रीहिसमास करुन अर्थ करण्याची रुढि आहे, परंतु विचारदृष्टीनें पाहिलें असतां ध्वजावर मासा बैल वगैरे बसविणें या शब्दांचा अर्थबोध व्हावा तसा होत नाहीं; रथावर जो ध्वज (पताका) उभारावयाचा त्याचेवर मासा घोडा बैल इत्यादि जें ज्याचें चिन्ह असे, त्याचें चित्र काढीत असावें असा अर्थ संभवनीय दिसतो. या चित्राच्या खुणेवरुन हा अमक्याचा रथ असावा असें तो पाहिल्याबरोबर इतरांस कळावें, असा या चित्रें काढण्याचा उद्देश असावा. प्रस्तुत युरोपीय राष्ट्रांत देखील ध्वजावर निरनिराळीं चित्रें काढण्याचा प्रघात दृष्टीस पडतो. तसाच कांहीं पूर्वी संप्रदाय असावा. १०. वाण्याप्रमाणें. ११. पुष्पमेघें. १२. आकाश.

ताचे लोटती. ॥ २०७ ॥ द्वादश आदित्य अकरा रुद्र। अष्टौ वसु सह तारा-चंद्र। कुमार गणपति वीरभद्र। गणेशसहित पातला. ॥ २०८ ॥ सत्पुरुषीं चतुरानन। विष्णुगणेसीं रमारमण। आपुलाले परिवारेशीं देवगण। आवडी तेथें पातले. ॥ २०९ ॥ सिद्ध साध्य मरुद्गण। किंनर विद्याधर चारण। यम नैर्ऋत्य वन्ही पवन। एक एक पातले. ॥ २१० ॥ शेष वासुकी जेथें। काद्रवेय पातले तेथें। अरुण गरुडादी समस्तें। कौतुकें आले त्या ठाया. ॥ २११ ॥ अंशावतारी जे मिळाले। तितुके अर्जुन जन्मता आले.। ऐसें कवीच्या एका बोलें। चतुरश्रोतीं जाणावें. ॥ २१२ ॥ पुष्पकींहूनि मंगळभरिता। अक्षता ओपूनि अर्जुनमाथां। जयजयकारें ऊर्ध्वपंथा। क्रमूनि गेले सुरसिद्ध. ॥ २१३ ॥ यापरी जन्मतां अर्जुन। त्रिलोकांतें आनंद पूर्ण,। परी माद्रीचें सखेद मन। अपुत्रत्व स्मरोनी॥२१४॥ पांडुआनंददिनकरदीप्ती। प्रसन्नमुखसंपन्न कुंती। माद्री तेथें कुमुद्वती। म्लानमुखीपरी भासे. ॥२१५॥ हें जाणोनि मनोगत। आदरें पुसे प्राणनाथ,। म्हणे, 'मी जाणे वृत्तांत। बोल कांहीं सुजाणे!' ॥ २१६ ॥ माद्री म्हणे, 'निजनिर्धारीं। शतपुत्र प्रसवली गांधारी। त्याचा खेद हृदयांतरीं। तिळतुल्य मातें असेना. ॥२१७॥ एक पुरुषाच्या अंगना। त्यामाजी संतोष अधिक उणा। तेणें खेद उपजे मना। हें काय लागे सांगणें? ॥ २१८ ॥ संततीचे गौरवमानें। कुंती वाढली अधिकगुणें। वंध्यात्वदोषाच्या अवमानें। मज पाताळीं घातलें. ॥ २१९ ॥ कृपा करूनि प्राणनाथा!। प्रार्थूनि कुंतिभोजदुहिता। पुत्रलाभें माझा माथा। सोज्वल केला पाहिजे.' ॥२२०॥ 'निकें' म्हणोनि पांडुनृपती। कुंती नेऊनि एकांतीं। प्रार्थना करूनि उभयहस्तीं। दान मागे याचक.॥२२१॥ 'कर्णासहित उदरगगनीं। प्रसवलीस चतुर तरणी। एकपुत्रमुखें सौजणी। माद्री मानें गौरवीं. ॥२२२॥

---

१. पृष्ठ ७५ टीप ५ पहा. २. एकादश रुद्रांचीं नांवें:—मृगव्याध, सर्प, निर्ऋति, अजैकपात्, अहिर्बुध्न्य, पिनाकी, दहन, ईश्वर, कपाली, महाद्युति आणि भर्ग. (आदिपर्व—अध्याय ६५ पहा.) हे सप्तविध देवांतील तिसरे प्रतीचे असून, भूतपिशाचयक्षराक्षसादिकांचे अधिपति होत. यांचीं नांवें अन्यप्रकारेंही आढळतात:—वीरभद्र, शंभु, गिरीश, अजैकपात्, अहिर्बुध्न्य, पिनाकी, अपराजित, भुवनाधीश्वर, कपाली आणि स्थाणु. ३. आप, (अह) ध्रुव, सोम, धर (धव), अनिल, अनल, प्रत्यूष आणि प्रभास अशीं यांचीं नांवें आहेत. 'धरो ध्रुवश्च सोमश्च अहश्चैवानिलोऽनलः। प्रत्यूषश्च प्रभासश्च वसवोऽष्टाविति स्मृताः ॥' ४. कार्तिकस्वामी. ५. शिवपार्षद. यानेंच दक्षप्रजापतीचा वध केला. ६. सर्प. ७. विमानांतून. ८. सखि.

माझें वचन पाळिल्या देख । मज त्वां दिधलें अनंत सुख । पतिव्रता तूं निर्दोषक । पांचांहूनि आगळी'. ॥ २२३ ॥ वंदूनि भ्रताराचें वचन । अश्विनीकुमारमंत्रदान । माद्रीलागीं दिधलें आपण । प्रणवबीजसहित. ॥ २२४ ॥ येरी जपतां त्या मंत्रातें । अश्विनौदेव पातले तेथें । अंगसंग अमोघरेतें । पुत्र जावळे प्रसवली. ॥ २२५ ॥ त्यांत अग्रजा नाम नकुळ । कनिष्ठ जाण सहदेव बाळ । एकरूपें एक कुशळ । बुद्धिवादें आगळे. ॥ २२६ ॥ एवं देवतावीर्यकरीं । कुंतीमाद्रीउभयजठरीं । पांडवेय धनुर्धारी । धरातळीं जन्मले. ॥ २२७ ॥ मुनी शतशृंगनगवासी । नामें ठेविते झाले त्यांसी । धर्मराज हें वडिलासी । भीमसेन दुजियातें. ॥ २२८ ॥ तिजया नाम अर्जुन वीर । तिघे यादवीचे कुमार, । माद्रवतीचे सुकुमार । नकुळ आणि सहदेव. ॥ २२९ ॥ यापरी पांडव जन्मले क्षिती । व्यास वदला जैसिया रीती । मीही बोलिलों श्रोतयांप्रती । तदाधारें पंडित हो! ॥ २३० ॥ इति श्रीआदिपर्वे भारत । पुढारीं परिसावें सावधचित्त । मुक्तेश्वरप्रार्थनें संत । स्नेहभावें डुलती. ॥ २३१ ॥

अध्याय अठाविसावा.

यापरी शतशृंगपर्वतीं । पंच आदित्य जन्मले क्षिती, । कीं पंच शावक ऐरावती । क्रीडों आले त्या ठाया. ॥ १ ॥ सबळ बळाचे केसरी । वस्त्रांभूषणांवीण शरीरीं । शोभा शोभतसे साजिरी । रंजविती सर्वदां. ॥ २ ॥ जनकजननी यांचीं मनें । विसरोनि भुललीं भूकतहानें, । दर्शनें अमृताचीं पानें । दृष्टी आंगीं निवाली. ॥ ३ ॥ ऋषी आणि ऋषींच्या नारी । देखतां स्नेहभरितें भारी । फलमूलादिउपचारीं । रंजविती सर्वदां. ॥ ४ ॥ पंचलिंगी त्रिपुरांतक । पंच-

---

१. अहल्या द्रौपदी सीता तारा आणि मंदोदरी या पांचाहून थोर. २. अध्याय १२४ श्लोक १६-२४ पहा. अश्विनीकुमार हे दोघे बंधु होते म्हणून येथें द्विवचनाचा प्रयोग केला आहे. ३. जुवळे. ४. यांच्या जन्मकालाचा उल्लेख महाभारतांत नाहीं. ५. या अध्यायांत मूळांतील सात अध्यायांचा (११८-१२४) समावेश झाला आहे. हीच कथा पंतांनीं एका अध्यायांत वर्णिली आहे. (आदिपर्व—अध्याय १८—गीति १-१००. काव्यसंग्रह पृष्ठ १०४—१११.) या अध्यायांत किंदममुनिशाप, पांडुवैराग्य, स्त्रीसंगत्यागनिश्चय, काननप्रवेश, पांडुपृथासंवाद, व्युषिताश्वोपाख्यान, कुंतीपुत्रोत्पत्तिविचारणा, मंत्रपंचकप्राप्ति आणि युधिष्ठिरभीमार्जुननकुलसहदेवोत्पत्ति असे विषय आहेत. ६. सूर्य ७. ऐरावत गजाचे शावक, बाल. ८. सिंह. ९. चांगली. १०. शिव. हे पांच पांडव असे दिसले कीं ज्याप्रमाणें शंकराच्या पांच लिंगांची पिंडी दिसावी अथवा हिमाचलाचीं पांच शिखरें दिसावीं. या पांच पांडवांत भेद करतां येत नव्हता इतके ते सारखे होते.

शिखरी गिरिनायक । तैसा एकाहूनि एक । कदा नै वचे भेदिला. ॥ ५ ॥ प्राप्त झाला वसंतमास । सूर्य अवलोकिला पूर्ण दिवस । वनावलोकनें उल्हास । पांडुराया मानसीं. ॥ ६ ॥ पंच कुमर आणि कुंती । कौतुकें चालली एकपंथीं । माद्री आणि राजनृपती । भिन्नमार्गीं विचरती. ॥ ७ ॥ पालाश तिलक चूत चंपक । पारिजातादि कुरबक । अनेक वल्ली द्रुम अशोक । विचित्रपुष्पीं शोभले. ॥ ८ ॥ विशाळ रमणीक सरोवरें । विचित्ररंगाचीं पुष्करें । भ्रमर झुंकारती झुंकारें । बहु कोकिला कूजती. ॥ ९ ॥ वनकुंजर आणी करिणी । हंस आणी हंसिणी । कुरंग डोळेस कुरंगिणी । सुखमैथुनीं क्रीडती. ॥ १० ॥ सुरतसंगीं चक्रवाकें । स्वइच्छा रमती कपोतकें । देखोनि रतीच्या नायकें । उदय केला मानसीं. ॥ ११ ॥ हृदयपेटारींचा सर्प । फुंपाटें उठिला कंदर्प । मृगशापाच्या अतिसमीप । गरळ दृष्टी लक्षीना. ॥ १२ ॥ बापा! होणाराची गती । लोपोनियां सर्व युक्ती । विवेकविचाराची शांती । काय झाली कळेना. ॥ १३ ॥ समीप पातलिया मरण । ऐसें घडे कर्मविंदाण । सर्व जाणता विचक्षण । होय अज्ञानसमुद्र. ॥ १४ ॥ बहुकाळ भोगाची अप्राप्ती । सुंदर वनिता एकांतीं । कामानळ प्रज्वळे पुरुषचित्तीं । मग विचार कायसा? ॥ १५ ॥ निकट मद्रराजकुमारी । सुवर्णलतिका अतिसाजिरी, । कोमळ फळाचिये परी । पयोधर वाढिले. ॥ १६ ॥ गौर ते कर्दळीस्तंभ जानू । नितंब मध्य नाभिस्थानू । त्रिवली रेखा नव्हे तो वाणू । काळव्याधें विंधिला. ॥ १७ ॥ पुरुष देखोनि कामविकारी । अंगना सरके माघारीं । रायें धांवोनि करपंजरीं । आकर्षिली लगबगां. ॥ १८ ॥ पतंग कवळी दीपकलिका । मधुकर झेंपावे चंपका । विवर भाऊनि सर्पमुखा । मूषक जैसा प्रवेशे. ॥ १९ ॥ वामहस्तकें कवळूनि वधू । सव्यें आंसुडी नीरीबंधू । विवस्त्रा करूनि कामांधू । बळें मैथुना संघटे. ॥ २० ॥ हा! हा! नानाविचारयुक्ती । वारितां मातला भद्रजाती । माद्रीरंभार्पणहस्तीं । सहसा नै वचे लोटितां. ॥ २१ ॥ नाभीशीं नाभी उदराशिं उदर । हृदयाशीं हृदय कामातुर । मेळवूनि अधरा अधर । चुंबनपाना भूलला. ॥ २२ ॥ खेळ खेळत मैथुनखेळा । प्राण हृदयीं झाला गोळा । गात्रीं विकळता नेत्रयुगुळा । पांडुरता

---

१. न जाय, वचे (वजे) हा शब्द व्रज् (जाणें) या धातूपासून झाला आहे. (अध्याय २९ ओवी १६७ पहा.) २. कमळें. ३. हत्ती. ४. हत्तिणी. ५. सुंदर. ६. मदनानें. (अध्याय १२५ श्लोक ५.) ७. चातुर्य, विलास. ८. 'मग मर्यादा कायसी' असा अन्य पाठ आहे. ९. हत्ती. १०. केळ. ११. न जाई.

पातली. ॥ २३ ॥ सहचरीच्या हृदयशयनीं । वीर्यस्खलन होतांक्षणीं । देह त्यागुन पंचप्राणीं[1] । गमन केलें तात्काळीं. ॥ २४ ॥ मुखें मुख पाहे युवती । कुंठित श्वासोच्छ्वासगती । दीर्घस्वरें रोदन करिती । 'हा! हा! काय' म्हणोनी.॥२५॥ तिचा ऐकोनि रोदनस्वर । समीप येती कुंती कुमर, । माद्री म्हणे, 'परते, कुमर । ठेऊनि, येईं जवळिकें.' ॥ २६ ॥ अंतरें ठेवूनियां तनुजा । निकट पातली श्रेष्ठ भाजा,[2] । प्राणरहित देखोनि राजा । अंकासनीं स्त्रियेच्या. ॥ २७ ॥ कुंती म्हणे, 'वो मंदमती! । वहुकाळ रक्षिला म्यां नृपती । आजि त्वां घातला अनर्थीं । वना आणोनि एकटा.' ॥ २८ ॥ येरी म्हणे, 'वारिला बहुत । असो तें होणार बळिवंत, । जाणतजाणतां अनर्थ । घडला जाण नृपनाथा. ॥ २९ ॥ आग्रहें वारितां रायासीं । राजा न विचारी मानसीं । मन अनावर झालें त्यासीं । अटक तेथें हरिहरा. ॥ ३० ॥ आतां देईं आज्ञावचन । वल्लभासवें करीन गमन.'[3] । कुंती म्हणे, 'तूं अज्ञान । म्हणोनि ऐसें जल्पसी. ॥३१॥ सर्वस्वें जे वडील नारी । ते सर्वकर्मा अधिकारी । प्रेतापासूनि होईं दुरी । सहगामिनी[4] मी येथें.' ॥३२॥ प्रार्थूनि बोले कनिष्ठभाजा, । 'काम संपूर्ण नाहीं माझा । हृदयीं आलिंगुनी राजा । प्राण देईन हुताशीं[5]. ॥३३॥ माझेनि कामीं वंचला मरणीं । मीच होईन सांगातिणी । भ्रतारासवें देवसदनीं[6] । वसतें करीं मज, माये !॥३४॥ तिघांऐसीं दोन बाळें । ळळेनें पाळीं स्नेहाळे ! । तुझींच असती तेथें म्यां बोलें । काय विशेष बोलावें ?'[7] ॥३५॥ म्हणूनि पुरुषातें आलिंगन । देतां तात्काळ सांडिला प्राण; । कुंती म्हणे, 'करणें कोण ।

---

१. पंचप्राण='प्राणोऽपान: समानश्चोदानव्यानौ च वायव: । शरीरस्था इमे' (अमर). 'हृदि प्राणो, गुदेऽपानः, समानो नाभिसंस्थितः । उदानः कंठदेशे स्याद् व्यानः सर्वशरीरगः ॥ अन्नप्रवेशनं मूत्राद्युत्सर्गोऽन्नविपाचनम् । भाषणादिनिमेषादि तद्व्यापाराः क्रमादमी ॥.' शरीरस्थ वायु पांच आहेत—प्राण, अपान, समान, उदान आणि व्यान. यांचीं स्थानें आणि कार्यें भिन्न भिन्न आहेत. २. भार्या. ३. अध्याय १२५ श्लोक २३-२४ पहा. ४. मृतपतीच्या प्रेताबरोबर जाणारी. ५. अग्नींत. ६. स्वर्गीं. ७. अध्याय १२५ श्लोक २५-३१ पहा.

प्रारब्धाचें विचित्र'. ॥ ३६ ॥ क्षणांत झाली दुजी सृष्टी । मीनेल्या तापसांच्या कोटी । बाळकें धरूनियां पोटीं । शांतविती कुंतीतें. ॥ ३७ ॥ मूळ भारतामाजी जाण । संदेहस्थ निरूपण । वनीं पांडूचें देहदहन । सहगमन माद्रीचें. ॥ ३८ ॥ पुढती ऋषीश्वर घेऊनि प्रेतें । पातले हस्तिनापुरातें । तेथें कौरवांचेनि हातें । दहन केलें दोहींचें. ॥ ३९ ॥ असो. व्यास वदला जैसें । तुम्हींही श्रवण करा तैसें । कवित्वा दूषण ठेविजे ऐसें । कारण कांहीं असेना. ॥ ४० ॥ मुनी शतशृंगनिवासी । म्हणती, 'राजा गुणैकरासी । सुहृद त्यागूनि वनवासी । आम्हांसमीप राहिला. ॥ ४१ ॥ भक्तिविनीत आर्जवगुणीं । सत्य विनीत मधुरवाणी । बहुतकाळ भावभजनीं । सुखी केलें आमुतें. ॥ ४२ ॥ भाग्यें लाधला सुपुत्रातें । काळें पावला निधनातें । त्याचा परिग्रह आणि प्रेतें । स्वस्थळाप्रती

१. दैवाचें, नशीबाचें. प्रारब्ध=या शब्दाचा मूळचा अर्थ 'आरंभिलेलें' असा आहे. एखाद्या मनुष्यास उद्योग वगैरे कांहीं केल्याशिवाय द्रव्यप्राप्ति वगैरे सुख झालें किंवा कांहीं अपराध नसतां दुःख झालें म्हणजे त्याचें प्रारब्ध चांगलें किंवा वाईट असें म्हणतात. संसारांत एकाएकीं मनुष्यास कारणाशिवाय सुख किंवा दुःख प्राप्त होणें ही ईश्वराच्या दयालुत्वाशीं व न्यायित्वाशीं विरुद्ध दिसणारी गोष्ट सर्वकाळीं सर्व देशांत आढळते व तिचें विवेचन अनेक लोकांनीं वेगळालें केलें आहे. कित्येक पूर्वजन्म न स्वीकारणारे म्हणतात कीं, ईश्वर मनुष्यावर आकस्मिक संकटें आणून त्याच्या धैर्यादिक मानसिक गुणांची परीक्षा करितो. हें मत ईश्वराच्या सर्वज्ञत्वाशीं जुळत नाहीं. आमच्या शास्त्रकारांचें असें मत आहे कीं, सुख दुःख हीं पुण्या पापाचीं फळें होत. पुण्याशिवाय सुख व पापाशिवाय दुःख व्हावयाचें नाहीं, असा त्याचा सिद्धांत आहे. जगांत मनुष्यास आकस्मिक सुखदुःखें प्राप्त होतात. या विरोधाचें समाधान पूर्वजन्म स्वीकारून ते असे करितात कीं, एखाद्यानें मागल्या जन्मीं फार पुण्य किंवा पाप करून त्याच्या सर्व फळाचा उपभोग झाल्याशिवाय त्यास मरण आलें तर त्याचें फळ त्यास या जन्मीं प्राप्त होतें यामुळें कित्येक ठिकाणीं सुखदुःखाचें कारण या जन्मीं दिसत नाहीं तेथें तें प्रारब्ध म्हणजे पूर्वींच्या जन्मीं भोगण्यास आरंभिलेलें प्राप्त झालें असें समजावें. यावरून 'प्रारब्ध' शब्दाचा अर्थ 'नशीब' असा झाला आहे. (व्युत्पत्तिप्रदीप पृ० ५१-५२टीप १.) २. मिळाल्या. ३. तपस्विजनांच्या. ४. माद्रीनें वनांत भर्त्याच्या चितेवर आरोहण केलें असें वर्णन आहे. (अध्याय १२५ श्लोक ३१); तसेंच पुढें (अध्याय १२६ श्लोक ४ व ७ यांत ऋषिजन पांडु आणि माद्री यांचे देह घेऊन हस्तिनापुरास आले असें वर्णन आहे. यांत थोडा फेर आहे म्हणून संदेहात्मक वर्णन आहे असें जें कवीनें म्हटलें आहे तें खरें दिसतें. ५. आर्जव=सरलत्व. ऋजू याचा मूलार्थ उजू यामध्यें आला आहे, परंतु आर्जव म्हणजे सरळपणा याचा मराठींत वेगळा अर्थ झाला आहे. प्राकृत आर्जव शब्दांत निंदा ध्वनित होते. आर्जवी मनुष्य म्हणजे लवचीक, लवणारा म्हणजे लोक म्हणतील त्यास होय होय म्हणून खुशामत करून आपलें काम करून घेणारास आर्जवी म्हणतात. (व्युत्पत्तिप्रदीप पृष्ठ १६.) ६. मरणातें. ७. पत्नीपरिजन.

पाठऊं. ॥ ४३ ॥ समागमें कुंती कुमर । उचलोनि दोन्ही कलेवर[1] । लंघोनि अनेक देशांतर । कौरवपुरा पातले. ॥ ४४ ॥ नगराबाहेर गंगाकूळा[2] । निकट थोकला[3] तापसमेळा । प्रेतशिबिका ठेविली तळा । उतरोनियां गुह्यकीं. ॥ ४५ ॥ कुंती आणि पांचही कुमर । वेष्टीत संगिये ऋषीश्वर । देखोनि पातले राजद्वार । तयीं वार्ता जाणविली. ॥ ४६ ॥ 'पांडु निधन पावला वनीं । माद्रीसहित शरीरें दोन्हीं, । पांचही पुत्र सुलक्षणी । घेऊनि ऋषी पातले. ॥ ४७ ॥ जाऊनि सांगा रायातें । भीष्म बाल्हीक धृतराष्ट्रातें । कृपाचार्या[4] विदुरातें । शीघ्र येथें पाचारा. ॥ ४८ ॥ दुर्योधनादि राजकुमर । आप्त सोयरे थोर थोर । इतर गोत्रसंबंधी अपार । अवघे येथें आणावें. ॥ ४९ ॥ अंबिका अंबालिका सहित । सत्यवतीतें जाणवा मात । वेष्टीत स्नुषा एकशत । गांधारीतें पाचारा'. ॥ ५० ॥ वार्तारूप निर्झरसरी[5] । हस्तिनापुरीं सांगतां हेरीं । प्रवेशोनि घरोघरीं । विस्तारिली बहुमुखें. ॥ ५१ ॥ वार्ता पडतां कर्णपुटीं[6] । चालल्या पौरजनाच्या थाटी[7] । नारीनरांची बहु दाटी । धरातळीं न समाय. ॥५२॥ वर्णावर्ण जाती विजाती । अनेकजीविका[8] अनेकवृत्ती[9] । पातल्या अठरापगड[10] जाती । कर्ते सर्व पातले. ॥ ५३ ॥ कुंती आणि पांडुकुमर । आले, ऐकोनि सत्वधीर । धाविन्नले लहान थोर । आर्तवंत[11] पहावया. ॥ ५४ ॥ भीष्म बाल्हीक सोमदत्ती । विदुर पवित्रविचार सुमती । यानारूढ सुहृदपंक्ती । एक एक पातले. ॥ ५५ ॥ मद्र सैंधव कृपाचार्य । सुवर्णशिबिके अंबिकातनय, । धृतराष्ट्र म्हणे, 'प्रतापसूर्य । आजि पांडु मावळला.' ॥ ५६ ॥ रथ कुंजर अश्वयानीं । सुशोभित वस्त्राभरणीं । छत्र चामरें वाद्यध्वनीं । राजकुमार निघाला. ॥ ५७ ॥ एकोत्तरशतपुत्रपत्नी । आरूढल्या सुखासनीं । मुख्यराजाची स्वामिणी । रत्नशिबिके गांधारी. ॥ ५८ ॥ काशीश्वराचिया कुमारी । सत्यवती इत्यादि स्थविर[12] नारी । रोदन करिती शोकस्वरीं । आक्रंदत पातल्या.

---

१. शरीर. मूळांत 'देह' असें आहे. आणि त्याचा अर्थ दोन देहांच्या अस्थि—असा टीकाकार नीलकंठ चतुर्धर यानें केला आहे. (अध्याय १२६ श्लोक ४ पहा.) २. तीरा. ३. थांबला. ४. हें नांव मूळांत नाहीं. ५. देवनदी. (निर्झर=देव, सरी=नदी.) ६. कर्णरंध्रीं. [अंजलिपुट, नासापुट, कर्णपुट—असें प्रयोग संस्कृत काव्यांत अनेक आढळतात.] ७. समूह, झुंडी. ८. पोटाचा धंदा. ९. उदरनिर्वाहसाधन, जीवनोपाय. १०. या अठरा जातींचीं नांवें:—कुंभार, कासार, तेली, तांबोळी, न्हावी, परीट, कलाल, कोष्टी, झारा, महार (चांभार), जैन, जती, हुंडे, गुजर, मारवाडी, सोनार, सुतार, आणि हलालखोर. अठरा टोपकर आणि अठरा पगडजात हे परस्पर भिन्न होत. ११. उत्सुक. १२. वृद्ध.

॥ ५९ ॥ प्रधान सेना आणी सेवक । राजसंबंधी सहित लोक । ग्रामनि-[1]योगी देशिक[2] । जन महान पातले. ॥ ६० ॥ अवलोकूनि तापस जन । **भीष्में** घातलें लोटांगण । ऋषी बोलती गर्जोनि वचन । म्हणती, 'अवघे ऐका हो! ॥ ६१ ॥ राजवैभव सुखसंपत्ती । सोडूनि **पांडु** विवेकमूर्ती । राहिला आ-मुचे संगतीं । शतशृंगपर्वतीं. ॥ ६२ ॥ आचरोनि खडतर तपें । भस्म केलीं महापापें । पंचदेवतांचिये कृपें । पुत्रपंचक[3] लाधला. ॥ ६३ ॥ **धर्मा**पासून ज्येष्ठ **धर्म** । **वायु**वीर्यजबळिया **भीम** । **इंद्रा**चा हा नरेंद्रोत्तम । **विजय पार्थ** धनुर्वाड[4]. ॥ ६४ ॥ **अश्विनौ**देवांचे वीर्यज । दोघे **माद्री**चे आत्मज । कवि-[5]**गुरु**तुल्य तेजःपुंज[6] । **नकुळ** आणी **सहदेव**. ॥ ६५ ॥ देवासमान मानवां देवा । **पांडव** हा नरपार्थिवा! । पांचातुल्य या मानवां- । माजी सहावा असेना.॥६६॥ पिता पावलिया मरणा । पातले वडिलाचिया स्थाना । आतां तुम्हीं करूनि करुणा । सर्वस्नेहें पाळावें. ॥ ६७ ॥ सहज असती सभाग्यपिंड । भो-गिती मेदिनी नवखंड[7] । स्नेहभावें वर्तवीं गोड । यशप्राप्तीतें जोडावें. ॥ ६८ ॥ निधन पावलिया नरेश । दिवस लोटले सप्तदश[8] । विधीनें ओपूनि हुताश[9] । कर्म सांग[10] संपादा.' ॥६९॥ ऐसें सांगोनि **भीष्मा**प्रती । **पांडव** निरविले समस्तीं । देखत देखत अदृश्यगती । ऋषी गेले स्वस्थाना. ॥७०॥ जैसा भ्रामक[11] महेंद्रजाळीं[12] । दावोनी हरवी तात्काळीं । नातरी आच्छादे निराळीं[13] । गंधर्वनगर[14] पैं जैसें. ॥ ७१ ॥ तैशा तापसांच्या कोटी । अप्रत्यक्ष झालिया दृष्टी । अवघे आश्चर्य करिती पोटीं । परम सिद्ध म्हणोनी. ॥७२॥ **भीष्म** बोले सप्रेम वचन, । 'गांठीं होतें अपार पुण्य । सत्पुरु-षाचें आगमन । तेणें झालें या ठायां. ॥ ७३ ॥ दर्शन देऊनि आपुलें । पूजा न घेतां निघोन गेले । ईश्वर पुरुष भाग्याथिले । चाड काय आमुची? ॥७४॥ **पांडव** हृदयीं आलिंगुन । **धृतराष्ट्र** करी दीर्घ रोदन । मोहें बंधूचे सद्गुण । आठवूनि जल्पत.॥७५॥

---

१. ग्रामाधिकारी, गांवचा कारभारी. २. देशांतील. ३. पंचक=पांचांचा समुदाय. ४. धनुर्धर अर्जुन. ५. शुक्राचार्य आणि बृहस्पति यांच्या सारखे. ६. तेजस्वी. ७. पृष्ठ ११० टीप १० पहा. नऊ खंडांचीं नांवें:–ऐंद्र, कसेरु, ताम्रपर्ण, गभस्तिमत्, कुमरिका, नाग, सौम्य, वारुण, गांधर्व. (भास्कराचार्य व तत्कृत ज्योतिष, पृष्ठ २५.) ८. सतरा. अध्याय १२६ श्लोक २९ पहा. ९. अग्नि. १०. यथाविधि, संपूर्ण. ११. वंचक, शठ, ठक, फसव्या. १२. इंद्रजाल=नजरबंद विद्या; नाहीं तें दिसावें आणि आहे तें दिसूं नये इत्यादि चमत्कारमय जी विद्या ती. १३. आकाशांत. १४. आकाशामध्यें अनेकरत्नाकृति, प्रकाशमान आणि पताकाध्वजतोरणान्वित नगरासारखें जें एकादे वेळीं दिसतें तें. याचें वर्णन ज्योतिःशास्त्रांत आहे तें:—'अनेकरत्नाकृतिखे प्रकाशते पुरंपताकाध्वजतोरणान्वितम् । यदा तदा नागमनुष्यवाजिनां पिबत्यसृग्भूरिरणे वसुंधरा ॥.'

सत्यवती आणी **गां**धारी । **कुं**तीस कवळूनि हृदयांतरीं । शोक करिती दीर्घ-
स्वरीं. । दुःख भोगिलें याहेतु. ॥ ७६ ॥ **धृतराष्ट्र विदुरा** आज्ञा करी, । 'वसन[1]-
सदनें **जान्हवी**तीरीं । उभऊनि[2] द्वादशरात्री । वस्तीस सर्वां रहावें. ॥ ७७ ॥
भार्येसहित द्वय शरीरें । अग्नीसीं अर्पावीं उपचारें[3] । चंदन तुळसी कृष्णागरें[4] ।
बिल्वकाष्ठ मिश्रित. ॥ ७८ ॥ धेनु रत्नें बहु सुवर्णें । संपदा वेचूनि सहस्रगुणें ।
उत्तरक्रिया ऋषींच्या वचनें । सांगोपांग[5] संपादा. ॥ ७९ ॥ कवणालागीं धन
जोडिजे? । व्यर्थ कासया संसारीं जीविजे? । जरी आप्ताचें सार्थक न कीजे ।
जीतं[6] मेल्यासारिखे.' ॥ ८० ॥ परिसोनि रायाचें उत्तर । **विदुर** आणि **गंगा**-
कुमर । आदरें उठोनि अतिसत्वर । शवासमीप पातले. ॥ ८१ ॥ सुवर्णघट
शतानुशत[7] । **गं**गोदकें सोज्वळ भरित । स्वहस्तें प्रक्षाळूनि प्रेत । धौतवस्त्रें दा-
टिलीं. ॥ ८२ ॥ बावन्न चंदनें दिव्य कस्तूरी । कर्दम[8] करोनि नव केशरीं ।
चरणापासोनि मस्तकावरी । लेप हातें लेपिला. ॥ ८३ ॥ पीतांबर तगटी भ-
रीत । नेसविला सुशोभित । अंगप्रत्यंगीं रत्नखचित । स्वर्णाभरणें लेविलीं. ॥ ८४ ॥
मुगुट कुंडलें कटिमेखळा । सुवर्णमाळा सुमनमाळा[9] । कर्पूर चंदन पिष्टं[10] धुरळा ।
चहूंकडे उधळिती. ॥ ८५ ॥ यांचपरी[11] वृद्धवनितीं[12] । आदर केला **माद्री**प्रती ।
अभ्यंग[13] करूनि स्वहस्तीं । वस्त्राभरणें लेवविलीं. ॥ ८६ ॥ छत्र चामरें वाद्यध्व-
नी । राजविग्रह[14] शिबिकायानीं[15] । सजीव तैसा भाऊनि[16] मनीं । शोक करिती स-
मस्त. ॥ ८७ ॥ **अं**बिका आणी **अं**बालिका । हृदय पिटोनि करिती शोका ।
'आम्हां सांडोनि परलोका । केंवी जासी सुपुत्रा !' ॥ ८८ ॥ वस्त्रें आच्छादूनि
वदन । प्रज्ञाचक्षु[17] करी रोदन । **भीष्मविदु**रांचे नयन । अश्रुपातें ढळताती[18]. ॥ ८९ ॥
सत्यवती आणी **गां**धारी । शोक करिती हाहाकारीं । **कुं**तीलागीं बहुत नारी ।
सांवरूनि चालविती. ॥ ९० ॥ पाहोनि निर्मळ **गं**गातट । चिता रचिली प्र-
चंड नीट । आज्य तैल कनकघट । सहस्रावधी आणिले. ॥ ९१ ॥ अगरु
चंदन बिल्वकाष्ठीं । बैसका[19] रचिली तळवटीं । बालतृणाचिया थाटी[20] । आस्तर-
णातें सूदल्या[21]. ॥ ९२ ॥ त्यावरी कुंकुम आणि केशरीं । कर्पूर आंथरिला थ-

---

१. डेरे, राहुट्या. २. उभारून. ३. यथाविधि पूजा करून. ४. कृष्णागरु=उत्तमचंदन. ५. यथासांग, अंग आणि उपांग यांसहित. ६. जीवंत. ७. शेंकडों. ८. चिखल. ९. पुष्पमाळा. १०. कुटलेला, चुरलेला. ११. याचप्रमाणें. १२. स्त्रियांनीं. १३. अभ्यंग स्नान घालून. १४. राजदेह. १५. पालखींत. १६. मानून. १७. अंध, धृतराष्ट्र. १८. भीष्म विदुर यांचे डोळे रडण्यानें गळून गेले. १९. स्थान, बैठक. २०. समुदाय. २१. घातल्या.

रोथरी । सर्वें पहुडविलीं साजिरीं । जैंवी सेजारीं दंपत्य. ॥ ९३ ॥ विधीनें प्राथिला हैव्यवाट । ज्वाळा पेटल्या धडधडाट । धूप परिमळ तैलघट । अनंत-हस्तें ओपिती. ॥ ९४ ॥ असो. झालिया देहदहनें । समस्तें सारिलीं गंगास्नानें । उदकक्रियाविधी विधानें । संपादिली वेदोक्त. ॥ ९५ ॥ गोत्रेंज सुहृद नागरिकीं । वस्त्रगृहीं पैं अनेकीं । देवतटिनीच्या तटाकीं । द्वादशरात्री लोटिल्या.॥९६॥ सांग संपादिलीं श्राद्धें । तृप्ती पावविलीं ब्रैह्मवृंदें । घृत मधु आणि दुग्धें । ओघ गंगे मिळाले. ॥ ९७ ॥ सुवर्ण रजत रत्न वस्त्रें । असंख्य धेनूंचीं सहस्रें । दक्षिणा नेतां ऋषीश्वरें । 'पुरे पुरे' म्हणिजेलें. ॥ ९८ ॥ दिवस लोटलिया तेरा । चतुर्दशदिवशीं राजेश्वरा ! । मुहूर्तीं प्रवेशोनि नगरा । पांडुगृहा पातले. ॥९९॥ पांडुनृपाचें राजसदन । सर्व संपत्ती भरली पूर्ण । माजी पांडूचे नंदन । कुंतीसहित स्थापिले. ॥ १०० ॥ जें जें कांहीं मागती जेव्हां । तें तें तात्काळ पावविजे तेव्हां । रायें आज्ञापितां सर्वां । 'अवश्य' म्हणितलें मंत्रियें. ॥ १०१ ॥ आज्ञा मागोनि समस्तीं । नमस्कारूनि पांडव कुंती, । नगरवासी स्वगृहाप्रती । जाते झाले संतोषें. ॥ १०२ ॥ पैक्ष एक लोटतां जाण । धृतराष्ट्र गृहा ये आपण । करी पुत्रांचें समाधान । शांतवन कुंतीचें. ॥ १०३ ॥ नेमें लोटलिया पंचरात्र । येऊनि सांभाळी गंगापुत्र । स्नेहें विदुर अहोरात्र । पांडवगृहीं वसतसे. ॥ १०४ ॥ तेचकाळीं व्यासमूर्ती । पातला सत्यवतीप्रती । माता नेऊनि एकांतीं । सुचना कांहीं अनुवादे. ॥ १०५ ॥ 'हितार्था साधावया तुझ्या । यत्नें पातलों याच काजा । वाक्यार्थ परिसोनि माझा । त्याची रीती वर्तावें. ॥ १०६ ॥ येथोनि संतोषसूर्यअस्त । झाला क्लेशकाळ उदित । सुटला दुश्चिन्हाचा वात । परमअरिष्टसूचक. ॥ १०७ ॥ लोपेल धर्मक्रियाचार । वाढेल असत्य अनाचार । विवेक वैराग्य विचार । नावही यांचें उरेना. ॥ १०८ ॥ माजेल मायेचा धुळोरा । माजी नोळखिती येरयेरां । नाना दोष धांवती सैरां । जैसे म्हैसे मातले. ॥ १०९ ॥ लोभ सांडील मर्यादेतें । स्वार्थ जोडेल अनर्थातें, । ऐसें येथूनि वर्तेल सत्यें । विशेष याही वेगळा. ॥ ११० ॥ ऋषी जातील बदरीवना । सिद्ध न देतील दर्शना, । पृथ्वी ग्रासील रत्नधना । स्वल्प कांहीं उरवील. ॥ १११ ॥ वीर्यें सांडितील मंत्रांतें । औषधी सांडितील गुणातें, । देव सांडितील देवपणातें । पाषाणत्वें वर्तती. ॥ ११२ ॥ कुळामाजी उपजेल

---

१. अग्नि. २. दायाद. ३. भागीरथीच्या. [तटिनी=नदी.] ४. ब्राह्मणांचे समूह. ५. पंधरा दिवस. ६. सांत्वन. ७. अन्योन्यां, परस्परांस. ८. स्वैर, स्वच्छंद. ९. प्रभाव, तेज, सामर्थ्य.

कळी । जेंवी वणवा वेळुजाळीं । क्षत्रियमात्र पृथ्वीतळीं । संहारतील तद्योगें. ॥ ११३ ॥ गांधारीचा वडील कुमर । तो कुरुकुळवैश्वानर । त्याचेनि अपराधें साचार । नाश होईल वंशाचा. ॥ ११४ ॥ बरवें कांहीं न दिसे दृष्टी । पाटा वाटेल सर्व सृष्टी, । यालागीं तुवां उठाउठीं । आतांचि येथूनि निघावें. ॥ ११५ ॥ एकदां अवघियांचीं मरणें । कासया अवलोकावीं नयनें ? । वैराग्य अवलंबोनि मनें । तपोवना निघावें. ॥ ११६ ॥ झणी धरिसी याची माया । वरपडा होसी सहस्रवाया । अग्नि लागलिया आलया । त्यागूनि परतें पळीजे.' ॥ ११७ ॥ 'अवश्य' म्हणोनि सत्यवती । उभय स्नुषा धरूनि हातीं, । येऊनि भीष्म विदुराप्रती । आज्ञा पुसे निश्चयें. ॥ ११८ ॥ भविष्य जाणोनि साचारें । मान्य केलें गंगाकुमरें । श्रेष्ठ विचार मानूनि विदुरें । आज्ञावचनीं बोळंवी. ॥ ११९ ॥ पवित्र भागीरथीचें तीर । व्याससंगीं निरंतर । विरक्त सखियांचा सेजार । शांती धृती जवळीके. ॥ १२० ॥ खडतर तपाचिया आगीं । उदार होवोनि देहत्यागीं । परम गती पावल्या तिघी । अरुंधतीसम पाडें. ॥ १२१ ॥ ईश्वर पुरुष उपजे वंशीं । तरी परम पदवी पाविजे ऐसी । यालागीं संतसंगापासीं । मोक्ष जोडे आयिता. ॥ १२२ ॥ पुढील कथेचें अनुसंधान । बाळखेळ वनक्रीडन । कृपद्रोणादि महदाख्यान । कृपेनें संतीं परिसावें. ॥ १२३ ॥ भारतकथा अमृतवल्ली । श्रवणमंडपीं नवरसफुल्लीं । फुलोनि मोक्षसुखाचे फळीं । लवोनि आली फळभारें. ॥ १२४ ॥ लीलाविश्वंभरप्रसादें । मुक्तेश्वरगिरा सुखानुवादें । संतहृदया निघती दोंदें । हें आश्चर्य तंव नव्हे. ॥ १२५ ॥

अध्याय एकोणतिसावा.

वेदोक्तविधीनें संस्कारिले । भोजनपानसुरवाडिले । दिवसें दिवस वाढते झाले । चंद्रवृद्धीसारिखे. ॥ १ ॥ शृंगारिले वस्त्राभरणीं । आरूढती अनेकयानीं । लोकीं अवलोकितां नयनीं । प्रेमानंद नसंटे. ॥ २ ॥ गांधारीचे शत नंदन । कुंतीकुमर पांचहीजण । एकवट होऊनि सुखसंपन्न । बाळक्रीडा खेळती. ॥ ३ ॥ कुमारखेळाचे खेळणी । दक्ष पांडव आगळे गुणीं । डावमात्रीं पावती हानी । उणे दिसती कौरव. ॥ ४ ॥ तयांमाजी भीमसेन । खेळतां

१. अग्नि. २. सत्य. ३. गृहा. ४. दोघी. ५. सून—अंबिका आणि अंबालिका. ६. जाण्याचा निरोप देई, पाठवी. ७. वाणी. ८. वृद्धिंगत झालेले, पोषण झालेले. ९. न समावे, न सांठे. १०. आनंद देणारे पुत्र, 'नंदनं वासवोद्याने सुते ना हर्षके त्रिपु' इति रत्नमाला.

जिंकोनि जाय पण । करिशावकां[1] पंचानन[2] । तेंवी भासे सर्वांतें. ॥ ५ ॥ पळतां अवघे सांडी मागें । झोंबिये एकला पाडी आंगें । पृष्ठीशीवणी पाठी लागे । करूनि डाया आणित. ॥ ६ ॥ कनकवीटा कनकदंड । माणिकमणीगोटिया जोड । रत्नकंदुक खेळतां होडें । जिंकोनि जाय एकला. ॥ ७ ॥ चक्रभोंवरे लपण डाया । मस्तकसिवणी सुरकवडीया । पैजहारी आणूनि तयां । अंजाशब्दें[4] हिणावी. ॥ ८ ॥ शकुनी कर्ण दुःशासन । दुर्योधन आणि विकर्ण । म्हैसा करूनि भीमसेन । हस्तपाद कवळिती. ॥ ९ ॥ मस्तकें डीवोनि[5] पाडी धरणी । खुरेंकरूनि ताडी चरणीं । अस्थी चूर्ण होतां वदनीं । अशुद्ध[6] वाहे भडभडां. ॥ १० ॥ एका उचलोनि झुगारी गगनीं । आंदोळतां आपटी धरणीं । तेणें दुखवती हस्तचरणीं । कटीं पृष्ठीं मस्तकीं. ॥ ११ ॥ बहुसाल कवळुनियां बाहीं । उडी घाली अगाधडोहीं । प्राण जातां जातां पाहीं । थडिये टाकी अविलंबें. ॥ १२ ॥ फळें तोडितां कौरवांतें । अवघे वळंघले वृक्षावरुते । झाड झोडितां वज्रलातें । तळीं पडती धडधडां. ॥ १३ ॥ मृत्तिकेचा विशाळ टेंका । करूनि तळवटीं वोढिती एका । 'सोडीं' म्हणोनि मारी हाका । हटा पेटला न सोडी. ॥ १४ ॥ आपण होवोनि एडका । मस्तका मस्तक मारी धडका । पक्व फळें आपटी खडका । तेंवी व्यथा पावती ॥ १५ ॥ राजा करूनि युधिष्ठिर । आपण होय मत्त कुंजर । कौरव कल्पूनि तस्कर[10] । पायीं[11] बांधे आपुल्या. ॥ १६ ॥ तेथोनि धांवे सैरावैरा[12] । झाडी पाडी राजकुमरा । मस्तकें आदळती पाथरा[13] । तेणें विषाद पावती. ॥ १७ ॥ आपुलिया आंगावरते । मुष्टिघात मारवी गणितें । उसणें फेडितां तयांतें । घायें मूर्छा आणित. ॥ १८ ॥ धर्मासी म्हणे हे भगवती, । 'नवसा आणिल्या वस्तपंक्ती[14] । म्हणोनि कौरव पाडूनि क्षिती । कंठच्छेदना दाखवी.' ॥ १९ ॥ हें देखोनि कर्ण शकुनी । क्रोधें संतप्त अंतःकरणीं । दुर्योधना दाखविती नयनीं । पुढारीं बरवें दिसेना. ॥ २० ॥ विशाळ गर्ता निर्मूनि भूमीं । कुंड कल्पोनि बैसे होमीं, ।

---

१. हत्तींच्या छाव्यांस. २. सिंह. [पंच (विस्तृत) आहे आनन (मुख) ज्याचें तो; पंच (पांच–एक मुख आणि चार पाद) आननें (मुखें) ज्यास तो असा 'पंचानन' शब्दाचा विग्रह आढळतो.] ३. पैज, प्रतिज्ञा. ४. 'बैं' या शब्दानें. ५. डांस घेऊन किंवा चाऊन. ६. रक्त. ७. चढला. ८. 'ताडितां' असाही पाठ आहे. ९. हत्ती. १०. चोर. ११. 'चरणा बांधी आपुल्या' असाही पाठ आहे. १२. ज्याला जिकडे वाट फुटेल तिकडे. (भयामुळें संभ्रांतपणें अनेक मार्गानें पळणें याचें विशेषण). १३. दगडा. (प्रस्तर=फत्तर, पाथर). १४. वकऱ्यांची ओळ. १५. खळगा.

'स्वाहा'[1]शब्दें कौरवनामीं । आहुती करी त्या सांडी. ॥ २१ ॥ आपण होऊनि मत्स्यावतार[2] । जळशंख केला शंखासुर । बळें घोटीये दाटितां कर । कासावीस[3] आक्रंदे. ॥ २२ ॥ अवघे मिळोनि मारिती मुष्टी । कूर्म[4] होवोनि वाढवी पाटी । मारितां उखळती बाहुवटी[5] । तेणें व्यथिष्ट पैं एक. ॥ २३ ॥ वराह[6] होवोनि पसरी दंष्ट्रा[7] । हिरण्याक्ष[8] करी धार्तराष्ट्रा[9] । हृदयीं रोवितां दंतधारा । क्लेश अद्भुत पावती. ॥ २४ ॥ आपण होवोनि नरकेसरी[10] । दुःशासना आडवें धरी । म्हणे, 'नखें घालूं तव उदरीं । आतां किंवा पुढारीं.' ॥ २५ ॥ बळवर्धन[11] करूनि बळी । पाठी रगडी पायातळीं । म्हणे, 'दावूं या पाताळीं । पुढती नुठे तें करूं.' ॥ २६ ॥ आपण अवगोनि[12] भार्गवाकारा[13] । मुखीं कवळी कार्मुक शरा । म्हणे, 'म्यां निःक्षेत्री केली धरा[14] । म्हणोनि कौरवां पहुडवी.' ॥२७॥ सैंधवें[15] शृंगारूनि देखा । म्हणे, 'हे नेटकी शूर्पनखा[16].' । पार्थसौमित्र[17] नासिका । छेदिलें ऐसें दावित. ॥ २८ ॥ शकुनि करोनि कुंभकर्ण । कुंकुमें लेपी नाक कान, । रावण करोनि दुर्योधन । रघुनंदन स्वयें होत. ॥ २९ ॥ आतां कृष्णअवतार गाढा । खेळ खेळोनि दाखवी पुढां । त्रयोदशवर्षांनीं सांकडा[18] । बौद्धत्व आम्हीं अवगणें. ॥ ३० ॥ पुढें माजलिया कळीतें । मारूं म्लेंच्छकर्मकर्ते । ऐसा खेळ खेळतां तेथें । गोत्रजांतें न साहे. ॥ ३१ ॥ पीडे पावती कौरवबंधू । दुर्योधना अतिविषादू । उक्ती नचले म्हणोनि शब्दू । मुखें कांहीं न बोले. ॥ ३२ ॥ हृदयीं धडके महारागें । शकुनीलागीं संकेत सांगे, । येरू हातें दडपी आंगे । 'समय नव्हे' म्हणोनी. ॥ ३३ ॥ निशाकाळीं जाऊनि सदना । जनकजननीतें वेधना[19] । पुत्र सांगती करूनि रोदना । अंगीं क्षतें[20] दाविती. ॥ ३४ ॥ भीमाचेनि करताडणें । अवघे बंधू जाऊनि प्राणें । नखेळों म्हणोनि राहतां मौनें । बळें आम्हां पीडितो. ॥ ३५ ॥ सौबळ[21] सांगे धृतराष्ट्रातें, । 'कुंतीचेनि द्वितीयसुतें । पुत्र मारिजेतील निवातें । जीत मेले न

---

१. देवाला हविर्दान करतेवेळीं जो उच्चार करतात तो. २. ओंव्या २२-३१ यांतील बाल्यक्रीडानुरूप अवतारवर्णन मुक्तेश्वरानें आपल्या कल्पनेनेंच केलें आहे. यास मूळांतील १२८ व्या अध्यायांत आधार नाहीं. ३. व्याकुळ प्राण होऊन. ४. कांसव. ५. बाहुभूषणें. ६. डुकर. ७. दाढा. ८. एक महाबलाढ्य असुर. हा कश्यपाचा पुत्र. हा भूलोकास पाताळांत घेऊन चालला असतां विष्णुरूप वराहानें याचा संहार करून पृथ्वीचा उद्धार करून तिला पूर्ववत् स्थापिलें, अशी कथा आहे. ९. दुर्योधनाला. १०. नरसिंह. ११. 'दुर्योधन' असाही पाठ आहे. १२. धरोनी. १३. परशुरामाकार. १४. पृथ्वी. १५. जयद्रथ. १६. रावणभगिनी राक्षसी. १७. अर्जुनरूप लक्ष्मण. १८. संकट. १९. पीडा. २०. व्रण, जखमा. २१. शकुनि.

विचारी.' ॥ ३६ ॥ अवलंबोनि वडीलपणा । राजा कांहीं नाणीच मना । म्हणे, 'भेदांग दावितां जना । अविवेक लागे आमुतें.' ॥ ३७ ॥ वडिला न-कळतां दुर्योधनें । कपटबुद्धी धरिली मनें । म्हणे, 'हा मृत्युवेषपणें । आम्हा-पाठीं लागला. ॥ ३८ ॥ रूपद्वेष विद्याद्वेष । अंगबळाचा आगळा द्वेष । लोक वर्णिती हाही द्वेष । अतिविशाळ वाढला. ॥ ३९ ॥ साधुनि निष्ठुरतेचा अर्थ । याचा प्रयत्नें करावा घात । तरीच वांचिजे, येऱ्हवीं मृत्य । भीम[1]हस्तें कौ-रवां. ॥ ४० ॥ हा ऐक[2] मारिल्या पाहीं । इतर चौघांचा लेखा[3] नाहीं. । मग आमुतें अपाय[4] कांहीं । मागां पुढां असेना.' ॥४१॥ कर्णशकुनीदुःशासना- । सहीत मांडिली विचारणा[5] । 'वधावया भीमसेना । उपाय कैसा सांगिजे.' ॥ ४२ ॥ एक म्हणे, 'घालिजे फांस.' । दुजा म्हणे, 'देइजे विष.' । तिजा म्हणे, 'सर्पदंश । निद्रास्थळीं करवावा.' ॥ ४३ ॥ दुःशासन म्हणे, 'लोटिजे उदकीं.' । दुःशीळ म्हणे, 'नकळतां लोकीं । शिळा घालोनि मस्तकीं । क्षणें मारून सांडावा.' ॥ ४४ ॥ शकुनी म्हणे, 'विचारवंत । गुप्त साधणें आपुला स्वार्थ । प्रगट लोकीं नकळे मात । ऐसे शहाणे वर्तती. ॥ ४५ ॥ सहज भीमा आगळी भूक । भक्षितां आवडती मोदक । त्यामाजी सूदोनि[6] मारक वीख । वनभोजनीं साधावा.' ॥ ४६ ॥ अवघे म्हणती, 'हा मुख्यार्थ । गुप्त हृदयीं राखावी मात.' । यावरी दुर्योधन सांगत । शिल्पीकारा[7] आदरें. ॥४७॥ 'जळविहारा वनविहारा । करावया आवडी राजकुमरां । त्वरें रचावें क्रीडागारा । कृत्रिमवनासमवेत. ॥ ४८ ॥ विश्रामस्थळ गंगातटीं । त्या नांव बोलिजे प्र[8]माणकोटी । उपरिका[9] गोपुरें[10] तळवटीं । गुप्तागारें[11] निर्मावीं, ॥ ४९ ॥ चित्र-विचित्र खेळकुलिया[12] । चौंपेखण[13] चौकडिया । बंधूलागीं कोठडिया । भिन्न भिन्न निर्माव्या. ॥ ५० ॥ वापी[14] पुष्करिणी[15] सरोवरें । कमळकल्हारीं[16] मनोहरें । ऊर्ध्वपंथा धांवती नीरें[17] । ऐशिया कळा कराव्या. ॥ ५१ ॥ सोमकांताच्या पा-षाणीं । भिंती चित्राव्या सुवर्णीं । मुक्ताफळांचेनि चूर्णीं[18] । संधिभाग लिंपावे. ॥ ५२ ॥ सप्तरंगीं रेखावीं चित्रें । वितानीं[19] लावावीं दिव्य वस्त्रें । रत्नखेळणीं

१. 'भीमरूपें' असाही पाठ आहे. २. भीम. ३. पाड, गणना, हिशेब. ४. 'अ-रिष्ट' असा अन्य पाठ आहे. ५. या भीमवधविचारणेचें वर्णन मुक्तेश्वराच्या कल्पनाशक्तीचें सू-चक होय. यास मूळांत आधार नाहीं. यांतील कवितापोषक कल्पना मुक्तेश्वराच्या स्वतःच्याच आहेत. ६. घालून. ७. कारागीरां. ८. गंगाप्रदेशीं असणाऱ्या स्थळाचें नांव. ९. माड्या. १०. उंच इ-मारती. ११. चोरघरें. १२. खेळावयाचीं स्थानें. १३. माजघर. १४. विहीर. १५. तळें, कमलिनी. १६. अनेक जातीचीं कमळें. १७. उदकें. १८. चुना. १९. छताच्या ठायीं.

अतिविचित्रें[१] । ध्वज पताका कळसादी.[२]' ॥ ९३ ॥ आज्ञा देतां दुर्योधना । याहूनि विशेष रचिली रचना । इंद्रभुवननंदनवना-। समान शोभा आणिली.॥९४॥धर्मासीं प्रार्थी दुर्योधन,। 'तुम्हांसहित वनभोजन । करावया इच्छी मन । श्लाघ्यें केलें पाहिजे.[३]' ॥९५॥ 'अवश्य[४]' म्हणोनि अजातशत्रु । बंधुसहित मानला मंत्रु । निर्मळ पोटीं या अमित्रु[५] । दुजा दृष्टी दिसेना. ॥ ९६ ॥ पंचभक्ष[६] आणी षड्रस । अन्नें चतुर्विध[७] सुरस । नवनीतपाचित[८] बहुवस । दुर्योधनें करविलीं. ॥ ९७ ॥ प्रथम साक्षा-[९]च्छिखिभर्जित । खर्परभर्जित[१०] दुजें येथ । उत्क्वथित[११] आणि स्वेदित[१२] । तैलपाचित[१३] पांचवें. ॥ ९८ ॥ मधुर[१४] तिक्त[१५] कषाय[१६] जाण । कटुम्ल[१७] आणि लवण[१८] । षड्रस बोलती विचक्षण । सूपशास्त्रीं[१९] जाणते. ॥ ९९ ॥ लेह्य[२०] पेय[२१] चोष्य[२२] खाद्य । अन्नें बोलिलीं चतुर्विध. । आज्य[२३] मधु दधि दुग्ध । हेमकळशीं[२४] सूदलीं. ॥ ६० ॥ शुद्धविश्वासी माणवसी[२५] । त्यासी सांगूनि शर्करारसीं । मोदक अपूपांचिया[२६] रासी । भीमालागीं करविल्या. ॥ ६१ ॥ जैपाळ[२७] सोमल अहिफेणा[२८] । बचनाग[२९] पै मेणा । राजविखें[३०] मारक नाना । एकमेळें सूदलीं. ॥ ६२ ॥ ज्यांचा वास लागतां घ्राणीं । प्राणाचा नाश तत्क्षणीं । अश्विनौदेव[३१] पातल्या गुणी । उतार कांहीं असेना. ॥ ६३ ॥ ज्यांचा स्पर्श होतां ओठीं । तात्काळ मरण पावे भेटी । ऐसीं अन्नें करूनि पाठी । चालविलीं साक्षेपें. ॥ ६४ ॥ पालाणिले[३२] रथ कुंजर । शृंगारिले राजकुमर । चौताळती अश्वसार । स्वेच्छा यानीं वळंघले. ॥ ६५ ॥ छत्रें उभविलीं विचित्रवर्णें । मेघडंबर सूर्यपर्णें । कनकदंडी वाळव्यजनें । भृत्य

---

१. तांबडा, काळा, पांढरा इत्यादि सात रंगानीं विचित्रता. २. ओंव्या ४८–५३ यांतील वर्णन मुक्तेश्वराच्या वर्णनशक्तीचें सूचक होय. ३. आदिपर्व–अध्याय १२८ श्लोक ३५-३६ पहा. ४. एवमस्तु. (अध्याय १२८ श्लोक ३७). ५. शत्रु. ६. पांच प्रकारचे भक्षणीय पदार्थ. ७. चार प्रकारचीं. ८. तुपांत पाकविलेलीं. ९. प्रत्यक्ष अग्नीनें भाजलेलें. १०. खापरामध्यें भाजलेलें. ११. कढविलेलें. १२. वाफ देऊन शिजविलेलें. १३. तळलेलें. १४. गोड. १५. तिखट. १६. तुरट. १७. कडु, आंबट. १८. खारट. १९. पाकशास्त्रीं. २०. मुखाच्या लाळेनें ओला करून चाटून खाण्याजोगा जो क्षीर, पंचामृत–साखर इत्यादिकांचा पाक इत्यादि पदार्थ. २१. पिण्याजोगा दूध इत्यादि. २२. रस मात्र घेऊन बाकी टाकण्यासा पदार्थ (ऊंस इत्यादि). २३. तूप. २४. सुवर्ण कलशांत. २५. स्वयंपाकी. २६. पुऱ्यांच्या. २७. एरंड्या. २८. अफू. २९. 'वत्सनाभिनाग पैं मेणा' असाही पाठ आहे. ३०. स्थावर आणि जंगम विषें, त्यांचा प्रभाव, त्यांजवर मंत्र औषधी इत्यादि उपाय, यांचें सविस्तर वर्णन वाग्भटकृत अष्टांगहृदयाच्या ३३ व्या अध्यायांत आहे. ३१. अश्विनीकुमार हें अश्विनीरूपधारी संज्ञानामक अप्सरेस सूर्यापासून झालेले दोन पुत्र. हे देवांचे वैद्य होत. ३२. सज्ज केले.

ढाळें ढाळितीं. ॥ ६६ ॥ पंच[2]प्रकारचीं वाद्यें । वाजतां गगन [3]भेदिलें नादें, । पांचही भिन्न भिन्न शब्दें । गर्जनेतें दाविती. ॥ ६७ ॥ एक वदनवातोद्भवें । एक खडतर यंत्रोद्भवें । एक चर्मकाष्टोद्भवें । कांस्योद्भवें पैं एक. ॥ ६८ ॥ वीरांमुखींचे विकट शब्द । या नाव बोलिजे सिंहनाद । यापरी वाद्यें पंचविध । एकवेळ गर्जती. ॥ ६९ ॥ पातले देवतटिनीतटा । **धा**र्तराष्ट्रा उत्साह मोठा । एक पेलिती गजघंटा । [6]महोत्साह विनोदें. ॥ ७० ॥ एक बैसले अश्वासहित । जळीं खेळती संतोषभरित. । एक शृंगारुनी पोतँ[7] । मंचकासनीं मिरवती.॥७१॥ [8]डोणिया [9]ताफे [10]सांगडी घटीं । चर्म वेष्टिला वेळू पाटी । माजी बैसोनि उभय-तटीं । धांव छंदेंच घेताती. ॥ ७२ ॥ उष्णद्रव्याच्या भक्षणें । एक करिती [11]आसवपानें । शीतबाधा बाधेल क्षणें । जळीं जळ खेळतां. ॥ ७३ ॥ वेढूनि पट्टकुळें पडदणी । **कौ**रव **पां**डव एक मिळणी । जळीं निघोनि हस्त धरणी । स्वेच्छानंदें क्रीडती. ॥ ७४ ॥ जळ शिंपिती परस्परीं । खेळ खेळती [12]अगाध-नीरीं । बुडिया मारोनि शोधातें करीं । एकमेकां पिटिती. ॥ ७५ ॥ बळें **कौ**रवांच्या थाटी । बुडवूं झोंबती **भी**मकंठीं । येरू अवघे वाहूनि पृष्ठीं । कुं-जर तैसा क्रीडत. ॥ ७६ ॥ [13]शुंशुमार घडियाळ मत्स्यमगर । कूर्म करमीन जळ-विखार । जळमाणसें नारीनर । वोढोनि बाहेर आणिती. ॥ ७७ ॥ अस्तमानीं सरला खेळ । [14]थडिये आला सुहृदमेळ. । दुर्योधन अतिस्नेहाळ । वस्त्रें ओपी **पां**डवां. ॥ ७८ ॥ शृंगारूनि वस्त्राभरणीं । परिवार गौरविला वचनीं । भक्ष्य-पानीं तांबूलदानीं । 'विश्रांति करा' म्हणतसे. ॥ ७९ ॥ प्रमाणकोटीस्थळ ए-कांतीं । भोजना पातल्या बंधुपंक्ती । सुवर्णताटावरी झळकती । रत्नवाटिया सु-तेजा. ॥ ८० ॥ जो जो पदार्थ जे जे पदार्थीं । मिनल्या वाढवी सुस्वाद प्रीती । तो पुढिलातें भक्षविती । स्वयें भक्षिंती संतोषें. ॥ ८१ ॥ दुग्धशर्कराघृतमिश्रित । क्षीरभोजनी एका आर्त । एक [15]वटक [16]कथिकायुक्त । [17]शाल्योदनें भक्षिती.॥८२॥

---

१. वारिती. २. 'पंचवाद्यप्रकारीं वीरवाद्यें' असाही पाठ आहे. ३. 'भरलें' असाही पाठ आहे. ४. युद्धध्वनि. ५. भागीरथीच्या तीरास. ६. 'मोहोदकीं विनोदें' असा अन्य पाठ आहे. ७. बालक. ८. लहान नौका. ९. लांकडें इत्यादि नदींतून तरून आणण्याकरितां जें साधन करि-तात तें. १०. दोन भोंपळे किंवा दोन लांकडें किंवा दोन नौका एकत्र बांधून पाण्यांतून तरण्यास्तव जी करितात ती. ११. मद्यपानें. १२. खोल उदकीं. १३. 'सुसरी मगरिया मत्स्याकार । कूर्मा-कारमेळीं जे विखार' असाही पाठ आहे. १४. तटाला. (तट=तड, गंगातट=गंगथडी; भीमातट= भिमथडी). १५. वडे. १६. कढीनें युक्त. १७. साळीचा भात.

एक मधुर शि[1]खरिणी । श्वेतभक्ष्य पंचवरान्नी । भरीतरोटिया भक्षणीं । आवड एका अपार. ॥ ८३ ॥ [2]दधिसार [3]दुग्धसार । मिळणि स्वादिष्ट अपार । एक सच्छिद्रें [4]अरुवार । नवनीतसंगें गोडसीं. ॥ ८४ ॥ मुखीं लावोनि लवणशाखा । [5]दध्योदन आवडे एका । एका खिचडिया अनेका । घृतप्लुता [6]भक्षिती. ॥८५॥ थिजल्या तुपासीं गुळवरिया । खाज्या करंज्या घृतपुरिया । सदृढ त्या गुळपो-ळिया । एक स्वइच्छा भक्षिती. ॥८६॥ नूतन धान्य सकोमळ । भर्जित घमघमित कोमळ । एकत्र करूनि शर्करा तिळ । म्हणती '[7]वाणगी भक्षा हो!' ॥ ८७ ॥ चणकवाटाणियांचे सोले । निंबरसें लवण आले । सूक्ष्म वाळकें बदरीफळें । नूतन न्यायें सेविती. ॥ ८८ ॥ फणसें दाळिंबें जांबळें । द्राक्षें नारिंगें [8]अमृतफळें । अंजीरें केळें [9]नारिकेळें । माहुलिंगें खर्जूरी. ॥ ८९ ॥ [10]कंपित्थें [11]गंगाफळें सु-रस । इक्षुदंड इक्षुरस । स्वइच्छा सेवितां संतोष । सर्वही बंधु पावले. ॥ ९० ॥ आपुले आवडीसारिखीं । भक्ष्यें भक्षिलीं सकळिकीं । दुर्योधन निजहस्तकीं । भीमसेना वाढीत. ॥ ९१ ॥ सद्यस्तप्तघृतसंयुक्त । मोदक चारिले संख्येरहित । अपूप अमूप विषभरित । भक्षविले यथारुची. ॥ ९२ ॥ दिवसा जळीं खेळतां श्रमला । शीतवातें अतिपीडिला । शय्यास्थळीं [12]पहुडविला । वृक्ष जैसा भूतळीं. ॥ ९३ ॥ निद्रेसी दीधलें भिन्नस्थळ । शय्या सूदली मृदु मवाळ । आपुले हस्तीं कुंतीबाळ । दुर्योधनें निजविला. ॥ ९४ ॥ अर्धनिशा लोटतां जाण । विषें घेरिला भीमसेन । उडोनि गेलें शरीरस्मरण । उमज कांहीं [13]पडेना. ॥ ९५ ॥ गाढनिद्रेमाजी प्रबळ । विषबाधेची मूर्च्छा केवळ । तेणें पडिला अतिव्याकुळ । शस्त्रघात स्मरेना. ॥ ९६ ॥ हें देखोनि दुर्योधन । कर्ण शकुनी दुःशासन । समीप येऊनि चौघेजण । काय केलें निष्ठुरीं. ॥ ९७ ॥ [14]लतापाशीं उभय हस्त । मागां बांधिले न सुटत । अंगुष्ठादि कटीपर्यंत । व-ज्रगांठी दीधल्या. ॥ ९८ ॥ चौघीं उचलोनि तात्काळीं । बांधोनि टाकिला अगाधजळीं । शिला बांधिली वक्षःस्थळीं । गिरिशृंगासारिखी. ॥ ९९ ॥ बं-

---

१. शिकरण.('पिकलेलीं केळीं, खरबूज इत्यादिक कुसकरून साखर व दूध घालून भुरकण्याजोगा जो पदार्थ करतात तीं'.) २. दह्याची साय. ३. दुधाची साय. ४. अरुवार=अरवार, अरवाळ. ('ज्या-मध्यें वातडपणा टणकपणा नाहीं असें केवळ हलकें झालेलें जें पक्वानादि तें'.) ५. दहिंभात. ६. 'सेविती' असाही पाठ आहे. ७. 'म्हणती तिळवा भक्षा हो' असाही पाठ आहे. ८. आंबे. ९. नारळ. १०. कवठीचें फळ. ११. भोंपळा. १२. निजविला. १३. 'असेना' असा अन्य पाठ आहे. १४. आदिपर्व–अध्याय १२८ श्लोक ५४ पहा.

[1]शेदंडें लोटिला परता । पाडिला जळधारे [2]आंतौता । गंगाजळीं पूर्वपंथा । जातां पाडिला प्रवाहीं. ॥१००॥ निः[3]शल्य मानूनि **दुर्योधन** । करिता झाला संतोषशयन । उदकीं टाकिला **भीमसेन** । तेंचि पुढां परिसावें.॥१०१॥ **गंगा** मिळोनि सागरीं । **भी**मा वोढोनि [4]महाविखारीं । नेला पाताळविवरीं । नागलोका आणिला. ॥ १०२ ॥ असंख्यसर्पकुळांची [5]मांदी । झोंबिन्नली संधी संधी । [6]अपायें लाधे उपायसिद्धी । तैसें विपरीत वर्तलें. ॥ १०३ ॥ **गंगा**मृताचेनि उल्हासें । [7]उरगाचेनि [8]दशनदंशें । [9]गरळ स्रवोनि [10]आपैसें । देह झाला निर्विष. ॥ १०४ ॥ उमज [11]पडिला **भी**मसेना । बळें तोडिलें करबंधना । झाडोनियां उभयचरणा । [12]पादग्रंथी सोडिल्या. ॥ १०५ ॥ हातें रगडितां सर्पतोंडें । सुटलीं सर्पांचीं [13]जुंबाडें । तडतडां तोडोनि शतखंडें । **गं**गोदकीं टाकिलीं. ॥ १०६ ॥ हें देखोनि बहु वि[14]खार । पळत प्रवेशले नगर । जेथें **वासुकी** राजेश्वर । **कुबे**रातुल्य संपत्ती. ॥ १०७ ॥ [15]पाताळ**भो**गावतीतीरीं । **भो**गावती नाम नगरी । **वा**सुकी राजा सहपरिवारीं । **इं**द्र[16] जैसा अमरांसीं.॥१०८॥ तया जाणविती मात । म्हणती, 'नवल अत्यद्भुत । प्रचंड पुरुष प्राणरहित । हस्तपादीं बांधला. ॥ १०९ ॥ **गं**गा[17]जीवनाचिये लोटीं । वाहत आला नगरानिकटीं । प्रेतत्व जाणूनियां दृष्टी । आतां सजीव दि[18]सताहे.' ॥ ११० ॥ वार्ता ऐकतां साचार । भुजगसहित भुजगेश्वर । समीप पातला **सत्वर** । अत्यादरें दयाळु. ॥ १११ ॥ सचेतन आणि सावधान । रूपगुणबळसंपन्न । दृष्टी देखोनि **भी**मसेन । सर्पराज संतोषे. ॥ ११२ ॥ **वा**सुकी बोले मधुर वाणी, । 'कोण्या उत्तमाची हे करणी । मरावया करबंधनीं । **गं**गाजळीं टाकिलें. ॥ ११३ ॥ असो. चुकलासि तया व्यसना । ऊठ, चाल आमुचे सदना । पृथादेवीच्या नंदना । **कृ**ष्णप्रिया ! पवित्रा!'॥११४॥ पुढती **वासुकी** [19]ऐळापत्र ।

---

१. काठीनें. २. जळधारेच्या आंत. ३. शत्रुरहित. ४. मोठे विषधारण करणारे सर्पादिक त्यांहीं, विषोल्वण नागांनीं. (अध्याय १२८ श्लोक ५६.) ५. मंडळी. ६. अनिष्टापासून इष्ट असें कार्य सिद्ध व्हावें अशी परमेश्वराची योजना जगाच्या व्यवहारांत कधीं कधीं दिसते या विधानाचें हें एक उदाहरण आहे. ७. सापाचे. ८. दांतांच्या चावण्यानें. ९. विष. १०. आपोआप. ११. 'पातला' असा अन्य पाठ आहे. १२. अध्याय १२८ श्लोक ५९ पहा. १३. समुदाय. १४. साप. १५. पातालगंगातटीं. १६. हाच अर्थ मूळांत आहे. (श्लोक ६० पहा.) १७. उदकप्रवाहांत. १८. अध्याय १२८ श्लोक ६१-६३ पहा. १९. सर्पविशेष.

स्नेहें बोले वाक्य पवित्र । 'दौहित्राचा[1] दौहित्र । सोयरा होय आमुतें.' ॥११९॥ म्हणोनि दिधलें आलिंगन । अमृतहस्तें स्पर्शिलें वदन । गृहा नेऊन म्हणे, 'कवण । वस्तु यातें निवेदूं[2]'. ॥११६॥ एळापत्र म्हणे, राया[3] ! । विषें पोळली किं काया । सुधारस प्राशावया । देणें उचित येकाळीं. ॥ ११७ ॥ यावेगळें जें उचित । ओपिसी तें वाटे व्यर्थ । जया जेकाळीं जें आर्त । तेंची ज्ञाते पुरविती. ॥ ११८ ॥ तरुणवरातें कन्यादान । क्षुधिता मिष्टान्नभोजन । दरिद्रियातें ओपिजे धन । परम धर्म या नांवें. ॥ ११९ ॥ यालागीं अमृतप्राशनें । याचा विषाग्नि शांत करणें । पुण्यकीर्ति जोडेल येणें । हें सर्वज्ञा! जाणावें. ॥ १२० ॥ कामातुरातें संन्यास । भुकेल्या करविजे उपवास । धाल्या[4] वाढिजे षड्रस । मूर्खाचार[5] या नांवें.' ॥ १२१ ॥ 'अवश्य' म्हणोनि उरगाधीशें[6] । आठही कुंडें भरलीं रसें[7] । एक दाऊनि संतोषें । 'प्राशन करवा' म्हणतसे. ॥ १२२ ॥ सर्पी धरूनि वीर बाहुटीं । नेला अमृतकुंडातटीं । बैसवूनि म्हणती, 'घोटीं । सुधारस प्राशीं कां.' ॥ १२३ ॥ येरें पाहात असतां सकळां । आठही[8] कुंडें एकेचिवेळां । प्राशिलीं जैसीं सिंधुजळां । अगस्तीच्या[9] आचमनीं. ॥ १२४ ॥ उरगीं[10] जाणवितां मात । आश्चर्य करी नागनाथ । वरद[11] वदे संतोषभरित । लक्षूनियां भीमातें. ॥ १२५ ॥ 'अमृतें भरलीं आठही कुंडें । ऐकसरें[12] प्राशिलीं तुंडें । यास्तव याचें सामर्थ्य गाढें । वाणिजेल सुरनरीं. ॥ १२६ ॥ नागायुतबळें बळिष्ठ ।

---

१. मुलीच्या मुलाचा (नातवाचा) आर्यकाचा दौहित्र शूर राजा आणि कुंतिभोजद्वारा शूराचा दौहित्र भीम. 'दौहित्रदौहित्र' असें पद मूळांतच आहे. (श्लोक६४-६५.) आर्यक (एलापत्र)या नागाची कन्या मारीषा अथवा भोजा. ही यदुकुलोत्पन्न शूरराजाची स्त्री. तिच्याठायीं शूरास झालेली कन्या पृथा आणि या पृथेचा पुत्र भीम, तेव्हां आर्यकाचा भीम हा प्रपौत्र होतो, म्हणजे पौत्रीचा पुत्र. यावरून 'दौहित्रदौहित्र' हा संबंध नीटसा जुळत नाहीं. २.कोणतें धन यास अर्पण करूं.३.हे वासुकि. ४. तृप्त झालेल्यास. ५. ओंव्या ११८-१२१ यांतील वर्णन मुक्तेश्वराच्या पदरचें आहे. यावरून याची प्रसंगानुरूप विस्तृत वर्णन करण्याची शक्ति व्यक्त होते. ६. सर्पश्रेष्ठें. (वासुकीनें.) ७. अमृतें. ८.अध्याय १२८ श्लोक ६७-७१ पहा. ९. अगस्त्यमुनि—हा मित्रावरुणांचा पुत्र. याचा कनिष्ठ भ्राता वसिष्ठ मुनि. इंद्राच्या शापानें वायु आणि अग्नि हे मृत्युलोकीं मित्रावरुणांपासून अगस्त्यवसिष्ठरूपानें जन्मास आले. मित्रावरुणांनीं आपलें तेज कुंभांत सोडिलें म्हणून यास 'कुंभयोनि' असें नांव पडलें. याच्या स्त्रीचें नांव लोपामुद्रा. कालकेय नामक असुर जनांस अत्यंत पीडा देत असत, तेव्हां यानें समुद्रोदकाचें शोषण करून त्या असुरांचा नाश केला. हा मोठा तपस्वी, विरक्त आणि तत्ववेत्ता होता. १०. सापांनीं. (उरग=उरसा गच्छतीति उरगः=उरानें जाणारा तो उरग.) ११. वर देणारा आर्यक. १२. एकदम. 'एकश्वासें' असाही पाठ आहे.

रणपंडितांमाजी वरिष्ठ । वानरवेषें **नी**लकंठ[1] उपमे एक **मारुती.**' ॥ १२७ ॥ करूनि अमृतरसभोजन । विश्रांति पावला **भी**मसेन । हेममंचकीं मृदु आस्तरण । सर्पराजें ओपिलें. ॥ १२८ ॥ तेथें पहुडला[2] सावकाशीं । जेंवी योगी समाधीसीं । हारल्या[3] क्लेशांचिया राशी । काळिमा कांहीं असेना[4]. ॥ १२९ ॥ येरीकडे जान्हवीकूळीं[5] । **प्र**माणकोटी विश्रांतिस्थळीं । सूर्य देखोनि उदयाचळीं । जागिन्नले समस्त. ॥ १३० ॥ सारूनियां प्रातःस्नानें । पालाणूनि[6] अनेक यानें । **कौ**रव आल्हादयुक्त मनें । नगराप्रती[7] चालिले. ॥ १३१ ॥ परस्परें बोलती शब्द । 'मैत्री आर्जव स्नेहवाद । श्रेष्ठ जोडी परम हे मंद । वृत्ती[8] कोण्ही नेणती. ॥ १३२ ॥ श्रेष्ठ **पां**डूचे नंदन । वाहती सर्वज्ञतेचा भान । परी हे गुणी अतिनिर्गुण । आमुलीक यां नाहीं. ॥ १३३ ॥ मागां सांडोन भावंडें । उतावेळ अवघ्यांपुढें । **भी**म गेला, त्यां नावडे । सुहृत्संग सर्वदा. ॥ १३४ ॥ आम्हीं झोंबूं परम आर्ते । परी हे बडविती लातें. । असो. जें मानलें त्याचिया चित्तें । तेंच मान्य आमुतें.' ॥ १३५ ॥ ऐसियापरी कपटयुक्ती । **धर्मा**अर्जुना परिसविती । परी ते परम दुश्चित चित्तीं । तें बरवें कांहीं वाटेना. ॥ १३६ ॥ **भी**मावीण चौघेजण । अतिउद्विग्न म्लानवदन । मुखें बोलतां नये वचन । तळमळती वियोगें. ॥ १३७ ॥ वहनें धांवडीत सत्वरा । **कौ**रव प्रवेशले नगरा । आपुलालिया निजमंदिरा । जाते झाले संतोषें. ॥ १३८ ॥ दृष्टी न देखतां **भी**म । शोकें जाकळे राजा **धर्म** । आळसें प्रवेशोनि धाम । मातेलागीं[9] विचारी. ॥ १३९ ॥ '**भी**म पुढें पातला श्रेष्ठे ! । कार्यार्थ तुवां पाठविला कोठें ? । रात्रीपासूनि हृदय फुटे । तयावीण[11] पैं माझें. ॥ १४० ॥ निशाकाळीं केलिया शयनीं । त्यावरी देखिला नाहीं नयनें । वाटे केला **दु**र्योधनें । अंधपुत्रें निर्घात.' ॥ १४१ ॥ वक्षस्थळ पिटोनि जननी । शोकें आंग टाकी धरणीं । **वि**दुर येऊन म्हणे वचनीं । 'स्थीर स्थीर, वो ! सुजाणे ! ॥ १४२ ॥ दुःख पावलिया अचाट[12] । धैर्यें आवरिजे लोट । अधीरें दुणावती कष्ट । ऐसें श्रेष्ठ बोलती.' ॥ १४३ ॥ यादवी[13] म्हणे, 'गा सर्वज्ञा ! । दुष्टबुद्धी **दु**र्योधना । अखंड **भी**माचिया हननां[14] । उपाय चिंती मानसीं. ॥ १४४ ॥ तेणें निश्चयें घात केला ।

---

१. शिव. (नीलवर्णआहे कंठ ज्याचा तो.) २. निजला. ३. 'भिनल्या' असा अन्य पाठ आढळतो. ४. 'उरेना' असा अन्य पाठ आहे. ५. गंगातीरीं ६. सज्ज करून. ७. अध्याय १२९ श्लोक ३ पहा. ८. वार्ता. ९. पोळे. १०. अध्याय १२९ श्लोक ४-९ पहा. ११. 'त्याचेनिवीण प्राण पां' असा अन्य पाठ आहे. १२. मोठें. १३. कुंती. १४. 'मरणा' असाही पाठ आहे.

अन्यथा नाहीं यथा बोला.' । क्षत्ता म्हणे, 'करीं उगला । वाग्व्यापार येकाळीं. ॥ १४५ ॥ बोलतां घडेल अनर्थ । उरलियांचा होईल घात । पडिली दुष्टांसीं संगत । विचारबळें निस्तारिजे. ॥ १४६ ॥ विवेकें धरूनियां धीर । हृदयीं चिंतीं कमळावर । स्वस्तिक्षेम तुझा कुमर । शीघ्र येईल तुजपाशीं. ॥ १४७ ॥ क्षमा अवलंबूनियां मनें । उरले वांचवीं प्रयत्नें । बोलतां दुष्टांचीं दूषणें । अनर्थ वाढे रोकडा.' ॥ १४८ ॥ ऐकोनि विदुरगुरूचें वचन । माता आणी चौघे-जण । अवलंबोनि महामौन । बाहेर गमन टाकिलें. ॥ १४९ ॥ आठवितां भीमसेन । हृदयीं धडके शोकहुताशन, । जेंवी अर्थ गेलिया कृपण । मत्स्य-प्राय तळमळी. ॥ १५० ॥ येरीकडे वासुकीसदनीं । अष्टम दिवस लोटल्या गुणी । जागा झाला जेंवि तरणी । उदयो करी प्रभातें. ॥ १५१ ॥ अंगीं जिरला अमृतरस । हृदयीं न धरे महोल्हास । शरीरीं दुणावला कैस । अत्यद्भुत बळाचा. ॥ १५२ ॥ कृष्णचरणीं भावार्थ जया । तो प्रारब्धें नेलिया विषम ठाया । तेथें पावोनि [10]संतोषजया । पूज्य होय सर्वांतें. ॥ १५३ ॥ वासुकी[11] म्हणे, 'यादवीतनुजा ! । तुजवीण तुझिया सगुणानुजा । जननी आणी धर्मराजा । परम दुःखावस्था होतसे. ॥ १५४ ॥ तूतें न देखतां जाण । पांचहीजण त्यजितील प्राण । दर्शन देऊनि समाधान । जीव त्यांचे वांचवीं.' ॥ १५५ ॥ आवडी करूनि मार्जनें[12] । ओपिलीं दिव्य वस्त्राभरणें । पंच[13] भक्ष्यादी परमान्नें[14] । भोजन दीधलें स्वपंक्तीं. ॥ १५६ ॥ सुहृद सर्प देऊनि संगें । नागलोक लंघूनि वेगें, । बंधूसहित होता मागें । तयास्थानीं थोपैलें. ॥ १५७ ॥ ठेऊनि पांडूचा कुळदीप । अदृश्य झाले महासर्प । भीम निर्भय निष्कंप । नगरपंथें चालिला. ॥१५८॥ अष्टम दिवसीं पातला सदना । धांवोनि धरी मातृचरणा । [16]पान्हा फुटला उभयस्तना । कंठीं मिठी घातली. ॥ १५९ ॥ हृदयीं कवळोनि माय । दीर्घस्वरें मोकली धाय, । म्हणे, 'तान्हया झालें काय? । कोठें काळ लोटिला? ॥ १६० ॥ तुजवीण शून्य पडली सृष्टी । जावया प्राण पातले कंठीं.' । भीम म्हणे, 'स्वस्थ

१. विदुर. २. अध्याय १२९ श्लोक १७-१८ पहा. ३. लक्ष्मीपति. ४. सुखरूप. ५. प्रत्यक्ष, तात्कालिक. ६. अग्नि. [हुत+अशन=हवनीय द्रव्य+भक्षण ज्याचें तो.] ७. आदिपर्व-अध्याय १२९ श्लोक २० पहा. ८. सूर्य. ९. सत्व, अर्क. १०. संतोष आणि जय. ११. मूळांत 'भुजंगम बोलतात' असें आहे. (अध्याय १२९ श्लोक २१.) १२. स्नानें. १३. पंच खाद्यें=सारीक, खोबरें, दाळ, लाह्या व पोहे. १४. पंच परमान्नें=पंच पक्वान्नें=घीवर, लाडू, खाजी, जिलबी आणि गुळोरी. १५. 'पातला' असाही अन्य पाठ आहे. १६. 'पान्हा दाटला मातुःस्तना' असा अन्य पाठ आहे.

पोटीं । होवोनि ऐका वृत्तांत.' ॥ १६१ ॥ ईश्वर मानूनियां विदुर । घातला साष्टांग नमस्कार । विदित केला समाचार, । जो कां आगें अनुभविला. ॥१६२॥ वंदूनि अग्रजाचे चरण । आवडी दिधलें आलिंगन, । मस्तकें केलीं अवघ्राण । पार्थादीक बंधूचीं. ॥ १६३ ॥ [3]गोत्रपुरुषांची वर्तणुक । विषबाधेचें परम दुःख । नागलोकींचें कौतुक । सांगतां चोज समस्तां. ॥ १६४ ॥ जिंतवण करूनि जननी । वस्तू सांडिल्या ओवाळूनी । ब्राह्मण पूजिले गुप्तदानीं । कौरवांतें नेणतां. ॥ १६५ ॥ विदुरमतें कुंतीबाळ । सावधवृत्ती सर्वकाळ । कौरवांसीं निकट मेळ । मनोभावें त्यागिला. ॥ १६६ ॥ एकावेगळा एक न फुटे । तयां संगतीं न वेंचती कोठें । सखोलबुद्धीचेनि नेटें । निज मर्यादा वर्तती. ॥१६७॥ विष्णुस्मरणें विष्णुभजनें । विष्णुमूर्तीचे सदा ध्यानें । विष्णुपूजनप्रतिमार्चनें । काळ सार्थक लोटिती. ॥ १६८ ॥ भारतपवित्रकथाजीवन । त्यावरी घटिका सभाग्य श्रवण । भारत भरतां निमज्जन । स्वानंदजळीं स्वभावें. ॥ १६९ ॥ तेथें प्रकृतीपुरुषासी । लग्न लागेल निर्धारेसीं । अनधिकारीया मोक्षरसीं । तृप्ती पावे सर्वदा. ॥ १७० ॥ मंडपीं पारिखे वऱ्हाडी । आप्तासमान मिष्टान्न गोडी । सेविती तेंवी जडमूढीं । गती पाविजे भारती. ॥ १७१ ॥ अवधूतपदजलसरोवरीं । मुक्तेश्वर सप्रेम शैफरी । म्हणोनि वियोग शुष्कतीरीं । लागतांक्षणीं प्राणांत. ॥१७२॥ [10]इति श्रीआदिपर्वे भारत । पुढें निरूपण अत्यद्भुत । विद्याभ्यासचरितामृत । कर्णपात्रीं धरावें. ॥ १७३ ॥

अध्याय तिसावा.

प्रज्ञाचक्षु निजमानसीं । संकल्प कल्पी विचारेसीं । धनुर्वेदविद्याभ्यासीं । कुमार सर्वेही लावावे. ॥ १ ॥ धार्तराष्ट्र एकशत । कर्ण पांडव वैश्यासुत ।

---

१. हुंगणें. २. अध्याय १२९ श्लोक ३० पहा. ३. दुर्योधनादि गोत्रजांचें निपचारणादि आचरण. ४. जितवण=जीवितावन (जीविताचें रक्षण)=मुलानें चिरंजीव व्हावें म्हणून आई किंवा घरांतील वडील बाया दिवा ओंवाळण्याचा अथवा अन्न ओंवाळून टाकण्याचा जो विधि करतात तो. औक्षवण (आयुष्यावन) हाही असाच एक सुप्रसिद्ध विधि आहे. ५. जाती. ६. 'भारता ऐसा निज सज्जन' असा अन्य पाठ आढळतो. ७. 'तृप्ती लाधे संसर्गें' असा अन्य पाठ आहे. ८. अवधूताच्या चरणरूप उदकाच्या तळ्यांत. ९. मत्स्यविशेष. १०. या अध्यायास 'प्रमाणकोटिवनक्रीडण' असें नांव दोन जुनाट हस्तलिखित प्रतींत आहे. या अध्यायांत मूळांतील १२८-१२९ या अध्यायांचा समावेश झाला आहे. ११. युयुत्सु.

शताहुनि आगळे सात । पाचारिले जवळिके. ॥ २ ॥ धनुर्विद्याराजगुरु । कृपाचार्य परम चतुरू । गौ[1]तमवीर्य अजरामरू । [2]शरस्तंबीं जन्मला. ॥ ३ ॥ तयाचे स्वाधीन केले सकळ । विद्याव्यसनीं परम कुशळ । अनालस्य सर्वकाळ । विद्याभ्यासीं लागले. ॥ ४ ॥ [3]राजा म्हणे, 'वक्तया । वैशंपायना चातुर्यसूर्या ! । शरस्तंबीं कृपाचार्या । जन्म झाला सांगसी. ॥ ५ ॥ तेंचि विस्तारें करीं कथन । कथाव्यसनीं भुललें मन.' । वक्ता म्हणे, 'सावधान । ऐकें आतां नरेंद्रा ! ॥६ ॥ सप्तऋषींत पंचमस्थानीं । गौतम जाण परमज्ञानी । [4]गंगापरिसरीं तपोवनीं । तपश्चर्या आचरे. ॥ ७ ॥ वेदशास्त्रीं परम निपुण । श्रेष्ठ तापस तपोधन । धनुर्विद्ये [5]सूदलें मन । तेही कळा लाधली. ॥ ८ ॥ शंकर अगस्ती परशुराम । धनुर्विद्येंत विशेष परम । तयांतुल्य ऋषि गौतम । निपुण झाला शस्त्रास्त्रीं. ॥९॥ शापें शरें महामारक । देखोनि अमरांचा [6]नायक । म्हणे, 'जिंकी माझा लोक । [7]उभयबळें तपस्वी. ॥ १० ॥ हाणी होय याचिया पुण्या । ऐसिया पाडूं अपाय व्यसना,' । म्हणोनि धाडिली देवकन्या । [8]जालपदी या नांवें. ॥ ११ ॥ धनुष्य बाण धरूनि मुष्टी । ऋषी अवलोकी अरण्य दृष्टी । तंव [9]अप्सरातनु [10]गोमटी । उभी ठेली सन्मुख. ॥ १२ ॥ तिचें अवलोकितां वदन । हृदयीं संचरला मदन । हस्तींहूनि [11]धनुष्यबाण । गळोनि पडिलें [12]तळवटीं. ॥ १३ ॥ आठवितां संगसुरत । शरीर झालें रोमांचि[13]तें, । अधोसंधी सुटलें रेत । तें सांडलें भूतळीं. ॥ १४ ॥ शरांवरतें अमोघ । पडोनि झाले दोन [14]भाग, । एक घडलें पुरुषलिंग ।

---

१. कृपाचार्य हा गौतमकुलोत्पन्न शरद्वान् ऋषीचा पुत्र. २. शर नामक तृणाच्या स्तंबाबरोबर (समूहाबरोबर) झालेला, शर नामक तृण ज्यास बंधुवत् प्रिय असा. ('जातः सह शरैः; शरस्तंबे समुद्भूतः' असें मूळांत आहे.) ३. जन्मेजय. ४. गंगेजवळच्या भूमीच्या ठायीं. ५. घातलें. ६. इंद्र. ७. मंत्र आणि धनुष्य यांच्या बलानें. ८. 'जानपदी' असें नांव महाभारतांत आहे. (आदिपर्व–अध्याय १३० श्लोक ६.) ९. अप्सरा ह्या समुद्रमंथनकाळीं अप् म्हणजे उदक यापासून उत्पन्न झाल्याः–'अप्सु निमथनादेव रसात्तस्माद्वरस्त्रियः । उत्पेतुर्मनुजश्रेष्ठ तस्मादप्सरसोऽभवन् ॥'. ह्या गंधर्वांगना असून स्वर्वेश्या आहेत. ह्या इंद्राच्या दासी असून त्याला कोणाच्या तपाचें भय वाटलें म्हणजे तपोभंग करण्याच्या कामीं मोठ्या कुशल, म्हणून त्याच्या आज्ञेनें ह्याच जावयाच्या आणि कार्यसिद्धि करून परत यावयाच्या. उर्वशी, मेनका, रंभा, घृताची, तिलोत्तमा सुकेशी, मंजुघोषा, इत्यादि प्रमुख सुरवेश्या होत. बाणकवीनें यांचीं चवदा कुळें असल्याविषयींचा उल्लेख कादंबरी ग्रंथांत केला आहे. अप्सरा आपल्या नृत्यविलसितानें विजांस लाज आणतात असें त्याचें वर्णन संस्कृत ग्रंथांतून आढळतें. १०. सुंदर. ११. अध्याय १३० श्लोक ९ पहा. १२. खालच्या प्रदेशीं. १३. हर्षानें आंगावरील केश उभे राहिलेले असें. १४. अध्याय १३० श्लोक १३ पहा.

कन्याकार भाग एक. ॥ १५ ॥ छळिलें जाणोनि सहस्रनेत्रें[1] । त्यजूनि अजिनें[2] हव्यपात्रें । गौतम गेला स्थळें पवित्रें । अवलोकीत तपार्थी. ॥ १६ ॥ शांतनुराजा अरण्यमृगया । खेळत पातला तया ठाया । उभय बाळकें देखोनि हृदया । महामोहें आकळिला.[3] ॥ १७ ॥ देखोनि होमपात्रें अजिनें । ब्रह्मवीर्यज[4] ऐसें मनें । निश्चय करूनि कुरुनंदनें । मग वोसंगीं[5] घेतलीं. ॥ १८ ॥ समारंभ आणूनि घरा । जातकर्मादिसंस्कारा[6] । संपादितां राजेश्वरा । परम आल्हाद मानसीं. ॥ १९ ॥ भाऊनि आपलीं बाळकें । वाढविलीं अतिकौतुकें । कृपेनें पाळिलीं म्हणोनि मुखें । तींच नामें ठेविलीं. ॥ २० ॥ कृप कृपी ऐसी नामें । पाचारितां अतिसंभ्रमें[7] । वृत्तांत जाणोनि गौतमें । बीज केलें त्या ठाया. ॥ २१ ॥ आपुलीं ऐसें करूनि ज्ञानें । नृपा दीधलीं आशीर्वचनें । धनुर्वेदविद्याधनें । पुत्रालागीं दीधलीं. ॥ २२ ॥ कृपी विधीनें द्रोणाचार्या । पाणिग्रहणीं[8] केली भार्या । तीच्या उदरीं नरेंद्रवर्या ! । अश्वत्थामा जन्मला. ॥ २३ ॥ असो. यापरी गौतमवीर्यें । देह धरिला कृपाचार्यें । तो आचार्य कुरुवर्यें । पुत्रांलागीं योजिला. ॥ २४ ॥ अनेकदेशींचे राजकुमर[9] । विद्येलागीं पातले चतुर । राजगुरूतें निरंतर । विद्याभ्यासें[10] सेविती. ॥ २५ ॥ ऐसे लोटले कांहीं दिवस । भीष्म पडताळी[11] विद्याभ्यास, । म्हणे, 'शिष्यप्रज्ञा बहुवस[12] । सांगणें स्वल्प गुरूचें.' ॥ २६ ॥ म्हणे, 'जेवित्या[13] क्षुधा बहुत । निश्चळ कृपण वाढितां हात । तैं इच्छेनें भोक्ता नव्हे तृप्त । तैसें येथें[14] दिसताहे. ॥ २७ ॥ पुत्रपुत्राची[15] प्रज्ञा सुमती । देखोनि विचार विवरी[16] चित्तीं । विशेष विद्येची संपत्ती । प्राप्त व्हावी ययातें. ॥ २८ ॥ पशुत्वें भजनाचा[17] घातला घाणा । जुंपोन करवी प्रदक्षिणा, । पेंड कीं तैल यया ज्ञाना । पात्र नव्हे निर्धारें. ॥ २९ ॥ एक म्हणती भावार्थ फळे, । असो, तें वर्म कोणा न कळे, । आतां ब्रह्मांडची सगळें । गुरूभावना

---

१. इंद्रें. [अहल्येबरोबर इंद्रानें व्यभिचार केला, तेव्हां तिच्या भर्त्यानें (गौतममुनीनें) 'तुझ्या अंगास सहस्र भगें (भोंकें) पडतील असा त्याला शाप दिला. नंतर इंद्रानें गौतमाची प्रार्थना अनेक प्रकारें केली, तेव्हां ऋषीनें प्रसन्न होऊन 'तुझीं भगें नेत्रें होतील' असा उश्शाप दिला. या गोष्टीवरून इंद्रास 'सहस्रनेत्र' असें नांव पडलें.] २. कृष्णाजिनें. ३. व्याकुळ झाला. ४. ब्राह्मणाच्या वीर्यापासून झालेलीं, द्विजांती. ५. मांडीवर. [वोसंग=उत्संग.] ६. पृष्ठ २१६ टीप २० पहा. ७. अत्यंत आदरानें. ८. विवाहद्वारा. ९. यादव इत्यादि. १०. 'नित्याभ्यासें' असा पाठभेद आहे. ११. परीक्षा घेई, अनुभव पाही. १२. पुष्कळ. १३. या वर्णनास मूळांत आधार नाहीं, कवीनेंच समयानुरूप योजिलें आहे. १४. 'कांहीं' असा पाठभेद आहे. १५. नातवाची. १६. विवरणें=निर्णय करणें, मनांत घोळणें. १७. 'भजनाचिया' असा पाठभेद आहे.

भाविजे. ॥ ३० ॥ आग्रहें सेविजे अयोग्य गुरू । तो शिष्य तेलियाचा ढोरू । डोळे बांधोनि निरंतरू । फेरे घाली भोंवते. ॥ ३१ ॥ संशयेसीं अज्ञान झडे । सर्वज्ञता अनुभवें जोडे । ऐसें बहुत गुरूंच्या तोंडें । साधूनि घेती जाणते. ॥ ३२ ॥ चोविसांचे[1] घेऊन गुण । अवधूत[2] पावला समाधान । बृहस्पतिशिष्या[3] ब्रह्मज्ञान । कृष्णें कथिलें उद्धवा.[4] ॥ ३३ ॥ म्हणूनि सद्गुरूवीण ज्ञान विशेषें । अभेदभावना भजावी शिष्यें । जेवीं दीपिकाप्रकाशें । गृहाचार सुपंथ. ॥ ३४ ॥ विचारितां एथें कांहीं । निषेधानीं लाग नाहीं । बहुतां नाविकांच्या बाहीं[5] । नौका थडिये[6] लाविजे. ॥ ३५ ॥ कृपाचार्य नव्हे नेण । शस्त्रविद्ये परमनिपुण, । अस्त्रबीजरहस्यगहन । कथिले नाहीं गौतमें. ॥ ३६ ॥ भार्गव[7] अथवा ऐकिजे द्रोण । जरी भेटती भाग्येंकरून । तरी हे होती विद्यानिपुण । इच्छा पूर्ण तैं माझी.' ॥ ३७ ॥ ऐसी भावना भाग्यवंत । रिकतां द्रोणचि पातला तेथ । तेणें अमोघ[9] विद्यावित्त । कुरुवंशजां ओपिलें. ॥ ३८ ॥[8] हेंही विस्तारोनि निरूपण । तुजप्रती पाहिजे केलें कथन । प्रश्न करावया उदित मन । ऐसें जाणोनि बोलत. ॥ ३९ ॥ भारद्वाज तपस्वी श्रेष्ठ । ध्यानतपनेमिष्ठ । गंगाद्वारीं एकनिष्ठ । अनुष्ठानीं तिष्ठत. ॥ ४० ॥ तेथेंच घृताची देवांगना । विनोदें पातली गंगास्नाना, । स्नान सारूनि[10] हेमवसना[11] । वेढितां दृष्टी देखिली. ॥ ४१ ॥ अवलोकितां अंगनावपू[12] । हृदयीं जागिन्नला कंदर्पू[13] । जैसा डंवचिला काळसर्पू । फडा काढी, फुंफाटे. ॥ ४२ ॥ प्रमदावेधें विचारमंदु । हृदयीं कोंदला सुरतानंदु । अधोसंधी सुटला बिंदू । पर्वतोदकासारिखा. ॥ ४३ ॥

---

१. दत्तात्रयाचे चोवीस गुरु यांचीं नांवें:—पृथ्वी, वायु, आकाश, आप, अग्नि, चंद्र, रवि, कपोत, अजगर, सिंधु, पतंग, मधुकृत् (भ्रमर), गज, मधुहन्, मीन, पिंगला, कुरर (पक्षी), अर्भक (बाल), कुमारी, शरकृत् (बाण करणारा), सर्प, ऊर्णनाभि (कांतीण) आणि सुपेशकृत् (कुंभारीण—कीटक.) [भागवत—एकादश स्कंध—अध्याय ७ श्लोक ३२-३४.] या प्रत्येक गुरूपासून जें काय शिक्षण संपादावयाचें त्याचें वर्णन भागवतांत केलें आहे. [स्कंध ११ अध्याय ७-९]. २. अवधूत—बालोन्मत्त पिशाच वृत्तीनें पृथ्वीवर भ्रमण करणारा दत्तात्रेय नामक ब्राह्मण, याचा यदुराजाशीं संवाद झालेला आहे. [भागवत—स्कंध ११ अध्याय ७-९.] ज्यानें संसारत्याग केला आहे त्यासही 'अवधूत' असें म्हणतात. ३. उद्धवास. ४. उद्धवाचा ज्ञानाधिकार पाहून कृष्णानें त्यास आत्मतत्त्वोपदेश केला असें वर्णन भागवतांत आहे. [स्कंध ११.] ५. भुजांनीं. ६. तडीला. ७. परशुराम. ८. या भीष्मोक्तींत गुरुमाहात्म्याविषयीं जें वर्णन आहे तें मुक्तेश्वराच्या बहुश्रुतत्वाचें दर्शक होय. त्यास आधार मूळ महाभारतांत नाहीं. ९. फलदायक. १०. उरकून. ११. कनकवस्त्र. १२. स्त्रियेचा देह. १३. मदन. (अध्याय १३० श्लोक ३५-३६).

रेत सांडतांचि धरणीं । ऋषीनें धरिलें पर्णद्रोणीं । अमोघ वीर्य तेचक्षणीं । दिव्य कुमर जन्मला. ॥ ४४ ॥ [1]द्रोण[2]कलशीं पावला जनन । त्यालागीं नांव ठेविलें द्रोण । ऋषीपासूनि वेदाध्ययन । संस्कारादि लाधला. ॥ ४५ ॥ [3]अग्निवेश अग्निकुमरू । धनुर्वेदविद्याचतुरू । तो आदरेंकरूनि गुरू । सेवा करी शिष्यत्वें. ॥ ४६ ॥ अग्निअस्त्राचे प्राप्त्यर्थीं । सेवा करी [4]अहोराती । [5]गुरुबंधु जोडिला संगती । [6]द्रुपदनाम सुमित्र. ॥ ४७ ॥ पृषत पांचाळराज नृपती । त्याचा पुत्र विवेकसुमती । तो द्रुपद द्रोणाचिये संगतीं । विद्याभ्यासीं उद्दिष्ट. ॥ ४८ ॥ दोघे लाधले विद्याधन । लाहोनि गुरूचें आज्ञावचन । पांचाळ देशाप्रति आपण । द्रुपद जाय ते काळीं. ॥ ४९ ॥ द्रोण बोले मित्रभावार्थें, । 'जनकें राज्य ओपिल्या तूतें । आलिया, सांभाळावें मातें । गुरुबंधुत्व स्मरोनी.' ॥ ५० ॥ द्रुपद म्हणे, 'मी राज्यधर । झालिया कैसेनि पडेल विसर ? । राज्य तुझें हा निर्धार । धरूनि राहें मानसीं.' ॥ ५१ ॥ द्रुपद गेलिया [7]अहिच्छत्रा । पित्यानें केली स्वर्गयात्रा । राज्य प्राप्त झालें पुत्रा । द्रुपदराजा ते काळीं. ॥ ५२ ॥ भारद्वाजऋषीचे आश्रमीं । शरीर त्यागूनि योगधर्मीं । ब्रह्मादिकांचिया [9]धामीं । वसता झाला सुकृतें. ॥ ५३ ॥ तेच आश्रमीं द्रोणाचार्या । बहुकाळ करितां तपश्चर्या । शारद्वती वरिली भार्या । [10]प्रजोत्पत्तीकारणें. ॥ ५४ ॥ गौतमकन्या लावण्यगुणी । कृपाचार्यांची कनिष्ठ भगिनी । शांतनुराजें वेदविधानीं । द्रोणालागीं अर्पिली. ॥ ५५ ॥ तिच्या पोटीं जन्मला कुमर । काळा नाकळे [11]वैश्वानर । जन्मकाळीं महाथोर । शब्द केला स्वमुखें. ॥ ५६ ॥ उच्चैःश्रव्याचें गर्जन । तैसें परिसोनि देवगण । [12]अश्वत्थामा हें अभिधान । ठेविते झाले तयातें. ॥ ५७ ॥ शुभलक्षणें चिरंजीविया । पुत्र देखोनि द्रोणाचार्या । आनंद वर्तला तो हृदया । धरिला [13]नै वचे सर्वथा. ॥ ५८ ॥ यावरी वार्ता ऐकिली श्रोत्रीं । भार्गवें वधूनि सर्व क्षेत्री । ब्राह्मणा वोपिली [14]धरित्री । [15]सागरांत प्रतापें. ॥ ५९ ॥ विशाळवसुधाकनकताटीं ।

---

१. द्रोणकलशसंज्ञक यज्ञपात्रांत. २. अध्याय १३० श्लोक ३८ पहा. ३. अग्निवेश हा अग्नीचा पुत्र. यापासून द्रोणाचार्यांनें धनुर्वेदाची शिक्षा घेतली. भरद्वाज मुनीनें आग्नेय अस्त्र अग्निवेशाला दिलें होतें, तें त्यानें आपला गुरुपुत्र जो द्रोण त्याला पढविलें. [अध्याय १३० श्लोक ३९-४० नीलकंठकृत टीका पहा.] ४. अहन्+राती=दिवस+रात्र. ५. गुरुबंधु—एका गुरूचे जे अनेक शिष्य ते परस्पर गुरुबंधु होत. ६. द्रुपद हा भरद्वाजसखा जो पृषतराज त्याचा पुत्र. ७. अहिच्छत्रा—द्रुपदराजाची पूर्व नगरी. ८. पृषतराजानें. ९. स्थानीं. १०. अध्याय १३० श्लोक ४५ पहा. ११. अग्नि. १२. अध्याय १३० श्लोक ४८-४९ पहा. १३. न जाई. १४. पृथ्वी. १५. सागर आहे अंत (सीमा) अशी (धरित्री).

अनेकरत्नाचिया कोटी । भरून ऋषींच्या करसंपुटीं । वायनदानें वोपिल्या. ॥ ६० ॥ ब्रह्मांडगेहीं सांडोनि परतें । दरिद्र पळविलें, नेणो केउतें । हें परिसोनि परम-[1]आर्तें । द्रोणाचार्य निघाला. ॥ ६१ ॥ हृदयीं धरूनि आर्तकाम । टाकिला महेंद्र पर्वतोत्तम । भार्गवाश्रमीं भार्गवराम । लोटांगणीं वंदिला. ॥ ६२ ॥ 'स्वागत' पुसे कल्याण राम, । द्रोण म्हणे, 'मी द्रव्यकाम । स्वामीचे चरण कल्पद्रुम । टाकोनि आलों [2]श्रांतलों. ॥ ६३ ॥ दानसूर्याचेनि प्रकाशें । तीन्ही लोक उजळिले दिशे । दरिद्र [3]उल्लूक पळतां न दिसे । ठाव कोठें लपावया. ॥ ६४ ॥ [4]देशांधेर निबिड पाहीं । संतोषदीप नलगे कांहीं । म्हणोनि [5]दाटली माझे गेहीं । सांगों आलों स्वामियां.' ॥ ६५ ॥ आदरें भार्गवराम बोले, । 'आळस कासया केले पहिले ? । तुज पाहिजे तें गेलें । वेंचोनि[6]यां सर्वही. ॥ ६६ ॥ सुवर्ण रजत रत्नजाती । दान दीधल्या ब्राह्मणाप्रती । कश्यपा ओपिली [7]वसुमती । [8]नगरमालिनी शोभित. ॥ ६७ ॥ अस्त्रविद्या आणी शरीर । उरलें असे गा ! [9]साचार । यांत मानेल तें सत्वर । माग मातें ब्राह्मणा !' ॥ ६८ ॥ द्रोण म्हणे, 'जगद्गुरु देवा ! । अस्त्रविद्याधनाचा ठेवा । माझे हृदयीं जिरवावा । कृपाकरूनि स्वामिया.' ॥ ६९ ॥ '[10]अवश्य' म्हणोनि [11]रेणुकातनय । शिष्य करूनि द्रोणाचार्य । अस्त्रविद्याप्रतापसूर्य । हृदयाकाशीं उजळिला. ॥ ७० ॥ '[12]आगमोक्तमंत्रबीजें । [13]सवीर्य ओपिलीं [14]लोकराजें । युद्धकाळीं कल्पिजे जें जें । तें तें अस्त्र प्रसवती. ॥ ७१ ॥ 'क्षत्रिया आणि ब्राह्मणवर्णा । वांचूनि उपदेश न करीं कोणा' । लाहोनि समर्थगुरूची आज्ञा । द्रोण स्वाश्रमा [15]पातला. ॥ ७२ ॥ चालवीत असतां गृहस्थाश्रम । दरिद्रें केला सर्व विराम । [16]धनधान्यविरहित श्रम । दारा पुत्र भोगिती. ॥ ७३ ॥ स्वइच्छा [17]धनेश्वराचे कुमर । सुवर्णपात्रीं भक्षिती क्षीर । हें देखोनि रोदन करी थोर । अश्वत्थामा बाळक.

---

१. आवडीनें. २. श्रमलों. ३. घुबड. ४. देशांतील काळोखी. ५. 'दडाली' असा पाठभेद आहे. ६. अध्याय १३०-श्लोक ६१ पहा. ७. पृथ्वी. ८. नगरांची माला (पंक्ति) जींत आहे अशी (वसुमती). 'नगरमालिनी' हेंच विशेषण मूळ ग्रंथांत योजिलें आहे. (श्लोक ६२ पहा.) ९. खरोखर. १०. अध्याय १३० श्लोक ६४-६७ पहा. ११. भार्गवराम. १२. शास्त्रोक्त मंत्र व त्याचीं बीजें. १३. प्रयोग रहस्य प्रभाव यांसह. १४. 'विश्वराजें' असाही पाठ आहे. १५. या ७२ ओव्यांतील वृत्त पंतांनीं ३१ गीतींत समाविष्ट केलें आहे. (मोरोपंत—आदिपर्व—अध्याय २१-२२ पहा.) १६. 'ग्राम—वास—वियोग—श्रम दाराकुमरीं भोगिजे' असा पाठ आहे. १७. श्रीमान् लोकांचे.

॥ ७४ ॥ पिष्टोदक[1] शुभ्रवर्णी । माता भरोनि पर्णद्रोणीं । दुग्ध म्हणोनि देतां वदनीं । पान करी संतोषें. ॥ ७५ ॥ दुग्ध भक्षिलें म्हणोनि बळें । हर्षे नाचे संगियामेळें[2] । हें देखोनि हृदयकमळें । द्रोण दुःखें आकळे[3]. ॥ ७६ ॥ म्हणे, 'संसारीं पाहतां[4] मनें । जळो निर्धनाचें जिणें । पिष्टोदकाचे प्राशनें । दुग्ध भावी[5] बाळक. ॥ ७७ ॥ आपुलें कुटुंब आपुले दृष्टी । दरिद्री पाहतां परम कष्टी । तैं स्वहस्तें शस्त्र घालोनि पोटीं । दुःखें प्राण त्यजावा.' ॥ ७८ ॥ ते वेळीं आठवलें मना, । 'जावें द्रुपदाचिया दर्शना । पुत्रालागीं दुग्धपाना । धेनु एक मागावी.' ॥ ७९ ॥ म्हणोनि लवलाहें निघाला । पांचाळपुरा ठाकोनि आला । भद्रासनीं[6] अवलोकिला । सर्वभाग्यें भूपती. ॥ ८० ॥ आशीर्वाद वदतां द्विजा । प्रत्युत्तर नेदी राजा । 'कोणँ[7] ?' म्हणोनि पुसतां लज्जा । मनोल्हास[8] मंदला. ॥ ८१ ॥ द्रोण म्हणे, 'पडिला विसरु, । मी गुरुबंधू सहोदरु[9] । आम्हां तुम्हां एक गुरु । अग्निवेश निर्धारें[10]. ॥८२॥ दरिद्रव्याघ्र झोंबतां कंठीं । रिघों[11] पातलों तुझे पाठीं । गुरुबंधुत्व[12] स्मरोनि पोटीं । क्लेशातीत[13] करावें.'॥८३॥ उपहासोनि पांचाळ[14] म्हणे[15], । 'ब्राह्मण नेणता[16] बहुतां गुणें । अयोग्य योग्यासी साजणें । नाहीं कोठें परिसिलें. ॥ ८४ ॥ [17]धनिका आणि द्रव्यहीना[18] । उदारा आणि परमकृपणा । हृदयशुद्धा चित्तमलिना । मैत्री नाहीं परिसिली. ॥ ८५ ॥ कर्मभ्रष्टा आचारशीळा । मूर्खा[19] आणि शास्त्रकुशळा । सज्जना आणि कुटिला खळा । मैत्री नाहीं परिसिली. ॥ ८६ ॥ वेदांतिया[20] आणि चार्वाका[21] । मीमांसका[22] आणि कौलिका[23] । विरक्ता आणि कामिका[24] । मैत्री नाहीं परिसिली.

---

१. पिष्टयुक्त उदक. (हें दुधासारखें पांढरें असतें.) २. मित्रमंडळांत. ३. व्याकुळ होई. ४. विचार करतां. ५. मानी. ६. मण्यादि निर्मित राजासनीं. (भद्र=कल्याणप्रद असें जें आसन तें.) ७. 'बोल' असा पाठभेद आहे. ८. 'मनोत्साह मावळला' असा पाठभेद आहे. ९. बंधु. १०. 'मुनींद्र' असा पाठभेद आहे. ११. शिरों. १२. 'मित्रभाव' असा अन्य पाठ आहे. १३. दुःखमुक्त. १४. पांचाळराज द्रुपद. १५. अध्याय १३१ श्लोक ४-११ पहा. १६. अजाण, असंस्कृतबुद्धि. १७. येथें दाखल केलेलीं परस्परविरोधदर्शक युग्में मुक्तेश्वरानें आपल्या कल्पनेनें योजिलीं आहेत. यांतील अनेक युग्मांस मूळ महाभारतांत आधारलेश सुद्धां आढळावयाचा नाहीं. १८. धनच्युत. १९. अविद्वान्. २०. पृष्ठ ११५ टीप ५ पहा. २१. पृष्ठ ११४ टीप १४ पहा. २२. पृष्ठ ११४ टीप १९ पहा. २३. कौलिक—शत्तयुपासक शाक्त, वाममार्गानुयायी शाक्त. [यांचें वर्णन श्रीराजशेखरकृत 'कर्पूरमंजरी' नामक सट्टक ग्रंथांत भैरवानंदाच्या भाषणांत आहे. तें तेथें पहावें. हा ग्रंथ गीर्वाणभाषामहोदधिपारीण महामहोपाध्याय पंडित दुर्गाप्रसाद यांनीं 'काव्यमाले'ंत छापून प्रसिद्ध केला आहे.] २४. विषयासक्त.

॥ ८७ ॥ [1]क्लीबा आणि [2]झुंजारशूरा, । अधैर्यवंता परमधीरा, । [3]अश्रोत्रिया आणि श्रोत्रिया । नरा, मैत्री नाहीं परिसिली. ॥ ८८ ॥ मागतया आणि न देतया, । मानइच्छका उपेक्षीतया, । सभ्या आणि निलाजरिया, । मैत्री नाहीं परिसिली. ॥ ८९ ॥ रत्न रत्नाचिये पंक्ती, । मित्र भूपाचा भूपती, । योग्य शर्करा समरस घृतीं, । लवण तक्रें, नेमिलें. ॥ ९० ॥ कुळ शीळ ज्ञान वैभव[4] । समान योग्यता मित्रभाव, । सखा पार्थिवा पौर्थिव[5] । [6]भैणगा भणग सोयरा. ॥ ९१ ॥ कैंचा गुरू? कैंचा बंधु? । बोलसी तितुका कृत्रिम शब्दु । शंकारहित बुद्धिमंदू । मित्र म्हणसी रायातें.[7]' ॥ ९२ ॥ ऐश्वर्यमदें अतिमातला । द्रुपदें द्रोण अवमानिला । पुढती म्हणे, 'चाल [8]वहिला, । काज नाहीं ये स्थळीं. ॥ ९३ ॥ शीघ्र जाईं आलिया पंथें.' । [9]वाड बोलतां शेवटु येथें, । परम विषाद मानूनि चित्तें । द्रोण फिरे माघारां. ॥ ९४ ॥ म्हणे, 'गा! पावलों विश्रांती । सध्याच येईल याची [10]प्रचीती । तुज मानेल ऐशिया रीती । ईश्वर ठेवी आम्हुतें.' ॥ ९५ ॥ ऐसें बोलोनि शीघ्रगती । चालिला कुरुदेशाप्रती । विषाद जोडला [11]सांगाती । जो अवमानें उपजला. ॥ ९६ ॥ हृदयीं विचारी आपण, । 'शिष्य करूनि कुरुनंदन । अमोघ अस्त्रविद्यादान । तया हातीं ओपिजे. ॥ ९७ ॥ दरिद्रदीर्घवल्लीचा कंदू । कुमित्राचा ऐश्वर्यमदु । या दोहींचा मूळच्छेदू । शिष्याहातीं करवणें.' ॥९८॥ पृष्ठीं बांधोनियां कुमरा । हातीं धरोनि गौतमीदारा । द्रोण पातला हस्तनापुरा । परमक्लेशें सखेद. ॥ ९९ ॥ गुप्त राहोनि ब्राह्मणाघरीं । भीष्मदर्शना कल्पना करी, । अकस्मात एके अवसरीं । राजकुमर निघाले. ॥ १०० ॥ नगरबाह्यदेशभूमिके । क्रीडेलागीं सुकौतुकें । एकत्र [12]मिनले ऐसें देखे । द्रोणाचार्य दुरोनी. ॥ १०१ ॥ कौरव पांडव सभाग्यपिंड । कनक[13]वीटीं कनका[14]दंडें । [15]खेळ खेळतां प्रचंड । [16]चोज कांहीं वर्तलें. ॥१०२॥ दंडप्रहारें ताडितां वीटा । बळें उसळोनि गगनवाटा । [17]कूपीं पडिली, नरेंद्रश्रेष्ठा! । जे काढितां असाध्य. ॥ १०३ ॥ मिळोनि राजकुमरमेळ । म्हणती, विरस झाला खेळ । वीटा काढी ऐसा कुशळ । कांहीं उपाय दिसेना.',॥१०४॥

---

१. नपुंसक. २. योद्धा. ३. वैदिकास. ४. अध्याय १३१ श्लोक १० पहा. ५. पृथ्वीचा ईश्वर=पार्थिव. ६. निर्धन. ७. मोरोपंत—आदिपर्व—अध्याय २३ गीति २-६ द्रुपदोक्ति पहा. मोरोपंत आणि मुक्तेश्वर यांची तुलना करण्यास हें स्थल चांगलें साधन आहे. ८. सत्वर. ९. जास्त, अधिक. १०. अनुभव. ११. सोबती. १२. मिळाले. १३. वीटा=यवाकार तर्जनीसहित अंगुष्ठ विस्तारायेवढें काष्ठ (नीलकंठ). १४. दंड=हस्तमात्र दंड. १५. विटीदांडूचा खेळ. १६. नवल. १७. अध्याय १३१ श्लोक १७ पहा.

काढावया नचले युक्ती । राजकुमरांचिया पंक्ती । कूपामाजी अवलोकिती, । म्हणती, 'यत्न विचारा.' ॥ १०५ ॥ तेचि पाहतां देखा । धर्महस्तींची मुद्रिका । गळोनि पडली कूपोदका- । माजी न साधे प्रयत्नें. ॥१०६॥ द्रोणाचार्य ते अवसरीं । कौतुक पाहे राहूनि दुरी । वीटा पडिली कूपोदरीं । देखोनि करी हास्यातें. ॥१०७॥ विंचुंबा पडिला देखोनि दृष्टीं । द्रोण पातला तयानिकटीं, । म्हणे, 'क्षत्रिय हो ! बलिष्ठ सृष्टीं । स्तब्ध कैसें पाहतसां ? ॥१०८॥ असाध्य वस्तूची नव्हे प्राप्ती । तरी कां धनुष्य धरावें हस्तीं ? । कोणा समर्थ गुरुप्रती । विद्या नाहीं साधिली.' ॥१०९॥ मग दर्भईषिका धरूनि करीं । मंत्रोनि सांडिली कूपोदरीं । तेही वीटा चढोनि सूत्रीं । दर्भ जडले ऐंकएका. ॥ ११० ॥ कूपाबाहेर पातलें अग्र । काढोनियां अतिसत्वर । झेलोनियां हास्यवक्त्र । वीटा हस्तीं ओपिली. ॥ १११ ॥ अभिमंत्रोनि शरसंधानीं । करमुद्रिका धरोनि वदनीं । बाण पातला देखोनि नयनीं, । परम आश्चर्य समस्तां.॥११२॥ राजकुमारीं लागोनि पायां, । म्हणती, 'चालिजे राजालया' । द्रोण म्हणे, 'भीष्माचार्या । श्रुत आधीं करावें. ॥११३॥ मित्रभावें पातलों येथ । मानें पाचारिल्या तेथ । भेटि झालिया घडेल अर्थ । तो आदरें स्वीकारूं.' ॥११४॥ कुरुवृद्धातें सांगती कुमर, । 'धनुर्विद्येचा अगाध सागर । ब्राह्मण पातला चतुर । जामदग्न्यासारिखा. ॥११५॥ वीटा आणि करमुद्रिका । कूपोदकीं पाडिली देखा । मुष्टी भरूनि दर्भशिखा । मंत्रोनि तेथें सोडिल्या ॥ ११६ ॥ काडिया काडी जडोनि आंगें । वीटा गोऊनि काढिली वेगें । बाण विंधोनि त्यामागें । मुद्रा कडे काढिली. ॥११७॥ भेटी झालिया स्वामीची । मानें उपेक्षा न कीजे त्यांची । वस्तु जोडतां परिसाची । जेंवी कुटुंबी न विसंबे.' ॥ ११८ ॥ जळीं बुडाली मुद्रिका बाणें । भेदूनि काढिली अर्धक्षणें । कुमरीं सांगतां सन्मानें । भीष्म प्रेरी प्रधाना. ॥ ११९ ॥ पाठऊनि शिबिंकायान । द्रोण आणिला पाचारून । भीष्में देऊनि आलिंगन । श्रेष्ठासनीं बैसविला. ॥ १२० ॥ अर्घ्य पाद्य सुगंध सुमनें । वस्त्रालंकारभूषणधनें । समर्पोनियां गोदानें । मग 'स्वागत' विचारिलें. ॥ १२१ ॥ 'ऐकोनि जाणें मी सम-

---

१. धर्माच्या बोटांतील आंगठी कूपांत पडली, असें वर्णन मूळांत नाहीं. द्रोणानें आपली मुद्रा कूपांत टाकतों आणि काढतों–असें भाषण केलें असें वर्णन मूळांत आहे. (श्लोक २४ पहा.) मुक्तेश्वराची महाभारताची प्रत विद्यमान छापील ग्रंथांहून बरीच भिन्न असावी असें जागोजाग वर्णनांत जो विरोध आढळतो त्यावरून वाटतें. २. अचंबा. ३. काडी, गवताची काडी. ४. मोरोपंत–आदिपर्व–अध्याय २३ गीति १४-१७ पहा. ५. अध्याय १३ श्लोक ३१-३३ पहा. ६. बांधून. ७. पालखी. ८. पूजाविधि द्रव्य. ९. पाय धुण्याचें उदक. १०. पुष्पें.

र्थातें । विशेष दर्शनलाभ येथें । आजि सुदिन झाला आमुतें । पवित्र केलें स्वामियां! ॥ १२२ ॥ कवण आगमनाचा हेत । येथेंचि किंवा पुढारां पंथ.' । द्रोण म्हणे 'आर्तवंत । येणें झालें तुजपाशीं. ॥ १२३ ॥ मनुष्यलोकीं जन्मल्या जना । नरकभोग यमयातना । दारिद्र्य ऐसें माझिया मना । विचारितां मानलें. ॥ १२४ ॥ दरिद्री आंधळे देखतां नयनीं । परि ते डोळस एके गुणीं । सुमित्रकुमित्राचीं नाणीं । पारखूं जाणे निर्वाडें. ॥ १२५ ॥ पुत्र मातें एकला एक । तो पयःपानार्थ करी शोक । दुग्ध म्हणोनि पिष्टोदक । कृपी त्यातें प्राशवी. ॥ १२६ ॥ तें पहावया धैर्य नोव्हे नेत्रा । म्हणोनि पूर्वील बाळमित्रा । द्रुपदभेटी अहिच्छत्रा । धेनुयाचनें मी गेलों. ॥१२७॥ तेणें ओळखी सांडोनि पुरी । अवमानोनि दवडिलें दुरी । वाढला हृद्रोग परिहारी । ऐसा वैद्य पहातसें. ॥ १२८ ॥ ब्रह्मांड शोधितां समग्र । उत्तमगुणी गुणागार । तूं एक जाणोनि सत्वर । येणें केलें या ठाया. ॥१२९ ॥ आलवाल न भरितां जळें । सुरतरू ओपी इच्छिलीं फळें । आर्जव नसतां दयाळें। आर्त हरिजे दीनाची. ॥ १३० ॥ आतां सर्वज्ञा! तुम्हीं जाणा । काय बहुसाल बोलूं वचना? । विवेकें उचित मानेल मना । तैसेंच आतां वर्तावें.' ॥ १३१ ॥ भीष्म बोले वाङ्नियमी, । 'पृथ्वी आणि हे राज्यलक्ष्मी । तुमची ऐसें जाणा, आम्हीं । आज्ञाधारक पैं तुझे. ॥ १३२ ॥ तुम्हांऐशीं गुणनिधानें । जोडावया पुरुष शहाणे । जीवित्व सांडितां सांडणें । अमूल्य वस्तु म्हणोनी. ॥ १३३ ॥ तेथें नश्वर धनसंपत्ति । यांचा पाड कायसा चित्तीं? । अंधा आम्हां धरूनि हातीं । धर्मपंथीं वागवीं. ॥१३४॥ दारिद्र्य दवडोनियां परतें । सनाथ करीं कौरवांतें । आयुष्य सरे तंवपर्यंतें । तुम्हीं आम्हीं संगाती.' ॥१३५॥ राजालयातुल्य सदनीं । संपत्ती भरिली अनेकगुणीं । धन धान्यें धेनु वसनीं । दास दासी अपार. ॥१३६॥ रथ कुंजर अश्वपंक्ती । अनेकवर्ण रत्नजाती । ऐसें गृहदान दीधलें वस्ती । द्रोणालागीं कुरुवर्यें.॥१३७॥ सुग्रीवबिभीषणांचे क्लेश । हरोनि राघवें दीधला तोष । तेंवी द्रोणालागीं अतिउल्हास । भीष्माचेनीं मित्रत्वें. ॥ १३८ ॥ नमस्कारूनि परम प्रीती । कुमर ओपिले तया हातीं । धनुर्वेदविद्यार्थी । धार्तराष्ट्र पांडव. ॥ १३९ ॥ सुमुहूर्तें करूनि पूजा । गुरुत्व नेमिलें भारद्वाजा । विद्याभ्यासीं पुत्रात्मजां ।

---

१. निश्चयें. २. पूर्वकालच्या. ३. नगरविशेष त्याप्रत. ४. गाय मागण्यासाठीं. ५. ज्यापासून अंतःकरणास काळजी लागते असा रोग. ६. दूर करी. ७. गुणसदन. ८. आळें. ९. इच्छा, आवड. १०. अध्याय १३१ श्लोक ७७-७९ पहा. ११. हत्ती. १२. राज्याभिषेक आणि हृतदारप्राप्ति यांनीं सुग्रीवाला, आणि रावणवध आणि लंकाराज्याभिषेक यांनीं बिभीषणाला तोष दिला. १३. नातवांना.

शिष्यधर्मीं योजिले. ॥ १४० ॥ शिष्य अंगीकारूनि द्रोणें । रहस्य बोले गुह्यवचनें, । 'विद्या पूर्ण झालिया करणें । कार्य माझें इच्छित.' ॥ १४१ ॥ ऐसें बोलतां आचार्यवर । दुर्योधनादी राजकुमर । न देऊनि प्रत्युत्तर । अधोवदन राहिले. ॥ १४२ ॥ गर्जोनि पार्थ बोले पैजा, । 'अटक असेल अमरराजा । तेंही कार्य करूनि तुझा । संकल्प सिद्धी न्यां नेणें.' ॥ १४३ ॥ परिसोनि प्रतिज्ञेचें वचन । आदरें उठोनियां द्रोण । अर्जुना देऊनि आलिंगन । 'साधु साधु' म्हणतसे. ॥ १४४ ॥ ऐसें बोलोनि अत्यादरें । दिव्य शस्त्रें अमोघ अस्त्रें । देता झाला सिद्धमंत्रें । पांडुपुत्रा आवडी. ॥१४५॥ धनुर्वेदविद्यासत्र । द्रोणें घातलें अतिपवित्र । अभ्यास करिती राजपुत्र । हें ऐकिलें समस्तीं. ॥ १४६ ॥ नानादेशींचे राजकुमर । वृष्णि अंधक थोरथोर । तेथें पातले जेंवि सुरवर । वाचस्पतीजवळिके. ॥ १४७ ॥ सूतपुत्र राधेयनामा । कर्ण सूर्याची अपर प्रतिमा । स्वयें येऊनि शिष्यधर्मा । अत्यादरें अनुष्ठी. ॥ १४८ ॥ अस्त्रसंग्राम अर्जुनासीं । करावया हर्ष बहु मानसीं । मैत्री करून कौरवांसीं । विद्याभ्यासीं उदीतू. ॥ १४९ ॥ द्रोण अर्जुना आज्ञा करी, । 'भोजन कीजे अंधकारीं.' । 'अवश्य' म्हणोनि तयापरी । येरू आज्ञेनें वर्ततू. ॥१५०॥ एके दिवसीं अवघेजण । एकपंक्ती निशिभोजन । करितां लागोनियां पवन । दीपकलिका लोपल्या. ॥ १५१ ॥ अवघे अवरोधोनियां हात । ठेले भोजनक्रियारहित । अर्जुन शंकेरहित तेथ । भोजन करी संतोषें. ॥ १५२ ॥ उजेडीं जो दृष्ट पदार्थ । त्यावरी अंधकारीं हात । अवक्र पडतां देखोनि करित । अति आश्चर्य आचार्य. ॥ १५३ ॥ आलिया पाहोनि दीप प्रकाशें । तंव तो जेऊनि बैसलासे, । म्हणे, 'हा लक्ष्य न चुके ऐसें । चिन्ह मातें मानलें.' ॥ १५४ ॥ धनुर्षी ठणत्कारितां गुण । ध्वनी गाजवी धरागगन, । पुढती सुखावोनि द्रोण । क्षणक्षणा आलिंगी. ॥१५५॥ म्हणे, 'गा! लोकत्रयीं जाण । तुजसम वीर नाहीं आण । ऐसें करीन तरीच द्रोण । नाम माझें यथार्थ.' ॥ १५६ ॥ मनोभावें विद्याभ्यास । करिता झाला दिवसेंदिवस । अर्जुनाप्रती बिंब प्रकाश । जेंवी दाविता दर्पण. ॥१५७॥

१. अध्याय १३२ श्लोक ६ पहा. २. जें कार्य करण्यास इंद्रास देखील कठिण तेंही कार्य. ३. अध्याय १३२ श्लोक ७-८ पहा. ४. बृहस्पति. ५. राधेनें वाढविलेला म्हणून राधेय. [अध्याय १३२ श्लोक ११.] ६. युद्ध. ७. उद्युक्त. ८. अध्याय १३२ श्लोक २२ पहा. ९. रात्रिभोजन. १०. दिव्याची ज्योत. ११. सरळ. १२. पृथ्वी आणि आकाश. १३. आणखी. [अध्याय १३२ श्लोक २७ पहा.]

रथयानीं कुंजरयानीं । अश्वयानीं झुजणें रणीं । उभय युद्ध करणें चरणीं । वीरासनीं बैसलिया. ॥ १९८ ॥ अस्त्रयुद्ध शस्त्रयुद्ध । मेषयुद्ध महिषयुद्ध । मल्लयुद्ध मुष्टियुद्ध । सर्व भेद शिकविले. ॥ १९९ ॥ [2]झोंटेधरणी केशयुद्ध । नक्रयुद्ध व्याघ्रयुद्ध । सिंहयुद्ध वृषभयुद्ध । [3]सांगोपांग बोधिलें. ॥ १६० ॥ धर्मयुद्ध अधर्मयुद्ध । दिवायुद्ध निशियुद्ध । यक्षराक्षसगंधर्वयुद्ध । देवयुद्ध शिकविलें. ॥ १६१ ॥ जळयुद्ध मंडळयुद्ध । आकाशयुद्ध भूमियुद्ध । एकांगयुद्ध समदळयुद्ध । [4]कळा विविध शिकविल्या. ॥ १६२ ॥ अनेक कळा युद्धभेद । द्रोणें कथिले विविध । अर्जुनाला विशेष बोध । [5]आचार्यपुत्रा त्यापाठीं. ॥ १६३ ॥ गदा [6]शक्ती शूळ [7]तोमर । पाश [8]लहुंडी [9]चेंडु चक्र । असिलता मुद्गर वज्र । [10]दळभंजनी शतघ्नी. ॥ १६४ ॥ [11]वर्मधरणीं [12]चर्मधरणीं । अनेक शस्त्रांचे साधनीं । देहरक्षणीं [13]परमारणीं । कळा कौशल्य वीरांचें. ॥ १६५ ॥ लक्ष भेदूनि अतिआवेशीं । बाण परतोनि [14]तूणीरकोशीं । रिघे ऐसिया गतिविशेषीं । निपुण केलें शिष्यांतें. ॥ १६६ ॥ शतानुशत राजकुमर । विद्याधनार्थी अपार । [15]मीनले जैसे धनिकद्वार । बहु याचक सेविती. ॥ १६७ ॥ हिरण्यधन्वा [16]निषादराज । एकलव्य तयाचा तनुज । विद्यासाधनाचें काज । धरूनि आला त्या ठाया. ॥ १६८ ॥ आचार्यासि करूनि नमन । उभा ठेला कर जोडून, । 'शिष्य करणें' म्हणतां द्रोण । तटस्थ मौनें विचारी. ॥ १६९ ॥ श्रेष्ठ राजकुमर म्हणती, । 'आम्हां क्षत्रियांचे पंगती । अरण्यकिरात [17]हीनयाती । योग्य नव्हे बैसावया'. ॥ १७० ॥ म्हणोनि लोटोनि दवडिला परता । येरू गुरुपाद वंदोनि माथा । हृदयीं धरोनि भावार्था । महावनीं प्रवेशे. ॥१७१॥ विजनीं सरोवराचे तटीं । [18]परिधी करूनि [19]वेंशताटी । [20]चैत्यमंडपीं [21]गोमटी । [22]गुरुप्रतिमा निर्मिली. ॥१७२॥ दृष्टीं देखिलें द्रोणरूप ।

---

१. रणस्थानीं. २. केंशधरणी. ३. संपूर्ण. ४. हा युद्धविस्तार मूळांत फार थोडा आहे. (श्लोक २८-२९पहा.) आम्हीं यापूर्वीं अनेक प्रसंगीं दर्शविल्याप्रमाणें मुक्तेश्वराची महाभारताची प्रत भिन्न असून तींत हा युद्धविस्तार असल्यास नकळे. विद्यमान मुद्रणांकित महाभारतांत मात्र तो विस्तृत नाहीं. कदाचित् हा विस्तार मुक्तेश्वराच्या पदरचाच असेल. ५. अश्वत्थाम्याला. ६. आयुधविशेष. ७. गंडासा. ८. लहुंडी=लुहंगी, लुहांगी, लोहंगी, लोहांगी=लोखंडाचे अंग जिचें अशी काठी. ९. चेंडु चक्र=चडक चक्र=जें वाटोळें फिरतांना आघात करतें असें आयुध. १०. सैन्याचा नाश करणारी शतघ्नी. (तोफ.) ११. कवच धारण करण्याविषयीं. १२. ढाल धरण्याविषयीं. १३. शत्रुनाश करण्याचे कामीं. १४. भात्यांत. १५. मिळाले. १६. कोळ्यांचा राजा. याचें नांव हिरण्यधन्वा (सुवर्णधनु). १७. क्षुद्रजाति. १८. मर्यादा. १९. वेळवांनीं युक्त. २०. यज्ञमंडपीं. २१. सुंदर. २२. आचार्य द्रोणाची मूर्ति.

तयाचि ऐसें मृत्तिका[1]लेप । निर्मूनियां अतिसाक्षेप[2] । अहोरात्र पुजे त्या. ॥१७३॥ त्याचे वंदूनियां चरण । जें जें शस्त्र साधनीं मन । इच्छी तें तें शस्त्र जाण । तात्काळिक ये हाता. ॥ १७४ ॥ रथकुंजरअश्वयानीं । बैसोनि युद्ध करणें रणीं । त्या त्या कळा येती धांवोनी । अनायासें त्यापाशीं. ॥ १७५ ॥ जितकी विद्या अर्जुनासीं । आचार्यें ओपिली कृपाराशी । येरू लाधला त्याहून विशेषीं । कृपाबळें श्रीगुरूच्या. ॥ १७६ ॥ पूर्ण विद्या व्हावया प्राप्त । एक भावार्थचि बळिवंत । यावेगळे होती व्यर्थ । साधनाचे संभार. ॥ १७७ ॥ धन्य कोळियाचा भावार्थ । द्रोणप्रतिमा मूर्तिमंत । तैसीच विद्या प्राप्त होत । भावबळें करूनियां. ॥ १७८ ॥ ऐसा विद्यानिपुण झाला । पारधीलागीं स्वयें गेला । येरीकडे भार[3] चालला । कौरवांचा आदरें. ॥ १७९ ॥ प्रज्ञाचक्षूचे[4] नंदन । इतर राजकुमर आणि कर्ण । सर्वे पांडूचे पांचहीजण । पारधीलागीं निघाले. ॥१८०॥ विहार करिती सकळ जन । दावितां धनुर्विद्याविंदाण[5] । एक सांडिती लक्ष[6] भेदून । एक चुकती बाळकें. ॥ १८१ ॥ ऐसे चालले क्रीडा करीत । पारधी खेळती वनांत । श्वापदें मारिती असंख्यात । लघुलाघवें विंधोनी. ॥ १८२ ॥ वनीं मांडूनियां ठाण । दृढ तूणीर[7] सजून । एक लाऊनियां नयन । नेमिलें विंधोनि पाडिती. ॥ १८३ ॥ चेंडु चक्र गदा मुद्गर[8] । पट्टिश लहुंडी तीव्र वज्र । शतघ्नीनें हाणोनि कर । श्वापदांतें हाणिती. ॥ १८४ ॥ येरीकडे किरात फिरला । पारधी खेळोनि शुंफे चालिला । पुढें सारमेय[9] देखिला । लगबगेनें[10] जातसे. ॥ १८५ ॥ तेणें पसरिलें देखोनि वदन । किरातें लघुलाघवें[11]करून । बाणामागें विंधोनि बाण । वदन संपूर्ण भरियेलें. ॥ १८६ ॥ खेळ खेळोनि कौरव पांडव । नगराकडे परतले सर्व । पुढां देखिलें अभिनव । कौतुक ग्रा[12]-मसिंहाचें. ॥ १८७ ॥ मुख पसरिल्या वदनांत बाण । नखोंचत भरले पूर्ण । ऐसा धनुर्धर गाढा कवण । म्हणोनि पाहती टक्मकां. ॥१८८॥ हे धनुर्विद्या असंभवीत । कोणाची म्हणोनि पाहत । अर्जुनही चौंकाटला[13] तेथ । तंव किरात देखिला. ॥१८९॥ किरातासीं पुसे अर्जुन, । 'एवढें लघु लाघवसंधान । कोण सद्गुरुप्रसादरत्न?' । येरु 'द्रोणाचार्य[14]' म्हणतसे.॥१९०॥ विजय[15] चित्तीं चमत्कारला, ।

---

१. मातीनें निर्माण केलेलें. २. अत्यंत उत्कंठतेनें. ३. समुदाय. ४. धृतराष्ट्राचे. ५. धनुर्विद्येचें कौशल्य. ६. लक्ष्य, शरव्य. ७. भाता. ८. घन, द्रुघण. ९. कुत्रा. १०. त्वरेनें. ११. कुशलतेनें, हस्तचापल्यानें. १२. कुत्र्याचें. १३. चकित झाला. १४. अध्याय १३२ श्लोक ४५ पहा. १५. अर्जुन.

गृहीं येऊनि आचार्य नमिला । गुरूसी वृत्तांत निवेदिला । किराताचा संपूर्ण. ॥ १९१ ॥ 'स्वामी! विपरीत दिसे कांहीं । मजवांचूनि किरातदेहीं । विशेषें[1] विद्या ठेविली पाहीं । प्रत्यक्ष डोळां देखिली.' ॥ १९२ ॥ ऐकोनि अर्जुनाचें वचन । द्रोण विचारी धरूनि मौन, । मग हातीं धरूनि फाल्गुन[2] । वना वेगें पातला. ॥ १९३ ॥ कौतुक देखोनि कौळिकाचें[3] । चित्त आल्हादे आचार्याचें; । आलिंगूनि म्हणे, 'साचें । प्रिय शिष्य तूं माझा.' ॥ १९४ ॥ देखोनि गुरूचें आगमन । येरें घाळूनि लोटांगण । स्वहस्तें क्षाळूनि चरण । तीर्थोदक प्राशिलें. ॥ १९५ ॥ द्रोण म्हणे, 'ऐक कुमरा ! । तूं शिष्य, मी सद्गुरु खरा, । गुरुदक्षिणा[4] वेतनभारा । बळें घ्यावया पातलों.' ॥ १९६ ॥ किरात बोले करूनि नमन, । 'कायावाचाप्राणधन । सर्वही स्वामीचें आपण । आवडे तें घेईजे.' ॥ १९७ ॥ द्रोण म्हणे, 'आपुल्या हातीं । अंगुष्ठ छेदूनि परमभक्ती । मातें ओपिल्या[5] निश्चिती । गुरुदक्षिणा[6] पावली.' ॥ १९८ ॥ ऐसें वचन ऐकतां क्षणीं । अंगुष्ठ छेदूनि शस्त्रपाणी[7] । पुढें ठेऊन गुरुचरणीं । भाळ ठेवी भाविक. ॥ १९९ ॥ म्हणे, 'दीधलें परम न्यून । फेडी देऊनि कोटी ऋण । उत्तीर्ण[8] होती दुर्बळ दीन । तैसें येथें मानावें.' ॥२००॥ देखोनि कौळिकाचा भाव । आश्चर्य करी आचार्यदेव । पार्था अंतरीं दिधला ठाव । आनंदातें वसावया. ॥ २०१ ॥ तैंपासून अद्यापि सृष्टी । किरात जितके तिहींबोटीं । सीतें ओढिती हें दृष्टी । लोक देखती प्रत्यक्ष. ॥ २०२ ॥ वनीं स्थापून किरातकुमरा । द्रोण पातला हस्तिनापुरा । पार्थाचिया उत्तरा । साच केलें येरीती. ॥ २०३ ॥ धनर्वेदविद्याधन । पावोनि झाले सर्व निपुण । धरूनि जांणिवेचा[10] मान । एक एका न लक्षिती. ॥ २०४ ॥ धनुर्विद्या लाधली कर्णा, । इर्षेनें अवगणी[11] अर्जुना । गदायुद्धीं दुर्योधना । स्पर्धा वसे भीमाची. ॥२०५॥ खड्गयुद्धीं आगळा पणीं । ऐसा अहंकार वाहे शकुनी । त्यासीं सहदेव इच्छी मनीं । एकांग युद्ध करावया. ॥ २०६ ॥ युद्धीं सर्वज्ञतेचा मान । गुरुपुत्र[12] वाहे आपण । नकुळ माद्रीचा नंदन । हेळणा करी हुंकारें. ॥ २०७ ॥ बाहुबळें

---

१. अध्याय १३२ श्लोक ४८-४९ पहा. २. अर्जुन. ३. कोळ्याचें. ४. गुरुदक्षिणारूप द्रव्याला. (श्लोक ५४ पहा). ५. दिली असतां. ६. अध्याय १३२ श्लोक ५६ पहा. ७. शस्त्र पाणीच्या ठायीं ज्याच्या असा एकलव्य. ८. उतराई. ९. धनुष्याची दोरी. १०. ज्ञानाचा. ११. अवमानी. १२. अश्वत्थामा सर्व युद्ध रहस्यांत निपुण होता.

दुःशासन । दृष्टीस निर्भर्त्सी वीर आन[1], । हें देखोनि **भीमसेन** । दोर्दंड[2] पिटी आपुले. ॥ २०८ ॥ रथारोहणीं आगळें बळ । युधिष्ठिर[3] देखोनि कुशळ । हृदयीं शैल्य[4] वाहे **शैल्य**[5] । निकरें[6] झूज झूजावया. ॥ २०९ ॥ असो. यापरी शिष्य सकळ । झाले धनुर्विद्याकुशळ । विशेष पूर्ण परीक्षेचें बळ । पाहों इच्छी आचार्य. ॥ २१० ॥ विशेषविधीचे[7] परीक्षीं । वंशी[8] बांधोनि न्यग्रोधवृक्षीं[9] । त्यावरी भांस[10] म्हणजे पक्षी । वरी कृत्रिमी निर्मिला. ॥ २११ ॥ **द्रोण** बोले शिष्यमेळीं, । 'शब्दसंकेत होतियेकाळीं । भास लक्षूनि भूतळीं । शरें विंधोनि पांडावा[11].' ॥ २१२ ॥ आज्ञा होतां, युधिष्ठिर । सज्य करूनि चाप शर । उभा ठेला त्यासमोर । पुढती वदे आचार्या. ॥ २१३ ॥ 'भास देखिला तरुवरीं'. । तो म्हणे, 'देखिला निकिर्यापरी[12].' । 'मी वृक्ष आणि धनुर्धारी । सर्व डोळां देखिले.' ॥ २१४ ॥ येरू म्हणे, 'सर्व देखिलें दृष्टी.' । गुरू म्हणे, 'धनुष्यीं ठेवीं मुष्टी । लक्ष न भेदवे पोटीं । चिन्ह मातें मानलें.' ॥ २१५ ॥ याचिपरी समस्तांतें । **द्रोण** विचारी शिष्यांतें । भेददृष्टी न सांगतां त्यातें । धनुष्य हातें ठेववी. ॥ २१६ ॥ मग **पार्थ** पाचारूनि जवळा । म्हणे, 'परियसीं वीरशार्दूला[13] ! । भ्रूसंकेत[14] दावितां डोळां । भास विंधोनि पांडावा[15].' ॥ २१७ ॥ 'अवश्य' म्हणोनि नरेश्वरें । ओढी काढोनि अतिसत्वरें । धनुष्य करोनि मंडळाकारें । शर सज्जुनि राहिला. ॥ २१८ ॥ द्रोण म्हणे, 'गा ! चतुरा ! । पक्षी वृक्ष आणि या वीरां । देखत आहेत या निर्धारा । सांग मातें डोळसा. ॥ २१९ ॥ येरू म्हणे, 'भांस[16] एकचि असे । यावेगळें कांहीं न दिसे' । पुढती पुसे, 'अवयव कैसे ? । सांग मातें सुजाणा !' ॥ २२० ॥ प्रत्युत्तर वदे किरीटी[17], । 'मस्तक एक पडे दृष्टी । न दिसे पाय पक्ष पाठी, । सत्य गोष्टी गुरुवर्या ?' ॥ २२१ ॥ वचनें संतोषला **द्रोण** । मानवला, हालवी मान । नयनीं लक्षूनियां नयन । मुहूर्त एक राहिला[18]. ॥ २२२ ॥ संकेत दावितां हुंकारें । भासमस्तक उडविला शरें, । 'भला रे ! भला !' म्हणोनि आदरें । पाठी हातें थापटी. ॥ २२३ ॥

---

१. अन्य. २. भुजदंड. [दोस् (दोषन्)+दंड=भुज+दंड.] ३. युधिष्ठिर रथश्रेष्ठ होता. (श्लोक ६३ पहा). ४. कांट्यासारखें टोंचणारें शस्त्र. ५. राजविशेष. ६. नेटानें. ७. प्रहरणज्ञानाच्या परीक्षेत. कोण कसा प्रहार करतो हें पाहण्यासाठीं. ८. वेळू. ९. वटवृक्षीं. १०. नीलपक्ष पक्षी. ११. श्लोक ७० पहा. १२. एकटाच. १३. शूरव्याघ्रा. १४. भोंवयांची खुणा. १५. अध्याय १३३ श्लोक १-२ पहा. १६. अध्याय १३३ श्लोक ५ पहा. १७. अर्जुन. १८. जुनाट हस्तलिखित एका पोथींत ओवी २२२ वी नाहीं.

हस्त बैसला शरसंधानीं[1] । परम आल्हाद द्रोणा मनीं । जोडका[2] पुत्र देखोनी गुणी । जनक जैसा सुखावे. ॥ २२४ ॥ यावरी एके दिवसीं जाणा । द्रोण पातला गंगास्नाना[3] । जळीं रिघतां उभयचरणा । जळसावजें ग्रासिला. ॥२२५॥ कटिपर्यंत[4] गिळिली तनू[5] । समस्तांशीं सांगे द्रोणू, । 'शुशुमार[6] मारूनि प्राणू । येकाळींच वांचवा.'॥२२६॥ एक धाकें पळाले परते, । एक सांडिती हत्यारातें, । जळीं रिघोनि जळग्राहातें[7] । कवळूं कोणी न शकती. ॥ २२७ ॥ हाक मारूनि द्रोण सांगे, । 'अर्जुन पाचारा वेगें.' । पार्थ पातला लगबगें । 'स्वस्थ' म्हणे आचार्या. ॥ २२८ ॥ उदकीं घालूनियां उडी । मग रक्षिला देऊनि बुडी । धनुष्या पंच नाराच[8] ओढी । वर्मस्थळीं विंधावया. ॥ २२९ ॥ बुडी देऊनियां जीवनीं[9] । जळचर लक्षूनियां नयनीं । गुरूसी न लागतां, पंचबाणीं । हस्तलाघवें[10] विंधिला. ॥ २३० ॥ पृष्ठावरूनि पुच्छाकडे । उतरते भेदले कुऱ्हाडे । जळचरें पसरितां जाबाडें[11] । द्रोण कडे काढिला. ॥ २३१ ॥ गुरू वाहूनि पृष्ठावरुता । मगर मारूनि केला पुरता, । द्रोण म्हणे, 'रे पार्था! । तुजसारिखा तूं ऐके[12]. ॥ २३२ ॥ पूर्वी गजेंद्र[13] धरिला नक्रें । तो सोडविला इंदिरावरें[14] । हेच एक निजनिर्धारें । उपमा साजे तुज वीरा! ॥ २३३॥ गुणांमाजी औदार्यगुण[15], । तारांमाजी[16] रोहिणीरमण[17], । ग्रहमंडळीं सहस्रकिरण[18], । शिष्यांमाजी तैसा तूं.' ॥२३४॥ जिंकोनियां पांचाळ राजा । हाचि एक आणील पैजा । ऐसा भरंवसा भारद्वाजा[19] । निश्चयेसीं मानला. ॥२३५॥ प्रसन्न होवोनि आचार्यराजा । 'ब्रह्मशिरो'नामास्त्र बीजा । उपदेशिलें, त्याचे तेजा । साहों न शके कृतांत. ॥२३६॥ 'ज्यासी निवारण नाहीं सहसा । ब्रह्मांड न पुरे ज्याचिया ग्रासा'. । द्रोण म्हणे, 'नरवीरेशा! । परमयत्नें रक्षावें. ॥ २३७ ॥ हें न घालावें कवणावरी । वि-

---

१. बाणाचा नेम धरण्यांत, बाणाचें निशाण मारण्यांत. २. धन इत्यादि जोडणारा, लाभकारक जोड करणारा. ३. अध्याय १३३ श्लोक ११ पहा. ४. जंघान्तपर्यंत असें मूळांत आहे. (श्लोक १२.) ५. शरीर. ६. सुसर, ग्राह. ७. सुसर. ८. बाण. [नरसमुदायाला भक्षण करणारा जो बाण तो नाराच, असा विग्रहार्थ आहे.] ९. उदकीं. १०. हस्तकौशल्यानें. ११. मुख, जबडा. १२. हें 'अनन्वय' नामक अलंकाराचें उदाहरण आहे. याचें लक्षण:—'उपमानोपमेयत्वे एकस्यैवैकवाक्यगे । अनन्वयः' [काव्यमाला—काव्यप्रदीप पृष्ठ ३७८.] १३. श्रीमद्भागवत—स्कंद ८ अध्याय २-४ पहा. १४. श्रीकृष्णें. (लक्ष्मीपति.) १५. हें म्हणणें अगदीं यथार्थ आहे:—'शतेषु जायते शूरः सहस्रेषु च पंडितः । वक्ता दशसहस्रेषु दाता भवति वा न वा ॥.' १६. नक्षत्रांत. १७. चंद्र. [रोहिणी ही दक्षकन्या आणि चंद्राची अत्यंत आवडती स्त्री म्हणून चंद्राला 'रोहिणीप्रिय', 'रोहिणीवल्लभ' अशीं नांवें आहेत.] १८. सूर्य. १९. भरद्वाजपुत्राला. (द्रोणाला.)

श्वपीडक दुराचारी, । परी संकटाचे अवसरीं । स्मरण याचें करावें.' ॥२३८॥ आलिंगूनि परमप्रीतीं । आवडी पार्थ धरूनि हातीं । द्रोण पातला सभेप्रती । भीष्मादिक पैं जेथें. ॥२३९॥ 'विद्यानिपुण झाले कुमर । शृंगारूनि परीक्षागार[1] । बैसवूनि वडिल चतुर । कौतुक दृष्टी पाहिजे.' ॥२४०॥ ऐसें बोलतां ब्राह्मणोत्तम । 'अवश्य' म्हणे राजा भीष्म, । शिल्पिकारां सांगे, 'रंगधाम । अतिविशाळ निर्मावें.' ॥ २४१ ॥ तेंचि पुढें निरूपण । श्रोतीं सादर करावें श्रवण । विद्यापरीक्षा लक्षण गुण । कुमर वडिलां दाविती. ॥ २४२ ॥ भारतआळवाळें[2] भरलीं[3] । विश्वंभरकृपासलिलीं । मुक्तेश्वराची वाग्वल्ली । कथाफळीं सुफळित. ॥ २४३ ॥

अध्याय एकतिसावा.

द्रोण म्हणे, 'कौरववीरा ! । धृतराष्ट्रा ! हे जनेश्वरा ! । विद्या[6] पूर्ण झाली कुमरां । ते मानसीं आणिजे. ॥ १ ॥ भीष्म, बाल्हिक, शारद्वत[7], । विदुर सर्वज्ञ, सोमदत्त, । व्यास देवऋषीसहित[8] । सभास्थानीं बैसवा. ॥ २ ॥ शिष्यालागीं केले क्लेश । ते तुवां जाणितल्या विशेष । सार्थक[9] होती, जेंवी महेश[10] । फळ दे जैसा तपांतीं. ॥३॥ पुत्राचेनि[11] झालेपणें । सर्व पूर्णता मानिती मनें, । इंद्र[12] तोही चक्षूहीनें । अंध ऐसा भाविजे[13].' ॥ ४ ॥ संतोषोनि कुरुनृपाळ[14] । मंत्रियां सांगे उतावीळ, । 'उत्तम[15] अवलोकोनि स्थळ[16] । रंगभूमिका निर्मावी. ॥५॥

---

१. परीक्षा घेण्यासाठीं गृह. २. भारतरूप अळें. ३. 'भलीं' असा अन्य पाठ. ४. या अध्यायास 'विद्यासिद्धि' असें नांव हस्तलिखित पोथींत आहे. ५. या अध्यायांत कृपद्रोणोत्पत्ति, द्रोणाचें हस्तिनापुरागमन, द्रोणापाशीं पांडवांचा धनुर्वेदाभ्यास, ग्राहापासून अर्जुनहस्तें द्रोणाचें मोचन, असे विषय असून मूळांतील चार अध्यायांच्या (१३०-१३३) सारांश मुक्तेश्वरानें आणिला आहे. हाच विषय पंतांनीं चार अध्यायांत वर्णिला आहे. (मोरोपंत—आदिपर्व—अध्याय २१-२४ पहा). ६. धनुर्वेदादि विद्या. ७. कृपाचार्य. (शरद्वत्सुत.) ८. नारदासहित. ९. फलप्रद. १०. शंकर. ११. द्रोणाचार्य धृतराष्ट्रास म्हणतात:—मुलगा हुशार झाला, विद्यादिकांनीं पूर्ण झाला, म्हणजे (आईबाप वगैरे) यांस पूर्णता (कृतकृत्यता, सार्थक्य) मनांत वाटते. प्रत्यक्ष इंद्र जरी मुलगा असला, पण तो ज्ञान(चक्षु)हीन असला तर तो आंधळा असें समजावें. १२. ज्यास सहस्र नयन आहेत असा इंद्र. १३. मानावा. १४. धृतराष्ट्र. १५. मुक्तेश्वराला विस्तृत वर्णन आवडत असे, या विधानास प्रस्तुत स्थल चांगलें आधारभूत होय. मुक्तेश्वरानें स्वकल्पनासामर्थ्यानें रसिकांस मान्य होण्यासारखा वर्णनविस्तार केला आहे, अशीं स्थळें आदिपर्वांत अनेक आहेत. १६. कुमारांचें अस्त्रशिक्षानैपुण्य पाहण्यासाठीं.

[1]वृक्षगुल्में खंडोनि परतीं । समसमान करावी [2]क्षिती । भूमिदेवतेचिये शांती । बळिप्रदान विधियुक्त. ॥ ६ ॥ सुमुहूर्तें करूनि शांती । बहुतां शिल्पिकारां- हातीं । [3]परीक्षागार रचावें क्षिती । [4]इंद्रभुवनासारिखें. ॥ ७ ॥ अनेक राजे राजयुवती । बैसावया स्थळें पुरतीं । श्रेष्ठ ऋषींचिया पंक्ती । उच्चासनीं बैसवा. ॥ ८ ॥ अश्वगजरथांचे [5]थाट । [6]फेरे करिती घडघडाट । [7]संधान करिती वीर [8]उद्भट । ऐसें विस्तीर्ण निर्मावें. ॥ ९ ॥ पिटावया [9]दोर्दंड पाणी । कस्तूरिका- चंदनचूर्णी । मृत्तिका पसरावी अंगणीं । मृदु [10]मवाळ साजिरी. ॥ १० ॥ चौके साधूनि मध्यभागीं । [11]उपरिकागृहें गोपुरें शृंगीं । कनकोदकें रत्नरागीं । चित्र- विचित्र रेखावीं'. ॥ ११ ॥ आज्ञा देतां नरनायकें । शिल्पकारीं तात्काळिकें । [12]निरोपिलें त्याहूनि अधिकें । परीक्षागार [13]उभविलें. ॥ १२ ॥ सुंदर पाषाण मृत्तिकेविणें । [14]निर्वाळिलीं रत्नें सुवर्णें । मुक्ताफळांचेनि [15]चूर्णें । संधिभाग लिं- पिले. ॥ १३ ॥ सूर्यकांत सोमकांत । स्फटिक[16]सोपानें शोभिवंत । [17]हेमरंगीं सु- चित्रित । पाचुबद्ध भूमिका. ॥ १४ ॥ [18]शातकुंभस्तंभ [19]पोटोळे । [20]उथाळीं बै- सका इंद्रनीळे, । दांडियां [21]सूदलीं [22]प्रवाळें । [23]किळेचापाट [24]वज्राचे. ॥ १५ ॥ [25]स्तंभवेष्टित कनकवल्ली । फळघोंस माणिक्य मुक्ताफळीं । त्यावरी खेळणीं ते- जाळीं । शुकहंसमयूरां. ॥ १६ ॥ शुद्धकनकाचीं [26]तुळवटें । प्रकाशें झळकती [27]निघोटें, । पद्मरागाचीं कपाटें । करकरती आक्रोशें. ॥ १७ ॥ [28]पुष्कराज [29]पेरोजे हिरे । गोमेदरत्नांचीं गोपुरें, । कनकदंडीं [30]पताकाचिरें । [31]विद्युत्प्राय झळकती. ॥ १८ ॥ विशाळ [32]उपरिका चौफेरी । विचित्र शृंगारिल्या [33]कुसरी । मंचक डो- ल्हारे माझारीं । हेमसूत्रीं लोंबविले. ॥ १९ ॥ दिव्यास्तरणें मृदुमवाळीं । चां-

---

१. वृक्षांचीं झांकरें. तृणसमूहाचे मूलपिंड कापून. (नीलकंठ). २. पृथ्वी. ३. परीक्षा घेण्याचें घर, प्रेक्षागार. ४. इंद्रलोकासारखें मनोहर. ५. जमाव. ६. फेरी=गिरकांडी घेत फिरणें, गिरकी मारणें, चक्कर मारणें. ७. शरसंधान. ८. मोठें. ९. भुजदंड आणि हात. (दोर्+दंड=दोषन्=भुज.) १०. मऊ, नरम. ११. दुमजली, तिमजली अशीं माडीचीं गृहें. १२. सांगितलेल्या. १३. उभें केलें. १४. निर्मळ केलेलीं. १५. चुन्यानें. १६. पायऱ्या. १७. सुवर्णरंगीं. १८. सुवर्णाचे खांब. १९. वाटोळे. २०. गृहास जे खांब बसवितात त्याखालीं जे धोंडे बसवितात तीं. २१. घातलीं. २२. पोंवळीं. २३. तक्तपोशीस तक्तयाच्या सांदीवर बसवितात जे फळीचे तुकडे ते. २४. हिऱ्याचे. २५. खांब. २६. वाहालें. २७. परिपूर्ण. २८. रत्नविशेष. २९. पेरोज, पेरुजा, पेरोजा—हें वैडूर्य जातीचें रत्न आहे. हा शब्द आरबी आहे. ३०. वसनें, निशाणें. ३१. विजेसारखीं. ३२. माड्या. ३३. कुशलतेनें.

दवे झळकती मुक्ताफळीं । टेंकणीं टेंकिलीं [1]सुढाळीं । सुंदर सूर्यपुटांचीं. ॥ २० ॥ सखयांसहित राजांगनीं । [2]बैसका केल्या मंचकासनीं । कुंती [3]गांधारनंदिनी । मुख्य तेथें [4]नायिका. ॥ २१ ॥ [5]मेरुमाथां सहज लीळे । [6]मीनले देवांगनांचे [7]पाळे । तैसीं उपरिकागृहमंडळें । [8]नायिकांचीं शोभती. ॥ २२ ॥ सभास्थानीं पुरुषपंक्ती । मांडलिक राजे नर भूपती । अनेक [9]वर्ण अनेक जाती । कौतुक पाहों पातले. ॥ २३ ॥ [10]प्रज्ञाचक्षु राजेश्वर, । कृप, बाल्हीक, गंगापुत्र, । तया एकासनीं विदुर । सभास्थानीं शोभला. ॥ २४ ॥ व्यास, वैशंपायन, शुक, । जैमिनीसंजयनारदप्रमुख । अगस्त्यादि ऋषि अनेक । उच्चासनीं मिरविले. ॥ २५ ॥ तंव कृष्ण पुरुष मेघवर्णी । [11]शुक्लसूत्रश्वेतवसनी । श्वेत[12]श्मश्रु श्वेतसुमनीं । श्वेतमाळा शोभती. ॥ २६ ॥ ऐसा द्रोणाचार्य तेथें । पातला [13]निजपुत्रासहितें । प्रत्युत्थानीं जनें समस्तें । [14]लोटांगणीं वंदिला. ॥ २७ ॥ वस्त्राभरणें बहु सुवर्ण । गोसहस्रदक्षिणादान । पूजनीं देऊनी बहु सन्मान । मुख्यासनीं बैसविला. ॥ २८ ॥ पाठीं शिष्यवर्गाचे थाट । राजकुमर वीर [15]उद्भट । लोटले जैसे [16]महालोट । समुद्राचे [17]युगांतीं. ॥ २९ ॥ [18]बद्धगोधांगुळीत्राणें । [19]बद्धकक्षा मतमानें । परीक्षा दावावया मनें । वीरोल्हास समस्तां. ॥ ३० ॥ महाशक्तीचा कडकडाट । वीरवाद्यांचे बोभाट । तडक [20]यंत्रांचे भडभडाट । तेणें आकाश दुमदुमिलें. ॥ ३१ ॥ सकळां मुखीं एक आरोळी । बाहुपिटणें उठती टाळी । तेणें काढूनि [21]वेंटोळीं । शेष जागा फुंफाटे. ॥ ३२ ॥ करूनि द्रोणाचार्या नमन । केलें शस्त्रांचें [22]पूजन । रक्त पुष्पें रक्त चंदन । चर्चूनियां समस्तां. ॥ ३३ ॥ आज्ञा घेऊनि आचार्याची । साधनें दाविती शस्त्रास्त्रांचीं ।

---

१. सुरेख, चकचकीत. २. बैठका. ३. अध्याय १३४ श्लोक १५ पहा. ४. स्त्रिया. ५. मेरुपर्वताच्या मस्तकावर. ६. मिळाले. ७. थवे. [हाच दाखला मूळांत आहे.] ८. इतर स्त्रियांचीं. ९. चतुर्वर्ण असें मूळांत आहे. १०. अंध. (धृतराष्ट्र.) ११. शुक्लयज्ञोपवीतयुक्त आणि शुक्लांबरधर. १२. सितश्मश्रु. (अध्याय १३४-१९.) १३. अश्वत्थामा. १४. साधु, देव, प्रभू इत्यादि प्रीत्यर्थ आडवें पडून चक्रासारखें लोटत जाण्याची जी कृति तिला 'लोटांगण' म्हणतात; लोटांगण=नमस्कार. १५. मोठे. १६. मोठमोठ्या लाटांचा पूर. १७. प्रलयकाळीं. १८. बांधलीं गोधा आणि अंगुलित्राण ज्यांनीं असे; गोधा=हाताचें संरक्षण करणारी चामड्याची पिशवी, ज्याघातवारणाचें साधन. १९. वस्त्रानें संवृत (आच्छादित) आहेत असे (खांदे) पृष्ठ (पाठ) आणि पोट ज्यांचें ते. (नीलकंठ.) २०. तोफांचे. २१. फेरे, वेढे. २२. हा पूजनसंस्कार नीराजनाविधि प्रमाणें कांहींसा असावा [रघुवंश–सर्ग ४।२५; १७।१२; नैषध–सर्ग १।१४४.]

'बाप' 'बाप' या शब्दाची । वीर[1]गर्जना माजली. ॥ ३४ ॥ [2]तूणीर आंवळिले पृष्ठीं । प्रचंड धनुष्यें धरिलीं मुष्टीं । सकळां दावूनियां दृष्टीं । [3]लक्ष्य [4]विंधोनि पाडिती. ॥ ३५ ॥ एक झांकोनियां नयन । नेमिलें पाडिती विंधोन, । एक पाठमोरे जाण । अचूक लक्ष्य भेदिती. ॥ ३६ ॥ [5]गदा मुद्गल चेंडू चक्र । तोमर पाश [6]लहुंडी वज्र । परशु पंचाग्र पट्टीश दुधार । आणि तिधार, [7]शतघ्नी. ॥ ३७ ॥ खांडे पट्टे बाण सुरिया । कोयते कातरे कटारिया । भाले करकाठी गुप्तिया । यमदंष्ट्रा तीक्षणा. ॥ ३८ ॥ जो जे शस्त्रविद्या जाण । वाहे निपुणतेच्या मान, । तो तें शस्त्र धरून । साधना करी [8]साटोपें. ॥ ३९ ॥ रथफेरी [9]कुंजरफेरी । दाविती युद्धाची कुसरी । एक [10]वळंघोनि [11]रहंवरीं । [12]रथजुंझार [13]तळपती. ॥ ४० ॥ वोढणें पडताळूनि देख । खड्गपाणी वीर अनेक । शस्त्रसाधन कौतुक । श्रेष्ठांपुढें दाविती. ॥ ४१ ॥ थरक चमक सरक वेग । पिलांग उठावणी निर्व्यंग । मागुते बाणें लंघनें मार्ग । पुढिलां ऐसा सत्वरा. ॥ ४२ ॥ एक दाऊनि मारणें एका । [14]परभंजनीं अतिआवांका । रणसिंधूच्या परतटाका । तरूनि जाणें एकटें. ॥ ४३ ॥ लागों न देतां घाय, आणी । एकें बहुसाल पाडणें रणीं, । अनेक शस्त्रांची मारणी । चुकवूं जाणें साधक. ॥ ४४ ॥ विकट एकांगींचें झूज । [15]चिन्हें भेदणें घालोनि पैज । [16]चारी बोटें टाळूनि काज । [17]वांटिवची साधणें. ॥ ४५ ॥ शस्त्र न धरितां हस्तकीं । वैरी शस्त्रें मारितां [18]तवकीं । करतळानें ताडूनि कवतुकीं । [19]आंगळीक दावणें. ॥ ४६ ॥ शस्त्रेंसहित मणगटें । मोडोनि सांडावीं पैं सुभटें । ऐशी विद्या वीरश्रेष्ठें । द्रोणाचार्यें दीधली. ॥ ४७ ॥ [20]लाघव सौष्ठव शोभा परम । धीरत्व दृढत्व वीरश्री निःसीम । षड्गुणीं साजिरा संग्राम । जेंवि कां ज्ञान

---

१. 'निविड गर्जना माजली' असा अन्य पाठ. २. भाते. ३. निशाण, शरव्य. ४. भेदून. ५. हा शस्त्रविस्तार मूळांत नाहीं. जागजागीं मुक्तेश्वरानें आपल्या पदरची भर घालून मूळावरही ताण केली आहे असें म्हणण्यास संकोच बाळगणें नको. ६. लहुंडी-लोहांगी, लोखंडानें केलेलें. ७. बंदुक, तोफ. ८. अहंकारानें. ९. गजावर बसून फेरी करणें, चक्कार मारणें. १०. वळंघणें=चढणें. ११. रहंवर=रथवर, रथश्रेष्ठ. १२. रथयोद्धे. १३. तळपणें=चमकणें. १४. शत्रूच्या पराभव करण्यांत. १५. निशाण मारणें. १६. 'चारी वेढे काढूनी काज । वाढिवेचें साधन' आणि 'चारी वेढे टाळूनि काज । वाढिवेचे साधनें' असे पाठभेद आहेत. १७. वांटीव=पुरुषार्थ, पराक्रम. १८. आवेशानें. १९. आधिक्य. २०. लाघव=शैघ्र्य, त्वरितपणा; सौष्ठव=चातुरी, केवळ एकच खड्ग सभोंवतीं फिरवून एकाचसमयीं अनेक आयुधांचें निवारण करणें असें चातुर्य; शोभा=देदीप्यमान एकाच खड्गाची सर्व ठिकाणीं फांकणारी प्रभा; धीरत्व=स्थिरत्व, अभीतत्व; दृढत्व=

वैराग्य. ॥ ४८ ॥ शौर्य तेज धृति दक्षता । झुजतां परतेना मागुता, । उदार[1] ईश्वरभाव चित्ता । तो एक उत्तम क्षत्रिय. ॥ ४९ ॥ क्लीबत्व निस्तेज अधैर्य आळस । पलायनार्थी आगळा कस । कार्पण्य ईश्वरीं अविश्वास । तो अधम क्षत्रिय जाणावा[2]. ॥ ५० ॥ असो. अनेक युद्धाचीं अंगें । कुमर वडिलांतें दाविती वेगें । तेणें कौतुकानंदगंगे[3] । सर्व झाले जलचर. ॥ ५१ ॥ शिंगणीं[4] चापीं शरसंधान । उत्तरदिशेचें[5] युद्ध दारुण । करकाठिया खोंचणें प्राण । गौड युद्ध यानांवें. ॥ ५२ ॥ सलंब भाले कोपरखेडी । गर्जतां झुंजती ईडे[6] पाडी । दे अभिचारयुद्धप्रौढी[7] । क्षात्रधर्मी बोलिले. ॥ ५३ ॥ खेटक[8] करवाळें[9] सतेज । सूडसाधनीं विशाळ पैज । त्या नांवें महाराष्ट्र झुज । खंडितांही न खंडे. ॥ ५४ ॥ कटीं कटारे तडक हातीं । उवड आंगीं सत्वर गती, । तें कर्णाटकयुद्ध म्हणती । रणपंडित निर्धारें. ॥ ५५ ॥ आपादमस्तकावरी ओढण[10] । आड करूनि परतें मारण । तैलंगयुद्ध तें जाण । आंध्रदेशस्थ बोलती. ॥५६॥ लोहवृश्चिक वामकरीं । सव्य[11] असिलता दुधारी । मारीत लोटणें पुढारीं । बर्बरयुद्ध यानांवें. ॥ ५७ ॥ करीं यष्टी अर्धचंद्राकार । तेंचि करूनि हत्यार । दक्षिणसमुद्रीं प्रखर[12] । कर्णफाटे[13] झूजती. ॥ ५८ ॥ नौकायानीं यंत्रमारें । पोतें[14] भंगिती पाणीभारें । वातवेगीं पळावें त्वरें । फिरंगीयुद्ध यानांवें. ॥ ५९ ॥ डांगा[15] यष्टिका भिंडिमाळी[16] । झूज झूजणें कृषीवळीं[17] । कळा वर्म आंग कवळी । मल्लयुद्ध यानांवें. ॥६०॥ ऐसे अनेक युद्धांचे भेद[18] । कुमरीं दाविता विविध । तंव प-

---

दृढमुष्टिता. (नीलकंठ–भारतभावदीप–अध्याय १३४ श्लोक ३१.) 'लाघव'शब्दाचा अर्थ कसा बदलला हें पुढच्या उताऱ्यावरून कळेल:—"चित्रें काढणें, नक्षीचें काम करणें वगैरे कुशलतेचें काम करण्यास हात हलका असावा लागतो; या गुणास हस्तलाघव असें म्हणतात, याचा अर्थ हस्तकौशल्य. यावरून लाघव शब्दाचा अर्थ कौशल्य असा झाला. लाघव ज्यास आहे तो लाघवी म्हणजे दुसऱ्याचें मन वळविण्यास चतुर असा अर्थ झाला, त्यावरून गोड बोलून काम करून घेणाऱ्या मनुष्यास 'तो मोठा लाघवी' असें म्हणतात." (व्युत्पत्तिप्रदीप पृ० ५९.)

१. 'उदारभाव ईश्वरसत्ता' असा पाठभेद आहे. २. हा वर्णनविस्तार मूळ ग्रंथांत नाहीं. ३. कौतुकानंदनदींत. ४. वर उडवून देण्याविषयीं. ५. 'उत्तरदेशींचें झुंज' असा अन्य पाठ आहे. ६. ईर्षेनें, मत्सरानें, ईर्ष्यापूर्वक. ७. जारणमारणादि विधियुक्त युद्धाची थोरवी. ८. ढाल. ९. तरवार. १०. आच्छादन. ११. डावा. (पण या स्थळीं 'दक्षिण' असा अर्थ इष्ट आहे.) १२. 'मखर' असा अन्य पाठ. १३. कानफाटे=ज्यांच्या कानांत कुंडलें असतात असे गोसावी. १४. नौका. १५. काठी, दंड. १६. भिंडी=गोफण, भिंडीपाल, भिंडीमाळ=गोफणी. १७. शेतकऱ्यांनीं. १८. हे युद्धभेद मूळ ग्रंथांत नाहींत. विस्तृतवर्णन करण्याच्या हौसेनें हे भेद कवीनें येथें सांगितले आहेत.

रिसिला महानाद । अत्यद्भुत [1]दोघांचा. ॥ ६१ ॥ वीरश्रियेचा आवेश । सिंहगर्जनेसारिखा घोष । दोघां मुखींचा ऐकोनि, त्रास । महावीर पावले. ॥ ६२ ॥ [2]ऐकशिखराचा गिरिवर । [3]ऐकदंती मत्त [4]कुंजर । एकशृंगी [5]नंदिकेश्वर । दोनी रूपें [6]आवगला. ॥ ६३ ॥ तेंवि **दुर्योधन** भूपती । दुजा **भीम** बळसंपत्तीं । प्रचंड गदा उचलोनि हस्तीं । [7]भद्रजाती [8]लोटले. ॥ ६४ ॥ विचित्र दाविती रणमंडळें । गदा परजती हस्तढाळें । मही पिटोनि पादतळें । मुखीं करिती गर्जना. ॥ ६५ ॥ सभेसन्मुख इडेपाडे । कळा दाविती [9]चंढोवाडें । मत्सर वाढिन्नला वाढे । तेणें निकरा पातले. ॥ ६६ ॥ सिंह [10]उंफाळती हुंकारें, । कुंजर लक्षिजे कुंजरें । कीं वृषभ माजले [11]डिंबरें । पुंफाटती अतिरागें. ॥ ६७॥ दृष्टी काढूनि सभेवरूनी । दापिती [12]येरयेरां नयनीं । हाकारिती मस्तक तुळनी । [13]अधर [14]दशनें चाविती. ॥ ६८ ॥ श्मश्रू पिळोनि वामकरीं । पदें झाडिती पुढारीं । एकांगयुद्धाचे अंतरीं । इच्छा [15]वेंतें दोहींतें. ॥ ६९ ॥ दोघीं उभारूनि कर । सन्मुख झाले येरा येर । देखोनि उठला हाहाकार । महावीर गजबजले. ॥ ७० ॥ उभयपक्षीं आर्तली सभा, । एक वर्णिती **सुयोधनप्रभा**, । एक म्हणती, '[16]गगनस्तंभा । तुळणे **भीम** दूसरा.' ॥ ७१ ॥ एक म्हणती, **सुयोधन** चांग। गदायुद्धीं न पावे भंग.' । एक म्हणती, '**भीम**वेग । साहों न शके [17]कृतांत.' ॥७२॥ **द्रोणाचार्य** ते अवसरीं । स्वपुत्रातें [18]आज्ञा करी, । 'दोघे वीर धरूनि करीं । दोहींकडे करावे. ॥ ७३ ॥ विद्यापरीक्षेलागीं सुभग । कौतुकें मांडिलासे रंग । येथें कोपाचा प्रसंग । काय उचित विचारा ?' ॥ ७४ ॥ **अश्वत्थामा** उठोनि [19]कोडें । हातीं धरूनि वारिले [20]कडे । आचार्यपादुकांची तोंडें । [21]आण दोघां घातली. ॥ ७५ ॥ 'कोणे समयीं काय उचित । जाणे तोचि वरपंडित । अप्रसंगीं पोटींचा अर्थ । गौप्य करिती जाणते.' ॥ ७६ ॥ ऐसें बोलोनि आचार्यपुत्रें । दोघे शांतीचेनि सूत्रें । गोंवोनि स्वस्थ केले प-

---

१. सुयोधन आणि भीम या दोघांचा. २. ज्याला एक शिखर आहे असा. ३. ज्याला एक दांत आहे असा. ४. हत्ती. ५. महादेवाचें वाहन. ६. स्वीकारलीं; आवगणें=स्वीकारणें. ७. हत्ती. (अध्याय १३४-३३.) ['भद्रो रुद्रे वृषे रामचरे मेरुकदंबके । हस्तिजात्यन्तरे भद्रो वाच्यवत् श्रेष्ठसाधुनोः ॥' इति विश्वः] ८. 'क्षोभले' असा अन्य पाठ. ९. चढाओढीनें. १०. उडतात. ११. पशुजातीचा शब्दविशेष (डुरकणी) त्याणें. १२. अन्योन्यां. १३. ओंठ. १४. दंतानें. १५. 'वाढे' असा अन्य पाठ. १६. 'मेरुस्तंभा' असा अन्य पाठ आहे. १७. यम. १८. अध्याय १३५ श्लोक ४ पहा. १९. कौतुकानें. २०. एकीकडे. २१. शपथ [आज्ञा=आण.]

वित्रें । सर्प जैसे मांत्रिकें. ॥ ७७ ॥ **द्रोण** आज्ञापी समस्तां, । 'पुत्राहूनि मज [1]पढियंता । **पार्थ** पाचारा [2]आरुता । कौतुक दाऊं तयाचें.' ॥ ७८ ॥ [3]कनककुंडलें कनकाभरण । कनककिरीट विराजमान । कनकमेखळा कनकवसन । प्रकाशमान तेजस्वी. ॥ ७९ ॥ [4]कनकतूणीर कनकचाप । कनककवचीं दावी [5]ओपें । ऐसा **पार्थ** पातला दीप । जेंवी आंधारीं उजळिला. ॥ ८० ॥ इंद्रचापसमीप [6]तरणी । व्योमीं तडके [7]सौदामिनी । तैसा [8]मेळावा **अर्जुनीं** । झाला दिसे समस्तां. ॥ ८१ ॥ नानावाद्यांचे [9]बंबाळ । मेघध्वनीनें लोपती सकळ । तेंवी **पार्थ** गर्जतां, विकळ । घोषवीर्यें वीरांचीं. ॥ ८२ ॥ असंख्य शंखांचे नाद । प्रचंड दुंदुभीचा शब्द । [10]ब्रीदांवळीचे प्रबंध । [11]भाट करिती गर्जना. ॥ ८३ ॥ धृतराष्ट्र [12]पुसे, '**विदुरा**! गुणीं । [13]समुद्रगर्जनेसारिखी ध्वनी । ऐसा कोण हा [14]मेदिनीं । उभा ठेला सांग पां? ॥८४॥ भेदोनियां नभस्थळ । दणकेनें कांपवी अवनीतळ'. । **विदुर** म्हणे, '**कुं**तीबाळ । तृतीय पुत्र पैं तुझा. ॥८५॥ **पां**डव [15]**फा**ल्गुननामा । विद्यापरीक्षा दाखवी तुम्हां.' । राजा म्हणे, 'भाग्या सीमा । भुवनत्रयीं आगळी. ॥८६॥ धन्य मी एक राजेश्वर । विश्वामाजी मीच थोर । माझे वंशीं वंशधर । **भीमार्जुना**सारिखे. ॥८७॥ [16]पृथारणीपासाव गुणी । **धर्मा**दिक पवित्र [17]तीनी । [18]आहवनीय दक्षिणाग्नी । गार्हपत्य पैं जैसा.' ॥ ८८ ॥ यानंतरें [19]धनुष्यधर । गुणीं अभिमंत्रूनि शर । अस्त्रविद्याचमत्कार । दाविता झाला समस्तां. ॥ ८९ ॥ अग्निअस्त्रें प्रगटे [20]अनळ । वरुणअस्त्रें मोकली जळ । पर्जन्यास्त्रें महाप्रबळ । मेघ वृष्टी पाडीत. ॥ ९० ॥ वायव्यास्त्रें [21]झंझावात । पर्वतास्त्रें प्रेरी पर्वत । भौमास्त्रें भूमी आंत । भेदूनि जाय [22]रथेसीं. ॥ ९१ ॥ [23]अंतर्धाना जपतांक्षणीं । गोचर नव्हे जगाचे नयनीं । क्षणैक रथस्थ क्षणैक गगनीं । [24]उपेंद्रातुल्य आभासे. ॥९२॥ क्षणें रथीं क्षणें भूमीं । क्षणें तळपत दिसे व्योमीं । चोज करूनि अंतर्यामीं । सभा पाहे तटस्थ. ॥९३॥ लोहवराहस्तंभयंत्रीं । सवेग भ्रमतां

---

१. आवडता. (अध्याय १३५ श्लोक ७-८.) २. आलीकडे, समीप. ३. सुवर्ण, सोनें. ४. सुवर्णाचा भाता. ५. चकाकी, कांति. ६. सूर्य. ७. विद्युल्लता. ८. मेळ. ९. शब्द. १०. बिरदावळी, बिरुदावली=बिरुदांची (चिन्हांची, गुणांची) जी आवलि ती. ११. स्तुतिपाठक. १२. अध्याय १३५ श्लोक १५ पहा. १३. क्षुब्धार्णवनिभ. १४. पृथ्वीवर. १५. अर्जुन. १६. पृथारूप अरणीपासून. १७. धर्म, भीम आणि अर्जुन. १८. हीं तीन अग्नींचीं नावें आहेत. १९. धनुर्धारी अर्जुन. २०. अग्नि. २१. वावटळ, झंझानिल, वाऱ्यापावसाची गर्दी. २२. अध्याय १३५ श्लोक १९-२० पहा. २३. गुप्त होण्याचा मंत्र. २४. विष्णुसम.

भ्रमणचक्रीं । अधोवदनें त्याचे वक्रीं । भ्रमत जिव्हा विंधणें. ॥ ९४ ॥ लोहदंष्ट्रा विकट चारी । चपळ जिव्हा त्यामाझारीं । एकशरें पंच शरीं । लक्ष भेदूनि पाडिलें. ॥ ९५ ॥ वाळसूत्रें करमुद्रिका । विषाण[1]कोशीं विंधिली देखा । भ्रमत घंटिकेची लोळिंका[2] । भेदूनि केली निनाद. ॥ ९६ ॥ ऐसीं सूक्ष्माहूनि सूक्ष्में । लक्ष्यें भेदिलीं वीरोत्तमें । यानंतरें अनुक्रमें । शस्त्रसाधना दाविली. ॥ ९७ ॥ खड्गअसिलतागदाचक्रें । तोमरपाशभिंडिपाळ सूत्रें । यावेगळीं अनेक शस्त्रें । पैरजूनीयां[3] दाविलीं. ॥ ९८ ॥ सभानायकांचिया दृष्टी । मनेसहीत पावल्या तुष्टी । उपमा न सरे म्हणोनि गोष्टी । म्हणती नये बोलतां. ॥ ९९ ॥ तंव अकस्मात ऐकसरीं[4] । हाक वाजिन्नली बाहेरी, । नाद न सैमाय[5] अंबरीं[6] । तळीं थरारी भूतळा. ॥ १०० ॥ वाटे तँडकला[7] कनकाचळ[8] । खंडें आंतलें पृथ्वीतळ, । एक म्हणती, 'महाप्रबळ । मेघ गर्जे प्रळयींचा.' ॥ १०१ ॥ पादघातें सकंप धरणी[9] । संनिध स्थिरों न शके कोणी । उलथोनि पडती वीरश्रेणी । एकाएका वरौते. ॥ १०२ ॥ दोर्दंडपीडणाचे स्फोट[10] । गमे विजेचा कडकडाट । दचकोनियां श्रेष्ठ श्रेष्ठ । द्वारा उजू लक्षिती. ॥ १०३ ॥ खळबळोनि सभाउदधी । सांडीं धैर्यमर्यादाअवघी । म्हणे, 'प्राशन करावया क्रोधी । कोण अगस्ती पातला?' ॥ १०४ ॥ बंधूसहित दुर्योधनराजु । उठता झाला द्वारा उजु । पांडवांशीं भारद्वाजु । रणांगणीं शोभला. ॥ १०५ ॥ सावित्र[11] म्हणजे हस्तनक्षत्र, । पंचतारांसीं[12] रोहिणीमित्रें[13] । तेंवि तो आचार्य पवित्र । पांडवांसीं शोभला. ॥ १०६ ॥ असो; यापरी गर्जना करीत । कर्ण पातला प्रतापवंत । कवचकुंडलीं तरुणादित्य[14] । रंगाकाशीं उगवला. ॥ १०७ ॥ पादचारी कनकाचळ । सजीव सरळा सुवर्णताळ । कौरवशावकमेळीं[15] प्रबळ । ऐरावत[16] मिरवला. ॥ १०८ ॥ दिव्य किरीट विराजमान । दिव्य चाप दिव्य बाण । द्रोणपायां करूनि नमन । कृपाचार्या वंदिलें. ॥ १०९ ॥ पुढती वोढवला रंग । फिटला सभेचा वोसंगीं[17] । जैसा खंडत खंडत वोघ । घनें मागुती सांधिजे. ॥ ११० ॥

---

१. शिंग. २. घंटेची लोळी, लोळा. ३. परजणें=चमकावणें, फिरवणें, पेलणें, फिरवून दाखवणें, वावडणें. ४. एकदम. ५. मावे. ६. आकाशांत. ७. फुटला. ८. मेरुपर्वत. ९. पृथ्वी. १०. शब्द. ११. सावित्र=हस्तनक्षत्र. १२. पचतारायुक्त. [हस्तनक्षत्राचे तारे पांच असतात. अध्याय १३५ श्लोक ३० पहा.] १३. चंद्र. १४. बालसूर्य. १५. कौरवबालकसमूहांत. १६. इंद्राचा हत्ती. [इरा आपः तद्वान् इरावान् समुद्रः तस्मादुत्पन्नः । इरा उदकानि संत्यस्मिन् इरावान् इरावत्यब्धौ भवः ऐरावतः । असा ऐरावत शब्दाचा मूलार्थ आहे. समुद्रामध्यें उत्पन्न झालेला जो तो ऐरावत.] १७. उत्संग, मांडी.

यापरी सरसावली सभा । कर्णविद्यावधूची शोभा । पाहावया आर्तवंत[1] लोभा । ज्येष्ठकनिष्ठ आवघे. ॥ १११ ॥ बंधु पाठीचा पाकशासनी[2] । ऐसें सावित्र[3] नोळखे मनीं । गर्जना करीत चापपाणी । ईर्षावादें जल्पत. ॥ ११२ ॥ 'रे रे कुंतीच्या बाळका ! । ज्या ज्या कळा दाविल्या लोका । त्यांचीं नामें आपूनियां मुखा । कर्णीं[4] मातें परिसवीं. ॥ ११३ ॥ त्या त्या मी दावीन चौगुणी । म्हणी श्लाघ्यता मानिसी मनीं । अहंकार वाहे त्याची मूर्ध्नीं[5] । पायांतळीं माझिया.' ॥ ११४ ॥ ऐसें बोलोनि दिव्यास्त्रें । गुणीं जोडिलीं बीजमंत्रें । पार्थें सोडिलीं विचित्रें । तीं तीं सर्वही दाविलीं. ॥ ११५ ॥ शस्त्रास्त्रांचिया संधाना । अद्भुत दृष्टीं दाविलें जना, । हें देखोनि दुर्योधना । परमानंद न संघटे[6]. ॥ ११६ ॥ अत्यादरें धरूनि हातीं । आलिंगिला परमप्रीतीं । स्वागत पुसोनियां चित्तीं, । 'आवडे तें सांग पां. ॥ ११७ ॥ जें मज आज्ञापिसी मुखें । तें मी स्वीकारीन मस्तकें'. । कर्ण म्हणे, 'निजनिष्टंकें[7] । वाक्य[8] परिसें नरेंद्रा ! ॥ ११८ ॥ स्व-इच्छा आयणी[9] पायणी । अर्जुनासीं रणांगणीं । द्वंद्वयुद्ध करावें मनीं । आवडी असे अपार'. ॥ ११९ ॥ कौरव म्हणे, 'सुहृदश्रेष्ठा! । समान करूं राज्याचा वांटा । स्वीकारूनि भाग्य सुभटा! । भोग भोगीं मजसरी[10]. ॥ १२० ॥ साधूनि सुहृदाचिया हिता । पाय देईं असुहृदमाथां'. । हें ऐकोनियां पार्था । क्रोध अद्भुत नावरे. ॥ १२१ ॥ म्हणे, 'रे ! न[11] पाचारितां येणें, । न बोलवितां बहु बोलणें, । त्यांतें नीतिवंत शाहाणे । शाहाणा ऐसें न म्हणती. ॥ १२२ ॥ कारणेंविण वाढवी द्वेष, । ऐश्वर्य नसतां म्हणती ईश, । पुरुषांमाजी अधर्म पुरुष । ऐसें ज्ञाते बोलती. ॥ १२३ ॥ विद्यामदें वाढवी मान । तोचि फळे होवोनि अवमान । निस्तेज म्हणतां हुताशन[12] । प्राणनाश पतंगा[13]. ॥ १२४ ॥ सिंहासन्मुख मुक्ताफळें । दावितां भंगिती कुंभस्थळें[14] । कस्तूरी-

---

१. उत्सुक. २. इंद्रपुत्र. (अर्जुन.) ३. सूर्यपुत्र. (कर्ण.) [सावित्र हाच शब्द मूळ ग्रंथांत या स्थळीं योजिला आहे.] ४. 'श्रवणीं' असा पाठभेद आहे. ५. मस्तक. ६. सांठे, मावे. ७. अव्याहत, सिद्धांत. ८. अध्याय १३६ श्लोक १५ पहा. ९. आवड, बुद्धि. १०. माझ्याप्रमाणें. ११. न पाचारितां=अनाहूत. (अध्याय १३६–१८) १२. अग्नि. १३. शलभ. ['पतंगः शलभे शालिप्रभेदे पक्षिसूर्ययोः' इति विश्वः] १४. गंडस्थळें. (हत्तीच्या) गंडस्थळीं मोत्यें असतात तीं सिंह गंडविदारण करून घेतो–अशी कविप्रसिद्धि आहे. याच अर्थाचीं सुभाषितें पहा:–(१) 'गम्यते यदि मृगेंद्रमंदिरे लभ्यते करिकपोलमौक्तिकम्,' (२) येन भिन्नकरिकुंभविस्खलन्मौक्तिकावलिभिरंचिता मही,' (३) 'जानंति किं तु करजक्षतकुंभिकुंभनिर्मुक्तमौक्तिकमयानि वनांतराणि,' (४) 'येनाक्रम्य करींद्रगंडयुगलं निर्भिद्य हेलालवाल्लब्ध्वा ग्रासवरं वराटकधिया मुक्तागणस्त्यज्यते'. मोत्यांचीं उत्पत्तिस्थानें एका श्लोकांत वर्णिलीं आहेत तो असा:–'करींद्रजीमूतवराहशंखमत्स्याहिशुक्त्युद्भववेणुजानि । मुक्ताफलानि प्रथितानि लोके तेषां तु शुक्त्युद्भवमेव भूरि ॥'.

चेनि परिमळें । हरिण व्याधा[1] हिणावी. ॥१२५॥ मद्यप्या हातीं नागवें खड्ग । झाडितां निवटी आपुलें अंग । तेंवि अहंकार मिरवितां चांग । मूळ होय नाशातें. ॥१२६॥ शूरत्वें ज्यासी अहंभाव । त्याचा वारूनियां घाव । वैरियातें वर्मठाव । यम दावी मारावया. ॥ १२७ ॥ म्हणोनि अहंकार न कीजे कांहीं । न्यून नाहीं ब्रह्मांडगेहीं, । कार्तवीर्या[2] रावणा पाहीं । काय झालें शेवटीं.' ॥ १२८ ॥ ऐसें बोलतां[3] अर्जुन । राधेय क्षोभला दारुण; । म्हणे, 'रे! रंगें[4] हा समान[5] । वीरविद्येसि मांडिला. ॥ १२९ ॥ येथें आपुलालिया शक्ती । दाविजे बळाची प्रचीती,[6] । शंका नाहीं ययाअर्थीं । बोलतां किंवा झूजतां. ॥ १३० ॥ कोण्ही न बोलतां उत्तर । आदरें कलहाचा गिरिवर । उचलूं भावी, तया थोर । अनर्थ अंगीं आदळे. ॥ १३१ ॥ पोटींचेनि कपटाचारें । कठिण आणी व्यंग्योत्तरें[7] । बोलतां शिर छेदीन शरें । धरातळीं पाडीन.'[8] ॥ १३२ ॥ ऐसें अनुवादतां कर्ण, । पांडव सिद्ध झाले पांचहीजण । शस्त्रें पडताळूनि[9] जाण । उभे ठेले सन्मुख. ॥ १३३ ॥ बंधूंसहित दुर्योधन । उभा ठेला जिकडे कर्ण, । भीष्म कृपाचार्य द्रोण । पांडवांपाठीं सिद्ध झाले. ॥ १३४ ॥ दोन भागांतला रंग । मांडला[10] झुजाचा प्रसंग; । म्हणती, 'कौतुकामाजि बिरंग[11] । अनर्थ कैसा प्रसवला?' ॥१३५॥ पाहावया पुत्रांचें कौतुक । सूर्य आणि सुरनायक[12] । करूनि अभ्राची[13] जवनीक[14] । अंतरिक्षीं थोकले.[15] ॥ १३६ ॥ सावित्र[16] आणी पाकशासनी[17] । दोघां कलहांची मांडणी । देखोनि दुःखाचा दावाग्नी । कुंतीहृदया लागला. ॥ १३७ ॥ कर्ण अर्जुनाचेनि सुखें । चित्त समान तोखें । एकासी दुःख होतां दुःखें । चित्त पोळे समान. ॥ १३८ ॥ यालागीं व्याकुळ झालें मन, । नेत्रीं लोटलें जीवन[18], । भोंवंडी[19] दाटली संपूर्ण । मूर्छागत

१. पारध्यास. २. कार्तवीर्य=सहस्रार्जुन. याचा गर्व याच्या मरणास कारण झाला. जमदग्नीची कामधेनु यानें बळानें हरण केली. ती परत न दिल्यामुळें हा परशुरामाच्या हातून मरण पावला. ३. हें अर्जुनाचें भाषण मूळांत एका श्लोकांत आहे(श्लोक १८),पण त्याचा केवढा विस्तार मुक्तेश्वरानें पदरची भर घालून केला आहे हें शोधकांनीं पहावें. ४. सभास्थान. (अध्याय १३६ श्लोक १९-२०.) ५. सर्वसाधारण. ६. प्रतीति, अनुभव. ७. मनास लागण्यासारखीं उत्तरें, मर्मभेदी वचनें. ८. मोरोपंत–आदिपर्व–अध्याय २५ गीति ३५-३६ पहा. ९. पडताळणें=ढाल तरवार जोडा पागोटें इत्यादि प्रयाणसमयीं जें ज्या अवयवाच्या ठिकाणीं ज्याप्रकारें धारण करावयाचें तें त्या ठिकाणीं त्याप्रकारें धारण करणें. १०. 'मागला' असा अन्य पाठ. ११. 'विरंग । अनर्थ कैसा ओढवला' असा अन्य पाठ आहे. १२. देवांचा स्वामी. (इंद्र.) १३. मेघाची. १४. पडदा. १५. स्थित झाले. १६. कर्ण. १७. अर्जुन. १८. उदक, नेत्रजीवन=अश्रु. १९. भोंवडी=भोंवंड, भोंवळ, घेरी.

पाडियली. ॥ १३९ ॥ भाव जाणोनि अंतःकरणीं । विदुर सर्वज्ञ[1]शिरोमणी । चंदनोदक शिंपोनी वदनीं । सावध करी स्वहस्तें[2]. ॥ १४० ॥ म्हणे, 'दुश्चित्त[3]तेचा वात । वावरों नेदीं हृदयांत, । निर्भय चित्त करूनि स्वस्थ । चोज पाहें पुत्रांचें.' ॥ १४१ ॥ सजले[4] देखोनि दोघेजण । कृपाचार्य बोले वचन, । 'पांडुनृपाचा नंदन । प्रसिद्ध अर्जुन नामें जो. ॥ १४२ ॥ सोमवंशीं विजयध्वज । पृथादेवीचा आत्मज । तिचा जनक कुंतिभोज । मातृवंश यादवी. ॥ १४३ ॥ कर्णा ! त्वांही उभय[5] कुळें । वचनीं उच्चारूनि विमळें । समानयोग्यतेच्या बळें । द्वंद्व[7]युद्ध करावें.' ॥ १४४ ॥ ऐकोनि आचार्याचें वचन । कर्ण झाला विवर्णवदन[6] । पद्मपत्रीं जळधारकण[8] । तैसा घर्म[9] आननीं[10]. ॥ १४५ ॥ हें देखोनि दुर्योधन । गुरूसि बोले परिहारवचन, । 'त्रिविध योगें श्रेष्ठपण । पुरुषालागीं बोलिजे. ॥ १४६ ॥ जातिकुळें नामाथिला[11] । तो ऐकें[12] श्रेष्ठत्वें मानिला, । एक विद्येनें पूज्य झाला, । सेनाबळें पैं एक. ॥ १४७ ॥ धनुर्वेदविद्यागुरू । उपमे कार्तवीर्य अपरू । ऐसियाचा अनादरू । कैंवी चतुरीं करावा ? ॥ १४८ ॥ क्षात्रधर्मी आगळा सृष्टीं । तो केंवि पहावा हळवटदृष्टीं[13] । तुम्हां सुज्ञांच्या गोष्टी । नवल वाटे ऐकतां. ॥ १४९ ॥ राजा ऐसी भावना गुणीं । वर्तत असेल जरी अर्जुनीं । तरी हा [14]अंगराज्यासनीं । अभिषेकीन मी आतां. ॥ १५० ॥ नेणते मानिती अराजा । तरी हा करीन अंगराजा.' । म्हणोनि हाकारिलें द्विजा । श्रेष्ठ श्रेष्ठ जवळिकें. ॥ १५१ ॥ इच्छिजे धृतराष्ट्राच्या मनें । तेंचि मांडिलें दुर्योधनें । अनेक नृपांसहीत द्रोणें । मान्य केलें तेकाळीं. ॥ १५२ ॥ भीष्मादिकां देखतां नयनीं । रंगांगणीं मध्यस्थानीं । अंगदेशराज्यासनीं । अभिषेकिलें कर्णातें. ॥ १५३ ॥ तळीं मांडूनि रत्नपीठ[15] । तीर्थोदकीं[16] सुवर्णघट । हातें सारोनि वज्रकिरीट । तोयें[17] माथां ओपिलें. ॥ १५४ ॥ वेदमंत्रीं अभिषिंचन । सहस्र अयुतें [18]कपिलादान । द्विजां ओपी दुर्योधन । सुवर्णदक्षिणा समवेत.

१. सर्वधर्मवेत्ता. २. मूळग्रंथांत 'दासींकरवी'='प्रेष्याभिः' असें आहे. ३. खिन्नचित्ततेचा, चित्तखिन्नतेचा. ४. चापसहित असे. ५. मातेचें आणि पित्याचें. ६. म्लानमुख, व्रीडावनतमुख. ७. असाच दाखला मूळांतच आहे. (श्लोक ४ अध्याय १३६.) ८. मेघाचे कण. 'जळस्थिरीकरण' असा पाठभेद आहे. ९. घाम. १०. मुखावर. ११. नामांकित, प्रख्यात. १२. शास्त्राप्रमाणें सत्कुलीन, शूर आणि सेनापति ह्या राजांच्या तीन योनि गणिल्या आहेत; हे तीन राजे समजावे (आदिपर्व—अध्याय १३६ श्लोक ३५). १३. हलक्या दृष्टीनें. १४. अंगदेश हा भागलपुराजवळचा देश असें म्हणतात. हा प्रदेश गंगातटाकीं असून याची राजधानी चंपा अथवा अंगपुरी. १५. रत्नखचित आसन. १६. 'कुंकुमोदकीं' असा पाठभेद आहे. १७. उदक. १८. धेनुदान.

॥ १५५ ॥ श्वेतच्छत्र वाळव्यजनीं । हारकेयूरदिव्याभरणीं । शृंगारूनि राजचिन्हीं । नमन करवी गुरुतें. ॥ १५६ ॥ आज्ञा करी मांडलिकातें, । 'मजसमान मानूनि यातें । भूमी स्पर्शोनियां माथें । नमस्कारीं वंदावा.' ॥१५७॥ कर्ण विनवी, 'राजेश्वरा ! । मज त्वां दीधलें राज्यभारा । याचेनि पांलटें उदारा । कांहीं एक मागावें.' ॥ १५८ ॥ याचिसारिखी अमोल्य वस्तू । 'माग' म्हणतां कौरवनाथू । आलिंगूनि म्हणे, 'भावार्थू । विकार पावों न द्यावा. ॥ १५९ ॥ देहें पडे तंव, आवडी । चढते प्रेमें वाढवीं गोडी । अक्षय मित्रभावजोडी । जोडे ऐसें मज द्यावें.' ॥ १६० ॥ 'अवश्य' म्हणोनि तो भास्करी । प्रमाण ओपिलें दक्षिणकरीं; । असो, तेथें ते अवसरीं । राधारमण पातला. ॥ १६१ ॥ पुत्र झाला राज्यधर । ऐकोनियां अतिसत्वर । तेथें पातला समोर । येतां कर्णें देखिला. ॥ १६२ ॥ आर्द्रशिर बद्धपाणी । भाळ ठेवी पितयाचरणीं, । येरें आलिंगितां नयनीं । आनंदाश्रु लोटले. ॥ १६३ ॥ अवघ्राण करितां मस्तक, । चक्षुघटीं स्रवलें उदक, । केला दुसरा अभिषेक । ऐसें वाटे समस्तां. ॥ १६४ ॥ असो. यत्परी रथसारथी । कर्णें पूजिला पितृभक्ती । हें देखोनि पांडवां चित्तीं । निश्चय ऐसा मानला. ॥ १६५ ॥ धीर न धरवे भीमसेना, । म्हणे, 'रे ! सूताचिया नंदना ! । वर्णोत्तम ऐसी संज्ञा । आजी कळली आमुतें. ॥ १६६ ॥ चित्त न घालोनि क्षात्रधर्मी । हातीं धरूनि प्रतोद रश्मी । दासभावें दासधर्मीं । रथसारथ्य करावें. ॥ १६७ ॥ अर्जुनासीं द्वंद्वयुद्ध । करूं पहासी बुद्धिमंद, । जेंवी कां डोळसासीं अंध । पैज घाली लपावया. ॥ १६८ ॥ अंगदेशराज्यासनीं । योग्य नव्हेस अधमवर्णी । श्वान जवळा महायज्ञीं । पुरोडाश लाभेना.' ॥१६९॥ ऐसें बोलतां वृकोदरा, ।

---

१. वाळव्यजन=चंवरी, चामर. २. केयूर=भुजभूषण. ३. बद्दल, ऐवजीं. ४.आमरण, यावज्जीव. ५. तथेति. ६.सूर्यपुत्र. (कर्ण.) ७.राधेचा पति=अधिरथ. यालाच कर्ण नदींत सांपडला. ८.अभिषेकानें ओलें (आर्द्र) शिर (मस्तक) ज्याचें असा. ९. हात जोडलेला. १०. हुंगणें. प्राचीनकाळीं मुलांसारख्या मानलेल्या स्वीय आप्त जनांचें मस्तक, ते बाहेरून प्रवास करून आले म्हणजे वडील मनुष्यांनीं हुंगावें, असा परिपाठ होता असें वर्णन पुष्कळ ठिकाणीं आहे. ११. अध्याय १३७ श्लोक ४ पहा. १२. कर्ण हा सूतपुत्र असा निश्चय. १३. सारथ्याच्या. १४. चाबूक. १५. घोड्यांच्या दोऱ्या. १६. 'पळावया' असा पाठभेद आहे. १७. 'श्वा हुताशसमीपस्थं पुरोडाशमिवाध्वरे' असें मूळांत आहे. १८. अग्निहोत्राच्या अग्नीवर पिष्ट भाजून जें होमद्रव्य तयार करतात तें. [पुरः प्रथमं दाशंलेनम् (यच्छन्ति एनम्); 'पुरोडाशो हविर्भेदे चमस्यां पिष्टकस्य च । रसे सोमलतायाश्च हुतशेषे च कीर्तितः॥' इति विश्वः.]

आवेश न धरवे **राधेयवीरा** । [1]दांत खावोनि करकरां । [2]दिवाकरा अवलोकी. ॥ १७० ॥ क्रोधें स्फुरती ओंठ । भृकुटी [3]ताऊनि तेजिष्ठ । [4]श्मश्रू सरसाऊनि नीट । **पृथे** उजू पाहिलें. ॥ १७१ ॥ हें देखोनि दारुण । तैं लक्षूनियां भीमसेन, । [5]तयाप्रती **दुर्योधन** । प्रतिवचन बोलत. ॥ १७२ ॥ 'सभेमाजी श्रेष्ठानिकटीं । कवणा काय **बोलिजे** गोष्टी । जया नकळे, तो या सृष्टीं । मनुष्य म्हणतां लाजिजे. ॥ १७३ ॥ शल्य होऊनि [6]परअंतरीं । शब्द राहे बहुकाळवरी । ऐसें बोले तो [7]निर्धारीं । [8]कीटकातुल्य जाणावा. ॥ १७४ ॥ शूर नृपाळ नदी साधू । यांचा न कीजे [9]मूळशोधू, । मुखें बोलतां निंदावादू । कोण श्रेष्ठत्व पावला ? ॥ १७५ ॥ उदकापासोनि झाला [10]अनळ । तेजें जाळी ब्रह्मांडगोळ, । [11]दधीचीचें अस्थी तेजाळ । वज्र भेदी पर्वता. ॥ १७६ ॥ **द्रोणाचार्य** गुरु आमुचा । [12]द्रोणकलशीं [13]उद्भव त्याचा । [14]**स्कंद आग्नेय** कृत्तिकांचा । **रौद्र गांगेय** बोलिजे. ॥ १७७ ॥ जगद्गुरु **व्यास** भगवान । त्याचें उपजतें कवण स्थान । तुम्हां कैसें झालें [15]जनन । तें कां हृदयीं नाठवा? ॥ १७८ ॥ दृष्टी न घालूनि [16]पादपमूळीं । सुमस्वाद पाहिजे फळीं । [17]कर्दम सांडूनि [18]अलिकुळीं । सुवास [19]पद्मीं सेविजे. ॥ १७९ ॥ [20]शरस्तंबीं **गौतमवीर्यें** । देह धरिला **कृपाचार्यें** । ब्राह्मणापासाव क्षत्रिये । जन्मले ऐसें बोलती. ॥ १८० ॥ अवलोकनें ज्याचिया दृष्टी । [21]कुंजर [22]मरती कोट्यानकोटी । तो सिंह जन्मला [23]मृगीचे पोटीं । हें कैसेनि घडे पां ? ॥ १८१ ॥ [24]असंख्यरोमाग्रीं [25]गिरिवर । धरूनि [26]बांधी जो

---

१. दांत खाणें=क्रोधानें दांत कडकड वाजविणें. २. सूर्याला. [अ० १३७ श्लो० ८.] ३. चढवून. ४. मिशा. ५. त्या भीमाला. ६. दुसऱ्याच्या हृदयांत. येथें संधि अवश्यकर्तव्य असून केला नाहीं. ७. निश्चयें. ८. 'कटकातुल्य' असा अन्य पाठ आहे. ९. अध्याय १३७ श्लो० ११-१८.१०. अग्नि.११. दधीच नामक ऋषीचें. दधीच मुनि हा इंद्राचा शिष्य आणि अश्विनीकुमारांचा गुरु. वृत्रासुरवधार्थ यानें आपलीं हाडें (अस्थि) इंद्रास देऊन त्यांचें वज्र करविलें—अशी कथा आहे.(वनपर्व—अध्याय १००-१०१) १२. द्रोणासारख्या कलशनामक यज्ञपात्रीं. १३. उत्पत्ति. (अध्याय ३० ओवी ४०-४५.) १४. कार्तिकस्वामी; स्कंद=महादेवाचें रेत शरवण नामक वनांत स्कन्न (गलित) झालें म्हणून 'स्कंद' असें नांव पडलें. हें रेत कांहीं काळपर्यंत अग्नीनें धारण केलें म्हणून 'अग्निभू (आग्नेय)' असें नांव पडलें. कृत्तिकासंज्ञक सहा नक्षत्रांनीं गंगेनें टाकलेल्या गर्भास वाढविलें म्हणून 'कार्तिकेय' असें नांव पडलें. रुद्राचा म्हणून 'रौद्र' आणि गंगेचा म्हणून 'गांगेय'. १५. उत्पत्ति. १६. वृक्षाच्या मूळांत. १७. चिखल. १८. अलि+कुळीं=भ्रमर+समूहांनीं. १९. कमळांत. २०. शरनामक गवताच्या राशीमध्यें. २१. हत्ती. २२. 'पळती' असा अन्य पाठ. २३. मृगी व्याघ्रातें कशी प्रसवते—असें मूळांत आहे. (श्लोक १६ अध्याय १३७.) २४. अगणित केंसांच्या अग्रभागांवर. २५. मोठे पर्वत. २६. सेतुद्वारा बांधी.

सागर । तो हनुमंत अंजनीकुमर[1] । हें काय ज्ञाते बोलती ? ॥ १८२ ॥ समुद्रवलयांकित भूमिका । ने[2] पुरे ज्याची पदमृत्तिका । त्यासी अंगराज्याचा लेखा[3] । काय विशेष बोलणें?' ॥ १८३ ॥ ऐसें बोलोनि **कुरुनायकें** । गदा पडताळिली तँवकें[4] । हें देखोनि रंगभूमिके । हाहाकार माजला. ॥ १८४ ॥ अर्जुनभयाचिये आधीं । **कौरव** राहिले कर्णपरिधीं[5] । संध्याकाळ तयासंधी । उठवावया पातला. ॥ १८५ ॥ वरुणदिग्वधूचें[6] वदन । चुंबिता झाला सहस्र[7]किरण, । हें देखोनि अति उद्विग्न । म्लानमुख पद्मिणी. ॥ १८६ ॥ भ्रष्ट पुरुषाची जाती । ऐसा विकल्प धरूनि चित्तीं । चक्रवाकी[8] आपुला पती । त्यजूनि जाती परपारा. ॥ १८७ ॥ पवित्र स्पर्शला देखोनि दोषा । कलंकी उजळी आपुली दशा । क्षुद्र पावती संतोषा । तेंवि तारा झळकती. ॥ १८८ ॥ गृहस्थ पडतां अनाचारीं । झाला आश्रित दिवाचारी । गाढनिद्रेच्या आंधारीं । लपावया चालिले. ॥ १८९ ॥ समर्थ पावती तेजहाणी । दूतिका[9] गर्जती निंदावचनीं । [10]पंकोद्भव नीचयोनी । म्हणोनि कुमुदें[11] हांसती. ॥१९०॥ असो. हे अप्रसंगवाणी । **कर्ण** कुरुराज[12] हात धरुनी । वेष्टित सेवकसुहृज्जनीं । रंगाबाहेरी निघाले. ॥ १९१ ॥ दीप दीपिका नेणों किती । असंख्य उजळिल्या चंद्रज्योती । वाद्यें गर्जतां व्योमक्षितीं । नाद अद्भुत कोंदला. ॥ १९२ ॥ सांडोनि मर्यादाजवनिक[13] । प्रळयीं पसरे सिंधूदक[14] । सभा विसर्जूनि लोक । निघतां तैसे भासती. ॥ १९३ ॥ अनेक राजे राजयुवती । असंख्य प्रजांचिया पंक्ती । आपुलाले गृहाप्रती । हर्षयुक्त चालिले. ॥ १९४ ॥ एक वर्णिती दुर्योधना, । एक म्हणती, 'धन्य रे ! **कर्णा** !' । एक म्हणती, '**भी**मार्जुना-। समान कोण्ही असेना.' ॥ १९५ ॥ **कर्णासी** **अं**गराज्यप्राती । उदित कलह पावला

---

१. 'वानरी' असा अन्य पाठ आहे. २. 'न पवे' असा पाठभेद आहे. ३. पर्वा. ४. आवेशानें. ५. कर्णाच्या संभोवतालच्या प्रदेशांत. ६. पश्चिमदिशारूपिणी जी स्त्री तीचें मुख. ७. सूर्य. ८. चक्रवाक नामक एक पक्षी आहे. हा जोड्यानें जलाशयांचा आश्रय करून असतो. त्यांत पुरुष (नर) स्त्री (मांदी) यांचा रात्रीं ऋषिशापामुळें नित्य वियोग होतो. त्यांचा परस्परांवर अनुराग फार असल्यामुळें त्यांना वियोगाचें दुःख अत्यंत असह्य होतें, पण रात्र सरून सूर्योदय झाला म्हणजे त्यांची परस्पर भेट होते. व तीं सारा दिवस एक ठिकाणीं राहून घालवितात—अशी कविप्रसिद्धि आहे. 'त्यज चक्रवाकि शोकं बधान धैर्यं सहस्व समयममुम् । अयमेव वासरमणिर्हरिष्यते शापमूर्च्छां ते ॥' इत्यादि सुभाषितांवरून चक्रवाकपक्ष्याची स्थिति सुव्यक्त होते. ९. 'निंदक' असा पाठभेद आहे. १०. चिखलापासून उत्पत्ति ज्यांची अशीं. ११. कमळें. १२. सुयोधन. १३. मर्यादारूप पडदा. १४. सागराचें उदक.

शांती, । कुंती सुखावोनि चित्तीं । नमस्कारी विदुरातें. ॥ १९६ ॥ विद्याप-रीक्षारंगागारीं । सांगतां दृष्टी देखिजे चतुरीं । द्रुपदराजयाची पुढारीं । कथा सादर परिसावी. ॥१९७॥ इति श्रीआदिपर्व भारत । पर्वीं अपूर्व प्रमेयामृत । देवस्वरूप श्रोते संत । म्हणोनियां सेविती. ॥ १९८ ॥ मुक्तेश्वर विनवी संतां । कृपाहस्त ठेऊनि माथां । शिकवाल तशी बोलूं कथा । शुकसारिके-सारिखी. ॥ १९९ ॥

अध्याय बत्तिसावा.

पाचारूनि शिष्य सकळ । द्रोण बोले उतावीळ, । 'गुरुदक्षिणा ओपितां काळ । प्राप्त झाला वीर हो ! ॥ १ ॥ बहुकाळ वसे माझिये मनीं । तुम्हीं संकल्प केला वचनीं । तें सत्य करूनि आमुचे ऋणीं । उत्तीर्ण झालें पाहिजे. ॥ २ ॥ द्रुपदराजा पंचाळपती । रणीं जिंकोनि सर्व शक्ती । बांधोनि ओपिल्या माझे हातीं । गुरुदक्षिणा पावली.' ॥ ३ ॥ ऐकोनि आचार्याचें वचन, । 'अवश्य' म्ह-

---

१. या अध्यायाला 'विद्यापरीक्षा' असें नांव दोन जुनाट हस्तलिखित पोथींत दिलेलें आढळतें. यांत युधिष्ठिरादिकांची परीक्षा, अर्जुनकृत स्वास्त्रशिक्षादर्शन, दुर्योधनकृत कर्णाचा राज्याभिषेक आणि भीमसेनकृत कर्णाधिक्षेप असे विषय आहेत. या अध्यायांत मूळांतील १३४-१३५-१३६ आणि १३७ अशा चार अध्यायांचा समावेश केलेला आहे. तसेंच मोरोपंतांनीं हा मजकूर एकाच अध्यायांत [आदिपर्व–अध्याय २५] आणिला आहे. २. कीर मैना इत्यादिकांसारिखी. ३. शिष्य=नियमन करण्यास योग्य जो तो शिष्य असा मूलार्थ आहे. (शास्=नियमन करणें.) पण मराठींत 'शागीर्द, सेवक' असाही अर्थ कालांतरानें झाला, कारण शास्त्यापाशीं जे शिष्य असतात ते त्याची सेवा करतात, तेव्हां शिष्य म्हणजे सेवक. ४. गुरूला देण्याचें धन. ५. 'शोपिता' असा अन्य पाठ. ६. उतराई. ७. आचार्य. "आ उपसर्गपूर्वक चर् धातूचा अर्थ सत्कार करणें, सेवा करणें, असा आहे, त्यास कर्मवाचक य प्रत्यय लागून आचार्य शब्द झाला आहे. त्याचा अर्थ सेवा करण्यास योग्य असा आहे. पूर्वी गुरुगृहीं राहून त्याची सेवा करून विद्याभ्यास करण्याचा परिपाठ असे तो या शब्दावरून द्योतित होतो. गुरूची सेवा करून विद्या प्राप्त करून घेणें, किंवा द्रव्य देऊन विद्या शिकणें, किंवा आपल्यास येईल तें दुसऱ्यास शिकवून आपणास येत नसेल तें त्याजपाशीं शिकणें, हे विद्या करण्याचे तीन मार्ग समजले आहेत. हल्लीं दुसरा म्हणजे द्रव्य देऊन विद्या शिकण्याचा मार्ग सुरू आहे. पूर्वी आपल्या देशांत बहुतकरून सर्व ठिकाणीं पहिलाच मार्ग सुरू होता, हें आचार्य किंवा उपाध्याय, या शब्दावरून स्पष्ट होतें. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट या शब्दांवरून कळून येते ती ही कीं, आचार्याची किंवा उपाध्यायाची स्त्री या अर्थी आचार्य किंवा उपाध्याय शब्दाचें स्त्रीलिंगरूप आचार्यानी किंवा उपाध्यायानी असें होतें. व जी स्त्री स्वतः व्याख्यान देणारी किंवा शिकविणारी तिला आचार्या किंवा उपाध्याया असें म्हणावें असें सांगितलें आहे. यावरून

णती कौरवगण; । आज्ञापितां दुर्योधन । प्रस्थानभेरी ठोकिल्या. ॥ ४ ॥ सज्य केली चातुरंग सेना । वाव घालोनियां निशाणा । अश्व कुंजर रथिये नाना । शस्त्रास्त्रीं सिद्धले. ॥ ५ ॥ वाद्यें वाजूं लागलीं अपार । बळें चालिले कौरवभार,। हेडवडलें पांचाळपुर। वार्ता पुढें परिसोनी. ॥६॥ बंधू प्रधानसहित सेना । वीरश्री चढली यज्ञसेना, । क्षुद्र पक्षी देखोनि श्येना । आवेश न धरवे ज्यापरी. ॥ ७ ॥ कडकडाटें वीरभारीं । पांचाळ पातला बाहेरी । उभयदळाचे झुंजारीं । रणकल्लोळ माजला. ॥ ८ ॥ अर्जुन विनवी आचार्यातें, । 'मनीं अहंकार कौरवांतें । धरूनि आणूं द्रुपदातें । शौर्यबळें आपुलिया. ॥ ९ ॥ परंतु जाणवेल अंतःकरणा, । नाश पावेल कौरवसेना, । रणीं धैर्य न धरवे कोणा, । पाठी देवोनि पळतील. ॥ १० ॥ रणमूर्धीं पांचाळराज । धरूं न शकती धृतराष्ट्रतनुज । दर्पें भग्न झालिया काज । सिद्धी आम्हीं पावणें. ॥ ११ ॥ यावरी कांहीं स्वल्प करणी । करून दाखवूं तुमचे नयनीं । तोंवरीं स्वस्थ रथासनीं । अर्धक्रोशानंतरें ॥ १२ ॥ राहून कौतुक पाहूं येथ'; । म्हणोनि थोकले द्रोणासहित. । तंव संग्राम अत्यद्भुत । उभय भारीं माजला. ॥ १३ ॥ ऐसा आंवांका धरूनि पोटीं । द्रोणाचार्य घेऊनि पाठीं । धर्म भीम आणि [11]किरीटी । युद्ध दृष्टी लक्षिती. ॥ १४ ॥ बळें दुर्धर पांचाळदळ, । लोटलें जैसें समुद्रजळ । कौरवसेना वडं[12]-

---

पूर्वी जसे मोठमोठे अनेक विषयांवर व्याख्यान देणारे आचार्य असत त्याप्रमाणेंच मोठमोठ्या विद्वान् नामांकित स्त्रिया आचार्या असत. त्या गहन विषयांवर व्याख्यान देत व पुष्कळ विद्यार्थी पढवीत असें या शब्दांवरुन स्पष्ट होतें. स्त्रिया पूर्वी विद्या शिकत याविषयीं पाराशर माधवीय या ग्रंथांत यमाचें वचन आहे, तें येणेंप्रमाणें:–'पुरा कल्पे तु नारीणां व्रतबंधनमिष्यते । अध्यापनं च वेदानां सावित्रीवचनं तथा ॥' तसेंच अग्निहोत्रादिक कित्येक यज्ञकर्मांत केवळ स्त्रियांनीं म्हणावयाचे मंत्र आहेत. यावरुन पूर्वी भरतखंडांत पुरुषांप्रमाणेंच स्त्रिया विद्या शिकत होत्या यांत संशय नाहीं. स्त्रियांनीं कोणतीही विद्या न शिकण्याची चाल या देशांत यवनी राजे झाल्यापासून पडली हें निःसंशय आहे". (व्युत्पत्तिप्रदीप पृ० ३२-३३.) ८. 'तथा' असें.

१. कौरवसैन्यसमूह. २. हडवडणें=दंगा इत्यादि कारणांनीं गडबडून जाणें. 'गडवडलें' असा अन्यपाठ. ३. द्रुपदराजाला. ४. वीरांत. ५. कोलाहल. ६. युद्धाच्या अग्रस्थानीं. (अध्याय १३८ श्लोक १३ पहा.) ७. अर्ध्या कोसाच्या अंतरावर दूर स्वस्थ असूं. ८. उभे राहिले. ९. सैन्यांत. १०. धैर्य. ११. अर्जुन. १२. वडवा+अनल=घोडी+अग्नि=घोडीसारख्या मुखाचा समुद्रजलशोषक अग्नि. यालाच 'और्वाग्नि' असें म्हणतात. या संबंधानें पौराणिक कथा आहे ती अशी:–परशुरामानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली तेव्हां क्षत्रियांच्या स्त्रिया इतक्या घाबरून गेल्या कीं त्यांचे भयानें गर्भपात देखील होऊं लागले. तेव्हां एका स्त्रीनें आपला गर्भ पोटांतून काढून आपल्या मांडींत (ऊरुंत) ठेविला. नंतर कांहीं काळानें हा गर्भ जेव्हां बाहेर आला, तेव्हां कोपानें सर्व

वानळ । धडाडीत प्रतापें. ॥ १५ ॥ एक धांवे विझवावया । एक धांवे शोषावया । उभयभागीं वीरश्रिया । [1]तांडव नाचों लागले. ॥ १६ ॥ कुंजरावरी कुंजरभार । राउतावरी [2]अश्वस्वार । नानाशस्त्रीं पायींच वीर । [3]घोरें कंदना मिसळले. ॥ १७ ॥ रथ लोटले रथियावरी, । जैसे गिरिवरी महागिरी, । धडका लागतां [4]अंबरीं । नाद उठती कडकडां. ॥ १८ ॥ शूरत्वाचेनि बळाभिमानें । पांचाळ मानी जैसीं तृणें । [5]गजदळावरी [6]पंचाननें । धांविजे तैसा धांवत. ॥ १९ ॥ रथेसीं एकटा पातला पुढें । लक्षें नेमिलें कौरवतोंडें । धनुषीं योजिलें कुराडें । वज्रातुल्य तेजस्वी. ॥ २० ॥ घनें घातलीं सात वांकुडी । तैसी संधानक्रिया गाढी । धनुष्य ओढावया ओढी । वाव न साधे कौरवां. ॥ २१ ॥ भिन्न भिन्न शत सायका । नेमूनि विंधिलें एकएका । समोर यावया आवांका । [7]सहसा कोणा न धरवे. ॥ २२ ॥ उरीं शिरीं बाहुवदनीं । वीर भेदिले तीक्ष्णबाणीं । अश्वकुंजरांचिया श्रेणी । एकएका त्रासिलें. ॥ २३ ॥ [8]अग्निवेशगुरूची दीक्षा । लक्षितां न लक्षवे लक्षा । चोज वाटे मुख्यमुख्या । कर्णादिकां मानसीं. ॥२४॥ [9]दुर्योधन दुःशासन । विकर्ण सुबाहु दीर्घलोचन । झुजा मीनले, तयां बाण । असंख्यात ओपिले. ॥ २५ ॥ द्रुपद म्हणे कौरवांतें, । 'द्रोणासमान मानूनि मातें । धनुष्य ठेवूनियां हातें । [10]दंडवतें मज घाला. ॥ २६ ॥ माझिया [11]गुरुबंधूचे शिष्य । ते मी मानीं आपुले दास । विद्या अपूर्ण ते विशेष । मजपासाव अभ्यासा. ॥ २७ ॥ [12]व्यर्थ जयाची दुराशा । धरोनि करितां संग्रामशोषा । गुरुअवज्ञामहादोषा । पात्र तुम्हीं झालेती.' ॥ २८ ॥ जेंवी [13]अलातचक्ररेखा । तेंवी हस्तवेग देखा । कौरवसेनेचिया लोका । अतिआक्रांत मांडला. ॥ २९ ॥

पृथ्वीस जाळूं लागला. नंतर देवांनीं त्याला समुद्रांत ठेविलें. हा प्रत्यहीं बारा योजनें उदक भक्षण करतो अशी समजूत आहे. हा ऊरु म्हणजे मांडीपासून निघाला म्हणून याला 'और्व' असें म्हणतात.

१. उद्धत नृत्य. २. घोडेस्वार. ३. भयंकर रणा. ४. आकाशीं. ५. गजसैन्यावर. ६. सिंह. [पंच-आनन=विस्तृतमुख=विस्तृत ज्याचें मुख आहे तो; किंवा आनन आणि चार पाय हीं पांच मुखें ज्याचीं तो (सिंह) 'मुखं पादाश्च पंच आस्यानीव यस्य स पंचास्यः'] ७. 'धैर्य' असा अन्य पाठ. ८. ही गुरुपरंपरा अशी आहे:—अगस्त्याचा शिष्य अग्निवेश, अग्निवेशाचे शिष्य द्रोण आणि द्रुपद, आणि द्रोणाचा अर्जुन. ९ अध्याय १३८ श्लोक १९-२० पहा. १०. दंडवत घालणें= नमस्कार करून शरण आलों असें सूचविणें. ११. द्रोणाचार्यांचे. [द्रोण व द्रुपद हे सहाध्यायी असून अग्निवेशाजवळ पढले. अध्याय १३१ श्लोक ४१-४३.] १२. 'असाध्याची दुराशा । धरोनि करितां संग्रामसोसा' असा अन्य पाठ आहे. १३. अलात (कोलीत) चक्रासारखें फिरविलें असतां चक्रासारखा आकार दिसतो तें अलातचक्र, त्याची ओळ.

द्रुपदरायाचे शरमारीं । कौरव खोंचले सहपरिवारीं । पळाले देखोनि समरीं । पांचाळपुरीं आल्हाद. ॥३०॥ शंख भेरी मृदंग काहाळी[1] । गोंधळ माजे पांचाळदळीं । महावीरांची आरोळी । जयजयकार[2] प्रवर्तला. ॥ ३१ ॥ नाना शस्त्रें धरूनि मुष्टीं । नगरवासी कोट्यानकोटी । कौरवसेनेचिये पाठीं । ताडण करीत पातले. ॥ ३२ ॥ द्रुपदाचें शरसंधान[3] । नागरिकांचें[4] करताडण । तेणें कौरवांचें सैन्य । दाहीदिशा भंगलें. ॥ ३३ ॥ कर्ण विकर्ण दुःशासन । थारों न शके दुर्योधन । अनेक राजकुमर जाण । माघारले परौते[5]. ॥ ३४ ॥ धृतराष्ट्राचे बळिष्ठ तनुज । रायादुर्योधनाचे अनुज । पळतां देखोनि पांचाळराज । टाळी[6] पिटोनि हांसतसे. ॥ ३५ ॥ म्हणे, 'अंधबाळकें चक्षुहीनें । सैरा[7] पळती आडरानें । हातीं धरूनि अभयदानें । नीट वाटे लावणें'. ॥ ३६ ॥ घाय वार लागले एका । दीर्घस्वरें[8] मारिती हाका । एक म्हणती, 'राखा राखा । धांवा भीमा! अर्जुना!' ॥ ३७ ॥ सेना परिभविली मोडें । पळत पातली पांडवांकडे । हें देखोनि वीर गाढे । भीमार्जुन क्षोभले. ॥ ३८॥ आचार्यासीं करूनि नमन । सवेग उठले दोघेजण । रथीं वेळंघला[9] अर्जुन । धनुष्यबाणीं सज्जला. ॥ ३९ ॥ गदा[10] घेऊन उतावीळ । पुढां धाविन्नला भीम सबळ । जेंवी मांडल्या प्रळयकाळ । [11]दंडपाणी भूतांतें. ॥४०॥ पादचारी रणवेताळ । घोषें गर्जवी ब्रह्मांडगोळ । वर वळला देखोनि विकाळ । रणोत्साह वीरांचा. ॥ ४१ ॥ तिमिंगिळें[12] निघे समुद्रजळीं । तैसा भीम पांचाळदळीं । बळें मिसळतां खळबळी । सेना यज्ञसेनाची. ॥ ४२ ॥ असंख्यात कुंजर थाट[13] । स्रवती मदोदकाचे[14] पाट । त्यावरी उठावला बळिष्ठ । गदाघायीं ताडित. ॥४३॥ [15]कुंभस्थळापासूनि धरणी[16] । रक्तप्रवाह ताम्रवर्णी । मुक्ताफळांचिया[17] श्रेणी । उभमार्गीं विखुरल्या[18]. ॥ ४४ ॥ गदाघायीं कुंभस्थळें । फुटती जैसीं सुपक्व फळें ।

---

१. काहल, काहला, वाद्यविशेष, शृंग. २. वाखाणणी, जयघोष. ३. शर धनुष्यावर योग्यप्रकारें जोडून मारणें. ४. शहरांतील लोकांचें. ५. दूर, पलीकडे. ६. टाळी पिटणें=टाळी वाजविणें, मारणें. ७. सैरावैरा, सैरा, सैराट=मनास येईल तसें. ८. 'आर्तस्वरें' असा अन्य पाठ. ९. चढला. १०. अध्याय १३८ श्लोक २७-२९ पहा. [भीम गदायुद्ध संकर्षणा(बलरामा)जवळ शिकला. अध्याय १३९ श्लोक ४.] ११. यम. १२. हा मासा शंभर योजनें लांब असतो. हा 'तिमि' नामक मत्स्याला गिळून टाकतो म्हणून याला 'तिमिंगिल' असें नांव आहे. (मूळांत मकर सागरांत प्रवेश करतो तसा असें आहे. अध्याय १३८ श्लोक ३० पहा.) १३. समूह. १४. मद=हत्तीच्या गंडस्थलांतून स्रवणारें उदक. १५. गंडस्थळापासून. १६. पृथ्वी. १७. मागें अध्याय ३१ ओवी १२५ टीपा पहा. १८. पसरल्या.

कीं मृद्धटपंक्ती[1] लोहमुसळें[2] । जेंवि फुटती फटफटा. ॥ ४५ ॥ बळें बैसतां गदाघात । कुंजर आणि महावंत[3] । पडती जैसे शिखरसहित । शैल्य[4] वज्रें ताडितां. ॥ ४६ ॥ विशाळ वारणांच्या[5] ओळी । असंख्य पाडोनि रणमंडळीं । पुढां धाविन्नला आतुर्बळी[6] । महारथी[7] मारावया. ॥ ४७ ॥ अश्व सारथी रहंवर[8] । एके घायीं करी चूर । पाठीं राउतेसीं वार । घाव घालूनि दुखंडी. ॥ ४८ ॥ नागरिकें मानूनियां दीनें । न मारिजेती भीमसेनें । शब्दें वळिजेती गोधनें । तेंवी म्हणे 'परता रे.' ॥ ४९ ॥ येरीकडे विजयी पार्थ । पुरवावया गुरूची आर्त[9] । द्रुपद लक्षूनियां रथ । वातवेगें प्रेरिला. ॥ ५० ॥ अश्वरथकुंजरभार । विभांडीत रणझुंजार । रथयोद्धे शतसहस्र । बाणधारा खंडिले. ॥ ५१ ॥ पदातीदळाची आंगवण[10] । तृणप्राय लेखिजे कवण । सुटतां अर्जुनाचे बाण । उभेची प्राण सांडिती. ॥ ५२ ॥ बाणधारा अकस्मात । शिरें उडती मुगुटासहित । शस्त्रीं[11] उभारिले हात । ते नभांत उसळती. ॥ ५३ ॥ बाण लागोनियां चरणीं । कोथळे[12] पडताती धरणी । वेग न लक्षवे नयनीं । संधानाचा सर्वथा. ॥५४॥ अशुद्धनदीचे[13] खळखळाट । पुसती सागराची वाट । मार्ग दावावया नीट । अपार प्रेतें चालिलीं. ॥ ५५ ॥ असंख्य निमाले रणतळवटीं । उरले तीहीं दीधली पौठी[14] । अर्जुनबाणाचिये वृष्टी । ठाव न दिसे लपावया ॥५६॥ हाहाकार माजला प्रबळ । फुटलें पांचाळाचें दळ । एक म्हणती 'प्रळयकाळ । अत्यद्भुत मांडला.' ॥५७॥ असो. फाल्गुन चापधारी[15] । धाविन्नला द्रुपदावरी । तेणें पार्थ रणचत्वरीं[16] । सहस्रबाणीं विंधिला. ॥ ५८ ॥ ते साहोनि चापपाणी । पांचाळ विंधिला लक्षबाणीं । हें देखोनि रणांगणीं । सत्यजित[17] धाविन्नला.

---

१. मातीच्या घटांची माला=अनेक मडकीं. २. लोखंडी मुसळानें. ३. माहूत, हस्तिपक. ४. पर्वत. ५. गजांच्या. ६. अत्यंत बलवान्. ७. महारथी—रथांत राहून युद्ध करणाऱ्या वीरांचे महारथ, अतिरथ, रथ आणि अर्धरथ असे चार वर्ग मानले आहेत. त्यांची व्याख्या अशी:— 'एको दशसहस्राणि योधयेद्यस्तु धन्विनाम् । शस्त्रशास्त्रप्रवीणश्च महारथ इति स्मृतः ॥ अमितान्योधयेद्यस्तु संप्रोक्तोऽतिरथस्तु सः । रथस्त्वेकेन यो योद्धा तन्न्यूनोऽर्धरथः स्मृतः ॥.' याचा भावार्थ:— जो शास्त्रविद्येमध्यें प्रवीण असून एकटा दहा हजार धनुर्धर वीरांशीं युद्ध करतो, त्यास 'महारथ' असें म्हणतात. जो अगणित धनुर्धारी वीरांशीं युद्ध करतो, त्यास 'अतिरथ' असें नांव आहे. जो एकट्या वीराशीं लढतो, तो 'रथ'; आणि त्याहून कमी तो 'अर्धरथ'. यासच महारथी, अतिरथी, रथी आणि अर्धरथी असें म्हणतात. ८. रथ. ९. इच्छा. १०. शक्ति. ११. शस्त्रधारकांनीं. १२. कोथळा=कोठ्या भोंवतालचें मांसादिकाचें आवरण. १३. रक्ताच्या नदीचे. (अशुद्ध=रक्त.) १४. पळून गेले. १५. धनुर्धर. १६. युद्धांगणीं. १७. हा द्रुपदराजाचा पुत्र, याला द्रोणानें मारिलें.

॥ ५९ ॥ द्रुपद घालूनियां पाठीं । युद्धा पाचारिला किरीटी । पार्थें हांसोनि घेतां मुष्टी । बाणदशक[1] सोडिलें. ॥ ६० ॥ तें तोडोनि सत्यजितें । पार्थ विंधिला बाणशतें । तें खंडूनि पांडुसुतें । चाप हस्तींचें छेदिलें. ॥ ६१ ॥ आणीक चाप धरूनि करी । सत्यजित लोटला समरीं । जेंवि जिंकावया वज्रधारी[2] । पूर्वीं शंबर[3] पातला. ॥ ६२ ॥ द्रुपद आणि सत्यजित । दोघीं पैं खिळिला पार्थ,। म्हणती, 'वोंटिवेचा[4] हात । पुढतीं दावीं आमुतें.' ॥ ६३ ॥ दोघे झुंझार मिनले[5] रणीं । शंका नाहीं अर्जुना मनीं, । भीम देखतां हे नयनीं । चोज पाहे अंतरें. ॥ ६४ ॥ अश्व सारथी आणि रथ । चूर्ण केले निमिषार्धांत[6] । चरणचाली सत्यजित । पुढती झूजा मीनला. ॥ ६५ ॥ शिर च्छेदावया हातें । पुढें पाऊल टाकिलें पार्थें । धाकें सत्यजित तेथें । हाक मारूनि पळाला. ॥ ६६ ॥ पुढें द्रुपदा आणि अर्जुना । संग्राम झाला चौगुणा[7] । जैसा शक्र[8] आणि वैरोचना[9] । शक्रपुरीकारणें[10]. ॥ ६७ ॥ पांचाळाचें शरसंधान । अर्जुना भासे जैसें तृण । जेंवी कां शाब्दिकाचें ज्ञान । निष्ठावंत न लेखी. ॥ ६८ ॥ गांडीवमंडळापासूनि पाहा हो ! । वर्षों लागला बाणसमूहो । व्योमधरणीमाजी वावो । वारियातें[11] खुंटला. ॥ ६९ ॥ निबिड दाटले शर आकाशीं । निःशेष लोपला तेजोरांशी[12] । तम कोंदलें दाहींदिशीं । कोण्ही कोणा न देखे, ॥ ७० ॥ अर्जुनाची संधानकळा । आश्चर्य वाटे पैं सकळां । पांचाळ म्हणे, 'कठीण वेळा । मृत्युतुल्य मांडिली'. ॥ ७१ ॥ ध्वजच्छत्रासहित गुणी । चाप छेदून पाडिलें धरणी । तयासाठीं पंचबाणीं । अश्व[13] सारथी मारिले. ॥ ७२ ॥ भ्रमें जौंकळिला[14] गळां सर्प । तेंवी भुलला पांचाळ नृप । शरीरस्मरणाचा दीप । हृदयालयीं[15] मालवला. ॥ ७३ ॥ गांडीव ठेऊनि तांतडी । रथाखालीं घातली उडी । धांवोनियां आंगप्रौढी । पांचाळ हातें वोढिला. ॥ ७४ ॥ उडी घालोनि महाडोहीं । चुंची धरूनि काढिजे अही[16] । तया गरुडाऐसा[17] पाहीं । पांचाळ बाहीं[18] कवळिला.

---

१. अध्याय १३८ श्लोक ४७ पहा. २. इंद्र. ३. शंबर=इंद्रानें मारलेला एक असुर. [अध्याय १३८. श्लोक ४३ पहा.] ४. वांटीव=पुरुषार्थ, पराक्रम. (हा शब्द ज्ञानेश्वरींत आहे.) ५. मिळाले. ६. क्षणार्धांत. ७. चौपट मोठा. ८. इंद्र. ९. विरोचन दैत्याचा पुत्र बलि यानें इंद्रपद मिळविण्यासाठीं मोठें युद्ध केलें—इत्यादि कथा सुप्रसिद्ध आहे. १०. अमरावतीसाठीं. ११. वायूतें. १२. सूर्य. १३. अध्याय २३८ श्लोक ५५ पहा. १४. जाकळणें=व्यापणें, ग्रासणें. १५. येथें हा रूपक अलंकार जाणावा. १६. सर्प. १७. अध्याय १३८ श्लोक ५८ पहा. हा येथें उपमालंकार जाणावा. १८. भुजांनीं.

॥ ७५ ॥ एक हस्त ग्रीवेतळीं । दुजा सूदला कटिमंडळीं, । प्रचंड वृक्ष तैसा मौळीं । वाहूनियां चालिला. ॥ ७६ ॥ अंगबळें उचलोनि हातीं । आणोनि सूदला आपुले रथीं । बंधुवर्गाचिया पंक्ती । जयजयकारें गर्जती. ॥ ७७ ॥ पांचाळदळीं वाजली हाक । धाकें पळाले एकएक । आनंदले कुरुनायक । हातें पिटिती टाळिया. ॥ ७८ ॥ मर्दावया पांचाळपुर । वेगीं चालले कौरवभार । प्रजा करिती हाहाकार । तो अर्जुनें ऐकिला. ॥ ७९ ॥ दूत धाडोनि तांतडी । सर्वांसी म्हणे, 'हे बुद्धी कुडी । प्रजापीडणाचे प्रौढी । काय श्लाघ्यता मिरवणें? ॥ ८० ॥ द्रुपद जिंकिलिया संग्रामीं । द्रोणाची हे राज्यलक्ष्मी । तुम्हीं अभिलाषितां कुकर्मीं । दोषविभागी होतसां. ॥ ८१ ॥ आमुच्या गुरूचा गुरुबंधू । तो आमुतें परम वंद्यू । म्हणोनि न करा हस्तबंधू'। मानें रथीं बैसविला. ॥८२॥ दूत प्रेरूनि आपण । धरून आणविले प्रधान । त्यांहीं सहित जेथें द्रोण । तया ठाया पातले. ॥ ८३ ॥ पुढें करूनि पृषदपुत्रा । म्हणे, 'स्वामी! भेटिजे मित्रा.' । द्रोणें अवलोकोनि वक्त्रा । मंदहास्यें बोलत. ॥ ८४ ॥ म्हणे, 'राया! आशीर्वचन । तूं भूपाळ, मी ब्राह्मण, । तूं दाता सर्वसंपन्न, । दीन आम्हीं मागते. ॥ ८५ ॥ अराजा मित्र नव्हे रायातें । ऐसें बोलिलां तें यथार्थतें । आतां जरी मानेल तूतें । तरी मित्रत्व मानी कां.' ॥ ८६ ॥ द्रुपद म्हणे, 'द्रोणाचार्या! । करणें नलगे येथें आश्चर्या । हारी अथवा जयऐश्वर्या । पुरुष पावे प्रारब्धें. ॥ ८७ ॥ काळें लाभ, काळें हाणी, । याचा विषाद कायसा मनीं ? । तोषलाभपरदूषणीं । चित्त न घाली जाणता. ॥ ८८ ॥ अवगुणासी करणें गुण । हें उत्तम पुरुषाचें लक्षण । उचिता चुकला अज्ञान । तें सज्ञान स्मरेना. ॥ ८९ ॥ दैवापुढें न चाले बळ । ऐसें बोलती विवेककुशळ । कुबेरसखा सर्व काळ । दैन्य भोगी शंकर. ॥ ९० ॥ असो. सुकृतबळोपायें । समर्थ करिती काय नोहे? । तुजसारिखा इच्छिलें लाहे । हें काय नवल सांगणें'. ॥ ९१ ॥ ऐसें बोलतां पृषदतनय । कृपेनें द्रवलें ब्रह्महृदय । आलिंगूनि म्हणे, 'गा! भय। मजपासाव तुज नाहीं. ॥ ९२ ॥ बाळमित्र आम्ही तुम्ही । अग्निवेशाचे निजाश्रमीं । एकत्र वर्तलों बंधुधर्मीं । तो आठव मज आहे. ॥ ९३ ॥ क्लेशाकाळें

१. मानेखालीं. २. घातला. ३. मस्तकीं. ४. वांकडी, खोटी, वाईट. ५. द्रुपदा. ६. मुखा. ७. याचक. ८. अध्याय १३८ श्लोक ६४-७० पहा. ९. पराभव. १०. कुबेराचा मित्र=शंकर. [कुबेरसख. येथें 'सखि' या मूळ शब्दाचा 'कुबेर' शब्दाशीं समास असल्यामुळें 'राजाहःसखिभ्यष्टच्' [५।४।९१] या सूत्राधारें 'कुबेरसख' असा अकारांत शब्द झाला. अन्य उदाहरणें–कृष्णसख, रविसख.] ११. द्रोण म्हणे.

अतिसंकटीं । आज पडलासि माझिये दृष्टी । तुझिया खेदा होय तुटी[1] । तें म्यां केलें पाहिजे. ॥ ९४ ॥ जें म्यां जोडिलें पुरुषार्थें । त्यांत अर्धभाग तूतें । कृपेनें देतसें, तयातें । स्वीकारूनि सुख भोगीं. ॥ ९५ ॥ जान्हवीच्या[2] दक्षिणैं[3]पारीं । चर्मण्वतीच्या उत्तरतीरीं । गंगायमुनामध्यपरिसरीं[4] । देश तितुका देतसें. ॥ ९६ ॥ कांपिल्य[5] उत्तम पुरीं । विशाळकनकाचे मंदिरीं । पुत्रबंधुसहपरिवारीं । राज्य भोगीं चिरकाळ. ॥ ९७ ॥ गंगाकुळाच्या[6] उत्तर क्षेत्रीं । आम्हीं असावें अहिच्छत्रीं[7] । गुरुदक्षिणा पांडुपुत्रीं । जे कां मातें दीधली.' ॥ ९८ ॥ ऐसें बोलोनि पांचाळातें । स्वस्थळा धाडिलें मानें बहुतें । परी तो अवमान चित्तें । विषादवन्ही शमेना. ॥ ९९ ॥ म्हणे, 'क्षत्रियाहूनि देख । ब्राह्मणाचें तेज अधिक । आतां तोषवूं त्रिपुरांतक[8] । तपोबळें आपुलिया.' ॥ १०० ॥ पुत्र मागोनि अयोनिज । रणीं मारणें भारद्वाज । ऐसा संकल्प पांचाळराज । धरिता झाला मानसीं. ॥ १०१ ॥ यापरी द्रुपद जिंकोनि समरीं । अहिच्छत्र नाम नगरीं । द्रोणासि गुरुदक्षिणा बरी । अर्जुनराजें दीधली. ॥ १०२ ॥ संपली द्रुपदराजयाची कथा । पुढें अवधान द्यावें श्रोतां । कुडा[9] मंत्र[10] कौरवनाथा । सांगेल कणिक प्रधान. ॥ १०३ ॥ इति श्रीभारते आदिपर्वणि । कथाभीमीं[11] भवनाशिनी[12] । सद्गुरुपांडुरंगचरणीं । स्पर्शों आली प्रवाहें. ॥ १०४ ॥ नेमूनि मुक्तेश्वराचें वक्त्र । तेंचि पांडुरंगक्षेत्र । सभाग्य भाग्याचे पवित्र । श्रवणें सुस्नात जे होती[13]. ॥ १०५ ॥

अध्याय तेत्तिसावा.

पांचाळ जिंकोनियां पणें । राज्य दिधलें गुरुदक्षिणें, । हें ऐकोनि चक्षुहीनें[14] । परम आश्चर्य मानिलें. ॥ १ ॥ समर्थ जाणोनि सर्वोपरी । वर्ष एक लोटल्या-

---

१. नाश, क्षय. २. भागीरथीच्या. ३. कूलीं. ४. गंगा यमुना यांच्या मध्यप्रदेशीं. ५. येथें 'माकंदी' असा शब्द असावा. द्रुपदाची राजधानी माकंदी व द्रोणाची राजधानी कांपिल्यपुर. [अध्याय १३८ श्लोक ७०-७४ पहा.] ६. भागीरथीच्या उत्तरेस द्रोणाचें राज्य. चर्मण्वतीनदीपर्यंत द्रोणाच्या राज्याची सीमा होती. ७. अहिच्छत्रपुरी=ही द्रुपदाची पहिली राजधानी होती ती अर्जुनानें जिंकून द्रोणास दिली. अध्याय १३८ श्लोक ७६-७७ पहा.] ८. शंकर. ९. खोटा, वांकडा, कपटाचा. १०. मसलत. ११. भीमा नदी. १२. संसारनाश करणारी. १३. या अध्यायास 'द्रुपदपराभव' असें नांव दोन पोथींत आहे. महाभारतांत या प्रकरणास 'द्रुपदशासन' असें नांव आहे. १४. अंधें. (धतराष्ट्रें.)

वरी । युवराजपदाधिकारीं । युधिष्ठिर स्थापिला. ॥ २ ॥ [1]धृती [2]स्थैर्य [3]सहि-
ष्णुत्व । [4]आनृशंस्य [5]जैनआर्जव । सेवकालागीं स्नेहभाव । धनें मानें तो-
षवी. ॥ ३ ॥ सुहृदभावें सुहृदमेळीं । विकृती न पवे कदाकाळीं । यालागीं
मान्य केला सकळीं । धर्मराज [6]धर्मात्मा. ॥ ४ ॥ विशेष साधावया विद्याधन ।
गुरु करोनि [7]संकर्षण । गदायुद्धीं भीमसेन । निपुण झाला सर्वार्थी. ॥ ५ ॥
पर्वत डोलवी करतळीं । पायें थरकावी जगती तळीं । [8]द्युमत्सेनासमान बळी ।
भीमसेन बळसिंधू. ॥ ६ ॥ हें देखोनि कौरवराजा । आराधूनि [9]अच्युता-
ग्रजा । तेच विद्या साधिली पैजा । जिंकावया भीमास. ॥ ७ ॥ राजधर्मी
सर्वज्ञता । शोभली ज्येष्ठकुंतीसुता । अस्त्रशस्त्रविद्या पार्था । तुळणें आन
असेना. ॥ ८ ॥ नीतिशास्त्र बृहस्पतीचें । हृदयीं वसे सहदेवाचे, । आज्ञाव-
चन राजयाचें । कदाकाळीं नुलंघी. ॥ ९ ॥ चित्रयुद्धा अतिरथी । नकुळ-
राजा विवेकमूर्ती । चौघे धर्माचे [10]वंशवर्ती । आज्ञाधारक सर्वदा. ॥ १० ॥
[11]शमादिगुण [12]सुशीळवृत्तीं । आच्छादिली पितृकीर्ती । [13]जैसीं नक्षत्रें [14]गभस्ती. ।
लोपोनि दावी [15]प्रभेतें. ॥ ११ ॥ सभानायकांदेखतां नयनें । पार्थ पाचा-
रिला द्रोणें । आदरें आलिंगूनि म्हणे, । 'वाक्य परिसें पवित्रा! ॥ १२ ॥
[16]तुझेनिपाडें [17]त्रिभुवनीं । वीर दुसरा [18]नाहीं कोणी, । अमोघअस्त्र विद्यादानीं ।
योग्य पात्र तूं एक. ॥ १३ ॥ अगस्तीमहामुनीचा [19]शिष्य । माझा गुरु
अग्निवेश । तेणें ओपिलें [20]सरहस्य । मंत्र बीजें[21] [22]प्रणवेंसी. ॥ १४ ॥ विष्णुचक्रा-
तुल्य तेजाळें । अस्त्रराज [23]सर्वांगळें । क्षणें जाळील ब्रह्मांड सगळें । जें [24]ब्रह्मास्त्र

---

१. प्रजाधारण. २. अचापल. ३. तितिक्षा, सहनशीलता. ४. अनिष्ठुरता. ५. अवक्रता. ६. पुण्यात्मा. ७. बळराम. ८. हा द्युमत्सेन कोण याचा खुलासा मूळांत नाहीं. हा शाल्वदेशाचा राजा म्हणजे सुप्रसिद्ध सावित्रीचा श्वशुर नसेलना? [अध्याय १३९-श्लोक ५ पहा.] ९. बळरामा. १०. स्वाधीन. ११. धृति, अचापल, सहिष्णुत्व, अनैष्ठुर्य इत्यादि गुण. (अध्याय १३९ श्लोक २-३.) १२. शील=विनयादि सदाचार, वृत्त=शौर्यतेज. १३. येथें हा उपमा अलंकार जाणावा. १४. सूर्य. १५. कांतीतें. १६. तुझ्यासारखा. १७. त्रिभुवन=स्वर्ग, मृत्यु आणि पाताळ हे तीन लोक. १८. अध्याय १३९ श्लोक ७-८ पहा. १९. धनुर्वेदांत शिष्य. २०. प्रत्येक मंत्राविषयीं अत्यंत गुप्त असें जें ज्ञान त्यास 'रहस्य' असें म्हणतात. रहस्य समजल्याशिवाय तो मंत्र यथासांग सिद्ध झाला असें होत नाहीं. २१. 'बीज' हाही मंत्राचाच एक भाग आहे. २२. ओंकार. २३. सर्वांहून मोठें. २४. ज्याची देवता ब्रह्म आहे असें अस्त्र. [याला 'ब्रह्मशिर' असें मूळांत नांव आहे. अध्याय १३९ श्लोक ११ पहा.]

बोलिजे. ॥ १५ ॥ प्रगट न करावें बाहेरी । सहसा न घालावें कवणावरी । तें देतसें तुझे करीं । परमयत्नें रक्षावें.' ॥ १६ ॥ ब्रह्मास्त्र देऊनि अर्जुना । म्हणे आचार्य, 'गुरुदक्षिणा । मागेन ते त्वां विचक्षणा! । दीधली मातें पा[1]-हिजे. ॥ १७ ॥ समस्त राजे देखतां नयनीं । मजसीं युद्ध करावें रणीं । शंका न धरूनियां मनीं । ई[2]डेपाडे झुं[3]जावें.' ॥ १८ ॥ '[4]तथास्तु' अशी वदोनि वाणी । मस्तक ठेविलें द्रोणचरणीं । तेच आज्ञा स्वीकारूनी । उत्तरदिशे चालिला. ॥ १९ ॥ भीम आणि भूपसमूहो । घेऊनि निघाला वीरबाहो, ।

---

१. 'पाहिजे' हा शब्द विचार करण्यासारखा आहे:—'पाहिजे' 'म्हणजे' हे दोन्ही शब्द जुन्या प्राकृत भाषेंतले अद्याप राहिलेले आहेत, हीं 'पाह' व 'म्हण' या धातूंचीं कर्मणि प्रयोगांतलीं रूपें होत. 'पश्य' व 'भण्' या धातूंस कर्मणि 'य' प्रत्यय होऊन 'पश्यते' व 'भण्यते' अशीं मूळचीं रूपें झालीं; व नंतर 'य'चा अपभ्रंश प्राकृतांत 'ज' होऊन व उपांत्य 'त'कार लुप्त होऊन वरील रूपें बनलीं. मुकुंदराज व ज्ञानेश्वर यांच्या ग्रंथांतून वरील शब्द मूळ अर्थी योजलेले आढळतात. जसें:—जेणें माया अधिष्ठिजे । तें ब्रह्म मायोपाधि बोलिजे । माया शबळ ऐसें म्हणिजे । तयातेंची ॥ (विवेकसिंधु). तेव्हां 'पाहिजे' म्हणजे 'पाहिलें जातें' व 'म्हणिजे' म्हणजे 'म्हणलें जातें' असा मूळचा अर्थ होय. पण क्रमाक्रमानें आतां अगदीं निराळ्या अर्थी वरील शब्दांचा प्रयोग होतो. पहिल्याच्या ठायीं आवश्यकत्वाचा बोध होतो, व दुसरा अर्थविवरण करतांना अव्ययत्वें करून योजिला असतो; जसें:—'रोग्याला औषध पाहिजे' 'गज म्हणजे (प्राकृतांत) हत्ती'. आतां 'म्हणजे'याचा अर्थ दुसरा हळूं हळूं कसा बनला हें उघडच आहे; वरील दुसऱ्या वाक्याचा मूळ पदार्थाप्रमाणें घेतला असतां असा अर्थ होतो:—'प्राकृतांत गज हा हत्ती म्हटला जातो' म्हणजे 'गज या शब्दाचा प्राकृत पर्याय हत्ती हा होय.' आतां दुसऱ्याचें अर्थांतर मात्र अंमळ दुर्बोध होय. 'रोग्याला औषध पाहिजे' याचा मूळ कर्मणिप्रमाणें अर्थ 'रोग्याला औषध पाहिलें जावें' म्हणजे 'त्याच्या औषधाची तजवीज करणें जरूर आहे' असा घेतां येणार आहे. यांत आवश्यकतेचा बोध होतो हें स्पष्टच आहे' (निबंधमाला अंक ४३ पृ० २४-२५). 'पद्यरत्नावली'च्या अखेरीस 'मराठी भाषेंतील व्याकरणाचे विशेष' म्हणून एक निबंध जोडला आहे. त्यांत 'पाहिजे' या शब्दावर असें विवरण केलें आहे:—'आतां पाहिजे या शब्दाच्या अर्थांत अधिक भेद पडून तो मूळ अर्थापासून दूर गेला आहे. तरी त्याच्याही हल्लींच्या अर्थांत व मूळच्या अर्थांत संबंध दाखवितां येईल. पहा धातूचा कधीं कधीं इच्छिणें असा अर्थ होतो; जसें:—'तो जाऊं पहातो, येऊं पहातो', इत्यादि. तसेंच या कर्मणिरूपाचा विध्यर्थीही पुष्कळ वेळ प्रयोग होतो म्हणून वर लिहिलेंच आहे. तेव्हां पाहिजे याचा अर्थ इच्छावें अथवा इच्छित आहे असा झाला. पुढें इच्छित असा अर्थ घेऊन त्याच्या संबंधानें कर्तृवाचक पदास संबंधसामान्यदर्शक चतुर्थी होऊन 'त्यास पाणी पाहिजे' म्हणजे 'त्यानें पाणी इच्छित आहे' असा प्रयोग झाला असावा. (पद्यरत्नावली पृ० ८९ पहा.) २. ईर्षेनें. ३. अर्जुनानें गुरूचे आज्ञेनें गुरुबरोबर युद्ध केलें. [अध्याय २३९ श्लोक १४ पहा.] ४. 'तथेति' असा अन्य पाठ.

प्रथम उत्तरदिशेचा नाहो[1] । यवनाधीश त्रासिला. ॥ २० ॥ तीनें[2] वर्षें यज्ञ प्रबळ । केल्या, नये जयाचें फळ, । डंबगोनि[3] पांडुनृपाळ । स्वस्थ ठेला स्वस्थानीं. ॥ २१ ॥ तो सौवीर[4] मारूनि रणीं । बळें[5] जिंकिले म्लेंच्छ धरणी । तेथून पुढां प्रतापतरणी[6] । चितळदेशीं उगवला. ॥ २२ ॥ तो तावूनि प्रतापतरणी । दत्तामित्र[7] पाडिला रणीं, । भूमी त्रासूनियां बाणीं । रायें राय[8] भंगिले. ॥ २३ ॥ उत्तर[9] करूनि आपैती[10] । चालिला पूर्वदिशेप्रती, । जाऊनियां उदयाचळापर्यंत क्षिती, । वश्य केली प्रतापें. ॥ २४ ॥ तेथोनि दक्षिणदिशे आंत । राजे जिंकोनि असंख्यात । सिंहलादि समुद्रप्रांत । देश अनेक शोधिले. ॥ २५ ॥ रत्न वस्त्र धेनू कुंजर । पर्वतप्राय स्वर्णभार । आणूनियां कौरवपुर । समुद्रप्राय भरियेलें. ॥ २६ ॥ अनेकराष्ट्रींचें सुवर्ण । आणूनि स्वराष्ट्रीं भरिलें धन, । हें देखोनि धृतराष्ट्रमन । चिंताज्वरें[11] तापलें. ॥ २७ ॥ कृष्णपक्ष पांडवदशा । वाढली म्हणोनि दाहीदिशा, । कौरवोत्साहचंद्रप्रकाशा । क्षयो झाला निर्धारें. ॥ २८ ॥ म्हणे, 'पुढती न दिसे निका । कवेंत लागला महारुखा[12] । निर्मूळ करील क्षणाएका । येथें अनुमान[13] असेना.' ॥ २९ ॥ ऐसें विचारूनि मनीं । कणिकनामा प्रधान गुणी । परम कुटिल विकल्पखाणी । पाचारिला जवळिकें. ॥ ३० ॥ 'बळें नागवती कवणा । राज्य घेतील आंगवणा[14], । अभाग्य माझिया नंदना । भिक्षा वरील दिसताहे.' ॥ ३१ ॥ सदा सादर कौरवहितीं । धृतराष्ट्राचा निकटवर्ती । दीर्घद्वेष्टा ब्रह्मघाती । रायाप्रती पातला. ॥ ३२ ॥ अवलोकोनि एकांत । धृतराष्ट्र पुसे चिंताग्रस्त । म्हणे, 'कणिका! बुद्धिवंत । तूंचि एक मी मानी. ॥ ३३ ॥ पांडुकुमरांचा पुरुषार्थ । वाढला दिसे अत्यद्भुत । मत्पुत्रांचा मनोरथ । निर्फळ पुढें दिसताहे. ॥ ३४ ॥ ऐसियासि करणें काय? । ते मज सांगा विचारसोय, । तूं नेमिसी तेणें न्याय- । वर्तणूक म्यां करणें.' ॥ ३५ ॥ ऐसें कुरुराजशिरोमणी[15] । बोलतां, बोले प्रधान वाणी, । त्याच्या कुटिलोक्ती विचक्षणीं । नावेक[16] श्रवणीं परिसाव्या. ॥३६॥

---

१. नाथ. २. सौवीरराजानें तीन वर्षेंपर्यंत यज्ञ केला होता म्हणून पांडुराजा त्याला जिंकूं शकला नाहीं–अशी कथा आहे. या राजाचें नांव विपुल. (अध्याय १३९ श्लोक २०-२१ पहा.) ३. कंटाळून. ४. यवनाधिप. (श्लोक २२ पहा.) ५. 'बळें जिंतिला म्लेंच्छ धणी' असा अन्य पाठ. ६. सूर्य. ७. हा ही सौवीरराजाचा होता. (अध्याय १३९ श्लोक २३.) ८. विपुल, सुमित्र इत्यादि राजे. ९. उत्तर दिशा. १०. आपली. ११. चिंतारूप तापानें. अनमान=(अध्याय १३९ श्लोक २७.) १२. महावृक्षा. १३. अनुमान=शंका, आशंका. १४. शक्तीनें, बळानें. १५. धृतराष्ट्र. १६. क्षणभर.

जो खळाचा मूर्त सिद्धांत । दुर्जनाचा सांप्रदाय पंथ । दुष्टाचारविचाररहित । उपदेशी रायातें. ॥ ३७ ॥ चिन्मूर्ति लीलाविश्वंभरू । दत्तात्रेय जगद्गुरू । त्याचेनि नामें मुक्तेश्वरू । कथा बोले भारती.[1] ॥ ३८ ॥

अध्याय चौतिसावा.

कणिक[2] म्हणे, 'कौरव नृपती । पांडव वाढले प्रबळशक्ती[3] । राज्यहानीचे अनर्थीं । पुत्र पडती निर्धारें. ॥ १ ॥ ऐसिया चिंतेचा अनळ[4] । हृदयारण्यीं लागला प्रबळ । त्या परिहारा मेघ[5] सजळ । बुद्धिवंत मी असें. ॥ २ ॥ जेथें आशंका कल्पी मन । तें भयाचें जन्मस्थान, । परंतु बुद्धिबळें जाण । परिहारातें[6] करावें. ॥ ३ ॥ यासीं अमृतवल्लेचें झाड । जंववरी वेष्टूनि नेघे वाड । तववरी विषवल्लीचा मोड । निमूळ करिती जाणते. ॥ ४ ॥ युगांतीं अपाय लागे जेणें । त्याची[7] चिंता आधींच करणें । उपेक्षा केलिया आपणें । घात केला आपुला. ॥ ५ ॥ वैरी थोर अथवा सान । ययासीं यत्नें जागिजे सावधान । काळसर्प कीं हुताशन[8] । वाढल्या सर्वथा नावरे. ॥ ६ ॥ कंटक भेदिला असतां चरणीं । गोमक्षिका रिघाली[9] कर्णीं, । कण खुपत असतां नयनीं, । स्वस्थ कैसें बैसावें? ॥ ७ ॥ पैंदरक्षेमाजील[10] हरळ[11] । घाईं आड केलें शस्त्र प्रबळ, । गृहामाजील सर्वकाळ । करकर कोणा सोसवे? ॥ ८ ॥ आपुली अंगना[12] रतली[13] परा । स्वतांची लक्ष्मी आणिका घरा । जातां खेद राजेश्वरा! । कैंवी तोंडें बोलावा? ॥ ९ ॥ यालागीं[14] बुद्धिमंता चतुरा! । या क्लेशाचा अपाय वारा । अंगा न लागे, तंव परिहारा । विचारूनि ठेवणें.॥ १०॥ दूरि दवडोनि सात्विकता[15] । विस्तारावी अतिक्रूरता । उग्रतेस्तव इच्छिल्या अर्था । अनायासें पाविजे.॥ ११॥ पाठी लागे घ्यावया प्राण । यालागीं मृगराज हें अभिधान[16] । कृपेनें अंकीं धरिला हरिण । मृगलांछन चंद्रमा. ॥ १२ ॥ हें देखोनि क्रूरतेचें रूप । लोक भजती आपेंआप ।

---

१. या अध्यायाचें नांव 'धृतराष्ट्रचिंता' असें मूळांत आहे आणि एका जुनाट हस्तलिखित प्रतींत 'दिग्विजय' असें नांव आहे. २. दंडनीतिशास्त्रवेत्ता सचिव. ३. महापराक्रमी ४. अग्नि. ५. येथें हा रूपकालंकार जाणावा. ६. परिहार होई, निवारण होई असें. ७. 'त्याचा विचार आजचि करणें' असा अन्य पाठ. ८. अग्नि. ९. शिरली. १०. जोडा, वाहणा इत्यादि पादत्राणांतील. ११. ओलें बारीक गवत. १२. स्त्री. १३. रममाण झाली, परासक्त झाली. १४. अध्याय १४० श्लोक ७ पहा. १५. सत्त्वस्थपणा. १६. नांव.

यत्न करितां न लाभे स्वल्प । तेंही साध्य स्वभावें. ॥ १३ ॥ गुह्य आपुलें गौप्य करणें, । छिद्र पराचें अवलोकणें, । तेंचि निमित्त करोनि तेणें । मग अपाय चिंतावा. ॥ १४ ॥ कृत्रिमें दावूनि मित्रधर्म । शोधोनि ठायीं पाडावें वर्म । आपुलें अंग लपवी कूर्म । तेंवी स्वदोष झांकावे. ॥ १५ ॥ शोधिजे परबुद्धीचा ठाव, । कळों नेदिजे आपुला भाव, । स्वार्थ साधे तो उपाव, । नानायत्नीं साधावा. ॥ १६ ॥ कामिक वारवधूचें रोदन । न मनीं कामना परिपूर्ण । तेंवी विचारीं न घालोनि मन । स्वकार्य बळें साधावें. ॥ १७ ॥ घालूनि अकीर्तीची माळा । न धरूनि पापाचा कंटाळा । रौंहाटी दावूनि जना सकळा । भय उपजविजे अपार. ॥ १८ ॥ तोचि संपत्तीचा समुद्र । येरा न सोडी दरिद्र । जे कां विचारबुद्धीचे क्षुद्र । थिल्लर हातें डेंहुळती. ॥ १९ ॥ दया आर्जव साधुवृत्ती । वर्ततां वदनीं पडे माती । कवडीही परी न लाभे हातीं । तळमळ चित्तीं शमेना, ॥ २० ॥ घेइजे बहुतांचें मनोगत । न दीजे कोणाहातीं चित्त । ईश्वरही झालिया आप्त । विश्वास तेथें न धरावा. ॥ २१ ॥ अतिथी म्हणोनि कौस्तुभमाळी । भावें विश्वासतां बळी । तेणें तो लोटोनि पाताळीं । हाणी केली सर्वस्वें. ॥ २२ ॥ शिष्यत्व अंगिकारूनि शशी । मैथुन केलें गुरुपत्नीसीं, । पुरुषवेषें वनतापसी ।

---

१. सहायसाधनोपाय. २. अध्याय १४० श्लोक ८ पहा. ३. चाल. ४. लहानसें डबकें. ५. डहुळणें=घुसळणें. ६. विष्णु (वामन). ही कथा श्रीमद्भागवताच्या आठव्या स्कंधांत अध्याय १६-२३ यांत वर्णिली आहे. ती इष्ट असल्यास पहावी. ७. विरोचनपुत्र. ८. गुरुपत्नी= तारा. ही बृहस्पतीची भार्या. ही गुरुपत्नीधर्षणाची कथा अशी आहे:—चंद्राच्या घरीं कांहीं उत्सव होता म्हणून इंद्रादि देव आपल्या कुटुंबासह तो प्रसंग साजरा करण्याकरितां आले होते. त्यांत बृहस्पति तारेसह आला होता. चंद्राला अनेक स्त्रिया होत्या तथापि—अतिकामुकत्वामुळें त्याचें समाधान झालें नव्हतें. तेव्हां नवीन सुंदर स्त्री दृष्टीस पडली म्हणजे त्याचें मन तिजकडे सहज जाई. तारेसारखी रमणी वारंवार दृष्टीस पडल्यामुळें चंद्राचें मन कामार्त झालें व तीच अवस्था तारेची झाली. घरचा उत्सव समाप्त झाल्यावर सर्व देव आपल्या कुटुंबांसह निघोन आपापल्या घरीं गेले. पण कांहीं बहाणा करून तारा नवऱ्याबरोबर न जातां चंद्रगृहींच राहिली. खरें कारण म्हटलें म्हणजे एकमेकांचें मन एकमेकांवर लुब्ध झालें होतें, हें होय. बृहस्पतीनें पुष्कळ निरोप पाठविले, परंतु तारेचे मनांत स्वपतिगृहीं जाण्याचें येईना. बृहस्पतीनें होते तितके उपाय करून पाहिले, परंतु व्यर्थ. अखेरीस तारा स्वसंतोषानें नवऱ्याच्या घरीं जाण्यास सिद्ध नाहीं असें झालें. तेव्हां ही गोष्ट गीष्पतीनें इंद्राच्या कानावर घातली. त्यानेंही आपली शर्थ करून पाहिली, पण तारेचें मन वळेना. चंद्रानें तरी इंद्राच्या म्हणण्यास मान द्यावयाचा होता. पण त्यानें तसें कांहीं न करितां अहल्याकामुकत्वासारखीं त्याचीं कर्मे वर्मे काढून उलट यथेच्छ निर्भर्त्सना केली. असें होतां होतां सामोपचारानें गीष्पतीस तारा मिळत नाहीं असें दिसून आलें. तेव्हां देव आणि

इंद्रें छळिली अहल्या[1]. ॥ २३ ॥ पुढें ऐकसी नृपनाथा! । पुत्रा मारवील माता[3] । कुंडलें मागोनियां पार्था[2] । रक्षावया कारणें. ॥ २४ ॥ म्हणोनि राया! स्वार्थ विषयीं । शुद्धत्व न दिसे कवणेठायीं । ऐसें जाणोनियां हृदयीं । विश्वास कोठें न धरावा. ॥ २५ ॥ सलगी देऊनि भावें भजतां । गुरुही प्रवर्ते विशेषघाता । तोचि मर्यादेनें ठेवितां, । सर्व उपद्रव चूकती. ॥ २६ ॥ महानुभाव[5] गुरु महंत । तेथेंही भजावें परिमित । लिंग म्हणोनि श्रीशैलपर्वत[6] । कवणें कंठीं बांधावा[7]? ॥ २७ ॥ विष्णुतीर्थ म्हणोनि गंगा । सगळी कवणा प्राशवे सांगा?। जितुका अवकाश ठाके आंगा । तितुकें उचित भजावें. ॥ २८ ॥ पिता पुत्र अथवा बंधू । शत्रूच्यापरी पाववी खेदू, । त्याचा न विचारतां वधू । नानायत्नीं करावा. ॥ २९ ॥ पोटीं रोग मारी प्राणें । अरण्य औषधी वांचवी जीवनें, । आतां आप पर हीं वचनें । कोणें कैशीं मानावीं? ॥ ३० ॥ ज्याचेनि साधे इच्छिला अर्थ । तोचि मानिजे जवळील आप्त । अपाय चिंती तो अनाप्त । निकट वसों न द्यावा. ॥ ३१ ॥ कार्यें राजसें तामसें । तीं सात्विकें नव्हती वश्यें; । म्हणोनि दुष्ट विशेषें । संग्रहीं असला पाहिजे. ॥ ३२ ॥ क्षेत्रालागीं[8] कंटकावरण । तस्करालागीं[10] पाळिजे[9] श्वान । शोधावया शत्रूचें

दैत्य यांच्यामध्यें **तारा**मूलक तुमुल युद्ध झालें. यालाच पुराणग्रंथांत **'तारकामयसंग्राम'** असें सुप्रसिद्ध नांव आहे. इंद्रादिक देव हे सुरगुरुपक्षानुयायी आणि शुक्राचार्य, तद्गुरुबंधु महादेव आणि दैत्य हे चंद्रपक्षानुसारी झाले. लढाईत हजारों प्राण्यांचा नाश होऊं लागला. तेव्हां ब्रह्मदेवानें मध्यस्थी करून लढाई मिटविली. ही बृहस्पतिपत्नीकथा 'हरिवंशा'च्या प्रथम पर्वाच्या २५ व्या अध्यायांत पहावी. याच विषयावर श्रीकृष्णकविप्रणीत 'ताराशशांक' नामक २०६ श्लोकात्मक एक मनोरम काव्यही सुप्रसिद्ध आहे. [काव्यमाला–चतुर्थ गुच्छ.] या संग्रामाचें वर्णन अनेक पुराणग्रंथांत मोठें रसभरित आणि विस्तृत केलेलें आहे. बृहस्पति हा देवांचा गुरु म्हणून चंद्र हा त्याचा शिष्य होय. चंद्रापासून तारेला एक बुध नामक मुलगा झाला तो चंद्रालाच मिळाला.

१. अहल्या=गौतममुनिभार्या. (पृष्ठ ६३ टीप ३.) २. कर्णा. ३. कुंती. ४. मुक्तेश्वर–वनपर्व, अध्याय २२ वा पहा. ५. महाशय, उदारमनस्क. ६. श्रीशैलपर्वतावर मल्लिकार्जुन या नांवाचें शिवाचें ज्योतिर्लिंग आहे. हीं लिंगें एकंदर बारा आहेत. हीं जेथें आहेत त्या स्थलांचीं व या बारा ज्योतिर्लिंगांचीं नांवें:—(१) सोमनाथ सोरठ येथें, (२) महाकाल उज्जनी येथें, (३) केदार बदरी येथें, (४) विश्वेश्वर काशी येथें, (५) ओंकारेश्वर महेश्वर येथें, (६) त्र्यंबकेश्वर त्र्यंबक येथें, (७) घृष्णेश्वर वेरूळ येथें, (८) नागनाथ आवंढें येथें, (९) वैजनाथ परळी येथें, (१०) भीमाशंकर भीमाशंकर येथें, (११) मल्लिकार्जुन श्रीशैलपर्वतावर, (१२) रामेश्वर सेतुबंध येथें. अशीं एकंदर बारा ज्योतिर्लिंगें आहेत. ७. येथें काकर्थ जाणावा, अर्थात् कोणी कंठीं बांधीत नाहीं. ८. शेतासाठीं. ९. कुंपण घालणें. १०. चोरासाठीं.

न्यून । खळ दुर्जन रक्षावे. ॥ ३३ ॥ पाटा चूर्ण करी तें काम । करूं न शके [1]शालिग्राम, । यतिहस्तींचा दंड उत्तम । [2]रवी नोव्हे घुसळावया. ॥ ३४ ॥ सुवर्णलिंगें गर्भप्राप्ती । हा भरंवसा कवणे युक्ती ? । कक्षावाळीं कंबलें होती । हें मानेल कवणातें ? ॥ ३५ ॥ जे जे कर्मी जे जे युक्त । ते ते योजिती बुद्धिमंत; । अन्यथा करणें तें व्यर्थ । जेंवी कां घृत तान्हेल्या. ॥ ३६ ॥ दंत शोधावयाची काडी । खड्गातुल्य रण [3]विभांडी, । सर्प आकर्षी गारुडी । [4]केंवी धरवे आणिका ? ॥ ३७ ॥ तेणें स्वार्थ साधनें सिद्धी । तरी नायकणें परबुद्धी । बळिष्ठ निर्दय शत्रु वधी । ते संवादीं असों दे. ॥ ३८ ॥ मूळें खंडिल्या तरुवर, । स्तंभ पाडिल्या कोसळे घर, । बळ भंगिल्या अमित्र नर । मशक प्राय मारितां. ॥ ३९ ॥ मुखीं ताडितां [6]दंदशूक । पुच्छीं ताडितां [7]वृंश्चिक, । वर्मी ताडितां शत्रूचें मुख । होय विन्मुख स्वभावें. ॥ ४० ॥ सामदानदंडभेदें । कार्य साधिजे विचारवृद्धें । तोही अर्थ विशदशब्दें । जाणल्या तूं जाणसी.' ॥ ४१ ॥ [8]राजा म्हणे, 'मंत्रिया सुमती । [9]शत्रु जिंकावयाच्या युक्ती । तुवां निरोपिल्या त्या चित्तीं । मज विशेष मानल्या. ॥ ४२ ॥ त्यांत प्रस्तुत कवण भली । मागां [10]उंपेगा कवणा आली । ते मज आज्ञापीं बोलीं । स्वीकारीन सर्वथा.' ॥ ४३ ॥ कणिक म्हणे, '[11]कुंभिनीकांता! । स्वल्प कांहीं कथीन [12]कथा । ते त्वां आणूनि श्रवणपथा । त्याचि रीती वर्तावें. ॥ ४४ ॥ कवणा एका वनांत । [13]जंबुक एक बुद्धिवंत । समागमी चौघे तेथ । कोण कोण

---

१. गंडकी नदींतील काळा दगड. याची पूजा करितात. २. मंथनदंड. ३. मारी, पराभवी. ४. 'तें काय करवे आणिकां' असा अन्य पाठ. ५. अध्याय १४० श्लोक १७ पहा. ६. सर्पविशेष. ७. विंचू. ८. धृतराष्ट्र. ९. 'शत्रू जिणावा चारी युक्ती' असा अन्य पाठ. चार युक्ती= साम, दान, दंड, भेद ह्या चार युक्ती. १०. उपयोगाला. ११. कुंभिनी (पृथ्वी) तिच्या पते हे धृतराष्ट्रा. १२. या कथांचा उल्लेख पुढील उताऱ्यांत आहे:—'पंचतंत्रादि गद्य ग्रंथांत ज्या प्रकारच्या पशुपक्ष्यांच्या गोष्टी गद्यरूपानें लिहिलेल्या आढळतात त्या प्रकारच्या कांहीं गोष्टीही [महाभारतांत] पद्यरूपानें लिहिल्या आहेत. उदाहरणार्थ, उद्योगपर्वाच्या ६४ व्या अध्यायांत (श्लोक १-१८) जाळ्यांत सांपडलेले दोन पक्षी जाळ्यासह उडून गेले व ते कलह करूं लागले तेव्हां ते पारध्याला सांपडले ही गोष्ट आहे. याच पर्वाच्या १६० व्या अध्यायांत (श्लोक १५-४१) बकध्यानी मांजराची गोष्ट आहे. कर्णपर्वाच्या ४१ व्या अध्यायांत (श्लोक १०-७१) बढाईखोर कावळा व हंस यांची गोष्ट आहे. आदिपर्वाचे १४० वे अध्यायांत (श्लोक २५-४९) लबाड कोल्ह्याची गोष्ट आहे'. १३. कोल्हा हा नीतिशास्त्रदर्शी आणि स्वार्थपंडित होता.

ते ऐकें. ॥ ४५ ॥ पहिला व्याघ्र, दुसरा [1]वृक, । तिसरा [2]नकुळ, चौथा [3]मूषक, । मित्रभावें एका एक । गौरविती बहुमानें. ॥ ४६ ॥ त्यांप्रती [4]सृगाळ बोले वचन, । '[5]पीनें तरुण [6]कृष्णहरिण । नित्य सन्मुख चरतां मन । इच्छा करी भक्षावया. ॥ ४७ ॥ हा धरितां न धरवे चपळपणीं । यालागीं निद्रिस्त असतां चरणीं । मूषकें [7]करांडोनि [8]दशनीं । पादहीन करावा. ॥ ४८ ॥ यावरी पळोनि जातां बिळीं । व्याघ्रें धरावा [9]केवेतळीं । मग बैसोनि सुहृदमेळीं । मांसभोजन [10]संपादूं !' ॥ ४९ ॥ त्याचें मानूनियां वचन । मूषकें [11]करांडिले चरण, । प्राणधाकें शक्तिहीन । धडपडोनि ऊठला. ॥ ५० ॥ पळों जातां [12]लवडसवडी । व्याघ्रें झडपें पाडिला बुडीं, । गतप्राण देखोनि आवडी । पांचही तेथें मिळाले. ॥ ५१ ॥ सृगाळ बोले, 'तुम्हीं सकळीं । स्नानें करूनि गंगाजळीं, । शीघ्र यावेंत ये स्थळीं । मी [13]रक्षीन एकला. ॥ ५२ ॥ उशीर न लावावा भोजना, । अनुच्छिष्ट रक्षीं [14]पिशिताशना । पशुपक्षी स्पर्शतां मना । प्रशस्त न वाटे [15]वीर हो !' ॥ ५३ ॥ तिहीं मानूनि यथार्थ वचन । नदीस गेले चौघेजण, । व्याघ्र सारूनियां स्नान । एकटा पुढें पातला. ॥ ५४ ॥ तंव जंबुक अतिउद्विग्न । कृत्रिमचित्त म्लानवदन, । देखोनि व्याघ्र वदे वचन । गौरवूनि आदरें. ॥५५॥ 'आम्हां सकळां [16]विचारगुरु । अगाध बुद्धीचा सागरू । अतिसखेद [17]चिंतातुरू । कोणे अर्थीं सांग पां ?' ॥ ५६ ॥ श्वास टाकून जंबुक म्हणे, । 'जळो तें अपकीर्तीचें जिणें, । मूषक बोलिला तीं वचनें । शल्यें तैसीं जाळिती. ॥ ५७ ॥ म्हणे, जळो, व्याघ्राचें झालें, । बाहुबळें म्यां जोडिलें, । तें भक्षून, देह आपुलें । वांचविणें म्हणतसे. ॥ ५८ ॥ जोडों न शके [18]आंगवणा । व्याघ्र मूषकाच्या पोषणा । ऐशा शब्दलांछना । पात्र झालासि भूतळीं. ॥ ५९ ॥ यालागीं भक्ष न रुचे मनें । निकें उपवासीं प्राण देणें । नीचमुखींचीं हीन वचनें । कोणें कर्णीं परिसावीं ?' ॥ ६० ॥ ऐकोनि व्याघ्रें पिटिली [19]बांही । म्हणे, 'हें आमिष [20]पावन कायी ? । सांगें तुझें तूंच खाई । नलगे आम्हां सर्वथा. ॥ ६१ ॥ आपुलेनि पुरुषार्थें । मारीन श्वापदांचीं शतें, । मूषकाऐसीं असंख्यातें । पाळूं

---

१. लांडगा. २. मुंगुस. ३. उंदीर. ४. कोल्हा. ५. पुष्ट. ६. कृष्णहरिण, [कृष्णसार=काळवीट, कृष्णमृग. कृष्णेन सारः शबलः=कृष्णशारः । कृष्णश्चासौ शारश्च=कृष्णशारः । कृष्णसार=कृष्णशार, कृष्णसारंग.] ७. करांडणें=कुरकुटून खाणें, कुरतुडणें. ८. दंतांनीं. ९. वेंधेंत. १०. अध्याय १४० श्लोक २८-३० पहा. ११. कुरतुडले. १२. त्वरेनें. १३. अध्याय १४० श्लोक ३२ पहा. १४. मांसभोजना. १५. 'शिष्ट हो' असा अन्य पाठ. १६. महाप्राज्ञ. १७. चिंताकुलितमानस. १८. शक्ति. १९. भुज. २०. पवित्र.

शकें कुटुंबी.' ॥ ६२ ॥ ऐसें बोलोनि अभिमानी । मृगमांसाचा त्याग क-रूनी । प्रवेशला महावनीं । न पाहात मावारें. ॥ ६३ ॥ व्याघ्र गेलिया उपे-क्षून । वृक पातला स्नान करून, । त्यातें म्हणे, 'ऐक वचन । हितार्थी मित्र वदावा. ॥ ६४ ॥ बळिष्ठ कोपल्या नव्हे भलें । व्याघ्र म्हणे हें पैळ आपुलें । रक्षावया मज ठेविलें । निग्रहूनि निज आज्ञा. ॥ ६५ ॥ स्त्रिया आणि आपुले कुमर । आणावया अतिसत्वर । गेला आहे महाक्रूर । येथें येईल क्षणेका. ॥ ६६ ॥ जो अणुमात्र भक्षील भक्ष्यातें । तो मुकेल निजप्राणातें । ऐसें व-दोनि गेला आज्ञेतें । भंग कैसा करावा? ॥ ६७ ॥ यावरी मानिजेल उचित । तें त्वां करावें गा! येथ.' । वृक म्हणे, 'तूं परम आप्त । महाअनर्थ चुकविला.' ॥ ६८ ॥ तोही गेला न भक्षितां । तंव मूषक पातला त्वरिता । त्यातें म्हणे, 'ऐकें गुह्यार्था । नकुळ कांहीं बोलला. ॥ ६९ ॥ कुरंगमांस केवळ विष । भक्षितांचि प्राणनाश । अरुवार आणि अतिसुरस । मूषकमांस भक्षावें. ॥ ७० ॥ जरी हें कार्य न करा कोणी । तरी मी एकला घेईन धणी । ऐसा कुमित्र तुझ्या हननीं । बुद्धी सांगे आम्रुतें.' ॥ ७१ ॥ ऐसें ऐकतां भयाभीत । मूषक पळे वनाआंत । विवरीं प्रवेशोनि गुप्त । प्राणधाकें दडाला. ॥ ७२ ॥ यावरी नेम सारूनि सांग । बभ्रु पातला जेथें मृग, । जंबुक म्हणे, 'गा! लगबग । स्थीर नावेक असावें. ॥ ७३ ॥ अंगबळें झुं-जोनि समरीं । तिघे दवडिले दुरिचे दुरीं, । तैसाच तूंही संग्राम करीं । मग हें भक्षीं बळिष्ठा! ॥ ७४ ॥ नकुळ म्हणे, 'महापुरुषा! । मूषकव्याघ्रा-दिकां ऐशां । जिंकिलें तेथें माझी दशा । काय मिरवे संग्रामीं? ॥ ७५ ॥ आतां कल्याण असो तूतें । स्वेच्छा भक्षीं भक्ष्यातें'. । जोहारूनि जंबुकातें । तोही गेला सत्वर. ॥ ७६ ॥ यापरी दवडोनि सर्वांतें । केलें आमिष आपैतें । मग एकला निर्भयचित्तें । भक्ष्य भक्षूं लागला. ॥ ७७ ॥ तुवांही करूनि हीच युक्ती । शत्रूचें नांव पुंसोनि क्षिती । सार्वभौम सर्व संपत्ती । निष्कंटक भो-गावी. ॥ ७८ ॥ वत्सनाभ[११] गुळचट लागे ओंठीं । प्राण नाशी रिघोनि[१२] पोटीं । साधुत्व दावोनि लोकरहाटी । मित्र परनाश साधावा. ॥ ७९ ॥ हा व्यक्त न दाखवितां विरोध । अंतरीं न विसरिजे विषाद । पावले ठायीं करावा वध ।

---

१. मांस. २. अध्याय १४० श्लोक ४३-४४ पहा. ३. हरिणाचें मांस. [अध्याय १४० श्लोक ४१-४२ पहा.] ४. विषासारखें दुष्पच. ५. तृप्ति. ६. मुंगुस. ७. क्षणभर. ८. अध्याय १४० श्लोक ४७-४८ पहा. ९. नमस्कार करुन. १०. नाहींसें करून. ११. बचनाग. १२. शिरोनी.

न विचारितां शत्रूचा. ॥ ८० ॥ निरूढी[1] जळवट घेइजे शिरीं । तेंवी वंदावे वळिष्ठ वैरी, । फावल्या अपायशिळेवरी । टाकूनि चूर्ण करावे. ॥ ८१ ॥ मुख्य बोलिजे वाक्य मधुर, । हृदय करावें वज्रधार, । हास्यवदन हितोपचार । समसमान दाखवावे. ॥ ८२ ॥ सुखीं दुःखीं व्हावें विभागी । ऐसें जाणिजे शत्रुवर्गी, । तरीच अपायाचे दुर्गीं[2] । मार्ग कीजे रिघावया. ॥ ८३ ॥ बळी देखोनि लीन होणें, । लुब्ध जोडिजे द्रव्यदानें, । समानासीं स्पर्धा करणें । प्रगट लोकीं न कळतां. ॥ ८४ ॥ सिंह कीं व्याघ्र देखोनि दृष्टी । खड्गा हात वसविजे मुष्टी, । वृश्चिक देखतां उठाउठी । पादरक्षा[3] आठविजे. ॥ ८५ ॥ तेंवि आपुलियाहूनि उणें । त्यासी पिडोनि सर्वस्व घेणें, । तेथें करुणेचेनि पवनें । चित्त कांपों [4]नेदिजे. ॥ ८६ ॥ आपुल्या अपकाराचे घाय । नित्य आठवी ज्याचें हृदय । त्याचा यत्नें न करितां क्षय । कैंवी अक्षय आपण? ॥ ८७ ॥ हातीं गवसलें घाली तोंडीं, । न पवे त्या मारी धोंडी, । मध्यस्त दंडें झोडोनि पाडी । जेंवी वनतरू फळातें. ॥ ८८ ॥ दारिद्र्य दुष्काळ आधि व्यसनें । शरण म्हणोनि भाकितां करुणे, । तोही शत्रु सोडितां प्राणें । सद्यः प्राणा मुकीजे. ॥ ८९ ॥ सबळ शत्रू झोडिजे डायीं[5] । तंव शिणावें कठिणोपायीं, । आलस्यअपायाची शायी । स्पर्शों आंगा न दिजे. ॥ ९० ॥ मुसळ दाऊनि अंगपतन । करी बहुधान्याचें [6]कंडण, । तेंवी घालोनि लोटांगण । शत्रुकंडण साधावें. ॥ ९१ ॥ नमनीं लववावें उत्तमांग[7], । मनीं लक्षिजे अपायमार्ग, । मस्तक खालावूनि चांग । मृग विंधी पारधी. ॥ ९२ ॥ सन्मुख सरळ मवाळ[8]युक्ती, । सदा वर्तणें धर्मपंथीं, । पायां लागूनि दुःख देती । कंटक जैसे जगातें. ॥ ९३ ॥ तेंवी अंगबळ मानूनि उणें । शत्रु साधावे बुद्धिबाणें, । अपाय करितां साधेल ज्याणें । तेंचि पुढां योजिजे. ॥ ९४ ॥ आमिषगर्ता[9] जाळिया फांसें, । बाणसंधानें श्वानें हुताशें[10], । श्वापदें साधिजेती सायासें । पारधीयें ज्यापरी. ॥ ९५ ॥ तेंवी मारितां न पवे यत्नीं । तरी निजेल्या गृहीं लाविजे अग्नी । फळतांबूलभोजनपानीं । विषप्रयोग करावा. ॥ ९६ ॥ पणीं जिंकोनि आणिजे हारी[11] । नियमीं गोविजे सत्योत्तरीं । झुजीं मारिजे बहुतां करीं । न्याय अन्याय न विचारितां. ॥ ९७ ॥ सर्पासि नाहीं ब्रह्महत्या, । व्याघ्रासि नाहीं

१. लोकरीति, प्रसिद्धि. २. किल्ल्यांत. ३. पायतण, वहाण. ४. न द्यावें. ५. डाई=डाव, सरसी, सर्वस्व. ६. कुटणें. ७. मस्तक. ८. मवाळ=मृदु. ९. मांसरूप खळग्याला. १०. हुताश=अग्नि. ११. वठणीस.

गोहत्या, । शत्रूसि नाहीं शत्रुहत्या, । हा निश्चय जाण पां. ॥ ९८ ॥ आतां सहस्र गोष्टींची गोष्टी । अपांडवी करूनि सृष्टी । पुत्रांसहित राजपटीं । भोग भोगीं चिरकाळ. ॥ ९९ ॥ [1]जीत असतां हें पांडव । पुत्रांसि [2]ने जिरे राणीव । ऐसें जाणसी तरीच [3]जाणीव । श्रेष्ठ ऐसें मग मानूं. ॥ १०० ॥ पांडुपुत्राचा [4]संबंधू । खंडे, तरीच फिटेल खेदू, । पुत्र पावती अक्षयानंदू । येरव्रीं मृत्यु पावाल कीं.' ॥ १०१ ॥ यापरी बोधून [5]वसुधापती । कणिक गेला स्वगृहाप्रती। राजा पडिला [6]चिंतावर्तीं । विचार कांहीं सुचेना. ॥ १०२ ॥ उद्वेगज्वरें [7]जाँकळे राव । पुढें मांडिला तोच प्रस्ताव । यावरी वर्तला कथेचा भाव । भाविक भावें [8]परिसोत. ॥ १०३ ॥ इति श्रीमहाभारते आदिपर्वणि । मुक्तेश्वरगिरा तारकावर्णीं, । अर्धचंद्रमा सुधाकिरणीं । जेंवि श्रवणीं आर्त चकोरा. ॥ १०४ ॥ श्रीगुरु ज्ञानकृपेची पौर्णिमा । पाहे तरीच लाहे उपमा । येरवीं वल्गना नये कामा । आम्हा मूढ [9]कवींची. ॥ १०५ ॥

अध्याय पस्तिसावा.

[10]बळाधिक [11]भीमसेन, । [12]अस्त्रविद्येंत श्वेतवाहन, । विवेकी राजनीतिनिपुण । धर्मराजा सर्वार्थी. ॥ १ ॥ ऐसें जाणोनि सर्व प्रजा । म्हणती, 'पुरातन पांडुराजा । ज्येष्ठ त्याचिया आत्मजा । राज्यपदा अधिकारू. ॥ २ ॥ चक्षुहीन प्रज्ञाचक्षू । भीष्म स्वनेमें [13]निरपेक्षू । यालागीं आमुचा राजा मुख्यू । युधिष्ठिर निर्धारें. ॥ ३ ॥ अवघे मिळोनि एकमतें । राज्यीं अभिषेकूं धर्मातें । भीष्मद्रोणकृपाचार्यांतें । विचारणें लागेना. ॥ ४ ॥ सहज इच्छिजे मानसें । तेंच वोढवलें दैवदशें । तरी तें नांव नेघों नावडे ऐसें । म्हणता कोणी असेना. ॥५॥ दुर्योधनें नायिकतां । शकुनीसही न कळतां । शीघ्र साधिजे या अर्था । विलंब सर्वथा न करावा.' ॥६॥ [14]ऐसें ऐकोनि दुर्योधन । क्रोधें धडकला [15]हुताशन, ।

---

१. जीवंत. २. राज्य न पचे. ३. ज्ञान. ४. अकारान्त पुंलिंगी नामें प्रथमेच्या एकवचनीं कधीं कधीं ओकारान्त आणि ऊकारान्त काव्यग्रंथांत आढळतात, या नियमास अनुसरून संबंधू, खेदू, आनंदू हीं रूपें जाणावीं. ५. धृतराष्ट्र. ६. चिंतारूप आवर्तांत (भोंवऱ्यांत). ७. व्यापून जाई. ८. परिसणें=परिश्रवणें, ऐकणें. ९. या अध्यायास 'कणिकनीति' 'कणिकवाक्य' असें नांव आहे. १०. येथें 'जतुगृहपर्वा'स आरंभ होतो. ११. प्राणाधिक असा भीम. (अध्याय १४१. श्लोक २०.) १२. 'कृतविद्या' असें मूळांत आहे. १३. निःस्पृह, अनिच्छु. १४. प्रजाभाषण. युधिष्ठिरास राज्याभिषेक करण्याविषयीं पौरजन आपला विचार कळवितात. (अध्याय १४१ श्लोक २७.) १५. अग्नि.

विदुर [1]नसतां, अति उद्विग्न । रायापाशीं [2]पातला. ॥ ७ ॥ म्हणे, 'राया अनर्थ पाहीं । उदेला तो ऐकिला कांहीं?' । येरु म्हणे, 'कळला नाहीं, । ज्ञात करीं [3]स्वाचे.' ॥ ८ ॥ 'अंधत्वदोष दावूनि तुतें, । [4]तृणाग्रीं बांधून भीष्मातें । पादांगुष्ठें लोटूनि मातें । एकशतबंधूंसीं, ॥ ९ ॥ [5]अन्यज कुंतीगर्भधामीं । जो जन्मला व्यभिचारधर्मीं । त्या धर्मातें राज्यलक्ष्मी । द्यावया सर्व सिद्ध झाले. ॥ १० ॥ पुरी राष्ट्र प्रजा लोक । ब्राह्मणादी वर्ण अनेक । सेवक संबंधी सकळिक । तेच [6]मिळणीं मिळाले. ॥ ११ ॥ हें निश्चयें झालें जाण, । यया बोला नाहीं आन, । कनिष्ट भिक्षा, अथवा मरण, । तुझिया [9]भोगा पातलें.' ॥ १२ ॥ राजा म्हणे, 'ऐक आतां, । पांडु माझा सहोदर भ्राता, । पुत्रां त्याचिया [7]गुणवंता । केंवी [8]वाईट चिंतावें? ॥ १३ ॥ क्षोभती सकळांचीं मानसें । भीष्मद्रोणा वाटेल कैसें? । [10]नेमिलें करिती [11]सायासें, । त्यासी उपाय असेना. ॥ १४ ॥ त्यांचेनि सुखें [12]पावती सुखा, । त्यांचेनि दुःखें पावती दुःखा, । ऐसी त्यांची [13]अदृष्टरेखा, । सांग कोणें [14]मोडावी? ॥ १५ ॥ [15]आगळें देखोनि पराचें, । मिळणी मिळती तयांचे, । या वेगळे प्रयत्न वाचे, । मी काय बोलों सांग पां?' ॥ १६ ॥ सुयोधन म्हणे, 'ऐकें जनका! । उच्छेदावया धर्मादिकां, । आप्तवर्गाची आशंका । कल्पूं नको मानसीं. ॥ १७ ॥ भीष्म येथें न घाली मन, । दोनी पक्ष पैं त्या [16]समान; । विदुर बोले धर्मवचन । परी तो स्वार्थीं [17]गुंतला. ॥ १८ ॥ अश्वत्थामा माझा प्राण, । जिकडे पुत्र तिकडे [18]द्रोण, । कृपाचार्य द्रोणाधीन, । दोघे येती निर्धारें. ॥ १९ ॥ मुख्य पांडवांचा वैरी । कर्ण जाण पां निर्धारीं, । शकुनी सर्पाचियेपरी । संधी पाहे [19]डंखावया. ॥ २० ॥ प्रजा सेवक [20]द्रव्यदानें । चोळंगती जैसीं श्वानें, । अनुसरती जीवें प्राणें । आम्हांलागीं सर्वथा. ॥ २१ ॥ प्रस्तुत ऐकें, एक शब्दू । निकट असतां नित्य संबंधू । क्ष-

---

१. नव्हता तेव्हां. २. पातला=पावला, प्राप्त झाला. ३. आपल्या वाणीनें. ४. तुच्छ मानून. (अध्याय १४१ श्लोक ३२.) ५. 'अन्यज कुंतीगर्भाधम । व्यभिचारकर्में पावला जन्म । तया धर्मातें राजधर्म' असा अन्य पाठ. ६. समाजांत. ७. दैवा. ८. गुणसंपन्न. [क्षेत्रजपुत्र औरस पुत्रांपेक्षा बुद्धिमान् आणि वीर्यशाली असतात हा सिद्धांत सर्वसंमत दिसतो.] ९. 'बोलटें' असा अन्य पाठ. १०. जें दैवानें योजिलें तें. ११. श्रम घेऊन. १२. प्राप्त होती. १३. दैवरेषा. १४. मोडण्यास कोणी समर्थ नाहीं—असा भाव. हा प्रश्नालंकार जाणावा. १५. अधिक, श्रेष्ठ. १६. सारखे, मध्यस्थ. १७. अर्थबद्ध. १८. अध्याय १४२ श्लोक २० पहा. १९. डसावयाला. २०. 'द्रव्येण सर्वे वशाः' असें बोलण्याचें तात्पर्य.

णक्षणा उपजे खेदू । मनोभंग मानसीं. ॥ २२ ॥ देखोनि उत्कर्षाची [1]रहाटी । विषादवणवा धडके पोटीं, । घडीमाजी अनर्थ कोटी, । केंवी धैर्य धरावें ? ॥ २३ ॥ हे ठेवावे [2]स्थळांतरीं । राजधानीपासोनी दुरी । इतुकेनि [3]भयाची गळसरी । [4]अर्थी तुटली [5]जाण पां. ॥ २४ ॥ बाहेर न पडतां न्यून पूर्ण, । विचारीं संचरेना मन, । [6]सामोपचारें [7]बाह्यगमन । करिती ऐसें करावें. ॥ २५ ॥ खळा आणि कंटकातें । दोन प्रकार बोलिजे येथें, । [8]उपानहीं भंगावें मुख्यत्वें । कीं वर्तणें दूरस्थ.' ॥ २६ ॥ ऐकोनि राजा आठवी मनें । [9]कणिकें बोलिलीं तीं वचनें, । तत्काळ पातलीं खुणें । विलंब कांहीं न लागतां. ॥ २७ ॥ मग [10]म्हणे, '[11]बुद्धिनिपुणा ! । हेंच मानलें माझिया मना, । सामोपचारें बाह्यगमना, । करिती ऐसें करावें.' ॥ २८ ॥ ऐसें सुयोधनासीं अनुवादन । करी प्रज्ञाचक्षु आपण, । पुत्रातें आज्ञा देऊन । मग बैसे [12]निवांत. ॥ २९ ॥ ऐसें चिंतार्णवीं निमग्न । दुरात्मयाचें अंतःकरण, । तंव पातला [13]प्रधान । तेच समयीं त्या ठाया. ॥ ३० ॥ करद्वय जोडोनि सुमती । वृत्तांत [14]सांगे राजयाप्रती । '[15]वार्ताहर वारणावती- । हूनि आले नृपवर्या ! ॥ ३१ ॥ तिहीं [16]वारुणावतीचें वर्णन । केलें तें ऐकें सावधान, । इंद्रभुवना समसमान । शोभा आली तयासीं. ॥ ३२ ॥ होमशाळा [17]देवतायतनें । वेदघोषशास्त्राध्ययनें । [18]छत्रागारें [19]प्रपास्थानें । विश्रामकरें शोभती. ॥ ३३ ॥ फळें शाका सर्व धान्यें । सर्वरसांचीं सर्व पानें । सर्वानंद भोगिती जनें । स्वर्गातुल्य ते ग्रामीं. ॥ ३४ ॥ वारणावती नाम नगरी । सुंदर आणि मनोहारी । उपमे तुळितां [20]अमरपुरी । [21]किरातपल्लीसारिखी.' ॥ ३५ ॥ ऐकोनि मंत्रियाच्या उत्तरा । पाचारूनि युधिष्ठिरा । सन्निध बैसवूनि आदरा । [22]करिता झाला [23]सौक्षपें. ॥ ३६ ॥ राजा [24]बोले मधुर वाणी, । म्हणे,

---

१. वर्तणूक. २. अन्य ठिकाणीं. ३. भीति हीच गळसरी. ४. खरोखर, आपोआप. ५. 'अर्धतंतु तुटेल' असा अन्य पाठ. ६. मृदु उपायानें. (अध्याय १४२ श्लोक १४.) ७. 'प्रजा प्रधान सगळे जन । निजमर्यादा वर्तती' असा अन्य पाठ. ८. पादुकांनीं. ९. अध्याय १४२ श्लोक १ पहा. १०. धृतराष्ट्र म्हणे. (अध्याय १४२ श्लोक १६-१९.) ११. दुर्योधना. १२. शांत, स्वस्थचित्त. १३. कोणी एक चतुर मंत्री. १४. अध्याय १४३ श्लोक २ पहा. १५. दूत. १६. वारणावत=वारणावती=हस्तिनापुराच्या समीपवर्ती एक नगरी. १७. देवालयें. [हें वारणावतीचें वर्णन मुक्तेश्वराच्या पदरचें होय. यास मूळांत आधार नाहीं. वारणावती नगरीस पशुपति महादेवाच्या पूजेनिमित्त मेळा भरावयाचा होता, व नानादेशांचे राजे यावयाचे होते म्हणून धर्म गेला असें वर्णन आहे.] १८. अन्नछत्रें. १९. पाणपोई. २०. अमरावती. २१. गांवढेगांवासारिखी. २२. अंबिकासुत धृतराष्ट्र करिता झाला. २३. अगत्यानें. २४. अध्याय १४३ श्लोक ७-१० पहा.

धर्मा! मानेल मनीं, । तरीं जाऊनि कौतुक नयनीं । अवलोकुनि येइजे. ॥ ३७ ॥ सर्वे घेऊनि बंधु माता । आरूढोनि कनकरथा । छत्रछायेतळीं पंथा । महोल्हासें लोटिजे. ॥ ३८ ॥ शृंगारवाटिकाविनोदवनीं । सुखसदनीं शय्यासनीं । वस्त्राभरणीं भोजनपानीं । सुख भोगीं मनइच्छा. ॥ ३९ ॥ मानें तंववरी वसिजे वीरा! । पुढती येईजे हास्तिनपुरा, । प्रशस्त मानेल जरी विचारा । तरी ऐसेंच वर्तावें!' ॥ ४० ॥ ऐकोनि नृपाननींची[1] गोष्टी । सुजाणा जैणवलें[2] पोटीं, । म्हणे, 'निरोपिसी तें मुगुटीं । पुष्प तैसें वंदीन. ॥ ४१ ॥ पिता गुरु तूं देवमूर्ती । तुझी सेवा ते विष्णुभक्ती, । तुझी आज्ञा ते कोटिसुमुहूर्ती । तुळितां उणी अपाडें. ॥ ४२ ॥ येचक्षणीं करीन गमन.' । म्हणोनि चरणा केलें नमन, । कुंतीसहित पांचहीजण । निघते झाले तात्काळीं. ॥४३॥ वंदिले भीष्म भारद्वाज[3] । विदुर आणि गौतमात्मज[4] । गांधारीचें पदरज । भावें भाळीं[5] स्पर्शिलें. ॥ ४४ ॥ चालिले देखोनि महाबळी । दुर्योधन एकांत स्थळीं । बैसोनि पाचारिले जवळी । प्राणमित्र आपुले. ॥ ४५ ॥ शकुनी कर्ण दु:शासन । चौथा आचार्यपुत्र[6] जाण । पाँचाजणीं आनंदोन । पांडवां अपाय कल्पिला.[7] ॥ ४६ ॥ 'पांडव होमावे हुताशीं[8]' । निश्चय करोनि निजमानसीं, । पुरोचन[9] पापराशी । पाचारिला जवळिके. ॥ ४७ ॥ तो दुरात्मा यवनजाती । दुर्योधनें धरोनि हातीं । म्हणे, 'मित्रा! माझिये मती । विश्वासिक तूं एक. ॥ ४८ ॥ ऐश्वर्येंसी पृथ्वीतळ । माझें तें तुझें सकळ, । मजसमान भोग अचळ । भोगवीन तुज निर्धारें. ॥ ४९ ॥ माझें ऐश्वर्य तुझें झालें, । तेथें कांहीं अरिष्ट आलें, । तें पाहिजे निर्मूळ केलें । आत्मकार्य म्हणोनी. ॥५०॥ आज्ञा देऊन पांडुसुतां । रायें[10] धाडिले वारणावता, । तुवां वेळघोनि[11] दिव्यरथा[12] । पुढां गंतव्य[13] करावें. ॥ ५१ ॥ मेळवूनि नगरवासी । बहु सन्मान देइजे त्यांसीं । ओपोनि संपत्तीच्या राशी । भोगसुखें भुलवावे. ॥ ५२ ॥ विश्वास दावूनि मानसा, । मग पाडावे मृत्युफांसा[14] । तोही प्रकार ऐकें, ऐसा । मी

---

१. धृतराष्ट्राच्या तोंडची. (आनन=मुख.) २. कळलें, समजलें. ३. द्रोणगुरु. ४. कृपाचार्य. ५. कपाळीं. ६. अश्वत्थामा. ७. 'पांचैजणी अपायदान । धर्मद्वेषें कल्पिलें ॥' असा अन्य पाठ. ८. अग्नींत. ९. पुरोचन=दुर्योधनाचा सचिव व मित्र. वारणावती नगरींत जतुगृह तयार करून त्यांत पांडवांस जाळावें ही कामगिरी दुर्योधनानें यास सांगितली होती. १०. धृतराष्ट्रें. ११. चढोनि. १२. हा रासभयुक्त यानांत बसून वारणावतीस गेला. (अध्याय १४४ श्लोक ४.) १३. गमन. १४. मृत्युपाशांत.

सांगेन त्यारीती. ॥ ९३ ॥ सहस्र शिल्पिकारांहातीं । महेंद्रसदनातुल्य निगुती[1] । आलय[2] रचावें, जे युक्ती । चतुरातेंही[3] अगम्य. ॥ ९४ ॥ तैल्यगर्भ तरूच्या काष्ठीं । थाट बांधोनि भूतळवटीं । मेणसूत्राच्या बांधाटी[4] । आंवळावें सुबद्ध. ॥ ९५ ॥ वेंश[5] सरळ लंब मोठे । दुरी करूनि अंतर गांठे । अग्नियंत्र औषध पिष्टें । मुखमर्यादा भरवी. ॥ ९६ ॥ ऐशी आइती करूनियां । भेंड[6] मुंज[7] सणकाडिया । वंशपात्रें मढोनियां । मघूनि सारें लिंपिजे. ॥ ९७ ॥ राळ कापूर गंधक तैलें । लाक्षा[8] सर्पिष[9] एकमेळें । कालवूनि कर्दमगोळे । संधिभाग लिंपावे. ॥ ९८ ॥ त्यावरी मृत्तिकेचा लेप । कीजे अत्यंत बहु ना स्वल्प । सप्तरंगी दावावी ओपें[10] । ऐशीं चित्रें रेखावीं. ॥ ९९ ॥ चतुःशाळा उपरिका[11] । गोपुरशृंगावरी पताका । भद्रपीठ रंगभूमिका । चैत्यासनें[12] निर्मावीं. ॥ ६० ॥ भरी घालूनि अस्थि चूर्ण । भूमि करावी समसमान । रमणीकपणें पाहतां मन । कदाकाळीं नुठावें. ॥ ६१ ॥ सर्व संपत्ती भरूनि पुर तें । वस्तीस ओपिजे पांडवातें । वर्ष एकपर्यंत तेथें । विश्वासेंसी सुखवावें. ॥ ६२ ॥ संकेत करूं ते अवसरीं । पावक[13] प्रदीप्त करिजे द्वारीं. । 'अग्नि लागोनि, निर्मोले[14] घरीं' । ऐसें लोकीं रूढवावें. ॥ ६३ ॥ तिळतुल्य वन्हि लागतां देखा । एकसरें उठे भडका, । ऐसिया गृहीं त्या गृहमुखा-[15] । माजी वैरी होमावे. ॥ ६४ ॥ कळों नेदिजे आपुल्या मना । तेथें ठावुकें न पडे आना । ऐसिये बुद्धी विचक्षणा ! । गुप्त कार्य साधावें.' ॥ ६५ ॥ ऐसीं दुर्योधनाचीं वचनें । येरीं झेलिलीं अंतःकरणें, । जैंवी कां वांती होतां श्वानें[16] । त्वरें चाटून जाइजे. ॥ ६६ ॥ माडवृक्षापासूनि देखा । अळुमाळ स्रवती मद्योदका । मद्यपानीं ओढवी मुखा । धांवोनियां लगबगां. ॥ ६७ ॥ आदींच शंखध्वनींचा उल्हास । त्यावरी पातला फाल्गुनमास, । कीं व्यभिचारिया मल्याळ[17] देश । दैवयोगें लाधला. ॥ ६८ ॥ तेंवी साधूंचा उच्छेद । करावया दुर्जना अतिआल्हाद । मृगसमुदाय देखूनि व्याध । हाव बांधी वधावया. ॥ ६९ ॥ तेंवी 'अवश्य' म्हणोनि

---

१. निश्चयें. २. चतुःशाल गृह. ३. 'चतुर ही ते चोजती' असा अन्य पाठ. ४. बंधनें. ५. वेळू. ६. लहान जातीचा वृक्ष, याच्या गर्भास भेंड असें म्हणतात. हा अग्निग्रहण करण्याविषयीं फार चपल. कोंकणांत या गर्भाचे वधुवरांच्या मुंडावळीस गोंडे करितात. ७. गवत. ८. लाख. ९. तुप. १०. झकाकी. ११. मांडी. १२. मंडपासनें. १३. अग्नि. १४. मृत झाले. १५. गृहद्वारांत. १६. ओंव्या ६६-६९ ह्या मुक्तेश्वराच्या पदरच्या असल्यामुळें त्या त्याचें दृष्टांतबाहुल्य सूचवितात. १७. मल्य, मलबारप्रांत.

वचनीं । पुरोचन निघाला तत्क्षणीं, । [1]रासभरथातें पिटोनी । वारणावता पातला.
॥ ७० ॥ येरीकडे पांडववीर । निघतां कौरवांचे भार । बोळवीत पातले,
द्वार । उल्लंघूनि नगराचें. ॥ ७१ ॥ प्रजा प्रधान करिती रोदना । निंदिती
भीष्मा दुर्योधना, । म्हणती, 'मर रे हृदयमलिना ! । धृतराष्ट्रा ! पापिष्ठा !
॥ ७२ ॥ पुत्रलोभें राज्यस्वार्थें । दूरी दवडिलें पांडवांतें, । आम्हीं जाऊं त्यां-
संगातें । धनें सदनें त्यागुनी. ॥ ७३ ॥ धर्मावीण अधर्मनगरीं । कोण राहेल
दुराचारी ?' । सकळ प्रजा [3]सहपरिवारीं । पांडवापाठीं चालिली. ॥ ७४ ॥
'हस्तनापुरीं पुत्रांसहित । धृतराष्ट्र आणि [4]गंगासुत । राज्य करो आनंदभरित ।
अनंतकाळ धर्मात्मा.' ॥ ७५ ॥ वनवासा [5]निघतां श्रीरामें । प्रजा चालिल्या स-
मागमें, । कीं मथुरे [6]जातां [7]देवोत्तमें । गोपीजन ज्यापरी. ॥ ७६ ॥ देखोनि
पौरप्रजांचा प्रेमा । अत्यंत प्रेमें [8]जाकळे धर्मा, । आलिंगूनि म्हणे, 'हो ! तुम्हां ।
चित्त माझें न विसंबे. ॥ ७७ ॥ राजाज्ञेनें वारणावतीं । किंचित्काळ करूनि
वस्ती । शीघ्र येईन तुम्हांप्रती । हें निश्चयें जाणावें. ॥ ७८ ॥ [9]अल्पमाळ वि-
षमतेचा वात । लागतां मातें जाणवा [10]मात । तात्काळ येऊनि मनोरथ । पूर्ण
करीन मी तुमचा.' ॥ ७९ ॥ यापरी राहवूनि समस्तां । धर्म [11]वळंघे रथावरुता, ।
कौरव म्हणती, 'विदुरा ! आतां । आज्ञा मागा माघारीं.' ॥ ८० ॥ संकेत
जाणवावया शब्दीं । विदुर पाहे एकांत संधी । भोंवती दुर्जनांची [12]मांदी । र-
क्षीत ठेले तयातें. ॥ ८१ ॥ बर्बर बोलती बर्बरदेशीं । म्लेंछभाषा बोलिजे
तैशी । ते भाषेनें चातुर्यराशी । [13]संज्ञा करी [14]धर्मातें. ॥ ८२ ॥ 'प्रज्ञा'शब्दार्थ
'संकेत' जाणे । तो '[15]प्राज्ञ' ऐसें बोलती शहाणे । [16]पराची [17]प्रज्ञा ओळखी मनें । नीतिशा-
[18]स्त्री सोज्वळ. ॥ ८३ ॥ [19]लोहो नव्हे, परी अतितीक्ष्ण । काळीज भेदोनि नि-
[20]वटी प्राण । तें शस्त्र ओळखे, त्या मरण । शत्रुपासाव [21]असेना. ॥ ८४ ॥
विवरगर्भीं असतां प्राणी । अग्नीनें अथवा सूर्यकिरणीं । दाहिला [22]नें वचे, सु-
जाणीं, । जाणितलें पाहिजे. ॥ ८५ ॥ मार्ग नोळखे [23]चक्षुहीन । नकळे दिशा
केउती कोण ? । अधैर्य पुरुषातें कल्याण । उभयलोकीं असेना. ॥ ८६ ॥

---

१. गाढव. २. अध्याय १४५ श्लोक १३ पहा. ३. परिजनांसह. ४. भीष्म. ५. निघाला तेव्हां. ६. गेला तेव्हां. ७. श्रीकृष्णें. ८. व्यापी. ९. थोडासा. १०. गोष्ट. ११. चढे. १२. दाटी. १३. खूण, संकेत. १४. 'सावध करी धर्मातें' असा अन्य पाठ. १५. बुद्धिमान्, अनेकभाषाभिज्ञ. १६. शत्रूची. १७. बुद्धि. १८. नीतिशास्त्रानुसारिणी. (अध्याय १४५ श्लोक २१ पहा.) १९. लोखंड. २०. मारी. २१. अध्याय १४५ श्लोक २२ पहा. २२. न जाई. २३. अध्याय १४५ श्लोक २४-२५ पहा.

सकामातें न साधे सिद्धी । सुखा न पावे [1]अशांत क्रोधी, । अधैर्यवंत ऐश्वर्यपदीं । पावों न शके सर्वथा. ॥ ८७ ॥ शत्रुसंबंधी असावधान । आलस्य निद्रा अधैर्य पूर्ण, । तेणें [2]आंवतूनियां मरण । [3]निजपालवीं बांधिलें. ॥ ८८ ॥ अमित्र मुखींचा शब्द सुरस । तो विषकमळाचा सुवास । आलिंगनीं [4]मैंदपाश । अतुट कंठीं शिरकला. ॥ ८९ ॥ अन्नस्वरूपें [5]काळकूट । गृहस्वरूपें [6]हव्यवाट । द्यूतस्वरूपें पाश कपट । उत्तरोत्तर जाणावें. ॥ ९० ॥ मन राखोनि सावधवृत्ती । हितोपदेश मानूनि चित्तीं । आत्महिताचे गूढपंथीं । नित्याभ्यासीं वर्तावें. ॥ ९१ ॥ अहोरात्र [7]अटण करिता । तो रात्रीही न चुके पथा । [8]नक्षत्रज्ञानिया सर्वथा । दिशा भुली न पडेची. ॥ ९२ ॥ हृदयीं वर्तला वृत्तांत । तो पंचप्राणांसीच विदित । ज्ञाते आपुला गुह्यार्थ । बाहेर प्रगटों नेदिती. ॥ ९३ ॥ ध्रुवमंडळ घालूनि पाठीं । अगस्तिचक्र लक्षूनि दृष्टी । दक्षिण भेदितां [9]जगजेठी । विजयी झाला हनुमंत. ॥ ९४ ॥ श्रेष्ठ जाणती श्रेष्ठ खुण । हृदयीं स्मरतां श्रीकृष्णचरण । अपायकाळीं संकटहरण । [10]उपाय येती सामोरे. ॥ ९५ ॥ मानस धाडिजे कृष्णापासीं । कृष्णचि ठेविजे मानसीं । तेणें अरिष्टें भंगोनि आपैसीं । उपाय येती सामोरे. ॥ ९६ ॥ बुडवितां बुडऊं न शके [11]आप । दंशकर्ते सर्प होती अकोप, । विषें मरतया अमूप । अमृत जोडे प्राशनीं. ॥ ९७ ॥ गृहीं धडकल्या प्रळयाग्नी । विवरमार्ग दे [12]मेदिनी । [13]षडिंद्रियें [14]चक्रपाणी । सत्व रक्षी सातवा. ॥ ९८ ॥ एकटें वनामाजी पडतां । धैर्य देऊनि, बुडवी, व्यथा । अपाय चिंती विष्णुभक्ता । तोचि आधीं विनाशे. ॥ ९९ ॥ रात्रीं उमजे मार्गरेखा । जळलंघनीं सांपडे नौका । आतुडतां राक्षसमुखा । तेथें रक्षी श्रीविष्णू. ॥ १०० ॥ संकटीं क्षमा विष्णुस्मरण । तात्काळ त्यासी गुरुदर्शन । गुरुदर्शनें समाधान, । आपदा वाटे संपदा. ॥ १०१ ॥ भंगोनि विघ्नाचा उमाळा । विजयलक्ष्मी घाली माळा । आत्मपदाचा सोहळा । भगवद्भक्त पावती. ॥ १०२ ॥ जाळितां न जळे [15]दैत्यकुमर, । जाळितां न जळे [16]हनुमान् वीर, । गाईगोपाळांचा [17]भार । जळ-

१. शांतिहीन नर. २. 'प्रयत्न करूनियां मरण । निज पाठीं बांधिलें' असा अन्य पाठ. ३. आपल्या पदरीं. ४. द्यूतकाराचे फांस. ५. विष. ६. अग्नि. ७. फिरणें. ८. श्लोक २६ पहा. ९. जगज्ज्येष्ठ. १०. 'उपाय रची आपैसा' असा अन्य पाठ. ११. उदक. १२. पृथ्वी. १३. पांच इंद्रियें व आत्मा सहावा मिळोन सहा इंद्रियें. १४. विष्णु. १५. प्रह्लाद. १६. मारुती. (लंकेत मारुतीला जाळण्याचा घांट रावणानें घातला होता—असा अर्थसंदर्भ जाणावा.) १७. समूह.

तां कोणें रक्षिला? ॥ १०३ ॥ तेचि स्मरण धरितां पोटीं । जगीं स्फुरली चातुर्यगोष्टी, । मेघश्याम असतां पाठीं । ताप संताप असेना'. ॥ १०४ ॥ ऐसें बोलोन विदुर सुमती । म्हणे, 'धर्मा! भेदलें चित्तीं?' । 'कळलें कळलें' म्हणोनि हातीं । चरण येरें वंदिले. ॥ १०५ ॥ असो, हें राहवूनि समस्तां । **पांडव** चालिले **वारणावता**, । मार्गीं आदरें विचारी माता । ज्येष्ठपुत्रा सुजाणा. ॥ १०६ ॥ '**विदुर** बोलला संकेतवचनें । दोघें पावलेति एके खुणे । तें काय ऐसें आमुच्या मनें । जाणीतलें पाहिजे.' ॥१०७॥ जननीलागीं बोलिजे **धर्में**, । 'विषाची बाधा एकल्या **भीमें** । सोसिली, आतां **कौरवाधमें** । अपाय सर्वां रचिलासे. ॥ १०८ ॥ गृहापासून उपजेल वन्ही । तेणें घालितां प्राणव्यसनीं, । कृपा करूनि **चक्रपाणी** । बिवरोदरीं रक्षील. ॥ १०९ ॥ वनोपवनीं भोगितां क्लेश । वर्षें लोटतील द्वादश । प्राप्त झालिया सुवाड दीस । क्लेश सर्व नासती. ॥ ११० ॥ होतील सुहृदांचिया भेटी । पुढती बैसों राजपटीं, । **विदुर** बोलिला त्या गोष्टी- । माजी अर्थ ऐसा कीं.' ॥ १११ ॥ असो. सत्वर क्रमोनि पंथा । **पांडव** पावले **वारणावता**, । पुढें राजदूतीं वार्ता । पौरजनातें जाणविली. ॥ ११२ ॥ रथ कुंजर अश्वपृष्ठीं । वळंघूनियां जनाच्या थाटीं । उपायनें घेऊनि भेटी । येते झाले सन्मुख. ॥ ११३ ॥ सडे चोक रंगमाळिका । मखरें तोरणें ध्वज पताका । **पांडवागमन** पवित्र लोकां । परम आल्हाद न संठे. ॥ ११४ ॥ अष्टमीमाजी शनि रोहिणी । शोभन योग मंगळदिनीं । मंगळ वाद्यांचिये ध्वनी । **धर्म** नगरीं प्रवेशे. ॥ ११५ ॥ जीर्ण विशाळ राजसदन । प्रथम ओपिलें वसतिस्थान । नाना उपभोग संपत्तीजन । घेऊनि पुढें वोळंगती. ॥ ११६ ॥ नित्यनैमित्यधर्माचरण । वेदशास्त्रपुराणश्रवण । ब्राह्मणभोजनें अनेक दान । दिवसें दिवस आगळें. ॥ ११७ ॥ बंधुमाता ऋषीसहीत । दहा दिवस लोटल्या तेथ । पुढें वर्तलें विपरीत । तें तूं परिसें नरेंद्रा! ॥ ११८ ॥ नगराधिकारी **पुरोचन** । पारिपत्य तया अधीन । **धर्मासी** करोनि नमन । बद्धहस्तें विनवीत. ॥ ११९ ॥ 'श्रेष्ठ रायाचें आज्ञा-

---

१. श्रीकृष्ण. २. दुर्योधनें. ३. बिळाच्या मध्यभागीं छिद्रामध्यें. ४. उत्तम. ५. कांहीं सामान्यनामें नित्य अनेकवचनींच असतात त्यांपैकीं 'क्लेश' हें आहे; जसें–'मला क्लेश होतात.' ६. मित्रांच्या. ७. नजराणे. ८. फाल्गुन शुद्ध अष्टमीस रोहिणीनक्षत्रीं पांडव वारणावतास रहावयास गेले. (अध्याय १४५ श्लोक ३४.) ९. अध्याय १४६ श्लोक ११ पहा. फाल्गुन कृष्ण तृतीयेस म्हणजे शु० ८ मी पासून दहावे दिवशीं पांडव पुरोचनाच्या विज्ञापनेवरुन लाक्षागृहांत राहावयास गेले.

वचन । इंद्रभुवना समसमान । चित्र विचित्र राजसदन । धर्मालागीं निर्मावें.
॥ १२० ॥ तेथें करवूनियां वस्ती । सेवा करावी अहोराती । जें जें इच्छिजे
मनोवृत्ती । तें तें तात्काळ निवेदीं[1]. ॥ १२१ ॥ ऐसी राजाज्ञा समर्थ । कथि-
ल्याहूनि विशेष येथ । रचना केलीसे अद्भुत । ते स्वामींनीं पहावी. ॥ १२२ ॥
राजाज्ञेनें निर्मिलें धाम[2] । राजाज्ञेनें सुखविश्राम । स्वामींनीं केलिया संभ्रम[3] ।
सुख होईल जनकातें[4]. ॥ १२३ ॥ माझी सार्थक करावी सेवा । संतोष द्यावा
नरपार्थिवा, । आजिचा मुहूर्तयोग बरवा । गृहप्रवेश करावया.' ॥१२४॥ प-
रिसोनि पुरोचनाचें वचन । बंधुसहीत कुरुनंदन । गृहीं प्रवेशे विचक्षण[5] ।
आठवूनि विदुरोक्ती. ॥ १२५ ॥ उपरिकामध्यें गर्भागार । भिन्न शाळा बाह्य
प्रकार । रचना देखोनि नागर[6] नर । धन्य म्हणती कर्त्याची. ॥ १२६ ॥
'सुंदर रमणीक दिव्य मंदिर' । ऐसें बोलती नारी नर । धर्मावेगळा गुह्य वि-
चार । आन[7] कोणी जाणेना. ॥१२७॥ दांभिकभजनाचा[8] पसारा । आदर उप-
जवी नारीनरा । अंतरीं दोषाचा थारा । तें एक जाणे ईश्वर. ॥ १२८ ॥
जैंवि मैंदांचा[9] पवित्राचार । प्रगट दिसे अतिसुंदर, । कीं वेश्येचा मुखशृंगार ।
भुली पाडी कामिका[10]. ॥ १२९ ॥ बचनागाची[11] कांडी गुळगुळी । सर्पा-
आंगींची मैत्राळी[12] । खदिरांगाराची[13] सोज्वळी । रत्नमाळा आभासे. ॥ १३० ॥
व्याघ्र दयाशीळ लोकीं । धेनु कुरवाळी निजनखीं । फणाग्रीं वाहूनि उदकीं ।
सर्प खेळवी बेडुका. ॥ १३१ ॥ सर्वें चोराची निर्लोभ सेवा । जाणता वि-
श्वास नुपजवी जिवा । तैंवि तें गृह देखोनि पांडवा । गोड न वाटे मानसीं.
॥ १३२ ॥ बोलतां तर्क न पडेल जना । ऐसिया दावूनि संकेतवचना । म्हणे,
'डोळसा भीमसेना ! । गृह दृष्टीं देखिलें ? ॥ १३३ ॥ आपणा म्हणविसी
विचक्षण । तरी येथें प्रगट करीं ज्ञान । निकें मानलें निकेतन[14] । वासायोग्य
आमुतें. ॥ १३४ ॥ गृह किंवा गृहाचें सुख । अक्षय किंवा क्षयकारक ।
क्षेमालय[15] कीं निर्जनिष्टंक[16] । यमालय मज सांग. ॥ १३५ ॥ भिंती स्पर्शोनियां
पाणी[17] । अवघ्राण[18] करीं आपुले घ्रोणीं[19] । कुवास सूचना सांगे मनीं । गृहवास
कीं सुवास. ॥ १३६ ॥ गंधक तैल रस घृत । लाक्षा[20]शाल्मलीसारभरित[21] । त्रि-

१. कथावें. २. गृह. ३. आदर. ४. धृतराष्ट्रातें. ५. पंडित. ६. पौर. ७. अन्य. ८. हें दृष्टांत-बाहुल्य कवीच्या पदरचें आहे, यास मूळ ग्रंथांत अधार नाहीं. ९. फांसेगाराचा. १०. कामुक पुरुषाला. ११. एक विष आहे. १२. खवळी, पापुद्रा. १३. खैराच्या निखाऱ्यांची. १४. रहाण्याचें स्थान, गृह. १५. सुखालय. १६. अव्याहत, सिद्धांत, निश्चित. १७. हातानें. १८. हुंगणें. १९. नाकानें. २०. लाख. २१. राळ.

विध पिंडिका मेण मिश्रित । कर्पूरभरीं भरिलासे. ॥ १३७ ॥ द्रव्यें प्रत्यक्ष सांगती नयनीं । वसती त्यांतें भक्षील वन्ही । अग्नियंत्रें रचिलीं घरणीं । गृहाकार जाण पां. ॥ १३८ ॥ विदुर बोलिला त्या युक्ती । तात्काळ पातल्या [1]प्रतीती'. । भीम म्हणे, 'सर्वज्ञसुमति ! । विज्ञापना परियेसीं. ॥ १३९ ॥ [3]येवढा दिसे जरी अनर्थ, । तरी अगत्य काय वसावया येथ ? । पूर्वी वास्तव्य केलें जेथ । तेचि स्थळीं वसावें.' ॥ १४० ॥ धर्म म्हणे, 'नव्हे युक्ती । आम्हीं [5]नेणते सर्वार्थी । ऐसें मानलें वैरियां चित्तीं । तेचि यथार्थ दावणें. ॥ १४१ ॥ [6]कुडा मंत्र केला वधावया । तो सुचविला पांडवेया । ऐसें जाणतां महा अपाया । तात्काळीक करितील. ॥ १४२ ॥ फावल्या करितील घात, । एकाचेनि मृत्यें सकळांसी मृत्य । यालागीं सांगेन तो सिद्धांत । सकळै तुम्हीं स्वीकारा.॥१४३॥ अग्नीपासाव गृहमरण । ऐसा निश्चय मानूनि पूर्ण । अहोरात्र सावधान । होओनि येथेंची वसावें. ॥ १४४ ॥ पुरोचनासी विश्वास । विशेष दावणें दिवसेंदिवस, । त्याचिया कपटाचा अंश । नेणें ऐसा दावणें. ॥ १४५ ॥ घेऊनि [7]भोळिवेची [8]बुंथी । आपणा रक्षिजे सावधवृत्ती । वैरियांसि तरावें सुमती ! । बुद्धिबळें आपुलिया. ॥ १४६ ॥ विवरद्वारा करूनि वाट । [9]सेखीं पुरोचनासगट । गृहा लावूनि [10]हव्यवाट । साहीजणीं निघावें. ॥ १४७ ॥ ईश्वर साधु ऋषीश्वर । भीष्मद्रोणा थोर थोर । कौरवांच्या कपटाचार । प्रगट दृष्टी दावणें. ॥ १४८ ॥ दुष्ट दुरात्मे विश्वासघाती । धार्तराष्ट्र पापमूर्ती । ऐसें सकळांचे प्रतीती । मानें तैसें करावें. ॥१४९॥ साक्षी असतां साधुजन । सात्विकां वाटतें कल्याण । दुर्जन पावती अकल्याण । हें निश्चयें जाण पां.' ॥ १५० ॥ ऐसें बोलोनि [11]पांडवाधीश । पुरोचनासीं अतिविश्वास । दावूनियां गृहप्रवेश । करिता झाला संतोषें. ॥ १५१ ॥ विवेकविषाददशायुत । घृतशर्करापायसयुक्त । सेवितां भोजनीं झाले तृप्त । म्हणती 'निर्विघ्न राजया.' ॥ १५२ ॥ धेनु वस्त्र बहु दक्षिणा । इच्छेनें देतां बहु ब्राह्मणा । तोषले, देती आशीर्वचना । '[12]रिपुक्षयोऽस्तु' म्हणोनी. ॥ १५३ ॥ करून पारधीचें मिष । वनोपवनीं लोटिती दिवस, । रात्रीं सावध पांचही पुरुष । हरिकीर्तनीं जा-

---

१. प्रत्ययाला, अनुभवाला. २. 'विनती ऐक समर्था' असा अन्य पाठ. ३. अध्याय १४६ श्लोक ३० पहा. ४. याच गृहांत वास केला पाहिजे असें म्हणतो. ५. आम्ही युक्ति (जतुगृहाची) जाणणारे नव्हे असें शत्रु मानतात, तेंच खरें आहे असें दाखविलें पाहिजे. ६. वांकडा. ७ भोळेपणाचें ८. आच्छादन. ९. अखेरीस. १०. अग्नि. ११. धर्मराज. १२. शत्रुक्षय असो.

गती. ॥ १९४ ॥ वर्षपर्यंत ऐसिया रीती । जातुषालयीं[1] केली वस्ती । पुढें वर्तलें तें नृपती । जन्मेजया! परियेसीं. ॥ १९५ ॥ इति श्रीभारत आदिपर्वणि । सभाग्य श्रोतयां तीर्थपर्वणी । प्रयाग मुक्तेश्वराची वाणी । मन सुस्नात व्हावया. ॥ १९६ ॥

अध्याय छत्तिसावा.[2]

अयनद्वय[3] सावधानें । जातुषालयीं कुरुनंदनें । वास्तव्य करितां, पुरोचनें । परम आल्हाद मानिला. ॥ १ ॥ कौरवांचे अपराध सर्व । विसरोनि, विसरले पांडव । आमुचे अपायाचें नांव, । नाहीं अळुमाळ ठावुकें. ॥ २ ॥ दुर्योधनें कथिलें शब्दीं । तें कार्य साधूं ऐसिये संधीं । विलंबीं घालितां, कुबुद्धी[4] । 'अनाप्त' मातें म्हणतील. ॥ ३ ॥ संकेत होतांचि अळुमाळ । गृहीं प्रदीप्त करूं अनिळ[5] । इतुकेनि क्षेम[6] झालें सकळ । जेंवी आरोग्य रोगिया. ॥ ४ ॥ मग भूपाळ दुर्योधन । तैसाच विभागी[7] मी पुरोचन । देवेंद्रपदा समसमान । सुख भोगूं इहलोकीं.' ॥ ५ ॥ ऐसें विचारूनि दुष्ट । पाहे कौरवाज्ञेची वाट,। येरीकडे भाग्य श्रेष्ठ । पांडवांचें परियेसा. ॥ ६ ॥ ध्याना येऊनि कृष्णमूर्ती । उपायबोध करी विदुराचित्तीं, । '[8]पांडव पाडावया पावकावर्तीं[9] । अपाय दृष्टी रचिलासे. ॥ ७ ॥ धरा[10] करावया भारातीत[11] । अवतरलों मी श्रीअनंत । जन्मलों यादवकुळा आंत । हें तूं एक जाणसी. ॥ ८ ॥ यालागीं अत्यंत विश्वासिक । शीघ्र प्रेरिला पाहिजे खनक[12] । ज्यातें प्रगट नोळखे लोक । जेंवी प्राकृत[13] सिद्धांतें[14]. ॥ ९ ॥ निर्दाळावया कौरवांतें । त्यांचे अपराध निमित्त त्यांतें । करणें आहे निश्चयातें । वर्म तूतें कळलेंसें. ॥ १० ॥ यालागीं खनकाचिये करीं । मार्ग रचोनि विवरद्वारीं । रात्रींतूनि न्यावे देशांतरीं । असंख्यात योजनें. ॥ ११ ॥ प्राप्त झालिया विषम स्थळें । रक्षिजेल म्यां गोपाळें । पुढें प्रगट होतील काळें । कृपाबळें माझिया. ॥ १२ ॥ विजयलक्ष्मी [15]ओपूनि

---

१. लाक्षागृहीं. २. या अध्यायास 'पांडवजातुषालयप्रवेश' अशी संज्ञा जुनाट हस्तलिखित पोथींत आहे. यांत मूळांतील १४२-१४६ ह्या पांच अध्यायांचा समावेश केला आहे. ३. दोन अयनें=एक वर्ष. ४. दुर्योधनादिक दुष्टमति. ५. अग्नि. ६. कल्याण. ७. ऐश्वर्यविभागी. ८. या कृष्णोक्तीस मूळांत आधार दिसत नाहीं. ९. अग्नीच्या भोंवऱ्यांत. १०. पृथ्वी. ११. भारहीन. १२. खणणारा. १३. सामान्य पुरुष. १४. ज्याला अणिमादिक आठ सिद्धि प्राप्त झाल्या अशा पुरुषातें. १५. समर्पून.

त्यांतें । उणें आणीन वैरियांतें । यालागीं प्रेरीं खनकातें । मनोवेगीं सुमित्रा!' ॥ १३ ॥ मानसपूजा करितां ध्यानीं । हृदयनिवासी चक्रपाणी । बुद्धिबोधक उन्मेषदानीं । प्रेरक झाला अनंत. ॥ १४ ॥ विदुरें उघडोनियां नेत्र । परोपकारी अतिपवित्र । खनक आपला प्राणमित्र । बोधूनि वेगें प्रेरिला. ॥ १५ ॥ जातां म्लेंच्छभाषावचनें । विदुर बोलिला आपुल्या वदनें । तोचि पुढें प्रेरूनि खुणें । निरोप धर्मा धाडिला. ॥ १६ ॥ तो निर्लोभ परम साधू । विष्णुभजनीं सदा सावधू । वंदूनि धार्मिकाचा[1] शब्दू । धर्माप्रती पातला.[2] ॥ १७ ॥ दर्शन घेतलें एकांतीं । क्षेमालिंगनीं समान प्रीती । सार्थक विदुराच्या उक्ती । धर्माकर्णीं सूदल्या.[3] ॥ १८ ॥ अत्यादरें युधिष्ठिरू । म्हणे 'तूं मार्ग दाविता गुरू । दुष्टसंकटकष्टांधकारू । तें निस्तरणें तुझेनीं. ॥ १९ ॥ हृदयीं आम्हुची आवडी असे । त्यावरी विदुराज्ञा विशेषें, । आतां कर्तव्य तें अनालस्यें । संपादिलें पाहिजे.' ॥ २० ॥ 'अवश्य' म्हणोनि विश्वासनिधी । अंतर्गृहाचेनि गूढसंधीं[4] । सुरंग चालविला कुशळबुद्धी । पाताळपंथासारिखा. ॥ २१ ॥ द्वारीं लाविलें गुप्त कपाट । सहस्रनयना नव्हे प्रगट । जेंवि अनुभवी कळाविकट । वेदशास्त्रा न लक्षे. ॥२२॥ गर्भागारीं प्रगटे नीर[5] । तंववरी निर्मिला कूप थोर । तेथूनियां आडवें विवर । दक्षिण दिशे चालविलें.॥२३॥ वारुणावत सांडोनि दुरी । सप्त योजनें वनगव्हरीं[6] । तोंड उघडूनियां द्वारीं । प्रचंड शिळा लाविली. ॥ २४ ॥ धर्मा भीमा धरोनि करीं । मार्ग दाविला सेवटवरी । म्हणे, 'निर्गम[7] झालियावरी । मार्ग मोडोनि सांडावा. ॥ २५ ॥ कृष्णचतुर्दशीचे[8] रजनीं । पुरोचन गृहा लावील वन्ही.' । ऐसी सूचना सांगूनि गुणी । खनक गेला स्वस्थाना. ॥ २६ ॥ तोचि आठव धरूनि चित्तीं । पांडव वर्तती सावधवृत्ती । पुरोचनाची काळतिथी[9] । प्राप्त झाली स्वभावें. ॥ २७ ॥ ते कृष्णचतुर्दशीचिये दिनीं । दानोद्देश[10] मानोनि मनीं । द्विजवर्य द्विजेंद्रपत्नी । आमंत्रिल्या भोजना. ॥ २८ ॥ अयुतब्राह्मण सहित वनिता[11] । वस्त्राभरणीं शृंगारयुक्ता । भोजनें तृप्त केल्या, सरिता[12] । मेघवृष्टिनें ज्यापरी. ॥ २९ ॥ स्तवनीं तोषवुनि कुंती । सर्व गेलीं स्वस्थळाप्रती, । तंव पंच अपत्यें धरूनि हातीं । निषादी[13] एक पातली. ॥ ३० ॥ प्रेरिलें असतां मृत्युकाळें । घेऊनि पातली पांचै

---

१. विदुराचा. २. पावला, प्राप्त झाला. ३. घातल्या. ४. गुप्तभागीं. ५. उदक. ६. गुहेंत. ७. बाहेर निघणें. ८. अध्याय १४७ श्लोक ४ पहा. ९. मरणदिवस. १०. दान करण्याचा हेतु, दानापदेशानें. ११. स्त्रिया. १२. नद्या. १३. निषादजातीची स्त्री.

बाळें, । भोजन मागतां स्नेहाळें । दे आदरें यादवी[1]. ॥ ३१ ॥ इच्छाभोजनें करूनि तृप्त, । मद्यपानें झाली मत्त, । निशाकाळीं पुत्रांसहित । कुंतीगृहीं पे[2]-हुडली. ॥ ३२ ॥ पुरोचन कुटिल कुमती । भोजन सारी[4] धर्मपंक्ती, । 'पांडव जाळूं आजचे राती' । निश्चय चित्तीं केलासे. ॥ ३३ ॥ विचार विवरी[3] अंतः-करणीं । चतुर्थ प्रहरीं लावणें वन्ही । चित्रशाळे मंचकासनीं । प्रथमप्रहरीं पहुडला. ॥ ३४ ॥ रात्र लोटली द्वादशघटिका । भीमसेनें घेऊनि उल्का[5] । प्रथमद्वारदेशीं देखा । प्रतिष्ठिला[6] हुताशन[7]. ॥ ३५ ॥ पुरोचन पहुडला जये-स्थानीं । तेथें सभोंवता लाविला वन्ही । मग गृहाचे चहूंकोनीं । ज्वाळमाळा प्रज्वळल्या. ॥ ३६ ॥ स्पर्श होतांचि अळुमाळ[8] । धडधडाटे उठला ज्वाळ । अंतर्गृहीं लावूनि अनळ[9] । उल्का तेथें टाकिली. ॥ ३७ ॥ तैलदीपिका धरोनि त्वरित । कपटद्वार केलें मुक्त । पुढती निरोधिलिया[10] पंथ । मोडावया पावकें. ॥ ३८ ॥ बंधु माता धरूनि करीं । साहीजणें रिघालीं[11] विवरीं । मागें पुढें धीरोत्तरीं । सांभाळीत चालिले. ॥ ३९ ॥ गुप्तपंथीं क्रमूनि कुहर[12] । मुहूर्तामाजि टाकिलें द्वार । हृदयीं स्मरूनि यादवेश्वर । दीपिका तेथें विझविली. ॥ ४० ॥ बिळद्वारींच्या पाषाणें । मार्ग मोडिजे लोटितां चरणें । जन्म पावलीं साहीजणें । पृथ्वीगर्भापासूनी. ॥ ४१ ॥ बिळद्वारीं झाडितां लात । गुहा झाली पाषाण-भरित । विवर ना तो विवरपंथ । समसमान धरित्री. ॥ ४२ ॥ लाखाजोहरा[13]-पासूनि त्वरित । ऐशियापरी परमभक्त । कडे पडिले समर्थ, । कृपा कृष्णरायाची. ॥ ४३ ॥ येरीकडे पुरोचन । निद्रिस्त असतां, हुताशन[14] । लागला तेणें दडपोन । पतंगप्राय[15] भस्मला. ॥ ४४ ॥ गृहीं पेटला प्रळयाग्नी । जेंवी पुच्छाग्नी लंकाभुवनीं । घोर सुसाट लागतां गगनीं । नगरलोक चेइले[16]. ॥ ४५ ॥ जेथें ज्वाळांचा धडधडाट । वंशकाष्ठांचा तडतडाट । लाख जळतां भडभडाट । कुवास व्योमीं दाटला. ॥ ४६ ॥ पंचपुत्रांसह नि[17]-षादी । दुष्ट पुरोचन पापबुद्धी । भस्म झालीं जातवेदीं[18] । नगरलोकीं नेणिजे. ॥ ४७ ॥ कोट्यानकोटी शंखध्वनी । हाहाकारें गर्जिजे जनीं । ब्रह्मांड ग्रासी

---

१. कुंती. २. निजली. ३. करी, उरकी. ४. धोळी. ५. जळतें लांकूड. ६ लाविला, स्थापिला. ७. अग्नि. (अध्याय १४८ श्लोक १० पहा.) ८. किंचित्. ९. अग्नि. १०. अडविला. ११. शिरलीं. १२. बिळ, गुहा. १३. जातुषाग्नीपासून. [जोहार=ज्योतिर्धर, अग्नि.] १४. अग्नि. १५. शलभासारखा. ['पतंगः शलभे शालिप्रभेदे पक्षिसूर्ययोः' इति सुधा.] १६. जागे झाले. १७. कोळीण. १८. अग्नींत.

ऐसा वन्ही । दिसे भ्यासुर[1] क्षोभला. ॥ ४८ ॥ लोक रोदना करिती दुःखें । कौरवांतें[2] निंदिती मुखें, । भूमीं हाणिती मस्तकें, । एक हृदय पीटिती. ॥४९॥ 'लाक्षागृह रचूनि कपटें । पांडव जाळिले दुष्टनष्टें । धृतराष्ट्रा ! हें पाप मोठें । तुझें फळेल तुजलागीं. ॥ ५० ॥ पांडव होमिले जया अनळा[3] । तो वन्ही लागो तुझिया कुळा । पुत्रशोकाच्या महाज्वाळा- । माजी पडसी, पापिष्टा!' ॥ ५१ ॥ ऐसें विलपती[4] पुरुष नारी । आपुलालिया गृहगोपुरीं[5] । उभे ठाकूनि, निशा[6] थोरी । परमकष्टें लोटिती. ॥ ५२ ॥ येरीकडे युधिष्ठिर । सवें माता माद्रीकुमर । अंगीं निद्रेचा अतिभार । तेणें गात्रें न चलती. ॥ ५३ ॥ भीमसेन पाहे दृष्टी, । तंव अंधकारें कोंदली[7] सृष्टी । गुल्म[8]लता वृक्षदाटीं । तृणें मार्ग लक्षेना. ॥ ५४ ॥ निशाचरी[9] श्वापद पक्षी । थोर गर्जना करिती कक्षीं[10] । वोळंबलीं[11] महावृक्षीं । आस्वलें आणि वाघुळें. ॥ ५५ ॥ वनदेवता यक्षिणी- पाळें । धुमस घालिती गंदारोळें[12] । दीपिका लावूनि भंबाळें । गुप्त होती एकसरा[13]. ॥ ५६ ॥ प्रेतगण[14] स्मशानवाशी । रूपें धरूनि भ्यासुर[15] वेषीं । छळिती अशुची[16] मानवांसी । झोंबती[17] मांस भक्षावया. ॥ ५७ ॥ दिवाभीतांचे धुंघाट । पिंगळियांचे[18] किलकिलाट[19] । भालू भुंकती सैरांट[20] । टिटिवे थोर टिवटिवती. ॥ ५८ ॥ चक्रवाकांचे आर्तस्वरीं । कुमुदीं[21] भ्रमरांचे झुंकारीं । मस्तकमणीतेज[22]- विखरीं । जीव[23] आहारा शोधिती. ॥ ५९ ॥ चारिया निघोनि निधानें । धगधगीत प्रकाशमानें । ईश्वरकृपेस्तव पूर्वपुण्यें । येवों म्हणती सभाग्या. ॥ ६० ॥ असो. हे निशा दाटली काळी । जेंवी काळपुरुषाची कांबळी । ब्रह्मांडदेवतेवरी सगळी । पांघुरविली आसत्वें. ॥ ६१ ॥ ऐसें देखोनि तयेकाळीं । भीमसेन बळियाबळी, । धैर्यकास[24] घालूनि कवळी । पांचांतेंही एकला. ॥ ६२ ॥ खांदीं वाहूनियां जननी, । कडिये माद्रीकुमर दोनी, । धर्मार्जुना बाहुस्थानीं । पाणितळें कवळिलें. ॥ ६३ ॥ पाठी देऊनि ध्रुवमंडळा । अगस्तिचक्रा लक्षूनि डोळां । वामीं[25] कृत्तिकांचा मेळा । याम्यदिशे[26] चालिला. ॥ ६४ ॥ पवनवेगें

---

१. भयंकर. २. अध्याय १४८ श्लोक १४-१६ पहा. ३. अग्नि. ४. रडती. ५. घराच्या दरवाज्यांत. ६. रात्र. ७. दाटली. ८. झाडी. ९. राक्षसी. १०. गवतांत. ११. लटकलीं. १२. मोठ्यानें, मोठी आरोळी मारून. १३. एकदम. १४. पिशाचसमूह. १५. भयंकर. १६. अपवित्र, पापी. १७. 'मारिती मांसभक्षणा' असा अन्य पाठ. १८. पिंगळा हा एक पक्षी आहे. १९. किलबिलाट. २०. सैर, स्वच्छंदानें. २१. कमळांत. २२. मस्तकमण्यांचा प्रकाश पसरून. २३. प्राणी. २४. धैर्याची कांस. २५. डाव्या बाजूस. २६. दक्षिणदिशेस.

[1]पवनात्मजू । दक्षिणदिशे निघाला उजू । जैसा मातला महागजू । कर्दळीवना विभांडी[2]. ॥ ६५ ॥ झडपाआड मोडीत झाडें । तळवा चूर्ण करीत धोंडे । श्वापदसर्पांचीं [3]झुंबाडें । पायांतळीं रगडीत. ॥ ६६ ॥ भीमसेनाचा अंगवायो । सुटतां सिंह शार्दूळां प्रळयो, । म्हणती 'वना करावया क्षयो । काय अद्भुत पातलें.' ॥ ६७ ॥ शेषें[4] वेचतां अठरा घटिका, । पूर्वदिशेनें [5]क्षाळिलें मुखा । [6]कुंकुम रेखिलें त्या तिलका । अरुणोदय बोलिजे. ॥ ६८ ॥ [7]भार्गवाचार्य उदया येत । तंव अपार क्रमूनियां पंथ । पुढें जान्हवीजळाचा वात । शीतळ मंद पातला. ॥ ६९ ॥ हस्त आवरितां, कुमुदीं । अवमान मानिला [8]षट्पदीं । त्यांतें आदरें [9]कोकनदीं । पाचारिले जवळिके. ॥ ७० ॥ कुक्कुटरव करितां काका । भयें पळ सुटला [10]उलूकां । भोग द्यावया चक्रवाकां । [11]चक्रवाकी चालिल्या. ॥ ७१ ॥ गाढालिंगनें पडली गांठी । सोडितां दंपत्यें होती कष्टी । वस्त्रें वेढिती, परी पोटीं । अपूर्णकामें [12]जळजळ. ॥ ७२ ॥ स्वैरिणी सांडोनि सखयांतें । दूतीसहीत त्वरें बहुतें । गृहा येऊनि स्वकर्मातें । संपादिती लौकिका. ॥ ७३ ॥ वेश्यागारा सोडूनि विटें[13] । लोकाचारा मिनले निकट, । [14]वामी [15]कौळिक धूर्त शठ । वेष घेती शिष्टांचे. ॥ ७४ ॥ [16]तस्करीं सांडिलें तस्करकार्या, । [17]अभिचारिकीं [18]कौटाळक्रिया । जारण मारण मोहन यया । प्रेतपूजा स्मशानीं. ॥ ७५ ॥ वेऊनि अंधकाराची [19]बुंथी । चंद्र [20]स्वेच्छा भोगी [21]जगती । प्रकाश वेढोनि सूर्याप्रती । म्हणे, 'मी शुद्ध [22]पतिव्रता.' ॥ ७६ ॥ भोग भोगूनि सांडिले राजे । [23]नूतनातें उपजवी लाजे । भ्रम घालूनि म्हणे, 'माझें । असें ऐश्वर्य अक्षयी.' ॥ ७७ ॥

---

१. भीम. २. मोडी, पराभवी. ३. समुदाय. ४. अवशिष्ट काळ. ५. धुतले. ६. केंशर. ७. सूर्य. ८. भ्रमरीं. ९. लाल कमलांनीं. १०. घुबडांस. ११. चक्रवाकपक्ष्यांविषयीं प्राचीन कवींचा असा समज दिसतो कीं, हे पक्षी जोड्यानें फिरतात, संध्याकाळ झाला म्हणजे यांतील नरमादीची तुटातुट होते, व सर्व रात्र वियोगानें दुःख पावतात, व सूर्योदय झाला म्हणजे त्यांची भेट होते. हे पक्षी जलाशयाच्या आश्रयानें राहतात. १२. असंतोष, असमाधान. १३. जार. १४. वाममार्गी. १५. शक्त्युपासक, शाक्त. १६. चोरीं. १७. अभिचारिक=अभिचार (करणी, चेटुक) करणारा, भुताटक्या, वीरमंत्री. १८. कपटी, खोटी, वांकडी करणी. १९. बुरखा, आच्छादन. २०. यथेच्छ. २१. पृथ्वी, २२. पति हेंच व्रत जिचें ती पतिव्रता. पतिव्रतेचें लक्षण:— 'आर्तार्ते मुदिते हृष्टा प्रोषिते मलिना कृशा । मृते म्रियेत या पत्यौ सा स्त्री ज्ञेया पतिव्रता ॥.' २३. नूतन राजातें.

गगनसमुद्रीं मुक्ताफळें । अरुणचंचुनें कनकम[1]राळें । वेंचूनि घेतां कळाकुशळें । नाहींच केलीं नक्षत्रें. ॥ ७८ ॥ कीं व्योमनर्मदेमाजी थोर । [2]कार्तवीर्य सहस्र-कर । ताराबाणलिंगाचा भार । निवटोनि करी परौता. ॥ ७९ ॥ [3]कापडी चालिले तीर्थपंथें । 'सोऽहंमस्मि'[4] चिंतिती ज्ञाते, । भक्त स्मरती हरिहरांतें । प्रेमभावें आवडी. ॥८०॥ [5]शाक्त चिंतिती शक्तिप्रतिमा, । [6]सौर म्हणती सूर्यचि आत्मा, । [7]गाणपत्य गणेशमहिमा । वाखाणिती ब्रह्मत्वें. ॥ ८१ ॥ प्रातर्होम द्यावया जाणा । अग्निहोत्री उठले स्नाना । एक सिद्ध झाले अनुष्ठाना । जपी तपी [8]सुनेमें. ॥ ८२ ॥ असो. मागें वारणावतीं । उदया येतां [9]पद्मिनीपती, । दग्धगृहा वेष्टिती पंक्ती । पौरयांच्या दाटल्या. ॥ ८३ ॥ गृहगोपुरेंसहित भिंती । जळोनि समान झाली [10]क्षिती । विवरद्वारीं भरली माती । कोणातेंही लक्षेना. ॥ ८४ ॥ निषादी पुत्र पुरोचन कुमती । भस्मला त्याच्या देखिल्या अस्थी, । जनीं निश्चय मानिला चित्तीं । पांडवांच्या म्हणोनी. ॥ ८५ ॥ आठवूनि पांडवांची गुण कीर्ती । खेद समान सकळां चित्तीं । [11]दुःखवार्ता दूतांहातीं । हस्तनापुरीं पाठविली. ॥ ८६ ॥ 'पांडव जळाले [12]जातुषालयीं । [13]कृतकृत्यता मानूनि हृदयीं, । धृतराष्ट्रा! सुखी होईं । शल्य तुटलें म्हणोनी. ॥ ८७ ॥ [14]सोम सूर्य गगनसूत्रीं । फिरती तोंवरी पुत्रपौत्रीं । भोगीत राहें [15]धरित्री । काळसर्पासारिखा. ॥ ८८ ॥ पांडव दग्धले तुमचे यत्नें । पुरोचन नेणो कोणे कारणें.' । ऐसी वार्ता ऐकतां जनें । हस्तनापुरीं आक्रांत. ॥ ८९ ॥ पुत्र[16]निधन पडतां श्रवणीं । हाहाशब्द करूनि वदनीं ।

---

१. हंसें. २. कार्तवीर्य=हा माहिष्मती नगरीचा राजा. यास हजार हात होते म्हणून सहस्रार्जुन असेंही म्हणतात. यानें जमदग्नि मुनीची धेनु बळजोरीनें नेली म्हणून जामदग्न्य परशुरामानें यास ठार मारलें. हा राजा श्रीदत्तात्रेयोपासक होता. माहिष्मती म्हणजे विद्यमान महेश्वर शहर होय. ३. यात्रेकरू, प्रवासी. ४. प्राणी गर्भात असतो तोंपर्यंत 'सोऽहं' म्हणजे 'मी ईश्वर आहें' असें म्हणतो, जन्मास आला म्हणजे 'कोऽहं' म्हणजे 'मी कोण आहें' असें म्हणतो, आणि पुढें मोठा होऊन त्यास समजूं लागलें म्हणजे 'अहं' म्हणजे 'मीच काय तो आहें' असें म्हणतो, म्हणजे ईश्वरास विसरतो. (नवनीत.) ५. शक्तिभक्त. ६. सूर्योपासक. ७. गणपतिभक्त. ८. हें अरुणोदयाचें वर्णन (ओंव्या ६८-८२) मुक्तेश्वराच्या पदरचेंच आहे. यांत मुक्तेश्वराचें सृष्टिवर्णनकौशल्य समुज्ज्वलित झालें आहे. या अरुणोदयवर्णनांत जें कांहीं मनोरम आणि हृदयंगम असें आहे तें सर्व कविप्रतिभेचें फळ होय. ९. सूर्य. १०. जमीन. ११. अध्याय १५० श्लोक ९ पहा. १२. जातुष=लाखेचें, आलय=गृह. ['ष'प्रत्यय लागून विशेषणें होतात; जतु—जातुष, त्रपु—त्रापुष (कथिलाचें).] १३. सार्थक्य, सफलता. १४. चंद्र. १५. पृथ्वी. १६. मरण.

[1]प्रज्ञाचक्षु पडला धरणीं, । हृदय हस्तें पिटीत. ॥ ९० ॥ म्हणे, 'प्रिय प्राणापरता । **पांडु** माझा सहोदर भ्राता । आजि [2]निमाला ऐसा चित्ता । खेद वाटे अपार. ॥ ९१ ॥ अवलोकोनि हे **पांडव** । बंधुवियोगशो[3]कार्णव । प्राशून झालों [4]कुंभोद्भव । वज्रहृदयी पापात्मा. ॥ ९२ ॥ [5]सेखीं पांचही कुळदीपक । अस्ता पावले जैसे [6]अर्क । शून्य पडले तीन्ही लोक । तैसें आजी मज वाटे. ॥९३॥ **भीष्म द्रोण कृप बाल्हिक** । शोकें स्पर्शले एकएक, । दुर्योधनादी करिती शोक । सत्य मिथ्या नेणवे. ॥ ९४ ॥ सकळ प्रजा करिती रोदन, । म्हणती, '**पां**डव पंचप्राण । गेले, यास्तव दुःख दारुण । मरणातुल्य आमुतें.' ॥९५॥ एक आठविती **धर्मा**, । एक म्हणती बळिया **भी**मा, । एक **अर्जुन** नरेंद्रोत्तमा, । एक **न**कुळसहदेवा. ॥ ९६ ॥ दुर्योधनादी कृत्रिमक्लेशें । म्हणती, '**विदुरा**! झालें कैसें?' । येरू विलपे, कांहीं हांसे, । म्हणे, '[7]नश्वर सर्वही. ॥ ९७ ॥ नवल नव्हे नृपाळा! । काय काय देखणें पडेल डोळां । ईश्वरेच्छा अलोट काळा । नये सहसा विश्वासों. ॥ ९८ ॥ एकाआधीं एकापाठीं । प्रत्यक्ष नाश देखिजे दृष्टीं । हे मृत्युलोकींची राहाटी । कोण अक्षयी उरलासे? ॥ ९९ ॥ गेलें [8]अंतवंत म्हणावें । दिसतें साच केंवि मानावें? । संसारस्वप्नींचे [9]रांणिवें । भुलों नये सर्वथा.' ॥ १०० ॥ [10]**सौं**बळीसहित सुना सकळी । **धृ**तराष्ट्र गोत्रजमेळीं । स्नान करूनी **गं**गाजळीं । [11]उदकक्रिया सारिली. ॥ १०१ ॥ धेनु वस्त्रें रत्नें कनकीं । बहु दक्षणा स्वहस्तकीं । संतुष्ट व्हावया परलोकीं । **पां**डवोद्देशें देतसे. ॥ १०२ ॥ **वा**रणावता धाडोनि आप्त । म्हणे, 'दग्धले **पां**डव जेथ । वापी [12]कूपे आराम तेथ । अति सुरम्य निर्मावे. ॥ १०३ ॥ बिल्व अश्वत्थ तुळसीवनें । चैत्यवेदिका वृंदावनें । मठ मठिका देवतायतनें । मनोहर निर्मावीं.' ॥१०४॥ येरीकडे दुस्तरवनीं । उदया येतां [13]वासरमणी । **पां**डवीं काय केली करणी । ते सुकर्णीं आकर्णा. ॥१०५॥ पावले **दे**वगंगेचें [14]कूळ । सागरातुल्य अगाध जळ । विचित्र [15]कल्लोळ खळाळ । आवर्त भोंवरे भोंवताती. ॥ १०६ ॥ [16]शुशुमार नक्र मत्स्य [17]कच्छप । तळपतां गगनीं उसळे [18]आप । देखोनि संतोष,

---

१. धृतराष्ट्र. २. मेला. (अध्याय १५० श्लोक ११ पहा.) ३. दुःखसागर. ४. अगस्त्यमुनि. ५. शेवटीं. ६. सूर्य. ७. क्षणभंगुर, अशाश्वत. ८. नाशवंत. ९. राज्य. १०. गांधारी. [गांधारदेशाधिप सुबळ त्याची कन्या सौंबळी.] ११. उत्तरक्रिया. १२. अध्याय १५० श्लोक १२-१३ पहा. १३. सूर्य. १४. तीर. १५. लहरी, लाट. १६. जलचरविशेष. याला 'शिरस' असें म्हणतात. १७. कासव. (कच्छानें—मागच्या भागानें पिणारा—असा शब्दार्थ.) १८. उदक.

चिंता अल्प । भीमहृदया झगटली. ॥ १०७ ॥ गंगादर्शनसुकृतजोडी । परी उतरावयाची अति सांकडी[1] । जाणें असे अतितांतडी । कुरुदेशातें लंघुनी. ॥ १०८ ॥ पूर्व पश्चिम गंगातीर । द्विवार करितां येरझार[2] । अकस्मात कर्ण-धार[3] । साहीजणीं देखिला. ॥ १०९ ॥ विदुरें बोधोनि गुह्यार्थ । मार्गी धाडिला नौकेसहित, । तो पूर्वींच येऊनि तेथ । वाट पाहात तिष्ठतसे. ॥ ११० ॥ साहीजण देखतां दृष्टी । वेगें पातला धर्मानिकटीं । नमस्कारूनि कर्णपुटीं । निरोप सांगे विदुराचा. ॥ १११ ॥ 'यवनभाषेमाजील अर्थ । खनक बोलिला जो गुह्यार्थ । तोचि मानून संकेत । विश्वास येथें धरावा. ॥ ११२ ॥ परिहारूनि पावकव्यसन[4] । दक्षिणपंथें पांचहीजण । येतील त्यांलागीं नौकायान । पाठविलें मजहातीं. ॥ ११३ ॥ वारुणावत सांडोनि राती । निरुते[5] येतील दक्षिणपथीं । तुवां जाऊनि सत्वरगती । मार्ग निरुती रक्षावा. ॥ ११४ ॥ विदुरआज्ञा अति समर्थ । यावरी तुमच्या ठायीं आर्त[6] । यालागीं येऊनियां येथ । भवदागमन[7] विलोकीं.' ॥ ११५ ॥ ऐसें बोलोनि अमृतवचनें । नौके वाहिलीं साहीजणें । अवलोकोनि अर्धक्षणें । पैलपारा आणिलीं. ॥ ११६ ॥ धर्में देतां आलिंगन । अश्रुधारा स्रवती नयन, । म्हणे, 'तुझा उपकार पूर्ण । येणें जन्में न विसरों. ॥ ११७ ॥ जेणें जन्मवरी प्रतिपाळिलें । दिव्यमंत्रातें उपदेशिलें, । संकटीं प्राणातें रक्षिलें, । आणि पोसिलें दुर्भिक्षीं. ॥ ११८ । जळतां राखिलें वैश्वानरीं[8] । बुडतां तारिलें महापूरीं । त्यातें विसरे तो अघोरीं । नरकीं पडे दुरात्मा. ॥ ११९ ॥ कृतघ्नदोषें दोषभरित । आपुल्या कोटिकुळांसहित. । जोंवरी तपती चंद्रादित्य[9] । तोंवरी पचे रौरवीं[10]. ॥ १२० ॥ एकला एक कळाकर्म । ज्ञान करितो सद्गुरु परम, । एक संकट करितो सुगम । तोही गुरु मानावा. ॥ १२१ ॥ वैरी साधितां, कैवारू[11] । एकवेळ करी तोही गुरू, । एक दोषाचा परिहारू । करी तो गुरू मानावा. ॥ १२२ ॥ एक दोन पांच सात । केले उपकार करी व्यर्थ । तो चांडाळयोनी आंत । जन्म पावे

१. संकट, अडचण. २. येरझार=येरजार, येरधार, (येरे+जारे), व्यर्थ जा ये करणें. ३. नावाडी. (कर्णं धरतीति कर्णधारः=नाविकः) कर्णधार हें उपपदसमासाचें उदाहरण आहे. ज्या समासांत उत्तरपद कर्तृवाचक धातुसाधित नाम (अथवा नामार्थक) असतें त्या समासास 'उपपदसमास' म्हणतात; जसें–कुंभकार, पादप, गृहस्थ, हव्यवाह इत्यादिक. ४. अग्निसंकट. ५. स्पष्ट. ६. आवड, प्रेम. ७. तुमचें येणें. ८. अग्नींत. ९. आदित्य=सूर्य. १०. नरकांत. ११. पक्षपात, साहाय्य.

निर्धारें[1]. ॥ १२३ ॥ यालागीं रक्षिता **यदु**नायक । खनक आणि तूं नाविक । चौथा **पांडु** आमुचा जनक । चौघे समान आमुतें.' ॥ १२४ ॥ नाविक म्हणे[2], 'हें बोलणें । भेद कल्पून दुरावणें । एके शरीराचे कारणें । काय उपरोध मानिजे[3]? ॥ १२५ ॥ मनीं चिंतिजे जया ठाया । तेथें जाणें घडे पाया । तो उपकार मानूनियां । काय चरणा वर्जिजे[3]? ॥ १२६ ॥ पायां लागोनि स्नेहाळ । उपानह[4] चुकवी कंटक होरळ[5] । तो आभार मानूनि कुशळ । काय हृदयीं कवळिजे[3]? ॥ १२७ ॥ आम्हीं सेवकीं करावी सेवा । येथें उपकार कायसा[3]? देवा! । आतां लोभ असों द्यावा । जाणें[6] असे गुप्तत्वें.' ॥१२८॥ चरण वंदूनि मस्तकें । जाता झाला सहीत नौके, । मग साहीजणीं देखें । **गंगा**स्नानें सारिलीं. ॥ १२९ ॥ स्कंधीं वाहूनियां माये । जवळ बंधु घेतले कडिये, । **धर्मार्जुना** मार्ग सोये । दाखवीत चालिला. ॥ १३० ॥ निबिड[7] दाटलेंसे वन । जेंवी भूतळा पातले घन[8], । भेदीत चालिला **भीम**सेन। पवनपुत्र म्हणोनी. ॥ १३१ ॥ गगनचुंबी वाढले वृक्ष । असंख्य श्वापदांचे लक्ष, । दिनकरकिरणांतें गवाक्ष[9] । शिरावया दिसेना. ॥ १३२ ॥ निर्भयपणें करीत वाट । त्वरें जातसे वीर वरिष्ठ, । सरिता माळ, माथेघाट । पर्वतांचे लंघिती. ॥१३३॥ विसांवा न घेतां अर्धक्षण । न सेवितां फळ मूळ [10]जीवन, । सप्तप्रहरपर्यंत जाण । मार्ग अपार सारिला. ॥ १३४ ॥ संपूर्ण लोटोनियां दिवसा । यामत्रय[11] क्रमिली निशी[12], । यावरी **कुंती**च्या मानसा । तृषा अपार लागली. ॥ १३५ ॥ म्हणे[13], '**भीमा**! मेळवीं उदक । बहुसाल श्रमले हे बालक, । आतां बैसोनि नाविक[14] । दे विसांवा बंधूंतें'. ॥१३६ ॥ 'अवश्य' म्हणोनि **वृकोदर** । लक्षिला न्यग्रोध[15] तरुवर, । सरळ शाखा मंडपाकार । छाया विशाळ तळवटीं. ॥ १३७ ॥ अफाट फांटे वरी खांदिया, । भूमी रुळती पारंबिया, । पक्क फळें सांडिलीं तयां । उपमा प्रवाळ[16]मणींची. ॥ १३८ ॥ वानर पक्षी अनेकवर्णी । वटीं [17]वसिन्नल्या वनयक्षिणी, । **भीमा** देखोनि बद्धपाणी[18] ।

१. निश्चयें. २. ही नाविकोक्ति मूळांत नाहीं, तेव्हां ही कवीच्या चातुर्याची साक्ष चांगली देते. ३. हे चारही प्रश्न काकर्थक आहेत. ४. पादुका. ५. खडा. ६. जावयाचें, जाण्याचें. ७. घन. ८. मेघ. ९. छिद्र. १०. उदक. ११. प्रहरत्रय. १२. रात्र. १३. अध्याय १५१ श्लोक १३-१४ पहा. १४. क्षणभर. १५. वड. (अध्याय १५१ श्लोक १५-१६.) १६. पोंवळ्यांची. १७. हासिन्नला, धाविन्नला, गर्जिन्नल्या, वसिन्नल्या इत्यादि रूपें केवळ कवितेंत आढळतात. हीं धातूस भूतकाळाचा प्रत्यय दोनदां लागून झालीं आहेत. १८. बद्धांजली.

अभय मागती वसावया. ॥ १३९ ॥ तेथें माता आणि अनुजें । स्वहस्तें निज-वूनि [1]तृणशेजे, । आपण उदकाचेनि काजें । महावन विलोकी. ॥ १४० ॥ तंव जळचर [2]पक्षियांचे शब्द । उत्तरदिशे ऐकिले विविध । तेथें आला, तंव अगाध । [3]जळकासार देखिला. ॥ १४१ ॥ घर्मे दाटली सुवर्ण तनु । स्नानें वोल्हावला [4]सुमतु । जळप्राशनें पंच प्राणु । विश्रांतितें पावले. ॥ १४२ ॥ अरण्य[5]क-दळीपर्णपात्र । निर्मूनि भरलें [6]तोय पवित्र. । विशेष मागुती उत्तरीयवस्त्र । आर्द्र करूनि घेतलें. ॥ १४३ ॥ पातला वटवृक्षानिकटीं । तंव पांचही लो-ळती [7]भूतळवटीं, । देखो आकांतला पोटीं । शोक करी आक्रोशें. ॥ १४४ ॥ म्हणे, 'विधातिया मूर्खा ! । काय रेखिली कर्मरेखा ? । आम्हां ऐशा अभाग्य पुं-रुखां । काय निमित्तें निर्मिलें ? ॥ १४५ ॥ कुंतिभोजाची [10]नंदिनी । वसुदे-वाची पवित्र [11]भगिनी । राया पांडूची वीरपत्नी । स्नुषा विचित्रवीर्याची, ॥ १४६ ॥ आम्हां पापिष्ठांची माता । जैंवी दीनभणगाची कांता । भूतळीं लोळे प्रेता-। तुल्य दिसे मज दृष्टी. ॥ १४७ ॥ सत्यशीळ पवित्र परम । पुण्यश्लोकामाजी उत्तम । धर्मस्वरूप राजा धर्म । कर्म भोगी केवढें ? ॥ १४८ ॥ ज्याचिये उपमे त्रिज-गती । भार्गवराम कीं [12]दाशरथी । तो हा अर्जुन वीर क्षिती । लोळे रंकासा-रिखा. ॥ १४९ ॥ ज्याचिया [13]रूपा वेधोनि पुढती । [14]देवांगना न लाविती पातीं । चातुर्या लाजोनि सरस्वती । पांडुरवर्ण विवर्णा. ॥ १५० ॥ ते हे माद्रीकुमर दोन्ही । अति सुकुमार सर्वगुणी । स्यमंत आणी कौस्तुभमणी । जैंवीं कां धुळीनें लेपले. ॥ १५१ ॥ याहीपरतें थोर दुःख । भोगिलें आणि भोगिती लोक । परि हें सर्वथा न वडे देख । एका पांडवां वेगळें. ॥ १५२ ॥ वि-श्ववनिता हो ! पवित्र । पोटीं प्रसवावा सभाग्य पुत्र । रूपविद्याबळपात्र । काज नाहीं ययाचें. ॥ १५३ ॥ रूप विद्या बळ वरिष्ठ । त्या आम्हां पांडवां ऐसी वाट । इतर मानवांतें कष्ट । काय होती कळेना ? ॥ १५४ ॥ भाग्यरेखा न सरतां भाळीं । [15]वंध्या विद्या कळा सकळी । जैसीं प्राणेवीण मोकळीं । काय करावीं इंद्रियें ? ॥ १५५ ॥ अभाग्य जाळूनि केलें नाहीं । ऐसा निश्चय मानून हृदयीं । धृतराष्ट्रा ! सुखी होईं । शल्य तुटलें म्हणोनी.' ॥ १५६ ॥ ऐसा दीर्घ स्वरें शोक । भीम करितां भयानक । तालवृक्षविक्राळमुख । हिडिंबनामा राक्षस.

---

१. गवताच्या शय्येवर. २. सारसपक्षी. ३. उदकयुक्त तलाव. ४. सुमति, सुमनक. ५. केळ. ६. उदक. ७. महीतलावर. ८. अध्याय १५१ श्लोक २१-४१ पहा. ९. पुरुषां. १०. सुता. ११. स्वसा. १२. रामचंद्र. १३. लावण्या. १४. अप्सरा. १५. व्यर्थ, विफळ.

॥ १५७ ॥ तेणें ऐकतांचि कर्णीं । साही मानवें देखोनि नयनीं । म्हणे, 'आहार जोडला वनीं । अनायासें ये काळीं.' ॥ १५८ ॥ हिडिंबानामें त्याची भगिनी । तीतें प्रेरितां आज्ञावचनीं । 'साही मानवें मारूनी । शीघ्र आणी [1]भक्षा-वया.' ॥ १५९ ॥ आतां [2]हैडिंबापरिणयन । हिडिंबराक्षसाचें हनन । तें परिसोत विचक्षण । टीका व्यासऋषीची. ॥ १६० ॥ इति श्रीआदिपर्व भारत । मुक्तेश्वरकविविरचित । कथारूपें स्वर्गामृत । लोकोपकारा [3]पोतलें. ॥ १६१ ॥

अध्याय सदतिसावा.

हिडिंबा अवलोकी नयनें । तव निद्रिस्थ पांचहीजणें । भीम देखतां [4]पंचबाणें । हृदयवर्मीं ताडिलें. ॥ १ ॥ [5]जांबूनंदाचा सोज्वळ पुतळा । कनकमेरूचा मध्य मुसळा । रत्नशिखरें तैशा सरळा । भुजा वर्तुळा शोभती. ॥ २ ॥ प्रथमवयसीची [6]रिघवणी । श्मश्रुरेखा श्यामवर्णी । विशाळ [7]भाळनयनदशनीं । तेज फांके बोलतां. ॥ ३ ॥ म्हणे, 'हा मूर्तिमंत [8]मदन । नीटनेटका बळसंपन्न । याचें होवोनि [9]अंगनारत्न । स्वेच्छाभोग [10]भोगांवे. ॥ ४ ॥ मांस भक्षणें क्षुधा-हरण । तृप्ती जाणावी अर्धक्षण, । याचे रक्षूनियां प्राण । अनंतकाळ सुख भोगूं. ॥ ५ ॥ याचेनि पाडें सुंदर भर्ता । शोधितां न मिळे पृथ्वीवरुता । बंधु-आज्ञेनें करितां घाता । लाभ कांहीं दिसेना.' ॥ ६ ॥ ऐसें विचारूनि चित्तीं । सांडूनि राक्षसपणाची [11]बुंथी । वस्त्राभरणीं दिव्य युवती । उभी ठेली सन्मुख. ॥ ७ ॥ विनयें बोले मधुर वचन, । '[12]तुम्ही कोठील आहां कवण? । येथें यावया काय कारण? । ऐसें कळलें पाहिजे. ॥ ८ ॥ दिसतां अत्यंत सुकुमार । गुणसंपन्न राजकुमर । नगरत्यागें [13]वनगव्हर । प्रवेशलेत ये काळीं. ॥९॥ [14]नीलोत्पळाहूनि सुकुमारी । [15]पहुडली ते हे कवण नारी? । स्वगृहाऐसी घोर[16]कांतारीं ।

---

१. अध्याय १५२ श्लोक ८-१४ पहा. २. विवाह. ३. या अध्यायाला 'जातुपाल्यनिर्गम' अशी संज्ञा आहे. या अध्यायांत मूळांतील १४७-१५२ अशा सहा अध्यायांचा समावेश झाला आहे. यांत जतुगृहांतून बाहेर पडण्यासाठीं बिलखनन, बिलद्वारानें पांडवांचें बहिर्निर्गमन, नौकेंत बसून पांडवांचें गंगातरण, पांडवांचा वनप्रवेश, जलाभिहरणार्थ भीमाचें गमन, इत्यादि विषय आहेत. ४. कामानें. (कामाचे बाण पांच आहेत, अशी प्राचीन कवींची समजूत आहे.) ५. सोन्याचा. ६. शिरकाव, प्रवेश. ७. कपाळावर, डोळ्यांत व दांतांत. ८. काम. ९. स्त्रीरत्न. १०. अध्याय १५२ श्लोक १८ पहा. ११. आच्छादन. १२. अध्याय १५२ श्लोक २३-२९ पहा. १३. वनगुहा. १४. नीळकमळाहून. १५. निजलेली. १६. भयंकर अरण्यांत.

निद्रासनीं निर्भय. ॥ १० ॥ हिडिंबराक्षसाचें हें वन, । सुरां असुरां दुर्गम स्थान। येथें आलेती पांचहीजण । मातेसहीत नेणतां. ॥ ११ ॥ येतां मनुष्याची घाणी । राक्षस चेतला क्षुधाग्नीं । काळरूपी याच क्षणीं । येथें येईल भक्षावया. ॥ १२ ॥ सर्व नाश मांडल्या काळें । उरे तें उरविजे विचारकुशळें । तुज येकासी अंगवळें । वांचवीन हा हेतु. ॥ १३ ॥ अंगीकार करूनि माझा । भ्रतार होई पुरुषराजा! । मनोभावें तुझी भाजा[1] । मी झालें ये काळीं. ॥ १४ ॥ पृष्ठीं वाहूनि महावीरा! । तूतें नेईन द्वीपांतरा । येरें[2] अवघीं राक्षसआहारा । प्राप्त होती अदृष्टें[3]. ॥ १५ ॥ होय राक्षसाची बहिणी[4] । परि मी निर्मळ अंतःकरणीं । दयाशीळा! तुझे चरणीं । मी विनटलें[5] सद्भावें.' ॥ १६ ॥ हांसोनि भीम [6]बोले शब्दू, । 'सांडून जननी सखे बंधू । तुझा विषयभोग स्वादू । विषप्राय मज वाटे. ॥ १७ ॥ हिडिंबाऐशा राक्षसथाटी[7] । येकसरें[8] पातल्या कोटी, । वज्रप्राय माझिये मुष्टी- । तळीं होती शतचूर्ण. ॥ १८ ॥ राक्षस आलिया ये काळीं । कौतुक पाहें आपुलिया डोळीं । घायें मेळवीन धुळी । अर्धक्षण न लागतां.' ॥ १९ ॥ ऐसी उभयमुखींची वार्ता । राक्षस ऐके वृक्षावरुता । करकराटें खाऊनि दांतां । उडी घाली सत्वर[9]. ॥ २० ॥ अट्टहास्यें[10] देतां हांक । वनचर बुंजाले[11] एकाएक । पडेताळूनि[12] प्रचंडरूख[13] । काळरूपी धांवला. ॥ २१ ॥ तालप्रमाण[14] सलंब सरळा । [15]अंजनाचलासमान काळा । [16]खदिरांगार तैसी डोळां । आरक्तता भ्यासुर[17]. ॥ २२ ॥ विक्राळ दाढा विकट दंशन[18] । मस्तकीं जटा, पिंगट वर्ण । आरक्त स्मश्रु अति तीक्ष्ण । खड्गप्राय[19] नखधारा. ॥ २३ ॥ वनींचा आस्वल मातला मस्ती । तैसा धांवे उभविल्या[20] हस्तीं । सिंदूरवर्ण सर्पाकृती । जिव्हा लाळी विषातें. ॥ २४ ॥ अवयव लोपले रोमतळीं[21], । कुंडलें लेइला सिसोळी[22] । दृष्टी देखतां तात्काळीं । प्राणहाणी प्राणियां. ॥ २५ ॥ राक्षसी म्हणे, '[23]भीमसेना! । वेगीं उठवीं या पांचहीजणां । सर्वांतेंही नेईन गगना । स्कंधीं वाहूनि ये समयीं.' ॥ २६ ॥ भीम म्हणे[24], 'भयपीडितें । श्रमोनि पडल्या ममें[25] बंधुमाते । निद्राभंग करावया

१. स्त्री, भार्या. २. अन्य. ३. दैवानें. ४. भगिनी. ५. तत्पर झालें. ६. अध्याय १५२ श्लोक ३१-३२ व ३४-३६ पहा. ७. राक्षसांचे समूह. ८. एकदम. ९. अध्याय १५३ श्लोक १-३ पहा. १०. मोठ्यानें. (मोठ्या हंसण्यानें.) ११. घाबरले. १२. हातांत धरून. १३. भयंकर वृक्ष. १४. ताडवृक्षासारखा मोठा. १५. काजळाच्या पर्वतासारखा. १६. खैराचा निखारा. १७. भयंकर. १८. दंत. १९. खड्गासारख्या. २०. उभारलेल्या. २१. केशांत. २२. शिरें. २३. अध्याय १५३ श्लोक ४-६ पहा. २४. अध्याय १५३ श्लोक ७-१० पहा. २५. माझ्या.

तुतें । संकट काय सांग पां? ॥ २७ ॥ निद्रा न भंगतां यांची । [1]रक्षा करीन राक्षसाची.' । ऐसें ऐकोनि क्रोधाची । [2]उल्का सांडी राक्षस. ॥ २८ ॥ भगिनीसी बोले निष्ठुर वाणी, । 'दोषरूपे ! परजारिणी ! । आहार जोडतां पापिणी। आचरलीस विघ्नातें. ॥ २९ ॥ आतां वधून साहीजणें । [3]सेखीं तुजही घेईन प्राणें.' । वृक्ष भोंवडून [4]सैत्राणें । भीमाउजू टाकिला.॥ ३० ॥ [5]पादप पडताक्षूनि भीम । वारूनि सांडिला द्रुम, । वर्म लक्षूनि राक्षसाधम । वक्षस्थळीं [6]ताडिला. ॥ ३१ ॥ तेणें दुखवला सत्राणें । भीम हाणितला [7]चंडपाषाणें, । करतळें वारून चरणें । निशाचर लोटिला. ॥ ३२ ॥ प्राण घ्यावया संकटीं । मिठी घातली भीमकंठीं । परस्परें पडतां मिठी । मल्लयुद्ध मांडिलें. ॥ ३३ ॥ तळप्रहार मुष्टिप्रहार । गुडघे कोंपर [9]लत्ताप्रहार, । काळकर्षण पादप्रहार । [10]येरयेरां हाणिती. ॥ ३४ ॥ मुष्टिघात ओपितां बळें । डोलों लागलीं [11]पर्वतमौळें, । थरारोनि पृथ्वीतळें । महाकंप दाविजे. ॥ ३५ ॥ करोनि [12]किंकाट गर्जना । कंठीं रोवूं धांवे [13]दशना । भीमें हाणोनि [14]चंडकणा । दंतपंक्ती पाडिल्या. ॥ ३६ ॥ पांडव म्हणे, 'पापभरिता ! । शब्द न करीं मदोन्मत्ता ! । श्रमोनि [15]पहुडलीं बंधुमाता । निद्रा त्यांची भंगेल.' ॥ ३७ ॥ दणके वाजतां दणदणा । [16]चेवं आला पांचांजणा, । दोघे भिडती आंगवणा । प्राण [17]निकरें घ्यावया. ॥ ३८ ॥ चौदंत झाले [18]भद्रजाती । [19]मृगेंद्रें कवळिला मृगपती । कीं [20]सपक्ष पर्वत पर्वतीं । झगटे तैसे मिसळले. ॥ ३९ ॥ [21]शरभ शरभाचिये [22]कवे । कीं [23]गंडभैरव गंडभैरवें। तेंवी दोघे भिडतां हांवे। धर्मार्जुनें देखिलें. ॥ ४० ॥ कुंती सावध पाहे दृष्टी । तंव दिव्यांगना उभी निकटीं, । [24]म्हणे, 'तूं कोण वो ! गोरटी । महावनीं एकली, ॥ ४१ ॥ अप्सरा यक्षिणी व-

---

१. भस्म. २. ज्वाळा. ३. अंतीं. ४. बळानें, वेगानें. ५. वृक्ष. ६. या क्रियापदाचा 'भीमें' हा अध्याहृत कर्ता होय. ७. भयंकर दगडानें. ८. राक्षस. ९. "मस्तप्रहार" असा अन्य पाठ. १०. एकमेकांस. ११. पर्वतशिखरें. १२. कें कें शब्दयुक्त. १३. दांतांला. १४. चडकाणी, थप्पड, चापटी. १५. निजलीं. १६. जागृती. १७. नेटानें. १८. हत्ती. १९. सिंह. २०. पंखांनीं युक्त. [पूर्वी पर्वतांना पंख होते. पर्वत पक्षसमूहाच्या योगें उडून जात असत, तेणेंकरून मुनि देव इत्यादिकांस त्यांच्या पतनभयामुळें सदा चिंता वाटत असे, व केव्हां केव्हां त्रास होत असे म्हणून क्रोधाविष्ट इंद्रानें त्यांच्या पक्षांचें छेदन आपल्या वज्रानें केलें—अशी कथा रामायणांत आहे. सुंदरकांड—सर्ग १ श्लोक ११५-११७.] २१. पक्षिविशेष. २२. पकडींत, कवळ्यांत. २३. गेंडा. २४. अध्याय १५४ श्लोक ३-४ पहा.

नदेवता, । कोण हें मज सांग तत्वतां; । रंभेसमान स्वरूपता । वस्त्राभरणीं शोभसी.' ॥ ४२ ॥ येरी वृत्तांत जाणवी, । 'हिडिंबराक्षसाची मी बहिणी । तुम्हां निद्रिस्थां देखोनी । वधावया धाडिलें. ॥ ४३ ॥ अवलोकितां **भी**मसेनातें । व्यसनीं पाडिलें मज मन्मथें,[1] । तो म्यां कायावाचाचित्तें । प्राणेश्वरू भाविला. ॥ ४४ ॥ तुमचें न करूनियां हनन । कामबुद्धीं रातलें[2] मन । हें देखोनि क्रोधायमान । राक्षस पाठी धांवला. ॥४५॥ तो हा मिनलासे झुजा, । परी यशस्वी वल्लभ माझा, । जो कां द्वितीय पुत्र तुझा । **भी**मनामा प्रतापी.' ॥४६॥ ऐकूनि राक्षसीचें वचन । वेगीं सरसावे **अर्जुन**, । सज्जूनियां[4] धनुष्यबाण । राक्षसा उजू धांवला. ॥४७॥ **न**कुळ **स**हदेव धैर्यमूर्ती । खड्गें[3] पैंडताळूनि हातीं । धांविन्नले बंधुसाह्यार्थीं । 'मारूं' म्हणती 'राक्षसा.' ॥४८॥ **भी**म वचनें वारी त्यांसी, । 'निश्चळ[5] बैसा **ध**र्मापाशीं, । राक्षस मारूनि क्षणार्धेंसी । तुम्हांपाशीं येतसें. ॥४९॥ नावेक[6] कौतुक पहा दृष्टी' । ऐकोनि थोकले[7] **ध**र्मानिकटीं, । तंव राक्षसें वज्रमुष्टी । **भी**ममाथां ओपिली. ॥ ५० ॥ तें साहोनि बाहुबळी । उचलोनि टाकिला भूतळीं, । कूष्मांडफळ[8] आदळे सिळीं[9] । तेंवी गात्रीं भंगला. ॥ ५१ ॥ सोमयागीं पशु[10] मारिती । तैसा धुमसिला[11] मुष्टिघातीं, । उभय चरण धरोनि हातीं । तीक्ष्ण भूमीं वोढिला. ॥ ५२ ॥ राक्षस चरण राक्षसकंठीं । गोऊनि[12] दुमता[13] केला पाठीं, । पायें चेपितां कडकडाटी । अस्थिखंडें शतचूर्ण. ॥ ५३ ॥ आर्द्रदुंदुभीचा नादू । तैसा करूनियां घोर शब्दू, । राक्षसें प्राण त्यागितां, बंधू । **ध**र्मादिक तोषले. ॥ ५४ ॥ टाळिया वाजवोनि हस्तकें । 'जयजय **कृ**ष्ण' म्हणती मुखें । स्वर्गींहूनि सुरनायकें[14] । पुष्पांजळी ओपिल्या. ॥५५॥ राक्षसाचिया नवद्वारीं[15] । अशुद्ध[16] लोटलें पृथ्वीवरी । सिंदुरवर्ण[17] सरिता[18] थोरी । भयानक वोहातसे[19]. ॥ ५६ ॥ प्रेत सांडोनियां क्षिती, । **भी**म पातला **ध**र्माप्रती, । प्रथम नमस्काररूनि **कुं**ती, । राजा पाठीं वंदिला. ॥ ५७ ॥ **हिडिं**बेतें म्हणे वचनीं, । 'तूं जातीची राक्षसिणी, । बंधुवैर स्मरोनि मनीं । धांत[20] करिसी आमुतें. ॥ ५८ ॥

---

१. कामें. २. रमलें. ३. खड्गें. ४. परजूनी. ५. अध्याय १५४ श्लोक २० पहा. ६. क्षणभर. ७. थांबले. ८. कोहळा. ९. शिळेवर, दगडावर. १०. अध्याय १५४ श्लोक ३०-३१ पहा. ११. मार्दिला, चेंचिला, बडविला. १२. बांधून. १३. दुणता, दुडता, दुहेरा. १४. इंद्रें. १५. दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, तोंड, गुद आणि उपस्थ अशीं नवद्वारें. १६. रक्त. १७. शेंदूरवर्णयुक्त. १८. नदी. १९. 'आभासे' असा अन्य पाठ. २०. अध्याय १५५ श्लोक १ पहा.

वेगीं जाई आपुल्या ठाया, । कैंचा पुरुष? कैंची जाया?' । उदास शब्द ऐकोनि पायां । येरी लागे सद्भावें. ॥ ५९ ॥ पृथेचे चरणीं ठेऊनि माथा । म्हणे, 'अनुमोदीं आपुल्या सुता, । उपेक्षा न करीं बो! सर्वथा । मी राक्षसी म्हणोनी. ॥ ६० ॥ मदनापासाव जे वेदना । पुरुषवियोगें पावती ललना । हा तो अनुभव तुझिया मना । विदित असे सुजाणे! ॥ ६१ ॥ पृष्ठीं वाहूनि साहीजणें, । तारून नेईन दुस्तर वनें, । त्या त्या समयीं भंगोनि विघ्नें, । सुख देईन समस्तां. ॥ ६२ ॥ माझे पोटीं जन्मेल कुमर, । तो करील शत्रूचा संहार, । साक्ष करोनि यादवेश्वर । प्राण रक्षील पार्थांचा. ॥ ६३ ॥ आतां आपुलेनि हस्तें । गांठीं पाडीं मज भीमातें.' । कुंती म्हणे ज्येष्ठपुत्रातें, । 'विचार हृदया आणिजे.' ॥ ६४ ॥ परचित्तपरीक्षासुजाण । धर्मराज विवेकनिपुण । शुद्ध भाव देखोनि मन । करुणारसें कवळिला. ॥ ६५ ॥ भविष्यार्थ जाणे ज्ञाता । म्हणे, 'विधिनें नेमिल्या अर्था, । अंगिकाराविणें वृथा । काज नाहीं आग्रहा.' ॥ ६६ ॥ म्हणे, 'भीमा! माझिये आज्ञा । अंगीकारीं हे पुण्यांगना, । इजपासाव अपाय, प्राज्ञा! । नाहीं ऐसें मी जाणें.' ॥ ६७ ॥ आदरें बोले राक्षसीतें, । 'दिवसा भीम दिधला तूतें, । रात्रीं रक्षावया आमुतें । सायंकाळीं आणावा' ॥ ६८ ॥ भीम बोले निश्चयगोष्टी, । 'एक पुत्र तुझे पोटीं । झालियानंतर हे राहटी । पुढां करणें घडेना.' ॥ ६९ ॥ ऐकोनि दोघांचिया वचना । 'अवश्य' म्हणोनि लागली चरणा, । खांदीं वाहोनि भीमसेना । क्रीडावना पैं गेली. ॥ ७० ॥ गुहागव्हरीं पर्वतमौळीं । नानारमणीकवनस्थळीं, । नदीपुलिनीं गंगाजळीं । क्रीडा करी मनेच्छा. ॥ ७१ ॥ द्रोणाचळीं चंद्राचळीं । मंदराचळीं विंध्याचळीं । मलयाचळीं हिमाचळीं । सुखसमेळीं क्रीडती. ॥ ७२ ॥ कनकमेरूचे रत्नशिखरीं । शीतळ हिमालयपरिसरीं । रजताचळाचे पाठारीं । सुरतोपचारीं क्रीडती. ॥ ७३ ॥ सोमकांत शीतळतळीं । सूर्यकांत काश्मीराचळीं । हेमभूमिके

१. मनोभावानें. २. 'म्हणे' या क्रियापदाचा 'हिडिंबा' हा अध्याहृत कर्ता. ३. स्त्री. ४. अध्याय १५५ श्लोक ५-१४ पहा. ५. दुसऱ्याच्या मनाची परीक्षा करण्यांत प्रवीण. ६. अध्याय १५५ श्लोक १६-१८ पहा. ७. व्यवहार. (श्लोक २० पहा.) ८. या विस्तृतवर्णनास मूळांत फारसा आधार नाहीं. (अध्याय १५५ श्लोक २२-३० पहा.) हें मनोहर वर्णन मुक्तेश्वरानें प्रसंग मनांत आणून योजिलें आहे. मुक्तेश्वराचा वर्णनविस्तार मधूनमधून बाणभट्टासारखा भासमान होतो, असें मार्मिक वाचकांस दिसून येईल. ९. नदीच्या वाळवंटीं. १०. सुवर्णाचलाचे.

रत्नस्थळीं । सुखसमेळीं क्रीडती. ॥ ७४ ॥ कर्पूरकर्दळीचे वनीं । कुंकुमकेशरउद्भवस्थानीं, । सुरतानंदें क्रीडती दोन्ही । मद्यपानीं मनइच्छा. ॥ ७५ ॥ मानससरोवरहंसतडागीं । सुवर्णपंकज वनपरागीं । प्रवाळ वल्लीच्या सुरंगीं । सुखसंभोगीं क्रीडती. ॥ ७६ ॥ भक्ष्य भोज्य पिशिताशनें[1] । नानारसांचीं रसपानें । फळें तांबूल सुगंध सुमनें[2] । भोगोपचारें ओळंगे[3]. ॥ ७७ ॥ लोटल्या एक संवत्सर, । भीमवीर्यें महाक्रूर । राक्षसी उदरीं जन्मला कुमर । भीम[4] भैमी[5] अद्भुत. ॥ ७८ ॥ पितयातुल्य पराक्रमगुणीं, । कराळ[6] वदन शंकुकर्णी । आजानुबाहू[7] विकटदशनीं[8] । लंबोष्ठी रक्ताक्ष[9]. ॥ ७९ ॥ मस्तक पाषाणघट्ट निष्कंच[10] । शब्द करी महाउंच[11], । यालागीं नांव 'घटोत्कच'[12] । माता ठेवी तयातें. ॥ ८० ॥ राक्षसीगर्भ तत्क्षणीं । जन्मत युवा बाळपणीं, । शस्त्रांस्त्रीं परम गुणीं । रूप अनेक पालटी[13]. ॥ ८१ ॥ नमस्कारूनि पांचही पिते, । भावें वंदिले पितृमाते; । पुत्र देखोनि पांडवांतें । परमानंद न संटे. ॥ ८२ ॥ म्हणे[14], 'मांडल्या विषम वेळ, । घेऊन राक्षसांचें दळें[15], । स्मरतां पावोनि तात्काळ । निर्दाळीन शत्रूतें.' ॥ ८३ ॥ हिडिंबा नमस्कारूनि धर्मा । बोले जोडोनि पाणिपद्मा, । 'कार्य विषम मांडल्या तुम्हां । आठविजे दासीतें. ॥ ८४ ॥ शीघ्र येऊनि पुत्रसहित । संपादीन अवघड कृत्य, । ग्रासूं पातल्या कृतांत । पायें लोटीन माघारां.' ॥ ८५ ॥ ऐसी बोलोनियां युक्ती । घटोत्कच धरोनि हातीं । गेली उत्तरदिशेप्रती । गगनपथें राक्षसी. ॥ ८६ ॥ शक्रशक्ती[16] प्रेरितां कर्णें । अर्जुन रक्षावया प्राणें, । भैमी[17] निर्मिला शचीरमणें[18] । पुत्रलोभें यापरी[19]. ॥८७॥ धर्म म्हणे, 'भीमार्जुना ! । आतां त्यागूनियां या वना । स्थळ अवलोकोनियां नयना । सव्यपंथें[20] चालावें.' ॥ ८८ ॥ 'अवश्य' म्हणोनि पवित्राचारी । जटावल्कल अजिनांबरीं[21] । माता वाहोनि पृष्ठीवरी । ज्येष्ठा पाठीं निघाला.

---

१. मांसभक्षणें. २. पुष्पें. ३. वोळगे, ओढवे, प्रवण होई. ४. भयंकर. ५. भीमाचा. ६. भयंकर. ७. महाभुज. ८. वक्र. ९. तांबडे डोळे. १०. केशरहित. ११. भीमनाद. १२. घट+उत्कच=घटासारखें शिर+विकेश, केशहीन. [घट=शिर; 'घटः समाधिभेदे ना शिरः कूटकटेषु च' इति मेदिनी.] याचें डोकें घटसदृश आणि केशरहित होतें म्हणून 'घटोत्कच' असें नांव ठेविलें. १३. कामरूपधर होता. १४. याचा कर्ता 'घटोत्कच.' १५. सैन्य. १६. इंद्रापासून कर्णानें मागून घेतलेली शक्ति. [मुक्तेश्वरकृत वनपर्व–अध्याय २२, ओंव्या ३७-४९ पहा.] १७. भीमपुत्र, घटोत्कच. १८. शचीवल्लभें=इंद्रें. १९. हें घटोत्कचोत्पत्तिप्रयोजन सांगितलें. (अध्याय १५५ श्लोक ४६ पहा.) २०. डाव्या मार्गानें. २१. मृगचर्मवस्त्रधारी.

॥ ८९ ॥ अवलोकिती विचित्रें वनें । सेविती फळें सरिताजीवनें,[1] । तपोवनाचीं आयतनें[2] । अत्यादरें वसविती. ॥ ९० ॥ सांग[3] अभ्यासिले वेद । शास्त्र सिद्धांत मतभेद । अर्थवाद यथार्थवाद । विचारविद[4] जाणती. ॥ ९१ ॥ वेदीं वर्णोक्त पाठसिद्धी । शास्त्रीं संपूर्ण अर्थसिद्धी, । नीतिशास्त्रोक्तीं विविधी । अनुभवसिद्धी वेदांत. ॥ ९२ ॥ ऐसियापरी सार्थक काळ । आत्मचिंतनीं काढिती वेळ, । व्यर्थ जाऊं न देती पळ । कृष्णस्मरणा वेगळें. ॥ ९३ ॥ मत्स्य त्रिगर्त पांचाळ[5] । कीचकदेशाचें मंडळ । उल्लंघूनि महाशैल । पुण्यारण्या पातले. ॥ ९४ ॥ पंचरात्री सप्तरात्री । स्थळोस्थळीं करूनि वस्ती, । पुढें चालतां दैवगती । अलभ्य लाभ देखिला. ॥ ९५ ॥ पितामह व्यास भगवान । दयाब्धी कृष्णद्वैपायन, । आदरें द्यावया दर्शन । मार्गीं उभा देखिला. ॥ ९६ ॥ अवलोकितां श्रीगुरुमूर्ती । पांडवां आनंद न धरवे चित्तीं, । जैसा[6] प्राण परते प्रेतीं, । तेंवी झालें समस्तां. ॥ ९७ ॥ भावें[7] घालितां लोटांगण । अश्रुधारा स्रवती नयन । मस्तकीं वंदोनि श्रीचरण । उकसाबुकसीं स्फुंदती. ॥ ९८ ॥ जोडोनियां करपंकज,[8] । स्तवन करी धर्मराज । म्हणे, 'तूं आमुचा पूर्वज, । सांभाळावया आलासी. ॥ ९९ ॥ जयजय सत्यवतीनंदना! । पराशरात्मजा! गुणनिधाना! । योगियांच्या मुकुटरत्ना! । भवार्णवतारका![9] ॥ १०० ॥ एकानना[10] चतुरानन । तूं द्विभुज[11] नारायण, । भाळांबकावीण[12] त्रिनयन[13] । हें महिमान[14] स्वामीचें. ॥ १०१ ॥ कौरवक्लेशगिरितळीं । आम्हां निजविलें संकटाजळीं, । तव स्मरणकुलिशें[15] कृपासलिलीं । लया गेलीं सकळ विघ्नें.' ॥ १०२ ॥ मस्तक स्पर्शोनि हस्तकें । स्नेहें शांतवी निजबाळकें । म्हणे, 'सर्वही मज ठाउकें । मुखें कांहीं न बोलावें. ॥ १०३ ॥ दुर्जनीं भोगविलें दुःख । तितुकें स्वयें सेविती विख, । शीघ्र पावाल अक्षय सुख । क्षमाशील म्हणोनी. ॥ १०४ ॥ पृथे! सांडीं चिंताज्वर, । चक्रवर्ती

---

१. नदीचें उदक. २. स्थानें. ३. सहा अंगांसहित. (पृष्ठ ६९ टीप २२ पहा.) ४. विचारज्ञ. ५. अध्याय १५६ श्लोक २ पहा. ६. हा उपमालंकार जाणावा. ७. 'भावें घालितां लोटांगण । साही वंदिती श्रीचरण । द्वैपायन आलिंगन । दे प्रेमभावें पांडवां ॥' असाही पाठ आढळतो. ८. हस्तकमळ. ९. संसारसागरतारका. १०. तूं एकानन असून चतुरानन (ब्रह्मदेव) आहेस. ११. तूं द्विभुज असून चतुर्भुज नारायणासमान आहेस. १२. मस्तकावरील नेत्र. १३. शंकर. १४. मोठेपण. १५. स्मरणरूप वज्रानें.

युधिष्ठिर । दानोदकाचा सागर । आठवा[1] करील भूतळीं. ॥ १०५ ॥ रमाधव धरिजे चित्तीं, । स्वधर्म पाळिजे सुमतीं, । तेणें सकळ अरिष्टें शांत होती । धर्मराया! जाण पां. ॥ १०६ ॥ येथूनि भाग्याचा उमाळा[2] । भीम नाशील दुष्टकुळा । पुढें विजयलक्ष्मी माळा । गळां घालील निर्धारें[3]. ॥ १०७ ॥ पुढती माझें आगमन । तंववरी स्वस्थ करूनि मन । नेमूनि देतों वसतिस्थान । तेथें गुप्त वसावें. ॥ १०८ ॥ एकचक्रनाम नगरी । तेथें पवित्र ब्राह्मणागारीं[4] । वास करावा षण्मासवरी । प्रगट कोणा न होतां. ॥ १०९ ॥ नेमिल्या काळीं येईन भेटी । तेवेळीं सांगेन विचार गोष्टी । तैसी पुढें करावी रोहाटी[5]' । कृपादृष्टी अनुवादें. ॥ ११० ॥ ऐसें करून समाधान । अदृश्य[6] झाला बादरायण[7], । कुंती आणी पांचहीजण । एकचक्रा पातलीं. ॥ १११ ॥ इति श्रीभारते आदिपर्वणि । व्यासोक्ती तेच मंदाकिनी[9] । वैशंपायन ओघजनीं । मित्रात्मजा[10] जाणिजे. ॥ ११२ ॥ अर्थ गुप्त सरस्वती सुंदर । तो स्वामी लीलाविश्वंभर । भरतां त्रिवेणी[11]ओघपरिकर । अक्षय्यवट[12] जन्मेजया! ॥ ११३ ॥ श्रवणतीर्थी तीर्थविधान । सांगतां तीर्थ उपाध्या ब्राह्मण, । मुक्तेश्वर परम दीन । कीं तो किंकर संतांचीं[13]. ॥ ११४ ॥

---

१. पृथ्वीवर निरनिराळे क्षीरोदादि सात सागर आहेत आणि धर्माच्या दानाचा आठवा सागर होईल. [या सात सागरांचीं नांवें:—'क्षीरोदो लवणोदश्च दध्योदश्च घृतोदकः । स्वादूदकःसुरोदश्च तथैवेक्षुरसोदधिः' इति वायुपुराणे.] २. उद्भव. ३. 'आनंदें' असा अन्यपाठ आहे. ४. विप्रगृहीं. ५. वर्तणूक. ६. 'दर्शनें देउनी बादरायण । स्वयें पावला अंतर्धान' असा अन्य पाठ. ७. शारीरकसूत्रकर्ता मुनि(व्यास). ८. या ओवीच्या पूर्वी पुढच्या ओव्या एका जुनाट हस्तलिखित पोथींत आढळतात:— इति श्रीमहाभारते आदिपर्वणि । मूळ व्यासकृत कृष्णावेणी । भीमा मुक्तेश्वराची वाणी । येकार्थ रसीं समरसें. ॥ १ ॥ संत अवदान वर्षाकाळीं । पूर मातल्या पृथ्वीतळीं । साक्षे साकार मध्य स्थळीं । जो पारखी दोंहिते ॥ २ ॥ यालागीं येथें घ्यावया उपमा । सहज काडलूर संगमा । धर्मगंगा परि विश्रामा । कृष्णावारी तृष्णेतें. ॥ ३ ॥ आतां एकचक्रनगराप्रती । पांडव जाती सहकुंती । तें एकाग्र करुनी चित्तीं । श्रोते सादर परिसावें. ॥ ४ ॥' ९. गंगा. १०. यमुना. ११. गंगा यमुना सरस्वती ही त्रिवेणी होय. १२. प्रयागास अक्षय्य वटाचा वृक्ष सुप्रसिद्ध आहे. १३. या अध्यायास 'हिडिंबवध' अशी संज्ञा आहे. यांत मूळांतील १५४–१५६ या तीन अध्यायांचा समावेश असून हिडिंबवध, घटोत्कचोत्पत्ति, त्याचें नामकरण, व्यासदर्शन, त्याचा पांडवांस एकचक्रानगरीवासार्थ उपदेश–इत्यादि विषय आहेत.

अध्याय अडतिसावा.

एकचक्रनगरी आंत । ब्राह्मणगृहीं जननीसहित, । वसते झाले तें अद्भुत । प्रगट गुप्त विचारा. ॥ १ ॥ विनयार्जवें मृदु मंजुळ । वचनें आप्त झाले सकळ, । अत्यंत प्रिय ते सोज्वळ । ऐसें जनीं भाविजे. ॥ २ ॥ सत्यविनीतप्रियभाषणीं । त्यासी वश्य सकळ प्राणी । पांडव आथिले इहीं गुणीं । यालागीं मान्य सकळांतें. ॥ ३ ॥ सत्य आणी सहनशील । तेणें जिंकिलें विश्व सकळ । ऐशिया गुणीं सर्व कुशळ । म्हणोनि वंद्य विश्वातें. ॥ ४ ॥ सर्वभूतीं समान दया । निर्जर नमस्कारिती तया, । ऐशिया गुणीं भूषित काया । म्हणोनि प्रिय देवांतें. ॥ ५ ॥ वृत्ती झाली निरभिमान । भिक्षेस जाती पांचहीजण, । आणिती तें एकत्र करून । मातृहस्तीं वोपिती. ॥ ६ ॥ जननी आपुलेनि हातें । अर्धें वोपी भीमातें, । आहार विशेष असे त्यातें । म्हणोनि बंधू रक्षिती. ॥ ७ ॥ शेष उरलें पंचधा करी । चार ओपी चौघां करीं, । एक भाग आपुले उदरीं । क्षुधाग्नीतें शांतवी. ॥ ८ ॥ ऐसे लोटले दिवस कांहीं, । पुढें एके दिवसीं पाहीं । अकस्मात ब्राह्मणगेहीं । शोकध्वनी मांडिली. ॥ ९ ॥ गृहस्थ भार्या सुत कन्यका । चौघे कवळोनि एकमेकां । दीर्घ स्वरें करिती शोका । तें पृथेनें परिसलें. ॥ १० ॥ मातेसी बोले भीमसेन, । 'ब्राह्मण करी दीर्घ रोदन, । त्या दुःखासि काय कारण । तें विचारीं, पवित्रे! ॥ ११ ॥ असेल पर्वताहूनि थोर । तरी मी पंरिहारीन संकट सैंचार, । गृहीं वसों ते उपकार । कांहीं उत्तीर्ण या होणें.' ॥ १२ ॥ पुत्र गेलिया भिक्षाटणा । कुंती प्रवेशली विप्रसदना । तंव द्विजाची विलापकरुणा । कर्णरंध्रीं न घेववे. ॥ १३ ॥ म्हणे, 'बळिष्ठा पूर्वकर्मा! । कोण प्रस्तावो योजिला आम्हां? । जो मरणावांचूनि निर्गमा, । आन कांहीं असेना. ॥ १४ ॥ धिक् धिक् संसारी नर निर्धन, । धिक् धिक् प्राणी पराधीन, । धिक् धिक् राजा पुरुषार्थहीन । व्यसनीं पाडी प्रजांतें. ॥ १५ ॥ या-

---

१. पृष्ठ २५० टीप ५ पहा. २. मानावें. ३. नम्र, विनयसंपन्न. ४. संपन्न झाले. ५. सकल प्राण्यांच्या ठिकाणीं. ६. देव. ७. देह. ८. पद्यांत कधीं कधीं निं, पैं, पां, इत्यादि शब्द केवळ पादपूरणार्थ योजितात, असें आढळतें. ९. अध्याय १५७ श्लोक ६ पहा. १०. पांच अंश. [धाप्रत्यय संख्यावाचक शब्दांपुढें प्रकारार्थीं होतो–चतुर्धा (चार प्रकारांनीं), पंचधा (पांच प्रकारांनीं), द्विधा, त्रिधा, एकधा इत्यादि.] ११. दूर करीन. १२. खरोखर. १३. उतराई. १४. 'म्हणे' या क्रियापदाचा अध्याहृत कर्ता 'विप्र' होय. (अध्याय १५७ श्लोक २०-४१ पहा.) १५. प्रसंग. [प्रस्तावो–अकारान्त नामें कवितेंत कधीं कधीं ओकारान्त आणि ऊकारान्त आढळतात–भाव-भावो, ठाव-ठावो, देव-देवो, कैलास-कैलासू, देवदार-देवदारू.] १६. पराक्रमशून्य.

चिलागीं तुज सुंदरी[1]! । मागां बोधिलें बहुतांपरी । हें स्थळ त्यागूनि स्थळांतरीं । निर्भयदेशीं वसावें. ॥ १६ ॥ पूर्वजांचा वसता ठावो । यालागीं येथें धरिला भावो, । आतां अरिष्टाचा घावो । कोण वैरी सांग पां? ॥ १७ ॥ जळो मृत्युलोकींचा वास । जेथें नाहीं सुखाचा लेश, । सुख भाविती त्याचा वोसें[3] । ज्ञानविचार जाणावा. ॥ १८ ॥ विषय द्रव्य दारा कुमरें । जेथें आभासे सुखाचें वारें । वियोगकाळीं ब्रह्मांड भरें । शोकदुःखें अपार. ॥ १९ ॥ माझेनि मृत्यें कुटुंबासीं मरण । कुटुंबत्यागें दुःख दारुण, । आम्हां चौघांमाजी[4] कोण । मृत्या वोपूं सांग पां? ॥ २० ॥ आतां असो अवघी बोली, । स्नेहें बाळांतें तूं प्रतिपाळीं । मी देह द्यावया बळी । बकारण्या[5] जातसें.' ॥ २१ ॥ भार्या म्हणे[6], 'प्राणेश्वरा! । उसंत[7] तूं नको शोकसागरा, । मी सांगेन त्या विचारा । अत्यादरें अनुष्ठीं[8]. ॥ २२ ॥ अंगिकारूनि देह मरणा । मी जाईन राक्षसभुवना, । आपण निजकन्या नंदना । संरक्षूनि असावें. ॥ २३ ॥ शरीरेंसी वित्त जीवित । वेंचोनि करी पतीचें हित । ते कुलीन उभयलोकांत । पवित्र ऐसें बोलती. ॥ २४ ॥ जन्मला प्राणी पावे मरण, । तेथें कां व्याकुळ करावें मन? । आपुल्या सुखालागीं धन । पुत्र दारा इत्यादी. ॥ २५ ॥ म्हणोनि माझेनि एक त्यागें । क्षेमें[9] उरावें आपण तिघें, । अपत्यपाळण तुज मागें । कदां नोहे मांझेनी.[10]' ॥२६॥ ऐसें जननीतें बोलतां । तीतें हातें वारी दुहिता । म्हणे, 'चिंता न करीं ताता! । वाक्य माझें अवधारीं[11]. ॥२७॥ माझ्या देहातें निश्चिती । वोपिलें पाहिजे[12] पुढिल्या हातीं, । तेचि भावना धरोनि चित्तीं । त्याग माझा करावा. ॥२८॥ भ्रतार भावूनि केवळ, । स्वयें वरीन मृत्युकाळ, । तुम्ही दोघे असल्या कुशळ । पुढती पावाल वृद्धीतें. ॥२९॥ नरकापासोनि तारी पुत्रें[13] । ऐसें बोले वेदशास्त्र, । पुत्र रक्षिल्या पवित्र । लोकें[14] होती तुम्हांतें[15].' ॥ ३० ॥ ऐकोनि तिघांची वाणी । बाळ

---

१. हे ब्राह्मणी. २. निवारी. ३. शून्य, ओस, रिकामा. ४. विप्र, सुत, भार्या आणि कन्या. ५. बक नामक राक्षसाचें नांव. ६. अध्याय १५८ श्लोक १-३७ पहा. ७. बुडूं नको. ८. करीं. ९. सुखरूप. १०. मोरोपंत–आदिपर्व–अध्याय ३० गीति २१-२६ पहा. ११. ऐका. १२. पृष्ठ ३०५ टीप १ पहा. १३. याविषयीं मनुवचन आहे तें असें:—'पुंनाम्नो नरकाद्यस्मात्त्रायते पितरं सुतः । तस्मात्पुत्र इति प्रोक्तः स्वयमेव स्वयंभुवा ॥' (मनुस्मृति–अध्याय ९ श्लोक १३८). याचा तात्पर्यार्थः— ज्या कारणास्तव पुंनाम नरकापासून मुलगा पित्याचें त्राण (रक्षण) करितो, त्या कारणास्तव स्वतः ब्रह्मदेवानें मुलाला पुत्र असें म्हटलें आहे. १४. जे अपुत्रिक आहेत त्यांना देवलोकप्राप्ति होत नाहीं अशा प्राचीन समजुतीस अनुलक्षून हें वर्णन आहे. ['अपुत्राणां किल न संति लोकाः शुभाः' कादंबरी–पृष्ठ १२८] ज्यांना पुत्र असतात त्यांनाच स्वर्गलोकीं निवापांजलि मिळतात. ज्याला पुत्र

बोले बोबडे वचनीं । 'माते[1]! पितया! बहिणी! । शोक कांहीं न करावा; ॥३१॥हातीं घेऊनी तृणकाडी । म्हणे, 'मी आपुल्या अंगप्रौढी, । वना जाऊनि तांतडी । निर्दाळीन असुरातें.' ॥ ३२ ॥ ऐकोनि बाळकाचें वचन । स्नेहें कळवळलें पृथेचें मन, । मोहें देऊन आलिंगन । मग विचारी वडिलातें. ॥३३॥ म्हणे, 'कवण संकट तुम्हां । मांडलें असे ब्राम्हणोत्तमा! । तैसेंच सत्य सांगा आम्हां, । परिहरे तें विचारूं'. ॥३४॥ द्विज[2] म्हणे, 'स्नेहभरिते! । व्यर्थ काय सांगिजे तूतें?। आमुचें अरिष्ट हरिहरातें । हारिलें[3] न जाय सर्वथा. ॥ ३५ ॥ बकनामा राक्षस बळी । नगरा समीप वनस्थळीं । वसे त्यातें जनीं सकळीं । नेमिलासे भक्ष्यभाग. ॥ ३६ ॥ देश प्रजासहित नगर । राक्षस रक्षी निरंतर, । भूतअरिष्ट कीं परचक्र[4] । स्पर्शों नेदी स्थळातें. ॥ ३७॥ चतुष्पद द्विपद लोक । रोगरहित रक्षी बक, । म्हणोनि त्यातें प्रजानायक । वेतनातें अर्पितो. ॥३८॥ भक्ष्य भोज्य भरोनी रथीं, । महिषयुग्में[5] जुंपिती रथीं[6], । सूप[7] शाखा दधि घृतीं। घट भरोनी ठेवावे. ॥ ३९ ॥ मांसाआगळा[8] पुरुष एक । राक्षसभक्षणालागीं देख, । रथीं वाहूनि सन्मुख । बकारण्या पाठवणें. ॥ ४० ॥ नित्य साठ खंडी अन्न । दहा खंडी मास प्रमाण, । अजा[9] शतानुशत[10] जाण । त्यावरी एक पुरुष देणें. ॥ ४१ ॥ ऐसा राक्षसाचा नित्य नेम । प्रत्यहीं देती निःसीम, । चुकतां आन सारिखे काम । भावें भोजन करविती. ॥ ४२ ॥ नेम चुकल्या एक दिवस । रात्रीं येऊनि राक्षस । कुटुंबेसीं करील ग्रास[11]। काळरूपी दुरात्मा. ॥ ४३ ॥ आमुतें आज पातली पाळी । आम्हीं चौघें एके मेळीं, । यांत कवण वोपूं बळी । तें तूं सांगें जननीये! ॥ ४४ ॥ विक्रयें मेळऊं पारिखा[12] जन ।

आहे त्याचेंच पितरांचें ऋण फिटलें, तो पितरांचा ऋणी नाहीं, कारण पुत्र हा पितरांच्या ऋण-निर्मोक्षाचें साधन आहे. 'एष वा अनृणो यः पुत्री यज्वा ब्रह्मचारी वा' अशी श्रुति आहे. तसेंच 'ऋणं देवस्य यज्ञेन पितृणां दानकर्मणा । संतत्या पितृलोकानां भावयित्वा परिव्रजेत् ॥,' 'जायमानो ब्राह्मणस्त्रिभिर्ऋणं वा जायते ब्रह्मचर्येणर्षिभ्यः, यज्ञेन देवेभ्यः, प्रजया पितृभ्यः' अशीं ग्रंथवचनें आहेत. याशिवाय मनुस्मृति–अध्याय ९ श्लोक १०८-१०९; अध्याय ६ श्लोक ९.८; रघुवंश सर्ग ८ श्लोक ३० पहा. मनुष्याला तीन ऋणें असतात; एक देवऋण, एक पितृऋण आणि एक ऋषिऋण. शास्त्राध्ययनानें ऋषींचें ऋण फिटतें, यज्ञानुष्ठानानें देवाचें ऋण आणि पुत्रोत्पादनानें पितरांचें ऋण फिटतें अशी प्राचीन समजूत आहे. १५. मोरोपंत–आदिपर्व–अध्याय ३० गीति २८-३० पहा.

१. अध्याय १५९ श्लोक २१-२२ पहा. २. अध्याय १६० श्लोक २-१७ पहा. ३. 'हरिलें न वचे सर्वथा' असा अन्य पाठ. ४. शत्रुसैन्य. ५. दोन रेडे. ६. 'महिषी महिष जुंपिजे पंक्ति' असा अन्य पाठ. ७. वरण. ८. अधिक. ९. शेळ्या. १०. शेंकडों. ११. घांस. १२. परका.

तरी मी दरिद्री द्रव्यहीन । राजा दुष्ट निर्दय जाण । सोडवी कोण आम्हुतें ? ॥ ४५ ॥ आम्हां चौघांतेंहि जाण । जिणें मरणें समसमान, । यालागीं चौघें-जणें प्राण । राक्षसातें निवेदूं[1].' ॥ ४६ ॥ [2]कुंती म्हणे, 'ऐक विनंती । प्रगट न बोला कवणाप्रती, । तुमचें अरिष्ट करावया शांती । सामर्थ्य तें मज आहे. ॥४७॥ पांच पुत्र माझ्या पोटीं । त्यांत दुजा सबळ सृष्टीं । तो जाईल राक्षस-भेटी । [3]तुजपालटें जाण पां. ॥ ४८ ॥ मंत्रबळ आंगबळ । उभयशक्ती प्रळयानळ । अन्न वोपोनि क्षेम कुशळ । गृहा येईल जाण पां'. ॥ ४९ ॥ ब्राह्मण म्हणे, 'आपणालागीं । पराचे प्राण लोटणें आगीं, । हा अकीर्तिदोष [4]कर्दम जगीं । स्पर्शों नेदी सर्वथा. ॥ ५० ॥ तीर्थवासी दीन ब्राह्मण । गृहा पातले जे शरण । त्यांचें वोपोनियां देहदान । काय हा प्राण [5]रक्षणें ?' ॥ ५१ ॥ पृथा बोले [6]रहस्य गोष्टी, । 'गुज सांठवी आपुले पोटीं, । [7]मिनल्या राक्षसांच्या कोटी, । मृत्यु नाहीं मत्पुत्रा. ॥ ५२ ॥ मागें वधिले थोर थोर, । आतां असो तें, न बोलों सविस्तर, । राक्षस आणि माझा कुमर । भेटल्या [8]चोज देखसी.' ॥ ५३ ॥ वचन बोलोनि अमृतमय । स्वस्थ केलें ब्राह्मणहृदय, । यावरी पातले पांचही तनय । [9]भिक्षान्नातें घेऊनियां. ॥ ५४ ॥ वृत्तांत परिसोनि मातृमुखें, । भीम म्हणे, '[10]बहुसाल निकें.' । एकांतीं धर्म बोले दुःखें, । मातेप्रती सखेद. ॥ ५५ ॥ 'पारिख्यालागीं स्वपुत्रासी । मृत्यु इच्छीना राक्षसी । तुझी विचार-बुद्धी कैसी ? । त्यागूं म्हणसी कुमारातें. ॥ ५६ ॥ ज्याचेनि बळें आम्हां [11]जीवन । रात्रीं पहुडों सुखसंपन्न, । ज्यातें शकुनी दुर्योधन । मृत्युरूप मानिती. ॥ ५७ ॥ स्वप्नीं चित्रा देखतां लेख । [12]वोथरोनी कौरव मारिती हाक, । ऐसें सुतरत्न अमोलिक । [13]सर्पदंष्ट्रीं खोविसी.' ॥ ५८ ॥ कुंती बोले हास्यवदन, । 'पुत्रा ! बोलसी दीनवदन, । साक्ष देतसे माझें मन । राक्षस तृण भीमासी. ॥५९॥ [14]नागायुतबळ शरीरीं । तुळणें [15]हळुवट [16]वज्रधारी । त्यातें राक्षसभयाची शरीरीं । भूतबाधा कल्पिसी ? ॥ ६० ॥ सुखें असतां ब्राह्मण[17]धामीं । खंडल्या कौरवभयाच्या

१. देऊं. २. अध्याय १६१ श्लोक १-३ पहा. ३. तुझ्याऐवजीं, तुझ्याबद्दल. ४. पाप, चिखल. ५. अध्याय १६१ श्लोक ४-१२ पहा. हा प्रश्नालंकार आहे. ६. गुप्त. ७. मिळाल्या, जमल्या. ८. कौतुक. ९. भिक्षा मागून मिळविलेलें अन्न. १०. फार चांगलें. ११. प्राण. १२. भय पावून, घाबरून. १३. सापाच्या दाढेंत. १४. अध्याय १६२ श्लोक १६-१९ पहा. १५. हलका. १६. इंद्र. १७. गृहीं.

[1]ऊर्मी, । त्याच्या संकटा पुरुषीं तुम्ही । साह्य कैसे न व्हावें ? ॥ ६१ ॥ माझ्या अंकापासूनि तळीं । पडतेक्षणीं जन्मकाळीं । शिळा झाली रांगोळी । अंगभारें [2]येचिया. ॥ ६२ ॥ चिंता [3]अळुमाळ न धरीं चित्तीं, । राक्षस [4]निर्वटेल भीमाहातीं.' । मातृवचनें धर्ममूर्ती । आल्हादला बोलत. ॥ ६३ ॥ म्हणे, 'म्यां पाहिलें तुझें चित्त, । मीही जाणें हा वृत्तांत; । परोपकाराहूनि अर्थ । श्रेष्ठ कोण [6]भूलोकीं [5]? ॥ ६४ ॥ [7]आप पर हा विचार । अधमजनाचा [8]अधमाचार, । उत्तम पुरुषाचा निर्धार । विश्वकुटुंब आपुलें. ॥ ६५ ॥ जें केलें तें बहुत बरवें, । श्रेय मानिलें माझेनि जीवें, । दीन संकटीं रक्षावें । दंड कीजे दुष्टातें. ॥ ६६ ॥ युद्धभिक्षेतें याचितां । पृष्ठी वोडवी कृतांता, । त्या भीमासि राक्षसवार्ता । मशकप्राय मी जाणें.' ॥ ६७ ॥ असो. हरोनि [9]तमिस्रामानू । गगनीं उदेल्या [10]स्वर्भानू । मातृआज्ञेनें [11]भीमसेनू । अन्न घेऊनि निघाला. ॥ ६८ ॥ हर्षयुक्त बैसला रथीं, । शकुन विजय सुचवी पथीं, । ब्राह्मण रहावूनि शीघ्रगती । आपण जाया निघाला. ॥६९॥ षड्रस पक्वान्नें घेऊन, । साठी खंडिया प्रमाण । गाडा भरूनि भीमसेन । बकारण्या पातला. ॥७०॥ विशाळ वनामाजि निरुतें । विजनीं सोडिलें रथातें । म्हैसे पिटितां ग्रामपंथें । पळत नगरा पातले. ॥ ७१ ॥ दीर्घस्वरें दीधली हाक, । म्हणे, 'कवण काक कीं बक । वसे, तेणें आपलें मुख । श्याम कीं गौर दावणें. ॥ ७२ ॥ येतां न येतां मुखाआंतौती । अन्नाविषयीं पडली माती, । आयुष्य सरलें म्हणोनि हातीं । ग्रास तोही लाधेना.' ॥ ७३ ॥ ऐसी गर्जना करूनि जाण । मार्गींच सारिलें संध्यास्नान, । आपण भक्षूं आदरिलें अन्न । उपचाराशीं स्वादिष्ट. ॥ ७४ ॥ हाक ऐकोनि कठोर । कोपें धांवे [12]निशाचर, । अन्न भक्षितां देखोनि क्रूर । [13]प्रळयानळसा [14]धडकला. ॥७५॥ म्हणे, 'म्हैसा दवडिला दुरीं । आणि माझ्या आहारातें स्वीकारी, । कोण हा मूर्ख आपुले करीं । शिर च्छेदी आपुलें ?' ॥७६॥ प्रत्युत्तर नेदूनि मुखें । भोजन [15]सारी यथासुखें, । जेंवि निंदोनि वर्जितां मूर्खें । साधु नेम न सांडी. ॥ ७७ ॥ राक्षस क्षोभला दुर्धर । विक्राळ [16]तुंड पर्वताकार । घरघराटें गगनोदर ।

१. लाटा. २. या भीमाच्या. ३. अणुमात्र. ४. मरण पावेल. ५. हा प्रश्नालंकार आहे. ६. हें वचन 'अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम्' या श्लोकार्थाप्रमाणें आहे. ७. 'साचार' असा अन्य पाठ आहे. ८. यमाला. ९. रात्र. १०. सूर्य. ११. अकारान्त शब्द काव्यग्रंथांत ऊकारान्त करण्याचा अल्प परिपाठ आहे. १२. राक्षस. (बक.) १३. प्रळयसमयींच्या अग्नीसारखा. १४. धांवत आला. १५. करी, संपवी. १६. तोंड.

प्रतिशब्दें गाजवी. ॥ ७८ ॥ दांत खाऊनि करकराटीं । दोन्ही वळोनि वज्रमुष्टी । भीमसेन ताडिला पृष्टीं । सिंह जैसा [1]कुंजरें. ॥ ७९ ॥ तेंही नाणूनियां लक्षा । भीम स्वस्थ भक्षी भक्षा, । मग उपडोनि चंडवृक्षा । भीमा पाठीं ताडिला.॥८०॥ घायें वृक्ष झाला चूर्ण, । भोजनीं न चळे भीमसेन, । मग उचलोनि चंडपाषाण, । पुढतीं तेणें ताडिला. ॥८१॥ तेंही पुष्पाचियापरी । मानूनियां भोजन करी, । संतापोनि उभयकरीं । दक्षिण हस्त [2]कवळिला. ॥८२॥ भीमें पसरोनि [3]वामपाणी । राक्षसहस्त धरिले दोन्ही, । भोजन सारोनि बळखाणी । उभा ठेला सन्मुख. ॥८३॥ म्हणे, 'आतां मजसीं भिडें, । पाहों सामर्थ्य कितुलें गाढें? । नगर पीडिलें त्याचें [4]वोढें । आजि काढीन एकदां.' ॥ ८४ ॥ राक्षस चढोनि [5]तंवका, । भीमहृदयीं मारी [6]थडका; । लत्ताप्रहारें ताडितां खडका- । वरी पडे उताणा. ॥८५॥ पुढती उठोनि सहस्र झाडें । भोवंडोनि मारिले धोंडे, । तितुकीं साहूनि [7]झुंबाडें । जटा मुष्टीं कवळिली. ॥८६॥ वामहस्तें धरूनि केशीं । [8]सव्य [9]न्यासिला कंठप्रदेशीं, । मान मोडितां कासाविसीं । हाक मारी आक्रोशें.॥८७॥मध्यें तोडिजे इक्षुदंड । त्यापरी केला तो [10]दुखंड, । नानानखधारीं प्रचंड । गरुड खंडी सर्पातें. ॥८८॥ वज्र हाणितां निघातें । दुखंड होइजे पर्वतें, । तेंवि मारूनि राक्षसातें । भीम झाला यशस्वी. ॥ ८९ ॥ चूर्ण झालिया [11]अस्थिजाळें । बाहेर पडलीं नेत्रबुबुळें, । मुखीं नासिकीं कर्णबिळें । रक्त वाहे भडभडां. ॥ ९० ॥ यापरी असुर पावला मरणा, । भय सकंप राक्षससेना । नमस्कारून भीमसेना । प्राणदान मागती. ॥ ९१ ॥ 'जे जे भक्षिती माणसें । त्यांसीं दंडीन ययाऐसें, । [12]भूतदया त्यां संतोषें । अभय माझें सर्वदां.' ॥ ९२ ॥ भीमाज्ञा वंदोनि [13]शिसीं । स्वकर्म सांडिलें राक्षसीं, । आप्त होवोनि मनुष्यांसीं । नगरीं वसों लागले. ॥९३॥ चरण धरोनि वामकरीं । प्रेत टाकिलें [14]नगरद्वारीं, । [15]प्रभात होतां नरनारी । पाहों येती कौतुकें. ॥ ९४ ॥ करूनि पादप्रक्षालन । त्रिपदामंत्रें शुद्धाचमन, । प्रवेशोनि [16]ब्राह्मणसदन । मातृचरण वंदिले. ॥ ९५ ॥ नमस्कारूनि ज्येष्ठ बंधु । नमिला ब्राह्मणगृहस्थ साधु, । म्हणे, 'स्वामी! प्रकट शब्दु । सहसा कोठें न

---

१. गजानें. २. पकडिला. ३. डावा हात. ४. उसनें. ५. कोपा. ६. कादण. ७. समुदाय. ८. दक्षिण (हस्त) [वाम=डावा, उजवा नव्हे, 'सव्य' म्हणजे 'डावा' पण येथें 'उजवा' असा अर्थ घेणें इष्ट आहे.] ९. ठेविला. १०. अध्याय १६३ श्लोक २६-२७ पहा. ११. हाडांचा समूह. १२. भूतांची (प्राण्यांची) दया, प्राण्यांवर दया करणें. १३. मस्तकीं. १४. अध्याय १६४ श्लोक ७ पहा. १५. पहांट. १६. ब्राह्मणाचें गृह.

वदावा.' ॥ ९६ ॥ मात विस्तारिली नगरीं । राक्षसप्रेत पडिलें द्वारीं, । पाहों पातल्या नरनारी । कोटीचेकोटी आनंदें. ॥ ९७ ॥ राजा म्हणे, 'जयाचा वार । तयासि पुसावा हा विचार, । कोणें वधिला निशाचर । अतिबळिष्ट बळगाढा'. ॥ ९८ ॥ ब्राह्मण म्हणे, 'घेऊन अन्न । प्रवेशलों राक्षसवन । तंव तेजस्वी तपोधन । मंत्रवादी[1] पातला. ॥९९॥ तेणें मंत्रोनि प्रोक्षितां[2] पाणी । राक्षस निमाला[3] ततक्षणीं, । हें म्यां प्रत्यक्ष देखिलें नयनीं । अत्यद्भुत, राजया ! ॥१००॥ प्रगट दिसत असतां आम्हां । गुप्त झाला नेणवे तुम्हां.' । राजा म्हणे, 'अगाध महिमा । कोण जाणे सिद्धांचा[4] ? ॥ १०१ ॥ राक्षस मारूनि महा क्रूर । पीडेवेगळें केलें नगर । हें तव प्रत्यक्ष दिसे, येरें[5] । काय तें आम्हां नेणवे.॥१०२॥ मुष्टिघातें केलें कंदन । गात्रगात्रीं केला चूर्ण, । मंत्रोनि मारिला हें वचन । कैंवि साचार मानावें ?' ॥ १०३ ॥ नमस्कारोनि ब्राम्हणोत्तमा । गौरवोनि धाडिले स्वाश्रमा,[6] । विशेष **पां**डवांचा प्रेमा । वाढता झाला द्विजातें. ॥१०४॥ बकाख्यान[7] हें सर्वदा । जे परिसती धरूनि श्रद्धा । त्यांचे कुळीं राक्षसबाधा । नाहीं म्हणे श्री**व्यास**. ॥ १०५ ॥ इति श्री**भार**तकथा गहन, । झालें **ब**कासुराचें हनन, । पुढें **द्रौ**पदी **धृ**ष्टद्युम्न । जन्मती तें अवधारा.[8] ॥ १०६ ॥ **मुक्ते**श्वरकवीची वाणी । पादुकारूपें श्री**गुरु**चरणीं । चालतां दिसे पवित्रागमनीं । स्वतंत्र नोहे विचारा.[9] ॥ १०७ ॥

अध्याय एकुणचाळिसावा.

एकचक्र नाम नगरीं । **पां**डव वर्तती ऐसिये परी, । अकस्मात ते अवसरीं । ब्राह्मण एक पातला. ॥ १ ॥ निशा क्रमावयाचे आर्ती । ठाव मागे **या**दवीप्रती[10] । सन्मानूनि परम भक्ती । **धर्म**राजें राहविला. ॥ २ ॥ निशाकाळीं घालोनि शय्या । **पार्थ** स्वहस्तें चुरी पांया, । म्हणे, 'स्वामी ! कवणा ठाया । गमनेच्छा सांगिजे.' ॥ ३ ॥ ब्राह्मण म्हणे, 'सुपवित्रा ! । जाणें नगरा **अ**हिच्छत्रा । **द्रु**पदराज**पृ**षदपुत्रा- । घरीं उत्सव मांडिला. ॥ ४ ॥ **द्रु**पदरायाची नंदिनी, । जिये नाम **या**ज्ञसेनी,[11] । अयोनिज[12] लावण्यखाणी । उपमे आन[13] असेना. ॥ ५ ॥

---

१. मांत्रिक. २. सिंचन करितां. ३. मरण पावला. ४. साधु पुरुषांचा. ५. अन्य. ६. स्वगृहाला. ७. ही फलश्रुति आहे. अध्याय १६६ श्लोक १३-२० पहा. तसेंच मोरोपंतकृत आदिपर्व-अध्याय ३० पहा. ८. निश्चल मनानें ऐका. ९. या अध्यायास 'बकहनन' अशी संज्ञा आहे. १०. कुंतीपाशीं. ११. द्रौपदी. १२. योनीपासून उत्पन्न झालेली नव्हे अशी. १३. अन्य.

हो कां वैकुंठविलासिनी, । अथवा कैलासनगरवासिनी, । दोघींवेगळी उपमा वाणी[1] । देवों नेदी आणिका. ॥ ६ ॥ कुमरी[2] आणी कुमर[3] एक । होमीं प्रसवला पावक[4], । त्यांसी योनिसंभव[5] लोक । सांग कैसे उपमावे[6] ?' ॥७॥ धर्म म्हणे, 'ब्राम्हणोत्तमा ! । अग्नीपासूनि मानुषप्रतिमा । जन्मली हें कौतुक आम्हां । विस्तारूनि सांगिजे.' ॥ ८ ॥ तापस म्हणे, 'सुनिश्चळ । कथा ऐक पवित्र निर्मळ, । श्रवण करितां तत्काळ । फळ पाविजे निर्धारें. ॥ ९ ॥ द्रोणें गांजिला पृषदात्मज[7] । पांडवांहस्तें हरितलें राज्य[8], । त्या अवमानाची धरूनि लाज । संतापला तळमळी. ॥ १० ॥ म्हणे[9], 'ब्राह्मणें[10] कपट पोटीं । धरूनि यश साधिलें सृष्टीं । जळो क्षात्रत्वाची गोष्टी, । तृणासाठीं सरेना.' ॥ ११ ॥ राज्यभोगीं संताप मना, । विषाद वाढला चहूं गुणा, । तपोवनीं तपोधना । मंत्रसिद्धा शोधित. ॥ १२ ॥ भाग्यें भागीरथीचे कूळीं । विस्तीर्ण देखिली ऋषिमंडळी । तपी असती तये स्थळीं । अस्नातक[11] कोणी असेना. ॥ १३ ॥ त्यांमाजी श्रेष्ठत्वें प्रसिद्धु । दोघां मिरवे आचार्यशब्दु, । याज उपयाज[12] सख्खे बंधु । तपस्तेजें आगळे[13]. ॥ १४ ॥ ज्यांचा क्रोध ब्रह्मांड जाळी । कृपा बैसवी सुरेंद्रमौळीं । ऋद्धी सिद्धी पादधुळी- । माजी रुळती सर्वदा. ॥ १५ ॥ ब्रह्मऋषी समसमानू । संहिताध्ययन सांग ज्ञानू । कश्यपगोत्रीं तपोधनू । वरें शापें समर्थू. ॥ १६ ॥ वडिल याज वसे वनीं, । कनिष्ठ उपयाज आश्रम सदनीं, । द्रुपदें येऊनियां चरणीं । लोटांगण घातलें. ॥ १७ ॥ म्हणे[14], 'गा ! तूं अतिसमर्थू, । पुरवीं माझा मनोरथू, । अभय देसी तरी यथार्थू । निवेदीन[15] वृत्तांता.' ॥ १८ ॥ उपयाज म्हणे, 'बोल वचनें, । जरी मानेल माझिया मनें । तरी न शंकिजे चतुराननें[16] । तें मी शक्त करावया.' ॥ १९ ॥ 'समरीं द्रोणातें संहारी । ऐसा पुत्र द्यावा उदरीं, । होय अर्जुना अंतुरी[17] । ऐसी कुमरी दे

---

१. सरस्वती. २. याज्ञसेनी. ३. धृष्टद्युम्न. ४. अग्नि. ५. योनीपासून झालेले. ६. तुलावे. ७. द्रुपदराजा. ८. पृष्ठ ३०३ पहा. ९. द्रुपद म्हणे. १०. द्रोणें. ११. सर्व स्नातकच होते; स्नातक=ब्रह्मचारी. याचे व्रतस्नातक, विद्यास्नातक आणि उभयस्नातक असे भेद आहेत. १२. अध्याय १६७ श्लोक ७८ पहा. १३. श्रेष्ठ. १४. द्रुपद म्हणे. १५. सांगेन. १६. चतुरानन–ब्रह्मदेव. यास चार मुखें आहेत म्हणून यास चतुरानन म्हणतात. त्यांचीं नांवें:—(१) दर्दुरमुख–यानें ऋग्वेद जपतो; (२) अश्वमुख–यानें यजुर्वेद जपतो; (३) जंबुकमुख–यानें अथर्ववेद जपतो; (४) श्वमुख–यानें सामवेद जपतो. यास पांचवें खरमुख होतें तें छिन्न झालें–अशी कथा आहे. १७. स्त्री.

[1]मातें. ॥ २० ॥ इतुका माझा रक्षिलिया मान । [2]अर्बुदसंख्या अर्पीन [3]धन । यावेगळें इच्छील मन । तें मी सर्व पुरविता.' ॥ २१ ॥ ऐसी परिसोनि विनंती । ऋषी आदरें न धरी चित्तीं; । समर्थ जाणूनि [4]अहोरातीं, । सेवा करी सद्भावें. ॥ २२ ॥ लोटल्या एक संवत्सर । कृपें द्रवला [5]करुणाकर, । बोले आज्ञिचें उत्तर । कार्यसिद्धीकारणें. ॥ २३ ॥ 'याज ऋषी वसे वनीं । तपोतेजें जेंवी [6]तरणी । नित्य नेमें [7]संहिताध्ययनीं । विष्णुस्मरणीं सावध. ॥ २४ ॥ असज्जनाचिया स्मरणा । कदां आतळों नेदी [8]रसना, । पवित्र पुरुषाचिया गुणा । श्रोत्रीं वक्रीं वसविलें. ॥ २५ ॥ नेणतां शुद्धाशुद्ध स्थळ । हातीं न शिवे पडिलें फळ, । आचारहीनाचें अन्न [9]अळुमाळ । अवलोकन करीना. ॥ २६ ॥ हेमरत्नादि [10]अनर्घ्य वस्तु । विजनीं पडिल्या न लावी हातु, । तेथें [11]परिग्रहाची मातु । कैंची झगटे तयातें ? ॥ २७ ॥ [12]मधुकरी मागोनि आणिलें अन्न । ब्राम्हण त्यागिती उपेक्षून, । [13]तें भक्षून रक्षी प्राण । स्वादास्वाद नेणतां. ॥ २८ ॥ त्याप्रती जाऊनि विनीतें[14] । निवेदीं आपुलें [15]मनोगत, । तेणें अंगीकारिल्या अर्थ । इच्छिला तो पावसी.' ॥ २९ ॥ शिरीं वंदोनि ऋषीच्या वचना । द्रुपद राजा पातला वना, । दृष्टीं देखोनि [16]तपोधना । केलें चरणां दंडवत. ॥ ३० ॥ उभा देखोनि जोडिल्या हस्तीं । तापस पुसे भ्रूसंकेतीं, । 'कवण कार्याचिये अर्थीं । आगमन या ठाया ?' ॥ ३१ ॥ द्रुपद बोले सद्गतकंठ, । 'मज मस्तकींचा कीर्तिमुकुट । द्रोणाचार्यें हरिला प्रगट । लाज लाऊनि वंशातें. ॥ ३२ ॥ शिष्यबळें जिंकोनि पैज । अवमानूनि हरितलें राज्य, । शब्दशास्त्रीं माझें तेज । निस्तेजिलें धिक्कारें. ॥ ३३ ॥ दीन करोनि सोडिलें सृष्टीं । स्वामीनें घालावें मजला पाठीं, । पुढती यशाचिये पटीं । बैसें ऐसें करावें. ॥ ३४ ॥ विद्याबळ मंत्रबळ । ब्रह्मतेजाचें आगळें बळ, । सर्वांपरींसही सबळ, । मी निर्बळ सर्वार्थीं. ॥३५॥ रणीं वाहे धनुष्य । भार्गवा

---

१. अध्याय १६७ श्लोक ११-१२ पहा. २. दशकोटी. ३. अर्बुद संख्या गाई देईन असें मूळांत आहे, तेव्हां 'गोधन' असा पाठ 'धन'स्थानीं असावा. ४. रात्रंदिवस. ५. करुणेची खाण (आकर). ६. सूर्य. ७. अध्याय १६७ श्लोक १८ पहा. ८. जिव्हा. ९. अल्प. १०. अमोलिक. ११. दानस्वीकार, घेणें. १२. मधुकर म्हणजे भ्रमर. तो जसा प्रत्येक पुष्पांतून थोडथोडा मध आणतो त्या प्रमाणें जो प्रत्येक घरांतून थोडथोडें अन्न आणतो तो मधुकर आणि त्यानें आणलेली सामुग्री ती मधुकरी=भिक्षा. १३. उच्छिष्ट अन्न. १४. नम्र (होत्साता). १५. मनांतील गोष्ट. १६. याज नामक ऋषीला.

तुल्य मिरवे यश । त्याचा करावया नाश । तूंचि एक मी मानी. ॥ ३६ ॥ छेदी द्रोणाचें मस्तक । ऐसा पुत्र द्यावा एक, । पांचाळकुळीं [१]प्रतापार्क । उगवे ऐसें करावें. ॥ ३७ ॥ अर्जुन करावया जामातु । असी बहुसाळ मनीं [२]आर्तु । लक्ष्मीसमान रूपवंतु । कन्यारत्न मज द्यावें. ॥ ३८ ॥ [३]कार्यारंभीं साळंकृत । धेनु [४]अर्पीन अष्टायुत । सवत्स दक्षिणा पट्टकूळासहित । सुवर्णशृंगी साजिऱ्या. ॥ ३९ ॥ फळसिद्धीच्या अवसरीं । एक अर्बुद रौप्यखुरी । दक्षिणा मेरुचिया सरी । सुवर्णभार [४]वोपीनें.' ॥ ४० ॥ गुरुदक्षिणा जनयाचना । करावया उद्योग ऋषीच्या मना, । द्रुपदें करितांच हे प्रार्थना । अत्यादरें स्वीकारी. ॥ ४१ ॥म्हणे, 'मी करीन तुझें काज, । पुत्र देईन अयोनिज, । त्याचेनि हातें भारद्वाज । मृत्यु पावेल निर्धारें. ॥ ४२ ॥ जामात करावया अर्जुन । देईन अनर्घ्य कन्यारत्न, । तेंचि होवोनि कारण । [५]भार फेडील पृथ्वीचा.' ॥ ४३ ॥ द्रोणवधार्थीं प्रतिज्ञा नेम । स्वीकारूनि मांडिला [६]होम, । सांग जाणतां मंत्रागम । तो उपयाज आणिला. ॥ ४४ ॥ सर्व सामुग्रीसीं राया । वना पातली द्रुपदजाया. । पुत्रार्थिनी वंदी पायां । तापसाच्या आदरें. ॥ ४५ ॥ याजें हवनद्रव्य आणिलें, । उपयाजें अभिमंत्रिलें, । हवन करितां नवल झालें, । तें सुकर्णीं आकर्णा. ॥ ४६ ॥ होमाआंतूनि दैदीप्यमान । बालार्कतेजें तेजसमान । कुमर निघाला धृष्टद्युम्न । हेमकवचें मंडित. ॥ ४७ ॥ किरीट कुंडलें चाप तूणीर । अश्वीं जुंपिला रहंवर । दिव्य खड्गमंडित कर । ऐसा कुमर निघाला. ॥ ४८ ॥ हे देखोनि सर्वपांचाळीं । जयजयकारें पिटिली टाळी, । तेणें घोषें [१०]अंतराळीं । मेघचक्रा भेदिलें. ॥ ४९ ॥ [११]वेदीपासाव तेच क्षणीं । कुमारी जन्मली रूपगुणीं । वेदविद्या सुलक्षणीं । लाज लावी [१२]शचीतें. ॥५०॥ [१३]इंद्रनीळकीळरंगी । [१४]नीळसरोजसुवास अंगीं । नित्य नूतन अंगसंगीं । पत्नी पंच पुरुषांची, ॥ ५१ ॥ [१५]अधरप्रवाळ सुरंग । दंतपंक्ती [१६]पद्मराग । [१७]श्वासामोदा भुलले [१८]भृंगें । वोंवाळिती मुखातें. ॥ ५२ ॥ ऐसी प्रगट

---

१. प्रतापसूर्य. २. इच्छा. ३. ही भेट (उपायन) होय, ही कृतकार्यार्थ दक्षिणा नव्हे; कारण रिक्तहस्तें देव गुरु राजा इत्यादिकांचें दर्शन घेऊं नये अशी स्मृति आहे. ['रिक्तपाणिर्न पश्येत राजानं देवतां गुरुम्'.] ४. ओपीन, अर्पीन. ५. पृथ्वीला दुष्ट खळांचा झालेला भार. ६. यज्ञ, याग. ७. मंत्रशास्त्र. ८. माता. ९. रथ. १०. आकाशांत. ११. यज्ञकुंडभूमि. १२. इंद्राणीतें. १३. पाचूच्या खिळ्यासारखा रंग. १४. नीलोत्पलसमगंधा. १५. पोवळें. १६. रत्नविशेष. १७. श्वासाच्या सुवासाला. १८. भुंगा.

होतां नदिनी । घोषें गर्जे आकाशवाणी, । ‘स्त्रियामाजी हे मुखरणी[2] । मनुष्यलोकीं जाणिजे. ॥ ९३ ॥ इचेनि योगें क्षत्रियां अंत, । वाढेल पुरुषांचा पुरुषार्थ, । दुष्टनाशें भारातीत[3] । भूगोळक इचेनीं. ॥ ९४ ॥ पुत्र जन्मला नृपनाथा, । तो द्रोणाचा प्राणहर्ता.’ । हें परिसोनि द्रुपदाच्या चित्ता । परमानंद न सांठवे. ॥ ९५ ॥ वीर्यतेजबळसंपन्न । यालागीं नाव धृष्टद्युम्न,[4] । कन्या अतसीकुसुमवर्ण[5] । म्हणोनि कृष्णा द्रौपदी. ॥९६॥ भविष्यार्थ[6] जाणोनि द्रोणें । कीर्तीलागीं[7] निर्वैरमनें । धृष्टद्युम्न विद्यादानें । समर्थ केला सर्वार्थी. ॥ ९७ ॥ मांडिये बैसऊनि कुमरी । पिता बोले हर्षोत्तरीं, । ‘अर्जुनाची प्राणेश्वरी । स्नुषा पांडुनृपाची. ॥ ९८ ॥ मनें इच्छिलें फळ पाविजे । त्या संतोषा काय तुळिजे, । ज्यालागीं घडे त्यासि दीजे । जीव तोही ओपिता.’ ॥ ९९ ॥ म्हणोनी याज उपयाज दोनी । राजा गौरवी मस्तकनमनीं, । वदला त्याहूनि चतुर्गुणीं[8] । द्रव्यदानीं तोषवी. ॥ ६० ॥ प्रार्थूनि बोले[9] द्रुपदपत्नी, । ‘हेचि आमुचि सख्खी जननी, । ऐसा भांव[10] आपुल्या मनीं । थारे ऐसें करावें.’ ॥ ६१ ॥ ‘हो तैसेंचि’ म्हणोनि वर । मस्तकीं ठेविला अभय कर । तियेकाळीं संभ्रम थोर । दोहींतेंही वर्तला. ॥ ६२ ॥ मग आज्ञा वंदूनि शिरीं, । सवें घेऊनि कुमरकुमरी । राजा प्रवेशला नगरीं । जयानंदें निर्भर[11]. ॥ ६३ ॥ कन्या झालिया उपवर । जनकाहृदयीं वरविचार,[12] । गुणें स्वरूपें अतिसुंदर । ऐकूनि राजे वेधले. ॥ ६४ ॥ द्रुपदरायाच्या अंतरीं । अर्जुनालागीं द्यावी कुमरी, । तव ‘ते भस्मले जोहारीं[13]’ । ऐसें मंत्री बोलिले. ॥ ६५ ॥ रायें मानूनि असंतोष, । क्षणक्षणा सांडी श्वास, । म्हणे, ‘द्रौपदीयोग्य पुरुष । दुजा ऐसा दिसेना.’ ॥ ६६ ॥ पुरोहित वदे प्रत्युत्तर, । ‘जोहारीं वांचले पंच वीर । ऐसें बोलती ऋषीश्वर । सत्य मिथ्या नेणवे’. ॥ ६७ ॥ राजा पडला संशयडोहीं । मग विचार विवरी पाहीं, । ‘घोषें गाजऊनि मही[14] । सैंवरें[15] आतां मांडावें. ॥ ६८ ॥ जरीं वांचले असतील सुभट,[16] । तरीं सैंवरीं होतील प्रगट, ।

---

१. अध्याय १६७ श्लोक ४८-४९ पहा. २. प्रमुख. ३. भारशून्य. ४. अध्याय १६७ श्लोक ५३ पहा. [धृष्ट (प्रगल्भ) आहे द्युम्न (वित्त, बल-शत्रूत्कर्षासहिष्णुत्व) ज्याचें तो धृष्टद्युम्न.] ५. जवसाच्या फुलासारिखा रंग जीचा असी. ६. पुढें होणारी गोष्ट, हा आपला नाशकर्ता होय ही गोष्ट. ७. कीर्तिरक्षण व्हावें आणि द्वेषानें अथवा भयानें विद्यादान केलें नाहीं अशी अकीर्ति न व्हावी यास्तव. ८. चौपट. ९. अध्याय १६७ श्लोक ५१ पहा. १०. मीच हिची माता होय—असा भाव. ११. पूर्ण. १२. योग्य वर पाहण्याचा विचार. १३. अग्नीत. १४. पृथ्वी. १५. स्वयंवर. १६. उत्तम वीर.

दृष्टीं देखतां बरवट। भार्जा[1] करणें अर्जुना.' ॥ ६९ ॥ द्रुपदरायाचे मानसें। निश्चयें नेमूनि ठेविलें ऐसें, । पुढें काय घडेल कैसें। तें शंकर स्वयें जाणे. ॥ ७० ॥ स्वैंवर मांडलेंसें थोर, । शृंगारिले देश नगर, । हिणाऊनि[2] अमरपुर[3]। शोभा रायें आणिली. ॥ ७१ ॥ छपन्न देशींचे राजेश्वर, । शाण्णव[4] कुळींचे राजकुमर। आले, आणि ऋषीश्वर। एक एक पातले. ॥ ७२ ॥ यादवांसीं यादवेश्वर, । प्रद्युम्नादि कृष्णकुमर। पांडव तंव दग्धले, येर। कौरव सर्व पातले. ॥ ७३ ॥ कवणा सभाग्या बैसेल पाटीं? । कवणा माळ पडेल कंठीं? । हें कौतुक पहावया दृष्टीं। इच्छा मातें नेतसे. ॥ ७४ ॥ राजा वांटील धन वसनें, । अश्व कुंजर धेनु रत्नें, । दरिद्र दवडोनि नयनें। समारंभ विलोकूं. ॥ ७५ ॥ [5]तुम्ही दिसतसां तेजस्वी। जेंवी भूतळींचे पांचही रवी, । नकळे प्रारब्धाची ठेवी। भाग्य अभाग्य पुरुषाचें. ॥ ७६ ॥ कौतुक पहावया सहज, । तुम्हींही यावें वाटतें मज; । पुढां वर्तेल जें जें चोज[6]। तें येईल प्रचीती[7]. ॥ ७७ ॥ शुद्ध सप्तमी फाल्गुनमासीं। आजपासोनि सातवे दिवसीं, । जाणें पांचाळनगरासी। महोत्सव पहावया. ॥ ७८ ॥ अर्जुन शोधावया जाण। रायें आड घातला पण, । तालप्रमाण धनुष्यबाण। लोहमुसळासारिखें. ॥ ७९ ॥ मत्स्ययंत्र गगनोदरीं। धनुष्य वाहूनि भेदन करी, । त्यातें वरील राजकुमरी। ऐसें भेरी[8] गर्जती. ॥ ८० ॥ ब्राह्मणी[9]! तुझिया मध्यसुता[10]। दृष्टीं देखतां पांचाळदुहिता। माळ घालील, हें तत्वतां। मद्धृदयीं वाटतसे'. ॥ ८१ ॥ ऐसें करितां अनुवादन। उदया आला सहस्रकिरण[11], । आज्ञा मागोनियां ब्राह्मण। पांचाळदेशा तो गेला. ॥ ८२ ॥ सांगोनि गेलिया ब्राह्मण। आर्ती वेधले पांचैजण. ।

---

१. भार्या. २. खालीं पहायास लावून. ३. अमरावती. ४. शाण्णव कुळींचे राजे. या राजांचीं नांवें एका ठिकाणीं दिलीं आहेत तीं:—अनुज, देवक, पृथु, ऋतुपर्ण, जय, सुभीम, सौवाम, सुमंत, कौंडोण, मंडुक, खुशीक, मार्तंड. कामपतीचे पुत्र सोमवंशी—पद्म, शाम, पृथु, श्रीधर, ब्रह्मज्ञ, चंभक, शार्दूल, नोल, विद्युत्पति, सुरब्रह्म, रघु, मागध, शैल, मान, श्रीपति, शल, नकुल, शैल, भूरथ, यदु, पौंडीक, जघव, मन्मथ, पार्थिव, रंधक, प्रघोष, शशी, दान, सारंग, वज्रदंष्ट्र, देव, मंत्रोद्भव, श्रीपाल, मयुरण्य, सुरसेन, नरहरि, मंडुक, भार्गव, सुग्रीव, सप्तसंधर, चैत्र, धर्म, रिपु, शाश्वत, दान, शाल्मली, जायव, विदर्भ, प्राणनाथ, वैजयंत, पार्थिव, भूरिसेन, पृषद, वासुकी कीर्तिमान, सुवर, गोत्रज, अतिवार, सुदेष्ण, रुक्मरथ, सुरथ, महाराज, अरिमर्दन, प्रीतिनाम, सहस्रजित, चित्ररथ, सीम, आदि, गज, असीमहीधर, श्वेत, सुक्षेत्र, महाविद्वान्, सुविद्वान्, कामद, श्रीधर, प्रजायाल, वेदवार, ध्रुववंश, स्वायंभुमनूचा रघुवंश, वैवस्वतमनूचा जनकवंश, पुरूचा कुरुवंश, यदुवंश, सूर्यवंश, शिवराज. ५. हें ब्राह्मणाचें भाषण आहे. (ओवी १ पहा.) ६. आश्चर्य. ७. अनुभवाला, प्रत्ययाला. ८. नगारे. ९. कुंती. १०. अर्जुना. ११. सूर्य.

कार्या जाती चंचळमन। तें देखिलें जननियें. ॥ ८३ ॥ म्हणे, 'पुत्रहो! चिरकाळ वास। एके ठायीं करितां विरस,। आतां त्यागूनि हा देश। पुढां गंतव्य करावें. ॥ ८४ ॥ देखिल्या ठाया न वचोनि पुढती। जावें **पांचाळ**-देशाप्रती,। **द्रुपद**रायाची संपत्ती। आपुली ऐसी देखाल. ॥ ८५ ॥ वडतील ऋषींचीं दर्शनें,। भुकेलीं तृप्त होतील मनें,। विधिनें जें ज्या कारणें। निर्मिलें तो तें पावेल'. ॥ ८६ ॥ ऐसा विचारी पुत्रभाव। तंव चिंतितां पावे देव,। तैसा योगियांचा रांव[1]। **व्यास**[2] तेथें पातला. ॥ ८७ ॥ पूर्वी नियमिल्या नेमें। दर्शन देतां सर्वोत्तमें। बंधुमातेसहित **धर्मे**। नमस्कारूनि पूजिला. ॥ ८८ ॥ कृपेनें बोले **द्वैपायन**,। 'क्लेशातीत[3] करूनि मन। सांगेन त्या ठाया गमन। साहीजणीं करावें. ॥ ८९ ॥ पूर्वी तपोवनीं नियमें। ऋषिकन्या पवित्र धर्मे। भ्रतारप्राप्तीचिया कामें। तपश्चर्या आचरे. ॥ ९० ॥ तीस तपांतीं द्यावया फळ। कृपेनें पातला **शिव**[4] दयाळ;। 'माग' म्हणतां पांच वेळ। 'दे भ्रतार' बोलली. ॥ ९१ ॥ हांसोनि बोले दयासिंधू,। 'होसील पांचजणाची वधू.'। येरी म्हणे, 'समर्थशब्दू। कोण विपरीत करील?' ॥ ९२ ॥ ते हे **द्रुपदा**ची नंदिनी। जन्म पावली **याज्ञसेनी**,। तुम्हां पांचाजणांची पत्नी। ते होईल निर्धारें. ॥ ९३ ॥ आजिपासूनि सप्तमदिनीं। अंगना जोडेल **याज्ञसेनी**,। अरण्यवासातें त्यजूनी। राजधानीं पावाल. ॥ ९४ ॥ **पांचाळ**पुरा करावें गमन। तेथें भेटती **राम कृष्ण**,। पुढती देईन दर्शन। लग्नकाळीं तुम्हांतें.' ॥ ९५ ॥ ऐसें वदोनि आज्ञावचन। अदृश्य झाला **द्वैपायन**[5];। गृहस्वामीस[6] साहीजण। नमस्कारूनि निघाले. ॥ ९६ ॥ उन्मेषसुवातें झडाडे। **व्यास**-घन बोळला[7] विश्वचाडे,। अवधान देइजे पृथ्वीयेव्हढें। तरीच धारीं वर्षावें. ॥ ९७ ॥ सखोलहृदयाचे सागर। भरोनि उचंबळती अपार,। तेथें स्वयें **इंदिरावर**। ये जळसेतु व्हावया. ॥ ९८ ॥ इति श्री**भारत आदिपर्वणि**। श्रवणसुखाचे गंगाजीवनीं। **मुक्तेश्वरकवीची** वाणी। संकल्प सांगे स्नानार्थ.[8] ॥ ९९ ॥

---

१. राना=राव, राय. २. सत्यवतीसुत. (अध्याय १६९ श्लोक १ पहा.) ३. क्लेशरहित, प्रसन्न. ४. शंकर. ५. व्यास. ६. एकचक्र नगरींत ज्या विप्राच्या घरीं पांडव राहिले होते त्या विप्राला. ७. वळला. ८. या अध्यायास 'धृष्टद्युम्नद्रौपदीसंभव' अशी संज्ञा आहे.

अध्याय चाळिसावा.

पांचही वीर निर्भय चित्तीं । पंथ क्रमितां अहोरातीं, । सोमाश्रयायणतीर्था[1]प्रती । अस्तमानीं पातले. ॥ १ ॥ संध्या सारूनियां सकळीं । पुढां चालिले महाबळी । भीमस्कंधीं पृथा, कैाळी[2] । जेंवी पृष्ठीं नंदीचे[3]. ॥ २ ॥ चंद्रप्रकाशें अर्धरात्री । चालतां लोटली पंथधात्री, । चंद्रअस्त झालिया नेत्रीं । अंधकार दाटला. ॥ ३ ॥ रत्न झांकणें समुद्रीं पडिलें । ब्रह्मांडकरंडा काजळ भरिलें, । विश्वलोचनीं भरोनि उरलें । अपरिमित दशदिशा. ॥ ४ ॥ मायामोहो निबिड[7] जाण । अंध होती जगाचे नयन, । योगी लेऊन ज्ञानांजन । निघती निधानें साधावया. ॥ ५ ॥ कीं निशा नव्हे ते भद्रकाळी । पूजिली नक्षत्रमुक्ताफळीं, । आरती उजळावया करतळीं । दीप अर्जुनें लाविला. ॥६॥ प्रदीप्त करूनि पांवका । करीं घेतली चंड दीपिका । तोच प्रकाश दावीत लोका । पुढां मार्गी चालले. ॥ ७ ॥ दीप तेजाचा आधार । धरूनि पाठिसी चौघे वीर, । चालतां चालतां पवित्र तीर । जान्हवीचें[11] पाहिलें. ॥ ८ ॥ तंव गंगोदकीं खळखळाट । स्त्रीपुरुषांचे कलकलाट, । परिसोनि धर्मराज निकट । म्हणे, 'हें काय विचारा'. ॥ ९ ॥ गंधर्वराज अंगारपर्ण । असंख्य स्त्रियांसहित नग्न । जळक्रीडा सुखसंपन्न । स्वेच्छाचारें करितसे. ॥ १० ॥ सेचल[12] देखोनि मनुष्याचा । गंधर्व बोले उग्र वाचा, । म्हणे, 'मेळ पंचपुरुषांचा । सांगा कवण कवणाचे? ॥ ११ ॥ मागिल्या पायीं सरा परते, । पुढें पातल्या दंडीन हातें, । नग्न स्त्रिया क्रीडती येथें, । काय अंध हो! न देखा! ॥ १२ ॥ यक्षगंधर्वराक्षसां । विभाग पातलीसे निशा । दिवसा व्यापार मा-

---

१. सोमाश्रयायण नामक तीर्थाला. [सोमाश्रय+अयन=चन्द्रधर रुद्र+स्थान] २. भवानी. ३. नंदी हा शिवांश असून शिवाचा द्वारपाळ होय. हा शालंकाय मुनीचा पुत्र. ४. रस्त्याची जमीन, मार्गातील धात्री (पृथ्वी—जमीन). ५. हा देशी शब्द आहे. ६. कज्जल. (अंधकार.) ७.दाट. ८. ज्ञानरूप अंजन. ९. उल्मुक, जळतें लांकूड. [अर्जुन रात्रीं चालला असतां, त्याच्या हातांत प्रकाशासाठीं प्रज्वलित काष्ट होतें—अध्याय १७० श्लोक ४ पहा.] १०. अग्नि. ११. "जन्हुनामक कोणी राजा होता. त्याविषयीं पुराणांत अशी कथा आहे कीं, पूर्वी भगीरथानें गंगेस स्वर्गाहून खालीं भूमंडळावर आणलें असतां, तिचा ओघ जन्हुराजा यज्ञ करीत होता तेथें जाऊन त्या यज्ञास विघ्न आलें, तेणेंकरून त्या राजास राग येऊन त्यानें ती सगळी पिऊन टाकली. पुढें भगीरथानें प्रार्थना केल्यावरून प्रसन्न होऊन त्यानें ती कानावाटे सोडली. यामुळें गंगेस जान्हवी म्हणजे जन्हूची कन्या असें नाम प्राप्त झालें." (पद्यरत्नावली—पृष्ट १७.) १२. चाउल.

णसा । नेमिलासे विधीनें. ॥ १३ ॥ आमुच्या काळामाजी गमन । करावया काय कारण? । आतां रक्षूनियां प्राण । पळा वेगीं माघारें.' ॥ १४ ॥ अर्जुन म्हणे, 'रे पामरा ! । भूतळ नेमिलेंसें भूचरा, । यक्ष गंधर्व निशाचरा । शून्यपंथीं विहारणें. ॥ १५ ॥ [1]शंकरजटागर्भींची कळा । [2]विष्णुपादोद्भव विमळा, । सर्वकाळीं सेव्य सकळां । पवित्र गंगा भूतळीं. ॥ १६ ॥ तीर्थवासीयांचा पंथ । अवरोधोनि बोलसी मस्त, । मार्गतस्करा अनर्थ । तात्काळीक पावसी. ॥ १७ ॥ मार्ग सांडोनि होईं कडे, । आम्हीं गमन केलिया पुढें, । स्त्रियांसहित मागुता क्रीडें । [3]मेंडूकप्राय जळडोहीं.' ॥ १८ ॥ वचनें कोपा चढला भारी । धांवोनि [4]वेंळंबला [5]रहंवरी । [6]गुणीं लाऊनि सहस्रशरीं । पार्थ वेगीं विंधिला. ॥ १९ ॥ उल्का भवंडूनि हातीं । बाण तोडोनि सांडिले क्षिती । चाप सज्जूनियां क्षिती । [7]पावकास्त्र सोडिलें. ॥ २० ॥ तें लागतां ज्वाळावदन । रथ जळोन झाला चूर्ण । तळीं पडला अंगारपर्ण । पार्थ वेगीं धाविन्नला. ॥ २१ ॥ गंधर्व कवळोनियां केशीं । [8]खर्ग ओढिलें हेमकोशीं, । घाव घालावा जंव [9]शिर्शीं । तंव गंधर्वी धांवल्या. ॥ २२ ॥ कुंभीनसी मुख्य जाया । लागली धर्मरायाच्या पायां, । म्हणे, 'पवित्राच्िया राया ! । [10]पतिदान दे आम्हां'. ॥ २३ ॥ धर्म म्हणे, 'अगा ! अनुजा । पतिरक्षणीं प्रार्थिती भाजा, । यातें मारिल्या वीरराजा ! । अति [11]जघन्य आमुतें.' ॥ २४ ॥ पार्थें सोडितांचि हातीं, । स्त्रियांसहित गंधर्वपती । पायां लागोनि पुढत पुढती । स्तुतिवादें गर्जत. ॥ २५ ॥ 'कुबेरमित्र [12]अंगारपर्ण । हें वन माझें क्रीडास्थान । रात्रीं तुमचें आगमन । कोण ऐसें मी नेणे. ॥ २६ ॥ नेणतां घडलें अनुचित, । तें मज क्षमा करणें येथ, । मी अनन्य शरणागत । दास तुमचा अंकित. ॥२७॥ आतां कळला सर्व वृत्तांत । अंतरंगनिकट भृत्य । पांडव जाणतां मनोरथ । पूर्ण झाला सर्वही. ॥ २८ ॥ नारदमुखें जें परिसिलें । तें मज आजि प्रत्यया आलें, । कौरवकुळीं अवतरले । पंच अवतार देवांचे. ॥ २९ ॥ अग्न्यस्त्रें जाळिल रथ । तो जाण पांडवांमाजी पार्थ, । पांडुतनय शक्रसुत । कुंतीगर्भीं

१. अध्याय १७० श्लोक १७-२४ पहा. २. विष्णूच्या पादापासून झालेली. ३. बेडूक. ४. चढला. ५. रथावर. ६. धनुष्याच्या दोरीवर योजून. ७. ज्या अस्त्राची देवता पावक (अग्नि) आहे तें=पावकास्त्र. (अ० १७० श्लो० ३१.) ८. खड्ग. ९. शीर्षी, मस्तकीं. १०. येथें गंधर्वांच्या अनेक बायका असल्याचा उल्लेख आहे, मूळांत फक्त कुंभीनसीविषयींच आहे. (अ० १७० श्लोक० ३५.) ११. नीचत्व. १२. अंगाराप्रमाणें (निखाऱ्याप्रमाणें) तेजस्वी पर्ण (वाहन—रथ) ज्याचें तो. (अध्याय १७० श्लोक ३८ टीका पहा.)

जन्मला. ॥ ३० ॥ आजिपासोनि अंगारपर्णी । हा शब्द सांडिला दवडोन, । चित्ररथ हें अभिधान । लोकत्रयीं मिरवेल. ॥ ३१ ॥ हें अग्निअस्त्र देईं मातें। गंधर्व 'चाक्षुषीविद्या' तूतें । मी देईन, जे देवांतें । न लभे तपें आचरतां. ॥ ३२ ॥ स्वर्गमृत्युपाताळभुवनीं । जें जें कौतुक जिये स्थानीं । तें येथोनि देखिजे नयनीं । येवढें सामर्थ्य विद्येचें. ॥ ३३ ॥ बोधितां शिष्याचिये बुद्धी । अैयना वेगळी नव्हे सिद्धी, । ते तुज तात्काळ शब्दीं । फळे ऐसी करीन. ॥ ३४ ॥ कुत्सितपुरुषातें उपदेश । करितां विद्येसी होय नाश, । धातु पाहूनियां परीस । स्पर्श करिती जाणते ॥ ३५ ॥ ओळखोनियां मैराळा । मग वाढिजे मुक्ताफळा, । तुज जाणल्या सर्वकुशळा । काय लागे सांगणें? ॥ ३६ ॥ हे चैक्षुविद्या गहन । मनूनें सोमासि दीधली जाण, । चंद्रें विश्वावसूचे कर्ण । मंत्रोपदेशीं शोभविले. ॥३७॥ विश्वावसूनें दीधली मातें।तीही कृपेनें देतसें तूतें.'। ऐसें बोलतां पार्थातें । बोध झाला तात्काळीं. ॥ ३८ ॥ पार्थ म्हणे, 'अगा मित्रा ! । घेईं अमोघ अग्निअस्त्रा । ज्याच्या तेजें सैहस्रनेत्रा । धरिलें नवचे लोचनीं. ॥ ३९ ॥ बृहस्पतीनें भारद्वाजातें, । भारद्वाजानें अग्निवेशातें, । अग्निवेशानें गुरुद्रोणातें, । द्रोणें मातें दीधलें. ॥ ४० ॥ तें हें वसो तुझ्या ठायीं.' । ऐसें बोलतां बिंबलें हृदयीं, । जैसें ठेवितां हरीचे पायीं । चित्त राहे भक्ताचें. ॥ ४१ ॥ 'अर्जुना तापत्यनंदना ! । तुवां रक्षिलें माझिये प्राणा, । उचित देईन सर्वज्ञा । तें अंगीकारिलें पाहिजे. ॥ ४२ ॥ पांचाजणा पांचशत । दिव्य अश्व देईन उचित, । ते अंगीकारोनि अभय हस्त । मजमस्तकीं ठेवणें. ॥ ४३ ॥ छेदिलीं वृत्रासुराचीं हाडें । उडालीं वज्रवराचीं खंडें, । तैयापासाव हे घोडे । वज्रप्राय निपजले. ॥ ४४ ॥ ते सुरेंद्रें दीधले मातें, । ते हे तुम्हा देतसें उचितें, । युद्धीं भंगिती शत्रूंतें । मैनोजवी अमूल्य.' ॥ ४५ ॥ अर्जुन म्हणे, 'सुहृदोत्तमा ! । अश्वरत्नें पावलीं आम्हां, । काज मांडल्या संग्रामा-। लागीं

---

१. चाक्षुषीविद्या—तीन जगांतील कोणताही विषय आपल्या चक्षूनें म्ह० नेत्रानें जसा पहावा असें इच्छितों तसा पाहतों म्हणून 'चाक्षुषीविद्या' असें या विद्येचें नांव. हिचें महाभारतांत वर्णन आहे तें:—'यच्चक्षुषा द्रष्टुमिच्छेत्त्रिषु लोकेषु किंचन । तत्पश्येद्यादृशं चेच्छेत्तादृशं द्रष्टुमर्हति ॥.' या विद्येचे योगेंकरून वस्तु कोणत्याही प्रकारची असो, ती पहाणाराला त्याच्या संकल्पानुसार दिसते. २. सहा महिने तपश्चर्या केल्याशिवाय प्राप्त न होणारी अशी विद्या. ३. कापुरुष. ४. हंसा. ५. अध्याय १७० श्लोक ४३ पहा. ६. इंद्रा. ७. त्या वज्राच्या खंडापासून हे घोडे उत्पन्न झाले. ८. अध्याय ११७ श्लोक ५०-५४ पहा.

मागों तुजपासीं. ॥ ४६ ॥ येणें काळें अज्ञातवासीं । आम्ही जातसों गुप्तवेशीं, । यालागीं तुझे तुजपाशीं । स्वल्पकाळ असों दे. ॥ ४७ ॥ आणि तापत्यनंदन-बोला । मातें बोललासी वडिला । याचा अभिप्राय कळला । पाहिजे मज तव मुखें.' ॥ ४८ ॥ गंधर्व म्हणे, 'धनुर्धरा ! । [1]तापत्यनंदनवंशधरा । निरूपण नरेश्वरा ! । निरोपीन परिसिजे. ॥ ४९ ॥ कन्या सूर्याच्या गुणवती । एक सावित्री, [2]दुजी तपती, । तपतीचेनि रूपें [3]युवती । शक्राचीही तुळेना. ॥ ५० ॥ रूप तारुण्य देखोनि नयना । सूर्य म्हणे, 'हे द्यावी कवणा । सोमवंशींच्या सं-वरणा । घडे तरी योग्य दिसताहे.' ॥ ५१ ॥ जीचें परिसोनि लावण्य, । वेधें वेधला [4]संवरण । तपश्चर्या अतिदारुण । तियेलागीं मांडिली. ॥ ५२ ॥ एके दिवशीं परिवारेसीं । वना पातला वनक्रीडेसीं । पर्वताग्रीं लावण्यराशी । तपती देवी देखिली. ॥ ५३ ॥ तिसीं अवलोकितां नयनीं । राजा मूर्छित प-डला धरणीं, । पुढती पाहे सावध होवोनी । तंव ते [5]अदृश्य दिसेना. ॥ ५४ ॥ शोक करितां अति अद्भुत । [6]नावेक प्रगट झाली तेथ, । राजा प्रार्थी तंव ते [7]म्हणत, । 'ऐके माझा विचार. ॥ ५५ ॥ प्रार्थूनियां सूर्यजनका । मागोनि घेईं नरनायका ! । विहिताचार दिसेल लोका । श्लाघ्यकर [8]दोघांतें.' ॥ ५६ ॥ रायें दवडोनि परिवार । तपश्चर्यें बैसला थोर । लोटले सहस्र संवत्सर । देवांचे पैं ते ठायीं. ॥ ५७ ॥ हा परिसोनि वृत्तांत । सूर्यवंशींचा पुरोहित । वसिष्ठ धांवोनि कृपावंत । [9]रायापासीं पातला. ॥ ५८ ॥ [10]अभिप्राय जाणोनि चित्तीं । स्वयें गेला [11]सूर्याप्रती, । भानु प्रार्थूनि नानायुक्तीं । तपती तया मागीतली. ॥ ५९ ॥ आणूनि दीधली संवरणा, । तो आल्हाद बोलवे कवणा? । राजा तिचेनि संगें वना- । माजी क्रीडे रातला. ॥ ६० ॥ तीच्या उदरीं [12]कुरुनामा । तापत्य जन्मला धर्मात्मा, । ज्याचेनि नामें सकळां तुम्हां । कौरव ऐसें बो-लती. ॥ ६१ ॥ तेणें निर्मिलें कुरुक्षेत्र । भूमंडळीं अतिपवित्र, । स्नानदानें

---

१. तपतीवंशोद्भवा (अर्जुना). तपती ही सूर्याची कन्या आणि सोमवंशीय संवरण नामक राजाची स्त्री. हिला वैवस्वती तपती असें म्हणतात. हिची कथा आदिपर्व–अध्याय १७१-१७३ यांत दिली आहे. तपतीचे जे पुत्र ते तापत्य. २. दुसरी. ३. शची. ४. सोमवंशीय राजा, हा सूर्योपासक होता. हा पांडवांपासून अकरावा पूर्वज आणि ब्रह्मदेवापासून चाळिसावा वंशज. ५. अंतर्धान पावे. ६. क्षणभर. ७. अध्याय १७२ श्लोक ४ पहा. ८. मोरोपंत–आदिपर्व–अध्याय ३२ गीति ४३-४६ पहा. ९. संवरणापाशीं. १०. संवरण राजाचा अभिप्राय [तपती पत्नी व्हावी असा.] ११. अध्याय १७३ श्लोक १७-१८ पहा. १२. कुरु हा संवरण+तपती यांचा पुत्र=तापत्य.

निधनीं[१] गात्र[२] । पडल्या कैवल्य[३] रोकडें. ॥ ६२ ॥ द्वादशवर्षें वनाआंत । राजा[४]
गुंतला तपतीसहित । नगरीं दुर्भिक्ष पडोनि बहुत । प्रजा पीडों लागल्या. ॥ ६३ ॥
वसिष्ठ येऊनियां पुढती । राजा[५] आणिला नगराप्रती । पर्जन्य पाडोनियां ज-
गती । दुःखातीत[६] पैं केली. ॥ ६४ ॥ ऐसा सर्वोपरी समर्थ । परोपकारी कृ-
पावंत । वसिष्ठा ऐसा पुरोहित । तुम्हीं[७] अवश्य करावा. ॥ ६५ ॥ समर्थ जोडिल्या
पुरोहित । कायसी दुःखशोकाची मात । जे जे जगीं अप्राप्त वस्त । ते ते लाधे
अवलीळा[८]. ॥ ६६ ॥ जया वसिष्ठाचिये शांती । तुळणें तुळावया लक्ष्मीपती, ।
म्हणोनि ब्रह्मनिष्ठाचे पंक्ती । अग्र मान जयाचा. ॥ ६७ ॥ विश्वामित्र होवोनि
द्वंद्वी[९] । शत पुत्र वधिले क्रोधीं । तरी शांतीचा उदधी । नुचंबळेच सर्वथा.'
॥ ६८ ॥ अर्जुन म्हणे, 'ते कैसी कथा[१०]?' । गंधर्व म्हणे, 'ऐकें आतां । '[११]वसि-
ष्ठाख्यान' भारता- । माजि पवित्र सांगणें. ॥ ६९ ॥ कान्यकुब्जदेशीं[१२] जाण । गा-
धिराजा[१३] बळसंपन्न । विश्वामित्र तयाचा नंदन । जो प्रसिद्ध जाणतसां. ॥ ७० ॥
तो सैन्येसीं क्रीडतां वनीं । वसिष्ठाश्रम देखिला नयनीं । आश्रमा आला, त्याला
मुनी । अतिसन्मानें राहवी. ॥ ७१ ॥ भोजना आवंतिला[१४] सहपरिवारीं । का-
मधेनु वसिष्ठाघरीं । ते प्रसवली षड्रसधारीं । दिव्य अन्नें सोज्वळ. ॥ ७२ ॥
कनकपात्रीं अतिपवित्रें । अमृतअन्नें चित्रविचित्रें । धेनु प्रसवतां विश्वामित्रें ।
चोज[१५] दृष्टीं देखिलें. ॥ ७३ ॥ भोजन करोनि सावकाशीं । विचार विचारी नि-
जमानसीं । म्हणे, 'प्रार्थून वसिष्ठासी । कामधेनू मागावी.' ॥ ७४ ॥ झालिया
तांबूलचर्वण, । वसिष्ठासी करूनि नमन । म्हणे, 'स्वामी! कृपा करून । काम-
धेनु मज द्यावी. ॥ ७५ ॥ इचेनि पालटें[१६] अर्बुद एक । सवत्स धेनू[१७] अपार क-
नक[१८] । देईन, आणि मी सेवक । जन्मवरी स्वामीचा.' ॥ ७६ ॥ हांसोनि बोले
ब्रह्मनंदनु[१९], । 'नित्यनेमाची होमधेनु । स्थापून गेला चतुराननु[२०] । ते केंवी तुज
द्यावी? ॥ ७७ ॥ हे लक्ष्मीची कनिष्ठ भगिनी । अमृतसहोदरनंदिनी । जी उ-
द्भवली समुद्रमथनीं । [२१]देती वस्तु हे नव्हे. ॥ ७८ ॥ जें देणारा देतां नये ।
तें मागल्यानें मागूं नये । तुझी म्हणोनि पवित्र गाये । रक्षीतसों होमार्थ.' ॥ ७९ ॥

---

१. मरणीं. २. देह. ३. मोक्ष. ४. संवरण. ५. अध्याय १७३ श्लोक ४०-४५ पहा. ६. दुःख-मुक्त. ७. पांडवांनीं. ८. सहज, अनायासें, लीलेनें. ९. शत्रु. १०. अध्याय १७५ श्लोक १ पहा. ११. मोरोपंत–आदिपर्व–अध्याय १३ पहा. १२. कनोजदेशीं. १३. राजविशेष. १४. आमंत्रिला. १५. कौतुक. १६. ऐवजीं, बदली. १७. अध्याय १७५ श्लोक १६-१७ पहा. १८. सोनें. १९. वसिष्ठ. २०. ब्रह्मदेव. २१. द्यावयाची.

हृदयीं विवरी[1] गाधिकुमर, । 'आम्हां राजयां कायसा विचार? । आतां करूनि बलात्कार । धेनु नेऊं सर्वथा.' ॥ ८० ॥ भृत्यांसि म्हणे, 'रे! सोडा । धेनु वेगें चालवा पुढां.' । नंदिनी फोडोनि हंबरडा । वसिष्ठातें विचारी. ॥ ८१ ॥ वसिष्ठ म्हणे, 'माझी शक्ती । येणें काळें पावली शांती.' । धेनु होवोनि क्रोधमूर्ती । दूत शृंगीं ताडिले. ॥ ८२ ॥ रोम झाडितांचि पुढती । अंगार[2]-वृष्टी झाली क्षिती, । दंड प्रहारितां दूतीं । अत्यद्भुत वर्तलें. ॥ ८३ ॥ आठही अंगांपासूनि क्रूर । अष्टौपरीचे[3] भ्यासुर[4] । म्लेंच्छ जन्मले ते मार । करिते झाले पैरदळा[5]. ॥ ८४ ॥ एक फिरंगी रक्तवर्ण, । खुरासनी पांडूरवर्ण, । बर्बर जन्मले कृष्णवर्ण । स्थूलघ्राण[6] लंबोष्ठी. ॥ ८५ ॥ त्यांहीं शस्त्र वरून दारुण । त्रासिलें विश्वामित्राचें सैन्य, । कित्येकीं त्यजिले प्राण । पलायमान उरले ते. ॥ ८६ ॥ अवमान पावोनियां फार, । विश्वामित्र प्रवेशे नगर; । म्हणे, 'क्षत्रियाहून[7] थोर । ब्राह्मणतेज आगळें[8].' ॥ ८७ ॥ तपें करूनि अनंत काळें । ब्राह्मणत्व पावला[9] बळें। पुढें वसिष्ठाचिया छळें । काय केलें परियेसा. ॥ ८८ ॥ कल्माषपाद[10] सूर्यवंशीं । अयोध्यापती भाग्यराशी । दैवयोगें दुर्बुद्धि[11] त्यासी । प्राप्त झाली परियेसा. ॥ ८९ ॥ वसिष्ठाचा ज्येष्ठ कुमर । शक्तिनामा ऋषीश्वर । मार्गीं येतां, दंडप्रहर । करोनि म्हणे, 'हो परौता.' ॥ ९० ॥ ढका मारून अंगप्रौढी, । म्हणे, 'भिक्षुका! मार्ग सोडीं.' । शक्ती कोपोनियां

---

१. विचार करी. २. निखाऱ्यांचा वर्षाव. ३. अध्याय १७५ श्लोक ३४-३६ पहा. ४. भयंकर. ५. शत्रुसैन्या. ६. नाक. ७. अध्याय १७५ श्लोक ४५-४६ पहा. ८. श्रेष्ठ. ९. विश्वामित्र तपोबळानें ब्राह्मणत्व पावला. १०. हा इक्ष्वाकुवंशज सुसद राजाचा पुत्र सौसद. या राजाचें नांव कल्माषपाद पडण्याचें कारण—हा एकदां एका राक्षसाचे पाठीस लागला असतां थकून परत आला. तेव्हां त्या राक्षसानें याचा सूड उगविण्याचा बेत केला. नंतर तो राक्षस वसिष्ठमुनींचें रूप धारण करून राजाकडे आला, आणि यास ह्मणाला कीं, 'भोजनार्थ सामिष अन्न सिद्ध कर?' नंतर गुप्तरूपें स्वयंपाकांतील मांस उचलून त्या जागीं नरमांस ठेऊन तो राक्षस निघून गेला. भोजनसमयीं खऱ्या वसिष्ठानें तें कपट जाणून राजास 'तूं राक्षस होशील' असा शाप दिला. तेव्हां क्रोधसंतप्त होऊन राजा वसिष्ठास प्रतिशाप देण्यास तयार झाला. त्यानें शाप देण्यासाठीं हातांत उदक घेऊन अभिमंत्रित केलें, आणि शापोच्चार करणार, इतक्यांत त्याच्या बायकोनें (मदयंतीनें) त्यास खरा वृत्तांत कळवून बोध केला कीं, 'गुरूस शाप देणें उचित नाहीं.' तेव्हां राजानें तें उदक आपल्याच पायांवर टाकिलें. त्यामुळें त्याचे पाय कल्माष (कृष्णवर्ण) झाले. ह्मणून कल्माषपाद असें त्याचें नांव पडलें. ११. विश्वामित्रानें कल्माषपादाच्या (सौसदाच्या) शरीरांत किंकर नामक राक्षसाची प्रेरणा केली आणि त्याकरवीं राजाची बुद्धि मोहित केली. नंतर राजाकरवीं वसिष्ठाचे शक्ति इत्यादि शंभर पुत्र मारविले. [अध्याय १७६ श्लोक ३१-४२ पहा.]

तोंडीं । शाप वदला तात्काळ. ॥ ९१ ॥ म्हणे, 'उन्मत्ता! दुरात्मया । शीघ्र वरीं राक्षसी[1]काया । मनुष्यमांस भक्षूनियां । वनीं वसें चिर[2]काळ.' ॥ ९२ ॥ घेऊनि शापाचें उत्तर । देहीं उद्भवला संचार; । [3]गृहा येतां, एक विप्र । भोजन मागे भुकेला. ॥ ९३ ॥ म्हणे, 'क्षुधिता मज ब्राह्मणा । मृगमांस द्यावें भोजना.' । 'निकें' म्हणूनि आणूनि सदना । वना गेला मांसार्थी. ॥ ९४ ॥ [4]मृग मारूनियां वनीं । [5]राजा प्रवेशला सदनीं, । [6]कुटुंबेसी भक्षितां मनीं । आठवण नाहीं विप्राची. ॥ ९५ ॥ अर्धरात्री लोटल्या पूर्ण । अवचीत झाली आठवण, । येऊनि पाहे तंव ब्राह्मण । [7]क्षुधातुर तिष्ठत. ॥ ९६ ॥ पाककर्त्यां करी आज्ञा, । 'ब्राह्मण बोलवा भोजना.' । ते म्हणती, 'जी सर्वज्ञा! । मांस नाहीं संग्रहीं. ॥ ९७ ॥ आणिलें तें भक्षिलें सकाळीं । अर्ध निशा लोटली येकाळीं, । आमचा यत्न इयेवेळीं । चाले ऐसा दिसेना.' ॥ ९८ ॥ [8]रात्र गुज सांगे तयांतें, । 'तस्कर घातले शूळावरते । त्यांचीं आणूनि [9]पिशितें । पाक करोनि वाढावा.' ॥ ९९ ॥ त्यांहीं आणोनि नरशुद्धीं । पचवूनि वाढितां आली गंधी, । ब्राह्मण क्षुधित महाक्रोधी । शाप वदला तात्काळ. ॥ १०० ॥ म्हणे, 'पापिष्ठा दुर्जना! । नरमांस कैंवी दीधलें भोजना? । ब्रह्मराक्षस होओनि वना- । माजी विचरें चिरकाळ.' ॥ १०१ ॥ तंव [10]तो होवोनि ब्रह्मराक्षस । राज्य त्यागूनि अरण्यवास । करिता झाला भ्यासुर वेश । स्वीकारूनि ते काळीं. ॥ १०२ ॥ तेथें विश्वामित्र [11]सौक्षपेसीं । वनीं भेटोनि [12]राक्षसासी । [13]पुरोहित होओनि त्यापासीं । अहर्निशी राहिला. ॥ १०३ ॥ पत्रें पुष्पें फळें मुळें । न्यात्रयासी शिष्यमेळें । वनीं विचरतां शक्ति काळें । विश्वामित्रें देखिला. ॥ १०४ ॥ राक्षसातें [14]दावी करीं । म्हणे, '[15]हा तुझा मुख्य वैरी । जेणें शापूनि वनगव्हरीं । दशा [16]ऐसी भोगविली'. ॥ १०५ ॥ राक्षसें धांवूनि धरिलें त्यातें । जेंवि व्याघ्रें क्षुद्रमृगातें । मारूनि भक्षिला कृतांतें । मांसरक्तें संतृप्त. ॥ १०६ ॥ [17]शत पुत्र याचि प्रकारें । विश्वामित्रें दावितां करें । तितुके भक्षिले [18]निशाचरें । [19]उर्वारुकफळप्राय. ॥ १०७ ॥ तेणें दुःखें वसिष्ठऋषि । वेगें

---

१. देह. २. अध्याय १७६ श्लोक १३-१४ पहा. ३. कल्माषपादगृहा येतां. ४. 'मांस मेळवुनी वनीं । लगबगां प्रवेशे सदनीं' असा अन्यपाठ. ५. कल्माषपाद. ६. कुटुंबासह. ७. क्षुधा+आतुर=भूक+पीडित. ८. रात्र. ९. मांसें. १०. कल्माषपाद. (सौदास नृपति.) ११. उत्कंठेनें. १२. राक्षस झालेल्या कल्माषपादाला. १३. गुरु. १४. विश्वामित्र दावी. १५. शक्ति. १६. राक्षसत्वप्रापक. १७. वसिष्ठाचे शत पुत्र. १८. राक्षसरूप कल्माषपादें. १९. कांकडीसारिखे.

निघाला देहत्यागासी । जळप्रवेश करितां त्यासी । सरिता कोणी न घेती. ॥ १०८ ॥ त्या येऊनि लागती पायां । म्हणती, 'सर्वज्ञाच्या राया ! । ब्रह्मांडासी लटिकी माया । तूं सर्वांसी सांगसी.' ॥ १०९ ॥ शतद्रु विपाशा ऐसिया । विशाळ सरिता पुण्यतोया । धरातळीं वहाती, राया ! । वसिष्ठवरें अद्यापी. ॥ ११० ॥ पडणीं न पडवे पर्वता । दहन न करवे वन्हिनाथा । म्हणती, 'वसिष्ठा ! भगवंता ! । दीना आम्हां संरक्षीं'. ॥ १११ ॥ देह त्यागावया पुढती । वसिष्ठ निघाला मध्यरात्री । मागें मागें महासती । शक्तिभार्या जातसे. ॥ ११२ ॥ वसिष्ठ जात असतां त्वरें । तंव वेदघोष दीर्घस्वरें । पाठीसीं ऐकोनि माघारें । उभा राहे विलोकीं. ॥ ११३ ॥ अदृश्यंती देखोनि पाठीं । मोहें कवळूनियां पोटीं । म्हणे, 'दुहिते ! वेदबोभाटी । कोण गर्जे काननीं?' ॥ ११४ ॥ येरी म्हणे, 'शक्तिकुमर । माझे उदरीं पराशर । त्याचे मुखींचा महास्वर । संहितापदक्रमोक्ती.' ॥ ११५ ॥ होतां संततीचा भरंवसा । क्षणें विसरला सर्वक्लेशा । पावोनियां परमहर्षा । निजाश्रमा परतला. ॥ ११६ ॥ परतोनि येतां वसिष्ठातें । कौशिकें दाविलें राक्षसातें । मुख पसरोनि ग्रासावयातें । धाविन्नला सत्वर. ॥ ११७ ॥ स्नुषा भयें झोंबली कंठीं । तीतें कवळोनियां पोटीं । उदक मंत्रोनि अंजुळीपुटीं । राक्षस पृष्ठीं ताडिला. ॥ ११८ ॥ तेणें होऊन शापमुक्त । स्मृती पावोनि विचारवंत । वसिष्ठचरणा दंडवत । करिता झाला साष्टांगीं. ॥ ११९ ॥ राक्षसदशेची काळिमा । फिटोनि आंतला मनुष्यप्रतिमा, । म्हणे, 'श्रीगुरु ! तुझा महिमा । एकवाचा न वदवे.' ॥ १२० ॥ पुत्राविषयीं मागतां वर, । वसिष्ठें माथां ठेविला कर, । नगरा आणोनि राजेश्वर । राज्यपदीं स्थापिला. ॥ १२१ ॥ कल्माषपाद रा-

---

१. नद्या. २. (संसाररूप) पाशच्छेद करणारी म्हणून विपाशा. ३. पवित्रजला. ४. मोरोपंतकृत आदिपर्व–अध्याय ३३ गीति ५३-५६ पहा. (काव्यसंग्रह पृ० १७६.) ५. हिचें नांव अदृश्यंती. ६. याचा कर्ता 'वसिष्ठ' अध्याहृत आहे. ७. कल्माषपादातें. ८. सून. (अदृश्यंती.) ९. पावला. १०. पुत्र मिळावा असा वर कल्माषपादानें मागितला असतां [कल्माषपादानें राक्षसावस्थेंत एका ब्राह्मणास खाऊन टाकिलें. तेव्हां त्याच्या स्त्रीनें 'तूं मदयंतीशीं संग करतांच मरशील' असा शाप दिला. त्यामुळें त्याला स्वस्त्रीसंग करतां येईना. तेव्हां त्यानें वसिष्ठाची आराधना करून पुत्ररूप वर मागितला. मुनीनें प्रसन्न होऊन राजस्त्रीशीं दिव्य विधीनें संग करून पुत्र उत्पन्न केला. अश्मक हें त्याचे पुत्राचें नांव. हा गर्भांत सात वर्षें राहूनही बाहेर निघेना, तेव्हां मदयंतीनें अश्मा (दगड) घेऊन त्यानें कुक्षिविदारण करून त्या गर्भास बाहेर काढलें, म्हणून त्यास अश्मक हें नांव पडलें.]

क्षसपणीं । आहारालागीं फिरतां वनीं । मैथुन करितां [1]तापसें दोन्हीं । राक्षसेश्वरें देखिलीं. ॥ १२२ ॥ [2]पुरुष धांवोनि धरिला [3]तेणें । स्त्री प्रार्थितां न सोडी प्राणें, । मारून भक्षितां दारुणें । शापवचनें [4]ते वदली. ॥ १२३ ॥ म्हणे, 'राक्षसा! दुर्जना! । मैथुन करितां पावसी मरणा । यालागीं सूर्यवंश जाणा । तुजपासाव खंडला. ॥ १२४ ॥ वसिष्ठसंतती नेली क्षया । यालागीं तुझी [5]क्षिती राया! । वसिष्ठ निक्षेपूनि वीर्या । वंश तुझा वाढवील.' ॥१२५॥ शाप वदोनि राक्षसासी । आपण प्रवेशली [6]हुताशीं । वंशवृद्धी सूर्यवंशीं । शून्य झाली यास्तव. ॥ १२६ ॥ यालागीं [7]मदयंतीच्या उदरीं । रायें प्रार्थिलियावरि । वसिष्ठें आपल्या वीर्यकरीं । अश्मक राजा जन्मविला. ॥१२७॥ द्वादशवर्षें थांबला उदरीं । प्रसूत नोव्हे कवणेपरी । दगड ताडितां कुशीवरी । तेणें प्रसूति पावली. ॥१२८॥ यालागीं अश्मक हें नाम । ठेऊनि केला बहु संभ्रम । सूर्यवंश वाढता धर्म । वसिष्ठाचा जाण पां. ॥ १२९ ॥ अवगुण सांठवूनि पोटीं । सौदास स्थापिला अयोध्यापदीं । ऐसा निर्मत्सर सृष्टी । दुजा दावी अर्जुना! ॥ १३० ॥ वसिष्ठ स्वाश्रमा पातला । अदृश्यंतीये [9]पुत्र झाला । तो पराशर हरिहरकपिला । तुल्य तेजें प्रतापी. ॥ १३१ ॥ खेळतां संगियां सांगातें । '[10]तांत' म्हणे वसिष्ठातें, । हें ऐकोनि दीर्घरोदनातें । माता करी आक्रोशें. ॥ १३२ ॥ कारण पुसतां जननीसी । ते म्हणे, 'पिता तुझा शक्तिऋषी । तो वनीं भक्षिला राक्षसीं । [11]पितामह वसिष्ठ.' ॥ १३३ ॥ ऐकोनि कोपला सुपुत्र, । म्हणे, 'मी करीन राक्षससत्र । त्रैलोक्यींचे राक्षस समग्र । भस्म करीन [12]हुताशीं.' ॥१३४॥ म्हणोनि आपुले निजसामर्थ्यें । मंत्रसिद्धी [13]आगमोक्तें । याग करितां राक्षसातें । महाप्रळयो मांडिला. ॥ १३५ ॥ वसिष्ठ येऊनि [14]पौत्रांप्रती । स्नेहें आदरें धरूनि हातीं, । म्हणे, 'बापा! धरीं शांती । कोप सांडीं सर्वथा. ॥ १३६ ॥ प्रारब्ध भोगवी सुखदुःखा । तो बोल नाहीं आणिका, । अन्यायें वर्तती त्यां देखा । शिक्षा करिता ईश्वर. ॥ १३७ ॥ इतिहास एक तेथ । कृतवीर्य राजा, पुरोहित । [15]भृगुवंशज, अपरिमित । सुखसंवादें वर्ततां. ॥ १३८ ॥ वडील राजे पावल्या [16]निर्धन, । संतती झाली द्रव्यहीन । [17]ब्राह्मणांसी म्हणती, 'व-

---

१. एक विप्रदंपत्य. २. दंपत्यांतील पुरुष. ३. कल्माषपादानें. ४. स्त्री. ५. पृथ्वीरूप स्त्री. ६. अग्नींत. ७. ही कल्माषपादाची पत्नी. ८. वसिष्ठासारखा दुसरा. ९. पराशर. १०. मोरोपंतकृत आदिपर्व—अध्याय ३३ गीति ७०-७२ पहा. (काव्यसंग्रह पृ० १७८.) ११. बापाचा बाप. (आजोबा.) १२. अग्नींत. १३. शास्त्रोक्तें. १४. नातवाला. १५. भृगुमुनीच्या कुळांत जन्मलेला. १६. मरण. १७. पुरोहितांला.

डिलीं धन । तुमच्या घरीं ठेविलें.' ॥ १३९ ॥ तींहीं वाहूनियां आण । स्वल्प कांहीं दिधलें धन, । राजदूतीं करितां खनन । वित्त अपार निघालें. ॥ १४० ॥ तोच लावूनि अपराध । केला विप्रांचा शिरच्छेद, । धाकें ऋषिभार्यांचें वृंद । पळों सैरां लागलें. ॥ १४१ ॥ नग्न शस्त्र घेऊनियां मुष्टीं । कृतवीर्य लागला तयांपाठीं, । एक स्त्रियेचा संकटीं । गर्भ पोटीं गळाला. ॥ १४२ ॥ तो एक-वर्षावधी । धरूनि राखिला जानुसंधीं । त्यावरी सतीया महाक्रोधी । पृथ्वीवरी टाकिला. ॥ १४३ ॥ गर्भ टाकितांचि धरणीं । जेंवि उगवले सहस्र तरणी । तेज देखतांचि नयनीं । अंध झाले क्षत्रिय. ॥ १४४ ॥ तो और्वनामा ऋषी-श्वर । तपश्चर्ये बैसला थोर, । कृतवीर्याचा वंशतरुवर । जाळावया साक्षेपें. ॥ १४५ ॥ हें ऐकूनि पूर्वज तेथें । विमानस्थ पातले वरुते । म्हणती, 'और्वा! आम्हुतें । कृपादृष्टी विलोकीं. ॥ १४६ ॥ क्रोधें पाविजे संताप । क्रोधें नाशे आपुलें तप, । आतां होवोनि सकृप । नेम सांडीं मांडिला. ॥ १४७ ॥ नेण-तियें निरंतर चुकावें । तें जाणतियानें क्षमावें, । आतां यजमाना रक्षावें । कृत-वीर्या आपुले.' ॥ १४८ ॥ स्तवनें तोषली और्वमाता । चक्षुर्दानें ओपिलीं समस्तां । ब्राह्मणहृदया आंतौता । क्रोध न धरवे चिरकाळ. ॥ १४९ ॥ क्रोध सांडिला सागरीं । तो वडवानळ अद्यापवरी । जळ प्रासी समुद्रोदरीं । नित्य द्वादश योजनें. ॥ १५० ॥ तैसी क्षमा करोनि बापा! । सांडी हृदयींच्या कोपा, । जे जे करिती जया पापा । ते ते त्यांचीं फळें भोगिती.' ॥ १५१ ॥ पितामहाचीं उत्तरें । अव्हेरून पराशरें । राक्षससत्र मांडिलें त्वरें । निजसामर्थ्यें आपुलिया. ॥ १५२ ॥ तेथें राक्षसांचिया थाटी । एकसरें कोट्यानकोटी । पावकीं रिचवोनि पाठोपाठीं । भस्म झालें असंख्य. ॥ १५३ ॥ एकमेका क-

---

१. स्वैर, स्वच्छंद. २. मांड्यांमध्यें. ३. सूर्य. ४. और्व नामक ऋषि. (ऊरु म्ह० मांडी, ती-पासून झालेला तो और्व.) भार्गव कुळांतील स्त्रीपुरुषांस कृतवीर्य राजाच्या वंशांतील राजांनीं द्रव्या-निमित्त बहुत पीडा दिली. परंतु त्यांचें कोणीही निवारण केलें नाहीं; यास्तव या भृगुकुलज और्वमुनीला फार कोप आला, व सर्व लोकांचा विनाश करावा म्हणून यानें उग्र तप केलें. त्याच्या प्रभावानें स-र्वांस पीडा करण्यास समर्थ असा भयंकर अग्नि उत्पन्न झाला. तो सर्वांस जाळूं लागला. ते सर्व लोक त्याच्या पितरांस शरण गेले. तेव्हां त्यांनीं येऊन और्वास उपदेश केला आणि त्याचा कोपानल त्याकरवीं समुद्रांत टाकविला. (महाभारत–आदिपर्व, अध्याय १७९-१८०.) ५. और्वाचे पूर्वज. ६. मोरोपंत–आदिपर्व, अध्याय ३३ गीति ७५-८२ पहा. (काव्यसंग्रह पृ० १७९.) ७. हे पराशरा! ८. न मानून. ९. समुदाय. १०. एकदम. ११. अग्नींत. १२. रिक्त होऊन, पचवून, ओतून.

वळिती करें । मुखें गर्जती करुणास्वरें । सहवर्तमान दाराकुमरें । भस्म झाले [1]हुताशीं. ॥ १९४ ॥ पाताळींचे उसळोनि येती, । स्वर्गींचे उलंडोनि पडती, । [2]मंदेहादि अनेक जाती । तये सत्रीं भस्मले. ॥ १९५ ॥ देखोनि राक्षसांची शांती । [3]पुलह [3]क्रतु आणि [3]पुलस्ती । विमानीं येऊनि बद्धहस्तीं । प्रार्थना करिती ऋषीची. ॥ १९६ ॥ 'कृपादृष्टी आमुतें पाहीं, । राक्षसांचा अपराध नाहीं, । विश्वामित्रनिमित्त कांहीं । विचार धरीं सुजाणा! ॥ १९७ ॥ शक्तीसहीत एकशत । वैकुंठवासी विष्णुभक्त । ब्रह्मानंदें नित्य क्रीडत । त्यांचा खेद कां करिसी? ॥ १९८ ॥ वसिष्ठसंतती जीववूं पहासी । आणि आमुचें निसंतान करिसी । हा परमार्थ कोणदेशीं । मिरवणें सांग पां? ॥ १९९ ॥ तुमचा तुम्हांमाजी कलहो । नेणोनि पावलासी मोहो । जाळोनि राक्षसांचा समूहो । निमित्त वायां घेतलें.' ॥ १६० ॥ बोधोनियां [4]वसिष्ठपौत्रा । पूर्ण करविलें राक्षससत्रा, । जाळूं शके ब्रह्मांडपात्रा । ऐसा वन्ही जो उरला. ॥ १६१ ॥ तो हिमालयपैलभागीं । स्वसामर्थ्यें टाकिला वेगीं । तो अद्यापि धडके आंगीं । भक्षण करी वृक्षांचें. ॥ १६२ ॥ संस्थापूनि वंश दोन्ही । यश पावला वसिष्ठमुनी । ऐसा विचारूनि गुणी । पुरोहित [5]तुम्हीं करावा. ॥ १६३ ॥ [6]ऐसें [7]वंदोनि प्रीतिमेळीं । अश्व करून सांभाळीं । सुहृदभावें हृदयकमळीं । समसमान उभयतां. ॥ १६४ ॥ तापत्य वसिष्ठ आणि और्व । कथिलीं आख्यानें अपूर्व । आज्ञा मागोनि गंधर्व । जाता झाला स्वस्थाना. ॥ १६५ ॥ चौघे बंधूसहित माता । उत्कोचनाम उत्तमतीर्था । धर्म पातला भगवंता । भेटावया धौम्यातें. ॥ १६६ ॥ त्याचें घेऊनियां दर्शन । देऊन पुरोहिताचा मान । त्यासही सांगातें घेऊन । पांचाळपुरा चालले. ॥ १६७ ॥ आतां द्रौपदीसैंवरीं । कथा वर्षेल अमृतधारीं । चातक होवोनियां चतुरीं । श्रवणद्वारीं सेविजे. ॥ १६८ ॥ साक्ष करोनि विश्वंभर । श्रोतयां विनवी मुक्तेश्वर । कथाश्रवणीं अत्यादर । कृपेनें केला पाहिजे. ॥ १६९ ॥ इति श्रीभारत आदिपर्वणि । कथागंगा जगतारिणी । श्रवणसुस्नात क्षाळणी । महादोष नासती. ॥ १७० ॥

---

१. अग्नींत. २. मंदेह नांवाचे दैत्य. हे अर्घ्याचे पाण्यानें मरण पावतात व नंतर सूर्याचा उदय होतो. (मोरोपंत–विराटपर्व, अध्याय ३ गीति ११२.) ३. हे सृष्टिकर्ते ब्रह्ममानसपुत्र महर्षि होत. ४. पराशरा. ५. पांडवांनीं. ६. या अध्यायास 'तापत्यवसिष्ठौर्वाख्यान' अशी संज्ञा आहे. यांत मूळांतील चौदा (१७०-१८३) अध्यायांचा अंतर्भाव झाला आहे. ७. 'वंदोनि' या क्रियापदाचा अध्याहृत कर्ता 'चित्ररथ गंधर्व' होय. ८. 'अन्नदानें प्रीतिमेळीं' असा अन्य पाठ.

अध्याय एकेचाळिसावा.

मार्गी चालतां पांचहीजण । महालाभ सुचविती शकुन । संगीं मीनले[1] बहु ब्राह्मण । सैंवरा जाती कौतुकें. ॥ १ ॥ पंथ क्रमितां तये मेळीं । पुढां विस्तीर्ण वृक्षातळीं । व्यास देखिला, चंद्रमौळी[2] । भेटे जैसा तपांतीं. ॥ २ ॥ त्यासी नमस्कारोनि राजा । अरण्यपुष्पीं बांधिली[3] पूजा, । संकेत बोधी तनुजात्मजा[4] । 'भेटी होईल सैंवरीं[5]. ॥ ३ ॥ तेथें बोलों सावकाशें । गमन करावें मनोल्हासें.'। पंचबंधु पृथेसरिसे[6], । पांचाळपुरा पातले. ॥४॥ पाहतां मेदिनी[7] रिक्त कैंची? । शिबिरें उभविलीं बहु रायांचीं । आकाशपृथ्वीवरी वाद्यांची । एक ध्वनी नसमाय. ॥ ५ ॥ पूर्वउत्तरधराचक्रीं । गोपुरें रचिलीं चित्रविचित्रीं । डोल्हारे मंचक हेमसूत्रीं । ध्वज पताका झळकती. ॥ ६ ॥ कुंकुम[9] कस्तूरी हरिचंदन । सडे घातले समसमान । सुमनें[10] विखुरलीं सघन[11] । बकुळ चंपक शेंवती. ॥ ७ ॥ पद्मरागाचीं तोरणें । स्तंभ मढिले दिव्यसुवर्णें । सैंवरमंडपीं तारांगणें[12] । नक्षत्रमाळा शोभती. ॥ ८ ॥ चैत्यें[13] हिरियाचे अनेक, । माणिकांचे माणिकचौक, । मध्यें यंत्रें[14] अलौकिक । जे कां अटक सुरनरां. ॥ ९ ॥ पूर्वें थोकलें[15] कौरवभार,। पश्चिमे यादव यादवेश्वर । अगस्तिदिशा[16] आणि उत्तर । अनेक राजे व्यापिले. ॥ १० ॥ नवखंड आणि सप्तद्वीप[17] । छपन्नदेशींचे महाभूप । ऐश्वर्येसीं[18] पातले[19], रूप[20] । पांचाळीचें परिसोनी[21].॥ ११ ॥ यक्ष गंधर्व सिद्ध चारण । विमानीं दाटले सुरगण[22], । माळा[23] पडतां, सुमनें[24] घन । वर्षावया आवडी. ॥ १२ ॥ मध्यकक्षेच्या मंडळीं । बैसल्या ऋषीश्वरांच्या ओळी । धर्मराज बंधुमेळीं । तयां पाठीं बैसला. ॥ १३ ॥ सकळां आवेश न धरवे पोटीं, । म्हणती, 'कलहकारण

---

१. मिळाले. २. शंकर. ३. पूजा बांधणें=फलपुष्पादिकांनीं पूजा करणें, देवावर फळें पुष्पें इत्यादिकांची विशेष रचना करून देवास पोषाक इत्यादि देणें. ४. पंडुपुत्रा. (धर्मा.) ५. स्वयंवरीं. ६. पृथेबरोबर. ७. पृथ्वी. ८. पृथ्वीमंडळावर. ९. केंशर. १०. पुष्पें. ११. विपुल, दाट. १२. तारांगण=आकाश. १३. घरें, मंडप. १४. राधायंत्र. [श्रीमदमरचंद्रसूरिप्रणीत बालभारत—आदिपर्व, सर्ग ५ श्लोक ९२ यांत 'यः कश्चन स्पृहयति द्रुपदात्मजायै राधां स विध्यतु धनुर्धरधैर्यधुर्यः' असें वर्णन आहे. काव्यमाला—पृ० ६२.] १५. स्थिर झाला. १६. दक्षिणदिशा. [अगस्त्य आग्नेयकोणाच्या दक्षिणेस उगवतो म्हणून दक्षिणदिशा असा अर्थ. शंकर बाळकृष्णकृत ज्योतिर्विलास पृ० १९ पहा.] १७. 'जंबूप्लक्षाह्वयौ द्वीपौ शाल्मलश्चापरो द्विपः । कुशक्रौञ्चौ तथा शाकः पुष्करश्चैव सप्तमः ॥' इति विष्णुपुराणे. १८. ऐश्वर्यासह. १९. आले. २०. सौंदर्य. २१. परिसणें=परिश्रवणें. २२. देवगण. २३. द्रौपदीची माळा. २४. पुष्पें.

दृष्टी । पडतां चमत्कार सृष्टी । करोन कांहीं दावणें.'[१] ॥ १४ ॥ भार्गवशाळें[२] आंतौता । ठाव मागोनि ठेविली माता । चौघे बंधु ज्येष्ठ भ्राता । रंगमंडपा पातले. ॥ १५ ॥ 'झाडूं कौरवांच्या पाठी । प्रगट करूं जातुषाची[३] कुटी । उगाळूनि पृथ्वीतटीं । चंदन[४] करूं शल्याचें. ॥ १६ ॥ उघडूं कर्णाचीं टाळीं । पाय देऊं भूपाळमौळीं, । प्रतापें जिंणोनि[५] पांचाळी । लाज लावूं समस्तां. ॥ १७ ॥ कवण कवण पातले क्षेत्री[६] । कैसा यंत्रभेद करिती यंत्रीं । पंर्णू[७] म्हणती पांचाळपुत्री । तें नावेक[८] विलोकूं.' ॥ १८ ॥ वेढोनियां वल्कलाजिनें[९] । विभूती[१०] चर्चिली शुभ्रवर्णें, । परी तो सूर्य व्योमवसनें[११] । आच्छादिला न लोपे. ॥ १९ ॥ बैसले ऋषीश्वरांचे पाठीं । कौतुक अवलोकिती सिंहदृष्टी । असंख्य नृपाचिया थाटीं[१२] । शृंगारोनि चालती. ॥ २० ॥ वैतालिक[१३] नट नर्तक । सूत मागध[१४] नियोधिकें[१५], । ब्राह्मणादि वर्ण असंख्य देख । विद्यापात्रें[१६] पातलीं. ॥ २१ ॥ रत्नें सुवर्णें आणि अन्न वसनें । याचकइच्छेनें दिधलीं दानें । षोडशदिवसपर्यंत ज्याणें । तृप्ति केली समस्तां. ॥ २२ ॥ याज्ञसेनाची संपत्ती । देखोनि ऋषी आश्चर्य करिती, । म्हणती, 'कुबेर आणि अमरपती[१७] । उणा यासीं अपाडें.'[१८] ॥ २३ ॥ ऐसिया स्वयंवरमंडपीं राजे । यंत्र भेदावयाचे पैजे । जिंकावया द्रौपदी भाजे[१९] । उतावळे सर्वही. ॥ २४ ॥ द्रुपद म्हणे कौतुकें, । "धृष्टद्युम्ना ! पुत्रा ! ऐकें, । द्रौपदी आणावी रंगभूमिके । समय आहे शपथेचा.'[२०] ॥ २५ ॥ यांसी[२१] म्हणती नरनायक । 'परी हे आमुचे याचक रंक । द्रौपदीअभिलाषभिक्षे देख । भणंग[२२] होवोनि तिष्ठंती.[२३] ॥ २६ ॥ जो आवांका[२४] जयापोटीं । प्रगट दिसों येईल दृष्टीं । अर्जुन इच्छिला तो सृष्टीं । कवणे ठायीं नेणवे.' ॥ २७ ॥ गजस्कंधीं याज्ञसेनी । जैसी उघडली लावण्यखाणी । सौंदर्य वर्णावया शहाणी । शारदा[२५] म्हणे मी

---

१. कुंभाराच्या मृत्तिकाघट करण्याच्या गृहांत. [मोरोपंत—आदिपर्व, अध्याय ३४ गीति २-३ काव्यसंग्रह पृ० १८२.] २. ही पांडवोक्ति आहे. ३. लाक्षागृहाची. ४. चंदन करणें=चंदनाप्रमाणें उगाळून पातळ (चूर्ण) करणें, ठार मारणें. ५. जिंकोनी. [जीयते=जणिजे=जिंकिजे; जिणणें=जिंकिणें.] ६. क्षत्रिय. ७. वरूं. (परिणय करूं. परिणय=विवाह.) ८. क्षणभर. ९. वल्कलें आणि अजिनें. (हरिणचर्मे.) १०. भस्म. ११. आकाशरूप वस्त्रानें. १२. समुदाय. १३. स्तुतिकर्ते, भाट. १४. स्तुतिपाठक. १५. बाहुयुद्ध करणारे. १६. महाविद्वान पुरुष. १७. इंद्र. १८. असम, अतुल्य. १९. भाजा=भार्या. २०. शपथ. [हा शब्द मराठींत स्त्रीलिंगी आहे, परंतु तो संस्कृतांत पुल्लिंगी असल्यामुळें कवितेंतही तसाच क्वचित् आढळतो. 'माझा शपथ तुज असे, जें सत्ये! सत्य तेंचि सांग मला.' मोरोपंत.] २१. राजांस. २२. भिकारी. २३. उभे आहेत. [हें संस्कृत क्रियापदाचें रूप आहे.] २४. धैर्य. २५. सरस्वती.

नोव्हें. ॥ २८ ॥ कोशमात्र अंगसुवास । फांकितां मधुकर[1] राजहंस । धांवोनि येती हें मानस[2] । मन्मथाचें भावोनी. ॥ २९ ॥ श्यामसुकुमारतेची शोभा । नीलोत्पलाचा[3] कठीण गाभा, । बिंबाधरामाजी सुप्रभा । दंतमाणिकें झळकती. ॥ ३० ॥ करिणीवरूनि[4] लावण्यखाणी । धृष्टद्युम्नें उतरिली धरणी । जांबूनदकनकाभरणीं[5] । तेज फांके दशदिशा. ॥ ३१ ॥ ते पांचाळी रत्नज्योती । धृष्टद्युम्नें धरोनि हातीं । राजयांच्या वदनपंक्ती । नामोच्चारें उजळित. ॥ ३२ ॥ 'हा[6] दुर्योधन कौरवेश्वर । एकशतबंधूसहित वीर । राया धृतराष्ट्राचा कुमर । तुजकारणें पातला. ॥ ३३ ॥ कर्ण, विराटसह[7] उत्तर, । भोज जयत्सेन गांधार । सुद्युम्न चित्रसेन कुमर । तुजकारणें पातले. ॥ ३४ ॥ मेघसंधि सहदेव मणिमान । वार्धक्षेमी आणि अंशुमान । सुवर्चा सेनाबिंदू चेकितान । तुजकारणें पातले. ॥ ३५ ॥ सुधन्वा सुचित्र सुकुमार । वृक सत्यधृति पटच्चर । सुषेण शिबी औशीनर । तुजकारणें पातले. ॥ ३६ ॥ समुद्रसेन चंद्रसेन । विदंड श्रेणिमान । पौंड्रीक भगदत्त धृतिमान । तुजकारणें पातले. ॥ ३७ ॥ सोमदत्त रुक्मांगद । कांबोज कारूष चित्रांगद । बाल्हीक निहंता शुभांगद । तुजकारणें पातले. ॥ ३८ ॥ कालिंग ताम्रलिप्त पत्तनाधिप । मद्रराज शल्य भूप । मिरवावया बळ प्रताप । तुजकारणें पातले. ॥ ३९ ॥ बाल्हीक श्रुतायू सैंधव । उलूक वत्सराज कैतव । कोशलाधिपादि पार्थिव । तुजकारणें पातले. ॥ ४० ॥ बृहद्बळ बृहद्रथ । बृहत्क्षत्र भगीरथ । दृढधन्वा नृपनाथ । तुजकारणें पातले. ॥ ४१ ॥ कृष्णपुत्र कृष्णबंधु । बळिराम सात्यकी प्रतापसिंधु । यादवसेनेसीं मुकुंदु । कौतुक पाहूं पातले.' ॥ ४२ ॥ सिंह गर्जे जेंवि काननीं । तेंवि धृष्टद्युम्नाची वाणी । म्हणे, 'सर्वही ऐका श्रवणीं । वाक्य माझें वीरहो ! ॥ ४३ ॥ हें प्रचंड धनुष्य धरूनि करीं । जो चक्ररंध्रें[8] पंचशरीं[9] । यंत्र भेदील निर्धारीं । लक्षालक्ष न चुकतां, ॥ ४४ ॥ तयासी हे प्रमदांची स्वामिणी । माळ घालील माझी बहिणी[10] ।

---

१. भ्रमर. २. मानस नामक सुप्रसिद्ध सरोवर. ३. निळ्या कमळाचा. ४. हत्तीण. [करिन् (पुल्लिंग) करिणी (स्त्रीलिंग). ई प्रत्यय लागून पुल्लिंगाचें स्त्रीलिंग होतें. हस्तिन् हस्तिनी, मेधाविन् मेधाविनी, पयस्विन् पयस्विनी.] ५. जंबूनदोत्पन्न सुवर्णाच्या अलंकारांनीं. ६. अध्याय १८६ पहा. ७. विराट आपल्या शंख आणि उत्तर या दोन पुत्रांसह आला होता. (अ० १८६ श्लो० ८.) ८. चलयंत्रच्छिद्रद्वारा. ९. एकदम पांच बाणांनीं. १०. द्रौपदी-भगिनी. (अ० १८५ श्लो० ३४-३६.)

सभाग्य असेल तेणें हे करणी । करूनि येथें दाविजे[1]. ॥ ४५ ॥ कुळ शीळ रूप गुण । नाम गोत्र उच्चारून । यंत्र भेदिल्या, निधान । द्रौपदीऐसें आंतुडे[2].' ॥ ४६ ॥ परिसोनि पांचाळपुत्रवचन । भूमीं चाप अवलोकून । पर्वतातुल्य सघन । म्हणती, 'प्राण न देववे.' ॥ ४७ ॥ बहुतीं सांडिले आवांके[3] । वीरश्रीम्लानमुखें । म्हणती, 'पातलों कौतुकें[4] । महोत्साह पहावया.' ॥ ४८ ॥ सीतास्वयंवरीं रावण । उठे तैसा राजा कर्ण, । बाहू पिटोनि म्हणे, 'वचन । ऐका माझें, वीर हो ! ॥ ४९ ॥ यंत्र भेदणें म्यांचि पैजा । द्रौपदी ते माझी भाजा । द्रुपदराज श्वशुर माजा[5] । नेमिलासे विधीनें[6].' ॥ ५० ॥ म्हणोनि चाप धरिलें करीं । कष्टें आणिलें जानूवरी[7] । पुढें झोंबतां उभयकरीं । ऊर्ध्वं[8] नोव्हे तिळतुल्य. ॥ ५१ ॥ धापें[9] दाटला राधात्मज[10] । म्हणे, 'धनुष्यें लाविली लाज । बळें संजितां[11] अंगतेज । निस्तेज झालें येकाळीं.' ॥ ५२ ॥ वृक्ष उलथे चंडवातें । तैसें शरीर पृथ्वीवरुतें । पडतां हाहाकार तेथें । कौरवभारीं माजला. ॥ ५३ ॥ मुगुट उडाला त्यागूनि शिर । तुटले पदक रत्नहार । क्लेशा पावोनि महावीर । स्वस्थ ठेला आसनीं. ॥ ५४ ॥ हांसोनियां राजकुमरी[12] । बोल बोले मधुरोत्तरीं । म्हणे, 'माझा नेम[13] चतुरीं । जोणीतला[14] असावा.' ॥ ५५ ॥ यंत्र

---

१. दाखवावी. [दाविजे, कीजे, घेईजे, जाणिजे, करिजे, बोलिजे हीं रूपें कवितेंत कधीं कधीं विध्यर्थी आढळतात.] २. सांपडे. ३. धैर्य. ४. कुतूहलानें. ['कौतुकं मंगले हर्षे हस्तसूत्रे कुतूहले' इति शाश्वतः.] ५. माझा. प्रासासाठीं कवि कधीं कधीं झच्या स्थानीं एकांशीं सवर्ण जो ज त्याचा आदेश करतात–जसें माझी=माजी, माझें=माजें, माझे=माजे, तुझा=तुजा, इत्यादि. पंताच्या काव्यांत देखील अशीं स्थळें आढळतात:—(१) दावाया सैरंध्रीप्रति हें मति वरिल केंवि मुख **माजी** (विराटपर्व–३-५३), (२) सेवुनि वांचेल कसी म्हणत्या गुरुस प्रजा गरा **माजी** (उद्योगपर्व–२-७८), (३) तें न स्मरे न तुमच्या वनवासालाहि चित्त मी **माजें** (उद्योगपर्व–१०-५१), (४) होइल कसा स्वपरिभव सांगा साहिल्य होय जें **माजें** (भीष्मपर्व–१-७७), (५) मज जिंकिलें नदीजें न चले बळ यापुढें तिळहि **माजें** (उद्योगपर्व–१३-१७८), (६) पुत्री म्हणोनि नारदमुनि कळविति तेंचि चर मला **माजे** (उद्योगपर्व–१३-१९६), (७) चिंता करी बहु म्हणे कोण निवारील शाप हा **माजा** (आदिपर्व–२-६), (८) होतों ब्राह्मणसुत मी मन्नाम सहस्रपात् सखा **माजा** (आदिपर्व–३-५०), (९) बा ! सांगे मज, नेली कोणिकडे राक्षसी प्रिया **माजी** (बालमंत्ररामायण–४-१३), (१०) सीतेला अवलोकुनि, झाली हे दृष्टि निर्मला **माजी** (मंत्ररामायण–५-११९). ६. ब्रह्मदेवानें. ७. गुडघ्यापर्यंत. ८. वर, उंच. ९. श्वासें. १०. कर्ण. ११. सज्य करीत. [सज्य=गुणयुक्त, स+ज्या=सहित+धनुष्याची दोरी. मौर्वी, ज्या, सिंजिनी आणि गुण असे धनुष्याच्या दोरीला पर्याय शब्द आहेत.] १२. द्रौपदी. १३. नियम. १४. जाणला. [कांहीं धातूंच्या अंत्यास भूतकाळीं त लागून ला हा प्रत्यय लागतो, म्हणजे भूतकाळाचा प्रत्यय दुबार लागतो. कवितेंत कांहीं धातु याप्रमाणें भूतकाळीं आढळतात.]

भेदिलें जरी हेळा[1] । तरी अवर्णा[2] हीनकुळा । मी सर्वथा न घालीं माळा । हा निर्धार आणिजे.'[3] ॥ ५६ ॥ हें ऐकोनि शल्य[4] सैंधव[5] । हृदयीं सांवरिती शहाणीव, । सरली कौरवांची हांव । दुर्योधनासमवेत. ॥ ५७ ॥ निस्तेज देखोनि सर्व क्षेत्री । पांचाळ बोले क्रोधनेत्रीं । म्हणे, 'निर्वीर[6] हे धरित्री । झाली दिसे मज आजी.' ॥ ५८ ॥ ऐकोनि नरेंद्रमुखींची वाणी । ऋषिमंडळांतून दोन्ही । भीम अर्जुन ततक्षणीं । उभे ठेले सन्मुख. ॥ ५९ ॥ वृद्ध ब्राह्मण तापस तेथें । कित्येक वारिती तयांतें हातें, । म्हणती, 'अटक[7] क्षत्रियांतें । तें तुम्हां कैसें साधेल ? ॥ ६० ॥ आधींच ब्राह्मण निर्बळ शब्दु[8] । त्यावरी नोव्हे यंत्रभेदु । या अवमानाचा खेदु । मरणप्राय सोसणें.' ॥ ६१ ॥ एक म्हणती, 'ईश्वरमहिमा । कोण जाणे ब्राह्मणोत्तमा । कोणा हृदयीं परमात्मा । कवणे स्थिती वर्ततु. ॥ ६२ ॥ एकलेनी परशुधरें[9] । निर्वीर केलें वसुंधरे । अगस्तीनें आपुल्या करें । महासमुद्र[10] शोषिला. ॥ ६३ ॥ ब्राह्मणतेज ब्राह्मणशक्ती । घडे न घडे कवणे युक्ती ? । जो आवांका ज्याचे चित्तीं । तो अवश्य होतसे. ॥ ६४ ॥ म्हणोनि करूं नये निषेधु । आज्ञेसि द्यावा आशीर्वादु'. । हें परिसोनि दोघे बंधु । धनुष्यनिकटीं पातले. ॥ ६५ ॥ दोघे येतां धनुष्यनिकटीं । समस्तराजयांच्या दृष्टी । एकवटोनि म्हणती, 'सृष्टीं । दुजें कौतुक मांडलें. ॥ ६६ ॥ कर्णशल्यादिकांचीं बळें । होवोनि गेलीं जेथें विफळें[11] । तेथें ब्राह्मणाचीं बाळें । इच्छा करिती द्रौपदीची.' ॥ ६७ ॥ साशंक अवलोकी द्रुपदु, । म्हणे, 'ब्राह्मण यंत्रभेदु । करूं भाविती हा शब्दु । सत्य कर्ता ईश्वर.' ॥ ६८ ॥ तंव पुढां होवोनि अर्जुन । करूनि त्रिवार प्रदक्षिण । धनुष्य वाहून सत्राण[12] । बाणपंचक[13] घेतलें. ॥ ६९ ॥ स्मरोनियां यादवराणा । भावें चिंतिलें द्रोणचरणा । अधोदृष्टी पंचबाणा । व्योमसूत्रीं विंधिलें. ॥ ७० ॥ तें अवक्र नळिकाचक्र । भेदोनि पाडिलें मकरयंत्र[14] । देखोनि सहस्रनेत्राचे[15] नेत्र ।

१. सहज, लीलेनें, अनायासें. २. हीनवर्णी. ३. जाणावा. ४. मद्राधिपति. ५. जयद्रथ. ६. वीरहीन. ७. प्रतिबंध. ८. अकारांत पुंलिंगीं नामें कवितेंत ओकारांत किंवा ऊकारांत कधीं कधीं आढळतात—या नियमाचें हें उदाहरण आहे. ९. पंतांच्या आदिपर्वांत हेच दाखले दिले आहेत. (आदिपर्व–अध्याय ३४ गीति ४४-४७ पहा.) १०. कालकेय असुरांचा नाश करण्यासाठीं अगस्त्य मुनीनें सागरोदकाचें शोषण केलें, या कथेकडे येथें लक्ष्य आहे. (वनपर्व–अ० १०२-१०५ पहा.) ११. व्यर्थ, निष्फळ. १२. वेगानें, बळानें. १३. पांच शर. पंचक=पांचांचा समुदाय. १४. मत्स्ययंत्र. १५. इंद्राचे.

आनंदाश्रु सांडिती. ॥ ७१ ॥ प्राकृतकवींचा वाग्जल्प । तैलकढईंत पाहूनि रूप । फिरतां मत्स्य सकंप । वामनेत्रीं विंधिला. ॥ ७२ ॥ परि तें मूळभारतीं नाहीं । म्हणोनि असो न बोलों कांहीं, । नळिकाछिद्रांतूनि पाहीं । यंत्र भेदोनि पाडिलें. ॥ ७३ ॥ गंधर्वदत्तविद्याबरें । यंत्र भेदितां धनुर्धरें । सात्विकभावं भिन्नाकारें । सकळां देहीं उदेले. ॥ ७४ ॥ अष्टौभावें अद्भुत प्रेमा । ऋषींच्या अंगीं उदेल्या रोमा । निर्जरांच्या नेत्रसद्मा । पातीं लवों विसरलीं. ॥ ७५ ॥ दिव्यदुंदुभींच्या गजरीं । पुष्पवर्षाव मांडिला सुरीं । टाळी वाजऊनि ऋषेश्वरीं । आशीर्वादें गर्जती. ॥ ७६ ॥ हर्षनिर्भर राजबाळा । आवडीचा

---

१. मुक्तेश्वरानें आपल्या पूर्वी झालेल्या कविजनांच्या ग्रंथांचें अवलोकन केलें होतें. असें या ओंवीवरून दिसतें. तसेंच मुक्तेश्वर महाभारतग्रंथ नीट पाहून काव्यरचना करीत असे असाही तर्क करण्यास हें स्थल चांगला आधार आहे. २. चित्ररथगंधर्वदत्त चाक्षुषी विद्येच्या योगें. ३. सात्विकभाव—हे शरीरविकार आहेत, यांचे चार भेद मानतात. ते असे:—"१ **कायिक** २ **मानसिक** ३ **आहार्य** आणि ४ **सात्विक.** (१) **कायिक**—शरीराचे जे चलनवलनादि व्यापार, आणि मनोविकार उत्पन्न झाल्यावर मुखावर होणारीं त्या त्या मनोविकारास योग्य अशीं चिन्हें. हे सर्व कायिकअनुभाव होत. (२) **मानसिक**—जसा मनोविकार उत्पन्न झाला असेल किंवा नाटकांत पात्रास त्या त्या प्रसंगीं जो मनोविकार उत्पन्न झाल्याचें अभिनयानें दाखवावें लागतें, तशी मनाची स्थिति असल्याचें दाखविणें किंवा प्रमोद ब्रह्मानंद समाधि इत्यादिक. (३) **आहार्य**—वेष धरून अभिनयद्वारा जें भाव दाखविणें तें. जसें:—विष्णूचें सोंग घेऊन चतुर्भुज होणें, सोंड लावून गणपति होणें, इत्यादिक. ह्याचा नाटकांत मात्र उपयोग आहे. (४) **सात्विक**—सत्वगुणापासून उत्पन्न होणारे जे शारीरिक विकार ते. हे आठ आहेत. त्यांचीं नांवें व लक्षणें. (१) स्तंभ.—शारीरिक सर्व धर्म कायम असतां कांहीं कारणांनीं अकस्मात् गतिनिरोध होतो तो. (२) स्वेद.—घाम श्रमापासून उत्पन्न झालेला असला तर तो सात्विकभावांत गणला जाणार नाहीं; कारण तो मनोविकाराचें कार्य नव्हे. (३) रोमांच.—क्रोध, भय, हर्ष, राग, इत्यादिकांपासून अंगावर कांटे उभे राहतात ते. (४) स्वरभंग.—आवाज बदलणें. सर्दी झाली असतां जो आवाज बदलतो तो मनोविकारजनित नसल्यामुळें स्वरभंग समजूं नये. (५) वेपथु.—अंगास कंप सुटणें. हर्ष, भीति इत्यादिकांपासून हा होतो. साधारण एखाद्या वेळीं अंग कांपूं लागतें त्यास वेपथु म्हणत नाहींत; कारण तो कंप मनोविकारापासून उत्पन्न झालेला नसतो. (६) वैवर्ण्य.—शरीराचा रंग पालटणें. (७) अश्रू.—स्पष्टच आहे. (८) प्रलय.—चेष्टानिरोध. स्तंभांत गतिनिरोध असतो, व ह्यांत चेष्टानिरोध असतो. निद्रेंतही चेष्टानिरोध आणि गतिनिरोध असतो; पण तो मनोविकारजनित नसल्यानें तेथें स्तंभ किंवा प्रलय मानीत नाहींत. येणेंप्रमाणें हे आठ सात्विकभाव आहेत." [रसप्रबोध–पृष्ठ ६-८ पहा.] ४. मागें पृष्ठ १ टीप ५ पहा. ५. मुनि रोमांचितगात्र झाले. ६. देवांच्या. ७. देवीं. ८. 'आनंदमदें राजबाळा' असाही एक पाठ आहे.

भरू आगळा । हातीं घेऊनि पुष्पमाळा । घाली [1]गळां पार्थाच्या. ॥ ७७ ॥ वाजों लागलीं मंगळतुरें । जन गर्जे जयजयकारें, । म्हणती, '[2]ब्राह्मणाचेनि कुमरें । याज्ञसेनी जिंकिली.' ॥ ७८ ॥ द्रुपद सांगे परिवारातें, । 'ब्राह्मण रक्षावे यत्नें बहुतें । राजे कलह करितील येथें । युद्ध दारुण दिसताहे.' ॥ ७९ ॥ पार्थ म्हणे, 'गा युधिष्ठिरा! । सवें घेऊनि माद्रीकुमरा । द्रौपदी न्यावी [3]बिढारा । कुंतीमातेजवळिकें.' ॥ ८० ॥ इतुकें बोले धनुर्धर । तंव लोटले राजभार । वर्षती शस्त्रांचे संभार । भीमार्जुना लक्षोनी. ॥ ८१ ॥ अवमानव्यथेचेनि भरें । झुंजा प्रवर्तले [4]निकरें । मुखें गर्जती अहाकारें । म्हणती, 'घ्या रे सैनिक! हो. ॥ ८२ ॥ ब्राह्मण नेईल राजपुत्री । [5]अवकळा वरितील कैंवी क्षत्री? । आतां झुंजोनियां शस्त्रीं । घेवों नोवरी हिरोनी. ॥ ८३ ॥ [6]अवचट बाण [7]निष्टला, । नकळत यंत्रभेद झाला, । इतुकेनि काय अवमानला । क्षत्रियांचा समुदाय? ॥ ८४ ॥ अवचट काय नघडे संसारीं । परी तें कोण मानी निर्धारीं । वेगीं छेदोनि शस्त्रास्त्रीं । खंड विखंड करावें. ॥ ८५ ॥ छेदोनि द्रुपदाच्या शिरा । वेगीं नेऊं हस्तिनापुरा । [9]अव्हेरूनि राजेश्वरा । भणगा कुमारी देतसे.' ॥ ८६ ॥ द्रुपद धाक घेऊनि पोटीं । [10]रिघों पाहे ऋषींच्या पाटीं, । तो म्हणे, '[11]ईये संकटीं । ब्राह्मणें आम्हां घातलें. ॥ ८७ ॥ पडिला सैन्याचा [12]ऑवर्त, । बाहेर [13]पडावया नाहीं पंथ, । आतां कवण करणें अर्थ । प्राणसंकट मांडलें.' ॥ ८८ ॥ हांसोनि [14]बोले भीमसेन, । 'स्वस्थानीं राखावें मन, । तुमचे भाग्याचे [15]लोचनें । कौतुक आतां देखती. ॥ ८९ ॥ यापासूनि भयाचा [16]अनिळ । तुम्हांस न लागे [17]अळुमाळ । आश्वासूनि हा पांचाळ । [18]आपणानिकटीं बैसवा. ॥ ९० ॥ कथा कौतुकपुराणश्रवण । अथवा [19]तत्वार्थ-

---

१. गळ्यांत. ('गळां' ही सप्तमी आहे. येथें 'आं' हा प्रत्यय आहे.) २. येथें 'नि' हा पादपूरणार्थक शब्द जाणावा. कवितेंत **नि पैं** इत्यादि निरर्थक शब्द पादपूरणार्थ योजण्याचा प्रचार फार आढळतो. मुक्तेश्वराच्या काव्यांत तर याचा प्रयोग अनेकस्थळीं आढळतो. ३. बिढार=बिडार=बिऱ्हाड. ४. नेटानें. ५. अप्रतिष्ठा, फजिती. ६. अकल्पित. ७. निसटला. ८. निश्चयें. ९. उपेक्षा करून. १०. रिघों पाहे=शिरों पाहे=शिरों इच्छी=रिघावया इच्छी. रिघण्याची इच्छा करतो. [रिघों=रिघूं. 'ऊं'च्या स्थानीं कवितेंत वारंवार 'ओं' हा अव्ययी भविष्य कृदंताचा प्रत्यय आढळतो]. ११. ह्या, या. १२. भोंवरा, घेरा. १३. पडावया=पडूं=पडों. १४. हें भीमाचें भाषण विप्रांस आणि द्रुपदास उद्देशून आहे. १५. नेत्र. १६. वायु. १७. अणुमात्र. १८. ब्राह्मणांजवळ. १९. वेदांतार्थनिवेदन.

निरूपण । आरंभोनि सुखसंपन्न । [1]भयातीत बैसावें. ॥ ९१ ॥ [2]जैंवी कां सिंहाचिये दृष्टी । पळती कुंजरांचिया [3]थाटी । तैंवी कौरव [4]बाराबाटीं । याचक्षणीं पळतील. ॥ ९२ ॥ [5]झंझामारुताचेनि घातीं । अभ्रें दशदिशा पळती । नातरी कृपणाची संपत्ती । नेणे कोणें हरिजेल. ॥ ९३ ॥ तैंवी या सैन्या आणि सैनिका । प्रळयसंकट वर्तलें देखा । [6]जयस्वी तूंचि नरनायका! । हेंचि निश्चयें जाण पां. ॥ ९४ ॥ राया! नेणसी आम्हीं कोण । सहज पुढां जाणसी खूण, । आतां निर्भय करूनि मन । कौतुक कांहीं देखसी.' ॥ ९५ ॥ जया वृक्षाचिये छाये । बैसला ऋषींचा [7]समुदाये । तोचि उपडोनि पंडुतनयें । प्रचंड खांदीं वाहिला. ॥ ९६ ॥ शाखा पत्रें झाडोनि सकळीं । वज्रप्राय हस्तकीं तुळी । उभा ठेला रणमंडळीं । [8]दंडपाणी [9]पैं जैसा. ॥ ९७ ॥ चमत्कारोनि पांचाळनाथ । म्हणे, 'हा काळ कीं कृतांत । भार्गव किंवा हनुमंत । किंवा भीम पांडवी. ॥ ९८ ॥ नव्हे मानवी बळाची [10]पैंरी । पांडव वांचले [11]लाखाजोहरीं' । ऋषी म्हणती, 'मौन स्वीकारीं । होईल तें विलोकीं.' ॥ ९९ ॥ मांडणी मांडूनि धनुष्याची । दक्षिणेउभा [12]सव्यसाची । भूमी साधूनि युद्धाची । [13]पैंदळातें पाचारी. ॥ १०० ॥ रथारूढ यादवभारीं । दुरोनि अवलोकी मुरारी, । जैसा रत्नामाजी [14]जोहोरी । रत्न पारखी आपुलें. ॥ १०१ ॥ अच्युत म्हणे '[15]रेवतीरमणा, । 'पैल अवलोकीं दोघांजणा । हे कोण ते विचक्षणा! । ओळखोनि मज सांगें.' ॥ १०२ ॥ तो म्हणे, 'नेणवे सर्वज्ञा! । [16]ओळखी मोडली माझिया नयना । आठव देईं' म्हणे सर्वज्ञा, । कृष्ण दावी हस्तकें. ॥ १०३ ॥ 'घेऊन उभा धनुष्यबाण । तोचि तूं ओळखें अर्जुन, । खांदीं वृक्ष तो भीमसेन, । आजानुबाहू प्रतापी. ॥ १०४ ॥ तयापाठीं तिवेजण । जयाजवळीं द्रौपदीरत्न । तो धर्मराज, द्वय नंदन । नकुळ सहदेव माद्रीचे. ॥ १०५ ॥ लाक्षागृहाहून वांचले । ते मज आज प्रत्यया आले. । सैंवरा आल्याचें झालें ।

---

१. भयरहित. २. हा उपमालंकार जाणावा. ३. समुदाय, राजी. ४. अनेक मार्गांनीं, अनेक दारांनीं. ५. वावटळ, चक्रवात. ६. या ठिकाणीं 'यशस्वी' असावें असें दिसतें. ७. तोली. ८. यम. ९. 'पैं' हा पादपूरणार्थक शब्द आहे. १०. बरोबरी. ११. जातुषानलीं. १२. अर्जुन. [सव्य हातानें बाणाचा नेम धरण्यांत जो कुशल तो सव्यसाची.] १३. शत्रुसैन्यातें. १४. जोहरी=जोहारी=जोहोरी=रत्नपारखी. १५. बळरामा. १६. येथें 'ओळख' हें एकवचनी प्रथमांत नाम अकारांत असतां ईकारांत केलें आहे. असेंच 'दैवें तुजसीं सत्सहवासांत नवी **ओळखी** पडली.' मोरोपंत.

सर्वथा सार्थक आमुचें. ॥ १०६ ॥ आजी जोडिल्या सुखाच्या कोटी, । पुढती पांडव देखिले दृष्टी । आम्हीं जें काज करावें सृष्टी । तें हे आतां करितील. ॥ १०७ ॥ आजी यांचेनि हस्तकें । कौरव शिक्षा पावतील निकें. । तटस्थ होवोनि कौतुकें । आम्हीं तुम्हीं पहातसों.' ॥ १०८ ॥ ऐकोनि तोषला हलधर । टाळी पिटी उभय कर । म्हणे, 'एकांत झालियावर । दर्शना गेलें पाहिजे.' ॥ १०९ ॥ ऐसें उभयतां बोलिजे, । तंव ते खवळले राजे, । वीरश्रियेचेनि माजें । 'घे घे मारा' म्हणोनी. ॥ ११० ॥ 'कैउते विप्र दोघेजण । शस्त्रघायीं करावे चूर्ण । द्रौपदी आणा रे! हिरून' । दुर्योधन बोलत. ॥ १११ ॥ ऐसी करितां बहु वल्गना । वीरीं वेढिलें भीमार्जुना । अस्त्रशस्त्र तडक बाणा । चहूंकडोनि मारिती. ॥ ११२ ॥ अंकुश लावूनि सत्वर । पुढें लोटिले मत्त [३]कुंजर । आसनीं [४]ठुमितां अश्वभार । चौताळले [५]चौफेरी. ॥ ११३ ॥ पाठीं रथाचे [६]संघाट, । वीर पायांचे उद्भट । [७]वोढणें पिटोनि तेजिष्ठ । नग्न शस्त्रें झाडिती. ॥ ११४ ॥ वृक्ष [८]भोंवंडोनि महाबळी । रागें ताडितां कुंभस्थळीं । मस्तकें भंगोनि खळाळीं । [९]रक्तगंगा लोटल्या. ॥ ११५ ॥ मध्यें ताडितां [१०]राउतातें । अश्वसहित झाले प्रेतें, । रथरथी सारथी यांतें । एकेचि घायें निःपात. ॥ ११६ ॥ भोंवडोनि ताडितां तरुवर । असंख्य मरती [११]पायांचे वीर । रणीं माजला हाहाकार । म्हणती रुद्र प्रळयींचा. ॥ ११७ ॥ मार देखोनियां प्रबळ । सर्वसैन्या सुटला पळ, । हें देखोनि उतावेळ । कर्ण पुढें धांवला. ॥ ११८ ॥ [१२]तंवेंकें लोटला अर्जुनावरी । प्रचंड धनुष्य घेऊनि करीं । पार्थ विंधिला शतशरीं । जैंवि कां गिरी जळधारा. ॥ ११९ ॥ ते अवगणूनि धनुष्यपाणी । राधेय विंधिला तीन बाणीं, । हस्तलाघव कुशलता ध्वनीं । देखोनि मनीं दचकला. ॥ १२० ॥ प्रळयीं तुटतां विद्युल्लता । तेंवी तेजें लोपला [१३]सविता, । कडकडाटें भूपवेता । महाकंप [१४]होसरैला. ॥ १२१ ॥ वेग देखोनि संधानाचा । मद उतरला वीरश्रियेचा । म्हणे, 'आजी [१५]संग्रामाचा । यत्न कांहीं चालेना. ॥ १२२ ॥ ध्यावया सर्वांचा अभिमान । ईश्वरें मांडिलें

१. उदासीन, मध्यस्थ. २. झालियावर=झाला+या (ह्या) वर. ३. गज. ४. प्रहार करतां, लाथ झाडतां. ५. चारी बाजूंनीं. ६. समुदाय. ७. वोढण=ढाल. ८. फिरवून. ९. रुधिरनद्या. १०. स्वारांतें. ११. पायदळ, पदाति. १२. त्वेषानें. १३. सूर्य. १४. झाला. १५. युद्धाचा.

[1]विंदान । नेणों **नर** [2]कीं **नारायण** । ब्राह्मणवेषें क्षोभला.' ॥ १२३ ॥ मग [3]म्हणे, 'ब्राह्मणा! ऐक वचन । तुझेनि झालों सुखसंपन्न । कवणापासून विद्याधन । साधिलेंसे सांग पां? ॥ १२४ ॥ **भार्गव** किंवा **रघुनंदन** । **द्रोण** किंवा **अर्जुन** । यांपासूनि विद्याधन । लाधलासी दिसताहे. ॥ १२५ ॥ कृत्रिम करूनि ब्राह्मणवेष । गुप्त फिरसी सिद्धपुरुष । कोण तूं असा निर्दोष? । सांगीतलें पाहिजे.' ॥ १२६ ॥ **अर्जुन** म्हणे, 'ब्राह्मण आम्हीं । विद्या निपजती ब्रह्मकर्मीं । गुरुप्रसादें क्षात्रधर्मीं । तोषवीन सर्वांतें. ॥१२७॥ आजी तुज जिंणावया लागीं । उभा असें रणरंगीं । विद्या जोडली **द्रोण**संगीं । तितुकी येथें दावीन.' ॥ १२८ ॥ हृदयीं विचार करी **कर्ण**, । 'युद्ध करितां रोकडें मरण, । एके बाणें हा ब्राह्मण । प्राण घेईल सर्वांचे.' ॥ १२९ ॥ सांडूनि युद्धाचिये चाडे, । रथ फिरविला शिबिराकडे । तें देखोनि **कौर**वांचीं तोंडें । प्रेतकळा अवगलीं. ॥ १३० ॥ येरीकडे मातला गज, । तेंवी **भी**मावरी **मद्र**राज । धांविन्नला तेजःपुंज । शूळ ताडी हस्तकें. ॥ १३१ ॥ म्हणे, 'ब्राह्मणा! पावलों वेगीं.' । शूळ शिवला वामभागीं । परी तो जेंवि गजा अंगीं । दर्भशिखा लागली. ॥१३२॥ तो साहोनि **वृ**कोदरू । पृष्ठीं ताडिला झोडूनि तरू । मूर्च्छा दाटली परी धीरू । धरूनि वेगें ऊठिला. ॥१३३॥ **पां**डव पायें परता लोटी । तंव मिठी घातली **भी**माकंठीं । मल्लयुद्धाचे परिपाठी । दोघे भिडों लागले.॥१३४॥ मुष्टिप्रहार चपेटप्रहार । कोंपरप्रहार लत्ताप्रहार । थडका चिमटे जानुप्रहार । अतिनिष्ठुर मारिती. ॥ १३५ ॥ राजे देखती कौतुका । युद्ध झालें चारघटिका । यावरी **भी**मसेनें देखा । अत्यद्भुत दाविलें. ॥ १३६ ॥ वाम हस्त [6]ग्रीवेतळीं । दुजा सूंदला पादमूळीं । गगनीं देऊनि उंसाळी । धरातळीं टाकिला. ॥ १३७ ॥ भूमी पडतांचि उताणा । गमला प्राणांत प्राणा । पुढती उठोन **भी**मसेना । मध्यभागीं कवळिला. ॥ १३८ ॥ **भी**में अवयव कवळोनि हस्तीं । मोट वाहिली मस्तकावरुती, । पुढती **शल्य** टाकिला क्षिती । गात्रोगात्रीं भंगिला. ॥ १३९ ॥ तांपसातें पुसे वचनें, । 'आजी यातें घेऊं प्राणें । किंवा सोडूं जीवदानें । तें निरोपा वडील हो!' ॥ १४० ॥ ऋषी बोलती

---

१. कळसूत्र. २. किंवा. ('कीं' याचा प्रयोग विकल्प, प्रश्न, कारण, आधार इत्यादि अर्थी आढळतो.) ३. कर्ण म्हणे. ४. जिंकावया. ५. धांविन्नला=धांवला [हासिन्नला, धाविन्नला, इत्यादि रूपें धातूस दुबार भूतकालवाचक (न + ला) प्रत्यय लागून सिद्ध झालीं आहेत.] ६. मानेखालीं. ७. घातला. ८. श्वासोच्छ्वास. ९. प्रत्येक गात्रीं. १०. ऋषींतें.

प्रत्युत्तरें । 'आजी भीमा ! इतुकेंचि पुरे, । शेष उरलें पुढारें । धर्मालागीं असों दे.' ॥ १४१ ॥ पाठीं देऊनियां लात । म्हणे, 'सोडिलें जिवें जीतं' । शल्य म्हणे, 'हो ! अद्भुत । काय विपरीत वर्तलें. ॥ १४२ ॥ मजसीं मेळवी हाताहात । ऐसा नाहीं पृथ्वीआंत । ब्राह्मणवेषें हा कृतांत । कोण आहे ने-णवे ! ॥ १४३ ॥ विष्णु किंवा श्रीशंकर । भार्गव किंवा वृकोदर । या-वेगळा आन वीर । मजसीं भिडों शकेना. ॥ १४४ ॥ आजची असे काळ-वेळा । युद्धीं यश न दिसे डोळां । यत्न करीन जरी आगळा । नाश होयील प्राणातें.' ॥ १४५ ॥ पाठी देवोनियां सैंमरीं । वेगीं पातला कौरवभारीं । दुर्योधनादीक अंतरीं । भयें झाले साशंक. ॥ १४६ ॥ एकयोजना अंतरें । कौरव उतरले दळभारें, । 'ब्राह्मण कोण हें निर्धारें' । म्हणती 'कळलें पाहिजे.' ॥ १४७ ॥ द्रौपदीविवाहसंभ्रम । हर्षें करील राजोत्तम । पुढती होईल संग्राम । कौरव आणी पांडवां. ॥ १४८ ॥ ते कथेची अभिनव गोडी । श्रोतीं परिसावी आवडी । मुक्तेश्वरकवीची जोडी । पवित्र पाय संतांचे. ॥ १४९ ॥

अध्याय बेचाळिसावा.

कर्णशल्याची ऐसी गती । देखोनि कांपले भूपती, । आपुलालिया नगराप्रती । जाते झाले सत्वर. ॥ १ ॥ म्हणती, 'पांडव हे निश्चिती । कौरवीं जोडिली अ-पकीर्ती, । जळो धृतराष्ट्राची रीती । कपटमूर्ती पापात्मा. ॥२॥ भीष्म सांडवला सत्ववृत्तीं । तोही नासला कुसंगती.' । ऐशा चाळीत नाना युक्ती । गेले भू-पती स्वनगरा. ॥ ३ ॥ खंडली संग्रामाची गुंती, । आनंदल्या ऋषींच्या पंक्ती । भीमार्जुन द्रौपदी सती । धर्म नकुळ सहदेव. ॥ ४ ॥ चालले मातेच्या दर्शना । पातले भार्गवशाळांगणा । म्हणती 'माते! ऐक वचना । भिक्षा अपूर्व लाधली.' ॥५॥ कुंती बोले न देखोन, । 'वांटोनि घ्या पांचहीजण । तुम्हां अक्षय कल्याण । असो वाढतें सर्वदा.' ॥ ६ ॥ ऐकोनि धर्म बोले वचन, । 'पार्थें द्रुपदकन्या जिंकिली

---

१. जीवंत. २. भिडों=भिडूं=भिडायास=भिडावया=झुंजावया. ३. मोठा. ४. समरांगणाला पाठ दाखवून, पळून. ५. 'या अध्यायांत मूळांतील १८४-१९० या सात अध्यायांचें सार आलें आहे. पांडवांचा विप्रांबरोबर संवाद, त्यांचा द्रुपदनगरप्रवेश, धृष्टद्युम्नकथित राजनामनिवेदन, क-र्णादिकांचा पराभव, अर्जुनाचा उत्सव, अर्जुनहस्तें राधायंत्रभेद, कृष्णबलरामसंवाद, आणि कर्णश-ल्यादिकांशीं भीमार्जुनांचें युद्ध असे विषय या अध्यायांत आहेत. ६. कुंभाराच्या घराला. ७. अ-ध्याय १९१ श्लोक ७ पहा.

जाण, । **द्रौपदी** आणि **अर्जुन** । वधूवरें अक्षयी.' ॥ ७ ॥ येऊनि पाहे जंव अंगणीं, । तंव देखिली [1]याज्ञसेनी. । मग म्हणे, 'जिव्हे! पापिणी! । जल्पलीस भलतेंची.' ॥ ८ ॥ पुत्रांसि म्हणे, 'माझें वचन । तुम्हीं न धरावें [2]प्रमाण, । **द्रौपदी** आणि **अर्जुन** । वधूवरें असोत.' ॥ ९ ॥ **पार्थ** म्हणे, 'न घडे ऐसें, । प्राप्त झालें सकळां [3]सरिसें, । मातृवचन [4]विशेषें । प्रमाण आम्हां सर्वथा.' ॥१०॥ **धर्म** म्हणे, 'ऐका भावें, । होईल तें [5]मौनें पहावें; । येथें [6]आलिया **व्यासदेवें** । सर्व [7]संशय खंडेल.' ॥ ११ ॥ इतुक्या [8]करितां संवादगोष्टी, । तंव लपवूनि जनाच्या दृष्टी । **कृष्ण** [9]**बळभद्र** [10]जगजेठी । आले भेटी आदरें. ॥ १२ ॥ पितृभगिनी देखोनि **पृथा**, । **कृष्णें** चरणीं ठेविला माथा, । तैसेंचि ज्येष्ठ [11]कुंतीसुता । परमप्रीतीं वंदिलें. ॥ १३ ॥ **भीमार्जुनमाद्री**कुमरीं । नमस्कारिला [12]असुरवैरी, । क्षेमालिंगन देऊन **हरी** । एकासनीं बैसले. ॥ १४ ॥ **धर्मा**सि म्हणे [13]हृषीकेश, । 'सांगों पाहसी हृदयींचे क्लेश, । ते मज ठावुके विशेष, । तुवां कांहीं न वदावें.' ॥ १५ ॥ **कृष्ण** शांतवी **पृथे**तें, । 'पुत्रासहित भोगिलें व्यथे, । त्याचें फळ दुर्जनातें । ठेविलें असे पुढारां. ॥ १६ ॥ असो. मग बोलों [14]मनोगत, । आतां [15]नावेक असा गुप्त.' । ऐसें बोलोनि **श्रीअनंत** । जाता झाला [16]शिबिरातें. ॥ १७ ॥ यावरी होतां अस्तमान, । भिक्षेसि गेले पांचही जण, । [17]माधुकरीचें आणिलें अन्न । तें मातृहस्तीं ओपिलें. ॥ १८ ॥ **कुंती** म्हणे, 'राजतनये! । अन्न स्वहस्तीं घेई माये! । मी सांगेन ते रीतीये । विभागून देई कां. ॥ १९ ॥ तुझे, माझे, अतिथीचे । विभाग काढोनि साचे, । पाठीं उरलिया अन्नाचे । [18]दोन भाग निर्मावे. ॥ २० ॥ त्यांमाजी एक देई **भीमा**तें, । एक ओपीं या [19]चौघांतें, । चतुर [20]गृहस्वामिणी! तूतें । नलगे व-

---

१. यज्ञसेन=द्रुपद, याज्ञसेनी=द्रुपदात्मजा. २. आधार, सत्य. ३. सारखें. ४. 'आज्ञा' असा अन्यपाठ आहे. ५. 'ज्ञानें' असा अन्यपाठ आहे. ६. 'पातल्या' असा अन्य पाठ आहे. ७. अध्याय १९१ श्लोक १६ पहा. ८. करीत असतां. ९. रौहिणेय. (अध्याय १९१ श्लोक १८ पहा.) १०. जगताहून ज्येष्ठ (श्रेष्ठ); अथवा जगताच्या पूर्वी वास करणारा. (ईश्वर.) ११. धर्माला. (अध्याय १९१ श्लोक २० पहा.) १२. दैत्यारि. (कृष्ण.) १३. कृष्ण. (इंद्रियस्वामी.) १४. मनांतील गुप्त विचार. १५. क्षणभर. १६. अध्याय १९१ श्लोक २५ पहा. १७. भिक्षेचें. (मधुकराच्या–भ्रमराच्या–वृत्तीनें मिळविलेली माधुकरी.) १८. 'भागद्वय निर्मावें' असा अन्य पाठ. १९. अध्याय १९२ श्लोक ४-६ पहा. २०. घरधनीन, घराची मालकीण. या आदरवाचक संबोधनानें कुंती द्रौपदीचा केवढा गौरव करिते आहे हें स्पष्ट आहे.

डिलीं सांगणें.' ॥ २१ ॥ हें परिसोनि राजबाळा[1] । आवडीचा[2] भरोनि थाळा । अन्न वांटोनि दिधलें सकळां । यथाविभाग[3] स्वहस्तें. ॥ २२ ॥ पंक्ती सारून सुखभोजन, । शय्या घातली तृणाजिन,[4] । शय्यासनीं स्ववृत्तिवचन[5] । राजहेरीं ऐकिलें. ॥ २३ ॥ संग्रामाच्या[6] कडोविकडी[7] । शस्त्रसाधनघडामोडी.[8] । शत्रु जिंणावे[9] अंगप्रौढी[10] । हा संकल्प सर्वांतें. ॥ २४ ॥ पाळती[11] आणी धृष्टद्युम्न[12] । ऐकत होते लावूनि कान, । कवण जाती कवण वर्ण । जाणावया सौक्षेपें.[13] ॥ २५ ॥ उदया पातल्या दिनकर । वार्तीक[14] धूर्त चार हेर । घेऊनियां राजकुमर । रायापासीं[15] पातला. ॥ २६ ॥ तंव तो उद्वेगें विव्हळ[16] । चित्तीं लज्जेची जळजळ । नेत्रीं सांडीत अश्रुजळ । दुःखें रोदन करीतसे.[17] ॥ २७ ॥ म्हणे, 'कुमरा ! माझी कुमरी । पडली कवणा[18] भणगाघरीं । ब्राह्मण वैश्य किंवा क्षेत्री[19] । किंवा शूद्र नेणवे. ॥ २८ ॥ माझे कंठींची रत्नमाळा[20] । तुटोनि जगाच्या पायांतळा । पडोनि पादमृत्तिकामळा[21] । सेविती झाली वाटतसे. ॥ २९ ॥ कीं रत्नदीपिका अखंडज्योती । मूषकें धरून नेली दांतीं, । कीं अमृतकूपिका अवचितीं । झडपोनि नेली वायसें.[22] ॥ ३० ॥ तेंवी द्रुपदाची आत्मजा । प्राप्त झाली याचकद्विजा, । याहूनि जघन्यतेची[23] लज्जा । कोण सांग मजप्रती ?॥३१॥ 'भूपाळकन्येतें भिक्षुक । भ्रतार,' ऐसें बोलती लोक । हें परिसोनि महादुःख । मरणातुल्य मज पुत्रा !' ॥ ३२ ॥ कुमर म्हणे,[24] 'ऐकें राया ! । दुश्चितभाव[25] नाणीं हृदया, । शोध करितां ते क्षत्रियां- । माजी दिसती प्रचंड. ॥ ३३ ॥ नित्य भिक्षान्नभोजन । कृष्णाजिन वल्कलवसन । ब्रह्मांड जाळूं ऐसा अभिमान । सर्वां हृदयीं धडकतसे. ॥ ३४ ॥ युद्धावेगळी[26] आन गोष्टी । चारी प्रहर रजं-[27]

---

१. 'आनंदभरितगुणवेल्हाळा' असाही एक पाठ आहे. २. थाळा भरणें=ताटांत अलंकार ठेवून ते वधूच्या अंगांवर घालण्यासाठीं तिला देणें (विवाहांत). येथें आवडीचा म्हणजे आवडीप्रमाणें ताटांत अन्न भरून—असा अर्थ इष्ट आहे. ३. 'आपुलिया' अन्य पाठ. ४. गवत व मृगचर्म. (अ० १९२ श्लो० ८.) ५. आपल्या वागणुकीच्या गोष्टी, शूरत्वाच्या गोष्टी. ६. लढाईच्या. ७. मोठमोठ्या गोष्टी. ८. शस्त्रें मिळविण्याच्या आणि घडविण्याच्या गोष्टी. ९. 'वधावे' असा अन्य पाठ. १०. शरीरबळानें. ११. पाळत राखणारे, शोध लावणारे हेर. १२. मोरोपंत—आदिपर्व—अ० ३५ गीति १८-२५ पहा. १३. उत्कंठेनें. १४. बातमीदार. १५. द्रुपदराजाजवळ. १६. व्यथित. १७. अ० १९२ श्लो० १४ पहा. १८. कोणत्या भिकाऱ्याच्या घरीं. (अ० १९२ श्लो० १५-१८.) १९. क्षत्रिय. २०. 'चंपकमाळा' 'पदकमाळा' असे पाठ आहेत. २१. पायांच्या धुळीच्या मळाला. २२. कावळ्यानें. २३. नीचतेची. २४. अध्याय १९३ श्लो० २-१३ पहा. २५. खिन्नता. २६. 'परिसीली' अन्य पाठ. २७. रात्रीचे.

नीचे पोटीं । ऐकिली नाहीं त्या वाक्पुटीं । [१]शक्रही दृष्टी [२]तृणतुल्य. ॥ ३५ ॥ तयांसवें वृद्ध जननी । द्रौपदी लागली तिच्या चरणीं, । अनुमान वाटे पांडु-पत्नी । कुंती देवी नेणवे. ॥ ३६ ॥ [३]होती न होती नये म्हणतां । [४]पांडव श्रम माझिया चित्ता, । तुम्हीं चातुर्यसमुद्र तौता ! । शोध करणें पुढारीं.'॥३७॥ द्रुपद म्हणे, '[५]लाखाजोहरीं । मुक्त झाले कैशापरी ? । मागां बोलिलें जें ऋ-षीश्वरीं । व्हावें सत्य वाटतें.' ॥ ३८ ॥ [६]पांचाळ [७]प्रेरी [८]पुरोहित, । तो नि-वेदी दंडवत, । म्हणे, 'तुम्हां [९]नगरनाथ । जाणों इच्छी मानसीं. ॥ ३९ ॥ कुळ शीळ नाम गोत्रें । वंश प्रगटावा पवित्र, । तेणें राजयाचे श्रोत्रें[१०] । [११]आनंदजळें निवतील.' ॥ ४० ॥ धर्मे करूनि [१२]ब्राह्मणपूजा । म्हणे आदरें, '[१३]परियसीं द्विजा ! । समाधान पावे राजा, । तैसें आपण वदावें. ॥ ४१ ॥ जें इच्छिजे तुझेनि जीवें, । तेंचि घडविलें असे दैवें, । ऐसें जाणोनि जिवें [१४]भावें । महोत्साह करावा. ॥ ४२ ॥ [१५]लक्ष्यभेद करावा पणीं । तुम्हींच नेम नेमिला वचनीं । तो जरी भेदिला ब्राह्मणीं । तरी [१६]दुश्चित्त कायसें ? ॥ ४३ ॥ क्षत्रियाहून ब्राह्मण श्रेष्ठ । हें तंव जाणतसां प्रगट, । राजा हृदयीं मानी कष्ट, । ते किमर्थ सांग पां ? ॥ ४४ ॥ तुम्हां वेगळे नव्हे आम्हीं, । ऐसें जाणावें [१७]अंतर्यामीं । आतां

१. इंद्र. २. तृणासारखा. ३. हे पांडव होत किंवा न होत—हें खात्रीनें म्हणतां येत नाहीं. ४. बापा ! द्रुपदा ! ['पुत्रे पितरि पूज्ये च तातशब्दो बुधैः स्मृतः' इति केशवः.] ५. लाक्षागृहांतून. ६. द्रुपद. ७. पाठवी, प्रेषी. ८. उपाध्याय. (अ० १९३ श्लो० १४.) पुरोहित कसा असावा किंवा पुरोहित होण्यास कोणते गुण लागतात याचें निरूपण पुढच्या पद्यांत केलें आहेः—'त्रय्यां च दंडनीत्यां च कुशलः स्यात्पुरोहितः । अथर्वविहितं कुर्यान्नित्यं शांतिकपौष्टिकम् ॥' इति कामंदकः; अथवा 'पुरोहितं च कुर्वीत दैवज्ञमुदितोदितम् । दंडनीत्यां च कुशलमथर्वाङ्गिरसे तथा ॥' इति मिताक्षरायाम्. ९. अ० १९३ श्लो० १६-१७ पहा. १०. कान. ११. हें रूपक आहे. १२. पुरोहित-पूजन. १३. अ० १९३ श्लो० २२-२८ पहा. १४. अंतःकरणपूर्वक. १५. नेम मारणें, राधायंत्र भेद करणें. १६. खिन्नचित्त. १७. अंतर्यामि—या शब्दाचा अर्थ 'हृदय' 'अंतःकरण' असा आहे; जसें 'अंतर्याम' कळकळल्यावांचून असा उद्गार निघायचा नाहीं,' 'अंतर्यामींची गोष्ट सहसा कोणाशीं प्रगट करूं नये,' 'ज्याचें मन त्याला अंतर्यामीं साक्ष असतें.' आतां लोकभाषेंत इतका गाढतर रूढ झालेला जो हा वरील शब्द याच्या स्वरूपाचा जर विचार केला तर ध्यानांत येईल कीं, धड शेंडा ना बुडखा अशासारखा हा शब्द आहे. संस्कृतांत 'अंतर्यामी' हें 'अंतः' (आंत) व 'यामी' (गमन करणारा) असें सिद्ध झालेलें विशेषण आहे. याचा अर्थ 'अंतर्गत,' 'आंतला' असा आहे; जसें 'हृदयांतर्यामीं परमेश्वर' 'शरीरांतर्यामीं ज्वर' इत्यादि. मराठी भाषेंतही असें म्हणतात कीं 'वर दिसत नाहीं तरी याच्या अंतर्यामीं ताप आहे.' येथें वरील संस्कृत प्रयोगाप्रमाणेंच 'अंतर्यामी' शब्दाचा मूळचा प्रयोग होता; पण पुढें लोकांचा असा समज होत गेला कीं, 'अंतर्यामीं' हें विशेषण नसून सप्तम्यंत नाम आहे, तेव्हां अर्थातच 'अंतर्याम' असें प्रातिपदिक पुढें सिद्ध झालें. (निबंधमाला अंक ४३.)

संशयाचे भ्रमीं । भ्रमों नको नरेंद्रा! ॥ ४५ ॥ लक्ष भेदूनि महापणीं । [१]विभांडिल्या क्षत्रियांच्या [२]श्रेणी । ऐसी [३]पुरुषार्थाची करणी । केंवि [४]ठाके आणिकां? ॥ ४६ ॥ कर्णशल्याचिया पाठी । आणिक कोण देखतां दृष्टी? । असो. [५]वाड न बोलों गोष्टी, । ब्राह्मण तुझे [६]कन्यार्थी.' ॥ ४७ ॥ ऐसें परिसोनि धर्मवचन, । पुरोहित करी शीघ्र गमन, । रायासि करूनि समाधान । सर्व वृत्तांत सांगीतला. ॥ ४८ ॥ परिसोनि पुरोहिताचीं वचनें । द्रुपदें धाडिलीं आमंत्रणें, । सवेंच प्रेरी पांच यानें । पांचांजणां पाचारूं. ॥ ४९ ॥ [७]रथ घेऊन धृष्टद्युम्न । येऊन धर्मास केलें नमन, । 'राजा पाहों इच्छी चरण । कृपेनें आलें पाहिजे.' ॥ ५० ॥ कुंती द्रौपदी एके रथीं । पांच [८]रहंवरीं पांच मूर्ती । चामर च्छत्रें गज पदाती । वाद्यगजरें आणिले. ॥ ५१ ॥ अनेकवर्ण अनेक [९]वृत्ती । [१०]जीवनोपायचिन्हें [११]निरुतीं । तितकीं मांडून ठेविलीं पंथीं । [१२]जातिपरीक्षेकारणें. ॥ ५२ ॥ नगरद्वारापासोनि प्रगट । जोंवरी पाहे [१३]भद्रपीठ । तोंवरी आयुधें अचाट । रचिलीं नानावृत्तींचीं. ॥ ५३ ॥ कोठें न घालूनियां [१४]दृष्टी, । नावेक शस्त्रसंभार निकटीं । [१५]घेऊन तुळिती मुष्टी । सतेज किंवा अतेज. ॥ ५४ ॥ [१६]भद्रासना पातले सहज, । मुख्यासनीं धर्मराज, । पाठीं उभे ठेले अनुज । निजमर्यादें आपुल्या. ॥ ५५ ॥ भय विस्मय नाहीं पोटीं, । द्रुपदसंपदा नये दृष्टीं, । राव पुत्रेसीं करी गोष्टी । 'राजे होती निर्धारें[१७].'॥५६॥ पुढें येऊन द्रुपदपत्नी । मस्तक ठेवूनि पृथाचरणीं । परम आदरें कवळोनि पाणी । अंतःपुरीं प्रवेशे. ॥ ५७ ॥ बैसवूनि कनकासनीं । दिव्यवस्त्रीं हेमाभरणीं । पूजिली जैसी देवांगणीं । प्राणप्रिया शिवाची. ॥ ५८ ॥ पांडवां पाहे याज्ञसेनु । तंव उगवले पंच [१८]भानु, । दर्शनें आल्हादलें मनु, । म्हणे, 'हे अवतार देवांचे.' ॥ ५९ ॥ श्वशुर मातुळ पुत्र बंधु । इष्ट मित्र सखे साधु । प्रीतीनें

---

१. मारिल्या, पराभविल्या. विभांडणें=पराभव करणें. २. पंक्ति. ३. पराक्रमाची कृति. ४. ठाकणें=प्राप्त होणें. ५. थोर, मोठ्या, ज्यास्त. ६. कन्यायाचक, कन्यासंपादक. ७. कांचनपद्मचित्र, सदश्वयुक्त आणि वसुधाधिपार्ह असे रथ. (अ० १९४ श्लो० २.) ८. रथीं. ९. धंदे. १०. उपजीविकेच्या उपायांचीं चिन्हें. ११. स्पष्टपणानें. १२. या कन्याहारकांची जात समजण्यासाठीं. १३. सिंहासन. १४. सांग्रामिकवस्तुसमूहाशिवाय त्यांनीं कांहींच फारसें पाहिलें नाहीं. (अ० १९४ श्लो० १४.) १५. 'उभे राहून स्पर्शिती बोटीं' असा पाठ आहे. १६. सिंहासन. भद्रासनाचें लक्षण 'देवीपुराणां'त आहे तें असें:—'हैमं च राजतं ताम्रं क्षीरवृक्षमयं च वा । भद्रासनं प्रकर्तव्यं सार्धहस्तसमुच्छ्रितम् ॥ सपादहस्तमानं च राज्ञो मांडलिकांतरात् ॥' [रंगनाथकृत विक्रमोर्वशीयनाटकटीका—पृष्ठ १३९ पहा.] १७. अ० १९४ श्लो० १५ पहा. १८. सूर्य.

पाचारी **द्रुपदु** । एकपंक्ती भोजना. ॥ ६० ॥ जांबूनदाचे[1] पेरियाळ[2] । रत्नवाटिया सुतेजाळ, । सुवर्णअडणिया[3] सोज्वळ । जडित झारिया जळपाना. ॥ ६१ ॥ हेमठाणवयावरी जडित तबकें । त्यांवरि रत्नाचे दीप अनेकें, । शुद्ध क्षाळूनि हस्तकें । अमृतअन्नें आणिलीं. ॥ ६२ ॥ लेह्य पेय चोष्य खाद्यें । भक्ष भोज्य नानाविधें । दुग्धसार घृत सुखादें । आरोगणें[4] सारिलीं. ॥ ६३ ॥ हस्त क्षाळिले सुगंध जीवनें[5] । पूगफळ कर्पूर खदिरपर्णें । अर्पूनियां चंदन सुमनें । पुष्पमाळा सूदल्या[6]. ॥ ६४ ॥ वल्कलाजिनें करूनि दुरी, । परिधान करविलें पीतांबरीं, । मुगुट कुंडलें कटिसूत्रीं । शृंगारिले पांचही. ॥ ६५ ॥ प्रार्थूनि बोले मग **पांचाळ**, । 'कँवण[7] जाती कवण कुळ? । कवण देश कवण स्थळ? । तें प्रांजळ बोलावें. ॥ ६६ ॥ आतां प्रतारणा[8] न कीजे । यथार्थ तेंचि अनुवादिजे, । कुटुंबामाजी मज लेखिजे । रंक एक द्वारीचें. ॥ ६७ ॥ निशीनें[9] आच्छादिला सूर्यो । तोंवरी लोपे समयो । जोंवरी प्रभातेचा[10] वायो । पुढें न करी अरुणातें. ॥ ६८ ॥ तुम्हीं लोपलां कृत्रिमगोष्टी, । परी लक्षणें सांगती प्रगट सृष्टी, । आतां करूनि कृपादृष्टी । आपणामाजी मेळवा.' ॥ ६९ ॥ हांसोनि बोले **युधिष्ठिर**, । '**पांडु**नृपाचा ज्येष्ठ कुमर, । **धर्मराज**[11] तो मी निर्धार । राजेश्वरा! जाण पां. ॥ ७० ॥ हा **भीमसेन** धाकुटा बंधु । जेणें केला **हिडिंब**वधु । **बक** मारून भयाचा कंदु । **एकचक्रीं** फेडिला. ॥ ७१ ॥ तिजा **अर्जुन** महावीरु । जो धनुर्धरां दीक्षागुरु । **भार्गव**[12] **भीष्म** कीं **रघुवीरु** । चौथा हाच गणावा. ॥ ७२ ॥ लावण्यद्वीपींचीं माणकें । चातुर्यतेजें अमोलिकें । तींहीं **माद्रीचीं** बाळकें । **नकुळ** आणि **सहदेव**. ॥ ७३ ॥ **कृष्णकृपें** **विदुरयत्नें** । मुक्त केलें हुताशनें[13] । तुम्हां वडिलांच्या[14] पुण्यें । पाय तुमचे देखिले. ॥ ७४ ॥ **कुंती** माता हे निर्धारीं । आम्हांऐसे पुत्र उदरीं । जन्मले म्हणोनि हा काळवरी । दुःखसमुद्रीं निमग्न.' ॥ ७५ ॥ ऐसें ऐकतांचि सकळीं । जयजयकारें पिटिली टाळी, । **द्रुपद** पाय वंदोनि भाळीं । क्षेमकवळीं मिसळले. ॥ ७६ ॥ आलिंगूनि **पांडवांतें**, । मुखें निंदी **धृतराष्ट्रातें**, । म्हणे, 'जामात, जोडलेति मातें ।

---

१. सोन्याचे. २. पात्रविशेष, ताटें. ३. सोन्याच्या अडण्या. ४. भोजनें. 'आरोगण' शब्दाचें हेंच उदाहरण मोलस्वर्थसाहेबांच्या मराठी–इंग्रजी कोशांत दिलें आहे. ५. उदकानें. ६. घातल्या. ७. अध्याय १९५ श्लो०२-६ पहा. ८. वंचना. ९. रात्रीनें. १०. प्रभात=प्रातःकाळ. ११. अध्याय १९५ श्लो० ९ पहा. १२. परशुराम. १३. अग्नीपासून. १४. अध्याय १५५ श्लो० १२ पहा. धर्माचें उत्तर श्लो० ८–१२ पर्यंत आहे.

कार्य तुमचें साधावया.' ॥ ७७ ॥ धृष्टद्युम्न चढला क्रोधा, । म्हणे, 'मी पाचारूनि युद्धा । कौरवांच्या शिरच्छेदा । मी एकला करीन. ॥ ७८ ॥ धार्तराष्ट्र निवटोनि बाणीं । धर्म स्थापीन राज्यासनीं, । कर्ण चैद्य शल्य शकुनी। एके सदनीं वसवीन. ॥ ७९ ॥ प्रतिकूळ झालिया भीष्म द्रोण । तेही रणीं पावती मरण, । आतां स्वस्थ करूनियां मन । सेवा घेणें मजहातीं.' ॥ ८० ॥ द्रुपद म्हणे, 'अगा कुमरा! । करणी करोनि दावीं चतुरा! । व्यर्थ बोलाचा पसारा । उघडूं नये अकाळीं.' ॥ ८१ ॥ पांडव जोडले जामात । तेणें द्रुपदा आल्हाद बहुत, । त्रैलोक्यासीं अमरनाथ । तृणतुल्य लक्षिला. ॥ ८२ ॥ रायें फोडिलीं भांडारें, । द्रव्यें वांटिलीं अपारें, । उभविलीं गुढिया मखरें । ध्वजपताकामंडित. ॥ ८३ ॥ राजा म्हणे धर्मराजातें, । 'उभयपक्षीं श्रेष्ठत्व तूतें, । आतां द्रौपदी आपुल्या हातें । अर्जुनातें समर्पी.' ॥ ८४ ॥ धर्म म्हणे, 'हा विचार । रहस्य बोलतां अपार, । पांचाळीतें भ्रतार । पांचही आम्हीं जाण पां. ॥ ८५ ॥ आधीं मातें देईं क्षण, । पाठीं भीम, मग अर्जुन, । त्यावरी माद्रीचे नंदन । एकपंक्ति नोवरे.' ॥ ८६ ॥ ऐकोनि कोपला याज्ञसेन, । स्तब्ध ठेला धरूनि मौन्य, । म्हणे, 'हें न मनी माझें मन, । लोकविरुद्ध आचार. ॥ ८७ ॥ तुम्हां पांचांत एकजण । अंगीकारा हें कन्यारत्न, । विधीनें करा पाणिग्रहण । जें कां मान्य समस्तां, ॥ ८८ ॥ एका पुरुषा बहुत नारी । देखिल्या ऐकिल्या चराचरीं, । एक भार्या पांच भ्रतारीं । हें अघटित सर्वथा. ॥ ८९ ॥ पंच भ्रतार पांचाळीतें । हें न मनिजे माझे चित्तें, । तुम्हीं सर्वज्ञ सर्वार्थे । विचारूनि मज सांगा.' ॥ ९० ॥ धर्म म्हणे, 'ऐक राया! । नेणतां आग्रह कीजे वायां, । द्रौपदी पांचांजणांची भार्या । नेमिलीसे विधीनें. ॥ ९१ ॥ पुराणीं ऐकिली जीर्ण कथा, । जटिला नामें गौतमवनिता । तीणें ऋषीश्वरा सांतां । वरूनि त्यांसी वर्तली. ॥ ९२ ॥ श्रीगुरुवचनं वंदोनि

---

१. इंद्र. २.अध्याय १९५ श्लो० २० पहा. ३.क्षण=विवाहप्राक्कालीन देवपूजादिपर्वोत्सव कुलधर्म. ['क्षणः पर्वोत्सवेऽपि स्यात्तथा मानेऽप्यनेहसे' इति मेदिनी. महाभारत—आदिपर्व—नीलकंठकृत टीका अ०१९५श्लो०२०.] ४. मानी. ५. अ० १९५ श्लो० २७-२८ पहा. ६. अध्याय १९५ श्लोक २९-३१ पहा, आणि अध्याय १९६ श्लोक १३-१७ पहा. ७. यांत धर्माचें उत्तर आहे. ७. गौतममुनीची कन्या. ही सर्व धर्मसंरक्षकांत श्रेष्ठ असून सात ऋषींची भार्या होती. ८. गौतमी. (अ०१९६ श्लो० १४ पहा.] याप्रमाणें मुनिकन्या वार्क्षी हिचा विवाह दहा भावांपाशीं झाला होता—अशी कथा आहे (अ० १९६ श्लो० १५.) ९. मोरोपंत—आदिपर्व अ० १० गीति ५६-५७ पहा.

माथां । झाली सातांजणांची कांता, । गुरूपरीस अधिक माता[1] । वेदशास्त्रीं बोलिजे. ॥ ९३ ॥ तें कुंतीचें आज्ञावचन । भिक्षा जोडिली दैवेंकरून, । वांटोनि सेवा अवघेजण । समसमान समत्वें. ॥ ९४ ॥ तें अन्यथा नोहे आतां । होणार तें होणें तत्वता, । ललाटींच्या ब्रह्मलिखिता।कोण भंगी सांग पां ?॥९५॥ पांचही[2] वर न चुकती कदा । कोण भंगी शंकरवरदा[3] ?' । हें परिसोनि द्रुपदा । विचार कांहीं सुचेना. ॥ ९६ ॥ मग म्हणे, 'तूं सर्वज्ञ । कुंती आणी धृष्टद्युम्न । तिघे सांगाल विचारून । तें प्रमाण म्यां करणें.' ॥ ९७ ॥ ऐसें करितां अनुवादन, । तव संकटीं पावे संकटहरण । तेंवी कृष्णद्वैपायन[4] । कृपेनें[5] आला त्या ठायां. ॥ ९८ ॥ देखोनि आनंदले सकळ, । भावें वंदिती चरणकमळ । स्नेहें पांचही कुंतीबाळ । आलिंगिले श्रीव्यासें. ॥ ९९ ॥ द्रुपदें नमस्कारूनि द्विजा । सर्वभावें अर्पिली पूजा, । म्हणे, 'दर्शनलाभ तुझा । कल्याण करी आमुतें. ॥ १०० ॥ फिटला सर्वही संदेहो । तुझे वचनीं मज निर्वाहो, । तूं नेमिसी तैसें राहों । हा निर्धार[6] मानसीं. ॥ १०१ ॥ आतां ऐकें द्वैपायना ! । हे द्रौपदी द्यावी कवणा । एकाजणा कीं पांचही जणा।तें स्वमुखें निरोपीं.'॥१०२॥ व्यास म्हणे, 'येविषयीं । चिंता न लगे करणे हृदयीं, । क्षणभरी एकांताच्या ठायीं । तुम्हीं आम्हीं बैसावें.' ॥ १०३ ॥ कुंती आणि पांचही जण । द्रुपदराजा धृष्टद्युम्न । अंतरगृहीं बैसवून । पूर्वकथा अनुवादे. ॥ १०४ ॥ 'नैमि[7]षारण्यामाजी पूर्वीं । दीर्घ[8] सत्र मांडिलें देवीं । शामित्र[9] याग या नांवीं । असुरजयाकारणें. ॥ १०५ ॥ होतां[10] केला धर्मराज[11] । तदां पडलें तेंचि[12] काज, ।

---

१. 'न मातुः परं दैवतम्' व 'सर्ववंद्येन यतिना प्रसूर्वंद्या प्रयत्नतः.' [आनंदाश्रमसंस्कृतग्रंथावलि–ग्रंथांक २२ श्रीमच्छंकरदिग्विजय पृ० ४९२.] 'पतिता गुरवस्त्याज्या न तु माता कदाचन । गर्भधारणपोषाभ्यां तेन माता गरीयसी ॥' स्मृतेः [स्तुतिकुसुमांजलि–स्तोत्र १८ श्लोक २३ टीका पहा. पृ० २६८.] 'गुरुषु जननी पराभवति' [स्तुतिकुसुमांजलि पृ० २६८.] 'पितृतोऽपि गुरुर्माता नास्ति मातृसमो गुरुः' । 'उपाध्यायान् दशाचार्य आचार्याणां शतं पिता । सहस्रं तु पितॄन् माता गौरवेणातिरिच्यते ॥' [रघुवंश सर्ग १ श्लोक १ ताराकुमारकविरत्नकृत टीका पृ० १० पहा.] अशा अर्थाचीं वाक्यें स्मृतिग्रंथांत आढळतात. २. 'होणार तें न चुके कदां' असाही पाठ आहे. ३. शंकर आहे वरद (वर देणारा) ज्याचा त्या अर्जुनाला. (शंकरानें प्रसन्न होऊन अर्जुनाला पाशुपतास्त्र दिलें अशी कथा वनपर्वांत आहे.) [अध्याय ४.] ४.व्यास. ५.'दैवें आला' असाही पाठ आहे. ६.निश्चय. ७. मोरोपंतकृत आदिपर्व–अध्याय ३५ गीति ५९-७४ यांत ही कथा आहे. (काव्यसंग्रह-पृ० १९८-१९९.) ८. मोठा यज्ञ. ९. यज्ञांत पशुवध करणें. १०. दीक्षित, यजमान. ११. यमराज. १२. मारणें.

दैत्य मारूनि झाले भूभुज[1] । ते पृथ्वीवरी मातले. ॥ १०६ ॥ प्रजावृद्धी झाली बहुतु । कोणातेंही नाहीं मृत्यु[2], । हें देखोनि चिंताग्रस्तु । देवं[3] म्हणती ब्रह्मयातें. ॥ १०७ ॥ 'प्रजावृद्धीची दाटणी[4] । भारें लवों पाहे धरणी[5], । यासी उपाय पद्मयोनी! । विचारिला पाहिजे.' ॥ १०८ ॥ ब्रह्मा म्हणे, 'वृंदारका[6]! । प्रजावृद्धीची कायसी शंका[7]? । वना जाऊन भूतांतका[8] । स्वकार्य तें निवेदूं.॥ १०९॥ अमरसहित अमरपती[9] । नैमिषारण्या येतां पंथीं । देखिली निर्मळ भागीरथी, । तेथें स्नानें सारिलीं[10]; ॥ ११० ॥ उदकप्रवाहें सोज्वळ । वाहोनि आलें सुवर्णकमळ[11], । शक्र म्हणे, 'यांचें[12] मूळ । शोधोनियां पहावें.' ॥ १११ ॥ वरुता चालिला गंगातीरीं । तंव जान्हवीमध्यनीरीं[13] । रोदन करीत दीर्घस्वरीं । दिव्य नारी देखिली. ॥ ११२ ॥ तिचे अश्रुबिंदु जे पडती । ते ते सुवर्णकमळें[14] होती, । तीतें पुसे सुरपती, । 'येथें तूं कोण? कोणाची? ॥ ११३ ॥ किमर्थ करिसी रोदनातें?' । येरी म्हणे, 'ये मज सांगातें । सर्व वृत्तांत कळेल तूंतें[15]' । म्हणोनि हातीं धरियेला. ॥ ११४ ॥ पश्चिमपथें गंगा मूळा । घेऊन गेली निर्जरपाळा[16], । पर्वताग्रीं[17] तनु विशाळा । देवाधिदेवा[18] देखिलें. ॥ ११५ ॥ त्रैलोक्याचा स्वामी श्रेष्ठ । शक्तीशीं[19] खेळे सारिपाट. । इंद्र येऊनि उभा निकट । परि तो दृष्टीं लक्षीना. ॥ ११६ ॥ विषाद पावोनि पाकशासन, । म्हणे, 'हें विश्व जैयां[20] अधीन । त्या मज अभ्युत्थानमान[21] । किमर्थ नाहीं दिधला? ॥ ११७ ॥ म्हणोनि प्रवर्तला निंदे, । परी तो स्पर्शला नाहीं क्रोधें, । खेळ सरतां विनोदें । शक्रा उजू पाहिलें. ॥ ११८ ॥ तयाची[22] लागतां दृष्टी, । काष्ठप्राय पडेला[23] सृष्टी, । सावध करोनी म्हणे[24] गोष्टी, । गर्व सांडीं अल्पका! ॥ ११९ ॥ तुजसारिखे इंद्र कोटी । नवे निर्मूनि दावीन दृष्टी, । ईश्वरी थोरपणाची गोष्टी । तृणासाठीं सरेना.'॥ १२० ॥ म्हणोनि हिमालयाचें शिखर । नखीं उन्मूळिलें सत्वर, । हें देखोनि सुरेश्वर[25] । भयें कांपे चळचळा. ॥ १२१ ॥ शक्र पुढें घाली दृष्टी । तंव बळसमुद्र तेज-

---

१. राजे. २. यम दीक्षित असल्यामुळें प्रजानाशाचें काम बंद पडलें आणि पृथ्वीवर मनुष्याची वृद्धि झाली. मनुष्य मरण्याचें बंद झालें तेव्हां अमर आणि मनुष्य यांत भेद (विशेष) राहिला नाहीं. ३. 'दीव्यते क्रीडति यस्मात् रोचते द्योतते दिवि । तस्मात् देव इति प्रोक्तः स्तूयते सर्वदैवतैः ॥.' ४. गर्दी. ५. पृथ्वी. ६. देवा. ७. भीति. ८. यमाला. ९. इंद्र. १०. उरकलीं. ११. हेमाब्ज. १२. या सुवर्णकमळाचें. १३. गंगेच्या मध्यभागांतील उदकांत. १४. अध्याय १९७ श्लोक ११ पहा. १५. अध्याय १९७ श्लोक १३ पहा. १६. इंद्राला. १७. गिरिराजमस्तकीं, हिमालयशिखरावर. १८. रुद्राला. १९. पार्वतीशीं अक्षक्रीडारक्त होता. २०. ज्या माझ्या (इंद्राच्या). २१. उठून आदर करणें. २२. त्या देवाची. २३. इंद्र (पडला). २४. भगवान् शिव. २५. इंद्र.

प्रृष्ठी । चौथे [1]इंद्र तयापाठीं । वज्रधर देखिले. ॥ १२२ ॥ देवें[2] निजसुखें [3]आज्ञा करी, । रोदन करीत आली नारी । कामें पीडिली बहुकाळवरी । म्हणोनि मागे पतीतें. ॥ १२३ ॥ 'तुम्हीं मानव देहधारी । होऊनि जन्मा पृथ्वीवरी । पांचांजणा एक नारी । हे स्वेच्छेनें भोगावी. ॥ १२४ ॥ हे स्वर्गलक्ष्मी मूर्तिमंता । होईल पांचांजणांची कांता । द्रुपदपांचाळदुहिता । मृत्युलोकीं म्हणतील. ॥ १२५ ॥ निमित्त होवोनि आपण । करीन क्षत्रियांचें हनन, । तुम्हीं पांडव पांचही जण । होवोनि जन्मा कुरुकुळीं. ॥ १२६ ॥ साह्य करून कमळावर । फेडावा वसुंधरेचा भर.'[4] । आज्ञा देतां सर्वेश्वर, । पांचही इंद्रीं प्रार्थिलें. ॥ १२७ ॥ 'जन्म देतोसि, देवराया! । तरी देवतावीर्यें आमुची [5]काया । जन्म पावे ऐसा स्वामिया! । [6]अनुग्रह करावा.' ॥१२८॥ कृपेनें बोले त्रिलोचन, । 'धर्म वायू [7]शचीरमण । [8]अश्विनौदेव यांपासून । जन्म होतील तुम्हांतें. ॥ १२९ ॥ विश्व भुक् आणि भूत धामा । शिबी इंद्र अद्भुतकर्मा । शांति ते[10]जस्वी, या नामा । त्यागोनियां येलोकीं ॥ १३० ॥ धर्म भीम आणि अर्जुन । नकुळ सहदेव दोघेजण । इहीं नामीं सर्वजण । पाचारितील भूलोकीं.'[9] ॥ १३१ ॥ पांचही इंद्र धरोनि हातीं । हर्षें पातली विष्णुप्रती, । केशव [11]म्हणे, '[12]पुरारातीं । बोलिला तें मज मान्य. ॥ १३२ ॥ मृत्युलोकीं धरूनि जन्में । पांच इंद्र व्हा पराक्रमें । भूभार फेडावया विक्रमें । साह्य होईन मी तुम्हां.' ॥ १३३ ॥ मस्तकींचे उभय रोम । एक श्वेत[13] एक [14]श्याम । प्रसाद ओपिला उत्तम । सर्वोत्तमें तेकाळीं. ॥१३४॥ यादवकुळामा-

---

१. हे चार पूर्वींचे इंद्र होत. २. गिरिश. (शिव.) ३. पांचां इंद्रांला आणि एका रडणाऱ्या दिव्य नारीला आज्ञा करी. ४. अध्याय १९७ श्लोक २७-२८ पहा. ५. देह. ६. कृपा. ७. इंद्र. ८. हे देव दोन म्हणून द्विवचनाचें रूप योजिलें आहे. ९. अध्याय १९७ श्लोक २९-३० पहा. १०. इंद्रांश. ११. भगवान् नारायण यानें दिलेल्या पांच इंद्रांस बरोबर घेऊन उमापति नारायणाकडे गेला, त्यानेंही या पांच इंद्रांस मनुष्यलोकीं जन्म घेण्यास आज्ञा दिली. (आदिपर्व–अध्याय १९७ श्लोक ३१.) १२. त्रिपुरासुराचा शत्रु. (महादेव.) १३. पांढरा. १४. काळा. सित म्ह० पांढरा आणि असित म्ह० काळा. याविषयीं आधार—'स चापि केशौ हरिरुद्बबर्ह शुक्लमेकमपरं चापि कृष्णम् । तौ चापि केशौ निविशेतां यदूनां कुले स्त्रियौ रोहिणीं देवकीं च ॥ तयोरेको बलभद्रो बभूव योऽसौ श्वेतस्तस्य देवस्य केशः । कृष्णो द्वितीयः केशवः संबभूव केशो योऽसौ वर्णतः कृष्ण उक्तः ॥' (महाभारत–आदिपर्व, अध्याय १९७ श्लोक ३२-३३.) भावार्थ–भगवान् नारायणानें आपला सित म्ह० पांढरा आणि असित म्ह० काळा असे दोन केश उपटून यदुकुळांत टाकिले; त्यांत श्वेत केसाचा अवतार रोहिणीचे ठायीं बळराम झाला आणि कृष्ण केंसाचा अवतार देवकीच्या ठायीं श्रीकृष्ण झाला.

झारी । देवकी रोहिणी यांच्या उदरीं;। निक्षेपावे तेथें श्रीहरी। आणी बळभद्र जन्मेल. ॥१३५॥ श्वेत तो बळदेव कामपाळ । कृष्ण तो श्रीकृष्ण गोपाळ । याचेनि बळें पृथ्वीतळ । भारातीत[1] करावें.' ॥ १३६ ॥ ते हे पांडव गा![2] तत्वतां । इंद्रावतार शची[3] वनिता । ते ही द्रौपदी तुझी दुहिता[4] । देवकार्या अवतरली. ॥ १३७ ॥ साही ऋणानुबंधसंगीं । पातलीं एक एकालागीं । तीं केंवि विघडती वियोगीं? । हें तत्वतां विचारा. ॥ १३८ ॥ देवचरित्र मानवा न कळे, । लोकाचार कांहीं न मिळे, । हृदयीं जाणोनि ईश्वरलीळे- । पुढें कार्य संपादा. ॥ १३९ ॥ पांडव पांच इंद्रांची प्रतिमा । हे प्रतीती[5] नरोत्तमा! । प्रत्यक्ष दाखवीन तुम्हां । दिव्य चक्षु देऊनी.' ॥ १४० ॥ म्हणूनि कमंडलूचें जळ । नयनीं स्पर्शिलें अळुमाळ[6] । सूर्यवन्हीहूनि तेजाळ । तालप्रमाण तेजस्वी. ॥१४१॥ मुगुटीं भासती वज्रार्क । कुंडलीं लोपले शशांक[7] । विष्णुतेजाचे दीपक । ब्रह्मांडगेहीं उजळिले. ॥ १४२ ॥ हें देखोनि याज्ञसेन । अष्टभावें[8] झांकी नयन, । धरून व्यासाचे चरण । मौन्यमुद्रा राहिला. ॥ १४३ ॥ पुढती व्यास बोले गोष्टी, । 'पूर्वीं ऋषिकन्या गोमटी[9] । तपें आराधूनि धूर्जटी[10] । वेगीं मागे वरातें. ॥ १४४ ॥ 'भतार दे दे' या उत्तरीं । पांचदां प्रार्थिला त्रिपुरारी, । प्रसन्न होवोनि मदनारी । 'घे घे' म्हणे पांचदां. ॥ १४५ ॥ 'पांडवांचें अंगनारत्न[11] । होऊनि कामना[12] करावी पूर्ण' । ऐसें शंकराचें वचन । सांग कोणें भंगावें? ॥ १४६ ॥ सर्व संशय दवडोनि चित्तीं । द्रौपदी ओपी 'पांडवांहातीं'[13] । ऐसें[14] सांगोनि व्यासमूर्ती । अंतर्धान पावली. ॥ १४७ ॥ द्रौपदीविवाह संभ्रमकाज । करावया राजया आनंद भोज । तें निरूपण ग्रंथराज ।

---

१. भारहीन. २. अगा! द्रुपदा! ३. इंद्राणी. ४. कन्या. ५. खात्री, अनुभव. ६. किंचित्. ७. चंद्र. ८. अष्टभाव येणेंप्रमाणें आहेत:—'स्तंभः स्वेदोऽथ रोमांचः स्वरभंगोऽथ वेपथुः । वैवर्ण्यमश्रुप्रलयौ अष्टौ भावाश्च सात्विकाः ॥' १ स्तंभ (स्तब्धता), २ स्वेद (घाम येणें), ३ रोमांच (आंगावर कांटा उभा राहणें), ४ वेपथु (कंप), ५ वैवर्ण्य (तोंडाचा वर्ण बदलणें), ६ अश्रु (डोळ्यांतून पाणी येणें), ७ प्रलय (बेशुद्धि), ८ वैस्वर्य (स्वर पालटणें). या आठ भावांचें स्पष्ट विवेचन पृ० ३७१ टीप ४ यांत पहावें. ९. सुंदर. १०. शिव. ११. स्त्रीरत्न. १२. इच्छा. १३. येथें व्यासोक्ति समाप्त होते. १४. देवांची गुप्त गोष्ट; पांच इंद्र हेच पांडव आणि स्वर्गश्री ही लक्ष्मी इत्यादि रहस्य. अर्जुन, हा इंद्राचा अंश. इंद्र स्वपदाधिष्ठित असल्यामुळें त्यानें जन्म न घेतां आपल्या वीर्यानें उत्पन्न झालेला असा अंशभूत पांचवा पुरुष दिला तो अर्जुन. (आदिपर्व, अध्याय १९७ श्लोक.)

श्रोतियें कर्णीं परिसावा. ॥ १४८ ॥ मुक्तेश्वराचे उन्मेष मृत्य । संतस्तवनीं आर्तवंत । तें पुढारीं परिसोत । [1]महानुभाव [2]आवडी. ॥ १४९ ॥

अध्याय त्रेचाळिसावा.

ऐकोनि व्यासमुखींची वाणी । [3]भेरीनाद उठिले गगनीं. । [4]सुमनवृष्टी होतां धरणी । गंधविषयें व्यापिली. ॥ १ ॥ मूळें पाठविलीं रायांतें । शिष्य-कुटुंबीऋषिवरांतें । द्रुपदें जाऊनि कृष्णातें । यादवांसीं राहविलें. ॥ २ ॥ द्रुपदस्तुती आरंभी [5]अवळीला, । म्हणे, 'जयजय विश्वंभर! विश्वपाळा! । आनंद-सुखसोहळा । जगन्नायका! अजिता! ॥ ३ ॥ जयजयाजी! परात्परा! । [6]करुणा-करा! गुणसमुद्रा! । आदिनारायणा! सुंदरा! । परमपुरुषा! तूं एक. ॥ ४ ॥ वैकुंठनायका! लक्ष्मीपती! । जगदात्मया! जगत्पती! । सुंदर तूं श्याममूर्ती । जग-दीशा! देवराया! ॥ ५ ॥ [7]माधवा! [8]राजीवलोचना! । सच्चिदानंदा! स्वानंद-घना! । ब्रह्मानंदा! परिपूर्णा! । तूंचि एक स्वामिया. ॥ ६ ॥ शंखचक्रगदाधरा! । निजभक्तांसीं आधारा! । निराकारा! परात्परा! । परमानंदा! तूं. ॥ ७ ॥ चित्सुखाचा सोहळा । स्वानंदसुख[9]कल्लोळा! । जगज्जीवना! बहुळा । आदि-पुरुषा! ॥ ८ ॥ अनंतकोटिब्रह्मांडनायका! । विश्वेशा! विश्वव्यापका! । गोपीवल्लभा विश्वपाळका! । श्रीकृष्णा! मुरारी! ॥ ९ ॥ मेघश्यामतनु श्या-मला! । गळां वैजयंती माळा । कासे पीतांबर पींवळा । विद्युत्प्राय झळकत. ॥ १० ॥ श्रीमुखचंद्र अतिसाजिरा । कोटि[10]कंदर्पसमानवीरा! । श्यामसुंदर सुकुमारा । जगन्निवासा! जी! ॥ ११ ॥ लावण्यगुणनिधाना! । कोटिकंदर्प-विराजमाना! । आनंदगुणनिधाना । श्रीकृष्णराया! तूं. ॥ १२ ॥ श्रीकृष्णा! जगद्गुरु । तूंचि एक चराचरु । लावण्यगुणसागरु । आनंदाचा तूं. ॥ १३ ॥ कल्पतरु चिंतामणी । गोपीवल्लभशिरोमणी. । अगाध महिमा तुझा वर्णी । ऐसा कोण [11]महात्मा? ॥ १४ ॥ तूं स्वामी माझ्या दातारा! । सकळ विद्यां-

---

१. महामनस्क, उदारधी. २. या अध्यायांत मूळांतील १९१-१९७ या अध्यायांतील कथेचा समावेश झाला आहे. यांत कुंती-धर्मार्जुन यांचा संवाद, धृष्टद्युम्नकृत पांडववृत्तांतोपलंभ, द्रुपदपुरोहित. युधिष्ठिर यांचा संवाद, द्रुपदकृत पांडवपरीक्षण, आम्ही पांडव असें द्रुपदाला धर्माचें निवेदन, पांचांसह विवाह करावा असें व्यासवचन आणि द्रौपदीपूर्वजन्मकथा इतक्या विषयांचा अंतर्भाव झाला आहे. ३. नगाऱ्याचे ध्वनी. ४. पुष्पवृष्टि. ५. सहजीं, लीलेनें. ६. दयाखनि. (आकर=खाण.) ७. लक्ष्मी-पते! ८. कमलनयना! ९. कल्लोळ=लहरी, लाट. १०. मदन. ११. महानुभाव, महाशय.

चिया आधारा ! । करिसी भक्तांच्या कैवारा । सगुणरूपा ! श्रीकृष्णा ! ॥१५॥ जगदीशा ! कैठभारी ! । तूंचि एक चराचरीं । विश्वंवंद्या मुरारी ! । पद्मनाभा ! स्वामिया !' ॥ १६ ॥ ऐसी द्रुपदाची विनंती । ऐकोनि म्हणे रमापती, । 'यथाविधी लग्न स्थिती । लावी' म्हणे तयातें. ॥ १७ ॥ [1]उभयमंडपीं [2]साक्षेपें । समान सोहळा करविला नृपें. । देवकप्रतिष्ठा [3]हरिद्रालेपें । मंगळाभ्यंग सुगंधी. ॥ १८ ॥ वस्त्रअलंकाररत्नजडित । कन्या शृंगारी नृपनाथ, । तैसेच पांचही जामात । वस्त्राभरणीं शोभविले. ॥ १९ ॥ [4]मधुपर्कादि पूजाविधी । पाणिग्रहण लग्नसिद्धी । धर्मासि अर्पूनि आधीं । तयापाठीं चौघांतें. ॥ २० ॥ पूजा समर्पूनि सप्रेम । प्रदक्षिणाविधी होम । सांग करवी ऋषी धौम्य । जो कां स्वरूप वेदांचें. ॥ २१ ॥ अवलोकितां पांचही वर । द्रुपदा हृदयीं आल्हाद थोर, । इच्छिलें त्याहूनि अपार । फळ पावला सुखाचें. ॥ २२ ॥ द्रौपदीभोगाचा काम । पांचांचे हृदयीं वर्ते सम । तैसाचि वधूचा मनोधर्म । पांचांतेंही कवळीत. ॥ २३ ॥ हीं चिन्हें देखोनि दृष्टी । राजा चमत्कारला पोटीं । होय पांचांची वधू गोमटी । पूर्वजन्मसंबंध. ॥ २४ ॥ सुखसोहळा चारीदिवस । करितां राजया अधिक उल्हास, । जेंवी अतृप्तां [5]महेश । भाग्य देतो दासांतें. ॥२५॥ नाना वस्त्रें अमोलिक । दिव्य रत्नें [6]अलोलिक । नाना [7]आभरणें देख । मनोभावें अर्पिलीं. ॥ २६ ॥ राजे वऱ्हाडी नागरीक । प्रधान सोयरे सुहृद लोक ।

---

१. वधूवरपक्षांकडील मंडपांत. २. अगत्यानें. ३. हळदीच्या लेपानें. ४. विवाहसमयीं वर वधूच्या द्वारीं आला असतां पादप्रक्षालनादि करून मध तूप आणि दहीं हीं मिश्रित करून त्यास समर्पून गंध वस्त्र इत्यादिकांनीं त्याची पूजा करणें, या विधीला 'मधुपर्क' म्हणतात. या संबंधानें पुढील वचनें आधारभूत आहेत:—'दधि सर्पिर्जलं क्षौद्रं सितैताभिस्तु पंचभिः । प्रोच्यते **मधुपर्क**स्तु सर्वदेवौघतुष्टये ॥ जलं तु सर्वतः स्वल्पं सिता दधि घृतं समम् । सर्वेषामधिकं क्षौद्रं **मधुपर्के** प्रयोजयेत् ॥' (कालिकापुराण.) याचा भावार्थ:—सर्व देवांच्या प्रीणनार्थं दधि घृत जल मधु आणि शर्करा या पांच पदार्थांचें जें मिश्रण करतात त्याला **मधुपर्क** हें नांव आहे. त्यांत पाण्याचा अंश सर्वांत कमी असतो. साखर दहीं आणि तूप हीं सारख्या प्रमाणानें असतात. परंतु मधुपर्कांत मधाचें परिमाण सर्वांत जास्त असतें. 'राजर्त्विक् स्नातकगुरून्प्रियश्वशुरमातुलान् । अर्हयेन्मधुपर्केण परिसंवत्सरात्पुनः ॥' [मनुस्मृति–अध्याय ३ श्लोक ११९.] याचा भावार्थ:—राजा, ऋत्विक्, स्नातक (वेदाध्ययन करून गुरुगृहापासून आलेला वेदाभ्यासी विद्यार्थी), गुरु, जांवई, सासरा आणि मामा, हे सात घरीं आले असतां गृह्यसूत्रांत सांगितल्याप्रमाणें त्यांची मधुपर्कद्वारा पूजा करावी. एक संवत्सर लोटल्यावर ते पुनः आले तर त्यांची मधुपर्कपूजा पुनः केली पाहिजे. ५. शंकर. ६. अलौकिक. ७. अलंकार.

वस्त्राभरणीं एक एक । गौरविले सन्मानें. ॥ २७ ॥ बरवीं [1]मार्जनें करविलीं । वस्त्रें [2]पट्टकुळें नेसविलीं, । कपाळीं कुंकुमें चर्चिलीं । समभावें सर्वांतें. ॥२८॥ अंगीं सुगंध उद्या चर्चिल्या, । पुष्पमाळा गळां घातल्या, । मग पंक्ती बैसविल्या । ताटें मांडिलीं विचित्र. ॥ २९ ॥ वरी पक्वान्नें वाढिलीं । भोजनें सकळिकीं [3]सारिलीं, । आचवणें सुगंधजळें झालीं । विडे कर्पूरयुक्त दिल्हे. ॥ ३० ॥ सर्वही बुडाले कुंकुमोदकीं । कस्तूरीटिळक तांबूल मुखीं, । माळा लेऊन चंपकी । [4]नगरगर्भीं मिरवती. ॥३१॥ ऋषी ब्राह्मण रायानें । तृप्त केले अन्नपानें, । घृतशर्करादुग्धजी[5]वनें । पाट वाहाती मूतळीं. ॥ ३२ ॥ भक्ष्यें नानापरीचीं । पक्वान्नें वाढिलीं साचीं । शाका अपूर्व पवित्र रुची । सर्वां भोजन करविलें. ॥ ३३ ॥ सुगंध विडे दीधले । समस्तांसी सुखी केलें, । अपार दक्षणेसीं बोळविले । मिती नाहीं तयासी. ॥ ३४ ॥ आदी मध्यें अवसानीं । याचक उबगले दक्षिणादानीं । वसनेंधनेंधेनुयानीं । म्हणती वोझें न वेववे. ॥ ३५ ॥ ब्राह्मणा दानें दीधलीं अपार । लोक सुखी केले समग्र । जयजयकार करोनि सत्वर । देती आशीर्वादातें. ॥ ३६ ॥ दे[6]वांगनांचीं नर्तनें । गंधर्वांचीं गायनें । उचित पावतां चौगुणें । [7]भाट करिती गर्जना. ॥ ३७ ॥ आंदण ओपितां संपत्ती । अयोग्य मानी पांचाळपती । कनकमेरूपुढें भक्तीं । [8]वराटिका अर्पणें. ॥ ३८ ॥ शाठ्यायनें [9]भद्रजाती । सुवर्णमाळिका रत्नदीप्ती । अष्टशावकी एकहस्ती । दे [10]पांचशत पांचांतें. ॥ ३९ ॥ रत्नचाकें हेमदंड । हेममंडपीं मकरतुंड । चारी [11]वारू बळप्रचंड । एके रथीं जुंपिले. ॥ ४० ॥ ऐसे शृंगारूनि रथ । पांचजणा पांचशत । अश्वआभरणीं मंडित । सहस्र एक एकातें. ॥४१॥ सोळावर्षांच्या सुजाणी । कळाकुशळ लावण्यखाणी । दासी जातीच्या [12]पद्मिणी । पांचशत पांचांतें. ॥ ४२ ॥ रूपविद्यातारुण्यगुणी । [13]प्रयोजपात्र मंडित पाणी ।

---

१. स्नानें. (अ० १९८ श्लो० ९.) २. उत्तम वस्त्रें. ३. केलीं. ४. शहरांत. ५. उदकें. ६. अप्सरांचीं. ७. स्तुतिपाठक. ८. कवडी. ९. भद्रजाति=हत्ती. [गजाच्या चार जाति आहेत:–'भद्रो मंद्रो मृगश्चेति संकीर्णश्चेति जातयः । चतस्रः करिणां तासां भद्रोऽतर्भद एव यः ॥' वल्लभ–रघुवंश–सर्ग २ श्लो० ७] वाल्मीकिरामायणांत हत्तीच्या तीन जाति आहेत असें वर्णन आहे. [बाळकांड–सर्ग ६ श्लो० २५.] 'पद्मी गज' दिले असें मूळांत आहे. (श्लो. १६) 'पद्म' हें गजोत्तम लक्षण आहे (नीलकंठकृत टीका पहा.) १०. अध्याय १९ श्लोक १५-१७ पहा. यांत द्रुपदानें जें आंदण दिलें त्याचें वर्णन आहे. ११. घोडे. १२. मागें पृ० ५१ टीप ४ व पृ० ६५ टीप ६ पहा. १३. पूर्णपात्रानें मंडित (अलंकृत).

सेवार्थ तिष्ठती अनुदिनीं । ते दासशत एकाएका. ॥ ४३ ॥ सोळा तुळांचा एक निष्क । तीं हेमनाणीं अयुत एक, । तितकींच रत्नें अमोलिक । एकएका अर्पिलीं. ॥ ४४ ॥ उष्ट्रें भरिलीं वस्त्रभारें । धेनु म्हैसी खिल्लारें, । धवळ[1] नंदीच्या आकारें । लक्ष एक वृषभांचें. ॥ ४५ ॥ ऐसें आंदण ओपोनि हातीं । आनंद न सांठे द्रुपदचित्तीं, । म्हणे, 'माझेनि पाडें नृपती । भुवनत्रयीं असेना. ॥ ४६ ॥ कृष्णबळें पांडवबळ । लाधलें म्हणोनि मीच सबळ, । कळिकाळासीं बांधीन सकळ । कौरवकुळ[2] तें मज किती?' ॥ ४७ ॥ कुंती गौरविली वरमाय । द्रुपदभार्या[3] वंदी पाय । मोहें कवळोनियां राय । कन्या हस्तें अर्पिली. ॥ ४८ ॥ माता पूजिली वस्त्राभरणीं । कुंती कृपेची मंदाकिनी,[4] । स्नुषा[5] आलिंगूनि वचनीं । आशीर्वाद अनुवादे. ॥ ४९ ॥ 'जेंवि इंद्राणी इंद्रातें, । स्वाहा देवी वन्हिपुरुषातें,[6] । रोहिणी आवडे चंद्रातें, । तेंवी प्रियांतें प्रिय होई. ॥ ५० ॥ जेंवी दमयंती नळातें, । अरुंधती वसिष्ठातें, । भद्रा जेंवी वैश्रवणातें,[7] । तेंवी, प्रियांतें प्रिय होई. ॥ ५१ ॥ पद्मनाभातें पद्मालया,[8] । शंकरातें शैलतनया,[9] । जेंवी सावित्री ब्रह्मया,[10] । तेंवी तूं प्रियां प्रिय होई.॥५२॥ लोपामुद्रा अगस्तीप्रती, । जालंधरा [11]वृंदा सती, । जमदग्नीतें रेणुका भगवती, । तेंवी तूं कांतां प्रिय होई. ॥ ५३ ॥ अत्रिऋषीतें अनसूया, । श्रीरामातें विदेहतनया, । प्रभाकरातें[12] जैसी छाया । तेंवी तूं प्रियां प्रिय होई.॥५४॥ पुत्र प्रसवोनि पुरुषार्थी । जेंवी मी श्लाघ्यता मिरवीं क्षिती । वरमायपणाची संपत्ती । सोहळा भोगीतसें संभ्रमें.[13] ॥ ५५ ॥ तेंवी प्रसवोनि सुगुणात्मजा । व-

---

१. शुभ्र. २. कुळ-सजातीयगण. ('सजातीयगणे गोत्रे गेहेऽपि कथितं कुलम्' इति सुधा.) ३. अध्याय १९९ श्लोक २ पहा. द्रुपदाच्या सकल स्त्रियांनीं कुंतीला वंदन केलें. ४. भागीरथी. ५. सून. ६. विभावसूतें. ७. कुबेरातें. ८. लक्ष्मी. ९. पार्वती. १०. ओव्या ५२-५४ यांतील उदाहरणें मूळांत नाहींत. (अ० १९९ श्लो० ६-७ पहा.) ११. वृंदा—ही जालंधर नामक असुराची भार्या. ही मोठी पतिव्रता होती म्हणून तिच्या पुण्यानें देव आणि राक्षस यांचे युद्धांत जालंधराचा पराभव होत नसे, म्हणून विष्णूनें जालंधराचे रूपानें येऊन वृंदेचें पातिव्रत्य हरण केलें. ह्या पातकामुळें जालंधर युद्धांत मृत्यु पावला. म्हणून तिनें सती जातेवेळेस विष्णूला 'तुला स्त्रीवियोग होईल' असा शाप दिला. पुढें ती सती जाऊं लागली तेव्हां तिचा वियोग विष्णूला सहन होईना. तेव्हां तिनें त्याला असा उ:शाप दिला कीं, 'मी सती गेल्यावर माझे चितेवर एक तुळसीचें झाड उगवेल त्यासीं विवाह कर म्हणजे वियोगदु:ख होईल.' याप्रमाणें त्यानें केल्यावर त्यांची शांति झाली—अशी कथा आहे. १२. सूर्यातें. १३. आदरानें.

रमायपणाची अनर्घ्य पूजा । अनंत काळ भोगीं वोजा । मंगळागौरीसारिखी.॥५६॥ [1]कुरुजांगळादिक देशीं । राजपत्नी [2]पट्टमहिषी । राजसेवक प्रजांसी । वंद्य होईं श्रेष्ठत्वें.॥५७॥भ्रतार जिंकितील भूमंडळ,। करितील हयमेध पुष्कळ,। तेथें पाळीं ब्राह्मणकुळ । अन्नदानें [3]सुवर्णें.' ॥ ५८ ॥ ऐशी कुंती अनुवादतां । असंख्यात ऋषिवनिता । 'तथास्तु' म्हणती पौरकांता । पुढती पायां लागली. ॥ ५९ ॥ तेचेंक्षणीं [5]द्वारकापती । उष्ट्रीं [6]वामी करिणी रथीं । भरूनि उपायनसंपत्ती । पांडवांप्रती पाठविली. ॥६०॥ सिंधुद्वीपींचीं [7]अंशुकें । मोलें घेती जनक तुकें, । मोटे बांधिजे उदकें । तीं असंख्य बहुवर्णीं. ॥ ६१ ॥ इंद्रगोपाहूनि तेजिष्ठ । जैसे सुरंग सूर्यपुट । [8]जपाकुसुमाहूनि तांबट । तींही अपार पाठविलीं.॥ ६२ ॥ अश्वरोमजें श्वानरोमजें । उष्ट्ररोमजें सतेजें । ऊर्णाकोश कृमिजें । तरुजें तृणजें अमूल्यें, ॥ ६३ ॥अनेक देशींचीं अनेक वसनें । चित्रपट कंबळासनें । शिरोवेष्टणें कटिबंधनें। शय्यास्तरणें विचित्रें, ॥ ६४ ॥ मुक्तामणिकें हेमाभरणें। नीळ पाचु पेरोज लक्षणें पद्मरागाचीं कंकणें। [9]वैडूर्यपात्रें पाठविलीं. ॥ ६५ ॥सहस्रावधी दासी दास । भूषण वेष्टित सुवास । शस्त्रमंडित सुवर्णकोश। [10]मोलेंगळे पाठविले.॥ ६६ ॥ [11]मत्त कुंजर तरुण वाजी । कनकरथ कनकध्वजी । स्पर्धा करिती सूर्यतेजीं । ऐसे असंख्य पाठ-विले.॥६७॥ शोधित जांबूनदाच्या [12]खोटी। सुवर्ण धाडिलें एक कोटी।कृष्णप्रसाद देखतां दृष्टी। पांडवां पोटीं आल्हाद. ॥ ६८ ॥नाना रत्नांचीं आभरणें। मुक्ताफळ-माळा हिरेरत्नें । मोहनमाळा विचित्र यानें। ऐशीं दीधलीं पांडवां. ॥६९॥ नाना-वस्त्रें अमोलिक । कोटीच्या कोटी असंख्य । नाना पडदे दिव्य देख । तेही अ-र्पिले पांडवां. ॥ ७० ॥ परमानंद [13]नसंटे चित्ता। सरली मागील पुढील चिंता, । राजया आणी राजमाता । न्यून कांहीं दिसेना. ॥ ७१ ॥ पांचाजणां पांच सदनें । मनोहरें ओपिलीं [14]याज्ञसेनें, । उपमे उणीं इंद्रभुवनें । तेथें स्वस्थ क्री-डती. ॥ ७२ ॥ चहूं सदनीं चौघेजण । एके गृहीं कृष्णार्जुन । क्षणक्षण

१. अध्याय १९९ श्लोक ९ पहा. २. पट्टमहिषी=पट्टराज्ञी, पट्टदेवी, मुख्यराणी. ३. येथें कुंतीची उक्ति समाप्त होते. (अ० १९९ श्लोक ६-१२.) यांत कुंतीनें केलेला उपदेश चिंतनीय आहे. ४. 'ऐकोनि कुंतीचा आशीर्वाद । द्रौपदी वंदी पादारविंद । तंव येरीकडे मुकुंद । पांडवां वस्त्रें पाठवी ॥' असा अन्यपाठ आहे. ५. कृष्ण. (अ० १९९ श्लो० १३-१८.) ६. वामी=वडवा, घोडी. ['वाम्यश्वावडवा' इत्यमरः.] ७. वस्त्रें. ८. जास्वंदीच्या फुलाहून. ९. रत्नपात्रें. १०. मोलानें श्रेष्ठ. ११. 'मारुततुल्य जवन वाजी' असाही पाठ आहे. १२. सोनें इत्यादि आटवून वर्तुळ चतुष्कोण जो आकार त्या. १३. न सांटे. १४. द्रुपदानें.

याज्ञसेन । सांभाळीत सर्वार्थीं. ॥ ७३ ॥ 'द्रौपदीस्वयंबर'निरूपण । श्रोतयां सांगितलें संपूर्ण । पुढील कथेचें अनुसंधान । अत्यादरें परिसावें. ॥ ७४ ॥ अवधानकळा ते वैरमाय[1] । वक्तृत्वशक्ति ते वेहूमाय[2] । म्हणोनि क्षणक्षणा पाय । वंदावया अधिकारु. ॥ ७५ ॥ सद्गुरुलीला विश्वंभर । स्मरणें तारी संसारपार । हाचि धरोनि आधार । मुक्तेश्वर अनुवादे. ॥ ७६ ॥

अध्याय चव्वेचाळिसावा.

पांडव वांचले लाखाजोहरीं[5] । द्रौपदी जिंकिली[6] स्वयंवरीं, । मात फांकली पृथ्वीवरी । सूर्यप्रभेसारिखी. ॥ १ ॥ निंदूनि बोलती सर्व राजे, । 'आझुनि धृतराष्ट्र न धरी लाजे, । अपकीर्तिकाळिमेचें ओझें । व्यर्थ वाहे दुरात्मा.' ॥ २ ॥ मनोवेगें गुप्त हेरीं । वार्ता फोडिली कौरवभारीं, । 'द्रुपदें पांडवां दिधली कुमरी । पाणिग्रह विधीनें. ॥ ३ ॥ लक्ष भेदिलें पंचशरीं[7] । तो अर्जुन होय निर्धारी, । सैन्य भंगिलें रणचत्वरीं[8] । तोचि भीम[9] जाणावा. ॥ ४ ॥ द्रुपदें दीधलें बहु आंदण । कृष्णें धाडिलें उपायन[10], । हें ऐकोनि दुर्योधन । हृदय पिटी हस्तकें. ॥ ५ ॥ कर्ण झाला अतिविवर्ण[11] । म्हणे, हें विधीचें करणें कोण? । शकुनि म्हणे, 'गेला प्राण । आलें मरण रोकडें.' ॥ ६ ॥ दुःशासन मोकली धाय, । म्हणे 'गेले हातपाय, । आतां विचार करणें काय । तो तात्काळ विचारा.' ॥ ७ ॥ शकुनि म्हणे, 'ऐका मात, । सांगेन तोचि स्वीकारा अर्थ, । संधिमित्रत्व आर्जवपंथ । येणें जन्मीं खुंटला. ॥ ८ ॥ तुम्हीं जाळिलें वैश्वानरीं[12] । हे मात प्रसिद्धली पृथ्वीवरी, । अपकीर्तिशब्दा परिहारी । ऐसा उपाय असेना. ॥ ९ ॥ लागलें तें न फिटे लांछन, । परिहार करितां नै[13] मनी जन, । घ्यावे एक एकाचे प्राण । फावलेठायीं अविचारें. ॥ १० ॥ येथें पाहतां येणें काळें । तुम्ही संपूर्ण सर्व बळें । पांडव सर्वार्थी निर्बळें । अरण्यवासें कष्टलीं. ॥ ११ ॥ राज्यबळ सेनाबळ । द्रव्यबळ सुहृद्बळ । सर्वशक्तींनीं तुम्हीं प्र-

---

१. वराची माता. २. वधूमाय-नवरीची आई. ३. या अध्यायास 'द्रौपदीस्वयंवर' अशी संज्ञा एका जुनाट पोथींत आहे. ४. या अध्यायांत मूळांतील अध्याय १९८-१९९ यांतील कथेचा समावेश झाला आहे. येथें वैवाहिकपर्व संपून 'विदुरागमराज्यलंभपर्वा'ला आरंभ होतो. ५. लाक्षागृहीं. ६. 'जितिली' असा अन्यपाठ आहे. ७. 'निज करीं' असा अन्यपाठ आहे. ८. रणांगणीं. ९. अध्याय २०० श्लोक २-४ पहा. १०. भेट, नजराणा. ११. निस्तेज. १२. अग्नींत. १३. न मानी.

बळ, । शत्रु निर्बळ सर्वार्थी. ॥ १२ ॥ द्रौपदीस्वयंवरीं अवसानें । दुःखें दुखविलीं नृपांचीं मनें । युद्ध मांडलिया सैत्राणें । तुम्हां पाठीं मिळतील. ॥ १३ ॥ जंव श्रीकृष्ण यादवेंसीं । साह्य झाला नाहीं त्यांसीं, । जंववरी द्रुपदाच्या मानसीं । नाहीं उठला अभिमान. ॥ १४ ॥ आतां असावधान पांचाळराज । नाहीं दुर्ग सेना सज्ज, । तंव स्वशक्तीनें आपुलें काज । अति लगबगां साधावें. ॥ १५ ॥ सज्ज करूनि दळभार । वेगीं वेढा पांचाळपुर, । मुळें शोधी कुैठारधर । तेंवी शोधूनि मारावे. ॥ १६ ॥ नायकोनी आन मंत्र । अंगीकारूनि अविचारशस्त्र । द्रुपदसहित पांडुपुत्र । मारूनियां सांडावे. ॥ १७ ॥ बहुतीं मारिले सर्पांतें । तेंवी वधावें पांडवांतें, । क्षणें विलंब करितां येथें । मग असाध्य जाणिजे. ॥ १८ ॥ आज तुमचें ऐश्वर्य पूर्ण । उदयीक याहूनि होईल न्यून, । दिवसें दिवस बळसंपन्न । वैरी होती निर्धारें. ॥ १९ ॥ तुम्हीं योद्धे कोट्यानकोटी । पांच पुरुषांची कितुली गोष्टी ? । लागवेगीं उठाउठी । मारूनियां सांडावे.' ॥ २० ॥ ऐकोनि बोले सौमदत्ती । म्हणे, 'हे न मनें कुश्चित युक्तीं, । जे या विचारें वर्तती । ते अनर्थी पडतील. ॥ २१ ॥ पांडव म्हणावया निर्बळ, । समर्थ नोव्हे अैमरपाळ, । एकला अर्जुन पृथ्वीतळ । करूं शके निःक्षेत्री. ॥ २२ ॥ गदाघायें बळप्रचंडें । नैवखंडधरेचीं शतखंडें । भीम करूं शके, तो या तोंडें । निर्बळ कैसें म्हणतसां ? ॥ २३ ॥ घेऊनि यादवांच्या कोटी । आतांचि कृष्ण उभा पाठीं । पांडवांचे प्राणांसाठीं । द्रुपद वेंचील प्राणांतें. ॥ २४ ॥ पांचाळ आटोपेल तुम्हां । याही न पडावें जी ! भ्रमा । पळतां हस्तनापुराची सीमा । दाखवील संग्रामीं. ॥ २५ ॥ जो बळिष्ठ सर्वशक्ती । इच्छिल्या काळीं त्याची स्थिती । सकळ जगाची संपत्ती । त्याचीच ऐसें जाणावें. ॥ २६ ॥ आतां विचार ऐका बरवा, । वा॰वूनी स्नेहभावा, । मागील अपराधाचा ठेवा । मिथ्या करोनि दावणें. ॥ २७ ॥ यापासूनि न घडे ऐसें । प्रैंचीत मानिजे मानसें । ऐसा स्नेह दिवसें दिवसें । वाढवावा सुहृदेसीं. ॥ २८ ॥ स्तुती नाशी मागील निंदा । मैत्री निर्दाळील विषादक्रोधा । जेंवी अमृत प्राशिल्या बाधा । खैंडे मागील विषाची. ॥ २९ ॥ तेंवी पुढील निर्बळ राहटी, । हैंरपती मागील कुटी । आतां वैर सांडोनि पोटीं । मैत्री त्यांशीं करावी. ॥ ३० ॥ सांडूनि

---

१. बळानें, वेगानें. २. काष्ठ तोडणारा. ३. भूरिश्रवा. ४. इंद्र. ५. क्षत्रियहीन. ६. पृथ्वीचीं. (नऊ खंड पृथ्वीचीं.) ७. खात्री. ८. नाशील. ९. 'खंडे मरणभयाची' असाही पाठ आहे. १०. नष्ट होती.

जीविंचा कपटभावो । दुरभिमान करोनि वांवो[1] । समुदायेसीं अवघे जावों । भेटावया **धर्मातें.** ॥ ३१ ॥ वंदूनिया श्रीकृष्णातें । क्षेमालिंगन **पांडवांतें** । समाधान करूनि बहुतें । स्नेहभावें गौरवा. ॥ ३२ ॥ भेटी गेलिया तात्काळ । धर्म अंतरींचा अति निर्मळ. । मागील अपकारांचें जाळ । क्षणें जाईल विसरोनी. ॥ ३३ ॥ **द्रुपदातें** करूनि नमस्कार । भाषण करावें मनोहर, । देऊनि उपायनें[2] अपार । स्नेहभाव दुणवावा. ॥ ३४ ॥ **पांडव** धरोनियां हातीं । घेऊनि यावें नगराप्रती, । राज्यविभाग ओपोनि प्रीती । यथासुखें नांदावें. ॥ ३५ ॥ विरोध करितां पावाल क्लेश, । बहुतेकां घडेल जीवनाश, । वांचलिया घेऊन अपेश । जाणें घडेल येथुनी.' ॥ ३६ ॥ ऐकोनि भूरिश्रव्याचें वचन, । निरोधोनि[3] बोले **कर्ण,** । 'पुरुषधर्माचें लक्षण । एकनिष्ठ चळेना. ॥ ३७ ॥ युक्त अथवा अयुक्त । कार्यजातीं[4] द्विधा चित्त । केलिया, स्वार्थ ना परार्थ । एकही अर्थ साधेना. ॥ ३८ ॥ कार्याकार्यीं एक पक्ष । अंगीकारी तोचि पुरुष दक्ष, । जितां अर्थ, मेल्या मोक्ष । साधूनि जाय प्रतापें. ॥ ३९ ॥ हृदयीं विकल्पाची वस्ती । झालिया विचिकित्सा[5] युक्ती । उपजोनि प्रयोजन नासती । आपुलें आणी पराचें. ॥ ४० ॥ निर्वटावया[6] शत्रुकुळ । जिंकावया पृथ्वीतळ । वश्य करावया धरणीपाळ[7] । हाचि काळ तुम्हांतें. ॥ ४१ ॥ न करितां **पांडवांचें** हनन । रणीं न जिंकितां **याज्ञसेन,** । परतोनि जातां विश्वजन । उपहासिती सर्वस्वें. ॥४२॥ काळसर्पातें दुखविलें, । सेखीं[8] जीतचि त्या सोडिलें, । तें महद्व्यसन प्राप्त झालें । **पांडव** जोहेरीं[9] वांचतां. ॥ ४३ ॥ तें दुःख स्मरोनियां चित्तीं । **भीम**राक्षस पापमूर्ती । रक्त प्राशोनियां दांतीं[10] । अस्थी त्याही भक्षील. ॥ ४४ ॥ त्यास मारावया यत्न वहिला[11] । ठाके तितका पाहिजे केला, । प्रस्तुत एकटियांवरी घाला । घालोनि वधिलें पाहिजे. ॥ ४५ ॥ मरणभय जयांचे उदरीं । तिहीं सुखें राहावें शिबिरीं, । आम्हीं रिघों रणीं[12]चत्वरीं । यश काढूं बुडालें. ॥४६॥ **पांडव** धरोनियां अभिमान । झुंजों[13] निघती पांचहीजण, । बहुहस्तीं करोनि कंदन । जैंवी कां कण[14] कृषीवळीं[15].॥४७॥ दंडोनि **पांचाळनृपवर** । असंख्य साधूं करभार, । दाहा सहस्र मत्त कुंजर[16] ।

---

१ व्यर्थ, पोकळ. २. नजराणे. ३. खोडून, खंडन करून. ४. कार्यसमूहांत. ५. संशययुक्ती. ६. मारावया. ७. राजे. ८. शेवटीं, अखेरीस. ९. लाक्षागृहदाहांत. १०. दांतांनीं. ११. सत्वर. १२. रणांगणांत. १३. युद्ध करावयासाठीं. १४. धान्याचे कण. १५. शेतकऱ्यांनीं. १६. हत्ती.

अश्वभार दशगुणित. ॥४८॥ रत्नें हाटकवर्ण[1] रथ । द्रव्य वेणें अर्बुदशत । तरीच आल्याचें येथ । सार्थक कांहीं जाणिजे.' ॥ ४९ ॥ ऐकोनि **कर्णा**चिया वचना, । परम आल्हाद दुर्योधना । बंधूंसहीत दुःशासना । हांव चढली चौगुणी[2].॥५०॥ ठोकिल्या संग्रामसंकेतभेरी । कोल्हाळ माजविला रणतुरीं[3] । सिंहनाद केले वीरीं । महायंत्रीं भूकंप. ॥५१॥ अश्वकुंजरवीरवर्गीं । कवचें बांधिलीं वज्रांगीं, । शस्त्रें झळकती झगमगीं । वन्हिजिव्हेसारिखीं[4]. ॥५२॥ चालिले **कौरव**दळभार । जेंवी माजला जळसागर । बुडवावया **पां**चाळपूर । करिती भयासुर[5] गर्जना. ॥५३॥ **कर्ण** महापुराचा लोट । शल्य तो महाउर्मींचा[6] संघाट । दुःशासनादि परम नष्ट । मत्स्य सैरां तळपती. ॥५४॥ **दुर्योधन** महाग्राहो[7] । **शकुनी** आवर्ता[8] भोंवे पहा हो! । ऐसा महार्णवाचा[9] प्रवाहो । **पां**चाळपुरा प्रगटला. ॥ ५५ ॥ बांधिला[10] मथिला वरी लंघिला । एकें प्राशूनि निर्मूळ केला । तरी निर्लज्ज गर्वाथिला[11] । गर्जना करितो जलनिधी. ॥ ५६ ॥ तेंवी **पां**डवहस्तीं सकळ । अवमान पावले बहुत वेळ । तरी गर्वाचा गोंधळ । घालीत आले युद्धार्थी. ॥ ५७ ॥ **कौरव** पातले दळभारीं, । मात जाणविली **पां**चाळपुरीं, । **द्रुपद** पुत्रांतें[12] आज्ञा करी, । 'निघा वेगीं सामोरें. ॥ ५८ ॥ स्नेहें जामात[13] पातले भेटी, । शस्त्रघायीं गौरवा पोंठी[14], । तुष्टी यथेष्ट वाणल्या पोटीं । निजनगराप्रती बोळवा.' ॥ ५९ ॥ **धृष्टद्युम्न** आणि **शिखंडी** । दोघां संग्रामाची गोडी । म्हणती, 'आजी बळाची प्रौढी । **कौरवां**तें दाखवूं.' ॥ ६० ॥ सन्नद्ध[15] बद्ध[16] **पां**चाळसेना । घाव घातला निशाणा । दुंदुभिनाद **कौरव**कर्णा[17] । 'आलों' म्हणोनी सांगती. ॥ ६१ ॥ छत्रचामरध्वजपताकीं[18] । वाद्यें गर्जती नाना तोखीं[19] । चमू समुद्राचि येतुकीं[20] । चतुरंगिणी शोभत. ॥ ६२ ॥ अश्व[21] गज[22] रथ पदाती । हारी रचिल्या

---

१. सुवर्णवर्ण. २. चौपट. ३. रणांतील वाद्यांनीं. ४. अग्नीच्या ज्योतीसारखीं. अग्नीला सात जिव्हा आहेत असें समजतात. ५. भयंकर. ६. मोठ्या लाटेचा. ७. मोठा सुसर. ८. भोवऱ्यासभोंवतीं. ९. मोठ्या सागराचा. (हें रुपकाचें उदाहरण आहे.) १०. 'बांधुनी मैथिलीवरें लंघिला । एकीं प्राशुनी निर्मूल केला । तरी निर्लज्ज गर्वाथिला । गर्जना करी गडगर्जें ॥' असा अन्य पाठ आहे. ११. गर्वसंपन्न. १२. धृष्टद्युम्न आणी शिखंडी यांतें. १३. कौरव. १४. झोडून काढा, शस्त्रांनीं झोडा. १५. कवचयुक्त. १६. बद्धपरिकर. १७. कौरवांच्या कानाला. १८. बृहत्संहिता—अध्याय ७२ यांत चामरलक्षण आणि अध्याय ७३ यांत छत्रलक्षण सविस्तर सांगितलें आहे. चमरी नामक मृग हे देवांनीं हिमालयाच्या गुहेंत चामर करण्यासाठीं उत्पन्न केले आहेत इत्यादि वर्णन पहाण्यासारखें आहे. १९. घोषीं. २०. इतकीं. २१. कोणता घोडा राजाला शत्रुनाशार्थ उपयुक्त होतो हें बृहत्संहिता—अध्याय ६७ यांत सांगितलें आहे. २२. बृहत्संहिता—अध्याय ६७ यांत गजलक्षण वर्णिलें आहे.

एक पंक्ती । चत्वारिमुखी भागीरथी । जेंवी उठे[1] दोषनाशा. ॥ ६३ ॥ ज्येष्ठपुत्र धृष्टद्युम्न । शिखंडी सुमित्र प्रियदर्शन । चित्रकेत सुकेत सगुण । ध्वजकेत धनुर्गाढा. ॥ ६४ ॥ रथारूढ राजकुमर । केडोविकडी[2] संग्रामचतुर । चरणीं ब्रिदांचे तोडर । धनुष्यधर निघाले. ॥ ६५ ॥ प्रधान सेनानी बळियाढे । महारथीये चालिले पुढें, । म्हणती, 'यश आम्हांकडे । पांडव[3] बळें जाणिजे.' ॥६६॥ श्वेत चामरें श्वेत च्छत्रें । श्वेत वाजी श्वेत वस्त्रें । रथीं भरूनि शस्त्रास्त्रें । द्रुपदराजा निघाला.॥६७॥ तयापाठीं पांडुकुमर । सुवर्णरथीं पांचही वीर,। दिव्यधनुष्यमंडितकर । रत्नतूणीर[4] पाठीसी. ॥ ६८ ॥ राहोनि द्रुपदाच्या पाठीं । नावेक अवलोकिती दृष्टी, । उभय दळां पडली गांठी । कौरव आणी पांचाळ. ॥ ६९ ॥ दोहीं सैन्यांचिये मिळणीं । प्रळयवृष्टी मांडिली बाणीं, । शस्त्रधरांचिये खणाणीं । वन्ही वर्षों लागला.॥७०॥ कुंजर संघट्टले[5] कुंजरा । राऊत[6] झगटले अश्वस्वारा, । प्रवर्तले घोर समरा । महारथ रथियांसीं. ॥७१॥ एकमेकांतें झुंजती, । एकमेकां युद्ध करिती, । बाणें बाण सोडिती । एकमेकां अपार. ॥ ७२ ॥ एक शरें मार करिती, । एक खर्गें खर्ग तोडिती, । एकांग झुजें झुंजती । एकमेकां निकरेंसीं[7]. ॥ ७३ ॥ एक खड्गें पैं तोडिती,। एक शूळें पैं खोंचिती, । एक भूतळीं पाडिती । क्षणार्धेंच शस्त्रधारीं. ॥ ७४ ॥ एक घोरांदर[8] झुंजती, । एकमेका थडका देती, । एक आंगवळें पाडिती । झुंजणार सक्रोधी. ॥ ७५ ॥ सुटतां शस्त्रधरांचीं शस्त्रें । मल्लयुद्धीं मोडिती गात्रें[9], । चडकणा हाणोनि फोडिती वक्त्रें । मुष्टी हृदयीं भेदिती. ॥७६॥ एकांगसंग धरोनि हातीं । वज्रप्राय मुष्टी हाणिती, । एक कवळोनि पायीं धरिती, । नक्रप्राय[10] एकातें. ॥ ७७ ॥ एक बाण सोडिती, । एकमेकां टाळिती, । मूर्छना येवोनियां पडती । वीर अनिवार धरणीये. ॥ ७८ ॥ कुंजर पडती कुंजरघातें, । राऊत मारिती राउतांतें, । रथी मारिती रथियांतें, । निर्बळातें बळिष्ठ. ॥ ७९ ॥ खर्गें खर्ग[11] हाणिती, । बाण एके सरें सोडिती, । एकमेकां खोंचिती, । रुधिर[12] वाहे अपार. ॥ ८० ॥ हस्तकमळें पादकमळें । किरीटकुंडलें वीरमौळें[13] । पडलीं जैसीं रक्तोत्पळें[14] । रक्तगंगातटाकीं[15]. ॥ ८१ ॥ झुंजतां पांचाळाचें दळ । नावेक झालें विकळ[16], ।

---

१. 'उठिली दाप दवडावया' असा अन्य पाठ आहे. २. भयंकर, उग्र. ३. 'पांडव आम्हां जाण पां' असा अन्य पाठ. ४. रत्नखचित भाते. ५. रणांत भिडाले. ६. घोडेस्वार. ७. नेटानें, त्वेषानें. ८. भयंकर. ९. अवयव. १०. नक्राप्रमाणें. नक्र=मगर, सुसर. ११. खड्ग. १२. रक्त. १३. वीरांचीं मस्तकें. १४. तांबडीं कमळें. १५. रक्तनदीतीरीं. १६. पराभूत, व्याकुळ.

देखोनि पांचही प्रलयानळ । पांडववीर क्षोभले. ॥ ८२ ॥ मनोवेगाहूनि देख । पांचही पातले सेनासन्मुख, । देखोनि भूप म्हणती सकळिक, । 'मरणावस्था[1] मांडिली.' ॥ ८३ ॥ अवघे म्हणती, 'हे पांडव । आतां कायसी वांटीव ? । रक्षूनि आपुलाले जीव । शीघ्र येथुनी पळावें. ॥ ८४ ॥ मंदबुद्धी पापी कर्ण । तेणें शिकविला दुर्योधन, । सर्वां प्राप्त झालें मरण । सोडवील कोण येथुनी?[2] ॥ ८५ ॥ शकुनी कर्ण दुःशासन । शल्य सैं[3]धव पांचही जण । यांचे बुद्धीनें दुर्योधन । क्षयो करील वंशाचा'. ॥ ८६ ॥ तंव जयद्रथ आणी कर्ण । दृष्टीं लक्षूनियां फाल्गुन[4] । धाविन्नले म्हणती, 'प्राण । वेऊं यांचा[5] संग्रामीं.' ॥ ८७ ॥ तया दोघांचे दोन कुमर । तारुण्यमदें मातले थोर । पुढें लाटोनि रहंवर[6] । पार्थासमोर पातले. ॥ ८८ ॥ दोघीं राहोनि दोंभागीं । बाण विंधिले पार्थालागीं, । हांसोनि अर्जुन बोले वेगीं, । 'मरणभय टाकिलें.' ॥ ८९ ॥ दोन सहस्र[7] कंकपत्रीं । अर्जुन ताडितां अमित्रपुत्रीं,[8] । येरें तोडोनि हेळामात्रीं[9] । चोज पाहे तयांचें. ॥ ९० ॥ धनुष्यापासूनि सुटती बाण । छेदूनि सांडी ते अर्जुन, । पिते देखत असतां निर्वाण । करिता झाला तयांतें. ॥ ९१ ॥ विशाळरंभापूर्ण तुंडें । दोघां ताडिलें दोहींकडे, । धरातळीं पाडिलीं [10]मुंडें । जपा[11]कुसुमासारिखीं. ॥ ९२ ॥ दृष्टी देखतां पुत्रमरण । खेद न करी त्यांचें मन । तैवेकें[12] वेढोनि अर्जुन । रागें मारूं लागले. ॥ ९३ ॥ वृत्र[13] जंभ दोघे पूर्वी । इंद्रासि मारूं धांवले गर्वी । तैसा वधावया वासवी[14] । कर्णसैंधव धांवले. ॥९४॥ कौरव वीर [15]मीनले पाठी । अवघे करिती बाणवृष्टी, । त्रिकूट[16] हाकांचे बोभाटीं । भूतसृष्टी भेदरली.[17] ॥ ९५ ॥ आगळीक करूनि कर्णें । अर्जुनरथींचीं अश्वरत्नें, । बाणें मारितां भीमसेनें । नूतन आणून दीधलीं. ॥ ९६ ॥ हें देखोनि कौरवदळीं । अवघे हर्षें पिटिती टाळी, । म्हणती, 'अर्जुन पडला तळीं । यश आलें आमुतें.' ॥९७॥ सोमदत्ती शकुनी कर्ण । सैंधवराज दुर्योधन । भीमा उजू पांचही जण । शस्त्रपाणी धाविन्नले. ॥ ९८ ॥ तालप्रमाण[18] प्रचंड चाप । भीमें वाहिलें सकोप, । त्रिशूळबाण [19]धरेवरी ओपें[20] ।

---

१. संशय. २. 'सोडवी कोण येथुनी' असा अन्य पाठ. ३. जयद्रथ. ४. अर्जुन. ५. अर्जुनाचा. ६. रथ. ७. बाण, शर. ८. शत्रूच्या पुत्रांवर. ९. सहज, लीलामात्रें. १०. मस्तकें. ११. जास्वंदीच्या फुलासारखीं. १२. त्वेषानें. १३. या असुरास इंद्रानें मारिलें म्हणून इंद्राला 'वृत्रहा' आणि 'जंभभेदी' असें म्हणतात. १४. अर्जुन. (वासवपुत्र.) १५. मिळाले. १६. भयंकर. १७. भयग्रस्त झाली. १८. तालवृक्षासारखें. १९. पृथ्वीवर. २०. कांति, प्रकाश.

झळके [1]कळानळाची. ॥ ९९ ॥ तो एक एकातें लागतां । पावती प्राणांत-व्यथा । जेंवी ताडितां वज्रघाता । उलंडती [2]गिरिवेर. ॥ १०० ॥ मरणभय सरलें मागां, । तंव माद्रेय लागले लागा, । धृष्टद्युम्न शिखंडी वेगा । द्रुपदपुत्र पावले. ॥ १०१ ॥ आवेशें धार्तराष्ट्र सकळ । आणी समस्त कौरवदळ । विध्वंसिलें जैसें [3]अनिळ । भंगी मेघमंडळातें. ॥ १०२ ॥ धृष्टद्युम्न आणि शि-खंडी । शरसंधान कडोविकडी । [4]हस्तिपांसहित गजकरवंडी । असंख्यात पाडि-यल्या. ॥ १०३ ॥ राऊत पाडिले [5]वारुवांसीं । [6]उष्ट्रें लोळविती बसलेल्यांशीं, । असंख्यात पायींच्या वीरांसी । [7]लेखा त्यांस असेना. ॥ १०४ ॥ पडिले अश्वेसीं सारथी । शस्त्रें सोडोनि पळाले रथी, । छत्र पताका लोळती क्षिती । शुष्कप-र्णासारिखीं. ॥ १०५ ॥ अर्जुन रथ लोटोनि समरीं । पुढें धांवला कर्णावरी । तेणें असंख्यात शरीं । पांडुपुत्रा ताडिलें. ॥ १०६ ॥ अर्जुनें घेऊनि तीन बाण । हृद-यमर्मी ताडिला कर्ण, । मूर्च्छा दाटली दारुण । ध्वजस्तंभीं टेंकला. ॥ १०७ ॥ उतरला वीरश्रीचा वारा । सूतें रथ काढिला माघारा, । भीमसेनें त्या अवसरा । दुर्योधना देखिलें. ॥ १०८ ॥ आठवूनि [8]जातुषागारा । दांत खात करकरा । [9]उपडोनि प्रचंड तरुवरा । उभयहस्तीं ताडिला. ॥ १०९ ॥ वटारिले [10]पावकातुल्य नेत्र । ऊर्ध्वदशनीं चाविले अधर, । जैसा प्रळयकाळींचा रुद्र । तैसा भासे स-र्वांतें. ॥ ११० ॥ मरणभय घेऊनि पोटीं । कौरव पळाले देऊनि पाठीं, । भीमें कोपें धरूनि मुष्टी । स्वस्थानातें थोकला. ॥ १११ ॥ कौरवदळ फार मारिलें, । उरलें तें पळोनि गेलें, । दुर्योधन तयेवेळें । पडिला क्षीण होवोनी. ॥ ११२ ॥ अनेक लोक पाडिले । भूमीवरी लोळविले, । मागें जे कां उरले । तेही मारिले तात्काळीं. ॥ ११३ ॥ [11]पांडवप्रताप पुरुष तरणा, । नववधू कौर-वसेना । शृंगारिली [12]परिसंघट्टना । युद्धसुरता न थारवे. ॥ ११४ ॥ गळालें अ-भिमानाचें [13]वास, । अधैर्याचे मोकळे केस, । रणशय्यासनीं त्रास । पावोनियां पळाली. ॥ ११५ ॥ कर्ण सैंधव [14]पयोधर [15]पीनें । मर्दितां झाले [16]आरक्तवर्ण, । शकुनी [17]कंचुकी आवरण । पडिलें कोठें नेणवे. ॥ ११६ ॥ शस्त्रधारातीक्ष्ण-

१. प्रलयाग्नीची. २. मोठे पर्वत. ३. वायु. ४. हस्तिप=माहूत. ५. घोड्यांसहित. ६. उंटें. ७. गणना. ८. लाक्षागृहाला. ९. उपटून. [भीमाचें शस्त्र पाहिलें असतां गदा अथवा प्रचंड वृक्ष असेंच वर्णन आढळतें. त्याची धनुर्धरत्वांत फारशी गति असल्याचें दिसत नाहीं.] १०. अग्नीसारखे. ११. हें रूपकाचें उदाहरण आहे. १२. भिडण्यासाठीं. १३. वस्त्र. १४. स्तन. १५. पुष्ट. १६. लाल, तांबडे. १७. चोळी.

दांतीं । चुंबितां मुख आंतलें क्षिती । झाली रूपाची [1]उपहती । कौरवसेनावधूची. ॥ ११७ ॥ आंगीं भेदले [2]उदंड घावो । म्हणोनि दुर्योधन रावो । चुकवूनी पळाला रणठावो । कोण आतां विचारी? ॥११८॥ ऐसे हस्ती [3]वाजी रथ । सांडोनि पळाले असंख्यात । शस्त्रभार अपरिमित । पांचाळातें लाधले. ॥ ११९ ॥ किरीट [4]कुंडलें कंकणें । बाहुअंगदें कटिभूषणें । माळा जडितपदकरत्नें । [5]अंगोळिका अमोल्य. ॥ १२० ॥ तितकीं ओपिलीं नगरलोकां । हर्षें उभविती ध्वजपताका, । शर्करा वांटिती एकमेकां । जयो झाला म्हणोनी. ॥ १२१ ॥ पराभविल्या कौरव, । श्रीकृष्ण बळिराम यादव । प्रीतीनें येऊनी पांडव । आलिंगिले आवडी. ॥ १२२ ॥ द्रुपद धरूनियां करीं । मग प्रवेशले नगरीं, । [6]अक्षवाणें करिती नारी, । ओंवाळिती सर्वांतें. ॥१२३॥ नगरा आला श्रीकृष्ण देवो, । द्रुपदें दंडवत घालोनि भावो । आलिंगिला द्वारकानाँहो । अत्यादरें करोनी. ॥ १२४ ॥ आले द्रुपदाच्या मंदिरीं । श्रीकृष्णा पूजिलें राजेश्वरीं, । वस्त्रें रत्नें अळंकारीं । दारां कुमरां तोषविलें. ॥ १२५ ॥ अन्नपानादि नाना भोग । स्वस्थ भोगीत [8]रमारंग । लाहोनि पांडवांचा संग । पांचाळपुरीं क्रीडतु. ॥ १२६ ॥ येरीकडे दीनवदनें । कौरव दुःखित अंतःकरणें, । मुखीं अवलंबोनि मौन्यें । हस्तनापुरा पातले. ॥ १२७ ॥ कोणी कोणा न बोले शब्दीं, । कोणी कोणा न पुसे बुद्धीं, । जळो पुरुषार्थ यत्नसिद्धी । अदृष्टकळा वेगळी. ॥ १२८ ॥ 'मर मर [9]पुरोचना ! मूढा !, । कार्य काय साधिलें दगडा ! । आपण मरोनि मागिलें कडा । अपकीर्ति सर्वां आणिली.' ॥ १२९ ॥ ऐसें बोले दुर्योधन. । 'यथार्थ' म्हणे दुःशासन. । 'मौन धरा' म्हणे कर्ण । 'व्यर्थ कांहीं न बोला'. ॥ १३० ॥ कृष्णबळें ते पांचजण । करूनि शत्रूचें हनन, । प्रतापें जिंकोनि द्रौपदीरत्न । [10]जाणविलें विदुरासी. ॥ १३१ ॥ ऐकोनि झाला परम हर्ष, । म्हणे, 'कर्ता द्वारकाधीश, । आतां वार्ता हे निर्दोष । धृतराष्ट्रातें जाणवूं'. ॥ १३२ ॥ विदुर नि-

---

१. नाश. २. पुष्कळ. ३. घोडे. ४. कुंडलें—"सोन्याचीं कुडीं. यांत एकाखालोखाल एक व एकावर एक बसविलेलीं तवकटें असून त्यांच्या कोंदणांत हिरे बसविलेले असत. प्राचीनकाळीं स्त्रियांप्रमाणें पुरुषही असलीं कुंडलें कानांत घालीत, व उत्तरहिंदुस्थानांत अजून सुद्धां तसें करितात." [देशी हुन्नर-पृष्ठ ४५.] ५. आंगठ्या. ६. मागें पृष्ठ २६६ टीप ४ पहा. ७. नाथ. ८. श्रीकृष्ण. ९. लाक्षागृह तयार करवून त्यांत पांडवांस मारावें म्हणून दुर्योधनानें पुरोचनाला इंद्रप्रस्थास पाठविलें होतें. १०. कळून आलें.

घाला राजसदना । पुढें कथेची कैसी रचना । ती पंडितीं आणिजे मना । **मुक्तेश्वर** कवि वदे. ॥ १३३ ॥

अध्याय पंचेचाळिसावा.

विदुर म्हणे, 'ऐश्वर्यनिधी ! । तूतें सून[1] झाली **द्रौपदी**, । या सुखाचा अमृतोदधी । अगस्तीसही घोंटेना[2].' ॥१॥ राजा[3] म्हणे, 'प्रचंड दैव'. । आवडी **विदुरा** दीधली खेंव[4], । म्हणे, 'ऋषींचे आशीर्वाद सर्व । फळा आले ये काळीं. ॥ २ ॥ आतां **दुर्योधन** पांचाळी[5] । वेगीं आणा मजजवळी । अळंकार मुक्ताफळीं । लेववीन स्वहस्तें.' ॥ ३ ॥ **विदुर** म्हणे, 'गा ! सुजाणा ! । पुरता वृत्तांत आणीं काना, । **पांडुपुत्र** हुताशना[6]- । पासूनि जाण वांचले. ॥ ४ ॥ प्रगट झाले **पांचाळपुरीं** । प्रतापें जिंकिली राजकुमरी । पराभविले राजे क्षत्री । जे जे आले संग्रामा.' ॥ ५ ॥ मुहूर्त एक स्तब्ध राजा । म्हणे, 'मनोरथ पुरला माजा, । अधिक माझिया आत्मजां- । हूनि मातें **पांडव**. ॥ ६ ॥ बहुत आनंद झाला चित्तीं, । निमाला[7] **पांडु**, जन्मला पुढती, । पुढां गोड होय ते युक्ती । सांगसी ते करीन. ॥ ७ ॥ **विदुरें** हस्त ठेवोनि पायीं, । म्हणे, 'हे बुद्धी असों दे ठायीं, । ऐक्यें वर्ततां, अपायीं । कदाकाळीं पडेना.' ॥ ८ ॥ वि[8]दुर नसतां, **दुर्योधन** । रायापासीं पातला जाण, । म्हणे, 'विदुरबुद्धींत मन । सहसा[9] तुवां न घालावें. ॥ ९ ॥ **पांडव** वांचले **काळानळीं**, । तो वंन्ही[10] लागला आमुचे कुळीं, । त्यांसि वधावया त्रिकाळीं । यत्न आम्हीं करीतसों. ॥ १० ॥ द्यावया राज्यविभागधना । **विदुर** बोधील क्षणक्षणा, । तें त्वां नाणुनियां मना । आश्रय त्यांतें न द्यावा. ॥ ११ ॥ संपत्तवृद्धीनें[11] आपुली वृद्धी । मानिसी जे विवेकनिधी[12] ! । वर्तसी **विदुराचिये** बुद्धी । हेचि मुळीं मूर्खता. ॥१२॥ श्रेष्ठनीति विलक्षण, । तुझी वर्तणूक भिन्न, । आतां शत्रुकुळाचें हनन ।

---

१. विदुराच्या मतें पांडूची सून आणि धृतराष्ट्राच्या मतें स्वतःची सून (दुर्योधनभार्या). २. पिऊन आटवेना. ३. धृतराष्ट्र. ४. आलिंगन. ५. द्रौपदी. यास आधारः–'मन्यते स वृतं पुत्रं ज्येष्ठं द्रुपदकन्यया । दुर्योधनमविज्ञानात्प्रज्ञाचक्षुर्नरेश्वरः ॥' (आदिपर्व–अध्याय २०० श्लो० १९, मोरोपंत–आदिपर्व–अध्याय ३६ गीति १). ६. हुताशन=अग्नि. (हुत+अशन=हवन केलेलें अन्न भक्षण करणारा.) ७. निवर्तला, मेला. ८. मोरोपंत–आदिपर्व–अध्याय ३६ गीति ३-५ पहा. ९. विदुर स्वगृहीं निघून गेल्यावर. १०. अग्नि. ११. शत्रूंच्या उत्कर्षानें आपला उत्कर्ष होईल अशी बुद्धि. (अध्याय २०० श्लोक २८-३१.) १२. हे विचारसागरा !

नानायुक्ती करावें.' ॥ १३ ॥ धृतराष्ट्र म्हणे, 'दुर्योधना !। ऐसेंचि येतसे माझे मना, । माझा मनोभाव जाणा, । विदुर नेणे सर्वथा. ॥ १४ ॥ रक्षा-वया तयाचें मन, । करीन पांडवांचें स्तवन, । तूतें विचार सुचला कवण । तो मज सांग, सर्वज्ञा !' ॥ १५ ॥ पुत्र म्हणे, 'ऐक वचन, । मंत्री पाठऊनि बुद्धिनिपुण । उपदेशूनियां याज्ञसेन । तेथेंचि ते ठेवावे. ॥ १६ ॥ येथें आ-लिया अनर्थकोटी । ऐसा धाक घालिजे पोटीं, । न करिती राज्यविभागगोष्टी । ऐसे करूनि ठेवावे. ॥ १७ ॥ सपुत्र फोडावा द्रुपद । द्रौपदीनिमित्त उ-पजे भेद । बंधुबंधुसीं विरोध । वाटे हेंही करावें. ॥ १८ ॥ दावूनि राज्य-विभागदान । भेदूं माद्रीचे नंदन, । पाठी उरले तिघेजण । तेही करूं तींठायीं. ॥ १९ ॥ रचूनियां नाना यत्न । प्राणें घेतल्या भीमसेन, । उरला एकला अर्जुन । तृणप्राय कर्णातें. ॥ २० ॥ भीमाचेनि बळें जाणा । करिती आ-मुची हो ! हेळणा, । त्याचेनि मरणें, मरणा । चौघेजण पावती. ॥ २१ ॥ धर्म अंतरींचा संन्यासी । सर्वकार्यी क्लीबता त्यासी, । राज्यलोभें भीष्मद्रोणांसी । झुजा ठाकों शकेना. ॥ २२ ॥ करूनि कृष्णाचें आर्जव । त्यागवावे हे पांडव, । त्यासीं समान आम्हीं सर्व, । शत्रुमित्र असेना.' ॥ २३ ॥ ऐसें दुर्योधनाचें वचन । वारूनियां [9]बोले कर्ण, । 'मागें केले जे जे यत्न । कोणते सिद्धी पावले ? ॥ २४ ॥ द्रुपद द्रौपदेय आणि कृष्ण । पांडव मानिती जैसे प्राण । वधिला जाईल भीमसेन । हें अघटित दिसताहे. ॥ २५ ॥ पांचां पुरुषांची एक वधू । ते कैंवी भेदले जाती बंधू ? । आतां ऐका विचार शुद्धू । जो कां मान्य सर्वांतें. ॥ २६ ॥ क्षत्रियां क्षात्रधर्माचें बळ, । बळें र-क्षावें पृथ्वीतळ, । आलिया पांडव पांचाळ । युद्धीं शिक्षा करावी. ॥ २७ ॥ वेळेसारिखें यश अपेश । याचा कांहीं न कीजे क्लेश, । अनालस्यें दिवसें दि-वस । वृद्धी कीजे बळाची. ॥ २८ ॥ वारंवार पडतां क्षिती । शेवटीं कीटकं चढे भिंती । खणत खणत पर्वतीं । खचोनी जाय एकदां. ॥ २९ ॥ तेंवी

१. जाणत नाहीं. (अध्याय २०१ श्लोक १-३ पहा.) २. आप्तकारी, वंचक असे कुशल विप्र धाडून भेद करावा. (अध्याय २०१ श्लोक ४-२०.) ३. फितूर. ४. मूळांत 'पादभाक् न' म्हणजे चतुर्थांशतुल्य मीहीं असें आहे. (अध्याय २०१ श्लोक १०-१३.) ५. अप्रतिष्ठा. ६. नपुंसकता. ७. अध्याय २०२ श्लोक १-२१ पहा. ८. स्त्री. (द्रौपदी.) ९. सैन्याची. १०. किडा. (हा दृष्टांत मूळांत नाहीं. असाच दाखला एक ठिकाणीं पंतांनीं विराटपर्वांत योजिला आहे. विराटपर्व—अध्याय २ गीति १० पहा.)

आपुलेनि पुरुषार्थें । क्षया न्यावें शत्रुकुळातें । मागतां राज्यविभागातें । उपेक्षोनि सांडावे. ॥ ३० ॥ जितुकें पाहिजे ऐश्वर्य बळ । तितुकें तुमचे ठायीं सकळ, । धैर्य प्रतापें अव्याकुळ । राज्य भोगीं पृथ्वीचें. ॥ ३१ ॥ पांडव पडिले दूरदेशीं । तैसेच असों द्यावें तयांसीं, । संधी मैत्री विभागासीं । गुंतों नको सर्वथा.' ॥ ३२ ॥ ऐकोनि कर्णाचें बोलणें । कौरवराज संतुष्ट मनें । काय बोलिजे भीष्मद्रोणें । तेंहि ऐकों इच्छिती. ॥ ३३ ॥ भीष्म द्रोण [1]पाचारिले । येऊनि स्वस्थानीं बैसले, । [2]रायें पुसतां सार बोले । हित स्वार्थ [3]सर्वांतें. ॥ ३४ ॥ भीष्म म्हणे, 'विचारखाणी! । या दुर्बुद्धी नायकें कानीं, । विरोध करितां माझिये नयनीं । कल्याण कांहीं दिसेना. ॥ ३५ ॥ पांडवांसीं विरोधमंत्रु । सांगती ते तुझे शत्रू, । आतां होईं स्वतंत्रु । वर्तों नको परबुद्धी. ॥ ३६ ॥ स्वार्थ सकळांचा सारिखा, । ईहीं भोगणें राज्यसुखा, । पांडुपुत्रीं मागणें भिका, । हा विवेक विचारीं. ॥ ३७ ॥ आतां करूनि समाधान । आणवीं पांडूचे नंदन, । अर्धराज्य देऊनि दान । सुखें समस्तीं असावें.' ॥ ३८ ॥ द्रोण म्हणे, 'भला गा! भीष्मा! । पुरुषांमाजी पुरुषोत्तमा! । हाचि विचार मानला आम्हां । आणि सर्वां ऋषींतें. ॥ ३९ ॥ आप्तपुरुष विवेकवंत । हितसाधक चातुर्यभरित । उत्तम उपायनासमवेत । द्रुपदाप्रति पाठवा. ॥ ४० ॥ त्याचें करूनि समाधान । आप्त करावा धृष्टद्युम्न, । कुंती कृष्ण [10]संकर्षण । गौरवावीं मधुरोक्तीं. ॥ ४१ ॥ पांचाळाचे दारा कुमर । गौरवावे स्नेहादर, । [11]वस्त्रें भूषणें अपार । समर्पूनी समस्तां. ॥ ४२ ॥ मागील विसरवोनि मनें । पांडव आणावे समाधानें, । राज्य विभागूनि देणें । समसमान दोंठायीं. ॥ ४३ ॥ अद्यापी नव्हती हे स्वतंत्र । उभय पक्षीं तूंचि छत्र, । नेमें स्थापूनियां पुत्र । कीर्तिपात्र तूं होईं. ॥ ४४ ॥ ऐसें न करूनियां राया! । बुद्धी पुससी पुत्र [12]येया, । तरी स्वकुळ न्यावया क्षया । तूंचि कारण [13]निर्धारें.' ॥ ४५ ॥ ऐकोनि आचार्यांची युक्ती । कर्ण म्हणे, 'ही

---

१. बोलाविले. २. धृतराष्ट्रानें. (अध्याय २०२ श्लोक २३-२५ पहा.) ३. अध्याय. (२०३ श्लोक १-१९ पहा.) ४. दुर्योधनादिकांनीं. ५. मूळांतील भीष्मभाषण चिंतनीय आहे. (अध्याय २०३ श्लोक १९.) ६. 'समाधान सर्वांहीं करावें' असाही पाठ आहे. ७. अध्याय २०४ श्लोक १-१२ पहा. ८. प्रियंवद. ९. उत्तम नजराणे देऊन. (अध्याय २०४ श्लोक ३.) १०. बळराम. ११. अध्याय २०४ श्लोक ६-९ पहा. १२. दुर्योधनाला. १३. निश्चयानें. १४. मोरोपंत—आदिपर्व—अध्याय ३६ गीति ३०-३४ पहा. तसेंच आदिपर्व—अध्याय २०४ श्लोक १३-२५ पहा.

बरवी रीती, । बळिष्ठ असतां नृपसंतती; । जाय संपत्ती त्याचे घरा. ॥ ४६ ॥ धेनूमाजी पाळिजे व्याघ्रा । वि[1]डाळ सूदलें [2]शुकपंजरा । हाहि विचार त्या विचारा- । सारिखा दिसे, वडिल हो ! ॥ ४७ ॥ [3]मवाळ लागलीं हस्तकें । म्हणोनि सर्पाचीं बाळकें । गृहीं संग्रहितां कौतुकें । मृत्यूसींच कारण. ॥ ४८ ॥ बुद्धीबळ जनआर्जव । सद्गुणीं [4]आथिले हे **पांडव** । बुद्धीनें साधितील राज्य सर्व । पडिले **कौरव** पाताळीं. ॥ ४९ ॥ झाला [5]राजा **मागधांचा** जाण । चक्षुहीन कर्णहीन, । तेणें **महाकर्णि** [6]प्रधान । नियोजिला विश्वासें. ॥ ५० ॥ तेणें आटोपोनि [7]क्षितीं । स्वामी झाला सर्वसंपत्ती, । राजा आणि राजसंतती । नाहींच केली भूतळीं. ॥ ५१ ॥ पाचारिल्या **पांडुसुत**, । तोच विचार दिसे येथ, । बुद्धी सांगतां समर्थ । धाकुटें बोलों शकेना'. ॥ ५२ ॥ ऐकोनि **कर्णाचें** उत्तर । **विदुर** बोले[8] न्यायनिष्ठुर, । 'दुष्ट नष्टाचा विचार । ऐसिया बोलीं जाणावा. ॥ ५३ ॥ जे नेणती कपटलेश । आप्तभावें अतिविश्वास । त्यांसीं निष्कारण द्वेष । मुळींहूनि चालविसी. ॥ ५४ ॥ तुम्हांकडोनि रे! दुर्बुद्धी । अपराध घडले पदोपदीं, । त्यांचा अन्याय एकशब्दीं । प्रकट करोनी बोल पां. ॥ ५५ ॥ हित सांगतां **भीष्मद्रोणा**, । तेथें तूं लाविसी दूषणा, । **धार्तराष्ट्र**[9] सुकतील प्राणा । तुझिये बुद्धी वर्ततां. ॥५६॥ राया ! पुत्रशोकाचा वन्ही । तुज न लागावा वृद्धपणीं । हेंच धरूनि अंतःकरणीं । वारंवार बोलतों. ॥ ५७ ॥ म्हणती **पांडव** जाळिले [10]जोहरीं । हे मात लटकी पृथ्वीवरी, । राया ! ब्रह्मकल्पवरी । यश तुझें जाळिलें. ॥ ५८ ॥ तया पातका [11]प्रायश्चित्त । हेंचि जाण तूं निश्चित । [12]बुझावूनि **पांडुसुत** । पुत्रस्नेहें प्रतिपाळीं. ॥ ५९ ॥ सुखें ठेवितां **पांडुसुत** । क्षेमें उरती हे समस्त, । तूं होसील कीर्तिवंत । इहलोकीं आणि परलोकीं.

---

१. बोका. २. पोपट. ३. मऊ. ४. 'भरिले' व 'कथिले' असे अन्य पाठ आहेत. ५. या राजाचें नांव अंबुवीच. याच्या नगराचें नांव राजगृह. (अध्याय २०४ श्लोक १७-२३ पहा.) याच्या प्रधानानें (महाकर्णीनें) राजाचें सर्व ऐश्वर्य हरण केलें. राजाच्या स्त्रीरत्नांचाही तोच उपभोग घेऊं लागला. परंतु दैवप्राबल्यानें अमात्याचे हेतु सिद्धीस न जातां, कालांतरानें अंबुवीचाला त्याचें राज्य मिळालें. हें सर्व खटपट न करतां झालें, तेव्हां दैव अनुकूल असलें म्हणजे अनिष्टाचें निरसन होऊन इष्टकार्य घडतें—असें या आख्यायिकेचें तात्पर्य आहे. ६. अमात्य. ७. राज्य. ८. अध्याय २०५ श्लोक १-३० पहा. ९. दुर्योधनादिक तुझे पुत्र. १०. जातुषालयाच्या दाहांत. ११. प्रायश्चित्त='प्रायो नाम तपः प्रोक्तं चित्तं निश्चय उच्यते । तपोनिश्चयसंयोगात् प्रायश्चित्तमितीर्यते ॥.' हेमाद्रि [रघुवंश—सर्ग १२ श्लोक १९ टीका.] १२. सांत्वून.

॥ ६० ॥ जे बोलती पुरुषार्थवचनें । ते वांजवृक्षाचीं सुमनें । राया ! विचारूनि मनें । हित आपुलें तें करीं. ॥ ६१ ॥ हिडिंब वधिला वनांतरीं, । बक मारिला एकचक्रीं, । राजे पराभविले समरीं । शल्यादिक बळियाढे. ॥ ६२ ॥ तेवेळीं यांची वीरवाटीव । कोठें गुप्त ठेविली होती सर्व ? । आतां शब्दाचें वैभव । विस्तारूनि बोलती. ॥ ६३ ॥ पांडवांसीं युद्धकदन । करूं म्हणतां ओंवतिलें मरण । राया ! तूंही सर्वजाण । काय आम्हीं बोलणें ?' ॥ ६४ ॥ परिसोनि सकळिकांच्या युक्ती । प्रज्ञाचक्षु विशाळसुमती । म्हणे, 'विदुरा ! बैस रथीं । द्रुपदाप्रती जावया. ॥६५॥ बोधोनि पांचाळ नरेश्वर । भेटवीं उपायनें अपार, । धृष्टद्युम्नादि राजकुमर । एक एक गौरवीं. ॥ ६६ ॥ जांबूनद दिव्याभरणीं । शृंगारावी याज्ञसेनी । स्नुषासहित द्रुपदपत्नी । रत्नीं वसनीं पुजावी. ॥ ६७ ॥ पृथेचिया चरणा नमन । स्नेहशब्दें शांतवन, । करूनि माझें आशिर्वचन । पांचही पुत्रां सांगावें. ॥ ६८ ॥ मज वृद्धातें प्रतिपाळावें, । मागील कांहीं नाठवावें, । द्रौपदीसहीत शीघ्र यावें । आपुलिया नगरातें. ॥ ६९ ॥ त्रैलोक्यनाथ द्वारकापती । लक्ष्मीपती रुक्मिणीपती । निर्जरपती[11] भक्तपती । रेवतीपतीसमवेत[12]. ॥ ७० ॥ त्या कृष्णासीं वारंवार । लोटांगणीं नमस्कार, । निवेदूनि मधुर उत्तर[13] । माझें तया सांगणें. ॥ ७१ ॥ 'पांडव घेऊनि सांगातें । कृपेनें शीघ्र येइजे येथें,' । माझें वचन तो निश्चितें । न मोडी हें मी जाणें.' ॥ ७२ ॥ आज्ञा होतां विदुर सुमती । मार्ग क्रमूनि मानसगती । पांचाळपुरा पातला, नृपती ! । सभास्थानीं भेटला. ॥ ७३ ॥ प्रीतीनें दीधलें आलिंगन, । कुशळ विचारी याज्ञसेन, । 'तुमचे कृपेनें समाधान । क्षेमें[14] कल्याण सर्वदा.' ॥ ७४ ॥ धृष्टद्युम्न शिखंडी वीर । आलिंगिले राजकुमर । सुहृद सोयरे इष्ट मित्र । तयां क्षेम दीधलें. ॥ ७५ ॥ अपार वस्तु सुवर्णरत्नें । जीं पाठविलीं कुरुनंदनें । विदुरें देतां याज्ञसेनें । अंगिकारिलीं आवडी. ॥ ७६ ॥ द्रौपदीस दीधले अळंकार । मोलागळे अति अपार । पांचाळाचें [15]अंतःपुर । रत्नाभरणीं गौरविलें. ॥ ७७ ॥ पुत्रांसी[16] दीधलीं भूषणें । सिंधुद्वी-

१. पराक्रमाचीं भाषणें. २. पुष्पें. ३. बलाढ्य. ४. वाटीव=पुरुषार्थ, पराक्रम. ५. आमंत्रिलें. ६. धृतराष्ट्र. [प्रज्ञा (बुद्धि) हाच आहे चक्षु (नेत्र) ज्याचा तो, ज्याला चर्मचक्षु नाहीं तो, अंध.] ७. अध्याय २०६ श्लोक १-६ पहा. ८. सुवर्ण. ९. द्रौपदी. १०. सुनेसहित. ११. निर्जरांचा (देवांचा) पति=देवाधिदेव. १२. बलरामासहित. १३. हा धृतराष्ट्राचा निरोप मूळ ग्रंथांत नाहीं. मुक्तेश्वराची सरस्वती या स्थळीं किती तरी रसाळ आणि हृदयंगम आहे. १४. आलिंगन. १५. अंतःपुरांतील स्त्रीजन. १६. धर्मादिक पुत्रांला.

पींचीं दिव्य वसनें । स्नेह दुणावला तेणें । सोयरिकीचा तेकाळीं. ॥ ७८ ॥ मग गृहा येऊनि एकांतीं । भावें नमस्कारिली कुंती, । येरी म्हणे, 'कृपामूर्ति!। तुझे कृपें पांडव. ॥ ७९ ॥ लंघोनि अरिष्टें दुर्गम । वांचले हा तुझा धर्म.' । येरु म्हणे, 'पुरुषोत्तम । सदां यांतें रक्षिता.' ॥ ८० ॥ चढल्या प्रेमें वोसंडत। अष्टभावें वोथंबत । कृष्णचरणा दंडवत । मनोभावें घातलें. ॥ ८१ ॥ कृष्णें कवळितां हृदयासीं । प्रत्यक्ष आणि हृदयवासी । मिळतां आनंद आकाशीं। सांठवेना तयाचा. ॥ ८२ ॥ लागोनि बळदेवाचे चरणीं । मग बैसले एकासनीं, । विदुर म्हणे, 'जी! श्रवणीं । विज्ञापना परिसिजे. ॥ ८३ ॥ वारंवार जोडूनि हस्त, । कौरवराजें प्रार्थिलें बहुत, । त्यासी देऊनियां चित्त । सकळीं परिसिलें पाहिजे. ॥ ८४ ॥ भाग्यें वांचले लाखाजोहरीं, । भाग्यें जोडिली राजकुमरी, । भाग्यें पुरोचन दुराचारी । भस्म झाला स्वदोषें. ॥ ८५ ॥ श्रेष्ठ भाग्य माझें सृष्टीं । भाग्यें मागुते देखले दृष्टीं, । आतां कृपा करूनि भेटी । पाठवावें पुत्रांतें. ॥ ८६ ॥ सवें देऊनि कुंती कृष्णा । आणि कुमरा धृष्टद्युम्ना, । येऊनि द्वारकेचा राणा । सांभाळील मजलागीं. ॥ ८७ ॥ तुझेनि शरीरसंबंधें सुखी। श्लाघ्यता मानूं उभयलोकीं, । इंद्र तोही माझिये तुकीं । तुळावया हेंलवट.' ॥ ८८ ॥ द्रुपद म्हणे, 'जी! सोचार। माझें राज्यलक्ष्मीनगर। पांडवांचें हा निर्धार। निश्चयेसीं मी मानीं. ॥ ८९ ॥ जाणें राहाणें आवडी त्यांची। भावना न चले हो! आमुची। त्यांस मानेल यथारुची। तेंचि केलें पाहिजे. ॥९०॥ मी सेवेचा सेवक प्राणें, । आज्ञा कराल तें मज करणें, । सांगिजे कुंती श्रीकृष्णें । त्याच विचारें वर्तेन मी. ॥ ९१ ॥ विदुर सर्वज्ञ ज्ञानमूर्ती। सर्वदा वर्ते तुमचे हितीं, । तो सांगेल त्याच रीती । वर्तणूक करावी.' ॥ ९२ ॥ धर्म म्हणे, 'नृपसत्तमा! । स्वतंत्र सामर्थ्य नाहीं आम्हां । तुझें वाक्य निगमागमा । तुल्य मानूं निर्धारें.' ॥ ९३ ॥ निश्चय बोले यादवराणा, । 'जाणें आवडे माझिया मना, । दुरावतां आपुल्या स्थाना । सहज दूरीं पडतसां. ॥ ९४ ॥ मीही येतसें सांगातें । सर्व विवेकें होईल तेथें'; । 'अवश्य' म्हणोनि कुंतीसुतें । प्रस्थानातें करविलें. ॥ ९५ ॥ पांडुपुत्र निघतां पुढतीं । द्रुपदें गौर-

१. हें तुझ्या धर्माचें (पुण्याचें) फळ होय—असा भाव. [धर्म=पुण्य. 'धर्मोऽस्त्री पुण्य आचारे स्वभावोपमयोः क्रतौ । अहिंसोपनिषन्न्याये ना धनुर्यमसोमपे ॥' इति सुधा. श्रीनिवासविलासचंपू—पृष्ठ १३८ टीका.] २. ही विदुरोक्ति मुक्तेश्वराच्या उज्ज्वल प्रतिभेची दर्शक आहे. ३. बरोबरीला, तुलनेला. ४. हलकट, लघु. ५. खरोखर. ६. अध्याय २०७ श्लोक १-४ पहा. ७. अध्याय २०७ श्लोक ५ पहा. ८. वेद आणि शास्त्र यांसारखें. ९. कृष्ण, वासुदेव. १०. दूर राहतां. ११. विचार.

विले उचितीं । उपायनाची संपत्ती । अमर्याद ओपिली. ॥ ९६ ॥ सहस्र क[1]रिणी मदोन्मत्त । सुवर्णकवची महावंत । सुवर्णांकुशमंडित । चार लक्ष एकएका. ॥ ९७ ॥ घंटा घागरिया नेपुरें । पत्रवेली शृंखळा सूत्रें । दशनबंधादि विचित्रें । सर्व आभरणें [2]कनकाचीं. ॥ ९८ ॥ इंद्रगोपाहूनि तांबटी । झुली घातल्या सुवर्णपुटी, । शिरीं आच्छादन हेमतगटीं । उभयकर्णीं चामरें. ॥ ९९ ॥ [3]शातकुंभमणिमंडित । चत्वार अश्व सहस्र रथ । [4]मनोजवी पांचशत । सहस्रसंख्या एकएका. ॥ १०० ॥ अयुत दानीं सहस्र दास । [5]शय्यासन विचित्र वास । सुवर्णभाजनें [6]बहुवस । [7]पृथगाकारें ओपिलीं. ॥ १०१ ॥ कोटी सुवर्ण एकएका । पांचाळरायें अर्पिलें देखा । मुक्तजाळिया रत्नशिबिका । एकशत एकएका. ॥ १०२ ॥ कुंती कृष्णा एकासनीं । एकत्र पार्थ चक्रपाणी, । चौवे बंधु भिन्नयानीं । [9]रहंवरीं मिरवले. ॥ १०३ ॥ सेनेसहित धृष्टद्युम्न । पाठीं चालिला बळसंपन्न । वाद्यध्वनींनीं [10]गगन । नादविषयें व्यापिलें. ॥ १०४ ॥ विदुर बैसवूनि निकटी । कृष्ण बोले सप्रेम गोष्टी, । 'विदुरा! तुजसमान सृष्टी । मित्र मातें असेना.' ॥ १०५ ॥ [11]क्षत्ता म्हणे, 'करुणाकरा! । काय स्तविसी मज पामरा? । अनाथबंधु! या उत्तरा । साच करिसी या बोलें.' ॥ १०६ ॥ वंदूनियां पांचाळेश्वरा । पांडव पातले कौरवपुरा । तो महोत्सव [12]पुरंदरा । दुर्लभ वाटे लोचनीं. ॥ १०७ ॥ निकट पातले [13]राजनगरा, । विदुर पाठविला पुढारां, । जाणवितां राजेश्वरा । परम आल्हाद तयातें. ॥ १०८ ॥ द्रोण कृप आणि [14]विकर्ण । सकळ दळेंसीं चित्रसेन । सन्मुख पाठविले [15]नंदन । आणावया सन्मानें. ॥ १०९ ॥ नगरनागरीकजनीं । गुढिया उभविल्या विचित्रवसनीं । कुंकुमें रंगवूनि [16]मेदिनी । चौक भरिती [17]मुक्तांचे. ॥ ११० ॥ हेमस्तंभी तोरणें मखरें । वाद्यें वाजूं लागलीं अपारें । भेरी निशाण मंगळ तुरें । [18]ईडिंपाडें गर्जती. ॥ १११ ॥

---

१. हत्तीण. २. सुवर्णाचीं. ३. सुवर्ण आणि रत्नें यांहींकरून अलंकारिलेले. ४. मनासारखे चपळ, वेगवान्. ५. राजादिकांचें शय्यासन कसें असावें इत्यादि वर्णन बृहत्संहिता–अध्याय ७९ यांत आहे तें पहावें. ६. बहुत. ७. भिन्न आकाराचीं. ८. प्रयाणसमयींच्या उपायनांचें वर्णन मूळ ग्रंथांत नाहीं. ९. रथांत. १०. आकाश. ११. विदुर. १२. इंद्राला. (शत्रूंच्या पुरांचें (नगरांचें) दारण करणारा तो पुरंदर=इंद्र.) १३. हास्तिनपुराला. १४. विकर्ण आणि चित्रसेन हे धृतराष्ट्रपुत्र. [विकर्ण हा मोठा नीतिमान् आणि सत्पक्षानुयायी म्हणून पांडवांस प्रिय आणि कौरवांस अप्रिय असे.] (अध्याय २०७ श्लोक १३.) १५. पुत्र. १६. पृथ्वी. १७. मोत्यांचे. १८. ईंपिनें.

ओवाळिती नगरनारीनर, । पुढती देखूनि पांडुकुमर, । '[1]हें आश्चर्य महाथोर, । सर्व आम्हीं भाग्याचे. ॥ ११२ ॥ आतां आमुचेनि सुकृतें[2] । पांडव अक्षयी असोत येथें, । सहज अवलोकितां यांतें । अमृतपान होतसे.' ॥ ११३ ॥ मिरवत आले राजसदना, । नमस्कारिलें पितृचरणा, । रायें[3] आलिंगितां, नयना । अश्रुपात लोटले. ॥ ११४ ॥ वारंवार धरोनि पोटीं । स्नेहभावें थापटी पाठी । म्हणे, 'आज सुखाची सृष्टी । झाली मातें पुत्र हो !' ॥ ११५ ॥ भीष्मद्रोण कृपाचार्या । वृद्ध बाल्हीक प्रतीपतनया । भावें वंदूनियां पायां । आलिंगनें दीधलीं. ॥ ११६ ॥ विकर्ण सैंधव शल्य शकुनी । दुर्योधनादि सभास्थानीं । निर्मत्सरें बंधुश्रेणी[4] । आलिंगिल्या पांडवीं. ॥ ११७ ॥ मस्तक ठेवूनियां चरणीं । नमिली गांधारी जननी, । तीणें स्पर्शोनियां[5] मूर्ध्नी । आशिर्वाद दीधला. ॥ ११८ ॥ पृथादेवी आणि सौबळी[6] । स्नेहें मीनल्या खेवंकवळीं[7] । तपती पयस्विनींच्या मेळीं । जेंवी न दिसे भिन्नता. ॥ ११९ ॥ काशिराजाची [8]नंदिनी । दुर्योधनाची मुख्य पत्नी । तीणें पूजिली याज्ञसेनी । गौरवूनि सन्मानें. ॥ १२० ॥ ओपिलीं अळंकारवस्त्रें । पदकमाळा हार कटिसूत्रें । कर्णीं ताटंकें विचित्रें । पद्मरागें[9] लेवविलीं. ॥ १२१ ॥ गांधारीच्या सुना सकळी । एकशत राजबाळी, । तींहीं पूजिली पांचाळी । भिन्नभिन्न वैभवें. ॥ १२२ ॥ बोले गांधारी राजकन्या । 'ऐकें विदुरा ! परमप्राज्ञा ! । पांडुरायाचिया सदना । पृथा नेईं पुत्रेंसीं. ॥ १२३ ॥ ओपोनि[10] अपार संपत्तीतें । सर्व सुरवाड[11] करावें येथें, । वनीं श्रांतले त्या दुःखातें । होय परिहार तें [12]करीं.' ॥ १२४ ॥ पांडव आणि कृष्णा कुंती । हर्षें गेलीं स्वगृहाप्रती, । तेथील सुरवाड सुखवस्ती । सर्व मागील विसरलीं. ॥ १२५ ॥ नित्य निकट श्रीकृष्णमूर्ती, । अखंड विदुराची संगती, । तया महासुखाचिया पंक्ती । तुळणें काय तुळावें ? ॥ १२६ ॥ प्रज्ञाचक्षू आणि सौबळी । नमस्कारूनि प्रा-

---

१. हे पौरजनांचे आनंदोद्गार आहेत. [अध्याय २०७ श्लोक १६-२०.] या प्रसंगाचें वर्णन पंतांनीं केलें आहे तें फार मनोहर आहे. [आदिपर्व—अध्याय ३६ गीति ६९-७३ पहा.] २. पुण्यानें. ३. धृतराष्ट्रानें. ४. बंधुपंक्ती. ५. मस्तकाला स्पर्शणें अथवा हुंगणें हें ममतेचें दर्शक आहे. [शिरस्याघ्राणं गुरुजनस्यापत्येषु वात्सल्यद्योतकम्—त्रिपुरारिप्रणीत भावप्रदीपिकानामक मालतीमाधवटीका—अंक ४ पृ० १०४.] ६. गांधारी. ७. आलिंगनग्रहणांत. ८. मुलगी (भानुमती). ९. 'पद्मरागपरीक्षा' सविस्तरपणें बृहत्संहिता—अध्याय ८२ यांत पहावी. १०. देऊन. ११. सुख, अनुकूलता. १२. हें गांधारीभाषण मूळांत नाहीं.

त:काळीं । स्वकर्म साधूनि राउळीं[1], । श्रवण करिती सत्कथा. ॥ १२७ ॥ कांहीं काळ लोटल्यावरी, । धृतराष्ट्र धर्मातें पाचारी । अत्यादरें धरूनि करीं । गुंज[2] कर्णी बोलत. ॥ १२८ ॥ म्हणे, 'दुर्योधनादि माझे कुमर । कोपी मानी अतिनिष्ठुर । स्वार्थलोभाचे सागर । मित्रद्रोही मी जाणें. ॥ १२९ ॥ दुष्ट दुरात्मे दुर्जन, । नायकती माझें वचन, । मज देखूनि चक्षुहीन । अव्हेरिती सर्वस्वें. ॥ १३० ॥ पुढती नुपजावा विकल्प[3], । ऐसा माझा शुद्धसंकल्प, । सर्वी असावें सुखरूप । बंधुवर्गी समभावें. ॥ १३१ ॥ अंगिकारूनि अर्धजगती[4] । तुवां असावें इंद्रप्रस्थीं[5] । जैसा इंद्र अमरावती- । माजी मिरवे वैभवें. ॥ १३२ ॥ पुत्र कोणी न करितील विघ्न । तंव मी करीन अभिषिंचन[6] । विदुर बोलाविला सज्ञान । आणी ऋषेश्वर जाणते. ॥ १३३ ॥ अष्टोत्तरशतवटसहस्र । आणवी जान्हवीचें नीरें[7] । नूतन घडवी अलंकार । शुद्धजांबूनदाचे[8]. ॥ १३४ ॥ किरीट कुंडलें करकंकणें । बाहु अंगदें कंठभूषणें, । मेखळा मुद्रिका नवरत्नें । अमोलीक आणवी. ॥ १३५ ॥ शिरोवेष्टनें कटिबंधनें । आंगझोळ विचित्रवर्णी, । मेघडंबर सूर्यपणें । कनकदंड आणवी. ॥ १३६ ॥ पताकादि राजचिन्हीं । चंवरडोल[9] मत्त करिणी । सुवर्णवर्णी सुवर्णमणी । मिरवावया आणवी. ॥ १३७ ॥ सहस्र धेनूंचे पुंज दशक । सवत्स साळंकार देख, । घेतां ब्राह्मण मानिती सुख । सुवर्णशृंगी आणाव्या. ॥ १३८ ॥ धान्य फळीं फळित ग्राम । शतभरी संख्या अति उत्तम । दक्षणेलागीं अपार हेमें[10] । शीघ्र येथें आणावें. ॥ १३९ ॥ पांडूनें वेचून बाहुबळ । सागरांत पृथ्वीतळ । साधूनि मातें ओपिलें फळ । जेंवी धात्रीतरूचें. ॥ १४० ॥ तें उत्तीर्ण व्हावया येथ । अर्धराज्येसीं इंद्रप्रस्थ । देऊनि त्याचा ज्येष्ठ सुत । अभिषेकीन नृपपदीं.' ॥ १४१ ॥ ऐकोनि बोले यदुनायक[11], । 'राया! धन्य धन्य तूं एक, ।

---

१. देवळांत. २. गुप्त गोष्ट. ३. संशय, बेबनाव, विघाड, विग्रह. ४. पृथ्वी. [राज्याचें अर्ध—अध्याय २०७ श्लोक २६.] ५. इंद्रप्रस्थ (दिल्ली) नामक नगराच्या सभोंवार जें अरण्य होतें त्याला खांडवप्रस्थ असें नांव होतें. या अरण्यांत धृतराष्ट्राच्या आज्ञेवरून पांडवांनी शहर वसविलें; तें अत्यंत सुशोभित होतें म्हणून त्यास 'इंद्रप्रस्थ' 'शक्रप्रस्थ' असें म्हणूं लागले. ६. अभिषेक. ७. पाणी. ८. शुद्ध सोन्याचे. ९. हत्तीवर बसावयाचें अंबारीसारखें वितानयुक्त आसन. [डोल हा शब्द आरबी आहे. याचा अर्थ झोके खात जाणारें पालखीसारखें वाहन. याचा उपयोग अद्यापि हिंदी भाषेंत प्रचलित आहे. जसें:—'आज आमंतचौरस है. गणेशजीके **डोल** आज निकलें गे' इत्यादि.] १०. सोनें. ११. कृष्ण.

ऐसें केलिया पुण्यश्लोक । तुझेनि पाडें असेना. ॥ १४२ ॥ साधावया हें कारण । विलंब न करीं अर्धक्षण, । आजची अमृतवेळा[१] जाण । जयवासर[२] शुभ तिथी.' ॥ १४३ ॥ ऐसें बोलतां कृष्णनाथ, । तंव तेच क्षणीं कृपावंत । ऋषी पराशराचा सुत । **व्यास** तेथें पातला. ॥ १४४ ॥ घेऊन नमस्कार पूजा । मग म्हणे, 'योजिलें त्या काजा । संपादूनि महाराजा ! । घे आशिर्वाद ऋषींचे.' ॥ १४५ ॥ सुहृदराज ऋषेश्वर । मीनले तपोधन अपार, । सुवर्णपीठीं **युधिष्ठिर** । बैसविला ब्राह्मणीं. ॥ १४६ ॥ **धौम्यव्यास**ादी वेदैविदीं[३] । अभिषेक केला यथाविधी, । तेवेळीं जयजयकारशब्दीं । गर्जिन्नले समस्त. ॥ १४७ ॥ वेढोनि दिव्य पीतांबर । लेवविले अलंकार, । **धर्म**राज **राजे**श्वर । राज्यश्रीनें वरियेला. ॥ १४८ ॥ ब्राह्मण तोषले दक्षिणादानीं । रायें कथिलें त्या चौगुणीं । **विदुरें** केली संपादणी । सांगोपांग सुजाणें. ॥ १४९ ॥ कुंजरारूढ[४] मिरवती नगरीं । माडियां गोपुरीं पुरुष नारी । सुवर्णसुमनाचे संभारीं । वृष्टी करिती संतोषें. ॥ १५० ॥ **व्यास** म्हणे, '**युधिष्ठिरा** ! । वश्य करूनि पृथ्वीवरा । जिणोनि सकळ वसुंधरा[५] । भोगीं अक्षयसुखातें. ॥ १५१ ॥ राजसूयमहायज्ञीं । सुस्नात होईं अवभृथस्नानीं[६] । तुझी कीर्ती विश्वश्रवणीं[७] । करो वसती युगायुगीं.' ॥ १५२ ॥ विश्व संतोषें निर्भर । दुःखी **धृत**राष्ट्राचे कुमर, । हृदयीं धडके वैश्वानर । क्रोधाग्नीचा सर्वांतें. ॥ १५३ ॥ हें जाणवलें **कौरवनाथा**[८] । पाचारूनि **धर्मा पार्था** । म्हणे, 'आतांचि **इंद्रप्रस्था** । गमन केलें पाहिजे'. ॥ १५४ ॥ आज्ञा वंदूनियां कुमरीं, । मस्तक ठेविलें चरणावरी, । **भीष्मद्रोणकृपगांधारी** । मनोभावें वंदिलीं. ॥ १५५ ॥ केली नगरा प्रदक्षिणा । रथीं वाहिली **कुंती कृष्णा**, । सवें घेऊनि **याद**वराणा । पांचही बंधु निघाले. ॥ १५६ ॥ सर्वभावें नमिला क्षत्ता[९] । राहविलें पौरजां समस्तां, । **पांडव** गेले **इंद्रप्रस्था** । पुढील कथा परिसिजे. ॥ १५७ ॥ व्यासमुसेपासूनि वहिला । **भारत**कनकरस फुटला, । उन्मेषवन्ही आगळा झाला । ब्रह्मांडआगटी आंतौता. ॥ १५८ ॥ **गणेशमतीच्या** सांडसें । धरिला न वचे जो सायासें । तो म्यां प्राकृतें माणसें । केंवी हातें स्पर्शावा ? ॥ १५९ ॥ तथापि **लीलाविश्वंभरू** । सानुकूल जगद्गुरू । म्हणोनि बोले **मुक्तेश्वरू** । हें

---

१. अमृतसिद्धियोगाचा समय. [मुहूर्तमाला–त्याज्यात्याज्यप्रकरण–श्लोक १४ पृष्ठ ३० पहा. २. जयाचा दिवस. ३. वेद जाणणाऱ्यांनीं. ४. गजारूढ. ५. पृथ्वी. ६. यज्ञसमाप्तीच्या प्रसंगीचें स्नान. ७. विश्वाच्या कानीं. ८. धृतराष्ट्राला. ९. विदुर. १०. हें रूपकालंकाराचें उदाहरण आहे.

सामर्थ्य संतांचें. ॥१६०॥ इति '**श्रीभारत आदिपर्वणि**'। पांडव इंद्रप्रस्थीं राज्यासनीं। बैसले, श्रीकृष्णकृपेकरूनी। पंचेचाळिसावे अध्यायीं. ॥ १६१ ॥

अध्याय शेचाळिसावा.

वनें सरिता गड पर्वत। उल्लंघूनि देश पुनीत, । **कृष्ण पांडव** हर्षयुक्त। **इंद्रप्रस्था** पातले. ॥ १ ॥ आले ऐकोनि धर्मरासी। आनंदले नगरवासी, । नाना उपायनाच्या राशी। घेऊनि येती सामोरें. ॥ २ ॥ आरूढले रथ कुंजरीं, । नगर शृंगारिलें मखरीं, । ध्वज पताका अंबरीं। विद्युत्प्राय झळकती. ॥३॥ सडे चौक रंगमाळा। तोरणें गुंफिलीं मुक्ताफळा, । कनककलश कुळाचळा। हेळणा करिती हेळाची. ॥ ४ ॥ दिव्य मंडप घातले, । नाना आस्तरणें भूषिले, । लोड तिवांसे विस्तारले। चित्रविचित्र परोपरी. ॥ ५ ॥ नगर नागरिक लोक। शृंगारिले एक एक, । अळंकार ल्याइले अनेक। रत्नादिकें शोभती. ॥ ६ ॥ **कृष्णें** स्मरतां अमरनाथ, । पातला **विश्वकर्म्या**सहित; । म्हणे, 'सेवका कार्य-भाग त्वरित। सांगीतला पाहिजे.' ॥ ७ ॥ **अच्युत** म्हणे, '**अमरपाळा**!। **निर्जर**नगरी भूमंडळा। पातली, ऐसी रचना डोळां। रचून येथें दाखवीं'.॥८॥ आज्ञा वंदूनि **विश्वकर्मा**। निर्मिता झाला धर्मधामा, । तेथील द्यावया उपमा। दुजी दृष्टी दिसेना. ॥ ९ ॥ **देवकीपुत्र कुंतीपुत्र**। पातीं लावूनि उघडिती नेत्र। इतुकियामाजी विचित्र। **इंद्रप्रस्थ** उभविलें. ॥ १० ॥ मनुष्यकरणी करोनि परती। आवडी **विश्वकर्म्या** हातीं। रचिली भूतळीं **इंद्रावती**। **इंद्रप्रस्थ** या नांवें. ॥ ११ ॥ परिघ पौळिया गृह गोपुरें। सौधें शतखणी दामोदरें, । मध्यें

---

१. या अध्यायाच्या शेवटीं 'इति श्रीमहाभारते आदिपर्वणि कुंतीतनययुधिष्ठिरराज्याभिषेचनो नाम पंचचत्वारिंशोऽध्यायः' असा शेरा आहे. यांत मूळांतील २००-२०७ या अध्यायांचा सारांश आला आहे. या अध्यायापासून 'राज्यलंभ' नामक उपपर्वास आरंभ होतो. या अध्यायांत पांडववृत्तश्रवणानें दुःखित झालेल्या दुर्योधनादिकांचा हस्तिनापुरांत प्रवेश, धृतराष्ट्रदुर्योधनसंवाद, धृतराष्ट्राचा भीष्मादिकांसह विचार, दुर्योधनाशीं भीष्माचें आणि द्रोणाचें भाषण, धृतराष्ट्रविदुरसंभाषण, धृतराष्ट्राच्या आज्ञेनें विदुराचें द्रुपदपुरास गमन, द्रुपदानुज्ञात पांडवांचें हस्तिनापुरप्रत्यागमन आणि धृतराष्ट्राज्ञेनें त्यांचें इंद्रप्रस्थप्रयाण असे विषय आहेत. २. पुण्यनिधि. ३. आकाशांत. ४. गाद्या. ५. इंद्र. ६. देवनगरी. ७. धर्मांचा वाडा. ८. कृष्णद्वैपायनप्रमुख पांडवांनीं शुभदिवशीं शांति करून भूमि मोजून नगर बांधिलें. तें सागरप्रतिरूप परिखांनीं अलंकृत, शतघ्नीयंत्रजालानें शोभित असें होतें. [अध्याय २०७ श्लोक २८-५१.] विश्वकर्म्याच्या हातानें नगररचना करविली असें वर्णन मूळांत नाहीं. ९. सौध=वाडा.

तळवरें उपरिकाकारें । पडशाळा देहलिका[1]. ॥ १२ ॥ गगनचुंबी विशाळ हुडे[2] । वर्तुळ पर्वताचे निपाडें[3], । द्वारीं कनककपाट जोडे । गर्जतां छळिती वैरिया. ॥ १३ ॥ लाज सांडोनियां क्षिती । मेवा आड अमरावती । लपाली, आणी भोगावती[4] । पाताळगतें निघाली. ॥ १४ ॥ पश्चात्ताप धरूनि चित्तीं । कुबेराची अलकावती । कैलासवनामाजी वस्ती । करूनि वसे वैराग्यें. ॥१५॥ उपवनें अवलोकितां नयनीं । लज्जा दाटली नंदनवनीं । सेऊनि मंदाकिनीचें[5] पाणी । तपश्चर्या आचरे. ॥ १६ ॥ वापी कूप सरोवरें । अमृतस्वादु[6] सरितानीरें[7] । अनेकरंगाचीं कल्हारें[8] । विकाशिलीं घमघमती[9]. ॥ १७ ॥ बकुल जाँतिका[10] शतपत्र । चंपक केतकी दमनकांकुर[11] । पराग धुळोरा मधुकर[12] । गुंजारवें खेळती. ॥ १८ ॥ हंस कारंडव मयूर । चातक चक्रवाक चकोर । खंजरीट मधुरस्वर । कोकिळांचे उमटती. ॥ १९ ॥ नहुषययातीराजेश्वरीं । राज्य केलें याच नगरीं, । रमणीक[13] याचे सरी । पट्टण आन असेना. ॥ २० ॥ आज्ञा मागोनि सत्वरीं । गमन केलें सुरेश्वरसूत्रधारीं[14], । पांडव प्रवेशले नगरीं । वाद्यगजरें संतोषें. ॥ २१ ॥ हर्षें पातले राजालया, । सवें पातल्या संपत्ति श्रिया, । धर्म तेथें वासविजया, । विजयी सवें श्रीकृष्ण. ॥ २२ ॥ माधव तेथें वसे कमळा, । कमळा[15] तेथें सिद्धी[16] सकळा, । म्हणोनि नित्य सोहळा । धर्मधामीं वाढता. ॥ २३ ॥ नीतिधर्मसदाचारी । जीवमात्रीं परोपकारी । देशीं राष्ट्रीं पुरीं नगरीं । दुःखी कोणी असेना. ॥ २४ ॥ सिद्ध साधक तपोराशी । ऋषी पातले कुटुंबांसीं, । गृहें देवोनि तयांसीं । धर्मरायें स्थापिले. ॥ २५ ॥ सर्वशास्त्रांचीं अध्ययनें । अनेक शास्त्रांचीं व्याख्यानें, । स्थळोस्थळीं धर्मपुराणें । देवार्चनें हरिकथा. ॥ २६ ॥ क्षुधिता इच्छेचें भोजन, । याचका इच्छेनें देणें दान, । ऐसा पुण्यश्लोक[17] जाण । प्रजापाळक धर्मात्मा. ॥ २७ ॥ कृष्ण म्हणे, 'कुरुनंदना[18] ! । मातें दीधली पाहिजे आज्ञा, । जाणें वसुदेवाच्या दर्शना । उग्रसेनादिकांच्या'. ॥ २८ ॥ मग धर्में नमस्कार केला । श्रीकृष्णासी स्तविता झाला, । कर जोडोनि उभा राहिला । हरीपुढें सन्मुख. ॥२९॥ म्हणे, 'जयजया कृपानिधी, । तूंचि सगुण साकार सिद्धी, । आपपरावा[19] नसे

---

१. उंबरे. २. बुरुज. ३. पर्वतासारखे. ४. अध्याय २०७ श्लोक ३१ वा आणि ५१ वा पहा. ५. भागीरथीचें. ६. अमृतमधुर. ७. नदीजलें. ८. कमळें. ९. सुगंध पसरितात. १०. जाई. ११. दवण्याचे अंकुर. १२. भुंगे. (भ्रमर.) १३. रमणीयता, सौंदर्य. १४. देवश्रेष्ठ विश्वकर्म्यानें. १५. लक्ष्मी. १६. अष्टसिद्धि. १७. युधिष्ठिर. १८. धर्मा ! १९. आपला आणि दुसऱ्याचा अशी मती.

कुद्री। जगद्गुरु! स्वामिया! ॥ ३० ॥ अगा! हे राजीवलोचना![1] । कोटिकंदर्प-विराजमाना! । लावण्यगुणनिधाना! । परिपूर्णा परब्रह्मा! ॥ ३१ ॥ तूंचि आमुतें रक्षिता, । तूंचि आमुतें प्राणदाता, । तूंचि पूर्ण ब्रह्म स्वसत्ता । निर्गुणा गुणातीता जी! ॥३२॥ परमपुरुषा! परात्परा! । लावण्यधामा! एकसुंदरा! । गुणातीता परात्परा! । स्वामिया! तूं निर्धारें. ॥ ३३ ॥ मेघश्याम सांवळा, । गळां वैजयंतीमाळा,[2] । तूंचि सुखाचा सोहळा । स्वामिया! विश्वेशा! ॥ ३४ ॥ वैकुंठनायका! लक्ष्मीपती! । तूंचि आधार त्रिजगतीं । त्राहें त्राहें[3] रुक्मिणीपती! । स्वामिया! करुणाकरा! ॥ ३५ ॥ श्रीमुख साजिरें सुंदर । स्वानंदघन निर्धार । जगन्निवास श्रीधर । करुणाकर तूं माय. ॥ ३६ ॥ तूं माझी माउली,[4] । तूंचि सुखाची साउली, । अगाध लीला वहिली । स्वामी तूंचि देवराया! ॥ ३७ ॥ तुझें श्रीमुख पाहतां । दुःख हरिलें तत्वतां, । तूं आम्हांसी सांभाळिता । आदी अंतीं जगदीशा!'[5] ॥ ३८ ॥ ऐसें श्रीकृष्णें ऐकोनि स्तवन । दीधलें पांचांसी आलिंगन, । मग आशीर्वाद देऊन । निघता झाला द्वारके.[6] ॥ ३९ ॥ 'स्मरण करितां अंतःकरणीं । मी येईन तत्क्षणीं, । भक्तांचिये हृदयभुवनीं । वसति माजी सर्वदा'. ॥ ४० ॥ धर्म देतां आलिंगन । अश्रूनें पूर्ण झाले नयन, । कुरवाळिले पांचहीजण । अमृतहस्तेंकरूनी. ॥ ४१ ॥ नमस्कारिली पितृभगिनी, । आश्वासिली याज्ञसेनी, । दृष्टीपुढोनि चक्रपाणी । जातां खेद सर्वांतें. ॥ ४२ ॥ कुंती म्हणे, 'हृषीकेशा! । पुढती पांडव पावले दशा । हा सर्व प्रसाद तुझा ऐसा । निश्चयेसीं मी जाणें. ॥ ४३ ॥ पुढती शीघ्र येईं भेटी'. । म्हणोनि स्नेहें धरिला पोटीं । नेत्रीं स्वानंदजळाची वृष्टी । तेणें सिंची[7] हृदयस्था. ॥ ४४ ॥ असो. राहवूनि समस्तां । सवें बळदेव ज्येष्ठ-भ्राता । आरूढोनि कनकरथा । प्रयाण केलें द्वारके. ॥ ४५ ॥ जातां कथिलें

---

१. हे कमलनयना! २. विष्णूच्या माळेला 'वैजयंती' असें नांव आहे. ही माळा कधीं कोमेजत नाहीं, अशी समजूत आहे. 'लारेल' (Laurel) नामक वनस्पतींच्या पुष्पांची माळाही कधीं सुकत नाहीं, सदा टवटवीत असते, असा प्राचीन ग्रीक व रोमन लोकांचा समज होता. ३. त्राहि त्राहि (त्रायस्व त्रायस्व)=रक्षण कर. ४. आराध्यदेवतेला 'माउली, आई' अशा स्त्रीवाचक शब्दांनीं संबोधन करून प्रार्थना करावी असें वर्णन जुन्या भक्तिप्रतिपादक ग्रंथांत वारंवार आढळतें. ५. हें कृष्णस्तवन (ओंवी २८-३८) मूळांत नाहीं. प्रसंग मनांत आणून विस्तारप्रिय कवीनेंच योजिलें आहे. ६. अध्याय २०७ श्लोक ५२ पहा. [पांडवांची आज्ञा घेऊन बळरामासह कृष्ण द्वारावतीस निघून गेला.] ७. बाष्पा सिंचन करी.

धर्मराजासी, । 'नारद येईल तुम्हांपासीं । तो सांगेल तें मानसीं । सर्व तुम्हीं धरावें.' ॥ ४६ ॥ वदोनि गेलिया चक्रपाणी, । नारद पातला तेचक्षणीं, । धर्म लागोनियां चरणीं, । वेरासनीं बैसविला. ॥ ४७ ॥ मग बैसवूनि पांचही-जण । नारद म्हणे, 'ऐका वचन. । माझिये आज्ञेचें पालन । अचळ केलें पाहिजे. ॥ ४८ ॥ पांचांजणां एक नारी । हेंच विपरीत लोकाचारीं, । विरोध उपजावयाची परी । येचि संधि होतसे. ॥ ४९ ॥ ऐकोदरां वैराकार, । एकोदरां वेगळेचार, । कारण स्त्रीसंग साचार । जाणतेनी जाणिजे. ॥ ५० ॥ येचि-विषयीं कथा जीर्ण । 'सुंदोपसुंदांचें आख्यान' । सावध ऐका अवघेजण । या दृष्टांताकारणें. ॥ ५१ ॥ हिरण्यकश्यपाचा कुमर । निकुंभनामा असुरेश्वर, । त्याचे दोघे पुत्र महाक्रूर । सुंदोपसुंद या नांवें. ॥ ५२ ॥ एक शरीर एक प्राण, । एक शय्या एक भोजन, । एकांहूनि एक भिन्न । अर्ध क्षण न होती. ॥ ५३ ॥ तिहीं वसवूनि विंध्याचळ । तपश्चर्या मांडिली प्रबळ, । तें देखोनि देव सकळ । भयसाशंक मानसीं. ॥ ५४ ॥ मनएकाग्रता करूनी । एकांगुष्ठीं उभे राहोनी । निराहार तपश्चर्येलागूनी । तेथें असती दोघेजण. ॥ ५५ ॥ उग्र तपश्चर्या करितां । प्राणापानांची एकाग्रता, । अत्यंत होवोनि विनीता । तप करिती अति उग्र. ॥ ५६ ॥ ऐकांगुष्ठीं तप दारुण । ऊर्ध्व पाद मस्तकासन । रक्त मांस करिती हवन । छेदछेदूनि आपुलें. ॥ ५७ ॥ द्वादश

---

१. अध्याय २०८ श्लोक १० पहा. २. सहोदरां=एका उदरांतून झालेल्या मुलांस (भावांला). ३. पुरातन इतिहास. ४. दैत्येंद्र. ५. दारुण, क्रूरमानस. ६. अध्याय २०९ श्लो० ५–६ पहा. ७. त्रैलोक्यविजयार्थ तप केलें. [अध्याय २०९ श्लोक ७ पहा]. ८. आहार केल्याशिवाय. ९. एक आंगठ्यावर उभे राहून, पादांगुष्ठाग्राधिष्ठित. [अध्याय २०९ श्लोक ९ पहा.] १०. आत्ममांस हवन करीत असत. ११. मागें अध्याय १५ ओवी ७८ पृष्ठ ११४ यांतही ह्याच ओवीसारखी ओवी आहे. (मागें पृष्ठ १६५ टीप ४ पहा.) 'द्वादश पंचाग्निधूम्रपान । सूर्यमंडळ अवलोकून' या ओवींत द्वादश हें विशेषण सूर्यमंडळाचें करावें, कारण द्वादश आदित्य प्रसिद्ध आहेत. हें पद सूर्यमंडळालाच विशेषण शोभतें. पुनः द्वादश अग्नींची कोठें प्रसिद्धि नाहीं. द्वादशादित्यांचीं नांवें:—१ धाता, २ अर्यमा, ३ मित्र, ४ वरुण, ५ अंश, ६ भग, ७ इंद्र, ८ विवस्वान्, ९ पूषा, १० पर्जन्य, ११ त्वष्टा, १२ विष्णु. सूर्याला याच कारणास्तव 'द्वादशात्मा' असें नांव अमरकोशांत आहे. हीं द्वादश आदित्यांचीं नांवें कोठें कोठें अन्य प्रकारानें दिलीं आहेत. 'पंचाग्निसाधन' 'पंचाग्निधारण' अथवा 'पंचाग्निधूम्रपान' हा एक तपश्चर्येचा प्रकार आहे. यांत साधकाच्या चार बाजूला चार अग्नि पेटविलेले असून त्यांचा धूर सेवन त्यानें करावा असें आहे. या अग्नींचीं नांवें:—दक्षिणाग्नि, गार्हपत्य, आहवनीय, प्रणीत (संस्कृत अनल) आणि पांचवा अग्नि तपन. [स्तुतिकुसुमांजलि—स्तोत्र २०

पंचाग्नीधूम्रपान । सूर्यमंडळ अवलोकून । चारी मास वृष्टि साहून । धारा धरिती मस्तकीं. ॥ ५८ ॥ देवीं छळितां [1]अनेकविघ्नीं । चळ नाहीं नियमासनीं, । ते वेळीं येऊनि [2]पद्मयोनी । 'मागा' म्हणे 'वरातें.' ॥ ५९ ॥ 'त्रैलोक्याची राज्यपदवी । अचळ करोनि आम्हां द्यावी, । युद्धीं आम्हांतें पराभवी । ऐसा उपजों न द्यावा.' ॥ ६० ॥ खडतर तपाचा [3]गरिमा । प्रसन्न झाला हर ब्रह्मा, । लोटोनि मर्यादेची सीमा । असुर वर मागती. ॥ ६१ ॥ 'अमर होवोनि असावें सुखीं, । मृत्यु कवणाचे हस्तकीं । न होय' ऐसें बोलतां मुखीं । विश्वकर्ता अनुवादे. ॥ ६२ ॥ 'त्रैलोकींचें सर्व सामर्थ्य, । तुम्हां दीधलें म्यां यथार्थ, । बंधुबंधूंचे हातें मृत्य । [4]सेखीं पावाल विरोधें. ॥ ६३ ॥ आणिकां हातें नव्हे मरण, । दोघीं करितां युद्धकंदन । नाश पावाल दोघेजण । हस्तें एकएकाच्या.' ॥ ६४ ॥ असुर वदती, 'विश्ववरदा! । आम्हां जीवांच्या सुहृदा । वैरविरोध नुपजे कदां । हें निर्धारें जाण पां.' ॥ ६५ ॥ होतां ऐश्वर्याची प्राप्ती, । मिळाल्या असुरांच्या पंक्ती, । देवां पळवूनि, संपत्ती । स्वेच्छें भोगूं लागले. ॥ ६६ ॥ त्रासूनि पाताळींचे भुजंग । भोगूं लागले पद्मिनीभोग । पृथ्वी जिणोनि [5]मातंग । मत्त तैसे क्रीडती. ॥ ६७ ॥ विष्णुप्रतिमा [6]शर्वस्थानें । भंगिलीं तीर्थें तपोवनें, । ब्राह्मण वधोनि [7]गोहिंसनें । करिती शंकेवेगळीं. ॥६८॥ सर्वें असुरांच्या कोटी । मद्यपानें आरक्त दृष्टी, । परस्त्रिया दाटोदाटी । बळात्कारें भोगिती. ॥ ६९ ॥ स्वेच्छें सेविती पिशिताशन, । स्वेच्छें करिती मद्यपान, । स्वेच्छा रमती सुखमैथुन । हेंचि तोंडें जल्पती. ॥ ७० ॥ 'घ्या रे! वसनें रत्नें धनें, । अश्व कुंजर मनुष्ययानें, । आनंदें भोगा.' ऐसीं वचनें । मातलेपणें गर्जती. ॥ ७१ ॥ ऋषी मारिले असंख्यात । वरदें शाप झाले व्यर्थ, । हाहाकार वर्तले

श्लोक २१ टीका] रघुवंशाच्या तेराव्या सर्गांत सुतीक्ष्ण नामक ऋषीच्या पंचाग्निसाधनाचें वर्णन आहे तें असें:—'चोहींकडे ज्वलन पेटवुनी दुपारीं, माथ्यावरी तपतसे जंव सूर्य भारी; । बैसोनियां मुनि सुतीक्ष्ण म्हणोनि हा कीं, पंचाग्निसाधन करी अबले!, बिलोकीं. ॥' कुमारसंभवाच्या पांचव्या सर्गांत पार्वतीच्या तपाचें वर्णन आहे. त्यांतही ग्रीष्मऋतूंत पार्वती चोहोंबाजूस चार अग्नी पेटवून त्यांमध्यें बसून सूर्याकडे एकसारखी टक लाऊन पाहात होती असा उल्लेख आहे. [श्लोक २० पहा.] या 'पंचाग्निसाधन'रूप तपोविशेषांत सूर्य हाच पंचम अग्नि होय. ['पंचमः पंचतपसस्तपनो जातवेदसाम्.' शिशुपालवध–सर्ग २ श्लोक ५१ पहा.]

१. अध्याय २०९ श्लोक १०-१२ पहा. २. ब्रह्मदेव. (अध्याय २०९ श्लोक १७ पहा.) ३. गुरुपणा, मोठेपणा. ४. शेवटीं. (श्लोक २४-२५ पहा.) ५. हत्ती. ['मातंगः श्वपचे गजे' इति मेदिनी.] ६. महादेवाचीं स्थानें. ७. गोवध. ८. मांसभक्षण. ९. अध्याय २१० श्लोक २२-२५पहा.

तेथ । लोकत्रयीं सर्वांतें. ॥ ७२ ॥ तपस्वी ऋषेश्वर[1] ब्रह्मयाप्रती । येऊनि क्लेशांतें सांगती । तेणें विचारूनियां चित्तीं । विश्वकर्म्या निरोपी. ॥ ७३ ॥ ‘रत्नें घालोनि अवयवीं । दिव्यांगना निर्मी बरवी, । जीतें देखतां वैरभावीं । नाश होय असुरांतें.’ ॥ ७४ ॥ ‘अवश्य’ म्हणोनि विश्वकर्मा । तीहीं लोकींच्या ललामा[2] । एकवटोनि दिव्य प्रतिमा । तिलोत्तमा[3] निर्मिली. ॥ ७५ ॥ तिळतिळ जडोनि रत्नकण । सजीव घडिलें प्रमदारत्न[4] । म्हणोनि तिलोत्तमा हें अभिधान । ब्रह्मा ठेवी तियेतें. ॥७६॥ सकुमार सुंदर सुलक्षणीं । चातुर्यप्रकाशाची खाणी, । जीतें अवलोकितां नयनीं । चोज आलें अद्भुत. ॥ ७७ ॥ उभी ठाके जया सवा । तिकडे मुखें निघती देवा । सहस्रनयन झाला मघवा[5] । चतुरानन विरंची[6].॥७८॥ तीणें होतांचि मागें पुढें । अग्नी दुंतोंडा[7] दोहींकडे । अवलोकनाचेनि पाडें । स्कंद झाला षण्मुख. ॥ ७९ ॥ तीसि बोधोनि वर्मकळा । विरिंची पाठवी विंध्याचळा । जेथें असुरगणाचा पाळा[8] । परमानंदें क्रीडत. ॥ ८० ॥ नृत्यांगनांचीं नर्तनें, । किन्नरांचीं मधुर गायनें, । डोल देती आसवपानें[9] । अंकासनीं अंगना. ॥ ८१ ॥ तेचि वनीं विलोलनेत्रा । तिलोत्तमा शशांकवक्त्रा[10] । रक्तवर्ण एकवस्त्रा । वेंढोनि वेंची पुष्पांतें. ॥ ८२ ॥ तीसीं अवलोकितां नयनीं । कामव्याधें विंधिलें बाणीं । देहस्मरणातें विसरूनि । भोग भूली भूलले.॥८३॥ आलिंगनालागीं उतावळे । दोघे धांवूनि पातले जवळे, । परस्परें जाऊनि डोळे । करसंकेतें वारिती. ॥ ८४ ॥ दक्षिणकरीं[11] धरिली सुंदें, । वामहस्तीं उपसुंदें, । दोघे कामाच्या उन्मादें । रमावया झोंबती. ॥ ८५ ॥ सुंद म्हणे, ‘रे! ज्येष्ठपत्नी[12] । तुवां मानावी मातृस्थानीं.’ । येरू म्हणे, ‘कन्या भगिनी । स्नुषा तुझी मम भार्या’. ॥ ८६ ॥ दोघे चढले अतिविषादा । वश झाले

---

१. अध्याय २११ श्लोक १-८ पहा. २. भूषणा, उत्तम पदार्थाला. [‘ललाम पुच्छपुंड्राश्वभूषाप्राधान्यकेतुषु’ इत्यमरः.] ३. हें तिचें नांव. मूळांत असें आहे:—‘तिलं तिलं समानीय रत्नानां यद्विनिर्मिता । तिलोत्तमेति तत्तस्या नाम चक्रे पितामहः ॥’ (आदिपर्व—अध्याय २११ श्लोक १८.) ४. स्त्रीरत्न. ५. इंद्र. (अध्याय २११ श्लोक २५-२९.) ६. पितामहाशिवाय सर्व देव तिलोत्तमेला पाहून मोहित झाले (अ० २११ श्लो० ३०) आणि स्थाणु महादेव तिला पाहण्यासाठीं चतुर्मुख झाला (श्लो० २८) असें मूळांत वर्णन आहे. विरंचि चतुरानन झाल्याचें वर्णन मूळांत नाहीं. ७. अग्नीला दोन तोंडें आहेत. (‘सप्तजिह्वो द्विशीर्षकः’ इत्यादि मंत्रांत हें अग्निदेहाचें वर्णन आहे.) ८. समूह, थवा. ९. मद्यपानें. १०. चंद्रमुखी. ११. अध्याय २१२ श्लोक १३ पहा. १२. ‘माझी भार्या ही तुझी गुरु’ असें सुंद म्हणाला (अ० २१२ श्लोक १६).

निष्ठुर क्रोधा, । पडताळूनि प्रचंड गदा । युद्धकंदना मिसळले. ॥ ८७ ॥ 'घे घे' म्हणोनि घालिती घावो । लक्षूनि भेदिती वर्मठावो, । लोपला सुहृदपणाचा भावो । घेऊं पाहती प्राणातें. ॥ ८८ ॥ सुंदें ताडितां हृदयकमळीं, । उपसुंद हाणी कर्णमूळीं, । मूर्छना दाटोनि भूमंडळीं । दोघे प्राणा मूकले. ॥ ८९ ॥ होतां प्रमदेचें दर्शन, । व्यर्थ दोघे पावले मरण, । जेंवी करिणीलागीं करीण । युद्ध करितां काननीं. ॥ ९० ॥ त्रिया आणि असुरमेळा । भयें पातला पाताळा, । ब्रह्मा आदि सुरां सकळां । परमानंद ते काळीं.॥९१॥ तिलोत्तमेसीं दीधला वर, । 'सूर्यलोकीं सुखविहार । करीं' म्हणे सुरेश्वर । अंगसेवें तोषवीं. ॥ ९२ ॥ ऐसा असे हा स्त्रीलोभ । सुहृदालागीं विग्रह क्षोभ, । म्हणोनि मर्यादेचा स्तंभ । चळण कोणी न करावा. ॥ ९३ ॥ दोन मास द्वादश दिन । असावा द्रौपदीचा काम, । चौघां अंतरीं विरोधधर्म । कदाकाळीं नुपजावा. ॥ ९४ ॥ 'ज्याच्या दिवसांत गोरटी । एकांतीं असतां तया निकटी । तेथें जो अवलोकील दृष्टी । तो गुरुतल्पग जाणावा. ॥ ९५ ॥ तेणें द्वादशवर्षें नृपा! । वनीं आचरावें तपा, । नेम भंगिल्या महच्छापा । पात्र होईल निर्धारें'.॥९६॥ नारदवचनाचेनि पाशें । पांचही बांधिले ऐसे, । सद्गुरुवाक्य मनउल्हासें । अंगिकारिलें पांडवीं. ॥ ९७ ॥ अंगीकारोनि पूजोपचारा । आज्ञा मागोनि सत्वरा । नारद पावला द्वारकापुरा । यादवेश्वरा भेटावया. ॥ ९८ ॥ यावरी पावला द्वैपायन । अर्पूनि पूजा धन सुवर्ण, । देऊनियां आशीर्वचन । तोही गेला स्वाश्रमा. ॥ ९९ ॥ यावरी कथा वर्तली कैसी । वैशंपायन गुणैकरासी । निवेदील कुरुरायासी । तेचि श्रोतीं परिसावी. ॥ १०० ॥ लीलाविश्वंभर स्वामिया । दत्तात्रेय जगदात्मिया । मनोभावें वंदोनियां । मुक्तेश्वर अनुवादे. ॥ १०१ ॥

---

१. गजेंद्र. २. सुंदोपसुंदांचे सेवक दैत्य. (अ० २१२ श्लो० २०-२१.) ३. आदित्यलोकीं (श्लो० २३). 'तूं आदित्यसम तेजस्वी लोकांत वास करशील आणि तुझ्या तेजामुळें तुझ्याकडे कोणी पाहणार नाहीं' असा ब्रह्मदेवानें तिलोत्तमेला वर दिला. ४. एकस्त्रीरत्नभोगकाम हा असा घातक आहे. ५. गुरुपत्नीसमागम करणारा. ६. पांचांनींही प्रतिज्ञा केली व तदनुसारें वागण्याचें पत्करिलें. ७. येथें हें 'सुंदोपसुंदोपाख्यान' समाप्त झालें. मोरोपंत—आदिपर्व—अध्याय ३७ गीति १-२७ यांत हेंच आख्यान आहे. तसेंच अमरचंद्रसूरिप्रणीत बालभारत—आदिपर्व—सर्ग ६ श्लोक ४२-४७ पहा. ८. येथें 'विदुरागमराज्यलंभ'नामक उपपर्व संपलें. येथून 'अर्जुनवनवास'नामक पोटपर्वास आरंभ होतो. या अध्यायाला 'पांडव'शक्रप्रस्थस्थापना नारदसंवाद' असें नांव पोथींत आहे.

अध्याय सत्तेचाळिसावा.

[1]यांवरी काळ लोटल्या कांहीं, । रात्रीं एका ब्राह्मणाचे [2]गेहीं, । तस्करीं घाला घालूनि पाहीं । सवत्स धे[3]नु हरितल्या. ॥ १ ॥ हृदय पिटीत उभयहस्तीं । ब्राह्मण पालवी अर्जुनाप्रती, । 'वीरांमाजी तूं पुरुषार्थी । ऐसें विश्व बोलतें. ॥ २ ॥ धांवणें करूनि लगबगीं । तस्कर दंडूनि निजांगीं, । गोधनें आणूनि मजलागीं । सुखी केलें पाहिजे.' ॥ ३ ॥ ऐकोनि लगबगां उठे **पार्थ** । तंव धनुष्यबाण ठेविलें जेथ, । ते [4]चित्रशाळेंत द्रौपदीसहित । **धर्म**राज प[5]हुडला. ॥ ४ ॥ ब्राह्मण आश्वासिला ह[6]स्तीं, । परी शस्त्रें ध्यावीं कवणे युक्तीं । नारदनियमाचिये गुंती । विचार कांहीं सुचेना. ॥ ५ ॥ देखोनि ब्राह्मणाची ग्लानी, । धीर न धरवे अंत:करणीं, । शस्त्र घेतां धर्महानी । तपश्चर्ये निघावें. ॥ ६ ॥ विशेषार्थ विचारी न[7]रेश । आधीं हरीं ब्राह्मणाचा क्लेश, । पुढें घडेल अरण्यवास । तोही सुखें घडो कां. ॥ ७ ॥ म्हणोनि चित्रशाळे प्रवेशला । शस्त्रें घेऊनि शीघ्र आला, । पाठीलागीं धाविन्नला । तस्कराचे ते काळीं. ॥ ८ ॥ पावोनि तस्कराचें वृं[8]द । शस्त्रें केला शिरच्छेद, । गोधनें आणितां आनंद । अपार झाला द्विजातें. ॥ ९ ॥ धेनु आणि [9]नेलीं वित्तें । आणोनि वोपिलीं द्विजातें । स्तवनीं पूजोनि **पार्थातें** । विप्र गेला स्वस्थाना. ॥ १० ॥ स्मरोनियां निजनेमातें, । येऊनि वंदिलें **धर्म**राजातें, । म्हणे, 'आज्ञा देइजे मातें । तपश्चर्ये जावया.' ॥ ११ ॥ **धर्म** म्हणे, 'अगा! अनुजा! । तुवां रक्षिला स्वधर्म माझा, । नेम चळला नाहीं तुझा । गमन न करीं [10]सर्वथा.' ॥ १२ ॥ **पार्थ** म्हणे, 'न घडे ऐसें, । असत्या न शिवें मी मानसें, । आज्ञा द्यावी मज संतोषें । तीर्थाटणा जावया. ॥ १३ ॥ नेम रक्षावया जाणा । करीन पृथ्वीची प्रदक्षिणा, । द्वादशवर्षांवरी दर्शना । शीघ्र येईन स्वामिया.' ॥ १४ ॥ जाणोनि त्याचा अ[11]लोट नेम । आज्ञा देऊनि पाठवी **धर्म**, । सवें चालिले द्विजो[12]त्तम । तपोधन ऋषिवर्य. ॥ १५ ॥ वेदपाठक शास्त्री पंडित । पौराणिक विचारनि-

---

१. 'द्रौपदीपाशीं एक पांडव क्रीडामंदिरांत असतां जो कोणी अन्य पांडव पाहील तो ब्रह्मचारी होऊन बारा वर्षें वनांत वास करील' अशी पांडवांनीं प्रतिज्ञा केल्यावर. २. घरांत. ३. अध्याय २१३ श्लोक ७-१० पहा. ४. क्रीडामंदिरांत. ५. निजला. ६. 'हे विप्रा! स्वस्थ अस, भिऊं नको' असें हातानें सूचवून. ७. अर्जुन. ८. टोळी. ९. नेलेलीं. १०. अध्याय २१३ श्लोक ३०-३३ पहा. ११. अनुल्लंघनीय, अनिवार्य, मोठा, पक्का, दृढ. १२. वेदपारग विप्र. (अध्याय २१४ श्लोक १-४ पहा.)

रत । ज्योतिर्विद[1] अतिसमर्थ । पार्थसंगें चालिले. ॥ १६ ॥ सवत्स तरुण धेनु बहुती । रजत[2] सुवर्ण रत्नजाती, । द्विजां द्यावया तीर्थोतीर्थी । सर्वे संपत्ती घेतल्या. ॥ १७ ॥ करीत तीर्थें तपोवनें । स्थळोस्थळीं स्नानें दानें, । देऊनियां निर्मळमनें । गंगाद्वारा पातले. ॥ १८ ॥ भेटले तीर्थींचे ब्राह्मण । सकळां झालें समाधान, । सारावया तीर्थविधान । गंगाजळीं निघाला. ॥१९॥ स्नान संध्या ब्रह्मयज्ञ । गंगाजीवनीं संपादून । अग्निकार्यालागीं[3] जाण । जंव बाहेर निघावें, ॥ २० ॥ तंव ऐरावतनागकुळीं[4] । कौरवनागराजबाळी । उलूपी वसे गंगाजळीं । शचीसमान[5] वैभवें. ॥ २१ ॥ तीणें धरूनि धनुर्धरा । वोढोनि नेलें निजमंदिरा;[6] । शंका[7] नाहीं पांडुकुमरा । अति निर्भय ते ठायीं. ॥२२॥ उलूपी म्हणे, 'नरेंद्रोत्तमा! । मनमोहन पुरुषोत्तमा! । अंगसंगें माझिया कामा । तृप्त केलें पाहिजे.' ॥ २३ ॥ पार्थ म्हणे, 'मी व्रतधारी । इंद्रियनेमें तीर्थें करीं, । बोलसी तें कवणेपरी । घडेल सांग सुजाणे?' ॥ २४ ॥ पन्निणी म्हणे, 'ऐक पार्था! । संकटीं रक्षूनि शरणागता, । जीवदान देऊनि मृता । वांचविल्या जय असे. ॥ २५ ॥ तुझिया अंगसंगेंवीण । तात्काळ जाईल माझा प्राण, । मज रक्षिल्या तुझें पुण्य । वृद्धी पावेल विशेषें. ॥ २६ ॥ आतां ओपिल्या संतोष । नाहीं व्रतभंगाचा दोष.' । अंगीकारूनि नर विशेष । रात्रीं तेथें वसिन्नले. ॥ २७ ॥ सुरतानंदें देऊनि तृप्ती । उलूपीसंगें क्रमूनि राती, । उदया येतांचि गभस्ती[8] । गंगाद्वारा पातला.[9] ॥ २८ ॥ पूजूनि ब्राह्मणा समस्तां । पातला हिमालयपर्वता,[10] । केदारबदरी[11] महापंथा । धर्मशीळें वंदिलें.

---

१. ज्योतिषी. २. रुपें. ३. पत्नीसांनिध्य नसतांही प्रवास करणाऱ्या गृहस्थानें औपासनहोम करावा असें आहे म्हणून अग्निकार्य करण्यासाठीं. [अ० २१४ श्लो० १३ टीका पहा.] ४. ऐरावत कुळांत झालेला जो कौरव्य नामक पन्नगवर्य त्याची कन्या. (अ० २१४ श्लो० १८.) ५. इंद्राणी. ६. नागराजाच्या मंदिराप्रत. ७. भय, आपद्धर्मांचा विचार मनांत आणून भय टाकून. ८. सूर्य. ९. अर्जुन उलूपीसह गंगाद्वारास आला. तेथें 'तुला पाण्यांत सर्वत्र जय मिळेल, व जलचर तुला सदा वश असतील' असा वर देऊन ती नागकन्यका परत गेली. [अध्याय २१४ श्लो०३४-३६.] १०. अध्याय २१५ श्लो० १-३ पहा. ११. "बदरीकेदार हा हरिद्वारापासून वर शंभर कोस आहे. तेथें एकंदर पंचबदरी असून त्यांत हा मुख्य आहे. तेथें बदरीनाथाचे पुजारी राउळ ब्राह्मण आहेत. आलीकडे येथून बारा कोसांवर शंकराचार्यांनीं ज्योतिर्मठ स्थापन केला असून तेथें ज्योतीश्वर महादेव आहे. केदारावर बर्फ फार पडतें यामुळें सहा महिन्यांनीं जेव्हां उष्णकाळामध्यें उन्हानें तें विरून जातें तेव्हां त्या देवळास जाण्याला वाट होते आणि त्यावेळीं तेथें ज-

॥ २९ ॥ पुढें टाकिला अगस्त्यवट । वसिष्ठपर्वत महाश्रेष्ठ । [1]भृंगिराज तीर्थ प्रगट । सिद्धपुरुष देखिले. ॥ ३० ॥ गोसहस्र बहुसुवर्णें । तेथें वांटिलीं पांडुनंदनें । ब्राह्मण ऋषी संतोषानें । आशीर्वाद गर्जती. ॥ ३१ ॥ करूनि हिरण्यबिंदुतीर्थ । प्राचीदिशे परतला पार्थ, । उत्पलिनी नदी जेथ । अमृतोदकीं प्रवाहे. ॥ ३२ ॥ प्रवेशोनि [2]नैमिषारण्या, । वंदिले तापसां तपोधना, । जें जें आवडे जयाच्या मना । तें तें तयां दीधलें. ॥ ३३ ॥ [3]नंदापरनंदा कौशिकी । '[4]महानदी' पवित्रोदकीं । गया करूनि शिवमस्तकीं । वसते गंगे वंदिलें. ॥ ३४ ॥ अंगवंगकलिंगदेशीं । तीर्थें करूनि पुण्यराशी । चालिला दक्षिणदिशेसीं । तंव [5]महेंद्राचळ देखिला. ॥ ३५ ॥ तो महेंद्रनामा पर्वत । ऋषींनीं वसविला पुण्यवंत । पुढां निकट नदीनाथ । [6]रत्नाकर देखिला. ॥ ३६ ॥ पश्चिमसागरींचे परिसरीं । मणिपूरनाम नगरीं । चित्रवाहन राज्य करी । न्यायनीतीनें धार्मिक. ॥ ३७ ॥ त्याची कन्या गुणलक्षणी । चित्रांगदा लावण्यखाणी, । तीणें लक्षिला [7]सिंधुजीवनीं । स्नान करितां अर्जुन. ॥ ३८ ॥ देखतां व्यापिली [8]मन्मथें, । विसरली निजदेहभावातें, । येऊनि सांगे जनकातें । उतावीळ मानसें. ॥ ३९ ॥ 'पातलासे दिव्य नरु । तेजें जैसा [9]प्रभाकरु । तो मज होय प्राणेश्वरु । ऐसें करीं दयाळा!' ॥ ४० ॥ आश्वासूनि त्या कुमरीसी । राजा पातला पार्थापासीं, । नामगोत्र परिसतां

ऊन पुजारी दरवाजा उघडतात तेव्हां यांजबरोबर यात्रेकरी जातात, व पुनः संध्याकाळीं परत येऊन ज्योतिर्मठांत राहतात. या प्रांताचें गरवाळ व कमाऊ असें नांव आहे. येथें कमिशनर असून तेथील राजा श्रीनगरचा आहे." (लोकहितवादिकृत उपयुक्त माहिती-भाग २ पृ० १२.)

१. भृगुतुंग=तुंगनाथ (अध्याय २१५ श्लोक २) नामक सुप्रसिद्ध पर्वतीं. २. नैमिषारण्य म्हणण्याचें कारण असें:—'नैमिशमिति शांतपाठांतरम् । श्रीभागवताप्रथमस्कंधे श्रीधरीटीकायां ब्रह्मणा विसृष्टस्य चक्रस्य नेमिः शीर्यते कुंठीभवति यत्र तन्नेमिशं, नेमिशमेव नैमिशम् । तथा वायवीये 'एतन्मनोमयं चक्रं मया सृष्टं विसृज्यते । यत्रास्य शीर्यते नेमिः स देशस्तपसः श्रुतः । इत्युक्त्वा सूर्यसंकाशं चक्रं दृष्ट्वा मनोमयम् । प्रणिपत्य महादेवं विससर्ज पितामहः । तेऽपि हृष्टतरा विप्राः प्रणम्य जगतां प्रभुम् । प्रययुस्तस्य चक्रस्य यत्र नेमिर्व्यशीर्यत । तद्वनं तेन विख्यातं नैमिशं मुनिपूजितम् ॥' [रघुवंश-सर्ग १९ श्लोक १ हेमाद्रिकृत टीका] नैमिश=नैमिष. ३. नंदा आणि अपरनंदा. ४. गयास्था नदी. (अ० २१५ श्लो० ७ टीका.) ५. अध्याय २१५ श्लो० १३ पहा. ६. सागर. ७. सागरजळांत. ८. चित्रांगदेला पाहून अर्जुन मोहित झाला असें वर्णन आहे. (अध्याय २१५ श्लोक १६-१७.) ९. सूर्य.

त्यासीं । परमानंद न संडे. ॥ ४१ ॥ मनोगत सांगे नरेश्वर,[1] । 'पूर्वज आमुचा प्रभंजन[2] वर । तेणें आराधिला श्रीहर[3] । संततिवृद्धीकारणें. ॥ ४२ ॥ नेमूनि बोलिला धूर्जटी,[4] । 'एकचि पुत्र ऐका पोटीं । जन्मेल हे यथार्थ गोष्टी । अन्यथा नोहे विचारितां.' ॥४३॥ माझिया पितयापर्यंत वंशीं । पुत्र झाले कुलस्त्रियेसीं, । कन्या जन्मली माझे कुशी । चित्रांगदा जाण पां. ॥ ४४ ॥ माझिये मनीं आवडी थोर । इच्या पोटीं जन्मेल कुमर । त्यासी ओपोनि राज्यभार[5] । तपश्चर्ये म्यां जावें. ॥ ४५ ॥ तरी हे अंगिकारूनि जाया । पुत्र उत्पन्न करीं, राया !' । हे परिसोनि धनंजया । पंचबाणें विंधिलें. ॥ ४६ ॥ यावरी पाणिग्रहणविधी । संपादिली लग्नसिद्धी, । आंदणरूपें त्या नवनिधी[6] । जेंवि सिंधु ओपी लक्ष्मीतें. ॥ ४७ ॥ वर्षे[7] एक क्रमूनि तेथें । रायाप्रती पुशिलें पार्थें,[8] । 'समुद्रतीरींचीं उत्तरतीर्थें । करूनि मागुती येतसे.' ॥ ४८ ॥ समुद्रतीरीं पंच कासार[9] । माजी जळचरें महाक्रूर । स्नान करितां नारी नर । ओढोनियां ग्रासिती. ॥ ४९ ॥ अगस्त्य[10] सौभद्र पौलोम । भारद्वाज कारंधम । पांचही तीर्थें पवित्र परम । परी तीं जनीं[11] वर्जिलीं. ॥ ५० ॥ भयें कोणीं न करिती स्नान । तेथें पातला कुरुनंदन, । लोकीं वारितांही आपण । तीर्थोदकीं रिघाला.[12] ॥ ५१ ॥ स्नान करूनि येतां बाहेरी । तों पायां झोंबली जळचरी,[13] । अर्जुनें उचलोनि दोंहीं करीं । बळें थडिये टाकिली. ॥ ५२ ॥ फिरोनि पाहे जंव सत्वरा । तों ते झाली दिव्य अप्सरा;[14] । म्हणे, 'पवित्रा पांडुकुमरा ! । दंडवत घे माझें. ॥५३॥

---

१. चित्रवाहन. २. प्रभंजन हा अपुत्र आणि म्हणूनच अपत्यार्थी होता. ३. अध्याय २१५ श्लोक १९-२० पहा. ४. उमापति. ५. मुलीचा मुलगा वारस असावा—त्याचें राज्य असावें असा आचार दक्षिण केरळदेशांत आढळतो, असें टीकाकार नीलकंठ चतुर्धर म्हणतो. (श्लोक २५ पहा.) ६. शंख, पद्म, मकर, कच्छप, नील इत्यादि धनाचे नऊ निधि. ७. 'वर्षत्रय क्रमूनि तेथें' असाही पाठ आहे. तीन वर्षें अर्जुन चित्रांगदेसह नगरांत होता. (श्लोक २६.) ८. चित्रांगदेला पुत्र झाल्यावर चित्रवाहनाची आज्ञा घेऊन अर्जुन यात्रेला निघाला. (श्लोक २७ पहा.) ९. सरोवरें. १०. अध्याय २१६ श्लोक ३-४ पहा. ११. धर्मबुद्धि तपस्विजनांनीं. १२. शिरला. १३. ग्राह. १४. देववेश्या. वर्गा, सौरभेयी, समीची, बुद्बुदा आणि लता अशा पांच अप्सरा मैत्रिणी होत्या. कुबेराच्या वनांत विहार करीत असतां यांनीं एका तपस्वी विप्रास पाहिलें व काममोहित होऊन पांचां जणींनीं त्याचा तपोभंग करण्याचा उद्योग चालविला; तेव्हां त्यानें क्रोधानें यांस शाप दिला कीं, 'तुम्ही शंभर वर्षें जलामध्यें नक्र होऊन राहाल.' नंतर त्या शापानें भय पावून तपोधनाला शरण गेल्या, व त्याची परोपरीनें मनधरणी केली. तेव्हां त्यास दया आली, आणि 'कोणी-

आम्हीं पांच अप्सरा नारी। कुबेराचिया अनुचरी, । तारुण्यमदें ऐश्वर्यभारीं। शक्रलोकीं विचरतां, ॥ ५४ ॥ तेथें ऋषी तपोधन। उपहासोनि केलें छळण, । ते बोलिले शापदान, । तेंही ऐक सांगेन. ॥ ५५ ॥ स्वर्गींहूनि जलचरी। मृत्युलोकीं जळकासारीं । वास्तव्य कराल समुद्रतीरीं । [1]दीर्घकाळ या दोषें. ॥ ५६ ॥ पुढें ईश्वराचा अंशू। भाग्यें येईल पुण्यपुरुषू । त्याचा होतां हस्तस्पर्शू। तैं उद्धरण तुम्हांतें. ॥ ५७ ॥ ऐसीं नारदमुनीश्वरें। वस्तीस दाविलीं पंच सरें, । अर्जुन आलिया काळांतरें । उद्धरील तुम्हांतें. ॥ ५८ ॥ तो तूं आजी पातलासी येथें। नाहीं मर्यादा पुण्यातें, । आतां जोडल्यानि हातें। प्रार्थीतसें अवधारीं. ॥ ५९ ॥ आणीक माझिया [3]सांगातिणी। [4]चौत्वारी तीर्थीं चौघीजणी। त्यांतें स्पर्शोनियां [5]पाणी। दिव्यदेही कराव्या. ॥ ६० ॥ पापदेहीं करूनि वास। मुखें भक्षिले बहु [6]तापस, । आजि होतां तुझा हस्तस्पर्श। पापकर्मा मूकलों.' ॥ ६१ ॥ तिंचीं ऐकोनि विनवणी। करें स्पर्शिल्या चौघीजणी। उद्धरोनि स्वर्गभुवनीं । वसल्या केल्या संतोषें. ॥ ६२ ॥ तदा सौरभेयी [8]वनिता। समीची आणि बुद्बुदा लता। जाल्या झाल्या स्वर्गपंथा। वंदोनियां पार्थातें. ॥ ६३ ॥ पुढती पातला मणिपुरा। तंव चित्रांगदा गरोदरा। बत्तीसलक्षणी राजकुमरा। बभ्रुवाहना प्रसवली. ॥ ६४ ॥ तोही पुत्रोत्साह देखिला। [11]रींयें कनकाचळ वांटिला। रूपें बळें आभासला। जेंवी नवा अर्जुन. ॥ ६५ ॥ 'अश्वमेधपर्वा'आंत । ज्याचें युद्ध अत्यद्भुत। रणीं मारिले समस्त। ते पुढती कृष्णें उठविले. ॥ ६६ ॥ चित्रवाहनें नृपनाथें। पुढां राज्य ओपिलें त्यातें; । असो. पुसोनि राजयातें। पार्थ पुढारीं चालिला. ॥६७॥ वंदोनि [12]गोकर्ण पवित्र। वोलंडूनि 'हरिहर' क्षेत्र। महाबळेश्वर भाळनेत्र। दाल्भ्येश्वर वंदिला. ॥ ६८ ॥ च्यवनऋषीचा आश्रम। अवलोकोनि पवित्र

एक उत्तम पुरुष शतवर्षांच्या अखेरीस येऊन तुमचा उद्धार करील,' असा त्यानें उ:शाप दिला. त्याप्रमाणें अगस्त्य, सौभद्र, पौलोम, कारंधम आणि भारद्वाज या पांच तीर्थांत वास करणाऱ्या पांच देवांगनांस अर्जुनानें ग्राहदशेंतून मुक्त केलें. (आदिपर्व–अध्याय २१५-२१६.)

१. 'शतं समा:'=शंभर वर्षें असें मूळांत आहे. [अध्याय २१६ श्लोक २३.] शतसहस्रादिक शब्द अनंतवाचकही समजतात. [अध्याय २१६ श्लोक ८ टीका पहा.] २. अध्याय २१७ श्लोक १७-१८ पहा. ३. सोबतिणी. ४. चार. ५. हात. ६. तपस्वी जन. ७. त्या वर्गा नाम अप्सरेची. ८. स्त्री. ९. मागें पृष्ठ १५८ टीप ४ पहा. १०. अध्याय २१७ श्लो० ३३-३४ पहा. ११. चित्रवाहनानें. १२. पशुपतीचें आद्यस्थान. [अ० २१७ श्लो० ३५.]

परम । स्थळोस्थळीं दान धर्म । करीत चाले ब्राह्मणा. ॥ ६९ ॥ तापती नर्मदेचे लोट । समुद्रीं झाले एकवट । ते ते क्षेत्रीं परम श्रेष्ठ । ऋषेश्वर पूजिले. ॥ ७० ॥ पश्चिमसमुद्रींचीं तीर्थें । अवघीं अवलोकोनि पार्थें, । मग पातला प्रभासातें । तेथें सोमेश वंदिला. ॥ ७१ ॥ तीर्थें करीत पातला पार्थ । हें परिसोनि श्रीकृष्णनाथ । रथारूढ दारुकासहीत । भेटीलागीं पातला. ॥ ७२ ॥ क्षेमालिंगनीं अद्वयानंद । तो केंवि बोलों शके शब्द ? । नरनारायणां भेद । विचारितां असेना. ॥ ७३ ॥ तीर्थयात्रेचें कारण । अर्जुनें सांगतां, जनार्दन । 'पाहिजे ऐसेंच' म्हणोन । 'भला भला' म्हणे त्या. ॥ ७४ ॥ प्रभासक्षेत्रीं क्रमूनि रात्री । उदया पावलिया गभस्ती । पांडुकुमर परमप्रीती । द्वा-

---

१. अध्याय २१८ श्लो० २ पहा. २. द्वारकेजवळच्या एका तीर्थातें. ३. सूर्य. ४. "द्वारका ह्या चार आहेत; एक गोमती द्वारका, ही स्मार्तांची व बेट द्वारका ही वैष्णवांची आहे. शिवाय, कोडीनार ही मूळची द्वारका होय असें म्हणतात; आणि डाकोरासही द्वारकेची मूर्ति आहे असें म्हणतात; एकूण चार द्वारका झाल्या. गोमती द्वारकेस शंकराचार्यांचा शारदामठ आहे. तेथें एक डोकीयेवढें उंच असें श्रीयंत्र स्थापन केलें आहे. येथील देऊळ विश्वकर्म्यानें बांधिलें असें म्हणतात. येथें जी गाइकवाडांची गादी आहे तीस 'उग्रसेनाची गादी' म्हणतात. मुसलमानी धांदलींत बोडाणा रजपूत यानें या देवळांतील मूर्ति उचलून डाकोरास आणिली ती परत गेली नाहीं. पुढें स्थिरस्थावर झाल्यावर शंकराचार्यांनीं द्वारकेचे देवळांत नवीन मूर्ति बसविली. तेथेंच शंकराचार्यांची गादी आहे. हें पाहून वल्लभाचार्यांचे पुत्र विठ्ठलनाथजी यांनींही असें सांगितलें कीं, 'मला स्वप्नांत विहिरींत श्रीकृष्णमूर्ति आहे ती स्थापावी असा दृष्टांत झाला.' असें सांगितल्यावर त्याप्रमाणें ती मूर्ति सांपडली. तेव्हां तिची स्थापना गोमती द्वारकेपासून दहा कोसांवर दर्यांत जें द्वारका बेट आहे तेथें केली. ह्या बेटद्वारकेंतील हें मंदीर मर्यादी, म्हणजे वल्लभाचार्यांचे रीतीप्रमाणें पांच वेळ पूजा व पांच वेळ दर्शन मात्र व्हावयाचें असून इतर वेळेस देऊळ बंद असतें आणि ह्याच रीतीप्रमाणें जें देऊळ असेल त्यास मर्यादी असें म्हणतात; व जेथें सर्व वेळ दर्शन होतें त्यास स्मार्त रीतीचें मंदिर म्हणतात. तेथें शंखोद्धार वगैरे अनेक तीर्थें असून अष्टनायकांचीं वगैरे देवळेंही पुष्कळ आहेत. येथें भाट्ये वाणी, लवाणे वगैरे वैष्णव फार येतात. येथें गोसांवीमहाराजांचे शिष्याचा अधिकार विशेष आहे. वैष्णवांचे छप्पन्न भोग वगैरे करणें तर येथेंच करितात. येथें देवाचे पैशाचीं दुकानें असून तेथें पैसाही फार आहे. या द्वारकेस जातांना दर्याचे कांठीं आरमडे म्हणून एक गांव असून तेथें तप्तमुद्रा देतात. त्याचे जवळच गोपीतलाव म्हणून एक गांव असून तेथें चार कोस भूमि सर्व गोपीचंदनाची आहे व त्यामध्यें एक तलावही आहे. येथें मुद्रा देण्याचा सांप्रदाय पीपाभगत म्हणून होता त्यानें काढिला असें म्हणतात. येथें मिराबाईचें मंदीर आहे. गोमतीद्वारकेस गाइकवाडी मामलेदार राहतात व तो गांव मोठा आहे. गोमती द्वारकेची गोमती नदी ही खारे पाण्याची असून हें गांव बंदरही आहे. ज्या प्रांतांत ही द्वारका आहे त्यास उखामं-

डळ असें नांव आहे. हा प्रांत वाईट व खडकाळ असून त्यांत वाघीर लोकांची वस्ती आहे, वाघीर हे क्षत्रियवंशज असून त्यांस काबेही म्हणतात. त्यांनींच कृष्णाचें राज्य घेतलें. पुढें ते १८०२ सालीं दर्यांत जहाजें घालून चोऱ्या वगैरे करूं लागले, याजमुळें इंग्रज व गायकवाड हे एकत्र होऊन त्यांनीं त्यांचा प्रांत घेतला व त्यांस पेन्शनें दिलीं. पुढें अलीकडे १८५६ सालीं ह्या वाघीरांनीं पुनः दंगा केला व त्यांनीं आपल्या प्रांतांतून गाइकवाडी मामलेदार पळवून लाविला. तेव्हां गायकवाडांनीं इंग्रज सरकारची मदत घेऊन बार्टन साहेब याचे साह्यानें तो दंगा मोडून वाघीरांचें गांव उजाड करून टाकिलें. त्यांनीं दहा वर्षें हा दंगा केला होता व त्यांत दोन्ही द्वारकेचें सर्व धन लुटीस गेलें होतें परंतु देऊळ मात्र कायम राहिलें. हें देऊळ फार सुंदर व उंच असून तें पांच कोसांवरून दिसतें. द्वारकेस जाणें तें कोणी दर्यांतून जातात, कोणी राजकोटावरून जातात व कोणी पंचतीर्थी करीत दर्याचे कांठानें जातात. पंचतीर्थांत पहिलें तीर्थ तुळशीश्याम. हें गीर पर्वतांत असून तेथें गोड्या पाण्याचीं उष्णकुंडें आहेत; दुसरें तीर्थ सोरटीसोमनाथ; तिसरें पोरबंदर उर्फ सुदामपुरी; चौथें माधवपूर, येथें मधुवनांत श्रीकृष्णाचा व रुक्मिणीचा जो विवाह झाला आहे त्याचें बहुलें आहे आणि पांचवें द्वारका क्षेत्र. या वाटेनें गिरनार म्हणून एक पर्वतशिखर आहे. गीर हा पर्वत चाळीस कोस लांब असून त्याचें एक शिखर उंच आहे त्यास गिरनार म्हणतात. त्याजवर श्रावक लोकांचीं देवळें आहेत व अंबाजी, दत्तात्रय वगैरे कांहीं हिंदूंचींही देवळें आहेत. या पर्वताचे खालींच अशोक राजाचा सुमारें २३०० वर्षांचा दगडावर कोरलेला जुना लेख आहे. त्या नजीकच भूतनाथमहादेव, दामोदरकुंड व गोसांवीमहाराजांची बैठक आहे. गिरनाराखालीं जुनागड म्हणून एक शहर असून तेथील राजा नबाब आहे. तो पूर्वी यादववंशीय हिंदु होता असें म्हणतात; परंतु अहमदाबादेस मुसलमानी राज्य झालें त्या वेळेस तो मुसलमान झाला. या प्रांतांत ज्या भागांत जुनागड आहे त्यास काठेवाड म्हणतात. हा प्रांत फार उत्तम असून त्यांत नद्या व डोंगर बहुत आहेत. तिकडे कापूस फार पिकत असल्यामुळें तेथील राजाचें उत्पन्न पूर्वीपेक्षां सहापट अधिक झालें आहे. गाइकवाडी अमलांत या प्रांतांत फार खराबी होती. त्या प्रांतांतील सर्व राजे गाइकवाडास खंडणी देत असून जुनागडचे राजासही पेषकष देतात. या प्रांतांत पोरबंदर, जोडीया, वेरावळ, घोगो, भावनगर वगैरे शेंकडों बंदरें आहेत. हल्लीं हा प्रांत सुखी आहे असें म्हणतात. यांत इंग्रजांचा एकही गांव नाहीं. परंतु राजकोटास पोलिटिकल एजंट याचें ठाणें आहे. पूर्वी यादवांचे वेळेस हा प्रांत एक बेट होतें. त्यांतच यादवांनीं वस्ती करून कृष्ण भगवान् यांनीं राज्य केलें. परंतु आतां समुद्र हटून गेला याजमुळें गुजराथेस हा प्रांत लागला आहे. तरी तेथें नळकंटा म्हणून समुद्राची जागा आहे त्या प्रांतासच लागून कच्छ देश आहे. तेथील वाणी, मेमण, वगैरे आफ्रिकाखंडांत, अरबस्तानांत व झांजिबार प्रांतीं वगैरे अनेक ठिकाणीं व्यापारास जातात. काठेवाडांत पालीटाणें म्हणून श्रावक लोकांचें एक मोठें देवस्थान भावनगराजवळ आहे. या देशांत स्मार्त, वैष्णव, बीजमार्गी, श्रावक, स्वामीनारायण, वल्लभाचार्य वगैरे धर्म चालतात. पूर्वी या प्रांतीं गायकवाडाची मोठी फौज असून त्यांच्या छावण्या माणिकवाडा, अमरोळी, द्वारका, या ठिकाणीं होत्या व अद्यापिही तेथें थोडे बहुत लोक आहेत. या प्रांतास सौराष्ट्र असें नांव आहे; परंतु त्यास काठेवाड म्हणावयाचें कारण हें कीं, यांत काठी लोक राहतात." (लोकहितवादीकृत उपयुक्त माहिती–भाग २ पृ० ८.)

रावतिये आणिला. ॥ ७५ ॥ यादव पातले सामोरें । वाजतो भेरी मंगळ तुरें । माडिया गोपुरीं नारी नरें । पाहों ठेले आवडी. ॥ ७६ ॥ सकळपुरांचा शृंगार । द्वारावती वैकुंठपुर । तेही शृंगारी श्रीधर । पार्थ आला म्हणोनी. ॥७७॥ पाहोनि सुधर्म सभास्थान । नमिले वसुदेव उग्रसेन । सात्यकी सांब संकर्षण । प्रद्युम्नादी भेटले. ॥ ७८ ॥ भोजनपानादि उपचार प्रीती । श्रीकृष्ण करी एकपंक्ती । ऐसा काळ सुखसंगती । कांहींएक लोटला. ॥ ७९ ॥ तंव एके दिवसीं यादववीर । एक एक ल्हान थोर । रैवतपर्वता समग्र । वनभोजना चालिले. ॥ ८० ॥ सवें घेतलीं दाराकुमरें । पाळाणिलीं रथकुंजरें, । आनंदवाद्यांचेनि गजरें । समारंभें चालिले. ॥ ८१ ॥ वसुदेवाचिया पत्नी । उग्रसेनाच्या मानिनी । कामपाळाच्या कामिनी । भिन्नयानीं शोभल्या. ॥८२॥ सोळासहस्र कृष्णपत्नी । पट्टमहिषी आठजणी । दासीवेष्टित सुखासनीं । शृंगारूनि चालिल्या. ॥ ८३ ॥ एकलक्ष साठीसहस्र । कुंजरयानी कृष्णकुमर । अर्जुनासीं शार्ङ्गधर । एकेरथीं मिरवले. ॥ ८४ ॥ छपन्नकोटी यादववीर । पृथक् संपत्तीचे सागर । रूपगुणीं उदार शूर । कृष्णापाठीं निघाले. ॥ ८५ ॥

---

१. अध्याय २१८ श्लोक १५-२१ पहा. २. वाद्यें. ३. भूषण, अलंकार. ४. देवसभास्थान. (सुधर्मा=देवसभा.) ५. येथें 'अर्जुनवनवासपर्व' संपतें आणि 'सुभद्राहरणपर्वा'स आरंभ होतो. ६. भोज, वृष्णि, अंधक इत्यादि वीर. ७. द्वारकासमीपवर्ती पर्वत. ८. रैवतपर्वतदैवयोत्सव होता म्हणून सर्व गेले होते. ९. खोगीर घातले. [पाळाणणें=खोगीर घालणें, पल्याण=खोगीर.] १०. हत्ती. ११. वसुदेवाला वीस स्त्रिया होत्या. [भागवत–स्कंध १० अध्याय ८४.] १२. उग्रसेन=हा वृष्णींचा प्रतापवान् राजा. याच्याबरोबर हजार स्त्रिया होत्या. (अध्याय २१९ श्लोक ८.) १३. मानवती स्त्रिया. १४. बळरामाच्या. ['रेवतीरमणो रामः कामपालो हलायुधः' इत्यमरः.] १५. स्त्रिया. १६. ही सोळासहस्र कृष्णभार्यांची कथा अशी आहे:—प्राग्ज्योतिषपुरीचा राजा नरकासुर. हा भूमीचा पुत्र म्हणून याला भौम (भौमासुर) असें म्हणतात. यानें इंद्राची संपत्ति आणि अदितीचीं कुंडलें हरण केल्यावरुन कृष्णानें याच्यावर स्वारी केली. याचा मुरु नामक दैत्य स्नेही होता त्यास कृष्णानें मारलें. या दैत्याचे पांच पुत्र कृष्णावर चालून आले, त्यांचाही कृष्णानें पराभव केला. नंतर नरकासुर स्वतः कृष्णापाशीं युद्ध करण्यास आला, तोही कृष्णहस्तें मरण पावला. याचा पुत्र भगदत्त कृष्णास शरण आला, तेव्हां कृष्णानें त्यास प्राग्ज्योतिषपुरीचा राजा केलें, आणि नरकासुरानें ज्या सोळा हजार राजकन्या बंदींत आणून ठेविल्या होत्या त्यांना मुक्त केलें. त्यांनीं कृष्णास मनेंकरून वरिल्यामुळें, कृष्णानें त्यांस द्वारकेस आणून त्यांच्यांशीं विवाह केला. अदितीचीं कुंडलें व इंद्राची संपत्ति कृष्णानें त्यांस परत देऊन संतुष्ट केलें. १७. पट्टमहिषी=पट्टराज्ञी, पट्टदेवी, मुख्य राणी. १८. 'रुक्मिणी जांबवती भामा सत्या भद्रा च लक्ष्मणा । कालिंदी मित्रविंदा चेत्यष्टौ पट्टमहास्त्रियः ॥' हीं या आठ स्त्रियांचीं नांवें.

गगनीं तारकांचिया श्रेणी । तैशा **याद**वांच्या कामिनी, । त्यांमाजी सौंदर्याची खाणी । सुलक्षणी **सुभद्रा**. ॥ ८६ ॥ ते **वसुदेवा**ची नंदिनी । श्री**कृ**ष्णाची कनिष्ठभगिनी । तीचें लावण्य नरवाणी । कैंवि वर्णवे सांग पां? ॥ ८७ ॥ सौंदर्याची राशी अमुप । सरस्वतीचें वदनमाप । [1]थिटें म्हणोनि सांडी आपेंआप । सत्यलोका परौतें. ॥ ८८ ॥ शृंगारूनि वस्त्राभरणीं । सुवर्णशिबिके [2]मृगलोचनी । जातां झळके [3]सौदामिनी । तेंवि **पार्थें** देखिली. ॥ ८९ ॥ वदन लक्षितांचि नयनीं । प्रतिमा जडली हृदयभवनीं । वर्मीं भेदलें [6]पंचबाणीं । **कुसुमशरें** ताडिला. ॥ ९० ॥ सर्पदर्शनीं [4]अज स्तब्ध । तैसा देहभावीं मद । त्यातें देखोनियां **गो**विंद । उपहासीत विनोदें. ॥ ९१ ॥ '[5]वैरिवरी तापसाचा वेष । तीर्थयात्रेचा हव्यास । हृदयीं [6]कामाचा निवास । हा परमार्थ [7]नेटका.' ॥ ९२ ॥ **अर्जुन** म्हणे, 'गा! हृदयस्था! । जेणें परिहारे हृदयव्यथा । मनोवृत्ती होती स्वस्था । तो उपाय मज सांगें.' ॥ ९३ ॥ वर्म सांगे [9]भक्तपती । '[8]रैवतपर्वताहूनि जैं फिरती, । **सुभद्रा** वाहोनियां रथीं । हरण तुवां करावें. ॥ ९४ ॥ मार्गां पडेल जो प्रसंग । तो मी संपादीन **श्री**रंग । **याद**वीं करितां पाठिलाग, । मी [10]वारीन तयांतें.' ॥ ९५ ॥ **अर्जुन** म्हणे, 'गा! **श्री**पती! । तुझी कृपा वर भगवती । प्रसन्न असतां **याद**व किती । मजसमोर रहावया?' ॥ ९६ ॥ अर्जुना बोधोनियां युक्ती । पुढां रैवतपर्वताप्रती । मिळोनि **याद**वांच्या पंक्ती । महोत्सव मांडिला. ॥ ९७ ॥ करिती दिव्यान्नभोजनें । विचित्र [11]पिशितें [12]आसवपानें । सुगंध सुमनें [13]हरिचंदनें । परिमळद्रव्यें चर्चिती. ॥ ९८ ॥ नृत्यांगना नृत्य करिती, । रागोद्वारें गायन करिती, । ताल मृदंग उपांगश्रुती । वीणे वाजती सुस्वरें. ॥ ९९ ॥ पायसान्नें [14]पंचभक्षीं । ब्राह्मणीं भक्षिलीं लक्षानुलक्षीं । तृप्ती पावोनि वृक्षोवृक्षीं । सुखशयनीं लोळती. ॥ १०० ॥ कांहीं दिवस क्रमूनि तेथ । **द्वा**रके चालिले समस्त, । संधी लक्षूनियां तेथ । वेग केला **अर्जुनें**. ॥ १०१ ॥ करूनियां पर्वताची पूजा, । **द्वा**रके येतां [15]अच्युतानुजा, । **अर्जुनें** धांवूनि सुतेजा । हस्तकमळीं स्पर्शिली. ॥ १०२ ॥ तारुण्यभरें कामपिसें । पहिलाचि भाव **अर्जुनीं**

---

१. अपुरतें, लहान. २. एणाक्षी, सारंगनयना. ३. वीज. ४. बकरा. ५. अध्याय २१९ श्लोक १५-१७ पहा. ६. मदनाचा. ७. हें व्याजोक्तिपर वचन आहे. ८. अध्याय २१९ श्लोक. १८-२० पहा. ९. कृष्ण. १०. निवारण करीन. (श्लोक २१-२३) ११. मांसें. १२. मद्यपानें. १३. हरीचें (इंद्राचें) चंदन; हरि (कपिलवर्ण) चंदन. ['हरिचंदनमस्त्री स्यात्रिदशानां महीरुहे । नपुंसकं तु गोशीर्षे ज्योत्स्नाकुंकुमयोरपि ॥' इति मेदिनी.] १४. पांच पक्वान्नें. १५. सुभद्रा.

असे, । हातीं धरितांचि संतोषें । रहंवरीं बैळंघली. ॥ १०३ ॥ वाहूनियां कनकरथीं । सुभद्रा नेली हातोहातीं । सखिया येऊनि सांगती । उग्रसेनादिकांसी. ॥ १०४ ॥ सेवक म्हणती वासुदेवातें, । 'सुभद्रा हरूनि नेली पार्थें । वेगीं निघा धावणियातें, । दुरी गेल्या नाटोपे.' ॥ १०५ ॥ पुढें आलिया यादववीरीं । मागिलेकडे राहिल्या नारी, । मध्यें एकली सुंदरी । हिरूनि नेली पांडवें. ॥ १०६ ॥ सुधर्मसभे यादववीर । बैसले होते थोरथोर, । सारण सात्यकी अक्रूर । रुक्मिणीकुमर सांबादी. ॥ १०७ ॥ गद बभ्रु निशठ । पृथुवीर सत्यक श्रेष्ठ । भंगकार महाख बळिष्ठ । चारुदेष्ण कृतवर्मा. ॥ १०८ ॥ भोज वृष्ण्यंधक बैळियाढे । भ्रुजों सरसावले गाढे,। म्हणती, 'पार्थ जातसे पुढें । पाठिलागीं धांवा कां?' ॥ १०९ ॥ त्रैाहाटिल्या निशाणभेरी, । सिंहनादें गर्जती भारी, । भयानक रणमोहरी । वीरीं शंख वाहिले. ॥ ११० ॥ कोपें खवळला ॅसंकर्षण । म्हणे, 'पालाणा रे! सकळसैन्य, । आजि कुंतीचा नंदन । स्वस्त पावेल मजहातीं. ॥ १११ ॥ धरूनि तापसाचा वेष । मौन्यें केला गृहप्रवेश, । भोळा नेणें हृषीकेश । दुष्टबुद्धी खळाची. ॥ ११२ ॥ दंभाचारी कृत्रिम साधु । मंद दुरात्मा कामलुब्धु । कृष्णकुळातें कुशब्दु । अपकीर्तीचा लाविला. ॥ ११३ ॥ भोजन करूनि पात्र फोडी । तैसी केली येणें परवडी । यादवां लाज लाऊनि गाढी । कन्या नेली नेणतां. ॥ ११४ ॥ पृथ्वी करीन पांडवरहित । पालथें घालीन इंद्रप्रस्थ'. । लांगल उचलोनि कृतांत । मुसळ हातीं पडताळी. ॥ ११५ ॥ पुढती बोले कामपाळ, । 'मौन्यें असे कां हा गोपाळ? । याचा गुप्त प्रगट खेळ । ब्रह्मादिकां नेणवे. ॥ ११६ ॥ अहो! याचेनि संकेतें । कन्याहरण केलें पार्थें, । कारण नकळतां आमुतें, । विचार कांहीं सुचेना. ॥ ११७ ॥ बुद्धी कवण ती करावी?। कन्या आणावी कीं नाणावी?। जें मानेल तुमच्या जीवीं । तेंचि मान्य आमुतें.' ॥ ११८ ॥ श्रीकृष्ण म्हणे, 'ऐका वचन । विचारवनीं परिभ्रमे मन । एक निश्चय नकळे म्हणोन । धरूनि मौन राहिलों. ॥ ११९ ॥ कन्याहरण क्षत्रियातें । विहित बोलिलें

---

१. रथावर. २. चढली. ३. अध्याय २२० श्लोक ६-९ पहा. ४. बलवान्. ५. त्राहाटणें=वाजविणें, ठोकणें. ६. बळराम (अ० २२० श्लो० २५-३१) ७. मरण. ८. हाच दाखला मुळांत आहे. [अ० २२० श्लो० २७.] ९. नांगर. (हें बळरामाचें आयुध होय.) १०. यम. ११. बलराम. १२. येथें सुभद्राहरणपर्व समाप्त झालें. आतां हरणाहरपर्वास आरंभ होतो. १३. अध्याय २२१ श्लोक २-१२ पहा.

[1]बळिरायातें । येणें विचारें [2]धनंजयातें । दोष कांहीं असेना ॥ १२० ॥ अर्जुना जिंकून राजकुमरी । आणी ऐसा बळिष्ठ [3]क्षेत्री । मातें नदिसे पृथ्वीवरी । तेंही एक अशक्य. ॥ १२१ ॥ हो कां पराभवूनि कुमरी । आणिलिया लावण्यलहरी, । पुढें ओपावी कवणाकरीं । जो याहूनि [4]आगळा? ॥ १२२ ॥ यासीं तुळे एका अंशीं । ऐसा जन्मला नसे राजवंशीं । रूप विद्या गुणैकराशी । धीर धीर उदार. ॥ १२३ ॥ रूपें जैसा मदन काम । वीरविद्ये भार्गवराम, । उदारता मनोधर्म । दाशरथीसारिखा. ॥ १२४ ॥ गंभीरपणें क्षीरसमुद्र । शांत जैसा पूर्णचंद्र । कोपें खवळल्या [5]वीरभद्र । भासे शत्रुकुळातें. ॥ १२५ ॥ तेजें जैसा प्रतापार्क । विवेकें पाहतां विदेहजनक । ऐसा सांडोनियां सूर्क । कोणता वर आणावा? ॥ १२६ ॥ कौरववंशीं विजयध्वज । पांडुनृपाचा आत्मज । कुंतिभोजतनयात्मज । सुहृद जवळी आम्हुतें. ॥ १२७ ॥ कवणे अंगीं उणा पार्थ? । कन्या तंव पराची [6]वस्त । यावरि दृष्टी पडेल जो अर्थ । तोचि तुम्हीं [7]अनुष्ठा. ॥ १२८ ॥ उपेक्षोनी राजहंसा । मुक्ता [8]ओगरिजे [9]वायसा, । तुमचा विवेक होईल तैसा । [10]कन्या अन्यास अर्पितां. ॥ १२९ ॥ झालें हेंचि मानूनि [11]तिकें, । अर्जुन परतवा द्वारके; । पाणिग्रहण करवूनि कौतुकें । लग्नविधी [12]संपादा.' ॥ १३० ॥ परिसोनि श्रीकृष्णाची उक्ती । बळदेव [13]मंदावला चित्तीं, । शस्त्रें ठेऊनियां खालतीं । म्हणे, 'होणार होतसे.' ॥ १३१ ॥ धाडोनियां मंत्री पुरोहित । मानें परतविला पार्थ, । आणि पाणिग्रहण विधियुक्त । सुभद्रा विवाहीं अर्पिली. ॥ १३२ ॥ चारी दिवस सुखसोहळा । समारंभ जना सकळां, । [14]हेमाभरणें रत्नमाळा । वधूवरां अर्पिल्या. ॥ १३३ ॥ पार्थ जोडला जामात । वसुदेवातें आल्हाद बहुत, । देवकी [15]निंबलोण करित । क्षणक्षणा आवडी. ॥ १३४ ॥ वर्ष एक हरिसंगतीं । द्वारकापुरीं करूनि

१. अत्यंत बलवान् पुरुषाला. २. अर्जुनातें. ३. क्षत्रिय. ४. श्रेष्ठ, अधिक. ५. दक्षप्रजापतीच्या यज्ञाचा विध्वंस करणारा शिवपार्षद. (भागवत–स्कंद ४ अ० ५). ६.'अर्थो हि कन्या परकीय एव' असाच भावार्थ समजावयाचा. ७. करा. ८. ओगरणें=वाढणें. ९. कावळ्याला. १०. 'कन्या माघारी आणतां' असा अन्य पाठ. ११. ठीक, योग्य. १२. मोरोपंत–आदिपर्व–अ० ३७ गी० ६०-६८ पहा. १३. शांत झाला, खिन्न झाला, निरुत्साह झाला. १४. सोन्याचे अलंकार. १५. 'दृष्टीचा अगर भूतबाधेचा विकार न व्हावा म्हणून मीठ, मोहऱ्या व कडू निंबाचीं पानें हीं ओवाळून टाकणें, ह्या कृत्याला "निंबलोण करणें" म्हणतात.' [नवनीत.]

वस्ती । उरला वनवास पुष्करतीर्थीं । ऋषीसंगतीं लोटला. ॥ १३५ ॥ सर्वें घेऊनि वसुदेवसुता । पार्थ पातला शक्रप्रस्था, । नमस्कारूनि ज्येष्ठ भ्राता । आलिंगन दीधलें. ॥ १३६ ॥ सुभद्रेनें करितां नमन । कुंती धर्मा आल्हाद पूर्ण, । कृष्णभगिनी जोडली सून । पार नाहीं भाग्यातें. ॥ १३७ ॥ ज्येष्ठें-प्रियेचें समाधान । करावया पातला अर्जुन, । येरी प्रेमें दाटली पूर्ण । मिष दावी रुसण्याचें. ॥ १३८ ॥ पाचारितां याज्ञसेनी । क्रोधें बोले अतिवचनी, । 'जेथें यदुराजनंदिनी । तेथेंचि आतां वसावें. ॥ १३९ ॥ द्वितीयबंध कषितां हातें । शिथिलता येई पूर्वबंधातें; । नूतन घृत जीर्णघृतातें । फिकें करूनि दावित'. ॥ १४० ॥ पार्थें देऊनि आलिंगन । सुशब्दें केलें शांतवन, । सुभद्रेनें केलें नमन, । म्हणे, 'मी दासी सेवेची'. ॥ १४१ ॥ ऐकोनि यादवीची गोष्टी । द्रौपदीनें धरिली पोटीं, । 'कृष्णानुजा ते धाकुटी । भगिनी माझी तूं माये'. ॥ १४२ ॥ यापरी आनंद झाला सकळां । धर्मा भीमा सहदेवनकुळा, । नगरवासियां सुखसोहळा । धर्माश्रयें नवनवा. ॥ १४३ ॥ सुवर्णसदनीं राजबाळा । ठेविली सुभद्रा वेल्हाळा, । भोगसंपत्तीचा सोहळा । दृष्टीपुढें खेळत. ॥ १४४ ॥ यादवीचे अंगसंगें । सर्व सुखांसी म्हणे 'उगें'. । घटिकेसमान मानी युगें । सुखानंदें विलासीं. ॥ १४५ ॥ लीलाविश्वंभर दिनमणी । स्पर्श करितां कृपाकिरणीं । चित्तसूर्यकांतपाषाणीं । उन्मेषानळ अवतरे. ॥ १४६ ॥ तो दावाग्नीदोषदांगीं । दीपिकारूपें कथामार्गीं । म्हणोनि मुक्तेश्वर सुसंगीं । श्रोतयांच्या चालत. ॥ १४७ ॥

---

१. पुष्करराज–हें अजमीरपासून तीन कोस आहे. तेथील ब्राह्मणांस पुष्कर ब्राह्मण किंवा पोखर्णे म्हणतात. शिवाय तेथें छनात नांवाचे ब्राह्मणही आहेत. छनात म्हणजे सवाई जयसिंगानें एकत्र केलेल्या सहा ज्ञाती, त्या:—१ खंडेलवाळ, २ गौड, ३ सारस्वत, ४ दायमा, ५ पारीख व ६ पुष्करणे. यांची एक पंगत करून त्यांनीं क्षत्रियांचें अन्न घ्यावें असें ठरविलें. पुष्कर हें सरोवर डोंगरांत असून त्यांत पाणी फार खोल व उत्तम आहे. या क्षेत्रीं देवळें फार आहेत. त्या नजीकच ज्येष्ठ, कनिष्ठ व मध्यम असे तीन पुष्कर आहेत. [ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती–भाग दुसरा–पृ० ४.] २. सुभद्रा. हिला वल्लवीवेष देऊन नेलें होतें. ३. द्वादश वर्षें पूर्ण झाल्यावर. (अ० २२१ श्लो० १५.) ४. द्रौपदीचें. ५. सात्वतात्मजा सुभद्रा. ६. मोरोपंत–आदिपर्व–अ० ३७ गी० ७१-७३ पहा. तसेंच महाभारत–आदिपर्व–अ० २२१ श्लो० १७ पहा. ७. हा दाखला मूळांत नाहीं. ८. प्रेष्या. (अ० २२१ श्लो० २३.) ९. सुभद्रेची. १०. दोषरूप झाडींत. ११. या अध्यायाला 'सुभद्राहरण' असें नांव एका जुनाट पोथींत आहे. या अध्यायांत मूळांतील २१३-२२२ ह्या अध्यायांचा

अध्याय अठ्ठेचाळिसावा.

वार्तिक[1] जाणविती गोष्टी । धर्मराजनृपाचे भेटी । घेऊनि यादवांच्या कोटी । राम कृष्ण पातले. ॥ १ ॥ द्वारकेहूनि दळ अचाट[3] । पातलें इंद्रप्रस्थानिकट, । कुंजरभेरींचा बोभाट । जाणवीत धर्मातें. ॥ २ ॥ सन्मुख धाडोनि माद्रीकुमर, । रायें शृंगारिलें नगर, । मखरें तोरणें अपार । गुढिया नगरीं उभविल्या. ॥ ३ ॥ मंडप घातले अपार । अवघे तैंगटीं झगझगीत थोर,। दीधलीं वितानें विस्तार । अतिसुंदर साजिरे. ॥ ४ ॥ श्रीगंध कस्तूरी केशर । शिंपोनि मार्ग केले सुंदर, । स्थळोस्थळीं कृष्णागर । परिमळधूपें धूपिले. ॥ ५ ॥ सुमनतैलाची सारणी । गंधरसाची खाणी । रक्तचंदनाचिये चूर्णीं । मार्गगर्भीं धुळोरा. ॥ ६ ॥ स्थळोस्थळीं मुक्ताझलरी । नानारंगीं रंगकुसरी, । चित्रीं चितारिलीं परोपरी । सुशोभीत मंदिरें. ॥ ७ ॥ अवघीं घरें शृंगारिलीं,। पट पाटावें बांधिलीं, । ध्वज पताका गगनमंडळीं । चित्रविचित्र शोभती.॥८॥ आसनें तिंवाशें परोपरी । निर्मळ रंग रंगाकारीं, । ऐशिया विचित्रचित्रीं । शोभायमान शोभती. ॥ ९ ॥ ऐसें नगर शृंगारिलें । इंद्रभुवनातुल्य शोभलें, । दृष्टी देखतां मन भुले । देहभाव विसरोनी. ॥ १० ॥ उपायनें[8] घेऊनि भेटी । पातल्या पौरांच्या कोटी, । अक्षवाणें[9] कनकताटीं । बोवाळिती जनवधू. ॥ ११ ॥ यादव पातले राजद्वारा, । परम आल्हाद कुंतीकुमरा, । वेगीं धांवोनि सामोरा । ज्येष्ठ कनिष्ठा सन्मानी. ॥ १२ ॥ रेवतीरमण रुक्मिणीनाहो[10] । सुहृद मंत्री आत्म्यसमूहो । सेनापती महाबाहो । अक्रूरनामा भेटला. ॥ १३ ॥ एकीं केलें साष्टांग नमन, । एकीं दिधलें आलिंगन, । एकीं मस्तक अवघ्राण[11] । आशीर्वचन पैं एकीं. ॥ १४ ॥ उद्धव देव गुरु शिष्य । यादवकुळीं कुळावतंस,[12] । ज्याप्रती ज्ञानाचें रहस्य । हृषीकेश[13] बोलिला. ॥ १५ ॥ सत्यक सात्यकी प्रद्युम्न । मित्र हार्दिक्य शुक सारण । गदसांबादी मुख्य करून । प-

---

समावेश झाला असून चोरहृतविप्रगोधनानयन, अर्जुनवनवासगमन, उलूपीजिष्णुसमागम, मणिपुरगमन, चित्रांगदासमागम, बभ्रुवाहनोत्पत्ति, ग्राहद्वारा अर्जुनाचें ग्रहण आणि मोचन, पंचाप्सरस्तीर्थी पंचाप्सरांची शापमुक्ति, अर्जुनकृत सुभद्राहरण आणि अर्जुनसुभद्रा यांचें इंद्रप्रस्थास आगमन असे विषय आहेत.

१. बातमीदार. २. अध्याय २२१ श्लोक २७-२८ पहा. ३. मोठें. ४. पत्र्यानें. ५. छतें. ६. कृष्णागर=उत्तम चंदन. (अध्याय २२१ श्लोक ३५-३७). ७. लोंडें. ८. भेटी, नजराणे. ९. आयुष्यवाणें. १०. कृष्ण. ११. हुंगणें. १२. कुलभूषण. १३. कृष्ण.

रमप्रीती भेटले. ॥ १६ ॥ सभेसि आणिले सन्मानें । ओपिलीं विचित्रकनकासनें, । मृदु मवाळ बोटिंगणें[1] । पिकपात्रें[2] झळकती. ॥ १७ ॥ गंधपरिमळतांबूलसुमनीं । अनर्घ्यवस्त्रीं दिव्याभरणीं । सोयरे गौरविले सन्मानीं । धर्मराजें सुजाणें. ॥ १८ ॥ आदरें बोले रेवतीपती, । 'सुभद्रा निरवावी वडिलांहातीं । यालागीं पातलों तुम्हांप्रती । दुणावणें सोयरीक'. ॥ १९ ॥ धर्म म्हणे विनीतवचनें, । 'आम्ही पांडव तुमचीं दीनें, । हातीं धरोनि श्रीकृष्णें । वागविजे आमुतें.' ॥ २० ॥ अपार अळंकार[3] कन्या धन । धर्मासि ओपी संकर्षण । चारी चारी श्यामकर्ण । साळंकार एकैका. ॥ २१ ॥ ऐशिया रथांचीं सहस्रें। सारथी कुशळ योजिले धुरे, । हेमदंडीं पताका चिरें[4] । विद्युत्प्राय झळकती. ॥ २२ ॥ सुदोहा[5] धेनु अयुत एक । देशांतरींच्या अमोलिक, । एकवीससहस्र आणिक । सहस्रएक दवळिया[6]. ॥ २३ ॥ चंद्रकिरणीं रंगलिया । सुवर्णशृंगी साजरिया । उपमे नंदिनीसारखिया । धर्मराजा दीधल्या. ॥ २४ ॥ पर्वताकार मेघवर्णी । मदोन्मत्त रत्नाभरणीं । संगीं शावकयुक्त श्रेणी । कुंजरांच्या सहस्र ॥ २५ ॥ सिंहलद्वीपींचे चतुर्दंत[7] । स्फटिकाचळासारिखे श्वेत । ज्यांचिया सुवासें प्राणांत । होतो अन्यदेशस्थां. ॥ २६ ॥ पंचघंटांचेनि नाद । अंगत्रयीं गाळित मद । हेमशृंखळा दशनबंध । तेही सहस्र दीधले. ॥ २७ ॥ कृष्णवर्ण श्वेतवर्णें । एकलक्ष अश्वरत्नें । दिवसामाजी शतयोजनें । वातवेगें चालती. ॥ २८ ॥ नानारत्नें आभरणें । वैडूर्यपात्रें पेरोज लसणे । नीळ पाचु आदि नवरत्नें[8] । दीधलीं कीं असंख्य. ॥ २९ ॥ नानावस्त्रें विचित्रें सकळें । अमोलीक तेजाळें । आंदण मर्यादेवेगळें । दीधलें धर्मराजासी. ॥ ३० ॥ ऐसें देऊनि यादवनाथें । उष्ट्रें ओपी पांच अयुतें । संतोषोनि कुंतीसुतें । अत्यादरें घेतलीं. ॥३१॥ पृष्ठीं मिरवलीं बैसकासनें । सुवर्ण पाखरा मुक्ताभरणें । मंदुरायुक्त[9] अश्वरत्नें । लक्षसंख्या ओपिलीं. ॥३२॥ वस्त्राभरणीं रोगरहित । तरुणी[10] सुगुणीरूपवंत । सर्वकामीं कुशल निरत । सहस्र दासी दीधल्या. ॥ ३३ ॥ सुवर्णाचे [11]मांदुसभार । समर्पूनियां अपार । स्वल्प मानी यादवेश्वर । अर्जुनाचे आवडी.॥३४॥ धर्मराजें याचरीती । शालक गौरविले सद्भक्ती, । भोजनपानादि स्वपंक्ती । वन-

१. जोडे. २. पिकदान्या. ३. अध्याय २२१ श्लोक ४४-५५ यांत या देणगीचें वर्णन आहे. ४. वस्त्रें. ५. चांगल्या दूध देणाऱ्या. ६. धौतवर्ण. ७. हत्ती. ८. या नऊ रत्नांचीं नांवें:— 'मुक्तामाणिक्यवैदूर्यगोमेदा वज्रविद्रुमौ । पद्मरागो मरकतं नीलश्चेति यथाक्रमम् ॥'. ९. अश्वशालायुक्त. १०. श्लोक ४९ पहा. ११. पेटी.

विहार संतोषें. ॥ ३५ ॥ यमुनाजळीं रम्यपुलिनीं । पुष्पवटिका शृंगारवनीं । नगरगर्भी राजसदनीं । स्वेच्छानंदें क्रीडती. ॥ ३६ ॥ [1]वळंघती अश्वकुंजरयानीं, । वाद्यें देती संतोष श्रवणीं, । नृत्य कीजे [2]वारांगनीं । सभेपुढें कौतुकें. ॥ ३७ ॥ मग पांचजणें मिळोन । कृष्णासि केलें साष्टांगनमन । आदरें धरूनि दृढ चरण । वेळोवेळां चुंबिती. ॥ ३८ ॥ 'अगा ! स्वामी ! देवाधिदेवा ! । तूं आमुचा विसांवा, । भक्तांचा करिसी [3]सिंधावा । जगीं तूंचि एकला. ॥ ३९ ॥ आम्हीं तुझीं अतिदीन । आमचें थोर केलें महिमान, । हातीं धरूनियां सीन । श्लाघ्य केलें देवराया ! ॥ ४० ॥ तूं अनाथाचा बंधू । [5]कैवल्यदानी सुखसिंधू । अगाध जगीं तुझा बोधू । ब्रह्मादिकां कळेना. ॥ ४१ ॥ आम्हांवरी कृपा केली, । हे भुवनत्रयीं कीर्ति झाली, । श्रीकृष्णें [6]पांडवें रक्षिलीं । उद्धरिलीं चराचरें. ॥ ४२ ॥ 'पांडवांचा कैवारी' । हें ब्रीद तुझें साच मुरारी ! । आमुचा तूं साह्यकारी । बा [7]निर्वाणकाळींचा.॥४३॥ तूं आमचा सखा सोयरा । करुणानिधी शारंगधरा! । सद्गतीच्या दातारा । तूं इहलोकीं परलोकीं.'॥ ४४ ॥ मग लोटांगण घातलें । पायांवरी लोळों लागले । मग कृष्णें उचलिले । थोर प्रेमें आदरेसी. ॥ ४५ ॥ 'तूं आमची जनकजननी ! । बंधूसुहृदशिरोमणी ! । आमुचिया प्रतिपाळणीं । तूंचि कृष्णराया ! कीं.' ॥ ४६ ॥ श्रीकृष्णासहित यादवेसीं । भोजन करविलें स्वपंक्तीसीं । तांबूल दीधलें कर्पुरेसीं । अतिआदरें सन्मानें. ॥ ४७ ॥ चंदन सुगंध पुष्पमाळा । घातल्या श्रीकृष्णाच्या गळां । पूजा ओपिली समसकळां । तृप्त झाले सर्वही. ॥ ४८ ॥ वस्त्राभरणीं गौरविले । समस्त यादव पूजिले । द्वीपींद्वीपींचीं रत्नें [8]सुढाळें । आदरेंकरूनि दीधलीं.॥४९॥ यापरि काळ क्रमूनि तेथें । आज्ञा मागोनि धर्मातें । यादवेसीं [9]रोहिणीसुतें । गमन केलें द्वारके. ॥ ५० ॥ अर्जुनें राहविला कृष्ण, । म्हणे, 'तुझा वियोग एकक्षण । होतां जावो पाहे प्राण । तूं जीवन जगाचें.' ॥ ५१ ॥ पुढां एक वर्षावरी । देवी सुभद्रेचे उदरीं । [10]अभिमन्यु जन्मला, [11]पुष्करीं । जेंवी उगवे [12]भास्वानु. ॥५२॥ अर्जुनाचे परमप्रीतीं । कृष्ण राहिला इंद्रप्रस्थीं,।

१. चढती. २. वारांगना=वेश्या. ३. सिद्धता. ४. ल्हान, हलका. ५. मोक्षपददानी. ६. 'पांडवें' असें नपुंसकलिंगी पद योजिलें आहे तें सहेतुक दिसतें. या योजनेनें पांडवांचें क्षुद्रत्व-पामरत्व सूचविलें आहे. ७. अंतसमयींचा. ८. सुंदर. ९. बलरामानें. १०. हा (अभि) निर्भय आणि मन्युमान् (क्रोधवान्) होता म्हणून त्याला 'अभिमन्यु' असें नांव पडलें. (आदिपर्व-अध्याय २२१ श्लोक ६७.) ११. उदकीं. १२. भास्वान्=सूर्य.

पार्थ सख्याचीच मूर्ती । नवामाजी[1] आठवी. ॥ ९३ ॥ जयंत[2] जैसा पौलोमीतें[3] । सर्वलक्षणें अवयव पुरते । रूपगुणीं पुरुषार्थें । पितयाहूनि आगळा. ॥ ९४ ॥ विशाळाक्ष विशाळहृदय । आजानुबाहू[4] अप्रमेय । उपमें तुळावा कार्तवीर्य[5] । तरी तो वृद्ध बहुकाळें. ॥ ९५ ॥ कुमर देखोनि सुलक्षण । धर्में वांटिल्या अयुत धेनु । द्रव्यदानें याचकजन । तृप्त केले अपाडें. ॥ ९६ ॥ याउपरी द्रुपदबाळे- । गर्भशुक्तिकेमाजि सुढाळे[6] । जन्मलीं पांच मुक्ताफळें । पंचवीर्यें करूनी. ॥ ९७ ॥ धर्मापासात्र प्रतिविंध्यनामा, । भीमापासाव सुतसोमा, । अर्जुनपुत्र तो श्रुतकर्मा, । शतानीक नकुळाचा. ॥ ९८ ॥ सहदेवाचा श्रुतसेन । एकेकावर्षानंतरें जाण । जन्म पावले पांचहीजण । द्रौपदेय ते जाणावे. ॥९९॥ जातकर्मादि अनुक्रमें । चूडोपनयनादी[9] संभ्रमें । विधीनें संपादिलें धौम्यें । सांगोपांग सुजाणें. ॥ ६० ॥ सर्वशास्त्रीं झाले निपुण । सांग करविलें वेदाध्ययन । अर्जुनापासोनि सांहीजण[10] । धनुर्विद्या लाधले. ॥ ६१ ॥ साही अतिरथी महावीर । रणपंडित युद्धचतुर । त्यांचा पुरुषार्थ सविस्तर । सहज पुढें परियेसीं. ॥ ६२ ॥ त्यांमाजि सुभद्रेचा कुमर । प्रतापतेजें जो भास्कर । अर्जुनगुणाब्धीचा चंद्र । बहुतां गुणीं आगळा. ॥ ६३ ॥ त्यातें अवलोकितां दृष्टी । अर्जुना चढे स्वानंदपुष्टी । आपुले सर्व विद्येची पेटी । हृदय केलें तयाचें. ॥ ६४ ॥ ज्याचा पुरुषार्थ अचाट । द्रोणपर्वी[11] होईल प्रगट, । ज्यासीं तुळावया वाट । उभयदळीं असेना. ॥ ६५ ॥ सुभद्राभगिनीचिये स्वार्थी । रणीं आटो कुरुसंतती, । राज्यभोगाचेनि औतीं[12] । स्वामी केलें तुम्हांतें. ॥६६॥ तो श्रीकृष्ण कृपामूर्ती । गर्भीं रक्षिला परिक्षिती ! । तुझ्या पूर्वजांची कीर्ती । विस्तारिली पैं जेणें. ॥ ६७ ॥ ऐसियापरी [13]इंद्रप्रस्थीं । धर्मराज धर्मनीती । राज्य चालवी चक्रवर्ती । जनकादिकां सारिखें. ॥ ६८ ॥ हरिश्चंद्र श्रीरामचंद्र । तयांतुल्य कुरुनरेंद्र । प्रजापालनीं दयासमुद्र । चातुर्याचा भूतळीं. ॥६९॥

---

१. श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, आत्मनिवेदन, या नवविध भक्तीमध्यें आठवी (सख्यरूपा मूर्ती). २. हेंच उदाहरण मूळांत आहे. (श्लोक६५.) ३. इंद्राणीतें. ४. गुडघ्यापर्यंत पोंचणारे बाहु ज्याचे तो. ५. सहस्रार्जुन. ६. सुंदर, तेजस्वी, सुरेख, बांधेसूद. ७. अ० २२१ श्लो० ७९-८६ पहा. ८. मोरोपंत–आदिपर्व–अ० ३७ गी० ८९ पहा. ९. चूडाकर्म (चौल) उपनयन (मुंज) इत्यादि. १०. सौभद्रासह सहा. ११. या उल्लेखावरून मुक्तेश्वरानें द्रोणपर्व रचिलें असावें असें कदाचित् म्हणतां येईल काय ? १२. आवडीस्तव. १३. येथें 'हरणाहरणपर्व' संपून 'खांडवदाहपर्वा'स आरंभ होतो.

जैसी कां प्रिय आपुली काया। तैसी भूतमात्रीं[1] दया। विवेक विचार सत्वन्याया। अर्धक्षण न विसंबे. ॥७०॥ आज्ञेनें नेमिले भूपाळ। करभारेसीं वोळंगती[2] सकळ। दुष्टदंडणीं जैसा **काळ**। परमसेवक साधूंचा. ॥७१॥ **भीष्मधृतराष्ट्रा**ची आज्ञा। परम मान्य तया प्रज्ञा। न दाखवी वक्रतेची संज्ञा। दुर्योधनादिकांसी. ॥७२॥ देव गुरु आणि स्वामी। **धर्म**विगळे मनोधर्मीं। स्पर्शों नेदिजे नरोत्तमीं। बंधुवर्गीं सद्भावें. ॥ ७३ ॥ बाळमित्र **कृष्ण अर्जुन**। एक जीव एक प्राण। मृगया खेळ भोजन पान। एकत्र शयन सर्वदा. ॥ ७४ ॥ **अर्जुन** म्हणे[3], 'स्वामी **कृष्णा**!। ग्रीष्मकाळ दाखवी उष्णा। उबारोनि[4] माझिया प्राणा। कासावीस करीतसे. ॥ ७५ ॥ सुशीतळ यमुनाजीवन[5]। तेथें करावें जळक्रीडण। तेणें होईल तापशमन। समाधान जीवासीं. ॥ ७६ ॥ दिवसा करूं जळविहार। सायंकाळीं प्रवेशूं नगर,। जरि हा मानेल विचार। तरी सत्वर चालिजे.' ॥ ७७ ॥ वचन मानलें अधोक्षजा[6]। आज्ञा पुसोनि **धर्म**राजा,। सवें घेतल्या उभय भाजा[7]। **द्रौपदी** आणि **सुभद्रा**. ॥ ७८ ॥ शतानुशत स्त्रियांच्या पंक्तीं। **द्रौपदी** वेष्टित चालती। बाळा[8] प्रौढा प्रगल्भा व्यक्ती। सालंकार सुवस्त्रा. ॥ ७९ ॥ वस्त्रगृहें[10] अतिनेटकीं। दीधलीं **का**लिंदीतटाकीं[11]। भक्ष्यभोज्याच्या अनेकीं। कावडी पुढें चालिल्या. ॥ ८० ॥ शिल्पकारीं तत्काळ तेथें। स्वर्णगृहें रत्नखचितें। शृंगारवनें सुशोभितें। पुष्पीं फळीं निर्मिलीं. ॥८१॥ तेथें मिळाले नारी नर। अवलोकोनि **यमुना**तीर,। स्थळ देखोनि मनोहर। ठायीं ठायीं क्रीडती. ॥ ८२ ॥ **सुभद्रा** आणि **याज्ञसेनी**। बैसोनियां नौकोयानीं[12],। [13]कर्णधाराचिया पत्नी। खेळ खेळविती कौतुकें. ॥८३॥ एक मातल्या आसवपानें[14]। मधुरस्वरें वाजविती विणे। करिती गायन नर्तनें। कळा गती दाविती. ॥ ८४ ॥ भक्ष्यें भक्षिती घृतपाचितें। फळें सेविती स्वादभरितें।

---

१. प्राणिमात्राच्या ठायीं. २. देती, नम्र होऊन देती. ३. अध्याय २२२ श्लोक १५ पहा. ४. संतापवून. ५. यमुनेचें पाणी. ६. अधोक्षज=विष्णु. याचा विग्रहार्थ असा:—(१) 'अधो न क्षीयते जातु यस्मात्तस्मादधोक्षजः', (२) 'द्यौरक्षं पृथ्वी चाधस्तयोर्यस्मादजायत। मध्ये वैराजरूपेण ततोऽधोक्षज इष्यते ॥', (३) अक्षात् इंद्रियाज्जायेत इति अक्षजम्=प्रत्यक्षज्ञानम्, तदधरं ग्राहकत्वाभावात् हीनं यस्य सः', (४) 'अधःकृतं अक्षजं=इंद्रियज्ञानं येन' याप्रमाणें या शब्दाचे विग्रह आढळतात. ७. भार्या=भाजा=बायको. ['भाजा' शब्दापासून 'बायको' हा शब्द झाला असेल काय? ८. या स्त्रियांचें वर्णन 'साहित्यदर्पण' नामक ग्रंथांत पहावें. [कारिका १०१.] ९. अध्याय २२२ श्लोक १७ पहा. १०. तंबू. ११. यमुनातीरीं. १२. नौकेंत बसल्याचें वर्णन मूळांत नाहीं. १३. नावाड्याच्या. १४. मद्यप्राशनें.

स्वेच्छे प्राशिती रसातें । जेंवी सुधा [1]सुरवरीं. ॥ ८५ ॥ [2]तपनतनयेच्या सुनी-
ळजळीं । [3]नीलोत्पलें सहस्त्रदळीं । नीळ भ्रमरांच्या ओळी । झुंकारती सुस्वरें.
॥ ८६ ॥ [4]नीलांबर बिंबलें जळीं । तटें बांधलीं इंद्रनीळीं । माजी तमालनील
[5]वनमाळी । नील [6]कुंतळीं शिखिपिच्छ[7]. ॥ ८७ ॥ तमालनील छाया वनीं ।
पडतां नीळिमा [8]आतळी धरणी । नीळिमा लागतां पाषाणीं । जन्म गरुडपा-
चूचे. ॥ ८८ ॥ कृष्णनीळिमा देखतां जनीं । नीळ श्यामता जडली नयनीं ।
तीं चिन्हें अद्यापि लोचनीं । जीवमात्रीं देखिजे. ॥ ८९ ॥ श्रीकृष्ण श्याम
कमळनयन । जळीं खेळतां जळक्रीडन । चरणस्पर्शें जळचरगण । दिव्यदेह
पावले. ॥ ९० ॥ सांडोनियां लोकराहटी । **कृष्ण अर्जुन यमुनातटीं** । बै-
सतां सुरतरुतळवटीं । तंव आश्चर्य देखिलें. ॥ ९१ ॥ [9]तप्तहाटकवर्णी पुरुष ।
[10]पिंगटवर्ण [11]श्मश्रुकेश । वेढोनियां [12]कृष्णवास । उभा ठेला सन्मुख. ॥ ९२ ॥
[13]विशाळशाळतरू सरळा । तैसा प्रचंड [14]तेजागळा । खदिरांगार स्त्रवती
डोळां । अंगप्रभा फांकली. ॥ ९३ ॥ यज्ञोपवीत जटाधारी । ब्राह्मण प्रार्थी
जोडल्या करीं, । '[15]क्षुधित मज ये अवसरीं । भोजन दिधलें पाहिजे. ॥९४॥
राहोनि **खांडववनानिकट** । तृप्त करावें मज यथेष्ट । तुम्हीं सर्वार्थी अति-
श्रेष्ठ ! । म्हणोनि येथें मी आलों.' ॥ ९५ ॥ श्रीकृष्ण म्हणे, 'ब्राह्मणोत्तमा ! ।
कवणे भोजनरसीं प्रेमा ? । तें प्रगट करोनि आम्हां । सांगतां तृप्ती तत्काळीं.'
॥ ९६ ॥ येरु [16]बोले यथार्थवचन, । 'तूं तव जाणता सर्वज्ञ । मी [17]पावक [18]हु-
ताशन । तृप्त नोव्हे षड्रसीं. ॥ ९७ ॥ देवेंद्राचें **खांडववन** । त्याचें केलिया
समूळ दहन । तेंचि मज इच्छित भोजन । [19]निर्मोचन रोगाचें. ॥ ९८ ॥ स्व-
शक्तीं करितां **खांडववनदहन** । इंद्र मोकलील [20]मेघजीवन । तेणें ज्वाळा हो-
तील क्षीण । यत्न कांहीं न चाले. ॥ ९९ ॥ तुम्हीं सोडोनि अस्त्रजाळा ।
निवारून मेघमाळा । **खांडववन** ओपिल्या मज अनळा । आरोग्य होईल
संतुष्टी. ॥ १०० ॥ [21]तक्षक नाग सहपुत्र । तेथें वसे [22]शक्रमित्र । यालागीं रक्षी सें-

---

१. देवश्रेष्ठीं. 'जेंवी सुधांशु चकोरीं' असा अन्य पाठ आहे. २. सूर्यकन्या यमुना तिच्या. ३. निळीं कमळें. ४. निळें आकाश. ५. कृष्ण. ६. केशांत. ७. मोरांचें पिच्छ. ८. स्पर्शे. ९. तापलेल्या सुवर्णासारिखा रंग आहे ज्याचा असा. १०. नीलपीताखिलांग. ११. ज्वालेसारखे पीतश्मश्रुकेश.(अ० २२२श्लो० ३१-३२.) १२. काळें वस्त्र. १३. बृहच्छालप्रतीकाश. १४. प्रतप्तकनकप्रभ. १५. अध्याय २२३ श्लो० २ पहा. १६. अध्याय २२३ श्लो० ५-११ पहा. १७. अग्नि. १८. हुत+अशन=हवन केलेलें द्रव्य खाणारा. १९. बाह्यरूप रोगाचें निरसन करणारें. २०. मेघांचें उदक. २१. तक्षक साप. २२. इंद्र.

हव्यनेत्र । जीवां खांडववासियां.' ॥ १०१ ॥ ऐसें बोलतां चित्रभानू । आवेशले कृष्णार्जुनू, । म्हणती, 'दाखवीं खांडववनू । करीं भक्षणू मनइच्छा. ॥ १०२ ॥ मेघवा मोकलून मेघातें । पाहों, कैसा वारील तूतें.' । पुढें वर्तलें कथेतें । उत्तराध्यायीं परिसणें. ॥ १०३ ॥ मग अर्जुनें काय केलें । श्रीकृष्णातें नमस्कारिलें । स्तवन पूजन आरंभिलें । अत्यादरें करूनी. ॥ १०४ ॥ म्हणे, 'जगन्मोहना! मुरारी! । तूं भक्तांचा कैवारी । पांडवांचा साह्यकारी । परमपुरुषा! स्वामिया! ॥ १०५ ॥ तूं अनादि परब्रह्म । ब्रह्मादिक नेणती महिमा, । अवतार धरिसी पुरुषोत्तमा! । आम्हां दीनांकारणें. ॥ १०६ ॥ आमुच्या जीवांचें जीवन । संकटीं रक्षिसी आमुचा प्राण, । माता पिता बंधुजन । तूंचि आम्हां आधार. ॥ १०७ ॥ आम्हीं तुझे दीन अनाथ । भक्तवत्सल स्वामी! तूं समर्थ, । ऐसें ब्रिद सत्य सत्य । जगीं एक तूंसाच. ॥१०८॥ तूं मेघश्याम सांवळा । गळां गुंजांचिया माळा । हृदयीं कौस्तुभ शोभला । शोभा देत साजिरी. ॥१०९॥ तूं सुखाचा सोहळा । आम्हां दीनाच्या दयाळा! । तूंचि एक चक्रपाळा! । वैकुंठवासी नारायणा! ॥ ११० ॥ मुगुट रत्नखचित । श्रवणीं कुंडलें झळकत । कांसे पीतांबर शोभत । विजूसारिखा झळाळी. ॥ १११ ॥ श्रीनिवासा! मुकुंदा! । आदी तूं परमानंदा! । गोपीजनानंदकंदा! । श्रीकांता अनंता! ॥ ११२ ॥ लक्ष्मीवासा! परात्परा! । परमपुरुषा श्रीधरा! । आदि अनादि विश्वंभरा! । गरुडध्वजा! जगदीशा!' ॥ ११३ ॥ ऐसें स्तुती स्तवन करितां । श्रीकृष्णें आश्वासिलें पार्था, । आलिंगिलें तत्वतां । अतिप्रेमें करूनी. ॥ ११४ ॥ टीका व्यासाची मोटेंकी । कथा वनितांमाजी नेटकी । श्रवणवेधास्तव तीं लोकीं । विश्वमोहनी बोलिजे. ॥११५॥ लीलाविश्वंभर सद्गुरु । सकळ सिद्धांचे ईश्वरू । बोलती तितुकें मुक्तेश्वरु । निरोपीत भारतीं. ॥११६॥

अध्याय एकुणपन्नासावा.

कुरुराज चतुर चक्रवर्ती । जन्मेजय धरित्रीपती । म्हणे, 'वैशंपायना! सुमती । विज्ञापना परिसिजे. ॥ १ ॥ जाळावया खांडववन । वैश्वानरा काय कारण? । हें विस्तारें करीं कथन । मजप्रती सर्वज्ञा!' ॥ २ ॥ मुनी म्हणे,

---

१. अग्नी. २. इंद्र. ३. ही अर्जुनकृत कृष्णस्तुति मूळांत नाहीं. ४. मोठी. ५. या अध्यायास 'अग्निदर्शन' अशी संज्ञा एका पोथींत आहे, आणि महाभारतांत यालाच 'ब्राह्मणरूप्यनलागमन' असें नांव आहे. ६. पृथ्वीपति. ७. अध्याय २२३ श्लोक १६ पहा.

'नरेंद्रमौळी ! । श्वेतकि[1]नाम राजा भूतळीं । ऐश्वर्यवंत जैसा बळी[2] । महाउदार धर्मात्मा. ॥ ३ ॥ तेणें मांडिलें महासत्र[3] । द्वादशवार्षिक पवित्र । ऋषी मीनले विद्यापात्र । वेदत्रयी[4] जाणते. ॥ ४ ॥ ऋत्विज मीनले श्रेष्ठ श्रेष्ठ, । जैसे अगस्ती कां वसिष्ठ । दक्षिणादानीं सुखी संतुष्ट । सर्व केले नरेंद्रें. ॥ ५ ॥ द्वादशवर्षें करितां यज्ञ । श्रम पावले ऋत्विजगण । धूम्रें[5] क्षीण झाले नयन । तेणें पीडा पावले. ॥ ६ ॥ नेत्रीं लागल्या जळधारा । उष्णता पातली शरीरा । मग सांगती राजेश्वरा, । 'शक्ती आमुची खुंटली.' ॥ ७ ॥ देखोनि ब्राह्मणाच्या श्रमा । रायें समाप्त केलें होमा, । ऋत्विज[6] गेले निजाश्रमा । चक्षुव्यथेकरूनियां. ॥ ८ ॥ लोटल्या एक संवत्सर । पुढें श्वेतकी राजेश्वर । करावया महा अध्वर[7] । हाव बांधी मानसीं. ॥ ९ ॥ म्हणोनि पातला याजकाप्रती, । 'ऋत्विज होवोनी कृपामूर्ती । याग संपादा' हे विनंती । वारंवार करीतसे. ॥ १० ॥ ऋत्विज बोलती सखेद शब्द, । 'दृष्टी निःशेष झालीसे मंद, । शक्तिहीन आम्हीं वृद्ध । क्लेश आतां न होती.' ॥ ११ ॥ राजा म्हणे, 'महाभागा ! । सेवेसि चुकलों नाहीं मार्गा । उदास होवोनि माझिया यागा । न करूं म्हणा

---

१. श्वेतकी नामक एका प्रख्यातराजानें असंख्य यज्ञ केले; शेवटीं शतसंवत्सरात्मक यज्ञ दुर्वासा-ऋषीच्या आश्रयानें केला. या अनेक यज्ञांत हविर्भक्षण केल्यामुळें अग्नीला इतकें जाड्य आलें कीं, 'याचा प्रतिकार कसा करावा ?' असें विचारण्यासाठीं त्याला ब्रह्मदेवाकडे जावें लागलें. अनेक वर्षें घृतधारा सेवन केल्यानें अग्नि निस्तेज आणि म्लान झाला. 'खांडववन भक्षण करून अग्नीनें आपलें जाड्य निरस्त करावें' असा उपाय पितामहानें सांगितला. पण हें वन इंद्ररक्षित होतें म्हणून तें अग्नीस सुप्राप्य नव्हतें. तेव्हां पितामहाच्या अनुमतानें अग्नि विप्रवेष घेऊन मनुष्यलोकीं कृष्णार्जुनांस शरण आला. त्या उभयतांनीं खांडववन भक्षणार्थ देण्याचें कबूल केलें, पण अर्जुनापाशीं रथादियुद्धसाहित्याची कांहींशी उणीव असल्यामुळें अग्नीनें वरुणापासून मागून घेऊन अर्जुनाला गांडीव धनुष्य, अक्षय्य इषुधि, कपिध्वजयुक्त दिव्यरथ, इत्यादि सामुग्री दिली आणि कृष्णास वज्रनाभ नामक चक्र आणि कौमोदकी नामक गदा देऊन उभयतांस संतुष्ट केलें. नंतर अग्नि तें वन भक्षण करूं लागला, आणि कृष्णार्जुन रथारूढ होऊन वनाच्या दोन्हीं बाजूंस सर्व प्राणिनाश करूं लागले. हें वर्तमान कळतांच इंद्र अग्नीचें निवारण करण्यासाठीं सकलदेवांसह आकाशांत येऊन जलवृष्टि करूं लागला. तेव्हां कृष्णार्जुनांनीं त्याचा पाडाव करून त्यास परत लाविलें. नंतर अग्नि तें वन पंधरा दिवस यथेच्छ भक्षण करून व्याधिनिर्मुक्त झाला. (आदिपर्व—अध्याय २२३-२२५.) २. बलिविक्रमसंयुत. ३. मोठा यज्ञसमारंभ. [सत्र=यज्ञ. 'सत्रमाच्छादने यज्ञे सदादाने वनेऽपि च' इत्यमरः.] ४. ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद. ५. धूमव्याकुललोचन. ६. ऋत्विज, याज्ञिक. [हे ऋत्विज सोळा असतात:—ब्रह्मा, उद्गाता, होता, अध्वर्यु, ब्राह्मणाच्छंसी, अच्छावाक्, नेष्टा इत्यादि.] ७. यज्ञ. ८. अध्याय २२३ श्लोक २२ पहा, तसेंच श्लोक २७-३१ पहा. ९. यांत श्वेतकिराजाचें भाषण आहे.

हें काय? ॥ १२ ॥ कृपाकरूनि मज दीनातें । स्वहस्तें संपादा यज्ञातें, । जे इच्छा असेल तुम्हांतें । ते स्वमुखें निरोपा.' ॥ १३ ॥ अत्याग्रहीं पडूनि राजा। वारंवार विनवी द्विजां, । कांहीं क्रोधाचिया तेजा । स्पर्श केला ते काळीं.॥१४॥ 'आज्ञेचें झालिया निरुत्तर । आणीक ऋत्विज ऋषेश्वर । आणूनियां हा अध्वर[1]। संपादीन प्रयत्नें.' ॥ १५ ॥ ऐकोनि ब्राह्मणीं[2] कोपिजे, । म्हणती[3], 'अवश्य आळस न कीजे, । सांगों तेरीती वर्तिजे । यागसिद्धीकारणें. ॥ १६ ॥ जाऊनि कैलासगिरिवरा । तपें तोषवी श्रीशंकरा, । सिद्धी पाववील अध्वरा । ऋत्विज[4] होवोनियां.' ॥ १७ ॥ आज्ञां[5] होतां नरवरेशा । श्वेतकी पावला कैलासा, । नमस्कारूनि व्योमकेशा[6] । तपश्चर्या मांडिली. ॥ १८ ॥ निराहार निरुदक । इंद्रियनेमें निजनिष्टक । तपोबळें त्रिपुरांतक । प्रसन्न करूं आदरिला. ॥ १९ ॥ द्वादश अथवा षोडशदिनीं । फळाहारीं स्वल्पजीवनीं[7] । प्राण रक्षूनि अनुष्ठानीं । अहोरात्र तिष्ठत. ॥ २० ॥ पातयापातें न लावी नयनीं । ऊर्ध्वबाहू एकचरणीं । वृक्ष तैसा निश्चळ धरणीं । शिवस्मरणीं सर्वदां. ॥ २१ ॥ षण्मास झालिया तपश्चर्या । करुणा आली कैलासराया, । म्हणे, 'प्रसन्न झालों सखया! । माग वेगीं वरातें.' ॥२२॥ राजा म्हणे, 'आत्मलिंगा । आरंभ करीतसें महायागा । ऋत्विज होवोनि उमारंगा! । संपादिला पाहिजे.' ॥ २३ ॥ हांसोनि[8] बोले त्रैलोक्यराज, । 'हें[9] नव्हे आमचें कांज[10]; । माझेनि वरप्रदानें सहज । याग पावेल सिद्धीतें. ॥ २४ ॥ प्रस्तुत सांगतसें नेम । तो चालवीं अतिउत्तम, । तेणें होसील पूर्णकाम[11] । हें निर्धारें जाण पां. ॥ २५ ॥ कुंजरशुंडाप्रमाण[12] चतुरा!। अखंड[13] न खंडतां घृतधारा । द्वादशवर्षें वैश्वानरा । तृप्त तुवां करावें. ॥२६॥ त्यावरि आलिया माझे भेटी । जे कामना असेल पोटीं, । ते मी पुरवीन धूर्जटी । हें सोंचार[14] मानी पां.' ॥ २७ ॥ ईश्वरें कथिलें त्याचिपरी, । पावक अर्चिला वसोर्धारीं[15]. । पुढती येवोनि त्रिपुरारी । मनोभावें वंदिला. ॥ २८ ॥ शंकर म्हणे, 'माझिये अंशीं । अत्रिपुत्र दुर्वासऋषी । ऋत्विज होवोनि तव

---

१. यज्ञ. २. याजक. ३. श्लोक ३३-३५ पहा. ४. 'याजक होऊनी निजांगें' असा अन्यपाठ. ५. हें याजकाचें साधिक्षेपवचन ऐकून. ६. महादेवा. ७. थोड्या उदकानें. ८. स्मितपूर्व. ९. अध्याय २२३ श्लोक ४५-४९ पहा. १०. याजन करणें हा आमच्या अधिकारांतील विषय नव्हे. [श्लोक ४५ टीका पहा.] ११. सफलमनोरथ. १२. हत्तीच्या सोंडेइतकी मोठी (आज्यधारा). १३. अछिन्न. १४. सत्य. १५. वसोर्धारा=पात्रविशेष. ज्यांतून संततधाराऋपानें हूयमान घृतद्रव्य गळतें तें पात्र. [अध्याय २२३ श्लोक ७२ टीका पहा.]

यज्ञासीं । संपादील सामर्थ्यें.' ॥ २९ ॥ ऐसें बोलोनि विश्वनाथें । आज्ञापिलें दुर्वासातें, । रायें मांडिलें सत्रातें । समारंभें तेकाळीं. ॥ ३० ॥ ऋषी पातले अपार । सदस्य मीनले थोर थोर, । हविष्य भक्षितां वैश्वानर । तृप्त झाला अपाडें. ॥ ३१ ॥ रत्नधनाचे गिरिवर । धेनु वस्त्रें वाजी कुंजर । दक्षिणादानीं ऋषेश्वर । सुखी केले नरेंद्रें. ॥ ३२ ॥ संपादूनि अध्वरा । राजा पातला स्वनगरा, । संतोषवोनि नारीनरां । आशीर्वाद घेतले. ॥ ३३ ॥ तेणें सुकृतें नरेंद्रोत्तमा! । त्यागूनियां मनुष्यदेहाची प्रतिमा । पावला अक्षय स्वर्गधामा । श्वेतकी राजा यापरी.॥३४॥हविष्य प्राशिलें अपार। कुपथ्यें निरोधिलें उदर। त्या व्याधीनें वैश्वानर । कासाविस होतसे. ॥ ३५ ॥ आहुती ध्यावया आणिका यज्ञीं । अरुची पडली वदनीं, । देह आतला पांडुरवर्णी । निचेष्टित निस्तेज. ॥ ३६ ॥ ब्रह्मयातें येवोनि वेगें । म्हणे, 'शरीर व्यापिलें रोगें । परिहारें तो उपाय सांगें । तूं समर्थ सर्वांसीं.' ॥ ३७ ॥ ऐकोनि बोले पद्मयोनी, । 'दिव्य औषधी खांडववनीं, । तें भक्षिल्या रोगबंधनीं । मुक्त होसी पावका! ॥ ३८ ॥ खांडव दाहिल्या वैश्वानरा! । अंतरीं दुष्टरोगाचा थारा । भस्मेल जैसा संसारा । नाश हरिहरचिंतनें'. ॥ ३९ ॥ ऐसें बोलतां चतुराननु, । पावक पावला खांडववनु, । दग्ध करितां, सहस्रनयनु । जाणवलें तत्काळीं.॥४०॥ ऐरावताचे दूत करटी । प्रेरिता झाला कोट्यानकोटी । शुंडा भरोनि तोयवृष्टी । करिते झाले पावकीं. ॥ ४१ ॥ बहुशीर्षाचे नाग बळिष्ठ । मस्तकीं घेवूनि उदकघट । सिंपोनियां हव्यवाट । शांत केला क्षणार्धें. ॥ ४२ ॥ अवमानला हुताशन, । नचले बळ अथवा यत्न, । ब्रह्मयाप्रती दीनवदन । क्लेश सांगे मागुती. ॥ ४३ ॥ स्रष्टा सांगे उपाय गहन, । 'भूतळीं नर आणि नारायण । देहधारी कृष्णार्जुन । देवकार्या अवतरले. ॥ ४४ ॥ त्यांसीं जाऊनियां शरण । मागून घेई खांडववन । तिहीं अंगिकारिल्या विघ्न । करूं न शके सुरेंद्र.'॥४५॥ ऐसें बोलतां चतुरानन । यमुनातीरीं कृष्णार्जुन । त्यांप्रति जाऊनि हुताशन ।

---

१. सदस्य=न्यूनाधिकविचारक ऋत्विग्विशेष. २. जमा झाले. ३. हत्ती. ४. श्लोक ६१ पहा. ५. श्लोक ६३ पहा. ६. बारा वर्षे घृतपान केलें. ७. 'अटकचि पडली उभय वदनीं' असा अन्य पाठ. ८. इंद्र. ९. हत्ती [करट=गजगंडस्थल.] १०. श्लो० ८१ पहा. ११. अग्नि. १२. खांडववन दहन करण्यास अग्नि सातवेळ उद्युक्त झाला असतां गज नाग इत्यादि वनस्थ प्राण्यांनीं अग्नीचा उपशम सातवेळ केला. [अ० २२३ श्लो० ८३.] १३. अग्नीचा याप्रमाणें पराभव झाला तेव्हां त्याचा अवमान झाला. १४. ब्रह्मदेव. १५. अध्याय २२४ श्लोक २-४ पहा.

[1]बद्धपाणी विनवीत. ॥ ४६ ॥ 'वर्म [2]बोधवितां [3]प्रजापती । आशेनें आलों तुम्हांप्रती, । कृपाकरूनि उभयमूर्ती । खांडव भक्ष्य मज द्यावें'. ॥ ४७ ॥ अग्नीनें कृष्णास देखोन । केलें साष्टांग नमन, । म्हणे, 'ब्रह्म परिपूर्ण । परब्रह्म पूर्णत्वें. ॥४८॥ तूं भक्तकाजकैवारी । मुरुमर्दना तूं मुरारी! । वेगीं होईं साह्यकारी । मजलागीं जनार्दना! ॥४९॥ परमपुरुषा! जगदीशा! । तूंचि एक परेशा! । जगदात्मया सर्वेशा! । आत्मरूपा तूं. ॥ ५० ॥ अनंतगुणपरिपूर्णा!। सच्चिदानंदा! गुणैकघना! । कृपासिंधु! गुणनिधाना! । लक्ष्मीवरा! जगदीशा! ॥ ५१ ॥ मेघश्याम सांवळा । [4]आपाद रुळती वनमाळा । तेजप्रकाश सोज्वळा । घननीळा श्रीकृष्णा!' ॥ ५२ ॥ ऐसी स्तुती करितां हुताशन । श्रीकृष्ण झाला प्रसन्न, । हस्त मस्तकीं ठेऊन । अभय देत श्रीहरी. ॥ ५३ ॥ अर्जुन [5]बोले अभयवचन, । 'तूतें ओपिलें खांडववन । इया बोला नाहीं आन । करीं भक्षण मनइच्छा. ॥ ५४ ॥ घेऊनि [6]निर्जरांचा भार । युद्धा आलिया [7]सुरेश्वर । पराभवीन जेंवी [8]जळधर । महावात विध्वंसी. ॥ ५५ ॥ देवतायुद्धीं मानवशस्त्रें । अभंग कैसीं उरती खडतरें । ऐसें आशंकेचें वारें । स्पर्शों नेदी मानस. ॥ ५६ ॥ अस्त्रें असती दिव्यरूप । परी तयां योग्य नाहीं चाप । युद्धीं आवरी खटाटोप । ऐसा रथही असेना. ॥ ५७ ॥ दुष्टदंडक श्रीपती । परि या योग्य अस्त्र नाहीं हस्तीं । असो. आतां भलतया रीती । कार्य तुझें संपादूं.' ॥ ५८ ॥ ऐकोनि बोलिजे [9]अनळमित्रें, । 'मी देईन दिव्य अस्त्रें । वज्र प्रेरितां सहस्रनेत्रें । न होय भंग जयांसी. ॥ ५९ ॥ विजयनामा अतिसुतेज । रथ ओपीन [10]वानरध्वज । चक्रीं [11]मित्र [12]नक्षत्रराज । जडले तैसे भासती. ॥ ६० ॥ अभंग चाप अक्षय भातें । वरुणदत्त देईन तूतें । विधीनें ओपिलें सोमातें । दानवहननाकारणें'. ॥ ६१ ॥ ऐसें बोलोनि तयेकाळीं । बुडी देऊनि यमुनाजळीं । क्षणें पातला वरुणाजवळी । वृत्तांत सांगे तयातें. ॥ ६२ ॥ म्हणे, 'उदारा! जळेश्वरा! । [13]पश्चिमदिग्वधूच्या वरा! । सुधावासिया रत्नाकरा! । लोकपाळा! परियेसीं. ॥ ६३ ॥ बळें भूभार उतरावया । धर्म साधु स्थापावया । कृष्णार्जुन देवकार्या । धरातळीं अवतरले. ॥ ६४ ॥ एक नारायण

---

१. बद्धांजलि. (हात जोडून.) २. जाणवितां. ३. ब्रह्मदेव. ४. पायांपर्यंत लोळतात. ५. अध्याय २३४ श्लोक १५-२१ पहा. ६. देवांचा. ७. इंद्र. ८. मेघ. ९. अग्नीनें. १०. कपिप्रवरकेतन. ११. सूर्य. १२. चंद्र. १३. आठ दिशा ह्या आठ वधू मानिल्या आहेत आणि त्या आठ दिशांचे जे स्वामी ते त्या वधूंचे वर होत. पश्चिमदिग्वधूचा वर म्हणजे वरुण होय.

एक नरू । कृष्ण आणी अर्जुन वीरू । त्यांसीं चालवीं मित्राचारू । दिव्य अस्त्रें देउनी. ॥ ६५ ॥ दानवत्रधालागीं पूर्वीं । गांडीव निर्मिलें असे देवीं । अक्षय भाते ठेविले ठेवी । सुवर्णकवचीं वेष्टिले. ॥ ६६ ॥ दिव्यरथ वानरकेतें । श्रेष्ठत्व ओपिलें सोमातें, । सोमें सर्व सामग्रीसीं तूतें । स्नेहभावें अर्पिला. ॥ ६७ ॥ तें तूं देईं अर्जुनातें, । तो फेडील भूभारातें, । संतोष होईल हरिहरातें, । तेही तूतें मानवती. ॥ ६८ ॥ कौमोदकी प्रचंड गदा । सुदर्शन चक्रायुधा । भावें अर्पून गोविंदा । यश घेईं सभाग्या !' ॥ ६९ ॥ संतोषोनि जैळचरनाथ । चाप तूंणीर अमोघ रथ । देऊनि स्वाहास्वधेचा कांत । बोळविला सन्मानें. ॥ ७० ॥ थँडीसी येऊनि पार्थाप्रती । गांडीव चाप दिधलें हातीं । दिव्य तेजाचिये दीप्ती । भानुतेज लोपलें. ॥ ७१ ॥ जें जें अस्त्र कल्पिजे युद्धीं । तें तें प्रसवे तूणीरसंधी । जैंवी शास्त्रज्ञाचे संवादीं । शब्दमाळा नखंडे. ॥ ७२ ॥ वानररूपी त्रिलोचन । ध्वजीं बैसला विराजमान । ज्याची गर्जना परिसोन । महाप्रळयो भूतांतें. ॥ ७३ ॥ उच्चैःश्रव्यातें जिंकिती त्वरें । तैसे वारू जुंपिले धुरे । सिंधुमेवाचेनि सरें । महा गर्जना जयांची. ॥ ७४ ॥ नमस्कारूनि रुक्मिणीपती । गदा चक्र ओपिलें हातीं । सारथी होवोनि बैसला रथीं । मुख्यासनीं अर्जुन. ॥ ७५ ॥ मस्तकें नमोनि हुताशना । मग रथासि करून प्रदक्षिणा । आसनीं बैसतां अर्जुना । वीरश्रियें वरियेलें. ॥ ७६ ॥ शस्त्रबळ वहनबळ । लाहोनि दोघे उतावेळ । निकट बैसवूनि अनळ । खांडववना पातले. ॥ ७७ ॥ समीप निश्चळ करूनि रथा । म्हणती स्वाहास्वधेच्या नाथा, । 'भक्षण वेगें करीं आतां । मागें पुढें न पाहें.' ॥ ७८ ॥ ऐसी होतां अभय वाणी । ज्वाळा धडकल्या चहूंकडूनी । धूम्र सुसाटें भरला गगनीं । पक्षियां पळणी मांडिली. ॥ ७९ ॥ गगनीं विरूढला कैनकाचळ । तैसे एकवटले ज्वाळ । माजी कोंडले जीव सकळ । निर्गम कोणा दिसेना. ॥ ८० ॥ प्रार्थूनि बोलिजे द्विजपावकें, । 'खांडववनी वसे जितुकें । एक न्यून न होतां मुखें । म्यां भक्षिलें पाहिजे. ॥ ८१ ॥ तरीच पावेन अक्षय तृप्ति । हृदयीं होईल रोगनिवृत्ती । भुवनत्रयीं तुमची कीर्ती । विस्तारेल, वीर हो !' ॥ ८२ ॥ 'अवश्य' म्हणोनि विजयी पार्थ । परिघ घातला बाणावर्त । कृष्णचक्र फेरे देत । भोंवों लागलें

---

१. अध्याय २२५-श्लोक २८ पहा. २. अध्याय २२५ श्लोक २३. यांत 'वज्रनाभ' असेंच चक्राचें नांव आहे. ३. वरुण. ४. भाता. ५. स्वाहा आणि स्वधा या अग्निपत्नी होत. ६. यमुनातीराला. ७. सूर्यप्रभा ८. अध्याय २२५ श्लोक ३१-३३ पहा. ९. मेरुपर्वत.

चौफेरीं. ॥ ८३ ॥ जीव पळोनि[1] जाती जिकडे । बाणाचा वेग पावे तिकडे, । शिरें छेदूनियां दुघडें । बळें होमी हुताशीं[2]. ॥ ८४ ॥ शशक जंबूक व्याघ्र मार्जार । ऋक्ष[3] वानर मर्कट अपार । शूकर चितळ तरस तेंगर[4] । सैरावैरा धांवती. ॥ ८५ ॥ खड्गमृग[5] कस्तूरीमृग । गवे [6]रोही कृष्णसारंग[7] । सुरभी धेनु लगबग । झुंडी[8] देती पळावया. ॥ ८६ ॥ कुंजर करिणी सिंह शार्दूळ । शरभपक्षी महाविशाळ । गंडभैरीयांचे[9] मेळ । वन्हिचक्रीं कोंडले. ॥ ८७ ॥ जवादी प्रसवती बिडाळी । वन्ही चर्चिला सुपरिमळीं । सुवर्णमूषकाचे बिळीं । चुचुंदरिया दाटल्या. ॥ ८८ ॥ कृष्णागरू हरिचंदनें । कर्पूरकर्दळीकेतकीवनें । जळतां सुवास पवनें । मळयाचळ[10] पळविला. ॥ ८९ ॥ शाल्मलीवनें गुग्गुळवनें । कुंकुमकेशरबिल्ववनें । दग्ध होतां हिशांचीं घ्राणें । दिव्यगंधें कोंदलीं. ॥ ९० ॥ अठराभार वनस्पती । दशलक्ष विहंगम जाती । चतुष्पदांच्या याती[11] । तीसलक्ष बोलती. ॥ ९१ ॥ अठरा लक्ष कीटकभेद । उभयवदनीं[12] जातवेद[13] । भक्षण करितां स्वादास्वाद । न विचारित मातला[14]. ॥ ९२ ॥ सप्तजिव्हा[15] ज्वाळमाळी । [16]रुधिरमेदाच्या अंजुळी । प्राशन करितां आगळी । तृष्णा कांहीं तोलेना. ॥ ९३ ॥ सरिता सरोवरींचीं जळें । कढों लागलीं महाज्वाळें । जळचरें उकडोनि एकवेळें । भस्म झालीं हुताशीं. ॥ ९४ ॥ श्वापदें पक्षियांच्या कोटी । रुदितशब्दांच्या बोभाटीं । बाळकें कवळोनियां पोटीं । प्रळयानळीं भस्मल्या. ॥ ९५ ॥ वैश्वानर कल्पांतकाळ । तापें तापलें भूमंडळ । दाटले धूम्राचे कल्लोळ । सत्यलोकावरौते. ॥ ९६ ॥ हाक गेली इंद्रभुवनीं । वन्ही लागला खांडववनीं । तो माजला नाटोपे कोण्ही । विश्वा ग्रासूं पहातसे. ॥ ९७ ॥

---

१. अध्याय २२६ श्लोक २ पहा. २. अग्नींत. ३. रीस, अस्वल. ४. मेंढा. ५. गेंडा. ६. नीलगाय, हरिणविशेष. ७. हरिण. ८. खरा. ९. मागें पृष्ठ ४२५ टीप १३ पहा. १०. मलयाचल हा चंदनवृक्षाचें स्थान होय. ११. जाति. १२. अग्नीला दोन मुखें आहेत असें वर्णन आहे. 'चत्वारि शृंगा त्रयोऽस्य पादा द्वे शीर्षे' इत्यादि वचन सुप्रसिद्ध आहे. १३. अग्नि. १४. माजला १५. अग्नीला सात जिव्हा आहेत असें समजतात. त्या सात जिव्हांचीं नांवें:–'काली कराली धूम्रा च लोहिता च मनोजवा । स्फुलिंगिनी विश्वरुपा सप्त जिव्हाः प्रकीर्तिताः ॥ 'इति गर्गः । यद्वा । भवति हिरण्या कनका रक्ता कृष्णा च सुप्रभा चान्या। अतिरक्ता बहुरूपेति सप्त सप्तार्चिषो जिव्हाः॥' इति हलायुधः [रघुवंश–सर्ग १० श्लो० २१ हेमाद्रिकृत टीका], "काली मनोजवा धूम्रा कराली लोहिता तथा । स्फुलिंगिनी विश्वरुचिः सप्त जिव्हा विभावसोः ॥' [अ० २ श्लो० ५ टीका.] १६. रक्ताच्या व चरबीच्या.

क्रोध नावरे सुरेश्वरा । जीमूत[1] प्रेरिले सत्वरां । वर्षोनियां मुसळधारा । धूमकेतू शांतवा. ॥ ९८ ॥ मेघ गर्जिन्नले आकाशीं । विद्युल्लता शक्रधनुष्यीं[2] । गाराजळ वर्षाव हुताशीं । अपार पडों लागले. ॥ ९९ ॥ गांडीव सजोनियां मुष्टी । वायव्यास्त्र सोडी किरीटी, । मेघ भंगले बारावाटीं । अभ्र कोठें दिसेना. ॥ १०० ॥ रागें वज्र ताडितां शक्रें । पार्थें टाकिलीं कंकपत्रें[3] । ऐरावताचीं सर्वगात्रें । संधी संधी भेदिलीं. ॥ १०१ ॥ वर्मीं लागतांचि घावो । अंकुशें लोटितांहि न घाली पावो । आश्चर्य करी अमररावो । म्हणे, 'अर्जुन नाटोपे.' ॥ १०२ ॥ सुरेंद्रमित्र तक्षक[4] फणी । वनीं नसतां, लागला वन्ही । पुत्र भार्या दोन्ही । पावकचक्रीं[5] कोंडलीं. ॥ १०३ ॥ मातेनें पसरोनि वदन । पोटीं सूदला[6] अश्वसेन[7] । आधीं गिळिला मुखाकडून । पुच्छ पाठीं ग्रासिलें. ॥ १०४ ॥ पळोनि जातां गगनमार्गें । पार्थें शीर छेदिलें वेगें, । माता र्निमाली, परी आंगें । पुत्र जिवें वांचला. ॥ १०५ ॥ पळोनि गेला कुरुक्षेत्रा । तेथें तक्षक भेटला पुत्रा, । भार्या निमाली[8] तेणें नेत्रा । अश्रुपात लोटले. ॥ १०६ ॥ मग कोपला अमराधीश[9,10] । मोकली[11] शिळांचा पाऊस, । हांसोनि बोले हृषीकेश[12], । 'ऐसेंचि[13] झालें गोकुळीं. ॥ १०७ ॥ तेवेळीं उचलोनि गोवर्धन । म्यां रक्षिले गोकुळींचे जन.' । वदे प्रत्युत्तर अर्जुन, । 'आजीही तूंचि रक्षिता.' ॥ १०८ ॥ सोडोनि तीक्ष्ण बाणजाळा । तिळप्राय फोडिल्या शिळा, । जैसी दुरुक्ती बोलतां खळा । सहिष्णु वैरी[14] विचारें. ॥ १०९ ॥ खांडव रक्षावें निजस्वार्था । साह्य करावें अमरनाथा, । म्हणूनि असुरांचिया[15]

---

१. मेघ. २. इंद्रचापीं. ३. बाण, तीर. ४. खांडववन जळत असतां त्या वनांत राहणारा नागराज तक्षक कुरुक्षेत्रास गेला होता. [अ० २२७ श्लो० ४.] ५. अग्नीच्या वेंटाळ्यांत. ६. घातला. ७. अश्वसेन हा तक्षकाचा पुत्र. तक्षकाची भार्या स्वपुत्राचें (अश्वसेनाचें) मुख व पुच्छ आपल्या मुखांत धरून अग्निप्रलयांतून बाहेर जात असतां अर्जुनानें बाणानें तिचा शिरच्छेद केला, तेव्हां इंद्रानें अश्वसेनास मुक्त केलें. (आदिपर्व—अ० २२५ श्लो० ६-८.) ८. मेली. ९. मोरोपंत—आदिपर्व—अध्याय ३७ आर्या १००-१०२ पहा. १०. इंद्र. ११. सोडी, पाडी. १२. कृष्ण. १३. मोठी भयंकर वृष्टि झाली. १४. निवारी. १५. ज्यांनीं सुरेचा (मद्याचा) स्वीकार केला ते सुर आणि ज्यांनीं केला नाहीं ते असुर, असा सुर आणि असुर या शब्दांचा अर्थ रामायणांत आढळतो. 'वरुणस्य ततः कन्या वारुणी रघुनंदन । उत्पपात महाभागा मार्गमाणा परिग्रहम् । ॥ ३६ ॥ दितेः पुत्रा न तां राम जगृहुर्वरुणात्मजाम् । अदितेस्तु सुता वीर जगृहुस्तामनिंदिताम् ॥ ३७ ॥ असुरास्ते न दैतेयाः सुरास्ते नादितेः सुताः । हृष्टाः प्रमुदिताश्चासन्वारुणीग्रहणात्सुराः ॥ ३८ ॥' [वाल्मीकिरामायण—बालकांड—सर्ग ४५.]

[1]चळथा । पार्थाउजू धाविन्नल्या. ॥ ११० ॥ दैत्य दानव गंधर्व यक्ष । राक्षस
पावले अकरा लक्ष । [2]मंदेह [3]पौलोम पांचलक्ष । [4]शस्त्रपाणी धाविन्नले. ॥ १११ ॥
[5]वज्रतुंड शरांच्या कोटी । [6]एकसरें मोकली [7]किरीटी, । संगीं श्रीकृष्ण जगजेठी ।
चक्र प्रेरी हातींचें. ॥ ११२ ॥ पार्थशरांचे महामारीं । सुदर्शन चक्र सहस्र-
धारी । शिरें तुटोनि पृथ्वीवरी । हास्य करिती गदगदां. ॥ ११३ ॥ जेंवी
कमळें खुडती माळी । कणसें खुंटिजेति [8]कृषीवळीं । तेंवि असुरांच्या [9]सिसा-
वळीं । रासी झाल्या भूखळीं. ॥ ११४ ॥ नातरी ते [10]भद्रकाळी । रक्तकुंकुम
लेपोनि भाळीं । [11]जपाकुसुमाच्या अंजुळी । कृष्णें पार्थें वाहिल्या. ॥ ११५ ॥
गगनींहूनि पडतां [12]रुधिरें । पावक म्हणे, 'हे [13]वसोधारे ! । पोटीं पडती असुर-
शिरें । तीं [14]भावी [15]अवदानें.' ॥ ११६ ॥ पडिल्या असुरांच्या कोटी, । उरले
रिघाले दिक्पाटीं, । [16]सुपर्वाण भाविती पोटीं । [17]महानिर्वाण दिसताहे. ॥ ११७ ॥
देखोनि कोपला [18]पर्वतशत्रु । शचीरमण सहस्रनेत्रु । सुरांसि म्हणे, '[19]मानवपुत्र ।
मृत्यु झाला वज्रानें. ॥ ११८ ॥ वेगीं अवघे एकत्र मिळा । एकदांचि मो-
कला शरजाळा । पार्थ पराभवुनि एकला । सोज्वळ करा सुरमुखें.' ॥ ११९ ॥
[20]वळंघला [21]श्वेतचतुर्दंतीं । [22]दंभोळिधारा पुसिल्या हातीं । हें देखोनि सुरांच्या

---

१. समूह, टोळ्या. २. मंदेह—या नांवाचे साडेतीन कोटी राक्षस सकाळीं व संध्याकाळीं सूर्याचा ग्रास करण्याकरितां उत्पन्न होत असतात. त्यांचा नाश करण्याकरितां गायत्री मंत्र म्हणून सूर्यास अर्घ्यं देण्याचा संप्रदाय आहे. गायत्रीमंत्रानें तयार केलेलें पाणी वज्ररुप होऊन या राक्षसांचा नाश करितें असा समज होता. 'तिस्रः कोट्योऽर्धकोटी च मंदेहा नाम राक्षसाः । उदयंतं सहस्रांशुमतियुद्ध्यंति ते सदा ॥ गायत्र्या चाभिमंत्र्योर्ध्वं जलं त्रिःसंध्ययोः क्षिपेत् । तेन शाम्यंति ते दैत्या वज्रभूतेन वारिणा ॥ मंदेहान्युध्यतः क्रूरान्त्रिःक्षिपेत्तेष्वथांजलिम् । × × एवं त्रिवारमावृत्य दग्धास्तांनसुरान्द्विजः ॥' सदर मंदेहांचा उल्लेख संस्कृत काव्यांतून अनेक ठिकाणीं आढळतो. उदाहरणार्थ—नैषधचरित सर्ग १७ श्लो० ९४, सर्ग १९ श्लो० ४१ पहा. ३. पुलोमा आणि कालका अशा दोन दैत्यकन्यका होत्या. त्यांस ब्रह्मदेवाच्या प्रसादानें पौलोम आणि कालकेय असे अनुक्रमें पुत्र झाले. ते देवांस अवध्य होते. परंतु त्यांचा मृत्यु मनुष्यापासून होता. त्यांचें नगर यथेच्छगामी हिरण्यपुर म्हणून होतें. त्यांस अर्जुनानें मारिलें. (अध्याय १७३.) ४. ज्याच्या पाणीमध्यें शस्त्र असे. ५. वज्र आहे तोंडांत ज्यांच्या असे. (शर.) ६. एकदम. ७. अर्जुन. ८. शेतकऱ्यानें. ९. शिरावळीतें. १०. देवी भवानी. ११. जास्वंतीच्या फुलांच्या. १२. रक्तें. १३. 'वसुंधरे' असा अन्य पाठ. १४. मानी. १५. हवनद्रव्यें. १६. गरुड. १७. मोठें संकट. १८. इंद्र. (पर्वतांचा शत्रु म्हणण्याचें कारण इंद्र पर्वतांच्या पक्षांचा छेद वज्राघातानें करीत असे. इंद्राला 'गोत्रभिद्' असें नांव आहे.) १९. कृष्ण व अर्जुन मरण पावले असें इंद्र म्हणाला. [अ० २२७ श्लो० ३०.] २०. चढला. २१. पांडुरवर्ण गजावर. २२. वज्रधारा.

पंक्ती । [1]शस्त्रास्त्रीं सिद्धल्या. ॥ १२० ॥ दंड धरूनि [2]धर्मराजु । रागें लोटला पार्थाउजु, । गदा भवंडितां सतेजु । [3]धनेश्वर धाविन्नला. ॥ १२१ ॥ वरुण घेवोनियां [4]पाश । म्हणे, 'मी घेईन पांडवांचें यश'. । कृत्रिम अवलंबोनि रोष । शिव धांवे शूळेंसीं. ॥ १२२ ॥ उपडोनि प्रचंड औषधी । [5]अश्विनौदेव धाविन्नले क्रोधीं, । [6]पर्वत घेवोनियां खांदीं । [7]त्वष्टा रागें धाविन्नला.॥१२३॥ [8]स्कंद लोटला घेऊनि शक्ती । मृत्यु पावला परशहस्तीं । [9]प्रतोद घेऊनि [10]गभस्ती । 'फिरा' म्हणे अवघ्यांतें. ॥ १२४ ॥ सज्जूनियां धनुष्यबाण । युद्धा पातला [11]प्रभंजन । लोहमुसळ पडताळून । जयनामा धाविन्नला. ॥ १२५ ॥ अर्यमा लोटला घेऊनि [12]परिघ, । मित्राहस्तीं चक्र अमोघ, । सोम आणि पूषा भग । [13]कार्मुकपाणी धांवले. ॥ १२६ ॥ [14]आदित्य [15]रुद्र [16]मरुत [17]वसव । [18]साध्य आणि [19]विश्वेदेव । हे मुख्य करूनि अमर सर्व । संग्रामार्थ पातले. ॥ १२७ ॥ परिघप्राय वेढोनि रथा । 'घ्या घ्या' म्हणती 'कृष्णपार्था' । जैसे [20]पाखांडी

---

१. देवांनीं आपापलीं शस्त्रें धारण केलीं. [अ० २२७ श्लो० ३२-३९.] २. यमराजा. याला 'दंडधर' अशी संज्ञा आहे, कारण याचें आयुध दंड होय. ३. कुबेर. याचें आयुध गदा होय. [श्लो० ३२.] महाभारताच्या टीकेंत 'शिबिका' किंवा 'शिंबिका' असा अन्य पाठ 'गदा' शब्दाच्या ऐवजीं असल्याचें दर्शविलें आहे. एका दारुमय, लोहमय आणि वक्र आयुधाला द्रविड लोक शिंबिका म्हणतात असें नीलकंठ टीकाकार सांगतो. ४. पाश हें वरुणाचें आयुध होय. याच कारणास्तव वरुणाला 'पाशी' अशी संज्ञा आहे. ५. अश्विनौ—हे दोन अश्विनीपुत्र होत. हे देवांचे धन्वंतरि होत. ६. 'पर्वत'स्थानीं 'विचक्र' (त्रिशूळ) असा पाठ असल्याचा उल्लेख महाभारताच्या टीकेंत आहे. (श्लो० ३४.) ७. देवांचा कारागिर. ८. कार्तिकेय. ९. चाबूक. १०. सूर्य. ११. वायुदेव. १२. लोहबद्ध लगुड. (श्लो० ३५.) १३. धनुष्य ज्यांचे हातीं असे. १४. द्वादश आदित्य. १५. एकादश रुद्र. सप्तविध देवांपैकीं एकादश रुद्र हे तिसऱ्या प्रतीचे देव होत. भूत पिशाच राक्षस यक्ष यांचे हे अधिपति होत. यांचीं नांवें अशीं आहेत:—मृगव्याध, सर्प, निर्ऋति, अजैकपात्, अहिर्बुध्न्य, पिनाकी, दहन, ईश्वर, कपालि, महाद्युति आणि भर्ग. यांचीं नांवें पुराणांतून अन्य प्रकारें दिलेलीं आढळतात, तथापि त्यांची संख्या सर्वत्र अकराच दिसून येते. १६. एकुणपन्नास मरुत. १७. आठ वसु. १८. बारा साध्यगणदेवविशेष. यांचीं नावें:—मन, उर्मनु, प्राण, नर, उपान, वीर्यवान्, चित्तहार्य, अयन, हंस, नारायण, विभु आणि प्रभु. १९. दहा विश्वेदेव. यांचीं नांवें:—क्रतु, दक्ष, वसु, सत्य, कामकाल, मुनि, कुरज, मनुज, बीज आणि रोचिमान्. या सर्व देवगणांची संख्या पुढील श्लोकांत दिली आहे. 'आदित्या द्वादश प्रोक्ता विश्वेदेवा दश स्मृताः । वसवश्चाष्ट संख्याताः षट्त्रिंशत्तुषिता मताः ॥ आभास्वराश्चतुःषष्टिर्वाताः पंचाशदूनकाः । महाराजिकनामानो द्वे शते विंशतिस्तथा ॥ साध्या द्वादश विख्याता रुद्राश्चैकादश स्मृताः ॥' [भानुजिदीक्षितकृत व्याख्यासुधान्वित अमरकोष पृ० ८.] याचा भावार्थ:—आदित्य बारा, विश्वेदेव दहा, वसु आठ, तुषित छत्तीस, आभास्वर चौसष्ट, मरुत एकुणपन्नास, महाराजिक दोनशें वीस, साध्य बारा आणि रुद्र अकरा होत. २०. नास्तिक, वेदांतमताचें खंडन करणारे, अनीश्वरवादी.

वेदार्थी । जिंकावया जल्पती. ॥ १२८ ॥ अगस्त्यास्त्र जपोनि वाणी । एकैक विंधिले दहाबाणीं । शस्त्रें हस्तींचीं उडवूनी । वर्मस्थळीं खोंचले. ॥ १२९ ॥ मुसळप्राय [1]सायकधारें । मारूनि उडविले माघारें, । जैसे प्रळयीं [2]महासमीरें । वृक्ष जाती दशदिशा. ॥ १३० ॥ एक मूर्च्छित पडले धरणीं, । एक उडविले ऊर्ध्व गगनीं, । एक टाकिले समुद्रजीवनीं । निचेष्टित शरमारें. ॥ १३१ ॥ जेंवि विघ्नाचिया कोटी । गणेश उडवी बारावाटी, । नातरी हनुमंताचिये दृष्टी । भूतसृष्टी उरेना. ॥ १३२ ॥ नातरी पातकाचिया लक्षा । एक हरिनाम करी [3]रक्षा, । तेंवी [4]निर्जरांचिये पक्षा । पराभविलें अर्जुनें. ॥ १३३ ॥ अमरगणीं काढिला मोड । म्हणती, 'न जिंकवे [5]होडें, । संग्राम पार्थासीं अवघड । धैर्य सहसा न धरवे.' ॥ १३४ ॥ पुढती कोपोनि सुरेश्वरें । अर्जुन ताडिला शैलशिखरें । पडे पडे तंव पांडुकुमरें । बाणधारें [6]फोडिलें. ॥ १३५ ॥ तंव गर्जिन्नली [7]आकाशवाणी, । 'विचार धरीं [8]वज्रपाणी! । नर नारायण हे दोन्ही । कृष्णार्जुन जाण पां. ॥ १३६ ॥ यांतें पराभवूनि यश । पावे ऐसा कवण पुरुष? । आतां सांडोन [9]संग्रामसोस । जावें वेगीं माघारें. ॥ १३७ ॥ [10]आततायी पातकी प्राणी । मरोनि उपजे खांडववनीं । त्यांतें निमित्त करोनि वन्ही । भूभार [11]यींहीं फेडिला. ॥ १३८ ॥ राक्षस तामस महापापी । झाले श्वापदें [12]पां-दपी । म्हणोनि कृष्णार्जुन [13]सौंक्षेपीं । नाश करिती तयांचा. ॥ १३९ ॥ यांसी करूं जातां युद्ध । जय न पावोनि पावसी खेद, । आतां वदोनि सरळ शब्द । यश उरवीं आपुलें.' ॥ १४० ॥ ऐकोनियां अमरनाथ । माघारला

---

१. सायकांच्या (बाणांच्या) धारेनें. २. मोठ्या वायूनें. ३. भस्म. ४. देवांचे. ५. प्रतिज्ञा, पैज. ६. इंद्रानें मंदराचलाचें शिखर तोडून अर्जुनावर टाकिलें तों त्यानें अजिह्मगशरांनीं त्याचे हजारों तुकडे केले. [अ० २२७ श्लो० ४९-५०.] येथें 'खांडवदाहपर्व' संपून 'मयदर्शनपर्वा'स आरंभ होतो. ७. अशरीरिणी वाणी. [अध्याय २२८ श्लो० १६-२२.] ८. हे इंद्रा! ९. युद्धाची हाव. १०. 'आततायी' या शब्दाचा 'महा अपराधी' असा अर्थ आहे. कोणकोणत्या अपराध्याचा 'आततायी'शब्दांत सामावेश होतो हें एका श्लोकांत सांगितलें आहे, तो श्लोक असा:— 'अग्निदो गरदश्चैव शस्त्रपाणिर्धनापहः । क्षेत्रदारहरश्चैव षडेते **आततायिनः** ॥' याचा अर्थ:—आग लावणारा, विषप्रयोग करणारा, मारण्याकरितां हातांत शस्त्र घेणारा, धनाचें अपहरण करणारा, क्षेत्राचें हरण करणारा व स्त्रीचें हरण करणारा, असे हे सहा **'आततायी'** आहेत. ह्या श्लोकांत जे सहा आततायी सांगितले, त्यांशिवाय शाप देण्यासाठीं हात उगारणारा, मंत्रयोगानें मारणारा, राजापाशीं चहाडी सांगणारा, भार्येचा अतिक्रम करणारा व दुसऱ्याचें छिद्र पाहणारा, यांसही **'आततायी'** म्हणतात. ११. या नरनारायणांनीं. १२. वृक्ष. १३. अगत्यानें.

वि[1]बुधांसहित; । अग्नीस म्हणती कृष्णपार्थ, । 'निःशंक आतां वेढाळीं.'॥१४१॥ विशेषें मातला महावन्ही । अपार भक्षिल्या श्वापदश्रेणी । वनस्पतींच्या रसपानीं । [2]ज्वाळाजिव्हा तोषल्या. ॥ १४२ ॥ वन्ही तोषला स्तवी चांग, ।'अनंतयुगीं अनंत याग, । ऋषीराजीं केले सांग । परी मी तृप्त न झालों.॥१४३॥ वसोनि शंकराचे [3]दृष्टी । प्रळयीं भक्षिली सर्व सृष्टी, । परी आजिच्या ऐसी तुष्टी । नाहीं तेथें पावलों. ॥ १४४ ॥ वसवूनि शेषाचीं मुखबिळें । युगांतीं दाहिलीं [4]सप्त पाताळें । परी आजिच्या ऐसी ते काळें । तृप्ती नाहीं पावलों. ॥ १४५ ॥ फळाहार लंकादहनीं । आजी पारणें सुखभोजनीं । तुमचे उपकार उभयवदनीं । बोलों न शकें सर्वथा. ॥ १४६ ॥ शत्रु वधूनियां सर्व [5]धरित्री । अर्जुना! भोगिसी एकछत्री । कृष्णनाम स्मरतां वह्नीं । [6]सायुज्यपदीं पावसी.' ॥ १४७ ॥ ऐसिया आशीर्वादशब्दें । गर्जना कीजे [7]जातवेदें, । खांडव भक्षितां सुस्वादें । परम तृप्ती पावला. ॥ १४८ ॥ [8]मय दानव नमुचीचा भ्राता । पूर्वी मंदोदरीचा पिता । शिल्पविद्येचा मुख्य वि[9]धाता । वि[10]श्वकर्मा असुरांचा.॥१४९॥ त्याचा वास खांडववनीं । वन्हिभेणें पळतां गगनीं । पावकें दावितां चक्रपाणी । चक्र काढी वधावया. ॥ १५० ॥ प्राणभयें आक्रंदोन । अर्जुनासीं आला शरण । पार्थें दिधलें आश्वासन, । 'तूतें न [11]मारीं सर्वथा.' ॥ १५१ ॥ अर्जुनें देतां अभयवचन । चक्र [12]ओवरी मधुसूदन, । यापरी मय वांचला आन । [13]तक्षकपुत्र दुसरा. ॥ १५२ ॥ ऋषेश्वरवीर्य शार्ङ्गपक्षी । चौघे वांचले पावककुक्षीं । असे हे खांडवभक्षीं । [14]सौंही प्राणें वांचले. ॥ १५३ ॥ [15]सारंग वांचले वैश्वानरीं । [16]ते कथा परिसावी पुढारीं । व्यास वदला ते अवसरीं ।

---

१. देवांसह. २. 'सप्तजिव्हा' असा अन्य पाठ आहे. ३. तृतीयनेत्रीं. शिवाला तीन नेत्र असून ते श्वेतभानु (सोम), बृहद्भानु (अग्नि) आणि भानु (सूर्य) होत असें वर्णन आहे. 'श्वेतभानुबृहद्भानुभानुभासितचक्षुषे' असें श्लोकार्ध आहे. [स्तुतिकुसुमांजलि–स्तोत्र २ श्लो० ६.] ४. आतल, वितल, सुतल, रसातल, महातल, तलातल आणि पाताल अशीं सात पाताळें. ५. पृथ्वी. ६. मोक्षपदीं. ७. अग्नीनें. ८. अध्याय २२८ श्लो० ३९-४५ पहा. ९. कर्ता. १०. मयासुर. या अग्निप्रलयापासून अर्जुनानें नमुचीचा बंधु मयासुर याचें संरक्षण केलें. हे उपकार फेडण्यासाठीं मयासुरानें मोठ्या कौशल्यानें पांडवांकरितां एक उत्तम सभागृह बांधिलें. ११. तक्षकाच्या गृहांतून पळत असतां मयासुराला कृष्णानें पाहिलें व त्यास चक्र मारण्यास उद्युक्त झाला. १२. अध्याय २२८ श्लो० ४३-४४ पहा. १३. अश्वसेन. १४. अध्याय २२८ श्लो० ४७ पहा. १५. शार्ङ्गकपक्षी. १६. 'पावक तृप्त झाला परोपरी । खांडवदहन अनल करी । ऐशी कथा जाहली॥' असा अन्य पाठ. 'खांडववनदहन केलें । सारंग अनळें वांचविले । तें पाहिजे परिसिलें । व्यासवचनें निर्धारें ॥' अशा या ओंवीचा आणखी पाठभेद आहे.

मुक्तेश्वरकवि वदे. ॥ १९४ ॥ मुक्तेश्वरकवि वदे । कृष्णपांडवांची बिरुदें । अमृतरस रसमर्दे । श्रद्धा सुधा सरेना. ॥ १९५ ॥

अध्याय पन्नासावा.[1]

राजा पुसे अतिआवडी, । 'वैशंपायना! संशय फेडीं, । प्रळयपावकाचे तोंडीं । पक्षी कैसे वांचले? ॥ १ ॥ हे कथेचा वर्षोनि घन[2] । निववीं माझे संतप्त श्रवण[3]'. । तंव वक्ता वदे त्रिलोचन[4] । स्कंदाप्रती[5] पैं जैसा. ॥ २ ॥ म्हणे, '[6]कुरुकुलनलिनीसूर्या! । सावध परिसें जन्मेजया! । [7]खांडवदाहीं त्या पक्षियां । वन्हिराजें रक्षिलें. ॥ ३ ॥ [8]मंदपालनामें ऋषी । तपोतेजें प्रकाशराशी । शरीर दंडोनि सायासीं । पुण्यें अपार जोडिलीं. ॥ ४ ॥ श्रेष्ठधर्मज्ञाच्चिये पंक्ती । [9]ऊर्ध्वरेता, [10]शंसितव्रती, । स्वाध्यायशील, [11]मनोवृत्ती । निरोधूनि वर्तता. ॥ ५ ॥ देह त्यागूनि काळगती । [12]पावला पितृलोकाप्रती, । दिव्यभोगाची संपत्ती । सामर्थ्य होतां दिसेना[13]. ॥ ६ ॥ कोणी न करिती बहुमान । बैसावया न देती स्थान, । हें देखोनि अतिउद्विग्न । [14]धर्मराजातें विचारी. ॥ ७ ॥ '[15]जोडोनि पुण्याचे पर्वत । बहुसायासीं पावलों येथ, । संतोष फळ न होतां प्राप्त । खेद अद्भुत वाटतसे.' ॥ ८ ॥ [16]धर्मराज म्हणे, 'ऐक गोष्टी । पुण्य अपार तुझिये गांठीं, । पुत्रसंतती नाहीं पोटीं । तेणें कष्टी तूं येथें. ॥ ९ ॥ जो कां प्राणी [17]प्रजाहीन । तो ये लोकीं न पावे मान, । यालागीं जाईं तूं परतोन । मनुष्यलोका मागुती. ॥ १० ॥ [18]भलता वर्ण भलती जाती । भलती धरून देहाकृती ।

---

१. या अध्यायाला 'खांडववनदाह' असें नांव जुन्या दोन पोथींत आहे. २. मेघ. ३. कान. ४. शंकर. ५. कार्तिकेयाप्रति. ६. कुरुवंशरूप कमलिनीला सूर्याप्रमाणें विकसित करणाऱ्या भूपा. ७. 'खांडव दाहितां' असा अन्य पाठ. ८. मंदपाल नामें एक मोठा जितेंद्रिय ऋषि होता, त्याला पुत्रसंतान नसल्यामुळें पितृलोकसंबंधीं फल मिळालें नाहीं. तेव्हां त्यानें पक्षियोनींत जरिता नामक पक्षिणीशीं संग करून प्रजोत्पत्ति केली. ती जरिता आपल्या चार बालकांसह खांडववनांत राहत असे. अग्नि हें वन दहन करण्यास आला, तेव्हां मंदपालानें त्याची आराधना करून 'माझ्या मुलांस दग्ध करूं नको,' अशी प्रार्थना केली. ती अग्नीनें प्रसन्न होऊन मान्य केली आणि त्याप्रमाणें चार शार्ङ्गक पक्ष्यांस दग्ध केलें नाहीं. ९. विजितेंद्रिय. १०. प्रशंसिलें व्रत ज्याचें असा. ११. मनोधर्म. १२. मरण पावला. १३. अध्याय २२९ श्लो० ७-८ पहा. १४. यमधर्मातें. १५. अ. २२९ श्लो० ९-१० पहा. १६. 'देव म्हणतात' असें मूळांत आहे. १७. अनपत्य, पुत्ररहित. १८. या विधानास मूळांत आधार नाहीं. 'अपत्यसंतानीं यत्न कर' असें देवाचें वचन मूळांत आहे. [अ० २२९ श्लो० १४.]

भलते योनींत संतती । संपादावी प्रयत्नें. ॥ ११ ॥ संग्रहीं असे पुण्य बहुत । जातिस्मरणें जन्मती सुत । आवडे ते योनीआंत । पुत्र अपार निपजवीं. ॥१२॥ यज्ञें परिहार देवरिण । ब्रह्मचर्यें ऋषीच्या रिणा । संततीनें पितृरिणा । उत्तीर्णता जाणिजे. ॥ १३ ॥ पुत्रसंततीनें देख । देवलोकीं पाविजे सुख । येऱ्हवीं विश्रांतीचें मुख । कदाकाळें न देखसी.' ॥१४॥ धर्मराजाचिये वचनीं । मृत्युलोका पातला मुनी, । अटण करितां खांडववनीं । प्रवेशला दारार्थी. ॥ १५ ॥ म्हणे, 'कवणे योनीआंत । शीघ्र संतती उपजे बहुत ?' । तव अंडजखाणींत असंख्यात । संतानवृद्धी देखिली. ॥ १६ ॥ घेऊन पक्षियाची आंगवणी । जातीची सारंगपक्षिणी । जरिता नामें केली पत्नी । तियेसंगीं रतला. ॥ १७ ॥ आत्मवीर्यें तिचे उदरीं । पुत्र निर्मिले विहंगम चारी । त्यांचीं नामें तूं अवधारीं । जन्मेजया ! महींद्रा ! ॥ १८ ॥ जरतारि आणि सारिसृक्क । स्तंबमित्र द्रोण देख । सारंगपक्षी सुलक्षणिक । ऋषिवीर्यें जन्मले. ॥ १९ ॥ चौघे पुत्रेंसीं जरिता अंतुरी । वनीं ठेवूनि तरुकोटरीं । लपिता नामें भार्या दुसरी । तिये भेटी निघाला. ॥ २० ॥ पुढील भविष्य जाणोनि मना । वन्ही जाळील खांडववना । बाळें नेणती अंगना । येथें प्राणें उरवावीं. ॥ २१ ॥ म्हणोनि गेला वन्हीप्रती । नमस्कारूनि करी विनंती, । 'माझी दाराकुमरवस्ती । खांडववनीं स्वामिया ! ॥ २२ ॥ खांडवदाह करितां वन्ही ! । पांचही रक्षावीं कृपा[11] करूनी'. । 'अवश्य' म्हणोनि अभयपाणी । अग्नीनें माथां ठेविला. ॥ २३ ॥ भाष घेऊनि विश्वासेसीं । ऋषी गेला लपितेपासीं; । मागां माजला चौफासीं । खांडवारण्यीं पावक. ॥ २४ ॥ वृक्ष भक्षीत कडकडाटें । श्वापदें जाळीत धडधडाटें,[12] । निकट येतां हव्यवाटें[13] । जरिता.

---

१. मागें पृष्ठ २३७ टीप १ पहा. २. मंदपाळ. ३. स्त्रीलाभेच्छु. ४. प्राण्यांचे चार भेद गणिले आहेत:—अंडज, जरायुज, स्वेदज आणि उद्भिज. अंडज म्ह० अंडापासून झालेले सर्प, मासे, पक्षी इत्यादिक; आणि जरायुज म्ह० जरायूंत (गर्भकोषांत) उत्पन्न होणारे मनुष्य, पश्वादिक प्राणी. जारज हा जरायुज ह्या शब्दाचा अपभ्रंश होय. (मनुस्मृति—अ० १ श्लो० ४३-४६.) ५. शार्ङ्गिका. ६. रत झाला. ७. पक्षी. ८. ऐक. ९. अध्याय २३० श्लो० ९-१० पहा. १०. स्त्री. ११. अध्याय २२९ श्लो० ३३-३४ पहा. १२. जळण्याची क्रिया घडतांना जो शब्द होतो=धडधड. अशा शब्दाला अनुकरणवाचक शब्द म्हणतात. अशा शब्दांचीं अनेक रूपें असतात—जसें धडाधड, धडधडा इत्यादि. "या अशा अनुकरणरूप शब्दांचा या महाराष्ट्र भाषेंत जितका भरणा असेल तितका, मला वाटतें, आणखी कोणत्याही भाषेंत नसेल, आणि तो या भाषेचा केवळ असाधारण जिव्हाळा होऊन राहिला आहे; गति, वेग, मांजुल्य, कार्कश्य, सौंदर्य, परिमिति

मोहें [1]जाकळे. ॥२५॥ 'पक्षहीन कोमल बाळीं । उडों न शकती [2]अंतराळीं,। पुत्र कवळोनि हृदयकमळीं । काळानळीं प्रवेशे. ॥ २६ ॥ [3]कनिष्ठस्त्रियेची आसक्ती । पुत्रस्नेह सांडोनि चित्तीं, । पिता गेला लपितेप्रती । तो हे आकांतीं असेना. ॥ २७ ॥ नूतन भार्येची [4]कामकळा । वाढल्या, नर होय आंधळा, । सुकल्या सांडिजे [5]सुमनमाळा । जीर्ण भार्या त्या रीती. ॥ २८ ॥ कनिष्ठभार्येची आवडी । पुत्रोत्पादनीं इच्छा गाढी, । ज्येष्ठस्त्रियेचीं बाळें सांडी । [6]कटुकफळासारिखीं. ॥ २९ ॥ कुटुंब ओपूनि [7]जातवेदीं । मनीं वेधिला [8]कामव्याधीं । कनिष्ठभार्येच्या कामसंधी । प्राणधाकें दडाला. ॥ ३० ॥ या अनिवार हुताशना । वारूनि कवण रक्षील प्राणा? । काय करूं नारायणा! । जीवदान तूं देईं.' ॥ ३१ ॥ पुत्र म्हणती, 'ऐक माते! । उड्डाण करूनि गगनपंथें । तूं जाई मंदपाल जेथें । स्नेह चित्तें सांडोनी. ॥ ३२ ॥ बोढवल्या एकत्र मरण, । उरे तेणें उरविजे प्राण, । मोहें अंगीकारितां [9]निधन । आत्मघात बोलिजे. ॥ ३३ ॥ पक्षहीनें चक्षुहीनें । आम्हीं [10]सांडवलों सर्वयत्नें । आम्हांलागीं प्राण देणें । हा [11]अविवेक सर्वथा. ॥ ३४ ॥ तूंहि तरुण रूपवती । प्रीती वसतां पतिसंगातीं । अपार लाधसी संतती । आम्हांहूनि विशेष.' ॥३५॥ माता बोले रुदितमुखी, । 'तुम्हां ओपोनियां पावकीं, । म्यां जाऊनि मृत्युलोकीं । किति काळ वांचणें? ॥ ३६ ॥ तुमच्या वियोगाचें दुःख । देह असे तंव करणें शोक, । पुढती विश्रांतीचें सुख । स्वप्नींहि परी न देखों. ॥ ३७ ॥ पांचही प्रवेशूं हुताशनीं । दिसे तरी उपाय करिजे यत्नीं । [12]संकटें

इत्यादि क्रियेचे शतावधि प्रकार दाखवावयाचे असतां, त्या त्या अनुकरणरूप शब्दांचा प्रयोग होतो. जसें:—**झटझट** चालतो; **चमचम** लवते; **टकमक** पाहते; **झणझण** वाजतें; **बदबद** पडतें; **टपटप** झरतें; **भडभड** ओकतो; **तडतड** बोलतो; 'छडी वाजे **छमछम** विद्या येई **घमघम**.' (दादोकृत व्याकरण.) **मुक्तेश्वरानें** असे अनुकरणवाचक शब्द योजून कोठें कोठें मोठी बहार करून दिली आहे. अशा स्थळीं अर्थ आणि ध्वनि हे परस्परांस इतके अनुरूप आणि अनुगुण आहेत कीं त्यांवरून **मुक्तेश्वराचें** समर्पक शब्दरचनाचातुर्य सुव्यक्त होतें. १३. अग्नीनें.

१. पोळे, जळे. (अ० २३० श्लो० ३-११ यांत जरिताभाषण आहे.) २. आकाशांत. ३. लपितेची. ४. हें प्राचीनकाळचें वर्णन पाहून वर्तमानस्थितींत कांहीं फरक पडला आहे असें म्हणवत नाहीं. हें वर्णन विद्यमान लोकस्थितीला तंतोतंत लागू पडतें. ५. वाळलेल्या, कोमजलेल्या पुष्पांची माळा ६. कुड्याच्या फळासारखीं. ७. अग्नींत. ८. कामरूप व्याधानें (पारध्यानें). ९. मरण. १०. सांडवणें=मुकणें. ११. आम्ही नष्ट झालों तरी चालेल, कारण तुला आणखी पुत्र होतील आणि कुलसंतति वाढेल, यास्तव तूं आम्हांला टाकून जेथें अग्नि नसेल तेथें जा—असें पुत्रांच्या भाषणांचें तात्पर्य आहे. १२. ह्या दोन चरणांत सुंदर 'पर्यायोक्त' आहे.

पळती ज्याच्या स्मरणीं । तो चक्रपाणी आठवा. ॥ ३८ ॥ धरातळीं मूषकबिळ । म्यां रक्षिलें अतिविशाळ, । त्यामाजी प्रवेश करूं सकळ । चित्त विकळ न करितां. ॥ ३९ ॥ पक्षें वोढूनियां माती । द्वार आच्छादीन निगुती । वन्ही शांत झालिया पुढती । सुखें बाहेर निघावें.' ॥ ४० ॥ पुत्र म्हणती, 'ऐक वचन । गँगनचारिया आम्हा जाण । बिळवासियें न लागतां क्षण । भक्षण करिती निर्धारें. ॥ ४१ ॥ या दुर्मरणें शरीरनाश । त्याहूनि पवित्र हुताश । धैर्यें करितां येथें प्रवेश । श्रेय पावों परलोकीं.' ॥ ४२ ॥ माता यथार्थ सांगे कुमरा, । 'मूषक येतांचि विवरद्वारा, । श्येनपक्षियें अंबरा । झडपूनि नेला भक्षणार्थ. ॥ ४३ ॥ आतां विवरीं नसे कोणी । तुम्ही रिघावें निर्भय मनीं, । सहजें शांत झालिया वन्ही । पुढती यावें स्वस्थळा.' ॥ ४४ ॥ पुत्र म्हणती, 'नेला ऐक, । विवरीं असती वो! अनेक, । तेथें रिघतां तात्काळिक । भक्षण करिती आमुचें. ॥ ४५ ॥ संकट वोढवल्या दारुण । श्रेष्ठासीच जावें शरण । नीच सेवितां जघन्य । हें लांछन श्रेष्ठातें. ॥ ४६ ॥ जव अपाय स्पर्श न कीजे, । तव चिंतायत्नीं शिणिजे, । अनर्थ आदळल्या होइजे । महामेरू धैर्याचा. ॥ ४७ ॥ सांपडल्या वन्हिचक्रीं, । नौका बुडतां महासमुद्रीं, । एकला शूर बहुतांवरी । नानाशस्त्रीं मारिजे. ॥ ४८ ॥ नृपें वधितां बळात्कारीं, । विजनीं प्राण घेतां चोरीं, । रोगें पीडिला देशांतरीं, । द्रव्यहीन एकला.॥४९॥ सुखें न भाषितां करुणा । धैर्यें देह ओपी मरणा, । तो अक्षयस्वर्गभुवना । पावे जैसा यागांतीं[12]. ॥ ५० ॥ त्यातें देवकन्या[13] पाही । गौंढालिंगनीं[14] कवळूनि बांहीं[15], ।

---

१. आखुबिल. (अध्याय २३० श्लो० १६-१८.) २. व्यथित, आर्त. ३. पक्ष्यांस. ४. बिळांत राहणारे. ५. अध्याय २३० श्लो० १९-२२ पहा. ६. अग्नि. ७. जरिता. ८. आकाशांत. ९. शिरावें. १०. मूषक. ११. हलका, नीच. १२. यज्ञाच्या अखेरीस. १३. अप्सरा. १४. रणांत पाठ न दाखवितां, संमुख उभें राहून जे वीर धारातीर्थीं प्राण देतात त्यांच्या गळ्यांत अप्सरा माळ घालतात अथवा ते सूर्यमंडळास भेदून वर ब्रह्मलोकास जातात–असें शास्त्रांत सांगितलें आहे. या गोष्टीवर येथें लक्ष ठेवून वर्णन केलें आहे. असें वर्णन संस्कृतांत वारंवार आढळतें:–(१) उद्दंडे भुजदंडे तव कोदंडे परिस्फुरति । अरिमंडलरविमंडलरंभाकुचमंडलानि वेपंते. ॥ (२) सूचीमात्रविभेदसंभ्रमगुणः क्षोणीशवामभ्रुवामुत्तुंगस्तनमंडलेषु लभते लीलारतिं कंचुकः । नाराचैर्निबिडैर्विभिन्नवपुषां पुसां महायोधने स्वर्गश्रीकुचकुंभसंभ्रमपरीरंभः कथं दुर्लभः ॥ (३) विपक्षशस्त्रक्षपणैः पुनः पुनः क्षताखिलग्रंथि निजास्थिपंजरम् । चकार चंडद्युतिमंडलोदरे सुखप्रवेशार्थमिवापरो भटः ॥ (४) द्वाविमौ पुरुषव्याघ्र सूर्यमंडलभेदिनौ । परिव्राड् योगयुक्तश्च रणे चाभिमुखो हतः ॥ यांचा भावार्थ–(१) हे राजा! तुझ्या बळाढ्य बाहुदंडावर धनुष्य चढलें असतां, शत्रुमंडल, सूर्यमंडल आणि रंभाकुचमंडल हीं कांपूं लागतात. (२) केवळ सुईनें टोंचून घेतल्यामुळें जर कंचुकाला नृपांगनांच्या उन्नत स्तनमंडळावर विलास करायास मिळतें, तर रणांगणांत छिन्नगात्र झालेल्या योद्ध्यांस देवांगनांच्या कुचकुंभालिंगनाचा लाभ

भोगार्थ नेती हो! लवलाहीं । विमानयानीं संभ्रमें. ॥ ९१ ॥ पूर्वपुण्य असल्या गांठी । ईश्वरगुरूची कृपादृष्टी । प्रळय होतां सर्वसृष्टी । तेथें वांचती सभाग्य. ॥ ९२ ॥ महार्णवीं बुडतां नौका । तेथें शंकर रक्षी एका । ब्रह्मांडही भक्षितां पावका! । तेथें वांचवी एकातें. ॥ ९३ ॥ दुष्काळीं वांचती द्रव्यहीन । शस्त्र मारितां उरती प्राण । तैसें विपरीत झालिया जाण । पुढतीं भेटों मागुती. ॥ ९४ ॥ आतां धैर्य धरोनि चित्तीं । वेगें जाईं वेल्लभाप्रती, । आमचे चिंतेच्या आवर्ती । भ्रमों नको सर्वथा.' ॥ ९५ ॥ ऐकोनि कुमराचिया उत्तरा । देखोनि र्‍यासुरवैश्वानरा । जरिता लंघूनि अंबरा । वनांतरा प्रवेशे. ॥ ९६ ॥ समीप येतां हुताशन । चौघींजणीं करूनि नमन, । म्हणती, 'आतां तुजवांचोन । रक्षक आम्हां असेना. ॥ ९७ ॥ तूं परमात्मा परंज्योती । त्रिधारूपें आलासि व्यक्ती । प्रळय आणि उत्पत्ति स्थिती । होती जगा तुझेनी. ॥ ९८ ॥ तुजवेगळी आहे वस्तु । बोलती ते मिथ्या मातु, । तूं चैतन्य सदोदितु । सर्वरूपी सर्वात्मा. ॥ ९९ ॥ तूं वससी विश्वकुक्षीं । म्हणोनि त्रिविधकर्मसाक्षी । प्रवेशोनि जगाचे चक्षीं । सर्व केले डोळस. ॥ ६० ॥ तूं विराटपुरुषाची वाचा । शब्दीं अर्थ स्वरूप साचा, । उदरीं वसोनि विश्वाच्या । पचन करिसी अन्नातें. ॥ ६१ ॥ फेडावया अज्ञानतमा । तूंचि झालासि सूर्यप्रतिमा, ।

घडला, त्यांत आश्चर्य कसचें? (३) एक वीर आपणास सूर्यमंडळांत प्रवेश करतां यावा म्हणूनच काय शस्त्रांनीं आपल्या अस्थिपंजराच्या ग्रंथि तोडिता झाला. (४) दोघे सूर्यमंडळाचा भेद करणारे होत. एक योगी व एक धारातीर्थीं मरण पावलेला वीर. याच अर्थाचीं प्रसिद्ध कवींचीं वचनें अनेक आढळतात. १५. सुज्ञांनीं.

१. आदरानें. २. मंदपालाकडे. (अध्याय २३१ श्लो० १४.) ३. भोंवऱ्यांत. ४. तेजस्वी, देदीप्यमान. ५. आकाशा. ६. चौघे बंधु—जरितारि, सारिसृक्क, स्तंबमित्र आणि द्रोण. ७. "वांचून'—हें मूळचें 'ऊन'प्रत्ययांत धातुसाधित असून याचा अर्थ 'राहून' असा आहे. पण होतां होतां हें शब्दयोगी अव्यय बनलें आहे; जसें, 'त्याजवांचून त्याला घटकाभरही करमत नाहीं;' 'मजवांचून तें कोणास माहीत नाहीं.' इंग्रजी भाषेंतील या अर्थाचे शब्द—except, save,—यांचें असेंच व्याकरणांतर झालें आहे. हीं दोन्हीं मूळचीं आज्ञार्थक क्रियापदें होत; पण होतां होतां अव्ययें होऊन बसलीं. तसेंच संस्कृतांत या अर्थी 'परित्यज्य,' 'त्यक्त्वा,' 'विमुच्य,' 'हित्वा 'इत्यादि धातुसाधितांचा अव्ययांसारखा प्रयोग होतो. असो; तर याचप्रमाणें वरील शब्द जरी आतां अव्ययांतच मोडतो, तरी त्या पंक्तींत तो येणेंप्रमाणें गेला असावा:—'मज वांचून' म्हणजे 'मला सोडून' 'मला टाकून' असा अर्थ. आणि वास्तविक व्याकरणरीत्या पाहिलें असतां पहिलें रूप 'मी वांचून' असें असेलसें दिसतें. 'मी वांचून' हें संस्कृतांतील सति सप्तमीसारखें किंवा इंग्रजींतील Nominative Absolute या सारखें होय; आणि त्याचा अर्थ 'मी राहिलों असतां' समजायाचा. [निबंधमाला—अंक १८ पृ० २८-२९.] ८. अध्याय २३२ श्लो० १-१९ पहा. ९. तीन प्रकारच्या रूपांनीं. १०. नेत्रीं. ११. अ० २३१ श्लो० १५-१६ पहा.

रश्मीपासाव अतिउत्तमा । मेघमाळा निर्मिसी.॥ ६२ ॥ त्यापासोनि वर्षे उदक। करिसी औषधी अनेक । औषधीस्तव सुस्वादिक । अन्नें होती पवित्रें. ॥ ६३॥ अन्नापासाव निपजती भूतें । म्हणोनि कारण तूं जगातें । तूतें भजती ते जाणते। येर ते मूर्ख जाणावे. ॥ ६४ ॥ तुझेनि मुखें सकळां तृप्ती । ऐसें बोलती वेदश्रुती, । तुझेनि कर्मे फळा येती । येरवीं होती निर्बीजें. ॥ ६५ ॥ पाकयज्ञ हविर्यज्ञ । सोमसंस्था सप्तही जाण । इहीं नामीं तूं आपण । पूजा घेसी विश्वाची. ॥ ६६ ॥ तुझे पूजक सोळाजण । जे बोलिजे ऋत्विजगण । अष्टावि-

१. किरणांपासून. २. अध्याय २३१ श्लो० ७ पहा. ३. सोमसंस्था—अग्निहोत्र्याचे घरीं तीन अग्नि (गार्हपत्य, दक्षिणाग्नि व आवहनीय) असतात त्यांस 'श्रौताग्नि' म्हणतात. गृहस्थाचे घरीं जो अग्नि असतो त्याला स्मार्ताग्नि अथवा गृह्याग्नि म्हणतात. गृहस्थाच्या घरीं जीं गृह्याग्नीवर कर्में होतात तीं सर्व स्मार्त कर्में होत. अग्निहोत्र्याच्या घरीं श्रौताग्नीवर जीं कर्में होतात तीं सर्व श्रौतकर्में होत. श्रौताग्नीवर होणाऱ्या कर्मांचें तीन प्रकार आहेत:—हविःसंस्था, सोमसंस्था आणि उत्तरक्रतु. स्मार्ताग्नीवर (गृह्याग्नीवर) जीं कर्में होतात त्यांस पाकसंस्था म्हणतात. या प्रत्येक संस्थेमध्यें जीं कर्में समाविष्ट होतात तीं.—

श्रौतकर्म.			स्मार्त.
(१) हविसंस्था (श्रौत)	(२) सोमसंस्था (श्रौत)	(३) उत्तरक्रतु (श्रौत)	पाकसंस्था (स्मार्त)
अग्न्याधेय	अग्निष्टोम	अश्वमेध	श्रवणाकर्म
अग्निहोत्र	अत्यग्निष्टोम	सत्र	अश्वयुजी
दर्शपौर्णिमास	उकथ	राजसूय	प्रत्यवरोहण
चातुर्मास्य	षोडशी	पौंडरिक	आग्रयण (नवान्नेष्टि)
आग्रयणी	वाजपेय	सर्वमेध	पिंडपितृयज्ञ
निरूढपशुबंध	अतिरात्र	विश्वजित्	सर्पबलि
सौत्रामणि.	आप्तोर्याम	पुत्रेष्टि	अन्वष्टका

याप्रमाणें या चार संस्थांत अनेक श्रौतस्मार्त कर्मांचा समावेश होतो. प्रस्तुत ओवींत पाकयज्ञ हविर्यज्ञ असे शब्द आले आहेत ते पाकसंस्था आणि हविःसंस्था यांच्या ऐवजीं योजिलेले दिसतात. पाकसंस्थेंत पाक तयार करून त्याचें हवन करणें हें प्रमुख अंग असतें. हविःसंस्थेंत हवीचें (तुपाचें इत्यादि) हवन मुख्यत्वें करून असतें. सोमसंस्थेंत सोमलतेच्या रसाचें पान करणें हें मुख्य अंग होय. प्रत्येक संस्थेंत सात कर्में मुख्य असतात म्हणून 'सप्त'शब्दाची योजना केलेली आहे. ४. मागें पृष्ठ ७४-७५ ओव्या ७१-७३ पहा. ५. श्रौत कर्में करणाऱ्या यजमानाला जे साहाय्य करतात त्यांस ऋत्विज् म्हणतात. धनप्राप्तीच्या आशेनें हे यजमानास साहाय्य करणारे याजक होत. सोमसंस्थेंतील यज्ञास सोळा ऋत्विज् लागतात. यांत चार मुख्य असून प्रत्येकाच्या हाताखालीं लहानसान कामें करणारे तीन तीन याजक असतात. असे एकंदर सोळा होतात. होता, अध्वर्यु, ब्रह्मा आणि उद्गाता हे प्रमुख होत. होता याजपाशीं मैत्रावरुण, अच्छावाक् व ग्रावस्तोता; उद्गाता याजकाच्या हाताखालीं प्रस्तोता, प्रतिहर्ता व सुब्रह्मण्य; ब्रह्मा याजपाशीं ब्राह्मणाच्छंशी, पोता व

शति पात्रें करून । नित्य सेवे तिष्ठती. ॥ ६७ ॥ तुज सांडोनि प्रत्यक्ष ब्रह्मा । लोप करूनि विहितकर्मा । भजे पाषाणधातुप्रतिमा । तो मंदात्मा बोलिजे. ॥ ६८ ॥ तो हा ब्राह्मण सर्वभ्रष्ट । उभयलोकीं पावे कष्ट, । दरिद्रदोषें दंडिजे दुष्ट । होय निकृष्ट अल्पायुषी. ॥ ६९ ॥ समुद्र सरिता सरोवरें । तुवांचि भरिलीं आपुल्या नीरें, । तीर्थें मिरवती बेंडिवारें । तोय तुझें लाधल्या. ॥ ७० ॥ तुझ्या स्तवना वेगळा शब्दु । मुखाबाहिर न काढी वेदु, । तेथें पक्षी आम्हीं मंदु । काय समर्थु स्तवावया? ॥ ७१ ॥ वसवोनि समुद्राचें जठर । सुखें जीवविसी जळचर । व्यापूनियां जगाचें अंतर । सुख देशी सर्वांशी. ॥ ७२ ॥ तैसा शीतळ होऊनि आम्हां । आजि रक्षावें प्रकाशधामा! । दीनदयाळ यया नामा । आठवावें ये काळीं. ॥ ७३ ॥ जो तूं प्रळयींचा दावाग्नी। भूषणरूपें हराच्या नयनीं । वसोनि शेषाचिये वदनीं । न पोळिसी मुखातें. ॥ ७४ ॥ हिरण्यकश्यपें जाळितां सुत । पांडव जळतां जोहरांत । लंकेशि जाळितां हनुमंत । कृपा केली तयातें. ॥ ७५ ॥ गोकुळीं जळतां गोपाळ गाई । त्यांतें झालासि प्राणदाई । ते कृपेची भिक्षा काई । आजि घालीं आमुतें.' ॥ ७६ ॥ ऐकोनि पक्षियांचें वचन । वन्ही जाहला हास्यवदन, । म्हणे, 'ऋषिपुत्र! हो! मन । व्याकुळ कांहीं न करावें. ॥ ७७ ॥ मजपासूनि भयाच्या अनिळ । तुम्हांसि झगटेना अळुमाळ, । हेचिविषयीं मंदपाळ । प्रार्थुनि मातें गेलासे. ॥ ७८ ॥ स्वस्थळीं असा आनंदचित्तें । इच्छित कांहीं मागा

आग्नीध्र; आणि अध्वर्यूपाशीं प्रतिप्रस्थाता, नेष्टा व उन्नेता, अशी याजकांची व्यवस्था असते. अध्वर्यु यजुर्वेदी असून त्याचें काम अग्नींत आहुति देण्याचें, होता ऋग्वेदी असून त्याचें काम यज्ञांतील देवतांस स्तुतिपूर्वक आव्हान करण्याचें; उद्गाता सामवेदी असून त्याचें काम देवतांच्या संतोषार्थ सामवेदगायन करण्याचें; ब्रह्मा वेदत्रयीज्ञ असून त्याचें काम यज्ञांतील सर्व कामावर पैरवी ठेवण्याचें. या सोळा ऋत्विजांशिवाय सदस्य म्हणून एक असतो त्याचें काम न्यूनाधिक काय होतें हें पाहून व्यवस्था ठेवण्याचें. याला विधिदर्शी अथवा न्यूनाधिक विचारक म्हटलें तरी चालेल. ६. या अठ्ठावीस पात्रांचीं नांवें अशीं आहेतः—१ स्प्य, २ कपाल, ३ अग्निहोत्र हवनी, ४ शूर्प, ५ कृष्णाजिन, ६ शम्या, ७ उलूखल, ८ मुसळ, ९ दृषद, १० उपल, ११ स्रुवा, १२ जुहू, १३ उपभृत, १४. ध्रुवा, १५ वेद, १६ पात्री, १७ आज्यपात्र, १८ प्राशित्रहरण, १९ इडापात्र, २० प्रणीताप्रणयन, २१ योक्त्र, २२ मेक्षण, २३ प्रदती, २४ वेदाग्र, २५ अन्वाहार्यस्थाली, २६ उपवेशा, २७ विष्टलेप, २८ फलीकरणपात्र.

१. श्रौतस्मार्तकर्मा. २. नद्या. ३. उदकानें. ४. थोरवी, मोठेपणा. ५. हे प्रकाशगृहा! ६. प्रल्हाद. ७. जातुषालयाग्नींत. ८. वायु. ९. अणुमात्र.

मातें.' । पक्षी म्हणती, 'स्वामी! येथें । [2]वनमार्जार माजला. ॥ ७९ ॥ अखंड उपजवी मरणभया । अहोरात्र टपे भक्षावया । तें अरिष्ट दवडावया । तूंचि समर्थ आमुतें.' ॥ ८० ॥ ऐसें ऐकोनियां अनळ, । मार्जारबिळीं सूदली ज्वाळ, । बिडाळ जाळूनि तत्काळ । ऋषिपुत्रां शांतवी. ॥ ८१ ॥ वन्हि मावारला मागें, । पक्षी आनंदले आंगें । जरिता तेथें लगबगें । पुत्रमोहें पातली. ॥ ८२ ॥ आलिंगूनि चौघांजणा । स्नेहें करूनि दीर्घ रोदना, । म्हणे, 'दयाळा हुताशना! । पुत्रदान त्वां दीधलें.' ॥८३॥ मंदपाळ [4]म्हणे, 'लपिते! । खांडव दाहिलें वन्हिनाथें, । माझिया पुत्रां आणि वनिते । काय झालें कळेना?' ॥ ८४ ॥ येरी म्हणे, 'ऋषि पवित्र! । विशेषें पावकाचा मित्र । क्षेम असती तुझे पुत्र । चिंता कांहीं न करावी. ॥ ८५ ॥ जरी धैर्य न धरवे मना। तरी चालिजे खांडववना.' । लपितेसहित पूर्वस्थाना । मंदपाळ पातला.॥८६॥ समीप आलिया मंदपाळ, । निकट न ये एकही बाळ, । जरिता रुसोनि तत्काळ । पाठिमोरी बैसली. ॥ ८७ ॥ मायामोहें विचारी मुनी, । 'कां न बोलसी स्नेहवचनीं?' । जरिता म्हणे, 'आवडे मनीं । तेचि आपण सेवावी. ॥८८॥ संकटीं सांडूनि आमुतें । भाळलासि [5]नूतनवनितेतें, । दैवें वांचविलें पुत्रांतें । वन्ही जाहला कृपाळु.' ॥ ८९ ॥ ऋषि म्हणे, 'स्त्रियांची जाती । [6]सापत्नभावें सदां जळती । [7]वसिष्ठा निंदी अरुंधती । गौरी अन्हेरी हरातें. ॥ ९० ॥ संततिकामें [8]कामाथिला । मनुष्यलोकीं पावलों [9]वेहिला । सुरलोक पाहिजे साधला । म्हणूनि भार्या संग्रहिली. ॥ ९१ ॥ परिहरूनि तुमचें विघ्न । मग म्यां पुढें केलें गमन, । तैं तंव तुम्हां नाहीं ज्ञान । व्यर्थ दूषण ठेवितसां. ॥ ९२ ॥ प्रार्थूनियां पावकमूर्ती । मग मी गेलों लपितेप्रती, । तें तव नाठवूनि चित्तीं । कुटिल मातें म्हणतसां.' ॥ ९३ ॥ अनुवादोनि मधुरोत्तरें । [10]संबोखोनि दाराकुमरें । मंदपाळऋषेश्वरें । [11]निर्भयदेशातें नेलीं. ॥ ९४ ॥ [12]मघव्यासहित मरुद्गण । दिव्य विमानीं आरूढोन । पातला जेथें श्रीकृष्ण अर्जुन । करी नमन माधवा. ॥ ९५ ॥ म्हणे, 'पुरुषार्थ केला दोघीं, । सत्कीर्ति विस्तारली

---

१. अध्याय २३२ श्लोक २१-२४ पहा. २. मार्जार. ३. अध्याय २३३ श्लो० २-६ पहा. ४. अध्याय २३३ श्लोक ८-१३ पहा. 'माझी सपत्नी जी जरिता तिजविषयीं तूं शोक कां करतोस? तिच्यावर जसें प्रेम आहे तसें माझ्यावर नाहीं' इत्यादि लपितेचें भाषण येथें कवीनें गाळलें आहे. ५. भार्येतें. ६. वैरभावानें. ७. अध्याय २३३ श्लो० २८-३१ पहा. ८. कामपीडित. ९. सत्वर. १०. संबोखणें=सांत्वणें, शांतवन करणें. ११. अध्याय २३४ श्लो० ४ पहा. १२. इंद्रासहित. (मरुद्गणांसहित इंद्र कृष्णार्जुनापाशीं आला–असें मूळांत आहे.)

जगीं, । सेवा सांगावी मजलागीं । ते वंदीन मस्तकीं.' ॥ ९६ ॥ पार्थ म्हणे, 'सुरेश्वरू! । पुढें असे कारण थोरू । दिव्यास्त्रांचे संभारू । मातें देईं आपुले.' ॥ ९७ ॥ शक्र म्हणे, 'ऐक किरीटी ! । प्रसन्न होईल धूर्जटी¹, । तेवेळीं अस्त्रांचिया कोटी । मी ओपीन² निर्धारें³.' ॥ ९८ ॥ ऐसें सांगोनि दोघांजणा । केली त्रिवार प्रदक्षिणा । आरूढोनि मग विमाना । अमरभुवना तो गेला.॥ ९९ ॥ तृप्त होवोनि वन्हिनाथ । स्तवनीं पूजिले श्रीकृष्ण पार्थ, । पंचदशदिवसपर्यंत । खांडव स्वेच्छे भक्षिलें. ॥ १०० ॥ गांडीव चाप अक्षय भाते । विजयी रथ वानरकेतें⁴ । गदा चक्र पावकनाथें । उचित दोघां दीधलें. ॥ १०१ ॥ 'माझी हरिली शरीरव्याधी । तैशीच शत्रुभयाची आधी । खंडोनियां अक्षयपदीं । राज्य भोगीं अर्जुना!' ॥ १०२ ॥ पुसोनि पार्था नरोत्तमा । वंदोनि श्रीकृष्णपादपद्मा⁵, । पावक प्रवेशला निजधामा । पूर्णकाम संतोषें.॥ १०३ ॥ पूर्वीं जेथें सुहृदमेळीं । क्रीडत होते यमुनाकूळीं⁶ । तेथें अर्जुन वनमाळी । मयासहित पातले. ॥ १०४ ॥ अस्तमान झालिया सूर्या,। हर्षें पातला राजालया। कुंती आणी धर्मराया । अत्यादरें वंदिलें. ॥ १०५ ॥ तृप्ती पावोनि सुखभोजनीं । प्रवेशले विश्रांतिसदनीं । पुढें वदले व्यासमुनी । तें सज्जनीं परिसावें. ॥ १०६ ॥ अर्जुनें कृष्णस्तवन केलें । आनंदघन आनंदले । पांडव पादपद्मा लागले । मनोभावें परियेसाँ⁷. ॥ १०७ ॥

उपसंहार.

(ओंवी.)

येथूनि सरलें आदिपर्व । अठरांमाजि अतिअपूर्व ।
ज्याच्या श्रवणें दोष सर्व । भस्म होती क्षणार्धें. ॥ १

देवांमाजी जैसा शर्व । ऋषींमाजी भार्गव और्व, ।
तैसें हें अपूर्वापूर्व⁸ । आदिपर्व भारतीं. ॥ २

---

१. महादेव. (श्लो० १०.) २ अर्पीन. ३. निश्चयानें. ४. वानरयुक्त ध्वज. ध्वजावर घोडा बैल इत्यादिकांचें चित्र काढण्याचा परिपाठ होता त्यास अनुलक्षून हें वर्णन आहे. श्रीधरानेंही असेंच वर्णन केलें आहे:-'कर्णाचे ध्वजीं रेखिला कुंजर । पार्थध्वजीं वायुकुमर । दोहीं दळीं वाद्यगजर । तुंबळ जाहला तेधवां. ॥ ९ ॥ कुंजर रेखित कर्णध्वज । विदारीत वायुतनुज. ॥२८॥[पांडवप्रताप-अध्याय ४९.] ५. चरणकमळाला. ६. कूल=तीर, तट. ७. येथें 'मयदर्शनपर्व' संपलें. या अध्यायांत मूळांतील २२९-२३४ या अध्यायांचा सारांश ग्रथित झाला आहे. मंदपालजरितापुत्रोत्पत्ति' जरितेचा आणि पुत्रांचा संवाद, जरितेचें पुत्रांस सोडून जाणें, जरितापुत्रांचा परस्पर संवाद, मंदपालाचा लपितेशीं आणि जरितेशीं संवाद, जरितामंदपालाचा संवाद, आणि वरप्राप्ति-असे विषय या अध्यायांत आहेत. ८. अपूर्वांमध्यें अपूर्व.

नवरस सुधार्णव[1] । भंगी ग्रंथकथेचा गर्व, ।
तें हें अपूर्वापूर्व । आदिपर्व भारतीं. ॥ ३
सरलें आदिपर्व विशाळ । पुढां सभापर्व रसाळ ।
श्रोतीं करूनि मन निश्चळ । सावधान परिसावें. ॥ ४
पुढील निरूपण दिव्य मुंदिर[2] । श्रोते यांचें मन मयूर ।
तांडव[3] नाचती ते चतुर । कौतुकें डोळां देखती. ॥ ५
प्रसिद्ध महाराष्ट्रदेशीं । गोदावरीतटनिवासी ।
अत्रिगोत्र[4] पवित्रवंशीं । जन्म जाहला जयातें. ॥ ६
तो चिंतामणिभूदेवकुमर[5] । श्रीदत्तांघ्रिपद्मभ्रमर,[6] ।
श्रोतयां विनवी मुक्तेश्वर । क्षमा कीजे समस्तीं. ॥ ७
करवीरलक्ष्मी[7] विष्णुभाजा । भैरव सुवर्णपुरींचा राजा ।
उभय कुळदैवतीं माझा । मस्तक पायीं स्पर्शिला. ॥ ८
तेणें बळें परम सुखीं । श्लाघ्यता पावलों उभय लोकीं ।
सद्गुरुकृपामातृअंकीं । योग्य झालों बैसावया. ॥ ९
व्यासभारतामाजी देखा । दोनशतें त्रिशती संख्या ।
अध्याय[8] नेमिले त्यां श्लोकां । गणना किती ते परियेसा. ॥ १०
आठसहस्र[9] नव शतें । श्लोक चौऱ्याशीं वरी निरुतें ।
संख्या सत्यवतीच्या सुतें । आदिपर्वीं बोलिजे. ॥ ११
तेंचि प्रमेय देशभाषे । मुक्तेश्वरकविनरेशें ।
कथिलें, कळेनकळे ऐसें । गोड कीजे सज्जनीं. ॥ १२

---

१. अमृताचा सागर (अर्णव). २. मेघ. [मोद देणारा जो तो मुदिर.] ३. मोर मेघांस पाहून नाचतात. ४. मुक्तेश्वर हा अत्रिगोत्रोत्पन्न ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण होता. हा पैठणाचा राहणारा म्हणून त्यास 'गोदावरीतटनिवासी' असें म्हटलें आहे. ५. याच्या बापाचें नांव चिंतामणि ऊर्फ विश्वंभर असें होतें. मुक्तेश्वरानें आपल्या मातापितरांच्या नांवांचा निर्देश 'लीलाविश्वंभर' या सामासिक पदानें अनेक ठिकाणीं केला आहे. [मुक्तेश्वर–रामायण–उपसंहार पृ० १६६.] ६. हा श्रीदत्ताचा उपासक होता. ७. कोल्हापुरची महालक्ष्मी ही याची कुलस्वामिनी व कर्नाटकांतील सोनारीचा (सुवर्णपुरीचा) राजा बहिरोबा (भैरव) हा याचा कुलस्वामी अशीं हीं याचीं दोन कुलदैवतें होतीं. ८. व्यासकृत भारताच्या आदिपर्वांत २३० अध्याय आहेत असें मुक्तेश्वर म्हणतो; पण विद्यमान मुद्रांकित जें पुस्तक उपलब्ध आहे त्यांत २३४ अध्याय आहेत. ९. आदिपर्वांत ८९८४ श्लोक आहेत असें मुक्तेश्वर म्हणतो.

मुक्तेश्वरकृत महाभारत-आदिपर्वाचीं परिशिष्टें.

१. पाठभेद.

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
		अध्याय पहिला.		
१	१	ॐ नमो जी विश्वभरा स्वामी!	ॐ नमो लीलाविश्वंभर स्वामी!	१
३	३	जेथें नमन एका सभावो	तेथें आनंद मनें एकात्म भाव	,,
७	१	माथां स्पर्शोनि स्नेहामृत	माथांपासोनि स्नेह मत्त	,,
११	३	कर्पूरगौर गजाजिन	कर्पूरगौर जो जगज्जीवन	,,
२५	२	स्कंदीं विरूढला	कदंब विरूढला	२
३५	३	दोहनमंथनावांचूनि सत्वरीं	तें भारत काढूनि लवकरीं	३
३७	१	वीणापुस्तकधारिणी	वीणापुस्तकशुकधारिणी	,,
४९	३	दंभाचार सांडिला मनीं	भेदसंचार सोडिला जनीं	४
६०	१	भेटतां भेटवी क्रोध काम	भेद कां अभेद क्रोध काम	,,
६३	१	वेदशास्त्राचें सदन	देवत्रयाचें सदन	,,
७४	२	भाष्याचार्य	भीष्माचार्य	५
,,	४	शेष विशेषें वंदिला	भाष्यविशेष वंदाविले	,,
८५	३	तुम्ही कराल तरि होय निका	तुम्ही शेष होउनियां देखा	६
,,	४	तोचि अगस्ति कीं शेष	साह्य करणें मजलागीं	,,
९५	४	अनुसंधानशृंखला	अनुसंधान लागलें	,,
१००	२	सौती पुराणीक सुज्ञानी	ऐसे पुराणिक शुकज्ञानी	,,
११३	१	चवदा लक्ष	पाऊण लक्ष	७
,,	३	एक लक्ष	सवा लक्ष	,,
१३३	४	भीम भीमपराक्रमी	भीमार्जुन पराक्रमी	८
१५२	१।२।३	युद्धीं कश्मल पावतां कीरीटी। कृष्णें विश्वरूप दाविलें पोटीं। तेव्हां जयाची गोष्टी।	युद्धीं विश्वरूप कीरीटी-। लागिं दाविलें त्रैलोक्य पोटीं। कृष्णें, तेव्हां जयाची गोष्टी।	९
१९७	४	इतिहासरूपें अगस्ती	इतिहासरूपें असती	१२
१९८	१	श्राद्धीं ब्रह्मविद ब्राह्मण	श्राद्धीं कोविद ब्राह्मण	,,
,,	२	आमंत्रितां तृप्ति पितरां संपूर्ण	एकें तृप्त पितृ संपूर्ण	,,

ओंवी.	चरण.	मूळपाठ,	पाठांतर.	पृष्ठांक
		अध्याय दुसरा.		
८	२	तंव अन्याय शिवला दिसे अंगा	तंव अन्याय वर्तला असे आंगा	१२
,,	३	हें जाणोनि व्यापार उगा	म्हणोनि व्यापार उगा	,,
१०	३	त्या वनीं देखिला ब्रह्मऋषी	नयनीं देखिला महा ऋषी	१३
११	२	जो कां सिद्धी पाववी होमा	जो सिद्धी पाववी धर्मा	,,
१८	३	धैर्य करूनि पिंडपाथरु	धैर्य करूनि जळपाथरु	,,
१९	२	सद्गुरु म्हणे आरुणि कां नाहीं	तव श्रीगुरु म्हणे आरुणि नाहीं	,,
२२	२	संपत्ति	संतति	,,
२४	३	कंडूयनें	कंडूयमानें	,,
४१	१	पीडिला	पडिला	१४
५०	३	स्नेहाच्या बाहुवटीं	देहाची बाहुटी	१५
५६	१	अन्वोरणें	आचरणें	,,
,,	२	लोकीं	लौकिकीं	,,
६४	४	तो जात्या द्विपाद पशू	तो जात्य स्वपरि पशू	,,
७१	१	उत्तम	उत्तंक	१६
१३३	४	अपान	आपण	१९
१३४	२	नासिकीं	पावकीं	,,
१५१	१	पौष्याख्यान	महद्राख्यान	२०
,,	३	श्रीगुरुपदीं	श्रीगुरुभजनीं	,,
		अध्याय तिसरा.		
१	४	परमप्रीती	परम पवित्र	२०
१४	३	वाहुनि नेतां	पृथ्वीं वाहुनि नेतां	२१
१८	३	नदी लोटली	नदीप्रवाह लोटला	,,
५६	२	सांडी	मोडी	२३
५९	३	शब्द	मंत्र	,,
,,	४	आम्ही	तुम्ही	,,
६१	४	दूतांचें	रुरु त्यांचें	,,
८४	३	जाणतां	देखोनि	२५

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
		अध्याय चवथा.		
२७	३	कुमार	पुत्र	२७
३८	२	खंडिलें निर्दयराशी	भेदिलें पापराशी	,,
४०	१	खगेंद्र	खगेश्वर	,,
५४	२	ललामाचिया खाणी	ललामाची स्वामिणी	२८
५६	२	समुदावो	देवसमूहो	,,
,,	४	प्रत्यक्ष	प्रसिद्ध	,,
७६	१	ठेविला नीरधीच्या तीरीं	ठेविला क्षीरनिधीच्या पारीं	२९
८२	१	उदधी	ऊर्ध्व	३०
९३	२	उठती	पसरे	,,
९४	१	कांचनरसाचा	कनकरसाचा	,,
१०१	३।४	ओढिते झाले मंदरागिरी । पुनरपि देवदानव	वेष्टुनियां मंदरागिरी । ओढिते झाले मागुती	३१
१२०	१	रंभा आणि	रंभारमणी	३२
१२७	१	ऐसें विषम देखोनि तेथ	ऐसें देखोनि त्वरित	,,
१३९	४	झाले हे	जोडलें	३३
१४४	१	अर्थांचेनि	कार्यांचेनि	,,
१४५	२	पोशिला	पुरविला	,,
१५१	४	ओपिन	पाववीन	३४
१६१	,,	ओपील	वाढील	,,
१६५	२	भ्रूसंकेत	हस्तसंकेत	३५
१७१	१	जयसिद्धि	जेथ सिद्धी	,,
,,	३	असुर	निसुर	,,
१७३	४	श्रीकृष्ण	श्रीविष्णु	,,
१७४	,,	प्राणत्यागें खंडेना	अमृतपान करावया	,,
१७६	३	पहा हो !	समयो	,,
		अध्याय पांचवा.		
४	४	तुझ्या घरीं	तव गृहीं	३६
६	१	पाचारूनि	बोलावूनि	,,

ओवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
६	२	सखेद	मुखें	३६
१२	२	वदला	बोलिला	३७
४६	१	अंशुमाळी	आकाशमौळी	३८
५०	४	अरुणासमीप पातल्या	अरुणाजवळी पावले	३९
७४	१	विषापरिस	वियाग्निपरिस	४०
७८	२	खगोत्तम	गरुडोत्तम	,,
८२	३	आगळे	भागले	,,
८६	१	घाडिलें	सोडिलें	४१
११३	४	कूर्म	कमठ	४२
११४	४	पळाले	पावले	,,
११५	३	साठी	कोटी	,,
१२२	१	अमृतानयनालागिं	लोकहितालागिं	४३
,,	३	आणिका	दुसरे	,,
१२४	३	शाखा	दोघां	,,
१२५	२	पादपशाखा	कनकशाखा	,,
,,	४	सावकास भक्षिले	भक्षण करूं लागले	,,
१३१	१	श्रीकद्रुविनतासौपर्णे	श्रीआस्तिकसहसौपर्णे	,,
,,	४	मुक्तेश्वर	कविकिंकर	,,

अध्याय सहावा.

२	४	वळी विष्णु	वळिष्ठ	४३
१९	४	कवळूनियां	काकूळती	४४
२४	३	करितें झाले	करूं लागले	४५
२७	२	तयानिकटीं	ऋपीनिकटीं	,,
४६	४	अनिमिष नेत्र झांकिती	निःशंक झांकिती लोचना	४६
६६	४	निर्वाण वेळा	ये वेळा	४७
८३	१	आपण	जाण	४८
९०	२	वहिला	तुजला	,,
९९	१	सहस्त्रगिरी	सहितगिरी	४९
१०८	१	एवं	ऐसें	,,

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
११२	१	सांगूनि	दावूनि	४९
,,	२	पातला	पावला	,,
१२४	१	एकत्र करोनि जनकजननी	जनक जाणि ते जननी	,,

अध्याय सातवा.

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
५	१	एळापत्र	व्याळपत्र	५१
,,	४	सुनामुख	सुदुर्मुख	,,
७	१	मुद्गर	मुद्गर	,,
२३	१	घेवोनियां	ठेवोनियां	५२
२७	४	होणें	राहणें	,,
३०	३	निकट	जवळी	,,
३१	१	परम भक्त म्हणोन	आत्मभक्त म्हणोनि जाण	,,
३६	४	ग्रासूं	शापूं	५३
५४	३	देहभाव	स्नेहभाव	५४
५७	४	याहीं साधावा	कांहीं परिसावा	,,
५८	१	रक्षूनि यत्नें	इच्छित रक्षित प्रेलें	,,
६४	१	कबरीं	करीं	,,
८४	३	विश्वामित्राहूनि	विश्वामित्रासमान	५५
११२	१	शापकर्वतें	पावकावर्तें	५७
१३०	२	सांडणें	अपाडा	५८
,,	३	मृत्युश्वाना	मृत्युस्थाना	,,

अध्याय आठवा.

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
४	२	भूर्ज	भूर्जें	५९
७	३	वेष्टित	रक्षित	,,
१४	२	अति	बहु	,,
३६	४	छळूनि	छेदूनि	६१
३७	,,	भंवडिलें	हिंडविलें	,,
५३	१	प्रत्युस्थानीं	मृत्युस्थानीं	,,
५६	२	हातीं	भक्तीं	६२

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
६३	३	एक पळत पळत	कोणी पळतां होती	६२
६६	४	हस्तकें	सकळिक	,,
६९	१	ब्रह्मशापाची	ब्राह्मणशापाची	,,

अध्याय नववा.

२७	४	आल्हाद	आनंद	६५
३३	२	निष्ठा संपूर्ण तत्वज्ञानीं	संपूर्ण पूर्ण ब्रह्मज्ञानी	६६
३४	१	व्यय शोभे	स्वयें बाल शोभे	,,
३५	३	पतिसेवे	पतिव्रता	,,
४९	२	श्वशुरगृहीं	स्वगृहीं	६७
५९	४	पल्लवें	आपुलें	,,
९५	३	जनमेजयें	राजा	७०
९७	४	संतोषती	आनंद पावती	,,

अध्याय दहावा.

६	१	नृपनाथा	लोकनाथा	७०
२२	३	उदिला	देउनि	७१
२६	१	तेणें	तेव्हां	,,
३०	४	माजला	झाला	७२
५९	२	त्रिकाळ	परम	७४
,,	४	आणावे	असावे	,,
६३	४	यज्ञकाळीं	येवेळीं	,,
६६	,,	तुळसीपत्रा	तुळसीदळा	,,
६७	२	पड्ग	खड्ग	,,
१०९	४	न जाय	सुटताहे	७७

अध्याय अकरावा.

६	२	तो ब्रह्मा शांडिल्य रव	तो ब्रह्मेशाभिरव	७८
२४	१	शरीर	प्रसाद	७९

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
२५	३	मग आहे	तरी तो	७९
२६	१	पहिलेंच	पूर्वीचें	,,
३२	१	भ्रम	श्रम	,,
४१	१	पुत्रा बोधी	त्याप्रति सांगे	८०
४८	१	रज्जू होवोनी सिंधुमथनीं	नेत्र लावोनि समुद्रमथनीं	,,
५३	३	मातेशी म्हणे	ते वेळीं माते	८१
५४	१	श्रवणीं	कानीं	,,
६०	४	अवघीं	ऋत्विज	,,
१६५	१	हृदयारविंद	दयाळवृंद	८७

अध्याय बारावा.

२४	१	विधिमंत्रें	विधिमात्र	८९
३३	४	फणींद्रें	पाहिजे	९०

अध्याय तेरावा.

३	३	माझिया	स्वामी	९१
८	१	साद्यंत	आद्यंत	,,
१४	३	विधिलें	विधिनें	,,
५२	१	ऐसी	असो	९४
६०	४	वद्वान्य	वदावया	,,
६४	३	कर्णगोचर	श्रवणसार	,,
६७	४	रचिलीं असतीं अद्यापी	रचिलीं तीं वसलीं अद्यापी	,,
७३	४	रायातें	तयातें	९५
७९	२	अधोमुख	सन्मुख	,,
८१	१	कक्षीं	वृक्षीं	,,
८५	४	ग्रासिलें	भक्षिलें	,,
९०	१	बाळकें	अर्भकें	९६
९७	१	वरोनि	वंदोनि	,,
११७	१	संपूर्ण	संपन्न	९७

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
१२६	१	पर्वता	पुरा	९८
१२८	२	अवधूतमूर्ति	अवधान मूर्ति	,,

अध्याय चवदावा.

५	१	ब्रह्मबीजें ब्रह्मक्षेत्रीं	ब्रह्मऋषी जे ब्रह्मक्षेत्रीं	९८
१३	४	द्रवला दयाळु	द्रवला बहुसाळ	९९
१८	२	गुणसागरा	सुरसहोदरा	,,
,,	४	सारा	कैसा	,,
३६	३	सूर्यवर्चा सुपुत्रवान	सूर्याचा पुत्र प्रवान	१००
,,	४	अर्कपर्ण	एक कर्ण	,,
४०	२	विद्यावरिष्ट	विद्याधरि	,,
४२	,,	समुद्र	चंद्र	,,
५३	३	ईश्वरु	विश्व	१०१
९०	२	प्राप्ति शमाची	प्राप्त सोमावि	१०४
९९	४	प्रसवली	प्रसिद्ध	,,
१०९	४	जन्मविले	जन्मविति	१०५
१२०	३	प्रकार कैसा	कौरवेशा	१०६
१३२	४	कुरुकुळीं	कुरुश्रेष्ठां	१०७
१४३	३	अवतरले	ऐकोनि	,,
१४८	१	उभय मिळूनी	उभयांश मिळणी	१०८
१६१	१	वेल्हाळी	गुण वेल्हाळी	१०९
,,	२	लावण्यलतिका कुचकुड्मळी	सौंदर्यकलिका कुचमंडळी	,,
,,	४	वेष्ठिला	वेढिला	,,

अध्याय पंधरावा.

३	४	सुगंध	सुंदर	१०९
३५	४	नक्षत्रीं	लक्ष्मी	१११
४१	१	घरचारमाझारी	घरचारइच्छाकामारी	११२
४३	४	सर्वांतें	मानसा	,,
७४	२	शाखांची	शास्त्रांची	११४
१०१	,,	नाम अभिधान	नामस्मरण	११६
१२६	४	कलशकुक्षीं	समुद्रकुक्षीं	११९

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
१३७	४	धरी वस्तु	स्ववस्तू	११९
१३८	१	धरोनी	म्हणोनी	,,
१४८	२	कन्याकारीं	कन्याकुमरी	१२०

अध्याय सोळावा.

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
५	३	कृपावंत	कृपायुक्त	१२१
१६	१	दुष्यन्त म्हणे	निर्भय होई	१२२
२०	,,	धरित्री	जगती	,,
३३	,,	शिरीषपुष्प	कुरळ पुष्पांतुल्य	१२३
६१	३	उक्तीं	श्रोतीं	१२५
७७	१	दश मास	वर्ष एक	१२६
७८	३	शकुन्तलेपासाव	शकुन्तलेय	,,
८४	,,	पौरवराजे याचेनि	पौरवजा तयांचे	,,
९०	३	पृथ्वी	त्रैलोक्य	१२७
९५	४	हेंचि	अती	,,
१०३	१	शब्द	दोष	,,
१०८	४	लोक देखती कौतुकें	अति साक्षेपें सर्वही	१२८
१३९	४	लिहिती	लिहविती	१३०
२४०	३	शासन	शोषण	१३६

अध्याय सत्रावा.

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
९	२	पार्थिवा	देवा	१३७
२	१	तयासि भार्या पवित्र दोन्ही	त्यासि स्त्रिया दोन्ही पवित्र जनीं	,,
५	,,	विषय	भिक्षा	,,
,,	२	याचितां	मागतां	,,
६	,,	वोपिलें	दिधलें	,,
८	१	अन्वयसंभूत सकळें	त्याचें अन्वयसंभूत काळें	,,
,,	२	संततिपरंपरा	सकळ संपत्ति परंपरा	,,
,,	३	सुपक्क	पवित्र	,,
,,	४	तुम्हा ऐसीं	तुम्हालागीं	,,

ओवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
९	२	ब्राह्मणकन्या	ब्राह्मणतनया	१३७
२०	३	सरी	थोरी	१३८
२५	२	लोकांचें	परांचें	,,
३०	४	त्या रीती	तें ऐक	१३९
३५	३	विद्या	अमृत	१३९
४१	,,	चतुर पुरुषातें शिकविणें	सर्वस्व जाणसी कवणें	,,
४२	४	कार्यसिद्धी	कार्यार्थ सूची	१४०
६५	२	श्वापदजठरींचीं	श्वापदउदरींचीं	१४१
,,	४	तत्काळीं	तत्क्षणीं	,,
७५	१	उशना	मुनी	१४२
७६	४	वधियेलें	मारिलें	,,
७९	२	मातें	माझें	,,
९८	२	लागे चरणीं	लोटांगणीं	१४३
९९	३	गोळीं	मेळीं	,,
१०८	,,	देखणेपण	वर्तन	१४४
१११	४	चमत्कार	प्रकार	,,
११३	३	द्वीपांतरीं	देशांतरीं	,,
१२७	४	नरकवास	निरयस्थान	१४५
१३०	४	पडे	होय	,,
१३३	३	निशाचरीं	या असुरीं	,,
१४२	१	कच	येरू	१४६
१४५	१	तूतें	मातें	,,

अध्याय अठरावा.

८	२	कामिनी	कुमारिणी	१४७
१२	४	चळसी	ढळसी	,,
१६	,,	याचका	भिक्षुका	१४८
४५	१	पोटिसीं	कंठासीं	१५०
८५	४	अति	परम	१५२
१०२	२	वोपील	अर्पील	१५३

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
१०४	३	ब्राह्मण	बोले	१५३
१०८	२	बैसका घातली	बैसण्या घातलीं	,,

अध्याय एकोणिसावा.

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
१	२	वसे	ते	१५६
४	,,	जैसें हाळाहाळा	हलाहलतुल्य	,,
१८	४	राजा	राव	१५७
२०	२	भाळीं रेखिला कस्तूरीटिका	भाळीं लेपिली कस्तूरीका	,,
४५	४	वदनीं	दृष्टीं	१५९
५१	,,	शिवितलें	वर्तलें	,,
५५	३	यालागीं	ह्मणोनी	,,
७६	१	शरीरीं	शिरीं शरीरीं	१६१
,,	२	कमठरूप	मर्कटरूप	,,
७८	४	खोकत	खेळतां	,,
८६	२	देईन	वोपीन	,,
९२	,,	पुरु प्रवीर	नृपवर	१६२
९४	१	मातृभोगकामा	मातृसंयोग आम्हां	,,
९५	२	कोपला अतिदुर्धर	क्षोभला सत्वर	,,
,,	३	अति निष्ठुर	दुर्धर	,,
९९	४	दुरात्मे	अराज्यें	,,
१००	४	दरिद्री	दुरात्मे	,,
१०१	,,	नीचयोनी	नीचानीच	,,
१०२	२	आरौतें	आतें	,,
,,	४	परम आदरें	प्रेमभरित	,,
१०३	२	पूरो ! तूं	परंतु	,,
१०८	४	गुण तुझे जगत्त्रयीं	तें तें संपूर्ण पावसी	,,
११०	२	वंशज	वीर्यज	१६३
१११	१	राज्यपदीं	भाग्यपदीं	,,
,,	२	भाग्यें	राज्यें	,,
११३	१	बोलतां	परम	,,
११४	३	वार्धक्य	लावण्य	,,

ओवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
१२०	३	अन्नें वसनें करुणावचनीं	अनृसंकाशा करुणागुणीं	१६३
१२१	३	जनमोहक	बहुमोहक	,,
,,	४	बहुवेषें	बहु विशेष	,,
१२२	१	आततांई	अतिअन्यायी	,,
१२३	३	पादघातें	चरणघातें	,,
१२४	,,	जिव्हा खंडविखंड	जिव्हा दंड खंड दंड	,,
,,	४	दुष्टाचें	तयाचें	,,
१२६	३	नन्तर	लोटतां	,,
१२८	१	तेवेळीं	ते त्रिवरीं	१६४
१३१	,,	भरितां	रिता	,,
१४०	२	राज्यधर	राजेश्वर	,,
,,	३	ज्येष्ठातें	श्रेष्ठातें	,,
१४४	४	मानसीं	निजधैर्य	,,
१४५	२	काम	संगम	१६५
१६८	,,	साहीत	साहोनी	१६६
१७३	१	परुषवचन	पुरुषें वचन	,,
,,	४	मागावें	म्हणावें	,,
१७८	२	मेरुसमान	मेरुतुल्य	,,
१७९	४	प्रासंगातें	या संगातें	१६७
१८१	३	कोपोनि म्हणे 'न धरिसी लज्जा	जें इच्छिलें तें झालें सहज	,,
१९०	२	हे नरेंद्र	एक	,,
१९१	१	संगें	योगें	,,
१९३	२	नृपाळ	नरभूपाळ	,,

अध्याय विसावा.

ओवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
६	१	जोडोनि	वंदी	१६८
३३	४	निद्रल्गीं बांधिलें	भोग भोगिले असंख्य	१७०
३८	,,	भोगिलें	लोटिलें	,,
५२	३	सागर	चराचर	१७१
५६	२	कवटाळिती	कंटाळती	,,
१०१	१	अरण्यवासी	वनवासी	१७३

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
१०१	२	अवगुण दोषी	अवगुण अरिष्ट दोषी	१७३
१०२	३	अक्षय पदीं	अक्षयसिद्धीं	,,
१०३	,,	मनें	प्राणें	,,
११५	,,	पुढें श्रवण	परी दृढ कारण	१७४
१२०	२	तयासी	दोन्हीं त्यासी	,,
१२१	१	अनग्नी-अनिकेतन अगोत्राचरण	अनाग्नि आणि केतन	,,
,,	२	कौपीनावीण न ठेवी वरून	अगोत्राचार कौपिन	,,
,,	३	प्राणधारणमात्रें अशन	असें तंव न वांछि वसन	१७५
१२३	३	मुनी मौनअचळनेमा	ईश्वरचरणीं निष्काम	,,
१२६	१	ऋषीं बळ	कर्षीले देह	,,
१३०	३	परमार्थी	परमार्थपंथीं	,,
१३४	४	तुळणा	उपमा	,,
१३७	१	तेथील	कथिले	,,
१४२	,,	प्रकाशें	मुखप्रकाशें	१७६
१६७	,,	व्हावया	थावया	१७७

अध्याय एकविसावा.

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
३	२	दृष्टीं	पोटीं	१७८
,,	४	पीयूषपानासारिख्या	अमृतपानासारिख्या	,,
५	३	आदिकेशव	आदिविष्णु	,,
१४	१	संयांति दृषद्दुहिता	शर्यातीनंदनदुहिता	१७९
१८	२	दुसरी	सुंदरी	,,
२०	३	परमगुणी	पवित्रगुणी	,,
२४	१	याचि नामें	मर्यादाचे नामें	१८०
३३	,,	जेणें हस्ती आपण । आपल्या नामें हें पट्टण । बसविलें म्हणोनी सकळ जन । हस्तनापुर बोलती ॥	आपुल्या नामें हें पाटण । वसविलें म्हणूनी सकळीक जन । पृथ्वीवरी हेंचि जाण । गजपुर बोलती ॥	,,
३७	१	ऋक्षा	नागा	,,
४६	२।३	तें नूतन होय निकें । यालागीं शंतनू त्यास मुखें ।	यासाठीं शंतनू व्यासमुखें । लोकत्रयीं कौतुकें ।	१८१

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
५४	४	विचित्रवीर्या वोपिल्या	पवित्रवीर्या आर्पिली	१८२
६३	२	शापवचन	शापदारुण	,,
,,	३	व्यसन	निधन	,,
,,	४	वंशकार्य स्तब्ध झालें	संततीचे वीर्य स्तब्धलें	,,

अध्याय बेविसावा.

२१	१	म्हणोनि	यालागीं	१८५
२८	४	ऐसें विचारावें	ऐसे विचार	१८६
३०	२	कुमार	पुत्र	,,
५३	,,	चित्त	अति	१८८
५६	४	झगटों	स्पर्शों	,,
६४	२	गुणवेल्हाळा	गुणविशाळ	,,
,,	३	अतिविशाळा	अद्भुतप्रबळ	,,
६६	४	पुत्रार्थी	पार्थिव	,,
६७	२	कंदमूळजीवन	कंदमूळफळजीवन	,,
९१	१	त्वरें	रायें	१९०
१२३	४	घडे मातें तुमचेनी	तें तुम्ही अवश्य करावें	१९२
१३४	३	ईश्वरभुवनीं	स्वर्गभुवनीं	१९३
१५९		अष्टम पुत्र देईन तूतें । म्हणोनि दिधलें शब्दातें । विसरलीस सत्यनेमातें । आतां भेटोनी सुख देई ॥	अष्टम पुत्र देईन तूतें । विसरलीस सत्य नियमातें । आतां भेटोनियां मातें । बोल काहीं सुखवार्ता ॥	१९४
१६२	१	पदकमाळा	रत्नमाळा	,,
१६३	,,	वाढविला	पाठविला	,,

अध्याय तेविसावा.

८	२	वेल्हाळा	अबळा	१९६
३५	,,	पूर्ण	जाण	१९७
४२	,,	ब्राम्हण	बहूत ब्राम्हण	१९८

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
४४	३	तरी न पडावें दीर्घ यत्नातें	तरी न करावें दीर्घ प्रेत्नातें	१९८
४८	१	मंत्री	पुत्र	,,
५१	४	अवश्य करावें	अवश्य ऐसें केलें पाहिजे	,,
५३	३	थोर	जाणार	,,
७९	२	स्वीकारिलें	अंगीकारिलें	२००
८१	३	परमा गती	अमर गती	,,
९३	४	स्वसेना	सर्वस्वें	२०१
१०८	३	जेंवी पातल्या	नाना देखोनी	२०२
१६१	१	मिष्टान्न भोजनें तृप्ती	भोजन पंक्तीं	२०५

अध्याय चोविसावा.

२	२	शोकावस्था	शोकान्नी व्यथा	२०६
१४	४	गुणलावण्य	रूपलावण्य	,,
२६	१	देखोनि	परिसोनी	२०७
४२	२	आलें	पातलें	२०८
६३	३	वर्षं एक नेमस्त	वर्ष एक नियम बुद्धिवंत	२०९
९२	४	भीष्मातें	तृप्त करी कर्णातें	२१०
१११	३	एवं गंधर्वतुल्य	देवगर्भातुल्य	२११

अध्याय पंचविसावा.

४	२	तिष्ठे	ठेला	२१२
१२	३	करबंधनीं	दंडधरानीं	,,
१३	४	शूळदंड त्या कीजे	शूळदंडीं दंडावें	,,
१७	१	सखेद	खगेंद्र	,,
५५	४	बहुसाल	सर्व	२१५
७४	२	राजा	पिता	२१६
८९	,,	तारुण्यदशा	तारुण्यकला	२१७
९४	४	विश्वातें	सर्वांतें	२१८
९५	१–३	कौतुक सांगिजे ऋषिजनीं । अति	कौतुक सांगिजे ऋषिश्वरीं । सु-	

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
		सुंदर सुबळनंदिनी । तिची वार्ता हे श्रवणीं ।	बळात्मजा अति सुंदरी । तिची वार्ता हो! चतुरीं ।	२१८
९६	२	गिरिजाकांत	गिरिजानाथ	,,
,,	३	लाधली	मिळाली	,,
१०३	२	वरी बुद्धी	वरिष्ट बुद्धी	,,
१०७	२	लावण्यनिधी	सौभाग्यसिद्धी	,,
११९	३	भक्ती	प्रीती	२१९
१४१	४	वंद्य	भूषण	२२१
१४९	३	जननी जान्हवी स्नेहाळ	वाहात जाय ते जान्हवी कल्होळ	,,
१५५	१	सांग	विद्या	,,
,,	३	सर्व विद्येनें	आदि विद्येनें	,,
१६४	१—३	तयाहूनि तूं विशेषा । अंगीं ऐश्वर्याचीं दशा । मिरवतां हे परम पुरुषा ।।	तयाहूनि गुणी तुलें पुरुषा । आंगीं आगळी तुझी दशा । मिरवत महा पुरुषा ।	२२३
१६७	३	म्हणे हे खेचरी अगाध काळ-व्यक्ती	म्हणे हे निर्वाण मांडल्या अंतीं	२२४
,,	४	मृत्यु देती वैरियां	प्रयोजावी संग्रामीं	,,
१७५	१	सागर	चतुर	,,

अध्याय सव्विसावा.

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
१	१	वंदे व्यासशिष्य	वेदव्यासशिष्य	२२५
९	२	हस्तिनापुरा आला नृपनाथ	आला गजपुरा नगरनाथ	,,
,,	३	लाऊनि त्वरित	लावी त्रिध्युक्त	२२६
१३	,,	कीं प्रतापनिधीचें जळ	कीं प्रताप अंबुनिधी कल्लोळ	,,
,,	४	उत्साहवातें उसळलें	उत्साहें उसळती	,,
१८	३	अपरिमित	असंख्यात	,,
१९	४	जो कां वाहे अयोध्ये	जेणें वंद्य अयोध्या	,,
२४	२	गजप्राय	योजनप्राय	२२७
३६	४	रथारूढ पैं झालें	रथारोहण केलें	२२८
४३	२	एक दीधला विदुरातें	एक निवेदी त्रियांतें	,,
५८	४	मज सांगें	सांग पां	२२९

ओवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
६७	२	सांवळी करी रोदन	श्वसली करित दीर्घ रोदन	,,
८५	३	पृथ्वीतळीं	भूतळीं	२३०
,,	४	संहारिल या योगें	नाश पावती यासंगें	,,
९१	३	बुडवीं	घालीं	२३१
१०७	१	ऊर्णनाभ दुर्दर्शन	विकटशम सुदर्शन	२३२
१०८	२	चित्रकुंडल	दीर्घसूत्री लोचन	,,
,,	४	निषंगी	महाबळी	,,
१०९	१–४	उग्रायुध सुषेण भीमकर्मा। कुंडधार महोदार दृढवर्मा। दृढपाशी नरेंद्रोत्तमा। सोमकीर्ती चित्रायुध अनूदर॥	उग्रायुध भीमकर्मा। कनकागुध दृढयुद्ध ब्रह्मकर्मा। ब्रह्मक्षेत्री नरेंद्रोत्तमा। सोमकीर्ती तदनंतर॥	,,
११६	४	नरवर्या!	नृपवर्या!	,,
११८	१	एकशत	एकोत्तर शत	,,

अध्याय सत्ताविसावा.

ओवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
२४	२	प्राणनाथा!	सर्वज्ञनाथा! व कृपावंता!	२३४
४०	२	महा विशाळ गिरी	नागसह गिरी	२३५
६१	,,	सहदेहें	स्ववीर्यें	२३६
७०	३	संतती वर्ते	संततीवंत	२३७
७३	,,	पितृश्राद्धादि गयावर्जना	पितृश्राद्धीं पितृच्या ऋणा	,,
८४	४	ब्रह्मवीर्यें सर्वज्ञे!	ब्राह्मणवीर्यें सर्वथा	,,
८६	३	मन्वादिक	उत्तम लोक	२३८
९३	१	देवरापासोनी	देवांपासोनी	,,
,,	४	मान त्यातें निर्धारें	जाण पां	,,
१३२	,,	मान्य श्रेष्ठा तो नव्हे	मान्य शिष्य तुम्हांसी	२४०
१३३	३	सृष्टिरचनें	सृष्टी स्वनेत्र	२४१
१३७	,,	चुंबन	स्पर्शे	,,
१८५	४	पाडीत	पीडित	२४४
१९०	,,	जागवीं	तेववीं	,,
१९२	,,	मानसीं	सांग पां	,,
२१४	,,	स्मरोनी	म्हणोनी	२४६

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
२१९	४	घातलें	सूदलें	२४६
२२०	१	प्राणनाथा!	धरित्रीनाथा!	,,
,,	४	केला पाहिजे	करीं लौकिकी	,,
२२४	,,	प्रणवबीजसहित	प्रणवबीजें मंत्रोक्त	२४७
२३०	२	व्यास वदला	व्यासें लिहिलें	,,
२३१	३	मुक्तेश्वर प्रार्थनें	मुक्तेश्वर प्रार्थुनि	,,
,,	४	डुळती	डोलवी	,,

अध्याय अठ्ठाविसावा.

१	४	त्या ठाया	भूतळीं	२४७
३६	,,	विचित्र	पाहे पां	२५०
६७	,,	सर्वस्नेहें	परमस्नेहें	२५२
७६	२	हृदयांतरीं	हृदयोदरीं	२५३
,,	४	दुःख भोगिलें या हेतू	दुःखभागिनी जाहलिया	,,
८९	३	नयन	लोचन	,,

अध्याय एकुणतिसावा.

२	४	प्रेमानंद	परमाल्हाद	२५५
३२	३	उक्ती	शक्ती	२५७
५६	,,	निर्मळ पोटीं	निर्मत्सर पोटीं	२५९
६३	४	असेना	दिसेना	,,
८३	१	एक मधुर शिखरिणी	एक मंडक[1], रस शिकरिणी	२६१
९९	२	बांधोनि	बळें	,,
११२	३	देखोनि	अवलोकुनि	२६२
१३२	३	श्रेष्ठ जोडी परम हे मंद	श्रेडीपरी (?) हे मंद	२६४
१३५	४	आमुतें	आम्हांही	,,
१४१	,,	निर्घात	निदांध	,,
१५३	,,	पूज्य	पूर्ण	२६५
१६४	२	परम दुःख	शरीरदुःख	२६६

१. मांडा, पक्वान्नविशेष.

ओवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.

अध्याय तिसावा.

ओवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
१९	४	परम आल्हाद	अत्यादर	२६८
२२	,,	दीधलीं	वोपिलीं	,,
२९	,,	निर्धारें	निश्चित	,,
३७	३	विद्या निपुण	परम निपुण	२६९
,,	४	पूर्ण तैं	होती तें	,,
३८	३	विद्यावित्त	विद्या बहुत	,,
३९	१	विस्तारोनि	सविस्तर	,,
४५	४	लाधला	शीकला	,,
८१	४	मंदला	मावळला	२७२
१०७	,,	देखोनी करी हास्यातें	जाणोनियां रहस्य	२७४
१२२	३	झाला आमुतें	ये पंथें	२७५
१२८	४	पाह्यतसें	विचारीं	,,
१३१	,,	आतां	येथें	,,
१३५	३	सरे तंवपर्यंतें	हरे तंव निश्चितें	,,
१७७	४	संभार	पसारे	२७८
२३०	२	जळचर	जळग्रह	२८१
२३८	३	परि संकटाचे	दृष्टी पडेल ते	२८२

अध्याय एकतिसावा.

ओवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
१	१	कौरववीरा !	कौरववरा ! व कौरवेश्वरा !	२८२
२	,,	बाल्हिक	द्रोण	,,
१७	,,	शुद्ध कनकाचीं	सुगंध कनकाचीं	२८३
३८	२	कोयते कातरे कटारिया	कितीक तीर कतारिया	२८५
४१	३	शस्त्रसाधन	शस्त्रसंधान	,,
५२	४	गौड युद्ध या नावें	तें गौड युद्ध जाणावें	२८६
१०३	३	दचकोनियां	ऐकोनियां	२८९
१०५	४	शोभला	साजिरा	,,
११४	३	अहंकार	गर्व	२९०
१२८	४	शेवटीं	विचारीं	२९१

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
१३५	४	प्रसवला	ओढवला	२९१
१५१	२	तरी हा करीन अंगराजा	कर्ण करावया राजा	२९२
१५४	,,	सुवर्णघट	कनकघट	,,
१८८	४	झळकती	चमकती	२९५

अध्याय बत्तिसावा.

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
१७	२	अश्वस्वार	असीवार	२९८
२७	,,	आपुले दास	माझे शिष्य	,,
६२	१	चाप	बाण	३०१
७४	४	पांचाळहातें	द्रुपदहस्तें	,,
७५	१	महाडोहीं	समुद्रडोहीं	,,
७९	२	कौरवभार	कौरववीर व कौरवसंभार	३०२
८१	,,	राज्यलक्ष्मी	सर्वलक्ष्मी	,,
८७	४	पुरुष पावे प्रारब्धें	पुरुषत्व नव्हे प्रारब्धें	,,
१०५	५	पांडुरंगक्षेत्र	पुंडलीकक्षेत्र	३०३

अध्याय तेहतिसावा.

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
७	४	भीमास	भीमसेना	३०४
९	१	नीतिशास्त्र	नीतिज्ञान	,,
१६	२	सहसा	कदा	३०५
१७	१	देऊनि	योजूनी	,,
२०	३	प्रथम उत्तर दिशेचा नाहो	रथ कुंजर अश्वादि हो	३०६
२१	२	केल्या नये	करितां नयेचि	,,
२६	१	धेनू	अश्व	,,
२८	४	क्षयो झाला निर्धारें	क्षय लागला स्वभावें	,,
३६	४	श्रवणीं	कर्णीं	,,
३८	२	दत्तात्रेय	अवधूत व दिगांबर	३०७
,,	३	त्याचेनि नामें	त्याचे प्रसादें	,,

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
		अध्याय चौतिसावा.		
१	४	निर्धारें	आपुले	३०७
४	१	अमृतकळेचें	अमृतफळाचें	,,
१०	२।३	या क्लेशाचा अपायवारा । अंगा न लागे तंव परिहारा ॥	अंगा न लागो म्हणूनि परिहारा कीजे अत्यंत कपटाचारा ॥	,,
१२	३	अंकीं धरिला	अधिकारितां	,,
२८	४	उचित	आपण	३०९
२९	,,	नानायत्नीं	सर्व रीतीं	,,
३०	,,	मानावीं	कल्पावीं	,,
३२	,,	असला	केला	,,
४४	२	कथीन	निरोपी	३१०
७२	,,	दडाला	पळाला	३१२
८०	१	हा व्यक्त न दाखवितां विरोध	बाह्य न दाखवी जो विरोध	,,
९३	४	जैसें जगातें	जेंवि आंगातें	३१३
१०४	४	जेंवि	जीववी	३१४
१०५	३	नये कामा	तितुकी आम्हां	,,
		अध्याय पस्तिसावा.		
१	२	अस्त्रविद्येंत श्वेतवाहन	अल्पविद्या दुर्योधन	३१४
,,	३	राजनीतिनिपुण	हा राजा निपुण	,,
४	१	अवघे मिळोनी एकमतें	सर्व मिळूनि एकचित्तें	,,
८	१	राया	पितया	३१५
,,	४	ज्ञात करीं स्वत्राचे	अनर्थ करीं सर्वांचा	,,
५७	३	मढोनियां	वेढोनियां	३१८
६५	२	तेथें ठावुकें न पडे आना	तेथें केवीं पडे ठावुकें आना	,,
,,	३	ऐसिये बुद्धी विचक्षणा	ऐसिया युक्ती शाहणिया	,,
६६	४	जाइजे	घेइजे	,,
६८	१	आदींच शंखध्वनीचा उल्हास	शंखध्वनीचा संतोष	,,
६९	२	आल्हाद	आनंद	,,
,,	३	मृग	कुरंग	,,
७४	,,	सकळ	सर्व	३१९

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
१०८	३	सोसिली	भोगिली व वरिली	३२१
११२	१	सत्वर	सर्व	,,
११३	४	सन्मुख	असंख्य	,,
११६	३	संपत्ती	संपदा	,,
,,	४	वोळंगती	लोळती	,,
११८	,,	नरेंद्रा	नरेशा	,,
१२०	३	चित्र विचित्र राजसदन	हिरे माणिकें करून	,,
,,	४	धर्मालागीं निर्मावीं	चित्र विचित्र निर्मावे	,,

अध्याय छत्तिसावा.

७	४	अपाय दृष्टी	उपाय दृष्टीं	३२४
१४	,,	अनंत	ते वेळीं	३२५
२४	,,	लाविली	दाविली	,,
४१	२	मोडिजे	सोडिजे	३२६
४८	३	ग्रासी	जाळी	,,
५६	१	वनदेवता	तंव देवता	३२७
,,	४	एकसरें	अप्सरा	,,
१०६	२	अगाध	तुंबळ	३३०
,,	३	कल्लोळ	वल्ली	,,
१०८	३	अति तांतडी	बहु तांतडी	३३१
१११	१	साहीजण	दुरूनि	,,
१२१	४	गुरू	सद्गुरू	,,
१३८	२	रुळती	स्पर्शल्या व लोळती	३३२

अध्याय सदतिसावा.

११२	३	ओघजनीं	बोधे जनीं	३४१

अध्याय अडतिसावा.

१	१	नगरी आंत	पुरी आंत	३४२
,,	२	गृहीं	घरीं	,,
५	४	प्रिय	वंथ	,,

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
१७	३	अरिष्टाचा	अनर्थाचा	३४३
१८	४	ज्ञानविचार	श्वानवेषें	,,
२४	१	शरीरेंसी वित्त	शरीरसंपत्ति	,,
६६	२	श्रेय	श्रेष्ठ	३४६
६८	,,	उदेल्या स्वर्भानू	उदेला सुभानू	,,
७०	३	गाडा भरोनि भीमसेन	गाडा भरोनियां जाण	,,
,,	४	बकारण्या पातला	भीमसेन निघाला	,,
७६	,,	शिर च्छेदी आपुलें	शिर च्छेदीं मी याचें	,,
८५	,,	उताणा	सन्मुख	३४७
८६	३	साहूनि	वारुनि	,,
८७	२	कंठप्रदेशीं	कटिप्रदेशीं	,,
,,	३	मान	माज	,,
८९	४	यशस्वी	जयस्वी	,,
९२	२	यमाऐसें	बकाऐसें	,,
१०३	२	केला	जाला	३४८
,,	४	केंवि साचार मानावें	हें साचार तैसेंची	,,
१०४	,,	द्विजातें	सप्रेमें व साल्हादें.	,,

अध्याय एकुणचाळिसावा.

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
२	१	आर्ती	वस्ती	३४८
,,	४	राहविला	पूजिला	,,
१०	३	अवमानाची	दुःखाची	३४९
१६	२	ज्ञानू	निपुण	,,
३९	४	साजिऱ्या	शोभित	३५१
४३	२	देईन अनर्घ्य	अनर्घ्य ओपीन	,,
४६	४	आकर्णा	ऐक पां	,,
६३	३	राजा	पांचाळ	३५२
६४	,,	स्वरूपें	कौशल्य	,,
९३	३	तुम्हां पांचाजणांची पत्नी	अरण्यवास ते त्यजुनि	३५४
,,	४	ते होईल निर्धारें	राजधानीं पावली	,,

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
		अध्याय चाळिसावा.		
१	२	क्रमितां	चालती	३५५
१७	४	तात्काळिक पावसी	सत्वर सद्य येथें पावसी	३५६
३३	३	देखिजे	पाहावें	३५७
३४	४	करीन	करीन निर्धारें	,,
४३	३	अंगीकारूनि	स्वीकारोनी	,,
४४	४	निपले	तेजस्वी	,,
४६	३	काज	प्रयोजन	,,
,,	४	तुजपाशीं	तुजप्रती	३५८
५४	३	पुढती पाहे सावध होवोनी	सावध होवोनी देखे नयनीं	,,
६०	४	रातला	गुंतला	,,
६२	,,	पडल्या	पडत्या	३५९
६८	३	तरी शांतीचा उदधी	परी शांतीचा अमृतउदधी	,,
७१	,,	आला	पातला	,,
७७	४	ते केंवि तुज यावी ?	केंवी यावी सांग पां ?	,,
८१	३	फोडोनि	हाणोनी	३६०
८६	२	त्रासिलें	नाशिलें	,,
१०४	३	शक्ति	मृत्यु	३६१
११२	२	मध्यरात्री	अर्धरात्री	३६२
,,	४	जातसे	चालली	,,
११४	१	अदृश्यंती देखोनी पाठीं	अदृश्यमती पाहूनी दिठीं	,,
११६	३	परमहर्षा	परमपुरुषा	,,
,,	४	परतला	पातला	,,
१२१	,,	राज्यपदीं	राज्यासनीं	,,
१२२	२	फिरतां	हिंडतां	३६३
,,	४	राक्षसेश्वरें	ऋषीश्वरें	,,
१२५	१	क्षया	लया	,,
१२६	,,	वदोनि	देऊनि	,,
१२७	४	जन्मविला	उपजवी	,,
१३२	३	ऐकोनि	परिसोनी	,,
१३९	,,	ब्राह्मणांसी	विप्रांशी	,,

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
१५३	३	पावकीं रिचवोनी पाठोपोठीं	पडोनियां हव्यवाटीं	३६४
,,	४	असंख्य	अपार	,,
१५४	,,	हुताशीं	असंख्य	३६५
१६२	२	टाकिला	सोडिला	,,
१६४	४	उभयतां	समस्तां	,,
१६७	,,	चालले	पातले	,,
१६९	,,	कृपेनें	श्रोतीं	,,

अध्याय एकेचाळिसावा.

६	४	झळकती	मिरविती, व, फडकती	३६६
१७	,,	लावूं	आणूं	३६७
२७	,,	नेणवे	कळेना	,,
३४	३	सुधुम्न चित्रसेन कुमर	अश्वत्थामा दंडधार	३६८
५८	४	मज आजी	मजलागीं	३७०
७२	३	फिरतां मत्स्य सकंप	फेडुनी मत्स्याचा संकल्प	३७१
७७	,,	पुष्पमाळा	सुमनमाळा	३७२
७९	२	यलें	बळें	,,
८६	३	राजेश्वरा	राजकुमरा	,,
८७	२	रिघों पाहे	लपों पाहे	,,
९५	४	कौतुक कांहीं देखसी	कौतुक दृष्टी पाहावें	३७३
९९	,,	विलोकीं	पाहें पां	,,
१०६	३	सैंवरा	शेवट	,,
११२	,,	अस्त्रशस्त्र	यंत्रशस्त्रें	३७४
१३२	१	वेगीं	लागीं	३७५
,,	२	शिवला	शिवाचा	,,

अध्याय बेचाळिसावा.

३	४	भूपती स्वनगरा	नृपती संस्थाना	३७६
६	२	वांटोनि द्या पांचहीजण	वांटोनि भिक्षा अवघेजण	,,
,,	३	तुम्हा अक्षय कल्याण	तुम्हा अक्षयी शुभ कल्याण	,,
,,	४	असो वाढतें सर्वदा	असो. तुमतें पुत्र हो	,,

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
२१	४	वाडिलीं	वाट	३७८
२३	१	पंक्ती	भक्ती	,,
२७	,,	उद्वेग	उद्योग	,,
२८	२	कवणा भणगा घरीं	कोणाचे पदरीं	,,
,,	४	शूद्र	शूद्रजाती	,,
३०	१	अखंडज्योती	रत्नज्योती	,,
३५	२	रजनीचे पोटीं	निशापोटीं	३७९
५६	१	विस्मय	निश्चय	३८०
६३	२	नानाविधें	अनेकविधें	३८१
७१	४	फेडिला	छेदिला	,,
९०	३	सर्वज्ञ	वडिल	३८२
९६	१	पांचही वर	हें वरातें	३८३
९६	४	सुचेना	नाठवे	३८३
१२१	,,	चळचळा	थरथरा	३८४
१२२	३	चौघे	पांच	३८५
१२५	१	मूर्तिमंता	पुत्रवंता	,,
,,	२	कांता	वनिता	,,

अध्याय त्रेचाळिसावा.

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
२७	२	सोयरे	सेना	३८८
२८	३	कुंकुमें चर्चिलीं	कस्तुरी रेखिली	३८९
५०	१	इंद्रातें	मघवातें	३९०

अध्याय चव्वेचाळिसावा.

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
१६	४	तैंवी शोधूनि मारावे	अतिलगवगां हाणावे	३९३
१७	३	द्रुपदसहित पांडुपुत्र	द्रुपदेशीं पुत्रपौत्र	,,
१९	४	वैरी	शत्रू	,,
३३	२	धर्म अंतरींचा	धर्महृदय	३९४
३५	४	यथासुखें नांदावें	यथापूर्वक वर्तावें	,,
३८	२	कार्यजातीं द्विधा चित्त	कार्यें वर्तती द्विविध चित्त	,,
४२	,,	न जिंकितां	न जिणवे	,,

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
६९	२	नावेक	अनेक	३९६
१०१	,,	लागले लागा	पावले सवेगा	३९८
१०२	४	मेघमंडळातें	मेघपटलातें	,,

अध्याय पंचेचाळिसावा.

१०	४	यत्न आम्हीं करितसों	यत्न कांहीं दिसेना	४००
१४	३	माझा	तुझा	४०१
१५	४	सर्वज्ञा !	सुपुत्रा !	,,
२८	१	वेळेसारिखें	बळासारिखें	,,
३२	३	त्रिभागांसीं	सर्वांपाशीं	४०२
३७	२	इहीं	इष्ट	,,
४९	,,	सद्गुणीं आथिले	सद्गुरू कथिले	४०३
५८	,,	पृथ्वीवरी	चराचरीं	,,
६३	३	शब्दाचें	शिष्टाचें	४०४
९३	,,	वाक्य	आज्ञावचन	४०५
१२०	३	पूजिली	येऊनि	४०७
१२०	४	गौरवूनि	गौरवीली	,,
१२३	३	सदना	नंदना	,,
१२८	१	कांहीं	किंचित्	४०८
१३९	४	येथें	आतां	,,
१५५	१	आज्ञा वंदूनियां	आज्ञा समर्थ म्हणोनियां	४०९

अध्याय शेचाळिसावा.

५	३	लोड तिवासे	लोड भद्रासनीं	४१०
८	१	अमरपाळा !	वज्रपाळा !	,,
३३	२	सकळा	विमळा	४११
४४	४	तेणें सिंची	तें जाणे	४१२
४६	,,	सर्व तुम्हीं	अत्यादरें	४१३
५५	,,	तेथें	वनीं	,,
५९	३	साहून	जीवन	४१४
६६	,,	देशां पळवुनि	देश लुटुनि	,,

		मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
९३		तपस्वी ऋषेश्वर	देव ऋषी	४१५
	२	सत्वरा	ऋषीश्वरा	४१६

अध्याय सत्तेचाळिसावा.

८	१	चित्रशाळे	मंदिरीं	४१७
८४	३	शांर्गधर	गदाधर	४२४
८६	२	कामिनी	पत्नी	४२५
९९	४	नी वारीन	निवारीन	,,
१२०	१	कन्याहरण	स्वयंवरीं हरण	४२६
१२१	,,	क्षीरसमुद्र	धीरसमुद्र	४२७
१३२	४	किवाहीं आपिली	देवी दिधली	,,
१३८	२	अर्जुन	निकेतन	४२८

अध्याय अठ्ठेचाळिसावा.

२०	४	आमुतें	संधातें	४३०
२३	३	आणिक	अमोलिक	,,
३१	,,	मुक्ताभरणें	कंठाभरणें	,,
४४	२	शार्ङ्गधरा	दामोदरा	४३१
४९	४	रोधलीं	कृष्णाशीं	
५२	,,	द्रौपदेत ते जाणावे	द्रौपदीकुशीं जन्मले	४३२
७१	२	बोळंघती	पाठविती	४३३
१०३	४	परिसणें	साक्षेपें, व, ऐकिजे	४३४
१०६	,,	आम्हां दीनाकारणें	आम्हालागीं देवराया !	,,

अध्याय एकुणपन्नासावा.

१९	४	आदरिला	मांडिलें	४३७
३९	,,	हरिहरचिंतनें	हरिहरकीर्तनें	४३८
४७	,,	भक्ष्य	भोजन	४३९
५०	,,	आत्मरूपा तूं	आत्मया रामा ! तुज नमो.	,,
६४	३	कृष्णार्जुन	विष्णु अंशें	,,

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
७३	४	भूतांतें	जगातें	४४०
८४	२	बाणाचा	रथाचा	४४१
८९	,,	कर्पूर कर्दळीकेतकीवनें	कर्पूरकदलीनंदनवनें	,,
९१	१	अठराभार	असंभार	,,
९२	३	स्वादास्वाद	स्वानंदस्वाद	,,
९३	१	सप्तजिव्हा	तप्त जिव्हा	,,
१०१	,,	रागें	करार्ग्रे	४४२
१११	३	मंदेह पौलोम	मध्यपाळ	४४३
१२१	४	धनेश्वर धाविन्नला	निघाला तो लवलाहें	४४४
१२४	,,	'फिरा' म्हणे	फिरवूं म्हणे, व, हटवूं पहे	,,
१३१	३	टाकिले समुद्रजीवनीं	पडिले सिंधुजीवनीं	४४५
१३५	,,	पांडुकुमरें	कुंतिकुमरें	,,
१५१	१	प्राणभयें	पावकभयें	४४६
१५५	४	सुधा	क्षुधा	४४७

अध्याय पन्नासावा.

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
५	१	श्रेष्ठधर्मज्ञाचिये	स्वधर्मराजाचे	४४७
,,	३	शंसितव्रती	शंसितवृत्ती	,,
२१	,,	वन्ही जाळील खांडववना	म्हणे अग्नि लागेल वना	४४८
३६	३	म्यां जाऊनि मृत्युलोकीं । किती काळ वांचणें ॥	मी किती काळ वांचावें लोकीं । सांगा मज पुत्र हो ! ॥	४४९
४१	४	निर्धारें	आमुतें	४५०

उपसंहार.

ओंवी.	चरण.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठांक.
२	१	शर्व	शिव	४५५
,,	२	ऋषीमाजीं भार्गव और्व	संगीत कथेचें गोरव	,,
१२	३	कळे न कळे ऐसें	लेश न भावें कैसे, व, लेखन भावें कैसें	४५६

२. अधिक पद्यें.

अध्याय २ रा, ओंव्या १२५-१२६ यांमध्यें:—

मर्यादा रेखेहूनी आरुति । सिंधुलि यावयाची कैंची प्राप्ती ।
उदयाचलावरी गभस्ती । उभा ठाके निशांतीं. ॥ १२६

अध्याय १३ वा, ओंव्या ४०-४१ यांमध्यें:—

अर्थशास्त्र धर्मशास्त्र । हेंचि एक मोक्षशास्त्र ।
चत्वार वेद आणि शास्त्रें । ऐकिलीं होतीं या श्रवणीं. ॥ ४१

अध्याय ३० वा, ओंव्या १७८-१७९ यांमध्यें:—

दृष्टीं देखिले द्रोणरुप । तयाचा ऐसा मृत्तिका लेप ।
सुंदर निर्मुनी साक्षेप । अहोरात्र पूजेचा. ॥ १७९

Digitized with financial assistance from
Dr. Gersan Da Cunha
on 19 February, 2019